
ब्रह्मर्षी दत्त महाराजांचे सान्निध्यात

शशीकांत दि. नागले



।। श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ।।

ब्रह्मर्षी दत्त महाराजांचे सान्निध्यात



शशीकांत दि. नागले

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस :
माघ वद्य ६, शके १९३५
२१ फेब्रुवारी २०१४
प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर वर्धापन दिन

मुखपृष्ठ :
श्री. सुरेंद्र शिंदे

मुद्रक :
रमा एन्टरप्रायझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : ०२२-२३८६७०४९/२३८५२८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक :
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगरासमोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२-२३६८०५/२४०१०२

।। श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ।।

मनोगत

'सोनियाचा दिवस आजी, अमृते पाहिला।'

श्रींच्या सहवासातील प्रत्येक क्षण अमृतमय होता. त्या त्यांच्या सान्निध्यातील अमृतमय स्मृती त्यांच्याच कृपेने, प्रेरणेने उत्स्फूर्त होऊन कागदावर साकार करण्याचा हा प्रयत्न झाला आहे. त्या क्षणांची अनुभूती यथार्थपणे जशी अनुभविली तशीच लिहून काढणे म्हणजे 'नेति नेति' म्हणण्या सारखेच आहे. ''स्मरण तुझे मज नित्य असावे तव गुण भावे गावे!''

प.पू. महाराजांचे झालेले त्या त्या प्रसंगांतील सगुण दर्शन, त्या त्या वेळी उपस्थित असलेल्या आमच्या गुरुबंधूंना आणि ज्या ज्या भक्तांना हा सोहळा 'सद्गुरु दर्शनाचा' लाभला नसेल त्यांना अंशत्वे तरी ह्या प.पू. श्री महाराजांच्या सान्निध्यातील स्मरणगाथेतून अनुभवण्यास मिळावा या उद्देशाने हा लेखन प्रपंच घडला आहे.

(सर्व भक्तांना या श्रींच्या कथाकथनांतून आनंद प्राप्त व्हावा, ही श्री चरणांशी प्रार्थना आहे.)

या स्मरणगाथेची पहिली झेरॉक्स प्रत श्री. सदाशिव देवळे यांच्याकडे सुपूर्द केली. 'श्री दत्ताश्रमांतील' वास्तव्यात त्यांनी या ग्रंथाचे वाचन सुरू केले. श्री. प्रकाशराव पणशीकर आमचे गुरुबंधू यांच्या दृष्टीक्षेपात ग्रंथ आला. त्यांना वाचनात अत्यंत आनंद होऊ लागला. प.पू. श्री सद्गुरु महाराजांच्या आठवणी कोणास भावणार नाहीत? त्यांच्या अंत:करणात भाव उदीत झाले. मुंबईस ते येताच आमचे फोनवर बोलणे झाले. त्यांच्या तीव्र उत्सुकतेने मला माझी स्थळप्रत त्यांना देणे भागच पडले. हे सर्व 'श्रीं'चे प्रेरणेनेच होत आहे. श्री. प्रकाशरावांनी आमचे डोक्यात प्रकाश टाकला. ते म्हणाले, ''अहो! हा प्रसाद आहे. तो फक्त तुमचे संग्रही ठेवून काय करता? आपण त्याचे प्रकाशन करूया! आम्ही तत्पूर्वी प.पू. श्री भगवती ताईमहाराजांची अनुमती आणि आशीर्वाद घेतो!'' आणि प्रकाशरावांनी तन-मन-धन एकत्रित करून या शुभकार्यास प्रारंभही केला.

ह्या सर्व 'श्रीं'च्या सान्निध्यातील आठवणी सन १९८० पासून १९९९ पर्यंत केवळ स्मरणाने लिहीताना मला त्या क्रमवार आणि सविस्तर लिहीता आल्या त्या केवळ माझे गुरुबंधू श्री. गो.ग. गोडसे यांच्या नित्य-रोजनिशीच्या आधारानेच! या पुस्तकाचा विस्तार खूप झाला आहे, याची कल्पना आहे. परंतु प.पू. श्रीदत्तमहाराजांचे सान्निध्यातला प्रत्येक प्रसंग, प्रत्येक क्षण सर्वांसमोर सर्व लहान-सहान नोर्दीसह यावा एवढीच यामागे भावना आहे.

गुरुभगिनी सौ. माधुरीताई आणि श्री. प्रकाशराव यांनी हा ग्रंथ अभ्यासून त्यात यथायोग्य सुधारणा करण्यात आपला बराच वेळ घालविला. ही त्यांची श्री गुरुचरणांची सेवाच असल्यामुळे मी त्यांचे आभार तरी कसे मानावे?

तसेच श्रीमती आशाताई धारप यांनी आपला अमूल्य वेळ देऊन व्याकरणदृष्ट्या ग्रंथ परिपूर्ण केला. ह्या सर्व लेखनाचे 'कॉम्प्युटर टायपींग', सेवाभावाने, गुरुभगिनी सुनीता कर्वे, श्री. व सौ. सुनील पावसकर, सीमन्तिनी व अजय पुंडलीक उभयता, ह्या सर्वांनी मिळून केले आणि मुद्रण छपाई हा भाग सेवाभावी किंमतीत श्री. पराडकर उभयतांनी सांभाळला. ह्या सर्वांच्या गुरुसेवेला आभार म्हणणे उचित ठरणार नाही. श्री चरणी सर्वांची सेवा रुजू होवो.

सर्व भक्तांना ''ब्रह्मर्षी दत्तमहाराजांचे सान्निध्यात'' या ग्रंथाच्या वाचनातून परमानंद प्राप्त व्हावा, श्रीगुरु चरणी भक्ती-श्रद्धा वृद्धींगत व्हावी ही 'श्रीं'चे चरणी प्रार्थना!

फाल्गुन शु. १४
प.पू. श्री दत्तमहाराज पुण्यस्मरण

- शशीकांत दि. नागले

卐 श्री गुरुः शरणम् 卐

अंगे अनुभव जाला मज। संत रजचरणांचा।।
सुखी जालो या सेवने। दुःख नेणे यावरी।।

'प.पू. ब्रह्मर्षी श्री दत्तमहाराजांचे सान्निध्यात' - ज्यांच्या जीवनाची २१ वर्षे (१९७८ ते १९९९) अनमोल व अविस्मरणीय अशी ठरली, अशा आदरणीय श्री. शशीकांत नागले ह्यांचा, ह्या काळातील आठवणींचा, हा जवळपास ६०० पृष्ठांचा विस्तृत ग्रंथ!!! प.पू. श्री दत्तमहाराजांच्या गृहाचा, सर्व कुटुंबीयांचा अकृत्रिम-स्वकीय स्नेह ज्यांना निकट सहवासाने लाभला, प.पू. श्री दत्तमहाराजांसारख्या महात्म्याच्या कृपाशीर्वादाने, श्रीनृसिंहवाडी येथील श्री दत्तमहाराजांचे घर, श्रीदत्त अमरेश्वर (वाडी), श्रीसौरेणुका निवास व श्री वामन निवास (पुणे), श्रीसौसुंदरदत्त निवास व प.पू.सौ. ताईमहाराजांचे घर (जालना); ह्या सर्व परमपवित्र श्रीदत्तवास्तुंची रचना, पुनर्रचना करायचे परमभाग्य लाभले आणि श्री हरीहरेश्वर येथे श्री. नागले यांच्या घरी, प.पू. श्री दत्तमहाराज व परिवार यांचे तीनदा वास्तव्य झाले; असे दुर्मिळ भाग्याधिकारी आ.श्री. नागले ह्यांना आपल्या ह्या सर्व जीवनकालाच्या अनुभव क्षणात, सर्व साधकभक्तांना सहभागी करून घ्यावेसे वाटले ह्याबद्दल त्यांचे अगदी मनापासून व श्रीसद्गुरु स्मरणपूर्वक अभिनंदन!!!!!!!

आ. श्री. नागले ह्यांच्या बरोबरीने आणखी तीन व्यक्तींचेही अभिनंदन करणे महत्त्वाचे आहे, हे श्री. नागले यांच्या प्रस्तावनेतून लक्षात येते. पहिले आहेत आदरणीय श्री. गो.ग. गोडसे. त्यांच्या दैनंदिनीतल्या बारीकसारीक नोंदींमुळेच हा ग्रंथ साकार होऊ शकला, हे निर्विवाद सत्य दिसून येते. श्री. गोडसे हे श्री. नागले ह्यांच्याबरोबर प्रत्येक छोट्यामोठ्या प्रवासात, सर्व तीर्थयात्रात, प्रत्येक साध्या तसेच महत्त्वाच्या प्रसंगात, त्यांचे सहभागी सुहृद होते, हे विशेषत्वाने लक्षात येते आणि तरीही श्री. गोडसे ह्यांनी स्वतःला काहीसे झाकून ठेवले आहे. ('दिसो नये लोकां'), असा आभास होत रहातो. असो! आपल्या श्रीसद्गुरुंचा आलेला जीवनानुभव अनेकविध अंगांनी जगापुढे येत रहावा, अनेक साधक-वाचकांना त्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, ह्या विशुद्ध व व्यापक हेतूने आदरणीय श्री. प्रकाशराव व सौ. माधुरीताई पणशीकर ह्या दांपत्याने, ह्या ग्रंथ निर्मितीचा आग्रह सातत्याने श्री. नागले यांच्याकडे धरला, त्याकरता कष्टही घेतले, त्यामुळेच हा ग्रंथ सिद्ध झाला. म्हणूनच ह्या दांपत्याचे हे योगदान अत्यंत महत्त्वाचे असे ठरले आहे. तेव्हा आ. श्री. गोडसे व आ. श्री. पणशीकर दांपत्य ह्यांचेही श्रीसद्गुरुस्मरणपूर्वक अभिनंदन-आभार.

हा ग्रंथ वाचताना प्रकर्षाने व सतत जाणीव होत रहाते ती श्री. नागले ह्यांच्या सरळ साध्या, निर्मळ-निष्कपट व्यक्तित्वाची! हे नक्कीच विशेष आहे. काही लपविणेही नाही तसेच स्वतःचे महत्त्व सांगण्याकरता काही वेगळे सांगणेही नाही. (ते जसे बोलतात, जसे वागतात, तसेच ते लिहितात.) प.पू. श्री दत्तमहाराजांच्या प्रथम दर्शनापासून तो अखेरपर्यंतचा एक साधासरळ प्रवास. त्यांच्या ह्या अनुभव प्रवासातून वाचकाच्या हातात ज्या गोष्टी येतात, त्यातील चार-पांच महत्त्वाच्या गोष्टी पुढील प्रमाणे -

प.पू. श्री दत्तमहाराजांकडून श्री. नागले यांना लाभलेला पहिला कृपा-प्रसाद म्हणजे श्रीशक्तीपात योगमार्गाची दीक्षा! श्री. नागले ह्यांनी ह्या संदर्भात, प्रस्तुत ग्रंथात फार मोलाची गोष्ट केली आहे. त्यांनी ह्या योगमार्गाची सर्वांगीण-संपूर्ण माहिती सविस्तर दिली आहे. एवढेच नव्हे तर त्यांना जेव्हा दीक्षा झाली, त्या प्रसंगाचे सर्व वर्णन

दिले आहे. त्यानंतर त्यांना पुढील आयुष्यात साधनेचे जे जे अनुभव आले ते ही सर्व व्यवस्थितपणे दिले आहेत. (साधकाने आपल्या साधनेचे अनुभव इतरांस सांगताना कोणत्या व किती मर्यादा पाळाव्यात, ह्याची कल्पना नाही. त्यामुळे त्यावर काही म्हणणे अनुचित ठरेल.)

श्री हरीहरेश्वर गांवी, श्री. नागले ह्यांच्या घरी, प.पू. श्री दत्तमहाराज व सर्व परिवार ह्यांच्या सर्व साधक-भक्तांसह झालेल्या तीन यात्रा; हा श्री. नागले कुटुंबीयांना अनेक जन्मांना पुरणारा पुण्याचा व आनंदाचा साठा आहे. ह्या तिन्ही यात्रांत श्री. नागले कुटुंबीय, साधक परिवार आणि हरिहरेश्वर गांवातील सर्वजनांची स्थिती -

"कोटी दिवाळ्या दसरे। आम्हां हेंचि झाले पुरे।।
घरोघरी ओवाळणी। विठ्ठल देखिला नयनी।।"

अशी प.पू. श्री नामदेव महाराजांच्या शब्दांप्रमाणे झाली होती. ह्या तिन्ही यात्रांत प.पू. श्री दत्तमहाराजांची १) श्रीगीताभाष्य २) श्रीगुरुचरित्र व ३) श्रीसौंदर्यलहरी (श्रीकालभैरव जयंती निमित्त) ह्या ग्रंथांवर प्रवचने झाली. हा आध्यात्मिक-चिंतनात्मक प्रसाद महत्त्वाचाच होता. ह्या सर्व यात्रांत नैवेद्याची जी ताटे सजली, ती आज मन:चक्षुंनी पहाताना, वासनाविरहित शांत मनाला, प्रसादाचा आनंद व तृप्तीचे समाधान देतात, ही श्रीसद्गुरुंची विशेष कृपा आहे.

ह्या ग्रंथाआधी, प.पू. श्री दत्तमहाराजांच्या श्रेष्ठ-आध्यात्मिक-अधिकाराने संपन्न अशी 'श्री नारायणी नमोस्तुते,' 'आल्हादिनी,' 'संतसंग,' 'आनंदलहरी' (विवेक चुडामणी, द्विसाहस्री), 'श्रीमद्भागवत' ही प्रवचनात्मक ग्रंथरचना प्रसिद्ध झाली आहे. पण मानवी-जीवन-व्यवहाराचा श्रीसद्गुरुसंत कशा तऱ्हेने विचार करतात, हे आपल्याला श्री. नागले जेव्हा सहा पवित्र श्रीदत्तवास्तुंची निर्मिती करताना आलेल्या अनुभवांचे वर्णन करतात, तेव्हा प.पू. श्री दत्तमहाराजांच्या विविध प्रतिक्रियांवरून कळते. बांधकाम करताना आलेल्या अडचणी (मग त्या तांत्रिक, आर्थिक, व्यावहारिक किंवा कुठल्याही) असोत, प.पू. श्री दत्तमहाराज त्यावर ज्या तऱ्हेने विचार करतात व उपाययोजना सुचवतात ते सदैव मार्गदर्शक ठरणारे आहे. "प्रेम आपुलकी कितीही असली तरी व्यवहार सोडू नये" असे सांगणारे प.पू. श्री दत्तमहाराज स्वत: सकट आर्थिक बाबतीत काटेकोर असत, ह्याची उदाहरणे हृदयाला स्पर्शून जातात. शिल्पशास्त्रज्ञ, व्यवहाराज्ञ, आर्थिक तज्ञ ह्यांच्यापासून ते साध्या कामगारापर्यंत सर्वांना ते त्याच आदरभावनेने पहात असत. त्याचप्रमाणे त्यांच्याशी, समान सन्मानाने वागत असत. ('अवघे जन मज जाले लोकपाळ। सोयरे सकळ प्राणसखे।।' ही ती अवस्था असावी.) हे सर्व, साधकांनी अभ्यासण्यासारखे आणि निश्चितपणे आचरण्यासारखे आहे.

ह्या ग्रंथाचे चौथे वैशिष्ट्य म्हणजे ग्रंथात समाविष्ट केलेली सर्व पत्रे! ही पत्रे प्रामुख्याने प.पू. श्री. दत्तमहाराजांची असून, ती श्री. नागले कुटुंबीयांना दिलेल्या उत्तराची किंवा काही प्रवास-नियोजनाची आहेत. शिवाय प.प. श्री गजानन-आश्रम-स्वामी, श्री. रघुनाथराव, श्री. दिनेश नागले आणि प.पू.सौ. ताईमहाराज ह्यांची एक दोन पत्रे, ह्या ग्रंथात आहेत. प.पू. श्री दत्तमहाराजांची सर्वच पत्रे अत्यंत आटोपशीर, मुद्देसूद व लिखीत भाषा असूनही ते आपल्याशी प्रत्यक्ष बोलत आहेत असे जाणवून देणारी आहेत, हे विशेषत्व आहे. ह्या सर्व पत्रांच्या बरोबरीने प.पू. श्री दत्तमहाराज आणि प.पू.ती. सौ. आईसाहेब ह्यांची 'शुभविवाह पत्रिका'ही आहे ज्याचा आनंद मंगलमय आहे.

ह्या प्रमुख वैशिष्ट्यांशिवाय, श्री. नागले ह्यांचे चिरंजीव श्री. संदीप हे 'प्लाझ्मा टेक्नॉलॉजीवर' संशोधन करीत असताना, प.पू. श्री दत्तमहाराजांनी केलेला तितीक्षेचा उपदेश, श्री. दिनेश नागले ह्यांना वेळोवेळी केलेले मार्गदर्शन

प.पू.ती. सौ. आईसाहेब ह्यांनी 'त्यांचे खरे गुरु कोण' ह्या प्रश्नाला दिलेले उत्तर, अशा काही वेगळ्या गोष्टी प्रस्तुत ग्रंथात दिसतात. चेटूक करणाऱ्या बाईंशी प.पू.श्री दत्तमहाराजांचे शांत व समंजस वर्तन, हे अनपेक्षित व स्तिमित करणारे होते ह्याचाही इथे अनुभव येतो.

'प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांचे सान्निध्यात' ह्या ग्रंथाकडे साक्षेपाने पहाताना, भाषेच्या दृष्टीने बोलीभाषा व लिखीत भाषा ह्यात फरक न केल्याचे नक्कीच जाणवते. त्याचबरोबर काही प्रसंग व वर्णनात मर्यादा घातल्या असत्या तर हा ग्रंथ अधिक आटोपशीर व परिणामत: अधिक प्रभावी झाला असता असेही वाटते. प.पू. श्री दत्तमहाराजांच्या गुजराथ यात्रेचे वर्णन करताना श्री. नागले ह्यांनी वैयक्तिक अनुभव बरेचसे बाजूला ठेवल्यामुळे, ही यात्रा वेगळेपणाने लक्षात राहिली आहे. कुठलेही वाङ्मयीन निकष, हा ग्रंथ अभ्यासताना लावणे चुकीचे आहे, ह्याची जाणीव आहे. कारण ही एका समर्पित साधकाची, श्रीसद्गुरुंच्या अनुभवाची, भक्तिभावाने लिहीलेली गाथा आहे.

आदरणीय श्री. नागले ह्यांचे पुन: श्रीसद्गुरुस्मरणपूर्वक अभिनंदन करताना व आभार मानताना, सर्व साधक-भक्त-वाचकांकरता एक संदेश आहे, जो सदैव ध्यानीमनी जागवावा.

संत उदार उदार। भरले अनंत भांडार।।
मागल्याची पुरे। धणी आणिकांसी उरे।।

।। प.पू. श्री दत्तमहाराजांच्या शुभचरणी विश्वमांगल्याची प्रार्थना।।

नम्र,

श्री. आशा किशोर धारप

।। श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ।।

कल्पवृक्षाच्या छायेत

गुरुभक्त श्री. शशीकांत नागले ह्यांच्या लेखणीतून उतरलेल्या प.पू. दत्तमहाराज कवीश्वरांच्या हृद्य आठवणींचे हे पुस्तक, वाचकांना, भक्तांना गुरुप्रेमाच्या अनन्य भक्तीच्या एका वेगळ्याच प्रांगणात घेऊन जाणारे आहे. प.पू. महाराजांच्या आठवणी म्हणजे श्री. नागलेकाकांच्या हृदयात अखंड तेवणारा एक पवित्र नंदादीप आहे. आज वर्षानुवर्षे त्यांच्या श्रद्धेने तेजाळलेला हा नंदादीप अनेकांना आश्वासक आधार देणारा ठरेल ह्यात शंकाच नाही. श्री. नागलेकाकांनी प.पू. महाराजांच्या भेटीगाठीची तारीखवार नोंद केलेली होती. त्या त्या भेटीतील त्यांची भावोत्कटता त्यांच्याच शब्दांमध्ये अचूकपणे उतरलेली दिसते.

प.पू. दत्तमहाराजांच्या व्यक्तीमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन श्री. नागलेकाकांनी मार्मिकपणे घडविले आहे. समदर्शित्व, अपरिग्रह, प्रशांत चित्त ह्या सर्वांचा प्रत्यय प्रस्तुत पुस्तक वाचकांना येईल.

श्री. नागलेकाकांना प.पू. महाराजांचा सहवास खूपच मिळाला. त्यांच्याबरोबर त्यांचा अनेक ठिकाणी प्रवासही झाला. तथापि ह्या बाह्यप्रवासाबरोबर नागलेकाकांचा जो आंतरिक प्रवास झाला त्याच्याही खुणा वाचकांना या पुस्तकात सापडतील.

सद्गुरु हे परब्रह्मच आहे हे आपल्याला माहीत असते पण एखादी गोष्ट माहीत असणे आणि ती अंतर्बाह्य स्वीकारणे ह्यात फरक असतो. हरिहरेश्वरचा एक अनुभव ह्या दृष्टीने बघण्यासारखा आहे. प.पू. महाराज हरिहरेश्वरला नागलेकाकांच्या घरी गेले होते. त्या मुक्कामात एकदा संकष्टी चतुर्थी आली... मोदक झालेले होते आणि देवांना नैवेद्य दाखवा असे सांगितल्यावर श्री. नागलेकाकांनी मोदकांचे ताट उचलून प.पू. महाराजांच्या समोर ठेवले आणि नैवेद्य दाखवला. 'गुरुर्साक्षात् परब्रह्म' ही श्रद्धा नागलेकाकांच्या मनात किती बळकट आहे हे ह्या प्रसंगातून आपल्या ध्यानात येते.

श्रेष्ठ पुरुष स्वत:ला किती झाकून ठेवतात ह्याची ही काही उदाहरणे ह्या पुस्तकात आलेली आहेत. रेणुका निवासाचे काम चालू असताना एकदा एका जिल्ह्याचे सुपरिंटेंडंट आणि तिघे एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर्स आले आणि 'श्रीं'समोर बसले. चहापान झाल्यावर सुपरिंटेंडंटने प.पू. महाराजांना विचारले, ''सांप्रतच्या काळात योगदीक्षा दाते सद्गुरु आहेत का की, ज्यांनी शिरावर हात ठेवताच त्या व्यक्तीस समाधी लागेल?'' त्यावर मंदस्मित करून प.पू महाराज म्हणाले, ''आहेत की, कुंडलिनी शक्ती जागृत करणारे आजही संत सत्पुरुष आहेत.'' त्यावर असे ते कोण आणि कुठे आहेत असा प्रतिप्रश्न आला. महाराज म्हणाले, ''आहेत. पुण्यातच श्री. मामा देशपांडे आणि श्री. नखाते आहेत. नाशिकला श्री. नारायणराव ढेकणे आहेत. नारायणराव ढेकणे तर आपल्यासारखेच सरकारी पी.डब्ल्यू.डी. खात्यात सुपरिंटेंडंट सिव्हील इंजिनिअर ह्या मोठ्या अधिकारावर होते.'' प.पू. महाराज स्वत: कुंडलिनी जागृतीच्या संदर्भातले अधिकारी पुरुष असूनही त्यांनी स्वत:चे नाव घेतले नाही. केवढे हे अमानित्व!

वाडीला प.पू. महाराजांच्या घराच्या जीर्णोद्धाराचे काम श्री. नागलेकाकांनी केले. घराच्या बाजूच्या गल्लीतून जाणारा ड्रेनेजचा पाईप नीट घालून, वर माती घालून व्यवस्थित रस्ता (तात्पुरता) तयार केला. कामानिमित्त नागलेकाका बाहेरगावी गेलेले असताना शेजारच्या घरातील व्यक्तीने ते सर्व काम उखडून टाकले. प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर त्यांनी त्यांना जे पत्र लिहिले ते प्रस्तुत पुस्तकात छापलेले आहे. त्यातून प.पू. महाराजांची

संयमी वृत्तीआणि स्पष्टवक्तेपणा असे दोन्ही गुण दिसतात. पत्रात शब्द इतके तोलून मापून वापरलेले आहेत की, पलीकडच्याला आपल्या चुकीची जाणीव तर व्हावी आणि मनात खोलवर हळहळही वाटावी.

श्रेष्ठ पुरुषांची चरित्रे आपल्या बुद्धीला स्थिरता प्राप्त करून देतात आणि आपल्या जीवनात मार्गदर्शकाचे काम करतात. त्यांनी उच्चारलेली वाक्ये दीपस्तंभाप्रमाणे असतात. ह्या दृष्टीने ह्या पुस्तकातले प.पू. महाराजांचे विचार लक्षात घेण्याजोगे आहेत. उदा.

'कर्मयोग सर्वांनाच अपरिहार्य आहे.'

'सत्पुरुषांना सुद्धा प्रारब्ध सोडत नाही.'

'आर्तजनांची सेवा ही ईशसेवाच आहे.'

'तीर्थयात्रेमुळे कायिक, वाचिक, मानसिक पापांचा क्षय होतो.
सद्गुरु कृपेशिवाय तीर्थयात्रा घडत नाही.'

श्री. नागलेकाकांना प.पू. महाराजांच्या घराचे-रेणुका निवासाचे काम करायला मिळाले. तसेच वामन निवासाचे कामही त्यांच्या भाग्याने त्यांच्या वाट्याला आले. श्रीदत्त अमरेश्वराच्या जीर्णोद्धारातही नागलेकाकांचा सहभाग होता. प.पू. महाराजांच्या वाडीमधल्या वास्तुचीही नीट परत उभारणी त्यांनी केली. ही अशी सेवा करायला पूर्वपुण्याई तर लागतेच पण प्रचंड गुरुनिष्ठाही लागते. या सर्वांबरोबर जालन्याच्या मंदिराचे आणि प.पू. ताईमहाराजांच्या घराचे बांधकाम करण्याचेही भाग्य त्यांना लाभले. त्यानिमित्ताने श्री. नागलेकाकांना प.पू. ताईमहाराजांचा सहवासही खूप झाला. रोज संध्याकाळी त्या नागलेकाकांना चहाला बोलावून घ्यायच्या. त्यांच्याशी खूप बोलायच्या. बोलण्याचा विषय प.पू. महाराज आणि गुरुभक्ती हाच असायचा. ह्या सर्व काळात ताईमहाराजांच्या पराकोटीच्या गुरुभक्तीचे दर्शन नागलेकाकांना घडले.

श्री. नागलेकाकांनी ह्या पुस्तकाच्या रूपाने असीम आनंदाचा ठेवा भक्तांना उपलब्ध करून दिलेला आहे. त्यांनी केलेली ही गुरुसेवा नक्कीच पुण्यफलप्रद आहे.

हे पुस्तक आकाराला आणण्याच्या कामात काही व्यक्तींनी मन:पूर्वक सहकार्य केले. त्यातील एक म्हणजे श्री. प्रकाश पणशीकर. त्यांनी हे लेखन बारकाईने वाचून बऱ्याच सूचना केल्या. त्यामुळे सर्व लेखनाला एक सुटसुटीत आकार प्राप्त झाला. श्रीमती आशा किशोर धारप ह्यांनी शुद्धलेखनाची बाजू सांभाळली. त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चेचाही मला खूप उपयोग झाला.

शेवटी जाता जाता एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते ती म्हणजे श्री. नागलेकाकांच्या ह्या लेखनात 'मी'चे अस्तित्व ठळकपणे असूनही त्यांनी ते कुठेही तसे जाणवू दिलेले नाही. वास्तविक त्या 'मी'च्या दृष्टीतून प.पू. महाराज आपल्याला दिसतात पण तो 'मी' अत्यंत लीन, सद्गुरुचरणी अनन्य शरण असा आहे. आपल्या गुरुंच्या आठवणीत आकंठ बुडालेल्या त्या 'मी'चे विलोभनीय दर्शन ह्या पुस्तकात घडते.

श्री. नागलेकाका गुरुकृपेच्या छायेत अक्षरश: लोळलेले आहेत. त्यांचे हे लेखन वाचकांनाही तसाच प्रत्यय देईल हा विश्वास व्यक्त करून मी थांबते.

डॉ. सौ. माधुरी पणशीकर
११, गुडविल बिल्डींग, मनमाला टँक रोड,
माहीम, मुंबई ४०० ०१६.

अनुक्रमणिका

क्र.	विषय	पृष्ट क्र.
१.	अथ प्रारंभ	१
२.	श्री गणेश म्हणजेच सद्गुरु	१
३.	गुरुंकडे काय मागावे?	२
४.	प.पू. श्री सद्गुरु दत्तमहाराजांचे प्रथम दर्शन	८
५.	योगदिक्षा याचना	१५
६.	शक्तीपात दीक्षेबद्दल योगवाणी पुस्तकाच्या आधारे थोडक्यात माहिती	१६
७.	योगदीक्षा प्राप्ती व अनुभूती	१९
८.	नित्य साधना आणि अनुभव	२२
९.	साधकास दीक्षेचे वेळी व नंतर येणारे अनुभव आणि होणाऱ्या क्रिया	२३
१०.	सद्गुरुंच्या कृपेने साधनेत आलेले अनुभव	२५
११.	सत्संग आणि गुरुभाव	२७
१२.	'श्रीं'चा अपरिग्रह	२८
१३.	'श्रीं'ची दास्यभक्ती	२९
१४.	सुसंगती सदा घडो	३०
१५.	प्रेमस्वरुप गुरुमाऊली	३१
१६.	'श्रीं'चे येऊरला आगमन	३२
१७.	कुरवपूर (कुरगड्डी) यात्रा	३३
१८.	कुरवपूर क्षेत्री स्वप्न दृष्टांत	३८
१९.	श्री वासुदेवांचे गुहेत ध्यान धारणा	३९
२०.	कुरवपूर यात्रेनंतर 'श्री' दर्शन	४०
२१.	श्री गुळवणी महाराजांनी घडविले दत्तप्रभू दर्शन	४१
२२.	यात्रा भोवली	४२
२३.	एका गुरुभक्ताची भेट	४२
२४.	हरिहरेश्वराचा संकल्प	४६
२५.	दीक्षेनंतरची पहिलीच गुरुपौर्णिमा	४७
२६.	'श्री' सोबत कन्यागतपर्व वाडी क्षेत्री	४८
२७.	श्री महाराजांचे आगमनास गुरुभक्त यजमानांची परवानगी	५२
२८.	'श्रीं'ची पाद्यपूजा	५४
२९.	'श्रीं'चे आगमन हरिहरेश्वरी व्हावे म्हणून अनुष्ठाने	५५
३०.	'श्रीं'ची हरिहरेश्वरचे कार्यक्रमास अनुमती	५६
३१.	हरिहरेश्वरी प्रयाण	६१

क्र.	विषय	पृष्ट क्र.
३२.	हरिहरेश्वरचा कार्यक्रम	६१
३३.	एक अविस्मरणीय अनुभव	७३
३४.	हरिहरेश्वरहून 'श्रीं'चे प्रस्थान	७५
३५.	हरिहरेश्वर कार्यक्रमाबाबत 'श्रीं'ची पत्रोत्तरे	७६
३६.	तुम्ही त्याला आपला मुलगाच समजा	८०
३७.	प.पू. दत्तमहाराज कवीश्वरांनी घरफोडी केली	८१
३८.	हरिहरेश्वरी ऐकल्या 'श्रीं'च्या आठवणी	८३
३९.	'श्रीं'च्या आगमनाचे प.पू. गुळवणी महाराजांकडून स्वागत	८६
४०.	प.पू. दत्तमहाराजांना महामहोपाध्याय पदवी	८६
४१.	ईश्वराने संधी दिली आहे, तर उरकून घेतो संध्यावंदन	८७
४२.	'श्रीं'च्या अध्यापनाचे वैशिष्ट्य	८८
४३.	एका कटाक्षांत	८८
४४.	श्री. कृष्णा आर्वीकर यांच्या घरचा श्री भागवत सप्ताह	८९
४५.	सौ. आईसाहेबांसोबत नाशिक प्रवास	९०
४६.	प.पू. दत्तमहाराजांचा अमृत महोत्सव	९१
४७.	कोणत्या बाळास दूध पाहिजे आहे	९२
४८.	प.पू. महाराज मला तुमची पत्नी म्हणून ओळखत नाहीत	९२
४९.	श्री. दामूआण्णा नवरे यांनी सांगितलेली गोष्ट	९३
५०.	'श्रीं'च्या सांकेतिक भाषा	९५
५१.	कारंजा क्षेत्र दर्शन संकल्प	९७
५२.	साधनेतील अनुभूती	९८
५३.	कारंजा क्षेत्र दर्शन	९८
५४.	श्री क्षेत्र माहूर दर्शन	९९
५५.	गाणगापूर यात्रा	१०३
५६.	तुळजापूर यात्रा	१०५
५७.	सत्पुरुषांची चरित्रे वाचावित	१०६
५८.	'श्रीं'चे त्रासदायक प्रवास	१०८
५९.	हरिहरेश्वर वास्तव्यात साधकांना मार्गदर्शन	११०
६०.	ग्रहणांत रात्री समुद्रस्नान	११०
६१.	सर्वभार श्री सद्गुरुंवर/स्वप्नी मंत्र प्रदान	११२
६२.	'श्री सद्गुरु महाराजांची प्रेरणा!'	११६
६३.	प.पू. सौ. ताईमहाराज - प्रथम दर्शन	११८
६४.	औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ वगैरे	१२०

क्र.	विषय	पृष्ट क्र.
६५.	प.पू. धुंडीराज महाराजांची समाधी/मंदिरात मूर्ती स्थापना	१२१
६६.	घरी दंडी संन्याशांचे आगमन	१२४
६७.	श्री नारायण स्वामी उत्सव	१२६
६८.	'श्रीं'चा अपरिग्रह (२)	१२८
६९.	हरिहरेश्वरी गुरुचरित्र सप्ताह संकल्प	१३४
७०.	श्री. रघुनाथरावांची मार्गदर्शनपर पत्रे	१३८
७१.	हरिहरेश्वरी गुरुचरित्र कार्यक्रमाची तयारी	१३९
७२.	'श्रीं'चा नाशिक मध्ये भागवत सप्ताह	१४१
७३.	जालन्याचा कार्यक्रम प्रारंभ	१४२
७४.	'श्रीं'चे पत्र/ग्रहदशा व संकटे	१४४
७५.	श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह (हरिहरेश्वर)	१४५
७६.	हरिहरेश्वरच्या कार्यक्रमानंतर 'श्रीं'ना लिहीलेले पत्र	१५८
७७.	प.प. गजानन आश्रमस्वामी महाराजांचे आलेले पत्र	१६०
७८.	सेवा स्वीकारण्यास 'श्रीं'ची प्रार्थना	१६०
७९.	तुझे पाडस मी, दर्शना भुकेले	१६२
८०.	गणेश जयंतीस 'श्रीं'चे आगमन	१६३
८१.	प.पू. श्री दत्तमहाराजांचा ७४ वा वर्धापन दिन	१६७
८२.	काशी यात्रेबद्दल ('श्रीं'ची पत्रे)	१६८
८३.	काशींतील श्री. दिक्षित 'श्रीं'चे अनुग्रहीत	१७७
८४.	काशी दर्शन	१७९
८५.	काशी यात्रेनंतर 'श्रीं'चे पत्र	१८४
८६.	आमच्या मातोश्रींचे निधनानंतर 'श्रीं'चे पत्र	१८६
८७.	देऊळगांवी धर्मशाळेच्या बांधकामाचे नियोजन	१८६
८८.	श्री बालाजी मंदिरात देऊळगांवी उत्सव	१८९
८९.	'श्रीं'चे देऊळगांवी बालमित्र	१८९
९०.	श्री रेणुकानिवास वाढीव बांधकाम संकल्प	१९०
९१.	'श्रीं'चे समवेत पहिली गुरुद्वादशी यात्रा	१९०
९२.	श्री दत्त अमरेश्वर दर्शन व वृद्धस्वामी	१९१
९३.	श्री दत्त अमरेश्वर मंदिर निवासी यमुताई	१९२
९४.	ते रुप देखियले म्या कृष्णातिरी	१९४
९५.	'श्रीं'चे वाडीत दर्शन	१९५
९६.	श्री वामन निवास	१९५
९७.	जन्मोजन्मी दत्त सद्गुरु	१९९

क्र.	विषय	पृष्ट क्र.
९८.	'भक्तवत्सल भक्ताभिमानी श्री सद्गुरु दत्तमहाराज!'	१९९
९९.	''प.पू. श्री महाराजांची सकारात्मक विचारसरणी''	२०१
१००.	वामन निवास बांधकाम - काही मतभेद	२०३
१०१.	सर्वाधिकारांचे 'श्रीं'चे पत्रक	२०४
१०२.	'श्रीं'ना वामन निवास पूर्तीचा ध्यास!	२०५
१०३.	भक्तवत्सलता!	२०७
१०४.	''कोणाही जीवाचा न घडो मत्सर''	२१०
१०५.	'श्रीं'ची वामन निवास साईट भेट श्री. गद्रे आर्किटेक्ट सह	२१३
१०६.	श्री वामन निवास व श्री रेणुका निवासच्या संमिश्र आठवणी - 'भूतदया'	२१५
१०७.	माझ्या हृदयविकाराने गुरुसेवेत आलेला प्रतिबंध	२१८
१०८.	चेटुक करणारी बाई	२२४
१०९.	घरच्या देवांचे पावित्र्य	२२६
११०.	प्रकृतीच्या किरकोळ कुरुबुरी प.पू. महाराजांचे नित्यक्रमाच्या आड येत नसत	२२७
१११.	प्रत्येक साधक-भक्त आणि त्यांची आपल्याबद्दल असलेली कणव, आपुलकी, आपपरभाव कोठेही नाही	२३२
११२.	दूजे एकनाथ प.पू. दत्तमहाराज!	२३३
११३.	आमंत्रणाविना समारंभास जावे कां?	२३५
११४.	आहे काय आणि नाही काय!	२३६
११५.	आम्ही तुमचे कोणीच नाही आहोत कां?	२३९
११६.	फोडणी चांगली जमली आहे!	२४२
११७.	सांसारिक समस्या निवारण (१)	२४४
११८.	सांसारिक समस्या निवारण (२)	२४५
११९.	सांसारिक समस्या निवारण (३)	२४६
१२०.	'श्रीं'चा अपरिग्रह	२४९
१२१.	आयुष्यांतील कटू कर्तव्य	२५०
१२२.	आजही योगदीक्षा दाते सद्गुरु आहेत?	२५५
१२३.	'श्रीं'ना वामन निवास पूर्तीचा ध्यास	२५६
१२४.	'श्रीं'बरोबर संभाषण!	२५८
१२५.	हैद्राबाद यात्रा - प.पू. महाराजांसोबत हैद्राबाद, श्रीशैल्य, कुरवपूर यात्रा	२६४
१२६.	भक्तवत्सल भक्ताभिमानी श्री सद्गुरु दत्तमहाराज-२	२७१
१२७.	गुजराथ-सौराष्ट्र दौऱ्याचा संकल्प!	२८०
१२८.	श्री. शुक्लाजी ''श्रीं''कडे कसे आले!	२८२
१२९.	''श्रीं''चे बडोद्यास प्रयाण व पत्र!	२८४

क्र.	विषय	पृष्ट क्र.
१३०.	गुजराथ-सौराष्ट्र दौरा!	२८६
१३१.	दौरा रहीत करण्याबद्दल श्री. रघुनाथराव व श्री गजाननआश्रम स्वामी महाराजांचे पत्र!	२८७
१३२.	'श्रीं' आमच्यावर रागावले!	२८९
१३३.	प.पू. महाराजांचा ७६ वा वर्धापन दिन/गुजराथ दौरा कायम!	२९१
१३४.	आमचे बंधुस जीवन मुक्ती!	२९१
१३५.	स्मर्तृगामी प.पू. महाराज!	२९२
१३६.	भाचा चि. श्रीपाद यास असाध्य रोग!	२९४
१३७.	दौऱ्यास निघताना ''श्रीं''ना श्रीपादची काळजी!	२९५
१३८.	''श्रीं'' सोबत गुजराथ-सौराष्ट्र दौरा!	२९६
१३९.	सिहोर येथे गुजराथ दौऱ्याची सांगता!	३०८
१४०.	चि. श्रीपाद श्री चरणी लीन!	३०९
१४१.	आध्यात्मिक मृत्यू!	३१०
१४२.	पुन्हा नित्यक्रमाकडे!	३१२
१४३.	''संमिश्र स्वैर आठवणी'' गुलाबाचे फूल	३१३
१४४.	आरतीमध्ये रुपया!	३१५
१४५.	आमच्या सौभाग्यवती स्नेहलता हिचे अनुभव (तिच्याच शब्दांत)	३१६
१४६.	स्वप्नी दृष्टांत 'श्रीं'चा पत्ता	३१७
१४७.	प.पू. महाराज - सौ. आईसाहेब यांचा 'कानडी' संवाद	३१८
१४८.	प.पू. महाराजांनी घेतलेली फिरकी!	३१९
१४९.	''तुमचे ते सर्वात्मका सर्वेश्वरा आम्हास फार आवडते!''	३१९
१५०.	प.पू. महाराजांचे पूर्वसूचक संकेत	३१९
१५१.	व्यवहार दक्ष 'श्री'	३२१
१५२.	संकष्टीला माव्याचे मोदक	३२२
१५३.	''स्थिर चित्त असावे!''	३२३
१५४.	''वर्धापन दिन १९८९ चा कोठे करावा?''	३२४
१५५.	श्री हरिहरेश्वर येथील तृतीय कार्यक्रमाचा संकल्प	३२५
१५६.	श्री. मुकुंदराव टिपरे यांची बायपास सर्जरी	३२५
१५७.	एक आठवण!	३२६
१५८.	श्री. विलास उर्फ आप्पा तावडे आणि प.पू. महाराज	३२७
१५९.	''दत्त महाराजांची काळजी वहायला आम्ही समर्थ आहोत!''	३२८
१६०.	अनपेक्षित पत्र	३३३
१६१.	''रक्कम आधी गंगेत बुडवा आणि नंतरच वापरायला घ्या!''	३३४
१६२.	श्री. रघुनाथरावांची सोबत	३३६

क्र.	विषय	पृष्ट क्र.
१६३.	भाचा प्रदीप याचा आजार!	३३७
१६४.	"काय मुंबईला निघालांत कां?"	३३९
१६५.	"शत्रूवरही दया!"	३४०
१६६.	"किरण म्हसवडकरांचा वाङनिश्चय!"	३४२
१६७.	"आपण म्हसवडकरांना ओळखता कां?"	३४३
१६८.	श्रीदत्त अमरेश्वर मंदिरातील पुजाऱ्याचा क्रोध!	३४४
१६९.	कृष्णामाईची न्याहारी!	३४६
१७०.	"श्रीं"चा अपरिग्रह (४)	३४७
१७१.	काही छोट्या आठवणी आणि प.पू. महाराजांचे उद्‌गार - नवे मंगळसूत्र	३४९
१७२.	दिवंगत प्रिय व्यक्तीचे स्मरण करावे भक्तीभावाने, दुःखाने नाही!	३४९
१७३.	ही जोडी आम्हाला ६०-७० वर्षापूर्वी भेटायला हवी होती!	३५०
१७४.	तुम्ही सर्व बॅण्ड वाजंत्रीसह या!	३५१
१७५.	पण आपला पास घेतलात कां?	३५१
१७६.	श्रीयंत्र	३५२
१७७.	मंत्रजपाच्या अनुष्ठानाने अपुरे शिक्षण पूर्ण झाले.	३५३
१७८.	जपानुष्ठानाने मन परिवर्तन!	३५४
१७९.	चिकाटीचे प्रयत्न केले की यश मिळणारच!	३५६
१८०.	प.पू. महाराजांच्या हातच्या पुरणपोळ्या	३५८
१८१.	तुमचे वडील आमच्या ऋणात आहेत!	३५९
१८२.	श्री. नगरकर प.पू. महाराजांकडे राजीनामा मागतात!	३५९
१८३.	महाराज किशोरकुमारची गाणी कधी ऐकणार?	३६०
१८४.	गजर लावलेला आहे.	३६१
१८५.	चव्हाणसाहेब गाडीही काढणार आहेतच!	३६१
१८६.	कोणी दिली तुम्हांला दीक्षा?	३६२
१८७.	"चला, बसा बैठकीला दीक्षेची वेळ झाली!"	३६३
१८८.	नागल्यांना आमच्यापर्यंत येऊ द्या!	३६५
१८९.	काय मग! ते गोविंदराव त्रास देत नाहीत नां?	३६६
१९०.	नागल्यांची काळजी तुम्हाला करण्याचे काहीच कारण नाही!	३६९
१९१.	"उंबरठ्याजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही!"	३७०
१९२.	"श्रीं"चे कृपेने कर्जमुक्त!	३७१
१९३.	सदाशिव ऊर्फ भाऊ मुजुमदारांची अंतिम यात्रा!	३७२
१९४.	सदाशिवभाऊंच्या निधनानंतरची "श्रीं"ची पत्रे	३७६
१९५.	श्री. साबळे शेटजींकडे दत्तयाग "श्रीं"चा ७७ वा वर्धापन दिन.	३७७


क्र.	विषय	पृष्ट क्र.
१९६.	१९८७ - ''श्रीं''च्या सोबत तुळजापूर, गाणगापूर	३७९
१९७.	आता तुम्ही छोटी छोटी कामे घेत जा!	३८०
१९८.	पुण्यात तीन लाखांत बंगला!	३८२
१९९.	'श्री रेणुका निवास' वाढीव बांधकाम	
	१) प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प	३८३
	२) पायांत भरणी	३८४
	३) ''श्रीं''ची उदासीनता	३८५
	४) उर्वरीत आयुष्य अमरापुरी वेचावे अशी ''श्रीं''ची इच्छा!	३८९
	५) वरच्या मजल्याचे काम सुरू करण्यास प.पू. सौ. ताईंची आज्ञा!	३९२
	६) प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प ''श्री'' प्रमाण मानीत!	३९४
	७) ''स्त्री धन''	३९५
२००.	प्रेमस्वरुप वात्सल्यमूर्ती सौ. आईसाहेब!	४००
२०१.	''श्रीं''चे श्री. अशोकरावांना पत्र	४१२
२०२.	आग्रह नाही!	४१३
२०३.	चि. कपिलला वेदपाठशाळेत प्रवेश	४१४
२०४.	चि. श्री. कपिल यांनी सांगितलेला एक प्रसंग	४१७
२०५.	वेदमूर्ती सर्वांनाच सन्माननीय असतात!	४१९
२०६.	प.प. विमलानंद स्वामींचे श्री वासुदेव निवासांत आगमन!	४१९
२०७.	श्री कुरवपूर (कुरगड्डी) येथील भागवत सप्ताह	४२०
२०८.	चिरंजीव दत्तू बाळास थंडीला बंडी!	४२२
२०९.	कुरवपूर भावत सप्ताह समाप्ती!	४२३
२१०.	प.पू. महाराजांचा वर्धापन दिन! (वय ७८ वर्षे पूर्ण)	४२४
२११.	'श्री गणेशदत्त रेणुकादेवी खाजगी न्यास'	४२६
२१२.	''श्री'' व सौ. आईसाहेबांचे प्रेम!	४२७
२१३.	आमच्या कामधंद्याची ''श्रीं''ना काळजी!	४२८
२१४.	''श्रीं''चे दर्शन व गोकर्ण महाबळेश्वर यात्रा!	४३०
२१५.	श्री हरिहरेश्वरचा तिसरा कार्यक्रम निश्चित झाला!	४३१
२१६.	श्री वामन निवास वरचा मजला!	४३५
२१७.	प.पू. महाराजांचे हरेश्वरी आगमन!	४३६
२१८.	श्री वामन निवास वरील बांधकाम प्रारंभ!	४४२
२१९.	प.पू. महाराजांचा सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळा	४४३
२२०.	श्री रेणुका निवासाचे वरील बांधकाम	४४५
२२१.	श्री रेणुका निवासात भागवत सप्ताह!	४५०

क्र.	विषय	पृष्ट क्र.
२२२.	''श्रीं''चे वर कोर्टाचे वॉरंट!	४५०
२२३.	मुलींनी पंजाबी पोशाख घालावा कां?	४५१
२२४.	दहावीचे विद्यार्थ्यांस परीक्षेस आशीर्वाद!	४५३
२२५.	मायेची पांखर!	४५४
२२६.	वाडीस महापूजा	४५६
२२७.	प.पू. महाराज आणि प्रकृतिस्वास्थ	४५७
२२८.	श्री दत्त अमरेश्वर मंदिर जीर्णोद्धार!	४७०
	१) दक्षिणद्वार खुले झाले!	४७९
	२) देव घरी आले!	४८१
	३) श्री कृष्णावेणी मातेचा उत्सव	४८३
२२९.	वाल्याचा वाल्मिकी झाला!	४९५
२३०.	'श्री दत्त पादुका मंदिर, जालना'	५०३
२३१.	गुरुसेवा फार कठीण आहे! - १	५०८
२३२.	''आपल्यास जालन्यास जायचे आहे!''	५१०
२३३.	सरकती खिडकी (स्लायडिंग विण्डो) दुसरी एक आठवण	५११
२३४.	गुरुसेवा फार कठीण आहे (पुढे चालू) - २	५१३
२३५.	गुरुपादुकांची प्रतिष्ठापना ''श्रीं''चे हस्ते?	५१४
२३६.	दर्शन दे गुरुराया!	५१५
२३७.	आरती दत्तराजयाची!	५१६
२३८.	प्रारब्ध बाळा, कोणासही चुकले नाही!	५१७
२३९.	''श्रीं''चे महानिर्वाण	५२०
२४०.	स्वप्नी दृष्टांत - दि. २५.११.१९९९ ची रात्र! स्वप्नलहरी	५२१
२४१.	आत्मनिवेदन	५२२
२४२.	''श्रीं''चे अस्तित्व-१	५२७
२४३.	''श्रीं''चे अस्तित्व-२	५२८
२४४.	''श्रीं''चे अस्तित्व-३ (दि. ३.१०.२००६ पादुका दर्शन)	५३९
२४५.	चि. (हर्षल) दिनेश यांस आलेली प.पू. श्री दत्तमहाराजांची मार्गदर्शनपर व इतर काही पत्रे	५४२

***



२. प. पू. सद्गुरू श्री रमादेवी -
प्रथम गुरू (मंत्र दिक्षा १८-१२-१९५७)
पृष्ठ - ६




३. श्रीं चे प्रथम दर्शन पृष्ठ -१०



४. कन्यागत पर्व - 'श्री' पालखीचे भोई
नृसिंहवाडी दि. २६-९-१९८० पृष्ठ - ४९



५. गोरेगांव जयप्रकाश नगर येथे
'श्रीं' चे आगमन पाद्यपूजा दि. २४-१०-१९८०
पृष्ठ - ५४



६. श्रीं ना औक्षण, हस्ते सौ. नागले
दि. २४-१०-१९८०
पृष्ठ - ५४



७. 'श्रीं' ची पाद्यपूजा, हस्ते श्री/सौ. नागले गोरेगांव
दि. २४-१०-१९८० पृष्ठ - ५५




८. 'श्रीं' चे स्वागत आणि संभावना
दि. २४-१०-१९८० पृष्ठ - ५५



९. 'श्रीं' चे स्वागत आणि संभावना दि. २४-१०-१९८०
पृष्ठ - ५५



१०.गुरूशरणम् - 'श्रीं' ची पाद्यपूजा, दि. २४-१०-१९८०
पृष्ठ - ५५




११. गुरूशरणांगत भक्त दि. २४-१०-१९८०
पृष्ठ - ५५



१२. 'श्रीं' चे दर्शन घेताना मातोश्री नागले
पृष्ठ - ५५



१३. हरिहरेश्वरी 'श्रीं' चे आगमन
दि. १०-४-१९८१ पृष्ठ - ६१-६२



१४. 'श्रीं' ची सायंसंध्या हरिहरेश्वरी पृष्ठ - ६४




१५. 'श्रीं' पलंगावर स्थानापन्न
पृष्ठ - ६४




१६. 'श्रीं' चे गीताभाष्य ग्रंथ पठण व भाष्य
दि. ११-४-१९८० ते १७-४-१९८०
पृष्ठ - ६५



१७. 'श्रीं' ना मोदकांचा नैवेद्य दाखविताना
पृष्ठ - ६५



१८.'श्री' भक्तिगीते श्रवणांत निमग्न
गायक :- श्री. विलास तावडे पृष्ठ - ६५



१९. 'श्री' प्रसाद भोजन करताना
पृष्ठ - ६५




२०. 'श्रीं' कडून चि. अभिजीत
यांस "श्रीगणेशा!" पृष्ठ - ६६




२१. 'श्रीं' चे सानिध्यात रामनामाचीधून- रामनवमीस
तथा दिगंबराची धून - पुढील अंगणात पृष्ठ - ६६




२२. श्रींचे हस्ते वृक्षारोपण - हरिहरेश्वर १२-४-१९८१
पृष्ठ - ६६



२३. मंदिराचे ट्रस्टी श्री. हरीभाऊ बोडस - 'श्रीं' चे स्वागत करताना
पृष्ठ - ६३



२४. हरेश्वर मंदिरात पूजेत असताना सौ. स्नेहलतास
'श्रीं' कडून दीक्षा दि. १३-४-१९८१ पृष्ठ - ६८



२५. 'श्रीं' चे स्नानापूर्वी समुद्र
वंदन दि. १४-४-१९८१ एकादशी पृष्ठ - ७०



२६. 'श्रीं' चे भक्तांसह समुद्रस्नान -
चैत्री एकादशी दि. १४-४-१९८१ पृष्ठ - ७०



२७. 'श्रीं' चे जाहले समुद्रस्नान
पृष्ठ - ७०



२८. 'श्रीं' चे जाहले समुद्रस्नान
पृष्ठ - ७०




२९.प्रस्थानापूर्वी 'श्रीं' व सौ. आईसाहेबांच्या समवेत दि. १६-४-१९८१ पृष्ठ - ७३



३०. 'श्रीं' चे मुखमार्जन
दि. २२-११-१९८२ पृष्ठ - १५०



३१.नॅप्कीनने हात पुसत 'श्रीं' नी खोलीत प्रवेश केला
पृष्ठ - १५०



३२. 'श्री' स्नानाच्या प्रतीक्षेत
बाहेरच्या चुलीवर पाणी गरम होत आहे.
पृष्ठ - १५०



३३.१०८ निरांजनांनी 'श्रीं' ची आरती व दिगंबरा धून

पृष्ठ - १५४



३४. 'श्रीं' चे पूजन करतांनां भगिनी सौ. स्नेहप्रभा शृंगारपुरे

पृष्ठ - १५०



३५. 'श्रीं' चे पूजन करतांनां श्री सुधाकर शृंगारपुरे

पृष्ठ - १५०



३६. गुरूचरित्र सप्ताहांत 'श्रीं' ची प्रवचने

पृष्ठ - १५०



३७. 'श्री'समुद्रस्नानास निघताना कार्तिक शु. एकादशी
शके १९०४



३८. 'श्री' समुद्रस्नानास समुद्र किनारी
कार्तिक शु. ११ शके १९०४



३९.'श्रीं' चे समुद्रस्नान कार्तिक शु. ११, शके १९०४



४०. श्री गुरूचरित्र पारायणाची समाप्ती-समारोप
दि. २८-११-१९८२ पृष्ठ - १५३



४१. श्री गुरूचरित्र पारायण कार्यक्रम समारोप
दि. २८-११-१९८२ पृष्ठ - १५३



४२ .हरिहरेश्वरी - औदुंबर, तुळशी वृंदावनांत
१०८ निरांजनांनी आरती, त्रिपुरी पौर्णिमा ३०-११-१९८२
पृष्ठ - १५४




४३. 'श्रीं' वामन निवास स्लॅब काँक्रेटींग दि. ३०-९-१९८४
पृष्ठ - २७१




४४. तृतीय कार्यक्रम -'श्रीं' चे हरिहरेश्वरी आगमन
दि. १७-११-१९८९ पृष्ठ - ४३९



४५. 'श्रीं' चे हरिहरेश्वरी आगमन दि. १७-११-१९८९
पृष्ठ - ४३६



४६. हरिहरेश्वरी - मागील पडवीत 'श्रीं' चे
ग्रंथपठण दि. १८-११-१९८९ पृष्ठ - ४३९




४७. 'श्री' प्रवचनास सिध्द दि. १८-११-१९८९
पृष्ठ - ४३९



४८. 'श्रीं' चे आद्यशंकराचार्यांच्या सौंदर्य लहरीवर प्रवचन
दि. १८-११-१९८९ पृष्ठ - ४४१




४९. हळदी कुंकूं प. पू. सौ. आई साहेब व
प. पू. सौ. ताईमहाराज आणि इतर भगिनी



५०. प. पू. सौ. ताईमहाराज
व प. पू. सौ. आईसाहेब



५१. हळदी कुंकूं प. पू. सौ. आई साहेब व
प. पू. सौ. ताईमहाराज आणि इतर भगिनी



५२. हरेश्वरी - दत्तयागास प्रारंभ करताना 'श्रीं' चा आशीर्वाद



५३. श्री दत्तयागास प्रारंभ
पृष्ठ - ४४२



५४. दत्तयाग - श्रोतृवर्गात :- सौ. आईसाहेब, सौ. ताईमहाराज, सौ. नीलाताई जोशी, सौ. सुमनताई, सौ. सुलभाताई, पुजारीबाई (गाणगापूरकर) व इतर. पृष्ठ - ४४२



५५.'श्रीं' ना आरती दर्शन
पृष्ठ - ४४२




५६. श्री दत्तयाग पूर्णाहूती कार्तिक वद्य ११
दि. २३-११-१९८९ पृष्ठ - ४४२



५७. प. पू. सौ. ताईमहाराज दर्शन - जालना
पृष्ठ - ५०५




५८. प. पू. सौ. ताईमहाराज - गुरूपादुका मंदीरबांधकामा-
बद्दल सूचना देताना पृष्ठ - ५०९



५९. औदुंबरा तळी प. पू. श्री दत्तमहाराज - जालना
पादुका स्थापित जागा पृष्ठ - ५०६



६०. प. प. श्री गजानन आश्रम स्वामी महाराज
आणि प. पू. श्री दत्तमहाराज



६०. प. प. श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराज
(प. पू. ब्र. श्री दत्तमहाराजांचे आद्य दीक्षा गुरु)

।। श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः ।।

१) अथ प्रारंभ

प.पू. श्री दत्तमहाराजांच्या सहवासातील पुण्य स्मृतींचे पुण्य स्मरणम्। प्रारंभः चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा शके १९२७ शनिवार ९ एप्रिल २००५.

श्री गणेशाय नमः।

दुर्लभम् त्रयमेवैतद् देवानुग्रह हेतुकम्।
मनुष्यत्वम् मुमुक्षत्वम् महापुरुष संश्रयः।।

मनुष्य जन्म प्राप्त झाल्यावर १) ईश्वर भक्तीचा प्रादुर्भाव होऊन २) मुमुक्षत्व अंतःकरणात निर्माण होणे आणि ३) महापुरुषांचा संत सज्जनांचा सहवास घडणे ह्या तीन गोष्टी जगतात अत्यंत दुर्लभ आहेत. ईश्वराचा अनुग्रह प्राप्त होण्यास या तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।
निर्विघ्नं कुरुमे देव सर्व कार्येषु सर्वदा।।



२) श्री गणेश म्हणजेच सद्गुरु

मनुष्य जन्म तर प्राप्त झाला पण जन्मास येताच त्या योगमायेने फार मोठे विघ्न समोर आणून ठेवले. आईचे उदरात असताना, मी जीवात्मा, स्मरण पूर्वक म्हणत होतो, 'सोऽहं! सोऽहं! तो मी आहे. तो परिशुद्ध आत्मा मी आहे. मी विस्मृतीत जाणार नाही. तो परिशुद्ध आत्मा ते परब्रह्मच मी आहे.' परंतु मातेच्या उदरातून बाहेर येताच त्या योगमायेने आवरण माझ्यावर टाकले; मी विस्मृतीत गेलो आणि टाहो फोडून विचारू लागलो, 'कोऽहं! कोऽहं! मी कोण आहे?' माझ्या जीवात्म्यास भ्रांत पडली. अज्ञानाचे विघ्न पुढे आले. त्याने मला पूर्ण झाकोळून टाकले. हे विघ्नहर्त्या गणेशा, हे अज्ञानांधःकाराचे विघ्न दूर कर. अज्ञान हेच विघ्न आहे आणि ते सद्गुरुच दूर करू शकतो. हा श्री गणेश म्हणजेच सद्गुरु होय. विघ्नहर्ता अज्ञान नाहीसे करून ज्ञानाचा प्रकाश देणारा! ती त्याची सोंड म्हणजे विवेक होय, सत्य काय? असत्य काय? शाश्वत कोणते आणि अशाश्वत कोणते? नित्य कोठले? अनित्य कोणते? ही वाक्ये आहेत माझ्या प्रथम मंत्र दीक्षा दात्या श्री सद्गुरु रमादेवी माऊलींची.

श्री गणेश मूर्ती

सद्गुरुंचे चरणी सर्व अहंभाव अर्पण करून वंदन करतो. गुरु स्मरण करण्यास, गुरुगान करण्यास श्री गणेशानेच प्रतिभा जागृती, स्फूर्ती देऊन श्रीगुरुचरणांची सेवा करवून घ्यावी.



३) गुरुंकडे काय मागावे?

सोळाव्या सतराव्या वर्षापासून मला आत्मचिंतनाची ओढ लागू लागली. 'ह्या हाडामासाच्या देहात मी मी म्हणून वावरणारा मी आहे तरी कोण? कोठून आलो, जन्माआधी कुठे होतो, मरणानंतर कुठे जाणार आहे.' अनेक धार्मिक ग्रंथातून शोध चालू होते. माझी आई पण सांगायची की, पोटात असताना ते बाळ 'सोऽहं' म्हणजे 'मी तो आहे' असे म्हणत असते. जन्म होऊन बाहेर आल्यानंतर योगमाया त्या बाळाला भूल पाडते. मग तो मोठ्याने किंचाळून विचारू लागतो, 'कोऽहं' मी कोण आहे. मग या माया मोहात त्याला शेवटपर्यंत कळत नाही की मी कोण आहे? आपण ईश्वराची भावपूर्ण भक्ती केली की आपल्याला गुरुमहाराज भेटतात. आपला भ्रमनिरास करतात. काही गुरु तर असे असतात की शिष्याच्या डोक्यावर हात ठेवताच तो समाधी अवस्थेत जातो. शिष्यही पूर्वजन्मी त्या पात्रतेस पोहोचलेला असतो आणि मग त्याला संपूर्ण ब्रह्मज्ञान होते. याच अवस्थेला आत्मसाक्षात्कार किंवा ईश्वर दर्शन किंवा ईशस्वरुप होणे म्हणतात.

याचबरोबर माझ्या आईने स्नानानंतर प्राकृत भाषेतील पंचरत्नी गीता रोज ठराविक अध्याय पद्धतीने वाचण्यास सांगितले. 'श्री कृष्णभक्ती' मला प्रिय होती. मी मनापासून गीताध्याय वाचीत असे. त्यांत विश्वरुप दर्शन कृष्ण अर्जुनास दाखवितात. त्यामुळे त्यास संपूर्ण ब्रह्मांडाचे, संपूर्ण विश्वाचे ज्ञान होते. स्वस्वरुप कळते. बालवयात एवढे काही कळत नव्हते. परंतु हे सर्व कळायला गुरुंची आवश्यकता आहे. हे मात्र कळून चुकले होते. माझे कुमार मन सद्गुरुंच्या शोधांत होते. पण गुरु म्हणजे हिमालयात गिरीकंदरात गुहेत तप करीत बसलेले असतात असे वाटत असे. पुढे कळले संसार करणारे, समाजात वावरणारे सुद्धा सत्पुरुष असतात आणि पैसे लुबाडणारे ढोंगी बुवापण खूप असतात. गुरु कसा असावा, कसा ओळखावा हे सुद्धा महाकठीण आहे. मग मी आमचे बंधु जगन्नाथ आप्पासाहेब यांच्याप्रमाणे श्री साईबाबांनाच गुरु मानून त्यांची भक्ती करू लागलो. १५ व्या वर्षापासून मी दाभोळकरकृत श्री साईसच्चरित्राचे सप्ताह करू लागलो. माझी शारदाताई व तिचे यजमान साईभक्त, म्हणून दरवर्षी श्रावणात मालाडला बरेच सप्ताह झाले आणि काही आप्पांकडे कर्जतला झाले. या पारायणांतूनही जीवनात गुरुंची नितांत आवश्यकता असल्याचे कळून चुकले. श्री साई, भक्तांच्या ऐहिक, प्रापंचिक गोष्टी आपल्या सामर्थ्याने पूर्ण करीत. सकाम भक्तांची इच्छापूर्ती करीत आणि अधिकारी भक्तच निष्काम भक्ती, अध्यात्म, आत्मसंशोधन, या विषयांवर मार्गदर्शन घेत. हे अभ्यासीत असतानाच 'सद्गुरु श्री गजानन महाराज गुप्ते' यांचे चरित्र वाचनात आले. शिवाय त्यांच्या 'आत्मप्रभा' ह्या पुस्तक वाचनातून बराच बोध झाला. १८.१२.१९५७ ला रात्री स्वप्नी 'श्रीं'चे बटूरुपात दर्शन होऊन, 'प्रथम चित्तशुद्धी,

आत्मशुद्धी करा,' हा आदेश आला. सप्तशब्दांचा त्रयोदशाक्षरी मंत्र स्वप्नी मिळाला. परंतु विस्मरणाने जागृतावस्थेत आठवेना. दिनांक १९ डिसेंबर बेचैनीत आणि त्याच रात्री थोरली बहीण बाबीताई व तिचे यजमान, स्नेही श्री. वामन केशव कुळकर्णी यांचे मार्फत त्यांचे गुरु श्री रमादेवी यांचे दर्शन घेऊन आले व मला अतिआग्रह करू लागले. मी एकदा तरी या प्रति मीराबाईंचे दर्शन घ्यावे हा त्यांचा आग्रह मी जरी धुडकावून लावला व ताईस असेही म्हटले की, 'काय तुम्ही सुशिक्षित पदवीधर मंडळी अशा महाराज बुवांचे मागे लागता.' परंतु त्या स्वप्नाने मी मनातून तसा बेचैनच होतो म्हणून बुचकळ्यात पडलो.

खरं सांगायचं म्हणजे माझी गुरुभेटीची वेळ आली होती. ताई म्हणाली तुझ्या स्वप्नाचा उलगडाही कदाचित त्यांचेकडून होईल. तिला मी सात शब्दांच्या त्रयोदशाक्षरी मंत्राविषयी विचारले तेव्हा तिलाही उलगडा होत नव्हता. या रमादेवी कोण आहेत, कशा आहेत ते जाऊन पहावे, त्यांचे प्रवचन उपदेश ऐकावे आणि अनुभव घेऊन ठरवावे की ही बुवाबाजी कां खरंच दिव्यशक्तीमाता त्या आहेत. त्यांचे आपल्या शेजारील मॉडर्न हायस्कूलच्या पाठीमागील एका प्रशस्त हॉलमध्ये सकाळी ९ वाजता प्रवचन आहे. तर दर्शन आणि श्रवण करून मी काय ते ठरवावे. खरंच त्या मोक्षगुरु किंवा सद्गुरु संत आहेत का? हा विषय लिहू तेवढा मोठा आहे. विस्तार भयास्तव थोडक्यात सांगतो.

सौ. बाबीताईंच्या मनापासूनच्या आग्रहास्तव मी जायचे ठरविले. पुण्याची जास्त माहीती नव्हती. आम्ही शिवाजीनगर येथे एटीफीट रोड किंवा संभाजी उद्यानाचा रोड जंगली महाराज रोड येथे रहात होतो. भाचा दिलीप मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत होता. शाळेमागील हॉल त्याला माहीत होता. म्हणून त्या सप्तवर्षीय बाळ दिलीपचे बोट धरून मी जेथे रमादेवींचे दर्शन व प्रवचन होणार होते त्या हॉलमध्ये दाखल झालो. श्री वामनरावांना भेटलो. त्यांना उतावीळपणे विचारले, "कुठे आहेत त्या रमादेवी?"

मला पुन्हा १०.३० वाजता खडकीला ऑफिसात कामावर हजर व्हायचे होते. मी त्यावेळी रेव्हेन्यू डिपार्टमेंट मध्ये स्पेशल महालकरी ऑफिसात क्लार्क कम् टायपिस्ट म्हणून लागलो होतो.

माझा असा प्रश्न ऐकून श्री. वामनरावांनी जीभ बाहेर काढून डोळे मोठे करून म्हणाले, "असं म्हणू नये, गुरुमाऊली नाहीतर नुसते माऊली म्हणा." त्यांनी मला स्टेजच्या समोर जवळच अशी जागा करून देण्यास स्वयंसेवकाबरोबर पाठविले.

स्टेजच्या उजव्या बाजूस सद्गुरु रमा माऊलींचा कट्-आऊट फोटो, मुरली वाजविण्याची पोज घेऊन नेत्र अर्धोन्मिलीत भावावस्थेंतला फोटो होता. स्टेजच्या मध्यावर सिंहासनासारखी प्रशस्त खुर्ची, पाय ठेवण्यास गोल आसन, त्यावर मऊ मखमली गोल कुशन आणि दुतर्फा

शुभ्र वस्त्रांकित पुरुष व दुसरे बाजूस गुरुभगिनी बसलेल्या होत्या. संगीताच्या तालासुरांत सुस्वर कंठाने गुरुभक्तीपर गीते ते गात होते. त्या गीतांतून दर्शन देण्याकरीता भक्त गुरुदेवांना आर्ततेने प्रार्थना करीत होते. नाहीतरी सद्गुरुंच्या दर्शनाची मलाही अंतर्यामी तीव्र ओढ होतीच. सहाजिकच भक्तीरसभरीत त्या संगीताच्या तारा माझ्या हृदयी जुळत होत्या. ध्वनीक्षेपकावर ध्वनी उमटले. ''श्री सद्गुरु रमा माऊलींचे आगमन होत आहे, सावधान!'' मी माझे पंचप्राण डोळ्यांत आणून सिंहासनी गुरुमाऊली कधी आरूढ होते ते पहात होतो. त्यांच्या दर्शनांची मला कमालीची ओढ लागली होती. माऊली स्टेजवर येऊन आसनावर स्थानापन्न झाल्या. सर्व भक्तांच्या मुखांतून माऊलींच्या जयजयकाराचे ध्वनी उमटले. त्या अत्यानंदातच माझे अष्टसात्विक भाव जागृत होऊन डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले. चित्तवृत्ती आनंदाने भरून ओसंडू लागल्या. मी मला विसरलो होतो. माझ्या मनास माऊलीची ओळख नव्हती पण अंतरात्मा सद्गुरुंना ओळखत होता. हीच ती गुरुभेटीची वेळ. ज्या क्षणाची आतुरतेने वाट पहात होतो. माझ्या नेत्राचे समाधान दर्शनाने पूर्ण होत नव्हते आणि इतक्यात मधुर वचने माऊलीच्या मुखांतून स्त्रवूं लागली. ती वचने, ते शब्द, चित्कणांनी परिपूर्ण असे ते शब्द, माझ्या कर्णपटलावर येऊन माझ्या संपूर्ण शरीरास रोमांचित करीत होते.

''विषय होता भगवंताला शोधायचे कोठे? ''अरे, तो तर आपल्या जवळ, आपल्या हृदयात आहे. मग मला तो दिसत का नाही? सद्गुरुंना शरण जा. 'गुरुविण सापडेना सोय.' तुमचा भ्रमनिरास गुरु करतात. त्या भगवंताला कुठे शोधायचे, त्याचेपर्यंत कसे पोहोचायचे ती वाट गुरु दाखवितात. मी कोण आहे विचारा आपल्या मनाला? मी मी करतोस, अरे जीवात्म्या? तू आहेस तरी कोण? गुरुंच्या मार्गदर्शनांतून साधना करा, तो मी म्हणजे दुसरा तिसरा कोणी नाही, तो परमशुद्ध आत्मा तोच परमेश्वर आहे. त्याच्या भेटीची गुरुकिल्ली गुरुजवळ असते.''

मी ज्या संभ्रमात होतो तो संभ्रम दूर होत होता. मला ज्या माहितीची आवश्यकता होती, मी जे शोधत होतो ते सर्व मिळण्याचे स्थळ म्हणजे गुरुदेव. मला पाहिजे ते ऐकायला मिळत होते. मी बाळ दिलीपला म्हटले, 'तू धावत घरात जा आणि तुझ्या आईला सांग तू असशील तशी, हातातील सर्व कामे टाकून याक्षणी धावत इकडे ये. प्रवचन चालू आहे. जे हवे ते मिळत आहे. तू ही संधी सोडू नको.'

सौ. ताईपण आली. तिलाही श्रवणाचा लाभ झाला. तासाभरात प्रवचन संपले. माऊली स्टेजच्या बाजूच्या खोलीत गेल्या. ध्वनीक्षेपकावर सूचना निनादली. ''ज्या भक्तांना रामनाम घ्यायचे असेल त्यांनी थांबावे. बाकी मंडळींनी जाण्यास हरकत नाही. कार्यक्रम संपला

आहे.'' जी काही मंडळी थांबली त्या वीस पंचवीस मंडळीत मी व ताई होतो. आम्हाला सद्‌गुरु माऊलींचे खोलीत प्रवेश मिळाला. भावपूर्ण साष्टांग नमस्कार माऊलींपुढे घालून एक एक जण असे समोर अंथरलेल्या बैठकीवर आम्ही बसलो.

मी श्री सद्‌गुरु रमादेवींनी दिलेला उपदेश आणि गुरुमंत्र कथन करण्यापूर्वी मला स्वप्नात झालेला दृष्टांत कथन केलाच पाहिजे. कारण श्री माऊलींचा उपदेश त्या स्वप्नातील दृष्टांताला धरूनच कसा आहे हे त्यावरून लक्षांत येईल.

१८ डिसेंबर १९५७ ची रात्र-स्वप्न लहरी

हे स्वप्न मला पहाटे (१९ तारीख उजाडता) ४ नंतर पडले. मी हरिहरेश्वरी आहे. श्री हरिहरेश्वर मंदिरात शिरलो. मंदिरात कोणीही नव्हते. एरव्ही ब्राह्मण मंडळी किंवा पुजारी असतात. पण आज कोणीच दिसत नाही. दर्शन करताना मूर्तीच्या चरणाला स्पर्श करावा अशी बहुतेक भक्तांची सत्प्रवृत्ती असते. मूर्तीबद्दल असलेला भाव-प्रेम त्यामुळे भक्तांना तसे वाटते. मलाही तसे वाटायचे. पण मंदिरात पुजारी असेल किंवा कोणी ब्राह्मण असतील तर देवाचे मूर्तीला स्पर्श करणे त्यांना आवडत नाही. कर्मठ पुजारी तर मनाईच करतात. देवाचे पावित्र्य राखण्याकरीता ते त्यांचे तसे करणे योग्यच असते. मी मंदिरात कोणी ब्राह्मण मंडळी दिसली तर लांबून दर्शन घेत असे. कोणी नसेल तर मूर्तीचे चरणास स्पर्श करून डोके टेकल्याखेरीज मला आनंद आणि समाधान मिळत नसे. मंदिरात कोणीच नाही असे पाहून मी मुर्तीचे चरणास स्पर्श करून चरणावर डोके टेकले. प्रत्यक्षात श्री कालभैरव मंदिरात, कालभैरव व योगेश्वरी अशा दोन उभ्या मूर्ती आहेत. हरिहरेश्वर मंदिरात चार पिंडी आहेत. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि आदिमाता पार्वती. पण स्वप्नात मला मूर्ती ३'-६" उंचीची स्फटिकाची दिसत आहे.

मी जवळपास कोणी नाही असे पाहून हरेश्वर मंदिराचे गाभाऱ्यात अंधूक प्रकाशांत मुर्तीचे दोन्ही चरण पकडून चरणांवर डोके टेकीत आहे, तोच ती मूर्ती प्रकट होऊन मला म्हणू लागली, ''तू मला स्पर्श करू नकोस, तू अपवित्र पापी आहेस.''

मी त्या मूर्तीस न्याहाळीत आहे. मूर्तीतून येणाऱ्या प्रकाश झोताने गाभारा झगमगून निघाला आहे. मूर्ती श्री विष्णु नारायणासारखी किंवा एकमुखी श्री दत्तात्रेयांसारखी किंवा श्रीकृष्णांसारखी आहे. चेहरा तेज:पुंज, पिवळसर तांबूस विस्फारलेले नेत्र (हरणाचे पाडसासारखे) उभा नाम कपाळी, धोतर नेसून पायात पादुका, अंगात पांढरी बंडी लांब हाताची, डोक्यावरून उपरणे घेतलेले, सरळ नाजूक नाक, लाल चुटुक ओठ, हनुवटी नाजुक सुंदर.

मी ''श्री''चे शब्द ऐकून मागे सरलो. चेहऱ्यावर माझे नेत्र स्थिर झालेले. क्षणभर सुद्धा ते सुमुख दृष्टीआड होऊ नये असे वाटे. मी विचारले, ''काय केले म्हणजे मी पवित्र होईन, आपले पादस्पर्शास लायक होईन?''

''श्रीं''ची मूर्ती म्हणते, ''हा सप्तशब्दांकीत मंत्र जप सुरू कर, सांगतो ऐक.'' मी लागलीच खिश्यातून कागदाचा तुकडा व पेन्सील काढली. दृष्टी तर ''श्रीं''चे वरून हलेना. मी कागदाकडे न पाहताच लिहीत आहे. पहिला शब्द, दुसरा शब्द श्रीमूर्ती सांगत आहे, मी कागदावर उतरवीत आहे. शेवटी श्रीमुर्ती म्हणाली, या सप्तशब्दांचा मंत्र तू जपत रहा. कालांतराने तू पवित्र होशील. मी श्रीमुर्तीच्या चरणीं लांबूनच मस्तक जमिनीवर टेकले आणि ''श्रीं''ची मूर्ती अदृष्य झाली. पुन्हा गाभाऱ्यात अंधार. मी मंदिराबाहेर आलो. कागद काढला. वाचू लागलो. पहातो तर काय? कागदावर फक्त १ ते ७ अंक लिहीलेले.

आज दि. २०.१२.१९५७ सकाळी १० वाजता श्री सद्गुरु रमादेवींनी दिलेला उपदेश आणि मंत्र.

''आपला जीवात्मा अनेक योनीत जन्म घेत घेत अनेक पाप पुण्ये करीत मनुष्य जन्मात आला आहे. पूर्व जन्मात सारासार विचार, विवेकबुद्धी नसल्याने अनेक पापे जीवात्म्याकडून घडली. ईश्वराचे पूर्ण विस्मरण आहे. आता या मानव योनीत जन्मास येण्यापूर्वी तुमच्या जीवात्म्याने नारायण भगवंतास (तुम्ही) वचन दिले आहे. आज योगमायेच्या आवरणाखाली तुम्ही भ्रांत आहात. तुम्हाला ते स्मरत नाही तुम्ही वचन दिले आहे. हे विष्णूनारायणा, मला मानवजन्म दे. मला बुद्धी विवेक दे. चांगले काय वाईट काय हे समजण्याची शक्ती म्हणजे विवेक दे, सारासार विचार म्हणजे काय चांगले काय हे मला मानव जन्मात कळेल. मी तुझे स्मरण ठेवीन. मी म्हणजे एक मानव जीव नाही तर एक परिशुद्ध आत्मा आहे. तुझा अंश आहे. 'अहम् ब्रह्मास्मि'. मी ब्रह्म आहे, प्रत्यक्ष नारायण आहे आणि देवाने तुम्हास मानव जन्म दिला. आज तुम्ही मायामोहांत दिलेले वचन आणि आपले स्वस्वरुप विसरला आहात. या मनुष्य जन्मात तुम्ही तुमची ओळख करून, आत्मज्ञान करून घेऊन श्री भगवंताशी एकरुपता संपादन करायची आहे. तुमचा आत्मा आनंदमय, सत् चित् आनंदमय आहे. मी आज तुम्हास सात शब्दांचा मंत्र देत आहे. ह्या मंत्रजपाने तुमचे मन शांत होईल, स्थिर होईल. आत्मशांती, चित्तशुद्धी होऊन तुम्ही पवित्र होऊ लागाल. शुद्धाचरण, सत्प्रवृत्ती होऊन शुद्ध झालात म्हणजे तुम्ही ईश्वर सन्निध्य संपादाल. तुमच्याच देहांत-अंत:करणात परमात्मा आहे. त्याचेसमोरच तुमचा जीवात्मा बसला आहे. परंतु ह्या जीवात्म्या भोवती अनेक जन्माच्या संस्कारांची वेष्टणे पडून जीवात्म्यास परमात्म्याचे दर्शन होत नाही. मंत्रजपाने एकाग्रता येऊन ध्यानधारणा होऊ लागेल. आत्मानुसंधान करताना बाह्यजगाचे ज्ञान हरपू लागेल. आनंदमय वृत्तीत तुम्ही भगवंताची अनुभूती घेऊ लागाल. मनुष्य जन्माचे सार्थक आपला आत्मसाक्षात्कार करून घेण्यात आहे. संसार करता करता सुख दु:खे भोगता भोगता तुम्हास त्या पलीकडे

जायचे आहे. सद्गुरु तुम्हाला क्षणोक्षणी पाठीराखा आहे. ती गुरुमाऊली तुम्हास सतत मार्गदर्शन देत राहील. तुमच्या मार्गात पंथराजक्रमणांत येणारे अडथळे दूर करीत राहील. एवढी दृढ श्रद्धा सद्गुरुचरणी ठेवा. मंत्रजप सवयीने श्वासाबरोबर व्हायला हवा. संसारातील कर्मे करताना मुखी रामनाम असू द्या. ते रामनाम तुमचा उद्धार करील. ते रामनाम असे.''

।। श्री रामजयराम जय जय राम।।

तेव्हापासून श्री सद्गुरु रमामाऊलीस हात जोडले ते आत्मशोधनाच्या प्रगती-करता. 'कालांतराने मन एकाग्र होऊ लागेल. आपल्या शरीरांतील आत्मा चैतन्य कुंडलीनी शक्ती गुरुमंत्राचे प्रभावाने जागृत होईल. ती मुलाधार चक्रातून निघून स्वाधिष्ठान मणीपूर चक्र, बेंबीजवळचे चक्र, हृदयांतील अनाहत चक्र, कंठाखालील विशुद्ध, भ्रूमध्यांतील आज्ञाचक्र, अशी सहा चक्रे सुषुन्मा नाडीतून वाट काढीत ही चक्र छेदीत मस्तकांत सहस्त्रारांत प्रवेश करताच जीवाशिवाचेऐक्य होऊन निर्विकल्प समाधीवस्था प्राप्त होईल. मायाजाल नष्ट होईल. पूर्वजन्म स्मरतील. त्याबरोबर आपणच भगवंत असल्याची अनुभूती येईल. आत्मानंदात निमग्न राहणे किंवा ऐहिकांत राहणे हे आपले हाती असेल. मी दुसरा तिसरा कोणी नसून तोच तो मी ब्रह्म अशी अनुभूती येईल.' असे हे अनुसंधान संसार व्यापात काही काळ खंडीत झाले.

सद्गुरु श्री रमादेवी आपल्या आश्रमात मँगलोर येथे १९७८ साली ब्रह्मलीन, समाधीस्थ झाल्या. आम्ही सपत्नी मँगलोरला माऊलींच्या सहवासात राहणार होतो ते राहून गेले. आणि पुढील मार्गदर्शनाकरता कुंडलीनी शक्ती जागृत करणारे म्हणजेच शक्तीपात दीक्षा-योगदीक्षा देणारे श्री परमपूज्य ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर महाराजांचा लाभ माऊलीचे कृपेनेच झाला. शेताची मशागत माऊलीने केली होती आणि प.पू. दत्तमहाराजांनी रोप लावले. दि. १७ मार्च १९८० पहाटे ६.०० वाजता शक्ती जागृतीची अनुभूती देणारी योगदीक्षा प्राप्त झाली.

पुढे प.पू. महाराज हरिहरेश्वरी आले असताना मी माझा १८.१२.१९५७ चा स्वप्नी दृष्टांत व मंत्र महाराजांना कथन केला. प.पू. श्री महाराजांना मी ते सात शब्द व त्याचा अर्थ काय म्हणून विचारले. प.पू. श्री महाराज म्हणाले, की आज सायंकाळचे प्रवचनात तोच विषय घेणार आहोत. त्याच दिवशी संध्याकाळी प.पू. श्री महाराजांनी प्रवचनात सांगितले, ''देवाजवळ मागणे मागायचेच झाले तर काय मागावे?''

धर्मे प्रीतीम् सन्मतीम् देवभक्तीम्
सत्संगाप्तीम् देही भुक्तीम् च मुक्तीम्

भावासक्तीम् चाखिलानंद मूर्ते
घोरात कष्टात् उद्धरास्मान् नमस्ते

संपूर्ण संसार आणि जगातील सर्व चराचर वस्तू नाशवंत आहेत. ईश्वराकडे त्या नाशवंत वस्तू मागण्यापेक्षा शाश्वत सुख देणारे वरदान मागावे. अनित्य सुखात न रमता नित्यानंद मागावा.

श्री सद्गुरु सतत मागेपुढे आपले पाठीराखे आहेत. ते सतत आपल्या साधनेत येणारे ऐहिक सांसारिक पातळीवरील संकटे विघ्ने दूर करीत असतातच. त्याकरीता त्याच्यापाशी मागणी करावीच लागत नाही. ते स्मर्तृगामीच नव्हे तर स्मरणापूर्वीच आपले पुढे उभे असतात. आपले योगक्षेम सांभाळत असतात. आपल्या साधनेत अडथळे येऊ नयेत म्हणून संपूर्ण काळजी घेऊन मार्गदर्शन करीत असतात. म्हणून काही अनाकलनीय झाले तरच सद्गुरुंना विचारावे. गुरुवाक्य प्रमाण मानून त्याप्रमाणे आचरण करावे.



४) प.पू. श्री सद्गुरु दत्तमहाराजांचे प्रथम दर्शन

दि. २९.१२.१९७८ हा सुट्टीचा दिवस होता. मनात विचार आला की या सुटीच्या दिवशी धाकटी बहीण सौ. प्रभा व भाऊसाहेब उर्फ श्री. सुधाकर शृंगारपुरे यांना घरी भोजनास आमंत्रित करावे. मी दि. २८ रोजी चेंबूरला त्यांच्या घरी गेलो. तेव्हा ते रिझर्व बँक कॉलनीत रहात होते. मी त्यांना आमच्या घरी गोरेगाव येथे येण्याचा आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, 'आम्ही आलो असतो, पण उद्या आमच्या घरी एक सत्पुरुष येणार आहेत. ते पुण्याहून मुंबईत आले आहेत आणि उद्या मी त्यांना गिरगावातून घेऊन येणार आहे.'

सत्पुरुष येणार म्हटल्यावर माझी वैखरीच स्तब्ध झाली. मला माझ्या डोळ्यांसमोर माझ्या सद्गुरु रमादेवींचे आगमन होत आहे असा चलचित्रपट डोळ्यांपुढून सरकू लागला. माऊलींचे आगमन म्हणजे आम्हा गुरुभक्तांना पर्वणी, सर्वोत्कट आनंदाचा क्षण. आम्ही सर्व भक्त आनंदाच्या परमोच्च शिखरावर जात असू. माऊलींच्या आगमनाच्या तयारीची धावपळ सुरू..... उत्साह ओसंडून जायचा. कोणी पताकांच्या माळा बांधतो आहे; गुरुभगिनी मार्गावर सडा संमार्जन, दुतर्फा रांगोळ्या काढण्यात व्यग्र आहेत. सुवासिक फुलांच्या माळांनी जणू रस्त्याला दुतर्फा कुंपणच घातले जात आहे. अत्तर, उदबत्त्या, सुगंधाची दरवळ, पुष्प पाकळ्यांचा सडा, आता माझी गुरु माऊली या मार्गावरून गाडीमध्ये बसून येणार, ध्वनी क्षेपकातून कर्णमधुर सनई चौघड्यांचे सूर निनाद लागले आहेत. दीपमाळांच्या रोषणाईने मार्ग प्रकाशमय झाला आहे. पंचारती घेऊन सुवासिनी दुतर्फा उभ्या आहेत. मला क्षणभर थांबून विचारावे लागले, 'भाऊसाहेब आपण महाराजांना कसे आणणार आहात?'

'टॅक्सीने'

'टॅक्सीने? नाही नाही! माझी गाडी असताना भाडोत्री वाहन कशाला?' 'ठीक आहे मग गाडी घेऊन या! फारच छान झाले! तुम्ही बरोबर सकाळी ८.३० वाजता सायनच्या पेट्रोल पंपाजवळ याल का?'

'हो हो अगदी निश्चित सकाळी ८.३० वाजता! मी आताच निघतो व गाडी प्रथम सर्व्हिसींग करून धुऊन घेतो. उद्या गाडीला हार वगैरे घालून आणतो.' मी चेंबूरहून लागलीच गोरेगावला आलो.

सायंकाळपर्यंत गाडी सर्व्हिसींग करून मिळाली. रात्रीच हार फुले गुच्छ आणून ठेवले. आत सीटवर अंथरण्यास रेशमी व लोकरीची वस्त्रे पायाखाली मऊ कुशन, अत्तर उदबत्ती सर्व तयार ठेवले. पहाटे स्नानादी आटोपून मी व पुतण्या संजय तयारीस लागलो. गाडी सजवून तयार केली व ७.३० वाजता घर सोडले. ठरल्या वेळात आम्ही सायन पेट्रोलपंपावर श्री भाऊसाहेबांना घेतले व गिरगावात आलो. गेटच्या एका बाजूला गाडी उभी केली. भाऊसाहेब प.पू. श्री महाराजांना आणण्यास त्या कंपाऊंड मधील एका इमारतीत गेले. मी अत्यंत उत्कंठेने सत्पुरुषांचे दर्शन व्हावे म्हणून प्रतिक्षा करीत होतो. साधारण १५ ते २० मिनिटात तिघे ब्रह्मवृंद समोरून येताना दिसले. भाऊसाहेब लगबगीने गाडी गेट मध्ये आणण्याचे सुचविण्यास येत होते. तोपर्यंत आम्ही गाडी गेटमध्ये आणून दरवाजा उघडून तयार होतो. माझे लक्ष त्या त्रिमूर्तींकडे होते. तिघेही वृद्ध सत्तरीच्या जवळचे असतील. दोन्ही बाजूचे ब्राह्मण सावळ्या वर्णाचे तर मधले गौरवर्ण तेजाळ कांतीचे होते. मधलेच 'श्री महाराज' असावेत हे न सांगताच कळले. तिघांनाही मागील सीटवर बसविले. चरणाखाली ठेवण्यास आणलेली उशी मी 'श्रीं'च्या पायाखाली सारली. चरण स्पर्श व वंदन करून मी व भाऊसाहेब पुढील सीटवर बसलो.

श्री सद्गुरु रमादेवींचा आगमन सोहळा, तो भोवतालचा अफाट जनसागर, त्या भक्तगणांची धावपळ - ही दृश्ये पहाण्याची नेत्रास सवय लागलेली होती. त्यामुळे प्रथम दर्शनी वाटले, असतील कोणीतरी सत्पुरुष, एखादे ब्रह्मनिष्ठ प्रवचनकार किंवा आचार संपन्न असे पुराणिक बुवा, ज्यांच्या मुखावर ब्रह्मतेज आहे, सात्विकता ओसंडत आहे असे आपण मंदिर तीर्थक्षेत्री पहातोच. तशा प्रकारचे हेही असावेत,' 'श्री महाराज' आधीच विनयाची मूर्ती! साधेपणाची कमाल! शुभ्र धोतर आणि अंगावर करवत काठी उपरणे हा वेष. मुद्रा अगदी निरागस. एखाद्या अजाण बालकासारखी. निराकार निर्विकार परंतु तेजाळ कांती, शांत-मुग्ध-प्रसन्न भाव. हिऱ्याची पारख होण्यास रत्नपारखी असावे लागते. आम्हां अज्ञानी बालकांस गारगोटी आणि हिरा कसे कळावे? मनात विचार चक्रे चालू असतानाच संजयने गाडी रिझर्व्ह बँक कॉलनीत वळविली. भाऊसाहेबांच्या इमारती समोरील प्रांगणात गाडी उभी राहिली.

आणि पाहतो तर काय.... भाऊसाहेबांनी अदबीने गाडीचे दार उघडले. 'श्री महाराज' खाली उतरले ते पांढऱ्या शुभ्र पायघडीवर. त्यांच्या थोरल्या बंधुंनी 'श्री महाराजांच्या' गळ्यात पुष्पहार घातला आणि दुतर्फा उभ्या असलेल्या भक्तगणातून एकमुखाने ललकारी निनादली. 'अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त! 'माझ्या दृष्टी समोर तीन मुखी दत्तात्रेय उभे राहिले. साक्षात दत्तप्रभूच येथे या क्षणी अवतीर्ण झाले आहेत. भक्तांनी 'श्री महाराजांवर' पुष्पवृष्टी चालू ठेवली. 'श्री महाराज' पावले टाकीत पुढे पुढे चालत होते. त्यांच्या पुढे पुष्पांचा सडा पडत होता. एका लयीत सर्व एकमुखाने धून म्हणत होते, 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' 'श्री महाराज' पायघड्यावरूनच चार पायऱ्या चढले. उजवीकडे वळले. प्रमुख दरवाजासमोर पाट मांडलेला होता. त्या पाटाच्या समोर मोठे चांदीचे ताम्हण होते. 'श्री महाराज' पाटावर उभे राहिले आणि मी माझ्या लहान बहिणीकडे आश्चर्याने पहातच राहिलो. एका चांदीच्या गडव्यातून ती दूध श्रीदत्त प्रभुंच्या चरणावर घालत आहे, लागलीच दुसऱ्या गडव्यातून समशीतोष्ण पाणी घालीत आहे. आता भाऊसाहेब पुढे सरसावले आहेत. शुभ्र मऊ वस्त्राने ते 'श्रीं'चे चरण पुसून कोरडे करीत आहेत. सौ. प्रभाताई हातात पंचारती घेऊन 'श्री महाराजांना' कुंकुम तिलक लावीत आहे. सोन्याच्या मुद्रिकेने प्रभुंना औक्षण करीत आहे.

पंचारती ओवाळतानाच 'श्री महाराज' आपल्या परम पवित्र हस्तातून रुपयांची ओवाळणी देत आहेत. यजमान हस्त संकेत करून 'श्रीं'ना घरात प्रवेश करण्यास सांगत आहेत. 'श्री महाराज' आत येतात, त्यांना बसण्यास आसन, टेकण्यास तक्क्या, सर्व तयार आहे. 'श्री महाराज' स्थानापन्न होतात. सौ. प्रभाच्या जावा, नणंदा अशा पंच सुवासिनी 'श्री महाराजांना' औक्षण आणि आरती ओवाळतात. 'श्री महाराज' प्रत्येकीच्या आरतीत ओवाळणी टाकतात. मग दर्शनास पुरुष स्त्रियांनी समस्त भक्तगणांची रांग लागते. अस्मादिकांचा नंबर येतो. ते माऊलींपुढे आपल्या साक्षात् श्री रमादेवीच पुढे बसल्या आहेत, आज दत्तप्रभू अवतारात दर्शन देत आहेत, असे मानून उपादानाचे पाकीट समोर ठेवून मनोभावे साष्टांग नमस्कार घालतात.

भाऊसाहेब म्हणाले, हे आमचे मेहुणे शशीकांत नागले, सौ. प्रभा हीने माझी ओळख करून दिली - 'माझा भाऊ' भाऊसाहेब.... म्हणाले 'हे बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर आहेत.' प.पू. महाराज म्हणाले, 'होय का? छान, चांगलं आहे.'

अस्मादिक भानावर येतात. मागे रांग आहे. पुनश्च नमन करून बाजूस नम्रपणे उभे राहतात. नंतर 'श्री महाराजांच्या' पाद्यपूजेचा कार्यक्रम सुरु झाला. 'श्री महाराजांच्या समोर चौरंग ठेवला होता. चौरंगासमोर सोवळे, उपरणे परिधान करून श्री. भाऊसाहेब व नऊवारी, नथीत आमच्या धाकल्या भगिनी बसल्या. गुरुजी जगन्नाथ पुजारी यांनी चौरंग रंगीबेरंगी फुलांनी सजविला होता. श्री दत्तप्रभुंच्या चांदीच्या पादुका श्री वासुदेव निवास कर्वे रोड, पुणे येथून आणलेल्या

मध्यभागी होत्या. पुण्याह-वाचन होऊन मंत्रघोष सुरू झाले. 'श्री महाराजांचे समवेत असलेल्या ज्या दोन ब्रह्मवृंदांचा उल्लेख केला होता त्यापैकी एक आपले वे.शा. संपन्न जगन्नाथ पुजारी गाणगापूरकर होते व दुसरे प.पू. गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत भक्त केसरी बापूसाहेब कुबडे हे सोलापूरहून आले होते. पादुकांना पंचामृत स्नान, अभ्यंग स्नान, उटणे, अत्तर वगैरे लावून प्रारंभ झाला. यथाविधी यथासांग पूजा संपन्न झाली. सर्व भक्तमंडळींसह प्रसाद भोजन म्हणजे सोवळ्यात ब्राह्मण आचाऱ्यांकडून करविलेल्या अन्नाचे सेवन झाले. थोडी विश्रांती झाल्यानंतर 'श्री महाराजांसह' मी व भाऊसाहेब त्यांना गिरगावात श्री. जोशींकडे घेऊन निघालो. सर्वांनी 'प.पू. महाराजांचा' निरोप घेतला.

जन्मोजन्मी केले पुण्य बहुसाल।
तरीच घडेल संत संग।।
संतसंग जया मानवा आवडे।
तेणे गुणे घडे समाधान।
समाधान घडे सज्जनांच्या संगे।
स्वरुपाच्या योगे रामदासी।
सर्वकाही घडे संगतीच्या गुणे।
साधुची लक्षणे साधु संगे।।

वरील श्लोक श्री रामदास स्वामी महाराजांचे आहेत. या जन्मात किती पुण्य संपादन केले, पापकर्मे-दुष्कृत्ये हातून किती घडली याची कल्पना अंतर्यामात असते. सिंहावलोकनाची मर्यादा बाल्यावस्थेपर्यंत पोहोचते. पुण्य संचयाचा ठेवा आठवावा तर अंशमात्रही हाती लागत नाही. असे असतानाही संतसंग घडतो आहे याचे कारण गत जन्मातील काही पुण्यसंचय! 'बहुत सुकृताची जोडी' असेच काही तरी असले पाहिजे किंवा वाडवडीलांच्या पुण्याईचे हे फळ असावे असे म्हणावे लागेल.

प.पू. श्री सद्गुरु रमादेवींची कृपा होऊन वयाच्या विसाव्या वर्षी दि. १८ डिसेंबर १९५७ रोजी मंत्रदीक्षा प्राप्त झाली. जीविताचे अंतिम साध्य कोणते? त्या अनुषंगे साधना कशी व्हावी? याचा उपदेश झाला. नित्य ध्यान धारणा जपानुष्ठान पूर्ण श्रद्धेने आणि निष्ठेने होऊ लागले. ''लाख आणि कोटी नाममंत्र जपाची अनुष्ठाने होतील तरच भक्तीभाव वाढीस लागेल. प्रारब्ध क्षय होईल. अंत:करणात सच्चिदानंद परमात्मा उभा आहे. त्याच्या समोरच हा जीवात्मा आहे. परंतु शंका कुशंका आणि जन्मजन्मांतरीचे अनेक भले बुरे संस्कार यांचे वेष्टन या जीवात्म्याभोवती आहे; हे सर्व मळभ दूर झाल्याखेरीज त्या परिशुद्ध परमात्म्याचे दर्शन होणार नाही. पूर्ण भक्तीभावाने जपानुष्ठाने करता करता वेष्टनाचा एक एक फेरा उलगडत जाईल. एक दिवस असा

येईल की, तुमच्या ठिकाणी वास करणारी ती आदिशक्ती जगदंबा कुंडलिनी जागृत होईल आणि श्रीहरींकडे जाण्याची एक एक दालने तुम्हाला उघडून देईल.''

श्री माऊलींचा हा उपदेश मनात पूर्णपणे बिंबला. नित्य साधना सुरू झाली. कधी शक्ती जागृत होईल? कधी ती अनुपम अनुभूती येईल? अशी मनास ओढ लागली. पाच सहा वर्षांचा कालावधी गेला. नोकरी, त्यातून सिव्हील इंजिनिअरींगचे शिक्षण, वृद्ध माता पिता, त्यात धाकट्या भगिनींची लग्ने, घरात काही आजार, त्यातून अनेक कौटुंबिक समस्या. सर्व जबाबदाऱ्या शिरावर येऊन टेक्निकल जॉब, त्यामुळे उन्हातान्हातील कामे, सकाळ - संध्याकाळ १२-१२ तास ही कामे चालत. त्यातून संसार सुरू झालेला होता. 'अनुदिनी अनुतापे तापलो रामराया!' अशीच ती अवस्था. कर्तव्ये आणि जीवनातील रुक्षता कमी करण्यास कुटुंबासह थोडी हौस करमणूक हेही आलेच. सर्वांच्या सुखा-समाधानाच्या, आनंदाच्या आड आपली साधना येऊन तरी कशी चालेल? देह त्याचे गुणधर्म साधायचा. विश्रांती, निद्रा जोर करायची. मग जाता येता बस वा लोकल मधून प्रवासात होईल तेवढा जप. माऊलींच्या कृपेतून रोवलेली भक्तीबीजे संसार तापात होरपळू लागली. माऊलींचे कधी काळी मँगलोरहून पुणे मुंबईस आगमन व्हायचे. तेवढ्या संतसंगात बॅटरी चार्ज होईल तेवढीच! माऊली आल्या तरी त्यांचा सहवास दुरूनच. निकट संतसंग नाही. माऊली सदैव ध्यान धारणा-समाधी अवस्थेत असायच्या आणि प्रवचनापुरत्या जनसमुदायापुढे यायच्या. प्रचंड जनसागर लोटायचा. त्या तुडुंब गर्दीतून व्यासपीठावर उच्चासनावर बसलेल्या माऊलींचे दुरून दर्शन व्हायचे. प्रत्यक्ष भेट होणे नाही. तसा निकट सत्संग हवा असेल तर मँगलोरला माऊलींचे आश्रमात जाऊन राहणे इष्ट होते. तेथे माऊली लेकरांची जातीने विचारपूस करते. खाणे पिणे सर्व सोई झाल्या की नाही जातीने पहाते. जवळ बसवून साधनेबद्दल चौकशी, शंका-कुशंका काही अडचणी असतील तर निराकरण करते. पण इतक्या लांब जाणे कसे व्हायचे? खर्च तरी कसा झेपणार. एकदा माऊली पुण्यास आल्या असताना, आम्हा सर्व अनुग्रहीत साधकांना त्यांची भेट एका स्वतंत्र हॉलमध्ये घेता आली. ही मिटींग फक्त अनुग्रहितांकरता असली तरी पाचशेच्या वर अनुग्रहीत मंडळी होती. माऊलींचे उद्या मँगलोरला प्रयाण होणार म्हणून आम्ही सर्व अत्यंत दु:खी झालो होतो आणि एकमुखाने माऊलीस कळवळून विनंती करीत होतो की, माऊलीने अजून काही दिवस रहावे. त्या आग्रहावर माऊलीने प्रतिप्रश्न केला, ''माझे बद्दल एवढी आत्मियता आणि ओढ आहे. मग तुम्ही किंवा तुमच्यापैकी संसार सोडून माझ्याबरोबर यायला कोण तयार आहे, त्याने हात वर करावा.'' एकही हात वर आला नाही. माऊलींचे प्रयाण झाले की, किती वर्षाने पुनरागमन होणार हे सांगता येत नसे.

माऊलींचे प्रयाण झाले की, पुढे काही दिवस किंवा काही महिने निष्ठेने साधना चालायची, पुन्हा येरे माझ्या मागल्या. नेहमीची धनार्जनाकरीता प्रति मिनीटास धावपळ, कष्ट-मेहनत, ताण-तणाव, जबाबदाऱ्या, संसारिक ताप असे वाटू लागायचे की, शक्ती जागृत झाल्याखेरीज खऱ्या अर्थाने साधना सुरू होत नाही. या नित्य संसार व्यापातून एवढी साधना होणे आणि शक्ती जागृतीचा अनुभव येणे अगदीच दुरापास्त आहे. निष्ठा डळमळत होती पण श्रद्धा दृढ होती. शेवटी मनाने निर्णय घेतला की, आता वयाची ४० वर्षे पूर्ण होईपर्यंत जास्त लक्ष सांसारिक कर्तव्ये, ध्येये पूर्ण करण्यात घालवू. चाळीशी पूर्ण होताच मात्र अध्यात्माकडे जास्त लक्ष देऊ. सर्वप्रथम ८-१५ दिवस मँगलोरला जाऊन गुरुमाऊलींच्या सान्निध्यात राहू. पत्नी सोबत आली तर सहकुटुंब जाऊ. चाळीशी झाली आणि १९७८ च्या ऑक्टोबरला माझ्या परमपूज्य गुरुमाऊली निजधामास निघून गेल्या. माऊलींचे महानिर्वाण झाल्याची बातमी आली. आकाश कोसळले. आता कसली साधना! कोठले मार्गदर्शन? आणि कशी होणार आहे शक्ती जागृती? महामाया आदिशक्ती गुरुमाऊलीच अंतर्धान पावली. किती मूर्खपणाचा निर्णय मनाने घेतला होता?

जाते घडी ही आपले साधा।
करा काय ते आता करा।।

हेच खरे! जीवनपथ, दिशा उदासीन वाटू लागल्या. सर्वत्र आता अंधारच दिसू लागला. ''आला आला प्राणी जन्मासी आला... गेला गेला काळ निघोन गेला.''

शेवटी जसा आला तसाच काहीही साध्य न करता उलट सांप्रत जीवनात संचित प्रारब्ध वाढवूनच गेला, असे अनेक नैराश्याचे विचार मनात थैमान घालू लागले.

नोव्हेंबर महिना आणि काहीसा डिसेंबर सरला आणि २९ डिसेंबर १९७८ रोजी या महाविभुतीच्या दर्शनाचा लाभ झाला. परंतु लाभ होऊनही रत्नाची पारख लागलीच झाली नाही.

वाटायचे की, या सांप्रत युगात असे सद्गुरु असे सत्पुरुष, रमामाऊलींच्या कृपेने भेटतील का? की जे आपली कुंडलिनी शक्ती आपल्या डोक्यावर हात ठेवून क्षणात जागृत करून आपल्याला समाधी सुखाचा अनुभव देतील? छे हे कसे शक्य आहे? आपण त्या पात्रतेपर्यंत पोहोचूच शकत नाही ही पहिली गोष्ट. त्यातून कलीयुगाचा कलीचा प्रभाव वाढत आहे. देव-भाव-भक्ती जणू संपुष्टातच येत चालली आहे. आजच्या या जगात असे सत्पुरुष, असे सिद्ध पुरुष, असे सद्गुरु मिळणेच अशक्य आहे.

श्री सद्गुरु रमादेवींचे भव्य दिव्य अफाट जनसमुदायाचे भक्तगणांचे उपस्थितीत होणारे आगमन; ती मिरवणूक, ती रोषणाई, ते सनई चौघड्यांचे मंगल सूर हे अनेकदा पाहिलेले,

मनावर प्रतिबिंबीत झालेले. त्या मानाने हे २९-१२-१९७८ चे एका सत्पुरुषाचे आगमन आणि प्रयाण साधेसुधेच वाटले.

प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांना श्री भाऊसाहेब शृंगारपुरे यांचे घरी आणणे आणि पुनश्च गिरगावात नेऊन सोडल्याच्या घटनेला सात ते आठ महिन्यांचा कालावधी निघून गेला. आता मी संत सत्पुरुषांची चरित्रे, आध्यात्मिक विषयावरील मासिके वाचण्याचा सपाटाच लावला होता. सप्टेंबर १९७९ ला एके दिवशी वाशी नवी मुंबई येथे नवीन काम मिळविण्याच्या प्रयत्नात गेलो होतो. येताना सौ. प्रभाकडे मी व संजय (पुतण्या) गाडीनेच गेलो. चहापान झाले. समोरच टेबलावर मला एक अंक दिसला. ''शक्तिपात योग दर्शन.'' तो प.पू. गुळवणी महाराजांवरचा गौरव अंक सांगली प्रतिष्ठानचा होता. अंक मिळण्याचा पत्ता अंकात सापडला. सायन येथे श्री. भाई वैद्य यांचे येथे हा अंक विक्रीस ठेवला होता. अंक सवडीने परंतु अभ्यासपूर्ण वाचून काढण्यात १९८० साल उजाडले.

प.पू. गुळवणी महाराजांची महती १९५७ साली कानी आली होती. वास्तविक १९५७ सालापासून १९५८ एप्रिल पर्यंत मी पुण्यातच रहात होतो, पण योग नव्हता. गुरुमहाराजांचे दर्शन झाले नाही. हा अंक वाचल्यानंतर मात्र कळून चुकले की, आजही शक्ती जागृत करून समाधी सुखाचा अनुभव देणारे सद्गुरु भूतलावर आहेत. या अंकाच्या पठणाने, अभ्यासाने, प.पू. योगीराज गुळवणी महाराजांची ओळख पटली. त्यांच्या संक्षिप्त चरित्राने आणि सर्व साधक भक्त अनुग्रहितांच्या अनुभवांच्या वाचनाने त्यांची योग्यता, महानता आकलनात आली. अशा या महान योगीराजाचे उत्तराधिकारी तेच ते की, ज्यांना आपण आपल्या गाडीने बहिणीकडे घेऊन आलो. तेच ते परम पूजनीय श्री दत्तमहाराज, की जे योग दीक्षा प्रदान करून भक्त भाविकास अध्यात्म्याच्या द्वितीय श्रेणीवर आरुढ करून बसवितात. क्षणमात्रे! काही काळ न लागता! असे ते तेजोमय सिद्ध पुरुष! आत्मसाक्षात्कारी! ब्रह्मनिष्ठ ब्रह्मज्ञ! चारही वेद अठरा पुराणे ज्यांनी आत्मसात केली आहेत, शास्त्र, न्याय, मीमांसा यांचा दांडगा व्यासंग - त्यात तज्ञ, विद्यावाचस्पती, शिवाय राष्ट्रीय पंडीत. भागवताचा अवतारच जणू; साक्षात् ईश्वर स्वरुप, हे सर्व त्या अंकात वाचनात आले. मी लागलीच बहिणीकडे चेंबूरला गेलो. मला चैन पडेना. आणखी एक कारण घडले. मी अंक वाचून पूर्ण केला आणि त्याच रात्री मला एक गोड स्वप्न दृष्टांत झाला, 'प.पू. गुळवणी महाराज माझ्या घरी आले. स्वच्छ पांढरे शुभ्र धोतर व पांढरा शर्ट, काळा कोट गर्द रंगाचा, काळी टोपी, उपरणे हा वेष!' येऊन हॉलमध्ये सोफ्यावर स्थानापन्न झाले. शांत प्रफुल्ल मुद्रा. मी भावपूर्ण साष्टांग नमस्कार केला. प्रसादाची कागदाची पुडी, साधारण एका नारळाच्या आकाराची, सोफ्यावर दोन्ही हाताने ठेवीत उभे राहिले व म्हणाले. ''प्रसाद ठेवला आहे'' हाताने आशीर्वाद दिला आणि क्षणात निघून गेले. आता त्या अंक

वाचनातून मला प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांची माहिती, त्यांची योगदीक्षा प्रदानशीलता कळली तशी त्यांचे उत्तराधिकारी प.पू. दत्तमहाराजांच्या योग्यतेची पुरेपूर महती कळली.

मी बहिणीकडे गेलो व तिला म्हटले, ''अग तुझ्याकडे त्या दिवशी एक सत्पुरुष आले होते (डिसेंबर १९७८ अखेरी) अगदी साधेसुधे! तुला माहीत आहे का ते कोण होते? तुला कळली का त्यांची महानता?'' बहीण गालात हसत होती. मी भावना वेगाने आवेशाने बोलत होतो. मन द्रवत होते. सद्‌गदीत होत होते; ती मूर्ती डोळ्यासमोर येत असताना!

''अगं साक्षात् दत्तात्रेय तुझ्या घरी येऊन गेले गं! ज्ञानाचा सागर योगीराज आणि योगदीक्षा दाते कुंडलीनी ज्यांचे अंकीत आहे असे श्री दत्तमहाराज. एवढ्या मोठ्या अधिकारी महात्म्याची तू संभावना केलीस, पण तुला याची कल्पना तरी आहे की नाही?''

बहीण म्हणाली, 'हो, अरे आम्हा उभयतांस ते प्रति परमेश्वर आहेत इतकेच माहीत आहे.'

'मग तुम्ही दोघांनी त्यांची अनुग्रह कृपा संपादली आहे की नाही?' 'होय आम्ही उभयता त्या कृपासिंधुचे अनुग्रहीत आहोत. हे आमचे गतजन्मीचे पुण्य फळास आले आणि या जन्मी भाग्योदय झाला असेच म्हणावे लागेल.' 'खरंच तुम्ही भाग्यवान आहात. मीही माझ्या सद्‌गुरु रमादेवींकडून हीच अपेक्षा धरून होतो. प्रार्थना करण्याकरीता व सहवास घडावा म्हणून मँगलोरला जाणार होतो. परंतु तो योग आला नाही. माऊली ब्रह्मलीन झाल्या. मी पोरका दीन झालो होतो. अंक वाचल्यावर प.पू. गुळवणी महाराजांनी द्वितीय गुरु केले. तसे प.पू. दत्तमहाराजांनाही द्वितीय गुरु करून योगदीक्षा प्रदानतेचे अधिकारही संपादन केले. मलाही आशेचे किरण दिसू लागले आहेत. आशा आकांक्षा पल्लवीत होऊ लागल्या आहेत. तुम्ही उभयता 'श्रीं'चे दर्शनास पुण्यास केव्हा जाणार आहात? ते मला कळू द्या, मलाही यायचे आहे.'

५) योगदीक्षा याचना

एके दिवशी साधारण मार्च १९८० च्या पहिल्या आठवड्यात मी, माझी धाकटी बहीण सौ. प्रभा व श्री. भाऊसाहेबांचे समवेत पुण्यास गेलो. श्री वासुदेव निवास कर्वे रोड येथे श्री महाराजांचे दर्शन झाले. 'श्रीं'चे दर्शन होताच माझे अष्टसात्विक भाव जागृत झाले असावेत. मन अत्यानंदाने बेहोश झाले. आनंदाश्रू वाहू लागले, अंत:करण अत्यंत मृदु सद्‌गदीत झाले.

मी 'श्रीं'च्या पुढे भावपूर्ण मनाने डोके टेकले ते मला उठावेसेच वाटेना. कसे बसे सावरून मी पुष्पहार काढून 'श्रीं'चे गळ्यात घालण्यास गेलो. 'श्रीं'नी हात पुढे करून हा हार प.पू. गुळवणी महाराजांचे फोटोस घालण्यास सांगितला. भावना वेग आवरून मी 'श्री'च्या पुढे

नारळ व दक्षिणा ठेवली आणि पुन्हा नमस्कार केला आणि आपणाकडून योगदीक्षा अनुग्रह प्राप्त व्हावा म्हणून प्रार्थना केली. क्षणभर श्री महाराज काहीच बोलले नाहीत. कटाक्ष टाकून अवलोकन केले इतकेच. मला उसंत नव्हती. मी म्हटले, '१९५७ साली श्री सद्गुरु रमादेवी माऊलींकडून मंत्रदीक्षा घेतली आहे. १९७८ च्या ऑक्टोबर महिन्यात माऊलींचे महानिर्याण झाले. या पुढील भक्ती मार्गाचे मार्गदर्शन आपणाकडून व्हावे. आपणाकडून दीक्षा प्राप्त व्हावी महाराज!'

''योगवाणी पुस्तकाचे वाचन पूर्णकरा आणि येत्या चैत्री पाडव्याचे दिवशी पहाटे सहा वाजता बैठकीला बसा'' आज्ञा झाली. ''स्नान संध्यादी आटोपून, देवा पुढे फक्त उदबत्ती लावून श्रीफळ साखर ठेवावी. प.पू. महाराजांना (प.पू. श्री गुळवणी महाराजांना) आपणास दीक्षा व्हावी म्हणून प्रार्थना करावी. देवासमोर काही अंतर सोडून कंबळ आसन अंथरून त्यावर बसावे. ज्या आसनामध्ये आपण सहज सुलभ आणि खूप वेळ बसू शकतो असे सहजासन घालावे. दोन्ही हाताची बोटे एकमेकात घालून वेळेच्या पंधरा मिनिटे आधीच डोळे मिटून, पाठीचा कणा ताठ ठेवून बसावे. गुरुमहाराजांचे स्मरण करीत रहावे. सहा वाजता दीक्षा होईल. उदबत्ती लावावी पण आपणापासून जरा दूर ठेवावी. दीप लावू नये. दीक्षा होताना होतील त्या क्रिया निर्भयपणे होऊ द्याव्यात. आपले संपूर्ण शरीर शक्तीमातेस देऊन तणाव सोडून बसावे. सर्व काही ठीक होईल.''

६) शक्तीपात दीक्षेबद्दल योगवाणी पुस्तकाच्या आधारे थोडक्यात माहिती

'श्रीं'चा निरोप घेऊन आम्ही मुंबईस परतलो. योगवाणी पुस्तक अभ्यास पूर्ण वाचले. शक्तीपात दीक्षा म्हणजेच योगदीक्षा. हा सिद्धयोग मार्ग आहे. या योगाला सिद्धयोग, महायोग, सहजयोग अशीही नावे आहेत. ही दीक्षा चार प्रकाराने दिली जाते.

प्रकार १ ला

१) आलिंगन दीक्षा : गुरु आलिंगन देऊन घट्ट मिठी मारतात. गुरुंच्या कवेत शिष्य बेभान होऊन अमृतानुभव, ब्रह्मानंद अनुभवित असतो. अशी दीक्षा अधिकारी शिष्यासच मिळते. अशा दीक्षेचे उदाहरणच द्यायचे झाले तर जगद्गुरु गोपाल कृष्णाने अर्जुनास दिलेली दीक्षा. आपला अध्यात्मातील अधिकार, आपली उच्चतम अवस्था ही शिष्यास स्वत:स माहीत नसते; त्याची कल्पनाही त्याला नसते. पण सद्गुरुंना त्याची पूर्ण कल्पना असते. ते आपल्या अंतर्ज्ञानाने, दिव्य चक्षूने त्याची आध्यात्मिक पातळी पाहू शकतात.

२) स्पर्श दीक्षा : दीक्षा देताना गुरुमहाराज सन्निध असतात ते शिष्याच्या शिरावर मध्यभागी (टाळूवर) हस्तस्पर्श करून ठेवतात किंवा भ्रूमध्यात उजव्या अंगठ्याने स्पर्श करतात आणि शिष्य साधक ब्रह्मानंदाची अनुभूती देहभान विसरून घेऊ लागतो. जगाचे, देहाचे, काही काळ विस्मरण झालेले असते.

३) चाक्षुषी दीक्षा : गुरु शिष्याच्या नेत्रात आपला नेत्रकटाक्ष एकटक करतात आणि शिष्य पाहता पाहता भावावस्थेत जाऊ लागतो. अधिकार परत्वे शिष्यास अनुभूती येते. कासवी जशी आपल्या पिल्लास एकटक पाहून त्याचे पोट भरते तसाच हा प्रकार आहे. कर्णेंद्रियातून सद्गुरुंची चित्कण मिश्रीत बोधवचने शिष्याच्या कानातून संक्रमित होतात आणि शिष्यास दीक्षा होऊन तो चिन्मयानंदात तल्लीन होऊन जातो. अशीही अनुभूती येते.

४) संकल्पित शक्तिपात दीक्षा : दीक्षा प्रदान करताना श्री सद्गुरु आपल्यापासून खूप दूर असतात. सद्गुरुंच्या अंतर्यामातून शिष्यास दीक्षा देण्याचा संकल्प सुटलेला असतो. श्री गुरुदेव आपल्याला तिथी-वार-तारीख व दीक्षेला बसण्याची वेळ सांगतात. त्यांच्या आज्ञेनुसार आपण दिलेल्या वेळेच्या पंधरा मिनिटे आधीच शुचिर्भूत होऊन देवापुढे नारळ साखर ठेवून उदबत्ती लावून सहजासनात बसायचे असते. दोन्ही हातांची बोटे एकमेकात गुंतवून डोळे मिटून प्रार्थना करायची. तत्पूर्वी घरातील आई-वडील व थोर मंडळीस नमस्कार करून बसायचे असते. थोर मंडळी सान्निध्यात नसतील तर त्यांना स्मरणपूर्वक मनातून नमस्कार करावा. ईश्वराला, आराध्य दैवताला, कुलस्वामिनीला, देवतांना वंदन करून श्री गुरुदेवांना आपणास दीक्षा व्हावी म्हणून, प्रार्थना करून त्यांचे ध्यान करावे. दिलेली वेळ होताच शिष्याला-साधकाला दीक्षा होत असलेली अनुभूती येऊ लागते. कुंडलीनी शक्ती आपल्या शरीराचा ताबा घेऊ लागते. केवळ मंत्रदीक्षा हा जो पूर्वापार चालत आलेला प्रकार आहे त्यात दीक्षा प्रदान करताना सद्गुरु आपल्या सन्निध असतात. पूर्वी घोंगडी किंवा कांबळी डोक्यावरून घेऊन गुरु शिष्याच्या कानात मंत्र सांगत असत. मंत्र षट्कर्णी होऊ नये, फक्त शिष्यासच ऐकू जावा हाही उद्देश. शिवाय हवेचे चलन-वलन सुद्धा समीप नसावे. गुरुमुखातून मंत्रोच्चार होत असताना अक्षरागणिक चित्कण शिष्याच्या कर्णपटलावर पडत असतात आणि शिष्याच्या शरीरात नसानसातून त्या मंत्र अक्षराचा चित्कणांसह प्रादुर्भाव रोमरोमात पसरतो. अंग अंग रोमांचित, पुलकीत-हलके-फुलके होते. उत्साह आणि चैतन्य अंगी आल्यासारखे जाणवते. ही अशी अनुभूती मला श्री सद्गुरु रमादेवी माऊलींनी दीक्षा दिली तेव्हा म्हणजे दि. १८.१२.१९५७ रोजी सकाळी १० ते १०.३० चे दरम्यान आली होती. (शक्तीपात दीक्षा म्हणजे काय?) शक्तीपात दीक्षा म्हणजे सद्गुरुंनी आपल्या शिष्याची कुंडलीनी शक्ती स्वत:च्या दिव्य शक्तीच्या संक्रमणाने जागृत करणे. ही शक्ती जागृत करणारा सद्गुरु अर्थातच सिद्ध पुरुष असतो. ही दीक्षा होत असताना शिष्याच्या

अंतर्यामात काय प्रक्रिया घडते ते थोडक्यात पाहूया.

योग शास्त्रामध्ये आपल्या शरीरात षट्चक्रे वर्णिलेली आहेत. त्यातील पहिले मुलाधार चक्र, दुसरे स्वाधिष्ठान चक्र, तिसरे मणिपूर चक्र, चौथे अनाहत चक्र, पाचवे विशुद्ध चक्र, सहावे आज्ञा चक्र, या षट्चक्र भेदनानंतर कुंडलीनी शक्ती टाळूचे मध्यावर असलेल्या सहस्त्रारात प्रवेश करते. येथे शिव-शक्ती, राधा-कृष्ण एकत्र येतात. या मीलनात साधक पूर्णावस्थेत पोहोचतो. आत्मसाक्षात्कार, ईश्वर दर्शन किंवा मोक्ष मुक्तीप्रद जातो. या अवस्थेनंतरचे साधकाचे जीवन केवळ जनकल्याणाकरता उरते. तो इच्छामरणी होतो. आपले ईश्वरदत्त कार्य संपताच आत्मतत्त्व अनंतात स्वेच्छेने विलीन करतो.

आता आपण प्रत्येक चक्राचे स्थान आणि शक्तिपात दीक्षा होताना मूलाधारात काय घडते तेही पाहू.

१) मूलाधार : हे गुद आणि जननेंद्रिय यामध्ये जी शिवण आहे तिचे मध्यावर आहे. मनुष्याचे पाठीत जो मेरुदंड आहे (मणक्यांची मालिका) त्याच्या डाव्या भागातून इडा नाडी, पिंगला नाडी उजव्या भागातून तर सुषुम्ना नाडी मध्यातून जाते. मूलाधारातून निघून सुषुम्ना नाडी डोक्यातील टाळूच्या मध्यात सहस्त्रदल पद्म आहे तेथपर्यंत पोहोचते. मेरुदंड मणक्याचे खाली आलेले शेवटचे टोक, पुच्छ, मूलाधार चक्र ह्याच पुच्छाच्या शेवटच्या अग्रावर आहे. येथेच ॐकार श्रीगणेश अधिष्ठीत आहे. हीच ती साडेतीन वेढ्यांची ॐकाराची कुंडलीनी देवता, म्हणजेच आपली प्राणज्योत, चैतन्य (इलेक्ट्रॉन्स) ही कुंडलीनी चैतन्य देवता द्विमुखी नागीणीच्या आकाराचे (सूक्ष्म) पिल्लू! या पिल्लाचे तोंड केशराने माखलेले आहे. विद्युल्लतेचा हा जणू नागीणीच्या आकाराचा प्रकाशझोत आहे. ही कुंडलीनी कशी आहे याचे सुंदर वर्णन श्री ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात केले आहे. हिचे एक मुख उर्ध्वगामी आहे. त्यामुळेच आपल्या शरीराला चलन-वलन, जीवन असून त्याद्वारे आपले सर्व व्यवहार चालतात. बाह्य जगाचे ज्ञान या उर्ध्वमुखाने होते. दुसरे अधोमुख आहे. ही कुंडलीनी कशी आहे हे वर्णन करताना श्री ज्ञानदेव माऊली म्हणते, ''सर्पाच्या पिल्लाच्या आकाराची, विद्युल्लतेसारखी नीलवर्णी, तेजस्वी प्रकाशमान, तिचे मुख केशरतंतूंनी माखलेले आहे तिचे अधोमुख आहे. ते आपल्याला अंतर्मुख करणारे, आपल्या खऱ्या स्वरुपाकडे म्हणजेच अध्यात्माकडे, आत्मसाक्षात्काराकडे, मोक्षाकडे नेणारे आहे.'' श्री सद्गुरु आपल्या सत् संकल्पाने आपल्या शक्तीने तिचे अधोमुख उर्ध्व करून सुषुम्ना नाडीचे द्वारात प्रविष्ट करतात. ते होत असताना म्हणजे दीक्षा होत असताना दिव्यानुभूती साधकास देतात.

प्रत्येक चक्रात कुंडलीनी शक्तीचा प्रवेश होत असताना ते ते चक्र सिद्ध होत पुढील शक्तीचे संचार क्रमण आणि त्या त्या वेळी साधकास येणाऱ्या अनुभूती या महायोग विज्ञान किंवा

पातंजल योगशास्त्रात वर्णिलेल्या आहेत.

२) कुंडलीनी शक्तीच्या प्रवासातील दुसरे स्थानक स्वाधिष्ठान हे नाभीस्थानी म्हणजे बेंबीजवळ आहे. मूलाधार शुद्ध होत असताना साधक शिष्याची प्रतिभा जागृत होते. तो काव्य, पदे लिहू लागतो.

३) स्वाधिष्ठानानंतर शक्ती मणिपूर चक्रात येते. हे चक्र नाभीस्थानाच्या वर आणि छातीचे हृदयाचे खाली आहे.

वरील दोन चक्रांचे भेदन करून कुंडलीनी शक्ती वर येण्यास साधकाला प्रयत्नांची म्हणजेच सतत अभ्यासाची, साधनेची पराकाष्ठा करावी लागते.

४) अनाहत चक्र : हे छातीत मध्यावर अंत:करणात किंवा हृदयाचे बाजूस असते म्हणून ह्या अनाहत चक्रात कुंडलीनी शक्तीचा प्रवेश झाल्यानंतर साधकास अंतर्यामातून अनाहत नाद (ध्वनी) ऐकू येऊ लागतो. आपला नाम जप श्री सद्गुरुच करीत आहेत. आपोआप जप होत आहे. आपण फक्त श्रोत्याची भूमिका करायची आहे. संतांच्या अभंगातून, कबीरांच्या दोह्यातून ह्या अनाहत चक्र भेदनाची अनुभूती वाचायला, ऐकायला मिळते.

५) विशुद्ध चक्र : हे कंठाचे खाली खळगा किंवा खोबण आहे तेथे आहे.

६) आज्ञाचक्र : हे कपाळाच्या मध्यावर भ्रूमध्यात आहे. येथे तिन्ही नाड्या एकत्र येतात. सुषुम्ना नाडीतून कुंडलीनी शक्ती आज्ञाचक्रातून सहस्त्रारात प्रवेश करते. सहस्त्रारात प्रवेश म्हणजेच अनंतात विलीन होणे, चित्शक्ती कुंडलीनी शक्ती म्हणजे प्रकाश झोतच तो, प्रकाशात मिळून मिसळून जातो. त्यानंतर तुकाराम महाराज म्हणतात ''आता उरलो उपकारा पुरता.''

७) योगदीक्षा प्राप्ती व अनुभूती

श्री सद्गुरु महाराजांनी सुरू केलेला हा श्री कुंडलीनी जगदंबा मातेचा प्रवास कधी आणि कोणत्या जन्मात संपेल हे सांगता येत नाही. हे आपल्या गतजन्मीच्या झालेल्या प्रगतीवर तसेच ह्या जन्मी आपण किती प्रयत्नशील असू किती साधनाभ्यास करू त्यावर अवलंबून आहे. पुढील जन्मी या पुढील अभ्यास चालू होऊन तीन जन्मात पूर्णत्व मिळते असे म्हणतात.

शक्तीपात दीक्षा जेव्हा संकल्पाने दिली जाते तेव्हा सद्गुरु देहाने आपले जवळ नसतात. मला श्री सद्गुरु दत्तमहाराजांनी दीक्षा दि. १७.३.१९८० चैत्री पाडवा या दिवशी पहाटे ६ वाजून १० मिनिटांनी दिली. तेव्हा सद्गुरु दिल्लीला होते. राष्ट्रीय पंडीत म्हणून त्यांना तिकडे आमंत्रण होते. दिल्ली येथे एका मंदिरात श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीची प्रतिष्ठापनाही पाडव्याचे दिवशी 'श्रीं'चे हस्ते झाली. मी गोरेगाव पूर्व, जयप्रकाश नगर, ३रा रस्ता, ३९-७ अभिषेक

इमारतीत ब्लॉक नं. ७ चे किचनच्या कोपऱ्यात देव्हाऱ्यासमोर आसनस्थ होतो.

पहाटे उठून स्नान संध्या आटोपून देवापुढे दर्भासन, त्यावर कंबलासन व त्यावर शुभ्रवस्त्र अंथरून बसलो होतो, खरे म्हणजे मी त्यावेळी कद-सोवळे किंवा धूतवस्त्र धोतर नेसायला हवे होते. पण धोतर-कद नेसण्याचा एक तर सराव नव्हता, शिवाय समजा यदाकदाचित योगिक क्रिया होऊन मी योगवाणीत वर्णन केल्याप्रमाणे नाचायला, उडायला, डुलायला लागलो असतो. अत्यानंदाने उड्या मारू लागलो असतो किंवा गडबडा लोळू लागलो असतो तर धोतर नेसण्याचे बाबतीत नवशिक्या असलेल्या माझी काय अवस्था झाली असती बरं? रिस्क नको म्हणून मी स्वच्छ धुतलेल्या लेंग्यात आसनस्थ झालो. शिवरंजनी उदबत्ती लावली. देवापुढे नारळ साखर ठेवली. 'श्री महाराजांचा' खुर्चीवर पायाखाली उशी आणि अंगावर लाल शाल असलेला फोटो ठेवला होता. देव्हाऱ्या पासून अंतर सोडून बसलो होतो. उड्या मारायला लागलो-बेभान झालो तर आजूबाजूला आपल्या अंगाला-पायाला काही लागेल; अशी वस्तु जवळ नसावी याची पूर्ण काळजी घेतली. ५-४५ वाजता डोळे मिटून बसण्यापूर्वी 'श्री महाराजांचे मन:पूर्वक दर्शन घेतले. मनात प्रार्थना केली, मनातून माझे माता-पिता थोरले बंधु-भगिनी सर्वांस स्मरणपूर्वक नमस्कार केला. प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांना आवाहन केले. 'या आणि मला सांभाळा, प.पू. दत्तमहाराज आपण या मला दीक्षा द्या! मी आपल्या पुढे पूर्ण शरणागत आहे. यापुढे त्वमेव माता, पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव, त्वमेव सर्वम् ममदेव देव' असे म्हणून मी डोळे बंद केले. सहजासनात मांडी घालून बसलो होतो. दोन्ही हातांची बोटे एकात एक घातली होती. घरची सर्व मंडळी, पत्नी, मुले निद्राधीन होती. पुतण्या संजय दारात उभा राहून उत्सुकतेने पहात होता. बसलो त्या खोलीतील लाईट बंद केला होता. शेजारच्या बिल्डींगमध्ये आकाशवाणी 'बी'चे कार्यक्रम सुरू झालेले ऐकू येत होते. प्रात:स्मरणाची प्रार्थना संपून पाचच मिनिटांचे वार्तापत्र होऊन ६.०५ नंतर भक्तीगीतांचा कार्यक्रम सुरू होत होता. मला बाह्यज्ञान होते. निरव शांतता होती. हवेत पहाटेचा सुखावह गारवा होता. मारुतीच्या देवळाजवळील पिंपळ वृक्षावर कोकीळ कुबुकुबी आवाज करीत होती. मी मनात श्री महाराजांचे प्रात:स्मरणीय, तेज:पुंज, सोज्वळ, शांत, दयार्द्र करुण रुप पहात होतो. इतक्यात आकाशवाणीवर, 'घनू वाजे घुण घुणा... कान्हा वेगे भेटवा का!' पहिले कडवे संपले असेल नसेल इतक्यात सर-सर-सर करीत चित् कंपने, स्पंदने मुलाधारात खळबळ होऊन निघू लागली. त्या सुखद समशीतोष्ण कंपाने मुंग्या मुंग्या याव्या असे कंप पायापासून मांडी-पाठीतून सरसरत मस्तकात ब्रह्मरंध्रा पर्यंत पोहोचले. मी मांडीपासून थरथरत वरवर उडत होतो. हा चैतन्याचा झोत मस्तकापर्यंत पोहोचताच मी बेभान होऊ लागलो. श्री महाराजांच्या आज्ञेनुसार मी अंग

अगदी मोकळे सोडले होते. जणू सद्गुरुंच्या स्वाधीन केले होते. परंतु मी गोलाकार फिरत आहे, माझे प्राण मस्तकाचे बाहेर निघून जात आहेत का? लखख वीज चमकली व मी बेभान अवस्थेतून भानावर येण्याचा, माझ्या प्राणास खाली खेचण्याचा कमालीचा प्रयत्न करू लागलो. क्षणात मन शांत होऊन निरामय झाले. आतून आनंद लहरी उसळू लागल्या. आता मला बेभान अवस्था असावी असेच वाटू लागले. डोळे उघडण्याचा थोडासा प्रयत्न करूनपाहिला, पण पापण्या घट्ट झालेल्या, हात हातात घट्ट झालेले, माझा ताबा शक्तीने पूर्ण घेतला आहे हे माझ्या लक्षात येऊ लागले. आता बाहेर काय चालले आहे. आपण कोठे आहोत, कोण काय करीत आहे, कावळे चिमण्यांचे आवाज येत आहेत का? नको मला काही नको, मला जगताचे भान नको, मला जाणीव नको. आनंदाचे डोही आनंद तरंग! सद्गुरुनाथा किती हा आनंद! मला सदा सर्वकाळ अशाच अवस्थेत राहू द्या! कशाला मी माझ्या प्राणास त्या सुखद अवस्थेतून भयाने खाली ओढले; असो. पण आता अशाच आनंदात डोलत राहू द्या. सर्वत्र उजाडले, पक्षांचे, माणसांचे आवाज, आरडा-ओरडा कानावर येऊ लागला. शांतपणे अर्धोन्मिलीत डोळ्यांनी पाहिले. पहाटेच्या थंड वातावरणात साखर झोपेतून जशी शेज सोडू नये असे वाटते ना, तशीच अवस्था होती ती. म्हटले पाच दहा मिनिटे तरी झाली असतील. घड्याळाकडे मान वर करून पाहिले तर सकाळचे ७ वाजून २० मिनिटे झाली होती. मी आसनावरून उठलो कसे अगदी हलके फुलके हवेत चालल्यासारखे वाटत होते. मन उल्हसित झाले होते. प्रेमाने, वात्सल्याने, आनंदाने अगदी भरून गेले होते. संपूर्ण दिवस आनंद लहरीतच गेला. सारखे वाटे, बैठक-आसन घालावे, पुन्हा ती शिवरंजन उदबत्ती लावावी आणि बैठकीला बसावे. सायंकाळी पाच ते सात बैठकीस बसलो. पहाटे सारखा अनुभव आला नाही तरी सर्वांगावर शहारे येऊन काया रोमांचित होत होती. मूलाधारातून पाठीच्या मणक्यातून सुखद स्पंदने जाणवत होती. आनंद उर्मी उठत होत्या. सद्गुरुंच्या स्मरणाने सात्विक भाव जागृत होत होते. आजपर्यंतच्या आयुष्यात ध्यानास बसत होतो. पण अशी स्पंदने येत नव्हती, असे रोमांच कधी जाणवत असत पण आजपासून हे आपोआप घडत आहे ते माझ्या देहात सद्गुरुने सुरू केले आहे. ''बाप सद्गुरु देवे मज ऐसे केले।।'' अशी तंद्री, अशी उन्मनी अवस्था रोज मिळणार असेल व त्याकरीता मला मांसाहार सोडून, कांदा व लसूण सोडून हा आनंद जर रोज मिळणार असेल तर खरंच मला काही नको. साधना, बैठक, सद्गुरुंच्या स्पंदनातून अंतर्यामात प्रवेश आणि सत्संग! रात्री ८.३० वाजता सद्गुरु प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांना पत्र लिहीण्यास घेतले. पत्र पोहोचेपर्यंत महाराज पुण्यात आलेले असतील म्हणून पुण्याच्या पत्त्यावर हे पत्र टाकायचे ठरवले. त्या पत्रात मी लिहीले होते ते खालीलप्रमाणे -

'आपल्या आज्ञेप्रमाणे गुढीपाडव्याचे दिवशी पहाटे सहा वाजता बैठकीला बसलो. साधारण ५ ते १० मिनिटानंतर शक्तीसंचार झाला. ध्यानमग्न होताच आसनासह आपण डावीकडून उजवीकडे स्वत: भोवती फिरल्यासारखे वाटले. फिरण्याच्या जाणीवेला धरूनच आपाद मस्तक वीजेचा झोत नखशिखांतून वर वर जाऊ लागला. या सुखद झोताने संपूर्ण शरीराचा ताबा घेतला. क्षणैक देहभान नष्ट झाल्याचे जाणवले. होतील त्या क्रिया होऊ द्यायच्या हे जरी ठरवून बसलो होतो; तरी मन, देहबुद्धी सोडण्यास राजी झाले नाही. देहभान हरपत आहे तोच मनास भय प्राप्त होऊन शक्तीसंचार मस्तकातून खाली आला, या गोष्टीची खंत वाटत आहे. देहबुद्धी आली, ध्यान धारणा तशीच राहिली पण जगताचे भान ठेवून. या अवस्थेत ३० ते ४० मिनिटे कशी गेली ते कळले नाही. पुढील बैठकीत प्रथम वेळेची तशीच्या तशी अनुभूती नसली तरी ध्यान धारणा चांगली होत आहे. शक्ती संचार जाणवतो. साधना सकाळ संध्याकाळ चालू आहे. उत्तरोत्तर साधनेत प्रगती होवो हीच सद्गुरु चरणी प्रार्थना.'



८) नित्य साधना आणि अनुभव

नित्य साधनेस प्रारंभ झाला. पहाटे आणि सायंकाळची ध्यान-धारणा बैठक होऊ लागली. सूर्यास्त होताच मनास साधनेची ओढ लागू लागली. कधी घरी जाऊन हातपाय धुऊन, देवासमोर उदबत्ती लावून आसनस्थ होतो अशी तीव्र इच्छा व्हायची. शिवरंजनीच्या मंद सुवासाची सवय इतकी झाली की कोण्या गुरुबंधूकडे गेलो आणि या ठराविक उदबत्तीचा सुगंध आला रे आला की लागलीच डोळे मिटू लागायचे. जगाची पर्वा न करता असू तेथे डोळे बंद करून बसावे आणि धारणेत मग्न व्हावे असे वाटायचे. आमचे दादरचे एक प्रियतम गुरुबंधू श्री. गोडसे शिवरंजनीच्या उदबत्तीचे पुडे घाऊकीने घेत व डोंबिवली, ठाणे, कल्याण, गोरेगाव, बोरीवली पर्यंतच्या गुरुबंधुंना त्यांच्या त्यांच्या ऑर्डरप्रमाणे त्याच दरात पुरवीत. त्या स्वस्त पडत. गाडीने कामाला जाता येता श्री महाराजांच्या फोटो समोर हीच उदबत्ती लावली जाई. पुतण्या संजय ड्रायव्हिंग करायचा व मी तंद्री लावून बसायचो. कधी सायंकाळी परतताना त्रिपदी गुणगुणायचो. कधी घरी असलो वामकुक्षी झाली की 'श्रीं'चे फोटो पुढे शिवरंजनी आणि आमची बैठक. बहुदा दारे खिडक्या बंद करून बसत असे. आठवड्यातून गुरुबंधूंच्या गाठीभेठी होत. विशेषत: मी गोडसे, शृंगारपुरे, भाऊकाका मुजुमदार असे भेटत असू. कधी उद्धवराव म्हसवडकर असत. मग काय महाराज महाराज आणि महाराजच! साधनेबाबत चर्चा होई. भाऊसाहेब शृंगारपुरे ह्यांच्यामुळे त्यांच्या ऑफिसातील सर्व गुरुबंधुंच्या ओळखी झाल्या. महिन्यातून एकदा आम्ही आमचे जेष्ठ गुरुबंधू श्री. नरेंद्र प्रभुदेसाई यांच्याकडे डोंबिवलीस जात

असू. तेथे सर्वच गुरुबंधू एकत्र यायचे. त्यात श्री. देवळे, बोडस, जोशी, घोलकर, तावडे, डांगे, निमकर, गंधे असे अनेक गुरुबंधू होते. पुढे पुढे आणखी मंडळी वाढली.

१) साधकास दीक्षेचे वेळी व नंतर येणारे अनुभव आणि होणाऱ्या क्रिया

या योग दीक्षेचे अनुभव सर्वांचे सारखे नसतात. ज्यांचे जसे पूर्वजन्मातील अध्यात्म शास्त्राचे आणि भक्तीचे संस्कार असतील त्याप्रमाणे अनुभूती येते.

अनेकविध अनुभूती आणि क्रिया : दीक्षा होताच काही हर्षोन्मादाने नाचू, गाऊ लागतात, हसू लागतात तर काहींची भस्त्रिका सुरू होते. अंगात संचार झाल्याप्रमाणे काही घुमू लागतात. अंगाचा त्रागा करतात, उड्या मारतात, प्रणवाचा ॐ उच्चार करून घर आणि आसमंत दणाणून टाकतात. काहींना भ्रमरी होते, भुंग्यासारखा गुंजारव करतात, पोपटाप्रमाणे शीळ घालतात, काही नुसतेच बसल्या जागी दोलायमान होतात. मागे-पुढे किंवा डाव्या-उजव्या बाजूस हेलकावे घेतात. जात्याप्रमाणे गोल फिरतात किंवा नुसती मानच गरगर फिरवतात. डोळे हात घट्ट मिटले जातात. तासाभराचे आत सर्व तणाव शांत होऊन पुनः स्थिर बसून हळूहळू समोर वाकून डोके पूर्ण जमिनीस टेकवतात. शवासन करून गाढ निद्रेप्रमाणे घोरतात. हे असे नानाविध प्रकार नाड्या शुद्ध होईपर्यंत काही काळ, काही महिने, काही वर्षे होत रहाते. काहींना काहीच होत नाही. परंतु तंद्री लागते. शरीराच्या आतून सूक्ष्म स्पंदने जाणवतात. शरीर शांतपणे दोलायमान होते. ह्या सर्व क्रिया होत असताना तल्लीनता आली असली तरी बाह्य जगाचे भान रहाते. बाहेरचे पक्ष्या-प्राण्यांचे रहदारीचे सर्व आवाज, घरातील व्यक्तींच्या संवादाचे बोलण्याचे आवाज कानावर येऊन आदळत असतात. परंतु मनास जो आत्मानंद मिळत असतो, तो अनुभवण्यातील अप्रतीम आनंद सोडून मन इतर आवाजाने तसे विचलीत होत नाही. या नित्य साधनेत पुढे पुढे वेगवेगळे अनुभव येऊ लागतात. दिवसाच्या चोवीस तासातील सकाळ संध्याकाळच्या ज्या काही साधनेच्या वेळा आपण ठरवू त्या सातत्याने पाळाव्यात, म्हणजे त्या त्या वेळी शक्ती देवता शरीरात उपस्थित होऊन स्पंदनाद्वारे संकेत देऊ लागते. आपली पाऊले आपोआपच नित्य बैठकीकडे ओढली जातात. डोळे झोपाळतात, मिटू लागतात. आता दुसरे तिसरे काहीही न करता लागलीच हातपाय धुवून, चार चुळा भरून देवाजवळ उदबत्ती लावून, बैठक अंथरून स्थानापन्न व्हावे. ज्या क्रिया होणे आवश्यक असते त्या शक्तीमाता शांभवी-जगदंबा आपल्याकडून आपोआप करून घेते. आपण फक्त आसनस्थ होऊन सहजासनात बसणे, हात बंद, डोळे मिटणे, ताठ बसणे पण संपूर्ण शरीर सैल सोडणे. शक्तीमाता

संपूर्ण शरीराचा ताबा घेते. जे काही आतून कंप, स्पंदनादी जाणवत असते, ते आपल्या इच्छेने, आपल्या कृतीने होत नसते ते सहज आपोआप-नैसर्गिक सद्गुरुंच्या संकल्पाने, शक्तीमातेच्या इच्छेने घडत असते. आपण फक्त एकाग्र मनाने त्या शक्तीमातेच्या लीला न्याहाळत, पहात निवांत स्वस्थ बसणे एवढेच! कधी असाही अनुभव येतो की क्षणिक आपण जगत् आणि देहभान विसरून गेलो आहोत. कधी धारणेतून देहभानावर येताना आपण आपल्याच देहाला शोधू लागतो. मी बसलो आहे की झोपलो आहे, माझ्या देहाची अवस्था काय आहे हे अजमावू लागतो. येथे मी आणि माझा देह भिन्न असल्याची आणि मी म्हणजे देह नव्हे तर देहात मी बसलो आहे ही विवेक बुद्धी येते. काही वेळा मंद मंद श्वसन होते आणि पूर्ण थांबतेही. बाहेर सोडलेला श्वास बाहेर, आतला आत. श्वसन क्रिया एकदम बंद. पण मनास कोणतीही बेचैनता-घालमेल नसते, घबराट नसते, आपण शांत असतो. आनंद मग्न असतो. सुखासिन असतो, काही वेळा आपणास झोपेत जसे स्वप्न पडते, स्वप्नात आपण सर्व दृष्ये पाहतो, तसे बैठकीतही घडते. कधी खेचरी मुद्रा होऊ लागते. जीभेचे अग्र उलटे घशाकडे फिरते व आपलीच जीभ आपलेच घशात जाऊ लागते. काही साधकांना ईश्वरी अवताराची रुपे, स्तब्ध फोटो सारखी म्हणजे पुतळ्याप्रमाणे पण हालचाल न करणारी खरी जिवंत पुतळ्याप्रमाणे दिसतात. एका साधकाला अक्कलकोटचे स्वामी महाराज, शेगावचे गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे महाराज असे एका पुढे एक संत दर्शन देऊन गेले. साधनेत एकाग्र असताना टाळ मृदुंगाचा, झांजेचा आवाज येतो, मोराचे ओरडणे, केकावली ऐकू येते. भ्रमराचा गुंजारव, मैना राघुचे ओरडणे, पक्ष्यांची किलबिल हे सर्व साधनेत ऐकणे हे शुभ संकेत असतात. घंटानाद ऐकणे, आरत्या, भजन, भक्तिगीते यांचे आवाज, ऐकू येणे हे शुभ असते; याचे वर्णन प.पू. गजानन महाराज गुप्ते यांनी लिहीलेल्या 'आत्मप्रभा' या पुस्तिकेत वर्णन आहे आणि खरोखरच असे अनुभव साधकाला येऊ शकतात. पण हे सर्व होण्यास कारण कोण? माझे सद्गुरु!

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'दर्पणी पाहता रुप, न दिसे हो आपुले। बापरखुमादेवी वरे मज ऐसे केले।।'

श्री ज्ञानदेवांना सर्वत्र ईश्वर दिसू लागला. ही त्यांचेवर किमया बापरखुमादेवी वरे केली, म्हणजेच गुरुदेवांची लीला! बैठकीला (ध्यान धारणेला) बसल्यानंतर ज्या काही अनुभूती येतात हा जो दीक्षेपूर्वीचा आणि दीक्षेनंतरचा फरक जाणवतो, तो कोणामुळे? माझ्या सद्गुरुंच्या कृपेमुळेच! शास्त्राने सांगितले दीक्षेनंतर शारीरिक, मानसिक क्रांती घडू लागते, बदल होऊ लागतात, ते अनुभूतीने कळतात म्हणून शास्त्रवचनावर जसा साधकाचा विश्वास बसतो, तसा गुरुंच्या कृपेने हे सर्व झाले, म्हणून गुरुमहाराजांवर देखील पूर्ण विश्वास, श्रद्धा, भक्ती दृढ होते.

ती इतकी होते की, ''गुरु परमात्मा परेशू, ऐसा जयाचा दृढ विश्वासू। देव तयाचा अंकीला, स्वये संचला त्याचे घरा।।''

जो सद्गुरु जेथे असेल तेथून दीक्षा देऊन आपल्यात बदल घडवून आणतात, ते आपणास कोठूनही कधीही पहात असतात, आपले सन्निध असतात. स्मर्तृगामी म्हणजे स्मरण करताच धावून येणारे ते आहेतच. पण स्मरण करण्यापूर्वीही ते आपल्या जवळच आहेत. आपले योगक्षेम सांभाळत आहेत. दीक्षा झाली त्या दिवसाच्या क्षणाचा (वेळेचा) संपूर्ण अनुभव आपण मागे वाचला आहेच. हा सर्व महिमा गुरुकृपेचा आहे. यात माझे वापरलेले 'मी पण' कथनापुरते आहे, करता करविता तोच सद्गुरु आहे.

१०) सद्गुरुंच्या कृपेने साधनेत आलेले अनुभव

दीक्षा दिनाचा प्रत्यक्ष अनुभव आपण मागे वाचला आता नित्य साधनेतील अनुभव पाहूया.

१) एके दिवशी मी तुर्भे साईट वरून (माझे त्यावेळेचे बांधकामाचे ठिकाण) लवकर घरी परतलो. उन्हाळ्याचे दिवस होते, घरी कोणी नव्हते. सर्व आमच्या गांवी, हरीहरेश्वरी, गेले होते. मी एकटाच घरी होतो. एकांताची संधी मी सोडली नाही. दीक्षेच्या सुरुवातीच्या काळात वर्षभर तरी ते वेडच लागले होते. मोकळा वेळ मिळाला की हातपाय धुवून देवाजवळ उदबत्ती लावावी आणि दर्भासनावर कंबळ आसन घालून, दारे खिडक्या, पंखा बंद करून साधनेला बसावे. डॉ. मणूरकरांच्या 'माझी साधना' या पुस्तकात वाचले होते की, साधनेस बसताना दारे, खिडक्या, फॅन बंद करावेत. खोलीतील हवामान सौम्य, सारखे चलन वलन नसलेले असावे. वारा वाहता नसावा. हवेचा दाब सौम्य असावा. खिडक्या दारे लावल्याने बाहेरचे आवाजही कमी होतात. उदबत्तीच्या सुगंधाने मन प्रफुल्लीत होते. ही उदबत्ती सुद्धा मसाला उदबत्ती नसावी. सौम्य परिमळ देणारी असावी.

आसनस्थ होऊन डोळे बंद करताच हे ध्यानी घ्यावे की श्री सद्गुरु आता येथे येऊन आपल्या समोर बसले आहेत. ते आपल्याकडे पूर्ण वात्सल्याने पहात आहेत.

हे सर्व झाल्यानंतर मी हळूहळू भावावस्थेमध्ये जाऊ लागलो. सर्वत्र ढगाळ वातावरण झाले आहे. पिवळा धमक उजेड पसरला आहे. समोर उंच डोंगर आहे. वृक्षवल्ली भरपूर आहे. सपाट पाऊल वाटेने जाता जाता डोंगराचा चढ सुरू झाला आहे. हवेत उष्मा आहे. पण मध्येच एखादी सुखद शीतल झुळुक येऊन अंग शहारत आहे. श्रीगुरुदेव हातातील काठी टेकीत टेकीत पुढे चालले आहेत. मी त्यांच्या मागोमाग जात आहे. पक्ष्यांच्या आवाजाचा मधुर नाद ऐकू

येत आहे. श्रीमहाराज आपणापासून फार दूर होऊ नये म्हणून मी चढावावर जलद चालण्याचा प्रयत्न करीत आहे. सतत श्रीमहाराजांची पुढे चाललेली पाठमोरी मूर्ती न्याहाळीत आहे. धोतर, करवत काठी, उपरणे, भस्मलेपित कपाळ आणि तेज:पुंज कांती, उजळ चेहरा हसतमुख असे ते माझ्याकडे मागे वळून पाहताना दिसत आहेत. मी खूप वर आलो आहे. दमलो आहे. धापा टाकू लागलो आहे. डोंगराच्या वरच्या भागावर पाहिले तर 'श्री' माझ्याकडे हसतमुख पाहात आहेत. 'काय दमलात काय? अजून खूप वर जायचे आहे आपल्याला.' मी हसरा चेहरा करून दमछाक करीत वर चढू लागलो. एकदाचा डोंगर चढून झाला. सपाट मैदान लागले. श्रीमहाराज पुढे जाऊन झाडाखाली शिळेवर सद्गुरु साईबाबांसारखे बसले आहेत. मी धावत धावत गेलो. 'श्रीं'ना नमस्कार घातला व त्यांच्या समोर डोळे मिटून बैठकीला (ध्यानास बसतात तसे) बसलो. मोर येऊन महाराजांचे अवती भोवती फिरत आहेत असे पाहिले होते. आता ढगांचा गडगडाट होऊ लागला. मोर ओरडत आहे. गार वारा वाहात आहे. मी भावावस्थेत तल्लीन आहे. आनंदोन्माद माझ्या नसानसात आहे. सर्व ध्वनी हळूहळू कमी होत चालले आहेत. डोळ्यापुढे आतून दिसणारी रमणीय दृश्ये पुसट दिसू लागली. हळूहळू लय पावली. मी साधनेतून बाहेर येऊ लागलो. अक्षरश: मी मलाच शोधू लागलो. माझा देह कुठे आहे? मी डोंगरावर गवतात बसलो आहे की घरात? झोपलो आहे की, अस्ताव्यस्त पसरलो आहे? जेव्हा मी भानावर आलो तेव्हा कळले की मी खोलीत देवासमोर बसलो आहे. मी महाराजांना मनोभावे वंदन केले आणि अक्षरश: माझ्या नेत्रातून पर्जन्याचा वर्षाव झाला. श्रीगजानन महाराजांनी केलेली केकावली मला गुरुकृपेने ऐकता आली.

२) साधनेस बसताना ताठ बसून, मंद श्वसन करावे. जास्तीत जास्त श्वास बाहेर सोडून स्थिर बसणे याला बहिर्कुंभक म्हणतात. तशा स्थितीत मी बसू लागलो. त्यात मला आनंद मिळू लागला. हे सर्व साधनेतच आपोआप शक्य होते, एरव्ही होऊ शकत नाही. मला होणारी क्रिया बहिर्कुंभक आहे हे श्री महाराजांच्या मार्गदर्शनातच कळले.

एका रविवारी मी सकाळीच साधनेला बसलो. ''महायोग साधना'' मध्ये मी वाचले होते की, सर्व साधारण माणसे, व्यक्ती अनावश्यक ऑक्सिजन श्वसनाबरोबर घेत असतात. इतक्या ऑक्सिजनची जीव धारणेस आवश्यकताही नसते व त्यामुळे आपले चित्तही विचलीत राहते. जेवढा श्वासोश्वास जास्त तेवढे मन विचलित व चंचल! म्हणूनच प्राणावरोध योगशास्त्रात सांगितला आहे व प्राणायामावर योगाचा भर आहे. प्राणावरोधाने चित्तवृत्ती निरोधही साधतो. परंतु आपल्या या सहजयोग साधनेत, मंद श्वसनाने वायू ग्रहण करणे, तसे करता करता साधनेत प्राणायाम हा मुद्दाम करावा लागत नाही, तो आपोआप होतो. काही वेळा असे वाटते आपला श्वास बंद पडतो की काय? पण घाबरण्याचे कारण

नाही. असा श्वास बंद पडण्याचा अनुभव मला त्या दिवशी आला.

साधनेत श्वसन बंद होऊन सुद्धा अस्वास्थ्य जाणवत नाही याचे कारण असे कळले की, कुंडलीनी शक्तीला भरपूर प्राणवायूचा पुरवठा झालेला असतो व साधनेत ती त्याचा उपयोग करत असते.

३) एके संध्याकाळी साधना अवस्थेत असताना माझ्या जीभेचे अग्र वर वर होत उठू लागले. हळूहळू जीभेचे टोक टाळूकडून घशात जाऊ लागले. साधनेमध्ये आपल्याला होणाऱ्या क्रिया आपोआप होऊ द्याव्या. त्यांना आवर घालू नये किंवा स्वतः त्या मुद्दाम करण्याचा प्रयत्न करू नये. नंतर मला कळले की, मला ही झालेली क्रिया हिला 'खेचरी मुद्रा' म्हणतात. ही मुद्रा सिद्ध झाल्यावर श्वसन थांबते व ब्रह्मानंदी टाळी लागते.

असे कितीही अनुभव या योग साधनेत आले तरी साधकाची कौटुंबिक आसक्ती जोपर्यंत नष्ट होत नाही तोपर्यंत पूर्णत्वाच्या जवळ जाऊन सुद्धा ते प्राप्त करता येत नाहीत. श्रीसद्गुरुंनी आपले बोट धरले तर ते पूर्णत्वास नेतील.



११) सत्संग आणि गुरुभाव

गुरुंकडे जावे कसे? सोबत उपादान न्यायचे असते. रिक्तहस्ते जाऊ नये. दर्शन होताच साष्टांग नमस्कार घालावा. उजवा हात गुरुदेवांच्या उजव्या पायाला व डावा हात डाव्या पायाला लावून नमस्कार करावा. शक्यतो स्पर्श करू नये. सहजी पादस्पर्श लाभला तर घ्यावा. अट्टाहास करू नये. मोजके बोलावे. ते काय बोलत आहेत ते नीट ऐकावे. पुष्कळ वेळा आपण भांबावून जातो. भावावस्थेमुळे तसे होते. अशावेळी शक्तीमातेस प्रार्थना करून श्रींकडे लक्ष केंद्रीत करावे. नजरेस नजर भिडवू नये. 'बसा' म्हणाले तरच बसावे. त्यांच्या आसनापेक्षा आपले आसन खाली असावे. प्रवासात देखील शेजारी बसू नये. सौम्य शब्दात बोलावे. त्यांच्या समोर कोणालाही वाईट बोलू नये. आपले मत दर्शवू नये. कोणाची तक्रार करू नये. त्यांच्याशी बोलताना आदरार्थी शब्द वापरावे. सद्गुरु आपले देवाधिदेव आहेत. अशी भावना ठेवावी. त्यांच्या समोर नकारात्मक बोलू नये. त्यांचा शब्द प्रमाण मानावा. त्यावर आपले मत प्रदर्शन किंवा वाद करू नये. 'असं नाही महाराज, ते असं आहे!' असे अति शहाणपणाचे वाक्प्रचार टाळावे. ''गुरु सर्वज्ञानी, सर्वसाक्षी, त्रिकालज्ञ असतात!'' आपले कल्याणच त्यांना अभिप्रेत असते. आमच्याकडून या शिष्याचे कल्याण कसे होईल? एवढीच तळमळ त्यांचे हृदयी असते. गुरुमहाराजांना न विसरता दरमहा विशेषतः पौर्णिमेला दक्षिणा अर्पण करावी. आपले भाग्य असेल तरच दक्षिणा स्वीकारतात व दक्षिणेचा वापर स्वतः करता

करतात. आपण आपल्या आई-वडीलांना कसे न चुकता न विसरता पैसे पाठवतो तसे सद्गुरुंना दक्षिणारुपाने पाठवावेत किंवा द्यावेत.

पंथराज मध्ये पूर्वी श्री गुळवणी महाराजांचा एक लेख आला होता. त्यांनी सद्गुरुंना दक्षिणा किती द्यावी यावर मार्गदर्शन केले आहे. शास्त्र असे म्हणते, गुरु प्रापंचिक असतील तर त्यांना, आपल्या एकूण कमाईच्या १/५ इतकी दक्षिणा गुरुंना द्यावी, १/५ माता पित्यांस, १/५ नातलग आप्तेष्ट व समाजऋण म्हणून तर १/५ देवधर्म-देवकार्य उरलेला १/५ स्वप्रपंचाकरिता वापरावा.

गुरुदेवांना ऐपती, कुवती प्रमाणे हत्ती, घोडे, रथ (वाहन), घर, जमीन, सुवर्ण, धन अर्पण करावे. गुरुपत्नी त्यांची मुले, नातवंडे सर्व स्वकुटुंबीय मानावे. स्वत:कडे धन पैसा असताना अभाव दाखवू नये. गुरुंकडून आपल्या सन्मानाची, कौतुकाची, प्रशंसेची कधीही अपेक्षा नसावी. तसे घडू लागले तर गुरुकृपा झाली असे समजू नये. गुरु सडेतोडपणे आपले दोष आपणास दाखवतील तेव्हाच खरी कृपा समजावी. सद्गुरुंना साक्षात् श्रीदत्तस्वरुप परमात्मा समजावे (श्रीगुरु: साक्षात दत्तस्वरुप परमात्मा समजावे.) श्री गुरुदत्तात्रेयांच्या अव्याहत चालू असलेल्या लोककल्याणाचे कार्य, हे संत सत्पुरुषांच्या माध्यमातून चालू असते. जीवनमुक्तीचे कार्य चालविणारे संत सत्पुरुष हे एकच असलेल्या गुरुतत्त्वाचे, दत्तप्रभूंचे अवतारच आहेत.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू। गुरुर्देवो महेश्वर:।
गुरु: साक्षात् परब्रह्म। तस्मै श्रीगुरुवे नम:।।



१२) 'श्रीं'चा अपरिग्रह

आपण सद्गुरुंना काय द्यावे हे आपण पाहिले. परंतु श्रीदत्तमहाराजांच्या स्वभावात अपरिग्रह इतका होता की, त्यांचे सोबत रिक्शाने गेले तरी ते भाडे आधीच काढून ठेवीत असत. आपले दिलेले पैसे परत करायचे. त्यांच्या घराचे वॉटरप्रुफींगचे काम आम्ही काही गुरुबंधुंनी मिळून सहयोगाने पूर्ण केले. काम पूर्ण होताच त्यांनी पैसे पुढे ठेवले. म्हणाले, ''तुम्ही दक्षिणा देता ती आम्ही स्वीकारीत असतो. हे व्यावहारिक देणे आहे. तुम्हीही प्रापंचिक आहात! आम्हांला ऋणात टाकू नका.''

माझ्या वाचनात जेव्हा श्री गुळवणी महाराजांचा तो पंथराज मधील लेख वाचनात आला तेव्हा मला खूप वाईट वाटू लागले. १९८० चे साल. दीक्षा झाल्यापासून मी दक्षिणा पाठवित होतो. दरमहा फक्त रु. ११/-. मी बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर होतो. मासिक धनार्जन हे नोकरी करणाऱ्या माणसापेक्षा किती तरी पटीने दरमहा पाच अंकी रक्कम तरी स्वत:करीता कमावित

होतो. मी मनाशीच ठरविले एकदम मोठी रक्कम नको. पण निदान शंभर ते सव्वाशे तरी पाठवू या. मी प्रथम रु. १०१/- ची मनीऑर्डर केली. लगेच श्रीमहाराजांचे पत्र ''एवढी मोठी दक्षिणा पाठवू नये. दक्षिणा दक्षिणेच्या रुपात पाठवावी. यापेक्षा आम्ही तुमच्या स्थापत्यशास्त्र ज्ञानाचा लवकरच उपयोग करून घेणार आहोत. तुमच्या तशा प्रकारच्या सहाय्याची, मदतीची आम्हास अपेक्षा आहे.

ही गोष्ट मी माझे प्रिय मित्र, गुरुबंधू श्री. गोडसे यांना सांगितली. गोडसे म्हणाले, ''मला काही ॲरीअर्स मिळाले म्हणून मी रु. १०१/- ची मनीऑर्डर श्रीगुरुमहाराजांना पाठविली. लागलीच पत्र!'' ''तुम्ही मनीऑर्डरने पाठविलेली रक्कम पोहोचली. तरी या रकमेचा विनियोग काय करावा ते त्वरीत कळवावे.''



१३) 'श्रीं'ची दास्यभक्ती

आम्ही गुरुबंधू श्रीमहाराजांच्या दर्शनास श्रीवासुदेव निवासांत जात असू. हातपाय धुवून वर पहिल्या मजल्यावर दर्शनास जावे तर जिन्याच्या जवळच्या पहिल्याच खोलीत ते ठराविक जागी खिडकीखाली बसलेले असायचे. कधी पत्रोत्तरांचे लेखन, कधी वाचन, कधी भक्तांच्या रांगा - सर्वांचे क्षेम कुशल विचारणे, प्रसाद देणे चालू असायचे. भोजनोत्तर सुद्धा दार आड करून त्याच पाचफूट लांबीच्या बैठकीवर आडवे होऊन विश्रांती घ्यायचे. आश्रमातील सेवेकरी भक्त, शिष्य, साधक परोपरीने महाराजांना गादी अंथरुन, पांघरुण वगैरे बाजूचे खोलीत किंवा याच खोलीत घालून देतो म्हणायचे. पण ते अनुमती देत नसत. बसण्याचे बैठकीवर अंगावरच्या उपरण्याचे पांघरुण करून पाय आखडून झोपायचे. ते ही किती? २०-३० मिनिटे! श्रीगुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना आपले उत्तराधिकारी नेमले होते. आज श्रीगुरुमहाराजांचे जागेवर ते होते. वास्तविक श्री गुळवणी महाराजांचे खोलीत त्यांच्या आसनावर स्थानापन्न व्हायला काहीच हरकत नव्हती. त्यांची खोलीही बाजूलाच होती. अधिकार प्राप्त झाला तरी त्यांची भूमिका शिष्याची-दासाची-भरताची होती. गुरुमहाराज रामप्रभू तर श्रीदत्तमहाराज भरत होते. गादीवर बसण्याचा अधिकार मिळून देखील त्यांनी पादुका स्थापन करून दास्यभक्ती चालू ठेविली. श्रीदत्तमहाराज श्री गुळवणी महाराजांच्या खोलीत आल्यावर विसावायचे. नंतर उठून शयनगृहात जाऊन साष्टांग प्रणिपात करून बाहेरील खोलीत आपल्या आसनावर स्थानापन्न व्हायचे.

श्री गुळवणी महाराजांनी व्यक्तात असतानाच शक्तीपात दीक्षेचा अधिकार श्रीदत्तमहाराजांना दिला होता. परंतु श्रीमहाराजांनी श्री गुळवणी महाराजांच्या महाप्रयाणानंतर महिना झाल्यानंतरच

दीक्षा प्रदान करण्यास प्रारंभ केला.

आज श्रीमहाराजांची दीक्षा झालेले किती साधक असतील याची कल्पना येत नाही. दीक्षेची याचना करणारी पत्रे पाहिल्यावर त्याचा अंदाज येतो. श्रीमहाराजांचे भागवत, गुरुचरित्र, देवी भागवत अशा अनेकविध सप्ताहांकरिता गावोगावी दौरे झाले. गावोगावी ८-१० दिवसाचे मुक्काम झाले. या मुक्कामात किती भक्त दीक्षेच्या प्रसादाने तृप्त जाले त्याची गणतीच नाही. 'श्रीं'नी कधी कोणाला दीक्षा दिल्याचा उल्लेख केला नाही. या दीक्षेचा प्रचार करणे त्यांना पसंत नव्हते. ज्या जीवाची गुरुभेटीची वेळ आली की तो आपणहून ईशकृपेने आपल्या गुरुंचा शोध घेत येतो. किंवा साधक तेवढाच अधिकारी असेल तर श्रीगुरुमहाराज त्याची भेट घडवून आणतात.



१४) सुसंगती सदा घडो

दीक्षा होऊन आठवडा होऊन गेला. या दिवसात आणि नंतरही सतत श्रीमहाराजांचे स्मरण चालू असे. असे वाटायचे की, महाराज आपल्या सोबत आहेत. वाटायचे सतत श्री महाराजांचे गुणगान कानी पडावे. दुसरा विषयच नको. कौटुंबिक-प्रापंचिक चर्चा नको. ह्या मार्गाव्यतिरिक्त मंडळींचा संपर्क नको. महाराजांच्या प्रत्यक्ष भेटीची तळमळ लागलेली होती. कधी ती दीनवत्सल, भक्तवत्सल, कारुण्यसिंधू मूर्ती दिसेल. अधीर लोचन सर्वत्र ते रुप पाहू लागले. चैन पडेना २९.३.१९८० ला मी, गोडसे, शृंगारपुरे पुण्यास श्रींचे दर्शनास गेलो.

भेटीत श्री. गोडसे यांनी खूप प्रश्न श्रीमहाराजांना विचारले. त्यांनी ही त्यांची उत्तरे दिली. 'अध्यात्माव्यतिरिक्त साधकाने इतर काही विषयांचा, जागतिक सर्वसाधारण माहितीचा, ज्ञानाचा अभ्यास करावा की नाही?' ह्या प्रश्नावर प.पू. महाराज म्हणाले,

श्रीमहाराज - ''साधना काही आपण २४ तास करीत नाही. हौस म्हणून काही विषयांचा किंवा व्यवसाय धंद्यास उपयुक्त अभ्यास केलातरी हरकत नाही. चित्तवृत्ती प्रक्षोभित होईल अशा कथा कादंबऱ्यांचे वाचन शक्यतो करू नये. चित्ताची समतोल अवस्था विचलीत होऊ देऊ नये. साधनेत साधायचा सात्विकभाव आणि अंतर्मुखता लवकर साधली जावी, त्या प्रगतीस काहीसा प्रतिबंध निर्माण न होण्याची दक्षता घ्यावी. दत्तभावसुधादी स्तोत्रांचे पाठही करीत जावेत. सर्दी-पडशा सारखे किरकोळ आजार असले तरी साधना करायला हरकत नाही. ज्वर ताप असेल तर साधना करू नये.''

रात्री वासुदेव निवासात भोजनोत्तर झोपण्यापूर्वी आम्हाला गप्पा गोष्टी, चर्चा करण्यास वेदमूर्ती श्री. कोडणीकर गुरुजींचा लाभ झाला. गुरुजी अत्यंत शांत वृत्तीचे, सोज्वळ, सात्विक

आणि आचार संपन्न होते. आश्रमातील मुख्य देव दैवत, साक्षात् दत्तप्रभुंनी प्रदान केलेल्या चांदीच्या पादुकांची पूजा त्यांचेकडे श्री गुळवणी महाराजांनी सोपविली आहे. पादुकांचे पावित्र्य राखण्यास आश्रमात सोवळ्या ओवळ्याचे अतिशय कडक नियम पाळले जातात. गुरुजीही आचार संपन्न पंडित आहेत. आमच्या विनंतीस मान देऊन ते श्रीदत्तमहाराजांबद्दल सांगू लागले -

श्रीदत्तमहाराज अत्यंत विनम्र, अत्यंत शांतवृत्तीचे आहेत. राहणे, वागणे अगदी साधे असल्याने त्यांच्या सर्वशक्तीसंपन्न व्यक्तीमत्त्वाची ओळख चटकन होत नाही. तुम्ही जेव्हा बैठकीस बसता तेव्हा त्यांना तुमची जाणीव होत असते. आपल्याला दीक्षा दिली म्हणजे नक्की काय दिले आहे हे तुमची साधना उत्तरोत्तर वाढत जाईल तेव्हाच कळेल. त्रेता, द्वापार युगात जे अनेक वर्षाच्या तप:श्चर्येने प्राप्त होत होते ते श्रीमहाराजांनी आपणास क्षणमात्राने दिले आहे. या दीक्षेने बुद्धी तीक्ष्ण होते. चांगला अभ्यास होत राहिला तर आपल्या अडी-अडचणींची, शंका-कुशंकाची उत्तरे व त्यावरील तोडगे, उपाय हे साधनेतून सापडत जातात. ही दीक्षा सुद्धा येणाऱ्या-जाणाऱ्या कोण्याही व्यक्तीस श्रीमहाराज देत नसतात. समोर आलेल्या व्यक्तीचे भूत-वर्तमान भविष्य त्यांना अंत:चक्षूने समोर दिसत असते. उपाधी नको म्हणून ते जास्त बोलायला जात नाहीत. एखाद्या व्यक्तीची दीक्षेची वेळ आलेली नसेल तर त्याला काही पारायणे, अनुष्ठाने, जप-जाप्य सांगतात. ह्या महिन्यातच प्रथम हप्त्यांत एक व्यक्ती जर्मनीहून आली. विशेष म्हणजे ती व्यक्ती संपूर्ण शांकाहारी होती. ब्रेडमात्र खात असे. संस्कृतचा गाढा अभ्यास होता. संस्कृत अस्खलीत बोलत होती. श्रीमहाराजांचे भेटीत अध्यात्मावर खूप चर्चा केली. दीक्षा मागताच श्रीमहाराजांनी पुढच्या आठवड्यातील तारीख दिली. वासुदेव निवासाच्या साधना हॉलमध्येच ती दीक्षेला बसली होती आणि पहाटे ६ पासून ३-४ तास तरी ती बेभान होती. दोलायमान क्रिया होत होत्या. भारतीय धर्म ग्रंथांची तसेच आध्यात्मिक साधनेची ओढ तिला होती.

१५) प्रेमस्वरुप गुरुमाऊली

दुसऱ्या दिवशी श्रीमहाराज सकाळी १० चे सुमारास आश्रमात आले. आम्ही दर्शन घेतले. आज निघण्याचा निरोप घेताच म्हणाले, "प्रसाद, भोजन करून निघा." आम्ही भोजनानंतर निघालो. 'श्रीं'चा भावपूर्ण निरोप घेऊन वरच्या खोलीतून बाहेर येऊन जिना उतरु लागलो तर श्रीमहाराजही आमचे पाठोपाठ येत होते. श्रीमहाराज अगदी गेटपर्यंत आले. मन श्रीमहाराजांपासून दूर जाण्यास राजी नव्हते. पण काय करणार? प्रपंच, कामधंदा, व्यवसाय मागे आहेत ना! आम्ही श्रीमहाराजांना नमस्कार केला व निघालो. आशीर्वादाकरीता

उभारलेला हात तसाच होता. प्रेमस्वरुप माऊलीचे ओठ काही तरी पुटपुटत होते. ''शुभास्ते पंथानः सन्तु'' असेच काही म्हणून अभिष्टचिंतन करीत असणार.

आम्ही काही काळ मात्र मंत्रमुग्ध अवस्थेत प्रवास करीत होतो. रेल्वेगाडीत सुद्धा आम्हा तिघांची साधना चांगली झाली. हात जोडले जात होते. डोळ्यावर झापड येत होती. परंतु श्रीआज्ञेचे सार्वजनिक स्थळी जगदंबा कुंडलीनी शक्तीमातेस प्रार्थनापूर्वक थांबवावी लागते.

१६) 'श्रीं'चे येऊरला आगमन

दि. १६.४.१९८० रोजी ठाणे-येऊर येथे सद्गुरु सेवा आश्रमात 'श्रीं'चे आगमन झाले. येथील कार्यक्रम एका थोर गुरुभक्तांनी आयोजित केला होता. त्यांच्याशी आमचा परिचय नव्हता आणि आम्हाला या कार्यक्रमात सहभागी व्हायचे होते. या कार्यक्रमास पडेल ती सेवा करण्याची मनापासून तयारी होती. शेवटी आम्ही त्या भक्ताच्या भेटीस जाण्याचे ठरविले.

ठाण्यास जाऊन आम्ही त्यांना आमचा मानस सांगितला. ते अतिशय खूष झाले व त्यांनी आमची इच्छा पूर्ण केली.

१६.४.१९८० श्रीदत्तमहाराजांचा येऊर येथे आगमनाचा दिवस! ठाणे शहरापासून ८ ते १० कि. अंतरावर (तपोवन म्हणून डोंगरावरील दाट जंगलाचा भूमी परिसर आहे.) अशा त्या आसमंतात आश्रम उंच घनदाट टेकडीवर होता.

सद्गुरुंच्या आगमनास शुभ्र वस्त्राच्या पायघड्या अंथरलेल्या, त्यावर पुष्प दलाचा सडा घातलेला. दुतर्फा नऊवारी साड्या नेसून औक्षणाचे ताट घेऊन सुवासिनी! अंतरा-अंतरावर दिवे उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होता. सनई-चौघडा, फोटो काढणारे सज्ज होते व त्या सगळ्यात 'दिगंबराची धून' (निनादत) होती. हा नयनरम्य सोहळा ज्यांनी पाहिला ते सर्व स्वतःला धन्य समजत होते. श्रीमहाराज आश्रमाचे द्वारापाशी स्थिरावले. श्रींचे मधुपर्क पंचामृताने पाद प्रक्षालन झाले. औक्षण झाले आणि गुरु सेवा मंदिरात भव्य भारतीय बैठकीवर ते स्थानापन्न झाले. दर्शनाकरिता गुरुभक्तांची रांग लागली. तासाभरानंतर श्रींना विश्रांती गृहात नेण्यात आले.

रात्रीचे प्रसाद भोजन आटोपून रात्रीची शेजारती झाली. दुसरे दिवशी 'श्रीं'चे उपस्थितीत सामुदायिक बैठक झाली. सर्वांचे स्नान, संध्यादि झाले. अल्पोपहारानंतर प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांनी केलेल्या दिगंबराच्या आरतीवर श्रीमहाराजांनी प्रवचन केले. सायंकाळी पुन्हा प्रवचन होऊन हा कार्यक्रम पूर्ण झाला.

१७) कुरवपूर (कुरगड्डी) यात्रा

दि. २९.३.१९८० रोजी गुरुबंधू श्री. गोडसे, श्री. शृंगारपुरे यांच्या समवेत मी ही 'श्रीं'चे दर्शनास पुणे येथे गेलो होतो. तेव्हा आम्हा भक्त मंडळींबरोबर बोलताना महाराजांनी विचारले. ''तुम्ही गरुडेश्वरला जाऊन आलात! कुरुगड्डीला काही तुमचे जाणे अजून झालेले नाही. ते सुद्धा एक महान् पवित्र क्षेत्र आहे.'' (ही चर्चा गोडसे, शृंगारपुरे यांच्या समवेत झाली.)

श्रीमहाराजांच्या विनयशील स्वभावात कोणालाही आज्ञा किंवा आग्रह नसतो. आपल्या अपत्यांच्या, नातवंडाच्या बाबतीत सुद्धा त्यांची भूमिका ही अशीच असते. 'असे करावे असे गुरुमहाराज म्हणतात, स्वामी महाराज म्हणतात, गीतेत व भागवतात असे सांगितले आहे.' असे त्यांचे सांगणे असते.

वरील 'श्रीं'च्या वक्तव्यावरून कुरुगड्डी हे सुद्धा महान पवित्र क्षेत्र आहे. 'कुरुगड्डीस सुद्धा तुम्ही जावे!' ही नकळत सूचनाच होती. त्याप्रमाणे त्यांनी श्रीमहाराजांना कुरुगड्डीस जाण्याविषयी विचारणा केली. ''जसे जमेल तसे करा.'' असे उद्‌गार 'श्रीं'नी काढले.

पुढे 'श्रीं'नी भक्तांच्या मनाची तयारी अजमावली. ते म्हणाले, ''चांगले ठिकाण आहे. पूर्वपुण्याईने अशा क्षेत्राचे दर्शन घडते. मे महिन्यात उन्हाळा मात्र कमालीचा असतो. नदीतून चालत जावे लागते. त्यांत खडक, खाच-खळगे फार असतात. पण नदीला पाणी मात्र कमी असते.''

गुरुबंधुंच्या डोक्यात कुरवपुरचे वारे वाहू लागले. कार्यक्रमाची, प्रवासाची आखणी सुरू झाली. प्रवासाचा मार्ग, सोबत घ्यावयांची सामुग्री, निघण्याच्या वेळा, रिझर्व्हेशन, प्रवासाच्या वाटा, टप्पे, कोण कोण निघणार, वगैरे वगैरे!

माझाही जीव खालीवर होत होता. मन जाण्यास ओढ घेत होते. पण दुसरीकडे धंद्याची कामे! मे महिना म्हणजे बांधकामे पूर्ण करण्याची घाई! जून महिन्यात मुलांच्या शाळा! श्रीमहाराज म्हणतात, 'प्रथम आपली नित्य कर्तव्ये पार पाडावी.' पण कामे तर नेहमीचीच आहेत. अशी संधी कधी प्राप्त व्हायची?

जाते घडी ही आपुली साधा
करा काय ते आता करा।।

परंतु धंद्यातील जशी कामे आपण पूर्ण करू तसे धन हाती येणार आहे. इतर नाटके जमतील पण पैशाचे नाटक जमेल का? मी पूर्ण द्विधा अवस्थेत सापडून चलबिचल, अस्वस्थता याने अगदी बेजार झालो होतो. मनातील विचार श्रीसद्‌गुरुंना मनोभावे बैठकीत सांगत होतो. ''महाराज! आपणच माझे मायबाप आहात. मलाही क्षेत्र दर्शन घडवा. मला काही मार्ग सूचित करा.''

आणि एके दिवशी श्रीमहाराजांचे पोस्टकार्ड येऊन थडकले. दि. ७.५.१९८० "श्री गोडसे यांचे पत्र आले. ते कुरुगड्डीस जाणार असल्याचे समजले. यावेळी नदीत पाणी कमी असते. उन्हाळा मात्र तिकडे जास्त. परमात्मा संरक्षण करण्यास समर्थ आहे. आम्ही आता १३ तारखेस नाशीकला श्रीदत्तयागाकरिता जात आहोत. परत येण्यास ८-१० दिवस लागतील."

ही तर श्री गुरुदेवांची आज्ञाच म्हणावी लागेल. बांधकामाची कामे तशीच गतीनी चालू राहण्यासाठी प्रयत्न करावा व नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. सारा संसार हा तापदायकच आहे. पण परमात्मा संरक्षण करण्यास समर्थ आहे. हे तर गुरुदेवांचे वचन आहे. मग ठरले. काही झाले तरी जायचेच. धंद्यातील वाढत्या जबाबदारीमुळे घरून जाण्यास थोडा विरोध होता.

व्यावहारिक पातळीवर हे जरी खरे असले तरी 'श्रीं'चा आदेश काय आहे? करते करविते आपण, का तो संरक्षण-समर्थ परमात्मा? धंदा, कामे, पैसे पुढेही मिळतील. पण पुण्यप्रद ही तीर्थयात्रेची संधी पुन्हा मिळेल का? याची शाश्वती नाही. म्हणून जायचे असेच ठरवले. श्रीगुरुदेव सांभाळतील सर्व.

काही भक्तांची रेल्वेची रिझर्व्हेशन आधीच झाली होती. आम्हाला प्रवासात कोठेही, कोणत्याही प्रकारे अडथळा आला नाही. आमच्यापैकी कोणीच या प्रवासाचे अनुभवी नव्हते. एका जुन्या पुस्तिकेच्या आधारे कुरवपुरचा मार्ग अत्यंत खडतर आहे असे कळले. तेथील पुजारी श्रीपादभट यांचा पत्ता मात्र सापडला. रायचूर स्टेशनला उतरायचे, तेथून बसने यापल्लदिन्नी गावी जायचे. पुढील ३ मैलाचा आडमार्ग, वाटेत वस्तीच नसलेला. हातखूर गाव आले की कोळी लोकांचे सहाय्य घेऊन कृष्णानदीत उतरायचे. नदीच्या पात्रात मोठमोठाले लहान-मोठे दगड, पाणी कधी गुडघाभर, तर कधी कंबरेपर्यंत, तर काही ठिकाणी अगदी गळ्यापर्यंत सुद्धा! योग्य वाटाड्या शिवाय हा प्रवास दुरापास्त. पण आमचा सद्गुरुंवर पूर्ण विश्वास होता. सहाय्यार्थ कोळी भेटले. त्यांनी आमचे सामान धरले, आमचे दंड धरले, आमचे हातात एक काठी दिली. ते म्हणाले, भोपळे घेऊन मागे एकजण येत आहे. पाणी वाढले तर कंबरेला भोपळे बांधू. ते आमचेशी मोडक्या तोडक्या हिंदीकम् तेलगू मध्ये बोलत होते. धीर देत होते. 'श्रीपादभट उन्नदी.'असं काही म्हणत होते. आम्ही श्रीपादश्रीवल्लभांचे मठात सुखरुप पोहोचलो.

मला जसे 'श्रीं'चे पत्र आले तसे इतर गुरुबंधुंनाही आले होते. त्या पत्रांचा गोषवारा पुढीलप्रमाणे.

।। श्रीदत्त प्रसन्न।।

वासुदेव निवास,
पुणे, ७.५.१९८०

"तीर्थयात्रा, महानदी स्नान इ. सत्कार्य पापक्षयकारक आहेत. या ठिकाणी यथाशक्ती सर्व प्रकारची सेवा करता येईल. मोठे सिद्ध स्थान आहे. हा योग ईशकृपेने आला आहे."

"श्रीप्रभुंच्या सिद्धस्थानात आपणा सर्वांना जाण्याचा योग आला आहे. पूर्व सुकृता शिवाय हे घडत नाही हे लक्षात ठेऊन, नाईलाजाने झोपेचा वेळ वजा जाता ईश्वरदत्त सर्व साधनांचा, त्याच्या सेवेप्रीत्यर्थ विनियोग तेथे असेपर्यंत करण्याचा निश्चय करावा म्हणजे बुद्धीप्रेरक हृषिकेश परमात्मा सर्व करवून घेईल, काळजी नसावी."

"ठरल्याप्रमाणे आपण सर्वांनी कुरुगड्डीस जाण्यास २१ तारखेस निघावे. तेथे ईशकृपेने सर्व व्यवस्था होईल. काया, वाचा, मन व धन या साधनांनी जेवढी सेवा होईल तेवढी करावी. ईश्वर कृपेने आलेला हा योग उत्तम कल्याणकारक आहे. आपण निर्धारानें निघाल्यावर देव सर्व व्यवस्था करतातच."

"या वेळी नदीत पाणी कमी असते. उन्हाळा मात्र तिकडे जास्त! परमात्मा मात्र संरक्षण करण्यास समर्थ आहे."

इति श्रीदत्तमहाराज।

---*---

आमचे एक वरिष्ठ गुरुबंधू, श्री गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत, आम्हांस म्हणाले, "तुम्हा सर्वास आलेला हा योग म्हणजे तुम्हा सर्वांवर असलेल्या महाराजांच्या कृपेचे प्रतिकच होय. तुम्ही परम भाग्यवंत आहात. तुमची सर्व सोय महाराजांनी आधीच केली आहे, हे तेथे गेल्यानंतर अनुभवांती लक्षात येईलच. कुरवपूरच्या परिसरात तुम्ही तुमचे ऐहिक जीवन संपूर्ण विसरून 'श्री' सेवेत तत्पर रहावे. प्रापंचिक, व्यावसायिक, नोकरी कामाकाजाबाबतची चर्चा त्या क्षेत्रात निक्षून टाळावी. इतकेच नव्हे तर अध्यात्माखेरीज कोणताच विचार मनात आणू नये. महाराज सर्वतोपरी तुम्हास सहाय्यभूत आहेतच. प्रात:काळी चार वाजता उठून कृष्णास्नान, संध्यादि विधी उरकून श्रीपीठावर पुजाऱ्यांच्या अनुमतीने पाणी घालावे. तिन्ही त्रिकाळ नदीस्नान संध्या करावी. श्रीगुरुचरित्र, श्रीदत्तमहात्म्य, सप्तशती, कोणत्याही ग्रंथाचे पारायण तीन दिवस करावे. आरती महानैवेद्य त्या त्या वेळी करावे. बाकी वेळ गुरुमहिमा-भजन-धून ध्यान धारणा बैठक यात घालवावा."

आमच्या प्रवासास प्रारंभ दादर, मुंबई येथून मद्रास मेलने मंगळवार, दि. २०.५.१९८० रोजी दुपारी २.०० ला झाला. दोन वाढीव तिकीटे मिळाली. टी.सी. चांगला भेटला.

गुरुमहाराजांचे स्मरण करीत प्रवासाची सुरुवात झाली. आम्हा सातही जणांच्या अंत:करणात एकच भाव प्रकट होत होता, हे सर्व घडत आहे हे गुरुकृपेनेच. आनंदाश्रुंनी नेत्र पाणावत होते. आपणापासून ती सगुण मूर्ती किती दूर आहे तरी तिचे आपल्यावर लक्ष आहे. वासुदेव निवासाचे कामकाज, देवपूजा, देवधर्म, पठण, विद्या अध्यापन आणि हे सर्व आचारधर्म पाळताना वृत्ती कशी शांत, निरागस निर्विकार असते. या व्यापांतून त्यांना आपल्या सारख्या क्षुद्र जीवांची आठवण-स्मरण असते. केवढे हे भाग्य! ईश्वर संरक्षक आहे. पण आम्ही कोठे पाहिला आहे तो ईश्वर? आम्हाला एकच देव माहीत आहे... श्रीदत्तमहाराज कवीश्वर! आमचे गुरुदेव! अशा श्री गुरुस्मरणात आमची प्रवास यात्रा सुरू झाली. रायचूरला उतरल्यानंतर हळूहळू प्रवासाची दिशा उलगडत गेली. चौकशी करीत आम्ही हातखूरला पोहोचलो. दुसरे दिवशी १२-१५ ला मठाच्या द्वारी पोहोचलो.

'ईश्वर संरक्षण करण्यास समर्थ आहे' या उक्तीची प्रवासात प्रचीती येत होती. अज्ञात मार्गाचा हा प्रवास गुरुकृपेने सुखकर झाला. पुढे कुरवपूरच्या वास्तव्यात एका मोठ्या संकटांतूनही आम्हा गुरुबंधूंचे संरक्षण झाले.

कुरवपूरच्या मंदिरासमोर कृष्णानदीच्या तीन धारा ओलांडून गेल्यानंतर एक स्थान आहे. अखंड शिलेची जमीन... त्यावर श्रीपाद श्रीवल्लभ सूर्यनमस्कार घालीत असत. आम्ही सर्व गुरुबंधू ते स्थान पहिल्याच दिवशी पाहून आलो. त्या शिलेवर श्रीप्रभूंच्या हाताचे-गुडघ्याचे व पायाचे ठसे नमस्कार घालताना पडलेले आहेत. आम्ही सर्वांनी सोबत नेलेल्या पूजा साहित्याने तेथे पूजन केले. एका शिलेवर श्रीपादवल्लभांची पादयुग्मे शिवाय नदीत जरा उंच खडकावर सोमसूत्री पीठ, त्रिशूलाची आकृती होती. त्याचेही पूजन करून मंदिराकडे परतलो. पात्रात लहान-मोठे गुळगुळीत निसरडे दगड होते. नदीच्या पाण्यास ओढ होती म्हणून आम्ही सर्वांनी हातात हात घालून साखळी केली होती (हा मार्ग अत्यंत अवघड आणि अर्धा अधिक किलोमीटरचा असेल.)

दुसऱ्या दिवशी आम्ही पुन्हा या स्थळी जाऊन 'घोरात्कष्टात्'चे १०८ पाठ करण्याचा संकल्प केला. अनुष्ठानास १.३० तास लागणार होता. चार वाजता प्रारंभ केला असेल आणि पाचचे सुमारास कृष्णानदीचे पाणी वाढण्यास सुरुवात झाली. पूर्वसूचना न देता धरणातून (पुढील गावांना पाणी कमी पडत असल्याने) पाणी सोडण्यास सुरुवात झाली. आम्ही चिंताग्रस्त झालो. श्रीपाद भट हे तेथील पोस्ट खाते सांभाळत असल्याने कामात व्यग्र होते. मी त्यावेळेस तेथे श्रीपाद भटांसोबतच होतो. माझे गुरुभक्त तेथे अडचणीत आहेत तरी त्यांना मदत करावी असे मी वारंवार भटांना सांगत होतो. परंतु त्यांचे एकच वाक्य "तुम्ही काही काळजी करू नका हो! श्रीपाद श्रीवल्लभ सांभाळतील की त्यांना. तुम्ही कशाला काळजी करता?"

''सूर्य मावळला, श्रीपाद गुरुजी आता काय करायचे हो?''

''काही नाही, तुम्ही तीरावरून मोठ्याने फक्त हाळी देत रहा. म्हणजे आवाजाचे रोखाने येतील बघा ते.''

मी व तावडे अक्षरश: श्रीपाद गुरुजीस दंडास धरून उठवू लागलो. कारण त्या तिघांपैकी दोघांना तर पोहायला पण येत नव्हते.

''अहो काय हो? तो ईश्वर सर्वांचे रक्षण करतो यावर तुमचा विश्वास नाही तर मग मुंबईहून एवढ्या लांब कशाला आले हो तुम्ही? आता येतील बघा ते.'' असे गुरुजी म्हणाले. गुरुदेवांची प्रार्थना करून आम्ही तीरावरून त्यांना मोठ्याने हाका मारत होतो. आणि लवकरच आम्हाला प्रतिसाद मिळाला 'आलो आलो.'

ते आल्यानंतर मंदिराच्या पायऱ्या चढताना म्हणाले, ''आलो एकदाचे. अहो आलो म्हणजे काय? ते श्रीपादभट मदतीला आले म्हणून येऊ शकलो. नाहीतर आमची काही धडगत नव्हती.''

आम्ही आश्चर्याने स्तंभीत झालो. अवाक् होऊन त्यांच्या समाधानी चेहऱ्याकडे पहात बसलो. म्हटले ''अहो कुठले श्रीपादभट. ते तर येथून हलायला तयार नव्हते? ते कुठे गेले मदतीला?''

पायऱ्या चढून होताच श्रीपादभट सामोरे आले व आम्हास म्हणू लागले, ''काय म्हटलं होत मी तुम्हाला? बघा, आलेत ना ते सुखरुप, अहो हे दोघे फारच घाबरले.''

आम्ही शरमलो. सद्गतीत झालो. धावतच श्रीपादश्रीवल्लभांच्या पीठावर महापूजे निमित्त बसविलेल्या उत्सव मूर्ती समोर आलो. साष्टांग नमस्कार घातला व डोळे मिटून अश्रू आवरीत बसलो.

ह्या तिघांकडून आम्हाला कळले ते असे -

पाणी चढले. काही ठिकाणी तर गळ्यापर्यंत येत होते. मार्ग दगड गोट्यांचा, खाच खळग्यांचा आणि दाट अंधार होता. कॅमेरा बॅटरी सर्व भिजले. आम्ही घाबरत घाबरत मार्ग चालत होतो. इतक्यात श्रीपादभटांची हाक ऐकू आली. आम्ही प्रतिसाद दिला. त्यांनी ओरडून हातवारे करून किनाऱ्यास कोठून कसे यायचे ते सांगितले. पाणीही कमी होत असल्याचे जाणवले. श्रीपादभटांच्या सूचनेनुसार आम्ही तीरापर्यंत कसे पोहोचलो ते कळलेच नाही. मग ते मागे एकदा तेथील श्री. केळकर कसे अडकले होते व त्यांची आम्ही कशी सुटका केली हा किस्सा वर्णन करून सांगू लागले. नंतर म्हणाले, ''चला, तुम्ही लवकर लवकर चला, तुमचे साथीदार तुमची काळजी करीत बसले आहेत. मी चलतो पुढे.''



१८) कुरवपूर क्षेत्री स्वप्न दृष्टांत

हा स्वप्न दृष्टांत म्हणजे हरीहरेश्वरच्या पुढे होणाऱ्या कार्यक्रमाची नांदीच म्हणावी लागेल. म्हणून या स्वप्नांचा येथे उल्लेख करीत आहे...

गुरुवार, दि. २२.५.१९८० रोजी पहाटेच्या काकड आरतीपासून सर्व कार्यक्रमात आम्ही सहभागी होतो. तो श्रीसेवेचा दिवस आम्हीच मागून घेतला होता. परंतु श्रीपादभट यांचे नियमाप्रमाणे त्यांच्याच मार्गदर्शनाप्रमाणे सर्व झाले. माध्यान्ह महापूजा, कृष्णेच्या उदकाचे स्नान, पंचामृत स्नान, फलरसांचे स्नान, अभिषेक लघुरुद्र, महापूजा यथासांग पार पडली. १०८ निरांजने लावून वाद्य मृदुंग घंटा, टाळ, चौघडा यांच्या नादात आरती झाली. पीठावर वस्त्रांकीत सर्व दागदागिने सुवर्ण मुखवटा घालून उत्सव मूर्ती बसवली होती. आरती चालू असताना मूर्ती आमच्याकडे बघत हसत आहे असे प्रत्येकास जाणवले. तेथील पद्धतीप्रमाणे आम्ही सर्वही पालथे झोपलो व आम्हाला ओलांडून आमच्या अंगावरून पालखी गेली. नंतर शेजारती होऊन आम्ही ११ नंतर झोपी गेलो.

दि. २३.५.१९८० रोजी पहाटे ३ ते ४ चे दरम्यान मी स्वप्न पाहिले ते असे -

अवाढव्य असे मैदान. त्याचे एका कोपऱ्यात कौलारु घर व बाजूला हिरवळ. मी त्या घरात बैठकीचे खोलीत माझ्या कारचे काही पार्टस् काढून त्यावरील ग्रीस रॉकेलने धुवून साफ करीत आहे. समोर परातीत ते पार्टस् आहेत व माझे हात काळ्या तेलाने भरले होते. गेट घरासमोरुन खूप दूर होते. बाहेर बघितले तेव्हा कोणी तरी वृद्ध त्या गेटमधून आत आल्याचे जाणवले. इतरही काही २-४ घरे होती. मी माझ्या कामात व्यग्र होतो. इतक्यात दारांतून रघुनाथरावांचा आवाज ''अहो शशिकांत! आम्ही आलो आहोत!'' मी मुख्य दरवाजाकडे पाहिले, श्री रघुनाथराव 'श्री' समवेत आत प्रवेश करीत होते. त्यांच्या अनपेक्षित येण्याने मी चकित झालो. पण दुसऱ्या क्षणी मला काही कळेना आता मी काय करू? त्यांचे स्वागत कसे करू? उभा राहिलो पण हात जोडावेत तर ते ग्रीस व काळ्या तेलाने माखलेले मी किंकर्तव्यविमूढ झालो आणि दीनवाणा होऊन पहातच राहिलो. दरम्यान रघुनाथरावांनी कोपऱ्यात पडलेला एक गोणपाट उचलला व श्रीमहाराजांना बसायला अंथरला. स्वत: करीता एक पथारी घेतली. खोली मध्ये सामान अस्ताव्यस्त पसरले होते. मी हात धुवून आलो होतो. धावपळ करून मी महाराजांना बसण्यास एक संतरंजी व टेकण्यास तक्या दिला व बसण्यास विनंती केली. श्रीमहाराज खूप दमलेले तसेच त्रासलेले दिसत होते. चेहऱ्यावर नाराजी जाणवत होती. ते जागेवरून उठले नाहीत. 'येथे ठीक आहे.' म्हणाले, सायंकाळी सौ. लता काही सामुग्री घेऊन बाजारातून आली. श्री महाराजांना व रघुनाथरावांना भोजन पान मांडले. श्रीमहाराज जेवण करून उठले. जेवताना व नंतर मी नेहमीप्रमाणे काहीच केले नाही. रघुनाथराव

म्हणाले, ''कसले ते जेवण?''

महाराज निघाले. माझी गाडी नादुरुस्त होती. मी वाहन आणतो म्हटल्यावर श्रीमहाराज म्हणाले, 'आम्हाला आता थांबायला वेळ नाही, लवकर जायचे आहे. जाता जाता मिळेल वाहन!'

मी पूर्ण शरमिंदा होऊन हताशपणे दोघांकडे पहात आहे. नमस्कार करण्याचेही भान नाही. महाराज रघुनाथरावांना म्हणत आहेत, ''बघा कसे कर्तव्यशून्य हताश होऊन आता आपल्याकडे पहात आहेत.''



१९) श्रीवासुदेवांचे गुहेत ध्यान धारणा

पहाटेचे ४ वाजले. सोबतच्या मंडळींनी मला उठवले. मुखमार्जन करून सर्वजण कृष्णा स्नान करून आलो. चहापान झाले. काकड आरतीस प्रारंभ झाला. पण माझ्या डोक्यावर त्या स्वप्नाचाच प्रभाव होता. आरती नंतर डोक्यातील मळभ विरळ होऊ लागले. नंतर दिवसभराचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. चार वाजता चहापानानंतर मी वासुदेवानंदांच्या ध्यान धारणेच्या गुहेत जाऊन बैठकीला बसायचे ठरवले. तेथील सेवेकरी व श्रीपाद भटजींची परवानगी घेऊन गुहेत जाऊन बसलो. गुहेत जाताना भोकातून प्रथम रांगत रांगत जावे लागते. पुढे बसायला ऐसपैस जागा मिळते. मनात 'ब्रह्मानंदम्' हा श्लोक पूर्ण होताच शक्ती संचार होऊन आनंद लहरीत विलीन झालो आणि जागेपणी दिव्यस्वप्नाची अनुभूती घेऊ लागलो. वासुदेव निवासात पोहोचलो. 'श्री' शांत, प्रसन्न नेहमीच्या जागेवर बसले होते. मी साष्टांग नमस्कार घातला व उभा राहिलो. श्रीमहाराज कौतुकाने हसतमुख माझ्याकडे पाहताहेत. बसण्याची आज्ञा होताच समोर बसलो.

''कसं काय? सर्व ठीक कुशल आहे ना?''

''होय महाराज.''

''आज कसं काय येणं झालं?'' महाराज.

''महाराज आपण माझ्या घरी हरिहरेश्वरी यावं असं मनापासून वाटतं. आमच्या सोबत आमचे मुंबईचे गुरुबंधूही येतील. सर्वांना सत्संग मिळेल.''

''ठीक आहे, मग आश्रमात तसे सांगा. कोण कोण येणार आहे तेही खाली विचारा आणि सर्व ठरवा.''

श्रीमहाराजांची अनुमती मिळताच मी हर्षभराने अत्यंत उल्हासित झालो.

आश्रमात खाली गेलो. कोडणीकर गुरुजी, रघुनाथराव, जगन्नाथ पुजारी सर्वांना सांगत

सुटलो. घरचेही, सौ. आईसाहेब, मुले महाराजांसोबत येतील. मंदिरांतील धूपारतीच्या आवाजाने मी भानावर आलो.

मुंबईस परतण्याचा दिवस उजाडला. आम्ही अत्यंत जड अंत:करणाने श्रींचा निरोप घेतला. सर्वांचा निरोप घेऊन आम्ही परतीच्या प्रवासास लागलो. सर्वांनी आपआपल्या घरी जाण्याचे ठरविले. मला मात्र श्रींच्या दर्शनाची तीव्र ओढ लागली. मी त्याप्रमाणे श्रीमहाराजांचे दर्शन घेण्यास पुण्यास जाण्याचे ठरविले.



२०) कुरवपूर यात्रेनंतर श्रीदर्शन

सर्व गुरुबंधू श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनास पुण्यास येण्यास तयार झाले. आम्ही सर्व स्टेशनवरून थेट श्रीमहाराजांचे घरी गेलो, तेव्हा ते पूजा-अर्चा आटोपून सोवळे सोडून धोतर नेसून बसले होते. वर्तक वाड्यातील तीन खोल्यांमध्ये श्रीमहाराजांचे वास्तव्य होते. आम्ही दर्शन घेतले. श्रीमहाराजांनी ''कशी झाली कुरवपूर यात्रा?'' हा पहिला प्रश्न केला. आम्ही सविस्तर वृत्तांत थोडक्यात सांगितला. आमचे गुरुबंधू श्री. जोशी यांनी गुरुमहाराजांना कृष्णेचे, श्रीपादश्रीवल्लभ पीठाचे तीर्थ दिले. त्यांनी ते प्राशन केले. लागलीच श्री. जोशींनी तेथीलच ताम्हण पुढे करून चरण त्यात धरण्यास सांगितले. सर्वांच्या आग्रहास्तव मनाचे सर्व हेतू पूर्ण करणारे महाराज आमचे सांगण्याप्रमाणे करते झाले. लागलीच श्री. जोशी यांनी आणलेले कुरवपुरचे कृष्णाजल श्रींचे चरणावर घातले. आम्हा सर्वांस परम भाग्यवशात, श्रीसद्गुरु चरण तीर्थाचा लाभ झाला. मला आता उसंत नव्हती. तीर्थमहिम्याचा विषय निघताच मी म्हणालो, ''महाराज आमचे गाव हे सुद्धा एक तीर्थक्षेत्र आहे. रायगड जिल्ह्यात, श्रीवर्धन तालुक्यात हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे. ब्रह्मा, विष्णू, शंकर व आदीमाता पार्वती अशी स्वयंभू लिंगे एका मंदिरात तर दुसऱ्या मंदिरात श्री कालभैरव योगेश्वरी या मूर्ती आहेत. ह्या देवांची स्थापना श्रीअगस्ती मुनींनी केलेली असून यांचे वर्णन स्कंद पुराणात आहे. आपण एकदा आमच्या गावी आमच्या घरी यावे. आम्ही आपल्या नेण्या-आणण्याची व्यवस्था करू. समुद्रकाठी शांत रम्य असे हे स्थान आहे. ७-८ दिवस तरी आपण आमचे घरी मुक्काम करावा. आम्हांला सर्व गुरुबंधूंनाही नेता येईल. जागा मोठी आहे. नारळी सुपारीच्या बागेत घर आहे. सभोवार चारही दिशांना अंगण आहे. ही बाग समुद्र किनाऱ्याला जाऊन पोहोचते.

''ह्या क्षेत्राची माहिती स्कंद पुराणात आहे का? आणि देऊळ समुद्र किनारी आहे का?''

''होय महाराज! श्रीहरिहरेश्वर महात्म्याची संस्कृत पद्यात व गद्यात माझ्या जवळ पोथी आहे. ती आपणास हवी असल्यास मी आणून देईन.''

''श्री हरिहरेश्वर आणि श्री कालभैरव योगेश्वर ही समोरासमोर देऊळे आहेत. ही हरिहर डोंगराचे पायथ्याशी समुद्रापासून २५-३० फूट उंचीवर आहेत. पण समुद्र किनाऱ्यास लागून आहेत.''

''पाहू पुढे केव्हातरी.'' श्रीमहाराज.

श्रीवासुदेव निवासात प्रसाद भोजन घेऊन आम्ही मुंबईस परतलो.

२६.५.१९८०

सकाळचे 'श्रीं'चे भेटीत श्री. मंगेश घोलकरांनी श्रीमहाराजांना विचारले. ''माझ्या गुरु पू. कलावती देवी समाधीस्त झाल्या आहेत. यापुढे आम्हा साधकांना त्या मार्गदर्शन करू शकतात का? व कसे करू शकतात?''

श्रीमहाराज म्हणाले, ''साधकाची तेवढी साधना, तेवढी तयारी असेल तर असे महात्मे समाधीनंतर म्हणजे निर्याणानंतर सुद्धा ध्यान धारणेच्या बैठकीत किंवा स्वप्नात दृष्टांत देऊन मार्गदर्शन करतात.''

२१) श्री गुळवणी महाराजांनी घडविले दत्तप्रभू दर्शन

श्री महाराजांकडून आम्ही श्रीवासुदेव निवासात आलो. सकाळचे दहा वाजले असतील. मी आंघोळीला जाण्यासाठी उभा राहिलो. तेवढ्यात एक वृद्ध गृहस्थ आले व अचानक त्यांनी मला वाकून नमस्कार केला. मी त्यांना तसे करण्याचे कारण विचारले. कुरवपूरहून आलात म्हणून केला असे त्यांनी सांगितले.

ते पुढे सांगू लागले. ''मी कुलकर्णी. पुण्यात नातलगांकडे आलो होतो. तेथून आश्रमात आलो. मी श्री गुळवणी महाराजांचा अनुग्रहीत आहे. एकदा श्री गुरुमहाराजांसोबत कुरवपूरला जाण्याचा योग आला होता. श्रावण मास असेल. कृष्णेला पाणी होते. खाट उलटी टाकून तिच्या चारही कोपऱ्यास भोपळे (सुके दुधी भोपळे) लावले हाते. खाट तरंगत मंदिराकडे निघाली. मध्यावर श्रीगुरुमहाराज व आम्ही तिघे चौघे चार बाजूस बसलो होतो. वेळ सूर्योदयाची होती. मी श्रीगुरुमहाराजांना विचारले, 'महाराज! श्रीदत्तप्रभुंचे येथे वास्तव्य असेल का? ते कधी कोणाला दिसले असतील का?

माझे वाक्य संपताचक्षणी श्रीगुरुमहाराजांनी उजवा हात पुढे केला व म्हटले ''हे पहा! हे कोण आहेत!''

''अहो काय सांगू तुम्हाला? साक्षात दत्तप्रभू कमळात उभे! कमळ कृष्णेच्या पाण्यावर तरंगत होते! दत्तप्रभू उभे! चांगले ६'-0 फूट उंच. गोरेपान-गुलाबी रंग. विस्फारलेले डोळे.

हसतमुख मंदस्मित भाव, उजवा हात वरदहस्त देणारा. आम्हा सर्वांना दर्शन झाले आणि दत्तप्रभू अंतर्धान पावले. काही क्षण आम्ही कोणत्या विश्वात होतो ते आमचे आम्हालाच कळले नाही.'' इति.



२२) यात्रा भोवली

गोरेगावी घरी येताच सौ. म्हणाल्या 'अहो तुमची यात्रा भोवली. गाडीची मागील काच काढून चोराने गाडीतील टेप, रेडीओ, स्पीकर्स पळवले.''

मला या गोष्टीचे काहीच सुख-दु:ख वाटले नाही. उलट चोराने गाडी नेली नाही. हे फार बरे झाले. मजवर उपकारच केले. आता मी माझ्या गुरुदेवांना गाडीतून हरेश्वरी नेऊ शकेन, याचे मला समाधान वाटले.

माझ्या यात्रेमुळे सामान चोरीला गेले हा सौ.चा भ्रम होता, पण 'श्रीं'नी तोही राहू दिला नाही. २-३ महिन्यांनी दोन पोलीस घरी आले व चोरी येथे झाली होती का ते विचारू लागले. तेव्हा माझ्या डोक्यात प्रकाश पडला आणि गाडीतील वस्तू चोरीला गेल्याचे मी पोलीसांना सांगितले.

चोरीची तक्रार न केल्याबद्दल पोलीसांनी आश्चर्य व्यक्त केले व माझ्या चोरीला गेलेल्या वस्तू परत मिळाल्या.



२३) एका गुरुभक्ताची भेट

प्रभुदेसाईंची भेट - आम्ही पुण्याहून आल्यानंतर रात्री भाऊसाहेब शृंगारपुरे यांचा फोन आला. त्यांनी दुसऱ्या दिवशी लंच टाईममध्ये त्या सर्वांच्या परिचयाचे श्री. प्रभुदेसाई यांना भेटायचे ठरवले होते.

आमचे बहुतांशी गुरुबंधू हे मुंबई येथील रिझर्व्ह बँकेमध्ये सर्व्हिस करणारे होते. श्री. प्रभुदेसाई हे आध्यात्मिक क्षेत्रात सर्वात सिनीअर मोस्ट आणि प.पू. सद्गुरु योगीराज वामनरावजी गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत. त्यांच्या डिपार्टमेंटमध्ये गुरुबंधू श्री. देवळे हे होते. श्री. प्रभुदेसाई यांनी श्री. देवळे यांना हा योग दीक्षा - शक्तिपात दीक्षेचा मार्ग दाखविला. त्यांना श्री वासुदेव निवासात प.पू. श्री दत्तमहाराजांकडे नेले. पुढे श्री. देवळे यांनी श्री. गोडसे, शृंगारपुरे, तावडे, बोडस, घोलकर यांना नेले. श्री. जोशी हे प्रभुदेसाईंचे प्रथमपासून परिचित होते. ही सर्व मंडळी आध्यात्मिक मार्गांतील वाटचाल कशी करावी, कोणते नियम पाळावेत,

कोणती पथ्ये पाळावीत येथपासून श्री गुरुसेवा कशी करावी, गुरुभाव कसा असावा ह्या सर्व मार्गदर्शनापर्यंत श्री. प्रभुदेसाई यांचे सल्ले घेत असत आणि श्री. प्रभुदेसाई यांची साधन बैठक स्थिर झालेली असल्याने ते या नूतन अनुग्रहीतांना उत्तम मार्गदर्शन करीत. कुरवपूरला जाण्यापूर्वी सुद्धा सर्व सूचना या मंडळींनी श्री. प्रभुदेसाई यांच्याकडून घेतल्या होत्या. लहान सहान गोष्टी मन मोकळेपणाने प.पू. महाराजांसारख्या महापुरुषाकडे विचारणे शक्य नसते. जशी वडिलांची आदरपूर्वक भीती असते तशी थोरल्या बंधूंकडे नसते. कुरवपूरहून येताच सर्व मंडळी श्री. प्रभुदेसाई यांना भेटली व त्यांत माझ्या भगिनीचे पती श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे यांनी नवोदित श्री. नागल्यांचीही माहिती दिली. श्री. नागल्यांनी प.पू. महाराजांना गांवी हरिहरेश्वरी चलण्याचाही बराच आग्रह केला आहे, हेही सांगितले. नवोदित अनुग्रहीत आणि एवढे धैर्य करणारी ही व्यक्ती आहे तरी कोण आणि कोणत्या बळावर त्यांनी हे आमंत्रण देण्याचे धैर्य केले आहे, ते जाणून घेण्यासाठी त्यांनी मला भेटीस मुंबई रिझर्व्ह बँकेजवळचे एका हॉटेलमध्ये बोलाविले.

श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे यांनी माझी व प्रभुदेसाईंची परस्पर ओळख करून दिली. लागलीच प्रभुदेसाईंनी विषयालाच हात घातला. ''आपण काय प.पू. दत्तमहाराजांना आपल्या गांवी चलण्याचा आग्रह केला आहे?''

''होय!''

''कशाकरीता? आपल्या घराला महाराजांचे पाय लागावेत! कुटुंबाचे भले व्हावे! सर्वांना सुख समाधान लाभावे वगैरे वगैरे याचकरीता ना?''

''काही ऐहिक इच्छा आकांक्षा करताच नव्हे! तर संत सहवास घडावा, अध्यात्मास पोषक अशी पवित्रता आपल्या घरास यावी.''

''अहो, पण आपण केवढे मोठे धारिष्ट्य करत आहात याची कल्पना आहे कां तुम्हाला? प.पू. दत्तमहाराज म्हणजे काय एखादी साधी-सुधी व्यक्ती वाटली कां तुम्हाला? चला, आपलं गाडीत घातलं नि घरात नेऊन सोडलं! चार दिवस राहिले आणि परत हे माणूस जाग्यावर नेऊन सोडलं! इतकं सोपं वाटतं का हे आपल्याला?''

''सत्संग घडावा, 'श्रीं'चे चरणांने घर पुनीत व्हावे ही सात्विक भावना माझ्या अंत:करणात उदित झाली, तर त्यात गैर काय आहे?''

''तुमच्या दृष्टीने गैर काही वाटत नसेल, पण एवढ्या मोठ्या ईश्वरतुल्य महापुरुषाला आपण नेत आहोत! त्यांचे नित्य आचार धर्म, सुचिता, जलप्राशन, भोजन ग्रहण या प्रत्येक गोष्टीचे यमनियम तुम्हाला माहीत आहेत कां?''

''होय! ते सर्व मला पाळायलाच लागतील आणि ते मला पूर्ण माहीत नसले तर

समजावूनही घ्यावे लागतील. जर मला त्यांना नेण्याची तीव्र इच्छा, तळमळ असेलच तर मला त्यांचे दैनंदिन व्यवहार-आचार-पथ्ये ही अभ्यासावीच लागतील!''

''आणि तुम्ही त्यांना नेणार कसे?''

''माझी गाडी आहे! गाडीने नेईन आणि गाडीनेच पुन्हा त्यांचे गृही आणीन!''

''तुम्हाला माहीत आहे कां? प.पू. श्री महाराज घरून निघताना पाणी पिऊन निघतील, त्यानंतर वाटेत पाण्याचा थेंब सुद्धा घेणार नाहीत. काही खाण्याचे तर सोडाच! फळे सुद्धा खाणार नाहीत आणि पाणीही पिणार नाहीत. तुमचे गांव पुण्यापासून किती दूर आहे? किती वेळ लागेल पोहोचायला?''

''पुणे ते हरिहरेश्वर २०० ते २५० किलोमीटर असेल. घाटांतून जाणे आहे. मधे थोडे थांबावेही लागेल. एकूण ८ ते ९ तास लागतील.''

''मग! इतक्या वेळात ते पाणी सुद्धा पिणार नाहीत! आणि वाटेत तुमची गाडी बिघडली तर काय कराल?''

''शृंगारपुरे बंधुंचीही गाड्या आहे! दोन गाडी घेऊन निघू.''

''दोन काय दहा घ्याल! पण संकटेच यायला लागली तर काय करणार आहात? वाटेत २-२ घाट आहेत, खंडाळ्याचा व बोर घाट. एवढं सगळं करून तुमचा प्रवास ठीक झाला समजा. पण घरी गेल्यानंतर दारात साक्षात् श्री दत्तप्रभू उभे आहेत. त्यांचे स्वागत यजमान म्हणून मानाने तुम्हाला करायचे आहे आणि इतक्यात तुम्हाला बुद्धीभ्रम झाला, मनोधैर्य खचले, तुम्ही भांबावून गेलात, काय करावे काही सुचेना, चक्रावलांत, श्री दत्तप्रभूंचे आगत स्वागत सन्मान तुमच्याकडून झाला नाही तर काय कराल हो?''

क्षणभर मला कुरवपूरच्या स्वप्न दृष्टांताचे स्मरण झाले व वाटले, ''खरंच हे यांचे म्हणणे सुद्धां नाकारता येत नाही. पण मला सद्गुरु आपले गांवी, आपले घरी यावे ही अगदी मनापासून ओढ आहे, तशी मला तळमळ लागली आहे, मग दत्तप्रभू माझी इच्छा पूर्ण करणार नाहीत कां?'' हे माझे मनी विचार चालू होते. माझा चेहराही जरा भांबावलेला झाला असावा. त्यांनी मला पुन्हा प्रश्न केला, ''काय, पटतंय ना मी काय म्हणतो आहे ते? पुण्य करायला जाल, ते राहील बाजूला आणि पाप पदरी पडायचे!''

मला प्रभुदेसाईंचे म्हणणे तेवढे पटले नाही. मी त्यांनाच प्रश्न केला, ''तुम्ही ही अशी नकारात्मकच भूमिका घेऊन कां बोलता? 'श्रीं'चे घरी आगमन झाले तर मला संत सहवास घडेल, माझ्या घरातील लोकांना, माझ्या गावकरी लोकांना आणि जे कोणी माझे गुरुबंधू या कार्यक्रमात सहभागी होतील त्यांनाही संत समागम घडेल! यात गैर काय आहे? कां माझे हे प.पू. महाराजांना आमंत्रण देणे गैर वाटते? तुम्ही म्हणता ती सर्व काळजी घेता येईल. श्री

प्रभू आंतरिक भावनाही जाणतात. का वाटेत अडथळे येतील? कशावरून मी ऐनवेळी बुद्धीभ्रष्ट होईन?''

''अहो, मलाही सत्संग नको आहे कां? म्हणून मीही जाऊन म्हणावं कां महाराजांना, 'चला माझे घरी! माझ्या गांठी एवढे पुण्य आहे किंवा नाही हे कसे कळणार? आपला आध्यात्मिक अधिकार हवा. आपली तेवढी उपासना, भक्ती पराकोटीची असली पाहिजे. महात्म्यांना प.पू. दत्तमहाराजांसारख्या सत्पुरुष-विभूतीला आणणं आणि नेणं किती मोठी जबाबदारी आहे. लाखो जीवांचा उद्धारकर्ता, त्याला फुलासारखे सांभाळून नेणे! त्यांचे नित्य आचारधर्म सांभाळता आले पाहिजेत! आणि तुम्हाला आता मी खरं ते स्पष्ट सांगू?''

''मला सर्व सांगा म्हणजे मला त्यांची सर्वतोपरी काळजी घेता येईल. अडथळे दूर करता येतील. त्यांचे आगमन व्हावे म्हणून तुम्ही सांगाल ते पारायण, अनुष्ठान करीन. सांगा!''

''अडथळे कोठले ते सांगतो. समोर दिसणारे आपल्या इंद्रियांना गोचर असलेले सर्व अडथळे दूर करता येतील, पण अगोचर जे आपल्या शरीराच्या ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत न येणारी, दृष्टीस न दिसणारी अदृश्य संकटे आपण कशी दूर करणार? आपण आपल्या बुद्धीने मनाने अशा विभुतीला घेऊन निघालो तर त्या विभुतीची सर्व जबाबदारी आपणावर येऊन पडते. तुम्हास माहीत नसेल, हे जे परलोकवासी आत्मे, पुण्यात्मे, इतकेच नव्हे तर स्वर्गातील देव देवता, चराचरांतील दिक्पाल, यक्ष, किन्नर, या सर्वांना सर्व सुखे, आनंद मिळतात पण संत सहवास, सत्पुरुषांचा सहवास, प.पू. दत्तमहाराजांसारख्या महापुरुषांचा सहवास मिळत नाही. एक यक:श्चित् मानव आणि संत समागमाच्या या अदृश्य शक्ती अनुभवात अनंत अडचणी, अडथळे निर्माण करू लागतात. आपण कल्पनाही करू शकणार नाही अशी विघ्ने हे परलोकवासी, हे स्वर्गस्थ ऋषी, मुनी, देव, संकटे उभी करून त्रास देऊ लागतात. आपली पुण्याई कमी पडते, आपण हवालदिल होतो. सोबत असलेले सत्पुरुष आपणास सहाय्य करण्यात उदासीन राहतात कारण अडथळे निर्माण करणारे पुण्यात्मेही असतात आणि देव देवताही असतात. त्यांना त्यांचा मान राखावा लागतो. परंतु हेच त्यांचे आगमन त्या सत्पुरुषांच्या स्वेच्छेने असेल, तर ते स्वत:हून, 'अहो नागले, आम्हाला तुमचे गृही यायचे आहे,' असे म्हणाले असतील तर त्यांच्या इच्छेच्या, त्यांच्या संकल्पाच्या आड श्री ब्रह्मदेव सुद्धा येणार नाहीत. कोणीही अडथळा करू शकणार नाही. तेव्हा हे लक्षात घ्या की, त्यांचे आगमन त्यांचेच इच्छेने व्हायला हवे!'' इति प्रभुदेसाई.

त्यांच्या या म्हणण्यात पूर्ण तथ्य आहे. पण मी तर आग्रह करून बसलो आहे. तर आता मी काय करावे? या बद्दल मी विचारणा केली.

श्री. प्रभुदेसाई म्हणाले, ''हे बघा! यानंतर तुम्ही स्वत:हून प.पू. महाराजांना काहीच विचारू नका. तुम्ही त्यांना हरिहरेश्वर महात्म्य पोथी वाचायला आणून देतो म्हणाला आहात. तर तीही देऊन या. तुमच्या बोलण्यात सर्व गुरुबंधूंना सुद्धा संत सहवास मिळेल असे आले. सर्वांनाच हा संत समागमाचा लाभ व्हावा असे तुम्हाला मनापासून वाटते कां?''

मी होय म्हटले.

''मग असे करा की शृंगारपुरे आणि गोडसे सर्व मुंबईकर गुरुबंधूंना ओळखतात, ज्यांना ज्यांना या कार्यक्रमाचा लाभ घ्यायचा असेल त्यांना त्यांना माझ्या घरी किंवा शेजारीच घोलकर राहतात, त्यांचे घरी या येत्या शनिवारी सायंकाळी बोलवा. आपण सभा घेऊ. सर्वांनी व तुम्ही यापुढे काय काय आणि कसे करायचे ठरवू. एक मात्र निश्चित की, तुम्ही स्वत:हून महाराजांना पुन्हा 'कधी येणार?' म्हणून विचारू नका. त्यांना स्वत:हून म्हणू द्या, केव्हा जायचे ते! याबाबत योग्य ते मार्गदर्शन श्री सद्गुरुंच्या प्रेरणेतून, जे सुचेल ते तुम्हा सर्वांपुढे सांगेन.''



२४) हरिहरेश्वराचा संकल्प

शनिवार दि. ३१.५.१९८० सायंकाळी हरिहरेश्वरच्या कार्यक्रमासंबंधी सर्व गुरुबंधुंची श्री. घोलकर यांचे घरी सभा झाली.

श्री महाराजांनी हरिहरेश्वरला यावे म्हणून घोरात्कष्टात चे ११ व 'भूतप्रेत पिशाच्याद्या' या स्तोत्राचे १२ पाठ करायचे ठरले. संकल्प झाला. घरोघरी प्रत्येक गुरुबंधूने अनुष्ठानास प्रारंभ केला.

दि. २४.७.१९८० श्री. व सौ. नीलाताई जोशींकडे गिरगावात श्री महाराजांचे आगमन झाले. मी, गोडसे, शृंगारपुरे यांच्या सोबत दर्शनास गेलो होतो. श्रीमहाराज प्रसन्नचित्त होते. त्यांनी आमची आस्थेने चौकशी केली.

दि. २७.७.१९८० गुरुपौर्णिमा होती. मी, श्री. गोडसे व श्री. शृंगारपुरे आदल्या दिवशीच श्रीवासुदेव निवास येथे मुक्कामास होतो. पौर्णिमेच्या दिवशी पहाटे 'श्रीं'ना स्नान घालण्याचा योग आला.

सायंकाळी ४ वाजता साधना हॉलमध्ये प.पू. महाराजांच्या उपस्थितीत सामुदायिक साधना होती, मला महाराजांच्या समोरच जागा मिळाली.



२५) दीक्षेनंतरची पहिलीच गुरुपौर्णिमा

संकल्पित दीक्षा झाली तेव्हा श्री महाराज दिल्लीस होते. १७ मार्च १९८० गुढीपाडवा. शक्ती संचारीत होऊन उर्ध्वगामी वेध घेताच निर्भय राहायचं ठरवलं होतं आणि जे होत आहे ते होत राहू दिलं. देहबुद्धी नष्ट होत आहे ही जाणीव होताच वेडं मन भयाकूल झालं. आज मात्र तयारीने बैठक मारली. आता काही झाले, अगदी समाधी अवस्था प्राप्त झाली, तरी माझी गुरुमाऊली माझ्यासमोर बसली आहे. माझे मन प्रफुल्लित होते. गुरुचरणांशी लीन होते. कोणताही विचार मनात नव्हता. ''मी माझे गुरुदेव आणि शक्तीमाता! गुरुमाऊलीच आहे शक्तीमाता आणि शक्तीमाताच आहे तो परिशुद्ध माझा आत्मा! आज त्रिवेणी संगम होऊन शिल्लक राहणार आहे तो फक्त सोऽहं!''

'ब्रह्मानंदंम् परम...' गुरुस्तुतीस प्रारंभ झाला. संपूर्ण हॉल अनुग्रहीत गुरुबंधुंनी भरला होता. सर्वत्र हॉलमध्ये पूर्ण शांतता झाली. सुगंध दरवळत होता. श्लोकांचा प्रारंभ होताच डोळे मिटले गेले. दोन्ही हातांची बोटे एकमेकात गुंतली. घट्ट झाली. नेत्र आपोआप जड झाले. सहजासनात आसन स्थिर झाले. दृष्टी आज्ञा चक्रावर स्थिरावली. तेजोमय वलय, बिंदुपासून मोठा आकार घेत होते. त्यात गुरुमहाराजांचे दर्शन! श्वसन वाढले असावे, भस्त्रिका होत असावी, गुरुबंधुंचे प्रणव ओंकार कानी येऊ लागले. हृदयात आनंद लहरी ऊठू लागल्या! आपण दोलायमान होत आहोत व वरवर जातो असे वाटले. कशाकशाचे भान राहिले नाही. मी मला, माझ्या देहाला विसरू लागलो. इतक्यात आपादमस्तकी विद्युल्लतेचा झोत मला टाळूच्याही वर खेचू लागला आणि हे वेडे मन मला खाली खेचू लागले. महाराज, नको मला क्षणात एवढे वरचे स्थान नको. ही वाटचाल इतक्या शीघ्रगतीने मला सहन होत नाही. मला सांभाळा. क्षणात माझी तगमग शांत झाली. हायसे वाटले. मग आनंदात तरंगत बसलो. मन सुखावत आहे. आनंद भरला आहे. पण बुद्धी क्षुब्ध होऊन मला विचारत आहे, 'काय हे केलेस?' महाराज समोर होते ना? त्यांच्या चरणाशी समीप असून शरणागत झाला नाहीस? अजून संसार आहे ना? संभ्रमाच्या पलीकडे जाताना स्वत:स खाली खेचलेस. हे तरी कोणी केले? तुझ्या मनाने? हाही स्वअभिमान. 'करता करविता नारायण सद्गुरु.'

अशी झाली आमची गुरुपौर्णिमा. ऐहिक जीविताची जाग आली. डोळे उघडले. श्रींकडे कटाक्ष टाकला. गुरुमूर्ती मजकडे पाहून मिश्कील हसत होती. मी उठून तात्काळ नमस्कार घातला.

दुसरे दिवशी निरोप घेण्यास श्रींपाशी गेलो. 'मुंबईस निघालो' हे सांगितले.

''भोजन प्रसाद घेऊन निघा. नित्य साधना चालू ठेवा.'' श्रींचा आशीर्वाद घेऊन आम्ही दुपारी परतीच्या प्रवासास निघालो.

२६) 'श्रीं'सोबत कन्यागतपर्व वाडी क्षेत्री

कन्यागत पर्व सुरू झाले होते. श्रीमहाराज पालखी करता वाडीस जाणार होते. मी व भक्तमंडळी या पुण्यप्रद सोहळ्यास श्रींचे सान्निध्यातच जाण्याचे ठरविले.

दि. २५.९.१९८० रोजी पहाटे आम्ही वाडीस पोहोचलो. श्रीमहाराज आधीच आलेले होते. सकाळी बाळू पुजारींचे घरी श्रीमहाराज उतरले होते. तेथे जाऊन दर्शन घेतले. श्रीमहाराज प्रसन्न होते. 'बरं झालं आपण सर्व आलात. ह्या कन्यागत पर्वातील पालखी सोहळा दर्शन, दत्तप्रभूंचे कृष्णास्नान, त्याप्रमाणे सर्वांसहीत श्रीक्षेत्री कृष्णास्नान हे सर्व काही पुण्यप्रद आहे.'

श्रीमहाराज पहाटे स्नानाला जातील तेव्हा स्नानाला जावे असे आम्ही ठरवले. पण महाराज पहाटे किती वाजता जातात ते कसे कळणार? स्नानाचा मानस श्रीमहाराजांना सांगण्याचे ठरविले.

रात्रीची पालखी झाल्यानंतर महाराज बाळू पुजारींकडे गेले. तेव्हा श्री. गोडसे यांनी महाराजांसोबत स्नानाचा मानस त्यांना सांगितला. 'अहो आम्ही फार लवकर स्नानाला जातो. 'किती वाजता जाणे होईल?' असे विचारल्यावर, 'पहाटे ४ वाजता जाऊ.' असे श्रीमहाराजांनी सांगितले. बस ठरले.

श्रीगोविंदभट यांचे घरी आम्ही उतरलो. पहाटे ४ वाजता आम्ही कृष्णा स्नानासाठी महाद्वारात पोहोचलो. स्नानाला जाण्यासाठी एकच मार्ग होता. म्हणून आम्ही तेथे श्रींची वाट पहात बसलो. मंदिराच्या आसमंतात निरव शांतता होती. आमच्या खेरीज कोणीच तेथे नव्हते. ४.३० वाजले तरी श्री आले नाहीत. नदीकडे जाणारा दुसरा रस्ता दुकानांच्या पुढे आहे का याचा आम्ही शोध घेतला. परंतु काही मिळाले नाही. परत फिरणार इतक्यात मंदिराकडून त्या निरव शांततेचा भंग करणारा घंटेचा टोल निनादला आणि आम्ही अक्षरशः आश्चर्याने चमकलो. पुढे घाईघाईने महाद्वारात प्रवेश केला तर रघुनाथराव दिसले. श्रीमहाराज पंचा नेसलेले. स्नान केल्यामुळे ओलेत्यात होते. हातात पाण्याने भरलेला तांब्या होता.

आम्हा तिघांना हा विस्मयांचा धक्काच होता. मंदिराकडे येणारा रस्ता एकच. आम्ही आलो तेव्हा कोणी म्हणता कोणीच नव्हते. आम्हाला नंतर कळले की, पहाटे ४ पूर्वी कोणीही घाटाकडे फिरकायचे नसते. आम्ही चक्रावलो होतो. पहाटेपासून तेथे येऊन श्रींची वाट पाहाणे हे एक स्वप्नच होते का? पण या सर्व प्रयत्नात आम्ही तिघे सहभागी होतो. महाद्वारापासून नदीकडे जाणारा रस्ता शोधण्यास आम्ही काही फार दूर गेलो नव्हतो. मग एवढ्या अवधीत हे सर्व ब्रह्मवृंद आले कोठून? श्रीमहाराज घाटावर गेले कोठून? दत्तप्रभुंच्या पादुका मंदिराचे महाद्वार उघडून श्रीरामशास्त्रींच्या गोड उच्च स्वरांतून काकड आरतीही सुरू होत आहे. आमचे देवाधीदेव हाती जलकलश घेऊन आग्नेय कोपऱ्यात उभे आहेत.

काकड आरती झाली. श्रीमहाराजांनी कृष्णेचे पाणी श्रींच्या रम्य पादुकांवर घातले व तीर्थ कलशात घेतले. श्री महाराज मंदिराबाहेर येऊन उजवी घालून मागील ओवरीकडे आले. आम्ही श्रीमहाराजांना लांबूनच भावपूर्ण वंदन केले. श्रीमहाराजांनी कलशातील तीर्थ पुढे केले. श्रींच्या हातून तीर्थ घेऊन आम्ही धन्य झालो.

कन्यागत पर्व आज दि. २६.९.१९८०

श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या पालखी बरोबर संपूर्ण नरसोबावाडीत ग्राम प्रदक्षिणा!!! रस्तोरस्ती सडासंमार्जन करून सुंदर सुंदर रांगोळ्या घातल्या होत्या. तोरणे पताका लावून सर्वत्र रोषणाई केली होती. जागोजागी सुगंधीत उदबत्यांचा सुगंध दरवळत होता. महाद्वारा पुढील रस्त्यावर सजविलेले चार शुभ्र घोडे, त्यावर शुभ्रवस्त्रांकित लालपट्टा आणि लाल पगड्या घातलेले घोडेस्वार, बँडपथक, लेझिम, झांज पथक, भजनी मंडळ, भगिनी मंडळ असे सर्व सज्ज होते. फटाक्यांची आतषबाजी झाली. शंख निनादले. ''अनंतकोटी ब्रह्मांडनायक...'' ललकारी झाली. सर्व वाद्ये वाजू लागली. वाजंत्री वाजू लागली. सकाळी ११.३० वाजता पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला. रस्त्यावर खूप गर्दी होती. श्रीमहाराज श्रीगुरुमहाराजांच्या 'गुरुनिवासच्या' चौथऱ्यावर उभे होते. गर्दीचा श्रीमहाराजांना त्रास होऊ नये म्हणून गुरुबंधू त्यांच्या अवतीभोवती उभे होते. श्रीमहाराजांचे लक्ष पालखीकडे होते. आम्ही तिघे त्यांच्या जवळच उभे होतो. पालखी मंद गतीने हळूहळू पुढे सरकत श्रीगुरुनिवासासमोर येऊन उभी राहिली. श्री महाराज गुरु भक्तांचे कडे तोडून कधी त्या जनसागरात घुसले ते कळलेच नाही. त्यांना एक प्रकारची वीरश्रीच संचारली होती. ते पालखीपुढे जाऊन त्यांनी केव्हा पालखीचा प्रमुख दांडा खांद्यावर घेतला ते कळलेच नाही. श्रीमहाराज नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचे भोई झाले. पालखी हळूहळू पुढे चालली होती. श्री. गोडसे यांनी ती सर्व क्षणचित्रे आपल्या कॅमेऱ्यात साठवून घेतली. आजही ती स्मरणचित्रे पाहून, त्या पुण्यस्मृती पुन्हा पुन्हा हृत्पटलावर उमटत आहेत.

ही स्वामी महाराजांची पालखी संपूर्ण वाडीग्रामात मिरवणुकीसह सात तास सतत फिरत होती. कृष्णानदी तीरावर भव्य मंडप उभारला होता, तेथे येऊन ती विसावली. स्वारीने नदीस्नानाची वस्त्रे परिधान केली. नदीच्या पात्रात उतरून श्री पाण्यात बुडी मारणार, स्वारी जेव्हा पाण्यात प्रवेश करील त्याचक्षणी कृष्णानदीचे पाणी परम पवित्र होईल. त्याचवेळी आपणही नदीत बुडी मारावी व श्रींच्या अंगावरील पाण्याचा स्पर्श होऊन पवित्र व्हावे. ह्यासाठी असंख्य भाविक सज्ज होते. बिगूल वाजले, तोफेचा ध्वनी आकाशी गरजला - 'अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त' म्हणत स्वारी प्रवेश करताच, धडाधड नदीत उड्या मारल्या. आम्हीही त्या दृश्याने, त्या स्नानाने श्रीमहाराजांचे सहवासात पवित्र झालो.

स्नानानंतर स्वारींना मंडपात आणून ब्रह्मवृंदाच्या मंत्र घोषात पूजा संपन्न झाली. नंतर सर्व उंची वस्त्रे अलंकार स्वारींचे अंगावर परिधान करून सजविण्यात आले. स्वारी पालखीत स्थानापन्न होऊन परतीचे प्रवासास सिद्ध झाली. मंदिरात आपले स्थानी स्थानापन्न होताच मिरवणुकीची समाप्ती होऊन महानैवेद्य व प्रसाद भोजनाची सिद्धता झाली.

सायंकाळी आम्ही उतरलो होतो त्या श्रीगोविंद भटांचे घरी आलो. श्रीनृसिंहवाडी मध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे येथील श्रीदत्तप्रभुंचे पुजारी हे नुसते पुजारी नाहीत तर ते श्री प्रभुंचे भक्त, श्रद्धापूर्ण भक्त आहेत.

श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज साक्षात येथे जागृत आहेत व आपले प्रत्येक कृत्य ते न्याहाळीत आहेत. त्यांच्याकडून असे कळले की त्यांच्या हातून काही प्रमाद झाला तर प्रभू त्यांना समज देतात. त्याचबरोबर त्या पुजारी भक्तांचे सर्व क्षेम कुशल प्रभू सांभाळत असतात. रात्री एकदा धुपार्ती पालखीच्या तीन प्रदक्षिणा होऊन शेजारती झाली की कोणीही मंदिरासमीप शांततेचा भंग करीत नाही. कारण श्री निद्रा घेत आहेत. पहाटे ४ पूर्वी कोणीही घाटावर जात नाही. कारण प्रभुंना त्रास होऊ नये. पहाटे ५ वाजता काकडा होतो.

खालच्या स्वयंपाक घरातून काही गोड संवाद ऐकू येत आहे. चला आपण कान देऊन ऐकू या. एक मुलगी आपल्या आईला म्हणत आहे. 'आई! आज परतताना स्वारींचा चेहरा पाहिलास? किती म्लान झाला होता. किती थकलेली वाटत होती स्वारी?'

''अगं! म्लान होईल नाहीतर काय? पहाटेपासून सतत भाविकांची गर्दी. सात तास उन्हातान्हातून गावभर प्रदक्षिणा . ती वाद्ये, तो गजर, तो अफाट जनसमुदाय. अनेकांकडे पहायचे, त्यांची दु:खे निवारायची. ही काही साधी गोष्ट नाही?'' आबालवृद्धांचा हा भाव पाहून मन भारावून गेले. दुसरे दिवशी सकाळी आम्हा तिघांना श्रीगुरुदेवांच्या समवेत स्नानाचा लाभ झाला. आम्ही त्यांचे सोबत नदीकाठी आलो. श्रीमहाराज वरल्या भागात स्नानास उतरले. त्यांचेकडील वाहते जल आमचे अंगावर येईल अशा रितीने आम्ही पाण्यात उतरलो. श्रीमहाराजांनी आमचे अंगावर स्वहस्ते जल शिंपडले. कन्यागत पर्वात हा लाभ म्हणजे कपिला षष्ठीचा योगच म्हणावा लागेल.

२७.९.१९८० - सायंकाळी पाचचे सुमारास आम्ही मंदिरात आलो. श्री.प.प. श्रीनारायणस्वामींचे कट्ट्यावर श्रीमहाराजांचे दर्शन झाले.

सगुण साकार कैवल्याचे धाम।
ते रुप देखियले म्यां कृष्णातीरी।।
शांत तदाकार सदा ब्रह्मलीन।
ते रुप देखियले म्यां कृष्णातीरी।।

वात्सल्यस्वरुप स्वानंद निमग्न।
ते रुप देखियले म्यां कृष्णातीरी।।

आम्ही श्रीमहाराजांचे समोर खाली बसलो. आमची विचारपूस करून निघण्याची चौकशी करून सातचे सुमारास प.प. श्रीनारायणस्वामींचे ओवरीत जेथे उत्सवमूर्ती ठेवलेली असते तेथे श्रीमहाराज गेले. एखाद्या व्यक्तीशी बोलावे तसे श्रीमहाराज उत्सव मूर्तींशी बोलत होते. आम्ही पंचप्राण कानात घालून श्रींचे बोलणे ऐकू लागलो व उत्सव मुर्तीला न्याहाळू लागलो. जसे मोठे महाराज त्यांच्या श्रीदत्त मूर्तीशी बोलत तसेच श्रीमहाराज उत्सवमुर्तीशी बोलत होते.

''जगताचे उद्धाराकरिता आपला अवतार झाला. त्यानुसार अफाट कार्य आपलेकडून घडले आहे. आज श्रीगुरुचरित्रात ज्या काही कथा व आपले कार्य त्यातून घडले आहे तेवढीच माहिती आमचे पुढे आहे. अलीकडील काळात श्री.प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांकडून सिद्धग्रंथांचे अफाट लेखन आपण करवून घेतले. सर्व वाङमय आपल्या अवतार कार्यापासूनचे उपलब्ध नाही. ग्रंथातून भक्त भाविकांकरीता आचार धर्माचे खूप मार्गदर्शन, नियम सांगितले आहेत. सांप्रत स्थितीमध्ये सारेच नियम व आचारधर्म सांभाळणे सर्वच भाविक भक्तांना, साधना करणाऱ्या साधकांना शक्य होत नाही. सांप्रत युगातील सामाजिक जीवनाचे जे वातावरण आहे ते तेवढेसे पूरक अनुसरणीय ठरावे असे नाही. तरी श्रीप्रभुंनी अशा भक्त भाविक आणि साधकांचे बाबतीत क्षमाशील औदार्य ठेवावे ही श्रीचरणी आमची प्रार्थना आहे. आपल्या अवतार कार्यात जे काही चरित्र घडले, त्यात जे जे प्रसंग नामधारकांनी वर्णिले आहेत त्यातून कितीतरी बोध घेण्यासारखे प्रसंग आहेत. प्रत्येक कथानक काहीतरी शिकवून जाते. योग्य काय अयोग्य काय, न्याय्य कोणते, असे निर्णय घेण्यास भक्त-साधक, चरित्राच्या सतत पारायणाने विवेक संपन्न होतो. जशी पारायणे करावी तशी अधिक अधिक ज्ञान संपदेची उकल होत जाते.''

यानंतर श्रीमहाराजांनी श्रीदत्तप्रभुंना खूप खूप स्तुतीसुमने वाहिली. तेजाने जणू तेजाची ओवाळणी आम्हां भाग्यवंतांना पाहायला व ऐकायला मिळाली.

प्रवचनातून श्रीमहाराज निरहंकारी कसे राहावे, अमानित्व अंगी कसे असावे याचे अनेक दाखले देत आहेत. परंतु श्रीमहाराज स्वत:च अत्यंत विनयशील, नम्र, अमानित्वाचा साक्षात अवतारच म्हणावे लागेल.

विद्याविनयोपेता हरति न चेतांसि कस्य मुनिजनस्य।
कांचन मणी संयोगे न जनयति कस्य लोचनानंदम्।।

२७) श्री महाराजांच्या आगमनास गुरुभक्त यजमानांची परवानगी

श्रीगुरुमहाराजांकडून दीक्षा प्राप्त झाल्यानंतर वर्षाचे आत शक्य झाल्यास आपल्या दीक्षा दात्या गुरुंना घरी बोलावून पाद्यपूजा करावी. श्रीमहाराज पूजेस येताना श्रीवासुदेव निवासातील चांदीच्या दत्तपादुका सोबत आणतात.

लवकरच कळले की २०.१०.१९८० पासून ठाणे येथे ब्राह्मण सभा कार्यालयात श्रीगुरुचरित्र सप्ताह एका गुरुभक्ताने आयोजित केला आहे. २०.१०.१९८० पासून ७-८ दिवस श्रींचा मुक्काम तेथेच आहे. श्रीमहाराजांचे प्रवचन रोज सायंकाळी होणार आहे. मग दुपारपर्यंतच्या वेळात श्रीमहाराजांना आपल्या गाडीने गोरेगावी आणता येईल व वेळेवर ब्राह्मण सभेत पोहोचवता येईल.

श्रीमहाराजांना येण्यासाठी व पाद्यपूजा संकल्प पूर्ण करून घेण्याची प्रार्थना करण्यासाठी मी व श्री. गोडसे पुण्यास १२.१०.१९८० रोजी सकाळी १० वाजता त्यांचे घरी शनिवार पेठेत गेलो. नवरात्रीचे दिवस होते. श्रीमहाराजांनी दुर्गा सप्तशतीच्या पाठास सुरुवात केली. आम्ही आलो हे कळताच त्यांनी आम्हांला आत पाठवण्यास सांगितले. हात, पाय धुवून आम्ही श्रीमहाराजांच्या देवघरात गेलो. औपचारिक क्षेम कुशल विचारले. मी खास येण्याचे कारण सांगितले व माझी इच्छा प्रगट केली. त्यावर श्रीमहाराज म्हणाले, "तुम्ही असे करा, आपले जगन्नाथ पुजारी आहेत ना? त्यांच्याकडे जा व त्यांना दि. २०.१०.१९८० ते २७.१०.१९८० पर्यंत कोणता दिवस ठरवावा ते विचारा. ते पंचांग पाहून दिवस सांगतील. पुजेचे साहित्य, तयारी काय ठरवायचे ते सांगतील. नंतर येथून मुंबईस जाताना ठाण्यास उतरून तेथील गुरुभक्तांना विचारून नक्की करा. पुजारींचे घर कोठे आहे ते माहिती आहे ना?

श्री. गोडसे म्हणाले होय. मला माहिती आहे.

श्री - या त्यांच्याकडे जाऊन या. पुन्हा येथेच या. आपल्या येथे प्रसाद भोजन घेतल्याशिवाय जाऊ नका. आम्ही तुमची वाट पाहात आहोत.

श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार करून आम्ही दोघे पुजारींच्या घरी गेलो. ते घरीच होते. आम्ही श्रींचा निरोप सांगितला. त्यांनी पंचांग पाहून दि. २४.१०.१९८० सकाळची १०.३० ची वेळ नक्की केली. पूजा साहित्याची समग्र यादी दिली. शिवाय एक धोरणी सल्लाही दिला. तो असा - "तुम्ही मुंबईस जाताना ठाण्यास उतरुन त्या गुरुभक्तांकडे जाऊन त्यांच्याकडे श्रीमहाराज येण्याचे नक्की झाले आहे ते सांगा. श्रीमहाराजांना नेण्यास येऊ व सायंकाळी प्रवचनाच्या १ तास आधी ठाण्यास पोहोचवू असेही सांगा."

गुरुजींचा सल्ला मार्गदर्शन घेऊन आम्ही श्रींचे घरी आलो. सर्व ब्राह्मण मंडळी आमची वाट पाहात मागे थांबली होती. पहिली पंगत झाल्यानंतर श्रीमहाराजांनी आम्हाला बसण्यास सांगितले. अहो, काय थाट! आम्हाला चांदीची ताटे, वाट्या, पेले, ताटाभोवती रांगोळीची

महिरप, पुढे उदबत्ती! आम्हाला संकोच वाटू लागला. श्रीमहाराज त्याच खोलीच्या दारात उभे राहून आम्हास पाटावर बसण्यास विनवीत होते. जेवण होईपर्यंत श्रींच्या दोन तीन फेऱ्या झाल्या. ''सावकाश होऊ द्या. संकोच करू नका. पोटभर जेवा. अरे, यांना पुरणपोळ्या वाढा. तूप घाला. स्वस्थ होऊ द्या बरं!''

आमचे भोजन होऊन हात धुवून होताच नॅपकीन कोणीतरी पुढे केला. आतून श्रीमहाराजांनी विचारणा केली. 'विडा दिला का दोघांना?'

आम्ही श्रीमहाराजांचे खोलीत गेलो. आत शिरताच श्रीमहाराज पुजेच्या पाटावर बसले होते. आम्ही वाकून नमस्कार केला. आम्हाला कॉटवर बसण्यास आग्रह करीत होते. आम्ही खाली बसलो.

'काय, पुजाऱ्यांनी दिवस पाहिला का पंचांगात? आता मुंबईस जाताना ठाण्यास उतरणार ना? ठाण्यास त्या गुरुभक्तांकडे जाऊन ठरलेला कार्यक्रम निवेदन करा. परंतु आम्ही येण्याचे नक्की आहे हे कळू देऊ नका. ठरलेल्या वेळी त्यांना आम्हांस तुमच्याकडे पाठवण्याची परवानगी मागा आणि नंतरच पुढील कार्यक्रम नक्की करा.

आम्ही दोघे श्रींचा निरोप घेऊन मुंबईस निघालो. मी सोबत आणलेले श्रीहरिहरेश्वर माहात्म्य श्रीमहाराजांना अर्पण केले. ब्राह्मण सभेत श्रीगुरुचरित्र सप्ताहात महाराज किती तारखेस येणार तेही त्यांनी सांगितले व म्हणाले, ''त्या ब्राह्मण सभेच्या हॉलच्या वरच्या मजल्यावर खोल्या आहेत तेथे आमची राहण्याची सोय केली आहे. तेथेच आम्ही सात दिवस राहणार आहोत.'

आम्ही श्रीमहाराजांना रोज निरुपण ऐकण्यास येण्याची इच्छा बोलून दाखविली. 'श्री' म्हणाले, ''तुम्हालाही रात्री तेथे राहायला हरकत नाही. झोपण्याची सोय आहे, तरी या.''

मुंबईस दादर येथे जाताना आम्ही दोघे ठाण्यास उतरुन त्या गुरुभक्तांकडे गेलो. सर्व वृत्तांत सांगितला व महाराजांनी या तारखेस सकाळी ९ ते सायं. ५ पर्यंत तुम्ही त्यांना आमचेकडे येण्यास परवानगी द्याल का ते विचारले आहे व सांगितले की आपले नक्की असेल तरच तुमचा पाद्यपूजेचा कार्यक्रम नक्की समजा.

हे ऐकून ते गुरुभक्त सद्‌गदीत झाले. त्यांचे डोळ्यात पाणी तरारले व म्हणाले, 'आपण महाराज व आम्ही पामर! आपली आज्ञा आम्हाला शिरसावंद्य. आपण आज्ञा करायची व ती आम्ही पाळायची. आमची अनुमती कसची मागता?'

श्रीगुरुचरित्रावर निरुपण रोज सायंकाळी आहे. सकाळी ९.३० ते सायं. ४.३० श्रीमहाराज निवांत आहेत. ह्या वेळांत त्यांना नेऊन सायं. ५ पर्यंत परत आणले तरी काहीच हरकत नाही. आम्ही त्या गुरुभक्तांचा निरोप घेऊन घरी परतलो.

२८) 'श्रीं'ची पाद्यपूजा

श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः

दि. २०.१०.१९८० ब्राह्मण सभा ठाणे, येथे प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांची याच दिवशी सुरू केलेल्या गुरुचरित्र पारायणावर प्रवचनेही सुरू झाली. दर दिवशी दि. २० ते २६.१०.१९८० पर्यंत रोज सायंकाळी ५.३० ते ७.३० प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. दि. २४.१०.१९८० शुक्रवारी प.पू. महाराजांना गोरेगांव येथे घरी आणून पाद्यपूजा संपन्न होण्याचा समारंभही निश्चित झाला. प.पू. महाराजांना आणण्यास मी व संजय (पुतण्या) सकाळी ८.३० ला ठाण्यास जाऊन ९ वाजता तेथून निघून ३९/७, 'अभिषेक', जयप्रकाश नगर, गोरेगांव, ३ रा रस्ता येथे आगमन होण्याचे ठरले व सायंकाळी ५ वाजेपर्यंत प.पू. महाराजांना ठाणे येथे ब्राह्मण सभागृहात पोहोचविण्याचे ठरले.

आदल्या दिवशी आम्ही आमचा संपूर्ण ब्लॉक झाडून, धुवून स्वच्छ करून घेतला. पूर्वेकडे तोंड करून श्रींची सोफ्यावर बैठक तयार केली. बैठकी भोवती फुलांच्या माळांनी मखर तयार केले. लोकरीची वस्त्रे अंथरली. हॉलमध्ये रोषणाई केली. मंगलवाद्यांची कॅसेट तयार ठेवली. गोमूत्र-पाणी शिंपून आसमंत पवित्र केला. धूप उदबत्ती सुगंधाची दरवळ केली. सोवळ्यातील दोन आचारी हे पाकनिष्पत्ती करण्यास ठेवले होते. सर्व गुरुबंधुंस आमंत्रणे केली होती. सर्व जय्यत तयारी पहाटे पाच वाजल्यापासून करून मी व संजय गाडी घेऊन ठाण्यास ७.३० वाजता निघालो. ८.३० ला ब्राह्मण सभेत पोहोचलो. संध्यादी आन्हिक आटपून प.पू. महाराज तयारीतच होते. आम्ही प.पू. महाराज, श्री जगन्नाथ पुजारी व श्री दत्तप्रभुंच्या पादुकांसह ९ वाजता निघालो. आरे कॉलनी मार्गे प.पू. महाराजांना घेऊन आलो. गुरुबंधू आले होतेच. स्वागताची तयारी सौ. लता व समस्त गुरुबंधूंनी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे जय्यत ठेवली होती. सकाळी दहाचे सुमारास प.पू. महाराजांची गाडी 'अभिषेकचे' फाटकात शिरली. गाडीपासून पहिल्या मजल्याच्या पायऱ्या चढून जाईपर्यंत पायघड्या घातल्या होत्या. प.पू. महाराज पुढे सरकत जातील त्या त्याप्रमाणे गुरुबंधू पुष्प दलांची पखरण करीत होते. मुखाने 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा जयघोष सुरू होता. मी लगबगीने वर जाऊन प्रमुखद्वारी श्रींच्या सत्कारास सज्ज झालो. प.पू. महाराज पायघड्यांवरून पाटावर उभे राहिले. सौ. लताने समशीतोष्ण केशर मिश्रीत दुधाने पाय धुतले, नंतर आम्ही मऊ वस्त्राने चरण पुसले. श्रींना गंध अक्षदा हळद कुंकूम तिलक हार घालून सौ. लताने औक्षण केले. श्रींना घरात प्रवेश करण्यास विनंती करून हातास धरून मखरांतील बैठकीवर नेले. श्री स्थानापन्न झाले. नंतर नऊवारींतील पाच सौभाग्यवतींनी औक्षण करून ओवाळले. प्रत्येकीस प.पू. महाराज एक रुपयाची ओवाळणी घालीत होते. सर्व भक्तांची दर्शनास रांग लागली. सर्वांचे

दर्शन घेणे झाल्यानंतर 'श्रीं'नी दूध व फलाहार घेतला. तसेच समस्त भक्तांनाही दूध व फलाहार देण्यात आला. श्री जगन्नाथ पुजारी हातपाय धुवून येऊन 'श्रीं'चे समोर पादुकास्थापने करता चौरंग सजवू लागले. पादुका स्थानापन्न करताच 'श्रीं'सह समस्त भक्त गुरुबंधू उभे राहिले. श्री पादुकांसमोर पाटावर बसले. पादुकांकडे व 'श्रीं'चे समोर मुख करून, मी सौभाग्यवतींसह प.पू. महाराजांचे आज्ञेने स्थानापन्न होण्यास आलो. श्रींना, पुजाऱ्यांना, समस्त गुरुबंधू भक्त मंडळींना आणि तीर्थरुप मातोश्रींना साष्टांग नमस्कार करून आम्ही स्थानापन्न झालो. षोडशोपचारे पूजन करून घेतले. विविध फुलांनी पादुका-चौरंग सजवला. पूजा पूर्ण होताच प.पू. महाराजांचे पूजन यथाविधी करून त्यांचे चरणी सुवर्ण, वस्त्र, शाल, श्रीफळ, दक्षिणा अर्पण करून आदर-सत्कार केला. तसेच पुजाऱ्यांचेही यथाशास्त्र यथाविधी पूजन केले. प.पू. महाराजांच्या पंक्तीचा लाभ अनुग्रहीत सर्व गुरुबंधूंना झाला. भोजनोत्तर 'श्रीं'ची तास दीड तास विश्रांती झाली. विश्रांतीनंतर श्रीमती नीलाताई जोशींची कन्या आशाताई गोरेगावातच रहात होत्या. त्या येऊन प.पू. महाराजांना जाताजाता त्यांचे घरी येण्यास विनवू लागल्या. प.पू. महाराजांनी यजमान म्हणून आम्हांस हाक मारली व म्हणाले, ''आपली परवानगी असेल तर जाता जाता त्या फडके ताईंकडे जाऊ.'' मला अतिशय शरमल्यासारखे झाले. मी त्या विनम्रतेस साष्टांग नमस्कार केला व म्हटले, ''आज्ञा शिरसावंद्य महाराज!''

सर्वांचा निरोप घेऊन प.पू. महाराज सायं. ४ वाजता निघाले. मी व संजय प.पू. महाराजांना प्रथम गोरेगावातच सौ. फडके ताईंकडे व तेथून ठाण्यास ब्राह्मण सभागृहात घेऊन गेलो. तेथील प्रवचन ५.३० ते ७.३० पर्यंत श्रवण करून गोरेगावी परतलो.

आज आपले घरी 'देव दीनाघरी विसावला,' हाच भाव हृदयात दाटून येत होता. साक्षात् दत्तप्रभू माझ्या घरी आले. भोजन स्वीकारले, पुन्हा जाताना विचारताहेत, ''काय! सर्व मनासारखे झाले ना?''

धन्य आम्ही, धन्य तो क्षण, धन्य तो दिवस. 'श्रीं'चा सहवास आम्हा सर्व गुरुबंधूंस प्राप्त झाला.

''अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त!''

२९) 'श्रीं'चे आगमन हरिहरेश्वरी व्हावे म्हणून अनुष्ठाने

दि. ३१.५.१९८० शनिवार सायंकाळी ५ ते ७ च्या दरम्यान डोंबिवली येथे आम्हा सर्व गुरुबंधूंची श्री. प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सभा झाली. विषय होता प.पू. ब्रह्मर्षी सद्गुरु दत्तमहाराजांनी स्वतःहून ''आम्हास आपले हरिहरेश्वर क्षेत्रग्रामी यायचे आहे!'' असे

म्हणावे म्हणून सर्व गुरुबंधूंनी अनुष्ठान करायचे! हे मागे सांगितले. त्या दिवशी सभेतच सर्व गुरुबंधुंचा संकल्प सुटला. प्रत्येकाने उद्या दि. १.६.१९८० पासून स्नान संध्या होताच सकाळी किंवा संध्याकाळी संकल्पाचा पुन:रुच्चार करून ११ वेळा श्रीपाद श्रीवल्लभ त्वम् सदैव.... चे ११ पाठ व ''भूत प्रेत पिशाचाद्या''चे १२ पाठ नित्यनियमीत देवापुढे बसून करायचे ठरले. सर्व गुरुबंधूंची अगदी मनापासून सातत्याने अनुष्ठाने सुरू झाली.

त्यानंतर कितीतरी वेळा प.पू. महाराजांच्या दर्शनाचा योग आला.

१) दि. २४.७.१९८० ला गिरगांवात श्रीमती नीलाताई जोशी यांचे घरी.

२) दि.२७.७.१९८० ला गुरुपौर्णिमा श्री वासुदेव निवासात.

३) दि. २५.९.१९८० ला श्री नरसोबावाडी येथे सतत ३ दिवस २८.९.१९८० पर्यंत.

४) दि. १२.१०.१९८० ला श्री. गोडसे यांच्या सोबत गोरेगांवी पाद्यपूजा संपन्न होण्यास.

५) दि. २०.१०.१९८० ला ठाणे ब्राह्मणसभेत श्रीगुरुचरित्र पारायण.

६) दि. २४.१०.१९८० ला गोरेगावी पाद्यपूजा व दि. २५.१०.१९८० ला कल्याण-डोंबिवली.

७) दि. २५.११.१९८० ते ६.१२.१९८० या अवधीत श्री. तांबोळी यांच्याकडे 'श्रीभागवत सप्ताहात.'

८) दि. १४.१२.१९८० ला मुंबईकर साधक गुरुबंधुंसाठी श्रींचे समोर बैठक.

३०) 'श्रीं'ची हरिहरेश्वर कार्यक्रमास अनुमती

परंतु एवढ्या सर्व भेटीगाठीत श्रींनी स्वत:हून हरिहरेश्वरी जाण्याचा विषयच काढला नाही. तो भाग्याचा दिवस ३१.१.१९८१ हा उजाडला. संध्याकाळी मी, गोडसे, जोशी व प्रभुदेसाई डेक्कन क्वीनने पुण्यास गेलो. प्रथम आश्रमात जाऊन रात्री श्रींचे घरी गेलो. प.प. नारायणस्वामींच्या पुण्यतिथी सप्ताहास प.पू. महाराज सालाबाद नियमाने नरसोबावाडीस जात असत. सात दिवस स्वामींचे जीवनावर प्रवचने होती. चैत्री अमावस्या हा प.प. नारायणस्वामींचा समाधी दिन! यावर्षी प.पू. महाराजांसोबत जाण्याचा आमचा मानस होता. प.पू. महाराजांची अनुमती मिळावी या उद्देशाने आम्ही सर्व दर्शनास आलो होतो. अनुमती मिळालीच तर लागलीच या दिवसात कोणती अनुष्ठाने उपासना करावी, महापूजा करावी का? असे अनेक प्रश्न आम्ही घेऊन गेलो होतो. प.पू. महाराजांनी आमची मनापासूनची येण्याची व काही सत्संकल्प अनुष्ठान-साधनेची तयारी जाणून पूर्ण अनुमोदन दिले. महापूजाही करण्यास सांगितली. नंतरच्या सामोपचाराच्या गप्पागोष्टी होत असतानाच प.पू. महाराज माझ्याकडे पाहून म्हणाले,

''आपण दिलेले श्री हरिहरेश्वर महात्म्य आमचे बहुतेक वाचून झाले आहे! हे श्री हरिहरेश्वराचे मंदिर समुद्रकाठीच आहे का?''

मी :- होय महाराज!

''अरे वा! मग देवदर्शनाबरोबर आम्हास समुद्रस्नानही घडेल! तेव्हा वैशाखात आपण जाऊया हरिहरेश्वरी! बघा तुमच्या सोयी सवडीने कसे जमते ते!''

मी, ''बरं बरं!'' म्हणत उभा राहिलो आणि श्रींचे पुढे साष्टांग नमस्कार घातला. आनंद सागराला भरती आली. ओथंबून सागर वाहू लागला! प.पू. महाराजांची वाक्ये ब्रह्मानंद स्वर्गसुख देऊन गेली. शिवाय हे सर्व श्री. प्रभुदेसाईंचे समोर त्यांचे उपस्थितीत घडत होते.

''माझे गुरुदेव माझे घरी यावेत. त्यांचा देवदेवतांस दुर्लभ असा सत्संग आपणास व आपल्याबरोबर समस्त गुरुबंधुंस मिळावा!'' मनात ज्या ''परम-अर्थ'' प्राप्तीची मी प्रतीक्षा करीत होतो तो परम-अर्थ, परमार्थ आज माझ्या समस्त गुरुबंधूंच्या अखंड अनुष्ठानाने सत् संकल्पाने सदिच्छेने मला प्राप्त होणार होता. क्षणैक असे वाटले की प्रत्येक गुरुबंधूंचे घरी जावे. त्यांना कडकडून भेटावे आणि प्रत्येकास म्हणावे, ''ही परमार्थाची प्राप्ती तुमच्या संकल्पाची, अनुष्ठानांची आणि सदिच्छेची!''

मी आनंद लहरीत यथेच्छ तरंगत होतो. माझ्या आयुष्यातील तो परमोच्च आनंदाचा क्षण होता. यानंतर जेव्हा श्रींचे सोबत मी हरेश्वरचा प्रवास प्रारंभ करीन, हरेश्वर घरी श्रींचे स्वागत करीन, त्या त्यावेळी माझी अवस्था काय असेल? छे! शब्दाने वर्णन करण्यास अगदीच अशक्य!

सर्व गुरुबंधुंना जेव्हा आपआपल्या अनुष्ठानाची फलश्रुती कळली तेव्हा तर अथांग सागराला श्रींच्या स्निग्ध प्रकाशात भरती आली. खरोखरच आम्हा एकमेकांना आनंद कसा प्रकट करावा हे, डोंबिवलीच्या त्या दिवसाच्या पुनर्भेटीत कळत नव्हते.

श्री. प्रभुदेसाई म्हणाले, ''आता तुम्ही प.पू. महाराजांना पत्र लिहा.'' त्यात म्हणा की, मुंबईचे गुरुबंधू सत्संग साधनेस हरेश्वरी येणार आहेत. आपण हरेश्वरी पोहोचण्याची निश्चित तारीख कळविलीत तर सर्वांना ऑफिसात रजा घेणे व एस.टी.चे रिझर्व्हेशन करणे सोईचे होईल.''

प.पू. महाराज देऊळगांवराजा येथे गेले होते. श्रींना पत्र पाठविले. लागलीच उत्तर आले. ''आम्ही देऊळगावराजाहून दि. ८.४.१९८१ रोजी किनगाव जट्टू या एस्.टी. गाडीने निघून दि. ९.४.१९८१ रोजी पहाटे किंवा सकाळपर्यंत माटुंगा किंग्जसर्कल या स्थानकावर येत आहोत. आपण आम्हास उतरवून घेण्यास यावे.''

मार्च १९८१ महिन्यात प.पू. महाराजांच्या आगमनाची तयारी करण्याकरीता हरिहरेश्वरी

माझ्या चार खेपा झाल्या. १-२ वेळा गोडसे व काही गुरुबंधू सोबत होते.

पहिल्या खेपेत घराचे आसपास घरास लागून असलेली मोठमोठी लाकडे व इतर सामान स्वतंत्र खोप (गोडाऊन) करून घरापासून लांब हलविले. घराच्या चारही बाजूस घरापासून ३० फूटाचा आसमंत मोकळा केला. चारही बाजूस प्रशस्त अंगणे झाली. घराच्या पूर्वेकडे व पश्चिमेकडे मांडव घालण्याची आखणी व सर्व सामानाची गडी माणसांना तरतूद करून दिली. घराच्या आतील जमीनी नवीन मुरुम अंथरून करून घेण्याचे ठरवून कामही सुरू करून घेतले. आधीची जमीन खणून काढली. नवी जमीन गुळगुळीत करून सारवण घालणे, चार अंगणांतील जमीनी खणून नवा मुरुम अंथरून चोपणे, धोपटणे, शेणाचे खळे करणे याकरीता गावची माहीतगार मजूर मंडळी जमविली. त्यांना लागणारे साहित्य देऊन कामास प्रारंभ केला. कारण एकच महिना बाकी आहे. जमीनी करून ओल गेली पाहिजे. माझ्या सद्गुरुंना कोठेही पायास टोचेल किंवा खडबडीत लागेल असे राहू नये. या चार दिवसात जमीन खणून झाली. मुरुमाच्या गाड्याही आल्या. सोबत आलेले गुरुंबंधू सर्व अडगळ सामान हलविण्यास, मुरुम घमेल्यात भरून सर्वत्र पसरविण्यास जातीने कामास लागले होते. सद्गुरुच सर्व प्रेरणा देत असतात. श्रीगुरुमहाराजांचे आगमन याठिकाणी होणार ही कल्पनाच अंत:करणात सात्विकभाव, भक्तीभाव वाढवीत होती. ''त्वयि भक्तिं मे वर्धय।'' .... 'धर्मे प्रितीं .... सन्मतीम् देवभक्तिम्। सत्संगाप्तींम् देही भुक्तिंच मुक्तिं। भावासक्तिं चाखिलानंद मूर्ते।'' स्वामी महाराजांच्या या उक्तीप्रमाणे सर्वसहज प्राप्त होत होते. घरातील छपराकडे लक्ष गेले. सर्व कौले शाकारणी करून घेतली. आमच्या कोकणात या कौलातून कधी विंचू, पाली खाली पडतात. एखादे छोटे जनावरही पडायचे. कौले साफ झाली शिवाय प.पू. महाराजांचा पलंग ज्या खोलीत होता व जेथे श्रींचे वास्तव्य होणार होते त्या खोलीवर सुताराकडून फळ्यांचे आच्छादन करून घेतले. श्रींचे आगमन वसंत ऋतुत असले तरी वैशाखात उष्मा असतो. श्रींना फॅनचा वारा सोसत नाही. फळ्यांचे सिलींगमुळे कौलांची झळ खाली येणार नाही. या शिवाय कौले तापू नयेत म्हणून त्यावर दाट गवत अंथरले.

शबरीचा भाव अंत:करणात उदीत झाला. जणू शबरीच आपादमस्तक संचारली. माझ्या पर्णकुटीत श्रीराम येणार! पर्णकुटीची जमीन, छत नवीन झालेच. भिंती धुवून रंगरंगोटी झाली. माझा राम येणार! त्या हरेश्वराच्या निसर्गरम्य परिसरात आनंदाने बेहोश होऊन मन नाचत धावत फिरत होते. लतांनो द्याल ना पुष्पे? झऱ्यांनो द्याल ना पाणी? श्रीराम येणार, माझा श्रीराम येणार! वृक्षांनो मधुर फळे द्याल ना? पक्षांनो गाणी गाल ना? वाऱ्या मंदमंद वाहशील ना? झुळके संगे सुवासिक फुलांचा परिमल माझ्या गृही आणशील ना?

आणि खरोखरच पुढील फेरीत आम्ही सर्वत्र फिरलो. गावकऱ्यांचे देवस्थानाचेही सहाय्य

हवे होते. पाणी साठविण्यास पिंपे कोणाकडे मिळतील? महिला मंडळातून भांडीकुंडी, मोठीमोठी भांडी, देवस्थानाकडून बैठका जाजमे, लाइट गेलाच तर गॅसबत्त्या, रोजची फुलपुडी व हार-गुच्छ बागेतून माळ्याकडून, रोजचे दूध कोणाकडे मिळेल? भाज्या कोणकोणत्या कुठे मिळतील? येणाऱ्या माझ्या सर्व गुरुबंधुंचीही प्रातः स्नानापासून सर्व व्यवस्था नीट व्हायला हवी. मंदिराची चौघडा, सनई मिळविणे, रोषणाईचे साहित्य मुंबईहून आणणे, इ. विचार मनात फेर धरत होते.

दुसऱ्या खेपेस गावच्या वेशीवर स्वागतपर बॅनर, ग्रामपंचायतीस अर्थसहाय्य देऊन रस्त्यांचे लाईट व 'श्रीं'चे वास्तव्यापर्यंत मुबलक पाणी व्यवस्था केली. ग्रामस्थांकडून श्रींचे स्वागत कुठे कसे करायचे, देवस्थानांकडून श्रींचे स्वागत तयारी.

आवश्यक ती सामुग्री मुंबईहून आणण्यास याद्या केल्या. प्रत्येक खेपेत काय काय न्यायचे ह्याचाही विचार झाला. शेवटची ट्रिप मुंबई ते हरेश्वर श्री शृंगारपुरे, गोडसेंसह झाली.

'श्रीं' पण परीक्षा पहात असतात. शेवटच्या ट्रीप मध्ये सर्व किंमती सामान जाणार होते. पुजेची उपकरणे, चांदीची भांडी, श्रींची शयन पलंगाची गादी, उशी, चादरी, पंचे, टॉवेल्स, शाल, साड्या, रोषणाईचे साहित्य - श्री. गोडसे यांनी तर संपूर्ण घराच्या समोरील ओटी अंगणाचा ले-आऊटच तयार केला होता. रंगीबेरंगी इलेक्ट्रीक माळा कोठे लावायच्या, स्पॉट लाइटस्, मोठे दिवे, पताका, 'साधुसंत येती घरा तो दिवाळी दसरा' कसा साजरा करूया? मांडवात, आकाश-कंदील कुठे कुठे लावायचे? ओटीवर सनई चौघडा वादक कुठे बसतील? फटाक्यांच्या माळा समोरील शेतांत लावायच्या. श्रींची गाडी मांडवात आणायची! ती चि. संजय (ड्रायव्हींगला असलेला) पुतण्या गाडी जिथे उभी करेल, तिथे पांढरा रंगाचा पट्टा! श्री पायघड्यांवर उतरतील, पायघड्या कोठून कोठपर्यंत? नंतर श्रींना उभे राहण्यास पायधुण्यास पाट, श्रींची गाडी गेटमध्ये शिरल्यापासून फोटो कोणत्या कोणत्या क्षणी, कोणत्या ठिकाणाहून, किती अंतरावरून, कोणत्या अँगलने घ्यायचे ह्या जागा सुद्धा निश्चित झाल्या. फोटोंचे काम स्वतः गोडसे व श्री. अनिल कर्णिक पहाणार होते. रंगरंगोटीची संपूर्ण जबाबदारी श्री. अनिल यांनीच घेतली होती. पायघड्या ऐनवेळी घालणे, 'श्री' पाटावर उभे राहताच इतरांचे पाय पडू नयेत म्हणून पायघड्या गुंडाळणे, पायघड्यांवरून श्री चालत येतील तेव्हा पुष्पवृष्टी करणे ही सर्व कामे गुरुबंधूंनी वाटून घेतली होती. दिगंबराची धून श्री प्रभूदेसाई सांगतील. श्रींच्या चरणावर दूधपाणी यजमानीण बाई घालतील, मऊ वस्त्राने यजमान पाय पुसतील. सर्व पादतीर्थ चांदीचे ताटात तबकात घेतले जाईल. 'श्रीं'ना हार घालून ओवाळले जाईल. 'श्री', ओठाणांत पूर्वाभिमुख अंथरलेल्या बैठकीवर स्थानापन्न होतील. मग नऊवारीतील सुवासिनी ताम्हणांत निरांजन घेऊन औक्षण करतील.

हा श्रींच्या आगमनाचा सोहळा जवळ येऊन ठेपला. तुर्भे येथील कामात माझे बरेच भांडवल गुंतले होते. आधीच्या कामांची लाखांनी येणी थकली होतीच. पण जे चालू कामाचे मोठे बिल मला मिळणार होते व ज्यावर या सर्व कार्यक्रमाची मदार होती तेच मिळायचे थांबले. श्रींच्या बरोबर सर्व गुरुबंधूसुद्धा माझे सन्माननीय आमंत्रित अतिथी देव होते. अहंकार म्हणा सात्विक अहंकार म्हणा, पण कोणाकडून काही अर्थसहाय्य घ्यायचे नाही असे ठरविले होते. संपूर्ण कार्यक्रमाचा खर्च आपणच करायचा असे मनाने ठरविले. कार्यक्रम जवळ येत चाललेला! शृंगारपुरे, गोडसे सतत मागे, "अरे सर्व मुख्य वस्तू, जिनसा केव्हा खरेदी करायच्या? याद्या व्हायच्या कधी? दिवस राहिले किती?"

मी पार्टीकडे खेटे मारतो आहे. कधी मिळणार बिलाचा चेक? पार्टी म्हणू लागली, 'आम्ही बँकेकडून लोन घेत आहोत. सँक्शन झाले आहे. रिलीज होताच आम्हीच तुम्हाला फोन करून बोलावून घेऊ. पाहिजे तर तुमच्या घरी येऊन देऊ! पण सारखे येऊ नका! तगादा लावू नका.'

एके शनिवारी भाऊसाहेब शृंगारपुरे आणि श्री. गोडसे यांनी कातावून हिय्याच केला की, येत्या शनिवारी गोरेगावी घरी बसून सर्व सामान सुमान साहित्याच्या याद्या बनवायच्या आणि रविवारी किंवा पुढील ३ दिवसात होईल तेवढी नाही तर सर्वच खरेदी करून मोकळे व्हायचे!

शनिवारी मंडळी आली. बैठकीच्या खोलींत श्रींचे तसबिरीसमोर आम्ही वह्या-चोपड्या काढून बसलो. याद्या तयार होत होत्या. हे आवश्यक आहे हे घेतलेच पाहिजे. हे मंगळवारी, हे बुधवारी घेऊ. माझ्या छातीचा ठोका चुकायचा! पण पुन्हा मन म्हणायचे श्रींचा संकल्प आहे, सर्व काही निर्विघ्न पार पडेल. सर्व याद्या पूर्ण झाल्या. काही आधी घ्यायचे, काही नंतर ते ठरले. मंगळवारी दादर येथे कुठे भेटायचे? सायंकाळचे चार वाजले होते इतक्यात कामावर सुपरव्हिजन करणारा माझा पुतण्या संजय आला. आम्ही भारतीय बैठकीवर गोलाकार बसलो होतो. माझ्यासमोर त्याने रु. ५० हजाराचा चेक टाकला. मला आश्चर्य वाटले, की हा चेक आजच अगदी ह्याचवेळी कसा आला? या पुतण्यास तो आणण्यास कोणी धाडले? आणि धाडले तरी पार्टीने त्याचे हाती तो सुपूर्त केला कसा? सारेच अनाकलनीय! ते फक्त कृपावंत सद्गुरुस आणि भाग्यवंत शिष्यासच ठाऊक!

हरिहरेश्वरचा कार्यक्रम अविस्मरणीय अप्रतिम झाला असे आज आम्ही प्रत्येक गुरुबंधू म्हणत आहोत, ही सारी गुरुदेवांची लीला आणि कृपा नव्हे काय?

जे श्री कुरवपुरी भावावस्थेत मनःचक्षुंपुढे चल चित्रपटांत पाहिले, जे बैठकीनंतर संपूर्ण लिहून काढले, जे इच्छिले, अपेक्षिले, कल्पनेतून रेखाटले तेच ते तसेच हरिहरेश्वरी घडले. वाल्मीकींचे रामायण!



३१) हरिहरेश्वरी प्रयाण

जेव्हा 'श्री' दि. ९.४.१९८१ ला सकाळी ७.४० वाजता एस्.टी. गाडीतून किंग्ज सर्कल स्टॉपवर उतरले, तेव्हा तर तेथेच श्रीचरणावर डोके ठेवून कवटाळावे असे वाटू लागले. श्रींना रघुनाथरावांसह आम्ही श्री माधवराव तांबोळी, श्रींचे द्वितीय जामात, यांच्या घरी कल्याण निवास येथे घेऊन गेलो. आदल्या दिवशी दि. ८.४.१९८१ रोजी ठरविल्याप्रमाणे पुण्यास श्रींचे घरी जाऊन श्री. गोडसे, सौ. आईसाहेब यांना सौ. सुलभाताई तांबोळींकडे घेऊन आलेच होते. दुसरे दि. १०.४.१९८० या दिवशी पहाटे माझ्या ती. मातोश्रींसह गाडी घेऊन आलो. श्री. नंदकुमार शृंगारपुरे यांच्या गाडीत ती. मातोश्री व सविता वहिनी, मंदा वहिनी, आमोद, रेणुका यांस बसवले व माझ्या गाडीत 'श्री' व सौ. आईसाहेब, रघुनाथराव, मी व ड्रायव्हींगला संजय होता. पहाटे ४.३० वाजता आम्ही 'श्रींसह' माटुंगा किंग्जसर्कल कल्याण निवासातून निघालो. अत्यानंदाने माझे हृदय भरून येऊन सतत एक तास गोवा रस्त्यास लागेपर्यंत अश्रुपात होत होता. मी काही बोलण्याचे मन:स्थितीत नव्हतो आणि 'श्री', आईसाहेब व रघुनाथराव हेही गप्पच होते. मध्यंतरी थांबून आम्ही सर्वांनी चहापान केले. 'श्रीं'करता सुकामेवा सोबत घेतला होता. नंदकुमारची ॲम्बेसेडर गाडी मोठी होती. त्यात प.पू. महाराज, सौ. आईसाहेब यांना बसविले. मीही सोबत बसलो व बाकी दुसऱ्या गाडीत बसले. हरिहरेश्वरचा डोंगर लागताच चि. संजय गाडी पुढे घेऊन गेला व समस्त गुरुबंधूंना पाच मिनिटात श्रींचे आगमन होत असल्याचे सांगितले.

दि. १०.४.१९८१ ला सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास श्रींचे सौ. आईसाहेबांसह हरेश्वरी आगमन झाले.

३२) हरिहरेश्वरचा कार्यक्रम

शुक्रवार, दि. १०.४.१९८१ - सर्व गुरुबंधू प.पू. महाराजांच्या स्वागतासाठी सज्ज होते. बंधुंनी धोतरे नेसून उपरणे घेतली होती, तर गुरुभगिनी नऊवारी साडीत होत्या. सुवासिनींनी ताम्हणात निरांजने घेऊन औक्षणाची तयारी केली होती. मांडवांत पताका तोरणे आणि आकाश कंदीलही लावले होते. रंगीबेरंगी दीपमाळा होत्या. आंब्याचे टाळे मांडवात प्रवेशद्वारावर होते. प्रवेशद्वारी ताज्या फुलांचे तोरण होते. मुख्य पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस स्त्रियांनी रांगोळी काढून सजावटीत भर घातली होती. ओटीवर उत्तर दिशेला सनई चौघडा वादक बसले होते.

'श्रीं'ची गाडी सकाळी १०.३० च्या सुमारास मांडवात ठरल्याठिकाणी येऊन उभी राहिली. गुरुबंधुंनी गाडीचे दार उघडले. श्रींचे प्रथम पद पायघडीवर पडले. सर्व बंधुंनी एकच जल्लोष

केला. ''अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.'' सनई चौघडा निनादू लागली. गुरुबंधू भगिनी सुस्वर कंठाने 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' धून म्हणू लागले. पायघड्यांवरून 'श्रीं'ची पाऊले पुढे पुढे सरकत होती. गुरुबंधू पुष्पवृष्टी करीत होते. 'श्री' पाच पायऱ्या चढून ओटीवर मुख्यद्वारासमोरील पाटावर उभे राहिले. सौ. नागले यांनी समशीतोष्ण दूधपाणी चरणांवर घातले. श्री. नागले यांनी मऊ वस्त्रांनी श्रींचे पाय पुसले. श्रींना पुष्पहार अर्पण केला. सौ. नी औक्षण केले, ओवाळले. दत्तप्रभुंनी ताम्हणात रुपयाचे नाणे टाकले. लागोपाठ पाच सुवासिनींनी औक्षण केले. 'श्रीं'ना ओठाणात आणण्यात आले. पूर्वाभिमुख बैठक तक्यासह मांडली होतीच. 'श्रीं'ना स्थानापन्न होण्यास विनंती केली. नंतर सर्वांची दर्शनास रांग लागली. १५ ते २० मिनिटे हा कार्यक्रम चालला. 'श्रीं'ना त्यांच्या खोलीत नेण्यात आले. हातपाय धुवून श्री पाटावर बसले. अल्पोपहार व चहापान झाले. समस्त मंडळींसह फलाहार, चहा कॉफी दूध घेऊन निवांत होताच 'श्रीं'ना सर्व सुवासिनी भगिनींनी घेरले. सौ. प्रभाताईंने सुंगधी उटणे-खसखस वाटून लेपन तयार केले होते. चौरंगावर बसवून महाराजांना उटणे लावून तुलसी वृंदावनात औदुंबराखाली समस्त गुरुबंधूंनी अभ्यंगस्नान घातले. सौ. आईसाहेब आश्चर्य प्रकट करीत होत्या की, दीपावलीस किंवा आपल्या वर्धापन दिनास आपल्या लेकी सुनांना सुद्धा अंगास स्पर्श करू न देणारे 'हे' आज भक्तांच्या एवढे स्वाधीन कसे?

गुरुबंधू-भगिनी 'श्रीं'ना अभ्यंगस्नान-अंगास तेल उटणे लावण्यापासून पाणी घालण्यापर्यंत सर्व शांतपणे करू देत होते. त्यांनी आपला देह जणू भक्तांच्या स्वाधीन केला होता व ती त्यांची चर्या भावावस्थेची होती. बाल गोपाळाचे, बाल दत्तात्रेयांचे निरागस भाव चेहऱ्यावर उमटत होते. स्नान होऊन 'श्री' त्यांचे खोलीत गेल्यानंतर त्यांचे आन्हिक, नित्य-उपासना, नित्यपाठ होईपर्यंत सर्वत्र निरव शांतता होती. श्रींना हरिहरेश्वरी वास्तव्यात पूर्ण विश्रांती देणे हा आमचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे कोणताच कार्यक्रम ठरविला नव्हता. पहिल्या दिवशी मागील पडवीत सर्व साधक-भक्त मंडळीस बसण्यास बैठका अंथरल्या होत्या. श्रींच्याकरीता लाकडी आराम खुर्ची मऊ आसनासह मांडली होती. समोर मोठे चौकोनी टेबलवजा स्टूल ठेवले होते. टेपरेकॉर्डर होताच. तबला पेटी झांजा घेऊन सर्व भक्त मंडळी बसली होती. प्रथम भक्तीगीते झाली, श्री. विलास तावडे यांनी आपल्या सुस्वर कंठातून भक्तीगीते, अभंग गाईले. 'श्री' प्रसन्न चित्त होते. गीतानंतर त्रिपदी नित्यउपासना हा सर्व कार्यक्रम दीड तास चालला.

दुपारी १२.३० वा. भोजनाची पाने मांडण्यात आली. 'श्रीं'च्या व सौ. आईसाहेबांच्या पानाभोवती महिरप रांगोळी व फुले लावली होती. सर्व गुरुबंधुंच्या ताटाभोवती रांगोळी होती. प्रसाद भोजन झाले. ३ ते ४ वाजेपर्यंत श्रींसह सर्वांचीच विश्रांती झाली. सायंकाळी ५ वाजता देवळाकडे दर्शनास जाण्याची तयारी झाली.

सकाळचे आन्हिक आटोपताच 'श्रीं'नी चौकशी केली, ''देव दर्शनाला कधी जायचे?'' मंदिराचे ट्रस्टी व ग्रामपंचायत ग्रामस्थ यांना सायंकाळी ५ वाजता दर्शनाला आणू असे सांगितले होते. त्याप्रमाणे सर्वभक्त मंडळींना पाच वाजताच मंदिराकडे पाठविले. मंदिराचा कुरंदी दगडाने बांधलेला रस्ता ५-७ पायऱ्या चढून सुरू होतो. सर्व भक्त गुरुबंधू-भगिनी पायऱ्यांपासून पुढे रस्त्याच्या दुतर्फा १०-२० फुटापर्यंतच्या मार्गात झांजांसह उभे होते. दिगंबराची धून म्हणत होते. मंदिराचे प्रमुख विश्वस्त श्री. हरिभाऊ बोडस व इतर विश्वस्त कुटुंबे, जोशी तसेच सरपंच ग्रामस्थ शेवटच्या वरच्या पायरीवर हार तुरे घेऊन उभे होते. प.पू. महाराज, सौ. आईसाहेब, रघुनाथराव, सवितावहिनी, मंदावहिनी, आमोद, रेणुका यांना दोन्ही गाडीने नेले. गाडी या पायऱ्यापर्यंतच जाते. गाडीमधून 'श्री' उतरले. त्यांना पायऱ्या चढून वर नेताच प्रथम श्री. हरिभाऊ यांनी हार घालून स्वागत केले. मी औपचारिक ओळख देण्यास सोबत होतोच. सुवासिनींनी सौ. आईसाहेबांना हार व सर्वांस पुष्पगुच्छ दिले. 'श्रीं'ना ओवाळले. हा स्वागत समारंभ उरकून 'श्री' पुढे रस्ता क्रमू लागताच प्रत्येक घरांतून सुवासिनी येऊन श्रींचे पायावर पाणी घालू लागल्या. श्रींना पुष्पगुच्छ, फुले देत होत्या. ओवाळत होत्या असे पाच-सात घरासमोरून मार्ग क्रमतानाच झाले. मला हे इतके स्वागत व घरोघरच्या सुवासिनींनी येऊन ओवाळणे हे अपेक्षितच नव्हते. कुरवपूर वास्तव्यांत बैठकीत मात्र हे दृश्य मी पाहिले होते. मी माझ्या ग्रामस्थांना ओळखत होतो. जो तो आपल्या शेतीवाडीच्या कामात गुंतलेला असतो. कुणाला उसंत नसते. आल्या गेल्याचे काही नसते. सायंकाळी-रात्री देवदर्शनास मात्र सर्व येऊन जात. श्री कालभैरव, योगेश्वरी आणि हरिहरेश्वर यांचे चरणी मात्र समस्त ग्रामस्थांचा पूर्ण भाव, श्रद्धा! बाकी कोणाशी स्नेहाचे घेणे देणे काही नसते. बैठकीत पाहिले ते कल्पना चित्र होते असेच मी धरून चाललो होतो. उलट मला ही शंका होती की या ईश्वर स्वरुप महात्म्याला मी गावी नेत आहे खरा! पण ग्रामस्थांकडून त्यांचा योग्य मानमरातब सांभाळला जाईल किंवा नाही? ग्रामस्थांकडून सत्कार होईल किंवा नाही? पण प्रत्यक्ष अनुभव वेगळाच आला. हरेश्वरी तयारीचे दृष्टीने माझ्या ज्या काही ३-४ खेपा झाल्या व ग्रामस्थ, मजूर तयारीस मजूरीवर येऊन गेले. त्यांच्याकडून आमच्या या छोट्या गावात बातमी पसरण्यास वेळ लागला नाही. नंतर मीही विश्वस्त, सरपंच, प्रतिष्ठीत ग्रामस्थ सर्वांना प.पू. महाराजांबद्दल संक्षिप्त माहिती देऊन आगमनाची तारीख वेळ सांगितली होती. 'श्रीं'चे मंदिरात जाताना झालेले स्वागत अप्रतिम होते. श्री कालभैरव योगेश्वरी सहीत हरिहरेश्वरांनीच हे स्वागत ग्रामस्थांना प्रेरणा देऊन करून घेतले हेच खरे!

प्रवासाचा शीण असल्याने रात्रीची जेवणे लवकर आटोपून 'श्रीं'ना देखील ९ वाजेपर्यंत शयनगृही नेण्यातआले.

सायंकाळी 'श्रीं'नी वास्तव्याच्या खोलीतच पलंगाशेजारी खाली बसून सायंसंध्या उरकली. काही हवे नको ते पाहण्यास मी वारंवार खोलीत डोकावत होतो. प.पू. महाराज पलंगावर स्थानापन्न होताच पुढे झालो. दूध, कॉफी बद्दल विचारले. दुधाचा चहा करून आणला. श्री. देवळे चहापानाची सेवा सांभाळण्यास तत्पर होते. मी पलंगाशेजारी नतमस्तक उभा होतो. 'श्री' म्हणाले, ''आता अजून दोन रात्री राहून आम्ही निघावे ना? क्षेत्राचे ठिकाणी तीन रात्री तरी रहावे म्हणतात!''

मी म्हटले, ''नाही नाही महाराज! आम्ही आपणास लागलीच सोडणार नाही! आता आपणास मोकळा वेळ आहे, तेव्हा जास्तीत जास्त निदान ८-१५ दिवस तरी रहावे!''

श्री - सर्व मंडळीही आहेत! कोणास किती रजा आहेत?

मी - ते आपआपल्या रजेप्रमाणे राहतील, जाणे आवश्यकच असेल तर जातील. पण हा असा योग केव्हा यावा? आपण बिलकूल घाई करू नये. आम्हासही वेळ आहे. कामे वगैरे चालू आहेत. कामावर सुपरवाइजर वगैरे आहेत. काहीच अडचण नाही. येथील हवा आपल्या प्रकृतीस मानवेल. सतत प्रवास आणि आश्रमातील सतत दर्शनार्थींची रीघ! आणखी आपणास किती त्रास आहेत याची कल्पना आहे आम्हाला! कृपया आपण येथे निवांत रहावे. जास्तीत जास्त रहावे! आपणास पूर्ण विश्रांती मिळावी म्हणून काही आपले कार्यक्रमही आम्ही ठेवले नाहीत.

श्री - अहो पण नुसते बसून तरी काय करायचे? असं करूया.... आम्ही सोबत आद्य शंकराचार्यांचा गीताभाष्य ग्रंथ आणला आहे. रोज सकाळी आन्हिकानंतर दोन अडीच तास त्याचे वाचन, विवेचन, मनन करूया! अहो, विश्रांती विश्रांती काय? तीच आमची खरी विश्रांती आहे. तुम्ही सर्व श्रोते आहातच.

मी - ठीक आहे म्हटले. रोज पहाटे सहा वाजता आम्ही सर्व मंडळी ओठाणात बैठकीसही बसायचे ठरविले आहे.

श्री - चांगले आहे, चालू द्या!

शनिवार, दि. ११.४.१९८१ - आपसात ठरविल्याप्रमाणे आम्ही सर्व साधक मंडळी पहाटे पाच वाजताच उठून प्रातर्विधी आटोपून श्री. देवळे यांच्या आज्ञेनुसार चहापान केले. सर्व कसे अगदी गुपचूप चालले होते. जेणेकरून सौ. आईसाहेबांची व सर्व मंडळींची निद्राभंग होऊ नये.

प.पू. महाराजांची बैठक जेथे प्रथम घातली तेथेच होती. ती नवी चादर घालून ठेवली होती. त्या त्यांचे बैठकीसमोर तोंड करून सर्व साधक पहाटे ५.४५ वाजता ध्यान धारणा बैठकीस बसले. धूप उदबत्ती सुवास दरवळला होता. पहाटे ६ ते ७ पर्यंत बैठक झाली. मुख्य गोष्ट म्हणजे प.पू. ब्रह्मर्षी श्री सद्गुरु देखील पहाटे ६ वाजता स्वत:हून येऊन आपल्या

बैठकीवर बसले अशी नुसती कल्पना करूनही सर्व साधक भक्तांचे अष्टसात्विक भाव जागृत होऊन ध्यानधारणा उत्तम झाली.

सकाळी चहापानानंतर श्री. रघुनाथरावांनी मला बाजूस घेऊन सांगितले की, प.पू. महाराजांना रात्री ताप आला होता. जास्त नाही पण होता. कदाचित प्रवासाच्या त्रासानेही असेल. देऊळगांवराजा येथून एस्.टी. ने १२ तास प्रवास ड्रायव्हरच्या मागच्या सीटवर बसून झाला. त्यांना मी म्हटले, ''आपण आता काहीच कार्यक्रम ठेवलेला नाही. प.पू. महाराजांना जास्तीत जास्त विश्रांती कशी मिळेल हेच पहायचे आहे.'' तरीही श्रींनी स्नानाची घाई केली. सकाळचे नित्याचे आन्हिक उरकले. सकाळची न्याहारी, चहापान होताच मला म्हणाले, ''तुम्ही जर काही कार्यक्रम ठरविला नसेल तर आम्ही सोबत आद्यशंकराचार्यांचा गीताभाष्य ग्रंथ आणला आहे. त्याचे वाचन, मनन, चिंतन सर्वांनी करूया! संस्कृत ग्रंथ आहे. आम्ही वाचन करून सर्वांस अर्थ विशद करू.

सकाळी श्री. प्रभुदेसाई व श्री. जोशी मंडळी आली. मागील पडवीत प.पू. महाराजांकरिता लाकडी आराम खुर्ची ठेवण्यात आली. समोर टेबलवजा चौरस स्टूल ठेवण्यात आले. सर्वांना बसण्यास खाली सतरंज्या बैठकी अंथरल्या. सकाळी ठीक १०.३० वाजता 'श्री' स्थानापन्न झाले. १०.४५ ते ११.४५ 'श्रीं'चे गीताभाष्य भगवत्गीतेवर अध्याय १३ वर निरुपण झाले. दुपारी १ ते २ पर्यंत भोजन झाले. उकडीचे मोदक केले होते; प.पू. महाराजांनी देवास मोदकांचा नैवेद्य दाखविण्यास सांगितले. मी सरळ 'श्रीं'चे पुढे ताट ठेवून नैवेद्य दाखविला. सायंकाळी चहापानानंतर मागील पडवीत त्याच आसनावर महाराज स्थानापन्न झाले. सर्व मंडळी सभोवार. 'अपराध क्षमापनवर' अर्थपूर्ण प्रवचन झाले. भक्तीगीते गाण्याचा व धुनचा; त्याला लागून नित्य कार्यक्रमातील त्रिपदीचा कार्यक्रम ठेवला होता. तबला, पेटी, झांज वगैरे संगीताचा साज होता.

श्री. विलास तावडे यांनी आपल्या सुस्वर कंठातून दोन भक्तीगीते गाईली.

१) **त्रिभंगी कान्हा मांडुनिया माये।**
कल्पद्रुमा तळी वेणू वाजवीतो आहे।।

२) **वेद जया लागी नित्य वाखाणीती।**
तो हा वेदमूर्ती पांडुरंग।।

हे वेदमूर्ती पांडुरंगाचे गाणे लयीला घेताना 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत त्यांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा।' ही कशी स्वरांतून बाहेर काढली ते कोणासही कळलेच नाही.

३) सुधाकर शृंगारपुरे यांचे एक विठ्ठलाचे गीत झाले.

४) नंदकुमार शृंगारपुरे यांनी ''प्रभो मला कर तुझ्या खडावा, तुझे धरू दे पाय, मी मागू दुसरे काय?'' हे गीत म्हटले.

५) बाळ राहूल शृंगारपुरे यांनी ''हे राष्ट्र प्रेषितांचे... आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे'' हे राष्ट्रपंडितांसमोर राष्ट्रगीत म्हटले. सायंकाळी ६.३० ते ७ 'क्षमस्व अपराध' अर्थ विशद करून सांगितला. नंतर कालच्याप्रमाणे नित्य त्रिपदी व धून झाली. सायंकाळी प.पू. गुळवणी महाराजांच्या आठवणी सांगितल्या.

रविवार, दि. १२.४.१९८१ .... रामनवमी

पहाटे ७ ते ८ ध्यानधारणा बैठक झाली. 'श्री' उपस्थित होते व मुखाने काही मंत्र पुटपुटत होते असे काही साधकांनी सांगितले. न्याहारी अल्पोपहारानंतर पूर्वेकडील अंगणात मांडवात बैठकी घालण्यात आल्या. मुख्य पायऱ्यांचे बाजूलाच पूर्वाभिमुख महाराज नेहमीच्या (उच्च) आसनावर विनंतीनुसार स्थानापन्न झाले. सकाळी १० वाजता चि. अभिजीत यांस पाटीवर 'श्रीगणेशा' लिहून प्रारंभ करून दिला. सौ. लतास म्हणाले, ''तुमचा लेखी जप चांगला होत आहे.'' श्रींचे आज्ञेनुसार दुपारचे श्रीरामजन्मापर्यंत 'दिगंबराची' धून करण्याचे ठरले. प.पू. महाराजांकडे तोंड करून सर्व भक्तमंडळी बसली. प.पू. महाराजांचे समोर स्टूलवर टेपरेकॉर्डर चालू करून मी महाराजांना प्रार्थना केली. ''महाराज आपणच धुनचा प्रारंभ करून द्यावा.

त्याप्रमाणे ११ वाजता प.पू. महाराजांनी धुनचा प्रारंभ करून दिला. ५ ते १० मिनिटे महाराज उच्च स्वरांत ताल सूर बद्ध धून सांगत होते. नंतर सर्वांस हात पुढे करून चालू ठेवा म्हणताच माईक श्री. प्रभुदेसाईंपुढे ठेवून त्यांना धून पुढे करण्यास सांगितली. श्री. घोलकर, बोडस, जोशी, नंदू शृंगारपुरे, तावडे, भाऊसाहेब शृंगारपुरे सर्वांनी एकामागून एक या धुनला रंगत आणली. १२ वाजेपर्यंत धून झाली. प्रभु रामचंद्रांचा नामघोष, जयजयकार झाला. भक्तांनी धून बरोबर फेर धरून कार्यक्रम उत्तम पार पाडला. घरी 'श्रीं'पुढे १०८ निरांजने लावून आरती झाली. (श्रीराम जन्मानंतर). सुंठवडा प्रसाद 'श्रीं'चे हस्ते मिळाला. भोजन नैवेद्यास पुरण पोळी होती. दुपारी २ नंतर प्रसाद भोजनोत्तर 'श्रीं'चे श्रीरामजन्मावर हरिहरेश्वर मंदिरात प्रवचन आयोजित करण्यात आले. सौ. जोशींनी रामनामाची धून घेतली. सायंकाळी पाचला मंदिराकडे निघण्यापूर्वी श्री. सदानंद देवळ्यांनी खास आणलेली कलमी आंब्यांची तीन रोपे 'श्रीं'चे हस्ते अंगणाच्या कडेला रोपण करून घेण्यात आली. सायंकाळी साडेपाचला प.पू. महाराजांसोबत सर्व मंडळी मंदिराकडे निघाली. श्री हरिहरेश्वर मंदिरात देवासमोर प.पू. महाराजांकरिता व्यासपीठ ठेवण्यात आले. 'श्रीं'ना प्रभू रामचंद्र मानून स्त्री-पुरुषांनी चरणावर फुले वाहिली. स्त्रियांनी निरांजनांनी ओवाळले. प्रमुख विश्वस्तानी पुष्पहार अर्पण करून प्रवचनास प्रारंभ करण्यास विनंती केली. सायंकाळी ५.४५ ते ६.४५ प.पू. महाराजांचे रामायण

आणि रामजन्मावर सुश्राव्य प्रवचन झाले. सर्व श्रोते मंडळींनी श्रद्धापूर्ण भक्तीभावाने श्रींचे दर्शन घेतले.

सोमवार, दिनांक १३.४.१९८१.... श्री हरिहरेश्वरावर रुद्राभिषेक संपन्न झाला.

मला 'श्रीं'ची दीक्षा दि. १७.३.१९८० गुढीपाडव्यास झाली. आपल्या पत्नीनेही योगदीक्षा 'श्रीं'कडून घ्यावी असे मला सतत वाटत होते. परंतु दीक्षा देखील कोणासही कोणत्याही वेळी प्राप्त होतेच असे नाही. एखादी गोष्ट आपले अंतर्मनास पटली, त्यानुसार ओढ लागली व ती केव्हा प्राप्त होईल म्हणून सतत प्रयत्न झाला तर ती दीक्षेची वेळ आली असे समजू या. गुरुंचे शोधात साधक वेडापीसा होतो. काही अधिकारी की, ज्यांचे पूर्वसुकृत चांगले आहे अशांकडे श्रीसद्गुरु स्वत:हून चालत येतात. त्यामुळे मी जरी सौ.ला म्हणत होतो की, अशी संधी येणार नाही. आज साक्षात ईश्वर स्वरुप महाराज आपले घरी आले आहेत, तू त्यांना प्रार्थना करून तर पहा! आपले भाग्य असेल तर रामनवमीचे मुहूर्तावर पहाटे बैठकीस बसा म्हणतील. दीक्षा होताना दिव्य अनुभूती देखील येऊ शकते. पण ती तयार नव्हती. त्याचे कारण ती सांगते ते असे -

मे १९७६ अखेर माझे थोरले द्वितीय बंधु, त्यांचे सद्गुरु प.पू. काडसिद्धेश्वर महाराज यांचे सोबत, काही गुरुबंधूंसह गोरेगावच्या त्यांच्या आश्रमांत (एस्.व्ही. रोड) येथे आले होते. त्यांनी आम्हास दर्शनास नेले. मी प.पू. दत्तमहाराजांचा अनुग्रहीत होतो. गुरुतत्त्व एकच चराचरात संचार करीत असते. कोणत्याही सद्गुरु चरणी मस्तक ठेवले तरी -

"मी ठेवीतो मस्तक ज्या ठिकाणी।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही।।"

या धारणेने मी प.पू. काडसिद्धेश्वर महाराजांना जयप्रकाश नगर मध्ये नव्या वास्तुत मी निवासास जाणार आहे असे सांगितले. तत्पूर्वी आपला पदस्पर्श वास्तुस झाला तर ती पवित्र होईल. आपण यावे ही प्रार्थना करताच ते दुसरे दिवशी दुपारनंतर येण्यास तयार झाले. आम्ही त्यांचे स्वागताची व दुग्ध प्राशनाची तयारी ठेवली. ते आले, त्यांनी सर्व वास्तु फिरून पाहिली. 'कल्याणमस्तू' आशीर्वाद दिला. आमच्या सौ. लताबाईंस त्यांनी 'सोऽहम्' मंत्राचा जप करण्यास सांगितले.

आता सौ. लताचे म्हणणे मी मंत्र घेऊन अनुग्रहीत झाले. आता प.पू. महाराजांकडे दीक्षेची याचना करणे म्हणजे त्या गुरुंना अपमानीत करणे म्हणजे प्रमाद घडणार! मी काही दीक्षा मागणार नाही. द्यायची असेल तर महाराज शक्तीपात (योग दीक्षा) स्वत:हून देतील.

मी ते मान्य करून स्वस्थ राहिलो. कारण ह्या गोष्टी सद्गुरुंच्या, परमेश्वराच्या इच्छेच्या कक्षेत आहेत. असो घडायचे ते घडेल.

सोमवार दि. १३.४.१९८० रोजी श्री हरिहरेश्वरावर लघुरुद्राभिषेकाचे आयोजन 'श्रीं'चे अनुमतीने केले होते. ग्रामस्थ ब्रह्मवृंदांना तसे कळविण्यात आले. परंतु पाठ सकाळचे वेळेत पूर्ण करण्यास त्यांना एक ब्राह्मण कमी पडत होता. आमचे गुरुबंधू गोपाळ बोडस तयार झाले. त्यांना रुद्र येत होता. ते 'श्रीं'ची आज्ञा घेऊन बसले. 'श्रीं'ना सकाळी ९ वाजताच मंदिरात आणण्यात आले. त्यांचे सोबत सौ. आईसाहेब व समस्त मंडळीही आली. श्री हरिहरेश्वरावर सहस्र बिल्वपत्र वाहण्याच्या संकल्पासही अनुमती मिळाली. परंतु 'श्रीं'ना व सौ. आईसाहेबांना इतका वेळ गाभाऱ्यात बेलपत्र वहात बसणे वयोमानाप्रमाणे कठीण जाईल. 'श्रीं'नीच आम्हां उभयतांना यजमानपण स्वीकारण्यास सांगून बिल्वपत्र वाहण्यास गाभाऱ्यात बसण्यास सांगितले. आम्ही पूजेचा गणवेष धोतर, उपरणे व सौ. ने नऊवारी साडी परीधान केली होती. सर्व बेलपत्राचे टोपले 'श्रीं'चे समोर ठेवले. माझा हरेश्वर सद्गुरुच होते. (गाभाऱ्याच्या खाली उतरण्याच्या मार्गाचे उजवीकडे) 'श्रीं'नी एक कटाक्ष दयार्द्रतेने, हंसतमुखाने व प्रसन्नतेने आम्हा उभयतांकडे टाकला. सर्व बेलावर उजवा हात फिरवून म्हणाले, ''घ्या! वहा देवावर! सहस्रनाम म्हणायला पूजा सांगायला खाली गुरुजी आहेत ना?'' मी होय म्हटले, वर रुद्राभिषेक आणि गाभाऱ्यात सहस्र बिल्वपत्रे वाहण्याच्या या कार्यक्रमास एकसाथ सुरुवात झाली. मी गुरुजी नामोच्चार करतील त्याप्रमाणे एक एक बिल्वपत्र वहात होतो तर सौ. लता गुरुजींचे सांगण्याप्रमाणे माझ्या उजव्या हातास हात लावून बसली होती. पंधरा वीस मिनिटे झाली असतील आणि सौ. लताचा हात खाली गेला. दोन्ही हातांची बोटे एकांत एक गुंतली आणि ती सकाळी ११.३० ला भावावस्थेमध्ये जाऊन, योगिक क्रिया होऊ लागल्या! तिचे शरीर दोलायमान होऊ लागले. हाताची पकड घट्ट झाली, डोळे घट्ट मिटले. श्री. गोडसे ह्यांच्या हे लक्षात आले. पूजेचे फोटो घेण्यास ते कॅमेऱ्यासह गाभाऱ्यात कोपऱ्यात उभे होतेच! क्षणात कॅमेऱ्याचा फोकस सौ. लताबाईंकडे पडला. सर्व गुरुबंधूंच्या मनात एकच विचार आला, ''नागले वहिनींना प.पू. महाराजांनी दीक्षा दिली.''

होय, खरंच होतं ते! कारण पुढील दिवशी धैर्य करून त्यांनी 'श्रीं'ना ''मला दीक्षा व्हावी अशी प्रार्थना आहे.'' असे म्हटले तेव्हा 'श्री' मिस्कील हसले व म्हणाले, ''काय? दीक्षा हवी कां तुम्हाला?'' दुसऱ्या दिवशी सौ. लतास येत्या अक्षय तृतीयेस पहाटे ६ वाजता बसण्याची आज्ञा झाली. प.पू. महाराजांना, 'माझी तिन्ही मुले लहान आहेत, त्यांनाही दीक्षा मिळू शकेल का?' असा प्रश्न केला व 'श्रीं'नेही लागलीच ''हो हो! त्या तिघांनाही याच अक्षयतृतीयेस बसू द्यात! श्री गुरुमहाराज दीक्षा देतील बरं!''

सहस्र बिल्वपत्र वाहण्याचा आणि रुद्राभिषेकाचा कार्यक्रम संपवून, तसेच गाभाऱ्यात १०८ निरांजने लावून आरती संपवून घरी आलो.

आज प्रसाद भोजनास कोवळ्या वाटाण्याची आमटी, कोकणी पद्धतीचा नारळाच्या दुधातला केशर-साखरभात, वरण, चटणी, वाटली डाळ, कैरीची व केळफुलाची भाजी होती. प.पू. महाराजांना या ७ ते ८ दिवसात कोकणी पद्धतीचे जास्त पदार्थ ठेवले होते.

सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत शंका समाधानाचा कार्यक्रम झाला. एकेका साधकास (गुरुबंधूस) 'श्रीं'चे खोलीत सोडून स्वतंत्रपणे काही प्रश्न शंका-प्रश्नोत्तरी झाली. एकांतात स्वतंत्रपणे शंका समाधान झाल्याने सर्व गुरुबंधू खूष झाले. सर्वांना मार्गदर्शन ठरतील अशी काही 'श्रीं'ची वाक्ये सर्वांनी सांगितली ती अशी.

१) योगदीक्षा घेतल्यानंतर साधकाने सातत्याने साधना केली तर कोणताही असाध्य रोग बरा होऊ शकतो. श्री लोकनाथ तीर्थांचे चरित्र लेखक श्री. पोटभरे यांचा अस्थमा साधनेमुळे व प.पू. गुरुमहाराजांच्या कृपेने गेला.

२) आपण शांतपणे बसून आत्मपरीक्षण करून आपल्यात कोणते दोष आहेत ते पहावे. एकदा ते समजले की, दूर करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. आपणात जर ते दोष दूर करण्याचे सामर्थ्य नसेल तर सतत ईश्वराजवळ प्रार्थना करीत राहणे एवढेच आपले हातात आहे.

३) आपण स्वीकारलेल्या आध्यात्मिक साधनेबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार इ.नी कितीही चेष्टा केली, विरोध केला तरी त्याला जुमानण्याचे कारण नाही. त्यांची उपेक्षा करावी. कालांतराने हा विरोध मावळतो.

४) आपल्या आयुष्यात दिवस-रात्री प्रमाणे साधनेच्या दृष्टीने अनुकूल आणि प्रतिकूल काळ येत असतो. अनुकूल काळात खूप साधना घडते; तर प्रतिकूल काळात घडत नाही. निरनिराळे प्रतिबंध आडवे येतात. अशावेळी ध्यान धारणा न करता नामस्मरण करीत रहाणेच योग्य. पण तेही घडत नसेल तर तो प्रतिकूल काळ दूर होईपर्यंत कसलाही विचार न करता शांत रहावे. साधनेस नित्य बसावे, ध्यान धारणा होणे, बैठक मनाप्रमाणे होणे हे शक्तीमातेच्या मर्जीवर आहे. प्रार्थना करावी. मनात साधना बैठक न झाल्याची कधीही खंत करू नये.

५) साधनेस उत्तम वेळ कोणती?
बैठक किंवा साधनेस अत्यंत चांगली वेळ रात्री १ नंतरची!

६) तीर्थयात्रा, पुण्य कर्म आणि नित्य साधना करण्यानेच विकार कमी होतात.

७) समाजात, कार्यालयात आपण साधक असल्याची ओळख देऊ नये. साधना गुप्त ठेवावी.

८) बैठक झाल्यानंतर १०-१५ मिनिटे शांत बसून रहावे.

९) शक्तीच्या इच्छेनुसार जेवण झाल्यावर कधी कधी बैठक लागू शकते.

या साधक संवादानंतर प.पू. महाराजांनी आपली नित्य सायंसंध्या उरकली. नंतर करुणा त्रिपदी, स्तोत्रे, धून व भक्तीगीते संगीत साथीसह हा कार्यक्रम झाला. सौ. आईसाहेबांनी सर्वांचे आग्रहास्तव गीत म्हटले.

रात्रौ ८.३० ला भोजनानंतर 'श्रीं'ना शयनगृहात नेण्यात आले.

मंगळवार, दि. १४.४.१९८१ ... एकादशी

पहाटे नित्याप्रमाणे ७ ते ७.३० ला सामुदायिक बैठक. सकाळी ८ वाजता प.पू. महाराजांसोबत आम्ही सर्व भक्त गुरुबंधू-भगिनी समुद्र स्नानास निघालो. आमच्याच नारळी-सुपारींच्या बागेतून रस्ता. पुढे थोडी शेत जमीन पुन्हा झाडांची दाटी, केतकीबन नंतर मोकळे माळ-भाट, पुन्हा केतकीबन आणि नंतर समुद्राचा वाळवंटी किनारा-समुद्र! साधारण ओलसर जमीन येताच प.पू. महाराजांनी समुद्रास साष्टांग नमस्कार घातला. आजन्म हे कधीच सुचले नव्हते. सर्वांनीच प.पू. महाराजांचे अनुकरण करून नमस्कार घातला व नंतरच पाण्यास पादस्पर्श केला. प.पू. महाराजांसमवेत सर्वांनी यथेच्छ समुद्र स्नान केले. 'श्री' प्रसन्नचित्त होते. 'श्रीं'चे पंचा, धोतर, उपरणे सर्व साहित्य आणले होते. परंतु उपरणेच पंचासारखे कासोटा घालून नेसले. समुद्राकडे जाता येता 'श्रीं'चा चपला घालण्याचा मानस नव्हता. परंतु वाटेत काटेकुटे आहेत सांगून विनंती केल्यानंतर रबरी स्लीपर्स घातल्या. केतकीच्या बनांत व तेथून भाटात येताना रस्ता दाखविण्यास मी पुढे होतो. 'श्रीं'चे हातात काठी होती. स्नानानंतर लागलीच आन्हिकाला बसणार म्हणून ते सर्वांचे स्पर्श टाळत होते. हे लक्षात येताच सर्वांस मागे थांबण्यास सांगून पुढे मी व मागे रघुनाथराव असे सुट्टे सुट्टे चालत होतो. माळरान भाटापासून केतकीचे बनातून शेतात उतरायला रस्ता जरा उतरंडीचा होता. मी 'श्रीं'कडे तोंड करून मागेमागे चालत होतो. 'श्री' अगदी आत्मविश्वासाने मार्गक्रमण करीत होते.

सकाळी ९ ते १० पर्यंत 'श्रीं'चे नित्य आन्हिक आटोपले.

हरिहरेश्वरांत विटांची भट्टी लावून विटांचा व्यवसाय करणारे एक गृहस्थ श्री. गावडे 'श्रीं'कडे दीक्षा मागण्यास आले होते. सदर गृहस्थ माझ्याही ओळखीचे नव्हते. 'श्रीं'नी त्यांना दीक्षेची वेळ पहाटे ६ व तारीख ६.५.१९८१ देऊन बैठकीस बसण्यास सांगितले. दीक्षेची जीवनात वेळ आली की कोण कोठून सद्गुरुंकडे येईल ते सांगता येत नाही. दीक्षा मागून लागलीच वेळ तारीख व बैठकीची आज्ञा होतेच असे नाही. काही वेळा त्या व्यक्तीची अंतर्ज्ञानाने चाचणी करून ते ठरविले जाते. परंतु या व्यक्तीची वेळ आलीच असावी म्हणून 'श्रीं'नी दिवस वेळ दिला.

प.पू. महाराजांना व बहुतांशी साधक भक्त भगिनींना उपवास होता. त्या सर्वांस 'श्रीं' बरोबर उपवासाचा फराळ देण्यात आला.

सायंकाळी ४.३० ते ६.३० आज दोन तास प.पू. महाराजांचे गीताभाष्यावर प्रवचन मागील पडवीतील मंडपात झाले.

सायं. ७ ते ८.३० ला साधकांनी भक्तीगीते गाईली. मी प.पू. महाराजांसमोर टेपरेकॉर्डर ठेवून ''आपणही एखादे पद, अभंग, गीत गावे अशी विनंती आहे महाराज'' असे म्हटले.

''आम्हाला आता पूर्वीसारखे गाता येत नाही! दम छाटत नाही! तरीही प्रयत्न करतो, झांज असेल तर द्या.''

मी 'श्रीं'ना छोटी झांज दिली. लागलीच ठेका धरून 'श्रीं'नी एकनाथ महाराजांचा अभंग म्हटला.

''तुजविण आम्हा ऽऽ। असे कोण देऽवाऽऽ।
धाव यादव रायाऽऽ मायबापा मायबापा।।धृ.।।
पडीलोसे डोही। प्रपंच आवर्ती।
कोण करी शांती। तुजवीन।
जन्म मरणाच्या पडीलोसे फेरा।
सोडवी दाताराऽऽ सोडवी दाताऽरा
मायऽबापा। तुजविण आम्हा असे कोण देवा।
एका जनार्दनी। भावे लवलाही
घेऊनिया हृदयी। ठाव देई ठाव देई
तुजवीण आम्हा असे कोण देवा।।''

अभंग 'श्रीं'चे मुखातून; सुस्वर मधुर गळ्यातून ऐकतांना सर्वांचे नेत्र पाणावले होते. सौ. लताबाई नागले तर पुन्हा भावावस्थेत गेल्या होत्या. जे सोमवारी बिल्वपत्र वाहतांना झाले तीच अवस्था.

'तुम्हाविण महाराजा। असे कोण आम्हा?
असे कोण देवा?'

यानंतर नित्य त्रिपदी स्तोत्रादी आटोपून रात्रीचे फराळानंतर 'श्रीं'ना विश्रांती देण्यात आली. आम्ही सर्व साधक भक्त मंडळी मात्र पुढील अंगणात म्हणजे 'श्रीं'च्या शयन खोलीपासून दूर; 'श्रीं'ना झोप येण्यास त्रास होणार नाही याची काळजी घेऊन भजन-भक्ती गीतास बसलो. प्रत्येकाने भजन-भक्तीगीत-अभंग जे येत असेल ते म्हटले व एकादशीचे जागरण १२.३० मध्यरात्री पर्यंत केले.

बुधवार, दि. १५.४.१९८१

आज सामुदायिक ध्यान धारणा बैठक 'श्रीं'चे समोर सकाळी ७ ते ७.३० पर्यंत झाली.

९.३० पर्यंत 'श्रीं'चे स्नान-संध्या नित्य आन्हिक पूर्ण झाले. गावातील प्रतिष्ठीत श्री. रामभाऊ कुटुंबे 'श्रीं'चे दर्शनास आदल्या दिवशी येऊन गेले होते व त्यांनी 'श्रीं'ना आपल्या घरी येण्याबद्दल मन:पूर्वक प्रार्थना केली होती. त्याप्रमाणे सकाळी ११ वाजता 'श्रीं'चे सोबत श्री. रघुनाथराव व मी रामभाऊ कुटुंबे गृही गेलो. 'श्रीं'चे पुढे फळे ठेवली होती. परंतु महाराजांनी फक्त दुग्ध प्राशन केले. १२.३० ला दुपारचे प्रसाद भोजन झाले. वालाच्या बिरड्यांची आमटी, वांगी-बटाटा भाजी, श्रीखंड-पुरी इत्यादी पदार्थ भोजनास होते. प.पू. महाराजांना सायंकाळी ५ पर्यंत पूर्ण विश्रांती दिली.

सायंकाळी ५ वाजता सौ. आईसाहेब यांच्या उपस्थितीत समस्त हरेश्वर सौभाग्यवतींना हळदी-कुंकवाचे आमंत्रण होते. ह्याच कार्यक्रमात देवापुढे १०८ निरांजने लावण्यात आली.

आज 'श्रीं'चे आरोग्य-स्वास्थ्य आणि हरेश्वरी पुनरागमन व्हावे म्हणून श्री कालभैरव-योगेश्वरी देवतांना चंदन लेपन करून पूजा केली. 'चंदनाची महापूजा' असे या पूजेस म्हणतात. भाविक या पूजेचा नवस करतात. वर्षाच्या पूजा आठवड्यात २-३ वेळा तरी आरक्षित असतात. 'श्री कालभैरव' हा शिवशंकरांचा शतघ्न राक्षस वधाकरिता घेतलेला उग्र अवतार आहे म्हणून मूर्तीच्या सर्वांगास चंदन लेपन करून शाडूच्या गणपतीला रंगरंगोटी करतात. तशीच या दोन्ही मूर्तीस करून, सजावट आरास केली जाते. सकाळ पासून मोठ्या सहाणेवर भरपूर चंदन उगाळतात. चंदन लेपनाचे काम दुपारी १ ते ३ पर्यंत पूर्ण होते.

प.पू. महाराज व सौ. आईसाहेबांसोबत आम्ही सर्व भक्त मंडळी चंदनपूजा दर्शनास सायं. ६ वाजता निघालो. प्रमुख पुजारी श्री. भाई गुरुव यांनी सूचना दिल्याप्रमाणे प.पू. महाराज आणि सौ. आईसाहेब यांना देवापुढे उभे करून प्रार्थना केली.

''प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर तथा सौभाग्यवती लक्ष्मीबाई उभयता आपल्या दर्शनास आले आहेत; आपल्या कृपेनेच आम्हा ग्रामस्थांना, तसेच शशिकांत नागले आणि त्यांचे गुरुबंधू भगिनी, समस्त भक्त यांना त्यांच्या सत्संगाचा लाभ झाला आहे. असेच त्यांचे पुनरामन हरिहरेश्वर क्षेत्री होत राहो ही आपल्या चरणाशी प्रार्थना. त्या निमित्त ही चंदनपूजा सेवा संपन्न झाली आहे. प.पू. महाराज उभयतांना उदंड आयुष्य, आरोग्य लाभो व सर्वांस त्यांच्या सहवासाचा लाभ घडो ही श्री चरणी प्रार्थना.''

सायंकाळी श्री. भगवानराव पटवर्धन घरी आले होते. 'श्रीं' समवेत त्यांचे संभाषण चालू होते. आज सौ. आईसाहेबांनी सर्वांना पैसे वाटले.



३३) एक अविस्मरणीय अनुभव

एक अविस्मरणीय अनुभव सायंकाळी आला तो असा...

श्री कालभैरव व योगेश्वरी देवतांच्या चंदन महापुजेच्या दर्शनासाठी सर्व मंडळी देवळाकडे गेली होती. प.पू. महाराजांनी देवदर्शन होताच घरी परत फिरण्याची इच्छा प्रदर्शित केली. श्री. रघुनाथरावांनाही त्यांनी ''तुम्ही पाहिजे तर थांबा!'' असे म्हटले. मी व संजय प.पू. महाराजांना गाडीने घरी घेऊन आलो. संजय इतर मंडळींना आणण्यास पुन्हा देवळाकडे गेला. प.पू. महाराज जरा थकल्यासारखे वाटले. 'श्री' मागील औदुंबराकडील पडवीत आले आणि तेथील खुर्चीत सरळ मांडी घालून बसले. दोन्ही हात एकात एक बोटे घालून बैठकीला बसावे तसे बसले. डोळे अर्धोन्मिलीत होते. ते रुप पाहून माझेही अंग शहारू लागले. मी लागलीच कंबल आसन त्यांचे खुर्चीसमोर काही अंतर सोडून घातले व 'श्रीं'चे कडे तोंड करून साष्टांग नमस्कार घालून बैठकीस बसलो. मला सुख संवेदना होऊ लागल्या, आनंद लहरीत मी बेहोश होऊ लागलो आणि इतक्यात तंबोऱ्याची तार छेडावी अशा नाद लहरीत ''नाऽराऽयऽण, नाऽराऽयऽण'' असा ध्वनी माझ्या कर्णपटलावर निनादू लागला. विस्मय उत्सुकता न रहावून मी बैठकीतूनच गाढ निद्रेतून निद्रा बाजूस करून कोठून आवाज येतो आहे म्हणून डोळे किलकिले करून पाहिले तर प.पू. महाराज ध्यानमग्न होते; चेहऱ्यावर कोणतीही हालचाल नव्हती; ओठ बंद होते आणि आवाज मात्र घुमत होता, ''नारायण, नारायण, नारायण!'' महाराजांचे मुखावर पिवळे तांबूस तेज ओसंडत होते. मी हात जोडून नतमस्तक झालो. एकदा श्री. अशोकरावांनी मला विचारले होते; ''शशिकांत तुम्हाला कधी असा अनुभव आला आहे कां? की महाराज ध्यानमग्न बसले आहेत; ओठाचीही हालचाल नाही आणि त्यांचे देहातून ध्वनी निघतो आहे.

''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा।।'' मी म्हटले, ''नाही मला कधी असा अनुभव आला नाही.'' त्यावर श्री. अशोकराव म्हणाले, ''मला असा अनुभव आला आहे'' आणि आज मी ती अनुभूती घेत होतो. परंतु इतक्यात संजय गाडीने सौ. आईसाहेब व काही महिला मंडळींस घेऊन आला. घरात वर्दळ सुरु झाली. मीही उठलो आणि प.पू. महाराजही!

गुरुवार, दि. १६.४.१९८१.

पहाटे सामुदायिक बैठक झाली. चि. दिनेश याचा आज ११ वा वाढदिवस असल्याने चिरंजीव पहाटे उठून, परडी घेऊन बकुळीची फुले वेचण्यास गेले व घरी येऊन सुंदरसा हार बनविला. प.पू. महाराजांचे संध्या आन्हिक आटोपल्यावर ते आराम खुर्चीत मागील पडवीत बसले असताना 'श्रीं'चे गळ्यात घातला. मी 'श्रीं'ना आज त्याचा वाढदिवस आहे सांगताच 'श्रीं'नी डोक्यावर हात ठेवून त्याला आशीर्वाद दिला. आज प्रवचन वगैरे ठेवले नव्हते कारण सायंकाळी महाराज उपदेशपर प्रवचन करणारच होते.

१२.३० प्रसाद भोजनाच्या पंक्ती, 'श्रीं'च्या पंक्तीत, सर्वांना एकदम पुढील अंगण मंडपात घेतल्या गेल्या. गुलाबजाम, लाल चवळीची आमटी, पोळी, भेंडी-भाजी, बटाटा भजी-चटणी असा बेत होता. प.पू. महाराजांचा निघण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला म्हणून मन बेचैन होत होते. गाडी चालवणारा पुतण्या संजय अक्रुरासारखा वाटू लागला. तर आम्ही सर्वच साधक भक्त गोपी स्वरुपात दिसू लागलो.

हे गेले सात दिवस जसे उगवले जसे मावळले तसेच पुढीलही दिवस चालू रहावेत; हा सत्संग संपू नये. प.पू. महाराज सौ. आईसाहेब आमचे मायबाप आणि आम्ही सर्व लेकरे! हा संसार संपू नये ह्यापेक्षा स्वर्गसुख तुच्छ होय! मन सारखे एकच आक्रोश करीत होते. ''नको ना जाऊ सद्गुरु राया मला सोडून!'' ''तुजविण आम्हा असे कोण देवा? थांब यादवराया मायबापा। मायबापाऽऽ''

सायंकाळी चार नंतर या शेवटच्या दिवशी प.पू. महाराजांनी काही उपदेशपर गोष्टी आम्हांस सांगाव्यात अशी अगदी आग्रहपूर्वक प्रार्थना केली आणि महाराजांनीही साधकांची ही इच्छा प्रवचन देऊन पूर्ण केली. हे प्रवचन लेखांकितही केले आहे. प.प. वासुदेवानंद सरस्वती विरचित ''श्रीपाद श्री वल्लभ त्वं सदैव। श्री दत्तास्मान्पाही देवाधिदेव।।''

या स्तोत्राचे शेवटचे कडवे

''धर्मे प्रीतीं सन्मतीं देव भक्तीं।
सत्संगाप्तिं देही भुक्तीं च मुक्तीं।
भावासक्तीं चाखिलानंदमूर्ते।।''

ह्या कडव्यावर प.पू. महाराजांनी सायंकाळी एक तास प्रवचन केले. त्यानंतर नित्य त्रिपदी व स्तोत्रे झाली. बहुतांशी साधक भक्त मंडळी रात्रीच्या गाडीने मुंबईस गेली.

ह्या सात दिवसांच्या मुक्कामात 'श्रीं'नी श्री. सुधाकर पंत व सौ. प्रभा या उभयतांना अंगाला उटणे तेल लावून स्नानात दोन तांबे पाणी घालण्यास दिले. एक दोन वेळेस पाय चेपण्यास संधी 'श्रीं'नी दिली. सौ. प्रभा पाय चेपण्यास येताच 'श्री' नको नको म्हणत होते. मी प.पू. महाराजांना म्हटले, ''महाराज प्रभाला बरोबर पायाच्या पोटऱ्यातील शीरा धरून मळता येतात. आमच्या वडीलांनाही तिचे पाय चेपणे सुखावह वाटायचे. आज खूप चाल झाली आहे; कृपया आपण तिला पाय चेपू द्यावेत.'' सौ. प्रभाला सेवा फक्त ५-७ मिनिटे का होईना पण मिळाली.

३४) हरिहरेश्वरहून 'श्रीं'चे प्रस्थान

दि. १७.४.१९८१, शुक्रवार. उजाडलाच तो दिवस! पहाटे चार वाजताच 'श्रीं'ना जाग आली. आम्हीही उठलो होतोच. प्रातर्विधी, मुखमार्जन, चहापान आटोपून पहाटे ५ वाजता एका गाडीमध्ये ड्रायव्हिंगला संजय, बाजूला मी, मागे रघुनाथराव व प.पू. महाराज तर नंदुच्या गाडीत सौ. आईसाहेब, सौ. सवितावहिनी, मंदावहिनी, आमोद व रेणुका ही दोन मुले असे निघालो.

म्हसळा गाव मागे टाकले, दाट वनश्रीमधून पहाटेच्या सुरम्य वेळी आमची गाडी 'श्रीं'ना घेऊन साई मोरब्याचा घाट चढू लागली. पक्षी कूजन करू लागले होते. झुंजुमुंजू पहाट होऊ लागली होती. पूर्व दिशा गुलाल उधळीत होती. सूर्यनारायण 'श्रीं'चे दर्शनास येत होते. आमची कार घाटाचा डोंगर संपवून उतारास लागत होती आणि इतक्यात काय आश्चर्य! आमच्या या रायगड जिल्ह्यात कधीही न दिसणारा दुर्लभ-दर्शन मयूर आमच्या गाडीच्या समोरून आडवा गेला. घाटाचा उतार असल्याने गाडी अत्यंत मंद गतीत पुढे जात होती. हा मोर गाडी मधील श्री मयूरेश्वर गजाननाच्या दर्शनाला आला होता की काय? न कळे. कारण पुढे गाडीच्या दिशेने जाऊन 'श्रीं'चे दर्शन होईल अशा फांदीवर बसून गाडीकडे पहात होता. आमच्या तोंडून सहज उद्‌गार निघाले. ''मोर मोर!'' 'श्रीं'नीही बाहेर डोकावून त्या भाग्यवंतास दर्शन दिले. घाट उतरून काळनदी ओलांडून आम्ही पाली रस्त्यास लागलो. रस्ता दाट जंगलातून काळनदीच्या काठाकाठाने जात होता. साधारण सकाळी ७ ते ७.३० च्या दरम्यान आम्ही 'श्रीं'चे आज्ञेने श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनास पाली येथील मंदिरात पोहोचलो. तेथील एका ब्राह्मणाचे अंगणात चहाचे हॉटेल होते; त्या मालकांना भेटून प.पू. महाराजांची माहीती सांगून सर्वांस दुधाचा चहा बनविण्यास सांगितला. सौ. आईसाहेबांसह आम्ही सर्वांनी चहा घेतला. प.पू. महाराजांनी मात्र काही घेतले नाही. श्री बल्लाळेश्वराची नुकतीच पूजा झाली होती. पुजाऱ्यांनी 'श्रीं'ना तीर्थोदक दिले. श्री बल्लाळेश्वराचे सर्वांनी दर्शन घेतले; 'श्रीं'चे नावे अभिषेकास व वर्गणी म्हणून पावती केली व आम्ही पुणे मार्गास जाण्याकरता खोपोलीकडे निघालो.

गाडीचे इंजिन गरम झाले होते. खंडाळा घाट संपवून आम्ही लोणावळ्यात शिरत होतो. रेडीएटर मध्ये पाणी घालणे आवश्यक होते; पाणी कोठे मिळेल हा प्रश्न मला व संजयला पडला होता. 'श्रीं'च्या हे लक्षात आले व 'श्री' म्हणाले, ''आणखी जरा पुढे चला नाक्यावर डाव्या बाजूलाच पेट्रोलपंप लागेल. बाहेर झाडाखाली पाण्याची दोन पिंपे भरून ठेवलेली असतात तेथे पाणी मिळेल; ते पाणी मोटार गाड्यांकरीताच ठेवलेले असते!''

खरंच जरा पुढे जाताच पेट्रोल पंपाजवळ पिंपे व पाणी काढण्याचा मगही दिसला. 'श्रीं'चे श्री. भगवानराव पटवर्धन यांच्याबरोबर या मार्गाने जाणे-येणे होत असे, म्हणून त्यांना हे माहीत

होते. पाणी भरून आम्ही मार्गस्थ झालो. 'श्रीं'च्या घरी आम्ही १२ चे सुमारास पोहोचलो. भोजनोत्तर थोडी विश्रांती 'श्रीं'च्या आग्रहास्तव घेऊन 'श्रीं'चा निरोप घेऊन आम्ही मुंबईस ५.३० वाजता निघालो. चेंबूरला रात्री ९ च्या सुमारास पोहोचलो. सौ. प्रभाकडे आलो तेव्हा कळले की, पुतण्या संजय यांच्या पत्नीस प्रसुतीगृहात दाखल केली आहे. रात्री १.४० वाजता प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाले. सत्संगाचा, श्री हरिहरेश्वरातील स्वगृहीचा कार्यक्रम 'श्रीं'च्या कृपेने सुव्यवस्थित पार पडला.

'श्रीं'ना पुणे येथील घरी पोहोचविले आणि त्याच रात्री आम्हास नातू होऊन वृद्धीअशौच आले. हा कार्यक्रम सुरू असतानाच सोयर आले असते तर सोवळे ओवळे सारेच प्रश्न उभे राहिले असते. पण सद्गुरुंना काळजी म्हणूनच कार्यक्रमात कोणताही व्यत्यय आला नाही आणि चि. स्वप्नील हा भाग्यवान जीव कार्यक्रमाचे सांगतेस नागले घराण्यात जन्मास आला.

३५) हरिहरेश्वर कार्यक्रमाबाबत 'श्रीं'ची पत्रोत्तरे

प.पू. महाराज हरेश्वरी येण्याचे ठरल्यानंतर ते केव्हा किती तारखेला येणार, कोठून येणार, इंदोरहून, अकोल्याहून, देऊळगावराजाहून, जालन्याहून की पुण्याहून? आमच्या डोक्यात एकच विचार तो म्हणजे प.पू महाराज मुंबईस येतील तेव्हा त्यांना उतरवून घेण्यास रेल्वेच्या किंवा एस्.टी. बसच्या कोणत्या स्थानकावर आम्ही हजर रहायचे.

प.पू. महाराजांची पत्रोत्तरे दि. २३.३.१९८१ पहिले, २६.३.१९८१ दुसरे, ३.४.१९८१ तिसरे अशी आली.

संत सत्पुरुषांची वचनेआपल्याला ऐकायला मिळतात, त्यांची पत्रे वाचायला मिळतात; अगदी आपले नावे लिहीलेली पत्रे आपण वाचतो. परंतु आपल्या मनाची एकाग्रता नसते. सर्वोत्कृष्ट आकलन शक्ती नसते. शब्दातून, वाक्यातून अनेक अर्थ दडलेले असतात. त्याचा बोध आपल्याला होत नाही. मथितार्थांची उकल होत नाही. आपले मन ज्या विचाराने किंवा कल्पनेने व्यग्र असते, त्यानुसार आपली बुद्धी धावत असते. आज ती पत्रे वाचून माझे हृदय हेलावते, नेत्र पाणावतात, माझा मलाच राग येतो, माझ्याच मनाची - बुद्धीची कीव येते. कसे प्रमाद आपल्याकडून घडतात हे आपले आपल्यालाच कळत नाहीत. सत्पुरुषांनी, संतांनी आपली स्तुती, प्रशंसा, कौतुक केलेले आपल्याला बरोबर आकलन होते. हेच पहा ना!

दि. २३.३.१९८१ इंदोरहून पाठविलेल्या पत्रात महाराज लिहीतात...

''आम्ही अकोल्याहून परवा येथे आलो असून २८ तारखेस अकोल्यास परत जाऊ. तेथून पाडव्यापर्यंत देऊळगावी जाऊन, तेथे ७ एप्रिलला पू. पिताजींचा श्राद्धविधी उरकून,

२-३ दिवसांनी पुण्यास यावे व तेथून आपल्या पत्राप्रमाणे पुणे-श्रीवर्धन मोटारने ११ तारखेपर्यंत श्रीवर्धनला येऊन पुढे हरिहरेश्वरला यावे असा विचार आहे. बरोबर सामानाचे ओझे व प्रवासातील गर्दी, यामुळे जालना-मुंबई प्रवास कसा होईल याचा विचार करावा लागेल. देऊळगावी गेल्यावर चौकशी करून फोनने कळविता येईल. वाडीसही जाणे चैत्र पौर्णिमा होताच २-३ दिवसात होईल असे दिसते. तेथे यंदा श्री नारायण स्वामींचे उत्सवात कन्यागत पर्व काळानिमित्त श्री भागवत सप्ताह वाचन सेवा करावी असे वाडीहून पूजक मंडळींचे पत्र आले. त्यांना संमति-पत्र पाठविले आहे. त्यांचे पत्र जसे येईल तसे निघावे लागेल. तरी आपण २५ तारखेस रिझर्व्हेशन केले असेल त्याप्रमाणे निघून वाडीस यावे असे श्री. शृंगारपुरे यांना कळविले आहे. आम्ही दोघे व श्री. रघुनाथराव असे हरिहरेश्वर क्षेत्री येऊ. तेथे चार दिवस राहून पौर्णिमेपर्यंत पुण्यास यावे लागेल.''

२६.३.१९८१ इंदोरहून पाठविलेल्या पत्रात प.पू. महाराज लिहीतात....

देऊळगाव-मुंबई अशी मोटार असल्याचे आज समजले. त्याप्रमाणे त्या गाडीची दोन तिकीटे रिझर्व्ह करून ठेवण्यास आज देऊळगावी कळविले आहे. त्या गाडीने निघून आम्ही ९ तारखेस मुंबईस येऊ. बरोबर सामान असल्याने ते ठेवण्याकरीता माटुंग्यास श्री. माधवरावांकडे आपली परवानगी असल्यास जाऊ. मुंबईहून हरेश्वरी केव्हा निघणे ते आपणच ठरवावे. त्यावेळी आम्ही आपल्याबरोबर येऊ. आज आपणास फोन करण्यासही सांगितले होते. त्यावरूनही कळले असेलच. हरेश्वरचा २-४ दिवसांचा काय होईल तो प्रवास आटोपूनच आम्ही पुण्यास जाऊ. पुढे वाडीत जाण्याची त्वरा आहे व प्रवास संपावा असेही वाटते. श्री. शृंगारपुरे यांनी दिलेल्या स्टॉपवर चेंबूरला आम्ही उतरावे, का दादरला ते पुढील पत्यावर कळवावे, ''द्वारा - श्री. बापूसाहेब पारसकर.... अकोला'' या पत्यावर उलट टपाली पत्र पाठवावे. अकोल्यास ४ तारखेपर्यंत मुक्काम होईल. बरोबर श्री. रघुनाथराव आहेत.

या प्रमाणे सर्व आपल्या इच्छेनुसार ठरले आहे. हरेश्वरी सर्वांच्या भेटी होतीलच. सिंदखेड-मुंबई ही एस्.टी. देऊळगावहून येते व देऊळगावी रिझर्व्हेशनही मिळते. आता यात सर्वांस अनुकूलच झाले आहे. परत जाताना हरेश्वरहून श्रीवर्धनला जाऊन तेथून आम्ही पुण्याला जाऊ. पुन्हा मुंबईस परतण्याची दगदग नको असे वाटते. विचार व्हावा. (विचार करण्यासारखेच त्यांचे वय आहे. ७१ वर्षे पूर्ण).

दि. ३.४.१९८१ अकोल्याहून पाठविलेल्या पत्रात महाराज लिहीतात...

''आपले ३० तारखेचे पत्र मिळाले. इंदूरहून आपणास पाठविलेल्या पत्रात तिथे आपल्या इच्छेप्रमाणे कार्यक्रम ठरविण्यास लिहीले आहेच. तरी आम्ही सायनला उतरल्यानंतर आपण जसे ठरविले असेल तसे उतरण्यास, राहण्यास जाता येईल. १० तारखेस हरेश्वर क्षेत्री जाणे

होईल. तेथे ४ दिवस थांबून १५ तारखेपर्यंत हा प्रदीर्घ प्रवास संपावा अशी इच्छा आहे. आम्ही येथे २९ तारखेस आलो. येथून परवा पाडव्याचे दिवशी सायंकाळी अकोला-पुणे गाडीने निघून रात्री ९ वाजेपर्यंत देऊळगावी जात आहोत.''

या वरील तीन पत्रांवरून प.पू. महाराजांच्या सतत प्रवासाची कल्पना येते.

२१.३.१९८१ अकोला ते इंदूर २८.३.१९८१ इंदूर ते अकोला पाडव्यापर्यंत अकोला ते देऊळगावराजा पुढे २-३ दिवसात देऊळगाव-पुणे असा विचार.

११.४.१९८१ पुणे-श्रीवर्धन-हरेश्वरचा विचार बरोबर सामानाचे ओझे, प्रवासातील गर्दीमुळे जालना-मुंबई मोटारने प्रवास कसा होईल याचा विचार करावा लागेल.

(ही पत्रे कोणाचे नावे पाठविली होती? शशिकांत नागले यांच्या! होय ना? मग विचार कोणाला करावा लागेल? नागलेंना करावा किंवा नागलेंनी तो करावा! होय ना? पण नागलेंच्या मंद बुद्धीच्या डोक्यात त्यांच्या दुर्दैवाने विचार सुद्धा आला नाही. आला असता तर 'श्री' असतील तेथे आपली गाडी ते घेऊन गेले असते. साधकांच्या ह्या चुका होतात त्या अशा. आम्हाला आमचा एकच स्वार्थी विचार, महाराज मुंबईस येतील मग पुढे ते आपलेच आहेत. तेथून पुढे सर्व आपणच करणार! (किती क्षुद्र आहोत आपण आणि आम्ही साक्षात् दत्तप्रभूंना घेऊन निघालो होतो!)

प.पू. महाराजांना पुढील कार्यक्रम वाडीचा तरी किती शारीरिक श्रमाचा होता. मग या पुढील प्रवासाचे त्रासाचा विचार नको होता का करायला? तरी वारंवार ते थकून भागून म्हणत आहेत की, आता हा दीर्घ प्रवास संपावा. पण निदान त्यांना एखाद्या ऐसपैस एअरकंडीशन गाडीची सोय करून तरी आराम देता आला नसता कां? हरेश्वरी आम्ही त्यांना आराम करण्याकरीता नेले होते. पण हा प्रवास?

आता दि. १७.४.१९८१ ला मी त्यांना पुणे येथे श्री रेणुका निवासात सोडून परतलो आणि लागलीच त्यांनी १८.४.१९८१ रोजी मला लिहीलेले पत्र पहा... ''सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम. काल दुपारी (आम्ही प.पू. महाराजांना दुपारी १२ नंतर घरी सोडले ता. १७ रोजी! आणि त्याच दुपारी महाराज आश्रमात गेले. प्रवासाचा एवढा शीण असून सुद्धा!) आश्रमात येणेस आम्हाला वेळ लागला. आपण ठरविल्याप्रमाणे आम्हाला व सर्व साधकांना हरेश्वर क्षेत्री नेऊन एक आठवडा उत्तम व्यवस्था केल्यामुळे पूर्ण विश्रांती मिळाली. पुन्हा येथे घरापर्यंत पोचवून आपण परत गेलात. ८-१० दिवस आपली कामे बंद ठेवून, हरेश्वरच्याच कार्यात आपण व्यग्र होतात. अहोरात्र तिकडेच लक्ष होते. शांत चित्त, मधुरवाणी, नम्रता ही पारमार्थिक साधने आपल्या ठिकाणी आहेत. त्याही साधनांचा अभ्यास स्वत:च्या साधनाभ्यासा बरोबर जीवनात ठेवला पाहिजे. परमात्मा सर्व करवून घेतो. काळजीचे कारण नाही. तेथे आम्हाला तर मोठाच

लाभ झाला. प्रवास उन्हाळा यामुळे मूळव्याधीचा त्रास सुरू झाला आणि आता वाडीत तर ४-५ तास भागवता करीता बैठक कशी होईल ही चिंता निर्माण झाली. पण श्री कालभैरवांच्या, श्री हरेश्वरांच्या प्रेरणेने श्री. रघुनाथरावांनी ऊन दूधातून चमचाभर तूप घालून २-३ दिवस दिल्यामुळे तो त्रास व चिंता दूर झाली. आता प्रकृती ठीक असून वाडीची काळजी राहिली नाही. हरेश्वर न करता परस्पर जर आम्ही इकडे आलो असतो तर त्रास झाला असता. असो सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

प्रेममयी वात्सल्यमूर्ती माऊलीचे हे आपल्या बाळावर उधळलेले कौतुकाचे बोल! आम्हास काय त्रास झाला त्याचा कोठेही उल्लेख नाही. मूळव्याधीचा त्रास सुद्धा कार्यक्रम संपवून घरी गेल्यानंतर कळवित आहेत. गुण देणे, शक्ती देणे, कार्य करवून घेणे हे सर्व आपले हाती असून आमच्या कर्तृत्वाचे कौतुक! प.पू. महाराजांना जी काही पारमार्थिक साधने माझ्यात दिसली ते त्यांच्या सहवासाचे फळ होते. गुणांच्या निधीच्या सहवासात दुर्गुणी राहिलच कोण? हे म्हणजे सूर्याने समोर त्याच्याच तेजाने उजळलेल्या य:कश्चित मानवास "तू किती तेज:पुंज दिसतोस" असे म्हणण्यासारखे आहे. प.पू. महाराजांचे सान्निध्य नसताना सुद्धा ही पारमार्थिक साधन संपत्ती उदून दिसली पाहिजे. म्हणूनच महाराज पुढे म्हणतात की, "त्याही साधनांचा अभ्यास स्वत:च्या साधनाभ्यासाबरोबर जीवनात ठेवला पाहिजे. परमात्मा सर्व करवून घेतो." गुरु महाराजांची कृपा झाली तर अशक्य काय आहे? आपण संत सत्पुरुषांच्या सहवासात गेलो की आपले दुरित दूर जाते. अष्टसात्विकभाव जागृत होतात. सत्वगुण प्रकर्षाने आपाद मस्तक भरून राहतो. चेहऱ्यावर, नेत्रात, बोलण्यात, वागण्यात सर्व सात्विकता भरून येते. परंतु ही दैवी गुणसंपत्ती जीवनात नित्य टिकून राहिली पाहिजे आणि त्या करता रोजच्या साधनेत, हे पारमार्थिक गुण अंगी बाणण्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे असेच प.पू. महाराज आपल्याला सांगत आहेत. प.पू. महाराज विनयाची मूर्ती! अत्यंत विद्वान असून अतिशय नम्र आहेत. अशी व्यक्ती पाहिली तर कोणत्या सज्जनाचे चित्त हरण होणार नाही? सुवर्णाच्या कोंदणातील हिरा पाहून कोणाच्या नेत्रास आनंद झाल्याशिवाय राहील?

"विद्या विनयेन शोभते"

आपल्याकडील गुण झाकून समोरील माणसाची तेच गुण पाहून प्रशंसा करणे हे तर आहेच. परंतु प.पू. महाराज प्रत्येक व्यक्ती मधील दोष न पाहता त्या व्यक्तीत असलेल्या गुणांची मुक्त कंठाने प्रशंसा करतात. साधकावस्थेतील प्रत्येक व्यक्तीस त्या प्रशंसेतून, कौतुकातून सहज प्रोत्साहन मिळत असते. प.पू. महाराज त्याच्या विरोधात असलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी जे काही गुण आहेत ते आम्हा साधकांपुढे आदर्श म्हणून ठेवतात. याची उदाहरणे पुढे येतीलच!

शत्रुत्व धरलेल्या व्यक्तीबद्दल सुद्धा दयार्द्र अंत:करणाचे दर्शन महाराजांचे वचनातून सहजगत्या प्रकट होते. आठवले म्हणून येथेच खाली देत आहे.

३६) तुम्ही त्याला आपला मुलगाच समजा

प.पू. महाराज १९८० ते ८१ पर्यंत शनिवार पेठेत कन्या शाळेसमोर वर्तक वाड्यात तिसऱ्या मजल्यावर रहात होते. रोजचे जिने उतरणे होतेच शिवाय संडास तळमजल्यावर, पाणी वर चढले नाही तर खालून भरावे लागे. अतिशय त्रास प.पू. महाराज व कुटुंबीय सहन करीत होते. प.पू. महाराजांनी प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांच्या आज्ञेने म्हणा किंवा त्यांची तीव्र इच्छा लक्षात घेऊन प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या समग्र संस्कृत वाङमयाचे संकलन करून सर्व ग्रंथांचे प्रकाशन केले. त्यांच्या ह्या सेवेबद्दल काही निधी प.पू. दत्तमहाराजांना दिला तर ते स्वीकारणार नाहीत म्हणून गुरु महाराजांनी त्यांना नवीन होत असलेल्या अत्रेय सहकारी सोसायटीत एक प्लॉट घेऊन दिला. प.पू. महाराज तो स्वीकारण्यास तयार नव्हते. परंतु गुरुमहाराज म्हणाले, "आम्ही हा प्रसाद म्हणून देत आहोत." मग स्वीकारणे क्रमप्राप्त झाले. पुढे प.पू. महाराजांनी त्यावर तीन खोल्यांचे घर बैठकीची खोली, शयनगृह, स्वयंपाक घर व संडास, स्नानगृह लागून असे बांधण्यास घेतले. यथावकाश ते पूर्ण झाले; आता वास्तुशांत होऊन प्रवेश होणार होता. ही १९७८-७९ ची गोष्ट असेल. इतक्यात एक प.पू. गुळवणी महाराजांचा अनुग्रहीत गृहस्थ श्री. फडणीस; तो बदली होऊन पुण्यास आला व प.पू. दत्तमहाराजांना भेटून म्हणाला,"महाराज माझी बदली पुण्यास झाली आहे, मी एका इमारतीत ब्लॉक घेतला आहे. त्या इमारतीचे काम ५-६ महिन्यात पूर्ण होईल. तोपर्यंत मला तुमच्या अत्रेय सोसायटीतील घरात, एका खोलीत केवळ सहा महिन्याकरीता रहायला जागा द्याल कां?" आपल्या अडचणींचा पाढा त्याने कथन केला. माऊली द्रवली व म्हणाली, "एक खोली सहा महिन्याकरीता काही हरकत नाही, परंतु पुढील हप्त्यात आम्ही वास्तुशांत करून घेत आहोत ती होऊ द्या नंतर तुम्ही रहायला या."

पडत्या फळाची आज्ञा! दुसऱ्या दिवशीच सर्व सामान घेऊन फडणीस आले आणि एक खोली म्हणता म्हणता सर्व घर व्यापून टाकले; अगदी भटाला दिली ओसरी प्रमाणे.

नंतर प.पू. महाराजांच्या मुलांचे म्हणणे ऐकून त्याने एका खोलीत संसार थाटून, संडास स्नानगृह बाहेरील आसमंत, याचा उपभोग साहजिकच तो घेऊ लागला. सहाचे दहा महिने झाले तरी गडी घर सोडायला तयार नाही. माझे घराचे काम आता होत आले आहे. दोन महिन्याने होईल, एक महिन्याने होईल असे म्हणता म्हणता महिन्यामागे महिने जाऊ लागले. नंतर असे

कळले की आपला तयार झालेला ब्लॉक त्याने दुसऱ्यास भाड्याने दिला आहे. या घराचे तो फक्त लाईट व पाण्याचे बिल श्री. अनिल कडे देत होता. एकदा तर १-२ महिने तेही दिले नाहीत. अनिलने बिलांचे भरणे करायचे आहेत म्हणून पैशांचा तगादा लावला. त्याने चेक दिला. अनिलने नाईलाजाने तो घेतला. परिणामी तो स्वत:स, ''मी तुमचा भाडोत्री आहे'' असे म्हणू लागला. ''कधी घर सोडणार? कधी जाणार?'' विचारले तर, ''प.पू. महाराज स्वत: सांगतील 'जा' म्हणून तेव्हा जाईन'' म्हणू लागला. एकदा सौ. आईसाहेब त्याच्याकडे जाऊन त्यांच्याशी खूप भांडून आल्या. मी त्यावेळेस दर्शनास प.पू. महाराजांचेकडे वर्तक वाड्यात आलो होतो. प.पू. महाराज माझ्याजवळ काही बोलत बसले होते, इतक्यात सौ. आईसाहेब आल्या. खूप चिडलेल्या! त्या प.पू. महाराजांचे समोर उभ्या राहून बोलू लागल्या, ''अत्रेय सोसायटीत जाऊन आले. त्या सूज्ञ माणसाला म्हटले अरे तू जाणार तरी कधी आहेस? आम्ही त्या वर्तक वाड्याच्या तिसऱ्या माळ्यावर किती गैरसोईत अपुऱ्या जागेत रहात आहोत. आमच्या तीन मुलांना रहायला जागा नाही. त्यात आता धाकट्या अजितचे लग्न करायचे आहे. आमच्या मुलांनी कोठे रहायचे?'' त्यावर तो शहाणा म्हणतो कसा! 'अहो आई मलाही तुमचा मुलगाच समजा.' या सर्व त्राग्यावर प.पू. महाराज अगदी शांत चित्ताने म्हणाले, ''तो म्हणतो आहे तर ठीक आहे. तुम्ही त्याला आपला मुलगाच समजा, म्हणजे तुम्हाला हे दु:ख होणार नाही.''

त्यानंतर मुलांनी प.पू. महाराजांच्या जावयांनी आश्रमात येणारे आय.जी.पी. श्री. देशपांडे यांच्या सहाय्याने घर खाली करवून घेतले. तसे त्यांनी आधी केलेले होतेच. पण नावाला एक वळकटी ठेवली होती व कुलुपाची चावी त्याच्याकडे होती. पोलीसांकडून कुलूप फोडून आतील त्याचे वस्तुंचा म्हणजे वळकटीचा पंचनामा झाला.

तो म्हणत होता महाराजांनी मला जा म्हणावे व प.पू. महाराज त्या अतिथी देवास जा म्हणायला तयार नाहीत. शेवटी पंचनामा होऊन झाल्या प्रकारानंतर त्या फडणीसाने वार्ताहर गाठले आणि सकाळला बातमी आली.

३७) प.पू. दत्तमहाराज कवीश्वरांनी घरफोडी केली

मी पुण्यात वासुदेवाश्रमात आलो होतो; मुक्काम होता आणि सकाळी ही बातमी वाचताच चहा न घेताच वर्तक वाडा गाठला. 'श्रीं'चे दर्शन घेतले. चरणावर डोके ठेवले अश्रूंना वाट दिली म्हटले, 'महाराज हे पेपरला काय लिहून आले आहे?'

महाराज म्हणाले, ''नेहमी चांगलेच नाव व्हावे, आपला उदा उदो व्हावा हे आपण मनाशी धरलेले असते, म्हणूनच अशा बदनामीने दु:ख होते. नांवाचा उदो आणि बदनामी याकडे लक्ष

न देता आपण आपल्या सन्मार्गाने चालत रहावे.''

''जो नाव लौकिक होतो किंवा जी काही बदनामी होते ती आपले देह-व्यक्ती म्हणून होत असते. आपल्या आत्म्याचा त्याच्याशी काहीच संबंध नसतो. आरोप देहावर असतात. आपली आत्मशांती आपण ते ऐकून घालवू नये. देह धारणेत तरी असे कुठे आहे की, आपले चांगले नावच व्हावे, वाईटही होईल!

'जशी श्रींची इच्छा'

ज्यांना तुमचे आमचे, मागचे पुढचे जन्म सुद्धा कळतात, त्या प.पू. महाराजांना, ह्या सद्गृहस्थाला जागा देऊन, आपल्यावर व आपल्या कुटुंबावर काय प्रसंग येणार याची माहिती असणारच. परंतु प्रारब्ध न टाळता, केवळ भोगूनच संपवावं, ह्या हेतूने जागा भाड्याने दिली असावी.

पुढे आपण रीतसर या वास्तुचे भाडोत्री आहोत व आम्हांस बाहेर काढले गेले असे आरोप पत्र व कोर्टात केस त्या उद्धव फडणीसानी प.पू. महाराजांवर दाखल केली. केस न्यायदेवतेपुढे उभी राहिली आणि प.पू. दत्तमहाराजांना आरोपीचे पिंजऱ्यात उभे करण्यात आले. तेव्हा न्यायाधिशांनी प.पू. महाराजांचा वयाचा वृद्धापकाळाचा विचार करून त्यांना खुर्ची देण्यास व खुर्चीवर बसण्यास सांगितले. प.पू. महाराज न्यायदेवते पुढे नतमस्तक होऊन म्हणाले, ''क्षमा मागतो आम्ही न्याय देवते समोर आसन ग्रहण करू शकत नाही.''

महाराज बसले नाहीत. पुढे केस चालली तारखा पडल्या व अखेर निर्णय प.पू. महाराजांचे बाजूनेच झाला.

प.पू. महाराज आता सहकुटुंब अत्रेय सहकारी सोसायटीत प्लॉट नं. १३, 'श्री रेणुका निवास' येथे राहण्यास आले. कवीश्वर कुटुंबीयांची कुल देवता माहुरगडाची श्री रेणुकामाता म्हणून घराचे नावही 'श्री रेणुका निवास' ठेवले. ही वास्तु सुद्धा फक्त तीन खणीच होती. बाहेरचा हॉल १२ x १० नंतर पॅसेज, पॅसेजमध्येच उजवीकडे वॉश बेसीन तर डावीकडे बेडरुम मध्ये प्रवेशद्वार. बेडरुम सुद्धा १२ x १० चीच असावी.

''श्रीं''चे वास्तव्य त्याच रुमचे ईशान्य कोपऱ्यात देवांचा चौरंग पॅसेज मधून पुढे गेल्यास उजवीकडे संडास बाथरुम. जरा पुढे गेले की, डावीकडे स्वयंपाकघर प्रवेशद्वार, डावीकडे गच्चीवर जाण्याकरीता जागा सोडलेली. तशी जागा खूपच अपुरी होती म्हणून प.पू. महाराजांचे द्वितीय चिरंजीव श्री. अनिल सहकुटुंब काही दिवस वर्तक वाड्यात पूर्वीच्या जागी रहात होते.

३८) हरिहरेश्वरी ऐकल्या 'श्रीं'च्या आठवणी

श्री हरिहरेश्वराचे दि. १०.४.१९८१ ते १७.४.१९८१ पर्यंतच्या वास्तव्यात सायंकाळी त्रिपदीपूर्वी आम्ही सर्व साधक मंडळी काहीना काही प्रश्न विचारत असू आणि प.पू. महाराज उत्तरे द्यायचे, त्यातून प.पू. महाराजांच्या पूर्व इतिहासाबद्दल कळलेली माहिती अशी,

व्रतबंध वाडीस झाल्यानंतर प.पू. महाराज रोज कृष्णा नदीतून पोहत पलीकडे (औरवाड) दत्त अमरेश्वरास जात. तेथे प.प. नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचे वास्तव्य होते. (दीक्षित स्वामी हे प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांचे पट्टशिष्य) प.प. स्वामी महाराज आठ वर्षांच्या दत्तू बाळास संध्या शिकवीत. संस्कृत स्तोत्रे शिकवीत. अनेक ग्रंथांचे वाचनही त्यांनी विद्यार्थी दशेत करून घेतले. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी संपूर्ण भागवत ग्रंथाचे संहिता वाचन प.पू. दत्तमहाराजांकडून करवून घेतले. इतकेच नव्हे तर झालेल्या वाचनावर ते दररोज सायंकाळी पाच पाच तास निरुपण करायचे. प.पू. महाराजांनी, प.प. स्वामींना गुरुस्थानी मानून शिष्यत्व पत्करले. त्यांना त्यांच्या सहवासात सतत रहावे असे वाटे. महाराज प्राथमिक शाळेत संस्कृतचेही पठण करीत असताना प.प. स्वामीमहाराज तीर्थाटनास निघाले. काही विद्यार्थीही कोल्हापूरपर्यंत सोबत गेले होते. प.पू. दत्तमहाराजही त्यात होते. सर्व विद्यार्थी अध्ययनाकरता परत फिरले. परंतु दत्तूबाळ काही गुरुमहाराजांचे चरण सोडून येण्यास तयार नव्हते. शेवटी पिताश्री प.पू. धुंडीराज महाराज स्वत: आणण्यास गेले. त्यांची समजूत काढणे फार कठीण गेले. त्यांना स्वामी महाराजांचे सोबत तीर्थाटन करायचे होते. शेवटी गुरुमहाराजांनी समजावून, उपदेश करून व पुन्हा आपला सहवास होणार आहे, प्रथम आपले कर्तव्य! आपला विद्याभ्यास! वगैरे सांगून त्यांना पिताश्रींबरोबर परत पाठवले. साश्रू नयनांनी, अगदी जड अंत:करणांनी दत्तूबाळ आपले वडीलांसवे वाडीस वेदपाठशाळेत परतले.

महाराज पुढील वेदाध्ययनास हुबळी धारवाड येथे होते. सुट्टी मिळताच नृसिंहवाडीस आले की प्रथम ते गुरुभेटीस अमरेश्वराकडे नदीतून पोहत जात.

एकदा नदीस महापूर असताना असेच ते कृष्णा नदीत उडी मारून पलीकडे जात असताना पाण्याच्या भोवऱ्यात सापडले. तो प्रसंग आम्ही विनंती केल्यावर त्यांनी कथन केला. तो त्यांच्याच शब्दात पुढे देत आहे.

''आम्ही सुट्टीत नृसिंहवाडीस आलो होतो. सद्गुरु परमहंस परिव्राजकाचार्य नृसिंहदीक्षित स्वामी गुरुमहाराज पलीकडे दत्त अमरेश्वराच्या मंदिरास लागून असलेल्या मठात रहात होते. आम्हास गुरुदेवांच्या दर्शनाची अत्यंत उत्कंठा होती. कृष्णा नदीस महापूर आल्याने नावाही बंद होत्या. सर्वांचे म्हणणे होते, महापूर ओसरल्या शिवाय जाऊ नये. पण आम्हास उसंत नव्हती. केव्हा सद्गुरुंचे दर्शन घडेल ही मनास इतकी ओढ होती की त्या महापुराचे आम्हास

यत्किंचितही भय वाटले नाही. सद्गुरु संरक्षणक्षम आहेत; ते सांभाळणारे आहेतच! बालपणापासून पोहण्यात आम्ही सर्व संवंगड्यांसोबत प्राविण्य मिळविले होते. आम्ही पुढचा मागचा विचार न करता पुरात उडी घेतली. गुरुमहाराजांची भेट लवकरात लवकर कशी होईल? एवढीच उत्सुकता आम्हास होती. पलीकडे जाईपर्यंत आमची चांगलीच दमछाक झाली. पण आम्ही जिद्दीने पैलतीर गाठला. सद्गुरुंची भेट झाली. त्यांचा कारुण्यमय हात आमच्या पाठीवरून फिरला; आमचा सर्व श्रमपरिहार झाला. म्हणाले, 'कशाला एवढी दर्शनाची घाई करायची? चार दिवस जाऊ द्यायचे होते.' शाबासकीचे हात पाठीवर पडले. आम्ही बराच वेळ त्यांचे प्रेमळ आश्रयास थांबलो; दुपारनंतर निरोप घेऊन निघालो. 'सांभाळून जा, काळजी घ्या' म्हणाले. आम्ही म्हटले, 'आपण आमची काळजी घेतच आहात. मग भय कसले?' आम्ही परत फिरलो, पुरात पुन्हा उडी मारली. वाडीच्या तीराकडे सरकू लागलो; पाण्याला फारच ओढ होती. मध्य गाठला न गाठला आणि आम्ही पाण्याच्या फिरत्या भोवऱ्यात सापडलो. गर गर गर फिरत आम्ही केव्हा नदीच्या तळाशी गेलो कळलेच नाही. गटांगळ्या खात होतो. धीर सुटू पहात होता आणि इतक्यात आधारास दोन हात धावून आले. त्यांनी दंडास धरून आम्हास पाण्याचे पातळीवर आणले. आम्ही श्वास घेऊ शकलो. पुन्हा व्यवस्थित पोहू लागताच ती सहाय्य करणारी व्यक्ती आमचा दंड, आमच्या पोटाखालील आधार काढून कोठे नाहीशी झाली आम्हास कळलेच नाही. आम्ही खूपच तीराजवळ आणि सौम्य प्रवाहात पोहोचलो होतो. वळून वळून आमचे नेत्र त्या व्यक्तीस शोधत होते पण ती व्यक्ती कोण? आम्हाला कळलेच नाही. श्री सहाय्य अनाकलनीयच असते, ते कसे कळायचे? ती व्यक्ती तरी दुसरी तिसरी कोण असणार?'' इति.

साधकांना उत्सुकता होती की, प.पू. दत्तमहाराज यांचे पहिले गुरु प.प. नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराज आणि योगदीक्षा दाते प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज असे कळते; तेच श्रींचे तोंडून ऐकायचे होते.

साधकातून प्रश्न - महाराज! आपले पहिले गुरु प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराज होय ना?

महाराज - होय! संध्या शिकविण्यापासून वयाचे आठवे वर्षी त्यांनीच आम्हास उपदेश दिला. विद्यार्थी दशेत आम्हाला त्यांचे मार्गदर्शन झाले. तसा ब्रह्मवाक्याचा बोधही झाला. ते वात्सल्यमूर्ती होते. (त्यांच्या नेत्रातून चाक्षुषी दीक्षा प्राप्त होत असे असा प्रश्न करताच महाराज नुसते होय म्हणाले.)

साधकाकडून - आपणास प.पू. गुळवणी महाराजांकडून शक्तिपात दीक्षा झाली का?

महाराज - होय! दीक्षेच्या दोन दिवस आधी आम्हास स्वप्नात दृष्टांत झाला. ''प.पू.

श्रीधर स्वामी महाराज स्वप्नात येऊन त्यांनी सज्जनगडावर लागलीच निघून या अशी आज्ञा केली.'' दुसरे दिवशी प.पू. गुरुमहाराजांना (म्हणजे गुळवणी महाराजांना) आम्ही दृष्टांत सांगितला व गडावर येण्याची आज्ञा सांगितली. प.पू. गुरुमहाराज म्हणाले की, तुम्ही त्वरीत निघा व सज्जनगडावर प.पू. श्रीधर स्वामी महाराजांचे दर्शन घ्या. गुरुमहाराजांच्या आज्ञेनुसार आम्ही सज्जनगडाच्या पायथ्याशी पोहोचलो, पण तेथे आम्हास अंगात कसकस व ताप चढू लागला. थकवा आला. आम्ही तसा निरोप पाठविला. वरून निरोप आला की, 'अशक्तपणा असेल तर डोली करून वर यावे.' पण आमचे मनास ते पटण्यासारखे नव्हते. आम्ही हळू पावलाने दम खात खात गड गाठला. स्वामींच्या दर्शनाने आम्हास बरे वाटले. बराच हुरुप आला. भोजनोत्तर स्वामी महाराज म्हणाले, ''उद्या पहाटे आपणास दीक्षा होणार आहे. तरी पहाटे समाधी मंदीरात बसावे.''

आम्ही पहाटे स्नानादी आटोपून श्रींच्या (रामदास स्वामींचे) समाधी मंदिरात स्थानापन्न झालो. डोळे मिटून घेतले आणि डोळ्यांसमोर प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज आले. त्यांनी डोक्यावर हात ठेवला. योगदीक्षा झाल्याची अनुभूती आली आणि आमचा बराच काळ भावावस्थेत गेला.

एके सायंकाळी प.पू. महाराजांनी गांधीवधानंतर वाडीत दंगल व जाळपोळ झाली त्यात ते (प.पू. महाराज) कसे सापडले व त्यांच्या घरी ते कसे सुखरुप राहिले हे ईश्वरी कृपेचे वर्णन केले. प.पू. गुळवणी महाराजांच्या काही आठवणी सांगितल्या. त्यात पिताश्रींचे व प.पू. गुरुमहाराजांचे संबंध व आपले कुटुंबावर असलेली त्यांची कृपादृष्टी याचे वर्णन केले. ते म्हणाले, ''प.पू. गुरुमहाराज नेहमी आमच्याच कुटुंबातील थोर पुरुष वाटायचे व त्यांचे आम्हा सर्वांवर अतिशय प्रेम होते.''

आमच्या ऐकीवात ह्या गोष्टी होत्याच! प.पू. गुळवणी महाराजांना प.पू. दत्तमहाराजांबद्दल प्रथम भेटीपासून अत्यंत आदरभाव होता. ते त्यांना 'दत्तमहाराज' म्हणून संबोधीत असत. आश्रमात कोणी हार घालण्यास आले तर तो हार त्या व्यक्तीस, 'प.पू. दत्तमहाराजांना घाला,' असे म्हणत. प.पू. दत्तमहाराजांना प.पू. गुरुमहाराजांच्या समोर मान सन्मान स्वीकारतांना संकोचल्यासारखे होई आणि म्हणून आश्रमात गुरुमहाराजांचे दर्शन झाले की ते उठून व जमलेल्या भक्तगणांच्या अगदी मागे कोठेतरी कोपऱ्यात जाऊन बसत. प्रत्येकासमोर प.पू. गुरुमहाराजांच्या बोलण्यात प.पू. दत्तमहाराजांबद्दल प्रशंसोद्‌गार, पूज्यभाव ओसंडत असे.

३९) 'श्रीं'च्या आगमनाचे प.पू. गुळवणी महाराजांकडून स्वागत

श्री. प्रभुदेसाईंनी एक प्रसंग सांगितला - एकदा डोंबिवलीला प.पू. गुळवणी महाराज आले होते. प.पू. दत्तमहाराज दुसरे दिवशी येणार होते. दुसरे दिवशी प.पू. गुळवणीमहाराज हाराची पुडी घेऊन रेल्वे स्टेशनवर गेले व गाडीला उशीर झाला म्हणून प्लॅटफॉर्मवर आसन ठेवले होते, त्यावर न बसता नुसते येरझारा शतपावली घालावी तशा घालत होते. प.पू. दत्तमहाराज लोकल मधून उतरून प्लॅटफॉर्मवर येताच प.पू. गुरुमहाराजांनी प्रेमभराने प.पू. दत्तमहाराजांचे गळ्यात हार घातला. प.पू. गुरुमहाराजांचे चेहऱ्यावर भेटीचा आनंद ओसंडत होता.

आश्रमात कोणत्याही धार्मिक कार्यात होमहवन यागात प.पू. गुरुमहाराज प.पू. दत्तमहाराजांचा सल्ला व मार्गदर्शन घेत असत.

४०) प.पू. दत्तमहाराजांना महामहोपाध्याय पदवी

प.पू. दत्तमहाराज कमालीचे प्रसिद्धी पराङ्मुख होते. ते दुसऱ्याचे दोष न पाहता गुणच पहायचे व त्या गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा करायचे. परंतु त्यांची प्रशंसा किंवा गुणगान केले तर तिकडे लक्ष न देता ते भावावस्थेत निमग्न होत असत.

आश्रमात वेदाध्ययनास राहिलेले कृष्णा आर्वीकर यांनी सांगितलेले हे उदाहरण.

प.पू. दत्तमहाराज नित्याप्रमाणे एकदा 'श्री वासुदेव निवास' आश्रमात सायंकाळी ४ वाजता आले आणि ६ ते ६.३० पर्यंत घरी गेले. साडेसहा नंतर एक धोती, कुडता, उपरणे, टोपी अशा पेहरावात मध्यम वयाचे गृहस्थ गाडीने आले. त्यांनी समोर कृष्णा आर्वीकर होते, त्यांना विचारले, 'प.पू. दत्तमहाराज वर आहेत का?' आर्वीकरांनी महाराज घरी गेल्याचे सांगितले. सद्गृहस्थ म्हणाले, ''अहो आज त्यांना समारंभास जगद्गुरु शंकराचार्यांनी बोलावले होते. तुम्हाला त्यांचे घर माहीत आहे का? मग कृपा करून येता का आमच्या बरोबर?''

प.प. शंकराचार्यांकडून आले आहेत, म्हटल्यानंतर व्यवस्थापकांना 'जाऊन येतो,' सांगून कृष्णा निघाले. वर्तक वाड्याजवळ पोहोचताच या गृहस्थांना तीन मजले चढायला नको व प.पू. महाराजांचे परवानगी शिवाय त्यांना अचानक महाराजांपुढे नेणे नको. त्यांना त्यांच्या गाडीत मध्येच बसवून कृष्णा प.पू. महाराजांकडे गेले. नुकतीच सायंसंध्या आटोपून प.पू. महाराज बैठकीवर बसत होते. इतक्यात कृष्णा आल्याचे कळले. आत बोलावताच; आदरपूर्वक साष्टांग नमस्कार करून कृष्णा म्हणाले, ''आज आपणास पुण्यातच काही समारंभाकरीता श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांनी आमंत्रित केले होते ना?'' प.पू. महाराज स्मित हास्य करीत म्हणाले.

''हो आमंत्रण होते पण आम्ही पूर्णपणे विसरूनच गेलो. आता वेळ झाला आहे. राहू द्या, काही इलाज नाही!''

कृष्णा :- तसे नाही महाराज! त्यांनी कोण्या सद्गृहस्थास आपणास नेण्यास गाडीसह पाठविले आहे. आम्ही त्यांना खालीच थांबवून वर आलो आहोत.

प.पू. महाराज लागलीच उठले, धोतर सारखे केले, उपरणे व्यवस्थित लपेटले व काठी घेऊन निघाले. शंकराचार्यांच्या दर्शनास म्हणजे अनवाणीच जाणे!

श्री. कृष्णा आर्वीकरांना आश्रमात परतण्यास सांगून प.पू. महाराज त्या सद्गृहस्थांसोबत गाडीने समारंभ स्थळी गेले.

अहो हा समारंभ श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांनी खास प.पू. महाराजांकरिताच आयोजित केला होता. हा समारंभ 'महामहोपाध्याय' या महान पदवीने प.पू. महाराजांना विभूषित करण्याकरता होता. शंकराचार्यांचे प्रशंसोद्गाराचे भाषण झाले आणि त्यांनी प.पू. दत्तमहाराजांना आधीच्या असलेल्या 'विद्यावाचस्पती', 'ब्रह्मर्षी,' 'राष्ट्रीय पंडीत' या पदव्यास लागून ''महामहोपाध्याय'' ही पदवी देऊन सन्मानीत केले.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, समारंभानंतर प.पू. महाराज घरी आले. घरीही काहीही याबद्दल बोलले नाहीत. दुसरे दिवशी नित्याप्रमाणे वासुदेवाश्रमात गेले. तेथेही वाच्यता नाही. वासुदेव आश्रमास ही बातमी सहा महिन्यानंतर कळली.

४१) ईश्वराने संधी दिली आहे, तर उरकून घेतो संध्यावंदन

श्री. कृष्णा आर्वीकर यांनी सांगितलेला आणखी एक प्रसंग - प.पू. दत्तमहाराज लांबच्या प्रवासास रेल्वे गाडीने श्री. कृष्णा आर्वीकरांना सोबत घेऊन निघाले होते. सकाळी प्रात:संध्या घरी झाली होती. सायंकाळी गाडी एका मोठ्या जंक्शन स्टेशनवर येऊन थांबली. स्टेशन मोठे असले तरी अस्वच्छ व बकालच होते. गाडी अर्धा तास थांबणार होती. प.पू. महाराजांनी दर्भासनाची वळकटी घेतली. संध्या साहित्याची पिशवी घेतली व कृष्णास म्हणाले, ''आम्ही संध्या आटोपून घेतो.'' प्लॅटफॉर्मवर नाना ढंगाचे उतारु इकडे तिकडे जात येत होते. पिण्याचे पाण्याचे नळासह असलेले एक काँक्रीटचे बेसीन होते. प.पू. महाराजांनी त्या बेसीनच्या जरा अंतरावर पथारी टाकली. मदतीस कृष्णा तेथे येऊन उभेच होते. पथारी जवळ ते थांबले. परंतु कृष्णाची कोणतीही मदत न घेता प.पू. महाराज स्वत:च संध्येकरीता फुलपात्रात पाणी घेऊन आले. आसनावर बसले, भस्म धारणादी विधी पूर्ण करून १०-१५ मिनिटात संध्या पूर्ण केली. साहित्य गुंडाळून पुन्हा गाडीत जागेवर आले. प.पू. महाराजांनी दर्भासन अंथरताच कृष्णाने

प्रश्न केला, 'महाराज आपण येथे संध्या करणार?'

महाराज - ''होय! काय आहे, फार तर लोक म्हणतील कोणी तरी वेडा येथे काही तरी करीत बसला आहे, हसतील, होय ना? हसू देत! आपला कार्यभाग तर पुरा होईल! नित्यक्रमात खंड तर पडणार नाही; ईश्वराने संधी दिली आहे तर उरकून घेतो संध्यावंदन!''

४२) 'श्रीं'च्या अध्यापनाचे वैशिष्ट्य

कृष्णा आर्वीकरांचा आणखी एक प्रसंग - ''आम्ही जरी श्री घैसास गुरुजींच्या पाठशाळेत जात असलो तरी श्री. राजेश्वर शास्त्री आणि छात्र, प.पू. महाराजांपुढे पाठास बसत तेव्हा आम्हीही बसत असू. श्री. राजेश्वर शास्त्री पाठातील काही अडचणी शंका विचारीत. पुन्हा दुसऱ्या दिवशी तीच अडचण, शंका प्रश्नांकित करीत. प.पू. महाराजांचे अध्यापनातील वैशिष्ट्य असे; की न समजलेल्या पाठावर कितीही वेळा तोच तोच प्रश्न विचारा ते दरवेळी नव्याने आणि वेगवेगळ्या प्रकारे तो प्रश्न सोडवित असत. 'काल असे निराकरण केले, आज कसे करताहेत ते पाहूया.' असे छात्रांना वाटे. यात गुरुजींची परीक्षा किंवा त्रास देणे नव्हते. तर ज्ञान द्विगुणीत करणे आणि शिक्षणातील प.पू. महाराजांचे विवरणातील आनंद उपभोगणे असे. छात्राने आपले शुद्धाचरण कसे ठेवावे ह्या बद्दलही प.पू. महाराज धडे देत असत. क्षौर केव्हा करावे, कोणती तिथी वार, नक्षत्र वगैरे पाहून तसेच दाढी काढली तर डोक्यावरील केसही पूर्ण वपन करावेत, केस ठेवले तर दाढी मिशीही ठेवावी. स्वतः पंडीत-शास्त्री सर्व शास्त्रात निपुण असल्याने हे सर्व मार्गदर्शन होत असे.

४३) एका कटाक्षात

एकदा कृष्णाने केस ठेवले व दाढीही ठेवली होती. परंतु दाढी त्याने वरवर कातरून त्याला एक वैशिष्ठ्यपूर्ण आकार दिला होता.

तारुण्यात शाळकरी विद्यार्थी भांगपट्टी करतात तसाच हा प्रकार. पण असे करणे शास्त्रविरुद्ध होते. नेमके दुसऱ्या दिवशी काही कामानिमित्त आर्वीकरांना प.पू. महाराजांचे घरी जावे लागले. प.पू. महाराज आन्हिकात होते. प.पू. महाराज आन्हिकात, पोथी पठणात किंवा अनुष्ठानात असले तरी दारी आलेल्या व्यक्तीस त्याकरीता थांबवून ठेवीत नसत. पाठात योग्य ठिकाणी थांबून त्या व्यक्तीशी संभाषण करून मोकळे करीत. उदा. संध्या चालू असेल तर अर्घ्यापर्यंत नेऊन थांबवित. कृष्णा आर्वीकरांना बोलावताच ते आत गेले. आत जातानाच

ते खूप घाबरलेले होते. आपण शास्त्रबाह्य वर्तन केल्याची मनास टोचणी होती. प.पू. महाराज रागावतील, काही तरी बोलतील, काही तरी समज देतीलच! आत येताच गुरुजींचा मान राखण्याच्या नित्य पद्धतीप्रमाणे दंडवत घालून समोर उभे राहिले. बसा म्हणताच समोर बसले. जे काही कथन करायचे ते कृष्णाने केले. प.पू. महाराजांनी त्याबद्दल काय सांगायचे ते सांगितले. जातांना निरोपाकरीता डोके टेकून उठता उठता प.पू. महाराजांनी त्यांची दाढी निरखत असा काही कटाक्ष टाकला की कृष्णा काय ते समजून गेले. लागलीच पंचांगाप्रमाणे तिथी वार पाहून न्हाव्याकडे गेले व संपूर्ण क्षौर करून घेतले.

४४) श्री. कृष्णा आर्वीकर यांच्या घरचा श्री भागवत सप्ताह

नागपूर येथे एका सधन गुरुभक्ताघरी प.पू. महाराजांचा भागवत सप्ताह होता. त्या भागवताची समाप्ती झाल्यानंतर लागलीच वेदमूर्ती कृष्णा आर्वीकरांचे घरी प.पू. महाराजांचे निरुपणाने भागवत सप्ताह संपन्न होणार होता. आधीच्या सप्ताहात झालेली भाविकांची गर्दी आणि रोजचे अन्नदान पाहून आर्वीकरांना आपल्या जमवलेल्या सामुग्रीबद्दल शंका येऊ लागली. भागवत सप्ताह तर जाहीर करून बसलो. प.पू. महाराजांनीही अनुमती दिली; नित्य निरुपण सेवा त्यांचीच होती. हा पुण्याचा महानिधी आपणा पामराकडे चालून येत आहे. मनास मात्र उगाच शंका! लक्ष्मीदेवी साथ देतील की नाही? प.पू. महाराजांना अगदी मनोमन प्रार्थना केली, 'करते करवीते आपणच आहा! या लेकराला सांभाळून घ्या आणि सप्ताहात कोणतेही संकट किंवा कशाचीही कमतरता पडू देऊ नका.'

इकडे दुसरे दिवशी प.पू. महाराजांची सामानाची बांधाबांध सुरू झाली. सामान असे कुठे जास्त असायचे? धोतर, उपरणे, पंचे, शाल, वळकटी आणि पोथ्यांचे बाड. पण प्रवासास किंवा बस्तान इथून तिथे हलवायचे म्हटले की प.पू. महाराजांचे आवरा आवरीत तसेच बरोबर घ्यायचे सामान जेथल्या तेथे व्यवस्थित स्वत: स्वहस्ते बांधून जय्यत तयार असायचे. कोणत्याही प्रकारे सहप्रवाशाची आपल्यामुळे खोटी नको. लांबचा प्रवास असेल तर एक तास आधीच स्थानकावर हजर असत.

प.पू. महाराज सर्व आवरून शांतचित्त बसले होते. इतक्यात यजमान बाहेर आले व प.पू. महाराजांना वंदन करून म्हणाले, ''महाराज, भागवत सप्ताहाकरीता आणलेले कडधान्य, डाळदाणा, तांदूळ, गहू, तेल, तूप आणि टिकेल असा भाजीपाला, बटाटे, वांगी व फळफळावळ भरपूर शिल्लक आहे. सप्ताहात अन्नदानाच्या उद्देशाने ते आणले होते. तर या उरलेल्या सामानाचे काय करू?''

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो भागवत सप्ताह संपला कुठे आहे? आज तुमच्याकडे झाला. उद्या त्या कृष्णा आर्वीकरांकडे आहे! जे काही उरले सुरले असेल ते त्यांच्याकडे पाठवून द्या! तेथे त्याचा सदुपयोगच होईल! सत्पात्री लागेल.'' पुन्हा यजमानांनी शंका विचारली, 'ते हे सर्व स्वीकारतील ना?' प.पू. महाराज म्हणाले, ''स्वीकारतील! त्यांना सांगा आमच्याकडूनच हे सांगणे झाले आहे.''

श्री. कृष्णा आर्वीकर प.पू. महाराजांना आपल्या घरी नेण्यास वाहन घेऊन आले. तेवढ्यात यजमानांनी त्यांना खूण करून आत बोलाविले. सर्व सामानाकडे अंगुली निर्देश करून म्हणाले, ''हे सर्व सामान उरले आहे, तरी प्रार्थना आहे की, आपले येथे होणाऱ्या भागवत सप्ताहात या सर्व सामानाचा विनियोग व्हावा! आपण नाही म्हणू नका! प.पू. महाराजांनीच हा विचार आमच्या पुढे मांडला आहे.''

श्री. कृष्णा म्हणाले, सर्व करणारे व करवून घेणारे तेच आहेत. आम्ही त्यांचे वचनाबाहेर कधीच जात नाही.

दुसऱ्या दिवशी आर्वीकरांच्या दारात सामानाने भरलेल्या दोन बैलगाड्या उभ्या राहिल्या, आर्वीकर चिंतामुक्त झाले. भागवत सप्ताह समारंभाची सर्व तयारी झाली. गोकर्ण माहात्म्य सुरू होण्यापूर्वी कृष्णा सोबत प.पू. महाराज सर्व मंडप घरातील सर्व खोल्या, घराभोवतालचा सर्व आसमंतात फिरले; ''गोधन गोठ्यात किती आहे?'' प.पू. महाराजांनी विचारले, कृष्णा प.पू. महाराजांना गोठ्यात घेऊन गेले. प.पू. महाराज प्रसन्नचित्त होते. ''या सर्व गाई दुभत्या आहेत का?'' प.पू. महाराजांनी विचारले. एका गाई जवळ प.पू. महाराजांना नेऊन कृष्णा म्हणाले, ''महाराज बरेच महिने-वर्ष झाले, ही गाय आम्हास दानातून (गोवत्स) म्हणून मिळाली; पण ही काही फळली नाही, अजून ही अशीच आहे.'' प.पू. महाराजांनी सहजगत्या त्या गाईचे पाठीवरून हात फिरविला व म्हणाले, ''फळेल! लवकरच फळेल! दूध दुभते वाढेल!''

श्री. कृष्णा आर्वीकर यांचे घरी श्रीमत् भागवत सप्ताह यथासांग व निर्विघ्न पार पडला आणि वर्षभरात त्यांची गायही फलीत होऊन यथा समय व्याली आणि गुरुमहात्म्यातील, 'वंध्या महिषी'च्या गोष्टीप्रमाणे आर्वीकरांचे घरात दूध दुभत्याची वाढ झाली.

४५) सौ. आईसाहेबांसोबत नाशिक प्रवास

साधारण १९८१ च्या कार्तिकात सौ. आईसाहेब यांच्या सोबत नाशिकच्या प्रवासाचा योग आला. प.पू. महाराजांना बाहेरगावी दौरा होता. नाशिकचे एक गुरुभक्त श्री. भातंबरेकर यांच्या मुलाचा विवाह होता. प.पू. महाराज स्वत: जाऊ शकत नव्हते. सौ. आईसाहेबांचे सोबत

जाण्यास श्री. अशोकराव, श्री. अनिलराव कोणास वेळ नव्हता. त्या मुंबईस श्री. माधवराव तांबोळींकडे आल्या होत्या. प.पू. महाराजांनी सांगितले होते की, ''नागले यांना त्यांच्या सोबत नाशिकला जाऊन येण्यास वेळ आहे का, ते विचारा!'' आम्हांस तर हा मोठ्या सेवेचा लाभ आणि सौ. आईसाहेबांचा सहवास मिळणार होता. मी लागलीच तयार झालो. सायनहून नाशिकची एस्.टी. पकडून आम्ही नाशिकला गेलो. गाडीत खूप गप्पा मारायला मिळाल्या. प.पू. महाराजांच्या पूर्वीच्या गोष्टी, त्यांची आध्यात्मिक साधना, ईश्वरी साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार, जे जे सौ. आईसाहेबांस ज्ञात होते, आठवत होते ते ऐकायला मिळाले.

सीमंतपूजन रात्री होते. कार्यालय मोठे होते. इतकी थंडी असेल याची कल्पना नाही. मी आपली छोटीशी शाल घेऊन आलो होतो. ती शाल अंगावर घेऊन मी सर्व मंडळीत एका बाजूस बसलो होतो. इतक्यात सौ. आईसाहेब एक मोठी शाल घेऊन आल्या. मला म्हणाल्या, ''ही कसली लेडीज शाल घेऊन बसला आहात? कोणी पाहिले तर हसतील! द्या ती इकडे आणि ही घ्या अंगावर.'' मी माझी शाल काढताच माऊलीने स्वत:च ती शाल माझ्या अंगावर पांघरली. हे मातृहृदयाचे दर्शन माझ्या कायमचे लक्षात राहिले.

प.पू. महाराजांचा माझ्या वयाइतकाच एक मुलगा बालपणीच गेला. त्याचे नाव 'गजानन' असावे. एकदा घरी माझा विषय निघाला असता सौ. सुलभाताईंना प.पू. महाराज म्हणाले, ''तुमचा गेलेला भाऊ नागल्यांच्या रुपाने ईश्वराने तुम्हास दिला आहे.'' हे मला स्वत: सुलभाताईंनीच सांगितले, तेव्हापासून त्या मला थोरला भाऊ मानतात. त्यांची मुले मला शशीमामा म्हणतात. आम्ही तरी किती भाग्यवान की, या महापुरुषांनी, या महादेवी सौ. आईसाहेबांनी, मला आपला मानसपुत्र मानले. 'गजानन' हे सौ. सुमनताईंच्या पाठचे असावेत.

४६) प.पू. दत्तमहाराजांचा अमृत महोत्सव

दि. २५.५.१९८१ ते ३१.५.१९८१ - प.पू. दत्तमहाराजांचा 'श्री वासुदेव निवासात' अमृत महोत्सव समारंभ झाला. दि. २४.५.१९८१ रविवार, वैशाख वद्य पंचमी रोजी सर्व प्रायश्चित विधी व सायंकाळी उदकशांत झाली.

वद्य षष्ठी देवता अभिवादन, संकल्प, गणेशपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, आचार्यादिऋत्विकवरण, देवतास्थापन, अग्निस्थापना, अन्वाधान, गृहहवन, ऋक्संहिता स्वाहाकार दि. २६.५.१९८१ रोजी श्री गणेशयागाने प्रारंभ झाला. २७.५.१९८१ नवचंडी याग, २८.५.१९८१ सौरयाग, २९.५.१९८१ भैमरथी शांती, ३०.५.१९८१ लघुरुद्र स्वाहाकार, ३१.५.१९८१ सर्व अनुष्ठानांची पूर्णाहुती, आचार्यादी ऋत्विजांचे पूजन, समारोप व आशीर्वाद.

हे सर्व कार्यक्रम श्री वासुदेव निवासात झाले. प्रसाद भोजन व्यवस्था आश्रमातच होती. या शिवाय रोज सायंभजन असे. दि. २५.५.१९८१ ला वासुदेव निवास भजनी मंडळ, दि. २६.५.१९८१ ला सौ. काळे मुलुंड यांचे एकनाथी भारूड, कीर्तन वगैरे कार्यक्रम झाले.



४७) कोणत्या बाळास दूध पाहिजे आहे

आम्ही साधक-भक्त मंडळी स्वयंसेवक होतो. गरवारे हायस्कूल, श्री वासुदेव निवास, ऋत्विजांची व्यवस्था कर्नाटक हायस्कूल, अशी तीन ठिकाणची व्यवस्था पहायची होती. पहिला दिवस फारच गडबडीचा व तारांबळीचा गेला. भक्त भाविक अचानक किती येतील त्याचा अंदाज नव्हता. गरवारे मध्ये चहापानाची सोय होती.

भगिनी प्रभाताई आपले वर्षाचे बाळ चि. निषाद यास घेऊन आल्या होत्या. गरवारे मध्ये उतरल्या होत्या. बाळाची दुधाची वेळ झाली ते रडू लागले. चहाची वेळ होण्यास अवधी होता. त्याच्या रडण्याने त्रस्त झालेल्या त्या माऊलीच्या तोंडातून सहज शब्द निघाले 'काय ही व्यवस्था? लहान मुलांना दूध लागेल हे नको का लक्षात घ्यायला!' पुढील पाच मिनिटातच नाशिकचे एक भक्त श्री. वारे आले व म्हणाले, ''कोणत्या बाळास दूध पाहिजे आहे? आणखी कोणी लहान मुले आहेत का?'' आपले विचार प.पू. महाराजांपर्यंत पोहोचले हे प्रभास कळून चुकले व तिला आपल्या वक्तव्याचा पश्चाताप झाला. त्याबरोबर आम्हा साधकास हेही कळून चुकले की, गुरुमाऊलींचे किती सूक्ष्म लक्ष, बारीक सारीक गोष्टींकडेही असते.



४८) प.पू. महाराज मला तुमची पत्नी म्हणून ओळखत नाहीत

सौ. नागले यांनीही माझ्याकडे शंका व्यक्त केली की, ''प.पू. महाराज मला तुमची पत्नी म्हणून अजून ओळखत नाहीत असे वाटते.'' मला काही हे म्हणणे पटले नाही. अहो किती लांब लांब जिल्ह्यातून, गावातून सान थोर लोक येतात. प.पू. महाराजांचे दर्शन घेतात तेव्हा प.पू. महाराज नावानीशी त्यांच्या लेकरांची, भावंडांची चौकशी करतात. आश्चर्य वाटते की, प्रत्येकाची नावे सुद्धा प.पू. महाराजांना कशी लक्षात राहतात? सौ. नागले यांचे समवेत आमचे धाकटे चिरंजीव, पाच वर्षाचे अभिजीतही होते. कार्यक्रमाचे शेवटचे दिवसात चिरंजीव तापाने फणफणले होते. ताप वाढू लागला म्हणून त्याला श्री वासुदेव निवासात पाठविले. परंतु तेथेही खूप गर्दी! कार्यक्रमाचा शेवटचा दिवस! बाळाला ताप असून रात्री १० नंतर सुद्धा झोपण्यास जागाच मिळेना! शेवटी आमचे गुरुबंधू श्री. तावडे यांनी खोलीतील धान्याच्या गोणी एकावर

एक ठेवून जागा करून दिली. सौ. नागले काहीशा त्रासल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी मुंबईस परतायचे होते. निरोप घेण्याकरीता सौ. नागले लताबाई यांना अभिजीतसह रांगेत उभे केले व मी कामात व्यग्र झालो. आपला नंबर प.पू. महाराजांचे नजिक आला की जाऊ; हा मी विचार केला. परंतु कामाचे गडबडीत मी खालीच राहिलो.

सौ. लताबाई त्रासल्या! त्या मनात म्हणत होत्या प.पू. महाराज तर आपल्याला ओळखत नाहीत! आता आपण दर्शन घेताना काय बोलावे आणि कसे बोलावे, हे आदरयुक्त भीतीमुळे कळेना! दर्शनास श्रींचे पुढे डोके ठेवून उठत आहे इतक्यात प.पू. महाराज म्हणाले, ''काय आज मुंबईस जायला निघणार का? अभिजीतचा ताप कसा आहे? तुमची बरीच गैरसोय झाली ते नागलेही तिकडे गरवारे शाळेत सर्व सेवेत व्यग्र होते.''

एका दगडात प.पू. महाराजांनी सौ. लताच्या अनेक विचित्र शंकांचे उत्तम समाधान केले. ती खूप खजिल झाली. इतक्यात मी तेथे पोहोचलो. अगदी वेळेवर! कारण लताबाई पूर्ण विरघळल्या होत्या! त्यांच्या नेत्रातून जलधारा वहात होत्या! मी 'श्रीं'पुढे नतमस्तक झालो. म्हणालो, ''महाराज! आम्ही निघतो आज'' पुन्हा प्रश्न ''अभिजीतचा ताप उतरला आहे ना?'' मी होय म्हटले.

प.पू. महाराज ''गोडसे, शृंगारपुरे तुम्ही पुढील हप्त्यात कारंज्याला जात आहात ना? चांगले आहे! अशा तीर्थस्थानाचे दर्शन पूर्व पुण्याईनेच घडत असते आणि तीर्थाटनाने पुण्य द्विगुणीत होते. श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे जन्मस्थान आहे ते! त्यांचे घरही आहे. जवळचे सर्व पाहून या.''

४९) श्री. दामू अण्णा नवरे यांनी सांगितलेली गोष्ट

या कार्यक्रमात प.पू. दत्तमहाराज आणि त्यांची योग्यता दर्शवणारी एक सत्यकथा श्री. दामू अण्णा नवरे (अंबरनाथ) यांनी सत्कार समारंभात सांगितली ती अशी...

नारेश्वर येथे प.पू. रंगावधूत महाराज वास्तव्यात असतानाची ही गोष्ट आहे. श्री. दामू अण्णा प.पू. गुळवणी महाराजांच्या दर्शनास आले होते. प.पू. गुरुमहाराजांना त्यांनी आपला स्वत:चा नारेश्वरला प.पू. रंगावधूतांचे दर्शनास जाण्याचा मनोदय सांगितला व परवानगी मागितली. गुरुमहाराज म्हणाले, ''जरूर जा आमचाही महाराजांना नमस्कार सांगा आणि जाताना प.पू. दत्तमहाराजांनाही बरोबर घेऊन जा.'' गुरुमहाराजांची आज्ञा घेऊन अण्णा प.पू. दत्तमहाराजांकडे आले व म्हणाले, ''अहो महाराज! आम्ही नारेश्वरला प.पू. रंगावधूत महाराजांचे दर्शनास निघालो आहोत व जाताना आपणासही बरोबर नेण्याची आज्ञा झाली आहे.''

प.पू. महाराजांना प्रश्न पडला. कारण ज्या दिवशी निघायचे, त्याच दिवशी संध्याकाळी एके ठिकाणी प.पू. दत्तमहाराजांचा प्रवचनाचा कार्यक्रम निश्चित झाला होता. प.पू. महाराजांनी आपली अडचण श्री. दामू अण्णांना सांगितली व म्हणाले, ''अण्णा तुम्ही असे करा, ठरल्याप्रमाणे तुम्ही निघा, दुसरे दिवशीच आम्ही नारेश्वरला पोहोचतो.'' ठरल्याप्रमाणे श्री. दामू अण्णा निघून गेले व नियोजित कार्यक्रम संपताच दुसऱ्या दिवशी प.पू. महाराज निघाले व दुपार नंतर संध्याकाळ पर्यंत नारेश्वर आश्रमात पोहोचले. स्नान, सायंसंध्या उरकून दर्शन घेण्याचा त्यांचा मानस होता. पण पोहोचताच कळले की प.पू. रंगावधूत महाराज तापाने आजारी असून झोपून आहेत, म्हणून दर्शन बंद आहे. दुसऱ्या दिवशी प.पू. दत्तमहाराजांना पुण्यास परतणे आवश्यक होते. रात्री झोपतांना प.पू. महाराज दामू अण्णांना म्हणाले, ''पहाटे चार नंतर नर्मदा स्नानास आपण जाऊया! येणार ना तुम्ही पण.'' अण्णा कबूल झाले. परंतु प.पू. महाराजांनी पहाटे चार वाजता अण्णांना हाक मारली, जागे केले, तर ते म्हणाले, ''महाराज! झोपा हो! बाहेर कडाक्याची थंडी आहे. शिवाय नदीत म्हणे सुसरी मगरीही असतात. ''प.पू. महाराज आपला पंचा उपरणे धोतर व लोट्या घेऊन नर्मदा स्नानास गेले. नदीचे पाणी समशीतोष्ण होते. स्नान आटोपून तीरावर आले. अंग पुसून धोतर उपरणे परिधान केले; आश्रमाकडे वळले आणि पहातात तर समोर प.पू. रंगावधूत महाराज व त्यांचे सोबत एक तेजस्वी, भव्य, गौरवर्णी मध्यम बांध्याची केस मोकळे सोडलेली, सौभाग्यालंकार ल्यालेली कपाळावर मोठ्ठे कुंकू अशी एक विदुषी स्त्री होती. प.पू. दत्तमहाराजांनी तेथेच साष्टांग नमस्कार घातला. त्या देवींनाही नमस्कार केला. प.पू. रंगावधूतांनी प.पू. महाराजांचे तसेच गुरुमहाराजांचे कुशल विचारले व पुढे म्हणाले, ''आज जाण्याची घाई आहे तर निघायला हरकत नाही.''

आश्रमात आपल्या खोलीत येताच प.पू. महाराज दामू अण्णांना म्हणाले, ''अण्णा तुम्ही चांगली संधी घालविलीत, आम्हाला महाराजांचे दर्शन नदीतीरावर झाले. त्यांचे सोबत कोणी विदुषी बाई देवता समान होत्या. त्या कोण ते कळले नाही पण त्यांचेही दर्शन झाले. ''सकाळ होताच प.पू. महाराज आश्रमातून निघाले व त्यांनी पुण्यास प्रयाण केले. श्री दामू अण्णांनी सकाळी आश्रमात चौकशी केली की, प्रकृती बरी नसताना महाराज नदीतीरावर पहाटे एवढ्या थंडीत कसे गेले?

आश्रमात कळले की, प.पू. रंगावधूत महाराज गेले ५-६ दिवस तापाने आजारी आहेत. चालण्याचेही त्यांना त्राण नाही. खूप थकावट आहे. ते तीरावर जातील कसे? ते तर झोपूनच आहेत. रात्रीत ते उठलेच नाहीत! हे ऐकून अण्णांना विस्मय वाटला. यांचे खरे मानावे की प.पू. दत्तमहाराजांचे? प.पू. दत्तमहाराज हे तर सदैव सत्य वचनी आहेत ते असत्य बोलणे

कदापि शक्य नाही! श्री. दामू अण्णांनी घडलेली घटना त्वरीत प.पू. गुळवणी महाराजांना पत्राने कळविली. २-४ दिवसात उत्तर आले, ''आपण पुण्यास यावे. भेटीत काय ते बोलू!'' पुण्यास गेल्यानंतर दामू अण्णांना गुरुमहाराज म्हणाले, ''अहो! दत्तमहाराजांना तुम्ही कुठे ओळखता? प.पू. रंगावधूत त्यांना दर्शन द्यायला आले होते, तर साक्षात् नर्मदा नदी प.पू. दत्तमहाराजांचे दर्शन घेण्यास आली होती!''

''गुरु''

गुरु हा संतकुळीचा राजा।
गुरु हा प्राणविसावा माझा।।
गुरुविण देव नाही दुजा।
पाहता त्रिलोकी।।
गुरु हा सुखाचा सागर।
गुरु हा प्रेमाचा आगर।।
गुरु हा धैर्याचा डोंगर।
कदाकाळी डळमळेना।।
गुरु हा सत्यालागी साह्य।
गुरु हा साधकाची माय।।
गुरु हा कामधेनु गाय।
भक्ताघरी दुभतसे।।
गुरु हा भक्तीचा सागर।
गुरु हा काळासी दंडण।।
गुरु हा करीतसे खंडण।
नानापरी पापांचे।।

- *संत ज्ञानेश्वर*

५०) 'श्रीं'च्या सांकेतिक भाषा

प.पू. दत्तमहाराज कधी कोणास आज्ञा करीत नसत. त्यांच्या सांकेतिक भाषणातून आपण शोधायचे असते की त्यांना नक्की काय म्हणायचे आहे किंवा आपल्याकडून त्यांची काय अपेक्षा आहे. कुरवपूर क्षेत्र दर्शनास जाण्याचा गुरुबंधूंचा विचार ठरला तो असाच. 'श्री' दर्शनास आलेले गुरुबंधू श्री. गोडसे, शृंगारपुरे व बाकी सर्व प.पू. गुरुमहाराजांचे दर्शन

करून समोर बसले असताना प.पू. महाराजांनी प्रश्न केला.

''तुम्ही कुरवपूरला कधी गेला होतात का? श्री श्रीपाद श्रीवल्लभांची ती तपोभूमी आहे. फार पवित्र आहे. भाग्यवंतांनाच अशा क्षेत्रांचे दर्शन घडते. ''श्रीं''चे हे उद्‌गार ऐकून एकमताने सर्वांनी ठरविले की, कुरवपूरला जायचे. प.पू. महाराजांना विचारले, ''आम्हाला कुरवपूरला जायचे आहे. आम्ही केव्हा निघावे?''

''मे महिन्यात उन्हाळा खूप असतो, परंतु नदीला पाणी कमी असते. म्हणून पात्रातून चालत जायला बरे पडते! तिकडे काही नाव होडी वगैरे नाही. कोळी लोकांच्या सहाय्याने चालत जाता येते'' झाले! या मंडळींनी जायचा दिवस ठरविला. मला विचारले, ''येणार का? रिझर्व्हेशन करीत आहोत!'' धंदा व्यवसाय व मे महिना म्हणजे जून पूर्वी इमारत बांधकामे संपविण्याची घाई! मी पूर्ण विचारांती 'नाही' असे म्हटले.

आठ दिवसात आमचे नावे पोस्टकार्ड! ''गोडसे, शृंगारपुरे ही मंडळी मे महिन्यात कुरुगड्डी (कुरवपूर) येथे जात आहेत. यावेळी नदीला पाणी कमी असते. (मला चांगले पोहता येत नाही हे जणू 'श्रीं'ना माहीतच असावे.) उन्हाळा मात्र तिकडे जास्त! परमात्मा संरक्षक समर्थ आहे.'

पत्र वाचता क्षणीच, 'हीच गुरु आज्ञा' म्हणून मी माझा बेत निश्चित केला व रिझर्व्हेशन नसताना गाडीत घुसून कंडक्टर गाठला! व पुण्यप्रद क्षेत्राचा लाभ झाला.

माझी गुरुभेट होण्यापूर्वी म्हणजे १९७८-७९ साली या गुरुबंधूंना प.पू. महाराजांनी असाच प.प. वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे समाधी स्थान 'श्रीगरुडेश्वर' (गुजराथ) क्षेत्राचा महिमा सांगितला होता आणि 'ता'वरून ताकभात समजणाऱ्या गुरुबंधूंनी त्याचा लाभ घेतला.

पुन्हा जून १९८१ मध्ये मी, गोडसे व शृंगारपुरे दर्शनास गेलो असता प.पू. महाराजांनी ''श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे जन्मस्थान 'कारंजा' पाहिले का?'' असे विचारले.

याचाच अर्थ आम्ही या क्षेत्राचे दर्शन घ्यावे. आपल्या भक्तमंडळीस हा पुण्यप्रद लाभ व्हावा ही आंतरिक इच्छा! भक्तवत्सलच गुरुमहाराज! त्यांना आपल्या शिष्य व भक्तांच्या कल्याणाचाच विचार. संत सत्पुरुष किंवा प.पू. दत्तमहाराजांसारखे अवतारी पुरुष त्रिकालज्ञ असतात.

आपल्या वत्साचे कल्याण कशात आहे? आध्यात्मिक पारलौकिक लाभ कशात आहे हे त्यांना अंतर्ज्ञानाने समोर दिसत असते. ही त्यांची त्रिकालज्ञ दृष्टी ते कोणाचेही दृष्टोत्पत्तीस येऊ नये याची काळजी घेत असतात. त्यात प.पू. महाराज तर पूर्णपणे प्रसिद्धी पराङ्‌मुख! त्याशिवाय शिष्याचे भावी कल्याण समोर दिसत असताना तुम्ही असे करा किंवा तसे करा, इकडे जा किंवा तिकडे जा अशी वाक्ये या विनयमूर्तीचे तोंडून कशी निघणार? प.पू. महाराजांचे प्रवचनातून, मार्गदर्शनातून सतत जाणवते ते असे... जी आपली नित्यनैमित्तिक कर्तव्ये आहेत

ती ईश्वरदत्त आहेत; ती चांगल्या प्रकारे कौशल्याने पार पाडणे ही तर ईशसेवाच आहे. ती कर्तव्ये बाजूस सारुन देवधर्म, अध्यात्म, देवदर्शन हे त्यांना अभिप्रेत नाही. दर्शनास जाताच पहिलाच प्रश्न, ''आज काय काम बंद आहे का?'' किंवा ''आज काय रजा, सुट्टी होती कां?'' एकदा एक नातू, मुलीचा मुलगा, परीक्षा जवळ आली म्हणून पुण्यास 'श्रीं'चे घरी आला व म्हणाला, 'आजोबा आमची परीक्षा जवळ आली आहे. नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळावेत म्हणून सात दिवसांचे गुरुचरित्र पारायण करण्यास मी आलो आहे.'

प.पू. महाराजांनी लागलीच प्रतिप्रश्न केला, ''अहो पारायण करून जास्त गुण मिळतात किंवा मोठे यश पदरात पडते हे तुम्हाला कोणी सांगितले? आधी घरी जा आणि कसून अभ्यासाला लागा! परीक्षेची पूर्ण तयारी अभ्यासाने करा! परीक्षा झाल्यानंतर ईश्वराला प्रार्थना करून पारायणाला बसा! तो दयाळू आहे. त्याला जे जसे योग्य वाटेल त्या प्रमाणात तो तुम्हास यश देईल!''

आम्हा गुरुबंधूंना आपली नित्यकर्मे पूर्ण करून मिळणाऱ्या वेळेत साधना करावी, सवडीने होईल तेवढे नामस्मरण करीत जावे, असे सांगत असत. नित्य दिनक्रमात किती तरी वेळ अनावश्यक गप्पागोष्टी आणि चर्चेत जात असतो, तो टाळून, ही सवड पकडून साधना केल्यास भरपूर वेळ मिळतो.

५१) कारंजा क्षेत्र दर्शन संकल्प

मी, गोडसे, शृंगारपुरे दर्शनास गेलो असता प.पू. महाराजांनी कारंज्याचा विषय काढला आणि लागलीच आम्ही तिघांनी जुलै १९८१ मध्ये जाण्याचे ठरविले. मंडळींनी जुलै मध्ये रजा मिळेल म्हटले व मीही जुलैमध्ये पावसाळ्यात बांधकामे कमीच असतात अशी पुष्टी जोडली. ''चांगले आहे! पुण्यवान आहात तुम्ही! अशा क्षेत्रांचे दर्शन घेण्याची तुम्हाला प्रेरणा होते. या जाऊन या!'' दि. ४.७.१९८१ रोजी सायंकाळी ७ च्या रेल्वेने आम्ही तिघे कारंज्यास निघालो. प्रवासात आमचा विषय काय असणार? महाराज आणि महाराज! या महात्म्याच्या दैवीगुण संपदेवर वाहू तेवढी स्तुती सुमने कमीच आहेत! प.पू. महाराजांची कुलस्वामिनी माहुरगडा वरील 'श्री रेणुकामाता!' कारंज्याहून हे स्थान जवळच आहे. ''चला, आपण माहुरगडावरही जाऊ या. श्री रेणुका माता आपल्या गुरुदेवांची कुलस्वामिनी, आपण प.पू. महाराजांची लेकरे; म्हणजे आपलीही तीच कुलस्वामिनी!'' ह्या भावनेने आमचे एकमत झाले आणि या रेल्वे प्रवासातच माहुरगडास जाण्याचा संकल्प सुटला. माहुर हे श्री दत्तप्रभुंच्या निद्रेचे स्थान. कारंज्याला जाऊन तेथील महापूजा, प्रसाद, भोजन, क्षेत्र दर्शन, नृसिंह सरस्वती

स्वामींचे निवास स्थान. घर सर्व पहायचे आणि सर्व यथासांग यथाविधी कार्यक्रम आटोपले की, माहुरला प्रस्थान करायचे!

रोजच्या साधनेत येणारे निरनिराळे अनुभव आम्ही एकमेकांना सांगत होतो. मी गेल्याच वर्षी अनुग्रह घेतला म्हणून दोघानाही काही अनुभव येतात का ते विचारले व मी सांगू लागलो.

५२) साधनेंतील अनुभूती

साधनेला बसताना आसनस्थ होऊन डोळे बंद करताना प.पू. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे- ''आपले गुरुदेव आपल्या समोर येऊन स्थानापन्न झाले आहेत. त्यांना वंदन करून 'ब्रह्मानंदम् परम सुखदं केवलम् ज्ञान मूर्तीम्!' हा श्लोक व 'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु' हा श्लोक म्हणून मी साधनेस प्रारंभ करीत आहे.'' नमस्कार करून माझी बैठक सुरू झाली. 'श्रीं'चे भावनात्मक सान्निध्यात रंगू लागली. चांगली झाली बैठक! धारणेतून बाहेर येत असताना डोळे मिटूनच मी 'श्रीं'चे चरणावर मस्तक ठेवत आहे या भावनेनेच मी त्यांचे चरणावर मस्तक ठेवले. आश्चर्य असे की त्यावेळी खरोखरच प्रत्यक्ष 'श्री'चरणांचा स्पर्श मला जाणवला. पण लगेच मनात विचार आला की, हा आपल्याला भास किंवा भ्रम झाला असेल. कारण खरोखरच 'श्री' तेथे असते तर त्यांनी आपल्याला खडीसाखरेचा प्रसाद दिला असता. ज्याअर्थी प्रसाद आपले हाती पडला नाही त्याअर्थी हा सारा मनाचा खेळ. रात्री झोपताना सुद्धा तो सुखद, पवित्र, पादस्पर्श जाणवत होता. मी लागलीच पुनीत झालेले माझे हात, कपाळ डोक्यावरून फिरवीत होतो. त्याच रात्री प.पू. महाराज स्वप्नात आले. त्यांनी मला दोन्ही हातांची ओंजळ भरभरून प्रसाद दिला आणि विचारले, ''काय नागले प्रसाद मिळाला ना?''

५३) कारंजा क्षेत्र दर्शन

सकाळी ६.३० ला मूर्तिजापुरला उतरुन ठीक ८.३० चे एस्.टी. ने दि. ५.७.१९८१ रोजी सकाळी आम्ही कारंजा क्षेत्रातील 'श्री नृसिंह स्वामीचे' मंदिरात पोहोचलो. दर्शन घेतले व ट्रस्टींची चौकशी ऑफिसमध्ये केली. कारण आम्हास उतरण्यास खोली व स्नानादी प्रातर्विधी उरकायचे होते. ट्रस्टींनी आमच्या आगमनाचे स्वागत केले. आम्ही आमची ओळख ''आम्ही मुंबईहून आलो. पुण्याच्या प.पू. दत्तमहाराजांचे आम्ही अनुग्रहीत आहोत'' म्हटल्यावर मनस्वी आनंद त्यांचे चेहऱ्यावर उमटला. 'श्रीं'ना येथे फार मानतात. त्यांच्याबद्दल आदरभावाने बोलतात. ते म्हणाले, ''अहो मग तुम्ही आमचेच आहात! प.पू. दत्तमहाराजांतर्फे इथे वर्षातून

एक दिवस महापूजा, अभिषेक, प्रसाद वगैरे करण्याची शाश्वत स्वरुपाची व्यवस्था त्यांनी केली आहे.''

नंतर त्यांनी आम्हाला खोली उघडून दिली. स्नानास गरम पाणी, चहा-नाश्ता सर्व सोयी होत्या. इथे पूजा, महापूजा, रुद्राभिषेक, सत्यदत्तपूजा असे विधी होतात. आम्हीही पूजा अभिषेक वगैरे सांगितले.. आरती प्रसाद झाले. भोजनानंतर आम्ही 'श्री नृसिंह सरस्वती स्वामी' महाराजांचा जिथे जन्म झाला ते स्थान पाहिले. त्यांनी जिथे बालक्रीडा केल्या ती स्थाने दाखविली. कारंजा सोडून नरहरी तप:श्चर्येला आणि तीर्थाटनाला निघाले तेव्हा त्यांच्या मातेस अतिशय वियोग दु:ख होऊ लागले. तिची शोकाकूल अवस्था पाहून दत्तप्रभू नरहरी द्रवले. आपल्या वाड्यातील (घरातील) भिंतीकडे बोट दाखवून आईला म्हणाले, ''माते! जेव्हा जेव्हा तुला माझे तीव्र स्मरण होईल, त्या त्या वेळी तू या भिंती समोर येऊन बस! क्षणात या भिंतीवर तुला मी दिसेन. तुझ्याशी संभाषण करीन. स्मरण होताच आईला दर्शन देणारी ती भिंत आम्ही पाहिली.



५४) श्री क्षेत्र माहूर दर्शन

दुसऱ्या दिवशी दि. ६.७.१९८१ रोजी ट्रस्टींना आम्ही माहूरला जाण्याचा मार्ग विचारला. दीड वाजता दुपारी माहूरला जाणारी थेट एस्.टी. होती. प्रसाद भोजन घेऊन आम्ही ट्रस्टींचा निरोप घेण्यास गेलो. त्यांनी आम्हाला, आमची काही गैरसोय तर झाली नाही ना? हा प्रश्न केला. खरे म्हणजे त्यांचे आदरातिथ्य पाहून आम्ही भारावून गेलो होतो. भोजनोत्तर तांबूल देतांना सुद्धा विचारले, 'भोजन कसे झाले होते? आवडले ना?' प्रसादाला नावे कोण ठेवील? आणि भोजन खरोखरच उत्कृष्ट रुचकर झाले होते.

प्रत्येक तीर्थाटन जर संत सत्पुरुषांच्या आदेशाने किंवा त्यांचा आशीर्वाद घेऊन केले किंवा त्यांच्या आदेशाने केले तर ते सहज घडते. मग सद्गमनच नव्हे तर कोणतेही सत्कर्म, सत्कार्य असो; मार्ग सूकरच होणार त्यात कोणताही अडथळा, त्रास नसणार. जणू प.पू. महाराजच आपल्या सोबत आहेत, नव्हे सोबत असतातच, असे अनुभव वेळोवेळी येतात. कुरवपूरला जातानाही माझे रिझर्व्हेशन नव्हते. काही कन्स्ट्रक्शनची कामे जूनच्या पहिल्या आठवड्यात संपवून ताबा द्यायचा होता. पण कुठेही काही विपरीत घडले नाही. प्रवास तर व्यवस्थित झालाच पण माझ्या पश्चात कामेही चालू राहिली.

कारंज्याहून दि. ६.७.१९८१ रोजी दुपारी आम्ही १.४५ वाजता सुटणारी एस्.टी. गाडी पकडण्यास एस्.टी. स्टॅण्डवर गेलो. ५ वाजले तरी एस्.टी.चा पत्ता नव्हता. आम्ही तिघे

स्थानकावर कंटाळून स्टॅण्डच्या समोरील रस्त्यावर गाडी दिसते का ते पाहण्यास आलो. मनात विचार की एस्.टी. न आल्यास काय करावे? इतक्यात एक एस्.टी., अचानक स्टॅण्डवर न जाता रस्त्यावर आमच्याजवळ उभी राहिली. मी धावत पुढे जाऊन बोर्ड पाहिला तर 'माहूर' त्या चालकाने आम्हाला ओरडून, 'ओ मिस्टर प्लीज कम हीअर!' म्हटले. पुढे इंग्रजीतूनच तो म्हणाला 'इथूनच मी बाजूचे गल्लीत बस नेणार आहे. तिथे पाठोपाठ तुम्ही या' त्या गल्लीत त्याला गाडीत रेडीएटर मध्ये पाणी घालायचे असावे किंवा काही काम असावे. गाडी वळवून आणली. गाडीचे दार उघडले. आम्ही श्रींचे नाव घेऊन गाडीत जाऊन बसलो. हीच गाडी नंतर त्याने एस्.टी. स्टॅण्डमध्ये आणली. त्यावेळी इतकी प्रचंड गर्दी प्रवाशांनी केली, आत जाण्यासाठी धक्का-बुक्की, आरडा-ओरड झाली. आम्हा शिस्तप्रिय मुंबईकरांना ती गाडी पकडणे अगदी अशक्यच झाले असते. मध्यंतरीचे दारव्हा स्टेशन येईपर्यंत आम्ही मोठ्या विस्मयात पडलो होतो. हे घडले कसे? या चालकाला आम्हाला माहूर गाडीचीच प्रतीक्षा आहे हे तरी कळले कसे? असो ही खचाखच भरलेली गर्दी खाली होऊ दे! दारव्हा स्टेशनला संपूर्ण बस खाली झाली. बसमध्ये राहिले तीनच पॅसेंजर गोडसे, शृंगारपुरे आणि नागले.

चहाला उतरल्यावर आम्ही तिघांनी आमचे सोबत चालकांनाही घेतले; गोडसे यांनी त्या चालकाला विचारले, 'तुम्ही आमच्या जवळच आणून बस का उभी केलीत? तुम्ही आमच्याशी इंग्रजीतूनच बोलायला सुरुवात का केलीत? सहसा एस्.टी.चे कर्मचारी इंग्रजीत कधीच बोलत नाहीत! त्यातून आम्हाला इंग्रजी समजेल असे तुम्हाला कशावरून वाटले? आम्हाला माहूरला जाणारीच बस हवी आहे हे तुम्हाला कसे कळले?' 'साहेब याचे एकच कारण सांगू? लांबूनच तुम्हाला सामानासह उभे राहिलेले पाहून मला अंतर्यामातून झालेली प्रेरणा! ह्याला दुसरे उत्तर नाही. बाकी आमच्या या खेडेगावातून मुंबईचा माणूस लागलीच ओळखता येतो. सुशिक्षित माणूस पण कळतो. त्यातून मी मुंबईला रिझर्व्ह बँकेत नोकरीला होतो.'

झालं! एवढे म्हटल्यानंतर श्री. गोडसे यांची प्रश्नांची सरबत्ती वाढली. जिज्ञासा वाढली. माहीती मिळाली ती अशी की हे चालक श्री. दिवेकर रिझर्व्ह बँकेत वरच्या पोस्टवर होते. कोण्या एका बँकेच्या इन्स्पेक्शन रिपोर्ट मध्ये वस्तुस्थिती प्रामाणिक, पारदर्शी लिहील्यानेच त्यांना नोकरी सोडायची वेळ आली. स्वाभिमानाने आणि अंगच्या सत्यवक्तेपणाने त्यांनी नोकरी सोडली. अकोल्यात येऊन स्थायिक होऊन ही एस्.टी.ची बस चालकाची नोकरी त्यांनी स्वेच्छेने पत्करली. नंतर त्यांच्या परिचयाच्या अनेक व्यक्ती श्री. गोडसे यांच्याही परिचयाच्या निघाल्या. परंतु आम्हाला माहूरच्याच एस्.टी.चीच प्रतिक्षा आहे हे या दिवेकर चालकांना कसे कळले हे कोडेच राहिले.

आम्ही रात्री ८.३० वाजता माहूरला पोहोचलो. मंदिर व देवाचे पुजारी यांची चौकशी

करून पुजाऱ्यांचे घर गाठले. आमची राहण्याची व भोजनाची सर्व सोय झाली.

दि. ७.७.१९८१ ला सकाळी उठून स्नान संध्यादी आटोपून पुजाऱ्यांसोबत चक्रधर स्वामींचा मठ पाहिला. त्यांनी एक खोली शयनगृह म्हणून दाखविली. त्यात शुभ्र मार्बलचे दोन पलंग दाखविले यावर रात्री श्री चक्रधर स्वामी (महानुभाव पंथाचे) व श्री गुरु दत्तात्रेय निद्रा घेत असतात. काही पूजा पाठ दक्षिणा प्रदान करून आम्ही माहूर गडास प्रस्थान केले. सकाळी ८.३० च्या बसने आम्ही श्रीदत्तशिखर माहूरगडावर निघालो. सकाळ पासून सतत पाऊस होता. तेथील पूजा अभिषेक झाले. शिखरावर वास्तव्य करून असलेल्या महंतांची दर्शन भेट झाली. त्यांनी स्वामी विवेकानंदांसारखा पायघोळ, कफनी वजा पोशाख घातला होता. ते अगदी तरुण हसतमुख आणि अत्यंत विनयशील होते. त्यांनी प्रेमळपणे आमची चौकशी केली. आनंद व्यक्त केला. त्या पीठावर महंत स्थापित होत असतो. एकाची समाधी झाली की ईश्वर इच्छेने दुसरा दीक्षा स्वीकारतो ही परंपरा पूर्वापार चालू आहे. गत महंतांच्या समाधी आसमंतातील जागेत आहेत.

श्रीदत्तात्रेयांचा पितळी मुखवटा होता; त्यावरच अभिषेक पूजा झाली. आम्ही आधीच फोटो घेतला होता. निरोप घेताना महंत म्हणाले, येथील देव व मंदिराचा फोटो घ्यायचा नसतो. महंतांकडून हेही कळले की, या गडावरून खाली दरीत उतरुन समोरचा गड चढल्यानंतर तिथे 'अत्रि-अनसूयांची कुटी' आहे. पाऊलवाटा आणि वाटाड्या कोणी दिसला नाही, वेळही थोडा होता म्हणून 'अत्रि-अनसूया शिखर' गाठण्याचे धारिष्ट्य केले नाही. दत्तमहात्म्यात वर्णन केलेले सर्व प्रसंग ह्याच स्थानात घडले आहेत. त्या क्षेत्रात ती ती ठिकाणे मातृतीर्थ, मंदिर, श्री रेणुका देवीचे मंदिर थोडे खाली उतरल्या नंतर आहे. त्या त्या कथांचे स्मरण झाले व प्रत्यक्ष स्थाने पाहताना आमची मने भारावून गेली होती. असे वाटत होते येथेच थांबावे, ध्यानास बसावे. दत्त शिखरावरून आम्ही प.पू. महाराजांची कुलस्वामिनी श्री रेणुका माता देवीचे दर्शनास गेलो. माझी व श्री. शृंगारपुरे यांचीही कुलस्वामिनी एकवीरा म्हणजे श्री रेणुकामाताच! श्री देवीची मूर्ती म्हणजे जीभ काढलेले मुख (७ ते ८ फूट डायमीटरचे असेल) उग्र रुप होते. आम्ही श्री रेणुका देवीला प.पू. महाराजांच्या प्रकृती स्वास्थ्याकरीता अभिषेक केला. प.पू. महाराजांच्याकडे नेण्यास तीर्थ व प्रसाद घेतला. सर्व क्षेत्र डोळे भरून पाहिले आणि परतीच्या प्रवासाच्या भानावर आलो.

या भागाची काहीच माहिती नव्हती येथून पुण्यास कसे जावे? चौकशी अंती कळले की येथून थेट पुण्याला बस नाही. येथून नांदेडला जावे लागेल. नांदेडहून मात्र पुण्याला जाणारी रात्रीची एकच बस आहे. येथून नांदेडला जायला लागलीच दु. २.३० वाजता बस होती ती मिळाली. पण नांदेड-पुणे ही एकुलती एक बस ह्या भागातून सुटणारी असल्यामुळे व रोजच

ती भरगच्च भरून जाते हे कळल्याने आमचे आशेचे दरवाजे बंद झाले होते. नांदेड-पुणे बस मिळेल की नाही? आमची बस नांदेडला वेळेत पोहोचेल की नाही? पुणे बस मिळाली तरी रात्रभर प्रवासात बसायला जागा मिळेल की नाही? काहीच शाश्वती नव्हती. 'श्रीं'चे वर सर्व भार टाकून आम्ही निर्धास्तपणे प्रवास करीत होतो. कसलीही चिंता न करता प.पू. महाराज ह्याच विषयावर आमचे तिघांचे बोलणे सुरू होते. आपला प्रवास कसाही होवो, पण हे श्री कुलस्वामिनी रेणुका देवीचे तीर्थ आणि हा प्रसाद कसेही करून 'श्रीं'च्या हाती पडावा ही एकच तळमळ आम्हा तिघांच्याही अंत:करणात होती.

रात्री ८ वाजता नांदेडमध्ये बस शिरताच अचानक आमच्या समोर ड्रायव्हर सीटच्या मागे बसलेला एक माणूस आम्हास म्हणाला, 'हे बघा आता ही बस डेपोत जाण्यापूर्वी डेपोच्या दाराजवळ थांबेल. सगळे लोक तिथे उतरतील पण तुम्ही मात्र उतरू नका. तुम्हाला मी आत डेपोत घेऊन जातो आणि पुण्याला जाणाऱ्या बसमध्ये डेपोतच बसवून देतो. तसे मी वाहक चालकास सांगतो. माहूर सुटल्यापासून तुम्हाला तुमच्या गुरुंच्या भेटीची-दर्शनाची जी ओढ लागली आहे, ती मला तुमच्या संभाषणावरून समजली. मीही तुमच्या नकळत गुरु-शिष्य प्रेमाचा आनंद लुटला. आमच्या करता चालक-वाहकास विनंती करून आम्हाला तो बस बरोबर डेपोत घेऊन गेला. पुण्याला जाणारी बस शोधून काढली. ती बोर्ड वगैरे लावून निघण्याच्या तयारीत होती. त्या बसच्या वाहक चालकास भेटून त्याने ही माझी माणसे आहेत. ह्यांना कसेही करून १ ते ५ व्ही.आय.पी. सीटवर बसवा. ह्यांना थेट पुण्यासच जायचे आहे आणि कसेही करून उद्या पुण्यास पोहोचणे अत्यावश्यक आहे. आम्हाला आमच्या जागेवर बसवून खाली उतरून झटकीपट तो निघून गेला. आम्ही उपकार कर्त्याचे नाव, गाव, ओळख करून घेणे, सौजन्याने त्यांचे मनापासून आभार मानणे, ह्या गोष्टींना उसंतही त्यांनी मिळू दिली नाही. आम्हा तिघांपुढे मोठ्ठे प्रश्नचिन्ह, कोण होता तो? ज्यांची ओढ लागली होती, तोच तो 'सद्गुरु' तर नव्हता ना? अंत:करणातून मनोभावे 'श्रीं'ना वंदन करून आम्ही पुणे प्रवासास लागलो.

दि. ८.७.१९८१ पुण्याला उतरल्यानंतर प्रथम कर्वे रोडला 'श्रीवासुदेव आश्रमात' जाऊन सर्व प्रातर्विधी आटोपून 'श्रीं'च्या घरी गेलो. 'श्रीं'चे आन्हिक आटोपत आले होते.

''आम्हाला तीर्थ प्रसाद देण्याकरीता तुम्ही इतक्या लांबचा प्रवास करून आलात?'' असे जेव्हा 'श्रीं'नी म्हटले तेव्हा १८ तासांच्या प्रवासाचा शीण कोठल्या कोठे निघून गेला. 'आपल्या कुलस्वामिनीने आपल्या करीता तीर्थ प्रसाद आमच्या घरी पाठवला,' ह्या जाणिवेचे भाव 'श्रीं'च्या चेहऱ्यावर उमटले होते. माऊलीच्या स्मरणाने ते क्षणभर सद्गदीत झाले होते. त्यानंतर अर्धा पाऊण तास 'श्री' दत्तप्रभूंच्या सर्वत्र संचाराबद्दल, तीर्थक्षेत्राच्या महात्म्याबद्दल, ईश्वराच्या निरनिराळ्या अवतार कार्याबद्दल स्वत:हून अगदी दिलखुलास, प्रसन्न अंत:करणाने

बोलत होते. आमच्या कारंजा-माहूर यात्रेचे वर्णन विचारले, कुठे कधी गेलात? कसे गेलात? श्री दत्तप्रभूंचे शयनगृह पाहिले का? आम्ही माहूर पायथ्याशी असलेली चक्रधर स्वामी व दत्तप्रभूंची शयनाची जागा पाहिल्याचे सांगितले. 'श्री' म्हणाले, ''अहो दत्तप्रभू अत्रि-वडीलांच्या पुढ्यात झोपत असतात! तुम्ही 'अत्रि-अनसूयेची शिखरावरील कुटी' पाहिली का?'' आम्ही पावसामुळे दत्तशिखर उतरुन अनसूया शिखरावर जाऊ शकलो नाही असे सांगताच म्हणाले, ''मुख्य ते राहिले'' नंतर 'श्रीं'नी ''श्री नृसिंह सरस्वती यांचा वंश आजही चालू आहे. त्यांचे वंशज नागपूर व काशीमध्ये राहतात. एक वंशज 'काळे' आडनाव लावतात पण हे आडनाव कोणत्याही ज्ञातीत सापडते म्हणून दत्तप्रभू कोंकणस्थ होते असा मात्र समज करून घेऊ नये.'' ही माहिती दिली. आम्ही आणखी एक प्रश्न केला तो असा, 'अक्कलकोटचे स्वामी हेच खरे कर्दळी वनात श्री शैल्य येथे निघून गेलेले श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज का? तेच तप:श्चर्येला बसले, त्यांच्यावर वारुळ झाले. नंतर एक लाकूडतोड्या झाड तोडत असता कुऱ्हाड वारुळास लागून ते वरुळ भंगले; स्वामींच्याही ढोपरास थोडे लागले. ते त्या समाधी अवस्थेतून उठले, तेच ते अक्कलकोटचे स्वामी का?' प.पू. महाराज म्हणाले, ''तेही दत्तावतारी होते पण नृसिंह सरस्वती अवतारातीलच ते, असे म्हणता येणार नाही; कारण श्री नृसिंह सरस्वती स्वामी हे त्रिदंडी संन्यासी होते तर अक्कलकोट स्वामी दंडधारी नव्हते''



५५) गाणगापूर यात्रा

दि. ८.८.१९८१ रोजी रात्री १०.१० च्या मद्रास मेलने, प.पू. श्रीमहाराज, सोबत गुरुजी जगन्नाथ पुजारी ह्यांना घेऊन गाणगापूर करता रवाना झाले. श्री. गोडसे, मी व शृंगारपुरे दि. १०.८.१९८१ रोजी गाणगापूरला पोहोचलो. श्री वासुदेवानंद सरस्वती धर्मशाळेत आम्ही उतरलो. 'श्री' तेथेच उतरले होते. आम्ही हातपाय धुऊन लागलीच प.पू. महाराजांचे दर्शन घेऊन आलो. आम्हा तिघांचेही 'श्रीं'नी कुशल विचारले.

रेल्वे स्टेशनपासून बसने गाणगापूरला यावे लागते, ती एकच बस नंतर कधी दुसरी बस येईल त्याची शाश्वती नाही. तुफान गर्दी, धक्का-बुक्की, कसा बसा बसमध्ये प्रवेश मिळविला. अर्ध्यातासानंतर गाणगापूर आले. परंतु तोपर्यंत तिकीटे देण्यास व पैसे घेण्यास वाहक आमच्यापर्यंत पोहोचलाच नाही. उतरायलाही लोटालोटी, कसेबसे खाली उतरलो. आता प्रश्न बस तिकीटाचे आमचे पैसे कुठे द्यायचे? शेवटी आम्ही आमच्या तिघांच्या तिकीटांचे पैसे श्री दत्तप्रभूंच्या मंदिरात दान पेटीत अर्पण केले.

मंदिराच्या दाराला असलेल्या झरोक्यांना दोन्ही डोळे लावून पादुकांचे दर्शन घेतले.

पादुकांसमोर दत्तप्रभुंचा पितळी किंवा सोन्याचा मुखवटा ठेवला होता. रात्री पालखी निघते, मंदिराभोवती प्रदक्षिणा करते. 'श्रीं'नी पालखी समोर अभंग म्हटला. दि. १०.८.१९८१. दत्तप्रभुंच्या पालखी प्रदक्षिणा वाटेवर भक्त भाविक आडवे झोपतात. पालखीचे भोई या झोपलेल्या भक्तांना ओलांडून पालखी नेतात. आपल्या अंगावरून दत्तप्रभू गेले हे मोठे समाधान, आनंद भक्तांना मिळतो. जसा भाव तसे लाड दत्तप्रभू पुरवितात. शेजारती करून आम्ही धर्मशाळेत आलो. भोजन व्यवस्था श्री गाणगापूरकर भटजींकडे होती.

दि. ११.८.१९८१ ला सकाळी प.पू. महाराजांचे वेळेतच आम्हीही मंदिरात गेलो. प.पू. महाराजांच्या हस्ते अभिषेक झाला. या पादुका, आपला अखंड पाय असावा, अशा फुगीर पाषाणाच्या आहेत. सोवळ्यातच असताना स्पर्शसुख होऊ शकते. ह्या पादुका हाताला मांसल भासतात. या दोन्ही पादुका (म्हणजे पावलेच) चांदीच्या डब्यात (झाकण न लावता) ठेवतात. प.पू. महाराजांची पादुका पूजा चालू असताना आम्हांसही दर्शन झाले. संपूर्ण पूजा पहायला मिळाली. दत्त पादुकांना प.पू. महाराज अगदी हलक्या हाताने कसे हाताळत होते. सुगंधी अत्तरे, सुगंधी द्रव्यांनी कसे विलेपन करीत होते हे अगदी पहाण्यासारखे होते. प.पू. महाराजांचे चेहऱ्यावर उमटणारे भाव हृदयात साठवण्यासारखे होते. आरती झाली. तेजानेच तेजाची आरती होती ती! पहाणारे आम्ही भाग्यवान! प.पू. महाराजांसोबतच प्रसाद भोजन भटजींकडे झाले. सकाळी संगमावर स्नान व पूजाही झाली होती.

प.पू. श्रीमहाराज, 'वासुदेव धर्मशाळेत' देवासमोरील असलेल्या मोठ्या हॉल शेजारील खोलीत बसले हाते. आम्ही तिघांनी नमस्कार करून साधना कक्षात बैठकीस बसत आहोत सांगून खाली तळघरात साधनेकरीता छोट्या छोट्या खोल्या स्वतंत्र अशा बांधल्या आहेत. तेथे उदबत्ती लावून बसलो. ध्यान धारणा अतिशय चांगली व समाधानाची झाली. त्यात श्री. शृंगारपुरे यांचा तर ॐकार प्रणव लागून एवढा प्रचंड ध्वनी त्या वास्तुत निनादला की आम्ही दोघेही पूर्ण शहारलो. तो ध्वनी त्या खोलीस दणाणून सोडत होता. मला त्यांची ती अवस्था पाहून मनास थोडेसे भयच वाटले. 'श्रीं'चे पुन्हा दर्शन घेतांना ही हकीकत 'श्रीं'च्या कानावर घातली. परंतु काहीही प्रतिक्रिया किंवा शब्द न बोलता नुसते गोड हसले.

मुंबईकर साधकांशी बोलताना 'श्री' म्हणाले, ''बैठक कां लागत नाही याचा विचार न करता बैठक न झाल्यास स्तोत्रपाठ, नामजप, स्मरण इ. करावे. एखाद्याच्या बाबतीत पापक्षय होण्यास वेळ लागतो.''

दि. १२.८.१९८१ - 'श्रीं'नी नैवेद्य महाप्रसाद श्री जगन्नाथ पुजाऱ्यांच्या भावाकरवी केला. आम्हां सर्वांस आमंत्रण दिले होते.

५६) तुळजापूर यात्रा

दि. १२.८.१९८१ दुपारच्या १.४५ च्या एस्.टी.ने आम्ही तिघे मुक्कामास तुळजापूरला गेलो. प.पू. महाराज व श्री. पुजारी पटवर्धनांच्या गाडीने सोलापूरला गेले. आम्ही तुळजापूरला सिद्धयोगाश्रमांत उतरलो. श्री. माशाळकर यांची ओळख झाली. प.पू. महाराज रात्री सोलापूर येथे येऊन श्री. बापूसाहेब कुबडे यांच्याकडे उतरले. सालाबाद हा कार्यक्रम प.पू. गुळवणी महाराजांपासून अव्याहत चालू आहे.

प.पू. महाराज श्रावण शु. द्वितीयेला गाणगापूरला येणार, तेथून चतुर्थीला सोलापूर श्री. बापूसाहेब कुबडे यांच्या घरी जाणार, नागपंचमीला श्रावणी त्यांच्या घरीच साजरी करणार, श्रावणी आटोपून सकाळी 'श्री' तुळजापूरला येणार हे ठरलेलेच.

दि. १३.४.१९८१ ला श्री. कुबड्यांकडे श्रावणी आटोपून सकाळी 'श्री' तुळजापूरला आले. धाकट्या देवीची 'श्रीं'नी पूजा केली. त्यांच्या बरोबर आम्हालाही पूजा करण्याची संधी मिळाली.

दि. १४.४.१९८१ ला प.पू. महाराजांनी आम्हा तिघांस ते उतरले होते तिथेच म्हणजे पाठक गुरुजींच्या घरीच मुक्कामास यायला सांगितले. दि. १३.४.१९८१ ला रात्रीच आम्ही श्री. पाठक गुरुजींच्या माडीवर राहण्यास आलो. माडी मोठी होती. अर्ध्या माडीत प.पू. महाराजांची कॉट व खाली श्री. जगन्नाथ पुजारी व श्री. रघुनाथराव तर अर्ध्या आतील भागात आम्ही तिघे होतो. म्हणजे सहनिवासच होता. मला मनातून वाटत होते प.पू. महाराज आज खूप दमले आहेत. आपण जावे आणि त्यांचे पाय, कंबर, पाठ चेपावे. परंतु त्यांनी सेवा घेतली नसती; कडक शिस्त आणि सोवळ्या ओवळ्याचे कर्मठ श्री. जगन्नाथ पुजारी खाली झोपलेले, त्यांनी निश्चितच नकारात्मक वक्तव्य करून प्रतिबंध केला असता. म्हणून मी इच्छा दाबली, आपला अपमान होईल म्हणून सेवेचे धैर्य केले नाही. श्री. पाठकांच्या घरी त्यांचे धाकटे चिरंजीव होते. पेहराव म्हणजे दिवसभर मळका लेंगा, मळका पांढरा हाफशर्ट आणि डोक्यावर कल्हईवाले घालतात तशी तिरकी किंवा आडवी घातलेली मळकट गांधी टोपी ध्यान वेडसरच वाटायचे! अशिक्षित, साधा, भोळा, बुटका माणूस. भाषा गावंढळ, सतत बडबड पण कमाईची अक्कल मात्र परमेश्वराने बऱ्यापैकी दिलेली. बायको सुंदर! एवढ्या वर्णनाने हे ध्यान आपल्या समोर उभे ठाकले असावे! त्याचे नाव माहीत नाही पण सर्व म्हणायचे बाळू!

माझ्या मनात हे विचार चालू असतानाच बाळू वर आला. प.पू. महाराज पलंगावर झोपले होते. पण जागे होते. श्री. जगन्नाथ पुजारी व रघुनाथरावही काहीना काही बोलत होते. इतक्यात बाळोबांची स्वारी वर आली आणि प.पू. महाराज झोपले होते त्या कॉटवर कडेला बसली व म्हणू लागली, 'ओ गुरुजी! गुरुजी! जरा उपडं झोपा; म्या तुमची पाठ रगडून देतो.

लय छान वाटंल बगा! पाय पोट्ऱ्या रगडू का? रगडतो रगडतो.' प.पू. महाराजही त्याच्याशी बोलू लागले, ''अहो राहू द्या! तुम्हीही दिवसभराच्या कामाने दमला असाल!'' प.पू. महाराजांकडे, त्यांच्या बोलण्याकडे काहीच लक्ष न देता त्याने पाय चेपायला तर सुरुवात केली व पुन्हा मोठ्या आवाजात म्हणतो, 'ओ, गुर्जी गुर्जी तुम्ही माशी मंतार द्या! द्याल का? कधी आता का सकालच्यान्' प.पू. महाराज ... ''अहो! तुमची रोजची भगवतीची सेवा चालू आहे! आल्या गेल्या अतिथींची सेवाही चालू आहे! तुम्हाला मंत्र वगैरेची तशी काही आवश्यकता नाही.''

तरी ह्याचे घोडे पुढेच धावत होते, 'ते काय बी सांगू नका, मला सकालच्यान मंतार देनार की नाय? आनी माझ्या मांगारणीला पण.' प.पू. महाराजांना या त्रासापासून सोडविण्याकरीता की काय, पण जगन्नाथ पुजारी मोठ्याने ओरडले, 'ए बाळ्या! ये इकडे ये, माझी कंबर फार दुखते आहे, ये जरा चेप ये.' बाळ्या लागलीच जगन्नाथ गुरुजींकडे जाऊन त्यांचे पाय चेपू लागला.

दुसऱ्या दिवशी प.पू. महाराजांनी खरोखरच त्या उभयतांना स्नान वगैरे आटोपून येण्यास सांगितले. पाटावर बसविले आणि या 'भोळ्या भावाला' मंत्रदीक्षा दिली. अहो भाग्यम्!

दि. १४ लाच श्री तुळजाभवानी (मोठ्या देवीची) पूजा झाली. देवी जवळ भोई असतात, त्यांचे मार्फत पूजा, देवीस दह्याचा अभिषेक वगैरे होत असतो. प.पू. महाराजांचे स्वहस्ते देवीची पंचामृत स्नानापासून षोडशोपचार पूजा आरती प्रसाद झाले. दुपारी श्री. पाठक गुरुजींच्या घरी प.पू. महाराजांतर्फे प्रसाद भोजन झाले व आम्हा तिघांस 'श्रीं'च्या पंक्तीचाही लाभ झाला.

ही यात्रा व हा अपार आनंद मिळवून आम्ही आमच्या सांसारिक नित्यकर्माकरीता मुंबईस परतलो.

५७) सत्पुरुषांची चरित्रे वाचावीत

प.पू. महाराजांच्या नित्य सांगण्यात यायचे की, ''सत्पुरुषांची जेवढी चरित्रे वाचायला मिळतील तेवढी वाचत जावीत. पुस्तकाचे वाचन करताना आपण त्या सत्पुरुषांच्या संगतीत जातो. सत्संग घडतो. संत वागतात कसे, राहतात कसे, त्यांना काय सांगायचे असते, साधनामार्ग त्यांनी कसा आचरला, त्यांचे काही अनुभव, त्यांचे ठाई दिसून येणारी दैवी गुणसंपदा या सर्व गोष्टींचे शुद्ध सात्विक संस्कार अशा ग्रंथांच्या वाचनाने आपले मनावर होत असतात आणि ते संस्कार आपल्या नित्य आध्यात्मिक साधनेत अतिशय उपयुक्त ठरतात.''

श्री. गोडसे यांचे वडील, आम्ही त्यांना 'अण्णा' म्हणत असू! त्यांनी मला एकदा श्री. रावसाहेब सहस्रबुद्धे महाराजांचे चरित्र वाचण्यास दिले. रावसाहेब महाराज प.पू. गुळवणी महाराजांचे समकालीन प.पू. गुळवणी महाराजही आपल्या साधक शिष्य परिवारास सांगत, ''तुम्हाला उन्मनी अवस्थेतील जडभरतासारखा माणूस कसा असतो हे पहायचे असेल तर श्री रावसाहेब सहस्रबुद्धे महाराजांच्या (पुण्यातच ते रहात होते) दर्शनास जा!''

चरित्र अप्रतिम आहे, त्यांना गुरुभेटीची आणि सहवासाची कशी ओढ होती ते वर्णन फारच चांगले आहे. असे बरेच प्रसंग आले असून संपूर्ण चरित्रच वाचनीय आहे. पुस्तक वाचून पूर्ण झाल्यानंतर मी ते त्यांना नेऊन दिले. त्या दिवशी गोडसे घरी नव्हते. श्री. अण्णा मला म्हणाले, ''शशिकांत, रावसाहेबांचे प्रेत यात्रेस दहनापर्यंत मी होतो. अस्थि संग्रहालाही होतो. त्यातील छोट्या दोन अस्थि मी आणून एका डबीत भरून देव्हाऱ्यात देव पूजेत ठेवल्या आहेत' त्यांनी मला ती डबी काढून अस्थींचे दर्शन घडविले. मी दर्शन घेतले, परंतु एखाद्या सत्पुरुषाच्या अस्थि घरात आणि देव पूजेत ठेवणे कितपत बरे आहे? ही शंका मनात आली. मी त्यांना काहीच बोललो नाही. एक गोष्ट माझ्या लक्षात होती ती अशी - माझी थोरली बहीण निवर्तली तिचे क्रिया कर्मांतर विधी करण्यास तिच्या अस्थि घेऊन मी तिच्या मुलाबरोबर हरेश्वरी निघालो होतो. माझे मेहुणे मला विनंती करू लागले की एखादा अस्थीचा तुकडा पत्नीचे स्मरण म्हणून त्यांना द्यावा. तो ते सोन्याचे डबीत ठेवून पूजणार होते. ही गोष्ट मी प.पू. महाराजांस विचारली होती. प.पू. महाराज म्हणाले, ''शास्त्रानुसार मृत देहाचा कोणताही अवशेष शिल्लक ठेवू नये. असे केल्याने भौतिक देहाची समाप्ती होत नाही. मृत व्यक्तीच्या जीवात्म्याच्या पुढील परलोक यात्रेतील गतीत अडथळा निर्माण होतो. अहेवमृत्यू आलेल्या स्त्रीच्या अस्थींचा अवशेष ठेवायचाच असेल तर एका मडक्यात विधीयुक्त संस्कार करून तुळशी वृंदावनाचे आत बंदीस्त बांधकामात ठेवता येतो. ती सतीची समाधी म्हटली जाते. सत्पुरुषांची समाधी बांधतांना सुद्धा त्यात त्यांच्या अस्थि अथवा देह विधीयुक्त शास्त्रोक्त मंत्राने संस्कार करून बंदिस्त ठेवतात.''

हे माझ्या लक्षात होते. श्री. गोडसे यांच्या वडीलांचेही निधन झाल्यानंतर ही गोष्ट मी त्यांच्या कानी घातली. पुढे 'श्रीं'चे मार्गदर्शनाखाली श्री. गोडसे यांनी त्या सत्पुरुषांच्या अस्थींचे समुद्रात विधीवत् विसर्जन केले.

५८) 'श्रीं'चे त्रासदायक प्रवास

दि. १९.१०.१९८१ रोजी सकाळचे आन्हिक आटोपून प.पू. महाराज, श्री. दामू अण्णा नवरे यांच्या मुलाच्या लग्नाकरीता पुण्याहून सकाळी १०.३० च्या पुणे मुंबई पॅसेंजरने निघाले. श्रींनी सकाळी ९ वाजण्यापूर्वीच काही अन्नग्रहण केले असेल. प्रवासात त्रास नको म्हणून 'श्री' मित आहार करतात. कधीही प्रवासास निघताना 'श्री' गाडी सुटण्याच्या एक तास आधीच स्थानकावर हजर असतात. सोबत रघुनाथराव कुलकर्णी होते. ते सांगत होते की, गाडी खच्चून पॅसेंजर्सनी भरली होती. रिझर्वेशन नव्हते. पॅसेंजर, त्यातून रिझर्व्हेशन नाही. नाना तऱ्हेचे लोक, अस्वच्छता, ढकला ढकली, रेटा-रेटी होती. अशा त्या पॅसेंजर गाडीच्या डब्यात प.पू. महाराजांची वर्णी लावली. 'श्री' अत्यंत अवघडून बसले होते. हातपाय हलवायला, मांडी बदलायलाही वाव नव्हता. १०.३० वाजता सकाळी निघालेली ही गाडी सायंकाळी ४.३० वाजता दादरच्या स्टेशनात शिरली. सहा तासांच्या या कठोर शिक्षेनंतर म्हणजे परेच्छा प्रारब्ध भोगून प्लॅटफॉर्मवर उतरले. नेहमीचे मुंबईकर भक्त 'श्रीं'च्या स्वागतास उपस्थित होते. एक बरे की श्री. नवरे यांच्या मुलाचे लग्न दुसऱ्या दिवशी होते. कोणाचे काजास 'श्रीं'चे आगमन आणि कोण्या भक्तास सेवेचा लाभ आणि आनंदाची पर्वणी! नागले म्हणजे मी पूर्व पुण्याईने आपली गाडी घेऊन आलो होतो. 'श्रीं'ना रघुनाथराव यांच्यासह किंग्ज सर्कल येथे श्री. माधवराव तांबोळींचे घरी घेऊन गेलो. हातपाय धुवून 'श्री' आसनस्थ होताच सर्वांनी दर्शन घेतले. सायंसंध्या चालू असताना रघुनाथरावांकडून प्रवासाचा इतिवृत्तांत कळला. आम्हा सर्वांस फार वाईट वाटले. या वयात 'श्रीं'ना अशा गैरसोयीतून प्रवासाची वेळ येऊ नये. आम्हां कोणाही गुरुबंधूस 'श्री' रिझर्व्हेशन विना पॅसेंजरने प्रवास करणार आहेत हे आधी कळले असते तर निश्चितच योग्य ती त्यांची काळजी घेऊन वाहन व्यवस्था करता आली असती.

संध्या झाली आणि प.पू. महाराज शंकर मठात जाण्यास निघाले. मी गोडसे, शृंगारपुरेही सोबत होतो. तिथल्या प्रसन्न वातावरणात प्रवेश करताच मन आनंदी झाले. तेथील मद्रासी ब्राह्मण व शास्त्री पंडीत प.पू. महाराजांच्या स्वागतास लागलीच पुढे आले. संस्कृत भाषेत त्यांच्या मुखातून स्वागतोद्‌गार निघाले. सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्न आनंदी सात्विक भाव होते. दर्शन घेऊन प.पू. महाराज आग्रहास्तव आसनावर बसले. सभोवार ही सर्व विद्वान मंडळी बसली. संस्कृतातूनच भाषण संभाषणे सुरू झाली. 'श्रीं'ना देखील मनस्वी आनंद झालेला होता. प्रवासाचा सर्व शीण उतरल्याचे चेहऱ्यावर दिसतच होते. विद्वानच विद्वानात रमतात, काय पहावा तो रम्य सोहळा!

दि. २०.१२.१९८१ रोजी सकाळचे आन्हिक होताच; प.पू. महाराजांना घेऊन शिवाजी पार्कवरच्या स्काऊट हॉल मध्ये गेलो. प.पू. सद्‌गुरु रमादेवी यांच्या सुश्राव्य प्रवचनास ह्याच

हॉलमध्ये मी १९५८ साली आलो होतो. 'श्रीं'ना आम्ही बाहेर गाडीतच थांबत आहोत असे सांगून मी व पुतण्या संजय गाडी पार्कींग करून 'श्रीं'ची मार्ग प्रतिक्षा करण्याच्या सुखसंवेदनेत गाडीत उदबत्ती लावून स्मरण करीत बसून राहिलो. वधू-वरांना शुभाशीर्वाद देऊन प.पू. महाराज थोड्याच वेळात बाहेर आले. आम्ही स्काऊट हॉलच्या गेटकडे डोळे लावूनच होतो. लागलीच गाडी गेटजवळ नेऊन गाडीचे दार उघडून 'श्रीं'ना बसवले. रघुनाथरावही बसले. प.पू. महाराज म्हणाले, ''गोडसेंचे घर जवळच आहे ना? त्यांचे वडील आजारी होते, त्यांना भेटायला जाऊ या का? तुम्हास कोठे लवकर जायचे वगैरे नाही ना?'' मी मनात म्हटले आपला सहवास 'दुर्लभम् भुवनत्रये' असा हा परमानंद सोडून आम्ही कोठे जावे? मी म्हणालो, 'आम्हास कोठेही जायचे नाही. जास्तीत जास्त आपल्या सोबतच रहायचे आहे.'

श्री. गोडसेंचे वडील 'श्रीं'च्याच कृपेने अत्यंत गंभीर अशा मोठ्या आजारातून उठले होते. गाडी शहासदनच्या गेट समोर उभी केली. श्री. गोडसे वाटच पहात होते. ते धावतच गाडीजवळ आले. प.पू. महाराजांचा हात धरून त्यांना त्यांनी गाडीतून उतरवून घेतले. एक जिना चढून 'श्री' गोडसेंच्या घरी पोहोचले. यथायोग्य स्वागताचे गुरुभक्तांना काही सांगावे, सुचवावे लागतच नाही. साक्षात गुरुदेव दारी उभे म्हटल्यावर सहजप्रवृत्तीने भाव भक्तीने सर्व घडते. आपले शेजारी वडील अण्णांना बसवून घेऊन, ''काय आता बरे आहे ना?'' अशी 'श्रीं'नी आपुलकीने चौकशी केली. ह्या भेटीने अण्णांची जर काही आधी-व्याधी शिल्लक असली तर निश्चितच दूर होणार होती आणि ती तशी झाली. दादर पश्चिमेकडून 'श्रीं'ना घेऊन आम्ही श्री. तांबोळी यांच्याकडे परतलो. थोड्या विश्रांती नंतर पुन्हा दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली. श्री. माधवरावांच्या विनंती वरून 'श्रीं'नी रामायणावर श्रवणानंद देणारे सुंदर निरुपण केले. 'श्रीं'चा उत्साह काय वर्णावा! जरा सुद्धा चेहऱ्यावर थकवा नाही, प्रसन्न चित्त!

रात्री ९.३० वाजता मुंबईकर भक्तांनी दादर स्टेशनवर हजेरी लावली. 'श्रीं'ना तांबोळींचे घरून दादर स्टेशनला गाडीने आणले. दादर-अमृतसर एक्सप्रेसने जळगावपर्यंत 'श्रीं'चे प्रयाण रात्री १०.४० वाजता होणार होते. गाडी दादरहूनच सुटणार असल्याने घाई गर्दी धावपळ नव्हती. बर्थ आधीच आरक्षित केले होते. 'श्रीं'ना फर्स्टक्लासचे रिझर्व्हेशन केलेले मुळीच आवडत नाही. 'श्री' म्हणतात ''जागा आरक्षित असली की प्रवास सुखाचा होतो! मग आणखी प्रथम वर्गाकरीता अधिक पैसे कशासाठी वाया घालवायचे? त्यापेक्षा ते पैसे देवधर्म, सत्पात्री दानधर्म यासाठी वेचावेत.'' 'श्री' आपले जागेवर स्थानापन्न होताच भक्तांची दर्शनास रांग लागली. बायका मुलांना 'श्रीं'नी खाऊसाठी पैसे दिले. गाडी सुटण्याची वेळ झाली; आता काही क्षणात माझी माय माऊली दृष्टीआड होणार, या विचाराने प्रत्येक भक्ताचे हृदय हेलावत होते. आम्ही सर्व प्लॅटफॉर्मवर उतरलो. सिग्नल मिळाला. शिट्ट्या वाजल्या. गाडीचा

हॉर्न वाजला. गाडी हळुहळू गती घेऊ लागली. 'श्री' हसत मुखाने खिडकी बाहेर, असंख्य जीवांचा उद्धार करणारा आपला पवित्र हात हालवून आम्हास निरोप देत होते.

५९) हरिहरेश्वर वास्तव्यात साधकांना मार्गदर्शन

हरिहरेश्वराचे वास्तव्यात प.पू. महाराजांना साधने संदर्भात अनेक प्रश्न साधकांकडून विचारले गेले. त्या सर्व उत्तरातून वेचक आणि साधनेस मार्गदर्शनपर विचार निघाले ते असे-

ध्यान धारणेस चांगली वेळ कोणती ह्या प्रश्नावर, 'रात्री एक वाजताची वेळ' प.पू. महाराजांनी सांगितली. एरवी साधनेस विशेषत: बैठकीस केव्हा बसावे या बाबत बोलताना प.पू. महाराज म्हणाले ''उपाशी पोटी बैठकीस बसू नये, तसेच भरपोटीही बसू नये. काही अल्पोपहार केल्यानंतर तासानंतर बसावे. सकाळची सायंकाळची जी कोणती वेळ ठरविली असेल ती सातत्याने सांभाळावी. ती ठराविक वेळ, ठराविक जागा, नित्याची झाली की, शक्तीदेवता त्यावेळी तेथे उपस्थित असते. चंद्रनाडी सूर्यनाडी श्वसनात चालू आहे किंवा नाही हे पाहण्यापेक्षा दोन्ही नाकपुड्यातून श्वासोश्वास चालू असतो ती वेळ चांगली. साधना तीर्थक्षेत्राचे ठिकाणी, कन्यागत सिंहस्थ अशा पर्वात, अधिकमासात जास्त करावी. ग्रहण काळात साधना-जप ग्रहण लागल्या पासून मोक्ष होईपर्यंत करावी. ग्रहण काळात नदीत किंवा समुद्राचे पाण्यात बसून केलेली साधना अधिक फलप्रद होते. सार्वजनिक ठिकाणी जेथे सर्व जनांची ये-जा असेल अशा ठिकाणी साधना करू नये. आपली साधना गुप्त असावी.

हे झाले स्वत:चे साधने बाबत; सामुदायिक साधनाही श्री वासुदेव आश्रमात साधना कक्ष हॉलमध्ये होत असते. ह्या साधनेत फक्त अनुग्रहित साधक असतात. येऊरलाही अशा सामुदायिक बैठकी झाल्या. दिगंबराची धून ही तर सर्व भाविकांसहच असते.

६०) ग्रहणात रात्री समुद्र स्नान

दि. ९.१.१९८२ रात्री ११ ते १२ चंद्रग्रहण होते. समुद्र स्नान हे सर्व श्रेष्ठ पवित्र समजले जाते. आम्ही भक्तमंडळी मोजकीच म्हणजे श्री. गोडसे, शृंगारपुरे दांपत्य, घोलकर, नागले, आम्ही सर्व, श्री. प्रभुदेसाईंचे सोबत हरेश्वरी रात्रीच्या समुद्र स्नानास या ग्रहण काळात जायचे ठरविले.

श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे उभयता पूर्वतयारी करीता पुढे गेले. मी, गोडसे, प्रभुदेसाई, घोलकर ड्रायव्हिंगला संजय नागले असे दि. ८.१.१९८२ रोजी दुपारी ३ वाजता गाडीने

निघालो. प.पू. महाराजांचाच विषय आणि अध्यात्मावर चर्चा, श्री. प्रभुदेसाई यांच्याकडून मार्गदर्शन अशा गप्पा गोष्टीत आमचा प्रवास मजेत सुरू झाला. सायंकाळी ५ पर्यंत आम्ही पेणच्या पुढे गेलो. वडखळ जवळ जवळ येत होते. येथे आम्ही थोडी विश्रांती व चहापान करणार होतोच. पण तेवढ्यात क्लचप्लेट मधून आवाज येऊ लागला. आम्ही गाडी मेकॅनिककडे नेली. त्या आवाजाचे कारण शोधेपर्यंत आम्ही विश्रांती गृहात चहा व श्री. प्रभुदेसाई यांच्याकरीता दूध घेऊन वाट पहात बसलो. चि. संजय आला व म्हणाला क्लचप्लेट बदलावी लागेल. सर्व मशीन काढावे व पुन्हा जोडावे लागेल. चार ते पाच तास जातील. आता इलाज नव्हता. विश्रांती गृह उघडे होते तोपर्यंत तेथे बसलो. नंतर रस्त्याचे कडेला! गप्पांमध्ये वेळ जात होता. पण माझा जीव कासावीस होत होता. आम्ही काही खाऊ शकलो असतो पण श्री. प्रभुदेसाईंची पाळवणूक कडक होती. ते बाहेरचे दूध व फळांखेरीज काही खाऊ शकत नव्हते. पाणीही त्यांनी त्यांचे सोबत आणले होते. मी व संजय, आमचे रात्री-बेरात्री अनेक वेळा प्रवास हरेश्वरचे झाले आहेत. परंतु या तीन साधक मंडळींची आपल्या गाडीच्या बिघाडामुळे फारच कुचंबणा होत आहे म्हणून माझी आतून घालमेल चालू होती. आठ वाजले, नऊ, दहा, दुकाने, हॉटेल्स बंद झाली. आता काय करावे. माझ्या जवळ हरेश्वरच्या कार्यक्रमात अल्पोपहारा करता सौ. लताने दिलेला गाजर हलवा होता. पण तो काही पोट भरेल इतका नव्हता. त्यातून तो निव्वळ दूध माव्यात केला होता. साधकांना चालेल असा जरी असला तरी काही योगी साधक मुळा, गाजर निषिद्ध मानतात! प्रभुदेसाईंना चालेल की नाही? माझी बेचैनी श्री. प्रभुदेसाईंच्या लक्षात आली. ते म्हणाले, 'अहो गुरुबंधूंकडील आणि तो पण दुधा माव्यात केलेला हलवा मला चालेल.' आम्ही सर्वांनी गाजर हलव्याचा फडशा पाडला. होणाऱ्या उशीरा बद्दल माझी अगतिकता व दीन अवस्था पाहून श्री. प्रभुदेसाई म्हणाले, 'अहो नागले तुम्ही एवढे हवालदिल का होता? आपल्याला हरिहरेश्वर क्षेत्रात केव्हा प्रवेश करू द्यायचे ते श्री कालभैरवाने ठरविले आहे. ती वेळ आली की आपण क्षेत्रात प्रवेश करूच. केव्हा पोहोचायचे हे जगन्नियंत्याच्या मर्जीवर आहे. प्रयत्न करणे आपले काम ते आपण करीत आहोत.' या श्री. प्रभुदेसाईंच्या वाक्याने माझे मन एकदम शांत झाले. इतकेच नाही तर अशा प्रसंगांना सामोरे जाण्याचा एक नवा दृष्टीकोन मला गवसला!

आपण कितीही काहीही ठरवावे, पण ईश्वराला मंजूर असेल तेच होणार. 'कर्मण्येवाधिकारस्ते...' हेंच श्रीकृष्ण सांगतात. पुढील आयुष्यात लेट झालेल्या गाडीची, बसची, अपॉईंटमेंट दिलेल्या व्यक्तींच्या भेटीची वेळ टळून गेली तरी माझ्या मनावर कधीच ताण आला नाही. होणाऱ्या घडणाऱ्या घटना श्री इच्छेनेच घडत असतात. रात्री ११ नंतर आमची गाडी ठीकठाक झाली व प्रवासास प्रारंभ होऊन रात्री २ पूर्वी आम्ही घरी पोहोचलो.

तोपर्यंत श्री. व सौ. शृंगारपुरे 'दिगंबराची' धून करीत होते.

दुसऱ्या दिवशी दि. ९.१.१९८२ रात्री ११ वाजता समुद्र स्नानाकरता चांदण्यात, नारळी सुपारीच्या बागातून, शेताच्या बांधावरून, केतकीच्या बनातून वाट काढीत, भाटातून समुद्र किनारी आलो. पूर्ण भरतीची वेळ होत आली होती. समुद्र शांत होता. श्रीगुरुदेव प.पू. दत्तमहाराजांना मन:पूर्वक साष्टांग नमस्कार घालून जपमाळेसह आम्ही समुद्र प्रवेश केला. तसे आम्ही काही खोल पाण्यात गेलो नाही. वाळूत बसल्यानंतर छातीपर्यंत पाणी लागत होते. ग्रहण स्पर्श झाला. आमचे मनोमनी जप सुरू झाले. कोणी कोणाजवळ बोलत नव्हते. १२ ते १२.३० पर्यंत आम्ही जपात होतो. पूर्ण समा होता म्हणून लाटाही जास्त उसळत नव्हत्या. नंतर आम्ही कपडे बदलून धोतर उपरणी परिधान करून श्री हरिहरेश्वर मंदिरात गाभाऱ्यात साधनेस बसलो. रात्री २ नंतर घरी येऊन चहापान करून दिगंबराची धून प.पू. महाराजांचे वास्तव्य झालेल्या खोलीत केली. ध्यान धारणा चांगली झाली. धून चांगली रंगली. सद्गुरु कृपेने या ग्रहण काळाचा पूर्ण फायदा करून घेतला. आनंदी आनंद!

दुसऱ्या दिवशी भोजन विश्रांती घेऊन तीन वाजता श्री हरिहरेश्वर कालभैरव तथा योगमाता योगेश्वरीचा निरोप घेऊन आम्ही कर्मभूमी मुंबापुरीस प्रयाण केले.

प.पू. महाराजांना आम्ही जेव्हा हा ग्रहण काळातील समुद्रस्नान आणि एकूण कार्यक्रम पार पाडल्याचे निवेदन केले तेव्हा ते ऐकून आनंदभरे कौतुक करून त्यांनी समाधान व्यक्त केले. आमची सेवा श्री चरणी रुजू झाल्याची पावती मिळाली.



६१) सर्वभार श्री सद्गुरुंवर / स्वप्नी मंत्र प्रदान

श्री सद्गुरु साधकांचा योगक्षेम सांभाळत असतात. प्रारब्धवशात म्हणजेच पूर्वसंचितानुसार जीवास सुख दु:खाच्या फेऱ्यातून जावेच लागते. मात्र संसारात येणारी संकटे, समस्या अनेक ऐहिक अडचणी हे सर्व भोग भोगण्यास श्री सद्गुरु सहनशीलता देतात. साधनेत व्यत्यय नको म्हणून येणाऱ्या संकटांवर ते उपाय योजनाही करीत असतात. सद्गुरुंना स्मर्तृगामी म्हणतात. भक्ताने स्मरण करताच ते त्याच्या हाकेला अव्यक्तरुपात हजर असतात. पण ह्याच्याही पुढे जाऊन म्हणता येईल की आपण स्मरण करण्यापूर्वीच आणि साद घालण्यापूर्वीच सद्गुरु पाठीशी उभे असतात. सांसारिक ऐहिक जीवनात अध्यात्म साधनेस आत्यंतिक महत्त्व आहे. पण त्याचबरोबर संसार आणि अध्यात्म ही एक तारेवरची कसरतच आहे. साधनेत मिळणारा आनंद लक्षात घेता संसारातील संकटे, अडीअडचणी, दु:खे सुसह्य होत असली तरी एकदा का एकावर एक संकटाचे डोंगरावर डोंगर चढू लागले की कितीही ठरविले असले की

सद्गुरुंना सांसारिक ऐहिक सुखासाठी हाक मारायची नाही तरी धावा करण्याची वेळ येतेच.

आम्ही हरेश्वरी जाऊन साधनांतर्गत आनंद उपभोगून आलो; आणि मुंबईस नित्यकर्मास लागताच कळले की, तुर्भे नवी मुंबई येथे चालू असलेली तीनही कामे बंद पडली आहेत. सिमेंट मिळत नव्हते. झालेल्या कामांची बिलेही अडकलेली. संपूर्ण भांडवल गुंतलेले. अनपेक्षितपणे मिळणाऱ्या रकमा अडकल्या. कधी मिळणार शाश्वती नाही. मोठ्या मुलाची कॉलेज ॲडमिशन, दुसरा हायस्कूलला सातवीत, धाकटा दुसरीत.

दि. १० ते १३.१.१९८२ ला सर्वत्र खेटे मारून झाले. काही निष्पन्न झाले नाही. पुढील महिन्यात घरखर्चाची तारांबळ! धंद्यातील चढउतार सहधर्मचारिणीस कथन करणेही काही वेळा ठीक नसते. साधनेतून आपण मानसिक ताण सहन करू पण पत्नी किंवा घरातील व्यक्ती सहन करू शकणार नाहीत. दि. १३.१.१९८२ ला रात्री २ ते ३ पर्यंत डोळ्यास डोळा लागेना. पत्नी, तीन मुले शांत झोपलेली. क्षणिक विचार येऊन गेला, भांडवल तर गुंतवलेल्या धंद्यावर उपजीविका, ह्या पोरांची शिक्षणे, घरखर्च हे कसे चालायचे? काही मार्ग दिसेना. अखेर 'श्रीं' पुढे उदबत्ती लावून मन एकाग्र करून ध्यान धारणेचा प्रयत्न केला पण व्यर्थ! शेवटी सद्गुरुरायास हाक मारली 'महाराज हा संसार ही लेकरे तुमची आहेत, धनार्जनात अचानक विघ्ने निर्माण झाली आहेत, मन:शांती डळमळू लागली आहे. आता सर्व भार तुमच्यावरच आहे' अशी प्रार्थना केली. अंथरुणावर पडलो. तीन वाजल्यानंतर निद्राधीन झालो.

दुसऱ्या दिवशी संक्रांत होती. मी, श्री. गोडसे व शृंगारपुरे सालाबादप्रमाणे प.पू. महाराजांना तिळगुळ देण्यास दुपारचे तीनचे डेक्कन एक्सप्रेसने जाणार होतो. सकाळी साईटवर जाऊन येणे होते.

पहाटे स्वप्नलहरीत दृष्टांत पाहू लागलो. प.पू. महाराज आणि रघुनाथराव घरी आले. (अभिषेक बिल्डींग मधील ब्लॉक मध्ये) मी माझ्या ध्यान धारणेच्या खोली मध्येच त्यांना बैठक घातली. मी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. गडबडीने अगदी जलद गतीने ते आले. बेल वाजताच दार उघडले, पाहतो तर प.पू. महाराज! ते लागलीच घरात शिरले ते थेट साधनेच्या खोलीतच! त्यामुळेच आगत-स्वागत काही करण्यास अवधीच मिळाला नाही. मी नमस्कार करून उभा राहताच जवळ बोलावून समोर बसण्यास सांगितले. मी बसलो. मनात विचार आला की, प.पू. महाराजांचे अचानक येणे कसे झाले? (झोपण्यापूर्वीचा धावा, प्रार्थना इ. सारे मी विसरलो होतो) श्री. रघुनाथराव खूप दूर बसले होते. तरी मला जवळ बोलावून हळू आवाजात माझे कानाजवळ एक छोटासा मंत्र सांगून 'ह्या मंत्राचे अनुष्ठान सुरू करा' असे म्हणाले. ३-४ शब्दांचाच तो छोटासा मंत्र होता. मी म्हटले, 'हा मंत्र संस्कृत आहे. माझ्या लक्षात राहणार नाही' प.पू. महाराजांनी लागलीच पिशवीतून वही काढली. वहीतील

पानाचा छोटासा चौकोनी तुकडा व्यवस्थित कापून काढला व तो मंत्र कागदावर लिहून माझ्या हाती दिला. मी तो स्वीकारून पुन्हा दंडवत घातले आणि मला जाग आली. पहाटेचे चार वाजले होते. उठलो; चार चुळा भरल्या प.पू. महाराजांच्या फोटो व देवापुढे उदबत्ती लावली आणि साधनेच्या खोलीत आसनस्थ झालो. बैठक फार चांगली झाली, पण मंत्र मात्र आठवेना! उजाडल्या नंतरही तोच विचार मनात घोळत राहिला. प.पू. महाराजांनी मंत्र दिला तो कोणता? संपूर्ण दिवस काही महत्त्वाची वस्तू अगदी हाताशी आली आणि हरवली! कुठे हरवली, कशी हरवली? आता काय करावे? बेचैनीत दिवस गेला. दुपारी ३ नंतर श्री. गोडसे, शृंगारपुरे यांचेसह पुण्याचा प्रवास सुरू झाला. दोघांनाही मी स्वप्न दृष्टांत सांगितला व दिलेला मंत्र; तो मंत्र लक्षात रहावा म्हणून प.पू. महाराजांनी लिहून दिला तरी विसरलो. गोडसे ह्यांनी 'श्रीमत्दत्तमहात्म्य या प.पू. वासुदेवानंद सरस्वती स्वामी' लिखित ग्रंथातील काही मंत्र मला हळू आवाजात सांगून विचारले, 'हा होता का? तो होता का? असा असा होता का? 'कोणत्याही मंत्राशी तो जुळला जात नव्हता. मग दोघांनीही मला विचारले, 'आठवत नाही मग आता तुम्ही काय करणार?' मी म्हटले गोष्ट सरळ आहे. आपण सायंकाळी दर्शनाकरता निघालो आहोत; भेट होताच 'श्रीं'ना विचारणार, 'आज पहाटे चार वाजता आपण मला मंत्र दिला तो कोणता?'

आम्ही तिघेही गुरुगृही पोहोचलो. 'श्री' निवांत एकाग्रचित्त बसले होते. श्री. अनिल यांनी आम्ही आल्याचे सांगितले. आम्ही 'श्रीं'ना तसेच सौ. आईसाहेब व घरातील सर्वांस तीळगूळ दिला. सौ. आईसाहेब व प.पू. महाराजांकडून तीळगूळ घेतला. आज्ञेनुसार समोर बसलो. प.पू. महाराजांनी तिघांचेही कुशल विचारले. मी पुढे सरकलो. 'श्रीं'ना पुन्हा दंडवत घातले. जवळ जाऊन सविनय पृच्छा केली, 'महाराज! आपण मला आज पहाटे स्वप्नात एक मंत्र दिलात आणि त्या मंत्राच्या जपास लागलीच प्रारंभ करण्यास सांगितले! तो मंत्र कोणता?'

क्षणार्धात प.पू. महाराजांनी प्रतिप्रश्न केला, ''लक्षात राहिला नाही का?'' मी नाही म्हटले. त्यावर प.पू. महाराज म्हणाले, ''ठीक आहे! आम्ही तो मंत्र तुम्हास पत्राने कळवू.''

सोबतच्या दोन्ही गुरुबंधूंना उत्सुकता होती की प.पू. महाराज काय सांगत आहेत? इतके कळले की, मी म्हटले होते हा मंत्र लक्षात राहणार नाही म्हणून स्वप्नात त्यांनी कागदावर लिहून दिला आणि आता प्रति-प्रश्नात विचारले, ''लक्षात राहिला नाही का?'' पुन्हा सर्वांसमोर उद्धृत न करता 'आम्ही पत्राने कळवू' म्हणाले.

मुंबईस येताच मी सर्व साईटस्, व्हीजीटस्, क्लायंटला भेटणे यात व्यग्र झालो. दि. २२.१.१९८२ ला मी कामावरून सायंकाळी ४.३० ते ५ च्या दरम्यान घरी आलो. हातपाय धुतले. चहा घेतला, इतक्यात माझी सहज नजर मेन डोअरकडे गेली. दरवाजा आतून उघडतो

व भिंतीला फ्लश होतो. आता दरवाजा बंद होता. तो ज्या भिंतीला फ्लश होतो त्या भिंतीला टेकून एक बंद पोस्ट पाकीट, त्यावर लिहीलेला पत्ता दाखवित उभे पडलेले होते. मी धावत जाऊन ते उचलले. प.पू. महाराजांच्या हस्ताक्षराने पत्ता लिहीलेले ते पाकीट क्षणात मी ओळखले आणि भक्तीभावाने कपाळास लावले. साधना कक्षेत गेलो दार लावले. 'श्रीं'च्या पुढे उदबत्ती लावली, पत्र समोर ठेवले. बैठक अंथरली व स्थानापन्न झालो. पत्र हातात घेऊन हलक्या हाताने अलगद उघडले. समोर धरले. प्राण नेत्रात आणून अत्यंत उत्कंठेने वाचू लागलो आणि माझे नेत्रातून घळघळ गंगा यमुनेचे ओघ वाहू लागले. खोलीत कोणी नव्हते मी आणि करुणाद्रदृष्टीने माझ्याकडे पहाणारी प.पू. महाराजांची प्रतिमा!

पत्रात लिहीले होते, ''हा मंत्र षट्कर्णी करू नये. रोज जेवणापूर्वी देवासमोर आसनावर बसून तीन माळा जप व्हावा. जपाचा प्रारंभ गुरुवारी दि. २८.१.१९८२ (गणेश जयंती) सकाळी स्नान झाल्यावर देवाची प्रार्थना करून सुरू करावा. या मंत्र जपाने धनार्जनातील विघ्ने दूर होतील. शुद्धबुद्धी होईल व आरोग्य लाभेल. पत्र पाकीट बंद करून देवापाशी ठेवावे.''

आपल्या भक्ताचे योगक्षेम स्वयं सद्गुरू देव सांभाळतात. त्यांचे उतराई कसे व्हावे? जन्मोजन्मी हे अशक्य आहे. त्यांना अर्पण करावे असे आपल्याजवळ आहेच काय? स्वत:चा देहही आपला नाही! माझे मी पण अर्पण करावे ते तरी कोठे शक्य होते? तेवढी साधना हवी.

माझ्यावर कोसळलेली संकटे विशेषत: धनार्जनात आलेली विघ्ने ही कुठे मी 'श्रीं'ना सांगायला गेलो होतो. केली होती प्रार्थना 'श्रीं'चे फोटो पुढे! त्यांची प्रतिमा! मग प्रतिमा आणि ते; माझे अंत:करण आणि ते! ह्यात द्वैत आहे का? पण हेच आम्हा कच्च्या साधकास कळत नाही.

प.पू. महाराजांनी जो मंत्र दिला त्यात भगवती महालक्ष्मी, श्रीगुरुदेव दत्त, श्रीगणेश या त्रैमूर्तीची उपासना होती. १९८३ मध्ये येणाऱ्या माघ शु. चतुर्थी विनायकी श्री गणेश जन्म या दिवशी प्रारंभीत केलेल्या जपाचा त्या दिवसाचा वर्धापन दिन होता. दि. १८.१.१९८३ आनंदाचा सुखद धक्का, ''आम्ही अहमदाबादहून निघून श्री गणेश जयंतीचे दिवशी सकाळी बोरीवली येथे नीलाताई जोशींकडे येत आहोत. सायंकाळी तुमचे घरी येऊ. मुक्काम करू. गणेश जयंती उपवासाचे पारणे प्रसाद भोजन आपले घरी करू'' इति प.पू. दत्तमहाराज. श्री गणेश जयंती १९८२ ते श्री गणेश जयंती १९८३ या कालावधीत अनेक घटना घडल्या. त्या प्रसंगांचा परामर्ष आधी घेऊ या. नंतर १८.१.१९८३ चे 'श्रीं'चे आमचे गोरेगाव ३९ अभिषेक जयप्रकाश नगरच्या आगमनाचा सोहळा कथन करू या.

संक्रांतीचे भेटीतच दि. १४.१.१९८२ रोजी गेल्यावर्षी प्रमाणे याही वर्षी 'श्री गुरुमहाराजांनी' हरिहरेश्वरी यावे आणि आम्हा भक्त मंडळींकडून 'श्री गुरुचरित्र सप्ताह' करून घ्यावा अशी

प्रार्थना केली. 'श्रीं'नी जरी निश्चित तारीख दिली नाही तरी प्रस्ताव नाकारला नाही. एवढे मात्र म्हणाले की ''वयोमानाप्रमाणे प्रवासाचा त्रास होतो, पाहू पुढे, जशी श्रींची इच्छा'' ''तुम्ही आता आश्रमातच मुक्काम करणार ना? मग आम्ही बसतो त्याच पहिल्या मजल्यावरील खोलीत, झोपा.'' मुद्दामहून हे 'श्रीं'नी सांगितले या मागे त्यांचा काही हेतू असणार! पण आम्ही आश्रमात पोहोचताच पहिल्या मजल्यावर गेलो तर त्या खोलीला आतून कडी लावून कोणी तरी झोपले होते. आमची काही साध्य होण्याची संधी हुकली.

६२) ''श्री सद्गुरु महाराजांची प्रेरणा!''

१९८० च्या चैत्री पाडव्याला दीक्षा झाली. मनात सतत एकच विचार यायचा! आपल्या समस्त बंधुंचे एकमेकास दर्शन आठवड्यातून किंवा मुंबईच्या धावपळीत महिन्यातून एकदा तरी व्हावे. सर्व गुरुबंधू भेटले की गुरुभेटीचा आनंद मिळतो. सर्वांचा विषय एकच असतो 'श्री गुरुदेव'. श्रीगुरुमहाराजांचे स्मरण, नाम संकीर्तन आणि भेटी सारखा आनंद मिळतो. १८.१२.१९५७ पासून मी 'श्रीसद्गुरु रमादेवी' यांचा मंत्र दीक्षेने अनुग्रहीत होतो. आम्ही सर्व गुरुबंधु, माऊलीचे पट्टशिष्य श्री. मामा कामत यांचे गृही, म्हणजे परळ येथील सुपारीबाग जवळील रेल्वे क्वॉर्टर्समध्ये जमत असू. १९६१ पर्यंत मुंबईहून नोकरीत बदली होईपर्यंत मी ह्या कार्यक्रमास जात असे. दर रविवारी सायंकाळी ४ ते ६ हा कार्यक्रम व्हायचा. ४ ते ५ सुस्वर कंठात भजन, गान एका सुरात एका तालात, संगीत साथीसह व्हायचे. दर गुरुवारी तालासुरात गायला शिकवायचा क्लास असायचा पण मी गाऊ शकत नसे. एक तास भजन झाले की अर्धा तास ध्यान धारणा (मेडिटेशन) पुढील अर्ध्या तासात प.पू. गुरुमाऊलींची आलेली पत्रे, आलेले आदेश, गुरु माऊलींचे दौरे यावर प्रमुखांची भाषणे होत. कोणी मेंगलोरला माऊलींच्या सहवासात जाऊन आला असेल तर सुखसंवादांचे वर्णन होई. नंतर आरती होऊन कार्यक्रमाची सांगता होई. साधक भक्तांनी आणलेली फळे व पेढे याचा एकत्रित प्रसाद बाहेर पडताना स्वयंसेवक आमच्या पैकीच गुरुबंधू हातावर देत. येणारे गुरुबंधू अधिक संख्येने कोकणी बोलणारे, कारण माऊलींचीही मातृभाषा कोकणी होती. पण त्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कोंकणी भाषेतून प्रवचन करायच्या. मराठी, हिंदी बोलताना जरा अडखळायच्या, पण ऑडिअन्स मधून शब्द उच्चार दिला जायचा. सांगायचे असे की, मनी एकच विचार आपण सर्व गुरुबंधूंनी महिन्यातून एकदा तरी भेटून सत्संग का करू नये? मनीचा हा ध्यास मी श्री. गोडसे व शृंगारपुरे यांच्या कानी घातला. त्यांनी हा प्रस्ताव सर्व गुरुबंधूंचे समोर मांडला. श्री. प्रभुदेसाई यांच्याकडे आले असताना, सर्वांस प्रस्ताव आवडला. मग

कोणास दुसऱ्या व चौथ्या शनिवारी रजा असते, गुरुबंधू रोजचा लोकल ट्रेनचा प्रवास करीतच असतात. पुन्हा रविवारी प्रवास नको. शनिवारी कसे ऑफिस सुटले की, कार्यक्रम असेल तेथे जाता येईल. चौथ्या शनिवारी चार वाजता गुरुबंधूंच्या घरी भेटायचे ठरले. सर्व गुरुबंधुंनी क्रमवार हा कार्यक्रम वाटून घेतला. डोंबिवलीस सर्व तेथील रहिवासी बंधू झाले की कल्याण, ठाणे, दादर, चेंबूर, गोरेगाव, बोरीवली असे ठरले. या कार्यक्रमात ४ ते ५ सायंकाळी संगीत साथीने 'दिगंबराची' धून, ५ नंतर ११ वेळा 'घोरात्कष्टात्' स्तोत्र, ३ वेळा दत्तबावनी, आरती, प्रसाद, चहापान, समारोप. मंडळी परस्पर ऑफिस मधून येणार म्हणून ज्या गुरुबंधूंकडे हे साधूसंत येतील त्यांच्याकडे हा सण यथाशक्ती साजरा होणार! प.पू. महाराजांच्या हरिहरेश्वराचे वास्तव्यानंतर ह्या चौथ्या शनिवारी कार्यक्रमाचा प्रारंभ झाला आणि आज २००८ सालापर्यंत अव्याहत चालू आहे.

अशीच एक कल्पना श्री सद्गुरु रमादेवींच्या दरवर्षी होणाऱ्या वर्धापन दिन उत्सवाच्या सोहळ्यातून प्रकट झाली. श्री दत्तमहाराजांचा वर्धापन दिन माघ वद्य षष्टी संपूर्ण दिवस साजरा व्हायला पाहिजे. मागीलप्रमाणे प्रभुदेसाईंच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव सर्व गुरुबंधुंपुढे मांडला. तो तत्काळ संमत झाला. प्रभुदेसाई यांनी सूचित केले की, येत्या माघ वद्य षष्टीला हा कार्यक्रम दि. १४.२.१९८२ ला त्यांच्या घरीच साजरा करू! पण प्रारंभ करण्याआधी श्री महाराजांकडे जाऊन त्यांचे हस्ते आशीर्वादाचा नारळ घेऊन यावे. श्री. गोडसे व नागले यांना पाठवायचे ठरले.

आम्ही, (मी व गोडसे) दि. ६.२.१९८२ रोजी पुण्यास श्री महाराजांचे घरी गेलो. आम्ही येत असल्याचे कळविले होते म्हणून श्रीगुरुमाऊली आमची वाटच पहात होते. रात्री ९.३० वाजता आम्ही 'श्रीं'च्या घरी पोहोचलो. श्रीमहाराजांनी गेल्या गेल्याच दि. ३.३.१९८२ रोजी देऊळगावराजा येथे श्री दत्तात्रेय व प.पू. धुंडीराज महाराज यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना आणि समाधी मंदिराची स्थापना होणार असल्याचे सांगितले. ही प्रतिष्ठापना श्रीदत्तमहाराजांचे हस्ते होणार म्हणून आम्ही उपस्थित राहण्याबद्दल परवानगी मागितली तर श्री महाराजांनी समारंभाची निमंत्रण पत्रिकाच हाती दिली. आमचे येण्याचे प्रयोजन श्री महाराजांचे कानी मी घालावे म्हणून श्री. गोडसेंनी संकेत केला. आपल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाच्या प्रारंभासाठी श्रीफळ मागावे तर 'श्रीं'ना ते उचीत वाटणार नाही. म्हणून 'श्रीं'ना म्हटले, "दि. १४.२.१९८२ माघ वद्य षष्टी आहे. त्या निमित्त आम्ही सर्व गुरुबंधू डोंबिवलीस श्री. प्रभुदेसाई यांच्या घरी एकत्रित येऊन 'दिगंबराची' धून संपूर्ण दिवस २१ तास करणार आहोत. आपला आशीर्वाद हवा म्हणून श्रीफळ न्यायला आलो आहोत! आमच्या सद्गुरुंचा वर्धापन दिन दरवर्षी साजरा होत राहो व नामसंकीर्तन घडो असा आशीर्वाद हवा! या शिवाय या कार्यक्रमात आपली

उपस्थिती असावी, इतकेच नव्हे तर आपण उपस्थित आहात याचा अनुभव आम्हास यावा, अशी कळकळीची प्रार्थना आहे महाराज!''

श्री म्हणाले, ''अशी प्रार्थना आश्रमात जाऊन गुरुमहाराजांना करा!'' पुढे 'श्री' म्हणाले, ''देऊळगावराजाच्या पंचक्रोशीतच, घृष्णेश्वर, औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ, राजूर वगैरे स्थाने आहेत. तुम्ही ही स्थाने पाहिली आहेत का?''

आम्ही 'नाही' म्हटले, ''वेळ असेल तर पहावी. तीन स्थळे १२ ज्योतिर्लिंगांपैकीच आहेत. राजूरच्या गणपतीचेही दर्शन होईल. आज अनेक वर्षे झाली. श्री गणपती मंदिरात १०० नंदादीप अखंड जळत असतात. आम्ही म्हटले, 'आम्ही देऊळगावराजाला ह्या समारंभास येऊ तेव्हाच ही दर्शनेही करू.'

दि. १४.२.१९८२ रोजी आमच्या तर्फे 'श्रीं'चा वर्धापन दिन डोंबिवलीला श्री. प्रभुदेसाई यांच्या घरी साजरा झाला. सर्व गुरुबंधू उपस्थित होते. पहाटे ६-१० वाजता 'श्री दत्तमहाराजांची' जन्म वेळ! या वेळेसच 'श्री'च्या फोटोवर पुष्पवृष्टी केली. फोटो पूजन, हार घालून 'दिगंबराच्या धुनला' प्रारंभ झाला. पारायणे, स्तोत्रे, स्तोत्राचे पाठ अशी सामुदायिक साधना कार्यक्रमात चालू होती. संध्याकाळी श्री. झुरळे महाराजांचे तासभर निरुपण झाले.

ह्या कार्यक्रमाकरीता श्री. प्रभुदेसाईंनी प.पू. दत्तमहाराजांचा एक फोटो मोठा करून फ्रेम करून घेण्याकरीता फ्रेम मेकरकडे दिला होता. परंतु ते काम वेळेवर न झाल्याने पेच प्रसंग आला. अखेर त्यांनी तातडीने दुसरा फोटो फ्रेम करून आणला. आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि. १२.२.१९८२ रात्री (दि. १३ उजाडता) स्वप्नात 'श्री महाराज' चेष्टेच्या स्वरात विचारत आहेत. ''काय मग फोटो मिळाला की नाही?''

मला स्वप्नाचा अर्थ काहीच लागला नाही. नंतर रविवारी १४.२.१९८२ रोजी 'श्री महाराजांच्या' वर्धापन दिनानिमित्त श्री. प्रभुदेसाईंकडे गेलो होतो तेव्हा त्यांनी फोटो वृत्तांत सांगितल्यावर मला स्वप्नाचा उलगडा झाला.

६३) प.पू. सौ. ताईमहाराज - प्रथम दर्शन

दि. २८.२.१९८२ रोजी श्री. शृंगारपुरे, श्री. गोडसे, श्री. बोडस व मी सकाळी ७ वाजता एस.टी.ने देऊळगावराजा येथे पोहोचलो. स्टॅण्डवरच सकाळचे मुखमार्जनादी विधी आटोपून, चहापाणीही आटोपून ठीक ८ वाजता 'श्रीं'च्या घरी पोहोचलो. 'श्री महाराज आतील देवघरात आन्हिकाला बसले होते. मी आत जाऊन देवखोलीच्या बाहेरूनच साष्टांग नमस्कार करताच 'श्रीं'नी विचारले, ''काय आज एस्.टी. लेट झाली कां?''

मी - नाही महाराज! एस्.टी. वेळेवर आली.

श्री - मग एवढा वेळ कुठे होतात?

मी - स्टॅण्डवरच होतो महाराज! मुखमार्जन आटोपून आलो.

श्री - (माझ्या मागे उभ्या असलेल्या सर्वांकडे दृष्टीक्षेप टाकून) रजा किती दिवस आहे?

आम्ही सर्व म्हणालो, शुक्रवार पर्यंत आहे.

श्री - मग आता तुम्ही स्नान वगैरे आटोपून प्रसाद घेऊन निघा, प्रथम औंढ्याला जा. तेथून तुम्हाला परळीची एस्.टी. मिळेल. 'श्रीं'नी रघुनाथरावांना हाक मारून आमची सोय धर्मशाळेत किंवा श्री. जगन्नाथशेठ धन्नावत यांच्याकडे करण्यास सांगितले. पुढे 'श्री' म्हणाले, ''सौ. ताई महाराज आल्या आहेत, त्यांचे दर्शन घ्या!''

मधल्या हॉलमध्ये पाहिले तर बऱ्याच बायका उभ्या होत्या. श्री. जगन्नाथ पुजारी यास आम्ही हळू आवाजात यातील 'सौ. ताई महाराज कोणत्या?' म्हणून विचारले. तार स्वरात गुरुजी म्हणाले, 'या सर्व बायका उभ्या आहेत त्यातील ताईमहाराज कुठल्या त्या ओळखा आणि नमस्कार करा.'

आमच्या पुढे मोठाच पेचप्रसंग उभा! यातील ताईमहाराज ओळखायच्या कशा? महाराज म्हटल्यानंतर आमच्या डोळ्यासमोर भारदस्त, भव्य, तेजाळ व्यक्तिमत्त्व अशी प्रतिमा होती! पण तसे कोणी दिसेना. सर्वच सर्वसामान्य मराठमोळ्या स्त्रिया दिसत होत्या. इतक्यात एका बाईने उभ्या असलेल्या कृश, सडपातळ बांध्याच्या, मोठ्या कुंकवाच्या, डोक्यावरून हिरव्या साडीचा पदर घेतलेल्या बाईला मनोभावे वाकून नमस्कार केला आणि आम्ही विस्मयाने पहातच राहिलो. पुजारी ओरडले, 'ह्याच ह्याच त्या ताईमहाराज! करा त्यांना नमस्कार.' आम्ही चौघांनी रांगेत नमस्कार केले. आम्ही पहातच राहिलो त्यांच्या अंगावर मंगळसूत्राशिवाय कोणताही दागिना नव्हता. आपली छाप पडावी असा कोणताही आविर्भाव नव्हता. यापूर्वी मे १९७८ मध्ये गोडसे अगदी प्रथमच प.पू. महाराजांचे दर्शनास गेले असता त्या पहिल्या भेटीतच प.पू. महाराजांनी गोडसेंना प्रश्न विचारला, 'तुम्ही कधी जालन्याला गेला होतात का? तिथे ताईमहाराज म्हणून, परमार्थातल्या फार मोठ्या अधिकारी विभूती आहेत.'

ह्याच त्या विभूती सौ. ताईमहाराज! आज आम्हा चौघांस प्रथम दर्शन झाले. दि. २८.२.१९८२ ''जालन्याला गेल्या सप्ताहातच विष्णूयाग संपन्न झाला. आपण चौघांनी मुंबईस जाताना जालन्याहूनच जा, (जुन्या जालन्यात) आश्रमात जाऊन प्रसाद घ्या व नंतरच मुंबई प्रवासास लागा.'' सौ. ताईंची आज्ञा घेऊन आम्ही श्री. जगनशेठ धन्नावत यांच्याकडे जाऊन स्नान वगैरे आटोपून, फराळ प्रसाद घेऊन 'श्रीं'ची आज्ञा घेऊन एस्.टी. स्टॅण्डवर निघालो.

६४) औंढ्यानागनाथ, परळी वैजनाथ वगैरे

प्रथम औंढ्यानागनाथ ह्या क्षेत्री गेलो. एस्.टी. जालना-जिंतूर मार्गे औंढ्यानागनाथास पोहोचली. श्री. धन्नावत यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे आम्ही एस्.टी. स्टॅण्ड समोरील 'हॉलीडे होम' मध्ये उतरलो.

दि. १.३.१९८२ रोजी औंढ्यानागनाथ मंदिरात प्रवेश करून दर्शन घेतले. हीच ती पिंडी की संत नामदेव गुरुदेवांना शोधत ह्या मंदिरात आले आणि वृद्ध विसोबा खेचर पिंडीवर दोन्ही पाय ठेवून उताणे झोपले होते. श्री नामदेव महाराजांनी, त्यांना आपले पाय पिंडीवर आहेत ते बाजूस करा म्हणून सुचविले. वृद्धापकाळाने अंगात शक्ती नसल्याने त्यांनी नामदेवांसच आपले दोन्ही पाय उचलून दुसरीकडे ठेवण्यास सांगितले. आश्चर्य असे की, नामदेवांनी त्यांचे पाय उचलून दुसरीकडे ठेवताच पायाखाली दुसरी शंकराची पिंडी उपस्थित झाली.

गुरुदेव विसोबा खेचरांना नामदेवांस कोणते ज्ञान द्यायचे होते? देव सर्वत्र आहे, तो फक्त राऊळातच नाही. मंदिरातच नाही, तर सर्व सृष्टीत जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र तो व्याप्त आहे. असं आहे तर! तरीच प.पू. महाराजांनी आम्हास इकडे पाठविले. 'श्रीं'नी जेव्हा आज्ञा केली की आता तुम्ही निघा! आणि औंढ्यानागनाथ, परळी वैजनाथ, घृष्णेश्वर जमल्यास राजूरचा श्री गणपती ही दर्शने करून या. माझ्या मनी हेच आले होते. मला तुमचा सहवास मिळतो आहे, जो 'दुर्लभम् भुवन त्रये' असा आहे! मग मला कशाला पाठविता ह्या क्षेत्रांचे दर्शनास? आपल्या दर्शनातच ही दर्शने समाविष्ट नाहीत का? हो आहेत; पण माझे गुरुदेव धारण केलेल्या देहातच फक्त आहेत हा माझा समज सुद्धा बरोबर नव्हता! माझे गुरुदेव सर्व भुवने भरून उरलेले आहेत. जन्मापुरतेच म्हणायचे तर आपली शक्तीमाता आमचे हृदयी संक्रमित करून स्पंदनाच्या स्पंद-कंपनाने जाणीव देत असतात की मी तुझ्या हृदय मंदिरातही आहे. श्री औढ्यानागनाथांची ब्राह्मणद्वारा अभिषेक पूजा केली.

नंतर आम्ही परळी वैजनाथला पोहोचलो. पुजारी गुरुजींकडेच उतरून तेथील अभिषेक पूजा केली. गुरुजींनी आम्हास अंगाऱ्याची पुडी दिली व निघता निघता म्हणाले, "परळी वैजनाथाला रोज चिताभस्म लागते. अंगाराही चिताभस्माचाच असतो." आमचे मनास ते मानवले नाही. आम्ही तेथून निघतानाच नदीत ते भस्म विसर्जित केले. रात्री औरंगाबादला पोहोचलो. एका लॉजवर मुक्काम केला. पहाटे उठून स्नानादी आटोपून घृष्णेश्वराचे दर्शन घेऊन आम्ही एस्.टी. ने जालना मार्गे राजूरच्या गणपतीच्या दर्शनास आलो.

ह्या राजूरच्या श्री गणपतीचे वैशिष्ट्य असे की हा गणपती स्वयंभू आहे व तो पृथ्वीच्या नाभिस्थानी विराजमान आहे. या गणेशासमोर शंभर नंदादीप अहोरात्र तेवत असतात. नंदादीपात तेल वातींकडे सतत भक्तांचे लक्ष असते. दुसरे असे की, प.पू. दत्तमहाराजांचे

पितामह प.पू. वक्रतुंड महाराज हे या गणपतीचे असीम भक्त होते. त्यांची भक्ती इतकी कळसास पोहोचली की एके दिवशी नैवेद्य श्री गणेशास देऊन मनोभावे प्रार्थना करताच साक्षात 'श्री गणराय' सगुणात प्रकट होऊन त्यांनी प्रसाद भोजन ग्रहण केले. आम्ही मार्च १९८२ ला गेलो तेव्हा फक्त छोटे देऊळ, आता जो गाभारा आहे ते होते. या मंदिराचा जीर्णोद्धार होऊन भारत सरकारने अवाढव्य वास्तू उभारली आहे व आता दर्शनास अलोट गर्दी लोटत असते.



६५) प.प. श्री धुंडीराज महाराजांची समाधी मंदिरात मूर्ती स्थापना

श्री राजूरच्या गणपतींचे दर्शन करून आम्ही रात्री देऊळगावराजा येथे परतलो व श्री. जगनशेठ धन्नावत यांच्या घरी निवास केला. श्री देऊळगावराजा ह्या संस्थानचे सर्वाधिकारी श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे मामा होते. या संस्थानात श्री बालाजींचे देऊळ आहे, मूर्ती स्वयंभू आहे. तिरुपती बालाजींचे दर्शन या मूर्तीतून घडते. हे तेवढेच पुण्यप्रद दर्शन आहे. या मंदिरापासून जवळच प.पू. वक्रतुंड महाराजांचे व त्यांचे पश्चात् प.पू. धुंडीराज महाराजांचे घर आहे. आम्ही दि. २८.२.१९८२ ला प्रथम आलो 'श्रीं'च्या दर्शनास, ते ह्याच घरी! तेव्हा तेथे 'श्रीं'चे बंधू प.पू. वासुदेव काका महाराज कवीश्वर, उभयता रहात होते. ज्या ठिकाणी म्हणजे गावास लागून असलेल्या शेतात 'श्रीं'च्या पिताश्रींचा प.पू. धुंडीराज महाराजांचा अग्निसंस्कार झाला, त्याच जागेवर समाधी मंदिर बांधण्यात आले आहे. दहनाचे जागेवरच दि. ३.३.१९८२ रोजी प.पू. धुंडीराज महाराजांची मूर्ती स्थापन होणार आहे. ही मूर्ती तळघरात तर बरोबर त्या मूर्तीचेच वर श्री दत्तप्रभूंची मूर्ती वरच्या मजल्यावर स्थापित होणार आहे.

ही समाधी मंदिर होत असलेली जागा, म्हणजे ते शेत, मन्नावत नावाच्या मारवाडी गृहस्थाच्या मालकीची होती. प.पू. धुंडीराज महाराजांचे अग्निसंस्काराचे दिवशी त्याने स्वयंस्फूर्त, 'माझे शेतात विधी करा' अशी परवानगी दिली व 'पुढे होणाऱ्या समाधी मंदिराकरीताही हे संपूर्ण शेत मी समर्पित करीत आहे,' असे त्याच दिवशी जाहीर केले. इतकेच नव्हे तर, 'माझी बुद्धी फिरू नये म्हणून आताच ह्याच क्षणी वकील व स्टॅम्प पेपरवर माझ्या जागेचे समर्पण पत्र लेखी करून घ्या. ते झाल्याखेरीज मी भोजन करणार नाही. पाणीही पिणार नाही,' असे म्हटल्याने श्री मन्नावत यांचा जागा समर्पित केल्याचा कागद लागलीच सही शिक्क्यानिशी करून घेतला.

तळघरातील चौथऱ्यावर प.पू. धुंडीराज महाराजांची संगमरवरी मूर्ती स्थापित होणार आहे व मूर्तीसमोर साधना हॉल आहे. वरच्या मजल्यावर त्रिमुखी दत्तात्रेयांची संगमरवरी मूर्ती व समोर हॉल आहे.

दि. ३.३.१९८२ रोजी देऊळगावराजा येथील समाधी मंदिराची स्थापना पहिल्या प्रहरात चालू असलेल्या विष्णुयाग महायज्ञाची पूर्णाहुती झाली. दुपार-मध्यान्ह साधारण एक वाजण्याचे सुमारास 'श्रीं'चे हस्ते श्री दत्तात्रेय व प.पू. धुंडीराज महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. ह्या समारंभास हजारो भक्तगण उपस्थित होते.

येथील समस्त ग्रामवासी आबाल वृद्ध प.पू. धुंडीराज महाराजांकडून मंत्रदीक्षा प्राप्त झालेले अनुग्रहित आहेत. जे ज्येष्ठ नागरिक वयस्कर होते त्यांचे पिताश्री वक्रतुंड महाराजांचे अनुग्रहीत तर वयस्कर मंडळी पू. धुंडीराज महाराजांचे आणि तरुण म्हणजे तिसरी पिढी प.पू. दत्तमहाराजांकडून मंत्रदीक्षा घेतलेले आहेत. व्रतबंध झाला की मुलगा अनुग्रहीत होतो व मुलाचे लग्न होऊन सून घरी आली की तिला प.पू. दत्तमहाराज मंत्रदीक्षा देतात. अशी तीन पिढ्यांची परंपरा आहे. प.पू. धुंडीराज महाराजांवर येथील भक्तांची आत्यंतिक भक्ती आणि श्रद्धा! प्रत्येकजण अगदी डोळ्यातून वाहत्या आसवांनी व गद्‌गद्‌लेल्या कंठानी प.पू. धुंडीराज महाराजांची महती, अनुभव, चमत्कार कथन करीत होता. आम्ही मुंबईहून या कार्यक्रमास आलो आहोत आणि आम्हीही प.पू. दत्तमहाराजांचे अनुग्रहीत आहोत, म्हटल्यावर सर्वांना आमच्याबद्दल अधिक आपुलकी वाटत होती. काय सांगू? किती सांगू? कसे सांगू? असे प्रत्येकास झाले होते. खरोखरच गुरुमहिमा वर्णन करताना शब्द अपुरे पडून त्यांच्या चेहऱ्यावरील शुद्ध सात्विक भाव त्यांचे गुरुप्रेम प्रकट करीत होते. शिर्डीचे श्री साईबाबा तसे देऊळगावराजाचे प.पू. धुंडीराज महाराज! आसपासच्या गावातून आलेले असंख्य भक्तगणही होते. दुसऱ्या दिवशी दि. ४.३.१९८२ रोजी माझ्या प्रथम गुरुमाऊली रमादेवींची जयंती होती. भंडारा भोजनास सायंकाळी पाच नंतर प्रारंभ होणार होता. सर्व रस्ते, माळा पताकांनी सडासंमार्जन करून सजविले होते. रस्त्याच्या दुतर्फा तसेच मध्यभागी अशा रस्तो रस्ती पंगती बसणार होत्या. सकाळी न्याहारी करीता मायमाऊली वात्सल्यमूर्ती सौ. आईसाहेबांनी आम्हा चौघांस घरात नेऊन बसविले. "भोजनास पाच वाजणार, पुन्हा एकदा १२ ते १२.३० पर्यंत काही तरी घेऊन येते. येऊन खाऊन जा! मी वाट पहाते आहे." सौ. आईसाहेबांनी एवढ्या मोठ्या समारंभात आम्हां लेकरांची खाण्या-पिण्याची, चहापानाची काळजी घेतली. भोजनास उशीर आहे म्हणून प.पू. दत्तमहाराजांचे बालमित्र कोण आहेत त्यांची माहीती घेऊन, त्या श्री. मन्नावत यांच्याकडे, आम्ही प.पू. महाराजांच्या बालपणीच्या आठवणी ऐकण्यास गेलो. त्यांनी खूप माहिती दिली.

१) प.पू. महाराज अभ्यासाबरोबर बलोपासना देखील करीत असत. जोर बैठका, सूर्यनमस्कार काढीत; २) पोहण्यात पटाईत होते. पोहण्यातील सर्व करामती त्यांना अवगत होत्या; ३) झाडावर चढणे; ४) सायकलींग करणे. आश्रमात जाण्या-येण्यास, पुण्यातही प.पू. महाराज बरेच वेळा सायकलवरून जात येत असत; ५) प.पू. महाराजांचा आवाज

खणखणीत होता व ते गायन कलेतही निपुण होते; ६) शास्त्रोक्त संगीताचा अभ्यास होता; ७) प.पू. महाराज तबला वाजवीत तसे पेटी वादनही करीत; ८) प्रवचने तर वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच ते करीत आले; ९) 'श्रीं'नी कीर्तनही केले आहे; १०) पाकलेतही त्यांचे नैपुण्य होते; ११) स्वत:ची चप्पलही त्यांनी शिवली आहे, असे या हिऱ्याचे कितीतरी पैलू होते. सर्वच आपणास ज्ञात नाहीत. कोणत्याही कोंदणात हा हिरा चमकणारा आहे.

।। विद्या विनयेन शोभते।।

सायंकाळी सोवळ्या ब्राह्मणांच्या पंगती नंतर भंडारा. गाव जेवणास प्रारंभ झाला. रस्त्याच्या मध्यांत आणि दुतर्फा पंगती बसल्या होत्या. उच्च-नीच भेद नव्हता. लहान-मोठा कसलाही भेदभाव नव्हता. दोन पंगतींच्या मधून ट्रॉली फिरत होती. ट्रॉलीच्या दोन्ही बाजूस दोन दोन वाढपी होते. विशिष्ट आकाराची थापी घेऊन किंवा द्रव पदार्थ असेल तर पळ्या घेऊन दोन्ही बाजूंना वाढून पुढे पुढे सरकत होते. जेवढे जेवणात पदार्थ, पक्वान्न होते तेवढ्या ट्रॉल्या होत्या व वाढपी आपला हात जलद गतीने चालवीत होते. याशिवाय कोणास काही हवे नको ते काही स्वयंसेवक पहात होते. सर्व अन्न अत्यंत रुचकर होते. मसाले भात, वडे, भाज्या, आमटी, पंचामृत, चटणी, लोणची, पापड, पापड्या, जिलेबी, लाडू, बुंदी अनेक प्रकार! मनसोक्त आहार आणि कोठेही आरडा ओरड न होता अत्यंत शिस्तबद्धपणे चालू होते. रात्री मध्यरात्रीपर्यंत तरी भंडारा चालूच होता. श्री सद्गुरुंच्या दरबारात कशाचीही उणीव कमतरता नव्हती. देणारे, वाढणारे, स्वीकारणारे सर्वांचीच मने भक्तीभावाने भारावलेली होती. तो अपूर्व सोहळा पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. गुरु महात्म्य वर्णन करण्यास खरोखरच शब्द अपुरे पडतात. 'श्रीगुरुमहाराजांचे सोहळे पहावे ते मराठवाड्यात' असेच म्हणावे लागेल.

आम्ही मुंबईस जाण्यास निघालो. प.पू. महाराजांचा निरोप घेतला. प.पू. महाराज म्हणाले, ''बरं झालं, तुम्ही आलात! सर्व सोहळा प्रत्यक्ष पहायला मिळाला. ज्योतिर्लिंगांचेही दर्शन झाले. या आता!''

सौ. ताईही तेथेच होत्या. त्यांनी जालन्यास उतरल्यास नंतर आश्रमात जाऊन प्रसाद घेऊन जाण्याची पुन्हा आठवण दिली. जालना बस स्थानकावर उतरल्यानंतर लक्षात आले की, गाडीची वेळ होत आली आहे. ही गाडी चुकली तर दुसऱ्या दिवसाशिवाय गाडी नाही. त्यामुळे आम्ही चौघांनी एकच निर्णय घेतला. 'आता ह्या घाईत कुठे त्या ताईंच्या मंदिरात आश्रमात प्रसाद घेण्याकरीता जायचे? आपण सरळ रिक्शाने स्टेशनच गाठू या. अजून तिकीटे काढायची आहेत. तिकीटास लाईन असली तर पंचाईत. म्हणून जेवढे शक्य तेवढ्या जलद गतीने आधी जालना स्टेशन गाठू या!'

घाईघाईने स्टेशनवर आलो. धावतच जाऊन तिकीटाची खिडकी गाठली, चार माणसे

लाईनीत होती. आम्ही तिकीटे काढली आणि प्लॅटफॉर्मवर पाय ठेवतो आहोत. इतक्यात उद्घोषणा झाली की, मुंबईस जाणारी गाडी तीन तास उशीरा येईल! ज्या रिक्शाने आम्ही आलो तो रिक्शावाला समोरच उभा होता. त्याला म्हटले 'बाबा रे आम्हाला ताई महाराजांच्या गुरुमंदिरात नेणार का? तेथे आमची १५-२० मिनीटे जातील! परत स्टेशनला यायचे आहे!' त्याने विचारले 'ताई माईचे मंदिर का?' आम्ही हो म्हटले. ताईमाईच्या आश्रमात पोहोचलो. सामान ओवरीवर ठेवून हातपाय धुवून आत आश्रमात गेलो. कोणी पुजारी देवाजवळ धुपारतीचे तयारीत होते. त्यांना आम्ही प.पू. दत्तमहाराजांचे अनुग्रहीत व देऊळगावराजाहून आलो अशी आमची ओळख दिली व सौ. ताई महाराजांनी आश्रमातून दर्शन व प्रसाद घेऊन नंतर मुंबई प्रवासास लागा असे सांगितल्याने आलो आहोत असे सांगितले.

त्यांनी प्रसाद हातावर दिलाच. पण शिवाय चौघांस चार बुंदी प्रसादाच्या पुड्या सोबत नेण्यास दिल्या. तेथील काही व्यक्तींकडून कळले ते पूजेच्या गडबडीत असतानाही आमचे स्वागत करणारे तेच सौ. ताईमहाराजांचे यजमान श्रीमान मधुकरराव चाटुफळे! आम्ही त्यांचा प्रेमळ निरोप घेऊन जालना स्टेशनकडे निघालो. रात्री ११ वाजता गाडी आली. आमचा प्रवास सुखाचा झाला.

६६) घरी दंडी संन्याशांचे आगमन

गोरेगावी घरी आल्यानंतर कळले की, आमच्या समारंभाच्या कालावधीत घरी एक नवलाई घडली. कोणी एक दंडी संन्यासी माध्यान्ह समयी दारात उभा राहिला. काषाय वस्त्रे धारण केलेला (भडक भगवी नाहीत) साठी पासष्टीच्या वयाचा, डोक्यावर पूर्ण क्षौर केलेले दिसण्यात याच वयातील प.प. लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचा एक बसलेला फोटो आहे तसाच दिसणारा, हिंदी भाषिक, दंड कमंडलू धारण केलेला असा होता. मेन डोअरची बेल वाजली म्हणून सौ. लताने दार उघडले. तो म्हणाला, 'माई मै संन्यासी हूँ। मुझे भिक्षा दिजीये!' घरात माझी वृद्ध आई, मुले व कामास असलेली वंदना होती. सौ. लताने त्यांना आत येण्याची विनंती करून बसण्यास कंबल आसन दिले. मांडीवर आपला दंड ठेवून बसले. 'संपूर्ण जेवण तयार आहे. आपले भोजन पात्र वाढू का?' सौ. लताने विचारले. ते संन्यासी म्हणाले, 'मुझे सिर्फ एक रोटी और नमक दिजीये! उसके पहले एक लोटा पानी लाईए!' आपला अर्ध अंडाकृती काळा वाडगा (हा वाडगा लांबट आकाराच्या केरळातील नारळापासून बनविलेला असतो) झोळीतून काढून समोर ठेवला. वॉशबेसीन सारखा उपयोग करून त्याने लोट्यातील पाणी हातावर ओतण्यास सांगितले. छाटीने हात पुसले ते पाणी टाकून देण्यास व वाडगा

स्वच्छ धुवून आणण्यास सांगितले. स्वच्छ केलेल्या वाडग्यात पुन्हा हातावर पाणी सोडून ते सर्वांस चमचा चमचा पिण्यास दिले. पुन्हा हातावर तीर्थ म्हणून सर्वांस देण्यास सांगितले. ते तीर्थ साखर पाण्यासारखे गोड लागले. नंतर वाडगा पुसून ठेवला त्यात रोटी वाढण्यास सांगितली. वाडग्यासमोर छोट्या वाटीत मीठ ठेवले होते. ते चिमटीने घेऊन रोटीवर टाकून ती कुस्करून खाल्ली. पाणी प्यायले. पुन्हा वाडग्यात हात धुवून पाणी टाकून वाडगा धुवून आणण्यास सांगितले. 'मै अभी बनारस काशी जा रहा हूँ। आपके मालीक घरमे नही इसलिये दक्षिणा प्रवास भाडेके लिये नही लेता हूँ। दक्षिणा एक्कीस रुपया देना।' इतक्यात सौ. लताने रु. २१ दक्षिणा समोर ठेवून घरातील सर्वांनी नमस्कार केला. त्यांनी प्रत्येकाचे नमस्कारास 'नारायण नारायण' असा आशीर्वाद दिला व 'फिर आऊंगा' असे म्हणून निरोप घेतला. गेटचे बाहेर पडून तो मार्गस्थ झाला. तो कुठे जातो आहे हे पाहण्यासाठी सौ. लताने मुलांना वंदनास त्यांचे पाठोपाठ पाठविले. पण रस्त्यावर येऊन पहाताच तो मागे पुढे कुठे दिसलाच नाही.

सौ. लता माझे मागे लागली की, तुम्ही लागलीच प.पू. महाराजांना पत्र पाठवून विचारा की, तो संन्यासी नक्की कोण होता? मला वाटत होते कशाला पत्र प्रपंच करून श्री महाराजांना त्रास द्या! आपणाकडून त्यांची जी काही संभावना आतिथ्य झाले ते यथा योग्यच झाले आहे! श्रीमहाराज अगदी ते साक्षात दत्तप्रभू आले असले तरी तसे ते लिहीणार नाहीत. म्हणतील, ''तुम्ही केले ते चांगलेच केले.'' शेवटी सौ. लतानेच 'श्रीं'ना पत्र लिहीले. आलेले उत्तर खालीलप्रमाणे -

।। श्री दत्त ।।

बीड, दि. १७.३.१९८२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले, स्वामींचे दर्शन, भोजन आपल्या घरी झाले हा चांगला योग आला. 'अतिथी देवो भव' हीही एक उपासना, गृहस्थाश्रमी माणसांना घडते. ती करण्याची बुद्धी आपल्या मंडळींना ईश्वर कृपेने मिळाली आहे. सद्भावनाच सर्व कल्याण करणारी आहे. आम्ही येथून २२/२३ तारखेस देऊळगावी जाऊ तेथे २८ तारखेस ती. महाराजांची पुण्यतिथी करून रात्रीचे एस्.टी.ने पुण्यास जाऊ. नंतर ३० मार्च ते ९ एप्रिल पर्यंत अकलुजला सप्ताह कार्यक्रम डॉ. जामदारांनी ठरविला आहे. तो आटोपून ४/५ दिवस पुण्यास थांबून १३/१४ तारखेस वाडीस श्री नारायण स्वामींचे उत्सवास जायचे आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

६७) श्री नारायण स्वामी उत्सव

प.पू. महाराज आपल्या होणाऱ्या दौऱ्यांचा तेथील मुक्कामांचा, त्या दौऱ्याच्या प्रयोजनाचा सविस्तर वृत्तांत दौरा चालू व्हायच्या आधीच पत्राने कळवित असत. हे बीडहून त्यांचे आलेले पत्र ...

।। श्री दत्त ।।

बीड,
दिनांक २६.५.१९८२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आम्ही येथे काल खर्डा जामखेडहून सायंकाळी आलो. १-२ दिवस विश्रांती घेऊन देऊळगांवी जाऊ. तेथूनही आसपास १०-२० मैलांचे परिसरात पूर्वनियोजित मंगल कार्यांचे निमित्ताने जाऊन यावे लागेल. पुण्यास येणेस अद्याप १५-२० दिवस लागतील असे वाटते. इकडे उन्हाळा बराच जाणवत आहे.

राजधानी एक्सप्रेसची तीन तिकीटे रिझर्व झाल्याबद्दल आपला फोन आल्याचे श्री. रघुनाथरावांकडून कळले, उत्तम झाले. आम्ही २२ जूनला पुण्यास श्री प.प. टेंबेस्वामींची पुण्यतिथी करून दुपारी ३ च्या गाडीने निघून माटुंग्यास २२ तारखेस सायंकाळी मुक्कामास येऊ. दुसऱ्या दिवशी दिल्लीस रवाना होऊ. मुंबईहून दिल्लीस जाणारी गाडी दुपारी किती वाजता सुटते व दिल्लीस केव्हा पोहोचते ते कळवावे व तीन तिकीटे रिझर्व करण्यास किती खर्च आला ते 'पोस्ट देऊळगावराजा, जि. बुलढाणा (विदर्भ) देवाचे दुकानासमोर' या पत्त्यावर कळवावे. खर्ड्यास ३-४ दिवस पोस्टाची थैलीच न आल्याने कोणाचेच टपाल येथे मिळू शकले नाही.

दिल्लीहून राजधानी एक्सप्रेस मुंबईस येण्यास गुरुवार व सोमवार दोन दिवशीच निघते असे समजल्यावरून सप्ताह २४ ते ३० ठेवावा व १ जुलैची गुरुवारची मुंबईची तीन तिकीटे रिझर्व करून ठेवावीत व देऊळगावी कळवावे असे श्री. कुर्लेकरांना कळविले आहे. सर्वास यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर.

वरील पत्रास दिलेले उत्तरही पुढे देत आहे. वरील पत्रात तीन तिकीटे रिझर्व करण्यास किती खर्च आला ते देऊळगावचे पत्त्यावर कळविण्यास सांगितले आहे. आपल्या करता साधक भक्ताचा खर्च होऊ नये व झालाच तर तो त्वरीत परत करण्याची 'श्रीं'ना घाई असे. अशी बरीच उदाहरणे देता येतील. श्री महाराजांचेच प्रवचनात आले आहे. ''सत्पुरुषांच्या प्रीत्यर्थ द्रव्य खर्च झाले तर पुण्यसंचय वाढतो.'' पण प्रत्यक्षात श्री महाराज त्यांच्या स्वतः करता खर्च

करूच देत नसत. याची बरीच उदाहरणे आहेत ती प्रसंगानुसार येतील.

'श्रीं'चे पत्रास उत्तर....

।। श्री दत्त ।।

३९, अभिषेक, जयप्रकाश नगर,
३ रा रस्ता, गोरेगाव, मुंबई.
दि. ३.६.१९८२

परमपूज्य ब्रह्मर्षी दत्तमहाराज,

आपले चरणी दोन्ही कर जोडून, त्रिकाल मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार वि.वि.

आपले दि. २६ चे पत्र हरेश्वरहून येताच मिळाले. खर्डा जामखेडहून आपण बीड येथे ता. २६ ला आलात व दोन दिवसात देऊळगाव येथे जाणार असे लिहीले आहे, हे ध्यानी आले. देऊळगावहून देखील आसपास १०-२० मैलांचा प्रवास होणारच आहे. उन्हाळा तर फार आहे. आपल्या प्रकृती स्वास्थ्याची काळजी वाटते. 'श्रीं'नी वयोमान, सतत प्रवास, दगदग यातून सर्वथैव आपला सांभाळ करावा. अशी 'श्री' चरणी प्रार्थना आहे.

पुण्याचे पत्त्यावर पत्र टाकले होते व त्या पत्राचे उत्तरच या आपल्या पत्रातून मिळाले आहे. आपण पुण्याहून दि. २२.६.१९८२ ला दुपारी ३ च्या गाडीने निघत आहात. आपणास दादरहून माटुंग्यास नेण्यास दादर स्थानकावर ७ ते ७.३० ह्या गाडी येण्याच्या वेळी आम्ही सर्व उपस्थित आहोत. तसेच दुसऱ्या दिवशी मुंबई सेंट्रलला आपल्या मोटर गाडीने राजधानी एक्सप्रेस पर्यंत येऊ.

राजधानी एक्सप्रेस मुंबई सेंट्रलहून सायंकाळी ३.४५ ला (पावणे चारला) सुटते व ती दिल्लीस दुसऱ्या दिवशी सकाळी ९.२० वाजता पोहोचेल.

दिल्लीहून गुरुवार, दि. १.७.१९८२ रोजी आपण निघणार. तेथून ही गाडी सायंकाळी ४.४० वाजता सुटते व मुंबई सेंट्रल येथे दुसऱ्या दिवशी सकाळी १०.४२ वाजता पोहोचते. ही गाडी येताना दादरला थांबणार नाही. मुंबई सेंट्रल येथे आम्ही आपल्या स्वागतास उपस्थित राहूच.

या राजधानी एक्सप्रेसला एक गैरसोय आहे, ती म्हणजे झोपण्याची सोय नाही, बसण्यास 'चेअर्स' (खुर्च्या) असतात. त्यांची फक्त आराम खुर्ची करता येते. प्रवासात नाही म्हटले तरी त्रासाचेच होणार आहे. आपण तीन तिकीटे रिझर्व करण्यास किती खर्च आला हे विचारल्या वरून कळवितो की, तीन तिकीटास रु. ६७२/- लागले.

एरवी आपल्या प्रत्यक्ष सेवेचा लाभ आम्हास होत नाही. हा खर्च आम्ही दोघांनी मी व सुधाकर शृंगारपुरे मिळून केला आहे. आम्हा दोघांची सांपत्तिक स्थिती देखील आपल्या कृपेने

सुव्यवस्थित आहे.

जरी जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा 'श्री चरणांची' येनकेन प्रकारेण सेवा करण्याची संधी प्राप्त होत रहावी, अशी आपल्या चरणी लीन होऊन प्रार्थना आहे.

श्री. रघुनाथराव यांसी शि.सा. नमस्कार, थोरास नमस्कार, लहानास आशीर्वाद.

सदैव आपले चरणी लीन

शशीकांत दि. नागले



६८) 'श्रीं'चा अपरिग्रह : (२)

'श्री महाराजांना' श्री वासुदेव निवासातून घरी 'श्री रेणुका निवासात' पोहोचविण्याची संधी मिळत असे. अगदी प्रथम 'श्रीं'चे सोबत रिक्शातून जाण्याची वेळ आली, तेव्हा 'श्रीं'ना आधी बसू दिले. त्यांच्या उपरण्यात गुंडाळी केलेले एक बोचके सोबत असायचे. त्यात बहुधा पोष्टाची पाकीटे, कार्डे, रायटींग पॅड, बॉल पेन, वही चोपडी व इतर काही जरूर त्या वस्तू असायच्या. ते बोचके त्यांच्या जवळ ठेवून 'श्रीं'चे चरण जेथे विसावले होते तेथे बसू लागलो. ऐकलेले होते की गुरुमहाराजांच्या समपातळीवर आपले आसन नसावे ते खाली असावे. मी खाली बसत आहे असे पाहून 'महाराज ' मोठ्याने बोलले, ''अहो अहो! हे काय असे? वर बसावं! प्रवासात आपली पथ्ये, आचार शिष्टाचार आसनाबाबत सांभाळू नये. आपण आमच्या शेजारी बसावे.''

गुरु आज्ञा म्हणून मला शेजारी बसणे भाग पडले. घर जवळ येत चालले तसे मी रुपये पाचची नोट काढून ठेवली. लागलीच रिक्शावाल्यास देण्यास! परंतु 'श्री महाराजांनी' देखील हातात सुट्टे पैसे ४ रुपये ६० पैसे काढून ठेवले होते. मी 'श्री' उतरत असतानाच रु. ५ ची नोट रिक्शावाल्यास दिली. त्याने ४० पैसे परत केले आणि घराच्या गेटच्या आत शिरण्यापूर्वीच 'श्रीं'नी माझ्या हाती ४ रुपये ६० पैसे ठेवले व म्हणाले, ''हे सुट्टे आपल्याकडे असू द्या, जाताना उपयोगी येतील.'' नको नको म्हणायची सोयच नव्हती. 'श्री महाराज' तरातरा घरात शिरलेही! असा त्यांचा अपरिग्रहाचा किस्सा हरिहरेश्वराच्या द्वितीय कार्यक्रमास हरेश्वरी पोहोचताच घडला. तो पुढे देऊच! दक्षिणा प्रदान मोठ्या रकमेने केली तर 'श्रीं'ना आवडत नसे या बाबतीत श्री. गोडसे व मलाही आलेला अनुभव पुढे येईलच. मला आलेल्या खालील पत्रातही वाचावयास मिळेलच. दिल्ली राजधानी एक्सप्रेसची तीन तिकीटे रिझर्व केली त्याचा रु. ६७२/- चा ड्राफ्ट खालील पत्रासोबतच आला. हे 'श्रीं'चे पत्र माझ्या जीवनात सेवा प्राप्तीचा आनंद देणारे आहे म्हणून तसेच्या तसे खाली देत आहे.

।। श्री दत्त ।।

देऊळगावराजा
दि. ९.३.१९८२

श्रीमान् रा. श. दि. नागले,
३९, अभिषेक, जयप्रकाश नगर, गोरेगांव
यांना सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही दोन दिवसापूर्वी इकडील जवळचा प्रवास आटोपून येथे आलो. येथील काही अनुष्ठान १४ तारखेपर्यंत आहेत. पुन्हा आम्ही १५ तारखेस पुण्यास जायला निघू. जालन्यास एखादा दिवस थांबावे लागल्यास १६-१७ तारखेस पुण्यास पोहोचणे होईल. तेथून २२ तारखेस पुण्यतिथीचा प्रसाद घेऊन दुपारी ३.३० च्या एक्सप्रेसने दादरला ७ वाजेपर्यंत येत आहोत. त्या दिवशी माटुंग्यास मुक्काम करून २३ तारखेस राजधानी एक्सप्रेसने दिल्लीस जाऊ. श्री. माधवरावांनाही सवडीने हे वृत्त कळवावे.

आपली मनीऑर्डर व पत्र मिळाले. या पत्रासोबत ६७२/- रुपयांचा आपल्या नावाचा ड्राफ्ट श्री. रघुनाथरावांनी पाठविला आहे. तो पोहचल्याचे पुण्याचे पत्त्यावर कळवावे. तिकीटाचे किती पैसे लागले ते कळवावे, असे दिल्लीहून श्री. कुर्लेकरांचे पत्र आल्यावरून आपल्या पत्रात त्याबद्दल विचारणा केली होती. त्यांच्याकडून पैसे येतील. त्यांनी ३ जुलैची झेलमची परतीची पुण्याची तीन तिकीटे काढून ठेवली आहेत. तिने निघून ४ तारखेस आम्ही पुण्यास पोहोचू. ६ तारखेस गुरु पौर्णिमा आहे.

आपल्याकडून धनाचे सहाय्य तर आम्हास नेहमी चालूच आहे. धनापेक्षा मनाचे सहाय्य महत्त्वाचे आहे. तेही आपले आहेच. त्याचीच यापुढे विशेष जरूरी आहे. पुण्यास सध्या 'श्री वामन निवासाचा' नकाशा, मॉडेल तयार करण्याचे काम चालू आहे त्या वास्तुची उभारणी करण्याचे कार्य आपल्या सारख्या आत्मीय वास्तु शास्त्रज्ञांच्या देखरेखीनेच उत्तम प्रकारे पार पडणार आहे. याबद्दल पुढे सवडीने चर्चा करता येईल. या कार्याकरीता दिल्लीस श्री. कुर्लेकरांनी तेथील योग्य मंडळींची एक स्थायी सहाय्यक समिती स्थापन केली असून येताना नकाशा, खर्चाचा अंदाज घेऊन येण्यास लिहीले आहे. संध्याकाळी रोज दि. २५ ते १ तारखेपर्यंत, ६ ते ९ भागवतार्थ कथनाचे कार्यही आमच्याकडे त्यांनी दिलेले आहे, पण ते अंगभूत परमात्म्याच्या असीम कृपेनेच पूर्णतेस जाणारे आहे. श्री. शृंगारपुरे, श्री. गोडसे इत्यादी सर्वांना घरातील सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

हे वि.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

येथील मंदिराचे नकाशे आपण श्री. जगनशेठ धन्नावत यांच्याकडे पाठवणार होता, ते पाठवावे असे श्री. जगनशेठ धन्नावत यांनी सांगितले आहे.

।। श्री दत्त ।।

द्वारा श्री. उ.र. कुलेंकर
डी२/९७, किडवाई नगर (पूर्व),
न्यू दिल्ली.
दि. २५.६.१९८२

सप्रेम सादर निवेदन वि.

आम्ही येथे काल सकाळी बरोबर ९.३० लाच पोहोचलो. उशीर झाला नाही. स्टेशनवर मंडळी नेणेस आली होती. आज कार्यक्रम रात्री ६ ते ९ ला सुरू होईल. १ तारखेस समाप्ती होईल. २ तारखेस येथे राहून ३ तारखेस येथून निघता येईल. त्या दिवशीची पुण्याची झेलमची तिकीटे काढलेली आहेतच. श्री. माधवरावांचा फोन येथे २३ तारखेस मिळाला. इतर गाड्यांची मुंबईची तिकीटे तत्काल मिळत नाहीत. नुसती नावे लिहून घेतात. २ तारखेस ९/१० ला त्याचा निर्णय कळणार. नंतर फार धावाधावी, गडबड होईल म्हणून झेलमने निघणे बरे. मुंबईच्या तिकीटांचाही प्रयत्न करू, असे येथील मंडळींचे मत आहे. ईशेच्छेने काय घडते ते पहावे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---*---

प.पू. महाराज व श्री. रघुनाथराव यांची दि. १.७.१९८२ ची राजधानी एक्सप्रेसची दिल्ली-मुंबई तिकीटे तेथील मंडळींनी मिळविली. दि. २.७.१९८२ रोजी सकाळी १०.४२ वाजता श्री महाराजांचे मुंबई सेंट्रल स्थानकावर आगमन झाले. आम्ही सर्व मंडळी त्यांचे स्वागतास उपस्थित होतोच. दि. ५ पर्यंत 'श्रीं'चा मुक्काम माटुंग्यास होता. दि. ५ ला सायंकाळी 'श्रीं'चे सोबतच पुण्यास मीही गेलो. दि. ६.७.१९८२ ला गुरुपौर्णिमा होती. 'श्रीं'चे दर्शन पूजन व सायंकाळी 'श्रीं'चे समोर 'साधना कक्ष' हॉलमध्ये सामुदायिक साधना, बैठकीचा लाभ झाला.

दुसऱ्या दिवशी 'श्रीं'ची आज्ञा घेऊन मुंबईस परतलो. दि. २३.७.१९८२ ला सात तासांचा 'दिगंबरा' धूनचा कार्यक्रम आम्ही काही गुरुबंधूंनी केला. त्याच दिवशी दि. १.८.१९८२ शनिवारी श्रावणात हरेश्वरी जाऊन २१ तासांचा नामस्मरणाचा कार्यक्रम करण्याचा संकल्प 'श्रीं'ची प्रार्थना करून सोडला. दि. २५.७.१९८२ ला मी पुण्यास गेलो असता 'श्रीं'चे कानावर घातले की आम्ही ५-६ गुरुबंधू श्री हरेश्वर क्षेत्री जाऊन आपले वास्तव्य होते त्या

आपल्या खोलीत २१ तास 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'या महामंत्राची धून करणार आहोत. आपले आशीर्वाद असावेत. नंतर श्री हरिहरेश्वरास बेल फूल वाहून मुंबईस परतू. परंतु दि. ३०.७.१९८२ रोजी सायंकाळीच आमचे मेहुणे सौ. लताचे बंधू श्री. रवींद्र कर्णिक यांना माईल्ड हार्ट अॅटॅक आला. आमच्या मनी चलबिचल झाली. कार्यक्रम केला तर त्यांच्या प्रकृतीस निश्चितच 'श्री'कृपेने आराम पडेल. परंतु हा श्रद्धापूर्ण विचार ऐहिक पातळीवर पुरा करणे शक्य नव्हते. सर्वांची धावपळ उडाली. माझी रात्री भायखळा हॉस्पिटलला शुश्रूषेकरीता जाण्याची योजना झाली. मी लागलीच प.पू. महाराजांना पत्र लिहीले ते असे....

।। श्री दत्त ।।

गोरेगाव, मुंबई.
दि. ३०.७.१९८२

प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराज आपले पवित्र चरणीं दोन्ही कर जोडून त्रिवार मस्तक ठेवून शि.सा.न.वि.वि.

आपल्या भेटीत आम्ही या शनिवारी हरेश्वरी जाऊन २१ तासांचा नामस्मरणाचा कार्यक्रम करून 'श्रीं'स बेलफूल वाहून येऊ म्हटले होते. परंतु सौभाग्यवतींचे थोरले बंधू श्री. रवींद्र कर्णिक यांना सौम्य हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांना भायखळा रेल्वे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे व शुश्रूषेस माझी योजना कुटुंबातून झाल्यामुळे हरेश्वरी जाता येणार नाही. तरी श्रावण मासात हा संकल्प 'श्री'प्रभुंनी आमच्याकडून पार पाडून घ्यावा अशी 'श्री' चरणी प्रार्थना आहे.

श्री. रवींद्र कर्णिक हे आयुरारोग्य संपन्न होवोत ही 'श्री'चरणी प्रार्थना आहे. त्या प्रीत्यर्थ काही अनुष्ठान आम्ही किंवा त्यांच्या पत्नीने करावे असे असेल तर आपल्या कृपाशीर्वादासह कळवावे ही प्रार्थना आहे. बाकी सर्व आपल्या कृपेने क्षेम आहे. सर्व मंडळीस सप्रेम नमस्कार, कळावे.

आपले चरणी लीन
शशीकांत नागले.

---**---

आता 'श्रीं'चे आलेले पत्र पाहूया -

।। श्री दत्त ।।

पुणे, श्री वासुदेव निवास.
दि. ४.८.१९८२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम आपले पत्र गाणगापूरास निघतांना मिळाले. आम्ही तेथून

१ तारखेस निघून येथे आलो. श्री. कर्णिक यांच्या प्रकृतीस आराम पडण्याचे दृष्टीने श्रीचरणी प्रार्थना आहे. सप्तशती गुरुचरित्राचे १० पाठ त्यांच्या सौभाग्यवतीने सवडीने करावेत.

हरेश्वरी आपला संकल्पित भजनाचा कार्यक्रम सवडीने जाऊन करावा. आर्तजनांची शुश्रूषा हे सुद्धा पुण्यकर्मच घडले आहे. श्री. कर्णिक घरी आल्यावर आपण हरेश्वरी जाऊ शकाल. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---*---

प.पू. महाराजांचे पत्रातून श्री. कर्णिक बरे होऊन घरी येण्याची ग्वाहीच मिळाली आणि मन निश्चिंत झाले. श्री नरसोबाच्या वाडीला श्री दत्तप्रभुंच्या पादुकांवर २ महिने कृष्णेस पूर आल्याने पाणी असते. श्रावण मासात पूर ओसरून पादुका, दत्तप्रभूंचे चरण उघडे होतात व त्यांना सूज आलेली भक्तांना जाणवते. मग भक्त व पुजारी श्रींचे पादुकांवर त्यांना सर्दी होऊ नये, सूज ओसरावी म्हणून अनेक औषधी वनस्पती, मुळ्या, जेष्टमध व मधादी मिश्रीत, सोसेल असा गरम काढा घालतात. श्री प्रभूंची पाऊले मूळ आकारास येतात. हा काढा वाडीतील तसेच आसपासचे गावातील भक्त येऊन भक्तीभावाने बाटल्यातून भरून नेतात. संपूर्ण वर्षात घरी कोणालाही कोणत्याही प्रकारचा आजार आला, रोग झाला तर रुग्णास हा काढा दिला जातो. आम्हीही वाडीतून हा काढा नुकतेच घेऊन आलो होतो. त्या रात्री की ज्या दिवशी गुरु महाराज गाणगापुरास निघाले होते त्याच रात्री मी श्री. रवींद्र यांना, ''देवाचे तीर्थ घ्या तुम्ही लवकर बरे व्हाल'' असे म्हणून दिले व त्यांनीही ते घेतले.

प.पू. श्रीमहाराजांना मी पाठविलेल्या सर्वच पत्रांच्या प्रती माझ्याकडे नाहीत परंतु 'श्रीं'ची आलेली सर्वच पत्रे संग्रहीत आहेत. त्या त्या प्रसंग कथनात ती समाविष्ट करू. जेणेकरून 'श्री महाराजांशी' झालेल्या सुखसंवादांच्या रूपाने 'श्रीं'चेच पुन्हा सान्निध्य लाभेल.

'श्रीं'च्या आशीर्वादाने श्री. रवींद्र कर्णिक शनिवार, दि. ७.८.१९८२ ला रुग्णालयातून बरे होऊन घरी आले आणि संकल्पित कार्यक्रम पूर्ण करण्यास आम्ही हरेश्वरी प्रस्थान केले. श्री हरिहरेश्वर क्षेत्री हा कार्यक्रम यथाविधी पार पाडून आम्ही मुंबईस परतलो. लागलीच 'श्री महाराजांना सविस्तर वृत्तांत दि. ११.८.१९८२ रोजी पत्र लिहून कळवला ते पत्र पुढे देत आहे आणि माझ्या पत्रास आलेले 'श्रीं'चे पत्रही देत आहे.

।। श्री दत्त ।।

गोरेगाव, दि. ११.८.१९८२

प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराज आपले पवित्र चरणी दो.क.जो.त्रि.च.म.ठे.शि.सा.न.वि.वि.

श्री क्षेत्र हरिहरेश्वराहून परत येताच आपले पत्र मिळाले (दि. ४.८.१९८२ चे). माझे मेहुणे यांची प्रकृती सुधारून आपले कृपाशीर्वादाने ते आरोग्य संपन्न होत आहेत. शनिवार, दि. ७.८.१९८२ रोजी रुग्णालयातून त्यांना घरी आणले आणि लागलीच आम्ही निघालो. शनिवारी चेंबूर येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता आम्ही सहाजण श्री. व सौ. शृंगारपुरे, श्री. व सौ. गोडसे, मी स्वत: व पुतण्या संजय असे गाडीने हरेश्वरी गेलो. सकाळी ठीक ११.३० वा. भजनाच्या कार्यक्रमास प्रारंभ करून दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी ८.३० वाजता समाप्ती केली. सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत सहस्र बिल्वपत्र श्री चरणी अर्पण करून पूजन झाले व प्रसाद भोजन करून सायंकाळी ४ वाजता हरेश्वर सोडले.

शक्याशक्यतेचा विचार न करता 'श्री चरणीं' कार्यक्रमाचा संकल्प सोडावा, तो संपन्न व्हावा म्हणून 'श्री चरणीं' प्रार्थना करावी आणि दयाघन प्रभू गुरुदेवांनी आम्हा अज्ञ बालकांकडून पार पाडून घ्यावा. या परम भाग्याच्या जाणीवेने २१ तास पूर्ण होताच गहीवर आवरण्यास असमर्थ होऊन, कृष्णेच्या पुराने नयनांचा आश्रय घेऊन परमावधी झाली. गुरुकृपेचा महिमा वर्णन करण्यास शब्द अपुरे आहेत. भक्तीभाव वृद्धींगत होवो, सदैव 'श्री चरणीं' सेवेत रती वाढो ही विनम्र प्रार्थना. सौ. कर्णिक सप्तशतीचे १० पाठ रोज एक याप्रमाणे करणार आहेत.

कार्तिक शुद्ध कालात हरेश्वरी भागवत सप्ताह कोणत्या तिथीस प्रारंभ करायचा, ते मर्जीनुरुप ठरविणे आहे. प्रत्यक्ष भेटीत आम्हास त्याबद्दल कळणार आहेच. 'श्री' कृपया सर्वक्षेम. अ. सौ. आईसाहेबांचे चरणी शि.सा.न. सान थोरास यथानुक्रमे आ. नमस्कार.

सदैव चरणी लीन
श.दि. नागले

---**---

'श्रीं'चे आलेले उत्तर सर्वांनाच उद्‌बोधक आहे ते खाली देत आहे.

।। श्री दत्त ।।

पुणे, ४ श्री वासुदेव निवास
दि. १३.८.१९८२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम आपले श्रद्धा भक्तीपूर्ण पत्र वाचून समाधान वाटले. आपला सत्य संकल्प देवाने पूर्ण केला, ही खरी ईश्वर कृपा आहे. ठरल्याप्रमाणे श्रावण मासात २१ तास भजन, श्री हरेश्वरी सहस्र बिल्वार्पण, प्रसाद ग्रहण सर्व आपल्या इच्छेप्रमाणे उत्तम व्यवस्थित पार पडले. आपली व सर्व सहकारी मंडळी यांची निष्ठाच याला कारण आहे. तसेच श्री कर्णिकांच्या आजाराचे वेळी आपण थांबून त्यांची शुश्रूषा केलीत. ठरलेल्या पुण्यकर्मात अडथळा झाला असे न समजता व आग्रह न धरता, आप्तऋण हे प्राप्त कर्तव्य समजून ते

केलेत, या मोठ्या पुण्याने आपले पूर्व संकल्पित हरेश्वरचेही पुण्यकर्म आपणाकडून देवाने करून घेऊन तेही समाधान आपणास मिळवून दिले, असे समजण्यास हरकत नाही. परमार्थ हा मुख्य मनोवृत्तीवर अवलंबून आहे. पुण्यकर्म करण्याची बुद्धीही ईश्वर प्रेरणेनेच झाली. त्याप्रमाणे फलसिद्धीही ईशशक्तीचेच कार्य आहे. अशी मनोवृत्ती प्रत्येक कार्याच्यावेळी असल्यास, मनातील आग्रहादी विकार दूर होऊन शांती लाभते. अशा शांत स्थितीत जे कार्य घडेल तेच पुण्योत्पादक ठरते. आग्रहाने घडलेले कर्म तितके उच्च ठरणार नाही. श्री रामेश्वराला अभिषेक करण्याकरीता आणलेल्या गंगेच्या कावडीतील पाणी मध्येच भेटलेल्या, तहानलेल्या गाढवाला श्री नाथ महाराजांनी पिण्यास दिले. त्यांची मनोवृत्ती त्यावेळी शांत राहिली. श्री रामेश्वराला अभिषेक न झाल्याने त्यांना खेद झाला नाही हाच कर्मयोग व भक्तियोग यांचा समन्वय आहे.

ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान।।

हे परमार्थाचे मुख्य सूत्र आहे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---**---

कार्तिकातील आपल्या संकल्पाबद्दल स्वस्थतेने विचार करूया. अद्यापी अवधी आहे. द.क.

६९) हरिहरेश्वरी गुरुचरित्र सप्ताह संकल्प

श्री महाराजांनी पत्राच्या शेवटी ताजा कलम मध्ये लिहीले आहे ''कार्तिकातील आपले संकल्पाबद्दल स्वस्थतने विचार करूया. अद्यापी अवधी आहे'' या विषयी काही संदर्भ ....

त्याचे असे झाले मागील वर्षी 'श्रीं'चे हरिहरेश्वर येथील आमच्या घरी आगमन दि. १०.४.१९८१ रोजी झाले होते. सर्व गुरुबंधू या कार्यक्रमास उपस्थित होते. तसे पाहिले तर आम्ही कार्यक्रम काही ठरविलाच नव्हता. उद्देश होता श्री महाराजांना समुद्र सान्निध्य, श्री हरिहरेश्वराचे सन्निध नारळी सुपारींचे बागेत, मोकळ्या शुद्ध हवेत विश्रांती मिळावी आणि 'श्रीं'ना कोणत्याही प्रकारे त्रास न देता त्यांची सेवा व सान्निध्य, सहवास, सत्संग सर्वांस घडावा. परंतु आग्रहास मान देऊन 'श्रीं'नी १७.४.१९८१ पर्यंत वास्तव्य करून ''नुसते बसण्यापेक्षा रोज आचार्य आद्य शंकराचार्यांच्या गीताभाष्यावर अभ्यास करू या'' असे म्हणून ज्ञानोपासनाही सर्वांस घडविली. हा आठ दिवसांचा कार्यक्रम अप्रतिम झाला. सर्व सहकारी गुरुभक्तांच्या भावभक्तीने, श्रद्धेने सात्विक भाव ओसंडून वहात होते आणि सर्वांस खूपखूप आनंद लुटता आला. वर्षपूर्ण होताच सर्वांच्या मनात गतवर्षीच्या आठवणी उभ्या राहिल्या. सर्वांच्या मनी एकच विचार की दीपावलीला लागून येणारे सुट्टीत परत हा योग जुळवून यावा.

सर्व गुरुबंधूंनी ज्या ज्या वेळी शक्य होईल त्या त्या वेळी सात तास एकवीस तास कधी कोण्या गुरुबंधूंचे घरी, तर बहुतांशी 'येऊरच्या श्री सद्गुरु सेवा आश्रमात' 'दिगंबराची धून' नामस्मरण (भजन) करण्याचे ठरविले. आता हा कार्यक्रम व्हावा म्हणून 'श्रीं'च्या कानी घालणे, परवानगी मिळविणे ही जबाबदारी साहजिकच अस्मादिकांवर पडली. प्रथम ही गोष्ट श्री. रघुनाथराव याच्या कानी घालून त्यांचा सल्ला घेतला.

श्री महाराजांची प्रकृती ठीक नसते, डॉ. सरदेसाई विश्रांतीचा सल्ला देतात. प्रवास वयोमनाप्रमाणे झेपत नाही. परंतु नाही म्हटले तरी गावोगावचे कोणी भक्त, काही मंडळे 'श्रीं'ना कार्यक्रमास नेणारच, गळ घालणारच, त्यापेक्षा आपण श्री महाराजांना अज्ञातवासात निव्वळ विश्रांतीलाच का घेऊन जाऊ नये? श्री. रघुनाथराव म्हणाले, ''अहो पण महाराजांची विश्रांतीची व्याख्या काय? हरीभजन, प्रवचन, रामनाम हीच तर त्यांची विश्रांती असते. केवळ देहाच्या विश्रांती करता म्हणाल तर श्री महाराज तयार होणार नाहीत. त्यापेक्षा त्यांना श्रीमद् भागवत सप्ताह किंवा श्रीगुरुचरित्र सप्ताह असा काही कार्यक्रम सांगाल तर ते नाही म्हणणार नाहीत.''

'श्रीं'चे समोर बसलो इतर क्षेम कुशल होताच म्हटले, ''महाराज मुंबईच्या सर्व भक्त मंडळींचा मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी दीपावळीच्या सुट्टीत हरेश्वरी श्रीमद् भागवत किंवा श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह आपले उपस्थितीत करण्याचा मानस आहे. सप्ताह कोणता व किती तारखेस प्रारंभ करावा हे आपल्या मर्जीनुरुप ठरविणे आहे. आपल्यापुढे सर्वांची ही प्रार्थना आहे.'' श्री महाराज या संकल्पास नाही म्हणणे शक्य नव्हते. नकारात्मक ते कधीच बोलत नसतात. प्रश्न होता तो आधीच कोणता कार्यक्रम ठरला असण्याची. परंतु श्री महाराज म्हणाले, ''अजून अवधी आहे. शांतपणे ठरवू या.'' मुंबईकर मंडळींच्या आनंदाला आणि उत्साहाला हे ऐकून भरते आले.

दि. १४.८.१९८२ शनिवारी सायंकाळी चार वाजता सर्वांनी येऊर येथे पोहोचण्याचे ठरले. येऊर हे जंगलमय प्रेक्षणीय स्थळ ठाणे स्टेशन पासून ५ ते ७ कि.मी.चे आत आहे. डोंगरावरच आहे. या डोंगराच्या पलीकडे बोरीवलीचा नॅशनल पार्क येतो. पार्कचा अभयारण्याचा भाग येऊरला येऊन भिडला आहे. दाट अरण्य आहे. तपोवनच आहे म्हणाना! एकदा तर श्री महाराजांचा मुक्काम येथे आश्रमात असताना रात्री १० ते ११ चे सुमारास एक काळा वाघ अंगणात असलेल्या नळावर (वॉशिंग प्लेस) पाणी पिण्यास आला होता. श्री. रघुनाथराव हे फॉरेस्ट खात्यातील असल्यामुळे वाघाला पळवून लावण्याचा विशिष्ट प्रकारचा आवाज काढण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांनी तो आवाज काढताच वाघ तेथून धूम पळाला.

ह्या येऊरच्या जंगलात ही जागा प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांच्या एका भक्ताने काही तरी उद्योग करण्याचे निमित्ताने घेतली. त्या जागेस श्रीगुरुमहाराजांचा पदस्पर्श व्हावा

म्हणून ते त्यांना येथे घेऊन आले. जागेवर पाऊल पडताच उत्स्फुर्तपणे प.पू. श्रीगुरुमहाराज म्हणाले, ''अरे वा! ही जागा आश्रमाला फार चांगली आहे.'' गुरुवाक्य प्रमाणम्! त्या भक्ताने तेथेच श्री सद्गुरु सेवा आश्रमाचा संकल्प सोडला व येथे हा पवित्र आश्रम स्थापन झाला. आश्रमाच्या प्रशस्त हॉलमध्ये प.पू. श्री गुळवणी महाराजांचा मांडी घालून बसलेला कट आऊट फोटो आहे. चारही बाजूने काचा लावून गाभारा केला आहे. श्री गुरुमहाराज प्रत्यक्ष बसल्याचा व दयार्द्र दृष्टीने आपल्याकडे पहात असल्याचा भास होतो. हॉलला प्रशस्त बाल्कनी-कॉरीडॉर आहे. हॉलला लागून दोन बेडरुम्स्, न्हाणीघर श्री महाराज व इतर सत्पुरुषांकरीता आहेत. मागील भागात शौचालय आणि स्वयंपाकाकरीता स्वतंत्र वास्तूच आहे. अशा या परिसरात संतांच्या पादस्पर्शाने पवित्र झालेल्या, पावित्र्याने भरलेल्या सर्व मंगल मांगल्याने परिपूर्ण ज्या कक्षेत प्रवेश करताच सर्वांग रोमांचित होऊन नेत्र बंद होऊ लागून ध्यान धारणेची उत्कट इच्छा होते. अशा या परिसरात आमचे एकवीस तासाचे 'दिगंबरा दिगंबरा' या महामंत्राच्या धूनचे बरेच कार्यक्रम साग्रसंगीत झाले.

दि. १४.८.१९८२ शनिवारी ४.३० लाच 'ब्रह्मानंद परमसुखदं'ने आमच्या धुनला प्रारंभ झाला. प.प. श्री गजानन आश्रम स्वामी केवळ या धुनच्या कार्यक्रम श्रवणास मुक्कामाला आले होते. टाळ, मृदुंग, तबला पेटीच्या तालात आमचे काही गायन कुशल गुरुबंधू वेगवेगळ्या चालीत 'दिगंबराची' धून सांगत होते. आम्ही सर्व कोरसचे साथीदार म्हणत होतो. रात्र चढत चालली तशी धुनलाही रंगत येत चालली. गाभाऱ्याचे दोन्ही बाजूस मोकळ्या (उघड्या) खोल्या होत्या. उजवीकडील बाजूस प.प. गजानन आश्रम स्वामी दर्भासनावर बसले होते. स्वामी वयाने वृद्ध होते. रात्री दीड ते दोनचे सुमारास त्यांचे पायास रग लागली म्हणून की काय ते आपले पाय स्वत:च चेपू लागले. माझे सहज लक्ष गेले. आम्ही सर्व धून मध्ये भावभक्तीने तल्लीन झालो होतो. संन्याशी स्वामी महाराज नारायण स्वरुपच असतात. म्हणून पुन्हा मी दर्शनास डोळे उघडले. स्वामींचे स्वत:चे पाय स्वत:च रगडणे चालूच होते. मला ते दृश्य पहावेना. मी माझ्या हातातील टाळ खाली ठेवले. प.पू. महाराजांना नमस्कार केला व सरळ जाऊन स्वामी महाराजांना दंडवत घालून त्यांचे समोर बसून त्यांचे पादसंवाहन चालू केले. त्यांनाही बरे वाटले. संन्याशी साधूस स्पर्श करायचा नसतो. नमस्कार लांबून करायचा असतो. पण माझ्याकडून ते उत्स्फूर्तपणे घडले. वास्तविक आम्ही सर्व गुरुबंधू या स्वामींना श्रीवासुदेव निवासात वरच्या खोलीत वास्तव्य होते, तेव्हा नेहमी पहात होतो. परंतु तशी ओळख नसल्याने प.पू. महाराजांचे दर्शन घेऊन झाले की, आतील खोलीत जाऊन त्यांचेही दर्शन घेत असू.

दुसऱ्या दिवशी २१ तासांच्या धुनची समाप्ती होऊन, प्रसाद भोजन स्वामींच्या भिक्षेनंतर झाले. विश्रांती झाली. चहापान करत असतानाच प.पू. स्वामी महाराजांचे बोलावणे आले.

मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी जवळ बसवून घेतले. विचारपूस केली. परिचय झाला. आमच्या इतर गुरुबंधूंचाही परिचय झाला. नंतर श्रीवासुदेव निवासात नेहमी दर्शन होऊन आमचे स्वामी महाराजांशी चांगलेच संबंध वाढले. मनमोकळे बोलणे. काही आध्यात्मिक प्रश्न विचारावेत, ऐहिक विचारावेत, स्वामी निराकरण करायचे.

दि. १५.९.१९८२ ला ऑफीस मध्ये जाऊन श्री. प्रभुदेसाई यांना भेटलो व हरेश्वरच्या द्वितीय कार्यक्रमाबाबत प.पू. महाराजांकडे कसा विषय काढू या, दिवस तारीख ठरविण्याबद्दल तसेच पारायण कोठले ठरवावे या बाबत, विचार झाला. श्रीमत् भागवत म्हटले तर संहिता वाचनास कोणास तरी वेदशास्त्र संपन्न गुरुजीस आणावे लागेल. तेही आणू. परंतु आपला आंतरिक उद्देश आहे ''श्रींची विश्रांती'' तसेच भागवत सप्ताह म्हटले तर रोज प.पू. महाराजांचे पाच ते साडेपाच तास प्रवचन होणार! प्रकृती स्वास्थ्य लक्षात घेऊन आपण भागवताऐवजी 'श्रीगुरुचरित्र' पारायण सप्ताह' म्हणून हा कार्यक्रम ठरवू या. आपण सर्व गुरुबंधू श्रीगुरुचरित्राचा सप्ताह करू. गुरुभगिनी सप्तशती गुरुचरित्राचे पारायण करतील. रोज दुपार नंतर ३ ते ४.३० पर्यंत दीड तास श्री महाराजांच्या पूर्ण झालेल्या अध्यायांवर प्रवचन ठेऊ. अशी सर्व साधारण रुपरेषा ठरविली.

दि. १८.९.१९८२ व १९.९.१९८२ ला मी व भाऊसाहेब शृंगारपुरे नाशिक येथे प.पू. श्रीमहाराजांचा भागवत सप्ताह ज्या ठिकाणी होणार होता तेथे गेलो. 'श्रीं'चे आज्ञेने त्र्यंबकेश्वरला दर्शन करून आलो. नाशिकच्या वास्तव्यात श्री महाराजांजवळ कार्तिकात हरेश्वर येथ श्रीगुरुचरित्र पारायणाचे नक्की झाले. नक्की तारीख दिवस श्रीमहाराज नंतर सांगणार होते.

या भेटीत श्रीमहाराजांनी पू.सौ. ताईमहाराजांची आठवण काढली होती. एक आश्चर्य त्यांनी सांगितले, म्हणाले - ''आम्ही परवा जालन्यास सौ. ताई महाराजांकडे गेलो होतो. पंचवीस माणसे दुसऱ्या दिवशी येणार असा निरोप आला होता. त्याप्रमाणे सौ. ताई महाराजांनी पाकनिष्पत्ती केली होती. अहो! आणि प्रत्यक्षात १०० च्या वर समुदाय आला. प.पू.सौ. ताई महाराजांनी सर्वांस जेवू घातले. तेच तयार झालेले जेवण पुन्हा नवा स्वयंपाक नाही. तेच अन्न १००-१२५ माणसांना पुरले. मोठे आश्चर्यच आहे. अहो, सौ. ताई म्हणजे साक्षात् अन्नपूर्णा भगवती आहेत.''

दुसरे दिवशी सोमवार, दि. २० रोजी आम्ही दोघेही आनंदाची बातमी घेऊन मुंबईस परतलो. हरेश्वरचा द्वितीय कार्यक्रम कार्तिकात होणार हे निश्चित झाले. श्रीमहाराजांचे व सौ. आईसाहेबांचे हरेश्वरी आगमन होणार व सप्ताह २२.११.१९८२ ते २८.११.१९८२ रोजी संपन्न होणार हे नक्की झाले.

दि. १.१०.१९८२ रोजी रात्री ९.३० च्या रातराणीने मी व श्री. शृंगारपुरे पुढील कार्यक्रमाच्या व्यवस्थेच्या दृष्टीने पाहणी करण्यास हरेश्वरी गेलो.

पुन्हा दि. ९.१०.१९८२ रोजी श्री. प्रभुदेसाई, श्री. घोलकर, गोडसे, शृंगारपुरे दांपत्य असे हरेश्वरी जाऊन, 'कार्तिकात कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडो' म्हणून २१ तासांची 'दिगंबरा'ची धून नामस्मरण केले. या कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर सगळीकडे फिरून कुठे काय काय करावे लागणार त्या जागा नक्की केल्या. औदुंबराखाली तुलसी वृंदावन आहे. समोर अंगणात २५-३० माणसे पारायणास बसतील अशी जागा आहे. तेथे मंडप घालण्याचे ठरले. विचारपूर्वक सर्व योजना नक्की झाल्या. कार्यक्रमाला आता महिनाच राहिला म्हणून सर्व व्यवस्थेस प्रारंभ करायचे ठरले.

दि. २३.१०.१९८२ ला श्री. गोडसे यांच्या घरी चौथ्या शनिवारच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. 'श्रीं'च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी तो होता. त्यांचा जास्तीत जास्त सहवास लाभावा हा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात एक तास दिगंबराची धून व नंतर दत्तबावनी व घोरात्कष्टातचे निदान ११ पाठ करण्याचे ठरले. हा कार्यक्रम आळी-पाळीने प्रत्येक गुरुबंधूंकडे होईल. पहिला मान आमचे गुरुबंधू श्री. गोडसे यांस मिळाला.

दि. २७.१०.१९८२ ला श्री. शृंगारपुरे, गोडसेंसह सिकंदराबाद-एक्सप्रेसने पुण्यास गेलो. 'श्रीं'च्या नवीन घरी 'श्री रेणुका निवास' मध्ये जाऊन 'श्रीं'ना दसऱ्याचे सोने दिले. 'श्रीं'चे मंगल आशीर्वाद घेतले. हरेश्वरी श्रीगुरुचरित्र पारायण होणार म्हणून 'श्री' आपल्या सोबत 'श्री दत्त पादुका'ही आणणार आहेत हे कळले. सौ. आईसाहेबांनाही सोने दिले.

७०) श्री. रघुनाथरावांची मार्गदर्शनपर पत्रे

श्री. रघुनाथरावांनी दि. १०.१०.१९८२ च्या पत्रातून दिलेला आणखी एक धक्का - "जालन्याच्या कार्यक्रमाची समाप्ती करून २-३ दिवसात पुण्याला महाराजांना जायचे आहे. पुन्हा देऊळगावराजा तेथून श्रीनृसिंहवाडीचा प्रवास असे दोन प्रवास आहेत.

आपण श्रीमहाराजांचा श्री हरेश्वर मुक्काम पूर्ण पक्का केलेला दिसतोय. आपणास कळविण्यास सांगितले आहे की आपण आताच जास्त तयारी करू नये. एखाद्या वेळी कार्यक्रम पुढे करावा लागेल त्यासाठी पुष्कळ कारणे आहेत. म्हणून आताच सर्व तयारी करू नये. मधून मधून महाराजांची प्रकृती ठीक राहात नाही."

दुसरे श्री. रघुनाथरावांचे पत्र दि. २८.१०.१९८२ चे! काही मजकूर -

''श्रीगुरुचरित्र वाचनाबद्दल श्री वासुदेवानंद सरस्वती म्हणत गुरुचरित्र वाचनाच्या परंपरेप्रमाणे आपणास वाचन करणे त्यांच्या परंपरेस सोडून होत आहे. आपण ते नुसते ऐकलेत तरी तेवढ्याच पुण्याईचा लाभ होतो. स्वतः वाचण्याचा आग्रह मनात असल्यास तो काढलेला बरा.''

आ. रघुनाथ

---*---

दि. ७.११.१९८२ ला येऊरला सर्व गुरुबंधूंसह २१ तासाची धून नामस्मरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाच्या समाप्ती नंतर हरेश्वर येथे होणाऱ्या श्रीगुरुचरित्र पारायणाचा संपूर्ण कार्यक्रम सुसंगतपणे श्री. प्रभुदेसाईंचे मार्गदर्शनाखाली आखण्यात आला.

दि. २७.१०.१९८२ दसऱ्याच्या दिवशी आम्ही, मी, श्री. गोडसे, शृंगारपुरे येथूनच उद्या हरेश्वरी जात असल्याचे 'श्रीं'च्या कानी घातले. 'श्री' म्हणाले, ''निघताना आश्रमात पोहे वगैरे काही तरी खाऊन निघा. वाटेत तुम्हाला, हरेश्वरला पोहोचेपर्यंत काहीही खायला मिळणार नाही.''

७१) हरिहरेश्वरी गुरुचरित्र कार्यक्रमाची तयारी

हरेश्वरी पोहोचल्यावर आमचे मॅनेजर श्री. पांडुरंग मयेकर यांना सर्व कामांची रुपरेषा समजावून पूर्ण सूचना दिल्या. पाच दिवस राहून बरीचशी कामे आम्ही आमच्या समोरच करून घेतली. गतवर्षी एप्रिल १९८१ मध्ये झालेल्या उत्सवाची तयारी त्यांनी केली होती. कोणती कामे कशी कधी करायची या अनुभवातून ते गेलेले असल्याने ह्यावेळी काही जड गेले नाही. सर्व सुलभतेने पार पडले. ह्यावेळी समोर अंगणात मांडव तीनही बाजूने बंदिस्त होता व उत्तरेकडे फाटक होते. कितीही माणसे झोपू शकतील अशी आतील जमीन मुरुम टाकून चोपून सारवून गुळगुळीत केली होती. ह्याच मंडपात पूर्वाभिमुख व्यासपीठ श्री महाराजांच्या प्रवचनास व त्याच्याच बाजूला थोड्या उंच जागेवर प.प. गजानन आश्रम स्वामी महाराजांना बसण्यास मोठ्या चौकोनी चौपाईचे आसन केले होते. मागील पडवीत मंडप होताच. शिवाय औदुंबर-तुळशी अंगणासही आच्छादन केले होते. श्री महाराजांची खोली सुसज्ज ठेवली होती. छताला मांजरपाट कापड लावले जेणे करून फळ्यांच्या फटीतून काही कचरा पडू नये.

पुढील मंडपात ठिकठिकाणी आकाश कंदील, पताकांच्या माळांमधून लावले होते. आंब्याचे डहाळे, प्रवेशाची महिरप, हरेश्वर गावात शिरताना श्री महाराजांचा स्वागताचा रंगीत

फलक तसेच श्री हरिहरेश्वराचे मंदिराकडे जाण्याचा कुरंदी दगडांचा पेव्हमेंटचा रस्ता सुरू होण्यापूर्वी देवस्थान कमिटीचा सत्कार करणारा बोर्ड अशी जय्यत तयारी झाली. देवस्थानाकडून, ग्रामस्थांकडून, महिला मंडळांकडून जाजमे, टेबल, पिंपे, भांडी, अशी सर्वतोपरी मदत स्वयंस्फूर्त आपणहून मिळत होती. ही सर्व तयारी जणू हरिहरेश्वर आणि श्री कालभैरव योगेश्वरी या देवता आपल्या लाडक्या संत सत्पुरुष सद्गुरु श्रीदत्तमहाराजांकरिता समस्त ग्रामस्थांना प्रेरणा देऊन करवून घेत होते. हरेश्वरच्या माळ्याने येऊन म्हणावे, ''शशीनाना आपल्या बागेतून लागतील तेवढी फुले हार आम्ही पाठवू. फक्त तुम्ही सांगा किती आणि केव्हा?'' भाजीच्या मळेवाल्यांनी आधीच भाजी कोणती कोणती आहे त्याची यादी पाठवावी. तर देसाई दुकानदाराने, 'किराणा सामान कधी किती लागणार हे आधीच सांगून ठेवा म्हणजे माल आधीच आणून ठेवता येईल' म्हणावे. शेजारचे जोशी कुटुंब, खोत यांनी जागा कमी पडल्यास भक्त मंडळींना आमच्याकडे झोपण्यास पाठवा म्हणावे, समोरच्या काकुंनी काही लागले काही अडचण असेल तर ताबडतोब कळवा, संकोच करू नका म्हणावे, कोणी दूध किती लागेल विचारावे, ''देता किती घेशील दो करांनी!'' माझ्या गुरुमाऊलीने आपल्या आगमनापूर्वीच अनंत हात माझ्या मदतीस पाठविले होते. आणि गुरुबंधू तर काय? गेले काही महिने ७-७, २१-२१ तासांचे नामस्मरण करीत होते. जेणे करून आपला श्रीमत् गुरुचरित्र पारायण सप्ताह चांगल्या प्रकारे पार पडावा. मुंबईहून पूर्वीचे ब्राह्मण आचारी श्री. प्रभाकर पाध्ये आणि सहकारी येण्याचे नक्की झाले. दि. २०.११.१९८२ पासून ते ३०.११.१९८२ पर्यंतचा प्रत्येक दिवसाचा मेनू सौ. लताबाई व सौ. प्रभाने निश्चित केला. त्याप्रमाणे येणाऱ्या भक्तजनांच्या संख्येनुसार किती कोणती सामुग्री हे आचाऱ्यांसोबत नक्की झाले. याद्या किराणा दुकान, भाजीवाले, फळवाले, दूधवाले, फुलपुडी, हारवाले सर्वांना दिल्या गेल्या. तिकडे मुंबईकर भक्त मंडळींचीही तयारी चालू होती. श्री. प्रभुदेसाई यांचे असीम प्रेम भावनेतून मार्गदर्शन होत होते. सर्व गुरुबंधूंनी श्री. प्रभुदेसाईंच्या मार्गदर्शनाखाली प.पू. महाराजांचा आगमन सोहळा दि. २१.११.१९८२ पासून ते दि. २२ ते २८ नित्य श्री गुरुचरित्र पारायण, २९ ला धून नामस्मरण व ३०.११.१९८२ ला रात्री त्रिपुरी पौर्णिमेच्या दीपोत्सवापर्यंत सर्व कार्यक्रम नक्की केला.

नित्य कार्यक्रमाची सुरुवात दि. २२ पासून होती, आणि ती पहाटे ५.३० वाजता काकड आरतीने होणार होती. म्हणून प्रथम सौ. प्रभुदेसाई, सौ. निमकर आणि सौ. जोशी या तिघींनी काकड आरतीची पदे सांगायची व आम्ही सर्व साधक भक्त मंडळींनी पाठोपाठ म्हणायची असे ठरले. या प्रथम आरतीची रंगीत तालीम तबला, पेटी, झांजेच्या संगीतात सुरू झाली.

अशी सगळी प.पू. महाराजांच्या आगमनाची सहवासाची, श्री गुरुचरित्र सप्ताहाची जोरात अत्यंत उत्साहाने तयारी चालू होती. आम्हा सर्व गुरुबंधूंच्या आनंदास पारावार राहिला नव्हता.

सर्वांची अंत:करणे गुरुस्मरण, गुरुभक्तीने रसरसून भरली होती. पण आमच्या या जय्यत तयारीच्या कालावधीत आमच्या उत्सवमूर्ती प.पू. महाराजांचे सप्टेंबर १९८२ ते ३० ऑक्टोबर या दरम्यान काय काय कार्यक्रम झाले होते याचा धावता परामर्ष गुरुबंधू श्री. गोडसे यांच्या नित्य दैनंदिनी वरून घेऊ या.



७२) 'श्रीं'चा नाशिक मध्ये भागवत सप्ताह

दि. १८ सप्टेंबर १९८२. 'श्रीं'चे दुपारी पुण्याहून आगमन झाले. त्यांच्या शुभागमनास स्वागताकरीता हजारो भाविक उपस्थित होते. 'श्रीं'च्या आगमनाची मार्गप्रतिक्षा ही मंडळी डोळ्यात प्राण आणून अत्यंत अधीरतेने काही तास आधीपासून करीत होती. 'श्रीं'च्या शांत, सोज्वळ मूर्तीने मंडपात प्रवेश करताच 'श्रीं'चा 'श्रीदत्तमहाराज की जय।' म्हणून जयघोष केला. दिगंबराच्या धूनमध्ये 'श्री' हॉलमध्ये येऊन बैठकीवर स्थानापन्न झाले. मी व श्री. शृंगारपुरे सायंकाळी पाचचे सुमारास पोहोचलो. थोड्याशा विश्रांती नंतर लागलीच 'श्री' व्यासपीठावर स्थानापन्न झाले. भागवत सप्ताहास प्रारंभ होण्याच्या एक दिवस आधी गोकर्णमहात्म्य असते ते बालाजी मंदिरात सुरू झाले. प्रवचनानंतर आम्हा दोघांशी 'श्रीं'नी मनमोकळे संभाषण केले. सौ. ताईंच्या विस्मयकारक गोष्टी, त्यांचा आध्यात्मिक अधिकार यावर स्तुतीपर संभाषण केले हे मागे आलेच आहे. आम्ही फक्त दोन-तीन दिवसाकरताच आलो होतो. शक्य होत असेल तर दुसऱ्या दिवशी त्र्यंबकेश्वरास जाऊन पूजन करून येण्याची आज्ञा महत् भाग्यानेच झाली.

ह्या नाशिकच्या भागवत सप्ताहाचे खास वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रसंगाची स्टेजवर पात्रे उभी करून सोहळा साजरा करीत. 'श्रीं'चे प्रवचन होत होते. आधीच भागवताचे प्रत्येक दिवसांच्या निरुपणास कमीत कमी पाच तास लागतात. मध्यंतरी १५-२० मिनिटे भक्तजनांस चहापानास मध्यंतर असते. दि. २४.९.१९८२ श्रीकृष्णाचा जन्म झाला. मूर्ती पाळण्यात घालून पाळणा सुवासिनींनी म्हटला. सर्वांस नंदाघरचे पेढे वाटण्यात आले. गोवर्धनाचे आख्यानात गोवर्धनाची प्रतिकृती तयार करून पूजन केले.

दि. २५.९.१९८२ ला 'श्रीकृष्ण विवाह' आख्यानात भटजी बोलावून श्रीकृष्णाचा विवाह थाटात साजरा झाला. कन्हा घेऊन करवल्या बसल्या होत्या. मंगलाष्टक म्हटले. सर्वांना अक्षदा वाटल्या. वाजंत्री होती. फटाके वाजविले. आनंदी आनंद सोहळा पार पडला. सर्वांना अत्तर, गुलाबपाणी उडविण्यात आले. खऱ्याखुऱ्या विवाह सोहळ्याचा आनंद भक्तगणांनी उपभोगला.

दि. २६.९.१९८२ सप्ताह समाप्ती झाली. सप्ताह चालू असताना रोज पोथीची आरती आणि सर्व भक्त श्रोत्यांना व उपस्थित लोकांना प्रसाद वाटप होई. भाविकांनी आणलेली केळी इतर फळांची खिरापत, बर्फी, पेढे, बत्तासे, चुरमुरे असा प्रसाद मिळे. आज 'श्रीं'ची पूजा व सत्कार झाला. सौ. आईसाहेबांची यथायोग्य संभावना झाली. दि. २७ ला 'श्रीविष्णुसहस्रनाम' होऊन पारायणाची सांगता झाली. दुपारच्या प्रसाद भोजनाचा ६०० भाविकांनी लाभ घेतला. रात्री मुंबईकरांचा भारुडाचा कार्यक्रम झाला. पाद्यपूजा, गुरुपूजन झाले. दि. ३० रोजी श्री गजानन मंदिरात कार्यक्रमाच्या सर्व कार्यकर्त्यांबरोबर श्रमपरिहाराचे भोजन 'श्रीं'नी घेतले. त्यानंतर श्री. सीतारामपंत कुलकर्णी यांनी स्वत:च्या गाडीने 'श्रीं'ना जालन्यास नेले.

७३) जालन्याचा कार्यक्रम प्रारंभ

४ ऑक्टोबर १९८२ पासून जालन्यास कार्यक्रमांची सुरुवात. 'श्रीं'चे अभ्यंग स्नान वाजंत्रीच्या गजरात झाले. सकाळी पुण्याहवाचन नांदी श्राद्ध होऊन श्री गुरुचरित्र पारायण, सप्तशती पाठ, रुद्राभिषेक, आवर्तन इ. पारायणांचा शुभारंभ झाला. आगामी उत्सवाचे संकल्प 'श्रीं'नी स्वत: सांगितले. महाप्रसादानंतर ठीक ४.३० वाजता 'श्रीं'च्या गुरुचरित्रावरील प्रवचनास प्रारंभ झाला. अत्यंत भव्य अशा मंडपात आकर्षक व्यासपीठ, नेत्रदीपक विजेची रोषणाई, व्यासपीठावर दर दिवशी ताज्या फुलांच्या माळा सोडून केलेले सुशोभिकरण मन प्रसन्न करीत होते. पहाटेपासून मध्यरात्री २ वाजेपर्यंत सर्व कार्यवाही-स्वयंसेवक, सेवेत कार्यरत असतात. रोजच्या प्रसाद भोजनास दोन्ही वेळा चारशे पान होते. पंगत बसल्यावर स्वत: पू.सौ. ताई प्रेमाने सर्वांस नि:संकोचपणे पोटभर जेवण्याचा आग्रह करीत असत. पू.सौ. ताई महाराज, प.पू. श्रीमहाराजांना साक्षात् दत्तप्रभूच मानतात. 'श्रीं'चे सेवेत यत्किंचीतही कमी पडू नये म्हणून तर त्या दक्ष असत. 'श्रीं'चा जाण्या-येण्याचा मार्ग स्वहस्ते शेणाने सारवून कुठेही खडा 'श्रीं'चे चरणास लागू नये याची काळजी घेत.

दि. १० ऑक्टोबर १९८२ रोजी सकाळी पारायण समाप्ती होऊन, महारुद्र सहस्रावर्तन, जप इ. कार्यक्रम झाले. रात्री १ वाजेपर्यंत पंगतीवर पंगती उठत होत्या. सुमारे चाळीस हजार पान झाले. दि. ११ ला सकाळी काही मंत्रदीक्षा झाल्या. रात्री १० वाजता 'श्रीं'ची प्रचंड मिरवणूक निघाली. पुढे चौघडावादन आणि भक्तांची दिंडी! पताका, टाळ, मृदुगांचे नादात भजने गात भक्त चालत होते. स्त्रियांच्या आनंद उत्साहास पूर्ण भरते आले होते. नाच, फुगड्या, खेळ-खेळत होत्या. तर पुरुष मंडळी लेझीम, दांडपट्टा असे खेळ खेळत होते. 'श्रीं'ची प्रकृती बरी नव्हती. विश्रांतीची अत्यंत आवश्यकता होती. पण भक्तजनांना नाराज होऊ द्यायचे नाही.

सुशोभित मोटार गाडीमधून 'श्रीं'ची व पू.सौ. ताई महाराजांची मिरवणूक पुढे पुढे जात असताना ठिकठिकाणी वरचे मजल्यावरून पुष्पवृष्टी होत होती. दारोदारी मंगल आरत्या, जयजयकाराच्या घोषणा फटाक्यांचा कडकडाट, आतषबाजी, शिंगतुताऱ्यांची ललकारी अशा थाटात मुंगीच्या पावलांनी मिरवणूक पुढे पुढे सरकत होती. रात्री १ च्या सुमारास मिरवणूक गणपती गल्लीत येऊन काजळकर मंदिराजवळ विसर्जीत पावली. पहाटेपर्यंत भजन, भारुडे हे कार्यक्रम भक्तगणांचे चालूच होते. 'श्रीं'चा कितीही मुक्काम झाला तरी सौ. ताईंना तो कमीच वाटायचा. रोज मंगलवाद्यात अभ्यंग स्नान, आरती, पूजन, १० वाजता फराळ दुग्धप्राशन असे चालूच. मिरवणुकीत सतत तीन तास बसल्याने 'श्रीं'चे शरीर अवघडून गेले. चेहऱ्यावर थकवा स्पष्ट जाणवू लागला. नीट उभे राहता येईना, चालवेना, आधार देऊनच कारमधून उतरले. पुन्हा सर्वांची दर्शनासाठी झुंबड! अखेर 'श्रीं'च्या भोवती स्वयंसेवकांचे कडे करून त्यांना सरळ त्यांच्या शयनगृहात नेण्यात आले. सर्वांना दर्शन बंद केले. कारण गत्यंतरच नव्हते. दि. १२.१०.१९८२ ला 'श्रीं'ची प्रकृती थकव्याने फारच बिघडली. परंतु तशाही परिस्थितीत भक्तकाजास्तव 'श्रीं'ना पाद्यपूजेला भक्तांच्या आग्रहास्तव जावेच लागेल, श्री. देवळालकर, श्री. जगनशेट सराफ, श्री. भीमराव देशपांडे यांच्याकडे 'श्रीं'ची पाद्यपूजा झाली. १३ ऑक्टोबरला श्री. बरांजकर यांच्या गाडीने 'श्रीं'नी जालन्याच्या भक्तमंडळींचा साश्रूनयनाने निरोप घेऊन पुण्यास प्रयाण केले. अत्यंत उष्म्यामुळे ३ ठिकाणी गाडी थांबवावी लागली. रात्री आठ वाजता 'श्री रेणुका निवास' येथे स्वगृही आगमन झाले.

दि. २७ ऑक्टोबरला आम्ही मुंबईकरांनी पुणेकरांबरोबर दसऱ्याचे सोने लुटण्यास 'श्रीं'ना संपूर्ण दिवस श्रम दिले. दरवर्षी 'श्रीं'च्या ठीक-ठिकाणच्या तीर्थक्षेत्रांच्या वाऱ्या प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज - श्रीगुरुमहाराजांप्रमाणेच चालू असतात. त्यात कधीही खंड नसतो. दसऱ्यानंतर प.पू. महाराज गुरुद्वादशी निमित्त श्री नृसिंहवाडीस जाऊन आले. पुण्यास आल्यानंतर लागलीच दोन दिवसांनी त्यांनी मला पत्र लिहीले. ते पुढे देत आहे.

श्री सद्गुरु महाराजांबद्दल आपली धारणा जशी 'त्वमेव माता च पिता त्वमेव...' तसेच श्री दत्तमहाराज सुद्धा आपले मोठेपण विसरून (अर्थात मोठेपणाचा त्यांना कायमच विसर असतो.) आपल्या सख्या सोबत्यापुढे आपले मन मोकळे करावे तसे करतात. त्यांचे क्लेश, त्यांचे त्रास, त्यांची दु:खे कथन करतात. ते निरागस बालमनासारखे मन, आपल्याशी संवाद साधते. 'मी गुरुमहाराज आहे, शिष्यांजवळ सर्वच कथन केले तर तो आपल्याला गुरु-महान मानेल का?' वगैरे काही नाही. शुद्ध, सात्विक, पवित्र भाव, देवटाक्याच्या पाण्यासारखे स्वच्छ मन! ह्या त्यांच्या पत्रात हेही शिकायला मिळते की प्रारब्ध भोग कोणास सुटत नाही. श्री महाराज ऐहिक पातळीवर कथन करीत असले तरी 'सुख-दु:खे समेकृत्वा' अशी

स्थितप्रज्ञता ज्यांचे ठायी आहे त्यांना त्यांचे काय? पण साधकांना काही बोध ह्यातून आहेच. व्यावहारिक ऐहिक पातळीवर पाहिल्यास श्री महाराज यांच्यावर प्रापंचिक दु:खाचे आघात, कोर्ट कचेऱ्या, मानापमान, ट्रस्ट मधील त्रास, सर्व साधारण माणूस वेडाच झाला असता. कमालीचा शारीरिक व मानसिक ताण! हे त्यांचे खालील पत्र वाचून डोळ्यास अश्रूधारा लागतात.

७४) 'श्रीं'चे पत्र ग्रहदशा व संकटे

।। श्री दत्त ।।

पुणे, ४ श्रीवासुदेव निवास.
दि. १८.११.१९८२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम. आम्ही परवा मंगळवारी सकाळी वाडीची यात्रा करून आलो. प्रवासामुळे थोडा खोकला, कसर आहे. औषध चालू आहे. हरिहरेश्वरचा कार्यक्रम निश्चित ठरला असल्यास आपल्या इच्छेप्रमाणे आम्ही २१ तारखेस येथून तिकडे येऊ. फक्त श्री गजानन आश्रम स्वामीजी, श्री रघुनाथराव व आम्ही असे तिघे, तिकडे येऊन तेथील कार्यक्रम आपल्या इच्छेप्रमाणे आटोपून इकडे परत येऊ. देऊळगावी जाण्याचे निश्चित नाही. घरी मंडळींच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्याचे १-२ दिवसांत ठरेल. मोतीबिंदू फार पक्व झाल्याने यापुढे जास्ती वेळ लागणे हितावह होणार नाही, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. या पूर्वीच करावे असे त्यांचे मत होते.

तूर्त आम्ही ग्रहदशा, दैव यामुळे, या जागेच्या संकटात सापडलो आहोत. श्री बाबाराव भिडे वकीलांचे सहाय्य ईशगुरुकृपेने लाभलेले आहे. प्रतिपक्षाने आमच्यावर फौजदारी केली आहे. असत्याचा आणि कृतघ्नतेचा कळस होत चालला आहे. अशावेळी आपणासारख्या सात्विक सज्जनांच्या आत्मीयतेचा आम्हाला आधार आहे. ईशेच्छेनुसार जे घडेल ते खरे. ''आलिया भोगासी असावे सादर! देवावरी भार घालुनिया'' या संतांच्या वचनाप्रमाणे आम्ही स्वस्थ राहण्याचा प्रयत्न करीत आहोत. सात दिवस श्रीगुरुंच्या चरित्राचे चिंतन होऊन शांती मिळेल. सर्वांस मंगल आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

७५) श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह (हरिहरेश्वर)

दि. २१.११.१९८२ ते ३०.११.१९८२

दि. २०.११.१९८२ रोजी मी व पुतण्या संजय यास गाडी चालवण्याकरता घेऊन श्री रेणुका निवासात सायंकाळी पोहोचलो. माझी फियाट होती तर दुसरी गाडी श्री. नंदकुमार शृंगारपुरे घेऊन आले होते. त्यांची मोठी प्रशस्त ॲम्बॅसॅडर होती. दुसऱ्या दिवशी पहाटे किती वाजता निघायचे हे ठरविण्यास थोडे थांबलो. आम्हांस वाटत होते, पहाटे चार वाजता निघालो तर थंड शांत वेळी इतर गाड्यांची रहदारी चालू होण्यापूर्वी मार्गस्थ होऊ. ठरल्याप्रमाणे हरेश्वरी सर्व गुरुबंधूनाही ९.३० ते १० चे दरम्यान 'श्रीं'चे आगमन अपेक्षित होते. 'श्रीं'ना आमचा विचार पटला. परंतु चि. श्री. अनिल यांना हे काही पटेना? सकाळी चहा-कॉफी काही घेऊन निघायला नको का? चितळे डेअरीचे दूध ६.३० नंतर मिळणार, शिवाय बायका-मुले निघणार म्हणजे पहाटे त्यांचे सर्व उरकायला नको का? असे अनिल यांचे म्हणणे! तर आम्हास वाटत होते. आताच दूध आणून ठेवू. पहाटे फक्त प्रातर्विधी आटोपून निघू. स्नानादी हरेश्वरी करू! परंतु हा विचार त्यांना मान्य होईना! श्री महाराज म्हणाले, ''अहो! ते प्रवासाचे बाबतीत अनुभवी आहेत. गाडी तापू नये, रहदारी वाढू नये!'' शेवटी अनिल यांचे म्हणण्यानुसार सकाळी ७ वाजता निघायचे ठरविले.

मी, संजय व नंदू पहाटे ६.३० ला श्री वासुदेव निवासातून प.प.श्री गजानन आश्रम स्वामी महाराज, श्री रघुनाथराव व त्यांच्या मंडळी, वासंतीवहिनी यांना घेऊन आलो. श्रीमहाराज व सौ. आईसाहेब तयारच होते. श्री. नंदकुमार यांच्या मोठ्या गाडीत श्री महाराज सौ. आईसाहेब व श्री. रघुनाथराव मागील सीटवर तर पुढे मी व बाजूस आपल्या दंडाचे टोक खिडकी बाहेर काढून स्वामी महाराज बसले. दुसऱ्या गाडीत सौ. वासंतीवहिनी, जालन्याच्या मंदावहिनी कवीश्वर, सवितावहिनी व आमोद. रेणुका व आश्विन ही तीन लहान मुले बसली. चहापान करून आम्ही ७ वाजता निघालो. श्री महाराज म्हणाले, ''नागले तुमच्या ठरलेल्या कार्यक्रमाचा योग फार चांगला आहे. श्रीनृसिंहस्वामी महाराजांचे स्वरुपात गुरुचरित्र देवता दंडी संन्यासी स्वामी महाराज पण सोबत आहेत!'' वाटेत पाली येथे श्री बल्लाळेश्वरांचे (अष्टविनायकांपैकी) दर्शनास थोडे थांबलो. पारायणास प्रारंभ दि. २२ रोजी होणार त्या दिवशी अभिषेक व्हावा म्हणून श्रीचरणी दक्षिणेची पावती फाडली.

'वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।
निर्विघ्नं करु मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।'

पुढील प्रवासास लागलो. १० वाजून गेले होते. लवकर पोहोचले पाहिजे. दोघांनीही नागोठणे येथून, गोवा रोडचा चांगला रस्ता लागताच वेग वाढविला. त्यावेळी मोबाईल फोन

नव्हते. साधा फोनही हरेश्वर गावात नव्हता. थोडे अंतर गेले. रानवली गाव आले. रस्त्यावरील काळ्या रंगांतील स्पीड ब्रेकर रम्बलर स्ट्रीप दिसल्या नाहीत. आमची मोठी गाडी पुढे होती. वेगात असल्यामुळे खर्र् आवाज करीत स्ट्रीप वरून जात असताना ॲम्बेसॅडर गाडीचा ॲक्सल तुटला. श्री गुरुकृपेने पुढील अनर्थ टळला. आता गाडी रस्त्याच्या कडेला उभी राहिली. उजव्या बाजूला समोरच बसचा थांबा, वर स्लॅबच्या आच्छादनाचा व बसण्यास लांबलचक बाकडे असलेला असा होता. त्यावर शाल अंथरून 'श्रीं'ना बसविले. बायकामंडळी मुले बसली. सर्वांस जागा होण्यासारखी नव्हती. थांब्याच्या मागेच टेकाडावर एकघर होते. तेथील गृहस्थ पुढे आले व म्हणाले, ''बायका मुले म्हातारी माणसे आपले सोबत आहेत, तर कृपया आपण सर्वांनी माझ्या ओटीवर येऊन बसावे. त्याने आम्हा सर्वांस रस्त्यापासून ९-१० फूट उंचावर असलेल्या समोर प्रशस्त अंगण, ओटीही मोठी, कौलारू घरी नेले. सर्वांस बसण्यास भिंतीला लागून घोंगड्या अंथरल्या. ते गृहस्थ म्हणाले, 'मेकॅनिक येथून ५ कि.मी. वर इंदापूर व त्याचेही पुढे ५ कि.मी. वर माणगाव आहे. तेथे मिळेल.' आमचा नेहमीचा हरेश्वरी जाण्याचा रस्ता असल्याने चि. संजयला सुरेश मेकॅनिक. त्याचे गॅरेज व घरही माहीत होते. दुसरी गाडी फियाट घेऊन तो मेकॅनिक व ॲक्सल आणण्यास गेला. आता कमीत कमी दोन तास तरी जाणार! ते जे गृहस्थ होते त्यांचे नाव पालकर, ते बस कण्डक्टर होते. ते म्हणाले, ''मी तुम्हाला आता ११ च्या सुमारास मुंबई हरेश्वर गाडी जाईल तिला बसवून दिले असते. पण त्या हरेश्वरला काय कार्यक्रम आहे माहीत नाही. कालच दोन्ही गाड्या गच्च भरून गेल्या.'' मी त्या कण्डक्टर पालकर यांना जरा बाजूला नेले व म्हटले ''अहो! हरिहरेश्वरला जो मोठा कार्यक्रम होणार आहे त्याच उत्सवाची ही उत्सवमूर्ती श्री दत्तमहाराज कवीश्वर! हे पुण्याचे महान संत, आताच्या कालातील दुसरे श्री एकनाथ महाराजच समजा, आपल्या ओटीवर बसले आहेत.''

इतक्यात श्री महाराजांनी हाक मारून येथे जवळ कुठे विहीर आहे कां ते विचारले. त्यांना व स्वामी महाराजांना, रघुनाथरावांनाही स्नान करायचे होते. समोरच्या रस्त्याच्या पलीकडील शेतात विहीर होती. ते शेत, ती विहीर श्री पालकरांची होती. विहीरीतून पाणी काढण्यास हाताने फिरवायचा रहाटही होता. श्री महाराजांना व स्वामी महाराजांना घेऊन श्री रघुनाथराव 'श्रीं'चा पंचा, धोतर, लोटा घेऊन निघाले. पालकरांनी रस्ता ओलांडून विहीरीकडे शेतातून जाणारी पाऊलवाटही दाखविली. लागलीच पालकर आले. त्यांनी हॉलमध्ये पाणी सिंचन करून केर काढला. सतरंजी, घोंगडी बैठक लोड ठेवले. टेबल फॅन ठेवला. त्यांच्या बागेतून १०-१२ शहाळी (कोवळे नारळ) ही व्यवस्था ठेवली. 'श्रीं' स्नानाहून परतल्यावर हे कुटुंब मुलांसह दर्शन करणार, हे जाणून मी आधीच स्टीलचे वाडग्यात खडीसाखर काढून बैठकी

जवळ ठेवली. तसेच झाले. 'श्रीं' येताच पालकरांनी आतील हॉलमध्ये बैठकीवर बसण्याची विनंती केली. श्री महाराज बैठकीवर बसले. स्नान संध्या आन्हिक विहीरीनजिक करूनच आले होते. स्वामी महाराजांना पाट मांडला. मी नुकतीच झालेली ओळख 'श्रीं'ना कथन केली. 'हे श्री. पालकर बस कंडक्टर म्हणून याच विभागात काम करतात.' उभयतांनी अगदी मनोभावे नमस्कार केला. मुलाने व मुलीने नमस्कार केला. श्री महाराजांनी समोर बसण्यास सांगितले. कुटुंब, घर, जमीन-जुमला वगैरे चौकशी विचारपूस केली.

काय ह्या पालकरांचं भाग्य! आमच्या गाडीचा ॲक्सल काय तुटतो आणि प.पू. महाराजांची सेवा करण्याचं भाग्य ह्या पालकरांना लाभतं. कशामुळे काय होईल सांगता येत नाही. अशाच एका प्रसंगी प.पू. महाराजांनी म्हटलं होत, ''अहो गतजन्माच्या ऋणानुबंधाने प्रत्येक व्यक्तीशी संबंध येत असतो. प्रत्येक व्यक्तीवर आपले प्रेम असू द्यावे.''

इकडे संजय व नंदूने मेकॅनिक आणून १२ पर्यंत काम पूर्ण करून घेतले. आमच्या पुढील प्रवासास सुरुवात झाली. येथून आम्हाला ८० ते ८५ कि.मी. चा पल्ला गाठायचा होता.

तिकडे १० वाजता आगमन झाले नाही म्हणून श्री. प्रभुदेसाई यांनी 'श्रीं'चे दर्शन लवकर घडावे म्हणून 'दिगंबरा'ची धून चालू केली होती. पाच किलोमीटरवर हरेश्वर येताच चि. संजयने आपली गाडी हरेश्वर येथील भक्त मंडळीस 'श्रीं'चे आगमनाचा संदेश देण्यास पुढे काढली.

ठीक दोन वाजता श्री महाराज, स्वामी महाराजांची गाडी हरेश्वर गृहाच्या फाटकात शिरून मंडपाजवळ उभी राहिली. स्वागताची पूर्ण तयारी होतीच. प्रवेश द्वारातच 'श्रीं'चे चरणी दूध व पाणी घालून, यजमानांनी पुष्पहार अर्पण करून नंतर सुवासिनींनी औक्षण ओवाळणी करून 'श्रीं' बैठकीवर स्थानापन्न झाले. फटाके-अनार लावून चौघडा वादनात सोहळा पार पडला. सर्वास 'श्रीं'चे बरोबर केशर बदाम मिश्रीत दूध देण्यात आले. आम्ही 'श्रीं'चे आज्ञेप्रमाणे आधी घरी न येता मंदिरात जाऊन श्री कालभैरव योगेश्वरी, श्री गणेश हरिहरेश्वर दर्शन करून मग घरी आलो. तासाभरात भोजनाचा कार्यक्रम आटोपून 'श्रीं'ची विश्रामाची व्यवस्था केली.

औदुंबराखाली तुळशीच्या पारावर प.प. स्वामी महाराजांनीही विश्रांती घेतली. सायंकाळी ७ वाजता त्रिपदी पंचपदी होऊन तासभर धूनचा कार्यक्रम झाला. 'श्रीं'ना खोलीतच विश्रांतीस ठेवले होते आणि तेही झोप काढून, मुखमार्जन करून, चहा घेऊन पलंगावर लोडास टेकून शांत बसले होते. संपूर्ण वास्तू मंगलमय वातावणांनी, धूप, उदबत्तीच्या मंद सुवासाने भरून गेली होती. मंडपात मोठे दीप असले तरी घरात मंद प्रकाशाचे दिवे ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे आसमंतातील झाडातून पक्षी कुजन करू लागले. पूर्व दिशा उजळली, गुलालाची उधळण होत होती. मंद मंद थंडवारा वहात होता.

घरातील देवघरासमोर पेटीच्या सुरांतून गुरुभगिनीचे शब्द उमटू लागले.

रात्र सरली, दिशा उजळल्या।
पक्षी करिती, कुजनाऽऽ।।
हो ऽ हो ऽ पक्षी करीती कुजना।
हो ऽ हो ऽ उठा उठा वामना ।।धृ.।।
शक्तिपात तव पडता दहिंवर।
भक्त पुष्प हे फुलले सुंदर।।
कोटी कोटी वंदना ऽ हो ऽ।
उठा उठा वामना।।१।।
कृष्णा संगमी शुद्ध होऊनी।
कमल बिल्वदल शमी घेऊनी।।
भक्त आले पूजना ऽ हो ऽ हो ऽ।
उठा उठा वामना।।२।।
बद्ध जीव तव, द्वारी तिष्ठत।
कृपामृताचा थेंब अपेक्षित।।
उठ अत्रिनंदना, होऽहोऽ।
उठा उठा वामना।।३।।
नीलकमल सम, नयन उघडूनी।
कृपाकटाक्षे, आम्हा पाहुनी।।
धन्य करी जीवनाऽऽ होऽहोऽ।
उठा उठा वामना।।४।।
दिगंबरा दिगंबरा,
श्रीपाद वल्लभ दिगंबरा।
भक्त करिती गर्जनाऽहोऽ होऽ
उठा उठा वामना।।५।।

----**---

काकडे आरती दत्ता तुजला ओवाळू
दत्ता तुजला ओवाळू
प्रेमभावे तुझे चरण हृदयी कवळूं....

---***---

ह्या दोन आरत्या झाल्यानंतर मंडळी चहापानाकडे वळत. प्रातर्विधी मुखमार्जन होऊन बरोबर ६ वाजता सर्व भक्त गुरुबंधू, ओठाणात श्री महाराजांची बैठक मांडलेली असे, त्या बैठकीकडे (पश्चिमेस) तोंड करून बैठकीला बसत! बहुधा 'श्रीं'ना काकड आरतीनंतर जाग येऊन तेही असत, 'श्रीं'चे सान्निध्य आहे ही नुसती कल्पनाच आम्हां गुरुबंधुंना ध्यान धारणा होण्यास पुरेशी होती. बाहेर पक्षांचे कुजन सुरू, मंद शीतल वारा, उदबत्तीचा सुगंध आणि 'श्रीं'समोर असून त्यांच्या समोर आम्ही ध्यानावस्थेत जात आहोत, ब्रह्मानंदाचा आनंद लुटत आहोत. वाटायचं हे असंच सतत चालू रहावं. आनंदाचे डोही तरंगत रहावं! कसलं भान नाही, नाही. बाह्य जगताचं, नाही प्रपंच भवसागराचं, मी आणि माझ्या समोर बसलेला परमात्मा परेशू! अहाहा! धन्य ते मंतरलेले क्षण! अखिल विश्वाचा तारणकर्ता ब्रह्मांडनायक, राजाधिराज, भक्तवत्सल, भक्ताभिमानी माझ्या समोर आणि मी त्यांच्या जवळ! तास संपू नये. सात वाजूच नयेत. पण तेवढ्यात वेळापत्रक सांभाळणारे कोणी गुरुबंधू त्या निरव शांततेत टाळ वाजवून एकच ठोका देऊन आवरते घेण्याची सूचना देई. नंतर स्नानादी विधी आटोपून दुग्धपान करून सर्व संध्या आन्हिकादी कार्यक्रम पूर्ण करीत. 'श्रीं' औदुंबरा समोरील मागील पडवीत आराम खुर्चीत शांतपणे बसलेले असत. औदुंबराच्या छायेत, तुळशीच्या पाराभोवती अंगणात गुरुबंधू व भगिनींनी आपली आसने अंथरून पाटावर आपापल्या पोथ्या ठेवून जागा नेमस्त केलेली असे. 'श्रीं'च्या चरणी दंडवत घालून, 'श्रीं'ची परवानगी घेऊन, जो तो 'श्रीगुरुचरित्र' पाठ करीत.

मीही श्री महाराजांची, आदल्या दिवशी सप्ताहास बसण्याची परवानगी आहे कां हे श्री रघुनाथरावांचे पत्र दाखवून विचारले. श्री महाराजांनी प्रतिप्रश्न विचारला.

"तुमचा व्रतबंध झाला आहे का?"

मी म्हटले, "हो! आठव्या वर्षीच झाला आहे."

'श्रीं' म्हणाले, "मग काय? तुम्हाला वेदाध्ययनाचा, वेद पठणाचा सुद्धा अधिकार आहे! बसा बरं! श्रीगुरुचरित्र पारायणास प्रारंभ करा!"

श्री. रघुनाथराव मला बाजूस घेऊन म्हणाले, "आता प्रत्यक्ष महाराजांनीच परवानगी दिली. आता तुम्हाला अधिकार प्राप्त झालेला आहे. आमच्याही शुभेच्छा!"

मी त्यांनाही नमस्कार केला. तुळशीच्या पारावर रोज प.प. गजानन आश्रम कंबल आसनावर श्रवणास बसत. श्री. प्रभुदेसाई पोथीचे वाचन मोठ्याने म्हणून करीत केवळ स्वामींना ऐकू जावे म्हणून. आम्ही सर्व १०-१२ गुरुबंधू प.प. स्वामींनाही वंदन करून प्रभुदेसाईंच्या बरोबरच ग्रंथ पठण मनात करीत असू. त्यामुळे सर्वांचेच वाचन एकाच वेळी ११ ते ११.३० चे दरम्यान संपत असे. इकडे समोरील मंडपात सर्वांची भोजनपात्रे मांडलेली

असत. तीन तास सकाळी ८ ते ११ आमचे वाचन चालू असताना श्रीमहाराज त्यांचे स्नान संध्या आन्हिक आटोपून रघुनाथरावांचे बरोबर नारळी सुपारीचे बागेतून समुद्रापर्यंत रपेट मारुन येत. 'श्रीं'ना समुद्र दर्शनाची नित्य ओढ असे. कधी ते रस्त्यानेही हरिहरेश्वर क्षेत्राच्या वेगवेगळ्या दिशेस जाऊन येत. १२ ते १ वाजेपर्यंत भोजन - तांबूल सेवन झाले की, 'श्रीं'ची दोन तास विश्रांती होई. सर्व भक्तमंडळीही विसावा घेत. तीन वाजण्यापूर्वी स्वयंसेवक संदीप, शैलेश, दिनेश पुढील मंडपात व्यासपीठ, स्वामींची बैठक व सर्व श्रोते मंडळींना जाजमे सतरंजा बसण्यास अंथरुन ठेवीत. पहिल्याच दिवशी 'श्रीं' व्यासपीठावर आले पण न बसता सर्वत्र पाहू लागले. मी धावत जवळ गेलो. तेव्हा माझ्या कानात म्हणाले, ''स्वामी महाराजांचे आसन आमच्या आसनापेक्षा उंच करता येईल का?''

मला लागलीच आमचे मोठे २।। बाय २।। फूटाचे स्टूल आठवले. पाच मिनिटात ते श्री महाराजांच्या स्टेजच्या शेजारी स्वतंत्र मांडण्यात आले आणि श्रीमहाराजांचे प्रथम दिवशी पूर्ण झालेल्या श्रीगुरुचरित्राच्या अध्यायांवर निरुपण सुरू झाले. समोर २-२ टेपरेकॉर्डर्स्, लाऊडस्पीकर वगैरे व्यवस्था होतीच.

अशा प्रकारे दररोज सात दिवस कार्यक्रम ह्याच पद्धतीने अत्यंत शिस्तबद्ध, सुव्यवस्थित, सुरळीत चालू होता. श्री महाराजांचे प्रवचन ५.३० ते ६ पर्यंत संपायचे. नंतर बरेच गुरुबंधू प.प. स्वामी महाराजांसोबत समुद्र स्नानास जायचे. सर्वांचे आणि श्री महाराजांचे सायं-संध्यादी आटोपले की, सायंकाळी ७-८ पर्यंत पंचपदी, दिगंबरा धून व्हायची. रात्री ८।। ते ९।। पर्यंत भोजन, उपासवाल्यांना उपवासाचा फराळ हे सर्व आटोपल्यावर पुढील मंडपात श्री महाराजांपर्यंत आवाज पोहोचू शकणार नाही अशा आवाजात 'दिगंबरा' धून, भजने, भारुड, गीते, भक्तीगीते असे सर्व गुरुभक्तांचे कार्यक्रम होत. १० ते १०.३० पर्यंत सर्व झोपी जात.

ह्या वेळी भोजनाच्या मेनूमध्ये सौ. लता व भगिनी सौ. प्रभा यांनी जास्तीत जास्त आमच्या येथील कोकणी पदार्थ ठेवले होते. आचारी कोकणातील असले तरी काही खास पक्वान्ने कशी करायची, याची कृती त्या आचाऱ्यांना समजावून देत असतच. शिवाय सोवळ्या कक्षेच्या बाहेर उभे राहून स्वयंपाक प्रत्यक्ष शिजवताना, फोडणी देताना त्या त्या वेळी त्या सूचना देत. शक्यतो श्रीमहाराजांचा आहार हलका फुलका असे. परंतु दुपारच्या जेवणात अधून मधून जड अन्न होई. जसे वालाच्या बिरड्याची आमटी, वांगी बटाटा भाजी, कोबी बटाटा भजी, मसाले भात, साबुदाणा वडा, झुणका भाकर, उकडीचे मोदक, जिलेबी, कळीचे लाडू, करंजी कानवले वगैरे.

श्री महाराजांना मटकीची उसळ विशेष आवडते असे श्री अशोकरावांकडून कळले होते. तीही २२ तारखेला झाली.

बेसनाचे लाडवांचे बाबतीत सौ. प्रभास श्री महाराज म्हणाले, ''तुमच्या कडील बेसन लाडवांतील बेसन कसा तुपावर भरपूर भाजलेला असतो.'' श्री महाराज स्वत:च पाककलेत निष्णात होते. पुरण पोळ्याही त्यांना चांगल्या करता येत असत.

असे हे श्रीगुरुचरित्र सप्ताहाच्या कार्यक्रमाचे २१ ता. ते २९ तारखेपर्यंतचे मंतरलेले दिवस कसे संपले ते कळलेच नाही.

गेल्यावर्षी म्हणजे १९८१ च्या एप्रिलमध्ये श्री महाराज आमच्या आग्रहास्तव राहिले. परंतु आलेल्या प्रत्येक गुरुबंधूंकडे रजा आहे कां? कधी निघणार आहात अशी चौकशी करीत. काहींना तर 'उद्या तुम्हाला निघायला हरकत नाही, असे म्हणत.'' हे माझ्या लक्षात आले की, खर्चाचा भार नागलेंच्यावर पडू नये असे त्यांना वाटत असावे. म्हणून यावेळी श्रीमहाराजांना सर्व गुरुबंधू आपल्या पारायणाच्या दिवसांचा सर्व कार्यक्रमांचाच सहयोग देणार आहेत. प्रत्येकजण आपआपल्या खर्चाने येणार व जाणार आहे. आपणास आमच्या बद्दल तशी चिंता नसावी. पुण्याहून निघाल्यानंतर गप्पा गोष्टी करता करता श्री महाराजांनी विचारले ही तुमची गाडी १ लिटर पेट्रोलमध्ये किती किलोमीटर जाते. मी म्हटले, ''मुंबईतील वाहनांचे गर्दीत १० कि.मी. तर अशा लांबच्या प्रवासात १२-१३ कि.मी. तरी सरासरी देते.'' काही विषयांतर, इतर गोष्टी झाल्यानंतर पुन्हा मुंबई ते हरेश्वर किती कि.मी. असेल? पुण्याहून हरेश्वर जवळ पडते का? पुणे हरेश्वर साधारण किती अंतर पडते? असे विचारले. मी त्याबाबतीत अनभिज्ञच होतो. म्हटलं जवळ जवळ २०० कि.मी. होत असेल. घरी पोहाचल्यानंतर पेट्रोलचा भावही किती तो विचारून घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी सगळे गणित करून आम्हाला हाक मारून जवळ बोलावून काही रक्कम माझ्या हाती देत म्हणाले, **''हा घ्या आमचा सहयोग, जास्त नाही फक्त उताऱ्याचे भाड्यापुरता! आम्ही साधकच आहोत! तेव्हा असू द्या. आमची आज्ञा समजा!''** असे म्हटल्यानंतर ती रक्कम आम्हास स्वीकारणे भाग पडले. केवढे हे अमानित्व! सर्व शक्तीसंपन्न असूनही हनुमंताप्रमाणे स्वसामर्थ्य विस्मृती.

दि. २८.११.१९८२ ला श्रीगुरुचरित्र पारायणाची समाप्ती झाली. पारणे-महाप्रसाद रात्रीचे ठेवले होते. ब्राह्मण भोजन व्हावे अशी 'श्रीं'ची इच्छा दिसली. परंतु आजपर्यंतच्या अनुभवानुसार हरेश्वरचे ब्राह्मण क्षत्रियांकडे अन्न ग्रहण करीत नाहीत. अगदी ब्राह्मण आचारी असले तरी! श्री हरिहरेश्वर येथील मुख्य दैवत श्री कालभैरव होय! मुख्य दैवत असून त्या दैवतांची जयंती साजरी होत नव्हती. म्हणून आमचे आजोबा कै. यशवंत बळवंत नागले यांनी १८९७ सालापासून श्री कालभैरव जयंती उत्सव कार्तिक वद्य अष्टमीला सुरू केला. त्यावेळी त्यांचे सद्गुरु पुणे-इंदापूरचे श्री नारायण महाराज यांचे मार्गदर्शनाखाली सतत ३ वर्षे हा उत्सव झाला व ते स्वत: प्रवचन-कीर्तन करून कार्तिक वद्य ८ रात्री १२ वाजता जन्मोत्सवाचे आख्यान

लावून जन्मोत्सव करीत. पुढे या उत्सवास कीर्तनकार बुवा येऊ लागले. हा उत्सव अव्याहत १९५० पर्यंत आमच्या घराण्यात चालू होता. आमचे वडील मुंबईहून ब्राह्मण आचारी आणून सर्व स्वयंपाक सोवळ्यात करून घेत असत. पण तरी सुद्धा एकही ब्राह्मण किंवा त्याचा लहान मुलगा सुद्धा आमच्या घरी जेवणास आला नाही. श्री नारायण महाराज आमच्याकडेच मुक्कामास असायचे. ब्राह्मण आचारी आणि त्यांची सर्व पाळवणूक पथ्ये सांभाळली जायची. त्यामुळे आता श्री महाराजांना हे कसे सांगावे. ही मंडळी येणार नाहीत. माझ्या सद्गुरुंचा अपमान व्हायला नको. श्री. प्रभुदेसाईंना ही अडचण सांगितली. त्यांनी मला ''ही प्रचलीत परंपरा श्री महाराजांच्या कानावर घाला व मीही तुमचे बरोबर येतो खोलीत.'' म्हटले. आम्ही दोघे 'श्रीं'पुढे उभे राहिलो. मी जयंती उत्सव आणि इतर समारंभात येथील ब्राह्मण कोणता आचारधर्म पाळतात ते सांगितले. श्री महाराज म्हणाले, ''तुम्ही दोघेही ब्रह्मवृंदांकडे जा. यजमान म्हणून नागल्यांनी आग्रहपूर्वक आमंत्रण द्यावे. तुम्ही त्यांना आम्ही आणि आमचे सोबतचे सर्व भाविक ब्राह्मणच आहोत सांगा. संपूर्ण स्वयंपाक सोवळ्यात, ब्राह्मण आचाऱ्यांकडूनच होत आहे हे सांगा. हेही सांगा की श्रीगुरुचरित्र सप्ताहाचे पारणे-महाप्रसाद आहे. आपण नाही म्हणू नका. इतके करून शेवटी प्रभुदेसाई तुम्ही त्यांना आमचा निरोप सांगा की आपण आल्याखेरीज आम्ही अन्नग्रहण करणार नाही. येतील ते. या तुम्ही आमंत्रण देऊन.''

आम्ही दोघे सकाळी ११ वाजता देवळाकडे गेलो. ह्या वेळात सर्व ब्रह्मवृंद एकत्र हरेश्वर मंदिरात भेटतात. आम्ही जाऊन प्रथम प्रमुख वयोवृद्ध ब्राह्मण श्री हरीभाऊ बोडस यांना, आम्ही सर्वांस रात्रीच्या प्रसाद भोजनाचे आमंत्रण देण्यास आल्याचे सांगितले. मग सर्वांपुढे जसे श्री महाराजांनी प्रार्थनापूर्वक बोलायला सांगितले होते तसे हात जोडून विनम्रतेने विनंती करून सांगितले. श्री. प्रभुदेसाई सर्वांसमोर बोलले. एका महासंत पुरुषांचे तुम्हांस अगत्याचे आमंत्रण आहे. श्री महाराजांची महानता थोडक्यात सांगून आपण आल्याखेरीज ते अन्नग्रहण करणार नाहीत हेही सांगितले. श्री महाराजांची मात्रा लागू पडली व सर्वांनी एक मुखाने आम्ही रात्री ८ पूर्वीच येत असल्याचे सांगितले. माझ्या आयुष्यांतील हा विस्मयकारक व अत्यंत आनंददायी क्षण होता. रात्रीचा भोजन समारंभ पुढील मंडपात यथाशास्त्र यथाविधी पार पडला. पक्वान्नात उकडीचे मोदक केले होते. सर्व ब्राह्मणांना फल तांबूल दक्षिणा देऊन संभावना केली. श्री महाराजांबरोबर सर्व ब्रह्मवृंदांची चर्चा सामोपचाराने आणि श्री महाराजांना अगदी सन्मानित करून झाली, जेणेकरून मला हायसे वाटले.

दुसऱ्या दिवशी नामस्मरण, 'दिगंबरा धूनचा' कार्यक्रम, भजन भक्तीगीते झाली. कार्यक्रमाची सांगता आणि निरोपाचा कार्यक्रम सायंकाळी ४ नंतर झाला. बहुतेक सर्व गुरुबंधू भगिनी रात्रीचे

बसने निघणार होते. सर्वांचा सहयोग आमच्या हंडीत जमा झाला होता. तो सर्व सहयोग त्यात आमचाही सहयोग घालून थैली तयार केली. श्री महाराजांनी मला दि. १४.१.१९८२ उजाडता पहाटे ४ वाजता स्वप्नी दृष्टांत देऊन दिलेला मंत्र! मंत्राचे विस्मरण - 'श्रीं'ना १४.१.१९८२ च्या रात्री कथन - 'श्रीं' पत्राने मंत्र पाठवितात. दि. २२.१.१९८२ चे पत्र पोहोचते. त्यांत धनार्जनातील विघ्ने दूर व्हावी, शुद्ध बुद्धी व्हावी, आरोग्य प्राप्त व्हावे या करीता दिलेला गुरुमंत्र! त्या महामंगल मंत्रजपाने माझी सर्व विघ्ने दूर झाली होती. आर्थिक कमतरता बिलकूल नव्हती. म्हणून मनांत आले की, गुरुबंधूंशी आपण वचनबद्ध आहोत. तेव्हा सहयोग स्वीकारायलाच पाहिजे. परंतु तो स्वीकारलेला सहयोग - त्याचा विनियोग कसा करायचा हे आपल्या मर्जीवरच आहे. मग ही सर्व रक्कम आपण गुरुचरणाशी का ठेवू नये? मनी संकल्प झाला. भाषणास उभा राहिलो. सर्व गुरुबंधूंच्या सदिच्छा! त्यांचे सहकार्य! अफाट गुरुकृपा! ह्या सर्व गोष्टींचा उल्लेख करून केवळ ह्या सर्व सहाय्यानेच हा कार्यक्रम उत्तम पार पडलेला आहे. गुरुमहाराजांनी आमच्या 'धर्मेप्रीतीम्' मध्ये सतत वाढ करावी. आम्हास सर्वकाल सन्मती द्यावी. देवभक्ती वाढीस लागावी, त्यांचा सत्संग सतत आम्हास मिळत रहावा, या साधन मार्गात अडथळे नकोत म्हणून भुक्ती-संसारात समृद्धी निरामय जीवन देऊन मुक्ती शेवटी द्यावी. सद्गुरु सेवेत चरणाशी उत्तमभाव प्रकट करावा! असे भाषण करून पुढे म्हटले.

श्री महाराजांनी कृपाहस्त ठेवून धनार्जनातील विघ्ने पूर्णपणे संपविली आहेत. धनार्जनात काही कमी नाही. तेव्हा हा सर्वांनी मज हाती दिलेला सहयोग या गुरुचरित्र पारायण समाप्तीचे वेळी श्री सद्गुरु चरणी अर्पण करीत आहे, असे म्हणून मी 'श्रीं'च्या पुढे थैली ठेवून साष्टांग दंडवत घातले. लागलीच 'श्रीं'नी आम्हास बोलावून "हं! हा घ्या पारण्याचा प्रसाद!" असे म्हणून ती थैली आम्हास परत केली व पुढे भाषण केले ते असे -

"तुम्हा भक्त मंडळींचे चाललेले कार्य प्रशंसनीय आहे. कधी गुरुचरित्र सप्ताह तर कधी २१/२१ तास दिगंबराची धून, नामस्मरण! चालू आहे.चांगलं आहे! पण कोणतेही कार्यक्रम आखायचे, पार पाडायचे म्हणजे धनाची आवश्यकता आहेच.

एकमेका सहाय्य करुं। अवघे धरू सुपंथ।।

हे तुम्हां गुरुबंधूंचे एक कुटुंबच आहे म्हणा ना! ज्या गुरुबंधूंकडे धार्मिक कार्यक्रम होईल तो यजमान म्हणजे त्या त्यावेळी तो कुटुंब प्रमुख समजा! सहकुटुंबांत धनार्जन करणारी मुले जसा आपला पगार, वेतन, मिळकत कुटुंब प्रमुखाचे हाती देतात व तो सर्व कुटुंबाचा खर्च चालवितो तसेच हेही आहे.

आज या धार्मिक कार्यक्रमाचे यजमान श्री. नागले आहेत. तेव्हा त्यांनी आम्हा सर्वांचा सहयोग स्वीकारलाच पाहिजे!" (सर्व गुरुबंधूंनी टाळ्या वाजविल्या.)

कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व मंडळी आपआपले स्थळी निघून गेली. राहिले फक्त आमचे व श्री. शृंगारपुरे यांचे कुटुंब आणि श्री महाराज, स्वामी महाराज आणि पुण्याची मंडळी. श्री महाराज स्वत:हून म्हणाले, म्हणजे आम्ही मनापासून आग्रह करणारच होतो. पण ते स्वत:हून म्हणाले, ''आम्ही मंडळी उद्या त्रिपुरी येथेच साजरी करणार आहोत!'' आम्हां सर्वांच्या आनंदाला परिसीमा राहिली नाही. त्या रात्री श्री महाराज व प.प. गजानन आश्रमस्वामी महाराज यांना औदुंबराखालील तुळशी वृंदावनाच्या पारावर वृंदावनाच्या दोन्ही बाजूस दोघांचे आसन मांडून त्यावर बसण्याची विनंती केली. श्री महाराजांचे हे वैशिष्ट्य आहे की ते ज्या भक्ताकडे असतात. त्या भक्ताला यजमान समजून त्याचे अगदी आधीन होतात. तो सांगेल त्याप्रमाणे वागून करून त्याला सहवासाचे पूर्ण समाधान मिळवून देतात आणि शेवटी विचारतात.

''काय मग? तुमच्या मनाप्रमाणे सर्व झाले ना?'' श्री महाराज व स्वामी महाराज स्थानापन्न होताच त्यांच्यासमोर ॐ चे आकृतीत १०८ निरांजने श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे यांचे सहाय्याने लावून आम्ही सर्व घरातील मंडळींनी निरांजने मालवेपर्यंत दिगंबराची धून केली. सर्वांना आनंदाने उत्साह आला होता.

रात्री श्री महाराज पलंगावर बसले होते. मी लीनतेने खाली मान घालून पलंगाशेजारी उभा होतो. माझे बरेचसे कौतुक, पाठ थोपटून झाल्यावर तो ठराविक प्रश्न झालाच. ''काय! मग मनासारखे झाले ना सर्व?'' मी होय म्हटले, 'आपले सान्निध्य असताना मनाप्रमाणे सर्व घडणारच!'

दुसऱ्या दिवशी दि. १.१२.१९८२ ला पहाटे ५ वाजता श्री महाराज, प.प. स्वामी महाराज, श्री. रघुनाथराव व त्यांच्या पत्नी सौ. वासंतीवहिनी असे आम्ही आमचे गाडीने पुण्यास निघालो. गाडी चालक चि. संजय होता. पहाटे ६ च्या सुमारास श्रीवर्धन म्हसळा मार्गातील घाटात असताच चि. संजयने मला स्मरण करून दिले की आज आता पहाटे ६ ला हरेश्वरी आपल्या मातोश्री, चुलत सासूबाई कर्णिक, विनय व श्रीकांत प्रधान दिवेआगार यांना दीक्षेची वेळ दिली आहे. मला पहायचे होते की जेव्हा एखादे भक्ताला पहाटे ६ ची वेळ देऊन श्री महाराज शक्तीपात योग दीक्षा देतात तेव्हा ते स्वत: काय करीत असतात? मी पुढील सीटवर स्वामी महाराज आणि संजय यांच्यामध्ये बसलो होतो. प.प. स्वामींचा दंड, ते स्वत:, त्यांना व संजयला आपल्या मागे वळून बघण्याने त्रास होऊ नये याची काळजी घेऊन डोळ्यात पंचप्राण आणून मी 'श्रीं'चे अवलोकन करीत होतो. 'श्रीं' मागील तिघांचे पंक्तीतही खाली सोडलेले पाय वर घेऊन सहजासनात बसले होते. आम्ही बैठकीला बसतो तसे दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंतवून त्यांचे ध्यान लागले होते. त्यांचे ओठ मंत्र म्हणत आहेत कां हे तेवढे अंधारात

दिसले नाही. पण नसावेत. शेवटी ही संकल्पित दीक्षाच आहे. संकल्प नुसता मनानेही करता येतो. तसं पाहिलं तर श्री सद्गुरु साधकाला जेव्हा तिथी, वार, वेळ देतात, तेव्हाच संकल्प पूर्ण झालेला असतो आणि हा संकल्प परमात्मा ईश्वर (पण तो तरी कोण? स्वतः गुरुदेवच नाही कां?) पूर्ण करतो. म्हसळा मागे गेले. साई मोरब्याचा घाट लागला. खाली सायलेन्सर फाटून आणि आमची फियाट गाडी फडफड फट् फडफड आवाज करीत धावू लागली. आता हा आवाज बंद करणे माणगांव शिवाय शक्य नव्हते. अर्ध्या तासात ठीक ७.३० वाजता आम्ही आमच्या ओळखीचे सुरेश मेकॅनिक यांचे घरी त्यांच्या पत्नीने सतरंजी घोंगडी अंथरुन दिली. श्री. सुरेश मेकॅनिक घरी नव्हते. पण गॅरेजची काम करणारी माणसे कुठे आहेत ते तिला माहीत होते. तिने मेकॅनिक देऊन संजय गाडी घेऊन फाटलेला सायलेन्सरचा भाग व मफलर वेल्डींग करण्याकरीता घेऊन गेला. मेकॅनिकची बायको विचारत होती, काही खायला करू का? चहा करू का? तिला बिचारीला संत सत्पुरुष आणि संन्याशी महाराजांची पथ्ये काय ठाऊक? श्री रघुनाथराव म्हणाले, ''तुम्ही असे करा, फक्त स्टोव्ह, चहापावडर, साखर माझ्याकडे द्या. पाणी नको, दूध नागले घेऊन येतील, तसेच पोहे कुठे मिळतील ते दाखवा त्यांना. गावठी पोहे मिळतील कां कोणाकडे?'' तिने हो म्हटले. त्या वहिनींनी बाहेर येऊन तेथूनच सर्व कुठे मिळेल ते सांगितले. मी एक किलो पोहे, ताजे व गावठी, तसेच १ लि. दूध घेऊन आलो. श्री. रघुनाथरावांनी स्टोव्हवर तवा चढविला. पोहे भाजून फुलविले. हविष्यान्न तयार केले व श्री महाराज तथा स्वामी महाराज यांना दिले. गाडीची दुरुस्ती अर्ध्या-एक तासात झाली. न्याहारीचा, चहाचा कार्यक्रम ही पार पडला. सौ. (सुरेश) वहिनींनी पदर पसरून श्री महाराजांना व स्वामी महाराजांना नमस्कार केला. 'श्रीं'नी त्यांना प्रसाद दिला. माणगांवहून आम्ही निघालो आणि सरळ पालीच्या श्री बल्लाळेश्वराचे दर्शनास आलो. दर्शन घेऊन मार्गस्थ झालो. सौ. आईसाहेब, सौ. सवितावहिनी, सौ. मंदावहिनी आणि मुले, श्री. नंदू शृंगारपुरे यांच्या गाडीने मुंबईस किंग्ज सर्कलला सौ. सुलभाताईंकडे गेले.

खोपोलीस पोहोचण्यास ११.३० झाले. घाटात खूप रहदारी होती. लोणावळा येईपर्यंत गाडीचे इंजिन खूप तापले. घाटात वाटेत थांबणे शक्य नव्हते. लोणावळ्यात सखल भागात आल्यानंतर रेडीएटर मध्ये पाणी घालण्यास पाणी कोठे मिळेल हे मी संजय इकडे तिकडे पहात होतो. श्री महाराजांचे हे लक्षात आले. त्यांनी विचारले, ''काय गाडीमध्ये पाणी घालायचे आहे का?'' मी होय म्हटले, पुढे महाराज म्हणाले, ''असेच जरा पुढे चला. आपल्याला पेट्रोलपंप नाक्यावर लागेल. त्याच्या समोर रस्त्याच्या कडेला झाडाचे खाली पाण्याची दोन पिंपे भरून ठेवलेली असतात. इंजिनामध्ये पाणी घालण्याकरिताच ते पाणी ठेवलेले असते. पुण्यास जाताना श्री. भगवानरावही तेथेच पाणी घालतात.''

श्री महाराजांचे किती बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष अवधान असते. तसं पाहिलं तर हे योगीराज प्रवासात वाहनात सुद्धा आत्मानंदी लागली टाळी, असेच ध्यानावस्थेत असतात. कुठेही प्रवासाचे दृश्ये पाहात बसत नाहीत.

आम्ही तेथे अर्धा तास थांबलो. श्री महाराज म्हणाले, ''सावकाश चला, आता घरीच जायचे आहे.''

लोणावळा पुणे मार्गावर गाडीत असता, दि. ४.१.१९८३ ला गुजरात मेलचे रात्री ९.१५ ची बर्थसह तिकीटाचे आरक्षण करण्याचे 'श्रीं'नी आम्हास सांगितले. यावेळी श्री रघुनाथरावांनी आम्हास स्पष्ट सांगितले. ''दोनच तिकीटे श्री महाराजांचे व (त्यांचे) स्वत:चे आरक्षित करा. त्या जगन्नाथ पुजाऱ्यांचे करू नका. त्यांची प्रकृती ठीक नसते.'' श्री महाराज स्वस्थ होते. आम्ही जाणून होतो की, श्री महाराजांना हे रघुनाथरावांचे म्हणणे रुचले नसेल.

''पूर्वऋणानुबंधाने माणसे जवळ येतात. प्रेम असू द्यावे.''

मीही श्री रघुनाथरावांचे वक्तव्यावर काही बोललो नाही. मनी विचार केला. पुण्याहून परतताना, श्री महाराजांचा निरोप घेताना, किती तिकीटे रिझर्व्ह करायची ते त्यांनाच विचारून घेऊ. परंतु घरी पोहोचताच श्री जगन्नाथ पुजारींबद्दल दु:खद बातमी कानी पडली.

पुणे, श्री रेणुका निवासासमोर आमची गाडी २.३० ला उभी राहिली. आत लागलीच प.प. स्वामी महाराजांकरिता बैठक ठेवण्यात आली. हातपाय धुवून श्री महाराज आसनस्थ झाले. सौ. अनिता वहिनींनी चहा दुधाचे कप भरले. ते होताच श्री. अशोकरावांनी खूण करून मला बाहेर बोलाविले व ''आज सकाळीच श्री जगन्नाथ पुजारी यांचे निधन झाले. आता दादांचे (श्री महाराजांचे) कानी कसे घालावे? तुम्ही घालता का?'' मी म्हटले, ''आल्या आल्या नको. चहा दुग्धपान होऊ द्या.'' मग मी हळूच प.प. स्वामी महाराजांचे कानी ही दु:खद वार्ता घालतो व 'श्रीं'चे कानी घालण्यास त्यांनाच सांगतो. त्याप्रमाणे सर्व घडले. श्री महाराज व प.प. स्वामी महाराज पुजाऱ्यांचे घरी जाण्यास निघाले. संजयने गाडी समोर आणून मी दार उघडून दिले. संजयला पुजाऱ्यांचे घर व घरचा रस्ता माहीत नव्हता. श्री महाराज म्हणाले, ''आम्हाला कसे जायचे ते माहीत आहे. आम्ही रस्ता दाखवू, चलावे.'' दोन तासांनी संजय दोघांनाही घेऊन आला. श्री महाराज बाहेरचे बाहेरच स्नानास बाहेरचे मोरीवर गेले. श्री. अशोकरावांनी पाणी घातले. संजय व मी सायंकाळी श्री महाराजांचा निरोप घेऊन निघालो व आता परस्पर हरेश्वरी निघतो, असे श्री महाराजांना म्हटले. आम्हाला लागलीच हरिहरेश्वरहून मुलांना घेऊन मुंबईस निघायचे होते. मुलांची शाळा खूप दिवस बुडाली. सुट्टी तर केव्हाच संपली होती. श्री महाराज सांगत होते, ''आज रात्री तुम्ही श्री वासुदेव निवासात विश्रांती घ्या. जायची घाई असेल तर पहाटे ४ वाजता निघा.''

परंतु आम्ही आमचेच घोडे दामटवीत होतो. ''नाही महाराज आम्ही थोडी विश्रांती घेऊन आश्रमात भोजन घेऊन निघतो.''

'श्रीं'चे लक्षात आले की यांना निघण्याची घाईच दिसते. शेवटी नाईलाजाने 'श्रीं' म्हणाले, ''मग असं करा! आश्रमात जाऊन लागलीच जेवायला बसा. जेवण झाले की साधनाकक्ष हॉलमध्ये १५-२० मिनिटे जाजमावर आडवे होऊन विश्रांती घ्या आणि नंतर मग निघा.

आम्ही श्री महाराजांना होय म्हटले आणि आश्रमात गेलो. कृष्णा आर्वीकरने म्हटले, ''महाराज आज रात्री मुक्काम आश्रमात करून पहाटे ४ वाजता निघा म्हणत होते. पण आम्हास घाई आहे. गुरुआज्ञा म्हणून १५-२० मिनीटे जेवणानंतर झोपतो व लगेच निघतो.'' असे म्हणून लागलीच आम्ही पानावर बसलो. जेवण झाले. वर हॉलमध्ये गेलो. उशास काही घेऊन वामकुशीला पडलो आणि कसले काय? अत्यंत गाढ निद्रा लागली. पहाटे ४ नंतर श्रीकृष्णा आर्वीकर आले आणि आम्हास उठवू लागले. 'नागले उठा तुम्हाला ४ वाजता निघायचे होते ना? चार वाजून गेले. आम्ही लगबग उठलो. मुखमार्जन, प्रात:र्विधी पूर्ण केले. श्री. नारायण दातेंनी चहा केला तो प्यायलो. पहाटे ५ ला आम्ही गाडीने निघालो ते हरेश्वरी ११ वाजेपर्यंत पोहोचलो.

---**---

हरेश्वरच्या कार्यक्रमापूर्वी प.पू.सौ. ताई महाराजांना या कार्यक्रमास त्यांचे येणे व्हावे म्हणून आमंत्रणाचे पत्र लिहिले होते. त्या येऊ शकल्या नाहीत. पत्राद्वारे त्यांनी कार्यक्रमास शुभाशीर्वाद पाठविले ते पत्र -

जालना, दि. २१.११.१९८२

श्री सद्गुरु कृपावंत श्री नागले साहेब यांना सौ. ताई महाराजांचा कृपा आशीर्वाद व आपल्या कार्यक्रमास शुभेच्छा!

आपला होत असलेला कार्यक्रम समक्ष हजर राहून पाहण्याची अत्यंत उत्कट इच्छा होती. परंतु इकडील व्यवधानामुळे ते अशक्य आहे. तरी सुद्धा माझे तर्फे सौ. मंदावहिनी तेथे उपस्थित आहेतच. त्यामुळे मनास समाधान आहे. आपणावर श्री दत्तमहाराजांचा पूर्ण कृपा प्रसाद आहेच. त्यामुळे आपल्या मुळच्या सद्गुणाबरोबर आपणास आध्यात्मिक बळही प्राप्त झाले आहे. आपण पुण्यकर्मरत आहात. आपणास सर्व शक्तीमान परमेश्वर योग्य ते फळ देण्यास समर्थ आहे.

घरी सर्वांस शुभाशीर्वाद प.पू. दत्तमहाराज व सौ. आईसाहेब यांना सादर सा. नमस्कार, सौ. मंदावहिनी व प्रेमी भक्त मंडळींना शुभाशीर्वाद.

सौ. ताई महाराज, जालना.

श्री महाराजांचे दि. १८.११.१९८२ रोजी लिहीलेले पत्र मला हरेश्वरचा कार्यक्रम संपून मी दि. ३.१२.१९८२ ला गोरेगावी स्वगृही आलो तेव्हा वाचनास मिळाले. वाचून मन सद्गदीत झाले. अत्यंत वाईट वाटले. साश्रूनयनांनी व्याकुळ मन:स्थितीत लागलीच श्री महाराजांना दि. ५.१२.१९८२ ला पत्र लिहीले. ते माझे लिखाण ते पत्र एका महापुरुषास, संत महात्म्यास लिहीलेले किती रास्त, किती योग्य ते मला कळले नाही. कळतही नाही. परंतु भावनावेगांत जे मनास वाटते ते लिहीले.

७६) हरिहरेश्वरच्या कार्यक्रमानंतर 'श्रीं'ना लिहीलेले पत्र

॥ श्री दत्त ॥

३९, अभिषेक,
जयप्रकाश नगर, रस्ता नं. २,
गोरेगाव, मुंबई ४०००६३.
दि. ५.१२.१९८२

परमपूज्य ब्रह्मर्षी दत्तमहाराज आपले पवित्र चरणी, दोन्हीकर जोडोन, त्रिकाल चरणी मस्तक ठेवून, शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष,

आम्ही आमचे काजास्तव। बहु कष्टविले श्री गुरुदेव।।
अंतरीचा जाणोनि भाव। क्षमा करावी श्री गुरुदेव।।

आपल्या परम कृपेतून हरिहरेश्वर येथील कार्यक्रमात मनसोक्त आनंद सर्वांस लुटण्यास मिळाला.

श्रीगुरुचरित्राचे पारायण साक्षात गुरुदेवांचे समोर, प.प. गजानन आश्रमस्वामी आराध्य देवताच. नृसिंहस्वामी महाराज श्रवणास, तुलसी वृंदावनी, औदुंबराचे छायेत, सागरतीरी, ब्रह्मदेव-हरि-हर आणि आदिमाता जगदंबा पार्वतीमाता यांचे क्षेत्र हरेश्वर येथे, कार्तिकी एकादशी, त्रिपुरी पौर्णिमा या तिथी समाविष्ट. अशा या अभूतपूर्व कार्यक्रमाचे संस्कार मनी ठसले. ह्या सोहळ्याचे वर्णन. 'श्रीं'नी निरुपणातून पाजलेल्या अमृताची माधुरी वर्णन करण्यास वाणी असमर्थ आहे.

प.पू.सौ. ताईमहाराज यांनी पत्राद्वारे या कार्यक्रमास शुभेच्छा आणि शुभ आशीर्वाद पाठविले होते. ते त्यांचे पत्र आश्रमात आम्हास मिळाले.

आपल्या आज्ञेप्रमाणे आम्ही वासुदेव निवासात संपूर्ण रात्र विश्रांती घेऊन पहाटे ३.४० ला निघून हरेश्वरी वेळेवर पोहोचलो. आपणास घेऊन जाताना आणि परत आणतानाच त्या

गाड्यांना काय झाले होते ते न कळे. तथापि श्री कृपेने सर्व काही ठीक आहे.

गोरेगावी पोहोचल्यानंतर आपले दि. १८.११.१९८२ चे पत्र वाचण्यास मिळाले. प्रवासामुळे आपणास खोकला, ताप होता हे ध्यानी आले. याहीपेक्षा आपण ग्रहदशा, दैव यामुळे जागेच्या संकटांत सापडला आहात हे वाचून आश्चर्याबरोबर बोधही झाला. श्री रामप्रभू अवतार घेऊन वनवास भोगते झाले. श्रीकृष्णांचे सतत सानिध्य असून पांडवांची ग्रहदशा सुटली नाही. अगदी धर्माचरण, सन्मती, देवभक्ती, सत्संग असून देखील.

कलीयुगात तर संत सत्पुरुषांना समाजाकडून जास्तीत जास्त त्रास झाला आहे. निवृत्ती-ज्ञानदेव भावंडांनी दगडाचे मार खाल्ले. समाजाकडून उपेक्षा घेतली. जनाबाईंच्यावर चोरीचा आळ, तुकाराम महाराजांचे पाठीवर लाठीचे वळ, हे सर्व जसे होत आले तसेच हे कृतघ्नतेचे खोटेपणाचे आरोप आजही होत आहेत.

''कारुण्यसिंधु म्हणतात तुला परेशा।
मग या विचित्र करणी कां करितोस ऐशा।।''

असे कोण्या कवीने उद्‌गारले आहे. आपणास अशा वेळी सात्विक सज्जनांच्या आत्मीयतेचा आधार आहे, असे आपण लिहीले आहे. आम्ही परिपूर्ण सात्विकता, सज्जनता, आत्मीयता संपादण्याकरिता आपल्या पवित्र चरणी सदा लीन आहोत. आपला हा प्रतिपक्षाकडून होणारा त्रास, दूर व्हावा. शारीरिक, मानसिक स्वास्थ्य आपणास प्राप्त व्हावे याकरिता आम्हास सर्वांनी मिळोन सामुदायिकरित्या अथवा आम्हा स्वत:स आध्यात्मिक अथवा ऐहिक पातळीवर काय करण्यासारखे आहे, ते कृपया सूचित करावे. आम्ही आपल्या आज्ञेची वाट पहात आहोत.

ती.अ.सौ. आईसाहेबांस शस्त्रक्रियेनंतर भेटण्यास येणार आहोत.

आपले आरक्षण सोमवार अथवा मंगळवार पर्यंत करीत आहोत. (आपण सांगितल्याप्रमाणे दि. ४.१.१९८३ ला गुजरात मेल, रात्री ९.१५ चे शयनशय्येसह)

आपल्या शारीरिक, मानसिक स्वास्थ्याबद्दलचे पत्र अपेक्षितो, ती.अ.सौ. आईसाहेबांचे चरणी शि.सा.न., थोरास नमस्कार, लहानास आशीर्वाद.

कळावे, आपला आज्ञाधारक

सदैव चरणी लीन
शशीकांत नागले.

७७) प.प. गजानन आश्रमस्वामी महाराजांचे आलेले पत्र

ॐ श्रीगुरुवे नमः।

श्री गजानन आश्रम स्वामी
श्री वासुदेव निवास,
कर्वेपथ, एरंडवन ४२/१७, पुणे.
दि. ८.१.१९८३

अनेक स्वकुशल, नारायण स्मरण!

शशीकांतराव! हरिहरेश्वरला येण्यापूर्वी येण्याविषयी खळखळ केली होती. परंतु प्रत्यक्षात १०/११ दिवसांचे वास्तव्य अल्पकाळाचे वाटले. दररोजचे सागर (महातीर्थ) स्नान, श्रीगुरुचरित्र पारायण, ब्र.श्रीदत्तमहाराजांचे विवरण, श्री हरिहरेश्वर दर्शन, पौर्णिमेचे क्षौर आणि दुर्मिळ समुद्रस्नाने असा अलभ्य लाभ आतापर्यंतच्या जीवनात प्रथमच घडवून आणलात, याचे सर्व श्रेय आपणाकडेच येते. श्री. प्रभुदेसाईंच्या मार्गदर्शनाला आपण सर्वांनी दिलेली साथ खरोखरच कौतुकास्पद आहे. आपणा सर्वांची परमार्थांतील वाटचाल दिवसेंदिवस वृद्धींगत होवो हीच श्री हरिहरेश्वर चरणी प्रार्थना आहे. सर्वांनी मिळून अपार श्रद्धायुक्त भक्तीने आमच्या केलेल्या सेवेबद्दल सर्वच धन्यवादास पात्र आहात. ती ईश्वर चरणी रुजू आहे. कमंडलूसाठी दिलेल्या नारळाने आपला केलेला हिरमोड पुढे केव्हा तरी भरून काढावा. तसेच दण्डासाठी दाखवून ठेवलेला बांबू कापला जाऊ नये असे हरेश्वरी जाल त्यावेळी आपल्या व्यवस्थापकास सांगून ठेवावे. बुडामध्ये हाताच्या अंगठ्याएवढा ६/६।। फूट उंच झाल्यावर काढा किंवा आम्ही समक्षच येऊन घेऊ. परवा पुन्हा वाडीसही श्री. प्रभुदेसाई आणि कंपनीने तीन दिवसाच्या श्रीगुरुचरित्र पारायणाचा लाभ घडविला. इजा, बिजा, तिजा घडणारच या नियमाला बाधा येणार नाही. असो. हेच पत्री आपल्या मातोश्रींसह सर्वच कुटुंबियांना सप्रेम सकुशल नारायण प्रविष्ट! ३ फेब्रुवारीस आपणही येणार असे गृहीत धरतो. नारायण स्मरण.

- श्री गजानन आश्रम स्वामी

७८) सेवा स्वीकारण्यास 'श्रीं'ची प्रार्थना

दि. १९.१२.१९८२ रोजी सकाळी १०.३० वाजता मी, श्री. गोडसे, श्री. शृंगारपुरे दांपत्य व चि. संजय (ड्रायव्हिंग करिता) असे पुण्यास श्री दर्शनास निघालो. ह्या 'श्री' भेटीचा आम्हा तिघांचा मूळ उद्देश होता की, यापुढे कोणत्याही दौऱ्यास होणारा प्रवास खर्च आम्हा तिघांकडून 'श्रीं'नी घ्यावा म्हणून 'श्री' चरणाशी प्रार्थना विनंती करणे. प्रवासात जाताना

आम्ही 'श्रीं'चे समोर होणाऱ्या संभाषणाची जुळवा जुळवी करीत होतो. गेल्या बरोबर 'श्री' विचारतील ''काय! आज कसे काय येणे झाले? रजा होती कां? सर्व क्षेम आहे ना!'' ठराविक प्रश्नोत्तरे झाल्यानंतर आपण आपल्या मूळ उद्देशाला संभाषणाला कसा हात घालायचा? कशी सुरुवात कोणी करायची? काय म्हणायचे? वगैरे वगैरे... वास्तविक आम्ही येत असल्याचे 'श्रीं'ना काहीच कळविले नव्हते. १.४५ च्या सुमारास आम्ही गाडीने श्री रेणुका निवासात पोहोचलो. 'श्रीं'नी आमच्याकडे वर मान करून पाहिले आणि म्हटले, ''आलात का? या बसा.'' जणू आम्ही येणार हे त्यांना आधी माहीतच होते. नंतरचे आमचे कल्पित प्रश्न, कसे येणे झाले, वगैरे काही विचारलेच नाही. समोर बसल्यावर इकडची तिकडची बोलणी झाली. 'श्री' महाराजांचे दुसरीकडे लक्ष असनाताच मी दोघांना खुणावले 'दक्षिणा देऊ या!' आम्ही तिघांनीही ठरविलेली रक्कम पूर्ण भक्तीभावाने 'श्रीं'चे चरणी अर्पण केली. विशेष म्हणजे काहीही न बोलता अगदी प्रसन्न चित्ताने गालात मिश्किलपणे हसत त्यांनी ती स्वीकारली. माझ्याकडे पाहून मात्र म्हणाले, ''अहो! तुम्ही परवाच तर दक्षिणा दिलीत मग आता परत कशाला?'' संकोचाने म्हणाले, पण त्यात नकार नव्हता. नाराजी नव्हती. दक्षिणेचा स्वीकार करताना हसत म्हणाले, ''फार मोठी दक्षिणा आहे!'' आम्ही नम्रभावाने नतमस्तक उभे होतो. मोठी रक्कम स्वीकारतील की नाही? का पुन्हा आपले म्हणतील तेच... ''दक्षिणा दक्षिणेच्या रुपात द्यावी.'' वगैरे... पण त्यांच्या सात्विक वात्सल्यपूर्ण प्रसन्नतेने आमची इच्छा पूर्ण झाल्याने समाधान मिळाले. 'श्रीं'नी कौटुंबिक ख्याली खुशाली घेतली. आता आम्ही तिघेही 'श्रीं'चे पुढे बसले होतो.

मी म्हटले, ''आम्ही आपणापासून फार दूर राहतो, म्हणून व्हायला पाहिजे अशी आपली नित्यसेवा आमच्याकडून घडत नाही.''

श्री - आपल्या सारख्या भगवत् भक्तांचे प्रेम आमचेवर आहे यापेक्षा आणखी काय हवे?

गोडसे - मग आमच्याकडून प्रेमाने होणारी सेवाही आपणाकडून स्वीकारली जावी.

मी - महाराज! यापुढे मुंबईमार्गे जेव्हा जेव्हा आपणास बाहेरगावी जायचे असेल तेव्हा तेव्हा तिकीटांची रिझर्व्हेशनची तसेच इतरही काही व्यवस्था करण्याची जबाबदारी आम्हा वरती सोपवावी आणि त्याबद्दलचे पैसे आपल्याकडून येऊ नयेत.

श्री - (होकारार्थी हसले एवढेच)

मी विचारले - आपल्या कोर्ट केसचे काय झाले?

श्री - परमेश्वराला सर्व काळजी आहे. कलीचा महिमा मात्र फार आहे. कृतघ्नता, निष्ठुरता पराकोटीला गेली आहे. ठीक आहे. त्यामुळे आपला पापक्षय होतो. एवढ्याचसाठी संन्यासाश्रम सांगितला आहे. पण संन्यास घ्यायला ही पुण्य व देवाची कृपा लागते. असो.

संन्यासावरून श्री महाराजांनी नरसोबावाडीत ४० वर्षांपूर्वी शांताश्रम स्वामी होऊन गेले त्यांची गोष्ट सांगितली.

''अहो! ते, शांताश्रम स्वामी एखादे दिवशी भिक्षा उशीरा मिळणार असली तर श्री पादुकांजवळ जाऊन हात जोडून जसे समोर बसलेल्या व्यक्तीस सांगावे तसे सांगत, 'आज भिक्षा उशीरा मिळणार आहे. नैवेद्य आपणास उशीरा मिळेल, तेव्हा आपण थोडे थांबा.' पुढे 'श्री' महाराज म्हणाले, ''ते स्वामी लोकांना सांगत, तुम्हाला सप्ताह करायला जमत नाही तर महिन्याचे पारायण करा.'' हे 'श्री' महाराजांचे वाक्य ऐकताच हरेश्वरी 'श्री' महाराजांनी मला सांगितलेले शब्द आठवले. 'श्री' महाराज म्हणाले, ''यापुढे धंदा कामकाज यामुळे सात दिवस नेमस्त व्रतस्थ राहून पारायण करायला नाही मिळाले तरी स्नानानंतर श्री गुरुचरित्राचा एखादा अध्याय नित्य वाचनात ठेवावा. बघा जमेल तसे सवडीने करा.'' असे म्हणून 'श्रीं'नी बंधनातही ठेवले नाही. पुढे मी काही महिन्यानंतर सवडीने गुरुचरित्र अध्याय वाचन करीत राहिलो. याच भेटीत मी महाराजांपुढे आणखी एक प्रस्ताव टाकण्याचे धारिष्ट केले. म्हटले, ''महाराज आपणास जेव्हा जेव्हा ८-१० दिवसांचा अवधी मिळेल तेव्हा आमच्या बरोबर हरेश्वरी चलावे सोबत निवडक मंडळी श्री. गोडसे, शृंगारपुरे दाम्पत्य, आम्ही उभयता असे निव्वळ विश्रांती, हवा पालटाकरिता जाऊया असे आम्हास वाटते.

'श्री' यावर फक्त संमतीदर्शक हसले. नकारात्मक काही बोलले नाहीत. नंतर 'श्रीं'ना मी, संजय, गोडसे, शृंगारपुरे उभयता आश्रमात घेऊन गेलो. सायंकाळी ४ ते ६.३० पर्यंत आम्हीही आश्रमातच होतो. ६.३० वाजता आम्ही 'श्रीं'सह निघालो. 'श्रीं'ना घरी सोडले व निरोप घेऊन मुंबईस परतलो. सर्वांनी रात्रीचा मुक्काम श्री. शृंगारपुरे यांच्या घरी केला.

७९) तुझे पाडस मी, दर्शना भुकेले

अधीर लोचन आपुल्या दर्शनाते
अधीर हे हस्त पाद प्रक्षालनाते
अधीर हे श्रोत्र देववाणी श्रवणा
अधीर नासिका पदपुष्प अवघ्राणा
अधीर मस्तक चरण स्पर्शाते
अधीर रसना प्रसाद प्राशनाते
चरण धांवती पुण्यनगरी येथे
सगुण साकार निवास जेथे

म्हणो कोणी मजला आहे की खुळा
हदयी निवासींच्या दर्शना दुबळा
सगुण उपासनेला असे शास्त्राधार
निर्गुण राहिले आज तरी दूर
अद्वैताचे ज्ञान परोक्ष जाहले
अपरोक्षे म्याते नच अनुभविले
आत्मज्ञान परोक्षे मनी ज्ञानावले
अपरोक्षे नच मी कधी देखीयले
तूच पुढे ब्रह्म आज तरी माझ्या
दर्शना आसुसलो लागलो तुझ्या पाया
तूंचि माझा विष्णू हरि नारायण
चरणी तुझ्या बा घेऊं दे लोळण
तूंचि सदाशिव शंकर भोळा
सगुण साकार दिसो निज डोळा
श्री सद्गुरु दत्त माऊले
तुझे पाडस मी, दर्शना भुकेले



८०) श्री गणेश जयंतीस श्रींचे आगमन

'श्रीं'नी दिलेला मंत्रजप गतवर्षी गणेशजयंती पासून त्यांच्या आज्ञेने सुरू केला, त्याला या गणेश जयंतीला वर्ष पूर्ण होत आहे. हा गुप्त मंत्र जप धनार्जनांतील विघ्ने दूर करणारा, शुद्धबुद्धी देणारा, आरोग्यता देणारा आहे. वर्षभरांत त्याचे प्रत्यंतर आल्यावाचून राहिले नाही. हा मंत्र 'श्रीं'नी स्वप्नात दिला आणि नंतर बंद पाकिटांतून घरी पोस्टाने पाठविला. आधिभौतिकदृष्ट्या धनार्जनांतील विघ्ने तर दूर झालीच, आरोग्यही सुधारले, शुद्ध बुद्धी झाली की नाही ते आपले आपल्याला तरी कसे कळणार? पण विचारात सकारात्मकता मात्र जरूर दिसून येऊ लागली. आपले योगक्षेम सद्गुरु सांभाळत आहेत. मग आपल्याला ऐहिक पातळीवर व्यावहारिक चिंता काहीच राहत नाहीत. झाले ते उत्तम, होत आहे ते मंगल आणि होईल ते सुमंगल.

आज माझी मानसिक प्रसन्नता दिवस चालू झाल्यापासून संपेपर्यंत कायम राहिली. त्यात दोन दिवसांत म्हणजे १८.१.१९८३ ला दर्शन आणि सहवास घडणार, जो त्रिभुवनात

म्हणो कोणी मजला आहे की खुळा
हृदयी निवासींच्या दर्शना दुबळा
सगुण उपासनेला असे शास्त्राधार
निर्गुण राहिले आज तरी दूर
अद्वैताचे ज्ञान परोक्ष जाहले
अपरोक्षे म्याते नच अनुभविले
आत्मज्ञान परोक्षे मनी ज्ञानावले
अपरोक्षे नच मी कधी देखीयले
तूच पुढे ब्रह्म आज तरी माझ्या
दर्शना आसुसलो लागलो तुझ्या पाया
तूंचि माझा विष्णू हरि नारायण
चरणी तुझ्या बा घेऊं दे लोळण
तूंचि सदाशिव शंकर भोळा
सगुण साकार दिसो निज डोळा
श्री सद्गुरु दत्त माऊले
तुझे पाडस मी, दर्शना भुकेले



८०) श्री गणेश जयंतीस श्रींचे आगमन

'श्रीं'नी दिलेला मंत्रजप गतवर्षी गणेशजयंती पासून त्यांच्या आज्ञेने सुरू केला, त्याला या गणेश जयंतीला वर्ष पूर्ण होत आहे. हा गुप्त मंत्र जप धनार्जनांतील विघ्ने दूर करणारा, शुद्धबुद्धी देणारा, आरोग्यता देणारा आहे. वर्षभरांत त्याचे प्रत्यंतर आल्यावाचून राहिले नाही. हा मंत्र 'श्रीं'नी स्वप्नात दिला आणि नंतर बंद पाकिटांतून घरी पोस्टाने पाठविला. आधिभौतिकदृष्ट्या धनार्जनांतील विघ्ने तर दूर झालीच, आरोग्यही सुधारले, शुद्ध बुद्धी झाली की नाही ते आपले आपल्याला तरी कसे कळणार? पण विचारात सकारात्मकता मात्र जरूर दिसून येऊ लागली. आपले योगक्षेम सद्गुरु सांभाळत आहेत. मग आपल्याला ऐहिक पातळीवर व्यावहारिक चिंता काहीच राहत नाहीत. झाले ते उत्तम, होत आहे ते मंगल आणि होईल ते सुमंगल.

आज माझी मानसिक प्रसन्नता दिवस चालू झाल्यापासून संपेपर्यंत कायम राहिली. त्यात दोन दिवसांत म्हणजे १८.१.१९८३ ला दर्शन आणि सहवास घडणार, जो त्रिभुवनात

त्रैलोक्यात दुर्लभ आहे. संपूर्ण दिवस कामाचा यत्किंचितही ताण जाणवला नाही. मन आनंदी व प्रसन्न होते. मी व पुतण्या संजय रात्री ८ ते ८.३० च्या सुमारास घरी पोहोचलो. घरी पाऊल टाकताच सौ. लताने आश्चर्याचा, आनंदाचा महत्भाग्याचा धक्का दिला. अहो प.पू. महाराज दि. १८ ला आपल्या घरी सायंकाळी येत आहेत. ते आपल्या घरी राहणार आहेत. इतकेच नाही तर श्री गणेशजयंती विनायकीचे उपवासाचे पारणे दुसऱ्या दिवशी आपल्याकडेच करणार आहेत.

क्षणिक या अति आनंददायी वार्तेवर माझा विश्वासच बसेना. अहो, एवढे कुठले भाग्य या य:कश्चित् प्राण्याचे. मी सौभाग्यवतीस म्हटले कोणी तरी गुरुबंधूने तुझी चेष्टा-थट्टा केली असेल. 'श्री' आणि स्वत:हून आपले घरी येणार, राहणार, भोजन प्रसाद माऊली आपल्याला भरवणार. देवा! असे मंगल प्रसंग जीवनात येणार असतील तर पुन्हा पुन्हा मानव जन्म दे आणि तू सद्गुरु होऊन ये.

माझा विश्वासच बसेना! मी लागलीच अहमदाबाद येथे श्री वैद्यराज हर्डीकरांकडे फोन करून श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधला.

श्री. रघुनाथराव म्हणाले, होय! मीच फोन केला होता. प.पू. महाराज व सोबत आम्ही, दि. १७.१.१९८३ रोजी रात्री १० च्या गुजरात मेलने मुंबईला येण्यास निघत आहोत. आमची गाडी दि. १८ ला पहाटे ६ ते ६.३० वाजेपर्यंत बोरीवलीस पोहोचेल. तेथून आम्ही नीलाताई जोशींकडे जाऊ. त्यांची गाडी आम्हांस नेण्यास येणार आहेच. सायंकाळी आपण श्री. नागले यांच्याकडे ५.३० वाजता जाऊ. त्यांच्या घरीच मुक्काम करू, दुसऱ्या दिवशी उपवासाचे पारणे करू व दुपार नंतर पुण्यास प्रयाण करू असे स्वत: महाराजांनी आपणास कळविण्यास सांगितले आहे. दुसरे असे की, तुम्ही नीलाताईंना हे कळवा की, गणेश जयंतीचे दिवशी सायंकाळी ५.३० ला महाराज गोरेगांवी श्री. नागले यांच्याकडे मुक्कामास जातील!

आम्हा उभयतांच्या आनंदास सीमा राहिली नाही. रात्री बराच वेळ आमचे प्लॅनिंग चालू होते. दि. १७ ला पहाटे आम्ही उठलो. संपूर्ण ब्लॉक सिलींग भिंती, लॉफ्ट फ्लोरींगसह झाडून काढला. ब्लॉकची फरशी धुऊन काढली. देव असलेल्या बेडरुममध्ये कॉट प.पू. महाराजांकरिता ठेवली.

गादी, उशी,चादर, ब्लँकेट, बसण्याची बैठक सर्व तयारी केली. सर्व गुरुबंधूंना फोन करून प.पू. महाराजांचे आगमन गणेश जयंतीला सायंकाळी ५.३० वाजता होत आहे, हे कळविले. श्री. गोडसे आणि श्री. शृंगारपुरे यांनीही सर्वांस कळविण्याची कामगिरी करून श्रींचे आगमनास सर्वांनी उपस्थित राहण्याचे ठरविले. प्रसाद भोजनाचे दि. १९ चेही आमंत्रण सर्वांस दिले. श्री. माधवराव तांबोळींकडे सौ. सुमनताई आणि डॉ. भातलवंडेही आलेले होते. प.पू.

महाराजांचे दोन मोठे जावई, दोन्ही मुली, श्री. कृष्णा आर्वीकर हेही आले होते. ही मंडळी प्रसाद भोजनास येणार होती. दि. १८ ला गोमूत्रसिंचन करून सर्व शुद्धता केली. आचारी श्री. पाध्ये सोवळ्यात स्वयंपाक करणाऱ्या आचाऱ्यांसह येणार होते. गणेश जयंतीच्या उपवासाचे पारणे, मग सौ. लताबाईने उकडीचे मोदक, नाचणीचे सत्व-दूध काढून हलवा करण्याचे ठरविले होते.

दि. १८.१.१९८३ रोजी पहाटे मी, श्री. गोडसे व श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे बोरीवली स्टेशनवर पहाटे ६ वाजताच उपस्थित झालो. गाडी ६.३० ला येणार होती. आम्ही आतुरतेने 'श्रीं'च्या गाडीची वाट पहात होतो. 'श्रीं'चे दर्शन होणार म्हणून हृदयात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. जसजशी आगमनाची वेळ जवळ येत चालली तशी मुलाधारांत चलबिचल, हालचाल आणि स्पंदने जाणवू लागली. जगदंबा कुंडलिनी शक्ती राधा श्रीकृष्णाच्या दर्शनास बेभान होऊन नाचू लागली. मनास आवरते घ्यावे लागले. आपण सार्वजनिक क्षेत्रात रेल्वे स्टेशनवर आहोत. 'श्रीं'चे आगमन होताच त्यांचे सामान-सुमान गाडीतून काढण्याची धावपळ करायची आहे.

गाडी हळू हळू बोरीवली स्टेशनात शिरून प्लॅटफॉर्मवर स्थिर झाली. श्री. रघुनाथराव दारातच उभे होते. आम्ही लगबगीने आत शिरून सामान उतरविणे, 'श्रीं'ना हळू उतरण्यास मदत करणे यात गुंतलो. 'श्री' प्लॅटफॉर्मवर उतरले. श्री. जोशीही स्वागतास उपस्थित होते. आम्ही सर्वांनी प्लॅटफॉर्मवरच 'श्रीं'च्या चरण स्पर्शाचा लाभ घेतला. रेल्वे प्लॅटफॉर्म वरून जिने चढून पश्चिम दिशेला चालत यावे लागले. श्री. जोशी यांनी 'श्रीं' करिता गाडी आणली होती. पाठोपाठ आम्हीही घरापर्यंत गेलो व दर्शन करून निघालो. '५.३० वाजता आपण निघू!' जाता जाता श्रींचे शब्द ऐकून परतलो.

सायंकाळी ५ पर्यंत गुरुबंधू जयप्रकाश गोरेगांव येथील अभिषेक बिल्डिंगच्या सातव्या ब्लॉक मध्ये श्री. नागले यांच्याकडे जमले होते. आगमन आणि सत्काराची जय्यत तयारी पायघड्या-हार-पुष्पवृष्टी करिता फुले, प्रमुख द्वारात पाट चांदीचे ताम्हनापासून सर्व सज्ज होते. सर्व गुरुबंधू अशा मंगल आगमन समारंभास न चुकता हजर असतात, मग हा सोहळा कोणाही गुरुबंधूकडे असो. त्या धावपळीत, व्यग्रतेत गुरुभाव, गुरुसेवा आणि त्यातून मिळणारा आनंद तसेच गुरुबंधूंस आपणाकडून होत असलेले सहाय्य या भावनेने आनंद द्विगुणित होत असतो. ती क्षणचित्रे हृदयपटावर कोरली जातात. बैठकीत ती चलचित्रपटासारखी दिसू लागतात आणि वरच्यावर ती अनुभवास येऊ लागतात.

मी व पुतण्या संजय सायंकाळी ५ वाजता गाडी घेऊन बोरीवलीस गेलो. 'श्री' तयारीतच होते. चहापान करून आम्ही निघालो. श्री. जोशीही सोबत निघाले. कारण त्यांना जाता

जाता गाडी हॉस्पिटलवरून घेऊन त्यांचे चिरंजीव डॉ. आनंद जोशी यांना श्रींचे दर्शन घडवायचे होते. आम्ही वाटेत हॉस्पिटल जवळ थांबलो. डॉक्टर पेशंटच्या गडबडीत तिसऱ्या मजल्यावर होते. परंतु महाराज स्वस्थ न राहता स्वतःच तिसऱ्या माळ्यापर्यंत जाऊन डॉक्टरांची भेट घेऊन आले. भक्ताला जशी देवाची ओढ असते तशी देवाला सुद्धा भक्ताची ओढ असते.

गोरेगांवी पोहोचण्यास ७.३० वाजले. सर्व गुरुबंधू श्रींच्या आगमनाची आतुरतेने मार्गप्रतीक्षा करीत होते. सर्व तयारीनुसार श्रींचे यथाशक्ती स्वागत झाले. गुरुबंधूंनी सर्व तयारी ठेवली होती. प्रमुख दारात सौ. लताने व पाच सुवासिनींनी ओवाळले. चरणावर दूध-पाणी घातले. यजमानांनी पाय पुसले. हे सर्व ठरल्याप्रमाणे झाले. हॉलमध्ये प.पू. महाराजांना बसण्यास सोफ्यावरच शाल चादरी अंथरून बैठक केली होती. सर्व गुरुबंधूंनी दर्शन घेतले. दुग्धपान होऊन सर्व परतले. आजचा दिवस आयुष्यातील महत्त्वाचाच होता. मंगलमूर्ती, अज्ञान-विघ्न दूर करणारे विघ्नहर्ता, श्री सद्गुरुच! या सुखकर्ता मंगलमूर्तीची आज जयंती-जन्मदिवस, मंगळवार - गणपतीचाच! प.पू. महाराजांनी दिलेला गुप्तमंत्र गतवर्षी गणेश जयंतीस त्यांचे आज्ञेने प्रारंभ केला त्याचा आज प्रथम वर्धापन दिन! उद्या उपवासाचे पारणे महाप्रसाद! सर्वच गुरुबंधूंना दुसऱ्या दिवशी रजा नसल्याने येता येण्यासारखे नव्हते. श्री. पंत, शृंगारपुरे दाम्पत्य व श्री. गोडसे फक्त मुक्कामास थांबले. रात्री उपवासाचा फराळ 'श्रीं'चे बरोबर झाला. रात्री झोपण्यापूर्वी आम्ही उभयता 'श्रीं'चे शुभरात्रीचे दर्शन करण्यास गेलो असता श्री, सौ. लतास म्हणाले, तुमच्या हातचे उकडीचे मोदक आम्हाला खायचे आहेत!

लागलीच लता म्हणाली, होय महाराज! गणेश जयंतीचे उपास पारणे म्हणून प्रसाद भोजनास गणेशास प्रिय, उकडीचे मोदकच करण्याचे ठरविले आहे. शिवाय संक्रांत भोगीला आमचेकडे कोकणात नाचणीचे सत्त्व म्हणजे भिजत घातलेल्या नाचणीचे वाटून दूध काढून त्यात नारळाच्या चवाचे दूध आणि गूळ, जायफळ वेलची घालून मंद अग्निवर ते आटविले जाते. त्या पदार्थाला खांडवी म्हणतात. हे सत्त्व पौष्टिक असते. तेही करणार आहोत!

'श्री' - ''बरं आहे! एक नवीन पदार्थ चाखायला मिळेल. पण स्वयंपाकाचे जास्त काही वाढवू नका! दमला असाल, पडा आता - विश्रांती झोप घ्या!''

दुसऱ्या दिवशी ब्राह्मण आचारी आले होते. सर्व पाक निष्पत्ती सोवळ्यात झाली. श्रींचे म्हणण्याप्रमाणे सौ. लताने पहाटे उठून स्नानानंतर शुचिर्भूततेने सोवळ्याचे रेशमी नऊवारी लुगडे नेसून, उकडीचे मोदक सोवळ्या असलेल्या ब्राह्मणांची जरूर तेथे मदत घेऊन केले. खांडवीही केली. श्रींचे आन्हिक आटोपल्यानंतर १२ ते १२.३० पर्यंत भोजनाच्या पंक्ती बसल्या. श्रींच्या पंक्तीचा लाभ झाला. श्री. रघुनाथराव, श्री. कृष्णा आर्वीकर, डॉ. भातलवंडे,

सौ. सुमनताई, श्री. माधवराव तांबोळी, सौ. सुलभाताई सर्व मंडळींचा लाभ झाला. गुरुबंधू गोडसे, शृंगारपुरेही होते. भोजन चालू असताना प.पू. महाराजांनी सौ. लताबाईंची उकडीच्या मोदकाबद्दल व खांडवीबद्दल मुक्तकंठाने प्रशंसा केली. सौ. सुलभाताईस म्हणाले "ही खांडवी म्हणजे नाचणीचे सत्त्व. नाचणीचे दूध व नारळाच्या खोबऱ्याचे दूध काढून केले आहे. तुम्हीही ते त्यांना कसे केले ते विचारून घ्या. चवीलाही चांगले आणि पौष्टिक आहे!"

भोजनोत्तर विश्रांती घेऊन लागलीच दुपारी २.३० पूर्वीच प.पू. महाराज पुण्यास निघाले. पुण्यास पोहोचण्यास सायंकाळचे ६.१५ वाजले.

या दिवशी वसंत पंचमी होती. आता आम्हा गुरुबंधूंना वेध लागले आहेत ते पुढे येणाऱ्या दि. ३.२.१९८३ माघ वद्य षष्टी प.पू. महाराजांच्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे! हा प.पू. महाराजांचा ७४ वा वाढदिवस आहे.

८१) प.पू. श्री दत्तमहाराजांचा ७४वा वर्धापन दिन

प.पू. महाराजांचा तारखेने जन्म २ मार्च १९१० रोजी पहाटे ६ वाजून १० मिनीटांनी, नरसोबावाडी येथे, तर तिथी होती माघ वद्य षष्टी!

आम्ही मुंबईकर गुरुभगिनी, गुरुबंधू व मुले, मोठी माणसे २६ होती. आम्ही सर्व दि. २.३.१९८३ रोजी डेक्कन क्वीनने रिझर्व्हेशन करून निघालो. गाडीत आमची सामुदायिक 'दिगंबरा'ची धूनही झाली आणि प.पू. महाराजांच्या आठवणी, अनुभव यांचीही खूप खूप देवाण-घेवाण झाली. भावभक्तीचा आनंद ह्या एकत्रित प्रवासात मिळाला. पुण्यास श्री वासुदेव निवासात आम्ही रात्री पोहोचलो. तत्पूर्वी आम्ही किती भक्तमंडळी कोणत्या गाडीने किती वाजता पोहोचणार हे श्री. कृष्णा आर्वीकर यांस पत्राने कळविले होतेच. परिश्रमपूर्वक श्री. कृष्णा यांनी सर्व तयारी विशेषत: प.पू. महाराजांच्या वर्धापन दिनाची जय्यत तयारी ठेवली होती.

सर्वांची एकच इच्छा होती की, प.पू. महाराजांना आदल्या दिवशीच मुक्कामास आश्रमात आणावे. पहाटे ६ ते ६.३० च्या दरम्यान त्यांना अभ्यंग-मंगलस्नान घालावे. परंतु प.पू. महाराजांचे प्रकृतीस्वास्थ्य लक्षात घेऊन ते शक्य नव्हते. दि. ३.२.१९८३ रोजी पहाटे उठून ठीक ५.३० ला आम्ही सर्वांनी झांजा, मृदुंग, पेटीच्या वाद्यांत काकड आरती केली. भूपाळ्या गायल्या, भक्तीगीते झाली.

खालच्या हॉलमध्ये उच्च आसनावर प.पू. महाराजांचा फोटो ठेवून षोडशोपचार पूजन श्री. प्रभुदेसाई यांच्या हस्ते करविले. सर्वांस पुष्पपाकळ्या देऊन ६ वाजून १० मिनीटांनी प.पू. महाराजांचा जयजयकार करून सर्वांनी फोटोवर पाकळ्या उधळल्या. सुवासिनींनी

पंचारती केली. प्रथम फेर धरून व नंतर बैठकीवर बसून दिगंबराची धून सुरू झाली. हे यंदाचे वर्धापन दिन साजरा करण्याचे दुसरे वर्ष होते.



८२) काशी यात्रेबद्दल ('श्रीं'ची पत्रे)

काशीमध्ये दुर्गाघाट जवळच ''तारकमठ'' आहे. हा मठ खूप पुरातन आहे. या तारकमठांतच श्री एकनाथ महाराजांनी 'एकनाथी भागवत' हा ग्रंथ लिहीला. कितीतरी महान संत सत्पुरुष आणि संन्यासी या तारकमठांत राहून वास्तव्य करून गेले आहेत. प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराज ही येथे येऊन गेल्याचे कळले. विशेषत: संन्याशांचे निवासाकरिता, त्यांचे आश्रमस्थानच हा तारकमठ आहे. पूर्वी पाच माळ्याची ही इमारत होती. आता वरचे दोन माळे कमी केलेल्या अवस्थेत, पण ही इमारत मजबूत आहे. ह्या मठातील प्रशस्त हॉलमध्ये ''राधाकृष्ण'' मूर्तींची स्थापना प.पू. दत्तमहाराजांचे हस्ते करावी म्हणून प.पू. महाराजांना श्री. किशोरजी व्यास यांचे आग्रहपूर्वक निमंत्रण ते स्वत:, 'श्री रेणुका निवास' मध्ये येऊन देऊन गेले होते. 'श्रीं'नी ते स्वीकारले. मग जातच आहोत तर त्रिस्थळी करावी व येतील त्या भक्तांना सोबत नेण्याचे 'श्रीं'नी ठरविले.

दुसऱ्या दिवशी दि. २०.३.१९८३ रोजी दुपारी 'श्री' आश्रमांत आले. दर्शन प्रसाद, भोजन, थोडी विश्रांती झाल्यानंतर आम्ही सर्व 'श्रीं'चे पुढे बसलो. आम्ही सर्वांनी 'श्रीं'पुढे काशीयात्रेला येण्याची अनुमती मागितली. त्यांनी दिलीही. पहिला विचार होता आम्ही सर्वांनी पुण्यास यायचे व पुण्याहून 'श्रीं'चे परिवाराबरोबरच निघायचे! उन्हाळ्याचे दिवस असल्याने बायका मुलांना सोबत घेऊ नये असे 'श्रीं'ना प्रथम वाटत होते. परंतु 'श्रीं'चे समवेत प्रयाग-काशी-गया अशी सुसंधी आयुष्यात पुन्हा येणार नाही, म्हणून येत असतील तर बायका मुलांनाही सोबत घेण्याची आमची विनंती दयार्द्र 'श्रीं'नी मान्य केली. पण सर्वांसह निघायचे असेल तर मुंबईकरांना सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी मुंबईहून महानगरी गाडीचे रिझर्व्हेशन करून निघायचे असे ठरले व प.पू. महाराज, रघुनाथराव, कृष्णा आर्वीकर, प.प. गजानन आश्रम स्वामीमहाराज पुण्याहून निघतील असे ठरले. आम्ही सर्वांनी पुण्याहून ह्या मंडळींची फर्स्टक्लासची तिकीटे काढण्याचा विषय काढला. परंतु तत्क्षणीच 'श्रीं'नी तो खोडून काढला. तुमच्याप्रमाणे आम्हीही सेकंड क्लासनेच येऊ म्हणाले.

दि. २९.३.१९८३ रोजी प.पू. महाराजांनी सविस्तर सांगोपांग विचारपूर्वक पत्र प्रवासाच्या संबंधीत पाठविले ते पुढे देत आहे.

पाकीटावर पत्ता :
श्री. रा. श.दि. नागले
३९, अभिषेक, जयप्रकाश नगर,
गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.

॥ श्रीदत्त ॥

दिनांक २९.३.१९८३

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम काशीहून निमंत्रण पत्र आले असून तेथे ३१ मे व जून १ ह्या दिवशी मूर्तिप्रतिष्ठा कार्य आहे. त्याकरिता ३० मे पर्यंत तेथे पोहोचणे जरूर आहे. प्रथम अलाहाबादला उतरून तेथेच ३ दिवसात यात्रा कार्य करून पुढे काशीस जावयाचे आहे. बरोबर श्री गजाननाश्रम स्वामीमहाराजही आहेत. या दृष्टीने २६ मे १९८३ रोजी तेथून निघणाऱ्या वाराणसी एक्सप्रेसने निघून दि. २७ मे १९८३ रोजी काशीस पोहोचावे असे श्री स्वामीमहाराजांनी ठरविले आहे. तिकीटांचे रिझर्व्हेशन पुढील प्रमाणे ठरले आहे. १) सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर - वय ६८; २) श्री. अशोक कवीश्वर - वय ४३; ३) सौ. सविता कवीश्वर - वय ३४; ४) चि. आमोद कवीश्वर - वय १०; ५) कु. रेणुका कवीश्वर - वय ७. याप्रमाणे येथून मंडळी मुंबईस २४ किंवा २५ तारखेस येतील. त्यांची अलाहाबादची तीन मोठे व दोन लहान, यांचे दोघांची अर्धी अर्धी तिकीटे, याप्रमाणे तीन संपूर्ण व दोन अर्धी (अथवा दोघांचे मिळून एक) अशी मुंबई ते अलाहाबाद तिकीटे २६ तारखेस दादरहून सकाळी सुटणाऱ्या वाराणसी एक्सप्रेसची रिझर्व करावीत. याशिवाय तेथून आपण एकंदर किती मंडळी निघणार त्यांचीही सर्वांची तिकीटे रिझर्व करावीत. १) श्री गजाननाश्रमस्वामी महाराज; २) आम्ही व ३) श्री. रघुनाथराव अशी ३ तिकीटे येथून निघणाऱ्या वाराणसी डब्यात येथेच रिझर्व करावीत असे श्री स्वामीजी म्हणाले, ते योग्य आहे. आम्ही २५ ला रात्री येथून निघू. २६ ला सकाळी ९/१० पर्यंत भुसावळला पोहोचू. तेथे ४/५ तास आमचा डबा तुमची गाडी मुंबईहून येईपर्यंत थांबेल. तोपर्यंत आम्ही तिघेजण तेथे ओळखीच्या घरी जाऊन स्नान, संध्या, पूजा, भोजन करून, २ वाजेपर्यंत परत येऊन आमच्या डब्यांत बसू. तुमची गाडी आल्यावर आमचा डबा त्या गाडीला जोडतील. बरोबर देव असल्यामुळे तेथून निघणे आम्हाला सोईचे होईल आणि आपणा सर्व मंडळींना तेथेच गाडीत बसणे सोईचे आहे. इतक्या मंडळींनी येथे आश्रमात येणे, जाता येता रिक्षा, सामान, मुले असल्यास त्यांना अशी सर्वांची व्यवस्था करून स्टेशनवर जाणे त्रासाचे होईल असे वाटते म्हणून आम्ही तिघेच येथून निघू. बाकी आपण सर्व मुंबईहून निघणे बरे. येथे एकाच डब्यात सर्वांची तिकीटे मिळणेही कठीण आहे.

काशीकडे त्यावेळी उन्हाळा असल्यामुळे लहान मुलांनी, अशक्त माणसांनी इतक्या लांब यावे की, नाही याचा विचार करून सर्व ठरवावे. बायका कोणी बरोबर येत असल्यास, मासिक अस्पर्शतेचा काल मध्ये येणार नाही, त्यांनीच येणे हितावह होईल, नाहीतर मध्ये वेळ मोडेल इत्यादी सर्व विचार करून योग्य ते ठरवावे. याप्रमाणे तिकीटे रिझर्व झाल्याचे व एकंदर किती मंडळी निघणार ते कळवावे म्हणजे आधी अलाहाबादला व काशीला कळविणे सोईचे होईल. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

- आ. दत्तात्रेय कवीश्वर

---*---

वरीलप्रमाणे आमच्या तीन संपूर्ण व दोन अर्धी अशा अलाहाबादच्या तिकीटांना रिझर्व करण्याचा येणारा एकंदर खर्चही उत्तरी कळवावा, कळावे.

द.धु.

पुढे आणखी प.पू. महाराजांची लागोपाठ आलेली दि. २३.४.१९८३, व दि. १८.५.१९८३ ची पत्रे देत आहे.

।। श्री दत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास.
दि. २३.४.१९८३

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम. आम्ही आज दुपारी नाशिकहून येथे आलो. येथे काशीहून श्री. डॉ. विश्वनाथ देव यांचे पत्र आले. त्यांना उत्तर लिहीत आहे. त्यांचे पत्रांतील आपणास उपयुक्त भाग या सोबत पाठविला आहे. त्याप्रमाणे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर यात्रेस एकंदर मुंबईहून किती माणसे येणार हे कळवावे. तेथून परत निघण्याची तारीख, परत निघणाऱ्या मंडळींची नावे, वय हे सर्व कळवावे व पैशाचा ड्राफ्ट रजिस्टरने त्यांचेकडे पाठवावा, म्हणजे ते आपण कळविलेल्या तारखेची, आपण दिलेल्या नावांप्रमाणे परतीची मुंबईची तिकीटे रिझर्व करून ठेवतील. त्याप्रमाणे सर्व कळविले आहे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

- आ. दत्तात्रेय कवीश्वर

---*---

श्री. विश्वनाथ देव यांच्या पत्राचा प.पू. महाराजांनी पाठविलेला भाग -

आपल्या समवेत येणाऱ्या मंडळींची निवास, जेवणाची व्यवस्था आमच्याकडे अर्थात् काशी महाराष्ट्र भवनात होईल. वेळ प्रसंगी २-५ मंडळी जास्तीही झाल्यास त्यांचीही व्यवस्था आम्ही करू. येथून काशीहून परत पुण्यास जाण्याकरिता रेल्वेचे रिझर्वेशन वगैरे

करण्याची व्यवस्था आम्हांस करायची असल्यास प्रवास करणाऱ्या यात्रिकांची नावे, त्यांचे वय आदि क्रमवार लिहून तसेच माणसामागे १०० रुपये प्रमाणे तिकीटांकरिता शीघ्रातिशीघ्र पाठवावे. जून महिना रेल्वे प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत गर्दीचा असतो. ह्या करिता रिझर्व्हेशन जितके लवकर करून घेता येईल तितके चांगले. रेल्वेची तिकीटे वाराणसी-पुणे किती? वाराणसी-मुंबई किती? वगैरे पण स्पष्ट करावे. रिझर्व्हेशन करिता पैसे श्री. विनायक विश्वनाथ देव ह्या नावाने ड्राफ्टने पाठवावे. पत्ता - वेदभवन, क-२३/११८, दूध विनायक, वाराणसी. रजिस्टर पत्राने पाठवावा. श्री. अनंताश्रम स्वामी महाराजांचे आपल्या सेवेसी नारायण स्मरण. काळजी नसावी. नियोजित कार्यक्रम परमेश्वर कृपेने उत्तम प्रकारे पूर्ण होईल. असा विश्वास आहे, कळावे.

आपला
विश्वनाथ देव

---**---

पुढे प.पू. महाराज आम्हांस परतीचा दिवस नक्की ठरविता यावा म्हणून ह्याच पत्राखाली एक स्वहस्ते ओळ लिहीतात -

"काशीस ३ किंवा ६ दिवस, गयेस १ किंवा २ दिवस, प्रयागला २ दिवस धर्मविधीकरिता लागतील."

॥ श्रीदत्त ॥

श्री वासुदेव निवास, पुणे ४.
दिनांक २३.४.१९८३

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम. आपले सविस्तर पत्र मिळाले. वाचून समाधान झाले. आपल्या सर्वांच्या दृढ संकल्पाप्रमाणे श्री विश्वेश्वर कृपेने आपणास २५ मे ची महानगरी एक्सप्रेसची तिकीटे मिळून त्या दिवशी आपण त्या गाडीने ११ वाजता मुंबईहून सर्व निघत आहात. आम्हीही त्या दिवशी येथून निघत आहोत. अलाहाबादला २६ ला रात्री आपण पोचता. रात्रभर स्टेशनवर राहून २७ ला सकाळी आम्ही तेथे येऊन पोचल्यावरच सर्वांनी मिळून गावात श्री. पित्रे यांच्याकडे जावे हा आपला विचार समजला. तथापी, "श्री. गजानन राव पित्रे, महाराष्ट्र भवन (पोस्टा शेजारी), दारागंज प्रयाग ६, अलाहाबाद यु.पी." या पत्त्यावर पत्र पाठवून २६ मे ला रात्री त्यांनाच स्टेशनवर बोलावून घ्यावे, म्हणजे ते समक्ष स्टेशनवर येतील व आपणा सर्वांना गावात निवासस्थानी घेऊन जातील. म्हणजे रात्री जेवण, विश्रांती सर्वांना मिळेल. आम्हीही त्यांना येथून असे पत्र लिहीतो. आपणही पत्र लिहावे व त्यांचे उत्तर स्टेशनवर येऊ असे आले. तरच गावात जावे. त्यांची चिठ्ठी

घेऊन कोणी मनुष्य स्टेशनवर येईल तरच त्याचे बरोबर जावे. नाहीतर स्टेशनवरच राहणे बरे. २७ ला आपण सर्व बरोबरच गावात जाऊ. इतर कोणीही पंडे (ते गाडीतच ४/५ स्टेशनपासून भेटून चौकशी करतात) वगैरे आले तरी त्यांचे काही ऐकू नये. त्यांच्याबरोबर जाऊ नये. आमची मंडळी आहेत एवढेच त्यांना सांगावे. स्टेशनवरच रात्री रहाणे सुरक्षित ठरेल. आधी श्री. पित्रे यांना पत्र पाठवून त्यांचे विचारे सर्व ठरवावे. सकाळी ते आम्हाला नेणेस स्टेशनवर येतीलच. आम्ही येथून २७ एप्रिलला सह्याद्री एक्सप्रेसने वाडीकडे जाण्यास निघत आहोत, मध्ये भिलवडी स्टेशनवर उतरून तासगांवला जाऊ. तेथे २ तारखेपर्यंत थांबून ३ मे ला सायंकाळी मुक्कामास वाडीस जाऊ. तेथे ४ ते १२ मे पर्यंत उत्सव आहे. नंतर १३/१४ कोल्हापुरी जाऊन १४ ला रात्री महालक्ष्मी एक्सप्रेसने निघून १५ ला पहाटे येथे येऊन येऊरला जाऊं. एक दोन दिवसांनी तेथून परत येऊ. २०-२१ ला बार्शीस जाऊन २२ ला तेथील मुंजी आटोपून २३ ला येथे येऊ. २४ ला येथून मंडळी दुपारी ३.२० च्या गाडीने निघून दादरला उतरतील. येताना आम्ही वाराणसी डब्याने थेट पुण्यास येणार आहोत, तसे काशीस श्री. देवांना कळविले असून तिकीटे रिझर्व करण्याकरता पैसेही पाठविले आहेत. वाराणसी-पुणे डबा, भुसावळला सकाळी १० वाजता सुटतो व संध्याकाळी ६ ला तो महाराष्ट्र एक्सप्रेसला जोडतात. या ७/८ तासात आपण मुंबईला पोचू शकाल, या दृष्टीने आपली मुंबईची तिकीटे रिझर्व होणे योग्य आहे. तसे श्री. देवांना कळवावे. १० ते १५ जून या दरम्यान आमची पुण्याची तिकीटे केव्हाही रिझर्व करावीत असे आम्ही कळविले आहे. आपणही निश्चित तारीख मुंबईच्या रिझर्व्हेशनची कळवावी. सर्वांस यथोचित नमस्कार - आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---**---

या दि. २३.४.१९८३ आणि आधीच्या पत्रावरून सुद्धा 'श्रीं'चे भक्तावरील, सर्वच भक्तांवरील प्रेम वात्सल्य प्रकट होते. सर्वार्थाने सद्गुरु दत्तमहाराज आम्हा सर्वांची माय माऊली आहे. धन्य आम्ही गुरुबंधू-भगिनी आणि त्यांची लेकरे! या पत्रातूनच काशीयात्रेच्या मिळणाऱ्या पुण्यापेक्षा सहस्रपट पुण्य, माऊली आम्हांस या पत्रातून पाजीत आहे. एक एक शब्द अमृताते पैजा जिंके असाच आम्हां गुरुभक्तांना नव्हे काय?

'श्रीं'चे आज्ञेनुसार आम्ही दि. २८.४.१९८३ रोजी श्री. पित्रे, अलाहाबाद व श्री. देव वाराणसी यांना पत्रे पाठविली व त्यात श्री आज्ञेवरून लिहीत असल्याचे म्हटले. यात्रिकांची यादी क्रमवार व डिमांड ड्राफ्टही पाठविला.

एवढ्यावर माऊलीची भक्तांविषयीची चिंता संपलेली नाही. आता हे पुढील पत्र पहावे.

।। श्री दत्त ।।

श्री वासुदेव निवास
दि. १८.५.१९८३

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम. काशीचे उत्तर काय आले? पुढे तिकीटे मिळत नसल्यास मिळालेली तिकीटेच उपयोगात आणावीत म्हणजे गर्दीचा त्रास होणार नाही. ५ तारखेसच आपले परत निघणे होणार असल्यास श्री. गोडसे यांनी काशीस येणेच रद्द करून घरीत वडीलांचे वर्षश्राद्ध करणे बरे. आपणास तीर्थयात्राविधी श्राद्धादि करावे लागणार असल्याने यावेळी काशीस मुंज करण्याचे रहित करावे लागेल. आपण कोल्हापूरहून केलेल्या तारेचे उत्तर काशीहून अद्यापि इकडे आलेले नाही. 'कोणी तरी स्वयंपाक करण्यास बरोबर घेऊन यावे. इकडे कोणी मिळत नाही,' असे श्री. पित्रे यांचे पत्र इकडे आले आहे. तरी तसे आचारी तेथे मिळाल्यास बरोबर घेण्याचे ठरवावे म्हणजे प्रवासात सर्व सामान बाजारांतूनच आणता येईल. पात्री ८/१० रुपये द्यावे लागणार नाहीत. तेच पैसे आचाऱ्याला देता येतील. पण रिझर्व्हेशन त्यांचे कसे होईल ही चिंता आहे. जमेल तर आचारी बरोबर घ्या, नाहीतर जसे होईल तसे करता येईल. आम्ही २१ तारखेला बारशीस जाऊन २३ ला परत येऊ. २४ ला सकाळी ८ चे एशियाड एस्.टी.ने येथून मंडळी दादरला १२-१ पर्यंत येतील. तिकीटे काढली आहेत. सर्वांस यथोचित नमस्कार - आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. २५.५.१९८३ बुधवारी रात्री आम्ही सर्व बोरीबंदर (व्ही.टी.) स्टेशनवरून महानगरीने निघालो. ११ ला सुटणारी गाडी रात्री १.३० वाजता सुटली. आम्ही सर्व ११ पुरुष, ११ स्त्रिया, ७ मुले असे २९ ते ३० जण होतो. आमची गाडी अलाहाबादला रात्री (पहाटे) ३.३० वाजता पोहोचली, दि. २७ उजाडता वैशाखातील पौर्णिमा होती. श्री. पित्रे यांनी आम्हांस नेण्यासाठी चिठ्ठी देऊन माणूस पाठविला होता व टांग्यांची सोय केली होती. टांग्याने आम्ही प्रयाग येथे श्री. पित्रे यांच्या घरी गेलो. पुण्याहून निघालेले प.पू. महाराज, श्री गजाननआश्रम स्वामी महाराज, श्री रघुनाथराव व श्री. कृष्णा आर्वीकर दि. २७ ला म्हणजे आम्ही पहाटे ४ वाजता घरी पोहोचल्यानंतर सकाळी ९.३० ला पोहोचले. आयत्यावेळी यांचा डबा अनारक्षित केल्याने प.पू. महाराजांसह सर्वांचे हाल झाले. दुसऱ्या डब्यात कशीबशी जागा मिळाली. दि. २७ ला आम्ही गंगा-यमुना नदीत स्नान करून आलो. सायंकाळी 'श्रीं'च्या बरोबर वेणीमाधवांचे दर्शन घेतले. रात्री तासभर धून केली.

दि. २८.५.१९८३ ला पहाटे ५ वाजता आम्ही सर्वजण 'श्रीं'चे बरोबर गंगास्नानास गेलो.

श्री. पित्रे गुरुजींनी स्नान संकल्प सांगितला. 'श्रीं'चे व काही गुरुबंधूंचे क्षौर झाले. काहीजण आलोच आहोत तर आपणही क्षौर करावे असे मला वाटत होते. द्विधा अवस्थेत असताना शेवटी प.पू. महाराज प्रयाग क्षेत्री गंगानदी तीरावर एक मोठ्या शिळेवर बसले होते. मी जवळ जाऊन हळूच विचारले, "मी ही क्षौर करू का?" त्यांवर प.पू. महाराज म्हणाले, "नका करू! कारण तुम्हाला धंद्यात निरनिराळ्या मोठ्या व्यक्तींच्या गाठीभेटी घ्यायच्या असतात. उच्च अधिकारी, आर्किटेक्ट, इंजिनिअर्स यांच्याशी मिटींग, भेटी करायच्या असतात. तेव्हा क्षौर न करता गुरुजी सांगतील त्याप्रमाणे शास्त्र करा!" नंतर विधीपूर्वक 'श्रीं'च्या बरोबर गंगास्नान व प्रायश्चित्त विधी झाला. सर्वांची मने या कार्यक्रमाने प्रसन्न झाली. फारच छान झाला हा कार्यक्रम! मनास पूर्ण समाधान होऊन 'श्रीं'चे बरोबर हा लाभ झाला म्हणून धन्यता वाटली. स्नानानंतर श्री. पित्रे यांचे घरी जाऊन 'श्रीं'चे बरोबर आमच्याकडूनही 'क्षेत्रस्थ श्राद्ध यथाशास्त्र' यथाविधी पार पडली.

सायंकाळी प्रयाग मधील निरनिराळ्या संस्थांतर्फे श्रींचा सत्कार होऊन त्यांना सन्मानपत्रे देण्यात आली.

दि. २९.५.१९८३ रोजी सकाळी प्रथम स्त्रियांची व नंतर पुरुषांची स्नाने आटोपल्यानंतर लग्नाच्या विधींसारखे पती पत्नीचे अगदी मुंडावळ्या लावून काही विधी झाले. सर्व जोडप्यांची पुन्हा लग्ने लावली गेली. त्यात प.पू. महाराज व सौ. लक्ष्मीबाई हेही जोडपे होते. घरून निघून सर्वजण प्रयागच्या गंगा-यमुना संगमावर गेलो. त्या आधी आम्ही गाभाऱ्यांत उताणा आडवा पडलेल्या हनुमंताचे मंदिरात जाऊन दर्शन घेतले. ३-४ नावा सर्वांसाठी आरक्षित केल्या होत्या. श्री. गोडसेंचा कॅमेरा लग्नविधीपासून सज्ज आणि कार्यरत होता. संगमावर नावा येताच एक आश्चर्यकारक दृश्य दिसले ते म्हणजे गंगा आणि यमुना जेथे एकत्र मिळतात तेथे वेणीसारखी रेष उमटलेली दिसते. गंगेचे पाणी हिरव्या रंगाचे भासते तर यमुनेचे पांढरट वाटते. दोन्ही नद्यांचे पाणी एकत्र येऊन एकमेकांत न मिसळता स्वतंत्र दिसते. स्पष्ट कळते की, या रेषेअलीकडची हिरवट पाण्याची गंगा तर पलीकडील यमुना! याच संगमावर सुवर्णाच्या कात्रीने आपल्या पत्नीच्या वेणीतील एक केसाची बट कापून नदीला अर्पण करायची असते. प्रभू श्रीरामचंद्रानेही येथेच येऊन सीतामाईच्या केसांची बट नदीस अर्पण केली होती. ती कात्री गुरुजींस द्यायची असते. नंतर सर्वांनी होडीतून पाण्यात उतरून डोक्यावरून स्नान केले. पाणी कंबरभरच होते.

रात्री प.पू. महाराजांनी तीर्थक्षेत्रांची महती व तीर्थयात्रा का कराव्यात यांवर उद्‌बोधक सुश्राव्य प्रवचन पाऊण तास दिले.

"तीर्थयात्रेमुळे कायिक, वाचिक, मानसिक पापांचा क्षय होतो. सद्‌गुरुकृपेशिवाय

तीर्थयात्रा घडत नाहीत. त्यात आणखी सत्पुरुषांबरोबर यात्रा घडणे तर फार दुर्लभ. पांडवांनी वनवासांत असताना एकाच जागी न राहता भारद्वाज ऋषींबरोबर सर्व तीर्थयात्रा केल्या व ऋषींनी प्रत्येक तीर्थांचे महत्त्व त्यांना समजावून सांगितले. तीर्थयात्रा मनापासून, श्रद्धाभक्तीपूर्वक घडली तर तिचे फळ निश्चित मिळते. वेणीदानाचा प्रारंभ प्रत्यक्ष श्री रामचंद्रांनी केला. ते जेव्हा लंकेहून परत येऊन अयोध्येला जात होते तेव्हा प्रयागला थांबले. त्यावेळी सीतादेवींनी वेणीदान केले. तेव्हापासून ही वेणीदानाची पद्धत सुरू झाली. स्त्रियांना संकल्पपूर्वक प्रायश्चित विधी हा एकच आहे. परमार्थ आणि व्यवहार ह्यांची सांगड घातली गेली पाहिजे. बुद्धी निर्दोष होणे हे देखील तीर्थयात्रेचेच फळ आहे.''

दिनांक ३०.५.१९८३ ला सकाळी ६ वाजता आम्ही सर्वांनी मिटरगेज-पूर्वांचल एक्सप्रेसने प्रयाग सोडले. गाडीत भरपूर जागा होती. आम्ही सर्व एका बोगीत होतो. 'श्रीं'ना विश्रांती करता तीन सीटच्या बाकावर अंथरुण घालून दिले होते. बाजूच्या कम्पार्टमेंटमध्ये आम्ही गुरुबंधू, भगिनी, मुले होती. थोडा वेळ धून केली. गुरुबंधू भगिनींनी भक्तीगीते गायली. सर्वांचे आग्रहास मान देऊन मीही भक्तीगीत गाण्याचा यशस्वी प्रयत्न केला. गीत निवडले ते श्री सद्गुरु रमादेवींचे आवडते पद आणि आम्ही श्रींचे सोबत ज्या खास कार्यक्रमाकरिता आलो होतो त्या कार्यक्रम उत्सवमूर्तीस अनुरुप असे -

शामसुंदर मदन मोहन राधे गोपाळ।
राधे गोपाळ भजो राधे गोपाळ।।
शंख चक्र गदाऽधरा राधे गोपाळ।
राधे गोपाळ भजो राधे गोपाळ।।

तिकडे गीताचे स्वर कानी पडताच अंथरुणावर पडलेली सद्गुरु माऊली उठून बसली. अगदी बैठकीची पोज घेऊन! आणि दोन्ही हाताने-बोटाने ताल ठेका धरून डोलू लागली. श्री सद्गुरु रमादेवी आणि श्री सद्गुरु दत्तमहाराज कसे एकरूप! दोन्ही विभूतींची ह्या पदाने एकतानता तल्लीनता होते. मी बाजूचे कम्पार्टमेंटमध्ये असलो तरी तिरक्या बाजूने श्रींचे स्पष्ट दर्शन होत होते. 'श्रीं'चे उठून बसणे, पदावर ताल धरणे, तल्लीन होणे हे पाहून मीही भावभक्तीने मन उचंबळून येऊन ते गीत अगदी अंत:करणापासून आळवीत होतो. दि. १.५.१९८३ रोजी 'श्रीं'च्या हस्ते तारक मठाच्या प्रशस्त हॉलमध्ये राधाकृष्णांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना होणार होती. ११.०० वाजता आम्ही वाराणसीस पोहोचलो. प.पू. महाराजांना उतरवून घेण्यास व सत्कारास स्वत: श्री. किशोरजी व्यास अत्यंत विनयशील वृत्तीने हजर होते. गाडी वाराणसी स्टेशनच्या फ्लॅटफॉर्मवर लागताच आम्ही झटपट सामान उतरायला सुरुवात केली. आम्ही उतरविलेल्या सामानाजवळ पांढरी बंडी, लुंगी सारखे धोतर कासोटा

न मारता गुंडाळलेले व खालून वर खोचून घेतलेले, अशी एक पंड्या व्यक्ती आमचे सामानावर लक्ष ठेवीत होती व भिरभिरत्या डोळ्यांनी उतरणाऱ्या आम्हा सर्वांकडे पहात होती. श्री. विलास तावडे आमचे गुरुबंधू रागाने पुढे सरसावले व त्या माणसास दटावून म्हणू लागले, ''पंड्याजी क्या है? सामान क्या देखता है? देखो हम बोल देते है, सामान को हात नही लगाना!'' इतक्यात मी सामानाजवळ आलो. तावडे मला त्या पंड्याकडे अंगुली निर्देश करून म्हणाले, ''नानाजी नागले जरा ह्या माणसाकडे लक्ष ठेवा हं! बघा कसा चौफेर बघतो आहे! जरा सांभाळा, मी आणखी काही सामान डब्यात आहे ते घेऊन येतो!''

श्री. तावडे आणि इतर बंधूनींही होते नव्हते ते सर्व सामान खाली आणले. तावडे तो माणूस कुठे गेला ते पाहू लागले. पहातात तर ते गृहस्थ प.पू. महाराजांना मोठा भरगच्च हार घालून 'श्रीं'चे स्वागत करीत होते. 'श्रीं'ना देखील त्यांना पाहून खूप आनंद झाला होता. महाराज त्या गृहस्थांशी आदबीने वागत होते.

ते गृहस्थ म्हणजे, स्वत: श्री. किशोरजी व्यास! ते जातीने 'श्रीं'चे स्वागत सत्कारास आले होते.

नंतर तावडे शरमले. त्यांनी श्री. किशोरजींची क्षमा मागितली. किशोरजी म्हणाले, ''तुम्ही मुंबईकर आहात! तुमचे वागणे योग्यच होते. फसवेगिरी करण्यास आमचे काशीचे पंडे खरोखरच उस्ताद आहेत. पूर्व परिचय नसल्यामुळे असे घडले, तरी मनास लावून घेऊ नये!''

स्थानकावर 'श्रीं'चे यथायोग्य स्वागत झाले. प.पू. महाराज व त्यांचे कुटुंबीय श्री. देव यांच्या घरी व आम्ही बाकीचे सर्व तारकमठात उतरलो. आम्ही सर्वजण संध्याकाळी देवदर्शनास जाऊन आलो. श्री. तेलंग स्वामींच्या मठात शिरताच आणि त्यांची भव्य प्रतिमा पाहताच सर्वांग शहारले व येथेच बैठक मारून ध्यानास प्रारंभ करावा अशी तीव्र संवेदना होऊ लागली. श्री रामकृष्ण परमहंस देखील श्री तेलंग स्वामींच्या दर्शनाला आले होते.

रात्री छोट्या गैबींत रहाणारे दीक्षित नावाचे एक संस्कृतचे प्राध्यापक 'श्रीं'च्या दर्शनास आले. श्री. गोडसे, आमचे गुरुबंधू, त्या भेटीचा सोहळा पाहण्यास जातीने उपस्थित होते. श्री दीक्षितांना पाहताच क्षणी 'श्रीं'चा चेहरा प्रसन्न आनंदाने इतका फुलला की, असे 'श्रीं'चे दर्शन आम्हा कोणाही गुरुबंधूंस कधीच पहायला मिळाले नव्हते. विनयशीलतेने श्री. दीक्षितांनी 'श्रीं'ना साष्टांग नमस्कार केला. नंतर दोघांचे दिव्या मधुरा गिर्वाण भाषेंतून संभाषण झाले. संस्कृतप्रचूर भावपूर्ण संभाषण श्री. गोडसेंना ऐकायला मिळाले.

८३) काशींतील श्री. दीक्षित 'श्रीं'चे अनुग्रहीत

महाराष्ट्रापासून इतक्या दूर असलेल्या काशीक्षेत्र निवासी श्री. दीक्षितांची प.पू. महाराजांची एवढी घनिष्ट परस्पर इतक्या प्रेम संबंधांची ओळख कशी? हें ते 'श्रीं'चा निरोप घेऊन बाहेर आल्यानंतर जिज्ञासू गोडसेंनी त्यांना विचारले. ते गृहस्थ म्हणाले, ''अहो! मी महाराजांचा अनुग्रहीत आहे!'' हे ऐकून श्री. गोडसेना आणखी एक विस्मयाचा धक्का बसला. गोडसेंनी बाहेर त्यांना शेजारी बसवून घेतले व हा दीक्षा घेण्याचा योग कसा आला ते विचारले. श्री. दीक्षितांनी सांगितलेली समग्र माहीती :-

''दीपलक्ष्मीचा अंक प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांचा गौरव अंकच होता. तो काशीस मला वाचण्यास मिळाला. मी त्यावेळी योगदीक्षादात्या गुरुंच्या शोधांत होतो. सांप्रत जगतात असे सद्गुरु अवतीर्ण आहेत की, नाही याबद्दलही मला शंका होती. प.पू. गुळवणी महाराज शक्तीपात म्हणजेच योगदीक्षा देतात, हे मला महाराष्ट्रांत प्रसिद्ध झालेल्या त्या अंकावरून कळले. माझी तीव्र उत्कंठा दीक्षा घेण्याची होती. प्रत्यक्ष दर्शन घेऊनच दीक्षेबद्दल प्रार्थना करू असे मी ठरविले होते. एवढ्या लांबचा प्रवास खर्च त्यावेळी माझ्या सांपत्तिक स्थितीला परवडणारा नव्हता. मी माझी पुण्यास जाण्याइतकी आर्थिक जमा कधी होईल याची वाट पहात होतो. पण माझ्या दुर्दैवाने १९७४ च्या जानेवारी महिन्यात प.पू. गुळवणी महाराज ब्रह्मलीन झाल्याचे कळले. मी अत्यंत दु:खी झालो व माझ्या दुर्भाग्यास दोष देऊ लागलो. एके रात्री प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांनी स्वप्नी दर्शन दिले व म्हणाले, ''आमचे उत्तराधिकारी प.पू. दत्तमहाराज कवीश्वर आमचे स्थानावर अधिष्ठीत आहेत, ते तुम्हाला दीक्षा देतील. आपण पुण्यास जाण्याचे विचार माझे मनात तीव्रतेने येऊ लागले. आता वेळ घालविण्यात अर्थ नाही. माझी दीक्षेची वेळही आली असावी. योगायोगाने पुणे विद्यापीठाच्या संस्कृतच्या प्रश्नपत्रिका तपासण्याच्या कामगिरीवर मला पाठविण्यात आले. प्रथम पुण्यास जाताच मी ज्या कामाकरिता आलो होतो ते समजावून घेण्यास विद्यापीठात गेलो. आचारधर्माप्रमाणे कुठे वास्तव्य करावे व कोठे शुद्ध सात्विक भोजन प्राप्त होईल हे प्रश्न माझ्या मनी होते. माझी अडचण समजण्यास श्री. द्रविड शास्त्रींना वेळ लागला नाही. त्यांनी मला कर्वे रोड येथील श्री वासुदेव निवास आश्रमात उतरण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे एके दुपारी शांत वेळी मी श्री वासुदेव निवासात आलो. गेटमधून आत शिरलो. आश्रमाचे दार ढकलले तर तेही उघडेच होते. दुपारची वेळ असल्याने भोजनोत्तर छात्र अध्ययनास गेलेले. इतर कोणी असले तरी वामकुक्षी करीत असावेत. ऑफीस समोर जिना दिसताच मी बावरलेल्या स्थितींतच वर गेलो. वरचे खोलीत समोरच आसनावर एक वृद्ध ब्राह्मण गृहस्थ काही लिखाण करीत बसले होते. दार लोटून खोलीत प्रवेश करताच त्यांनी

वर पाहिले. मी म्हणजे कोणी अपरिचित व्यक्ती दारात उभी दिसली. हात जोडून मी विचारले, ''परमपूज्य दत्तमहाराज आहेत का?'' प्रश्नास उत्तर न देताच त्यांनी विचारले, ''कोठून आलात आपण?''

दीक्षित - ''मी दीक्षित काशीहून आलो. प.पू. दत्तमहाराज कधी भेटतील?''

ते - ''भेटतील! आपले भोजन झाले आहे कां?''

दीक्षित - नाही!

ते - मग आधी खाली चला! हातपाय मागील टाकीवर धुवून घ्या, तोपर्यंत आपले पान घ्यायला सांगतो!'

आम्ही दोघेही खाली उतरलो. त्या वृद्ध गृहस्थांनी मला पाण्याची टाकी नळ कोठे आहेत ते दाखविले. ते आत गेले. आश्रमात कोणीच जागे नव्हते. त्यांनी आमचे पाट-पाणी घेतले. पात्रात भात-भाजी-डाळ कोशींबीर वगैरे वाढले. तेवढ्यात मी आत आलो. त्यांनी भोजनास बसण्यास सांगितले. आमचे भोजन होईपर्यंत ते भिंतीस टेकून उभेच होते. भोजन होताच, 'पात्र राहू द्या' म्हणाले. मी उठून तोंड धुवून आत येईपर्यंत त्यांनी स्वत:च पात्र, पाट उचलून खरकटेही काढून फरशी पुसली होती. मला म्हणाले, ''वर हॉल आहे तेथे जाजमे आहेत. उशीपण आहे. आपण विश्रांती घ्या. चार नंतर भेटतील सर्व! आपण पडा जरा. विश्रांती घ्या!''

मी वर गेलो. जरा विश्रांती घेतली. चार नंतर उठलो. एक तरुण गृहस्थ वर हॉलमध्ये आले होते. त्यांना प.पू. महाराज आले आहेत कां ते विचारले. ते गृहस्थ म्हणाले, ''महाराज आहेत. खाली खोलीत बसले आहेत!'' मी म्हटले, ''मला दाखविता कां? माझा त्यांचा परिचय नाही! ते गृहस्थ एक जिना उतरून खाली आले व म्हटले, ''हे काय महाराज इथेच बसले आहेत!''

हे ऐकताच मला आश्चर्याचा धक्काच बसला. मी त्वरेने जाऊन दंडवत घातले व क्षमा याचना केली. त्यांनी काहीच घडले नाही असे दाखवून, ''काय मुक्काम आहे ना?'' प्रश्न केला. मी सद्गदीत झालो. ज्या सद्गुरुंच्या मी शोधात होतो, ज्या प.पू. गुळवणी महाराजांनी स्वप्नात ज्यांचा उल्लेख केला, तीच ही विनयशील करुणापूर्ण वात्सल्यमूर्ती! किती अजाणतेपणे मी त्रास दिला गुरुमाऊलीला? माझे नेत्रांतून अश्रूंचा पूर वाहू लागला. भावनावेग आवरून मी माझी समग्र माहीती, सद्गुरु गुळवणी महाराजांचा स्वप्नात झालेला आदेश आणि पुण्यात अनायासे काम निघून कसे येणे झाले, द्रवीड शास्त्रींनी आपणाकडेच कसे पाठविले हे सर्व कथन केले. योगदीक्षेची याचना प्रार्थनापूर्वक केली आणि यथावकाश मी प.पू. दत्तमहाराजांचा अनुग्रहीत झालो. त्यानंतर हा काशीत भेटीचा योग आला.''



८४) काशी दर्शन

दि. ३१.५.१९८३ रोजी आम्ही सर्व दुर्गाघाटावर सकाळी गंगास्नान करून आलो. भोजनानंतर विश्रांती घेऊन आम्ही काही मंडळी श्री गजानन आश्रम स्वामी महाराजांबरोबर काशी दर्शनास बाहेर पडलो. दुर्गाघाटावरून मणिकर्णिकेवर गेलो. तेथून श्री विश्वेश्वराचे मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्या आधी क्षेत्रपाळ श्री कालभैरवांचे दर्शन घेतले. रस्त्यावर यात्रेकरूंची खूप गर्दी होती. रात्री तारक मठात परतलो. रात्री सर्व गुरुबंधूंनी श्री गजानन आश्रमस्वामी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मूर्ती प्रतिष्ठापनेकरिता केलेला गाभारा आतून बाहेरून स्वच्छ धुवून काढला. हॉलची फरशीही धुवून चोळून स्वच्छ धुतली.

दुसऱ्या दिवशी दि. १.६.१९८३ रोजी सकाळी १०.०० नंतर त्या गाभाऱ्यात मंत्रोच्चारांच्या उच्च स्वरांत प.पू. दत्तमहाराजांचे हस्ते अत्यंत सुबक सुंदर श्रीकृष्ण आणि राधिकेच्या संगमरवरी मूर्तींची प्रतिष्ठापना झाली. तत्पूर्वी संकल्पासहीत गंगापूजन व मूर्तींस स्नान घातले. संपूर्ण दिवस अत्यंत उत्साहात आणि आनंदात गेला. राधेकृष्ण हरीची धून झाली. दिगंबराची धून झाली. प्रसाद भोजन झाले.

दि. २.६.१९८३ रोजी प.पू. महाराजांचे सोबतच आम्हा गुरुबंधूंचेही शास्त्रशुद्ध गंगापूजन, संपूर्ण पितरांचे श्राद्ध हे विधी पार पडले, आई-वडील, काका-काकी, आत्या, मामा-मामी, मावशी, आजी-आजोबा, वडीलांचे-आईचे, आपले पुरोहीत, गुरु, मोक्षगुरु जे कोणी स्वर्गवासी झाले असतील त्यांची पिंडे करून दान करावी लागतात. मला स्वत:स, गेलेल्या पितरांची २९ पिंडे करावी लागली. प्रत्येक गोष्ट आम्ही श्रींची कृती पाहून त्याप्रमाणे करीत होतो. श्रींचे पिंडाचे गोल गरगरीत पिंड बनविणे पाहून आम्हीही तसेच बनविण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु श्रींची प्रत्येक कृती अत्यंत नीटनेटकी, स्वच्छ, आटोपशीर असायची. कोठेही वेंधळेपणा-चाल ढकल नाही. अतिशय शिस्तबद्ध अगदी त्यांच्या हालचाली नुसते निरखतच बसावे.

सकाळी हा विधी पूर्ण झाल्यानंतर सर्वांनी पुन्हा गंगास्नान करून श्री विश्वेश्वराच्या दर्शनास व पूजेस गेलो. श्री विश्वेश्वरांसमोर श्रींच्या समवेत चोहोबाजूस आम्ही सर्व बसलो. श्री देवगुरुजी पूजा सांगत होते. नंतर बिल्वपत्रे वाहिली. केवढे आम्हां सर्व गुरुबंधूंचे भाग्य की सद्गुरु साक्षात् गुरुदेव तेच आमच्याकडून जणू स्वत: विश्वेश्वर पूजा करून घेत होते.

सायंकाळी श्रींचे व श्री देवगुरुजींचे सोबत आम्ही सर्व भक्त ठिकठिकाणची मंदिरे व देवदर्शनास निघालो. प्रथम श्री वेणुमाधव मंदिरात दर्शन घेतले. नंतर तेलंगस्वामींच्या मठात गेलो. श्री देवगुरुजींनी तेलंगस्वामींची माहीती दिली ती अशी -

श्री तेलंगस्वामी म्हणून योग सामर्थ्याने ३०० वर्षे जगलेले हे स्वामी काशीक्षेत्रांत होऊन

गेले. श्री रामकृष्ण परमहंस यांचे सहवासात राहून गेले. तसेच श्री स्वामी विवेकानंदांच्या चरित्रांतही तेलंगस्वामींशी विवेकानंदाचा पत्र व्यवहार झाल्याचे कळते. कोणीही बंगाली माणूस आला तर तो श्री तेलंग स्वामींच्या मठात येऊन दर्शन घेतल्याखेरीज जात नाही. श्री तेलंगस्वामींनी देह ठेवण्यापूर्वी स्वत:चा देह ठेवण्याकरीता स्वत:च्याच देहाच्या आकाराची खोबण दोन्ही शिळांमध्ये उभा अर्धा भाग (मूर्तीचा सांचा बनवावा असे भाग) तयार करून घेतले होते. ह्या दगडाच्या पेटींत ते अखंड राहू शकतील असे. शिवाय चार कोपऱ्यांस आणि मध्ये कडांना लोखंडी रॉड टाकून नट बोल्ट सारखे ते बंद करता येतील असे केले होते. मृत्यूनंतर त्यांचा देह ह्या दगडी पेटीत बंदीस्त करून सहा ते आठ ठिकाणी रॉडचे बोल्ट व कसण्यास नट लावून दोन भाग करून एकमेकांपासून सुटणार नाहीत असे करून गंगेत सोडावेत म्हणजे ती अखंड पेटी नदीचे तळात जावी अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे मरणोत्तर त्यांचा देह त्या साडेसात बाय साडेतीनच्या दगडी पेटीत बंद करण्यात आला. परंतु ती पेटी देहासह इतकी जड जाली की अनेक भक्तांच्या ताकदीनेही ती हले ना! शेवटी ती उघडून देहास काही दगडी शिळा बांधून नदींत सोडायचे ठरले. भक्त मंडळींनी ती पेटी परत उघडली आणि पाहतात तर काय त्यात स्वामींचा देह नव्हताच तर फक्त फुले आणि घातलेले हार होते. तेलंगस्वामी सदेह गुप्त झाले होते. कोण्या चित्रकाराने त्यांच्या हयातीत त्यांचे एक मोठे चित्र काढले आहे. ते मठात आहे. त्या दगडी संदुकीत आतून कोरलेला त्यांचा देहाचा आकार पाहता ते उंचीला ७ फूट आणि खांदे (आढे) दोन ते अडीच फूट तरी असावे. जाडजूड मोठ्या पोटाचे आणि धिप्पाड! त्यांच्या प्रतिमेत त्यांचे डोळे फारच बोलके तसेच भेदकही आहेत. त्यांच्या प्रतिमेवरती एक कालीमातेची मूर्तीही आहे. नंतर आम्ही श्रींचे सोबत श्री कालभैरवाचे दर्शनास गेलो. काशींत प्रवेश करताना प्रथम श्री कालभैरवांना वंदन व पूजन करावे लागते, नंतर क्षेत्र व इतर देवांचे दर्शन! कालभैरव काशीक्षेत्राचे क्षेत्रपाळ आहेत. जातानाही त्यांचा निरोप घेऊन व काळा गंडा दोरा बांधून निघावे लागते. श्रींचे बरोबर आम्हीही गंडे दोरे घेतले.

काशी परिसरांतील बहुतेक प्रमुख मंदिरे व देवता दर्शन पूर्ण करून प.पू. महाराज श्री देवगुरुजींचे घरी व आम्ही तारक मठात आलो.

दि. ३.६.१९८३ रोजी पहाटेला २ वाजता गयेस जाण्यासाठी आम्ही ठरविलेल्या बसमध्ये येऊन बसलो. आजारी अशक्त व अतिवृद्ध स्त्री पुरुषांना सोबत घेतले नाही. आमची बस ठीक ४.०० वाजता सुटली. गयेस आमची बस सकाळी ११ वाजता पोहोचली. परंतु उन्हे सहन होत नव्हती. प्रथम सूर्यतीर्थाचे दर्शन घेतले. स्नान करून श्री. मराठे गुरुजींच्या घरी भोजनास गेलो. पण घरी जाताच कळले की, त्यांचे घराण्यातील कोणी व्यक्ती मृत झाल्याने त्यांना सूतक होते. त्यांना आमचे पत्र व टेलीग्राम पोहोचला नव्हता. येणार हे माहीती असले तरी निश्चित

तारीख व वेळ माहीत नव्हती. त्यांच्या दृष्टीने आम्ही त्यांच्याकडे अचानक आणि अनपेक्षितपणेच पोहोचलो. तरीही त्यांनी प.पू. महाराज व त्यांच्याबरोबर आम्हा सर्वांकडून जी पूर्वजांची श्राद्धे पिंडदान करायची होती त्याकरिता दुसऱ्या गुरुजींकडे व्यवस्था केली. हे सर्व विधी यथाशास्त्र, यथा विधी पूर्ण होण्यास २ वाजले. श्री. मराठे यांनी त्यांचे स्वयंपाक घर व घरांतील शिधासाहित्य ताब्यात दिले होते. लागलीच सौ. सुलभाताई आणि आमचे गुरुबंधू श्रीकांत डांगे या दोघांनी उत्तमपैकी पिठले भात तयार केले. पिंडदान श्राद्ध हे सर्व विधी आटोपून स्नान करून आम्ही आलो. सर्वांनाच कडाडून भूक लागली होती. अशावेळी श्रींचे बरोबर पंक्तीस आम्ही पिठले भाताचे भोजन केले. काय त्या पिठले भाताला चव होती. 'अमृताते पैजा जिंके,' असे ते सुधामिश्रीतच जणू भोजन! यथेच्छ जेवलो. परत येतांना आम्ही ज्या वृक्षाखाली तप:श्चर्येस बसले असताना श्री गौतम बुद्धांना आत्मज्ञान झाले - प्रकाशमान झाले त्या बोधीवृक्षाचे परम भाग्याने श्रींचे समवेत दर्शन घेतले. ती सायंकाळची सहा वाजण्याची वेळ होती. जवळ जवळ अर्धा तास आम्ही त्या पवित्र भूमीत श्रींसह आनंद भोगला. नंतर सरस्वती नदीचे कोरडे पात्र पाहिले. तेथेही थांबलो. ही नदी येथे गुप्तपणे वाहते. एखाद्या फूटाच्या या पात्रांत हाताने खड्डा खणला तर पाणी लागते.

दि. ४.६.१९८३ रोजी पहाटे ३ वाजता आमची बस काशी येथे येऊन पोहोचली. साहजिकच तारक मठात जाऊन झोपल्यानंतर सकाळी उठण्यास उशीर झाला. गंगास्नान करून सर्व आलो. भोजनोत्तर थोडी विश्रांती झालीच.

मध्यंतरीच्या काळात सुरुवातीसच २-३ दिवसात प.पू. महाराज आम्ही कुठे कुठे उतरलो आहोत, काय व्यवस्था आहे ते पाहून गेले. वरचे मजल्यावर श्री. घोलकर यांच्या मातोश्री तापाने आजारी झाल्या होत्या. त्यांनाही महाराज स्वत: जातीने येऊन भेटून गेले.

आमची त्रिस्थळी यात्रा आज पूर्ण झाली.

दि. ५.६.१९८३ रोजी सकाळी ११ वाजताच्या वाराणसी-दादर या गाडीने मुंबईस निघालो.

दि. ६.६.१९८३ रोजी सोमवारी रात्री ८.३० वाजता आम्ही सर्व दादरला उतरलो. श्री. गोडसे यांना त्यांचे वडीलांचे वर्षश्राद्ध करायचे होते. म्हणून ते प.पू. महाराजांसोबत मागे थांबले.

काशीला दि. ४.६.१९८३ शनिवारी सायंकाळी ४ च्या सुमारास आम्ही श्रींच्या सोबत वेदभवनांत गेलो होतो. ती अवाढव्य इमारत होती. ह्या इमारतीत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद अशी चार कक्षे होती. एक प्रशस्त हॉलमध्ये प.पू. दत्तमहाराजांना अध्यक्षपदी नेमून मोठी विद्वत् सभा भरली होती. उच्चासनावर प.पू. महाराजांना बसण्यास प्रशस्त व्यासपीठ होते. डाव्या आणि उजव्या भागात दोन भाग करून विद्वान पंडीत बसले होते. बहुतेक मंडळी उघडी

होती. अंगावर उपवस्त्र, उपरणे किंवा साधा लाल चौकडीचा रुमाल घेतलेले, मळकट रंगाचे (तांबूस पंचावजा) धोतर नेसलेले, रंगाने तांबूस किंवा हवामानापरत्वे काळेच होते. मुंबईचा हातगाडी लोटत नेणारा घामेजलेला व खांद्यावर चौकडीचा लाल रुमाल टाकलेला भैय्या असतो तसे. तुम्हास जरा सुद्धा वाटणार नाही की, हे विद्वान ब्राह्मण किंवा पंडीत आहेत म्हणून! त्यात काही तरुणपण होते, मध्यमवयीन आणि वृद्धही होते. एक एकजण श्रींचे पुढे येऊन गुडघ्यावर बसायचा, उजव्या हाताने डाव्या कानाची पाळी व डाव्या हाताने उजव्या कानाची पाळी पकडून नतमस्तक व्हायचा आणि आपली ओळख संस्कृत भाषेत ''अहम् विनायक शर्मा, उपाध्ये उपनामे, ... गोत्रे, कुलोत्पनः'' याशिवाय कोणत्या शाखेत शुक्ल यजुर्वेदी कां ऋग्वेदी ते सर्व कथन करून दंडवत घालून आपले जागेवर येऊन बसायचा. आपली ओळख देण्याचे संपल्यानंतर चर्चा सत्रास प्रारंभ झाला. जसे आपले शाळेत कॉलेजात डिबेटींग असते ना तसेच! विषय होता ''जे हिंदु आपला धर्म सोडून परकीय धर्मांत गेले आहेत त्यांचे पैकी काहींना पुन्हा हिंदु धर्मात यायचे असेल तर त्यांना पुन्हा हिंदु करून धर्मांत घ्यावे किंवा नाही.'' अर्थात् हे चर्चासत्र संपूर्ण संस्कृत भाषेतून होते. आमने सामने बसलेले एकमेकांचे विरोधी मुद्दे मांडणारे होते. एका बाजूचे म्हणणार धर्मात घ्यावे व कां घ्यावे ते कथन करणार तर दुसऱ्या बाजूचे धर्मांत घेऊ नये म्हणणार व त्याची कारणे मांडणार! असे हे सत्र बराच वेळ चालले.

उदाहरणार्थ एका गटाने म्हटले, ''शिवाजी महाराजांनी सुद्धा नेताजी पालकरला परत हिंदु करून घेतले ना?'' दुसरा गट म्हणतो, ''शास्त्राने हे मंजूर नाही पण राजा हा विष्णूरूप असल्याने त्याचा शब्द प्रमाण मानला जातो! वगैरे.

दोन्ही बाजूंचे सत्र खूप रंगले परंतु हार कोणाचीच होईना म्हणून अंतिम निर्णय शास्त्री आणि पंडीत असलेल्या विद्यावाचस्पती, राष्ट्रीय पंडीत आणि शिवाय महामहोपाध्याय असलेल्या प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांना विचारण्यात आला.

प.पू. महाराज म्हणाले, ''इतर धर्मीयांचे मिशनरी कार्यकर्ते असतात, मग तो ख्रिश्चन धर्म असो, इस्लाम धर्म असो असे अनेक धर्मीय आपल्या हिंदु लोकांस नाना आमिषे दाखवून आपले धर्मात घेत असतात. पोतुगीजांनी तर भारतात उष्टे पाव विहीरीत टाकून ते पाणी पिणाऱ्यांना तुम्ही बाटलेत म्हणून आपले धर्मांत घेतले, इतिहासात काही मोंगल बादशहानी सक्तीने धर्म स्वीकारायला लावला. आपला हिंदु धर्म सनातन आहे. सर्व धर्माबद्दल सहिष्णुता आणि आदर ठेवणारा आहे. हिंदु धर्मीय कधीही परधर्मीयांना आपला धर्म स्वीकारण्यास गळ घालीत नाही. अशा स्थितीत आपल्या हिंदु धर्मीयांचे प्रमाण घटत जाते. म्हणून निदान आपल्या धर्मांतून बाहेर गेलेले पश्चाताप पावून पुन्हा परत येत असतील तर त्यांना विधीपूर्वक शुचिर्भूत करून पुन्हा धर्मांत घेण्यास काहीच हरकत नाही.

ही सर्व भाषणे अर्थात संस्कृतांतूनच झाली.

आम्ही सर्व मुंबईस परतलो. पण प.पू.महाराज, सौ. आईसाहेब, श्री. अशोकराव, सौ. सवितावहिनी, चि. आमोद, कु. रेणुका, श्री. रघुनाथराव व सौ. वासंतीवहिनी आणि आमचे गुरुबंधू श्री. गोडसे मागे राहिले. श्री. गोडसे यांच्या वडीलांचे वर्षश्राद्ध बाकी होते. प.पू. महाराजांनाही आणखी काही श्राद्ध विधी व विश्वेश्वर तसेच इतर मंदिरांतील देवतांचे पूजन व दाने करणे बाकी होती.

श्री. गोडसे सांगतात - दि. ५.६.१९८३ रोजी सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत श्राद्ध विधी पिंडदान झाले. नारद घाटावर दत्तमठांत श्रींना व सोबतचे मंडळींस प्रसाद भोजन झाले. येताना सर्व नौकेतून आले. श्री देवजींची व प.पू. महाराजांची काशीमाहात्म्य आणि क्षेत्रात होऊन गेलेल्या महात्मे या विषयावर चर्चा झाली. दि. ६.६.१९८३ रोजी सकाळी श्राद्धविधीच झाले.

दि. ७.६.१९८३ रोजी 'श्रीं'ची क्षेत्रस्थ विधींना सुरुवात झाली. प्रथम संकल्पपूर्वक गंगा स्नान झाले. देवीचे मंदिरात जाऊन कुंकूमार्चन झाले. देवीचे मूर्तीवर मंत्रपूर्वक चिमटी चिमटीने कुंकू अर्पण केले जाते. यानंतर श्री व सर्व मंडळी विश्वेश्वरांचे मंदिरात गेली. गर्दी अजिबात नव्हती. श्री विश्वेश्वराची पूजा यथासांग यथाविधी अगदी निवांतपणे झाली. प.पू. महाराजांना अनेक भक्तांकडून जे जे सुवर्ण अर्पण केले गेले होते ते त्यांनी प्रत्येक मंदिरात देवावर वाहिले. संध्याकाळी वसंतपूजन केले. येथील जास्तीत जास्त वैदिक ब्राह्मण बोलावून मंत्र जागर केला. प्रत्येक ब्राह्मणास धोतर, उपरणे व दक्षिणा दिली. सर्वांस वसंतपेयही दिले. श्रींनी या काशी यात्रेत अत्यंत सढळ हस्ते जास्तीत जास्त दानधर्म केला. निघण्यापूर्वी श्री रघुनाथरावांना 'श्री शिल्लक बाकी आहे कां?' असे विचारले. श्री. रघुनाथराव म्हणाले, "आता फक्त परतीच्या प्रवासापुरतेच पैसे शिल्लक आहेत." ते ऐकून श्रींना मनस्वी समाधान झाले. गंगामाईने सगळे करून घेतले.

दि. ८.६.१९८३ रोजी 'श्रीं'नी राहिलेले श्राद्धविधी पूर्ण केले.

दि. ९.६.१९८३ रोजी मागीलप्रमाणे विद्वत् सभा झाली. काशीतील पंडीतांतर्फे श्रींचा मोठा सत्कार होऊन त्यांना मानपत्र देण्यात आले. श्रींच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. त्याचा निर्णय श्रींनी दिला. सर्व संस्कृतांतूनच!

दि. १२.६.१९८३ रोजी निघता निघतांचे गंगास्नान सर्वांनी आटोपले. ११.३० च्या महानगरी एक्सप्रेसने सर्व परत निघाले. अलाहाबादला श्री. पित्रे गुरुजी परिवार गाडीवर श्री दर्शनास आले होते. जबलपूरच्या पुढे गाडी आल्यावर एका डब्याच्या खालील भागात बिघाड होऊन खोळंबा झाला. बिघडलेला डबा बदलून नवीन लावण्यास ६ तास लागले.

श्रींनी निघताना स्नान केले नव्हते. संध्या राहिली. संध्याकाळी ६ वाजता ही गाडी भुसावळला पोहोचताच श्रींनी फलाटावरील नळाखाली स्नान करून संध्या केली. तोपर्यंत श्रींनी फक्त पाणी प्राशन केले होते. संध्या झाल्यानंतर थोडा फराळ केला. आज ह्या घोटाळ्याने देवपूजा राहिली ह्याचे श्रींना इतके वाईट वाटले की, ते म्हणाले, ''आमचे कुठले पाप आडवे आले, कुणास ठाऊक. आमच्या देवांना आज स्नान घडले नाही.''

दि. १४.६.१९८३ रोजी श्री काशीयात्रा आटोपून सकाळी ६ वाजता श्रींसह सर्व मंडळी पुण्यास पोहोचली. दि. १७.६.१९८३ रोजी श्रींनी पाठविलेले पत्र.

८५) काशी यात्रेनंतर श्रींचे पत्र

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास.
दि. १७.६.१९८३

सप्रेम सादर निवेदन, वि.क्षेम आपले व चि. दिनेशचे संयुक्त पत्र मिळाले. चि. दिनेश परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी त्याला २० तारखेस बोलावले वाचून समाधान वाटले. काशी विश्वनाथांची, गंगामाईची कृपा आपणा सर्वांवर आहे.

आम्ही उद्या दुपारी १२ वाजता मुंबई-बेंगळूर गाडीने येथून निघून परवा सकाळी ९ ला बेंगळूरला पोचू. २० तारखेपासून यज्ञास प्रारंभ आहे व ३० तारखेस समाप्ती आहे. नंतर १/२ दिवसात तेथून निघून इकडे परत येऊ. येथे ५ ते ११ जुलै पर्यंत सद्गुरु श्री वासुदेवानंद स्वामी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव आहे. ११ जुलैला पुण्यतिथी आहे. ती करून त्याच दिवशी रात्री महाराष्ट्र एक्सप्रेसने जळगांवला जायचे आहे. तेथे सप्ताह आहे. तो २० तारखेपर्यंत आटोपून २१ तारखेस रात्रीपर्यंत आम्ही मुंबईस गिरगांवामध्ये सौ. नीलाताई जोशी यांच्याकडे येऊन २२ ला संध्याकाळी इकडे परत येऊ. २४ ला श्री गुरुपौर्णिमा आहे. आपली सर्वांची काशी यात्रा श्री विश्वेश्वर कृपेने निर्विघ्नपणे व्यवस्थित पार पडली, ही आपले पूर्व सुकृत व श्रद्धा भावनेचे फळ आहे. यात्रेत आम्हालाही आपले उत्तम सहाय्य झाले. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. चि.. दिनेश बाबूस धन्यवाद व मंगल आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. २४.७.१९८३ रोजी रविवारी गुरुपौर्णिमेनिमित्त मी, श्री. गोडसे, श्री. शृंगारपुरे, श्री. घोलकर व श्री. मुजुमदार भाऊकाका आज पुण्यास येऊन दर्शनाचा लाभ घेतला.

श्री. मुजुमदारांना श्रींनी सांगितले की, घोरात् कष्टात् या पवित्र स्तोत्राचे पाठ स्नान करून शुचिर्भूत होऊनच करावेत.

दि. २६.८.१९८३ रोजी शुक्रवारी प.पू. महाराजांचे गंगापूजन आश्रमातच होते. आम्ही सर्व गुरुबंधू आदल्या दिवशीच आलो. प.पू. सौ. ताईमहाराज प्रथमच पुण्यात या कार्यक्रमाकरीता आल्या होत्या. श्री. अशोकराव व सौ. सवितावहिनी पूजेस बसले होते. दुपारी प.पू. महाराजांनी प.पू. ताईमहाराजांची सर्वांस ओळख करून दिली. हा प्रसंग म्हणजे श्री दत्तमहात्म्यांतील 'दत्त रेणुकामातेच्या' संवादा सारखाच भावला. आम्हा सर्व साधकांतर्फे श्रींच्या घरी जाऊन श्रींना गरम पाण्याकरिता गिझर व सौ. आईसाहेबांस साडी अर्पण केली.

दि. १९.८.१९८३ रोजी प.पू. महाराज व सौ. ताईमहाराज जालन्यास रवाना झाले.

दि. १.९.१९८३ पासून श्रींची हिंगोली येथे श्री गुरुचरित्रावर प्रवचने सुरू झाली.

दि. ७.९.१९८३ रोजी आमच्या घरी गंगापूजन झाले आणि दुसऱ्या दिवशी आमची मातोश्री सकाळी काही केल्या उठेच ना! श्वास चालू, घोरणेही चालू पण हाकेला साद देईना. डॉक्टर आले. त्यांनी ती कोमांत गेली असल्याचे सांगितले. मग गोरेगांव येथीलच बालीगा हॉस्पिटल मध्ये तिला दाखल केले. श्रींना लागलीच पत्राने कळविले.

श्रींचे आलेले पत्रोत्तर -

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास.
दि. १४.९.१९८३

सप्रेम सदर निवेदन, वि. क्षेम,

श्री मातोश्रींची प्रकृती बरी नसल्याबद्दल व उपचार चालू असल्याबद्दल आपले व सौ. प्रभाताईंचे पत्र मिळाले. ईश्वर प्रार्थनापूर्वक आपले सेवा कर्तव्य चालू आहे. कर्मभोग सर्वांनाच अपरिहार्य आहे. ईशकृपेने सत्पुत्र कर्तव्य आपण करीत आहात. यातच आपले कल्याण आहे. ईश्वरेच्छेनेच सर्व घटना घडून येतात. प्राप्त कर्तव्याकडे आपण लक्ष देऊन राहणे एवढेच जीवाला करता येते. ईश्वरस्मरण करीत शांतचित्ताने रहावे. कळावे.

आमचा मुक्काम विजयादशमी पर्यंत येथे आहे. नंतर देऊळगावी जाणार आहोत. काय ठरते पाहू, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. १४.९.१९८३ रोजीच गणेश गौरी विसर्जन झाले. प.पू. महाराजांचा भागवत सप्ताह आश्रमात दि. १५.९.१९८३ पासून सुरू झाला. सप्ताहाची समाप्ती दि. २२.९.१९८३ ला

झाली. दि. २६.९.१९८३ रोजी सायंकाळी ६.३५ ला हॉस्पिटल मध्येच मातोश्रींचे निधन झाले. दुसऱ्या दिवशी ही दु:खद बातमी पत्राने मी प.पू. महाराजांस कळविली. माझे पत्र त्यांना दि. २८ किंवा २९ ला मिळाले असेल आणि लागलीच दि. २९ ला प.पू. महाराजांनी मला सांत्वनपर पत्र पाठविले ते पुढे देत आहे.

८६) आमच्या मातोश्रींचे निधनानंतर 'श्रीं'चे पत्र

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास.
दि. २९.९.१९८३

सप्रेम सादर निवेदन, आपले श्री माताजींचे देहावसान झाल्याचे वाचून वाईट वाटले. आपणांप्रमाणे सौ. प्रभाताईंनाही फार दु:ख झाले असणार. एक निर्व्याज प्रेमाचे छत्र नाहीसे झाले. ईश्वरेच्छेपुढे इलाज नाही. मागील वर्षी हरेश्वर येथील उत्सवांत त्यांना पुष्कळच समाधान लाभले होते. आपणासही शेवटपर्यंत त्यांची सेवा घडली. ही देखील ईश्वरकृपाच आहे, नाहीतर कुठेतरी नोकरीच्या स्थानी रहावे लागले असते तर वेळेवर येणेही कठीण. काही काळानेच हे दु:ख कमी होणारे आहे. त्यांचे प्रेमाशीर्वाद आपले पाठीशी आहेतच. ईश्वर त्यांना उत्तम गति देवो ही प्रार्थना. आम्हीही आपले दु:खात सहभागी आहोत. सौ. प्रभाताईंचे व इतरांचेही सांत्वन करण्याचा प्रयत्न करून पुढील कार्याकडे लक्ष द्यावे. त्यांचे उत्तरकार्य हरेश्वरला करणार काय? जेथे सोईचे होईल तेथे करण्यास हरकत नाही, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

८७) देऊळगांवी धर्मशाळेच्या बांधकामाचे नियोजन

रविवार, दि. १६.१०.१९८३ रोजी विजयादशमी होती. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सोने द्यायला मी, शृंगारपुरे, श्री. गोडसे पुण्यास आलो. श्री. भाऊकाका मुजुमदारही प्रथमच आमच्याबरोबर आले होते. प्रथम आश्रमात जाऊन नंतर रात्री घरी जाऊन 'श्रीं'ना सोने दिले. दुसऱ्या दिवशी 'श्री' विदर्भाच्या दौऱ्यावर निघणार, देऊळगांवराजाला जाऊन गुरुद्वादशीस ते सालाबादप्रमाणे वाडीला जातील. आम्हीही वाडीला येण्याबद्दल अनुमती मिळविली.

प.पू. महाराजांनी देऊळगांवी श्री दत्तात्रेयांचे मॅझेनाईन फ्लोअरवर मंदिर व त्या मंदिराखाली तळघरात प.पू. धुंडीराज महाराजांची समाधी व मूर्ती स्थापित झालेली आहे. या वास्तूच्या

८७) देऊळगांवी धर्मशाळेच्या बांधकामाचे नियोजन

रविवार, दि. १६.१०.१९८३ रोजी विजयादशमी होती. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सोने द्यायला मी, शृंगारपुरे, श्री. गोडसे पुण्यास आलो. श्री. भाऊकाका मुजुमदारही प्रथमच आमच्याबरोबर आले होते. प्रथम आश्रमात जाऊन नंतर रात्री घरी जाऊन 'श्रीं'ना सोने दिले. दुसऱ्या दिवशी 'श्री' विदर्भाच्या दौऱ्यावर निघणार, देऊळगांवराजाला जाऊन गुरुद्वादशीस ते सालाबादप्रमाणे वाडीला जातील. आम्हीही वाडीला येण्याबद्दल अनुमती मिळविली.

प.पू. महाराजांनी देऊळगांवी श्री दत्तात्रेयांचे मॅझेनाईन फ्लोअरवर मंदिर व त्या मंदिराखाली तळघरात प.पू. धुंडीराज महाराजांची समाधी व मूर्ती स्थापित झालेली आहे. या वास्तूच्या

बाजूस काही जागा सोडून धर्मशाळा व धर्मशाळेत मोठा हॉल बांधायचे श्री. जगनशेठ धन्नावत यांनी ठरविले असल्याचे सांगितले.

या धर्मशाळेचा तळघर धरून तीन मजली म्हणजे तळघर, ग्राऊंड फ्लोअर व फर्स्ट फ्लोअर असा प्लॅन त्यांचे मार्गदर्शनाखाली त्यांना कसा व किती क्षेत्रफळाचा पाहिजे ते विचारून तुमच्या ओळखीचे मुंबईचे आर्किटेक्ट व आर.सी.सी. इंजिनिअर यांचे सहाय्य घेऊन करावा असे मला सांगितले. ''तुम्हीही तुमच्या अनुभवाचे सल्ले त्यांना द्यावेत! आजपर्यंत झालेले बांधकाम हे त्यांचेच मार्गदर्शनाखाली झाले आहे. पण ही धर्मशाळेची वास्तू मोठी होणार आहे. तरी तुम्हीही त्यांत प्लॅन्स पूर्ण करून देण्याबाबत तरी लक्ष घालावे!''

श्रींच्या आज्ञेनुसार मी लागलीच माझ्या ओळखीचे इंजिनिअर श्री. जयंत कर्णिक, शिवाजी पार्कला राहतात त्यांना भेटलो. पाहणी करण्यास श्री. कर्णिक दि. २३.१०.१९८३ ला आमचे बरोबर येण्यास तयार झाले.

मुंबई सेंट्रलवरून सुटणाऱ्या एशियाड बसने मी, श्री. कर्णिक, श्री. गोडसे, शृंगारपुरे व भाऊ मुजुमदार सायंकाळी ७ वा. निघालो ते पहाटे ६.३० ला जालन्यात पोहोचलो. ही गाडी जालन्यापर्यंतच होती. आमचा हा जालना-देऊळगांव राजाला येण्याचा बेत अगदी अचानकच ठरला होता. एस्.टी. स्टॅण्डवरून देऊळगांवच्या एस्.टी. मध्ये बसण्यापूर्वी प.पू. ताई महाराज जुन्या जालन्यात आश्रमात आहेत कां? हे विचारण्यास श्री. रामभाऊ गाडे यांना फोन केला तर ते म्हणाले, ''ताईतर आहेतच. शिवाय महाराजही उद्या देऊळगांवला जाण्याकरीता येथे आलेले आहेत.'' साहजिकच देऊळगांवचा या क्षणी जाण्याचा बेत आम्ही पुढे ढकलला आणि आश्रमात गेलो. ही जालना आश्रमाला भेट देण्याची आम्हा तिघांची दुसरी वेळ होती. सकाळचे ८.३० वाजले होते. आम्ही आमचे मुखमार्जनादी प्रातर्विधी एस्.टी. स्थानकावरच आटोपून आलो होतो. हवेत गारवा होता, उत्साहीत करणारा होता. त्यात आश्रमाचे वातावरण अतिशय शांत आणि प्रसन्न होते. आम्ही 'श्रीं'चे खोलीत हलकेच प्रवेश केला. श्री पलंगावर लोडास टेकून पेपर वाचीत होते. सूर्याची कोवळी किरणे बाजूच्या छोट्या खिडकीतून येऊन खोली प्रकाशमान करीत होते. ताई भिंतीस टेकून नतमस्तक उभ्या होत्या. आम्ही श्री वाचनात मग्न आहेत असे पाहून प.पू. ताईंस नमस्कार केला. ''बस तर पहाटे येते, तुम्हाला उशीर झाला!'' आम्ही म्हटले, ''आम्ही मुखमार्जन वगैरे सर्व आटोपूनच आलो!'' प.पू. महाराजांनी पेपर बाजूस करून आमच्याकडे पाहिले. प.पू. ताईंनी आम्ही सर्व मुंबईहून आल्याचे सांगितले. आम्ही 'श्रीं'चे दर्शन घेतले. नंतर प.पू. ताई म्हणाल्या, 'चहा घ्या आणि स्नान आटोपा, तोपर्यंत न्याहारीची तयारी होतच आहे.' आम्ही मागील बाजूस गेलो तर ताईंची सेवा करणाऱ्या मुली म्हणाल्या, ''तुम्ही येणार म्हणून पहाटेपासूनच आंघोळीचे पाणी तापवून ठेवले आहे!''

''आम्ही येणार हे तुम्हास कसे कळले?'' आम्ही विचारले. त्या मुली म्हणाल्या, ''ताईंनी सांगितले! तुम्ही चौघे पाचजण मुंबईहून आलात ना? गोडसे, नागले, शृंगारपुरे होय ना?'' ''होय! अगदी बरोबर!'' मग चला! पाणी ओतले आहे! एकेकाने जरूर तर दोघा दोघांनी आंघोळी करा. आम्ही गरम पाण्याच्या बादल्या देतो!'' आम्हा सर्वांसच या गोष्टीचे आश्चर्य वाटले. चहा घेताना प.पू. ताई समोर बसल्या होत्या. श्री. गोडसेंनी प्रश्न केला, ''ताई! इकडे येण्याचे आमचे अचानक ठरले, श्रींना सुद्धा आम्ही विचारले नव्हते कां सांगितले नव्हते. कारण येण्याचा आमचा बेतच नव्हता! असे असताना तुम्ही या सेवेकरी भगिनींना अगदी नावानिशी आम्ही येत असल्याचे कसे सांगितले?''

या आमच्या प्रश्नावर, ''आमच्याकडे बिनतारी फोन असतो!'' एवढेच त्या म्हणाल्या! खरं सांगायचे म्हणजे त्यावेळी बिनतारी फोन पण नव्हते आणि मोबाईलही नव्हते! असो.

प.पू. महाराजांना मी, ''श्री. जयंत कर्णिक या इंजिनिअरना, धर्मशाळेची जागा व जमिनीचा प्रकार वगैरे पाहिजे ती माहीती करून घेण्यास घेऊन आलो आहे. त्यांना घेऊन मी लागलीच देऊळगांवला जाऊन येतो म्हणजे सायंकाळचे गाडीने श्री. कर्णिक मुंबईस परत जाऊ शकतील. तर त्याप्रमाणे आम्ही तिघे निघू का?'' असे विचारले.

'श्रीं'नी व सौ. ताई महाराजांनी परवानगी दिली व काम झाल्यानंतर आश्रमातच येण्यास सांगितले. श्री. मुजुमदार मी व श्री. कर्णिक देऊळगांवराजा येथे जाऊन श्री. जगनशेठ धन्नावत यांना भेटलो व लागलीच साईटवर गेलो. शेठजींकडून इमारत बांधण्याची जागा व इमारतीची साईज, एकूण माळे वगैरे सर्व माहीती घेतली. आम्ही दोघांनी जरूर ती मोजमापे घेतली. तळघराबाहेरील जमीन, जमिनीचा स्लोप, ड्रेनेज नाल्यास कसे मिळविता येईल वगैरे सर्व आर्किटेक्टस् प्लम्बिंग सॅनिटरी वगैरेचा विचार करून सर्व नोंदी कर्णिकांनी करून घेतल्या. पुन्हा आर्किटेक्टलाही आणण्याची आवश्यकता भासणार नाही अशी सर्व माहीती घेतली. जमिनीचा प्रकार समजावून घेण्यास दोन मजुरांस तळघर जमिनीचे खाली छोटा खड्डा घेण्यास लावले व आम्ही श्री. शेठजींकडे जाऊन घरी सर्व चर्चा केली. हॉल, डायनिंग हॉल, खोल्या सर्व शेठजींच्या डोक्यांत असलेल्या कल्पना समजावून घेतल्या. त्यांचे घरीच भोजन घेतले. येता येता ५-0 फूट खोल खणलेल्या जमिनीचे सॅम्पल घेऊन आम्ही ४.३0 पर्यंत आश्रमात पोहोचलो. श्रींना सर्व कथन केले व लवकरच श्री. मिलींद सांभारे आर्किटेक्ट यांचे कडून आर्किटेक्चरल ड्रॉईंग व श्री. कर्णिकांकडून आर.सी.सी. ड्रॉईंग तयार करून घेतो म्हणून सांगितले. प.पू. महाराज पाचचे सुमारास देऊळगांवी गेले. आम्ही श्री. कर्णिक व भाऊ मुजुमदारांना मुंबईच्या बसमध्ये बसवून देऊन रात्री देऊळगांव येथे गेलो. प.पू. ताईंनी जिलेबी, बासुंदी, बदामाचा शिरा असे सात्विक भोजन दिले.

८८) श्री बालाजी मंदिरात देऊळगांवी उत्सव

दि. २३.१०.१९८३ रोजी रात्री आम्ही तिघे गोडसे, शृंगारपुरे व मी मुक्कामास श्री. जगनशेठजींकडे होतो. भल्या पहाटे उठून स्नाने आटोपून आम्ही श्री बालाजी मंदिरातील उत्सव पहाण्यास गेलो. मंदिराचे जवळच प.पू. धुंडीराज महाराज रहायचे ते घर आहे. तेथे प.पू. दत्तमहाराजांचे बंधू श्री पू. वासुदेवकाका त्यावेळी सहकुटुंब रहात होते. श्रींचा व रघुनाथरावांचा मुक्काम त्यांच्या घरीच होता. प.पू. महाराज पहाटे ४ वाजता स्नान आटोपून बालाजी मंदिरात आले होते. लळित कीर्तन सुरू झाले आणि सालाबादप्रमाणे ह्याच दिवशी वेळ येताच मंडपाच्या छप्पर ज्यांवर उभे असते त्या लाटा (म्हणजे उंच मोठे खांब) लाईनशीर अलगद आडव्या होऊन पडल्या. वैशिष्ट असे की ह्या लाकडी (खांब) लाटा कोणाचेही अंगावर पडत नाहीत. कापडी कनातीचे छप्पर आपले अंगावर पडावे म्हणून भाविक भक्तांची ओढ त्या छपराखाली येऊन छप्पर अंगावर घेण्याकडे असते. अंगावर छप्पर पडणे महत् भाग्याचे, पुण्याचे लक्षण समजले जाते. हा सोहळा आम्ही प्रथमच पाहिला. दिवस होता दि. २४.१०.१९८३ सोमवार अश्विन वद्य तृतीया होती. लळीत संपल्यानंतर श्रींच्या कुलपरंपरेप्रमाणे त्यांचे प्रवचन झाले. हा कार्यक्रम संपवून श्री ७ वाजता घरी परतले. आम्हीही श्रींचे घरी गेलो.

८९) श्रींचे देऊळगांवचे बालमित्र

श्री. अनंतरावांकडून श्री. गोडसे यांनी प.पू. दत्तमहाराजांचे कोणी बालमित्र आहेत कां व ते कोण कोठे राहतात ते विचारून घेतले. त्यांनी श्री. जपे, श्री. टाकळकर, श्री. मन्नावत अशी नांवे सांगितली. आम्ही लागलीच त्या त्या मंडळींना भेटलो. या मंडळींकडून आमच्या या सद्गुरु हिऱ्याचे किती तरी पैलू ऐकण्यास मिळाले. थोडक्यात असे -

प.पू. महाराज गायन कलेत निष्णात आहेत, ते तबला चांगला वाजवितात, ते पेटीही वाजवितात, भजन व पदें भक्तीगीते उत्तम गातात, प्रवचन तर करतातच पण त्यांनी कीर्तनेही केली आहेत. ते पाण्याच्या कोणत्याही प्रवाहात पोहण्यात तरबेज आहेत. सूर्यनमस्कारादी बल साधना बलोपासना त्यांनी केली आहे. सायकलींग चांगले करायचे. ज्ञान साधनेत तर ते ज्ञानेश्वरच आहेत. उत्तम वक्ते, प्रवचनकार आहेत. आणखी काय सांगावे? स्वभाव, आचरण हे अत्यंत शास्त्रशुद्ध असून ते संत महात्मे आहेत. ह्या सर्वांच्या कथनांतून बरीच माहीती कळलीच! शिवाय ह्या पुरुषोत्तमाची आदर्श गुणसंपदा आज आपण पहातच आहोत.

धर्मग्रंथांतून जे काही आदर्श वर्णिलेले आपण वाचतो, त्या सर्व गुणसंपदेच्या आदर्शांचे दर्शन प.पू. दत्तमहाराजांचे व्यक्तीमत्वांत घडते. गुणसंपदा जणू ओतप्रोत भरून वहात आहे. अमानित्व, शांत स्वभाव, निर्लोभीवृत्ती, अपरिग्रह, मितभाषीपणा, विनयशीलता, सहनशीलता, तितिक्षा, कारुण्य, क्षमाशीलता, प्रेमळपणा, सर्वांत असून अलिप्तता, संसारात असून संन्यस्तवृत्ती, सदोदित त्रयस्थाचे भूमिकेतून पाहण्याची सवय, स्थितप्रज्ञता, सकारात्मकता, धर्मशीलता कृतीने तर कोणास दुखविणे नाहीच. पण शब्दानेही हिंसा न करणे, सत्यवचनी, स्पष्टवक्ते, अत्यंत वक्तशीर, दिल्या वचनास जागृत, साक्षात धर्मराजच, विनोदात सुद्धा वक्रोक्ती नाही. जीवन यशस्वीपणे कसे जगावे हे दाखवणारी आदर्श मूर्ती म्हणजे प.पू. दत्तमहाराज!

९०) श्री रेणुकानिवास वाढीव बांधकाम संकल्प!

दि. २४.१०.१९८३ रोजी सकाळी श्रींची अनुमती घेऊन ठीक १०.३० वाजता आम्ही जालन्यास परतलो. प.पू. ताईमहाराजांचे आश्रमांतच भोजन झाले. प.पू. ताईंनी त्यांच्या वडीलांच्या म्हणजे प.पू. काजळकर महाराजांची "ॐ श्रीराम" मंत्र लिहीलेल्या असंख्य वह्या दाखविल्या. दुपारचे वेळी "प.पू. दत्तमहाराजांचे श्री रेणुकानिवासला लागून दोन खोल्या बांधण्याचे काम श्री. नागले यांनी लवकरात लवकर चालू करावे. प्लॅन म्युनिसिपल कार्पोरेशनकडे पाठविण्यास श्रींची सही मिळेल. आम्ही श्रींना आमचा संकल्प आहे फक्त तुमचे आशीर्वाद हवेत, असे म्हटले आहे. तेव्हा कार्य सुरू करा." असा ताईंचा आदेश घेऊन आम्ही रात्रीच्या ७.४० च्या जालना-मुंबई एशियाडने जालना सोडले.

९१) 'श्रीं'चे समवेत पहिली गुरुद्वादशी यात्रा

दि. १.११.१९८३ रोजी 'श्रीं'च्या बरोबर आम्हा सर्वांची श्री नृसिंहवाडीची पहिलीच गुरुद्वादशी उत्सवाची यात्रा झाली.

श्री. दामोदर बडु पुजारी यांच्या घरी श्री. गोडसे, भाऊ मुजुमदार, श्री. शृंगारपुरे फॅमिली व आम्ही नागले कुटुंब असे उतरलो होतो. श्री. दामुंच्या घरापासून मध्ये एक घर टाकून पुढील घरी प.पू. महाराज नेहमीप्रमाणे श्री. मुकुंद ऊर्फ बाळू पुजारींकडे उतरले होते. आम्ही आमचे सामान घरी ठेवून लागलीच श्रींचे दर्शन घेऊन आलो. श्रींचे आन्हिक आटोपून ते बाहेरच्या ओसरीत बैठकीवर बसून पत्रलेखनात व्यग्र होते. आमचे दर्शन-नमस्कार स्वीकारण्यास त्यांना त्यांचे लेखन थांबवावे लागले. श्री म्हणाले, "आपण सर्वांनी स्नान देवदर्शन वगैरे आटोपून

या!'' त्याप्रमाणे आम्ही सर्व सकाळचे कार्यक्रम आमचे संध्यादी आन्हिक आटोपून पुन्हा आलो. श्री निवांत होते. ''श्री. वढावकरांच्या आमंत्रणाप्रमाणे हैद्राबादच्या दौऱ्याचा कार्यक्रम कसा काय ठरवू या?'' ह्या श्री. गोडसेंच्या प्रश्नाला श्रींनी उत्तर दिले, ''चैत्र महिन्यात आमचे वडीलांची पुण्यतिथी येते, ती पूर्ण करून त्याला लागूनच हा कार्यक्रम ठरविण्यास हरकत नाही! बाकी तो कसा कोठे करायचा ती सर्व आखणी तुम्हीच करा!'' असे श्री. गोडसे यांना सांगितले. श्री. गोडसेंनी या दौऱ्यात श्री शैल्यम्लाही जाता येईल म्हणताच श्री खूष झाले व म्हणाले, ''चांगलं आहे! श्री शैल्यम्ला जाऊन आले म्हणजे पुनर्जन्म होत नाही असं म्हणतात! पूर्वी आम्ही प.पू. महाराजांसोबत (प.पू. गुळवणी महाराज) जाऊन आलो आहोत. येताना आमची मोटार बंद पडली. बराच वेळ थांबावे लागले. नंतर एस्.टी.ने आम्ही आलो.''



१२) श्री दत्तअमरेश्वर दर्शन व वृद्धस्वामी

मी श्रींना प्रार्थनापूर्वक म्हटले, ''आपले सद्गुरु प.प. श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराज ज्या दत्त अमरेश्वर मंदिरात राहायचे ते मंदिर दाखविण्यास औरवाडला आपण आमचे सोबत येऊ शकाल कां?'' या माझ्या प्रश्नावर श्री प्रसन्नचित्त हसले व म्हणाले, ''हो! हो जाऊ या! सायंकाळी ४ ते ४.३० ला आपण येथून निघू या! तसं येथून ते जवळ आहे. पायीच फिरत फिरत जाऊ या!''

कृष्णेच्या पुलावरून जातांना 'श्री' व श्री रघुनाथराव पुढे व आम्ही सर्व पाठोपाठ निघालो. 'श्री' काठी टेकीत पण जलद चालत होते. पूल संपताच 'श्री' दमल्यासारखे वाटले. क्षणभर थांबून आम्ही श्री दत्तअमरेश्वर मंदिर गाठले. श्री दत्त अमरेश्वराचे गाभाऱ्याच्या छोटेखानी दारासमोर बसून दोन्ही भुवयांचेवर कपाळाशी हात धरून श्री, अगदी निरखून एकमुखी सिद्धासनास्थित दत्तमुर्तीचे बराच वेळ दर्शन घेत होते. त्यांनी दंडवत घालून प्रदक्षिणा घातली. याच गाभाऱ्याचे मागील बाजूस असलेल्या योगिनींचे दर्शन घेतले. नंतर प्रथम वासुदेवपीठ मंदिरात शिरण्यापूर्वी औदुंबराच्या पारावर ते बसले. श्रींकडे पाहताच ते आपल्या परम गुरुदेवांच्या आठवणीने खूपच भावनाविवश झालेले दिसले. काही काळ विसावून श्री वासुदेव पीठांत प्रवेश करते झाले. प.प. वासुदेवानंदांच्या आणि प.प. नृसिंह दीक्षित स्वामी महाराजांच्या पादुकांचे अगदी तन्मयतेने दर्शन घेऊन दंडवत घातले. गाभाऱ्याच्या बाजूसच प्रवेशद्वाराचे समोर एक वृद्ध संन्यासी स्वामी जर्जर होऊन अशक्तपणामुळे भींतीस टेकून बसले होते. श्रींनी त्यांनाही डोके ठेवून लांबून नमस्कार केला व आपण दत्तात्रेय कवीश्वर म्हणून ओळख दिली. स्वामी उठून व्यवस्थित बसले. वृद्धापकाळाच्या यातनेने खिन्न उदास बसलेल्या स्वामींचा चेहरा

लागलीच बदलला व हसतमुख प्रसन्न चित्ताने, 'नारायण, नारायण' म्हणत श्रींना समोर बसण्यास आसन देण्यास सेवकास सांगितले. प.पू. महाराजांची त्यांनी आस्थापूर्वक विचारपूस केली. नंतर श्रींना ते आपल्या वार्धक्य यातना सांगू लागले. नित्य कृष्णास्नान कसे कष्टप्रद होत आहे. चालताना तोल जाणे, दंतपंक्ती नसल्याने खाणे म्हणजे फक्त द्रव पदार्थ, अशा अनेक यातना व देहास लागलेल्या कळा-वेदना-ठणके वर्णन करून म्हणाले "दत्त महाराज आम्ही थकलो आता! या यातना आम्हाला सहन होत नाहीत! आम्ही हात जोडून आपणास प्रार्थना करतो की, या यातनेतून तुम्ही आम्हाला सोडवा, या देहातून तुम्ही आम्हाला सोडवा!"

श्री - अहो हे सर्व नियतीच्या परमेश्वराच्या हातातील गोष्टी आहेत! आपले हाती काय आहे? येईल त्या स्थितीला सामोरे जाणे एवढेच आपले हाती आहे!

स्वामी - नाही महाराज! तुमच्या हाती सर्व आहे. परमेश्वर दुसरा तिसरा कोणी नाही. तुम्हीच साक्षात् भगवंत नारायण आहात! सोडविणे तुमच्या हाती आहे! तुम्हीच आमचेवर दया करा आणि या यातनेतून या देहातून तुम्ही आम्हाला सोडवा!

श्री - जगन्नियत्याला सर्व चिंता आहे. तो दयाळू ईश्वर तुमचे हाकेला धावेल! आपण शांत व्हा!

नंतर त्या स्वामी महाराजांनी आपली पेटी उघडून आम्हा सर्वांस खडीसाखरेचा प्रसाद दिला. आम्ही सर्वांनी त्यांचे दर्शन घेऊन दंडवत घातले.

हे स्वामी मूळ गोव्याचे! त्यांचे सध्याचे नाव श्री परशुरामस्वामी महाराज! हे प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचे शिष्य! श्री दीक्षित स्वामींचे सहवासात ते येथे औरवाड श्री दत्त अमरेश्वर मंदिरात राहिले ते अखेर पर्यंत! वरील संभाषण प.पू. दत्त महाराजांसोबत झाले तेव्हा त्यांचे वय १०३ वर्षांपेक्षाही जास्त असावे. यानंतर काही दिवसांतच ते ब्रह्मलीन झाले.

९३) श्री दत्तअमरेश्वर मंदिर निवासी यमुताई

प.पू. महाराज, स्वामी महाराजांशी संभाषण संपवून बाहेर आले आणि मागील बाजूचे खोलीत वृद्ध यमूताई रहात होत्या त्यांचे भेटीस गेले. या ती. यमूताई देखील प.प. नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांच्या शिष्या! जेव्हा जेव्हा श्री दत्तमहाराज अमरेश्वर मंदिरात येत तेव्हा तेव्हा ते यमूताईंची भेट घेत! त्यांचे आध्यात्मिक संभाषण खूप वेळ चाले. दोघांनाही एकमेकांबद्दल गुरुबंधू-भगिनी म्हणून अत्यंत आत्मियता व प्रेम असल्याचे प्रत्ययास येई. इतकेच काय पण आम्ही प.पू. दत्तमहाराजांचे भक्त म्हणून आम्ही जरी त्यांचे दर्शनास

गेलो तरी दत्ताशास्त्रींचे भक्त माझ्या घरी (दारी) आल्याचा त्यांना खूप आनंद होई. "बसा हं बाळानो! मी तुमच्यासाठी चहा टाकते!" असे म्हणून उठत. त्यांची वृद्धावस्था पाहून आम्ही फक्त साखर हातावर मागत असू! भेटीत दत्ताशास्त्री कसे भागवत सांगत, स्वामी गुरुमहाराज कसे ते मन लावून ऐकत, स्वामींचे ते कसे लाडके होते, एकदा भागवत सप्ताह संपल्यानंतर श्री दीक्षित स्वामी महाराजांनी फुलांनी सजविलेल्या नावेतून दत्ताची त्याचे गळ्यात हार वगैरे घालून कशी मिरवणूक काढली होती, दत्ता कसा गोरा गोमटा सुदृढ अंगाचा आणि विनय मूर्ती होता. कसा शांत, मृदुभाषी होता आणि अजूनही आहे हो!" हे सर्व वर्णन त्यांच्या तोंडून ऐकण्यास आम्हाला खूप मजा वाटायची! एकदा त्या चष्मा हातात घेऊन कोठला तरी ग्रंथ वाचत होत्या! आम्हांस म्हणाल्या, "मला आता दिसत नाही, मग मी हा चष्मा वापरते! माहीती आहे का, हा कोणाचा चष्मा आहे? हा माझ्या सद्गुरुंचा श्री नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचा आहे! त्यातून मला चांगले दिसते!"

एकदा त्यांनी श्री दीक्षितस्वामी महाराजांच्या शिष्येची गोष्ट सांगितली. त्या म्हणाल्या, "ती एक वेश्या होती. ती आपला धंदा सोडून उर्वरीत आयुष्य भक्ती मार्गात घालवावे म्हणून स्वामींना शरण आली. तिला पुढे कुष्ठ रोग झाला. तिच्या हातात एका पुस्तकापेक्षाही लहान आकाराची पेटी होती. तिची दोन्ही झाकणे पुस्तकासारखी उघडझाप करीत राहिले की एकच सूर एकसारखा निनादत रहायचा! एकतारीवर भजन गावे तसे ती त्या सुरांत भजने-पदे गायची! पुढे लोकांना त्रास होऊ लागला. त्यात कुष्ठव्याधी झाल्याने लोकांनी तिला गावाबाहेर एका झाडाखाली नेऊन ठेवले. तरीही कधी कधी दत्त अमरेश्वर मंदिराच्या आत तिच्या त्या पेटीचा आणि तिच्या पदांचा गीतांचा आवाज यायचा! लोक म्हणायचे, 'आली वाटतं ही बया!' पुढे तिच्या देहात किडे पडून अत्यंत यातनेत तिला मृत्यू आला. माझ्या मनात आले एवढी ही स्वामी महाराजांची भक्त! सतत नामगान भक्ती करणारी, असं असताना हिला असं मरण आणि अशा यातना भोगायची कां बरं वेळ यावी? अहो, सांगायचं म्हणजे, त्याच रात्री ती माझ्या स्वप्नांत आली आणि म्हणाली, "अगं यमूताई! हा असला काय विचार करते आहेस? अगं महाराजांनी मला गुलाब फुलांच्या मऊ मऊ शय्येवर झोपविले आहे आणि त्यांचे सतत सान्निध्य मला लाभले आहे!"

पुढे प.पू. महाराजांचे संकल्पाने श्री दत्त अमरेश्वर मंदिर आणि आजूबाजूंच्या सर्व खोल्यांचे जीर्णोद्धाराचे काम निघाले. ते सुरू होण्यापूर्वीच पूज्य ती यमूताई स्वामी चरणीं निघून गेल्या होत्या! मातीच्या कच्च्या बांधकामांतील भिंती मध्येच त्यांनी मडक्यात साठविलेल्या चांदीच्या मोहरा भिंत तोडतांना सापडल्या व त्या मोहरा श्रींचे आज्ञेने आम्ही सरकारकडे जमा केल्या. ते पुढे ओघाने येईलच.

श्री दत्त अमरेश्वर-योगिनी-वासुदेवपीठ-परशुरामस्वामी दर्शन, यमूताई दर्शन सर्व आटोपून आम्ही श्रींचे समवेत पायी पायीच वाडीस परतलो.

आपल्या भक्तांविषयीची आस्था अनेक प्रसंगी दिसते. श्री. नगरकर असेच एक भक्त. त्यांच्या ज्ञानाचा योग्य उपयोग होईल अशी नोकरी श्रींच्या कृपेने त्यांना मिळाली.

दि. २.११.१९८३ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत श्री अचानक देवाजवळ आले आणि पादुका मंदिराच्या दक्षिणद्वाराजवळ बसले. बरेच भक्त व इतर भाविक लोक तिथे येऊन श्रींना नमस्कार करू लागले. श्री दत्तप्रभूंचे मंदिराजवळ आपल्याला कोणी नमस्कार केलेले श्रींना अजिबात आवडत नाही. ते तेथून उठले व उत्सवमूर्ती ज्या चांदीच्या सिंहासनावर ठेवतात त्याचे बाजूला जाऊन बसले. आम्ही घोरात् कष्टात् स्तोत्राचे पाठ करीत मंदिरात बसलेल्या देवांना अर्थात् श्रींना प्रदक्षिणा घातली. रात्री मंदिराहून परततांना श्रींनी दामूंचे घरी फराळास यावे असे श्रींना आमंत्रण दिले. त्याप्रमाणे श्री आले सुद्धा. श्रींचे पायघड्या घालून यथोचित स्वागत झाले. श्रींचे बरोबर आमचा सर्वांचा दिवाळीचा फराळ झाला. नंतर आम्ही सर्व नारायणस्वामींच्या कट्ट्यावर गेलो. श्री दत्तप्रभुंच्या पालखीची तयारी चालू होती. नारायणस्वामींचे मंदिरात दारासमोरच उत्सव मूर्तीस पुजारी अत्यंत हळूवार नीटनेटकेपणे सजवित होते. नेत्री काजळ कोरणे, गंध लावणे, अलंकार घालणे, धोतर पगडी व्यवस्थित घालणे. ही मूर्तीची रंगभूषा, वेशभूषा सजावट चालू असताना नेहमीप्रमाणे मूर्तीचे उजव्या बाजूस बसून प.पू. महाराज स्वारींना पुराण ऐकवीत होते. प्रवचनांतून गुणगान आणि स्तुती सुमने उधळत होते. आज गुरुद्वादशीस पालखी रात्री १.३० ते पहाटे ५ वाजेपर्यंत असते. थोडा वेळ थांबून श्रींचे पाठोपाठच आम्ही घराकडे परतलो.



१४) ते रुप देखियले म्यां कृष्णातीरी।

श्री नारायण स्वामींच्या मठाजवळ मठाबाहेर पोवळीवर बसलेले प.पू. श्री महाराज -

सगुण साकार कैवल्याचे धाम।
ते रुप देखियले, म्यां, कृष्णातिरी।।
शांत नि दांत सदा ब्रह्म लीन।
ते रुप देखियले, म्या कृष्णातिरी।।
वात्सल्यस्वरुप स्वानंदे निमग्न।
ते रुप देखियले, म्यां कृष्णातिरी।।



१५) श्रींचे वाडीत दर्शन

श्रींच्या सहवासात काही दुर्मिळ दृश्ये बघायला मिळाली. त्यापैकी एक म्हणजे वाडीला पादुकांची त्यांनी केलेली पूजा.

दि. ३.११.१९८३ ला 'श्री' स्नान करून ओलेत्यानेच प.प. वासुदेवानंदांचे ओवरीत आले. तिथे त्यांनी स्वामी महाराजांची पूजा केली तोपर्यंत आम्ही ओवरीतच बैठक आटोपून घेतली. 'श्रीं'चे पाठोपाठ आम्हीही खाली देवाकडे गेलो. 'श्रीं' आत गेले आणि पादुका गाभाऱ्याचे दाराशी जी बैठकीची जागा आहे तेथे बसले. आम्ही सर्व बाहेरून पहात होतो. 'श्रीं'नी पादुकांची महापूजा केली. या दुर्मिळ दृश्याचे श्री. गोडसेंनी फोटो घेतले. 'श्रीं'नी स्वहस्ते पादुकांवर फुले वाहिली. नैवेद्य दाखविला. आम्हा सर्वांस 'श्रीं'नी ते उतरले होते त्या पुजाऱ्यांचे घरी प्रसादभोजनास आमंत्रण दिले. प्रसाद भोजनाचा लाभ घेऊन आम्ही रात्रीच्या एस्.टी.ने बंधुंकडे गेलो.

१६) श्री वामन निवास

श्री वामन निवासाच्या बांधकामास प्रारंभ दत्तजयंती सोमवार, दि. १९.१२.१९८३ रोजी झाला. एक ते दीड वर्षापूर्वी प.पू. महाराजांना मी दरमहा पौर्णिमेस दक्षिणा पाठवायचीच असे ठरवून दक्षिणा पाठविली आणि मनीऑर्डर पोहोचताच श्रींचे पत्र आले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ''आपण वारंवार दक्षिणा पाठवू नये. आम्हाला यत्किंचितही अपेक्षा नाही. त्यापेक्षा आम्हांला तुमच्या स्थापत्यशास्त्रांतील ज्ञानाचा उपयोग श्री वामन निवासाचे बांधकामास व्हावा, ही अपेक्षा आहे. याबद्दल प्रत्यक्ष भेटीत बोलूच!'' दरम्यान श्री. रघुनाथराव कुलकर्णी भेटीत म्हणाले, ''नागले! तुमचे नाव महाराज वेळोवेळी काढतात व म्हणतात वामन निवासाला नागले सारख्यांची मदत, काम करून घेण्याचे दृष्टीने चांगली होईल. वामन निवासाचे बांधकामाकरिता त्यांनी तुम्हाला हेरून ठेविले आहे!''

यानंतर दि. ९.६.१९८२ रोजी आलेले पत्र वर दिलेले आहेच. त्यात प.पू. महाराज लिहीतात ते संदर्भाकरीता लिहीत आहे.

''आपणाकडून धनाचे सहाय्य तर आम्हाला नेहमी चालूच आहे. धनापेक्षा मनाचे सहाय्य महत्त्वाचे आहे, तेही आपले आहेच! त्याचीच यापुढे विशेष जरूरी आहे. पुण्यास सध्या श्री वामन निवासाचा नकाशा, मॉडेल तयार करण्याचे कार्य चालू आहे. त्या वास्तुची उभारणी करण्याचे कार्य आपणासारख्या आत्मीय वास्तुशास्त्रज्ञांच्या देखरेखीनेच उत्तम प्रकारे पार पडणार आहे, याबद्दल पुढे सवडीने चर्चा करता येईल. या कार्याकरिता श्री. कुर्लेकरांनी, तेथील योग्य

मंडळींची एक स्थायी सहाय्यक समिती स्थापन केली असून येताना नकाशा, खर्चाचा अंदाज घेऊन येणेस लिहीले आहे. संध्याकाळी रोज २५ ते १ तारखेपर्यंत ६ ते ९ 'भागवतार्थ कथनाचे' कार्यही आमच्याकडे त्यांनी दिलेले आहे. पण ते अंगभूत असून मुख्य कार्य श्री वामन निवासाचे आहे. आणि ते अनंतहस्ते परमात्म्याच्या असीम कृपेनेच पूर्ण होणार आहे.''

दि. १३.११.१९८३ रोजी रविवारी पहाटे मुंबईहून निघून सकाळी ११ वाजेपर्यंत पुणे येथे श्री वासुदेव निवासात पोहोचलो. या दिवशी सकाळी येऊन भेटावे म्हणून श्रींचा निरोप आला होता.

मी आल्याबरोबर हातपाय धुवून वर गेलो तर प.पू. महाराज त्यांचे बैठकीवर एकटेच बसले होते. मी साष्टांग नमस्कार करून उठताच माझ्याकडे निरखून पहात म्हणाले, ''कोण नागले कां?'' प.पू. महाराजांचे चेहऱ्यावर कळी खुलल्याचे जाणवले. आनंदून म्हणाले, ''आम्ही तुमचीच वाट पहात होतो! जरा दार आड करून घ्या!'' मी जिन्याकडील दार आड करून घेतले. समोर उभा राहिलो.

महाराज - ''बसा! श्री वामन निवासाच्या नियोजित वास्तूचे बांधकाम सुरू करायचे आहे. त्याचे सर्व नकाशे (प्लॅन) म्युनि. कार्पोरेशन कडून पास झाले आहेत. बांधकाम चालू करण्याची परवानगीही आली आहे. खाली ऑफीसात व्यवस्थापक श्री. नाना कुलकर्णी यांच्याकडे सर्व नकाशे पहायला मिळतील. त्या कामात लक्ष घालून बांधकामाची सर्व जबाबदारी तुम्ही स्वीकारावी. मुंबईला मोठी मोठी कामे तुम्ही केलेली आहेत. येथील श्री. मोरेश्वर घैसास तुम्हाला इमारतीस लागणारे सामान कुठे चांगले व किफायतशीर दरात मिळेल ते दाखवतील, लोखंड, सिमेंट, सिमेंटचे परमीट मिळविणे किंवा लेबरकाम करणारे ठेकेदार ते मिळवून देतील. त्यांच्या ओळखीही खूप आहेत.

''काय मग तुमची बांधकाम पूर्ण करून देण्याची तयारी आहे नां?''

मी लागलीच प.पू. महाराजांना साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, ''आज्ञा प्रमाण महाराज! एवढ्या मोठ्या सेवेचा लाभ होणं हे आमचं परमभाग्य आहे! आपली कृपा आहेच! आम्ही आनंदाने बांधकामाची जबाबदारी स्वीकारीत आहोत!''

महाराज - आज दुपारी ३.३० वाजता मिटींग आहे. तुम्ही आहातच! ट्रस्टी येतील, आर्किटेक्ट पुंडलीक आणि पुंडलीक, इंजिनिअर साहेब आपले गुरुभक्त श्री. संवत्सरकर, श्री. मोरेश्वर घैसास असे दोन दिवस ३.३० ते ४ वाजता बसू किंवा एकाच मिटींगमध्ये सर्व काही ठरवू! आता येणारी 'दत्तजयंती मार्गशीर्ष पौर्णिमा' चांगला दिवस आहे. त्याप्रमाणे तुम्हास कामाच्या पूर्वतयारीस लागता येईल. हे आमच्या आधीपासूनच मनात होते, तसे एका पत्रात आम्ही तुम्हाला लिहीलेही होते!''

ठरल्याप्रमाणे रविवार, दि. १३.११.१९८३ दुपारी ३.३० वाजता श्री वासुदेव निवासात वरचे मजल्यावर श्री गुरुमहाराजांचे खोलीत श्री वामन निवास बांधकाम संबंधात व्यक्ती व ट्रस्टी यांची प.पू. महाराजांच्या अध्यक्षतेखाली मिटींग झाली. सर्व अपेक्षित मंडळी मिटींगला आली होती. कामाचे वाटप झाले.

प.पू. महाराज म्हणाले - श्री वामन निवासाची वास्तू मंजूर झालेल्या नकाशाप्रमाणे बांधून देण्याची संपूर्ण जबाबदारी श्री. शशीकांत नागले यांनी स्वीकारावी.

नागले - श्री वामन निवासच्या वास्तुच्या बांधकामाची जबाबदारी मी स्वीकारीत आहे. हे बांधकाम मंजूर झालेल्या नकाशाप्रमाणे मे. पुंडलीक आणि पुंडलीक आर्किटेक्ट आणि आर.एन्. भट आर.सी.सी. इंजिनिअर यांच्या वेळोवेळी होणाऱ्या मार्गदर्शनाखाली केले जाईल. बांधकाम उत्तम प्रतीचे, कमी खर्चात आणि योग्य वेळेत संपविण्याकडे माझे लक्ष राहील. हे काम - कामाचे कॉन्ट्रक्ट न देता आपल्या खात्यातूनच होईल. माझी येथे सेवाभावी कॉन्ट्रॅक्टर सारखी भूमिका राहील. ही सेवा अर्थात विनामूल्य केवळ गुरुसेवा म्हणून राहील.

प.पू. महाराज - गुरुभक्त श्री. संवत्सरकर साहेब हे किर्लोस्कर कमिन्स मध्ये मोठ्या हुद्यावर आहेत. त्यांचेच ओळखीने आपल्याला प्लॅन तयार करणारे मे. पुंडलीक आणि पुंडलीक हे आर्किटेक्ट तसेच श्री. भट साहेब हे आर.सी.सी. इंजिनिअर म्हणून लाभले आहेत. श्री. नागले यांना नकाशांतील बांधकामास उपयुक्त अधिक माहीती लागली तर श्री. संवत्सरकरांनी त्या करीता नागलेना वेळोवेळी जरूरीप्रमाणे सहाय्य द्यावे. श्री. अविनाश भोपटकर यांचे पुंडलीक ओळखीचे असल्यामुळे त्यांचेही सहाय्य नागलेना होईल.

श्री. मोरेश्वर घैसास हेही सहाय्यक राहतील. पुण्यात इमारतीला लागणारे साहित्य सप्लायर श्री. घैसास यांचे परिचयाचे आहेत. लोखंड, सिमेंट, सिमेंटचे परमिट मिळविणे ही कामे घैसास पहातील. तसेच लेबरकाम करणारे ठेकेदार त्यांचे ओळखीचे आहेत ते मिळतील. श्री निजामपूरकर हेही काही मटेरीअल उत्तम प्रतीचे किफायतशीर किंमतीत मिळवून देण्यास मदत करतील.

श्री - ''श्री. भाऊसाहेब वाकडे हे ट्रस्टींकडून काही निर्णय किंवा अर्थसहाय्य मिळविणे ही कामे पहातील. काही झटपट घ्यायचे निर्णय साईटवर घेण्याचे निर्णय श्री. भाऊसाहेबांचे हवाली करू. जेणेकरून आम्ही दौऱ्यावर असल्याने आमचे सहीची अडचण पडू नये. कोणा माल देणाऱ्यांचे व कुठलेही चेक देणे असेल तर दुसरी सही लागते, ती श्री. भाऊसाहेब वाकडे करून देतील. कामाची गती फंड्स करता थांबू नये म्हणून आम्ही ट्रस्टी सतत प्रयत्नात असू. भाऊसाहेब वाकडे नागलेना सहाय्यभूत राहतील.

ह्या सर्व नेमणूका झाल्यानंतर प.पू. महाराजांनी जाहीरपणे घोषित केले - 'श्री वामन

निवासाच्या वास्तूच्या बांधकामाचे निर्णय घेणे व स्वत:चे ज्ञानाने बांधकाम करण्याचे सर्व अधिकार आम्ही श्री. नागले यांस देत आहोत! या अधिकारानुसार कोणीही व्यक्ती बांधकामांतील श्री. नागले यांचे निर्णयांत ढवळाढवळ करणार नाही.' श्री दत्तजयंतीला सोमवार, दि. १९.१२.१९८३ रोजी बांधकामास प्रारंभ करावा.

प्रमुख इमारतीचे बांधकामास आवश्यक सिमेंट ठेवण्याची खोली लागेल म्हणून गॅरेजचे काम प्रथम हाती घ्यावे. तसेच पाणी साठविण्याकरीता टाकी लागेल ती नियोजित टाकी पूर्ण करून घ्यावी.

दि. ११.१२.१९८३ रविवार व दि. १२ मी पुण्यास जाऊन कामाची पूर्व तयारी करून आलो. पुन्हा दि. १७.१२.१९८३ पासून श्री वासुदेव निवासातच राहिलो. लाईन आऊट गॅरेज फाऊन्डेशनची व हौदाची करून ठेवली. नवीन फावडे, टिकाव, घमेली ही मुहूर्ताला आपली लागतात ती खरेदी केली. प.पू. महाराजांचे हस्ते भूमीपूजन होऊन खोदाई करता महाराज टिकाव हाती घेतील. श्रींचे नाजूक हातास या अवजारांचे लाकडी खडबडीत दांडे त्रास देऊ नयेत म्हणून पॉलीश पेपरने गुळगुळीत करून ठेवले.

सकाळीच मी व माझा मुंबईचा सुपरवायझर श्री. नंदू गुरव साईटवर आलो. आश्रमांतून पूजेचे साहित्य घेऊन ब्राह्मण आले होते. प.पू. महाराज मुहूर्त वेळेपूर्वी आले. सोबत एक वयस्क व्यक्ती धोतर, कोट, काळी टोपी अशा पेहरावात आली होती. त्यांचा माझा परिचय नव्हता. भूमीपूजन झाल्यानंतर प.पू. महाराजांनी त्यांचे हाती नारळ देऊन, त्यांचे हस्ते नारळ फोडून, श्री वामन निवासच्या बांधकामाचा प्रारंभ केला. मी पुढे होऊन त्या उभयतांचे समोर टिकाव धरले. प.पू. महाराजांनी ते माझे हातून घेऊन त्या सद्गृहस्थांचे हाती दिले. ते गृहस्थ परोपरीने प.पू. महाराजांना विनवीत होते, ''महाराज, आपण अधिकारी आणि योग्य आहात! आपले हस्तेच होऊ द्या!''

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो, असं कसं म्हणता! आपले हातूनच वाडीच्या मंडपाचे काम प.पू. गुरुमहाराजांनी करून घेतले. आपले हातून गुरुमहाराजांची फार मोठी सेवा भक्तीभावाने निरासक्त मनाने घडली आहे. आपण महान तपस्वी आहात! तेव्हा आम्ही आपणास मन:पूर्वक विनंती करीत आहोत की, आपलेच शुभहस्ते कामास सुरुवात होऊ द्या!''

त्या तपस्वी पुण्य पुरुषाने जमिनीवर टिकाव मारले आणि जमलेल्या सर्व भक्त मंडळींच्या मेळाव्यात एक साथ ध्वनी उमटला, ''अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त! श्री गणपती बाप्पा मोरया। प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज की जय।''

अशा प्रकारे श्री दत्तजयंतीच्या शुभमुहूर्तावर सोमवार, दि. १९.१२.१९८३ रोजी सकाळी ८ ते ८.३० च्या दरम्यान श्री वामन निवासच्या बांधकामाचा प्रारंभ झाला. नंतर मला कळले

की, प.पू. महाराजांचे सोबत आलेले ते सद्गृहस्थ म्हणजे प.पू. गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत श्री. वैद्य सर होते. ते स्वतः बी.ई. सिव्हील होते. गुरुमहाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. श्री गुरुमहाराजांनी नृसिंहवाडीचा गोल सभामंडप त्यांचेच देखरेखी खाली बांधून घेतला. प.पू. महाराज त्यांना इतका सन्मान का देत होते ते माझ्या नंतर लक्षात आले.

९७) जन्मोजन्मी दत्त सद्गुरु

दत्त दत्त दत्त दत्त अखंड हे ध्यान।
गुरुदेवांचे सदैव चिंतन करीत राहो मन।।
क्षणमात्रे मी कधी न त्यजावे, गुरुदत्तनाम।
गुरुचरणांचा ध्यास सदा, मन हो निष्काम।।
कर्म उरावे, गुरुसेवेचे गुरु चरणी लीन।
गुरुविण आणिक दुसरे काही न दिसो मज आन।।
गुरुदेवांची मूर्त आगळी, सदा दिसो नयना।
गुरुदेवांची अमृतवाणी, सदा पडो श्रवणा।।
गुरुचरणांचे पुष्प मिळो मज सदैव अवघ्राणा।
गुरुहस्ताचा प्रसाद माझी, तृप्त करो रसना।।
सर्व सुखाचे आगर माझे, दत्त महाराज।
माथी माझ्या चरण धुळीचा, पवित्र तो साज।।
न भुक्तीची ना मुक्तीची, असे मला आस।
जन्मोजन्मी दत्त सद्गुरु, आणिक मी दास।।

दत्तजयंती दि. १९.१२.१९८३

दास - शशीकांत नागले

९८) 'भक्तवत्सल भक्ताभिमानी श्री सद्‌गुरु दत्तमहाराज!'

श्रीदत्त जयंती (१९८३) ला श्री वामन निवासाचे कामास प्रारंभ झाला. हळूहळू कामास गती येऊ लागली. पायापासून संपूर्ण इमारत बांधकामाची जबाबदारी प.पू. महाराजांनी माझ्यावर सोपविली होती. पुढे जेव्हा काही व्यक्तींकडून आम्हांस काही व्यत्यय आणि अडथळे निर्माण होऊ लागले व ते जेव्हा 'श्रीं'चे कानी गेले, तेव्हा तर प.पू. महाराजांनी दि. ११.५.१९८४

रोजी ट्रस्टच्या लेटरहेडवर प्रधान ट्रस्टी म्हणून लेखी सही शिक्क्यानिशी अधिकार पत्रच आमच्या हाती दिले. मी माझ्याकडून 'श्रीं'कडे कोणतीही तक्रार अगदी हस्ते परहस्ते सुद्धा केली नव्हती. श्री सद्‌गुरुंच्या सेवेत कितीही कष्ट, त्रास, शारीरिक-मानसिक त्रास झाला तरी तो सहन करायचाच! तितिक्षा वाढवायची अशा सेवेचा लाभ भाग्यवंतानाच मिळतो, त्यात जेवढा त्रास, मेहनत, मानसिक आघात होतील तेवढा प्रारब्ध क्षयच होणार आहे, ही माझी मनोधारणा होती. मात्र माझ्या गुरुदेवांना कोणी दोष दिला तर तो मला असह्य होईल.

श्री वामन निवासचे काम उत्तम प्रतीचे, कमी खर्चात आणि योग्य वेळात संपवायची जबाबदारी आता माझ्यावर होती. प्रपंच आणि परमार्थ डाव्या उजव्या हातात घेऊन तारेवरची ही कसरत होती. आणि पाठीशी उभा होता माझा सद्‌गुरु! मुंबईचा व्यवसाय, तोही नुसता धनार्जन, हा एकच हेतू धरून नव्हता. कामे वेळेवर, उत्तम प्रकारे किफायत किंमतीत पुरी करायची होती. त्या त्या कारखानदारांना ठराविक वेळेतच कामे पूर्ण करून द्यायची! माझ्याकडे दोन सुपरवायझर्स होते. पैकी जुना अनुभवी व प्रामाणिक असा श्री. नंदू गुरव याची नेमणूक मी वामन निवासच्या बांधकाम सुपरव्हीजन करता केली. सतत कामावर उभे राहणे हे पुणे काय किंवा मुंबई येथे काय, ते शक्य नसते. वेळोवेळी सुपरवायझर्सना सूचना देणे, जेथे आपली उपस्थिती आवश्यक असेल, जसे फुटींग-पायाचे काँक्रिटींग, लाईन आऊट, स्लॅबचे काँक्रिटींग अशावेळी सतत मला जातीने लक्ष घालावे लागते. श्री. नंदू गुरव याची नेमणूक ही माझ्या सोयी करताच होती व त्याचा पगार वगैरे मीच देणार होतो. पण ह्या गोष्टी स्पष्ट करायची आजच आवश्यकता नव्हती.

साईटवर सध्या राहण्यास आसरा नसल्याने गॅरेजचे काम पूर्ण होईपर्यंत नंदूला वासुदेव निवासातच रहायला व भोजनासही रहावे लागणार होते. श्री. मनोळकर हे पंजाब नॅशनल का कोणत्या तरी बँकेचे चेअरमन, उच्चाधिकारी असून आश्रमाचे अकाऊंटस् तपासनीस म्हणून सेवाभावाने काम पहात होते. आमचे वामन निवासचे लाईन आऊटचे काम चालू असताना ते श्री. भाऊसाहेब वाकडे यांचे सोबत साईटवर आले. मी कामातच व्यग्र होतो. कोणी आल्या गेल्याचे भान नव्हते. त्यातून त्या सद्‌गृहस्थांचा माझा परिचयही नव्हता. नंदूकडे बोट दाखवून हा माणूस कोण आहे हे त्यांनी भाऊसाहेबांना विचारले. भाऊसाहेबांनी तो नागल्यांचा सुपरवायझर आहे, त्यांनी ह्या कामावर नेमल्याचे सांगितले. हिशेब तपासनीसच ते! काटकसर पाहणे हे त्यांचे कामच होते. त्यांनी लागलीच भाऊसाहेबांना प्रतिप्रश्न केला, "याचा पगार किती व कोण देतो?"

भाऊसाहेब म्हणाले, "नागल्यांचे कंपनीत त्याला काही तरी ५०० रुपये महिना पगार आणि जाण्या-येण्याचा खर्च द्यावा लागत असेल!"

श्री. मनोळकर म्हणाले, ''नागल्यांनी काम घेतले आहे तर ते जातीने पाहतील, सुपरवायझरची इथे काय गरज आहे? उगाच ओव्हरहेड चार्जेस वाढतील. आश्रमाला भुर्दंड!'' श्री. मनोळकर हे वामन निवासचे विश्वस्त आहेत हे नंतर कळले.

सायंकाळी भाऊसाहेब वाकडे भेटले तेव्हा त्यांनी श्री. मनोळकर काय म्हणत होते ते मला सांगितले. मी म्हटले, ''भाऊसाहेब, काम संपेपर्यंत २ वर्षे मी इथेच राहिलो तर मुंबईचा माझा नित्य व्यवसाय धंदा, उपजीविका कशी चालेल? मुंबईस मी स्थायिक असूनही सुपरवायझर्स हे कामावर ठेवावेच लागतात. शिवाय सामानाची देखभाल करण्याकरीता डे-नाईटचे वॉचमन ठेवावे लागतात. नंदू शेड होताच साईटवरच राहणार आहे. त्यामुळे दोन वॉचमन्सचीही जरूरी नाही. राहता राहिला प्रश्न त्याच्या पगाराचा! तो माझ्या कंपनीत काम करतो. त्याचा पगार, जाणे-येणे प्रवास खर्च मीच सांभाळीन. चहा, भोजनादी त्याची व्यवस्था मी करावी असे वाटत असेल, तर तशीही तजवीज करता येईल. एवढेच पहा की, कोणीही माझ्या गुरुदेवांना बोल लावू नये. ते मात्र मला सहन होणार नाही.'' ही गोष्ट श्री. भाऊसाहेबांनी प.पू. महाराजांचे कानी घातली. मला काम संपल्यानंतर सायंकाळी वासुदेव निवासांत येऊन भेटण्याचा 'श्रीं'चा निरोप आला. सायं. ६ वाजता प.पू. महाराज आश्रमांतून निघण्यापूर्वीच जाऊन मी 'श्रीं'चे दर्शन घेतले.

''श्री'' म्हणाले, ''अहो! तुम्ही ते नंदू गुरव सुपरवायझर म्हणून नेमले ते बरे झाले, आम्ही तुम्हाला अधिकारपत्र दिले आहेच. काही कोणाला विचारायची आवश्यकता नाही. तुम्ही जो निर्णय घ्याल, तो आश्रमाच्या हिताचाच असेल याची आम्हाला खात्री आहे. त्याचा पगार आश्रमांतून द्या आणि काम संपेपर्यंत त्यांचे भोजन, दोन्ही वेळा चहापान वगैरे येथेच होऊ द्या!'' मी 'होय महाराज' म्हणून ''श्रीं''ना दंडवत घालून त्यांचा निरोप घेतला.

९९) ''प.पू. श्री महाराजांची सकारात्मक विचारसरणी''

गॅरेजचे प्रथम हाती घेतलेले काम योग्य मुदतीत पूर्ण झाले. दि. ६.१.१९८४ रोजी श्री. मोरेश्वर घैसास यांचे ओळखीने श्री. चंदू शेट्टी हे शाखेचे काम करणारे लेबर कॉन्ट्रॅक्टर लाभले. त्यांच्या केलेल्या कामाची पाहणी त्यांचे कामातील अनुभव असलेली कामे करण्यास लागणारी हुशारी निरीक्षण करून चाचणी करून त्यांना स्वीकारण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांचे दर पडताळून टर्मस् कन्डीशन्स विचारात घेऊन ॲग्रिमेंट केले व त्यांस फुटींगची खोदाई करण्यास अनुमती दिली. इतक्यात श्री. भाऊसाहेब साईटवर आले.

एकदा भाऊसाहेब साईटवर आले आणि म्हणाले, ''अहो, थांबा थांबा! इतकी खड्डे

खोदण्याची घाई करू नका! काम सुरू करताना वामन निवास बांधकाम फंडात आपल्याकडे बँकेत रु. ८५ हजाराचीच शिल्लक होती. पैकी ४५ हजार गॅरेजचा आणि टाकीचा खर्च झाला. आता आपल्याकडे फक्त ४0 हजार शिल्लक आहेत आणि तुम्ही तर म्हणता फाऊंडेशन ते प्लींथ पर्यंत ६0 हजाराचे नुसते लोखंडच लागणार आहे. आता जर हे खड्डे खणून ठेवलेत तर त्यात चरायला येणारी डुकरं पडतील, कुत्री पडतील. तुम्ही काम ताबडतोब बंद करा!'' इति भाऊसाहेब वाकडे.

मी काही काम बंद केले नाही. सायंकाळी सरळ प.पू. महाराजांकडे जाऊन भाऊसाहेब काय म्हणत आहेत ते सांगितले. त्यांनी काम बंद करण्यास सांगितले. परंतु आम्ही काम बंद केलेले नाही. तरी काय करावे?

प.पू. महाराज म्हणाले, ''भूमीपूजन करून प्रारंभ झाला. कुदळ पडली, आता थांबायचे नाही. काम चालू ठेवा. गुरुमहाराजांचा संकल्प आहे. त्यांना काळजी आहे. सर्वकाही व्यवस्था ते करतील. ३0 फुटींग कॉलमचे एकदम काम हाती घेता येत नसेल तर १-१ फुटींगचे करा! पण सुरू झालेले काम थांबता कामा नये. हे भाऊसाहेब असा नकारात्मक विचार दरवेळी का पुढे करतात? ते आम्हांस कळत नाही. तुम्ही काही चिंता करू नका. कशाचीही कमतरता पडणार नाही बरं!'' आणि खरोखरच काम सुरू होऊन पहिली स्टेज ग्राऊंड आणि मॅझेनाईन फ्लोअर स्लॅब पूर्ण होईपर्यंत फंडस्च्या अनेक अडचणी भिववीत होत्या. पण काम कधी थांबले नाही. देणेकरी दारी उभा राहिला नाही आणि पैशांकरीता कोणी आश्रमाचे ऑफीसचे दारात आलाच तर विन्मुख परत गेला नाही.

एकदा असे झाले, लेबर कॉन्ट्रॅक्टर चंदू शेट्टींचे बिल बनवायचे होते. परंतु पूर्ण झालेल्या कामाची मापे घेऊन बिल बनविणे चालू असताना, बिल मिळण्यापूर्वीच त्यांनी वरचा स्लॅब ठोकण्याचेही काम चालू केले होते. अचानक सेंटरींग फळ्या कमी पडल्याने तो आश्रमात आला. मीही भोजनास आलो होतो. श्री. भाऊसाहेबही वर होते. त्याला हवी असलेली कमीत कमी रक्कम देण्यासही आमच्या जवळ श्री शिल्लक नव्हती. त्याला त्याची काही कल्पना न देता मी त्याला ऑफीसमध्ये बसवून ठेवले व भाऊसाहेबांना भेटून येतो असे सांगून मी वर गेलो. भाऊसाहेबांशी चर्चा केली. ''मी त्याच्या झालेल्या कामाचे बिल बनवीत आहे व ते निश्चितच २0 हजारांपर्यंत जाईल.'' मी पुष्टी जोडली. भाऊसाहेबांचे म्हणण्याप्रमाणे या क्षणाला तरी काहीच देता येण्यासारखे नव्हते. शेवटी शेट्टींना नकार देण्यासाठी आम्ही खाली आलो. व्यवस्थापक नाना कुलकर्णींचे टेबलासमोर बसलो आणि आता नकारघंटा वाजविणार इतक्यात पोस्टमन मनीऑर्डरींची ही मोठी रास घेऊन आला व म्हणाला, ''सह्या वगैरे नंतर करा, आधी हे पैसे मोजून घ्या, मी सही केलेले फॉर्मस् नेण्यास ३ वाजता येतो.''

आश्चर्य एवढेच नाही, तर आलेल्या मनीऑर्डर्समध्ये वामन निवास कामाच्या देणग्यांच्याही मनीऑर्डर्स होत्या. त्यांची एकूण रक्कम पाच हजारांचे वर होती आणि श्री. चंदू शेट्टी यांचा डिमांड होता रुपये पाच हजारांचा. लागलीच श्री. चंदू शेट्टी यांचे व्हाऊचर बनविले व त्यांना पाच हजार कॅश देण्यात आली, अगदी त्यांचे म्हणण्याप्रमाणे.



१००) वामन निवास बांधकाम - काही मतभेद

श्री वामन निवासाच्या बांधकामांतील प्रमुख सहाय्यक इंजिनिअर, स्थापत्य शास्त्रातले तज्ञ श्री. संवत्सरकर साहेब हे किर्लोस्कर कमिन्स मध्ये चीफ इंजिनिअर या उच्च पदावर होते. प.पू. गुळवणी महाराजांकडून त्यांना दीक्षा प्राप्त झाली होती आणि साधनेची बैठकही त्यांची चांगली होती. त्यांचे ओळखीनेच श्री. पुंडलीक हे सुविद्य व पुण्यातील नामांकित आर्किटेक्ट लाभले. श्री. संवत्सरकरांच्या गुरुमहाराजांचे काम, म्हणून ही सेवा त्यांनी विनामूल्य स्वीकारली. तसेच श्री. संवत्सरकरांचे संबंधीत श्री. आर.एन. भट, आर.सी.सी. इंजिनिअर, एक विख्यात हुशार, तज्ञ इंजिनिअर हे वामन निवासाचे आर.सी.सी. डिझायनर म्हणून सेवाभावाने विनामूल्य काम पाहू लागले. श्री. संवत्सरकरांना आमच्याबद्दल प्रथम भेटीतच आपुलकी, प्रेम निर्माण झाले. प.पू. दत्तमहाराजांना तेही गुरुस्थानीच मानत होते. गुरुबंधुंच्या प्रेम संबंधातला गुरुमहाराज हा धागाच नव्हे तर ब्रह्मगाठ असते.

श्री वामन निवासच्या इमारतीच्या पायातील आर.सी.सी. फुटींगचे काँक्रिटींगचे काम सुरू होते. काम चालू असतानाच श्री. संवत्सरकर घाईघाईत साईटवर आले. मला विचारू लागले, "फुटींग काँक्रिटींगला तुम्ही काँक्रिट काय प्रमाणाचे वापरता?" मी म्हटले, "१:२:४ आणि हॅण्ड मिक्सींगला १० टक्के सिमेंट मिक्समध्ये जास्त घालतो." यावर ते म्हणाले, "अहो नको नको, एवढे रिच प्रपोर्शन वापरू नका, कमी प्रतिचे १:४:८ चालेल. हल्ली नवीन संशोधन आणि नव्या टेक्नॉलॉजीनुसार फुटींगला ही प्रपोर्शन वापरायची जरूरी नाही. तुम्ही १:४:८ हेच वापरा."

मी म्हटले, "मी सिव्हील इंजिनिअर म्हणून अभ्यासिले ते फुटींगला १:२:४ हेच वापरत आलो. आज २५ वर्षे! आता आपले हे म्हणणे कसे पटायचे?"

संवत्सरकर म्हणाले, "मी म्हणतो म्हणून वापरा. शास्त्र ॲडव्हान्स होत गेले आहे. नवे नवे शोध लागत आहेत. फुटींगला १:२:४ म्हणजे सिमेंटचा वेस्ट आहे. १:४:८ वापरावे असे आहे व त्यात ५० टक्के सिमेंटची बचतही होते. आपला बांधकाम खर्च कमी व्हावा, उगाच अनाठायी सिमेंट वापरून आश्रमाचे पैसे फुकट घालवू नका."

मी काहीच बोललो नाही. आमचा संवाद ट्रस्टी श्री. भाऊसाहेब वाकडे ऐकत होते. संवत्सरकर घाईत निघून गेले. भाऊसाहेब म्हणायला लागले, "ते जर म्हणत असले तर कशाला सिमेंट जास्त वापरायचे?"

मी म्हटले, "जे काही शोध, नवी सुधारणा याचा काही लेख, आर्टीकल आपल्याकडे आहे का? उद्या या चार मजली वास्तुचे फुटींग, फटी होऊन इमारतीस धोका पोहोचला तर जबाबदार कोण? आम्ही तरी फुटींग पायात आर.सी.सी. मध्ये १:२:४ पेक्षा कमी प्रतीचे काँक्रिट वापरलेले नाही. शिवाय श्री. भट साहेबांचे ड्रॉईंगमध्ये १:२:४ मिक्स स्पष्ट लिहीले आहे, अगदी सही शिक्यानिशी, जबाबदारी प.पू. महाराजांनी माझ्यावर टाकली आहे. मला तसे करता येणार नाही."

दोन तीन दिवसानंतर पुन्हा संवत्सरकर आले व माझ्यावर खूप चिडले. माझा शहाणपणा काढू लागले, किती कामे मुंबईत केलीत... वगैरे वगैरे.

पुढील दिवशी म्हणजे चौथ्या दिवशी दि. ३१.५.१९८४ ला सर्व फुटींगचे काँक्रिटींग पूर्ण झाले. श्री. भाऊसाहेबांनी ही गोष्ट प.पू. महाराजांचे कानी घातली असावी. प.पू. महाराजांनीही संवत्सरकरांना काही समज दिली असावी, कारण पुढील भेटीत संवत्सरकरांनी १:२:४ चा विषय काढला नाही व अत्यंत सलगीने प्रेमाने बोलत होते, वागत होते.

श्री सद्गुरुंचा वरदहस्त मागे कसा होता हे त्यांचे खालील अधिकार पत्रातून लक्षात येईल.

१०१) सर्वाधिकारांचे 'श्रीं'चे पत्रक

ॐ

श्री वामन महाराज गुळवणी व श्री धुंडीराज महाराज कवीश्वर स्मारक ट्रस्ट पुणे

(रजिस्टर क्र. ए१६११)

श्री वासुदेव निवास, ४२/१७, एरंडवणा, पुणे ४११ ००४.

विश्वस्त-विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडीत म.म.द.धुं. कवीश्वर

प्राचार्य दि.ब. केरुर, श्री. प.वा. मनोळकर

॥ श्रीदत्त ॥

दि. ११.५.१९८४

श्रीमान् रा. शशीकांतराव नागले यांना सप्रेम सादर निवेदन- श्रीगुरुमहाराजांचे प्रेरणेने श्री वामन निवासाचे बांधकाम सुरू झाले आहे. या कामी आपण गुरुसेवाबुद्धीने लक्ष घालीत

आहांत ही श्री गुरुमहाराजांची कृपाच आम्ही समजतो. आपले हातून मुंबईसारख्या शहरात मोठमोठी इमारतींची बांधकामे झालेली असून ती अत्यंत व्यवस्थित ज्ञानपूर्वक झाली आहेत. याबद्दल आम्ही मुंबईस आलो असता अनेक इंजिनिअर, व्यवहार तज्ञ, अशा समाजातील प्रतिष्ठीत सज्जनांनी आम्हाला सांगून आपणाबद्दलचा विश्वास व्यक्त केला आहे. म्हणून हे श्री वामन निवासाचेही संपूर्ण बांधकाम आपणाकडूनच सेवाबुद्धीने पार पडावे. आपणही इकडे शेवटपर्यंत लक्ष देऊन या पुण्यकार्याकरिता आपल्या विद्येचा, चातुर्याचा विनियोग करून यश संपन्न व्हावे म्हणून श्री वामन निवास बांधकामाकरिता संपूर्ण जबाबदारीचे अधिकारपत्र, श्रीगुरुस्मरणपूर्वक आज हे आपणास लिहून देत आहोत. तरी याप्रमाणे संपूर्ण जबाबदारीने कार्याकडे लक्ष द्यावे.

दि. ११.५.१९८४
शुक्रवार

दत्तात्रेय कवीश्वर
प्रधान विश्वस्त
श्री वामन महाराज गुळवणी
व श्री धुंडीराज महाराज कवीश्वर
स्मारक ट्रस्ट, पुणे ४.
श्री वासुदेव निवास.

१०२) ''श्रीं''ना वामन निवास पूर्तीचा ध्यास!

श्री वामन निवास बांधकामाच्या सुरुवातीपासून आणि पहिली स्टेज संपेपर्यंत प.पू. महाराजांचे गावोगावी जाण्याचे दौरे खूपच वाढले होते. कधी अकलूज, खर्डा, मराठवाड्यात परभणी, जालना, देऊळगांवराजा, औरंगाबाद अशी किती गांवे आणि शहरे लिहावीत. कोठे भागवत सप्ताह तर कुठे गुरुचरित्र सप्ताह, कुठे देवी भागवत सप्ताह तर कुठे गीताभाष्य, नाना विषय. कोणत्याही ग्रंथाचा प्रारंभ करताना 'अथ' पासून प्रारंभ होतो. या 'अथ'वर महाराजांनी ओळीने आठ आठ दिवस प्रवचने दिली आहेत. महाराजांना तासन् तास प्रवचनाला, प.प. टेंबेस्वामी महाराज यांच्या अनेकविध स्तोत्रातील एखादी ओळ, आचार्य आद्य शंकराचार्यांचा एखादा संस्कृत श्लोक पुरेसा असे. ज्ञानेश्वरीतील एखाद्या ओवीवर सुद्धा महाराज ७-७ दिवस प्रवचने देत. प.पू. महाराज ज्या ज्या शहरी जात तेथील श्रोतृवर्गाची क्षमता पाहून प्रवचन करीत. ज्ञानी मंडळी पुणे, नाशिक किंवा अन्य तीर्थक्षेत्र स्थानांतील मंडळी असतील तर प्रवचन प्रज्ञाप्रचूर असे. गावातुनही व्यापारी वर्ग किंवा प्रतिष्ठीत शेतकरी वर्ग असेल तर त्या समाजाला

पेलवेल असे प्रवचन असे. एखाद्या खेडूत किंवा मागासलेल्या गावातून सर्वांना कळेल अशा साध्या सोप्या शब्दात कथन असे.

प.पू. महाराज प्रत्येक ठिकाणी जमलेल्या दक्षिणा श्री वामन निवास बांधकाम फंडात जमा करीत. प.पू. महाराजांची प्रकृती ठीक नसे. डॉक्टर, वैद्यांनी प्रवासास प्रतिबंध केलेला असे, परंतु महाराजांना कधीही स्वस्थता नसे.

या बांधकामाचे वेळात आम्हाला श्री वासुदेव निवासाच्या तिसऱ्या (पुण्याच्या भाषेत तिसऱ्या म्हणजे दुसऱ्या) माळ्यावर एक ब्लॉकच राहण्यास दिला होता. एका खोलीत श्री. अच्युतराव पोटभरे "जीवनगंगा" या प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांच्या चरित्राचे लेखन करीत असत. एका खोलीत मी व वेदमूर्ती कृष्णा आर्वीकर रहात असू. या ज्ञानी मंडळींचाही सात्विक सहवास, श्री वासुदेवाश्रमांतील सात्विक भोजनासोबत लाभला. एके दिवशी सायंकाळी मी प.पू. महाराजांचे निरोपानुसार श्री रेणुका निवास मध्ये गेलो. "श्रीं"ची शांत मूर्ती खोलीत तल्लीनावस्थेत बसली होती. मी हातपाय धुवून आत गेलो. श्री. अनिल यांनी, नागले आले असल्याची वर्दी दिली. मी आत जाऊन दर्शन घेतले. नमस्कार होताच समोर बसण्याची आज्ञा झाली. विषय होता अर्थातच वामन निवास पुढील कामे कोणत्या वेळात, कशी कशी होणार व त्या त्या स्टेजप्रमाणे त्या त्या अवधीत मटेरिअल विशेषत: लोखंड, सिमेंट किती लागणार? सागवानी लाकडाचे काम केव्हा सुरू होणार व त्याला लाकडे खरेदीस प्रथम नुसत्या फ्रेम्सकरता किती खर्च येणार?

श्री सद्गुरुंच्या प्रत्येक प्रश्नास प्रामाणिकपणे सत्यास धरून वास्तववादी उत्तर देणे हे आलेच. ते विचारत गेले, मी सांगत गेलो. आज्ञेप्रमाणे चहापान, काही फराळ करून मी आश्रमात परतलो. माझे नंतर श्री. कृष्णा प.पू. महाराजांकडे गेले. त्यांना काही आश्रमांतील यज्ञयाग आणि होणाऱ्या महोत्सवाबद्दल चौकशी अथवा मार्गदर्शन घ्यायचे असावे, म्हणून ते गेले होते. दर्शन घेऊन बसताच महाराज म्हणाले, "नुकतेच नागले येऊन गेले. त्यांचेकडून पुढील महिन्यात किती रकमेची पूर्तता करावी लागेल हे ध्यानी आले. आता आम्हांस स्वस्थ विश्रांती घेत बसणे योग्य ठरणार नाही.एक दोन दिवसातच दौऱ्यावर निघावे लागेल."

श्री. कृष्णांनी आपले विचार मांडले, "आपली प्रकृती ठीक नाही, आपणास डॉ. सरदेसाई यांनी महिनाभर तरी विश्रांती घ्यायला सांगितली आहे. बांधकाम थोडे मंदावले तरी प्रकृती स्वास्थ्याकडे लक्ष द्यायला नको का?"

"जशी 'श्रीं'ची इच्छा' एवढेच महाराज म्हणाले, श्रीकृष्ण आर्वीकरांनी त्यांना यागाबद्दल जे काही मार्गदर्शन हवे होते ते घेऊन ते आश्रमात परतले. त्या रात्री श्री. कृष्णा यांनी सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून आम्ही दोघेही बेचैन झालो. आम्हांस अत्यंत दु:ख झाले. वामन

निवासाच्या कामात आणि मुंबईच्या व्यवसायातून वर्गणी जमा करण्यास आम्हांसही तेवढे शक्य नव्हते. चार प्रतिष्ठीत स्नेही मंडळींनी फूल नाही पण फुलाची पाकळी म्हणून शक्य होते तेवढे केले. पण श्री. कृष्णा आणि आम्ही एवढे मात्र समजून गेलो की सद्‌गुरुंपुढे आर्थिक अडचणींचे पाढे जपूनच वाचावेत. त्यापेक्षा ट्रस्टी मंडळी, भक्त मंडळी यांना हलवावे. श्री वामन निवासाच्या पहिल्या स्टेजचे म्हणजे संपूर्ण तळमजला, मेझेनाईन लेव्हलचा माळा, तळमाळा आणि मॅझेनाईन माळ्याचे छप्पर स्लॅब हे जवळ जवळ साडेदहा लाखाचे काम हे निव्वळ प.पू. महाराजांनी प्रवचनांद्वारे, यदृच्छासमोर पडलेल्या दक्षिणेतून आणि भक्त मंडळींच्या मुंबई-पुणे इतर गावोगांवच्या हजार पाचशेच्या पावत्यातून पूर्ण केले. साधक मंडळींतून वैयक्तिक देणगी आली तरी जास्तीत जास्त पाच हजाराची. आमचे स्नेही श्री. जी.आर. शुक्ला यांचा १० हजाराचा चेक एवढीच आमचे मार्फत मोठी जमा.



१०३) भक्तवत्सलता!

प.पू. महाराजांना जेव्हा हे कळले की मीपण काही रकमा देणग्या मिळविल्या तेव्हा त्यांना माझे केवढे कौतुक झाले. ते ज्याला त्याला सांगत, ''अहो, आम्हाला आमचे नागले कॉन्ट्रॅक्टर असे भेटले आहेत की, आपला मेहनताना, कमिशन, फी वगैरे काही घेत नाहीत. मुंबईहून जाण्या-येण्याचा खर्च स्वत:ची पदरमोड करून करतात. पुण्यातील वासुदेव आश्रम ते वामन निवास ही नित्य ये-जा तसेच आर्किटेक्ट, इंजिनिअर्स, सप्लायर्स यांच्या भेटीगांठी या प्रवासास रिक्षा खर्च स्वत:च करतात. याहीपेक्षा मुंबईहून देणग्यांच्या रकमाही मिळवून आणतात.''

काय म्हणावे या सद्‌गुरुंना? जे आम्ही त्यांचेच उपदेशाने लपवायला बघतो, या हाताचे त्या हाताला कळू नये म्हणून जपतो, तर हे स्वत:च आम्हाला सर्वांपुढे उघडे करतात. मला मात्र माझ्या समोर हे बोल कोणाला सांगू लागले तर फारच शरमेचे ओशाळल्यासारखे होई. असह्यच झाले तर काही तरी कारण काढून मी ''श्रीं''ची आज्ञा घेत असे. प.पू. महाराजांचे पूर्ण लक्ष माझ्या भोवती केंद्रीत असे. नागले वेळेवर जेवायला येतात की नाही? त्यांना सकाळी नाश्ता, चहा, दूध काही दिले जाते का नाही? त्यांना अधून मधून चहा लागत असेल. साईटवर तशी सोय आहे की नाही? नाना प्रश्न, चौकशी, विचारपूस ही माऊली, नाना कुलकर्णी या व्यवस्थापकांकडे करीत असायची. करते करविते आपण स्वत: असताना ही ब्रह्ममूर्ती सर्व कर्तृत्व आमच्यावर लादत असायची.

तो दिवस मॅझेनाईन फ्लोअर लेव्हलच्या स्लॅब कास्टींगचा होता. त्या दिवशी संकष्टी होती. आश्रमात सर्वांना उपवास म्हणून फराळाचे फक्त दिले जाते. मी सकाळीच ''श्रीं''चे

घरी दर्शनास गेलो. आशीर्वाद घेतला. काम निर्विघ्न पार पडावे, मशीन नीट चालावीत, कामगार-मजूर यांना काही अपघाती दुखापत होऊ नये, अशा अनेक चिंता नाही म्हटले तरी मनात थैमान घालतात. आमच्या डोक्यात हे वादळ तर माऊली शांतपणे आम्हांस विचारते, ''आज दुपारच्या भोजनाचे काय करणार? वासुदेव निवासात आज संकष्टीचा उपवास. फराळाचे, तेही साबुदाण्याची खिचडी नि भगर असणार. इकडे आपले घरी येता का? तुम्हाला काही संकष्टी नसते. तुमच्या करता पोळी भाजी भात वरण काही करून घेऊ.'' मी म्हटले, ''नको नको महाराज. मला संकष्टी किंवा आठवड्यातीलही काही उपास नसतात, पण स्लॅब असेल त्यादिवशी मात्र मी पूर्ण उपास, लंघन धरतो. काही खात नाही. एकतर वेळ नसतो, दुसरे म्हणजे सारखं वर-खाली जायचे असते. काम यथासांग उत्तम प्रकारे पार पडेपर्यंत उसंत नसते. एरव्ही सणांचे उपवास नाहीत. एवढं तरी करू द्या महाराज.''

''अहो, जेवू नका! पण मध्यंतरी काम सुरू होताना काही पोहे, शिरा, दूध, चहा काही तरी घ्याल की नाही?'' - महाराज.

''आपण बिलकूल चिंता करू नका. आम्ही साईटवर चहा, दूध काहीतरी घेऊ.'' मी म्हटले.

स्लॅब कास्टींगचे काम सुरू झाले. साडेआठला सुरू होणारा स्लॅब ११ वाजता सुरू झाला. कामाला जरा गती येत आहे इतक्यात वर संदेश आला. 'प.पू. महाराजांनी भगवान पाध्ये सोबत काही फराळाचे पाठविले आहे, खाली चला.' मी खाली आलो. भगवान पाध्ये म्हणाला, ''महाराज स्वत: आश्रमांत आले आहेत. त्यांनी तुमच्याकरता फोडणीचे पोहे करवून घेतले. ते तुम्हास नेऊन देण्यास मला पाठविले आहे. तुम्ही ते खाईपर्यंत मला थांबायला सांगितले आहे. ही केळी आणि हा चहा लोटीमध्ये दिला आहे. घ्या इथेच संपवा आणि मगच वर जा.''

मला गहिवरून आले. माझ्या माय माऊली महाराजांना केवढी माझी ही काळजी! मी आपले जन्मजन्मांतरी ऋण फेडू शकणार नाही. किती भाग्यवान मी. कोणते पुण्य मी केले होते? मी धन्य होय, धन्य होय. महाराज त्रिवार वंदन आपल्याला. दुपारी चारचे सुमारास ''महाराज आले, महाराज आले'' ध्वनी उमटले. मी धावत धावतच खाली गेलो. महाराज वर यायचे आहे म्हणू लागले. मी म्हटले, ''महाराज आपण वर न येणे बरे. वाटेत आडवे तिडवे बांबू लावलेले आहेत. पायाखाली खिळे सापडतात. सिमेंटचे किंवा फळ्यांवर टाकलेले पाणी वरून ठिबकत असते.''

पण महाराज ऐकायला तयार नव्हते. शेवटी त्यांचे दंडास धरून मी त्यांना माझ्याबरोबर हळूहळू वर चढविले. वर पोहोचताच ठेकेदारास बोलावून मी ''श्रीं''ना चालण्यास फळ्या

अंथरून घेतल्या. लोखंडी सळ्यांच्या जाळीत पाय टाकून चालणे कठीण झाले असते. जेथे काँक्रिट ओतणे चालले होते तेथपर्यंत महाराज वर आले. काँक्रिट मिक्सरमध्ये मटेरियल खडी, रेती, सिमेंट कसे मापाने टाकतात, पाणी किती मिक्सींगचे टाईमिंग किती, पसरवितात कसे, सळ्यांच्या खाली सुद्धा काँक्रिट जावे म्हणून बॉटमची फळी व सळई मध्ये कव्हरींग करता खडे लावणे, बीममध्ये काँक्रिट भरताना त्यात पोकळ्या राहू नयेत म्हणून व्हायब्रेटर मशीनच्या रॉडने काँक्रिट कसे घुसळले जाते, स्लॅब किती भरला, त्याची जाडी कशी कळते, वगैरे संपूर्ण माहीती प.पू. महाराजांनी अगदी मनापासून चौकस बुद्धीने समजावून घेतली. हे काय त्यांना माहीत नसेल? श्री वासुदेव निवासाचे बांधकामाचा संकल्प त्यांचाच होता. तेव्हाही पाहिले नसेल? पण होता तो आपल्या भक्ताचा, नागल्यांच्या कौतुकाचा भाग. एवढ्यावर आमचे लाड त्यादिवशी संपले नाहीत. मला विचारले, ''स्लॅब केव्हा पूर्ण होईल?'' मी म्हटले, सायंकाळी ६-७ वाजेपर्यंत पूर्ण होईल. मग मला म्हणाले, ''स्लॅबचे काम पूर्ण झाल्यानंतर आश्रमात जाऊ नका. सरळ आमचे घरी रेणुका निवासात या. आश्रमात आज संकष्टीमुळे चंद्रोदय झाल्याखेरीज नैवेद्य व प्रसाद भोजन होणार नाही. तुम्ही या बरं. आम्ही वाट पहात आहोत.''

स्लॅब कास्टींगचे काम संपल्यानंतर मी साईटवरून निघून रेणुका निवासमध्ये आलो. हातपाय धुवून 'श्रीं'चे दर्शन घेतले. पहिलाच प्रश्न, ''आज खूप दमला असाल.'' ते स्वयंपाक घरात जाऊन चहा ठेवण्यास सांगून आले. चहा झाला, मी चहा घेतला. आमोदला महाराजांनी हाक मारली. ''बाहेरच्या खोलीत सतरंजी अंथरुन एक उशी द्या, म्हणजे जेवण तयार होईपर्यंत ते जरा आडवे होऊन विश्रांती घेतील.''

दरवेळी संकोचाने नको नको म्हणायचे कां गुरुआज्ञा म्हणून मुकाट्याने सर्व स्वीकारायचे याचा नेहमी प्रश्न पडायचा. ''श्रीं''चे म्हणण्याप्रमाणे मी सतरंजीवर आडवा झालो. मला काही झोप नव्हती. व प.पू. महाराजांना जाणवत होता तेवढा थकवाही नव्हता. उलट मन आनंदाने बहरून येत होते. उल्हासीत होत होते. माझे कान व सर्व लक्ष महाराजांचे शब्दांकडे नि हालचालीकडे होते. ते आपले खोलीतून उठून सारखे स्वयंपाक घराचे दाराजवळ जाऊन उभे रहात. एक हात कंबरेवर, एक दाराचे फ्रेमवर. सौ. आईसाहेबांना विचारीत, ''अहो, झालं की नाही? किती वेळ आहे?''

सौ. आईसाहेब म्हणाल्या, ''अहो, जरा थांबा चंद्रोदय नको का व्हायला? ९.४५ ला चंद्रोदय आहे.'' महाराज, ''अहो, ते नागले सकाळपासून उपाशी आहेत. स्लॅबच्या कामामुळे वर-खाली करून ते खूप दमले असतील ते. चंद्रोदय आणि नैवेद्याचे राहू द्या. आधी त्यांना पोळी, भाजी, भात, आमटी वाढा. नैवेद्याचे नंतर होऊ द्यात.''

दोन तीन वेळां तरी स्वयंपाक घराकडे जाऊन प.पू. महाराजांनी सौ. आईसाहेबांना व सौ. सवितावहिनींना सतावून सोडले. साडेआठ वाजता स्वतः महाराज बाहेरच्या खोलीत आले व म्हणाले, ''तुम्हाला भोजनाला उशीर झाला. चला बसताना भोजनाला?'' मी विचारले, ''आणि आपण?''

''श्रीं'' - ''आम्हाला थोडा उशीर आहे! तुम्ही घ्या बरं उरकून! खूप दमले असाल! आता येथेच रहा. अरे आमोद, बाहेरच्या खोलीत नागलेंना गादी घालून अंथरूण पांघरुणाचे बघ, उशी ठेव. त्यांना दोन उशा लागत असतील.''



१०४) ''कोणाही जीवाचा न घडो मत्सर''

एखाद्या व्यक्ती आपल्या नेहमी विरोधात जात असली तर आपण अशा व्यक्तीला आपला शत्रू समजतो. मग शत्रू म्हटल्यानंतर त्याचे दुर्गुणच आपल्याला दिसणार. सद्गुण कधीही दिसणार नाहीत आणि दिसले तरी आपण त्याची प्रशंसा तर सोडाच, पण उच्चार सुद्धा करणार नाही. ''स्वतःस ज्यादा समजतो'' अशी मुक्ताफळे उधळणार! पण महाराज विरोधकांचा सुद्धा कसा आदर्श आपल्यापुढे उभा करतात त्याचे हे उदाहरण.

प.पू. महाराजांकडून श्री वामन निवासाचे बांधकाम आमच्याकडे सुपूर्त झाले. गुरुसेवेची फार मोठी संधी मिळाल्याबद्दल आम्हांस धन्यता वाटली व आम्हांस आम्ही खूपच भाग्यवंत म्हणू लागलो. पण गुरुसेवा आणि ती सुद्धा संसार करीत असता नेटका. ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नव्हे. ही तर तारेवरची कसरत आहे. प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही पारडी तोल जाऊ न देता समतोल राखणे हे सत् शिष्याचे लक्षण आहे. पण प्रपंचात गुरफटलेले आपण गुरुभक्तीत प्रपंचाचे पारडे वर जाऊ लागले की गटांगळ्या खाऊ लागतो. माझेही तसेच होत होते. मुंबईची चालू असलेली नफ्याची कामे, मी कामावर गैरहजर झालो की अतोनात नुकसान देत. मासिक घरखर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च या बाबतीत समस्या निर्माण होत. मालक जाग्यावर नसला की नोकरवर्ग आळसावतो. कामाची गती मंद होते. हलगर्जीपणे नुकसान होते. त्या एका आठवड्यात असेच काही घडले. मी सुपरवायझरला सर्व सूचना देऊन आलो होतो. पावसाची शक्यता आहे. सिमेंट गोडाऊनवर पत्रे टाका, प्लास्टिक कापड, ताडपत्री टाका. माझ्या गैरहजेरीत कोणी पाहिले नाही. व्हायचे ते झाले. सिमेंटवर परमिट होते. सिमेंट मिळणे कठीण होते. अचानक पाऊस आला. साईटवरच्या ३०० गोणी भिजून गेल्या. पावसाचा जोर कमी होताच मधल्या मधल्या काही गोणी सुक्या निघाल्या. त्या व्यवस्थित ताडपत्रीने आच्छादिल्या. ज्या भिजल्या त्या मालकाचे लक्षात येऊ नये म्हणून मागील खोलगट भागात फेकून देऊन

त्यावर माती पसरण्यात आली. कालांतराने गुप्तहेरांकडून या प्रकरणाचा छडा लागला. नुकसान होऊन गेले होते. जास्त ताणण्यात अर्थ नव्हता. श्री वासुदेव निवासात शनिवार-रविवारचे सुट्टीत श्री. गोडसे, आमचे प्रिय गुरुबंधू आले होते. कर्वे रोडच्या फूटपाथवर आम्ही बोलत उभे होतो. वेळ असेल सकाळी १० ते ११ ची. श्री. गोडसे म्हणाले, ''शशीकांत काय सांगायचे? मला ''श्री'' आज्ञेने सारखे जालन्यास जावे लागते. कॅज्युअल लिव्हज् संपल्या, सीक लिव्हज् संपल्या आता विदाऊट पे घेण्याची वेळ आली आहे. शिवाय इन्क्रीमेंट, प्रमोशन स्टॉप होणार. करणार काय?'' आमचेही डोक्यात झाल्या नुकसानीची हवा भरली होती. आपल्याकडून गुरुभक्तीत कसे प्रमाद घडतात त्याचे हे उदाहरण आहे. मी गोडसेंना म्हटले, ''अहो गोडसे, तुमचे नुकसान झाले ते रजा संपल्याचे. विदाऊट पे, स्टॉप इन्क्रीमेंट म्हटले तरी शे-हजारांचे आंत. तुम्हाला माहीत आहे? मी या वामन निवासाचे कामात व्यग्र असताना तिकडे तुर्भेच्या कामावर २०-२१ हजारांचे सिमेंट भिजून माझे नुकसान झाले.''

कसली गुरुसेवा, कसले अध्यात्म. पाकीटाला खार लागत नाही तोपर्यंत सर्व ठीक. ते श्री गजानन आश्रम स्वामी महाराज नेहमी म्हणतात, ''हे साधना करणारे साधक आपली चामडी आणि दमडी सांभाळून ही आध्यात्मिक साधना करतात.''

होय, खरे आहे ते. नागलेही त्यात काही वेगळे नाहीत. सद्गुरु सगुणरुप, आपल्यापासून खूप दूर असले तरी निर्गुण रूप अंतरात्म्याशी निगडीत असते. पण आमची ज्ञानदृष्टी तेथपर्यंत पोहोचत नाही. एवढे कळत असते तर आम्ही आमची जिव्हा, आमचे मन, बुद्धी, या अशा नफ्यातोट्याच्या व्यवहाराचे विचाराने शब्दाने विटाळली नसती. सद्गुरु सर्वसाक्षी, सर्वज्ञानी, सर्वांतर्यामी असतात. कसे ते पहा.

श्री वासुदेव निवासांतून ''श्रीं''ना मी सायंकाळी त्यांचे घरी श्री रेणुका निवासामध्ये पोहोचविण्यास गेलो. हातपाय धुवून मीही आलो. ''श्रीं''ही खोलीत येऊन बैठकीवर बसले. बसता बसता आपले ओले पाय फडक्याने पुसत होते. मी हात पुढे करून पाय पुसण्याचा प्रयत्न केला. परंतु ''नको नको, राहू द्या'' असे म्हणून मला स्पर्श करू दिला नाही. कसे देणार? आज आम्ही गैर शब्दोच्चाराने विटाळलो होतो. पाय पुसत पुसत ''श्रीं''नी मला प्रश्न केला, ''तुम्ही त्या वैद्य इंजिनिअरना ओळखता का?'' वास्तविक वामन निवासाच्या भूमीपूजनास व कुदळ मारण्यास प.पू. महाराजांनी त्यांचे हातूनच प्रारंभ केला होता. परंतु तेच ते वैद्य इंजिनिअर मला माहीत नव्हते. मी ओळखत नव्हतो. मी म्हटले, ''नाही महाराज, माझी आणि त्यांची अजून ओळख झालेली नाही.''

''श्रीं गुरुमहाराजांचे (गुळवणी महाराजांचे) ते अनुग्रहीत. महाराजांनी श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे वाडी येथील मंदिराभोवतालचे मंडपाचे काम त्यांच्यावर सोपविले. अगदी

तन-मन-धन अर्पून ती सेवा ते करीत होते. ते काम चालू असतानाच त्यांना युरोपियन (परदेशी) कंपनीकडून बोलावणे चालू होते. इंजिनिअर म्हटले तर त्याला दरमहा ३०० ते ३५० त्या काळांत पगार मिळत असे. परंतु ती कंपनी दिवसाला रु. १५०/- द्यायला तयार होती. पण ते तिकडे श्री गुरुसेवा डावलून गेले नाहीत. किंवा आपणास अशा कंपनीकडून एवढ्या मोठ्या पगाराची नोकरी मिळत होती याची वाच्यता देखील त्यांनी कुठे केली नाही. आपण ही नोकरी धिक्कारून मोठ्या धनलाभास मुकत आहोत - काही नाही. सेवा म्हणजे एकनिष्ठ सेवा, तिथे व्यावहारिक विचार, प्रपंचाचा विचार काही नाही. अशी गुरुसेवा व्हायला हवी.''

आम्ही समजायचे ते समजलो, त्या दिवसापासून ठरविले, आपल्या कामाचे, फायद्याचे, प्रपंचाचे काय व्हायचे ते होऊ देत. मी गुरुचरण सोडणार नाही. ''श्री'' चरणाशी, ''श्री'' सेवेशी एकनिष्ठ राहीन. मग मला कोणी भले म्हणो वा बुरे म्हणो. कोणी निंदा करो कोणी स्तुती करो, आपण आपणास महद्भाग्याने लाभलेली गुरुसेवा इमाने इतबारेच करायची. माझ्या डोक्यात आता एकच विचार. कोण असतील बरं ते परम गुरुभक्त श्री. वैद्य इंजिनिअर? त्या गुरुकृपापात्र गुरुभक्ताचे आपण दर्शन घेतलेच पाहिजे. त्यांचे चरणी मस्तक नम्र केलेच पाहिजे व त्यांचा आदर्श सतत समोर ठेवला पाहिजे.

एके दिवशी वासुदेव निवासात सायंकाळचे निवांत वेळी व्यवस्थापक नाना कुलकर्णी यांना मी प्रश्न केला, ''नाना, श्री. वैद्य इंजिनिअर कोण हो? कोठले? कसे आहेत दिसायला? माझी ओळख करून द्याल का?'' नानांच्या कपाळावर असंख्य आडव्या रेषा उमटल्या, भुवया वर चढल्या, चेहऱ्यावर क्रोधाच्या छटा दिसू लागल्या. उच्च स्वरांत ते उद्गारले, ''कशाला हवी त्या वैद्यांची ओळख? तुम्हाला माहीत आहे? ट्रस्टींच्या दर मिटींगला प.पू. महाराज प्रमुख ट्रस्टी असून त्यांना खाली मान घालून स्वस्थ बसायला लावतात. विरोध विरोध विरोध म्हणजे किती? त्याला काही सीमा आहे की नाही? प्रत्येक प्रपोजलला विरोध. प.पू. महाराजांचे ज्याला सकारात्मक आशीर्वाद पूर्ण अनुमोदन असेल तेथे यांचा नकार. त्यांना काय केशवराव पीठावर अधिकारी बसावे वाटत होते का स्वत:च त्यांना प्रमुख ट्रस्टी व्हायचे होते? काही कळत नाही. बरं, प.पू. दत्तमहाराजांना पीठाधिष्ठीत वारसाहक्क आपल्याच सद्गुरु श्री वामनराव गुळवणी महाराजांनीच आपल्या इच्छापत्रात नमूद केले आहे ना? गुरुमहाराजांना ईश्वर स्वरुप मानता, मग त्यांच्या इच्छेस मान देणं हे सच्छिष्याच कर्तव्य नाही का? अहो, वामन निवास सुद्धा बांधू नये असे हे म्हणत होते. काय करायचा आहे म्हणे वामन निवास. त्या वास्तूचे टॅक्सेस कोठून भरणार? मेन्टेनन्सला कोठून पैसे आणणार? एवढी मोठी वास्तू बांधून त्याची रोजची झाडलोट तरी कोण करणार? त्याचे पाणीबिल, त्याचे इलेक्ट्रिक बिल, वास्तूला दिवसा रात्रीकरीता रखवालदार? कसे होणार हे खर्च? असा सगळा नकारात्मक

पवित्रा. दत्तमहाराज म्हणतात, ''वामन निवास बांधायचा म्हणून आम्ही म्हणतो 'नाही.' आणि अशा ह्या महात्म्याच्या दर्शनाची तुम्हाला नागले, कसली लागली आहे ओढ? आपल्या गुरुमहाराजांना विरोध करणारी व्यक्ती तुम्हाला वंदनीय वाटेल का?''

ज्या प.पू. दत्तमहाराजांच्या प्रत्येक नियोजनास विरोध करणारी ही व्यक्ती आणि प.पू. महाराज तर त्यांचाच आदर्श, सेवा कशी असावी हे सांगताना उदाहरण म्हणून देतात. ''कोणाही जीवाचा न घडो मत्सर.'' प.पू. महाराजांनी केव्हाही, कोठेही, कधीही, कोणाचाही चुकून सुद्धा मत्सर केला नाहीच, उलट प्रतिस्पर्धक विरोधक यांचे गुणांचे कौतुक, प्रशंसाच केली. पूर्व ऋणानुबंधाने अनेक व्यक्ती, विभूती आपले संपर्कात, आपल्या जवळ, आपल्या आसपास येत असतात. त्यांच्याबद्दल आपले मनात प्रेम असू द्यावे, हा संदेश प.पू. महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास सखोल केला तर त्यांनी आपल्या जीवनांतून काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ हे षडरिपू केव्हाच हद्दपार केले होते हे लक्षात येते. त्यांचे सहज बोलण्यातून सुद्धा ''मी असे केले, मी म्हटले'' चुकून देखील अशी वाक्ये त्यांच्या मुखातून बाहेर पडत नसत. कधीही कोणाचे दोष त्यांनी निदर्शित केले नाहीत. उलट असलेल्या क्षुल्लक गुणांचे सुद्धा मोठे कौतुकच केले.

१०५) ''श्रीं''ची वामन निवास साईट भेट श्री. गद्रे आर्किटेक्टसह

मॅझेनाईन नंतरचा स्लॅब म्हणजे हॉलसह संपूर्ण ग्राऊंड फ्लोअरचा खूप मोठा असल्याने अर्धा अर्धा करण्याचे ठरवून ह्या अर्ध्या भागाचे काँक्रिटींग गुरुवार, दि. २७.९.१९८४ रोजी करण्याचा प्रोग्राम होता. मी त्याप्रमाणे दि. २६ लाच मुंबईहून आलो. पहातो तर काम बंद होते. लेबर कॉन्ट्रॅक्टर श्री. चंदू शेट्टी यांचेशी चर्चा केली व त्यांना म्हटले, ''मला दि. १.१०.१९८४ रोजी सकाळी मिटींग असल्याने मला मुंबईला गेलेच पाहिजे व नंतर नवीन कामाची बोरीवलीस सुरुवात करायची असल्याने मी १५ तारखेशिवाय येऊ शकणार नाही व मी उपस्थित असल्याखेरीज तुम्हाला कोणी स्लॅब भरू देणार नाही.'' त्यांनी लागलीच जोर लावला. त्यांच्या काही आर्थिक अडचणी पेंडींग बिले वगैरे वामन निवासकडून देवविली. रविवारी स्लॅब करण्याचे दृष्टीने कामास गती आली.

दि. २८.९.१९८४ रोजी शुक्रवारी १२.३० ते १ वाजेपर्यंत आश्रमात जेवणास जाऊन लागलीच मी कामाचे साईटवर आलो व सुतार, फिटरची कामे पाहू लागलो. ३ वाजले होते. प.पू. महाराज व त्यांचे सोबत त्यांचे नातजावई श्री. गद्रे आर्किटेक्ट, आणखी कोणी इंजिनिअर असे येताना दिसले. मला जेवढे आश्चर्य तेवढाच अत्यंत आनंद झाला. मी धावतच स्लॅबवरून

खाली आलो. सामोरा जाऊन नमस्कार केला.

''अरे, तुम्ही आहात का? भोजनानंतर विश्रांती वगैरे काही नाही का? बरं झालं तुम्ही भेटलात. कारण आम्हाला, त्यांना हे बांधकाम कसे काय, काही सांगता आले नसते. नुसते 'हे काम' यापुढे आम्ही काही सांगू शकलो नसतो. आमच्या मनात तो प्रश्नच होता. बरं झालं, तुम्हीही त्यातले तज्ज्ञ आहात आणि हे गद्रे, हे पण आर्किटेक्ट आहेत. हे त्यांच्या सोबत इंजिनिअर आले आहेत. आपण ओळखताना यांना?''

प.पू. महाराजांची प्रसन्न मुद्रा, हसतमुख, कळी खुललेली. मला ओळख करून देत होते. नंतर आमच्या सोबत वर येण्यास निघाले. मी म्हटले, ''महाराज आपण येथेच गॅरेजजवळ सावलीत खुर्चीवर बसून पहावे. मी त्यांना सर्व दाखवून येतो.'' तरीही महाराजांचा येण्याचा विचार दिसला. ''महाराज, वरचे ते मुंढे, खांब अजून घट्ट केलेले नाहीत, लोखंड अंथरलेले आहे, आपण येथेच थांबावं.''

१५ ते २० मिनिटांत मी संपूर्ण काम दोघांना दाखवून आणले. पुढील कामांची रुपरेषा सांगितली. ३.४५ साईटवरच झाले. आज महाराज विश्रांती न घेता आले होते. श्री वामन निवास पूर्ण होण्याकरीता त्यांना लागलेली तळमळ स्वस्थता लाभू देतच नाही. मी गाडीपर्यंत सोबत गेलो तेवढ्यात भट इंजिनिअर तपासणी करून गेले कां ते विचारलं. मी म्हटले, ''हा मी त्यांना आणायला निघालोच आहे. त्यांनी नेण्यास ४ वाजता बोलावले आहे.'' प.पू. महाराज लागलीच कारमध्ये बाजूस सरून त्यांना खेटूनच बसण्यास मला जागा करू लागले. मला म्हणाले, ''या, बसा. तुम्हाला नाहीतरी आश्रमावरूनच जायचे आहे ना?''

मी महाराजांचे बाजूचे दार बाहेरून लावले. ते मला ''सखात्वमेव'' म्हणून बाजूस बसण्यास सांगत होते. मी पुढे ड्रायव्हर शेजारी जाऊन बसलो. आश्रमात महाराज उतरले. मीही उतरलो. महाराजांनी मला आता कसे जाणार म्हणून विचारले. मी रिक्षा करून जातो म्हटले व निघालो.

श्री. भट साहेबांना साईटवर घेऊन आलो. स्लॅबचे लोखंड चेकींग झाले. त्यांनी स्लॅब भरण्यास परवानगी दिली. परंतु आम्ही शनिवारचा दिवस किरकोळ कामे पूर्ण करून घेण्याकरीता ठेवून रविवार दि. ३०.९.१९८४ रोजी स्लॅब कास्टींग कार्यक्रम नक्की केला. रात्री भोजनोत्तर श्री. कृष्णा आर्वीकर गप्पागोष्टी करताना मला सांगू लागले की, ''महाराज विचारत होते की, श्री. भाऊसाहेब वाकडे - ट्रस्टी, श्री. नागले यांना रिक्षाभाडे, गाडीभाडे काही देतात कां नाही? नागले काही स्वत:हून मागणार नाहीत.'' त्यावर कृष्णाने, 'नागले गाडीभाड्याचे पैसे घेत नाहीत' असे सांगितले. त्यावर महाराज म्हणाले, ''भाऊसाहेबांनी त्यांना रिक्षा, गाडी भाडे आणि इतर काही खर्च कामानिमित्त ते करत असतील तर ते घ्यायला भाग पाडले पाहिजे.

अहो, एक तर ते आपली मुंबईची कामे बाजूला टाकून इकडे येतात. मुंबई-पुणे ३-३ महिन्याचे पासही काढतात. स्टेशनवर जाणे ६.३० ते ७ रुपये एका वेळचे रिक्षाचे होतात. शिवाय त्या पुंडलीकांकडे जा, भट साहेबांकडे जा, प्लॅनकरिता, खुलासे करून घेण्याकरिता किती त्यांना खेटे मारावे लागतात. तुम्ही भाऊसाहेबांना आमचा निरोप सांगा.''

आश्रमात कधीही आलो आणि दर्शन घेऊन नमस्कार केला की पहिला प्रश्न, ''केव्हा आलात? कोणत्या गाडीने आलात? भोजन व्हायचे आहे ना? भोजन आधी करा, प्रवासाचा शीण होतो. वर हॉलमध्ये जाजमे आहेत, ती घेऊन जरा पडा, विश्रांती घ्या.'' हे नेहमीचे कथन असतेच. पण एवढ्या पितृहृदयातून निघणाऱ्या वक्तव्यावर ते थांबत नाहीत, कोणी समोर नसेल तर ही माऊली उठून स्वयंपाक घराकडे जिने उतरून येई. आचारी अथवा नाना कुलकर्णी किंवा कृष्णा, दत्ता, कोणी भेटेल त्यांना 'नागले आले आहेत, भोजनाचे काही आहे किंवा नाही. नसेल तर भात शिजत लावा. तोपर्यंत त्यांना चहा द्या.''

१०६) 'श्री वामन निवास व श्री रेणुका निवासच्या' संमिश्र आठवणी - 'भूतदया'

श्री रेणुका निवासाच्या उजवीकडील बंगल्यात एक कुटुंब राहते. कुटुंब प्रमुख पुणे म्युनिसिपल कार्पोरेशन मध्ये नोकरीला असून निरनिराळ्या जातीचे कुत्रे पाळणे, त्यांना शिकवणे व नंतर हजारो रुपये किंमतीला एक एक कुत्रा विकणे हा त्या गृहस्थांचा साईड बिझिनेस होता. त्यांच्या बंगल्याच्या मागील परिसरात ह्या कुत्र्यांचे पिंजरे लाईनशीर मांडलेले होते. त्यांची देखभाल, स्वच्छता वगैरे व्यवस्थित सांभाळली जात होती. पण कुत्र्यांचे भुंकणे, गुरगुरणे ह्या नेहमीच्या रात्रंदिवस आवाजाने श्री रेणुका निवासी त्रस्त होत. दोन बंगल्यांमध्ये म्हणजे उजवीकडील बंगला व श्री रेणुका निवास यांचे मध्ये फक्त तारेचे कुंपण होते. कधी कधी कुत्र्यांची पिल्ले त्या तारेच्या कुंपणाखालून श्री रेणुका निवास परिसरांत प्रवेश करून येथेच्छ सर्वत्र संचार करीत. ही पिल्ले ठिकठिकाणी विष्ठा, मूत्र करीत. ही घाण मग सहाजिकच घरच्या मंडळींना साफ करावी लागे. एके सकाळी दारासमोरील कुत्र्याच्या पिल्लाने केलेली घाण पाहून सौ. आईसाहेबांना खूप राग आला. मागील पडवीत ते गृहस्थ व त्यांची पत्नी आलेली पाहून सौ. आईसाहेब त्यांच्याकडील कुंपणाकडे जाऊन त्यांना सांगू लागल्या, ''अहो, तुमची कुत्री रात्रभर भुंकून उच्छाद मांडतात. आम्हांला जरा झोप लागू देत नाहीत. एखाद दिवस झाला तर त्रास सहन करू. पण हे रोजच्या रोज कोण सहन करणार? शिवाय ह्या कुत्र्यांची पिल्ले तारेच्या कुंपणामधून घुसून आमचेअंगणात, परिसरांत येतात. आवारात

विष्ठा, मूत्र करून घाण करून ठेवतात. रोज उठून कोणी ही घाण साफ करायची?''

ते गृहस्थ म्हणू लागले, ''ही पाळीव कुत्री आहे. ही उनाड कुत्र्यांसारखी रात्रभर ओरडत नसतात. आम्हांला त्रास होत नाही, तुम्हाला कसा होतो? पिल्ले तर पिंजऱ्यात असतात, ती तुमच्याकडे कशी येतील? उगाच आपली करायची तक्रार म्हणून तुम्ही करता.''

श्री. अशोकराव बाहेर सौ. आईंचे मदतीस आले व म्हणाले, ''काय सांगता तुम्ही कुत्री भुंकत नाही म्हणून? दादाजींची बेडरुम आणि खिडकी ह्या बाजूलाच आहे. मोठमोठ्याने कुत्री भुंकतात, आम्हांला त्रास होतो. तुम्ही, आमचे बाजूस कूस कंपाऊंड वॉल चांगली ५ फूट उंचीची बांधा. म्हणजे कुत्री येणार नाहीत, आवाजही जरा कमी होईल. तुम्ही म्हणता पिल्ले आमचे हद्दींत आवारात येत नाहीत. या इकडे पहायला या. आमच्या दारासमोरच पिल्लाने विष्ठा करून ठेवली आहे.''

ते गृहस्थ - हे बघा, तुमच्यापेक्षा आम्ही कुत्र्यांचे जवळ असून आम्हाला भुंकण्याचा त्रास होत नाही. त्या कुत्र्यांच्या मलमूत्र करण्याच्या जागा त्यांना दाखवून शिकवून ठेवल्या आहेत. भिंत बांधण्याचा खर्च आम्ही करू शकत नाही. तुम्हाला त्रास होतो तर तुमचे हद्दीत तुम्ही भिंत बांधा. आम्हाला जरूर नाही.

अशोकराव - वा, बरं आहे. धंदा तुम्ही करा, पैसे कमवा आणि तोही शेजाऱ्यांना त्रास देऊन. भिंत आम्ही बांधायची? आमचे येथे दरवाजासमोर पहायला या. कुत्र्याने विष्ठा केली आहे.

गृहस्थ - अहो, पण ती आमच्याच कुत्र्याने केली कशावरून? इतर कुत्री रस्त्यावर येत नाहीत का? सौ. आईसाहेब म्हणाल्या, ''चला अशोक, सूज्ञाला समजेल, यांना कोण समजावणार. यांना माणुसकी, दुसऱ्याला आपल्यामुळे त्रास होऊ नये ही वृत्तीच नाही. फक्त स्वार्थ! बोलण्यात काही अर्थ नाही. चला घरात.'' अशोकराव निमूटपणे घरी आले.

श्री रेणुका निवासाचे तळमजल्याचे वाढीव काम मी नुकतेच सुरू केले होते. आपल्याला एक स्वतंत्र खोली, संडास बाथरुमसह आणि खोलीला लागून हॉल, देवघर, देवखोली असावी हे प.पू. महाराजांना मान्य होते. परंतु आज आर्थिक बळ नसल्याने ते वाढीव बांधकामास परवानगी देत नव्हते. अखेर प.पू. ताईमहाराजांचे मध्यस्थीने आम्ही सर्व गुरुभक्त मंडळींनी गळ घालून परवानगी मिळवून प्लॅन पास करून घेतले. कामास सुरुवात झाली. मागील भागात आर.सी.सी. कॉलम (पिलर्स) करता फुटींग पायाचे पिट्स (चौरस खड्डे) खणले होते. लहान मोठ्या आकाराचे खड्डे ५/५ फूट खोल खणले जात होते.

त्यादिवशीची सकाळ उजाडली ती एका कुत्र्याच्या पिल्लाच्या ओरडण्याने. मी उठलो होतो. प.पू. महाराजांकडेच रहात होतो. स्वयंपाक घरात सौ. आईसाहेबांनी मला चहा देऊन पाट

मांडला, मी पाणी व चहा घेतला. सौ. आईसाहेब म्हणाल्या, ''शशीकांत, तुमच्या मागील कामाच्या खड्यात शेजाऱ्यांच्या कुत्र्याचे पिल्लू पडले आहे. सकाळपासून ओरडत आहे. ते तसेच ओरडत राहू द्या. त्या शेजाऱ्याला कळू द्या. त्याच्या कुत्र्यांची पिल्ले आपले आवारात येतात. तो काढायला येईल तेव्हा मला हाक मारा. मग मी त्याची चांगली कानउघडणी करते की नाही ते बघतच रहा.''

मी हसलो व म्हटलं, ''ठीक आहे.'' प.पू. महाराजांचे स्नान झाले. महाराजबाहेर येऊन आन्हिकाला बसले. तत्पूर्वी त्यांनी मला हाक मारली. ''अरे नागले आहेत का तिकडे?'' मी, प.पू. महाराजांचे शब्द ऐकताच खोलीत गेलो. वाकून नमस्कार केला. प.पू. महाराजांनी वर मान करून निरखून पाहिले. 'कोण नागले का?' मी 'होय' म्हटले, प.पू. महाराज म्हणाले, ''अहो, तुमच्या त्या मागील कामांतील खड्यात कुत्र्याचे पिल्लू पडले आहे असे वाटते. सकाळपासून ओरडत आहे. ते जरा बाहेर काढता येईल का कोणाला सांगून? अजून मजूर आले नसतील.''

मी म्हटले, ''मजूर काय करायचे? मी काढीन की! सकाळीच काढणार होतो पण सौ. आईसाहेब म्हणाल्या ते तसेच राहू द्या. त्याला बाहेर काढू नका. त्या शेजाऱ्याला पाहू द्या ते. तो म्हणतो आमच्या कुत्र्यांची पिल्ले तुमच्या हद्दीत येत नाहीत म्हणून.'' प.पू. महाराजांनी सौ. आईसाहेबांना सांकेतिक हांक मारली, ''अहो, ऐकलं का?'' सौ. आईसाहेब खोलीचे दाराशी आल्या व विचारू लागल्या, ''कशाला हाक मारली?''

''श्री'' : ''अहो, त्या कुत्र्याच्या पिल्लाने काय केले आहे तुमचे? त्या बाळाला कशाला सजा देता? भांडायचे तर जा त्या मालकाशी भांडा. अजाण पिल्लू ते. त्याला का छळता? हे नागले त्या खड्यातून ते पिल्लू बाहेर काढतील, त्यांना ते काढू द्या. फार तर तुम्ही त्या गृहस्थांना बोलावून सांगा की तुमच्या कुत्र्याचे पिल्लू ह्या खड्ड्यात पडले आहे.''

सौ. आईसाहेबांची आज्ञा घेऊन मी मागे गेलो. छोटी शिडी होतीच. ती लावून ते पिल्लू वर घेऊन आलो. शेजारील कुंपणातून शेजाऱ्यांना हाक मारली व ते पिल्लू त्यांचे हाती देत म्हटले, ''हे तुमचेच आहे ना? हे पिल्लू आमच्या येथील फुटींगचे खड्ड्यात पडून पहाटेपासून ओरडत होते. मी खाली उतरून काढले. पुन्हा पिले इकडे येणार नाहीत असे बघा. नाहीतर खाली पडून सळई लागली तर मरून जायचे. सांभाळा.''

दि. ३०.१०.२००८

१०७) माझ्या हृदयविकाराने गुरुसेवेत आलेला प्रतिबंध

धंदा म्हटला म्हणजे धावपळ, ताण तणाव, चढ उतार हे सर्व आलंच. धनार्जन हा मुख्य उद्देश असला तरी जे काम स्वीकारू ते उत्तमप्रकारे पार पाडले पाहिजे. एखाद्या इमारतीच्या बांधकामाचे काम स्वीकारले की ते उत्तम प्रतीचे, सुरेख, मजबूत, काटकसरीचे म्हणजे अनाठायी खर्च होऊ न देता व ठराविक वेळात ते झालेच पाहिजे. इतरही अनेक अडचणीस्तव जागा लवकर ताब्यात हवी असते. फॅक्टरी, ऑफिसेस अशा इमारती असतील तर त्या त्या कारखान्यांचे उत्पन्न (प्रॉडक्शन) जेवढे लवकर चालू होईल तेवढे त्या मालकाचे फायद्याचे असते. काम दिल्या मुदतीत, दिल्या तारखेस पूर्ण करावे लागते. एखादे बांधकाम काही कारणास्तव रखडले तर एस्टॅब्लिशमेंट चार्जेस वाढून नुकसान होऊ लागते. हे सर्व शारीरिक श्रम देणारे आहे तसे मानसिक ताण देणारेही आहे. कामे मिळावी म्हणून काळजी, ती व्यवस्थित पार पडावीत, कामाची बिले आणि वसुली वेळच्या वेळी व्हावी. दुसऱ्यांची म्हणजे लेबर सप्लायर्स यांची पीसवर्कर्सांची देणी वेळच्या वेळी जावीत आणि हे सर्व सुरळीत चालले तर प्रपंच आणि परमार्थ व्यवस्थित चालणार. आध्यात्मिक दृष्टीकोनांतून हे सर्व सद्गुरु परमेश्वर करीत असतो, करवून घेत असतो. हे जरी खरे असले तरी त्या सर्व गोष्टी ज्या माध्यमातून पूर्ण होतात त्या यंत्राची शारीरिक शक्ती, झीज (टेअर वेअर) ही होतच असते ना? घाईगर्दीत ह्या यंत्राची देखभाल करण्याकडे, त्याला योग्य वेळी वंगण, तेल, खाद्य देणे किंवा प्रमाणापेक्षा त्याचा वापरास प्रतिबंध करणे याचे नित्य कर्तव्यात भान रहात नाही. सहाजिकच त्याचे परिणाम ती देहयंत्रणा दाखवू लागते. ईश्वरी इच्छेने ४-५ मजल्यांच्या इमारतीची कामे मिळत गेली. आम्ही करीत गेलो. दिवसभरांत किती वेळा वर चार जिने चढून गेलो आणि किती वेळा उतरलो याचे भान नाही. हृदयविकारास ही सर्व परिस्थिती कारणीभूत होणे अपरिहार्यच म्हणावी लागेल. पण ही गुरुसेवेत आणि ''श्रीं''नी सुपूर्द केलेल्या बांधकामात तरी व्यत्यय देणारी नको होती. मुंबईच्या अनेक वर्षाच्या याच कामांच्या नोकरी आणि तद्नंतर धंदा, यांच्या व्यापातून १९८६ पासून थोडा थोडा त्रास संभवू लागला. सुरुवातीस वाटायचे परिश्रम जास्त झाले म्हणा, हवामानाचा परिणाम म्हणा. त्यामुळे होत असेल. १९९० च्या सुमारास प.पू. महाराजांचे श्री रेणुका निवासाचे वरच्या माळ्याचे एक्स्टेन्शन-वाढीव काम चालू होते आणि श्री वामन निवासाचेही वरच्या माळ्याचे वाढीव काम होते. श्री वासुदेव निवासच्या तळमजल्यावर हॉलमध्ये, इतर मंडळी वासुदेव निवासी मंडळींबरोबर आम्हीही आमची शय्या, पथारी तेथेच टाकत होतो. तरीही रात्री झोपेत श्वसनाचा अडथळा, छातीवर दाब, हृदय स्पंदने अतीतीव्र होत होती. झोपेत भयानक भितीदायक स्वप्ने पडायची. काही वेळा काही कारण नसताना घाबरल्यासारखे व्हायचे व मी दचकून जागा होऊन, मंद श्वसनाने, बैठकीत ध्यानाने ती स्थिती

ताब्यात आणण्याचा प्रयत्न करू लागायचो. १९९० ला श्री रेणुका निवासाचे वरचे काम चि. अजित कवीश्वर यांच्या ऑफिसमार्फत होत होते. ते अर्थात् वेळेवर द्यायचे होते. ''श्रीं''चे घराचे काम हे मला माझ्या परम भाग्यानेच प्राप्त झाले होते. ते काम करणे म्हणजे नुसते काम नव्हते. ती माझ्या गुरुदेवांची सेवा होती. ती भक्ती होती. ती या जन्माची परम भाग्यावस्था होती.

श्रीमत् भागवत सप्ताह समाप्ती होऊन प.पू. महाराज नैमित्तिक दौऱ्यावर श्री. रघुनाथरावांबरोबर गेले होते. मीही मुंबईस जाऊन येण्याचे ठरविले. चार दिवसाकरिता गोरेगांवी गेलो होतो. तेथे मला पुन्हा श्वसनाचा त्रास होऊ लागला. बेचैनी, थकवा, अशक्ततेबरोबर घाम सुटणे हे सर्व लक्षात घेऊन आमचे मेहुणे सच्चिदानंद कर्णिक हे आम्हांस हार्ट स्पेशालिस्ट डॉ. आर.व्ही. देशपांडे यांच्याकडे घेऊन गेले. 'काहीसा माईल्ड अॅटॅक असावा. परंतु आमचे कानी जास्त येऊ दिले नाही. इसीजी तेवढा चांगला नाही, बेडरेस्ट हवी. १५ दिवस तरी झोपून रहावे, जलद चालू नये, जिने चढउतार मुळीच करू नये. सर्व हालचाली स्वस्थ, मंदगतीने कराव्यात वगैरे वगैरे.' त्यातून श्वसनाचे असमाधान किंवा हृदय स्पंदने वाढली, बेचैनी आली, छातीत दुखू लागले तर जीभेखाली सॉर्बीट्रेट गोळी ठेवावी. इतर औषधे गोळ्या सर्व ट्रिटमेंट व्यवस्थित लिहून घेतली. ही सर्व औषधे वेळेवर घेईन, वेळेवर जेवेन, पथ्यपाणी सांभाळीन, ही सर्व कबुली देऊन मी पुण्यास आलो. मी वासुदेव निवास मध्येच राहण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीत होतो. तरी सौ. आईसाहेबांच्या वात्सल्यापुढे, श्री. अशोकराव, अनिल, अजित यांच्या प्रेमळपणामुळे मला बहुतेक वेळी श्री रेणुका निवासमध्ये निवास करावा लागे. श्रीगृही वास्तव्य ही मला जरी पर्वणी असली तरी ''श्रीं''च्या कुटुंबीय मंडळींची माझ्या सुखसोयी करता चालणारी धडपड मला असह्य होई. ज्यांची सेवा आपले हातून व्हावी अशी तीव्र इच्छा असते तीच मंडळी आपली सरबराई, उठबस सांभाळू लागली तर कसे आवडेल मनाला? आणि एकदा तर अगदी कळसच झाला

ती मंगळवारची सकाळ होती. पुण्यातील मंगळवार म्हणजे बाजाराचा दिवस. सर्व मजूर, कामगार सोमवारीच आपली आठवड्याची मजुरी ठेकेदारांकडून घेतात किंवा मंगळवारी सकाळी घेतात आणि आठवड्याचे गृहोपयोगी सामान सामुग्रीचे खरेदीस जातात. त्या दिवशी दुप्पट मजुरी दिली तरी कोणी कामावर येणार नाही. शहरात सर्वत्र बांधकामे व इतर कामगार मजुरीची कामे बंद असतात. मी गेले आठवडाभर वरील बांधकामास लागणारे सिपोरेक्स ब्लॉक्स लवकर मिळावेत म्हणून उत्पादकांकडे खेटे घालत होतो. तीन चार दिवसात ब्लॉक्स मिळणार होते. पण नेमका ह्या ब्लॉक्सचा ट्रक मंगळवारी सकाळी श्री रेणुका निवासच्या फाटकासमोर येऊन उभा राहीला. आता काय करावे? उतरवून घेण्यास मजूर नाहीत. ट्रक

परत पाठविला तर, पुन्हा ब्लॉक्स मिळतील याची काही शाश्वती नाही. बांधकाम तर सिपोरेक्स ब्लॉक्स करता खोळंबलेले. तसे हे ब्लॉक्स आकाराने मोठे म्हणजे १.६" x 0.९" x 0.४.५" असे असले तरी वजनाने दीड ते दोन किलो वजनाचेच असतात. ड्रायव्हर, क्लीनर हात लावायला तयार नाहीत. मी पूर्वीसारखा चांगला धट्टाकट्टा असतो तर एका तासाऐवजी दोन तास लागले असते, फार तर ड्रायव्हरला वेटींग चार्जेस दिले असते. पण ट्रकवर चढणार कसा? खाली ब्लॉक्स घ्यायला आणखी एक माणूस आवश्यकच. दोन्ही कामे एक माणूस करू शकणार नव्हता. पुन्हा तो एक किंवा ब्लॉक्सचा गठ्ठा उचलून रस्त्यावरून आत अंगणात आणून योग्य जागी रचायचा, अगदी तूटफूट होणार नाही याची काळजी घेऊन!

गुरुसेवेतील असमर्थता माझ्या मनास अतिशय व्याकुळता आणू लागली. मी भांबावून गेलो. काय करावे ते कळेना. माझी अधीरता चि. अजितच्या लक्षात आली. एकूण परिस्थिती माझ्याकडून समजल्यानंतर व माझी अधीरतेने झालेली घालमेल पाहून अजित म्हणाला, ''अहो नागले, काळजी कसली करता? हे आम्ही दोघे जवान आहोत ना येथे. मी आहे मनोज आहे.'' सौ. सुलभाताईंचा मनोज मुंबईहून आलेला होता. दोघांनी सुरवारी आणि अंगात गंजी घातली होती. कंबरेस उपरणे घट्ट बांधले आणि हे दोन कोवळे तरुण की ज्यांच्या हातांना असली रफ कामे करण्याची सवय नाही ते दोघेही मोठ्या उत्साहाने मला धीर देत, जणू खेळाचे मैदानातच उतरत आहोत अशा आविर्भावाने अंगणात अवतरले. क्षणैक माझ्या संकटाचे निराकरण झाले आणि आता संपूर्ण ट्रक खाली करून सर्व ब्लॉक्स अंगणात साठविण्यास वेळ लागणार नाही हे कळून चुकले. दिलासा वाटला. परंतु दुसऱ्या क्षणी अंत:करणातला शशीकांत आक्रोश करू लागला. तिकडे ट्रकवर चढून दोन दोन, तीन तीन ब्लॉक्स दोन हाताने उचलून अजित ट्रकखाली उभ्या असलेल्या मनोजकडे देत आहे. मनोज तसा उंचापुरा परंतु अंगणात ठराविक जागेपर्यंत त्याचे वाकणे, ब्लॉक्स साठवणे. अजितचीही लववाक, वजन उचलणे, या माझ्या सद्गुरुच्या लाडक्या लेकरांचे, नातवाचे कष्ट, श्रम हे सर्व पाहून माझ्या भावनांचा कडेलोट होऊ लागला. देवखोलीत श्री. अशोकराव देवपूजेची साफसफाई, करत होते. फुले लावून, निवडून वगैरे कामात व्यग्र होते. चि. अजित व मनोजचे ते परिश्रम पाहणे मला असह्य होऊन मी देवखोली, देवांसमोर दरवाजाचे बाजूस जेथे आता प.पू. महाराजांच्या प्रशस्तीपत्रके, पदके यांची शोकेस आहे तिचे खाली चटईवर भिंतीस टेकून बसलो आणि माझ्या मनाचा बांध फुटला. मी माझ्या भावनांना मुक्त केले. माझ्या नेत्रांतून घळघळा अश्रूधारा वाहू लागल्या, संपूर्ण रुमाल भिजून शर्टही ओला होऊ लागला. ओठ सरळच होत नव्हते. सारखे वाकडे होत होते. आवाज फुटण्याला गळा मोकळा व्हायलाच अवधी होता. कदाचित माझे हुंदके बाहेर पडून ते श्री. अशोकरावांना जाणवले असावेत. श्री. अशोकराव ही तर जात्याच

प्रेममूर्ती. ते क्षणिक माझ्याजवळ आले. माझे दोन्ही खांदे समोरून आवळून धरून मला हाक मारू लागले, ''शशीकांत, शशीकांत काय झालं? तुम्हाला अश्रूपात होतो आहे का? काय झालं? काही दुखत आहे का? काही मानसिक त्रास होतो आहे का?''

पण मी त्यांना उत्तर देण्याचे मन:स्थितीत नव्हतो. अशोकराव माझ्या पाठीवरून जवळ बसून हात फिरवत होते. म्हणत होते. ''आवरा, शशीकांत आवरा. मन स्थिर करा. सांगा मला काय होत आहे तुम्हाला?''

''काय सांगू अशोकराव? अजित आणि मनोज बिगाऱ्याची कामे करताहेत. आयुष्यात कधी अशी कामे करण्याची वेळ त्यांना आली नसेल. आज माझ्या असमर्थतेमुळे त्यांना हे कष्ट पडत आहेत. मला पहावत नाही हो हे. मी काय करू? गुरुसेवेला अपात्र झालो मी. कसला माझा हा आजार, कसले हे जीणे.''

''नका नका शशीकांत असं म्हणू नका. अहो, तुमची सेवा खूप आहे. मागचे बांधकाम तुम्हीच नाही का केले? वामन निवासाचे काम तुम्हीच नाही का केले! अहो, अजित आपल्याच घराचे कामास हातभार लावीत आहे ना? कोण्या परक्याचे तर नाही. अजित आणि मनोजकडूनही महाराजांना सेवा करून घ्यायची असेल. तुम्ही असे काही गैरविचार, मन दुखेल असे विचार करू नका. कोणाकडून काय किती करून घ्यायचे ते ''श्रीं''चेच हाती नाही का? आपण आनंदी समाधानी असावे. ''श्रीं''ची इच्छा सदैव आपण शिरसावंद्य मानावी आणि सद्गुरु तर तुमच्याकडून जास्तीत जास्त सेवा करून घेतच आहेत.''

ट्रक तीन तासात खाली झाला. अजित आणि मनोज शांत, प्रसन्न चित्त होते. एखादा खेळ खेळायला मिळावा अशा प्रफुल्ल मनाने हसत खेळत होते. दुपारी मी माझ्या हृदयविकाराबद्दल श्री. अशोकरावांजवळ सर्व कथन केले. त्यांना सर्व रिपोर्टस् व ट्रीटमेंट सांगितली. ते स्वत:ही डॉक्टरच. त्यामुळे त्यांना सर्व कळले. पण ते स्वत: देखील भावनाप्रधान, प्रेमाचा सागर, तेही द्रवले. दुसऱ्या दिवशी पहाटेसच प.पू. महाराज व श्री. रघुनाथराव दौऱ्यावरून येणार होते. मी रात्री श्री वासुदेव निवासात मुक्कामास गेलो. कामावर पुण्याचा मजूरवर्ग दहाशिवाय उगवत नाही. दुसऱ्या दिवशी मला मजूरांकडून ब्लॉक वर चढवून घेऊन, लाईन आऊट खोल्यांची आखणी करून, सिपोरेक्स ब्लॉक्सच्या भिंती बांधण्यास प्रारंभ करायचा होता. लवकर उठून स्नान संध्या आन्हिक आटपून मी श्री रेणुका निवासाकडे निघालो. आज मला माझ्या सद्गुरुंचे दर्शनही होणार होते. ८-१५ दिवस 'श्री' दौऱ्यावर होते. म्हणून 'श्री' दर्शनाची तीव्र ओढ लागली होती आणि तिकडे श्री रेणुका निवास मध्ये?

तिकडे श्री रेणुका निवास मध्येही सद्गुरुंना आपल्या शिष्याची माऊलीला आपल्या अजाण वत्साची ओढ लागली होती. साडेआठ वाजल्यापासूनच सारखी विचारणा चालू होती.

''नागले आले कां? आले की नाही नागले? किती वाजता येणार होते? काल सायंकाळी येथून उशीरा गेले का? काल काम बंद होतं ना? येथेच रहायला सांगायचं होत त्यांना. आपल्या कामाकरिताच त्यांचे पुण्यात वास्तव्य आहे अशोक. आले का बाहेर नागले?''

श्री. अशोकरावांनाही धीर नाही. पहाटे प.पू. महाराज आले. मुखमार्जन करून दुग्धपान करून जरा निवांत बसले होते. रात्रीचा प्रवासाचा त्रास झालेला. लागलीच अशोकरावांनी आमच्या आरोग्य स्वास्थ्याची आजाराची संपूर्ण माहीती ''श्रीं''चे कानी घातली. गुरुमाऊली द्रवली. जणू आता नागलेना होणारा त्रास हा केवळ त्यांचे कामावर होणाऱ्या परिश्रमांचाच परिणाम आहे. पावणेनऊ, नऊ, सव्वानऊ वाजले. अजून नागले नाही का आले? इतक्यात कपिल, आमोद का अश्विन कोणी तरी म्हटले 'नागले काका आले.' श्री. अशोकराव लगबगीने बाहेर आले. अंगणांतच सांगू लागले, ''अहो शशीकांत ८.३० पासून दादा तुमची वाट पहात आहेत. कितीदां विचारले, नागले आले का? आले कां नागले? चला चला आत चला. महाराजांचे खोलीत चला. ते तुमची वाट पहात आहेत.'' तसेच अशोकराव पुढे खोलीकडे गेले. मी पाठोपाठ होतोच. दारातूनच दादांना म्हणाले, ''दादा, आले बरं नागले.''

''श्री'' - 'आले का नागले?' मी आत शिरलो. साष्टांग नमस्कार घातला. प.पू. महाराजांनी माझ्याकडे वर मान करून पाहिले, ''आले कां? या या बसा.''

मी जरा अंतर ठेवून आज्ञा होताच बसलो. आपले समोर, अगदी नजीक, हाताने जमिनीला बोटे टेकून अगदी, ''या, इथे आमचे जवळ, आमचे अगदी समोर बसा आणि सांगा बघू तुम्हाला काय होत आहे? कसला त्रास प्रकृतीला होतो आहे?''

चष्म्यांतून प.पू. महाराजांचे डोळे, मोठी असलेली बुबुळे अधिक मोठी दिसत होती. दृष्टी आमचे संपूर्ण देहावर फिरून डोळ्याला डोळा देत होते. ते डोळ्याचे तेज मला असह्य होत गेले. पण वात्सल्य, प्रेम ओसंडून जात होते. त्या मृदू प्रेमळ वात्सल्यपूर्ण प्रश्नाने मला धीर आला. अगदी भयभीत होऊन आईचे कुशीत स्थिरावल्यावर निर्भय व्हावे तसा. मी म्हटले, रात्री झोपेत छातीवर दडपण येऊन किंवा कोंडल्यासारखे होऊन जाग येते. उगाचच भय निर्माण होते. हृदयस्पंदने जोरात सुरू होतात. घाम सुटतो, कितीही श्वसन करा समाधान होत नाही. धाप लागल्यासारखे होऊन थकवा येतो, बेचैन होते.

''श्रीं'' - अहो, हे असे आम्हालाही कधी कधी होते. इतकेच काय पण प्रवासातही होते. अशावेळी काय करावे? पहिली गोष्ट मन स्थिर करावे, धाप लागली असली, हृदयाचे ठोके वाढले असले तरी श्वसन मंद ठेवण्याचा प्रयत्न करावा. मंद श्वसन केल्याने मनही स्थिर होते. अधून मधून दीर्घ श्वास घेऊन सोडावा, मंद मंद श्वास आत घेऊन अंतर कुंभक होईल तेवढा पण सहजरित्या करावा, मुद्दामहून जास्त श्वास कोंडून ठेवण्याचा प्रयत्न नसावा. जेव्हा वाटेल

अंतर कुंभक सोडावा तेव्हा हळूहळू रेचक म्हणजे श्वास सोडण्याची क्रिया करावी. संपूर्ण श्वास सोडल्यानंतर श्वास सोडून दिलेल्या स्थितीतच बहिर्कुंभकांत स्थिर सहजगत्या राहता येईल तेवढे रहावे. बसताना पाठीचा कणा ताठ ठेवून बसावे. असे थोडावेळ केल्यानंतर आपली श्वसन संस्था आपोआप मूळस्थितीवर येते. घाबरू नये. अहो, आपण घाबरलो तर आपले आसपासची कुटुंबातील मंडळी घाबरतात. त्यांना काही सुचेनासे होते. हॉस्पिटलात दाखल करण्याची घाईगर्दी उडते आणि उगाच घबराट. तेव्हा तुम्ही ही अंतरकुंभक आणि बहिर्कुंभकाची क्रिया अभ्यासाने आणि कोणताही ताण-तणाव न घेता वाढवित चला. काही काळजी करू नका. बरे वाटेल तुम्हाला.'' प.पू. महाराजांचा भेदक दृष्टीक्षेप मला आपादमस्तक शहारून टाकीत होता. अंत:करणात आनंददायी वृत्ती प्रफुल्लीत होत होत्या. मी महाराजांपुढे साष्टांग नमस्कार घालून निरोप घेऊन खोलीचे बाहेर पडण्यास निघालो आणि तितक्यातच प.पू. महाराजांनी आम्हांस दूध नाहीतर चहा, काहीतरी देण्यास सांगितले.

आश्चर्य म्हणजे मी प.पू. महाराजांचे खोलीतून बाहेर पडलो तोच संपूर्ण बरा होऊन माझे मानसिक दौर्बल्य कोठल्याकोठे उडून गेले. मी तरतरीत, उत्साही झालो. निर्भय झालो. धीरवान साहसी मी काहीही अफाट अचाट कामे करू शकेन असा धारिष्ट्यवान् झालो. मरगळ, निरुत्साह कोठल्या कोठे गेले. मी निर्धास्त, निरामय, निरोगी झालो. माझा हा उत्साह पुढे १२ वर्षे तरी मला साथ देत राहीला. प.पू. महाराजांचे महानिर्वाणानंतर काही काळ जरी उदासीनतेत गेला तरी मला माझ्यात पूर्ण निष्ठा, श्रद्धा, भक्ती जाणवते आणि मला सांगते तुझा दाता, रक्षणकर्ता, उद्धारकर्ता श्री सद्गुरु सतत तुझ्याजवळ आहे आणि तुझे सारे योगक्षेम सांभाळतो आहे. कधी जाणीवेने कधी स्वप्नी दृष्टांत देऊन अनुष्ठाने देऊन, मार्गदर्शन देऊन सतत माझ्या उद्धाराचे त्यांचे कार्य चालू आहे. अव्यक्तांतून माझ्यासमोर कागदावर पडणाऱ्या उदबत्तीच्या रक्षेतून पादुकांरूपाने साकार होतात. जेव्हा तुझे अनुष्ठान चालते तेव्हा तुझ्यासमोर बसलेला नाही तर मी उभा असतो, मी सतत तुझ्या सन्निध असतो, 'याची जाणीव करून देत असतात. आधिव्याधी ह्या देहाला आहेतच. त्याचे तो धर्म सांभाळतो आहे. माझा मी ''श्रीं''चे छायेत आहे. माझा सर्व संसार सुखाचा करून सकल कुटुंबाचे मुलांचे सुनांचे नातवंडांचे सर्व क्षेम सांभाळून त्यांनी सांसारिक आणि पारमार्थिक क्षेत्रातही मला पूर्ण समाधानी उत्कर्षाच्या मार्गावर ठेवले आहे.

१०८) चेटूक करणारी बाई

श्री रेणुका निवासाचे बांधकाम चालू होते. घरी फक्त सौ. आईसाहेब, प.पू. महाराज तळमजल्यावर व मी वरच्या मजल्यावर कामात व्यग्र होतो. कपिल किंवा आश्विन, आमोद पैकी कोणी खाली खेळत असावेत. सौ. आईसाहेबांचा मला चहा करीता खाली येण्याचा निरोप आला. मी खाली गेलो. सौ. आईसाहेब पाट मांडून पाण्याचा ग्लास ठेवून चहा ओतत होत्या. मी पाटावर बसून पाणी व चहा घेतला. सौ. आईसाहेबांनीही घेतला. नंतर सौ. आईसाहेब बाहेरच्या रस्त्याकडील खोलीत पाटावर तांदूळ की काही धान्य निवडत बसल्या होत्या. मी दारात उभा होतो. इतक्यात फाटकांतून दोन बायका आत शिरल्या. मला दिसल्या. मी खिडकीजवळ गेलो. मला पाहतांच त्यांनी मला प्रश्न विचारला, ''महाराज आहेत का?'' मी सौ. आईसाहेबांकडे वळून म्हटले, ''आईसाहेब बाहेर कोणी दोन बायका आल्या आहेत.'' आईसाहेब उठून खिडकीजवळ आल्या व जरा करड्या आवाजातून विचारू लागल्या, ''कोण आहे?''

त्या दोघींपैकी पुढे असलेली बाई म्हणाली, ''आम्हाला महाराजांना भेटायचं आहे.''

सौ. आईसाहेब - काय काम आहे? आत्ता महाराज भेटायचे नाहीत. ते विश्रांती घेत आहेत, झोपलेत.

बाई - आम्ही थांबतो ते उठेपर्यंत.

सौ. आईसाहेब - आश्रमात चार वाजता येतील, तुम्ही आश्रमात जा.

बाई - एवढ्या लांब कुठे पाठविता आई. आमचं फक्त पाच मिनिटांचं काम आहे. ते आश्रमात जायला निघतील तेव्हा भेटू आम्ही.

सौ. आईसाहेब - काय काम आहे तुमचं?

बाई - काम त्यांच्यापाशीच आहे बघा.

सौ. आईसाहेब - हो, पण काय काम ते सांगाल की नाही.

ती बाई दुसऱ्या बाईकडे पाहू लागली आपसात काही कुजबुजू लागल्या. मी म्हटलं, ''महाराज फार दमलेले आहेत. त्यांना उठायला उशीर होईल. तुमचा काय निरोप असेल तर सांगून तुम्ही जावे हे बरे.''

ती बाई म्हणाली अहो, ''पाच मिनिटे भेटू द्या की आम्हाला.'' त्या बाईचा तो अट्टाहास पाहून सौ. आईसाहेबांना जरा रागच आला. त्यांनी मोठ्या आवाजात विचारले, ''काय काम आहे कळू द्या तरी.'' दुसरी बाई तिला म्हणू लागली, ''सांग की काय काम आहे ते.''

ती बाई म्हणाली, ''मी हा रबराचा चेंडू आणला आहे. माझ्या मनातील कामना पूर्ण करण्याकरिता एक भगताने मला तोडगा सांगितला आहे. हा रबराचा चेंडू हातात घेऊन आवळून

माझ्या हाती महाराजांनी द्यावा आणि घरांतील एक मूठ तांदूळ त्यांचे हातांनी त्यांनी मला द्यावे इतकेच.'' ते तिचे शब्द ऐकताच सौ. आईसाहेब खूप चिडल्या. म्हणाल्या, ''जाता की नाही येथून? काय महाराजांवर चेटूक आणि करणी करायला आल्या आहात काय? चला निघा, तांदूळ बिंदूळ काही मिळायचे नाही. चला चालते व्हा. शशीकांत त्यांना बाहेर घालवा. मदतीला वरच्या कामावरच्या बायका बोलवा पाहिजे तर.''

मी त्या बाईंना खूप समजावून सांगितले, पण त्या आपला हेका सोडायला तयार नाहीत. इतक्यात ही चाललेली झटापट प.पू. महाराजांचे कानी गेली व त्यांनी मला हाक मारली, ''अहो, नागले! कोण आले आहे बाहेर? काय हवे त्यांना?''

''त्या सटव्या आल्या आहेत, करणी चेटूक करायला.'' आईसाहेब गरजल्या. मी आत जाऊन प.पू. महाराजांना त्या आलेल्या बाईंची विचित्र मागणी काय आहे ती सांगितली. प.पू. महाराज उठून येऊ लागले. सौ. आईसाहेब त्यांना बाहेर येण्यास मनाई करीत होत्या. ''तुम्ही बाहेर येऊ नका. तुम्ही त्यांचे ऐकू नका. मला हे काही लक्षण ठीक दिसत नाही. तुम्ही चला बघू आत'' सौ. आईसाहेब.

प.पू. महाराज सौ. आईसाहेबांना समजावू लागले, ''अहो, त्यांना काय हवे ते देऊ देत. काय होणार आहे त्यांनी. तुमचे पाठीराखे श्री गुरुमहाराज असताना कसली भीती तुम्हाला?''

प.पू. महाराज खिडकीजवळ आले. त्यांनी दार उघडून समोरच्या खोलीत त्या दोघींना बसण्यास सांगितले. घरात जाऊन स्वत:च मुठींत तांदूळ घेऊन आले. पलंगाशेजारील खुर्चीवर बसले. त्या बायका अंथरलेल्या चटईवर बसल्या. प.पू. महाराजांनी विचारले, ''हं, सांगा काय आम्ही करायचे आहे?'' ती बाई म्हणाली, ''महाराज हा रबराचा चेंडू उजव्या हातात घ्या आणि हाताने दाबून आवळून तो माझे हाती द्या.'' प.पू. महाराज म्हणाले, ''हं, आणा तो चेंडू.'' प.पू. महाराजांनी हात पसरले. त्या बाईने वरूनच स्पर्श न करता महाराजांचे हाती रबरी चेंडू दिला. प.पू. महाराजांनी तो हातात घेऊन पाचही बोटांनी आवळून चिवळून वरूनच त्या बाईच्या हाताचे पशांत टाकला. नंतर तिने मूठभर तांदूळ मागितले. तेही महाराजांनी त्या बाईंना दिले. नंतर तिला विचारले, ''झाले का सर्व तुमच्या मनासारखे?'' ती बाई म्हणाली, ''होय. झालं बरं. मी नमस्कार करते.'' असे म्हणून तिने जमिनीला डोके टेकून महाराजांना नमस्कार केला, दुसरीनेही केला व त्या दोघी निघून गेल्या.

सौ. आईसाहेबांचा मात्र अगदी संताप झाला होता. प.पू. महाराज म्हणाले, ''अहो, त्या सर्व अज्ञानी, अंधश्रद्ध आहेत. त्यांच्या अडाणीपणाने हे सर्व चालले आहे. असे केल्याने त्यांचे काही भले होईल, अशी त्या बाईची श्रद्धा आहे तर होऊ द्या त्यांचे भले.'' सौ. आईसाहेब म्हणाल्या, ''हो पण आपल्याला भोगायला लागेल त्याचे काय? कशाला संकट ओढवून

घ्यायचे?''

''श्रीं.'' - सद्गुरुसारिखा असता पाठीराखा, आपले कोण काय वाईट करू शकतो? होणार असेलच वाईट तर प्रारब्धक्षय करून जाईल.

प.पू. महाराजांना आश्रमात नेण्यास श्री. रघुनाथराव आले. प.पू. महाराज आश्रमात गेले. पण सौ. आईसाहेबांचे मनातून घडलेला प्रकार काही दूर होईना.

१०९) घरच्या देवांचे पावित्र्य

दुपारचे चार वाजून गेले होते. मी श्री रेणुका निवासाचे मागील खोली, देवघर व हॉलचे बांधकामात व्यग्र होतो. प.पू. महाराज चार वाजण्यापूर्वीच नित्यक्रमाप्रमाणे श्री वासुदेव निवासात गेले होते. सौ. आईसाहेबांची कोणी एक त्यांचेच वयाची मैत्रिण आली होती. प्रथम दोघी बाहेरचे खोलीत गप्पागोष्टी करीत बसल्या होत्या. त्या बाईंचे हातात फुलपात्र, पात्रात अक्षदा, हळदी-कुंकुवाची कुयरी असे साहित्य होते. त्या बाई कोठल्या तरी मंदिरात जाऊन तरी आल्या होत्या किंवा यानंतर जाणार तरी होत्या. निघता निघता त्या प.पू. महाराजांचे खोलीत आल्या. या खोलीतच एका कोपऱ्यात चौरंगावर घरच्या देवांची मांडणावळ, बैठक होती. त्या मैत्रीणबाईंनी देवासमोर नमस्कार केला व सौ. आईसाहेबांकडे रांगोळी आणि गुलाल मागून घेतला. चौरंगालगत सभोवती त्या बाईंनी सुंदरशी वेलबुट्टी काढली. त्यात काही फुलेही चितारली होती. त्यावर गुलाल मिश्रित रांगोळीचा शिडकावा दिला. नंतर हळद-कुंकू आईसाहेबांकडून घेऊन त्यांनी निरोप घेतला.

सायंकाळी ६.३० चे सुमारास प.पू. महाराज रिक्शाने आले. वेळ होत आलेली जाणून मी अंगणांतच रेंगाळत होतो. रिक्शा थांबताच गेट उघडून मी ''श्रीं''चे हातातील पिशवी गाठोडे माझे हाती घेऊन त्यांचे पाठोपाठ घरात शिरलो. पिशवी व गाठोडे त्यांचे नित्य बैठकीच्या ठराविक ठिकाणी डाव्या बाजूस मी ठेवले. इतक्यात ''श्री'' हातपाय धुवून खोलीत आले. मी नॅपकीनने ''श्रीं''चे चरण पुसण्याचा प्रयत्न केला. ''राहू द्या, राहू द्या'' असे म्हणून ''श्री'' येऊन बैठकीवर बसले. देव्हाऱ्याकडे लक्ष गेले. पुन्हा उठले. देव्हाऱ्याजवळ आले आणि ''श्रीं''चा आवाज चढला. सहसा ''श्रीं''चा चढलेला आवाज कधी कोणास ऐकावयास मिळत नाही. परंतु आमचा मुक्काम घरीच म्हणून खासगीत कधी असे दुर्मिळ दृष्यांचे दर्शन घडते. नेहमीच श्री विष्णू, श्री ब्रह्मदेव तर कधी रुद्रशंकराचेही दर्शन अत्यंत दुर्मिळ पण घडते. देवांसमोर उभे राहून निरखून पाहू लागले आणि एकदम तारस्वरांत प्रश्न, ''काय हो, आज घरांत, खोलीत कोण आले होते?''

''आली होती माझी मैत्रीण, काय झाले?''

''अहो, काय झाले काय? कशाला तुम्ही कोणाला देवाजवळ येऊ देता?''

''त्या दर्शनाला आल्या होत्या आणि दर्शन त्यांनी लांबूनच घेतले.''

''दर्शन लांबून घेतले मग चौरंगाला खेटून ही रांगोळी कोणी घातली? त्यांनीच ना?''

''हो, त्यांनीच घातली. पण लांबून घातली. त्यांनी देवांना, चौरंगाला स्पर्श केला नाही.''

''अहो, काय सांगता आहात तुम्ही. ही इकडे येऊन पहा. किती खेटून ही रांगोळी काढली आहे. ही इतक्या जवळ रांगोळी घालताना चौरंगाला स्पर्श झाल्याखेरीज राहीला असेल का?''

सौ. आईसाहेब आत आल्या. त्यांनी निरखून पाहिले. त्यांच्याही ते लक्षात आले. त्या चकार शब्द बोलल्या नाहीत. मिटल्या तोंडाने मागे फिरल्या. स्वयंपाक घरात गेल्या.

''सारं काही सहन करू. पण बाहेरून येऊन ओवळ्यात कोणी आमच्या देवांना स्पर्श केलेला आम्हाला मुळीच सहन होणार नाही. आम्हाला आता देवासमोर प्रायश्चित्त घ्यायला पाहिजे.''

११०) प्रकृतीच्या किरकोळ कुरबुरी प.पू. महाराजांचे नित्यक्रमाच्या आड येत नसत

दुपारचा ३.३० ते ४ चा सुमार असेल. घरी फक्त प.पू. श्रीमहाराज, सौ. सवितावहिनी आणि मीच होतो. सौ. आईसाहेब मुंबईस गेलेल्या असाव्यात. मुले शाळेत. प.पू. महाराजांना झोप लागलेली पाहून मी दोनचे सुमारास गच्चीवरील नऊ इंची विटांची भिंत बांधण्याच्या सूचना देण्यास वर गेलो. सौ. सवितावहिनीही थोडी विश्रांती घेत होत्या. ३.३० च्या सुमारास अचानक सौ. सवितावहिनी वर आल्या, ''अहो शशीकांत'' अचानक वहिनींचा गच्चीवर आवाज ऐकून मी चपापलो व हातची लाईन आऊट करता घेतलेली वीट तशीच ठेवून उभा राहून त्यांच्याकडे वळलो. ''काय वहिनी?''

''अहो, दादांना खूप ताप आहे. अगदी दीडच्या पुढे असेल.'' मी म्हटले, ''डॉक्टरांना आणायचे आहे का?''

वहिनी - ''छेऽऽ अहो, अशा स्थितीत ते एकटेच आश्रमात जायला निघालेत. आश्रमात जायची वेळ झाली आहे ना. उभे राहीले तर तापाने थरथरत आहेत. तुम्ही तरी त्यांना आज न जाण्याबद्दल सांगून पाहता कां? कदाचित तुमचे ते ऐकतील.''

मला वहिनींच्या म्हणण्याचे आश्चर्य वाटले. मी इतका कोठला पुण्यात्मा की, ''श्रीं''नी माझा शब्द मानावा. माझ्या मनात विचार चालू असतानाच सौ. वहिनींच्या शब्दास मान देऊन मी लागलीच त्यांच्या सोबत जिने उतरू लागलो. मनात म्हणत होतो पूर्ण भक्तीभावाने

प्रार्थना करून पहायला काय जाते? मी खाली आलो. प.पू. महाराज आपली पिशवी आणि गाठोडे यात बरोबर घेण्याच्या आवश्यक त्या वस्तू भरत होते. एकूण जाण्याची तयारी चालू होती. मी समोर गेलो. दंडवत घातले. नम्रतापूर्वक प्रार्थना केली, ''महाराज, आपल्याला दीडच्या वर ताप आहे. आपल्या शरीरासही कंप, थरथर आहे. उभे राहून चालणे कठीण होत आहे. अशा स्थितीत आपणास आश्रमात गेलेच पाहिजे का? आजचे दिवस महाराजांना न जाऊन नाही कां चालणार?''

''अहो, ताप आहे म्हणून तर आम्ही जरा लवकरच निघालो आहोत. जाताना बुधवारात आनंदमठात जायचे आहे. तेथे ते आपले उगारचे नारायणानंद स्वामी उतरले आहेत. पूर्वाश्रमीचे ते उत्तम वैद्य आहेत. कालही आम्ही त्यांच्याकडे जाऊन त्यांना घसा दाखवून मलम, औषधही घेऊन आलो होतो. आज जरा ताप आहे. सोबतही कोणी नाही. पाहिजे तर तुम्ही चला आमचे सोबत. तुम्हाला वेळ आहे ना?''

मी म्हटले, हो आहे मी आपले बरोबर येतो. आधी रिक्शा घेऊन येतो. मी शाल काढली. ती ''श्रीं''चे अंगावर घालून लपेटून घेतली व सौ. वहिनींना सांगून रिक्शा आणण्यास गेलो. रिक्शा आणून आत प.पू. महाराजांना नेण्यास खोलीत शिरणार इतक्यात वहिनींनी आत बोलावून सांगितले, ''अशा स्थितीत ते उद्या रघुनाथरावांबरोबर टॅक्सीने औरंगाबादला श्री. नगरकरांकडे जायचे म्हणत आहेत.'' मी म्हटले, आता जाताना मी बोलतो त्याबद्दल. असे म्हणून मी खोलीत शिरलो. ''श्रीं''ना धरून अलगद उभे केले. हळूहळू चालत फाटकातच रिक्शा उभी होती. तिथे रिक्शात बसविले. धावत जाऊन बोचके व पिशवी घेऊन आलो. आज मी प.पू. महाराजांना एका हाताने जवळ जवळ कवटाळून घेतले होते. शाल डोक्यावरून घेतली होती त्यांनी. थोडी हुडहुडी जाणवत होती. ताप अधिक वाढेल की काय, सांगता येत नव्हते. प.पू. श्रीमहाराजांचे अंग मात्र चांगलेच सणसणले होते. रिक्शा खिंडीची चढण चढत होती. बालभारती वरून वळण घेत होती. मी आर्त स्वरांत महाराजांना विचारले, ''महाराज अशा अवस्थेत इतक्या लांबचा प्रवास कसा होणार? मी श्री. प्रमोद नगरकरांना आपण उद्या येऊ शकत नसल्याचे कळवू का? ट्रंककॉल करतो. करू का?''

''अहो, नको नको असं काही करू नका. परवा त्यांच्या कारखान्याचे उद्घाटन त्याच्या तीव्र इच्छेने व त्यांच्या श्रद्धेने आमच्या हातून करावयाचे आहे. कार्यक्रम निश्चित झाला आहे. त्यांनी काही मान्यवरांना आमंत्रित केले आहे. अशावेळी आम्ही ऐनवेळी न जाणे बरे नाही. ताप काय उतरेल. स्वामी महाराजांचे औषध चालू आहेच. उद्यापर्यंत बरे वाटेल आम्हाला.''

रिक्शा आनंद मठापुढे येऊन उभी राहीली. मी रिक्शाभाडे काढूनच ठेवले होते. त्यातूनही ''श्रीं''ची भाडे देण्याची चळवळ चालू होती. मी गाठोडे व पिशवी डाव्या कुशीत घेऊन ''श्रीं''ना हलकेच उतरवून घेतले. सरळसोट एकच असलेला तो लाकडी जिना चढून वर जायचे होते. ''श्रीं''चे एका हाती काठी होती. दुसरा हात मी जिन्याच्या रेलींगला टेकवीताच ''श्रीं''नी कठडा धरला व जलद चढण्याचा प्रयत्न करू लागले. मी विनंती केली, ''महाराजांनी एक एक पायरी हळूहळू चढावी.''

वर चढून येताच समोरच्या मोठ्या दरवाजातून शिरताच समोरच बैठकीवर प.पू. स्वामी महाराज बसले होते. ते लागलीच उठून पुढे आले. समोर जाजम अंथरले होते. महाराज सरळ त्यावर येऊन उभे राहीले. स्वामी महाराज बैठकीवर बसता बसता म्हणाले, ''बसा महाराज'' मग प.पू. महाराज त्यांचे समोरच दोन्ही हात मागे टेकून जणू आपल्याला काही झालेलेच नाही अशा अविर्भावांत बसले. बसण्यापूर्वी स्वामी महाराजांना वाकून हात जमिनीला टेकून नमस्कार करण्यास विसरले नाहीत. प.प. स्वामी महाराजांनी विचारले, ''काय म्हणते प्रकृती?''

श्री स्वामी महाराजांना दंडवत घालून म्हटले, ''स्वामी महाराज, महाराजांना दीडच्या वर ताप आहे. अंग थरथरत आहे, आम्ही म्हणत होतो आज बाहेर न पडणे बरे. पण म्हणाले, आपले दर्शनाने आणि औषधाने आम्हाला बरे वाटेल.''

''अहो, आमचे औषध काय नाममात्र आहे. ज्वर घालविणे हे त्यांचेच हाती आहे. हे पहा, येथे बसलेले आमचे बुवा.'' स्वामी महाराजांनी अंगुली निर्देश करीत म्हटले, ''ह्यांचा घसा काल प.पू. दत्तमहाराजांसारखाच खवखवत होता. आम्ही प.पू. महाराजांना लेपन तयार करून दिले ते महाराजांनी आमच्या समोरच आपल्या गळ्याभोवती लावले. प.पू. महाराजांचा हस्तस्पर्श झालेले ते लेपन महाराजांचा प्रसादच अशा भक्तीभावाने ह्या बुवांनी आपल्या गळ्यास लावले आणि काय आश्चर्य? सकाळी त्यांचा गळा, घसा त्या प्रसाद लेपनाने पूर्ण बरा झाला.''

प.प. स्वामी महाराज, प.पू. महाराजांच्या हस्तस्पर्श महती, प्रभाव मनापासून वर्णन करीत होते. खरं सांगायचे म्हणजे संस्कृताचे बरेचसे शिक्षण स्वामी महाराजांनी प.पू. दत्तमहाराजांकडून घेतले होते. इतके नव्हे तर अंतर्यामी ते प.पू. दत्तमहाराजांना गुरुस्थानी मानीत होते. संन्यास घेतल्यानंतर आश्रम धर्माप्रमाणे ते प.पू. महाराजांना नमस्कार व वंदन करू शकत नव्हते व ती खंत त्यांच्या शब्दातून नेहमी प्रकट होत असे.

नंतर स्वामी महाराजांनी औषधाची पुडी पाण्याबरोबर घेण्यास तेथेच दिली व या पुडीने ताप उतरेल म्हणाले. उभयतांचे संभाषण चर्चा चालू होत्या. प.प. श्री वासुदेवानंदांच्या

श्लोकाप्रमाणे -

सदा संतांपाशी जावे,
त्यांचे जवळी बैसावे
उपदेश ते न देती,
तरी ऐकाव्या त्या गोष्टी
तेचि उपदेश होती

प.पू. महाराजांच्या हस्तस्पर्श लेपनांने त्या बुवांचे घशाचे दुखणे कसे बरे झाले हे प.प. स्वामी महाराजांचे प.पू. दत्तमहाराजांबद्दलचे स्तुतीपर वर्णन चालू असताना प.पू. महाराजांचा चेहरा मात्र अगदी निर्विकार, निरागस होता. जणू काय हे वर्णन दुसऱ्याच कोण्या व्यक्तीबद्दल चालू आहे आणि ते ऐकण्यातही प.पू. महाराजांना रस नव्हता.

नंतर प.प. स्वामी महाराजांनी त्यांना नुकतेच स्फुरलेले काव्य ते प.पू. महाराजांना त्यांचा अभिप्राय मिळावा या उद्देशाने वाचून दाखवित होते. पंचमहाभूतांच्या बनलेल्या देहात आत्मा कसा वास करून असतो व देहाद्वारे सर्व आनंद कसा उपभोगत असतो आणि इतके करूनही तो परमात्मा कसा नामानिराळा असतो याचे सुंदर वर्णन त्या काव्यात स्वामी महाराजांनी केलेले होते. त्रयस्थाची भूमिका साधकाची कशी असावी हेही त्यात सूचित होत होते. काव्य वाचनानंतर स्वामी महाराजांनी प.पू. महाराजांना 'कसे काय झाले आहे काव्य,' ते विचारले. प.पू. महाराजांनी अर्थाची उकल करून ''आपण फारच उद्‌बोधक असे हे काव्य केले आहे'' असे म्हणून स्वामी महाराजांवर खूप स्तुतीसुमने उधळली. या अवधीत प.पू. महाराजांना दिलेल्या पुडीचा असर झाला. अंगास घाम येऊ लागला. स्वामी महाराजांनी प.पू. महाराजांचे कपाळास हात लावून पाहिला. पुन्हा येऊन आपले आसनावर बसले व म्हणाले, ''आपला ताप उतरला आहे. आता आपण थोडी कॉफी घेऊया.'' असे म्हणून त्यांनी सेवकाला जवळ बोलावून त्याच्या कानात काही सूचना देऊन पातेल्यात पाणी आणण्यास सांगितले असावे. त्या सेवकाने पातेल्यात पाणी आणल्यानंतर स्वामी महाराजांनी स्वहस्ते त्या पाण्यात डबा उघडून त्यात प्रमाणशीर साखर व कॉफी पूड घातली व त्यास ती अग्नीवर उकळवून गाळून दूध घालून प.पू. महाराजांना व मलाही देण्यास सांगितले. कॉफी पिणे चालू असता प.प. स्वामी महाराजांचे संभाषण प.पू. महाराजांबरोबर चालूच होते. कॉफी पिऊन झाल्यानंतर माझ्याकडे वळून त्यांनी म्हटले, ''ही कॉफी आम्ही स्वत: बनविली आहे, कसली बनविली असेल?'' हा प्रश्न त्यांनी माझ्याकडे पहात मलाच विचारला. प.पू. महाराजांनी, हे नागले इंजिनिअर, 'वामन निवास बांधकाम,' 'रेणुका निवास बांधकाम,' अशी आमची कौतुकपूर्ण ओळख दिलीच होती. मी संकोचाने जरा लांबच बसलो होतो. उभयतांचे आसनापासून दूर

स्वतंत्र छोटे आसन घेऊन बसलो होतो. त्या विद्वान देवतुल्य महामुनींसमोर माझे अस्तित्व काय असणार? तरीही प.प. स्वामी महाराजांना आपल्या कॉफीचे आयुर्वेदिक महत्त्व आमचे माध्यम करून प.पू. महाराजांना सांगायचे असावे.

मी म्हटले, ''आमचे कोकणात रस्त्याच्या कडेला टाकळा नावाची वनस्पती उगवते. या रोपट्यांची वाढ दीड-दोन फुटांपर्यंत असते. उन्हाळ्यात या रोपट्यास शेंगा सुकल्या की बियांचा खुळखुळ आवाज येऊ लागतो. आमची आई त्या बियांचे दाणे काढून त्याला थोड तूप चोळून ऊन्हे देऊन वाळवीत असे व ते दळून त्याचे पीठ करीत असे व ती पावडर कॉफी म्हणून वापरीत असे. ती औषधी असायची.''

स्वामी म्हणाले, ''तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. टाकळ्याच्या बियांचीही कॉफी करतात. पण ही ती नव्हे. आपण सुक्या मेव्यात खारीक खातो की नाही. त्या खारकेच्या बिया भाजून त्या ठेचून त्याची वस्त्रगाळ पूड केली आहे व तीच पूड म्हणजे आमची ही आरोग्यवर्धिनी कॉफी. काय कशी लागली?''

प.पू. महाराजांनी दाद दिली, ''वा! फारच उत्तम. एरव्ही या बिया आपण टाकून देत असतो. त्यात औषधी, आरोग्यवर्धक गुण असल्याचा आपण नवीनच शोध लावला आहे.''

४.३० वाजले होते. प.पू. महाराजांनी वासुदेव निवास आश्रमात जाण्याकरीता निघत असल्याचे सांगितले. प.प. स्वामी महाराजांनी औषधाच्या पुड्या, गोळ्या कधी कशा घ्यायच्या त्याचे अनुमान सर्व समजावून सांगितले. मी ते समजावून घेतले. खाली जाऊन जिन्यापर्यंत रिक्शा आणून उभी केली व प.पू.महाराजांसोबत आश्रमात गेलो. एखाद तासभर आश्रमात दर्शनार्थी मंडळींची रांग संपताच प.पू. महाराज, खाली पादुका व प.पू. गुरुमहाराजांचे प्रतिमेचे दर्शन, औदुंबर प्रदक्षिणा करून निघाले. श्री. भाऊसाहेब वाकडे यांच्या कानी प.पू. महाराजांना ताप असल्याचे व उद्या दुपारी टॅक्सीने श्री. रघुनाथरावांसोबत औरंगाबाद प्रस्थानाचा बेत सांगितला. त्यांनीही प.पू. महाराजांकडे प्रकृतीची चौकशी केली. उद्याचा बेत कायम होता.

श्री रेणुका निवासात आल्यानंतर हातपाय धुवून ''श्रीं''नी सायंसंध्या आणि आन्हिक पुरे केले.

१११) प्रत्येक साधक-भक्त आणि त्यांची आपल्याबद्दल असलेली कणव, आपुलकी आपपरभाव कोठेही नाही

श्री वासुदेव निवासात त्या दिवशी सालाबादप्रमाणे जे काही वार्षिक समारंभ असतात त्यापैकीच एक कोणतातरी मोठा सोहळा होता. प.पू. महाराज, सर्व सकाळचे आन्हिकादी कार्यक्रम आटोपून १० ते १०.३० वाजताच आश्रमात आले होते. पहिल्या मजल्यावरील समोरच्या पहिल्याच खोलीतील नित्य आसनावर येऊन बसले. मीही प.पू. महाराजांसोबत घरापासूनच होतो. दर्शनार्थींची लांबलचक रांग तळमजल्यापर्यंत गेली होती. मी जवळच ''श्रीं''ना काही हवे नको ते पहाण्यास सेवकाचे भूमिकेत बसलो होतो. दर्शनार्थी आलेल्या भक्तास ''श्री'' स्वहस्ते खडीसाखरेचा प्रसाद देत होते व लागलीच मी प्रसाद ठेवण्यास कागदाचा कापून ठेवलेला चौकोनी तुकडा देत होतो. प्रत्येक साधकाची प.पू. महाराज क्षेमकुशल चौकशी करीत होते. बहुतेक साधकांची संपूर्ण माहीती, अगदी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावानिशी सर्व महाराजांना माहीत असे व महाराज नावे घेऊन चौकशी करीत. ''श्रीनिवासचा अभ्यास कसा चालला आहे? यंदा नववीचे वर्ष ना? काय? गावी जाऊन आलात? कुशल आहेत ना आजी आजोबा?''

असे अनेक भक्त, त्यांच्या नानाविध अडीअडचणी पण त्या त्या भक्तांची त्या त्या परी अत्यंत आपुलकीने चौकशी. विस्मय वाटतो की, महाराज ह्या सर्व साधकांच्या सर्व गोष्टी कसे स्मरणात ठेवीत असतील?

ह्या रांगेतून एक तरुणी आली. ''श्रीं''च्या पुढे डोके ठेवून तिने भावपूर्ण नमस्कार केला. खडीसारखरेचा प्रसाद हातावर देताना चेहऱ्याकडे पहात महाराजांनी विचारले, कोण किशोरी का? आता खाली प्रसाद भोजनाची तयारी होत आहे. प्रसाद भोजन करूनच घरी जा.

किशोरी - महाराज मला आज सुट्टी नाही. मी ऑफिसला जाता जाता दर्शनाला आले आहे. आता मला ११ ते ५.३० ऑफिस आहे.

''श्रीं'' - असं. मग सुट्टी किती वाजता असते? मध्यंतरी भोजनास सुट्टी असेल ना!

किशोरी - दीड ते दोन पर्यंत असते. पण ऑफिस खूप दूर आहे महाराज.

''श्रीं'' - बरं मग आम्ही निजापूरकरांना तुमचा डबा घेऊन पाठवितो. त्यांना माहीत आहे ना ऑफिस?

किशोरी - होय महाराज, मी सायंकाळी येऊन घेतला असता प्रसाद महाराज.

किशोरी निरोप घेऊन निघून गेली. साधारण गर्दी ओसरल्यानंतर आमचे श्री वासुदेव निवास संबंधीत नेहमीचे सेवेकरी एक एक दर्शन घेऊन जात होते. आपले व्यवस्थापक नाना कुलकर्णी, त्यांचे मदतनीस श्री. भुसारी, कोंढरे, राजू कुलकर्णी. इतक्यात सफेद शर्ट,

पायजमा, पांढरी टोपी या पेहरावांतले श्री. निजामपूरकर आले. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे डोक्यावरची टोपी हातात काढून घेऊन ''श्रीं''च्या पुढे साष्टांग नमस्कार घातला. ''श्रीं'' म्हणाले, ''कोण प्रभाकर निजामपूरकर कां? बरं झालं आम्ही तुमचीच वाट पहात होतो. अहो, आपली किशोरी भोजन न करताच ऑफिसला गेली आहे, आज तिने नेहमीचा डबा पण सोबत नेलेला दिसत नाही. नाना कुलकर्णींना आचाऱ्यास सांगून तिचा टिफीनचा डबा आम्ही तयार ठेवण्यास सांगितला आहेच. आता तुम्हालाच जरा तसदी देऊन तो तिचे ऑफिसला पोहोचविण्याची कामगिरी सांगावी लागत आहे. तिचे ऑफिस कोठे आहे ते तुम्हाला माहीती असेल. चला बरे झाले तुम्ही भेटलांत.''

जणू महाराजच किशोरीचे मायबाप होते. किशोरीचे वडील निजामपूरकर कोण त्रयस्थच होते आणि महाराजांना त्यांना हा डबा पोचवण्याचा त्रास नाईलाजाने द्यावा लागत होता. श्री. निजामपूरकरांनी महाराजांना उपकृत केले आणि त्यांच्या नातीचा डबा वेळेवर ऑफिसला पोहोचविला. एवढ्या असंख्य भक्तांकडे प.पू. महाराजांचे कसे मातृतुल्य लक्ष असते, कसे वात्सल्य, कशी कळकळ. धन्य आम्ही प.पू. महाराजांचे साधक-भक्त आणि शिष्य!

हे गुरो, तुझ्यासारखा असता पाठीराखा आम्ही कसली चिंता करावी?

११२) दूजे एकनाथ प.पू. दत्तमहाराज !

श्री. बुवा गायकवाड फर्निचर पॉलिशींगचे काम करीत म्हणून गायकवाड पॉलिशवाले म्हणून ते ओळखले जात. तसे ते पंढरपूरची वारी करणारे, गळ्यात माळ घातलेले, अभंग, पदे ते सुश्राव्य गातात. त्यांनी गायलेल्या गौळणी पुन्हा पुन्हा ऐकाव्याशा वाटतात. बुवा भजने, पदे, गौळणी गातात म्हणून श्रोतेजन त्यांना बुवा म्हणू लागले. प.पू. गुळवणी महाराजांचे ते अनुग्रहीत. परंतु दीक्षा घेतल्यानंतर सुद्धा प.पू. गुरुमहाराज असताना आणि १९७४ सालानंतर सुद्धा त्यांनी श्री वासुदेवाश्रमाचे आत पाऊल टाकले नाही. स्वातंत्र्य मिळून ३०-३५ वर्षांचा काळ लोटला तरी अस्पृशता समाजातून गेली असे म्हटले तरी समाज मानसातून मात्र ती अजून पूर्णत्वाने गेलेली दिसत नाही. 'बुवांना आश्रमात येऊ नका' असा कोणी प्रतिबंध केला नव्हता. ते येऊन दर्शन घेऊन गेले असते किंवा भजन, कीर्तन, प्रवचनास आत येऊन बसले असते, सर्वांच्या पंक्तीत भोजनास बसले असते तरी त्यांना कोणी उठवले नसते, धिक्कारले नसते, नाकारले नसते. पण त्यांची भूमिका चोखामेळ्यासारखी.

''तुमच्या महाराजांचा मी महार'' ही लीनता आणि पूर्व परंपरागत संस्कार यामुळे त्यांना स्वत:चे मन आजच्या सुधारणेत घुसू देईना. इतर माणसांचा विचार करून प.पू. गुरुमहाराजांनीही

त्यांना आत येण्याबद्दल आग्रह केला नसेल. ते गुरुमहाराजांशी एकनिष्ठ तसे गुरुमहाराजही त्यांचा गुरुभाव, गुरुनिष्ठा पूर्ण जाणून होते. प.पू. गुरुमहाराजांनंतर प.पू. दत्तमहाराजांवरही बुवांची तेवढीच श्रद्धा, भाव, भक्ती. सायंकाळी चार नंतर ते आश्रमाबाहेर येऊन थांबणार. येणाऱ्या जाणाऱ्यांना सतत हात जोडून अभिवादन अगदी हसतमुखाने. आश्रमात चाललेले सर्व धार्मिक कार्यक्रम, भजन कीर्तन, प्रवचने, धून बाहेरून ऐकून तल्लीन होणार. सायंकाळी प.पू. दत्तमहाराज ६ नंतर घरी जाण्यास निघत तेव्हा रोज निघताना खडीसाखरेचा प्रसाद घेऊन निघत. वासुदेव निवासच्या फाटकात स्थिरावत, भिरभिरत्या नजरेने गायकवाड कुठे दिसताहेत का ते पहात आणि इतक्यात शुभ्र शर्ट, पायजमा, पांढरी टोपी घातलेली बुवांची मूर्ती लगबगीने विनयी मुद्रेने ''श्रीं''च्या पुढे येई. डोक्यावरची टोपी काढून फाटकांतून पुढे आलेले बुवा प.पू. महाराजांना जमिनीस डोके टेकून नमस्कार करीत. उभे रहाताच प.पू. महाराज खडीसाखरेचा हात पुढे करीत. बुवा दोन्ही हाताचा पसा पसरवीत आणि महाराज वरूनच त्यांचे हाती प्रसाद टाकीत. प.पू. महाराजांनी कधी म्हणावे, ''अहो, तुम्ही आत येत जा.'' बुवा विनयाने म्हणत, ''ठीक आहे महाराज.''

पुढे सहस्रचंद्र दर्शन शांतीचे सुमारास तर प.पू. महाराजांनी बुवांची सांपत्तिक स्थिती लक्षात घेऊन त्यांना सिक्युरिटी गार्डचा पोषाख देऊन वासुदेव निवास आश्रमाच्या दारात बसविले. 'सर्वांच्या भोजन पंक्तीत येऊन बसत जा,' म्हणून जवळ जवळ आज्ञाच केली. श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे जीर्णोद्धाराचे बांधकाम चालू असताना मला बोलावून या मंदिरात काही खिडक्या दरवाजे यांना लाकूड पॉलिशचे काम असेल तर बुवांना देण्यास सांगितले. बुवांनी ते केलेही, सेवाभावाने विनामूल्यच करण्याचा त्यांचा मानस होता. पण प.पू. महाराजांनी शेवटी त्यांना स्वहस्ते मानधन दिले.

पूर्वी एकदा प.पू. महाराज कोठल्यातरी कार्यक्रमास म्हणा किंवा काही कामानिमित्त एकटेच रिक्शाने चालले होते. रिक्शा मंडईवरून जाणार होती. रिक्शातून जात असताना त्यांचे सहज पुढे लक्ष गेले. परकर पोलक्यातील एक मुलगी हातात पिशवी घेऊन पुढे चालली होती. प.पू. महाराजांनी लागलीच रिक्शा ती मुलगी चालली आहे तिच्या जवळ थांबविण्यास सांगितली. रिक्शा थांबताच प.पू. महाराजांनी हाक मारली, ''अग मुली'' ती मुलगी दचकून थांबली. मागे पहाते तर रिक्शात महाराज बसलेले. आपल्यालाच हाक मारीत आहेत. ती रिक्शाजवळ येऊन रिक्शाच्या पाय ठेवण्याच्या बोर्डावर डोके टेकवून तिने महाराजांना नमस्कार केला. ती बुवा गायकवाडांची कन्या होती. प.पू. महाराज म्हणाले ''ये बेटा, बैस रिक्शात. तुला मंडईत जायचे आहे ना? आम्हालाही मंडईवरून पुढे जायचे आहे. आम्ही मंडई जवळ सोडू तुला. ये बैस आमचे शेजारी. संकोच करू

नकोस, ये बैस बरं.'' तिने पुन्हा महाराजांना भावपूर्ण नमस्कार करून ती ''श्रीं''च्या शेजारी बसली. प.पू. महाराजांनी तिला घरचे क्षेमकुशल विचारले व विद्याभ्यासाबद्दल चौकशी केली. मंडई येताच रिक्शा थांबवून तिला उतरविले. ती नमस्कार करून निघाली. ''श्रीं''चा वरदहस्त तिला आशीर्वाद देत होता.

धन्य बुवा गायकवाड आणि त्यांची सुपुत्री!



११३) आमंत्रणाविना समारंभास जावे का?

कुठे प्रवासास जाणे असो, कोणत्या नियोजित कार्यक्रमास जाणे असो, कुठे स्वत:चे प्रवचन असो, प.पू. महाराज एक तास आधीच तयार असत. त्यातून लांबच्या प्रवासाला जायचे असेल तर काय? आदले दिवशीच काय काय सामान घ्यायचे याची बांधाबांध झालेली असायची. कोठली वस्तू कोठे ठेवली हेही त्यांना पूर्ण ज्ञात असायचे. टापटीप, प्रत्येक वस्तू जेथल्या तेथे हे ''श्रीं''ना अगदी अंगवळणीच होते. कोठलीही वस्तू जेव्हा लागेल तेव्हा लागलीच मिळावी, शोधण्यात वेळापव्यय होऊ नये हा त्या मागील उद्देश असे. पुढील प्रवासाची गाडी सुटण्याची वेळ जी असेल त्या वेळेच्या एक तास आधीच स्थानकावर येऊन बसले तर बिघडले कुठे? उगाच ऐनवेळी उपवाहन रिक्शा, टॅक्सी, टांगा वेळेवर मिळाले नाही आणि मिळाले तर वाहतुकीच्या गर्दीमुळे पोहोचण्यास उशीर झाला तर? वेळेच्या बाबतीत प.पू. महाराज अत्यंत वक्तशीर असत. आपण एखाद्या व्यक्तीस दिलेली वेळ, दिलेला शब्द कधीही त्यांचा चुकला नाही आणि अपरिहार्य कारणास्तव तो चुकत असेल तर ते तत्पूर्वीच तसे कळवीत आणि ऐनवेळी टळला तर दिलगीरीने क्षमा याचना करीत.

त्या दिवशी प.पू. महाराजांना श्री. रघुनाथरावांचे बरोबर दौऱ्यावर जायचे होते. पुणे स्टेशनवरून ५ ते ५.३० गाडीची वेळ असावी. ''श्रीं'' आपला बोजा बिस्तार घेऊन घरून सकाळचे आन्हिक आटोपून सकाळी १०.३० लाच आश्रमात आले होते. त्या दिवशी प्रसाद भोजनही होते. १२.३० ते १.३० पर्यंत भोजन पंक्ती पूर्ण झाल्या. ''श्रीं''नी २.३० पर्यंत वामकुक्षी केली. मी ऑफिसमध्ये श्री. नाना कुलकर्णी यांना काही मदत करीत बसलो होतो. प.पू. महाराज ३ ते ३.३० पर्यंत पुणे स्टेशनला जायला निघतील त्यांचे सोबत किंवा पाठोपाठ माझाही रिक्शाने त्यांना निरोप देण्यास जाण्याचा विचार होता. तेवढीच रघुनाथरावांना गाडीत सामान चढविण्यास मदत करता आली तर पहावी. २.३० नंतर अचानक जिना उतरून महाराज लगबगीने खाली आले. आम्ही खुर्चीवरून उठून आदबीने सरलो. नाना कुलकर्णींचे टेबलासमोर उभे राहून महाराज नानांस सांगू लागले, ''नाना एक महत्त्वाचे काम आहे. उद्या

पुण्यात ते ..... शास्त्री यांची सहस्रदर्शन शांतीचा सोहळा साजरा होत आहे. हे १०१ रुपये घ्या. एका पाकिटात घालून तुम्ही जातीने त्या समारंभास जा. त्या शास्त्रीबुवांना भेटा व हे पाकीट आमची सप्रेम शुभेच्छा भेट त्यांच्या हाती द्या. त्यांना आमचा निरोप द्या की, आम्हांस आधीच ठरलेल्या नियोजित कार्यक्रमाकरिता बाहेरगावी जावे लागत आहे म्हणून आम्ही स्वत: जातीने हजर होऊ शकलो नाही, तरी क्षमा असावी.''

श्री. नाना कुलकर्णी प.पू. महाराजांचे बोलणे संपताच उद्‌गारले, ''पण महाराज, त्या शास्त्रीबुवांकडून आपल्याला आमंत्रण पत्रिका आलेली नाही!''

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो, आमंत्रण नसे ना का? ते आमचे सहाध्यायी आहेत. परम स्नेही आहेत. एवढं काम न विसरता करा बरं.''

एखाद्या व्यक्तीशी आपले स्नेह संबंध, प्रेम, आपुलकी असेल तर ती व्यक्ती अनावधानाने आपणास आमंत्रित करण्यास विसरली असली तरी त्या समारंभास आपणहून जाऊन उपस्थित झाले पाहिजे. आपल्या आंतरिक शुभेच्छा दिल्या पाहिजेत हेच प.पू. महाराजांना अभिप्रेत होते.

११४) आहे काय आणि नाही काय!

झाले होते असे की, श्री वामन निवासाचे चाललेले बांधकाम हे सर्वथैव भाविक भक्तांच्या हजार दोन हजारांच्या देणगीवर आणि प.पू. दत्तमहाराजांचे जे काही प्रवचनांकरीता गावोगाव दौरे व्हायचे त्या प्रवचनानंतर प.पू. महाराजांच्या पुढे पडणाऱ्या दक्षिणेतून!

श्री. साबळेशेठ आणि प.पू. महाराज यांचे संभाषण चालू असताना मी ''श्रीं''च्या जवळच बसलो होतो. श्री. साबळेशेठ म्हणत होते, ''महाराज माझ्याजवळ आपल्याला बांधकामाकरीता पुढे करायला एक लाख रुपये आहेत. आज मला त्या लाख रुपयांची जरूरी नाही. आज श्री वामन निवासाचे काम अडत असेल तर हे पैसे वापरा व नंतर सवडीने जसे जमतील तसे हप्त्या हप्त्याने मला परत करा. रक्कम माझ्याकडे नुसती अलमारीत पडून राहणार तर तिचा सदुपयोग तरी होईल. बघा तुम्हास काय वाटते ते.''

''श्रीं''च्या पुढे हा मोठा प्रश्न होता. आजपर्यंत श्री वामन निवासाचे जे काही काम झाले व जे चालू आहे ते खरोखरच शुचिर्भूत धनांतून, शुद्ध द्रव्यांतून चालू आहे. द्रव्यशुद्धी हे ''श्रीं''चे ब्रीदच आहे. पण साबळेशेठही प.पू. गुरुमहाराजांचे भक्त आहेत. त्यांना वामन निवासाबद्दल मन:पूर्वक आस्था आहे. कदाचित शेठजींचे ते द्रव्य कसेही असले तरी शुद्ध भावनेतून मिळत आहे. शिवाय कामापुरते घेऊन जेवढे घेतले तेवढे तसेच्या तसे पण शुद्ध

करून त्याना परत करायचे आहे. असा विचार करून ते स्वीकारण्याचे मनी ठरविले असावे. "श्री" त्यांना नाही म्हटले नाही. परंतु पूर्ण होकारही दिला नाही. 'पाहू पुढे, तशीच गरज भासली तर' एवढेच म्हणाले.

पुढील आठवड्यातच शेठजी रुपये एक लाख घेऊनच आले व ऑफिसमध्ये श्री. नाना कुलकर्णी व व्यवस्थापकांचे खुर्चीवर श्री. भाऊसाहेब वाकडे बसले होते. त्यांच्यासमोरील खुर्चीवर टेबलासमोर श्री. शेठजी येऊन बसले. मला म्हणाले, नागले जरा ऑफिसचे दार आड करून घ्या, मला भाऊसाहेबांशी बोलायचे आहे. मी दार आड करून घेतले व म्हटले, "मीही बाहेर जाऊ का?" "तुम्ही बसा हो, तुम्ही गुरुबंधूच आहात."

शेठजी - भाऊसाहेब, हे लाख रुपये मी श्री वामन निवासाच्या बांधकामाकरता आणले आहेत.

भाऊसाहेब - देणगी म्हणून आणले आहेत काय?

शेठजी - नाही, हे उसनवार म्हणून देतो. काम झाले की, माझे मला सावकाशीने सवडीने परत करा.

भाऊसाहेब - मग या पैशाची हात उसनवार म्हणून पावती करायची का?

शेठजी - नाही, नाही पावती वगैरे काही करायची नाही. असेच घ्या आणि काम झाले का सवडीने हे असेच परत करा.

भाऊसाहेब - अहो शेठजी, हे असे कसे होईल? ही रक्कम खर्चाला घेतली, काही माल मटेरीअल करता खर्च केली आणि तेवढी रक्कम आमच्या खाती नसली तर हे पैसे कुठून आले म्हणून दाखवायला नको का? एक तर तुम्ही देणगी म्हणून पावती घ्या नाही पेक्षा हात उसनवार, तात्पुरते कर्ज म्हणून पावती घ्या. आम्हाला पावती ही करावीच लागेल. अहो, आमच्या अकाऊंटला जमेची नोंद झाल्याखेरीज ही रक्कम खर्ची कशी पडेल? ते काही नाही. तुम्हाला पावती घ्यावीच लागेल.

शेठजी - अहो, भाऊसाहेब, मला पावती नको आहे.

भाऊसाहेब - तुम्हाला नको असेल तर नका घेऊ पण तुमच्याकडून जमा म्हणून आम्ही पावती फाडणार.

शेठजी - अहो, असं काय म्हणता? याबाबत महाराजांचे आणि माझे बोलणे झाले आहे.

भाऊसाहेब - (कातावून, रागानेच) अहो, महाराज कसे हे मान्य करतील? या बाबत अकाऊंटंटचा सल्ला नको काय घ्यायला?

शेठजी - मग मी ही रक्कम घेऊन आलो आहे त्याचे काय करू?

भाऊसाहेब - वर महाराज आलेले आहेत. त्यांना विचारा काय करायचे ते.

त्या दोघांचा हा वाद म्हणजे हुज्जतच चालू होती. अखेर निर्णय प.पू. महाराजांवर सोपवून भाऊसाहेब मोकळे झाले. विमनस्क मनःस्थितीत ती रक्कम रुमालात लपेटून झब्ब्याच्या खिशांत कोंबून श्री. शेठजी जिने चढू लागले. पूर्वी म्हणजे गेल्या आठवड्यातच ''श्रीं''च्या बरोबर झालेले शेठजींचे संवाद मी ऐकले होते. वामन निवासाचे बांधकामाचा सध्या मीही एक प्रमुख घटक (''श्रीं''नी बनविल्यामुळे) होतो. मलाही ''श्री'' काय निर्णय घेतात याची उत्सुकता होती. मी शेठजींच्या बरोबर वरच्या मजल्यावर गेलो. शेठजींनी पण महाराजांपुढे दंडवत घातले. प्रसंग ओळखून मी जरा दार आड करून घेतले.

प.पू. महाराजांपुढे शेठजींनी लागलीच विषयावरच बोलायला सुरुवात केली. भाऊसाहेबांवर ते जरा रागावलेच होते व तक्रारीचे स्वरांतच प.पू. महाराजांना सांगू लागले, ''महाराज, काय म्हणावं या भाऊसाहेबांना? किती मी त्यांना समजावून सांगितले पण ऐकायलाच तयार नाहीत. ते म्हणतात, आम्ही रकमेची पावती बनविणारच. मग ती पावती तुम्ही घ्या नाहीतर घेऊ नका. हे बघा आम्ही ही रक्कम पण घेऊन आलो आहोत. आता काय करायचे ते तुम्हीच सांगा महाराज. तुम्हीच काही उपाय सूचवा.''

प.पू. महाराज प्रसन्नपणे पण मिश्कील हसले व म्हणाले, ''अहो, त्यात विचार करण्यासारखे काय आहे? ती वामन निवास बांधकामाकरीता देणगी टाकण्याची पेटी आहे ना? त्या पेटीत वरून तुम्ही ही रक्कम आत सोडा आणि भाऊसाहेबांना म्हणावं पेटीच्या खालचे दार उघडून हातात ती रक्कम घ्या आणि वापरा बांधकामाकरीता. आहे काय आणि नाही काय?'' महाराज मनसोक्त हसले. श्री. शेठजींनी शंका काढली, ''पण महाराज ती पेटीतून निघालेली गंगाजळी होईल. ती आम्हाला परत कशी मिळणार?''

प.पू. महाराज म्हणाले, ''मिळेल मिळेल बरं. गंगेतून निघून शुद्ध पवित्र होऊन तुमचे हाती येईल.'' पुढे माझ्याकडे वळून प.पू. महाराज म्हणाले, ''नागले तुमच्या लक्षात असू द्या. ही रक्कम लवकरात लवकर आपल्याकडे निधी जमा होताच शेठजींना परत करायची आहे.'' इतक्यात श्री. भाऊसाहेब वाकडे आले. प.पू. महाराजांनी ती रक्कम त्यांना स्वीकारण्यास सांगितले व हप्त्या हप्त्याने जसे निधी जमतील तसतशी ती रक्कम परत करू.

ही रक्कम स्वीकारली. यथायोग्य वेळी या रकमेचा फारच चांगल्या प्रकारे उपयोग होऊन ती सत्कारणी लागली. पण परतफेडीकरीता मात्र प.पू. महाराज आमच्याकडे सारखी चौकशी करीत. ''आता शेठजींचे किती राहीले? नंतर किती राहीले? किती देऊन झाले? अजून किती राहीले?'' त्यांचे देणे पूर्ण होईपर्यंत प.पू. महाराजांना मात्र उसंत नव्हती. एकदाचे त्यांचे देणे पूर्ण झाले.

११५) आम्ही तुमचे कोणीच नाही आहोत का?

गोरेगाव, मुंबई येथील जयप्रकाश नगर, रस्ता नं. ३ वर अभिषेक बिल्डींगमध्ये पहिल्याच मजल्यावर आम्ही रहात होतो. आमच्या शेजारच्या ब्लॉकमध्येच माझी चुलत बहीण सौ. सुधा दिलीप गडकरी रहात होती. श्री. दिलीप गडकरी यांचे मेहुणे पुण्यास रहात होते. त्यांचे नांव श्री. चित्रे. हे सद्गृहस्थ भांडारकर इन्स्टिट्युटचे प्रमुख असावेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नर पदी नेमणुकीस ते पात्र होते. सदर गृहस्थ शेजारी श्री. गडकरींकडे काही समारंभास कार्यास येत असत. अर्थात् त्यांची माझी ओळख होऊन परिचयही वाढला होता. मी पुण्यात पौंडफाट्याजवळ दशभुजा गणपतीचे मागे 'श्री वामन निवास' या धार्मिक वास्तूचे काम सेवाभावाने करीत आहे हे त्यांचे कानी अर्थातच दिलीप गडकरींमार्फत गेले. श्री. चित्रे आणि त्यांचे कार्यालयांतील काही जणांनी मिळून, सोसायटी फॉर्म करून, पुण्यातील बाणेर येथे बरीच मोठी जागा घेतली होती. ही प्लॉट ओनर्स सोसायटी होती. जागेचा लेआऊट आर्किटेक्ट मार्फत तयार करण्यात आला होता. डोंगरी उतारावर हे नगर वसणार होते. रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा स्टॉर्म वॉटर ड्रेन्स (पावसाळी पाणी वाहण्यास गटारे) स्ट्रीट लाईटस्चे पोल उभे करणे, ड्रेनेज लाईन, मोठी अवाढव्य सक्शन टँक, मोठे पंप बसविणे तसेच डोंगरमाथ्यावर रिझर्वायर टँक असे पहिल्या स्टेजचे काम होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक सभासदाचे बंगले, प्रत्येकाचे आवडीनुसार स्वतंत्र प्लॅनप्रमाणे बांधण्याची कामे निघणार होती. गोरेगांवी आलेले असताना श्री. चित्रे व दिलीप गडकरी समवेत या कामाबाबत आमच्याशी चर्चा झाली. अनायासे माझे काम पुण्यात चालू आहे, तर हेही काम मी स्वीकारावे. शिवाय पुढे आम्ही बंगल्याचे कन्स्ट्रक्शनचे काम केलेले पाहिले तर दुसऱ्यांचीही बंगल्याची कामे मिळतील. श्री. चित्रे यांच्या ओळखीचे व त्यांना मानणारेच सर्व सभासद आपले पैकीच होते. श्री. चित्रेना बहुतांश बंगल्याची कामे मलाच देता येतील अशी खात्री होती. पण आधी हे प्राथमिक काम (समाईक सभासदांचे सोसायटीचे काम) प्रथम होणार होते. या प्रथम भेटीत त्या दोघांची मलाच काम देण्याची इच्छा दिसली व बाकीचे सभासद त्यांच्यावर पूर्ण विश्वास, भरवसा असलेले असल्यामुळे मलाच काम मिळणे शक्य होते. मीही माझी उत्तमप्रकारचे काम करण्याची तयारी दाखविली. दर ५० हजाराचे काम झाले की बिल करावे लागेल अशी आमची अट मी सांगितली. तेही श्री. चित्रे म्हणाले, सर्वांना विश्वासात घेऊन करता येईल. पण प्रथम या कामाचा प्रारंभ होत आहे तर नागले यांनी प्रवेश करून घेणे महत्त्वाचे आहे.

पुण्यास श्री. चित्रे व दिलीप गडकरी यांच्या सोबत मी साईट पाहून आलो. प्रथम भागात काय काय कामे करायची हे माझ्या पूर्ण आकलनात आले. त्यांचे ऑफिसवर जाऊन काही सभासदांच्या ओळखी देखील झाल्या. मला आवश्यक तेवढ्या प्लॅन एस्टीमेटची फाईल

मिळाली. माझे कोटेशन मी द्यायचे ठरले.

माझी कल्पना होती की, हे काम, ही सोसायटी, माझे कोटेशन घेऊन इतरांच्या कोटेशनप्रमाणे त्यात कमी जास्त करून मलाच देणार आहेत. मी माझ्या लेटरहेडवर सर्व एस्टीमेट टर्म्स कंडीशनसह टाईप करून त्यांनी सांगितलेल्या तारखेच्या दोन दिवस आधीच नेऊन दिले. परंतु ते स्वीकारताना श्री. चित्रे म्हणाले, हे असे चालणार नाही. आमच्या आर्किटेक्टने त्यांच्या फॉर्मेटमध्ये टेंडर तयार केले आहे. त्या फॉर्ममध्ये भरून हे द्या.

मी लागलीच त्यांनी दिलेल्या ॲड्रेसवर आर्किटेक्ट ऑफिसात जाऊन टेंडर फॉर्म प्लॅन रु. १५०/- फी भरून घेतले. आर्किटेक्ट साहेब म्हणाले, परवाचीच म्हणजे तिसऱ्या दिवशी टेंडर देण्याची अखेरची तारीख आहे व वेळ आहे दुपारी १ वाजेपर्यंतच. त्यानंतर आलेले टेंडर स्वीकारले जाणार नाही.

मी मनात विचार केला दोन दिवस रात्र मिळत आहेत. आपले रेटस् वगैरे तयारच आहे. देऊ या भरून. मी टेंडर फॉर्म नेऊन दुसरे दिवशी क्वॉन्टीटी रेटस् त्यानुसार होणारी रक्कम सर्व भरून, तयार केले. सर्व पूर्ण करून त्या टेंडरची टर्म्स कंडीशनची पाने शेवटचे दिवशी सकाळी अभ्यासू लागलो. सर्व ठीक होते पण मुख्य अडचण होती ती २५ हजाराचा चेक किंवा डिमांड ड्राफ्ट सोबत जोडण्याची. मी चेकबुकही कंपनीचे सोबत आणले नव्हते. टेंडर भरण्यास अवधी होता ४ ते ५ तासांचा. आदल्या दिवशी जरी ही अट वाचली असती तरी मुंबईस फोन लावून चेकबुक मागविता आले असते. आता काही इलाज नव्हता. मी श्री वासुदेव निवासाच्या वरच्या मजल्यावरील आमच्या रहात्या खोलीत विमनस्क मन:स्थितीत बसलो होतो. इतक्यात श्री. कृष्णा यांनी विचारले, ''काय नागले, आज काही गूढ विचारात पडला आहात? कसला एवढा विचार करता आहात?''

मी, श्री. कृष्णा यांना सविस्तर हकीकत सांगितली व म्हटले आज माझे कंपनीचे चेकबुक माझ्याकडे असते तर चेक देऊन टाकला असता आणि कामाचे टेंडर मुदतीत भरले असते. पण आज मला टेंडरच भरता येत नाही. येथे पुण्यात मी आणायचे कुठून रु.२५ हजार?

सायंकाळी श्री. कृष्णा आर्वीकरांनी ही सर्व कहाणी प.पू. महाराजांच्या कानी घातली. प.पू. महाराजांनी श्री. नागले यांना लागलीच घरी पाठविण्यास सांगितले. मी दुसऱ्या दिवशी सकाळी श्री रेणुका निवासामध्ये जाऊन ''श्रीं''चे दर्शन घेतले. ''श्रीं'' हॉलमध्ये देवखोलीसमोर पण माझ्याकडे तोंड करून बसले. माझे दंडवत होताच बसण्यास सांगून बेल वाजवून आम्हांस चहा देण्याची आज्ञा झाली. आणि चहा घेण्यापूर्वीच बोलायला सुरुवात.

''श्रीं'' - काल काय म्हणे एका मोठ्या कामाचे टेंडर भरायचे होते?

मी - होय महाराज.

''श्रीं'' - तुम्ही ते भरले नाही. का तर २५ हजाराचा ड्राफ्ट टेंडर सोबत जोडायला तुमच्याजवळ पैसे नव्हते.

मी - होय महाराज. मला वाटले होते ते काम आम्हाला केवळ आमच्या कोटेशनवर मिळणार आहे. पण सेक्रेटरीने टेंडर फॉर्म आणून नियमानुसार टेंडर भरायला सांगितले. आम्ही सर्व टेंडरचे दर वगैरे ॲटमप्रमाणे भरले आणि ऐनवेळी त्या टेंडरच्या अटी वाचल्या. त्यात त्यांनी २५ हजाराची इसारा रक्कम (डिपॉझीट) अनामत धनादेशाने किंवा डिमांड ड्राफ्टने भरायला सांगितली होती. आम्ही आमचे कंपनीचे खात्याचे चेकबुकही आणलेले नव्हते. त्या पार्टीने याची आम्हाला पूर्व कल्पना दिली असती तर आम्ही पूर्ण तयारीनिशी आलो असतो.

''श्रीं'' - अहो ती संस्था आहे. नियमाप्रमाणेच चालणार. तुमच्याजवळ चेकबुक नव्हते, रक्कमही नव्हती. मग आम्ही पुण्यात नव्हतो का? आम्ही काही कोणीच तुमचे लागत नाही आहोत का? का तुम्ही आमच्याकडे ही तुमची अडचण सांगितली नाही? आमच्याकडे एवढी रक्कम नसती तर काहीतरी तजवीज करता आली असती. आणि दोन दिवसापूर्वीच त्या जगन्नाथ पुजाऱ्यांनी आमचे नावे आलेले पैसे बँकेत कायमनिधी म्हणून ५-६ वर्षांकरीता भरले होते तेही पैसे मुदत पूर्ण होऊन आमच्याकडे आले होते. अरे, अजित ते बँकेतून आलेले ४0 हजार रुपये यांना दे. बघा, ते मागाहून भरून चालते का?

मी - नाही महाराज, काल दुपारी १ वाजेपर्यंतच टेंडर स्वीकारण्याची मुदत होती. मी पैसे नसल्याने टेंडरच भरले नाही. निदान टेंडर तरी ड्राफ्ट न जोडता भरले असते तर टेंडर उघडण्यापूर्वी ड्राफ्ट नेऊन देता आला असता.

''श्रीं'' - हळहळले, म्हणाले ''काय हे?''

मी - क्षमा असावी महाराज. माझ्या मनात जरा सुद्धा ही कल्पना आपल्या कानावर घालण्याची सुचली नाही (मी पुन्हा दंडवत घातले आणि म्हटले) चुकलो मी. महाराजांनी क्षमा करावी.

प.पू. महाराज सद्‌गदीत झालेले दिसले. त्यांनी आवाज काढून नाक उपरण्याने पुसले म्हणजे समजावे माऊली द्रवली.

''त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव'' श्री सद्‌गुरु माऊली असते, मायबाप असतात ते! बंधू असतात, सखा असतात. परंतु आपल्या ध्यानीमनी हे वरवर बोलण्यासारखेच असते असे वाटू लागले. का नाही आपल्याला वाटले की या क्षणी आपण त्वरीत महाराजांकडे जावे? आपले वडील किंवा थोरले भाऊ किंवा एखादा समर्थ जीवश्च कंठश्च मित्र असता तर त्यांच्याकडे आपण धावत गेलो असतोच ना? आपल्या मनात,

हृदयात, हा संस्कार पूर्ण बिंबलेला नाही. कदाचित आपण जास्तीत जास्त तन, मन, धन अर्पून गुरुसेवा करावी ह्या भावनेतून हा आर्थिक सहाय्य गुरुंकडे मागण्याचा विचार आपल्या मनी आला नसावा. पण ते काही असो, प्रसंगोचित आपण वागलो नाही हेच खरे. वरील प्रसंगावरून हे मात्र निश्चित कळते की, सद्गुरु आपल्याला अंतःकरणापासून आपलेच समजत असतात. त्यांचे हृदयी आपपर भाव नसतो. गुरुसारीखा असता पाठीराखा आपल्याला जगातच नव्हे तर त्रैलोक्यात काय कमी आहे.

अगणित पुण्य केले, म्हणूनच या जन्मी हे असे करुणासागर सद्गुरु लाभले. आम्हीच आपली खरी ओळख व्हायला कमी पडतो.

११६) फोडणी चांगली जमली आहे!

श्री रेणुका निवासाच्या वरच्या (पहिल्या) मजल्याचे बांधकाम चालू होते. माझा मुक्काम गुरुगृहीच होता. श्री वामन निवासाचे काम चालू असताना मी श्री वासुदेव निवासात रहात होतो. परंतु आता फक्त श्री रेणुका निवासाचेच काम चालू असल्याने मला रेणुका निवासातच रहाण्याची, मुक्कामास रहाण्याची आज्ञा झाली. जीवनात व्यवहार्य वागावे हे धर्मास धरून आहे आणि धर्मेप्रीतीम् हे आपले बोधवचन आहे. छोट्या छोट्या गोष्टींतून सुद्धा प.पू. महाराजांचे सान्निध्यात बरेच काही शिकायला मिळे.

श्रीमती नीलाताई जोशी यांचे प.पू. दत्तमहाराजांचे चरित्रात्मक पुस्तक "प्रयाग" लिहून पूर्ण झाले होते. तो ग्रंथ छापण्यापूर्वी त्यात वर्णिलेल्या सर्व घटना, प्रसंग अगदी बरोबर आहेत हे पडताळून पाहण्याकरीता नीलाताईंना तो ग्रंथ चरित्र नायकालाच वाचून दाखवायचा होता. "श्रीं"ना त्यांनी तशी श्रवणांस बसण्याची प्रार्थनापूर्वक विनंती केली. नीलाताई, श्रीगुरुमहाराज प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांच्या अनुग्रहीत. प.पू. दत्तमहाराजांनाही त्यांनी बिंब-प्रतिबिंब या भावनेतूनच पाहिले. श्रीगुरुमहाराजांइतकाच गुरुभाव प.पू. श्रीमहाराजांच्या ठिकाणी होता आणि आहे. देव भावाचा भुकेला. नीलाताईंसाठी प.पू. पांडुरंगही आषाढीला नीलाताईंकडे प्रकट झाल्याखेरीज कधीही राहीला नाही. सहाजिकच रोज दुपारी ३ ते ४ वामकुक्षीनंतर आणि आश्रमात जाण्यापूर्वी नीलाताईंचे वाचन व्हावे व प.पू. महाराजांनी श्रवण करावे यास प.पू. महाराजांनी अनुमती दिली. इतरही काही घरची तर काही दारची भक्त मंडळी ऐकावयास बसत. मी तिथेच असल्याने मलाही ती. नीलाताईंनी, "वेळ असेल तर तुम्ही ऐकायला बसत जा" म्हटले. श्री गुरुगाथा, परम गुरुभक्तांनी लिहीलेली, कोणा भक्तास ऐकावीशी का वाटणार नाही? मी माझी वरची मार्गदर्शनाची व इतर कामे मार्गी लावून तो

एक तास राखून ठेवीत असे. श्रीमती नीलाताईंचे ग्रंथवाचनास प्रारंभ झाला. प.पू. महाराजांच्या वक्तशीरपणास तोड नाही. तीन म्हणजे तीन. महाराज श्री रेणुका निवासच्या रस्त्याकडील खोलीत म्हणजे दिवाणखाण्यात छोटा पलंग होता त्यावर येऊन आसनस्थ होत. समोर ती. नीलाताई वाचनास बसत. आजूबाजूस आम्ही इतरेजन असू.

प.पू. महाराज नीलाताईंचे वाचन अगदी मन:पूर्वक ऐकत असत. एखादा चुकीचा प्रसंग किंवा गोष्ट आली तर महाराज ती सुधारून देत. ''नाही हे असे नाही, असे असे घडले.'' एखादा त्यातील प्रसंग महाराज अधिक विस्तारून सांगत, त्यात आणखी काही महत्त्वाची माहीती मिळे. त्या त्या वेळी नीलाताई आपल्या वहीत नोंद घेत. प्रसन्नचित्त सद्गुरु असताना बराच काही प्रसाद मिळून जाई. बहुतेक ती. नीलाताईंचे वाचन वस्तुनिष्ठ, वास्तव जसे घडले तसेच होते. मिळाली तर अधिक चांगली माहीती, परंतु स्वत:ची महती न वाढवणारी मिळून जाई. स्वकीर्ती कानी ना ऐकावी हे तर प.पू. महाराजांचे उद्दीष्टच. पण नीलाताईंवरील कृपाप्रसादाने प.पू. महाराज स्वस्थचित्त ऐकत असत. ते सर्व स्वत:बद्दल लिखाण ऐकताना ते संपूर्ण त्रयस्थाचे भूमिकेत असत. जणू मी तो नव्हेच. हे कोण्या महापुरुषाचे वर्णन या नीलाताई करीत आहेत आणि आम्ही ऐकत आहोत. आम्ही इतरेजन जसे श्रवण करीत होतो त्यापैकीच एक होऊन महाराज ऐकत होते. त्या ग्रंथातून येणारी ''श्रीं''ची स्तुती ऐकताना ''श्रीं''च्या चेहऱ्यावरील भाव निर्विकार असत. आई, वडील, गुरुमहाराज यांच्या संबंधांत काही आठवणी, प्रसंग आला की, प.पू. श्रीमहाराज भावपूर्ण होत तर कधी ब्रह्मानंदी टाळी लागली आहे असे भासे.

भागवतावरील प्रवचनात श्री गोपालकृष्ण श्री वसुदेव देवकी यांचे पुढे ''आपली सेवामात्र आमच्या हातून काहीच घडली नाही'' एवढे वाक्य महाराज उच्चारतात आणि महाराजांचा कंठ अगदी गदगदून येतो. उपरण्याचे टोक डोळ्यावरून फिरते आणि नाकावरूनही. प.पू. महाराजांचेही म्हणण्यात येते की हुबळी धारवाड व शंकराचार्यांकडे राहणे ह्या काळात आम्हाला 'माता-पित्यांची' व्हावी तेवढी सेवा घडली नाही.

ज्या दिवशी ते समग्र वाचन झाले आणि ती. नीलाताईंनी प.पू. महाराजांना प्रश्न केला, ''महाराज हे आमच्याकडून लिहून झालेले 'प्रयाग' ग्रंथाचे लिखाण कसे झाले आहे? आपल्याला पसंत पडले किंवा नाही, आवडले की नाही, आपला अभिप्राय काय?''

या ती. नीलाताईंच्या प्रश्नाला प.पू. महाराजांनी मोठे मार्मिक उत्तर दिले.

''आधीच आपण बायका पाकनिष्पत्तीमध्ये तरबेज, मीठ किती घालावे, मसाला किती वापरावा, शर्करा किती पेरावी आणि शेवटी फोडणी कशी द्यावी यात निष्णांत. फोडणी मात्र फारच चांगली जमली आहे.''

समोरच्या व्यक्तीस प्रशंसा करून खूष करणे, कोणाचा दोष न पाहता गुणवर्णन करणे आणि आपणाकडे कमीपणा घेणे हा ''श्रीं''चा गुणही वाखाणण्यासारखाच आहे. अनुकरणीय आहे. ''मी माझे चरित्र-जीवन विशेष काय आहे? तुम्ही साहित्यिक उत्तम लेखन करणारे आहात. हा ग्रंथ उत्तम शब्दांत उत्तम वाक्यात विद्वत्ताप्रचूर लिहीला आहात.'' असेच या महात्म्यास म्हणायचे असेल. आधीच प्रसिद्धी पराङ्मुख, त्यात भक्तांनी धरली सद्गुरुंच्या प्रसिद्धीची कास. आता आम्ही काय म्हणावे?

जसे रामदास स्वामींनी म्हणावे, ''आमचे ज्ञान हे अफाट वाळवंटातील एका वाळुंच्या कणाएवढेही नाही''

विद्याविनयोपेता हरति न चेतांसि कस्य मुनिजनस्य
कांचनमणी संयोगे न जनयति कस्य लोचनानंदम्



११७) सांसारिक समस्या निवारण - (१)

माझी मनोधारणा मी गुरुपदेशानंतर १९५७ पासून तरी कशी ठेवली. शक्यतो ऐहिक, सांसारिक समस्येकरता गुरुमहाराजांकडे मागणी मागायची नाही. बरे वाईट दिवस संकटे आली तरी प्रारब्धवशात् ती भोगून सोडायची, सहन करायची, 'पती लक्ष्मीचा जाणतसे,' 'सकल जगाचा करितो सांभाळ तुज मोकलील ऐसे नाही.'

हे जरी मनावर संस्कार असले तरी संसार, त्यांतील विघ्ने, संकटे ही गुरुंपुढे मांडण्याची वेळ येतेच. म्या पामरांकडूनही प.पू. महाराज ब्रह्मर्षी दत्तमहाराजांना अनेकदा ताप दिला गेला आहे.

चि. संदीपला डिप्लोमा आणि चि. दिनेशला ११ वीला कॉलेजमध्ये ॲडमिशन

चि. संदीप यास १२ वी नंतर इंजिनिअरींगला ॲडमिशन न मिळाल्याने त्याने लार्सन टुब्रोची मेकॅनिकल टूल्स ॲण्ड डायमेकर मध्ये 'अप्रेन्टीसशीप' २ वर्षे करून कोर्स पूर्ण केला. आता पॉलिटेक्निक कॉलेजला त्याला मेकॅनिकल कोर्सला तर दिनेशला ८४.७७ टक्के मार्कस् एस्.एस्.सी. ला मिळाले असून कॉलेजला सायन्स साईडला ॲडमिशन पाहिजे होती. दादर ते बोरीवलीपर्यंत अनेक कॉलेजमध्ये प्रयत्न चालू होते. ८५ टक्क्यांना ॲडमिशन बंद झाली होती. दुसऱ्या लिस्टची वाट पाहणे भाग होते.

मी एके सायंकाळी हातपाय धुवून बैठकीला बसण्याच्या तयारीत होतो. प.पू. महाराजांच्या फोटोपुढे कंबळ आसन टाकून, उदबत्ती लावून, बैठकीस बसणार इतक्यात सौ. लता मानसिक ताण अनावर होऊन माझ्याकडे आली व मलाच हात जोडून म्हणू लागली,

''प.पू. महाराजांकडे काही न मागण्याचा तुमचा नियम जरा बाजूला ठेवा आणि महाराजांना प्रार्थना करा की, कसेही करून संदीप व दिनेशला ॲडमिशन मिळू द्या. नाहीतर त्यांचे वर्ष फुकट जाईल. मी हात जोडते पण तुम्ही महाराजांना कळवळून हाक मारा.''

माझी बैठकीची नेहमीची वेळ झाल्याने मी डोळे मिटून ध्यानमग्न होण्यास अत्यंत उतावीळ होतो. जशी झोप दाटून अनावर होते तशी माझी अवस्था होती. परंतु आज महाराजांसमोर प्रार्थना केल्याशिवाय ही काही मला डोळे मिटू देणार नाही. म्हणून हात जोडून मी प.पू. श्रीमहाराजांचे फोटोसमोर प्रार्थना केली. ''महाराज, चि. संदीपला डिप्लोमाला इंजिनिअरींगला पॉलीटेक्निक कॉलेजला आणि चि. दिनेशला ११ वी ला सायन्स साईडला जवळच्याच कॉलेजात लवकरात लवकर ॲडमिशन (प्रवेश) मिळू द्या. त्यांच्या मातोश्रींना ताण असह्य होत आहे.''

मी प्रार्थना करून ध्यान धारणेत निमग्न झालो. दोन चार दिवस निघून गेले आणि ''श्रीं''च्या कृपेने चि. संदीप यांस विलेपार्ले जुहू येथील भगूबाई पॉलीटेक्निकला मेकॅनिकल साईडला हवी तशी ॲडमिशन मिळाली. चि. दिनेश यास अंधेरी येथील भवन्स कॉलेजला प्रवेश मिळाला. पुढील आठवड्यातच प.पू. महाराजांचे मुंबईत माटुंगा येथे श्री. माधवराव तांबोळी (सौ. सुलभाताई) यांच्या घरी आगमन झाले. आम्ही सहकुटुंब दर्शनास गेलो. सौ. लताबाईंस आम्हां सर्वांच्या पुढे दर्शन घेण्यास उभे केले. तिने चरणी नमस्कार करताच मिस्कीलपणे हसत ''श्रीं''नी प्रश्न केला, ''काय मग दोन्ही मुलांना हवे तसे प्रवेश मिळाले ना?'' सौ. लता हसली व म्हणाली, 'होय महाराज.' नंतर दोघांना हव्या होत्या तशा ॲडमिशन कशा मिळाल्या ते सविस्तर सांगून आपलीच कृपा असे म्हणून साष्टांग नमस्कार केला.

११८) सांसारिक समस्या निवारण - (२)

चि. दिनेशच्या बारावीच्या परीक्षेनंतरही चांगले टक्के गुणात असताना सुद्धा मुंबईत इंजिनिअरींग कॉलेजला प्रवेश मिळणे अतिशय कठीण झाले. वसई पासून सर्व टेक्निकल (इंजिनिअरींगची) कॉलेजेस शोधून झाली. पण सर्वत्र ॲडमिशन फूल. शेवटी भायखळ्याच्या साबुसिद्धीक ह्या कॉलेजला मॅनेजिंग कोट्यातील ॲडमिशन घेणे आम्हांस नकोसे वाटत होते. कारण त्यांच्या नेहमीच्या वागण्यात तंद्री असे. विस्मरण हा त्याचा स्थायी भावच झाला होता. अशा त्याच्या स्वभावामुळे व आई वडीलांना सोडून कधी दूर राहीलेला नाही म्हणून आम्हांस बाहेरगावी पाठविण्याचे धैर्य नव्हते. तो अभ्यासू, स्कॉलर असला तरी त्याच्या दैनंदिन व्यवहारात त्याच्या हालचाली मंद, सुस्त आणि परावलंबीत्व असलेल्या अशा होत्या.

ॲक्टीव्ह-चपळ-धावपळ करणारा असा तो नव्हता. कोठेच प्रवेश मिळेना. साबुसिद्धीक ह्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेण्याचा बेत नक्की केला. खरं म्हणजे हे कॉलेज मुस्लीम कम्युनिटीचे होते आणि कामाठीपुरा या लोकवस्तीच्या नजीक होते. पण नाईलाज होता. त्यांनी लागलीच दुसऱ्या दिवशी प्रवेशाकरिता वीस हजार, ॲडमिशन फी व इतर खर्च, म्हणून रक्कम आणण्यास सांगितली. दुसऱ्या दिवशी आम्ही बोरीवलीस श्रीमती नीलाताई जोशी यांच्याकडे प.पू. महाराज आषाढी एकादशीच्या दिवशी आले होते, त्यांच्या दर्शनास जाणार होतो.

आम्ही दोघे, मी व दिनेश सकाळीच बोरीवलीस प्रथम ''श्रीं''चे दर्शनास गेलो. दोघांनीही दर्शन घेतले. प.पू. महाराजांनी बसण्यास सांगितले. गेल्या महिन्यातच प.पू. महाराज डॉ. जोशींबरोबर वारणा येथील इंजिनिअरींग कॉलेजला भेट देऊन व कॉलेज प्रमुख श्री. तात्यासाहेब कोरे यांची भेट घेऊन आले होते. श्री. तात्यासाहेब कोरे यांनी प.पू. महाराजांना कॉलेज दाखवून त्यांचे इन्स्टिट्युटची समग्र माहीती दिली. श्री. तात्यासाहेब कोरे यांच्या कार्याबद्दल जोशींकडून त्यांना बरेच समजले होते.

आम्ही प.पू. महाराजांच्या समोर आज्ञेनुसार बसल्यानंतर मी हात जोडून प.पू. महाराजांना म्हटले, ''आज चि. दिनेश यास भायखळा येथील साबुसिद्धीक इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यास जात आहे.''

लागलीच प.पू. महाराज म्हणाले, ''दिनेशला वारणाच्या कॉलेजला प्रवेश का घेत नाही? ते कॉलेज फार चांगले आहे. गेल्या महिन्यातच आम्ही त्या कॉलेजला भेट देऊन सर्व पाहून आलो. ते तात्यासाहेब कोरे जातीने सर्व विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवीत असतात. त्यांचे चांगले कार्य चालू आहे. बघा कसे वाटते ते.''

मी लागलीच म्हटले, ''महाराज, मग मी व दिनेश आजच रात्रीच्या गाडीने निघून उद्या सकाळी वारण्यास पोहोचतो आणि कॉलेजला प्रवेश घेतो.''

आम्ही रात्रीचे महालक्ष्मीने निघून सकाळी वारणा कॉलेजला पोहोचलो. तेथे मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील, केमिकल्स अशा सर्व शाखेत त्याला प्रवेश घेता येणार होता. परंतु त्याने सिव्हील इंजिनिअरींगलाच जायचे ठरविले होते. त्याप्रमाणे सर्व फी हॉस्टेलसह भरून आम्ही प्रवेश घेतला. प.पू. महाराजांना पुण्यास पत्र टाकून तसे कळविले.

११९) सांसारिक समस्या निवारण (३)

वारणा कॉलेजला प्रवेश मिळाल्यानंतर चि. दिनेशला हॉस्टेलची रुम मिळाली. त्यात आणखी दोन पार्टनर होते - १) राणे, २) मंत्री. त्याला एक प्रश्न होता की, हे दोघे पार्टनर

धार्मिक वृत्तीचे असतील की नाही आणि सायंकाळी ध्यान धारणेची बैठक करणारे असतील की नाही. आपली संध्यावंदन आणि ध्यानधारणा बैठक ह्या नैमित्तिक साधनेला हे दोघे हसतील की काय? आपली टर तर उडविणार नाहीत ना? ह्या शंका मनात येताच चिरंजीवांचे पत्र सद्गुरुंना गेले. ''माझ्या हॉस्टेलच्या खोलीत दुसरे दोन पार्टनर आहेत. त्यांच्यासमोर माझी प्रात:संध्या, सायंसंध्या आणि बैठक साधना हे कसे होईल? मी साधना कशी करू?''

''श्री.''चे उत्तर आले, ''कोठलीही चिंता करू नये. सर्वकाही सुरळीत आणि मनासारखे होईल. तुमची नित्य संध्यादी आन्हिक आणि साधना दोन्ही वेळ किंवा जमेल तशी चालू ठेवावी.''

कॉलेज सुरू झाले. पार्टनर आले. प्रथम दिवशी प्रात:संध्यादी आन्हिक पाहून राणे यास काही वाटले नाही. मंत्रीलाही बरे वाटले. सायंकाळची दिनेशची बैठक पाहून मंत्री मात्र विस्मयाने बेहद्द खूष झाला. कारण त्याचीही हीच अडचण होती की, आपल्याला ध्यानधारणादी बैठक कशी करायला मिळेल. तोही प.प. शिवोमतीर्थ स्वामी महाराजांचा योगदीक्षाभूत अनुग्रहीत होता. त्याला हा मोठा चमत्कार आणि योगायोग वाटला तर दिनेशला सद्गुरुंच्या म्हणण्याप्रमाणे सर्व सुरळीत आणि मनासारखे झाल्याने ''श्रीं''च्या आशीर्वादपूर्ण वचनाची कृतार्थता वाटली.

नंतर चि. दिनेश वेळोवेळी ''श्रीं''शी पत्रोत्तराने संपर्क साधत होता. वरच्यावर त्याला ''श्रीं''चे यथायोग्य मार्गदर्शन होत गेले. आम्हांस चि. दिनेशची यत्किंचितही काळजी राहीली नाही.

जेव्हा जेव्हा मी ''श्रीं''च्या दर्शनाला जात असे, तेव्हा तेव्हा प.पू. महाराज दिनेशचे पत्र आल्याचे सांगत व त्याच्या तेथील वास्तव्याचे वर्णन करीत. त्याचे क्षेम कुशल कथन करीत. इतकेच काय पण मुंबईस ''श्रीं''चे मला पत्र आले तरी त्यात दिनेशची कुशलता किंवा कौतुक लिहीलेले असे. एकदा मी आणि दिनेश श्री रेणुका निवास मध्ये ''श्रीं''च्या दर्शनास गेलो असताना प.पू. महाराजांनी आश्चर्याचा धक्काच दिला.

''अहो, आपल्या दिनेशची कुंडलिनी शक्ती जागृत झाली. स्वाधिष्ठान मोकळे झाले. ही पाहिलीत कां पत्रासोबत आलेली त्याची काव्ये? त्यांची प्रतिभा जागृत झाली.''

मी 'श्रीं'ना साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, ''महाराज ही आपलीच कृपा नव्हे काय?''

प.पू. महाराजांनी चि. दिनेश याने त्यांना पाठविलेली काव्य-भक्तीपर भावगीते आपले पिशवीतून काढून पुडके माझ्या हाती दिले व म्हणाले, हे वाचा.

चि. दिनेशच्या पहिल्या वर्षाचा रिझल्ट लागला. तो फर्स्टक्लासमध्ये पास झाला. ही बातमी ''श्रीं''च्या कानावर घालण्यासाठी मी पेढे घेऊन ''श्रीं''चे दर्शनास गेलो. प.पू.

महाराजांना निकाल ऐकून आनंद आणि समाधान झाले. मध्यंतरीचे काळात कोणीतरी प.पू. महाराजांना सांगितले की वारणा कॉलेज फार महागडे आहे. बरीच फी भरावी लागते. भेटीत प.पू महाराज मला म्हणाले, ''आम्ही तुम्हाला दिनेशची ॲडमिशन वारणा कॉलेजला घ्यायला सांगितली, तुम्ही घेतलीही. पण अलीकडे आम्हांस कळले की या कॉलेजची फी फार मोठी आहे. आम्ही तुम्हाला अधिक खर्चातच टाकले.''

मी हात जोडून म्हणालो, ''नाही महाराज, तसे नाही. फी फार आहे वगैरे ठीक आहे. परंतु येथे फी व्यतिरिक्त डोनेशन वगैरे मागितले जात नाही. मागील हाताने पैसे द्यावे लागत नाहीत. व्यवहार पारदर्शक असून शिक्षण खरोखरच चांगले आहे. कॉलेजची शिस्त, संस्कार चांगले आहेत. आपण चि. दिनेशची ॲडमिशन येथे घेतली हे फारच बरे झाले आहे. आता पदवी परीक्षा होईपर्यंत कॉलेजही बदलण्याची आवश्यकता नाही.''

चि. दिनेशचे एक प्रोफेसर होते. का कोणास ठाऊक पण दिनेशबद्दल त्यांना सहानुभूती, आपुलकी वाटायची. पुढे त्यांना कोणाकडून कळले की दिनेश काही आध्यात्मिक साधना करतो. त्यांनी दिनेशला त्यांना भेटायचे आहे व खोलीवरच येऊन भेटेन म्हणाले. दिनेशकडे ते साधनेबद्दल विचारू लागले. आपली साधना गुप्त ठेवायची असते. साधनेचा प्रचार, प्रसार आणि आपला नावलौकिक होऊ नये असे दिनेशला वाटत होते. परंतु ते वरच्यावर या विषयावर चर्चा करण्यास येऊ लागले. विशेष म्हणजे ते त्या रुमवर आले की, आपली पादत्राणे सुद्धा बाहेर काढून, हातपाय धुवून दिनेशच्या खोलीत शिरायचे. त्यांची उत्कंठा पाहून आणि आपल्या सद्गुरुंची गुणगान गीता त्यांच्यासमोर गायल्याखेरीज दिनेशला राहवले नाही. नंतर त्यांनी दिनेशकडे अट्टाहास केला की तू पुण्यास जाशील तेव्हा मी ही तुझ्यासोबत येईन. तू मला दर्शन घडव व प.पू. महाराजांची ओळख करून दे.

शेवटी दिनेश त्यांना प.पू. महाराजांची आधी पत्राद्वारे परवानगी घेऊन दर्शनास घेऊन गेला. श्रीमान प्रोफेसर सरांनी प.पू. महाराजांकडे चक्र योगदीक्षेची मागणी केली. परम भाग्यवशात् सरांना सद्गुरुंकडून दीक्षेची तारीख, वेळ मिळाली. प्रोफेसर सर यथावकाश दीक्षाभूत, प.पू. महाराजांचे अनुग्रहीत झाले. पुढे अनुभवांनी त्यांना कळून चुकले की कोणत्याही अभ्यासाला ही साधना, हा योगाभ्यास पूरक आहे. आकलनशक्ती वाढते. ज्या विद्यार्थ्यांना ध्यानधारणेची (मेडीटेशनची) आवड असेल अशा विद्यार्थ्यांकरीता लवकरच त्यांनी कॉलेज अधिकाऱ्यांच्या परवानगीने कॉलेजात एक ध्यान धारणेकरीता ''साधना कक्ष'' सुरू केला.

१२०) ''श्रीं''चा अपरिग्रह

चि. दिनेशचे वारणा कॉलेजचे शेवटचे वर्ष होते. शेवटच्या वर्षाचे वर्ग चालू होताच मी स्वत: वारणा कॉलेजला जाऊन पुढील संपूर्ण वर्षाच्या अंतिम फीज् संपूर्ण भरून टाकल्या.

प.पू. महाराजांच्या निवासाचे श्री रेणुका निवासाच्या वरच्या माळ्याचेही वाढीव बांधकाम पूर्ण झाले होते. ते पूर्ण होण्यापूर्वी प.पू. महाराजांनी आम्हांस बोलावून घेऊन केलेल्या कामाचे मानधन म्हणून कोऱ्या पाकीटावर ''ईश्वरकृपापात्र श्रीमान् शशीकांत नागले यांस,'' असे म्हणून पाकीट माझ्या हाती दिले. श्री सद्गुरुंची सेवा तन, मन, धन अर्पून करायची मी ठरविले होते. एका पंथराज त्रैमासिकांत प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांनी लिहीलेला लेख वाचनात आला होता की, शिष्याने गुरुमहाराजांना दक्षिणा रुपात काय द्यावे? घोडे, हत्ती, रथ हे पुराण ग्रंथीत झाले असले तरी आजच्या काळात धन, सुवर्ण, जमीन, घर अशा कितीतरी दक्षिणा आहेत. इतकेच काय तर शिष्याने गुरुमहाराजांना आपल्या धनार्जनातील ५ वा हिस्सा जसा आई-वडीलांना देतो तसा द्यायचा आहे. गुरु गृहस्थाश्रमी असले तर त्यांचे पत्नीस, गुरुपत्नीस, गुरुपुत्र, कन्या ह्यांना सुद्धा दाने आहेत. मग आपण सद्गुरुंना काय देत असतो? हा माझ्यापुढे प्रश्न आणि सद्गुरुंकडून आमच्या हाती आलेले हे पाकीट. पाकीट उघडून पाहिले तर दहा हजारांचा चेक होता. मी तो चेक श्री चरणांशीच ठेवून म्हटले, ''महाराज आपला फक्त कृपाआशीर्वाद असू द्या. हे आम्हांस काही नको.''

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो, ही फुलाची पाकळीच आहे. जास्त काही नाही. आपण ती आमचा प्रसाद म्हणून स्वीकारावी.''

प.पू. श्रीमहाराजांपुढे मला नकार देता येईना. गुरुमहाराजांनी हा आमचा प्रसादच म्हटल्यानंतर नाकारायचा कसा? आमच्या नेत्रांतून ओघळणारे अश्रू रुमालाने टिपून मी ''श्रीं'' ना साष्टांग नमस्कार घातला.

ह्या गोष्टीला वर्ष होऊन गेले असेल. पुढे चि. दिनेश यांचीही पदवीची अंतिम परीक्षा जवळ आली होती. मी पुण्यास गेलो होतो. प.पू. गजानन आश्रम स्वामी महाराज यांना भेटायला. त्यांनी आम्हांस चि. दिनेश याची फी भरण्यासाठी कमी पडलेले रु. २५००/- श्री. निमकर यांच्या सोबत घरी पाठविले होते. सोबत पत्र होते, त्यात त्यांनी म्हटले होते, ''चि. दिनेशची फी भरण्यास कमी पडलेले पैसे पाठवित आहे. मनास गैर काही वाटून घेऊ नका. संन्याशाकडून कसे स्वीकारावे हाही प्रश्न मनांत येऊ देऊ नका. ही तुमच्या जिवलग सख्याने दिलेली क्षणिक किरकोळ भेट आहे. ही आमची ठेव म्हणून आम्ही तुमच्याकडे पाठवित आहोत असे समजा. तुमची अडचण दूर होऊन श्री शिल्लक जमा झाली की सवडीने आमची ठेव आम्हांस परत करा. आम्हा संन्याशांना काय करायचे आहेत ते पैसे? परंतु तुम्हास

जड वाटू नये व नंतर कोण्या गरजूंना देता येतील.''

मला ते स्वीकारणे भाग पडले होते. वर्षा सहा महिन्यांनी मी ते परत करण्यास आलो होतो. तेथून ''श्रीं''चे दर्शनास श्री रेणुका निवास मध्ये गेलो. ''श्रीं''ना साष्टांग नमस्कार केला आणि आज्ञेने समोर बसलो. घरचे दिनेशचे क्षेम कुशल तसेच कामकाजाबद्दल चौकशी झाली. नंतर प.पू. महाराजांनी चि. अजित, धाकटे चिरंजीव यांना हाक मारली व काही हळू आवाजात सांगितले. चि. अजित पाकीट घेऊन आला. ''श्रीं''च्या हातात त्यांनी ते दिले. प.पू. महाराजांनी मला जवळ बोलावले व आमच्या हाती रुपये पाच हजाराचा चेक दिला. मला सखेद आश्चर्य वाटले. मी म्हटले, ''महाराज आपण मागे एकदा दहा हजारांचा चेक दिलात. आपण प्रसाद म्हणून दिला आहे हे म्हणालात, आम्हाला स्वीकारणे भाग पडले. आता हे काय महाराज? नका महाराज मला नाराज करू नका. माझी अंशत्वे झालेली सेवा स्वीकारा. मी वंदन करतो महाराज. महाराज माझे मन, बुद्धी आपण जाणता. आपण माझा विचार करा.'' मी पुरा विरघळलो होतो. आता चरणी टाऽहो फोडणे बाकी होते.

प.पू. महाराज, ''अहो, तुम्हालाही आर्थिक अडचणी आहेत. मुलांची शिक्षणं, त्यांचे खर्च आहेत. दिनेशची वारणा कॉलेजची तर फी मोठीच आहे. असू द्यात ते, दिनेशची फी भरायला होतील.''

मी, ''महाराज दिनेशच्या शेवटच्या वर्षाची फी पै न पै भरली आहे. आता काहीही फी भरायला लागणार नाही. मी एकदमच या वर्षाची फी भरली आहे. कृपया आपण हा चेक, हे पैसे मला देऊ नका.''

''श्रीं'', ''अहो दिनेशची आणखी फी भरावी लागेल, हे पैसे असू द्यात. कॉलेजमधून बाहेर पडेपर्यंत त्यांचे काहीना काही देणे शिल्लक राहील, त्याकरीता हे असू द्यात. आमचे ऐका.''

पुन्हा नाईलाज. प.पू. महाराजांकडून तो पाच हजारांचा चेक स्वीकारावा लागला. विमनस्क मनाने घरी परतलो. घरी पोहोचताच सौ. लताबाई म्हणाल्या, ''अहो, वारणा कॉलेजचे पत्र आले आहे. त्यांनी कसली तरी वाढीव फी रुपये पाच हजार भरायला सांगितली आहे.''

१२१) आयुष्यातील कटू कर्तव्य :

श्री रेणुका निवासाच्या ग्राऊंड फ्लोअरच्या मागील जागेत वाढीव बांधकाम करून प.पू. महाराजांना सेल्फ कन्टेण्ड बेडरुम, बाजूला देवघर आणि हॉल बांधण्याची संकल्पना प्रथम माझ्या, श्री. गोडसे आणि श्री. श्रृंगारपुरे यांच्या डोक्यातून सहमताने प्रकट झाली. ''श्रीं''ची

अनुमती असल्याखेरीज ती कल्पना साकारणे अगदी अशक्य होते. 'श्री रेणुका निवास' आणि आत्रेय सोसायटीचा १३ नंबरचा प्लॉट प.पू.द.धुं. कवीश्वरांचे नावावर. म्हणजे प्लॅन म्युनिसीपालटीत मंजुरीकरीता पाठवायचे तर मालकांची संकल्पित वास्तुच्या नकाशावर सही हवी. अर्थात् ''श्रीं''ची अनुमती मिळवण्याची कामगिरी आमच्यावर आली. श्री वामन निवासाचे काम सुरू झाले होते आणि मी प.पू. महाराजांचे सतत संपर्कात होतो. आम्ही आमचे आयुष्य सुखवस्तू जागेत ऐषआरामात उपभोगीत आहोत आणि आपले सद्गुरु मात्र अत्यंत अपुऱ्या गैरसोयीच्या जागेत प्रथम वर्तकवाडा, शनिवार पेठ व नंतर अवघ्या दोन खोल्या आणि स्वयंपाकघर एवढ्याच जागेत तीन मुलांसह रहात आहेत. ही सल सतत मनास टोचत होती. ''श्रीं''ची परवानगी घेण्याची कामगिरी मी हिरीरीने स्वीकारली खरी पण ती मिळविणे किती कठीण आहे ते लक्षात येण्यास वेळ लागला नाही.

पहिली गोष्ट प.पू. महाराजांची त्यांच्या पदवीस शोभनीय, त्यांचे जीवनातील मूल्ये, अपरिग्रह कोणाकडूनही काही न घेणे. दुसऱ्याच्या कपर्दिकेसही स्पर्श न करणे, कर्ज न घेणे, आपल्यामुळे कोणासही शारीरिक, मानसिक, आर्थिक श्रम न देणे, आपल्या गरजा कमीत कमी ठेवणे, असेल त्या स्थितीत समाधानी राहणे.

ठेविले अनंते तैसेची रहावे,
चित्ती असू द्यावे समाधान

कोणाही व्यक्तीचे उपकार न घेणे, उलट परोपकारात आयुष्य वेचणे. अशा स्थितीत अल्पमती आम्ही, प.पू. महाराजांची अनुमती कशी मिळवणार? ह्या महापुरुषांपुढे काय युक्तीवाद करणार?

एकदा प.पू. महाराजांना घरापर्यंत सोबत करण्याची संधी मिळाली. श्री रेणुका निवासात पोहोचलो. ''श्रीं''नी जेवून जाण्याचा आग्रह केला. मी मान्य केला. ''श्रीं''ची सायंसंध्या वगैरे पूर्ण होऊन ते खोलीत आपले आसनावर बसले. आम्हाला समोर बसण्याची आज्ञा झाली. हसतमुख प्रसन्नचित्त ''श्रीं''ची चर्या पाहून ठरविले, हीच वेळ चांगली आहे. प.पू. महाराज श्री वामन निवासचे बांधकामाबद्दल बोलत होते. त्या चर्चेला धरूनच मी विषयाला हात घातला.

मी - महाराज आपल्याला ही जागा फार अपुरी पडते नाही का?

''श्रीं'' - होय, आहे ठीक आहे. पुढे कधीतरी होईल मोठी.

मी - महाराज, पुढे कशाला? आता आम्ही श्री वामन निवासाच्या बांधकामाकरीता अनायसे येथे आहोतच. तर आपल्या करीता आणि देवघराकरीता मागील बाजूस दोन खोल्या, एक हॉल एवढे तरी करता येईल.

''श्रीं'' - होय, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. आम्हांला आणि आमचे देवाकरता स्वतंत्र खोली असावी ही आमची गरज आहे. पण आजच काही त्याकरीता अडलेले नाही. पुढे काही पैसे जमा झाले म्हणजे विचार करता येईल.

मी - महाराज, पैशाची मिळवणी कशीही होईल. आम्ही सर्व आपले भक्त साधक आपले काय करतो? काही नाही. काही सेवा आम्हा सर्व गुरुबंधूंकडून करून घ्यावी. जरूर तर ज्या ज्या भक्तांनी काही पैसे पुढे केले असतील तर आपल्याला परत करता येतील. पण आज वामन निवास बांधकामामुळे सर्व संच जमून आलेला आहे. लेबर कॉन्ट्रक्टर मजूर, कामगार आहेत. या अनुकूल स्थितीचा फायदा घेता येईल. आम्हालाही लक्ष देण्यास वेळ आहे. तेव्हा वामन निवास बरोबरच हे आपले काम होईल तर बरे.

''श्रीं'' - अहो, नको श्री वामन निवासाबरोबर हेही काम नको. त्यामुळे लोकापवाद येतील. लोक म्हणतील आश्रमाचे कामाबरोबर त्याच सामानातून त्याच मजुरांकडून आम्ही आमचे बांधकाम साधून घेतले.

मी - मग श्री वामन निवासाचे काम संपताच सुरू करू. नाही तरी आर्किटेक्ट मार्फत प्लॅन्स म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे मंजूरीकरीता पाठविले तरी मंजूरी येण्यास २-३ महिन्यांचा कालावधी लागेलच.

''श्रीं'' - नका हो आज हा विचारच करू नका. काही रक्कम आमचे गाठीस जमली की आम्ही तुम्हालाच आमचे येथील बांधकाम तुमच्या सवडीने करण्यास बोलावून घेऊ.

अनेक प्रकारे आम्ही युक्तीवाद करून पाहिले. पण काही उपाय चाले ना. कसा उपाय चालणार? कुठे हे ईश्वरस्वरूप महापुरुष आणि कुठे आमची शामभटाची तट्टाणी? ज्या दिव्य पुरुषाच्या चरणरजाच्या कणाचे स्पर्शाने जीविताचे सार्थक व्हावे त्या पुरुषापुढे मी यक:श्चित मानव, युक्तीवाद कसा काय करणार?

शेवटी आम्ही तिघांनी ठरविले की आपण या बाबतीत जालन्याच्या प.पू. ताई महाराजांचे चरणी लोटांगण घालू या. त्या काही तरी मार्ग काढतील. प.पू. श्रीमहाराज त्यांना मानतात. त्या साक्षात् भगवती आहेत म्हणतात. मग आपण त्यांनाच या श्री रेणुका निवासाच्या वाढीव बांधकामाचा संकल्प सोडण्यास सांगू या. प.पू. महाराजही नेहमी म्हणतात ''प.पू. ताई महाराजांचे संकल्प महान असतात व ते पूर्ण झाल्याखेरीज रहात नाहीत.'' मी, गोडसे व शृंगारपुरे प.पू. ताई महाराजांपुढे दि. २४.१०.१९८३ रोजी बसलो असता श्री रेणुका निवासामध्ये ''श्रीं''ना स्वतंत्र दोन खोल्या तरी बांधाव्यात असा प्रस्ताव मांडला होता. प.पू. ताई म्हणाल्या, ''नागले यांनीच पुढाकार घेऊन सर्वांच्या सहयोगाने 'दत्तनिवास' बांधावे. त्यात प.पू. महाराजांना संडास, बाथरुमसह स्वतंत्र खोली व देवाकरीता देवघर आणि समोर हॉल असे

बांधावे.''

काही दिवसातच प.पू. ताई महाराजांचे आगमन श्री रेणुका निवासात झाले. आम्ही हा बांधकामाचा विषय त्यांच्यापुढे पुन्हा मांडला. मुंबईच्या सर्वच गुरुबंधूंचा सहयोग आणि मनापासून हे बांधकाम होण्याची इच्छा आहे. प.पू. ताईंना ही कल्पना एकदम पसंत पडली व योग्य संधी मिळताच ''श्रीं''च्या पुढे चर्चा करून अनुमती मिळविण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

त्याप्रमाणे प.पू. ताई महाराजांनी प.पू. श्रीमहाराजांपुढे बांधकामाचे नियोजन ठेवले व एवढ्या दोन खोल्या तरी बांधून झाल्याच पाहिजेत महाराज. तसे मी तयारीला लागण्यास नागलेना सांगते. श्री वामन निवासाचे बांधकाम चालू आहे. त्यांचे त्या निमित्त देखरेखीस नेहमी येणे जाणे आहे. त्यात हेही काम उरकता येईल. पैशाची आपण चिंता करू नये. पैसे कसेही उभे होतील. कोणाचे सहाय्य घेतले तर ज्याचे त्याला परतही करता येतील. मी नागलेंना आपल्याकडे पाठविते. सर्वच भक्तांची हे काम पूर्ण करण्याची इच्छा दिसते. आपण नाही म्हणू नका. बाकी आम्ही पाहू.

प.पू. सौ. ताईंच्या संकल्पापुढे ''श्री'' निरुत्तर झाले. फक्त, 'ठीक आहे' म्हणाले.

पुढे यथावकाश म्युनिसिपल कॉर्पोरेशन कडून प्लॅन पास झाले. कामास सुरुवात झाली. प.पू. श्रीमहाराजांनी, प.पू. सौ. ताई महाराजांनी आपल्या सहयोगाच्या यथाशक्ती रकमा दिल्या. समस्त गुरुबंधू मुंबईकरांचा यथाशक्ती सहयोग झाला. बांधकाम पूर्ण होऊन प्लम्बिंग, सॅनेटरीची कामे सुरू झाली आणि जमा झालेले सर्व फंडस् संपले. आता ''श्रीं''ना कसे सांगायचे? ते तर सुरुवातीपासूनच म्हणत होते पैसे जमा झाले की काम सुरू करू. प.पू. सौ. ताई महाराजांना तरी कसे सांगायचे? आणि या सर्व नोकरदार गुरुबंधूनी शक्तीनुसार जास्त रकमा दिल्याच होत्या. आम्ही ही त्यात होतो. कॉन्ट्रॅक्टर म्हणून जे शक्य होईल तेवढे झाले. आमच्याही मर्यादा संपल्या. आम्ही सत्त्वपरीक्षेत अनुत्तीर्ण झालो. एके दिवशी प.पू. महाराजांनी विचारले, ''ते निर्मल प्लम्बिंगचे काम करणारे त्यांच्या बिलाबद्दल विचारत होते. त्यांचे काही तरी चाळीस हजार जवळपास बिल देण्याचे बाकी आहेत. काही पैसे शिल्लक नसले तर काही तरी करूया. लोकांचे पैसे ठेवणे बरे नाही. तुम्ही त्यांचे बिल चेक करून आम्हांस सांगा किती रक्कम होते आहे ते. उद्या आहात ना तुम्ही? दुपारी भेटूया.''

दुसऱ्या दिवशी दुपारी तीन नंतर ''श्रीं''नी मी आलो आहे हे कळताच बोलावून घेतले व एक पितळी डबा आमच्या हातात दिला आणि म्हणाले, ''हे आमच्या सौभाग्यवतींचे सुवर्णालंकार आहेत. ते तुम्ही मुंबईस घेऊन जा. दादरला श्री. गोडसे यांच्या ओळखीचे कोणी सराफ आहेत. त्यांचे मदतीने सराफांकडे जाऊन या सर्व दागिन्यांचे वजन करा व

आत्ताच्या भावाने पैसे घेऊन ते विकून टाका. वजनात काही प्रमाणात ते घट धरतात. काय मिळतील ते पैसे घ्या. मात्र त्या सराफांकडून एकूण वजन किती झाले, घट वजा किती झाली, भाव काय लावला व रक्कम आपल्याला त्याने नगद किती दिली हे पत्रक त्याचे सही शिक्क्यानिशी लेटरहेडवर त्यांचे कंपनीचा छाप मारून लिहून घ्या. म्हणजे उद्या इनकम टॅक्सला रक्कम कुठून आणली ते दाखविता येईल.''

आमच्या अपयशाबद्दल श्री. गोडसेंना व मला अत्यंत दु:ख झाले. पण नाईलाज होता आणि ''श्रीं''ची आज्ञा होती. आमचे चेहरे पाहून ''श्रीं''नी आणखी समजूत घातली. ''मनास गैर वाटून घेऊन नका. अहो लक्ष्मी स्थिर नसते. आज गेली तरी उद्या येणार नाही असे नाही. सौभाग्यवतींचे अलंकार हळूहळू करता येतील. तुम्ही हे घ्या बरं. मुळीच संकोच किंवा कोणता खेदजनक विचार मनी आणू नका.''

तो डबा घेऊन विमनस्क मन:स्थितीत आम्ही श्री रेणुकानिवासांतून बाहेर पडलो. दुसऱ्या दिवशी सराफाकडे जाऊन व्यवहार पूर्ण केला. सराफाकडून आणलेले प्रमाणपत्र ''श्रीं''ना दिले. प्लम्बर व इतर वर्कर्सची बिले दिली.

आयुष्यातील हे अत्यंत कटू कर्तव्य आम्हाला करावे लागले. अजूनही ''श्रीं''चे शब्द आठवले की मन भरून येते. ''आमच्या देवांना आणि आम्हाला एक स्वतंत्र खोली असावी ही आमची गरज आहे हे नाकारता येत नाही. परंतु आज आमच्याकडे तेवढे आर्थिक बळ नाही. पाहू पुढे केव्हातरी ही गरज पूर्ण होईल.''

''श्री'' नको म्हणत असताना आमच्या हट्टापायी बांधकाम झाले. सौ. आईसाहेबांना स्त्री सुलभ स्वभावानुसार दागिन्यांची केवढी आवड आहे हे आम्हांस माहीत होते. त्या त्यागी मातेने एक शब्द मुखातून न काढता पतीची आज्ञा प्रमाण मानून कोणतीही हरकत न घेता हंसतमुखाने दागिने उतरवून दिले.

इतके झाल्यानंतर सुद्धा ''श्रीं''नी आम्हा गुरुभक्तांचे ऋण आमच्यावर झाले असे पत्रात लिहीले आहे आणि श्री प्रभुरामचंद्रांनी श्री हनुमंतांना म्हटले, ''तुमचे ऋण फेडण्याची वेळ आम्हांस न येवो. कारण तशी वेळ यायची म्हणजे हनुमानजींना आपदाग्रस्त व्हावे लागेल ते अडचणीत येणार तेव्हाच आम्ही ऋणांची फेड करायला जाणार ना? म्हणून हे हनुमंता तुझे ऋण माझ्या ठिकाणीच मुरुन जावोत!'' हे मागणे मागितले.

'आता आम्ही अमरेश्वरी उर्वरीत आयुष्य घालविण्याचे ठरविले होते ते रहित करून श्री रेणुका निवासातच तुम्हा सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना परमेश्वराजवळ करीत बसू.' हे सविस्तर पत्र ओघाने पुढे लिहीले जाईल.

१२२) आजही योगदीक्षा दाते सद्‌गुरु आहेत?

श्री रेणुका निवासाचे वाढीव बांधकाम चालू असताना एका दुपारी ३ ते ३.३० च्या सुमारास घरापुढे सरकारी मोटारगाडी उभी राहीली. मी लागलीच पुढे गेलो. ते गेटजवळ उभे होते. रस्त्यावरूनच त्यांनी मला विचारले, ''महाराज आहेत का?'' मी 'आहेत' म्हणून त्यांना आत घेतले व बाहेरचे खोलीत बसवून ''श्रीं''ना खोलीत जाऊन मंडळी बाहेर आली आहेत, त्यांना आत पाठवू कां ते विचारले. परवानगी मिळताच त्यांना मी आत प.पू. महाराजांचे खोलीबाहेरील देवांचे हॉलमध्ये आणून बैठकी चटयांवर बसण्यास सांगितले. प.पू. महाराज खोलीतून बाहेर येताच सर्वांनी आदबीने उभे राहून एकेकाने महाराजांना नमस्कार केला. नंतर एकाने स्वत:हून सर्वांची ओळख करून दिली.ते चौघे होते. एका कोठल्यातरी विभागाचे (जिल्ह्याचे) सुपरिटेन्डेन्ट होते. बाकीचे तिघे एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर होते. ''श्रीं''नी बसण्यास सांगताच सर्व ''श्रीं''च्या समोर लीनतेने बसले. नंतर त्यांच्या काही चर्चा चालू होताच मी तेथून वरील एक्स्टेन्शनच्या बांधकामावर गेलो. ''श्रीं''ना कोणी मदतनीस म्हणून थांबण्याच्या विचारात होतो, पण तेवढ्यात सौ. सवितावहिनी स्वयंपाकघरात दिसल्या. हातात असलेले वरील काम लाईनवर लावून मी पुन्हा हॉलमध्ये आलो. ''श्री'' माझ्याकडे हात दाखवून त्या सर्व इंजिनिअर्सना म्हणाले, ''हे आमचे नागले. हेही स्थापत्य शास्त्रातले तज्ज्ञ आहेत. आमच्या वासुदेव आश्रमाचेच पौड फाट्याजवळ श्री वामन निवासाचे काम चालू आहे. त्या बांधकामाचे हेच पाहतात.'' त्या सर्वांनी मलाही पंक्तींत बसण्याचा आग्रह केला. पण घरातून त्यांना पाण्याचे ग्लासेस व चहाचा ट्रे आणण्यास मी सौ. सवितावहिनींकडून सर्व घेऊन येण्यास गेलो. महाराजांनी मला म्हटले, ''तुम्ही सुद्धा बसा.'' मीही बसलो पण नुसती श्रोत्याची भूमिका करीत बसलो होतो. चहापान झाल्यानंतर त्या सुपरीन्टेडेंन्ट साहेबांनी ''श्रीं''ना विचारले, ''सांप्रतच्या काळात योगदीक्षा दाते सद्‌गुरु आहेत का? की जे शिरावर हात ठेवताच त्या व्यक्तीस समाधी लागेल?''

प.पू. महाराजांनी मंद स्मित केले आणि म्हणाले, ''आहेत की. योगदीक्षा, कुंडलीनी शक्ती जागृत करणारे आजही संत सत्पुरुष सद्‌गुरु आहेत.''

त्या साहेबांनी प्रतिप्रश्न केला, ''असे योगदीक्षा देणारे सद्‌गुरु कोण आहेत व कुठे आहेत ते आपण सांगू शकाल का?'' त्यांचा प्रश्न ऐकताच माझी उत्सुकता वाढली. आता महाराज काय उत्तर देत आहेत?

''आहेत, पुण्यातच ते श्री. मामा देशपांडे आणि श्री. नखाते आहेत, नाशिकला श्री. नारायणराव ढेकणे आहेत. हे नारायणराव ढेकणे तर सरकारी पी.डब्ल्यू.डी. खात्यात आपल्या सारखेच सिव्हील इंजिनिअर सुपरीन्टेडेंन्ट या मोठ्या अधिकारावर होते.''

प.पू. महाराजांनी त्यांना दिलेले उत्तर ऐकून मी आवाक् झालो. स्वतः योगीराज योगदीक्षादाते, कुंडलीनी ज्यांचे संकल्पाने चलित होते असे असून प.पू. महाराज इतरांची नावे सुचवित आहेत. क्षणिक माझ्या उतावीळ मनास वाटले, अहो योगदीक्षादाते कुठे शोधता? साक्षात् योगीराज राजाधिराज आपल्या समोरच बसले आहेत. पण मी माझ्या मनास आवरले. कदाचित माझ्या सद्गुरु माऊलीस आपल्या अंगाशी ही सरकारी कर्मचारी मंडळी लावून घ्यायची नसावीत.

धन्य श्री सद्गुरु दत्त महाराज!

१२३) 'श्रीं''ना वामन निवास पूर्तीचा ध्यास

दि. २४.७.१९८४

ॐ श्रीदत्त

प.पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या पुण्यतिथी प्रीत्यर्थ श्री वासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे येथे सप्ताह चालू होता. सप्ताहानिमित्त प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराज रोज ११ ते ११.३० वाजेपर्यंत आश्रमात येत व सायंकाळी ७.३० वाजता कीर्तन संपल्यानंतर आपल्या निवासी जात. नागपूरचे विख्यात कीर्तनकार ह.भ.प. साल्पेकर यांचे कीर्तन असे. आज दि. २४ रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या कीर्तनास बुवांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला होता, तो असा -

हेचि थोर भक्ती आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची।
ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान।

कथानक घेतले होते, माणकोजी बल्लाळ (जगताप) या सत्पुरुषाचे. माणकोजी गावचे पाटील होते. धनधान्य समृद्धी, गोधन, गाईगुरं विपुल, मोठा वाडा आणि धनसंपन्न. गावात एकदा दुष्काळ आला. लोकांचे हाल पहावेनात. पत्नी सहधर्मचारिणी. पतीचे मताशी, आचार विचारांशी सहमत. पावलावर पाऊल टाकणारी. माणकोजी म्हणाले, ''हे आबालवृद्धांचे हाल आम्हांस पहावत नाहीत.'' ते विचारत, ''आपण काय ठरविले आहे?'' माणकोजी म्हणतात, ''संकल्पावी माया संसाराची.'' पत्नी म्हणते, ''मग अवधी कशास?''

पती-पत्नी दारात उभी राहीली. ज्याला जे पाहिजे ते देऊ लागली. कोणी म्हणे, ''अन्नाविण लेकरे उपाशी, कोणी म्हणे, लेकरू दूध पीते आहे, पण गाय मेली गाय द्या. कोणी म्हणे बैल मेले, नांगरास काय लावू?'' तर कोणी कपडा नाही, भांडी नाहीत, असे याचक, पाटील दानास उभे आहेत कळताच झुंडी झुंडीने येऊ लागले. आणि पुढचा मागचा विचार

न करता माणकोजी आणि त्यांच्या पत्नी ज्याला जे पाहिजे दे देत राहीले. होते नव्हते ते सर्व आपल्या लेकरा बाळांचा विचार न करता सर्वांस देऊन टाकले आणि दुसरे दिवसापासून जमीन जुमल्यापासून काहीही हाती न राहीलेले हे पती पत्नी दुसऱ्यांचे शेतात मोलमजुरी करून राबू लागले.

कीर्तन संपताच प.पू. महाराज व सौ. आईसाहेब घरी गेले. मीही पाठोपाठ रिक्शा करून प.पू. महाराजांचे घरी श्री रेणुका निवासामध्ये दाखल झालो. प.पू. महाराज स्थानापन्न होताच दर्शन घेतले. प.पू. महाराजांनी विचारले, ''काय हो! असलेल्या ६५ ते ७० हजार शिल्लक रकमेतून श्री वामन निवासाचे किती काम होईल?''

मी म्हटले, ''मॅजेनाईन माळ्याचा स्लॅब होईल. हॉल वरचा स्लॅब करण्यास पैसे जमा करावे लागतील.'' त्यावर, ''लोखंड ५० हजाराचे लागेल का? आणखी १ लाख रुपये जमा केले तर स्लॅब होईल का?'' वगैरे प्रश्न उपप्रश्न विचारले व मी उत्तरे देत गेलो.

आणखी १ लाख जमविले तर स्लॅब होईल. आज मी व भाऊसाहेब वाकडे केरुर साहेबांकडे जाणार होतो व श्रीमान् गरवारे शेठजी यांच्याकडून देणगी मिळविण्याबद्दल विचारणा करण्यास सांगणार होतो. परंतु श्री. केरुरसाहेब घरी नव्हते. पुढे महाराजांनीच श्रीमान् गरवारे सांप्रत पुण्यात नसल्याचे सांगितले. इतक्यात सौ. आईसाहेब स्वत: माझ्याकरिता चहा घेऊन आल्या. तोच प.पू. महाराज जरा मोठ्या आवाजात म्हणाले, ''अहो, नागले! आज कीर्तन ऐकले का? संकल्पावी माया संसाराची, अहो जीव जगायला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजा भागल्या म्हणजे झाले. ते अंगावर सुवर्णालंकार करायचेत काय? तिकडे गुरुदेवांच्या वामन निवासचे काम बंद पडायची वेळ आली आहे. आम्ही भाऊसाहेब वाकड्यांना सांगितले आहे. तुम्हालाही सांगतो बघा. हे घर त्यावेळी ४० ते ५० हजारापर्यंत बांधून झाले. आज याची किंमत दीड ते दोन लाखापर्यंत होईल. तर हे घर जर गहाण ठेवून लाख रुपये कर्जाऊ मिळत असतील तर घ्यावेत. पुढे मागे देणग्यांचा ओघ वाढला म्हणजे फेडता येतील ते. बिघडले कोठे असे केले तर?''

मी म्हटले, ''प.पू. गुरुमहाराजांचा संकल्प आहे, येतील देणग्या, काम चालू केले आहे, कमी गतीने का होईना? पण चालू ठेवा असे आपणच नाही का आम्हांस सांगता.'' विषयात बदल करून मी म्हटले.

१२४) ''श्रीं'' बरोबर संभाषण!

मी - महाराज! ताई महाराजांचा संकल्प आहे.

''श्रीं'' - असं? काय आहे संकल्प?

मी - श्रीगुरुनिवासचे बांधकाम सुरु करायचे व श्रीगुरुनिवास बांधून पूर्ण करायचा. आणि कार्यवाही होण्यास त्यांनी आम्हाला आज्ञाही केली आहे.

''श्रीं'' - अस्सं? कुठे बांधायची आहे श्रीगुरुनिवासची वास्तू?

मी - आपल्या रेणुका निवासचे मागे, अगदी रेणुका निवासाला लागूनच.

''श्रीं'' - (प.पू. महाराज गालात हसले आणि एकदम उद्‌गारले) नको नको, आधी आपले श्री वामन निवास पूर्ण होऊ द्या.

मी - आपली आज्ञा सदैव वंदनीय आहे पण हा संकल्प सौ. ताईमहाराजांचा, आज्ञा त्यांची इतकेच काय पण श्री गुरुनिवासचे काम झाल्याखेरीज आम्ही पुण्यात पाऊल टाकणार नाही, आम्ही येऊ तर श्री गुरुनिवासामध्ये विसावण्यासच. गेल्या वर्षापासून त्या आम्हांस सांगत आहेत, ''काम चालू करा. येणाऱ्या जाणाऱ्यांकडे चौकशी करीत आहेत, काम सुरू झाले की नाही? नागलेंना हलवा-जागे करा.'' इकडे मुंबईकर मंडळी, गोडसे, श्रृंगारपुरे, मुजुमदार, म्हसवडकर आम्हाला सतावीत आहेत. एकच सर्वांचा प्रश्न काम केव्हा सुरू करणार?

''आमच्या देवांना स्वतंत्र देवखोली. तेथे आम्ही आणि आमचे देव. इतर कोणाची - घरांतील मंडळीची ये-जा नको, ही आमची अत्यंत गरज आहेच, पण आजच काही घाई नाही.'' मी म्हणालो, ''आता त्यांचा संकल्प आणि आज्ञा, मग आम्ही काय म्हणणार?''

तेवढ्यात आठवण झाल्यासारखे महाराज एकदम उद्‌गारले, ''अरे हो, बरे झाले तुम्ही विषय काढलात ते. खरं म्हणजे आम्ही तुमची वाटच पहात होतो. ''अरे अजिऽऽत,'' महाराजांनी अजितला हाक मारली. परंतु अजित बाहेर गेला असल्याचे आतून सांगणे झाले. महाराज पुढे म्हणाले, ''तुमचे ते वरच्या कामाचे वॉटरप्रुफींगचे जे काही पैसे झाले असतील ते घ्यावेत.''

मी म्हटलं, 'आम्ही चौघा-पाच जणांनी मिळून तो खर्च केला आहे. अत्यंत भावपूर्णतेने आम्ही ही गुरुसेवा केली आहे. आम्ही पण आपली लेकरेच नव्हे काय?''

''श्री'' म्हणाले, बरोबर आहे ते. तुम्ही काय, शृंगारपुरे काय, गोडसे सर्व मंडळी, काय तुमचा सेवाभाव आहे. चांगले आहे. प्रेम असू द्यावे. तुम्हा सर्वांत आणि आमच्यात दुजाभाव असा राहीलेलाच नाही. आम्हांस तुम्ही परके वाटत नाही, घरांतीलच वाटता. म्हणूनच तुम्हाला काही गोष्टी सांगायच्या आहेत. अजित लहान आहे. आज त्याला

चांगली नोकरी आहे. चांगले पैसे मिळतात त्याला. भावाला मोटार सायकल घेऊन दिली. मागे गच्चीवर जायला जिना केला. काही कमी नाही आहे. आणि दुसरं म्हणजे तुम्ही थोर बंधुंनीच त्याला व्यवहार शिकवायचा आहे. तर तो जे देईल ते तुम्ही स्वीकारा. एकदम सर्व रक्कम देणे कदाचित त्याला जमणार नाही, पण देईल हप्त्याहप्त्याने. घ्या बरं. आणि तुमची ईश्वराची सेवा करण्याची तळमळ आहे, तर तुम्हाला एक कामगिरी सांगतो. आमच्या या देवांसमोरील नंदादीप सतत तेवत ठेवायचा असतो. महिन्याला काहीतरी ३ ते साडेतीन किलो गोडेतेल लागते. तेव्हा हे जे पैसे आहेत ते, शिवाय त्या सुवर्ण बँकेतून दहा एक हजारापर्यंत रक्कम येणार आहे ती, या सर्व रकमा तुम्ही, शृंगारपुरे आणि गोडसे या तिघांचे नावे बँकेत खाते उघडून त्यात हे पैसे कायम ठेवीत गुंतवा. आणि त्यातून जे दरमहा व्याज येईल ते आमच्या घरात अजितकडे देवाचे नंदादीपाचे तेल खर्चास देत चला. अहो, पूर्वी आम्हाला २५ रुपये सगळा खर्च येत असे. हल्ली महागाई पण फार वाढली आहे. या बँकेच्या व्यवहारात तुम्हा तिघांच्या सह्या असू द्या. आमच्या वडीलांनीही त्यांचे एकूण इस्टेटीचा वाडीच्या जागेचा रकमेचा ट्रस्ट केला आणि काही तरी १० हजारापर्यंत रक्कम त्यांनी आमच्या घराण्यातील वार्षिक कुलाचार नियमित पार पाडण्याकरीता आमच्याकडे द्यावेत असे म्हटले आहे. पण जगनशेठ धन्नावत यांनी ती रक्कम महाराजांच्या समाधीमंदिर-दत्तमंदिर का आणखी कुठे धर्मशाळेत वापरली आहे. असो, पुढे मागे रक्कम जमा झाली म्हणजे देतील. ते तीही रक्कम मिळाली तर तुमच्या याच खात्यात भरावी. मुलांच्या हातात गेली तर खर्च होऊन जाईल. आता तुम्ही आम्हाला परके नाही आहात, म्हणूनच स्पष्ट बोलायचं. आता आम्ही एक एक गोष्टी मार्गाला लावण्याचे मागे आहोत. सर्व निरवानिरवी झाली म्हणजे आम्ही मोकळे झालो.''

प.पू. महाराजांचे पुढील शब्द झेलण्याचे सामर्थ्य मनास नव्हते. अंत:करणात गहीवर दाटू लागले. महाराज बोलण्याचे ऐन रंगात आले होते. खोलीत होतो फक्त महाराज आणि मी. महाराजांना बोलू दिले असते तर ते बोलत राहीले असते. त्यांना खूप खूप मनमोकळे बोलायचे होते. घड्याळात ९.३५ झाले होते. मी म्हटले, ''महाराज आपली अजून सायंसंध्या वगैरे आटोपायची आहे.''

''सप्ताह चालू असेपर्यंत आम्हांस रोज उशीरच होणार.''

मी म्हटलं, ''आपण लागावं संध्येला, मी निरोप घेतो.'' मी जड अंत:करणाने महाराजांचा निरोप घेतला. खोलीतून बाहेर येऊच नये असे वाटत होते पण संध्यादी आन्हिक आटोपल्याखेरीज महाराज जेवणार नाहीत व नंतर झोपण्यासही उशीर होणार. मी निरोप घेऊन बाहेर पडलो. मेन रोडला येऊन रिक्शा पकडली आणि मला आठवण झाली की आपण आपली व

गोडसेंची दक्षिणा प.पू. महाराजांना अर्पण करण्याचे विसरून गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नानसंध्या आटोपून प.पू. महाराजांना दक्षिणा देण्यास जायचे ठरवून अंथरुणावर (आश्रमात) आडवा झालो. रात्रीचे सर्वांचे भोजन होऊन गेल्यानंतर मी पोहोचलो. माझे पान ठेवले होते. भोजन आटोपून मी लागलीच झोपण्यास गेलो. पण झोपेऐवजी बैठकच जोर करीत होती. भोजन तर गळ्यापर्यंत झालेले. प.पू. महाराजांचे शब्द सतत कानावर पडत होते. अजून महाराज बोलतच आहेत असा भास होत होता.

दुसऱ्या दिवशी दि. २५.६.१९८४ रोजी स्नान संध्या जपादि आटोपून मी ८.३० ला आश्रमातून निघून ८.४५ पर्यंत प.पू. महाराजांचे निवासी पोहोचलो. नागले आले असल्याची वर्दी महाराजांच्या कानी गेली. त्यावेळी प.पू. महाराज सोवळ्यात आन्हिकास बसले होते. मी म्हटले, त्यांचे आन्हिक होऊ द्या. नंतर दर्शन घेतो. तेवढ्यात अजितने माझ्या पुढे चेकबुक धरले. व रु. ५,००१/- चा चेक महाराजांच्या आज्ञेनुसार लिहीला असल्याचे सांगितले व त्यावर काय नाव घालू ते अजित विचारू लागला. मी म्हटलं, हा कसला चेक देता? अजित म्हणाला, वरच्या वॉटरप्रुफींगच्या कामाचा. मी म्हटले, ''थांब नाव घालू नको. तो चेक तसाच माझ्याकडे दे. मी महाराजांशी बोलतो, नंतर नाव घालू.''

अजितला ते माझे म्हणणे पटले नाही. त्याला वाटत होते नागले चेक वा पैसे स्वीकारणार नाहीत अणि असा नाव न लिहीलेला हा चेक स्वीकारलाच तर नागले त्या चेकवर अजितचेच किंवा दादांचे नाव घालून ते पैसे आमच्याच खात्यावर जमा होणार. मी चेक तसाच घेतला व महाराजांच्या दर्शनास गेलो. महाराजांची संध्या झाली होती व पुढे ते पोथी पठण सुरू करण्यापूर्वी माझीच वाट पहात होते. मी नमस्कार करून माझ्याकडून व गोडसेंकडून अशी दोन पाकीटे त्यांचे हाती देऊन, दुसरे पाकीट श्री. गोडसे यांनी दिले असल्याचे सांगितले. लागलीच महाराज म्हणाले, ''प्रत्येक वेळा तुमची दक्षिणा फार मोठी असते.'' मी त्यांचे बोलणे तसेच ठेवून म्हटले, ''हा अजितने चेक दिला आहे.'' तेवढ्यात अजित तक्रार घेऊन आला, ''दादा त्यांनी चेकवर नाव घालू दिलेले नाही. उद्या हे हा चेक तुमच्या किंवा माझ्या नावे आपल्याच खात्यात भरतील.''

महाराज - ''नाही रे, ऐक, नागलेंजवळ मी सर्व काही बोललो आहे आणि बरं का नागले, पाहिजे तर तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे पाहिजे तर अजितचेही नाव त्या अकाऊंटवर घाला. तुम्ही एक मंडळ तयार करा.''

''महाराज, मग आपल्याच नावचे मंडळ तयार करून त्या खात्यांतच हा चेक भरतो.''

''श्रीं'' - ते तुम्ही ठरवा. काही नाव द्या. पण मग हे मंडळ रजिस्टर करावे लागेल का?

मी - मला तसे वाटत नाही, आणि तसा आपण एखाद्या वकीलाचा किंवा चार्टर्ड

अकाऊंटंटचा सल्लाही घेऊ. मला वाटले बँकेच्या कायम स्वरुपाच्या खात्यात ही रक्कम भरू आणि दरमहा व्याज देणाऱ्या योजनेत ठेवले तर दरमहा व्याज मिळेल ते अजितचे पण त्याचे बँकेत खाते उघडून त्यात जमा करायला बँकेस तसे लेखी लिहून देऊ. सेव्हिंग खाते मंडळाचे राहील. त्यात प्रमुख सही अजितची ठेवून बाकीच्या दोघांपैकी कोणीही एक सही करेल असे ठेवू.

''श्रीं'' - ते तुम्ही ठरवा, अहो आम्ही आमच्या संपूर्ण घराचा ट्रस्ट करण्याबद्दल वकीलाला विचारले, सॉलीसिटरला विचारले, पण ते म्हणाले, सोसायटी असल्यामुळे तसे करता येणार नाही. नाहीपेक्षा ह्या इस्टेटीचाही ट्रस्ट करण्याचा आमचा विचार होता.

मी - गुरुपौर्णिमेच्या दिवशी (गुरुवार, दि. १२ जुलै १९८४) आम्ही सर्व येत आहोतच. त्याच दिवशी मंडळाचे नाव ठेवून बँकेत खाते काढू.

''श्रीं'' - ते आता तुम्ही, अजित आणि सर्वांनी ठरवा. आमचा हा नंदादीप देवापुढे तेवत राहीला पाहिजे आणि तेवढी व्याजाची रक्कम होईल, ती अजितकडे देत चला. एक एक गोष्टी लाईनवर लावून मोकळे व्हायचे आम्ही ठरविले आहे. बरं या. आम्हीही आश्रमात येतच आहोत.

मी - आम्ही आता ताई महाराजांच्या संकल्पाप्रमाणे श्री. गद्रे आर्किटेक्ट यांना भेटून म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे प्लॅन मंजुरीकरीता पाठविण्यास सांगत आहोत. त्यांना यापूर्वी सांगितलेही आहे. कदाचित त्यांनी प्लॅन पाठविलेही असतील. गुरुपौर्णिमेस मुहूर्त भूमीपूजनास मिळतो का ते पहातो.

''श्रीं'' - अहो पण उद्या हे घर श्री वामन निवासाच्या पैशाच्या मदतीकरीता गहाण टाकायचे ठरविले तर? तुम्हाला मग त्या मागच्या खोल्यांचे बांधकाम कसे करता येईल?

मी - येईल महाराज, आपल्या घराची किंमत आणखी वाढणारच आहे, कमी तर होणार नाही ना.

एवढे म्हणून मी निरोप घेतला.

दि. २६.६.१९८४ रोजी प.पू. महाराजांकडे आश्रमात पुढील दौऱ्याबद्दल विचारणा केली. यावेळी जालना, देऊळगावराजा येथे आपला मुक्काम एवढा का लांबला तेही विचारले.

महाराज - ''ती जालन्यातील गावची मंडळी आमच्याकडे तक्रार करू लागली. म्हणाली, तुम्ही ताईंकडे नेहमी उतरता, राहता. आमच्याकडे येत नाही. म्हणून ४ दिवस आम्ही गांवात, या मंडळींनी व्यवस्था केली होती तेथे राहीलो. नंतर जालन्यात ताईमहाराजांकडे आलो. तेथून मग आसपासच्या गावातील लोकांची बरेच वर्षे-महिन्यांपासूनची आमंत्रणे होती, तेव्हा एक एक दिवस सगळीकडे जाऊन आलो. रघुनाथराव कंटाळले होते. त्यांचे

केव्हापासूनचे चालले होते की, आपण आता लवकरात लवकर पुण्यास परतूया. लोक प्रेमाने बोलवितात, जावं लागतं. रघुनाथरावांचही म्हणणं ठीक आहे. त्यांच्या पत्नी इकडे घरी अगदी एकट्याच असतात.''

पुढे ''श्री'' म्हणाले, ''सत्पुरुषांना सुद्धा प्रारब्ध सोडत नाही. उलट त्यांचे मागे अधिकच त्रास. बघा, त्या ताईमहाराजांकडे त्यांची बहीण आपली मुले बाळे घेऊन येऊन राहीली आहे. भांडते आहे. तो भाऊ पण येऊन राहीला आहे. तोही ताईंना छळतो आहे. नको नको करून सोडले आहे त्या बहिणीने आणि भावाने. सारखे द्या पैसे. त्या म्हणतात, 'आम्ही पैसे कोठून दररोज द्यायचे?' शेवटी आमच्याजवळ म्हणत होत्या, हे प्रारब्ध एवढ्याने संपत नाही तर आम्ही देहदंड घेतो. आणि आता अन्नत्याग केला त्यांनी. सकाळी का दुपारी कधी एकदा चहा घेतात. बाकी पाणी पिऊन राहतात. आम्ही त्यांना म्हटलं, तुम्ही असं करू नका. निदान ते सातूचे पीठ म्हणा किंवा दुसरे कसले पीठ घ्या. ते संन्यासी महाराज (ते म्हणजे उगारचे नारायणानंद स्वामी असावेत) एकदा काशीहून आले होते. ते नाही का सातूचे पीठ दूधात कालवून फक्त एकवेळ घ्यायचे. म्हटलं तसं तरी करा. संपूर्ण अन्नत्याग म्हणजे देहधारणा व्हायची तरी कशी? पण नाही ऐकले त्यांनी. आता फक्त पाण्यावर आहेत. आम्ही गुरुपौर्णिमेपर्यंत येथे पुण्यात आहोत. नंतर २-३ दिवसात म्हणजे १५.६.१९८४ ला येथून निघू आणि जालन्यास जाऊ.''

मी - पुन्हा एवढा लांबचा प्रवास? पुन्हा जालन्याला?

''श्रीं'' - होय. ताई महाराजांनी बोलाविले आहे. दरवर्षी नागपंचमीचे दुसरे दिवशी आम्ही गाणगापूर, तुळजापूरला जात असतो. गेल्यावर्षी ताई महाराजांनी तो मेटॅडोअर, ट्रक, जीप वगैरे सोय केली होती. त्या स्वत: आणि त्यांचे सोबत बरीच मंडळी होती. याही वेळी म्हणाल्या, आमच्या काही मंडळींसोबत गाणगापूर, तुळजापूर करायची राहीली आहेत म्हणे.

मी - मागे आम्ही सर्व जालन्यास गेलो होतो, तेव्हा ताईमहाराजांनी सर्व यात्रेचे प्रवास वर्णन सांगितले होते. तेव्हा गोडसे, शृंगारपुरे म्हणाले होते की, आपण स्वत: प.पू. महाराजांसोबत परत कधी निघाल तेव्हा आम्हांस कळवा. म्हणजे आम्हालाही तो लाभ होईल. कदाचित त्याकरिताही त्या म्हणाल्या नसतील ना?

''श्रीं'' - नाही नाही, त्या म्हणाल्या की त्यांच्याकडील बरीचशी बायका मंडळी गेल्या खेपेस यायची राहीली आहेत. गोडसे किंवा आणखी कोणी तुम्ही मंडळी पण येणार आहात काय? मग गोडसेंना म्हणावं, तुम्ही मुंबईहून एवढ्या लांब जालन्यास न येता सोलापूरला या. कारण आम्ही नागपंचमीच्या दिवशी निघून सोलापूर येथे श्री. बापूसाहेब कुबडे यांच्या घरी येणार आहोत. सोलापूरात एक रात्र मुक्काम करून मग गाणगापुरास जाणार. आता

नागपंचमीचा दुसरा दिवस म्हणजे कोणती तारीख येते ते तुम्ही कॅलेंडर मध्ये पहा. तुम्ही मुंबईस केव्हा उद्या जाणार का?

मी - होय, बुधवार ता. २७.६.१९८४ रोजी दुपारच्या एशियाड गाडीचे रिजर्वेशन केले आहे. पुन्हा आता एकदा गुरुपौर्णिमेच्या आदल्या रात्री येऊ.

''श्रीं'' - बघा कसे जमेल तसे. तुम्हाला देखील वारंवार येण्याचा त्रास आहे. काम मिळाले कां?

मी - होय महाराज. बोरीवलीचे फक्त बांधकाम करण्याचे काम मिळाले. बिल्डर म्हणून मिळावे असे आम्ही मनात धरले नव्हतेच. ते आम्हांस भांडवल अधिक लागते म्हणून जमलेही नसते. आता हे काम ऑक्टोबर मध्ये चालू करायचे आहे, तोपर्यंत इकडे श्री वामन निवासाकडे देखील अधिक लक्ष घालता येईल. या खेपेत लेबर कॉन्ट्रॅक्टरचे बिल तपासणे, खडी, रेतीवाल्यांची बिले रकमा तपासून भाऊसाहेबांना त्यांच्या किती रकमा द्यायच्या ते सांगितले आणि या मॅझेनाईन माळ्याला किती लोखंड लागेल तेही काढून देत आहोत.

''श्रीं'' - किती ५० हजारांचे लागेल का?

मी - या मॅझेनाईन व गॅलरीच्या कामास ३० ते ४० हजारापर्यंत लागेल असा अंदाज आहे, उद्या सांगतोच.

''श्रीं'' - अहो, भाऊसाहेबांनी काय म्हणे तुमचा निर्णय तुमच्या पश्चात बदलला? ते मोरेश्वर घैसास सांगत होते. आम्ही भाऊसाहेबांचे बरोबर कामावर जाऊन आलो. त्यांना सांगितलं, म्हटलं, नागले म्हणताहेत त्याप्रमाणे होऊ द्यावं. आपल्याला आयुर्वेदिक दवाखान्याच्या दोन खोल्या बांधण्याआधी मुख्य हॉल बांधून होणे महत्त्वाचे आहे. काय हो, वरचा स्लॅब म्हणजे हॉलच्या छपराचा स्लॅब, एक लाख जमविले तर होईल का?

मी - होय. महाराज होईल.

त्यानंतर प.पू. महाराजांनी घरची व (भाचा, सौ. प्रभाचा मुलगा) चि. श्रीपादची प्रकृती सुधारत असल्याबद्दलची विचारपूस केली. श्री. मानवतकर महाराजांबद्दल प्रशंसात्मक उद्‌गार काढले.

चि. संदीप यास मेकॅनिकल साईड डिप्लोमाला घालण्याचा विचार आहे. श्री. माधवराव तांबोळी मंत्रालयातून प्रयत्न करीत असल्याचे सांगितले, यावर ''श्री'' म्हणाले, ''अहो डिप्लोमानंतर दोन वर्षांत त्याला बी.ई. ला बसता येईल. शिवाय ते ए.एम.आय.ई. का काय ते तेही बी.ई. सारखचं असतं म्हणे. तेही करता येईल.'' मधल्याची चि. दिनेशची व धाकट्या अभिजीतचीही चौकशी केली.

दि. २७ ला मी निरोप घेण्यासाठी गेलो असता पुन्हा विचारले, ''काय हो! एक लाखात

हॉलच्या वरचा स्लॅब होईल ना?''

मी पुन्हा म्हटले, ''होय महाराज! होईल.''

दि. ३०.६.१९८४, शनिवारी दुपारी ३ पासून २१ तास आम्हां गुरुबंधूंचा धून नामस्मरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि. ७.७.१९८४ रोजी कुरवपूरचे श्री. केळकर गुरुजी अचानक आमच्या घरी दर्शन देऊन गेले. दि. ८.७.१९८४ रोजी श्री गजानन आश्रम स्वामी महाराजांना निरोप दिला तर लागलीच सोमवार दि. ९.७.१९८४ रोजी सकाळी १० वाजता प.पू. महाराजांचे व्ही.टी. स्टेशनवर आगमन झाले. आम्ही उतरवून घेण्यास गेलो होतो. बरोबर श्री. दत्ता सप्रे होते. श्री. जोशी त्यांच्या घरी 'श्रीं' ना नेण्यास आले होते. मी व माझ्याबरोबर श्री. शृंगारपुरे, घोलकर, गोडसे वगैरे मंडळी होती. विश्रांतीनंतर सायंकाळी श्री. जोशी यांच्या घरीच ''श्रीं''चे ''दत्ता कृपा सावली दे'' या अभंगावर प्रवचन झाले. मुंबईकर भक्त मंडळी उपस्थित होती. दि. १०.७.१९८४ रोजी दुपारी डेक्कन क्वीनने ''श्रीं'' पुण्यास रवाना झाले. दि. १२.७.१९८४ रोजी गुरुवारी गुरुपौर्णिमेस आम्ही सर्व पुण्यास श्री वासुदेव आश्रमात गेलो.

१२५) हैद्राबाद यात्रा

''प.पू. महाराजांसोबत हैद्राबाद, श्रीशैल्यम् व कुरवपूर यात्रा''

दि. १७ मार्च १९८४ ते २ एप्रिल १९८४

हैद्राबाद येथील श्री भटजीबापू संस्थानात श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह हा आमचे गुरुबंधू श्री. मुरलीधर द्वा. वढावकर यांनी आयोजित केला होता. श्री. वढावकर रिझर्व्ह बँकेत मोठ्या पदावरून नुकतेच निवृत्त झाले होते. हैद्राबाद येथे न्यूनल्लाकुंटा येथे त्यांचे स्वत:चे घर आहे. त्यांचे सत्संकल्पास ''श्रीं''चे आशीर्वाद मिळाले व त्यांनी ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणे आम्ही सर्व प.पू. महाराजांसोबत हैद्राबाद एक्सप्रेसने दि. १७.३.१९८४ रोजी दुपारी १२.३५ वाजता निघालो. सर्वांच्या जागांचे आरक्षण आधीच केलेले होते. आम्ही सर्व प.पू. दत्तमहाराज, सौ. आईसाहेब, श्री. गजानन आश्रम स्वामी महाराज, श्री. रघुनाथराव व सौ. वासंतीबाई, श्री. माधवराव तांबोळी व सौ. सुलभाताई, मामी, श्री. पंकज वढावकर, गोडसे, मुजुमदार, तावडे व मी पुण्यापर्यंत होतो. ''श्रीं''ना गाडी सुरू झाल्यानंतर कुपेमध्ये विश्रांती करीता अंथरूण घालून दिले. कल्याण, अंबरनाथ गेल्यानंतर ''श्री'' उठून बसले. मी जवळच होतो. श्री वामन निवासच्या कामांची रुपरेषा समजावून घेत होते. पुढील कामांचे टप्पे कोणते, प्रत्येक टप्प्यास पूर्ण करण्यास किती निधी लागेल वगैरे चर्चेचा विषय होता. सर्व गोष्टी माझ्या डोळ्यासमोरच असल्याने मी अभ्यासपूर्ण सविस्तर माहीती देत होतो. पुणे स्टेशनवर श्री.

भाऊसाहेब व श्री. राजू झानपुरे व इतर मंडळी दर्शनास आली होती. मला श्री वामन निवासाची काही कामे पूर्ण करायची होती. म्हणून मी पुढे जाऊ शकलो नाही. मी पुण्यास उतरलो. पुण्याला श्री. व सौ. दशपुत्रे आणि दत्ता सप्रे या सफरीत येऊन मिळाले.

हैद्राबादलाही मंडळी स्टेशनवर सकाळी ६ वाजता तर वढावकरांच्या घरी पोहोचण्यास ७ वाजले. श्री. व सौ. वढावकर यांनी यथायोग्य, पद्धतशीर ''श्रीं''चे तथा सौ. आईसाहेबांचे स्वागत केले. ''श्रीं'' करिता स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली होती. इतर मंडळींचीही व्यवस्था उत्तम होती. दि. १८ मार्च पहिल्या दिवशी वढावकर उभयतांनी ''श्रीं''ना अभ्यंगस्नान घातले. पादुकांची आणि ''श्रीं''च्या पादपद्मांची पूजा यथाविधी केली. ''श्रीं''चे आन्हिक आटोपल्यानंतर सर्वांस प्रसाद भोजन झाले. रात्री ओळखीच्या माननीय ३ व्यक्तींकडे ''श्रीं''ची पाद्यपूजा झाली. रात्री धून झाली. विशेष म्हणजे श्री क्षेत्र कुरवपूरला जाण्याचा बेत ठरला.

दि. १९ ला पहाटे ५.३० वाजता काकड आरती, ६-७ सामुदायिक बैठक ''श्रीं''च्या समोर झाली. त्यानंतर सहस्रावर्तन, श्री सत्यदत्तपूजा संपन्न झाली. यातील वैशिष्ट्य म्हणजे ''श्रीं''नी स्वतः श्री सत्यदत्तपूजा सांगितली. नंतर ''श्रीं''च्या समोर १०८ निरांजने लावून उत्सव साजरा करण्यात आला. ह्या सर्व कार्यक्रमानंतर भगिनी सौ. सुलभाताईनी श्री कुरवपूरला जाण्याचा बेत ''श्रीं''च्या कानावर घालून अनुमती मिळविली. सर्व भक्तांच्या आनंदात ''श्रीं'' आपले प्रकृती अस्वास्थ्य पूर्ण विसरले होते.

दि. २०.३.१९८४ ते २६.३.१९८४ श्री गुरुचरित्र सप्ताह श्री. भटजीबापूंच्या संस्थानात (मठात किंवा आश्रमात म्हणूया) करण्याचे ठरले होते. ह्या स्थानाची माहीती थोडक्यात अशी -

श्री. भटजीबापू नावाचे फार मोठे सत्पुरुष इथे होऊन गेले. बहुधा ते प.प. वासुदेवानंद टेंबे महाराजांचे समकालीन असावेत. महाराष्ट्रांतही त्यांचा संचार झाला होता. सौ. आईसाहेबांकडून कळले की, ते आईसाहेबांचे माहेरी बार्शीला येऊन गेले होते. तसे कवीश्वर कुटुंबीयांकडेही येऊन गेले होते. ह्या संस्थानात त्यांची समाधी आहे. संस्थानला बरीच जमीन इनाम मिळालेली आहे. इथे दर दशमीला मोठ्या प्रमाणात अन्नदान होते. समाधी मंदिराच्या उजव्या बाजूस स्वयंपाक घर आहे. त्यानंतर कोठीची व ट्रस्टींना उतरायची खोली आहे. त्यानंतर ऑफिस आहे. याच ऑफिसच्या खोलीत ''श्रीं''ची उतरण्याची सोय केली होती. मागे शिष्य, सेवेकरी याच्याकरीता ३-४ खोल्या आहेत. डाव्या बाजूस विहीर, कॉमन संडास, बाथरुम असे आहे. समाधीसमोर मोठे पटांगण त्याच्याही पुढे शंकर मंदिर आहे. समाधी मंदिर लांबलचक असून मध्यभागी समाधी आणि दोन्ही बाजूस प्रशस्त हॉल अशी

जागा आहे. एका बाजूच्या हॉलमध्ये ''श्रीं''चे व्यासपीठ आणि निरुपणास श्रोते बसत. निरुपणाचे ठिकाणीच सकाळी पोथीवाचन होई. भक्तांच्या पोथी वाचनाचे वेळात ''श्रीं'' ठिकठिकाणी भक्तांच्या आग्रहास्तव त्या त्या घरी जाऊन येत. दि. २० ते २६ पर्यंत रोज खालील प्रमाणे कार्यक्रम असत.

सकाळी ५.३० ला	:	काकड आरती
सकाळी ६ ते ७	:	सामुदायिक बैठक
सकाळी ८.३० ते दुपारी १.३०	:	प.पू. दत्तमहाराज सकाळी वाचलेल्या गुरुचरित्र अध्यायावर निरूपण करीत.
सायं. ६ ते ७	:	दिगंबराची धून
सायंकाळी ७ वाजता	:	सायंकाळची आरती

सप्ताह समाप्ती नंतर आम्ही सर्व ''श्रीं''चे सोबत दि. २७ पहाटे दोन मेटॅडोर मधून १५-१५जण 'श्री शैल्यम्ला' निघालो. ११.३० ते १२.३० पाताळगंगेचे स्नान झाले. १.३० च्या सुमारास श्री शैल्यमला पोहोचलो. एक बंगला रिझर्व्ह केला होता. ६.३० ते ८.३० ला ''श्रीं''च्या हस्ते देवीची कुंकुमार्चनाने पूजा व श्री शैल्यम्ची यथाविधी पूजा संपन्न झाली. ''श्रीं''नी पूजा आटोपली. नंतर त्या पुरोहितांनी सर्व वेदांच्या ब्राह्मणांना बोलावण्यास सांगितले. ते आल्यावर प्रत्येकाला आपल्या वेदांतल्या ऋचांचे पठण करण्यास सांगून विनयपूर्वक नमस्कार केला. हे सर्व देवळाचे आवारातच झाले. श्री शैल्यम्ची यात्रा झाली. म्हणजे सर्व तीर्थयात्रा घडल्याचे पुण्य मिळते असे म्हणतात. श्री गुरुचरित्र पारायणानंतर श्री सद्गुरुंच्या सहवासात श्री शैल्यम् दर्शन यात्रा ही आम्हा भक्तांस आयुष्यातील पर्वणी काळच म्हणावा लागेल.

दि. २८.३.१९८४ ला आम्ही सर्व हैद्राबाद येथील श्री. वढावकरांच्या घरी परतलो. दुसऱ्या दिवशी दि. २९ रोजी सकाळी आम्ही सर्व ''श्रीं''सह श्री भटजीबापू संस्थानांत द्वादशीचा प्रसाद घेतला. कालच्याच दोन मेटॅडोरने आम्ही सर्व कुरवपूर क्षेत्री प्रयाण केले. नॅशनल हायवे क्र. ७ ने मेहबूब नगर मार्गे मक्थन या गावी सायं. ५ वाजता पोहोचलो. या गावाहून हायवे सोडून आमच्या या छोट्या बसेस पुढे कच्च्या रस्त्याने पंचपाळ या गांवी ठीक ५.४५ ला आल्या. या गांवाचे कृष्णातीरी कुरवपूर अगदी समोर दिसत होते. आता आम्हाला नदी पार करायची होती. त्यावेळी येथे होड्या नव्हत्या. वृद्ध आणि स्त्रीयांकरिता खाटले, सुंभानी विणलेले ते उलटे नदीच्या पाण्यावर टाकतात. म्हणजे खाटेचे चार पाय वर असे. चारही कोपऱ्याला सुके भोपळे बांधून खाटेत ४ माणसे याप्रमाणे कोळी नेतात. बाकी सर्व तरुण मंडळी कोळ्यांचा हात व हातात लकडी असे चाचपडत पाण्यातून चालत जायचे

असते. कुठे पाणी गळ्यापर्यंत तर कुठे कंबरेपर्यंत, कुठे सपाट वाळू तर कोठे पायाशी मोठाले दगड असा हा प्रवास होता. वृद्ध, बायका व नवी माणसे, सायंकाळची वेळ ह्याचा फायदा घेऊन चौपट भाव सांगून ते कोळी अडून धरू लागले. शेवटी आम्ही काळोखात अडखळत, ठेचकाळत रखडत कसे बसे पैलतीरावर पोहोचलो. आमच्याजवळ बॅटरीही नव्हती. वाटाडे नेहमीच्या सवयीने जलद चालत पण आमची मात्र त्रेधातिरपीट होई. सायंकाळी ७ ला नदीत चालणे सुरू केले ते जवळ जवळ पाऊण तास नदीत. नंतर नदी ते मंदिर, रात्री ८ ला आम्ही श्रीपाद श्रीवल्लभांच्या मंदिरात पोहोचलो. ''श्रीं''चे बरोबरच सर्वांनी दत्तप्रभुंची धुळभेट घेतली. श्रीपाद भट पुजारी यांना आगाऊ पाठविलेले पत्र न मिळाल्याने त्यांची धावपळ उडाली. प.पू. महाराजांची त्यांची पूर्वीपासून ओळख होती. प.पू. महाराजांची ही कुरवपूर दर्शनाची तसेच गोडसे, घोलकरांसह मंडळींचीही ही दुसरी खेप होती. मधूनच वीज जायची. जेवणे व्हायला १०.३० ते ११ वाजले. रात्री ''श्रीं'' मंदिरात झोपले. स्त्रिया ओसरीत तर आम्ही पुरुष मंडळी उघड्या आवारातच झोपलो.

दि. ३०.३.१९८४ रोजी पहाटे ४.३० वाजता काकड आरती झाली. ''श्रीं''ही आरतीला उठले होते. आरतीनंतर ''श्रीं''नी पुन्हा विश्रांती घेतली. ते खूपच दमले होते. संपूर्ण यात्रेत श्री. वढावकरांचे सूचनेनुसार ''श्रीं''च्या समोरील सीट ''श्रीं''ची जणू देखभाल करण्याकरीताच त्यांनी मला दिली होती. मला त्यामुळे ''श्रीं''चा सहवासाचा इतकेच काय सेवेचाही खूप लाभ भाग्यवशात् झाला. प.पू. महाराजांचे पाय वळत अथवा दुखत असावेत. ते सारखी पायांची पोझीशन बदलायचे. काही वेळा आपलेच हाताने पाय रगडायचे. हे पहाणे असह्य होऊन भीडभाड न सांभाळता मी माझ्या बाजूस जागा करून त्यांचे चरण माझ्या सीटवर ठेवले व रगडण्यास प्रारंभ केला. एरव्ही त्यांनी अडथळा केला असता परंतु निश्चितच त्यांना पायांच्या पोटऱ्यातून मांडीतून असह्य वेदना होत असणार. माझ्या थोड्या फार ज्ञानाने मी त्यांच्या नसा नी नसा खोटेपासून मांड्यांपर्यंत चेपल्या आणि नंतर थोड्या थोड्या वेळाने ही सेवा मी मनोभावे करीतच राहीलो. सेवाभावापेक्षा माझ्या गुरुदेवांच्या वेदना शमल्या जाव्यात याचकरिता माझे प्रांजल प्रयत्न होते आणि माझ्या प्रयत्नांना ''श्री'' साथ देत होते.

पहाटे काकडआरती संपताच त्या निरव शांततेत, साक्षात् श्रीपादांच्या मठीत पहुडलेल्या आमच्या सद्गुरुंच्या सान्निध्यात ध्यानधारणा बैठकीचा लाभ घेतला. झुंजुमुंजू होताच, सर्व, नदी स्नानास जाऊन आलो. प्रवासांतून आल्यामुळे श्री. रघुनाथरावांनी स्नान करून प्रथम ''श्रीं''ची वस्त्रे व सोवळी धुवून पसरून नदी तीरावर वाळत टाकली. ती वाळेपर्यंत अर्धा पाऊण तास ''श्री'' शांतपणे एका खडकावर डाव्या मांडीवर उजवी मांडी ठेवून दोन्ही हातांची बोटे एकमेकांत मिटून आणि ध्यानपूर्व अवस्थेत डोळे मिटून अगदी स्वस्थ बसले

होते. सूर्योदय होत होता, कोवळी नाजूक तांबूस पिवळी किरणे श्रीमुखांवर हळूहळू पसरत होती. आहाहा! साक्षात दत्तप्रभूच मंदिरातून येऊन कृष्णा तीरी बसले आहेत.

सगुण साकार कैवल्याचे धाम।
ते रुप देखियले म्या कृष्णातीरी।।
शांत नि दांत सदा ब्रह्म लीन।
ते रुप देखियले म्या कृष्णातीरी।।
वात्सल्य स्वरुप स्वानंदे निमग्न।
ते रुप देखियले म्या कृष्णातीरी।।

आमच्या गुरुबंधू गोडसेंनी ते रुप कॅमेऱ्यात टिपले आहे. सर्वांचे नंतर ''श्रीं''नी स्नान केले व आपले आन्हिक त्या खडकावर बसूनच आटोपले. ओलेत्याने ''श्री'' गाभाऱ्यात पाणी घेऊन गेले. रुद्राभिषेकाने ''श्रीं''नी महापूजा केली. ''श्री'' स्वत:च आवर्तने म्हणत होते. यथासांग विधीपूर्वक पूजा आटोपण्यास दोन तास लागले. नैवेद्य महाप्रसाद एक वाजेपर्यंत झाले. त्यानंतर श्रीपाद भटजींनी देवस्थान तर्फे प.पू. महाराजांचा मोठा सत्कार केला. ''श्रीं''ना त्यांनी छाटी, धोतर, श्रीफळ व प्रसाद दिला. दुपारी २.३० वाजता आम्ही कुरवपूर सोडले. हैद्राबाद येथील श्री. वढावकरांचे घरी पोहोचण्यास आम्हांस रात्रीचे १० वाजले.

दि. ३१.३.१९८४ ला श्री. आजेगांवकर, ''श्रीं''ना आपले घरी एक दिवस मुक्कामाकरीता नेण्यास आले. ''श्रीं''नी मला हाक मारून श्री. आजेगांवकरांची ओळख करून दिली. मी चरण स्पर्श करून त्यांना नमस्कार केला. नंतर नेहमीप्रमाणे श्री वामन निवासाचे कामाचा आणि आमच्या कर्तृत्वाचा, कौतुकाचा पाढा सुरू केला. मला तेथून निघून जाणे शक्य नव्हते. मुंबईची कामे टाकून स्वखर्चाने येण्यापासून सर्व झाले. मी ओशाळल्या अवस्थेत नतमस्तक उभा होतो.

प.पू. महाराज श्री. आजेगांवकरांकडे गेले व आम्ही सर्व भक्त मंडळी श्री. वढावकरांकडेच होतो.

सकाळी श्री. वढावकरांनी त्यांचे संपूर्ण घर मला दाखविले. त्यांना ह्या घरावर वरचा मजला बांधायचा होता. त्यांनी वरच्या मजल्याचे प्लॅन्स-ड्रॉईंग्ज मला दाखविली. वरील बांधकामांत कोणती काळजी घ्यायची, कॉलम कास्ट करताना काय पहायचे, स्लॅबचे वेळी कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी पहायच्या या सर्व कामकाजाच्या नोटस् मी त्यांना दिल्या. पुढे त्यांनी प्रश्न केला, तुम्हालाच येथे येऊन हे वरच्या मजल्याचे काम करून देता येईल का?

माझ्या सद्गुरुंचा त्यांनी केलेला कार्यक्रम, सर्व गुरुबंधूंना व मलाही दिलेली सत्संगाची संधी, हे सर्व पाहता व आपलेच गुरुबंधू ते आहेत ही आध्यात्मिक आपुलकी लक्षात घेऊन

मला त्यांना नाही म्हणता आले नाही. खूप भीड पडली व मुंबईस गेल्यानंतर लेबर कॉन्ट्रक्टर व माझे सुपरवायझर्स यांना विचारून सांगतो म्हटले.

मुंबईस आल्यानंतर मी माझ्या लेबर कॉन्ट्रॅक्टरला विचारले. तो माझ्या पूर्ण विश्वासातील होता. मला एकूण २ ते ३ खेपा मारायला लागल्या असत्या. बाकी तो लेबर कॉन्ट्रॅक्टर सांगेल त्याप्रमाणे सांगेल त्या माल मटेरिअलचा सप्लाय स्वखर्चाने वढावकरांनी करावा ह्या शर्तीवर मी त्यांना होय म्हटले. तरीही हे काम म्हणजे माझ्यावर फार मोठी जबाबदारीच पडणार होती. प.पू. महाराज त्यादिवशी रात्री वाडीला निघणार होते. दि. २१.४.१९८४ ला मी पुण्यात श्री वामन निवासाच्या कामावर होतो. सकाळी श्री. वढावकर प.पू. महाराजांचे दर्शन घेऊन गेले. त्यांनी महाराजांना, ''मी नागलेना माझ्या घराच्या वरचे बांधकाम देत आहे,'' असे सांगितले.

प.पू. महाराजांनी आश्चर्याने विचारले, ''काय? नागले हैद्राबादला येऊन एक माळा वाढविण्याचे काम करणार आहेत? ते होय म्हणालेत?''

श्री. वढावकरांनी नागले काम करणार असल्याचे सांगून ते निघून गेले. मी भोजनास दुपारी आश्रमात आलो होतो. भोजन होऊन थोडी विश्रांती झाली. ऑफिसमध्ये मी नाना कुलकर्णी आणि श्री. रघुनाथराव यांच्याशी गप्पा मारीत बसलो होतो. इतक्यात महाराज जिने उतरून ऑफिसात आले. आम्ही उभे राहीलो. महाराज नानांचे टेबलासमोरील खुर्चीवर खिडकीकडे तोंड करून बसले. मला पाहताच म्हणाले, ''आला आहात का तुम्ही?'' नंतर रघुनाथरावांकडे तोंड करून जरा रागातच म्हणाले, ''अहो! हे हैद्राबादच्या त्या वढावकरांचे घराचे वरच्या मजल्याचे काम करायला निघाले आहेत. काम ते किती? ते हैद्राबाद कोठल्या कोठे? आपला मुंबईचा मोठा व्यवसाय सोडून एवढेसे काम करणे तेही हैद्राबादला जाऊन? हे कसे शक्य होणार यांना? पण यांना त्या वढावकरांना स्पष्ट सांगता आले नाही की, एवढ्या दूर त्रयस्थळी मला हे काम करणे शक्य होणार नाही. भिडस्त भिडस्त म्हणजे किती भिडस्तपणा?''

जाता जाता ''श्रीं''चा चरणस्पर्श करून नमस्कार केला व म्हटले, ''नाही करणार मी काम महाराज. खरंच मी भिडेखातर हो म्हटले होते.''

मग ''श्रीं''नी समजुतीने चार गोष्टी सांगितल्या व ''प्रेम आपुलकी कितीही असली तरी व्यवहार सोडू नये'' हा आदेश दिला.

प.पू. महाराज व श्री. रघुनाथराव आश्रमांतून घरी गेल्यानंतर श्री. नाना कुलकर्णींच्या जवळ बोलत बसलो होतो. नाना म्हणाले, ''नागले, महाराज आज खरंच तुमच्यावर रागावले होते. असे रागावलेले मी तरी कधी पाहिले नाहीत. अर्थात् त्या त्यांच्या रागात

नागले तुमचे हितच दडलेले आहे.''

महाराजांना राग येत नाही. एकनाथ महाराजांसारखी त्यांची शांत वृत्ती असे म्हणून नानांनी त्यांच्या शांत वृत्तीचा एक प्रसंग सांगितला तो असा,

मागे एकदा असेच रात्रीच्या गाडीने ''श्रीं''ना बाहेरगांवी जायचे होते. बाहेरगांवी रेल्वेने किंवा एस्.टी. बसने जरी जायचे असले तरी प.पू. महाराज एक तास आधीच घरून निघतात. त्यांचे म्हणणे असते, ''स्टेशनला जाताना रहदारीमुळे रिक्शाला अडथळा आला आणि स्टेशनवर पोहोचायला उशीर झाला तर? किंवा अन्य काही अडचणी अडथळे उपस्थित होऊ शकतात. वेळेच्या अर्धा तास आधी स्टेशनवर पोहोचले तर बिघडले कोठे? ऐनवेळी निघून मानसिक ताण वाढविण्यापेक्षा अर्धा तास स्टेशनात बसणे परवडेल.''

त्या दिवशी असेच बाहेरगावी जाताना चि. अजितला सोबत घेऊन रिक्शाने लवकरच निघाले. शिवाय जाता जाता १५ ते २० मिनिटे त्यांना वासुदेव आश्रमात जाऊन देवदर्शन, औदुंबर दर्शन सर्व करायचे होते. सोबत सामान होते. बेडींग, बोचके व एक होल्डॉल बॅग. हे सर्व सामान अजितने सीटचे मागील भागात ठेवण्यास जागा होती, तिथे लावले. प.पू. महाराज तातडीने उतरले व आश्रमात शिरले. आश्रमात नाही म्हटले तरी वेळ जाणार म्हणून रिक्शावाल्याचे पैसे देऊन त्याने रिक्शा सोडली व तोही दर्शनास आश्रमात आला. प.पू. महाराजांनी खरोखरच दर्शन १० ते १५ मिनीटांत पूर्ण करून अजितला म्हणाले, चला निघू या. दोघेही फाटकाजवळ आले. महाराजांनी विचारले, सामान कुठे आहे?

अजित गडबडला व म्हणाला, ''दादा मी घाईघाईत रिक्शामधून सामान काढण्याचे विसरूनच गेलो. आता काय करायचे?'' भांबावलेल्या अजितने धसका घेऊनच विचारले. प.पू. महाराज शांत, तेवढ्यातही त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. म्हणाले, ''रिक्शांतच गेले का? मग चला आपण परत घरी जाऊया आणि दुसरी वळकटी बांधून जरूर ते सामान घेऊन निघू या. चला आपल्याला त्या नाक्यावर रिक्शा मिळेल.'' महाराजांचे एक तास आधीच घरांतून निघणे कसे योग्य ते अशावेळी पटते. दुसरे म्हणजे सामान गेल्याची यत्किंचितही हळहळ नाही, अजित विसरला म्हणून दोन शब्द त्याला सौम्य आवाजात सांगणे सुद्धा नाही. राहीले? राहू द्या. दुसरे घेऊ. दोघे चालत येऊन त्यांनी घरी परतण्याकरीता रिक्शा पकडली आणि पहातो तो काय आश्चर्य? तीच ती रिक्शा. जणू त्यांचीच वाट पहात होती. सर्व सामान जसेच्या तसे होते. आता घरी जाण्याची आवश्यकता नव्हती.

१२६) "भक्तवत्सल भक्ताभिमानी श्री सद्‌गुरु दत्तमहाराज - २

रविवार, दि. ३०.९.१९८४ रोजी श्री वामन निवास बांधकामाचा स्लॅब कास्टींग (काँक्रिटींग)चा दिवस. मी सकाळी ८ वाजताच श्री वासुदेव निवासातून निघालो. बाहेर पडता पडता शब्द कानी आले. श्री. नाना कुलकर्णी व्यवस्थापक आचाऱ्यास सूचना देत होते, "नंदू व नागले यांच्याकरीता फोडणीचे पोहे करून साईटवर पाठविण्यास प.पू. महाराजांनी सांगितले आहे!"

प्रत्येक प्रमुख काँक्रिटींगची सुरुवात प.पू. महाराजांच्या हस्ते किंवा महाराज पुण्यात नसतील तर प.पू. वेदाचार्य घैसास गुरुजी महाराजांच्या हस्ते नारळ फोडून केली आहे. आज महाराज आहेत पण ते आन्हिकांत असतील. मनात विचार आला, प.पू. महाराजांना एवढ्या लांब येण्याची तसदी देण्यापेक्षा नारळ घेऊन महाराजांच्या घरी जावे व लागलीच नारळ घेऊन मी प.पू. महाराजांच्या घरी गेलो. हातपाय धुवून दर्शन घेतले व म्हटले, "महाराज आता १२.३० पर्यंत स्लॅबचे काँक्रिटींगला सुरवात करीत आहोत. प्रारंभ करताना आपल्या हस्ते नारळ फोडला जावा. तो फोडायचा नारळ आपल्या हस्तस्पर्शाकरिता मी घेऊन आलो आहे. काम निर्विघ्न पार पडावे म्हणून. आपण आपल्या हस्ते हा नारळ मजकडे द्यावा. म्हणजे कामास प्रारंभ करताना आम्ही तो फोडून सुरुवात करू."

त्यावर प.पू. महाराज म्हणाले, "अहो, तुम्ही गुरुभक्त मंडळी आहातच तेथे. तुम्हां सर्वांचा गुरुभाव आणि भक्तीभाव एवढा आहे की, तोच सर्व काम निर्विघ्न पार पाडून घेईल. बरं, आणलाच आहात नारळ तर देतो. असे म्हणून काही मंत्र ओठातच म्हणून, नारळास पिंजर लावून यांनी तो माझ्या पसरलेल्या दोन्ही हातात वरून सोडला आणि लागलीच प्रश्न. तुमच्या भोजनाचे काय?"

मी म्हटलं, "महाराज! ह्या बाहेरच्या कामातून आम्हाला कधी संकष्टी, एकादशी असे उपास करणे जमतच नाही. पण स्लॅब असेल तेव्हा मात्र उपास करावाच लागतो, म्हणजे धावपळ, वरखाली चढउतार करणे, शीघ्र होते, सुस्ती येत नाही."

प.पू. महाराज उद्‌गारले, "नाही नाही, तसे करून नका. मध्यंतरी वेळ काढून येथे आपले घरी येऊन जेवून जा." श्री सद्‌गुरुंपुढे आपला नकार मांडायचा नसतो, एवढी अक्कल आम्हांस नव्हती. आम्ही आमचा अति सूज्ञतेचा विचार पुढे मांडला. "महाराज, स्लॅबचे कामातून तसं शक्य होणार नाही. तशी आम्हाला कामात काही न खाण्याची सवयही असतेच. याशिवाय श्री. नाना आम्हाला फोडणीचे पोहे आश्रमातून पाठविणार आहेतच."

प.पू. महाराज, "बरं तर. मग रात्री भोजनाला तरी यायला जमेल ना?"

मी, "होय महाराज. आम्ही आधीच सौ. आईसाहेबांना, आमचे प्रसाद भोजन झाकून

ठेवा, आम्ही रात्री येऊन खाऊ म्हणून सांगूनच ठेवले आहे.''

प.पू. महाराज, ''बरं बरं, या हं. आज तुम्हाला बरेच श्रमही आहेत आणि संपूर्ण दिवसाचा उपवासही घडणार आहे.''

मी नारळ घेऊन साईटवर गेलो. नारळ फोडून स्लॅबच्या काँक्रिटींगचा शुभारंभ ठीक १२.१५ वाजता झाला. ४ वाजेपर्यंत स्लॅब व बिम्स्चे मुख्य काम, अर्ध्या भागाचे पूर्ण झाले होते. चार वाजता खाली धावाधाव होऊन ध्वनी उमटले. ''महाराज आले, महाराज आले.'' माझे मन अत्यंत आनंदाने, उत्साहाने भरून आले, मी खाली धावलो. मला खात्री होतीच की महाराज साईटवर येणार आणि आले की वर चढल्याखेरीज राहणार नाहीत. खाली येऊन पहातो तर पायऱ्या बांधून न झालेल्या जोत्याजवळ (प्लिंथ जवळ) कसे चढावे हा विचार करीत उभे होते. जोता २-० फूट उंच होता. मी धावतच पुढे जाऊन दोन बिगाऱ्यांच्या सहाय्याने स्लोपमध्ये दोन जाड्या फळ्या लावून घेतल्या. मी आधाराकरिता हात पुढे केला. फळीवर पाऊल टाकण्यापूर्वी विचारत आहेत, ''काय कोठवर आले काम? चला वर जाऊ या, पाहू या, कसे होत असते काम.''

मी म्हटले, ''अर्धे अधिक काँक्रिटींग झाले.''

प.पू. महाराज २१ फूट उंचीवरील स्लॅबवर पोहोचण्यास उभ्या मुंढ्यांतून, आडव्या ब्रेस बांबुतून वाट काढीत वर वर चढू लागले. भीति वाटत होती आणि त्याहीपेक्षा प्रश्न होता तो जिन्याचे डॉवेल बार्स डोक्याला लागण्याचा. शेवटचा जिना तर अजून काँक्रिटने भरून काढायचा होता. मी प.पू. महाराजांचे हातातील पिशवी घेतली व आधाराकरिता पुढे सरसावलो. पुढील मार्गातील अडचणी दूर करू लागलो. परंतु महाराज निश्चिंत, मंदस्मित, हसतमुख, भय नाही, भीती नाही. विलक्षण उत्साह अंगी दाटला आहे. वास्तविक डोळ्यांच्या मोतीबिंदूच्या ऑपरेशनने दृष्टी अधू झालेली. वयोमान ७५ आणि गेल्या काही दिवसात किरकोळ आजाराने थकवा आला होता. परंतु महाराज शीघ्र गतीने तरण्याताठ्या तरुणाप्रमाणे झप् झप् चढत होते. मधून मधून सिमेंट पाण्याचे थेंब अंगावर ठिपकत होते. वर अंथरलेल्या लोखंडी सळ्यांच्या जाळ्यावरून महाराज चालत आले. मिक्सरने कालविलेले काँक्रिट लिफ्टने वर कसे येते, ते कसे स्लोपिंग फळ्यांच्या प्लॅटफॉर्मवर ओतले जाते, हे सर्व आमच्याकडून नव्याने समजावून घेत होते. हा सर्व भक्तांच्या कौतुकाचा भाग होता. व्हायब्रेटर, काँक्रिट कसे घुसळतो, खाचा खळगे कसे भरून काढतो, बीमच्या खोक्यात तळापर्यंत कसे पोहोचवितो याबद्दल महाराज आश्चर्य प्रकट करीत आमचे कौतुकच करीत होते. जणू पाठ थोपटत होते. श्री. अविनाश भोपटकर ही सर्व क्षणचित्रे कॅमेऱ्यात टिपण्यास सज्जच होते.

"काय हे काम किती वाजेपर्यंत संपणार? सतत तुम्हाला उभे नि उभेच रहावे लागते. लवकरच घरी या. आम्ही सायंकाळपर्यंत आश्रमात आहोत. नंतर घरी येऊ.... वगैरे."

सायंकाळी ६.३० वाजता स्लॅब काँक्रिटींगचे काम पूर्ण होऊन गँग खाली उतरली. राहीलेले फिनीशींग पूर्ण करून घेण्यास अर्धा तास गेला. खाली येऊन स्वत:कडे पाहिले, तर पॅन्ट सिमेंट शिंतोड्यांनी भरून गेली होती. नंदू म्हणाला, "हा लेंगा घ्या नि ती पॅन्ट काढून द्या. मी धुवून देतो" त्यात थोडा वेळ गेला. पेमेंट गँगवाल्यांचे, मशीन भाडे वगैरे हिशेब, पुढील कामांच्या सूचना, काही चर्चा यात वेळ गेला. मी नंदुने धुतलेली ओली पॅन्टच चढवून निघालो. एकदा विचार आला. वेळ झाला आहे तर सरळ रिक्शा करून महाराजांच्या घरीच जावे. पुन्हा मनात आले की, हे ओले कपडे घेऊन कसे जावे? मी रिक्शा करून आश्रमात गेलो. आत शिरतो आहे, इतक्यात वरून कृष्णा आर्वीकर आले व नानांना विचारू लागले, "नागले आले आहेत का?" मी म्हटले, "हा मी मागे उभा आहे."

आताच महाराज म्हणाले, "खाली नागले आले असतील, त्यांना आम्ही वर बोलाविले आहे सांगा."

अहो! गुरुमाऊली लेकराची वाट पहात होती. टॉवेल गुंडाळून ओली पँट घालून वर गेलो. वर आपल्या नित्य बैठकीवर श्री. गुरुमहाराज बसले होते. समोर श्री. मोरेश्वर घैसास, श्री भाऊसाहेब वाकडे व इतर भक्त मंडळी बसली होती. मला पहाताच प.पू. महाराजांची कळी खुलली. चेहऱ्यावर प्रसन्न हास्य आले. माझा साऱ्या दिवसाचा शीण क्षणातच नाहीसा झाला. श्रमपरिहार होऊन धन्यता वाटली. साऱ्या अंगावर सुखद रोमांच दाटले. चरणी लीन होऊन मी साष्टांग नमस्कार घातला. प.पू. महाराज सारे कौतुक नेत्रात एकवटून माझ्याकडे एकटक पहात होते.

महाराज - हं,काय झाला का स्लॅब?

मी - होय महाराज!

महाराज - किती वाजता पूर्ण झाला?

मी - ६.३० वाजता पूर्ण झाला महाराज.

महाराज - मग इतका वेळ काय करीत होतात?

मी - स्लॅब झाल्यानंतर तो वाळतांना बारीक बारीक भेगा निर्माण होतात, त्या सिमेंटचे पाणी पसरवून झाडुने सारवण करावे लागते. शिवाय मिक्सर मशीन, लिफ्ट, व्हायब्रेटर याची भाडी देणे, गँगवाल्यांचा तेथल्या तेथे हिशेब करून त्यांचे पैसे श्री. चंदू शेट्टी यांच्या मार्फत देणे, वगैरे कामे उरकण्यात वेळ जातो.

प.पू. महाराजांनी समोर बसण्यास सांगितले. मी बसलो. थोडा वेळ भाऊसाहेब वाकडे,

श्री. मोरेश्वर घैसास आणि दर्शनार्थी आलेल्या मंडळींचा समाचार घेऊन, गर्दी संपल्यावर प.पू. महाराजांनी जिन्याकडील प्रवेश दरवाजा थोडा आड करून घेण्यास सांगितले. मला वाटले की, कामाबद्दल काही गोष्टी प.पू. महाराजांना माझ्याशीच बोलायच्या असतील. मी उठून कडी न लावता दरवाजा बंद करून घेतला व प.पू. महाराजांसमोर जरा जवळच बसलो. त्यानंतर अगदी आजन्म लक्षात राहील असा हृदयद्रावक प्रसंग प.पू. महाराजांचे संभाषणांतून प्रकट झाला. तो वर्णन करण्यापूर्वी आधी घडलेले दोन प्रसंग मला सविस्तर सांगणे भाग आहे ते असे,

पहिला प्रसंग - श्री. मनोळकर सुपरवायझर ठेवण्याबद्दल हरकत घेतात.

दुसरा प्रसंग - श्री. संवत्सरकर माझ्यावर चिडतात-फुटींगमधील काँक्रिट प्रमाणाबाबत

तिसरा प्रसंग - दि. ११.९.१९८४ रोजी 'श्री वामन निवास' बांधकामास मिळालेल्या मुंबईकरांच्या देणग्यांची पुरचुंडी (थैली) घेऊन मी पहाटेच्या डेक्कन एक्सप्रेसने दादरहून निघालो. सहा हजाराची रक्कम सोबत होती. आनंदी मूडमध्ये ११.३० ला सकाळी आश्रमात पाऊल टाकतो न टाकतो तोच अकाऊंट लिहीत बसलेले व तपासनीसाचे काम करीत असलेले श्री. मनोळकर साहेब ऑडीटर व श्री वामन निवासाचे ट्रस्टी, खवळून आमच्यावर उठले.

"काय हो नागले! हे काय चालविले आहे तुम्ही? त्या चंदू शेट्टींना २ हजार, दीड हजाराच्या रकमा दर आठवड्यास देता. त्या बिगाऱ्यांचे हजेरी पुस्तक कोठे आहे? त्यांचे आंगठे, सह्या कोठे आहेत?"

मी शांतपणे म्हटले, "साहेब, बिगाऱ्यांच्या सह्या घेण्याचे कारण नाही. याचे कारण असे की आपण श्री. चंदू शेट्टी यांना लेबर कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे."

साहेब म्हणाले, "लेबर कॉन्ट्रॅक्ट दिले आहे? कोणी दिले? कधी दिले? दुसरी टेंडर्स मागविली होती? कमीत कमी तीन टेंडर्स मागवावी लागतात. बरं पैसे मिळाल्याचे त्या शेट्टीचे व्हाऊचर आहे, पण त्याच्या डिटेल्स नको सोबत द्यायला? त्याचे बिल कोठे आहे? त्याची झाल्या कामाची मोजमापे कुठे आहेत? बिले सर्टिफाय कोणी केली? त्याला ॲडव्हान्स मंजूर कोणी केला? या सगळ्याला जबाबदार कोण? कोणत्या बेसीसवर पैसे दिले गेले? ही काय सगळी अंदाधुंदी आहे?"

मी म्हटले, "हे बघा मनोळकर साहेब. हा चंदू शेट्टी ओळखीने मिळालेला खात्रीचा माणूस आहे. त्याची सर्व पुण्यात केलेली कामे पाहून येऊन, आपले गॅरेजचे काम नमुन्यादाखल करून घेऊन, नंतरच हे काम त्यांना दिले आहे. त्यांचे रेटस् मार्केट रेटशी मिळते जुळते किंबहुना कमीच आहेत. त्याला दिली जाणारी पेमेंटस् ही त्याच्या झालेल्या कामाचे मोजमाप करून अगदी सेफर साईडने दिली जातात. एक दोन ॲडव्हान्स म्हणून पेमेंटस्

आहेत. ती फळ्या-सेंटरींगचे सामान खरीदण्यास म्हणून दिली असून सदर मटेरीअल आपले साईटवर, आपले देखरेखीखाली आहे व साईटवरच वापरले जात आहे.''

साहेब म्हणाले, ''तो सुपरवायझर, त्याचा काय उपयोग आहे? उगाच ओव्हरहेड चार्जेस वाढतात.' मी म्हटले, ''सुपरवायझर ठेवण्याबद्दल मीच प.पू. महाराजांना सांगितले आहे. त्याची साईटवर अत्यंत आवश्यकता आहे. तो चार दिवस रजेवर गेला होता तर किती गोष्टी पहाव्या लागल्या व समस्या उभ्या राहिल्या त्या श्री. नानांनाच विचारा. तोच तर आमच्या इंजिनिअर्स लोकांच्या इन्स्ट्रक्शन्सप्रमाणे साईटवर सर्व कामे करून घेत असतो. सिमेंट काँक्रिटची वेगवेगळी कामाप्रमाणे प्रमाणे असतात. ती पहावी लागतात. सेंटरींग मुदतीपूर्वी काढले जात नाही ना ते पहावे लागते. झालेल्या सिमेंटच्या कामावर पाणी मारणे, साईटवर सामानाची देखभाल करणे वगैरे वगैरे. सध्या कामाची अत्यंत घाई आहे. श्री वामन निवासाचे काम लवकर व्हावे, कमी खर्चात व्हावे आणि उत्कृष्ट प्रतीचे व्हावे इकडे आमचे तन, मन, व्यग्र असल्याने इतर गोष्टी व बाबींकडे आमचे लक्ष नाही. काही चुका होत असतील तर सुधारून घ्या. पेमेंटच्या डिटेल्स, मोजमापे, सर्व नोंद केलेले आहे. यथावकाश पद्धतशीर देता येईल.''

हा वरील प्रसंग साईटवर श्री. मोरेश्वर घैसास यांचे कानी मी घातला. श्री. चंदू शेट्टी हे मोरेश्वरांच्या ओळखीने आले होते. श्री. मनोळकरांना ३ टेंडर्स रेकॉर्डला पाहिजेत ती व शेट्टीची विकली पेमेंटची बिले पाहिजेत ती आपण त्यांना देऊ या. मोरेश्वरांनी हा सर्व वृत्तांत प.पू. महाराजांचे कानी घातला असावा.

---**---

प्रसंग चौथा

हा आजच्याच दि. ३०.९.१९८४ स्लॅब कास्टींगच्या वेळचा आहे.

लेबर कॉन्ट्रॅक्टर चंदू शेट्टी याने, त्यांच्या आर्थिक अडचणीमुळे आधी मॅझेनाईनवरील स्लॅब व नंतर १५ दिवसांनी टॉयलेट ब्लॉक्स, बाजूची रुम, जोड पॅसेज आणि जिना हा स्लॅब असे या छोट्या कामाचे दोन भाग केले होते. हे असे तुकड्या-तुकड्याने स्लॅब करण्याचे ठरविताना त्याने श्री. मोरेश्वर घैसास व श्री. भाऊसाहेब वाकडे यांना अनेक गोष्टी सांगून पटविले होते. मी तो संपूर्ण स्लॅब दोन्ही विंगचा मिळून भरण्याच्या इराद्याने मुंबईहून आलो आणि ही चंदू शेट्टीची तयारी पाहून मला रागच आला. कारण असे दोन विभागात काम करण्याने दोनदा मिक्सर मशीन आणि बऱ्याच गोष्टी डबल कराव्या लागणार होत्या. हा सगळा डबल खर्च वामन निवासाला बसला असता. हा आर्थिक फटका आणि एकाच वेळात

होणारे काम दोन पंधरवड्यात, म्हणजे वेळापव्यय झाला असता. मी शेट्टींना म्हटलं, ''पाहिजे तर मी आठ दिवस येथेच कामावर थांबतो. दोन्ही विंग्ज एकाच वेळी भरण्यास काय अडचणी असतील तर मला सांगा. मी निवारण करीन पण दोन्ही विंग्जचे स्लॅब जोड पॅसेजसह एकाच वेळी संपूर्ण कास्ट व्हायला हवेत.' आता या माझ्या निर्णयावर एकेक अडचणी सुरु झाल्या.

दोन्ही विंग्जना पुरेल एवढे सेंटरींग सामान फळ्या, मुंढे शेट्टींकडे नाहीत. नवीन खरेदी कराव्यात तर त्यांच्याकडे तेवढे पैसे नाहीत. मग मी माझ्या जबाबदारीवर ट्रस्टकडून रुपये पाच हजार शेट्टींचे बिल निघत नसताना देवविले. पैसे हाती न देता सोबत मार्केटला जाऊन फळ्या, मुंढे, बांबू पहाडाचे सामान, खिळे-मोळे जे जे लागेल ते खरेदी केले. श्री वामन निवासाच्या अकाऊंटला तुटपुंजी रक्कम शिल्लक होती. फळ्या तर अपुऱ्या होत्या. त्या दिवशी नेमका पाऊस. साईटवर रेती, खडी, ओली झालेली. बाहेर वापरास काढलेले सिमेंट भिजू नये म्हणून काळजी व प्लॅस्टिक पेपर करता धावाधाव. झालेल्या ताज्या स्लॅब काँक्रिट सरफेसवर लेबरला चालण्यास फळ्या कमी पडलेल्या, लेबर कॉन्ट्रॅक्टरचे अवसान खचत चाललेले. त्याला पाठीवरून हात फिरवून मनोधैर्य द्यावे लागे. त्यात श्री. संवत्सरकर साहेब त्यांचे कंपनीच्या शिरस्त्याप्रमाणे साईटवर हजर झालेले. मिक्सरमध्ये पाण्याचे प्रमाण कितीही कमी केले तरी पसरलेल्या काँक्रिटवर व कास्टींगच्या वेळेवर पावसाचे रिमझीम पडणाऱ्या पाण्याने ते पातळ होई. सेट होण्यास-घट्ट होण्यास वेळ लागे. फळ्या कमी, लेबरला चालण्यास फळी नाही, मजूरांचे पाय काँक्रिट सरफेस मध्ये ताज्या काँक्रिटवर काँक्रिटमध्ये जात. हा सर्व प्रकार पाहून आणि तो असह्य होऊन व पाठीमागील भूमिका किंवा वस्तुस्थिती काहीच माहीत नसल्याने संवत्सरकर साहेब माझ्यावर बेहद्द पिसाळले. म्हणू लागले, ''इंजिनिअरींगला तुम्ही कोठे शिकलात? काय मुंबईला ही अशीच कामे करता का? तुम्हाला श्री वामन निवासाचे काम चांगले व्हावे असे वाटत नाही का? तुम्हाला कामे कशी करायची असतात ते मी शिकवितो. माझ्याकडे या शिकायला. कामांची कोणती काळजी कशी घ्यायची ते लिहून देतो. ते तुम्ही अभ्यासा आणि मगच साईटवर उभे रहा.''

हे त्यांचे वक्तव्य मी शांतपणे ऐकत होतो. चाललेले काय आहे व स्लॅब कास्टींग संपताच गवंडी, सुतार, बिगारी लावून सिमेंट रेती घेऊन कुठे कुठे काय काय करावे लागणार आहे याची मला पूर्ण कल्पना होती. ऐनवेळी अचानक पाऊस आला नसता तर एवढी तारांबळ उडालीही नसती. स्लॅब संपल्यानंतरचीही दक्षता डागडुजी करावी लागली नसती. श्री. संवत्सरकर साहेबांची ही आगपाखड श्री. भाऊसाहेब वाकडे व श्री. घैसास ऐकत होते. मी शांत चित्ताने कामे सावरून धरत होतो. साहेबांना एकही उलट उत्तर मी केले नाही. श्री वामन निवासाचे काम चांगले व्हावे या आंतरिक तळमळीनेच ते चिडले होते. क्रोधायमान झाले

होते. त्यांचे त्याप्रसंगी रागावणे गैर नव्हते. पण त्यांना नीट सामोपचाराने समजावयाला मला उसंत नव्हती व त्या त्यांच्या तप्त भूमिकेत तेही समजावून घेण्याच्या पलीकडे होते. असो. त्यांची कळकळ नि उद्देश लक्षात घेऊन मला त्यांचा यत्किंचितही राग आला नाही. श्री भाऊसाहेब आणि घैसास यांनी मात्र झालेला हा प्रकार प.पू. महाराजांच्या कानावर, मी त्यांच्यासमोर पोहोचण्याच्या पूर्वीच घातला असावा.

वास्तविक या किरकोळ बाबी प.पू. महाराजांपर्यंत जायला नको होत्या. मला जर या दोघांनी आम्ही हे प.पू. महाराजांकडे सांगण्यास (हे वरील चारही प्रसंग सांगण्यास) जात असल्याची कल्पना दिली असती तर मी त्यांना त्यांचे हातीपायी पडून तसे करण्यापासून प्रार्थनापूर्वक परावृत्त केले असते. प.पू. महाराजांनी तरी किती म्हणून कोणाकोणाचे त्रास, दु:खे, समस्या सहन करायच्या?

ह्या सगळ्या प्रसंगाने भक्तवत्सल, भक्ताभिमानी गुरुमाऊली द्रवली आणि ऐका आता स्लॅब संपल्यानंतर श्री वासुदेव निवासात घडलेला तो हृदय हेलावणारा हृदयद्रावक प्रसंग.

प.पू. महाराजांनी मला दार आड करून घेण्यास सांगितले. मी दार बंद केले आणि समोर जरा जवळच येऊन बसलो. प.पू. महाराजांकडे पाहिले. महाराजांचे सारे वात्सल्याचे भाव पूर्ण बदललेले होते. ते रागाने लाल झाल्याारखे वाटत होते. डोळ्यांची बुबुळे रागाने गरागरा फिरत होती. असा रुद्रावतार मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. रागाचा थरकाप त्यांचे चेहऱ्यावर, शरीरावर जाणवत होता. ते रुप पाहून मी अत्यंत भयभीत झालो. मला कळेना काय झाले? आपले तर काही चुकले नाही ना? माझ्याकडे पहात मोठ्या आवाजात ओरडले, ''कशाला आलात तुम्ही इथे? मुंबईला काय कामे नव्हती का तुम्हाला? पैसा मिळत होता, नावलौकिक, मानसन्मान मिळत होता. सर्व काही मुंबईत मिळत होते. उत्कृष्ट कामे करून भरपूर कामे, मुबलक पैसा मिळत होता. आमच्या येथे काय आहे? पैसा नाही तर नाही, उलट गाठीचा पैसा खर्चावा लागतो. मानसन्मान नाहीच पण अपमान मात्र भरपूर मिळतो (होतो). एवढे कष्ट, एवढी मेहनत, जीव ओतून करून, शेवटी हेच पदरी पडणार असेल तर कशाला राहता इथे?''

प.पू. महाराजांचा गळा दाटून आला होता. ते आवंढा गिळत होते. आता मोठ्याने माऊली हंबरडा फोडणार की काय? असे मला वाटले. उपरण्याचा सोगा त्यांनी आपल्या तोंडावर धरून डोळे झांकून घेतले होते. मी पुरता विरघळलो होतो. वाटत होते, प.पू. महाराजांच्या गळ्याला घट्ट मिठी मारावी, आपलाही गळा मोकळा करावा. मी त्यांची पाऊले ओढून कधी हातात घेतली आणि अश्रू ढाळून पादप्रक्षालन कधी व कसे केले, हे माझे मला सुद्धा कळले नाही. मनी भाव उमटले, ''शांत हो श्री गुरुदत्ता, मम चित्ता-शमवी आता''

महाराज खरंच शांत झाले. मी पुढे वाकून त्यांचे चरणावर डोके ठेवले होते आणि महाराज वात्सल्याने माझ्या पाठीवरून हात फिरवत होते. मी मन शांत करून आवरते घेतले. ''यत्किंचितही कोणाच्या वाक् प्रहाराने मला इजा पोहोचलेली नाही. आपला कंठ दाटला, हे पाहून मला असह्य होत आहे. महाराज! मुंबईतच काय, त्रैलोक्यात जे आम्हाला मिळणार नाही, ते सर्व सुख आपल्या चरणाशी मिळत आहे. इतरांकडून मिळणारी वाग्दुषणे आणि अपमान, ही, आपले प्रारब्ध कमी करतात, असे आपणच आम्हांला सांगता ना? त्यात गुरुसेवेत झाला अपमान तर तो आमचे पापनाशकच ठरेल ना? कोणी काही बोलले तर त्याचे आम्हांस खरोखरच काही वाटत नाही. श्री वामन निवासाचे आपण सुपूर्द केलेले काम आमच्याकडून चांगल्या दर्जाचे, कमी खर्चाचे आणि जलद गतीने होवो हीच चरणी प्रार्थना! ही सेवाच आम्हाला, आमचे महत् भाग्याने लाभली आहे.''

पुढे शांत होऊन श्रीगुरुदत्तमहाराज म्हणाले, ''आहे! चांगलं आहे, तुमची भक्ती-भावना, धर्मबुद्धी चांगली आहे. महाराज तुमच्याकडे पाहतील. महाराज तुम्हाला सांभाळतील.''

मी कृतार्थ झालो, धन्य झालो. लागलीच प.पू. महाराजांपुढे साष्टांग नमस्कार घातला. प.पू. महाराज म्हणाले, ''चला निघायचे ना? येता ना? आम्ही तुमच्यासाठीच थांबून राहीलो आहोत.'' श्री. रघुनाथराव तेवढ्यात वर आले. त्यांच्याकडे पाहून महाराज म्हणाले, ''रघुनाथराव आज तुम्हाला सोबत येण्याची आवश्यकता नाही. नागले आहेतच आमच्या सोबत.''

मी लागलीच प.पू. महाराजांचे हातातील गाठोडे माझ्या हाती घेतले व त्यांचे मागोमाग चालू लागलो. आश्रमाबाहेर दोन पावले चालताच रिक्शा मिळाली. प.पू. महाराज आत बसले. सरकून आपले शेजारी बसण्यास मला विनवू लागले. आज रिक्शांत महाराजांशेजारी बसण्याचा माझा पहिलाच प्रसंग होता. मनी संस्कार बिंबलेला, गुरुदेवांचे आसनाच्या समपातळीवर आपण बसू नये. आपले आसन नेहमी खाली असावे. मनी संकोच दाटला. चरणाशी बसण्याचीही आपली पात्रता नाही. सीट खाली बसावे तर रिक्षाभोवती निरोप देणारी १०-१२ मंडळी जमा झालेली. पुन्हा महाराज म्हणाले, ''बसा बसा, प्रवासात संकोच धरू नये.'' मी मध्ये हातातील गाठोडे ठेवले आणि अगदी नाईलाजाने रिक्शाचे अगदी कडेला, महाराजांपासून अंतर ठेवून बसलो. आश्रमापासून महाराजांचे निवास स्थानापर्यंत (श्री रेणुका निवासपर्यंत) रिक्षा भाडे रु. ३.४० होते हे महाराजांना नित्य येण्या-जाण्याने माहीत होते. त्यांनी हातात कनवटीचे पैसे आधीच काढून ठेवले होते. तर मीही रु. ५/- ची नोट काढून ठेवली होतीच.

जाताना पुढील स्लॅब बद्दल महाराज विचारत होते. ''पुढील स्लॅब आता केव्हा होईल?

आणि रक्कम तरी किती लागेल? सिमेंट तर ४०० पोती मोरेश्वर घैसासांनी मिळविल्या आहेत म्हणे. आता लोखंड आणखी लागणार आहे का? तुमचे मुंबईचे नवे काम दसऱ्यापासून सुरू होत आहे ना? आता तुम्हाला जास्त यायला जमणार नाही. अगदी जरुरी असेल तेवढ्यापुरतेच येत चला.'' वगैरे वगैरे.

सर्व प्रश्नांना मी उत्तरे देत होतोच. घर आले, उतरताना महाराज रिक्शावाल्याचे पैसे देऊ लागले, पण तत्पूर्वीच त्यांचे नकळत मी पाचची नोट रिक्शावाल्याच्या हाती सारली होती.

''अहो, आम्ही सुटे पैसे काढून ठेवले होते.'' फाटकात शिरता शिरता त्यांनी ते आमच्या हाती दिले. म्हणाले, ''राहू द्या. जाताना लागतील सुटे पैसे.''

प.पू. महाराज घरात शिरले ते थेट स्वयंपाक घराच्या दाराशी. ''अहो, नागले आले आहेत बरं. सर्व तयार आहे का? त्यांचे पान लागलीच घ्या. सकाळपासून त्यांनी विशेष काही खाल्लेले नाही. फार दमले असतील ते आज. पुन्हा उद्या पहाटेच्या गाडीने मुंबईस जायचं म्हणत आहेत. आज फारच धावपळ झाली आहे त्यांची. लवकर जेवून विश्रांती मिळाली पाहिजे.''

एवढे सांगून आपल्या खोलीतील बैठकीशेजारील जागेवर बोचके ठेवून पुन्हा स्वयंपाक दाराशी आले. ''हे बघा! प्रसाद, आरती किंवा येणाऱ्या बाकी मंडळींची वाट पाहू नका. आधी त्यांचे पान घ्या.''

प.पू. महाराज आपल्या बैठकीवर स्थानापन्न होताच मी हातपाय धुवून येऊन नमस्कार करून आज्ञेने समोर बसलो. महाराजांनी आपली पुढील दौरा व कार्यक्रम सांगण्यास प्रारंभ केला.

''आम्ही दसऱ्याचे दुसरे दिवशी म्हणजे ५ तारखेला येथून निघू. निमकर सोबत येणार आहेतच. प्रथम श्रीगोंदे येथे जाऊ, नंतर नगरला जाऊ. ३-४ दिवस हे जातील, ९-१० तारखेला देऊळगांवला पोहोचू. १२ तारखेला लळीत आहे. १५ तारखेपर्यंत येथे येऊ. दिनांक १६ ला एक दिवस विश्रांती घ्यायला मिळेल. दिनांक १७ ला वाडीला जाऊ. ते मामा देशपांडे आले होते. त्यांनी वाडीला तीळांचा स्वाहाकार याग ७ दिवस करायचा संकल्प केला आहे. त्याची १७ ऑक्टोबर १९८४ ला समाप्ती आहे. आम्हाला खूप आग्रह केला आहे. अहो! त्यांनी २५ क्विंटल काळे तीळ मुंबईहून मागविले आहेत. पाच यज्ञकुंडे होमाची करणार आहेत.''

''हा याग वाडीत व्हावा अशी गुरुमहाराजांची (प.पू. गुळवणी महाराजांची) इच्छा होती. त्यांचे हस्ते आज महाराज करून घेत आहेत, ही फार चांगली गोष्ट आहे. आम्ही समाप्तीचे दिवशी तेथे उपस्थित राहू. नाशिकला २८ ऑक्टोबर ते ५.११.१९८४ पर्यंत श्री

गुरुचरित्र पारायण कार्यक्रम कुलकर्णी यांचे येथे आहे. दोन दिवस आणखी आमचे तेथे जातील. ८ तारखेपर्यंत पुण्यास परत येऊ. पुढे अहमदाबादला परस्पर जावे का बडोद्यास प्रथम जावे हे सर्व रघुनाथराव ठरवितील. १४.११.१९८४ चे रिझर्व्हेशन करावे लागेल हे मात्र निश्चित. तेथून गरुडेश्वरला जायचे आहे. तुम्ही गेला होता का कधी गरुडेश्वरला?''

मी म्हटले, ''नाही, आता आपल्या सोबतच जाण्याचा योग यावा.'' इतक्यात भोजनाचे पान वाढल्याचे बोलावणे आले. ''चला, लवकर बसा आणि सावकाश होऊ द्या.''

मी भोजनास सुरुवात केली. सौ. आईसाहेब शेजारीच बसल्या होत्या. आग्रह कर-करून वाढीत होत्या. नको, नको, एक बास! म्हणेपर्यंत दोन माव्या-रव्याचे लाडू पानात टाकलेच. ''खाल्लेच पाहिजेत.''

बटाटा भजी, भाज्या, कोशिंबीरी अगदी पंचपक्वान्नाचे पान होते. सौ. सवितावहिनीसाहेब सामोशाची तयारी सौ. निमकरवहिनींच्या मार्गदर्शनाखाली करीत होत्या. सौ. आईसाहेबांची घाई चालली होती. मला ते खायला मिळाले पाहिजे म्हणून त्यांनी दोन सामोसे आधी तळायला लावले. इतक्यात महाराज स्वयंपाक घराच्या दाराशी उभे. ''सावकाश, शांतपणे होऊ द्या. संकोच करू नका. अहो, प्रसादाचे लाडू वाढले का त्यांना? भात त्यांना जास्त नाही ना झाला? त्यांना पोळी खायची सवय असेल.'' मी म्हटले, ''आहे, सर्व काही व्यवस्थित आणि भरपूर वाढले आहे.''

भोजन आटोपल्यानंतर मी प.पू. महाराजांचा निरोप घ्यायला गेलो. नमस्कार घातला.

''या, या. आता २० दिवसांनंतर दुसरा स्लॅब होणार. तेव्हा मध्ये येण्याची घाई करू नका. ते नंदू सुपरवायझर आहेतच.''

मी म्हटले, दसऱ्याला सोने देण्याकरता आणि आपले दर्शन घेण्याकरता येणार आहोत. पुन्हा आपले लवकर दर्शन होणार नाही.

''श्रीं'' - नको, नको अजिबात येऊ नका. अहो, तुमचे बरेच दिवसानंतर आता काम सुरू होणार. दसऱ्याला मुहूर्त म्हणजे तेथेही वेळ जाणार. दर्शन काय नेहमीचेच आहे. आता तुम्ही तुमच्या कामात लक्ष घाला. बरं. नका येऊ दसऱ्याला.

मी म्हटले, जशी आपली आज्ञा. येतो मी.

१२७) गुजराथ-सौराष्ट्र दौऱ्याचा संकल्प!

दि. ४.१०.१९८४, विजया दशमी. मी माझ्या कामावर बोरीवली येथील कामाचा सकाळी मुहूर्त केला व पुढील पीटस्‌ची खोदाईची लाईन आऊट करून, पुढील ४-५ दिवस काम

माझ्या गैरहजेरीत चालू राहील, अशी व्यवस्था करून दुपारी भोजनोत्तर पुण्यास निघालो. प.पू. महाराजांच्या श्री रेणुका निवासाचे प्लॅन पास होताच काम चालू करायचे होते. म्हणून मी ''श्रीं''ची परवानगी नसताना दर्शनास अधीर होऊन दुपारी निघून रात्री श्री रेणुका निवासाला पोहोचलो. आमचे एक परम स्नेही गुरुभक्त श्री. शुक्लाजी साहेब यांना कळले हाते की प.पू. महाराजांचा ऑक्टोबर १९८४ मध्ये बडोद्याहून गुजराथ दौरा होणार आहे. गेल्या गुरुपौर्णिमेपूर्वीच ''श्री'' व इतर गुरुभक्त मंडळींना घेऊन गुजराथ व सौराष्ट्रांतील धार्मिक स्थळांना भेट द्यायची अशी इच्छा श्री. शुक्लाजी यांनी ''श्रीं''जवळ प्रगट केली होती व ''पुढे पाहूं'' असे ''श्री'' म्हणाले होते. ह्यावेळी ते या महिन्यात बडोद्यास जाणार आहेत कळल्यानंतर श्री. शुक्लाजी यांनी ''श्रीं''ना निरोप दिला होता की याच गुजराथ दौऱ्याला धरून आपल्याला आपला नियोजित कार्यक्रम पार पाडता येईल का? हे विचारण्यास सांगितले होते. मी रात्री घरी पोहोचलो. दर्शन घेतले. ''शेवटी आलेतच का तुम्ही?'' असे ''श्रीं''नी मिस्कील हसत विचारले. मी पुन्हा प्रणाम केला. शुक्लाजींचा निरोप सांगितला. परंतु ह्यावेळी तो पुढील कार्यक्रम जमणार नाही, असे ''श्रीं''चे म्हणण्यात आले.

''श्री'' म्हणाले, ''गरुडेश्वरला तीन दिवस प्रवचने ठरली आहेत. पुन्हा नंतर बडोद्यास आसपासच्या भागात अहमदाबादला इत्यादी ठिकाणी जायचे आहे. श्री वामन निवासाच्या कामासाठी काही मंडळींना भेटायचे आहे.''

मी विचारले, ''आम्ही येऊ का उद्याच्या प्रवासात आपल्या बरोबर?''

''श्री'' फिरकी घेत म्हणाले, ''अहो! तुम्ही तुमच्या घरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेतली आहे का? त्यांची गैरसोय तर होणार नाही ना? ते निमकर आहेत आमच्या बरोबर.''

१६ ऑक्टोबरला ''श्रीं''चे जालन्याहून पुण्याला आगमन झाले. प्रवासाचा शीण आल्याने ''श्रीं''ना किंचित ताप, सर्दी, खोकला होता. दि. १७ ला मी, श्री. शुक्लाजी, श्री. मुकावार व म्हसवडकर तसेच इतर काही मंडळी सकाळी ९.३० वाजता ''श्रीं''च्या घरी पोहोचलो. ''श्रीं''चे आन्हिक, संध्यादी चालू होते. रात्री पुन्हा वाडीला सह्याद्री एक्सप्रेसने प.पू. महाराज, श्री. रघुनाथरावांना सोबत घेऊन निघणार होते. पुढील महिन्यात ''श्री'' गुजराथच्या दौऱ्यावर जाणार आहेत हे समजल्यावर पुन्हा एकदा आपल्या नियोजित गुजराथ-सौराष्ट्र दौऱ्याची आठवण करून देण्यासाठी खास श्री. शुक्लाजी साहेब आमच्या सोबत आले होते. संध्या आटोपल्यानंतर ''श्रीं''नी सर्वांस आत बोलाविले. श्री. शुक्लाजींनी अत्यंत विनयाने ''श्रीं''ना मागल्या गोष्टींची आठवण करून दिली. त्यावर ''श्रीं'' म्हणाले, ''या खेपेस आम्ही फक्त श्री वामन निवासाच्या निधी जमविण्यासंबंधी बोलणी करण्यासाठी तिथल्या मंडळींना

भेटण्यासाठी जात आहोत, पुढे कधी तरी पश्चिमेची यात्रा आम्हाला स्वतंत्रपणे तुम्ही ठरविल्याप्रमाणे करायची आहे.''

श्री. शुक्लाजी - परत आपल्याला सवड कधी असेल?

''श्रीं'' - मार्चच्या सुरुवातीस किंवा एप्रिल म्हणजे चैत्री अमावास्येनंतर. पण एप्रिलमध्ये उन्हाळा फार असतो. त्यामुळे त्रास होईल.

श्री. गोडसे - जर अकलुजचा कार्यक्रम अजून निश्चित झाला नसेल तर आपण पश्चिमेचा कार्यक्रम मार्चच्या सुरुवातीला करायला हरकत नाही.

''श्रीं'' - दि. २० ते २७ फेब्रुवारी डोंबिवलीत कार्य आहे. ते झाल्यावर तसेच आम्ही मुंबईला येऊ व तिथून पुढे पश्चिमेला जाऊ. मार्च महिना चांगला. फार थंडी नाही, फार ऊन नाही. (इथे ''श्रीं''नी पंचांग बघून तारीख दिली.)

श्री. गोडसे - मग आपण असेच करू. डोंबिवलीचा कार्यक्रम आटोपून आपण मुंबईला याल, तिथून आपण गुजराथेत जाऊ. मग आम्ही बस ठरविणे, इतर माहीती काढणे, इत्यादी व्यवस्थेला आता पासूनच लागतो.

''श्रीं'' - हो, काही हरकत नाही, म्हणजे आता घाईघाईत यायची गरज नाही!

आम्ही सर्व मुंबईस परतलो. श्री वामन निवास करता ''श्रीं''ना दौरे करावे लागतात हे श्री. शुक्लाजींच्या लक्षात आले. त्यांनी गोरेगांवी पोहोचताच मला घरी बोलाविले. दुसऱ्या दिवशी मी शुक्लाजींकडे गेलो तर त्यांनी लागलीच 'श्री वामन निवास' बांधकामास देणगी रु. १० हजार चेकने दिली. मी पुण्यास गेलो व २१.१०.१९८४ रोजी राहीलेला अर्धा स्लॅब पूर्ण करून घेतला. खालून बांधकाम सुरू करण्याची तयारी केली.

१२८) श्री. शुक्लाजी ''श्रीं''कडे कसे आले!

हे श्री. जी.आर. शुक्लाजी कोण व कसे प.पू. महाराजांकडे आले ही एक योगायोगाची पण मनोरंजक गोष्ट आहे. ती अशी -

''श्रीं''चे देऊळगांवराजाहून मुंबईस दि. ८ एप्रिल १९८१ रोजी बुधवारी सकाळी ८.३० वाजता आगमन होणार. आम्ही त्यांना उतरवून घेण्यास सायनला जाणार, तेथून श्री. माधवराव तांबोळी (सुलभाताईंकडे) माटुंग्याला महाराजांना पोहोचविणार आणि एक दिवस विश्रांती घेऊन दि. १०.४.१९८१, शुक्रवारी पहाटे ५.०० वाजता आम्ही त्यांना व सौ. आईसाहेब, सौ. वहिनीसाहेब यांच्यासह हरेश्वरी निघणार असा कार्यक्रम निश्चित झाला होता. आमचे धाकटे चिरंजीव अभिजीत प्रज्ञाबोधिनी शाळेत सिनीयर के.जी.च्या वर्गात

शिकत होते. के.जी.ला असल्यामुळे त्यांच्या त्यावेळी येणाऱ्या वार्षिक परीक्षेचे आम्ही फारसे मनावर घेतले नाही. तरीपण हेडमास्तरांची परवानगी घेतलेली बरी, कारण त्याचा शेवटचा पेपर दि. १०.४.१९८१ लाच होता. मी हेडसरांना जाऊन भेटलो. त्यावर ते म्हणाले, ''ही वार्षिक परीक्षा असल्यामुळे शेवटच्या पेपरला गैरहजर राहून चालणार नाही. तो नापास होऊन वर्ष फुकट जाईल. जरूर तर तुम्ही प्रिन्सीपॉल साहेबांना भेटा.''

मी प्रिन्सीपॉलसाहेब श्री. त्रिवेदी यांना भेटलो. त्यांना सुद्धा नियमा विरुद्ध जाणे शक्य नव्हते. परंतु त्यांनी सुपरीन्टेडेन्ट यांना डायरेक्ट जाऊन भेटण्याची विनंती केली व ते कनवाळू आहेत, तशीच अडचण असेल तर मदत करतील. परीक्षेत गैरहजेरी ही त्यांचे कक्षेत येते. त्यांचा निर्णय शाळेत ग्राह्यच धरला जातो. त्यातूनही गरज पडल्यास मला बोलवा, मी समजावण्याचा प्रयत्न करीन! असे म्हणाले.. त्याप्रमाणे वरच्या मजल्यावरील खास केबिनमध्ये मी जरा घाबरतच परवानगीने प्रवेश केला. माझी अडचण त्यांना सांगितली. अत्यंत महत्त्वाचा धार्मिक कार्यक्रम, पूजा वगैरे आमच्या गांवच्या घरी असल्याचे सांगितले. प्रथम त्यांनी शालेय जीवन-विद्यार्थी व पालकांचे कर्तव्य टाळू नये, ते ईश्वरसेवेइतकेच महत्त्वाचे आहे असे म्हणून नाकारले. मी अगदीच गयावया केल्यानंतर ''तुम्ही मला प्रामाणिकपणे खरे खरे कारण सांगा! तर मी काही विचार करू शकेन.''

मी म्हटले, ''सर! माझ्या घरी एक महान सत्पुरुष येणार आहेत. आम्हा उभयतांना त्यांचे स्वागतास जाणे अपरिहार्य आहे आणि ह्या आमच्या बाळाला एकट्याला आम्ही कुठे ठेवणार?''

श्री. शुक्लाजींनी विचारले, ''कोण सत्पुरुष येणार आहेत? कोण, कुठले, थोडी माहीती सांगाल?''

मी म्हटले, ''श्रीदत्त सांप्रदायांतील अधिकारी सत्पुरुष योगीराज गुळवणी महाराज पुण्यात होऊन गेले, त्यांचे उत्तराधिकारी प.पू. विद्यावाचस्पती, ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर आमच्या घरी हरिहरेश्वर येथे येणार आहेत!''

श्री. शुक्लाजी - ''ह्यांची परंपरा कोणती आहे?''

मी - आपल्याला प.पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज माहीत आहेत का?

श्री. शुक्लाजी - अरे! ते गरुडेश्वरी ज्यांची समाधी आहे ते तर नाहीत?

मी - होय तेच, श्री वासुदेवानंद टेंबे स्वामी आमच्या श्री. वामनरावजी गुळवणी महाराजांचे सद्गुरु आणि प.पू. दत्तमहाराज कवीश्वरांचे सद्गुरु गुळवणी महाराज.

हे ऐकल्यानंतर श्री. शुक्लाजी आपले आसन सोडून उभेच राहीले व म्हणाले, ''मग श्री. रंगावधूत स्वामी महाराज गुळवणी महाराजांचे गुरुबंधूच झाले.'' असे म्हणत त्यांनी

जमिनीला हात लावून मला हात जोडले व म्हणाले, ''आपण परम भाग्यवान आहात! अशा थोर पुरुषांचा आपल्याला सहवास घडत आहे. हे महाराजही योगदीक्षा देत असणार!''

मी होय म्हटले. लागलीच शुक्लाजी म्हणाले, ''शक्य होत असेल तर कृपया पुण्यास मला प.पू. दत्तमहाराजांकडे घेऊन चला. आपण आपल्या वेळाप्रमाणे केव्हा जायचे ते मला सांगा, त्याप्रमाणे मी येईन.''

अर्थात अभिजीतला शेवटच्या एका पेपरला न बसण्याची अनुमती मिळाली. फक्त त्याचे प्रगतीपुस्तकावर ''वरच्या वर्गात घातला'' एवढा शेरा पडला इतकेच.

हरेश्वरचा कार्यक्रम संपल्यानंतर मी श्री. शुक्लाजी साहेबांना भेटलो. एके दिवशी ते माझ्या सोबत पुण्यास श्री वासुदेव निवासात आले. मी ''श्रीं''शी त्यांचा परिचय करून दिला. तेव्हापासून ते ''श्रीं''शी संलग्न झाले ते कायमचेच. नंतर ते स्वत:हून कधी आश्रमात तर कधी घरी जाऊ लागले.

ते स्वत: गुजराथी भाषिक होते. माझ्याजवळ त्यांचे वरील संवाद हिंदीतूनच झाले. ''श्रीं''शीही त्यांच्या गुप्त भेटी, गुप्त चर्चा अध्यात्मावर व्हायच्या. त्याही हिंदीतूनच. शुक्लाजी अत्यंत विद्वान, समंजस, अत्यंत शिस्तप्रिय, वक्तशीर वागणारे, वावगे सहन न होणार, स्पष्टवक्ते तसेच दयाळू-कनवाळू, त्यांची आध्यात्मिक बैठक उत्तम होती. त्यांचा योगदीक्षेचा योग त्यांना प.पू. दत्तमहाराजांच्या कृपेतूनच झाला.



१२९) ''श्रीं''चे बडोद्यास प्रयाण व पत्र!

दि. ८.११.१९८४, गुरुवार, त्रिपुरी पौर्णिमा. ''श्रीं''च्या घरी आज कुळधर्म होता. मला, शृंगारपुरे, मुजुमदार, घोलकर आणि म्हसवडकरना प्रसाद भोजनास बोलाविले होते. ''श्रीं''च्या आज्ञेनुसार आम्ही आलेल्या मुंबईकर मंडळींनी आश्रमातील देवांच्या गाभाऱ्यासमोर १०८ निरांजने लावून दिगंबराची धून केली. नंतर ''श्रीं''चे त्रिपुरी पौर्णिमा या दिवसाचे महात्म्यावर पाऊण तास प्रवचन झाले. साधना कशी हवी, साधायचं काय आहे, अभ्यास कसा ठेवायचा ह्यावर ''श्रीं''नी श्रवणीय बोधक विवेचन केले.

बडोद्यास दौऱ्यावर जाण्यापूर्वी मुंबईकरांच्या प्रार्थनेप्रमाण ३ दिवस आधी मुंबईस येऊन सर्वांस सहवास देण्याचे कबूल करून ''श्री'' पुण्याहून मुंबईस श्री. नंदकुमार शृंगारपुरे यांच्या गाडीने आले. मी, गोडसे आम्हीही गाडीमध्ये सोबत होतो. आश्रमात प्रसाद भोजन झाल्यावर विश्रांती घेऊन तीनच्या सुमारास आम्ही आश्रमातून निघालो. सायंकाळी ७ च्या सुमारास आम्ही माटुंग्यास तांबोळींकडे पोहोचलो. ''श्री'' आल्यापासून रात्री नऊ पर्यंत दर्शनार्थी

भक्तांची गर्दी होती.

दि. १२.११.१९८४ ला ''श्रीं''ची पाद्यपूजा श्री. भाऊसाहेब व प्रभा शृंगारपुरे यांच्या घरी चेंबूरला झाली. नंतर ''श्रीं''ना पुन्हा तांबोळींकडे सोडायचे होते. ''श्रीं''ना विश्रांती मिळावी म्हणून लवकर निघायचे होते. मला म्हणाले, ''तुम्हीही जेवून घ्या. तुम्हाला काही संकष्टी नसते.'' आम्ही कोणतेच उपास करत नाही ते ''श्रीं''च्या बरोबर लक्षात होते.

दि. १४ ला प.पू. महाराज बॉम्बे सेंट्रलहून रात्री १०.४० बडोदा एक्सप्रेसने श्री. रघुनाथरावांच्या सोबतीने बडोद्यास गेले.

दि. २१ तारखेस प.पू. महाराज नडीयादला गेले व तेथून दि. २५ ला अहमदाबादला आले. अहमदाबादहून त्यांनी मला २६.११.१९८४ ला पत्र पाठविले ते खालीलप्रमाणे,

॥ श्रीदत्त ॥

अहमदाबाद, फोन नं. ५४१४०

दि. २६.११.१९८४

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आम्ही बडोद्याहून २१ तारखेला नडीयादला येऊन, तेथून काल सायंकाळी येथे आलो. येथे ३ तारखेपर्यंत मुक्काम आहे. ४ तारखेस रात्री गुजराथ मेलने निघून, ५ तारखेस पहाटे बोरीवलीस थांबून, तेथून भोजनोत्तर निघून २/३ वाजेपर्यंत माटुंग्यास येण्याचा विचार आहे. नंतर लगेच श्री. शृंगारपुरे यांच्या गाडीतून निघून पुण्यास मुक्कामास जाणे होईल. म्हणजे तेथे मध्ये एक दिवस विश्रांती मिळेल. ७ तारखेस श्रीदत्त जयंती आहे. डोंबिवलीस २८ फेब्रुवारीपर्यंत भागवत सप्ताहकार्य आटोपेल. नंतर लगेच १-२ दिवसात सोमनाथ, द्वारका यात्रेस निघता येईल काय? ९ मार्च पर्यंत बडोद्यास, सर्व यात्रा संपवून येणे होईल काय? याचा विचार श्री. शुक्लाजींचे बरोबर करावा. कारण बडोद्यास १० मार्चपासून श्री भागवत सप्ताह व्हावा, तो करून पुण्याकडे जावे म्हणजे पुन्हा येण्याचा त्रास नको, असे परवा बडोद्याचे मंडळींचे म्हणणे दिसले. ९ मार्चपर्यंत सर्व यात्रा आटोपल्यास आम्ही बडोद्यास थांबू. आपण सर्वांनी मुंबईस परत जावे. आम्ही सप्ताह आटोपून पाडव्यापर्यंत पुण्यास परत जाऊ. तरी विचार व्हावा. काय ठरेल ते पुण्यास कळवावे. तसेच श्री. रघुनाथराव व त्यांची मंडळी यात्रेस येतील, तरी आम्ही दोघे व ते दोघे अशा चार मंडळींचा प्रवास खर्च काय होईल, याचा अंदाजही कळवावा. धार्मिक खर्चाचे पहाता येईल. सर्वांस यथोचित नमस्कार, आशीर्वाद.

कळावे,

आपला

दत्तात्रेय कवीश्वर

१३०) गुजराथ-सौराष्ट्र दौरा!

प.पू. महाराजांचे वरील पत्राप्रमाणे श्री. शुक्लाजी यांना त्यांच्या घरी जाऊन भेटलो. ते आमच्या राहत्या 'अभिषेक' इमारतीपासून दोन इमारती सोडून जवळच राहतात. त्यांचे जाणे येणे गुजराथ मध्ये नेहमीचे असल्याने प्रवासास प्रारंभ कोठून करावा, क्रमवार तीर्थस्थळे, धार्मिक स्थळे कशी दर्शनास, वास्तव्यास घ्यावीत याचा संपूर्ण आराखडा तारखा, वेळांप्रमाणे तयार करून ''श्रीं''च्या मंजुरीकरिता आम्ही पुण्यास जाऊन आलो. श्री. गोडसे यांनी तो ठरलेला कार्यक्रम जसाच्या तसा टाईप करून घेतला. त्याच्या अनेक प्रती सर्व येणाऱ्या मंडळीस देण्यास काढल्या. हा गुजराथ टूर प्रोग्राम दि. ८.३.१९८५ ते २१.३.१९८५ असा ठरला.

प्रथम हा कार्यक्रम दि. २८ फेब्रुवारीला रात्री बडोदा एक्सप्रेसने निघायचे असा ठरला होता. नंतर श्री. रघुनाथराव व श्री गजानन आश्रम स्वामी महाराज यांच्या पत्रानुसार व म्हणण्यानुसार रहित केला गेला.

श्री. शुक्लाजींचा वक्तशीरपणा आणि गुरुभाव असा की लागलीच ''श्रीं''च्या बरोबर किती माणसे येणार त्याची यादी घेऊन ते गुजराथ-सौराष्ट्र दौऱ्यावर गेले.

बडोद्यापासून गरुडेश्वर, नारेश्वर, डाकोर असे क्रमवार ज्या ठिकाणी ''श्रीं''ना घेऊन जायचे आहे त्या त्या ठिकाणी पूर्व तयारी करीता स्वत: जातीने गेले. तसे तेही वयाने सत्तरीचे पुढेच होते. प्रत्येक ठिकाणी जाऊन ''श्रीं''सह सर्वांची राहण्याची, उतरण्याची, संडास-बाथरुमसह क्षेत्राच्या धर्मशाळेत ''श्रीं''चे स्वयंपाक पाण्याची सोय, भक्त मंडळींची सोय हे सर्व पाहून आले. सोय नसेल तेथे खाजगी लॉजिंग पाहिली. प्रत्येक ठिकाणी पैसे भरून रिझर्व्हेशन केले. आम्ही ''श्रीं''सह जवळ जवळ १५ ते १६ जण होतो. सर्व कार्यक्रम तारीख-वार-वेळ-स्थळांसह येणाऱ्या माणसांसह नक्की झाला.

४ डिसेंबर १९८४ रोजी पहाटे ५.३० वाजता ''श्रीं''चे बोरीवली स्टेशनवर आगमन झाले. गुजराथ दौरा संपवून ते परतले होते. पण येताना मार्च महिन्याच्या १० तारखेपासून बडोद्यास भागवत सप्ताह करण्याचे कबूल करून आले. दि. २६.११.१९८४ च्या पत्रात ''श्रीं''नी भागवत सप्ताह बडोदेकर मंडळींचे आग्रहास्तव ठरवित असल्याचे लिहीले आहेच. शिवाय शुक्लाजींबरोबर गुजराथ-सौराष्ट्र दौऱ्याची समाप्ती ९ मार्च १९८५ रोजी बडोद्यास होईल का हे देखील पाहण्यास सांगितले आहे. ''श्रीं''चे सत्कारास स्टेशनवर आम्ही गुरुबंधू उपस्थित होतो. तेथून प.पू. महाराज डॉ. जोशी यांच्या घरी गेले. श्री. जोशींकडे भोजन आटोपून ''श्रीं'' काही ठिकाणी भेटी देऊन ४ वाजता आले. तासाभरात श्री. नंदू शृंगारपुरे यांच्या गाडीने पुण्यास रवाना झाले.

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात ''श्रीं''चे छोटेसे प्रोस्टेट ग्लँडचे ऑपरेशन करावे लागले. शस्त्रक्रियेला प.पू. महाराज तयार नव्हते. त्यातून बाहेरचे रक्त शरीरात भरण्यास त्यांची सक्त मनाईच होती. डॉ. सरदेसाईंचे म्हणणे होते की, आताच ग्लँडची वाढ होण्याची सुरुवात आहे, आता लगेच केले तर पुढचा त्रास वाचेल. शेवटी कुटुंबीय आणि भक्तमंडळींच्या इच्छेनुसार ते तयार झाले. दि. २६ डिसेंबर विनायकीचा उपवास होता. दुसऱ्या दिवशी पंचांग पाहून गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास ''श्रीं''नी ऑपरेशनला परवानगी दिली. आदल्या दिवशीचे पारणे दुसऱ्या दिवशी करावे तर डॉक्टरनी काही खायचे नाही सांगितले. ऑपरेशन नंतर पुढील दोन दिवस संध्या आन्हिक थांबले म्हणून ''श्रीं''नी काही खाल्लेही नाही. रविवारी, दि. ३० ला सकाळी ''श्रीं'' घरी आले. त्या दिवशी शाकंभरी नवरात्र सुरू होत होती. प्रकृती नाजूक झाली. डॉक्टर सरदेसाई यांनी पूर्ण विश्रांती घ्यायचा सल्ला दिला पण, 'श्री वामन निवासासाठी निधी जमविणे अत्यावश्यक असल्याने दौरे बंद करून कसे चालेल? ''श्रीं''चे दौरे ऑपरेशन नंतर १५ दिवसांतच पुन्हा सुरू झाले.

१३१) दौरा रहित करण्याबद्दल श्री. रघुनाथराव व श्री गजानन आश्रम स्वामी महाराजांचे पत्र!

श्री. रघुनाथरावांचे १५.१.१९८५ चे पत्र आले. पत्र असे,

दि. १५.१.१९८५

प्रिय श्री. नागले साहेब,

सोबतचा अत्यंत जरूरीचा अहवाल (डॉ. सरदेसाई यांचा) जोडला आहे. जरूर ती कारवाई आपल्या हस्ते होईल असे वाटते. विलंब न लावता आपण पत्राचा आशय तेवढा सर्व संबंधीत भक्तांच्या नजरेस आणावा. कोणाकडे पत्र न देता, पत्र स्वत:जवळच ठेवावे, ही विनंती.

कळावे,

आपला

रघुनाथराव

---**---

डॉ. ह.वि. सरदेसाई यांचा अहवाल त्यांनी पत्रासोबत जोडला आहे तो पुढीलप्रमाणे-

दिनांक १५.१.१९८५

Earnest Submission

After the operation undertaken on 28th with Dr. H.V. Sardesai had suggested that poojya Shri Maharaj be examined before leaving Pune on tour today. On Examination Dr's observaton and suggestions are :

दगदग फार झाली आहे. अशक्तपणा फार आहे. अशक्तपणावर गोळ्या दिल्या आहेत. कार्यक्रम आखताना काळजी इतरांनी, म्हणजे कार्यक्रम आखणाऱ्यांनी घ्यावयाची. प्रत्येक प्रवासानंतर आठ दिवसांची विश्रांती पाहिजे. म्हणजे एकाच ठिकाणी रहाणे झाले पाहिजे. नंतर परत यावयाचे. प्रवासानंतर प्रवास जोडून, तसेच फिरणे वाढवत जाणे इष्ट नाही. कारण प्रवासामुळे बदलत्या वातावरणाशी प्रकृती समरस होऊ शकत नाही.

दिनचर्येत नियमीतपणा (विश्रांतीचे बाबतीत) आवश्यक आहे. दगदग होता कामा नये.

(ह.वि. सरदेसाई)

- रघुनाथ कुलकर्णी

---**---

याचबरोबर हैद्राबादहून दि. २०.१.१९८५ ला पाठविलेले प.प. गजानन आश्रम स्वामी महाराजांच्या पत्राचा ''श्रीं''चे बाबतचा आशय पुढे देत आहे,

''दि. १६ ला सकाळी ब्रह्मर्षी दत्तमहाराज यांच्या घरी मुद्दाम मी जाऊन त्यांची प्रकृती पाहिली. निंभोरे, ता. माठे, येथे जाण्याचे पूर्वीच ठरल्यामुळे त्यांच्या प्रवासास प्रतिबंध केला नाही. त्यांची प्रकृती क्षीण झालेली आहे. डॉ. सरदेसाई यांना प्रवासाची परवानगी विचारल्यावर अनिवार्य असेल तर त्यांनी एखादा दिवस प्रवास, विश्रांती, प्रवास असे करण्यास नाईलाजाने परवानगी दिल्याचे कळले. म्हणून यापुढे महाराजांचा प्रवास व कार्यक्रम कमी करण्याकडे भक्तांची प्रवृत्ती असावी. त्या संबंधात डोंबिवलीचा सप्ताहाचा आणि उत्तरेतील द्वारका, प्रभास पाटण, मथुरा, गिरनार वगैरे प्रवासाचा ताण त्यांना सहन होईल की नाही, शंका वाटते. म्हणून तो रहित होईल असा आवर्जून प्रयत्न करावा. आपणा सर्वांना त्यांच्या बरोबरच्या तीर्थयात्रेच्या आनंदापेक्षा त्यांचे स्वास्थ्य उत्तम असल्याचे पाहण्यात अधिक समाधान नाही का? असे असताना देखील वाडीच्या राजारामने ठरविलेल्या महाराजांच्या रामेश्वर यात्रेस (फाल्गुन महिन्यात) मी मात्र मान्यता दिली आहे कारण महाराजांची काशीयात्रा झाली. तेथील गंगा

रामेश्वरला अर्पण करणे आणि रामेश्वरचा सेतु पुन्हा गंगेत अर्पण करण्यानेच त्यांनी सुरू केलेली यात्रा पूर्ण होणार आहे. तो अपूर्ण ठेवून इतर यात्रांना प्राधान्य देऊन करणे योग्य नाही.''

करिता डोंबिवलीचे श्री. देखणे आणि श्री. तांबोळी यांना सांगून दोन्ही कार्यक्रम रहित केल्यास महाराजांना अनायासे विश्रांती मिळणार आहे. ''लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो'' अशी म्हण आहे. त्यांच्या स्वास्थ्यासाठी आपण सर्वांनी आपल्या प्राणांची कुर्बानी करण्याची तयारी करणे हीच खरी गुरुसेवा आहे. चमडी व दमडी सांभाळून श्री गुरुसेवा अंतिम साध्य करून देणारी ठरत नसते. बडोद्याच्या गृहस्थांना भेटून, तीर्थयात्रेचा प्रवासाचा ताण महाराजांना के वळ तुमच्या इच्छेसाठी देऊ नये असे आवर्जून सांगावे. या प्रवासाच्या खर्चाची रक्कम सर्वांनी श्री. वामन निवासाकडे सुपूर्त करण्याने महाराजांना खरा आनंद मिळेल असे मला वाटते. श्री वामन निवासाची पूर्तता हेच आता त्यांचे अखेरचे ध्येय आहे. ते साध्य होताच १-२ वर्षांत त्यांना या सर्व व्यापातून मुक्त होऊन नृसिंहवाडीस अखेरचा काल घालवावा असा त्यांचा मानस आहे. त्याच्याकरीता सर्वांनी प्रयत्नशील असणे सध्या आवश्यक आहे. द्वारका यात्रेला येणारा खर्च वामन निवासाकडे सुपूर्त करण्याइतका मनाचा मोठेपणा मात्र पाहिजे. एषणा ठेवून अथवा एषणापूर्तीसाठी गुरुसेवेचे आमिष जगापुढे ठेवण्यात शिष्यांचीच हानी आहे. एक सुचवावेसे वाटते... पुण्यास होणाऱ्या हेलपाट्यांची रक्कमही थोडीफार श्री वामन निवासास अर्पण करावी, दत्तमहाराजांचे प्रवासाचे कष्ट कमी करता येतील, वगैरे वगैरे.

- श्री गजानन आश्रम स्वामी

१३२) ''श्रीं'' आमच्यावर रागावले!

ही आलेली पत्रे व शिवाय रघुनाथरावांचा निरोप हे पाहून मी श्री. शुक्लाजींना भेटून सर्व परिस्थिती समजावून सांगितली. श्री. निमकरांबरोबर स्वामी महाराज खास मुंबईस हा कार्यक्रम रद्द करण्यास आले होते. श्री. शुक्लाजी अत्यंत समजदार आणि प.पू. महाराजांच्या बाबतीत तर ते ''श्रीं''ची अत्यंत काळजी घेणारे. मला म्हणाले, ''नागले, महाराजांच्या प्रकृती स्वास्थ्याकरीता आपण काहीही करू, मी महाराजांना पत्र पाठवून कळवितो की आपले प्रकृती स्वास्थ्य आम्हांस या दौऱ्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. हा दौरा आपली प्रकृती सुधारल्यानंतर केव्हाही करता येईल.''

त्याप्रमाणे श्री. शुक्लाजींनी प.पू. महाराजांना सविनय प्रार्थना करून तसे पत्र पाठविले.

दि. ७.२.१९८५ रोजी सायंकाळी मी प.पू. महाराजांच्या दर्शनास व दौरा पुढे ढकलला असल्याचे कथन करण्यास आलो. प.पू. महाराज नुकतेच सायंकाळी आश्रमांतून आले

होते. हातपाय धुवून खोलीतील आपल्या बैठकीवर स्थानापन्न होत होते आणि तेवढ्यात मी दर्शनास समोर लोटांगण घातले. माझ्याकडे पहाताच गंभीर झाले. आज महाराज हसतमुख प्रसन्नचित्त नव्हते.

रागातच मला म्हणाले, ''काय तुम्ही आमच्या प्रकृतीचे कारण सांगून शुक्लाजींना भेटून गुजराथ दौरा रहित केलात?''

मी - होय महाराज! रघुनाथरावांचे आपली प्रकृती ठीक नसल्याचे पत्र व डॉ. सरदेसाई यांनी प्रवास न करण्याबद्दल दिलेला अहवालही त्यांनी पाठविला होता ते सांगितले. शिवाय श्री गजानन आश्रम स्वामी महाराजांचेही दौरा रहित करण्याबद्दल आम्हांस पत्र आले आहे. श्री स्वामी तेवढ्याकरीता निमकरांबरोबर मुंबईस आले. आम्हांस भेटीस बोलावून त्यांनी हा दौरा रहित करण्यास सांगितले.

''श्रीं'' - (रागाने) अहो पण तुम्ही आम्हाला तत्पूर्वी विचारलेत का? का नाही तुम्ही आमच्याशी संपर्क साधला? ज्या शुक्लाजींनी श्री वामन निवाससाठी रु.१०,०००/- ची देणगी दिली, त्यांनी हा कार्यक्रम आमच्याशी विचारणा करूनच ठरविला. इतकेच नाही तर आमच्या आणि भक्तमंडळींच्या सोयीकरीता संपूर्ण गुजराथ, सौराष्ट्रचा दौरा करून ठिकठिकाणी जाऊन धर्मशाळा, लॉजिंग वगैरेची व्यवस्था पैसे खर्चून आरक्षणे करून ते आले. बसच्या प्रवासाची सोय नक्की करून आले, त्यांच्या मनाचा काही विचार केला? काय वाटले असेल त्यांना? याचा तुम्ही विचार केलात का? सप्ताह ठेवला की आम्ही जातोच ना निधी जमा करण्यासाठी? मग त्यांच्या विनंतीला मान का देऊ नये? आणि जरी आम्ही या गुजराथ दौऱ्यावर गेलो नाही तर येथे आम्हाला कोण स्वस्थ बसू देणार आहे? आम्ही मोकळे आहोत पाहिल्यावर दुसरीकडचे कुठले तरी आमंत्रण येणारच. मग आम्ही तिकडे जाऊच ना? स्वामी एकीकडे तुम्हाला सांगतात सौराष्ट्रचा दौरा रद्द करा, दुसरीकडे राजाराममार्फत आम्हाला रामेश्वरला चलण्याचा आग्रह धरत आहेत. आम्हाला काय म्हणायचे आहे ते कोणी लक्षात घेत नाही. आम्हाला भेटून विचारत नाही. आम्ही सोमवारी ४ तारखेला निमकरांबरोबर तातडीने शुक्लाजींना पाठविलेला निरोप मिळाला का नाही?

मी - नाही महाराज, त्यांनीच तर आम्हांस आज आपणास भेटून, 'दौरा पुढे केव्हातरी करू' असे सांगण्यास सांगितले.

मी ''श्रीं''च्या पुढे साष्टांग नमस्कार घालून माझी चूक मान्य करून क्षमायाचना केली व म्हटले, ''मी आपणास समक्ष भेटूनच शुक्लाजींशी ठरवायला हवे होते.''

''श्री'' म्हणाले, ''मग आता असे करा, लागलीच येथून फोन करून त्यांना ठरलेला गुजराथ दौरा व आखलेला कार्यक्रम कायम आहे म्हणून सांगा. त्यांनी सर्व ठिकाणी तसे

कळविले असेल की काय ते कळायला मार्ग नाही. त्याबद्दलही आम्हांस कळवा. मुंबईस श्री. शुक्लाजींना भेटून ठरल्याप्रमाणे कार्यक्रम होणार आहे ना हे आम्हांस त्वरीत कळवा.''

श्री. शुक्लाजींना लागलीच फोन करून तसे कळविले. ते भावनगरला त्यांच्या गावी जायला निघाले होते. ''पुढील सर्व व्यवस्था ठरल्याप्रमाणे फोन करून सर्व ठाकठीक करून १०-१५ दिवसात आपण भेटून सर्व ठरवू'' असे ते म्हणाले.



१३३) प.पू. महाराजांचा ७६ वा वर्धापन दिन/गुजराथ दौरा कायम!

प.पू. महाराजांचा ७६ व्या वर्षात पदार्पण करणारा वर्धापन दिनाचा सोहळा या वर्षी भक्त मंडळींनी (मुंबईकरांनी) येऊर येथे श्री. भगवानराव पटवर्धनांच्या सौजन्याने साजरा केला. २१ तासांची धून व रविवारी दि. १०.२.१९८५ रोजी पहाटे ''श्रीं''च्या जन्मवेळी पुष्पवृष्टी करून साजरा केला. मी मात्र वामन निवासाचे कामा करता पुण्यातच होतो. श्री वासुदेव निवासात पवमान, अभिषेक असे कार्यक्रम ब्रह्मवृंदाच्या सहकार्याने करवून घेतले. प्रसाद भोजन झाले.

दि. २१.२.१९८५ रोजी दुपारी श्री. शुक्लाजी भावनगरहून परतले. मी श्री. शुक्लाजींना भेटून घडलेला प्रकार व ''श्रीं''चे संपूर्ण भाषण कानावर घातले. माझ्या सोबत श्री. तांबोळी व श्री. मुजुमदार होते. श्री. शुक्लाजींना हा रहित केलेला कार्यक्रम ठरल्याप्रमाणे आता होऊ शकेल किंवा नाही ते विचारले. कार्यक्रम पुन्हा नक्की होत आहे हे ऐकून त्यांना मनस्वी आनंद झाला. त्यांनी फक्त एकच विनंती केली, ''अजून काही स्थळांकडून रहित केलेले कार्यक्रम पुन्हा होते तसे ठेवण्याबद्दल कन्फर्मेशन यायची आहेत. तरी २-४ दिवसात मी दि. ८ ते २० मार्च १९८५ चा कार्यक्रम निश्चित असल्याचे कळवीन.''

पुढे हा कार्यक्रम नक्की झाल्याचे श्री. शुक्लाजींनी दि. २१.२.१९८५ रोजी सांगितले व ''श्रीं''ना तसे कळविले, गेले काही महिने आम्ही मात्र संकटाच्या आणि आपत्तींचे गर्तेत सापडलो होतो. ''श्रीं''च्या कृपेनेच जीवनक्रम पार पाडीत होतो. वेळोवेळी ''श्रीं''चे कृपाछत्र मला कसे सांभाळीत होते ते सविस्तर लिहील्यावाचून रहावत नाही.



१३४) आमचे बंधूस जीवन मुक्ती!

माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठे असलेलें माझे बंधू श्री. शरदभाऊ हे असाध्य चर्मरोग व शेवटी शेवटी इतर व्याधींनी ग्रस्त होते. पूर्वीचे बरेच उपचार हॉस्पिटले झाली होती. नंतर वृद्ध

माता पित्यांचे सोबत ते हरेश्वरी रहात होते. शेती बागायत सांभाळत होते. परंतु पुढे आजार बळावल्याने त्यांना मुंबईस आणून हॉस्पिटलमध्ये १९७० च्या सुरुवातीस दाखल करून १९८४ अखेर पर्यंत ''श्रीं''नी त्यांची सेवा माझ्याकडून घडवून आणली. दि. ७.१२.१९८४, श्री दत्तजयंतीचे दिवशी अत्यावस्थ असतानाच त्यांनी मला के.ई.एम. हॉस्पिटलला बोलावून घेतले व त्या सायंकाळी दिगंबराची धून १ ते ३ तास त्यांना मी ऐकवावी अशी विनवणी केली. त्याप्रमाणे दत्तजयंतीचा प्रसाद भोजनाचा डबा नेऊन त्यांना जेवू घातले. ते स्वतः दत्तभक्त होते. गुरुचरित्राची पारायणे करीत असत. मी त्यांना त्यांच्या कॉटजवळ बसून त्यांच्या कानाशी भावभक्तीपूर्वक धून ऐकविली. निरोप घेताना मी पुण्यास जाणार असल्याचे म्हणताच त्यांनी हात जोडून प.पू. दत्तमहाराजांना प्रार्थनापूर्वक निरोप दिला की, ''मी आता जीवितास कंटाळलो आहे, यातना सहन होत नाहीत, तरी या यातनेतून या जीवनातून मला मुक्ती द्या.'' पुण्यास गेल्यानंतर मी त्यांचा निरोप ''श्रीं''च्या कानावर घातला. ''श्री'' म्हणाले, ''आश्रमात महाराजांना प्रार्थना करा!'' दि. १५.१२.१९८४ शनिवारी मी पुण्यास एशियाडने गेलो आणि त्याच रात्री १०.३० वाजता हॉस्पिटलमध्ये त्यांचे देहावसान झाले.

१३५) स्मर्तृगामी प.पू. महाराज!

आमच्या बोरीवलीस चालू असलेल्या एकमेव कामावर भानगडी सुरू झाल्या. वास्तविक हे कन्स्ट्रक्शनचे मोठे काम होते. मालकांच्या चिरंजीवांनी स्वतः आमच्याकडे येऊन प्रार्थना करून आम्हांस हे काम स्वीकारण्यास लावले होते. पुढे ॲग्रीमेंट होऊन हे काम सुरू होऊन गती घेऊ लागले आणि त्या पाच-सहा भावंडांत आणि वडिलांच्या मध्ये कडाक्याची भांडणे सुरू झाली. दोन भाऊ आणि वडील यांनी आमची नियुक्ती केली होती. धाकट्या बंधुंना त्यांचा कॉन्ट्रॅक्टर आणायचा होता. पाड्यांतील गांव गुंडांना त्यांनी हाताशी धरले आणि उत्तम प्रकारे चाललेल्या कामात अडथळा निर्माण केला. झालेल्या पहिल्या बिलाचे अर्धे पैसे येणे बाकी होते तर पुढील कामाकरीता लोखंड, सिमेंट व इतर मटेरिअल आम्ही खरेदी करून साईटवर जमा केले होते. दि. १८ ला त्यांनी आम्हांस धमकावले. ''उद्या कामावर याल तर मार पडेल. पाय-तंगड्या तोडू. राहीलेले पैसे जमा केलेल्या सामानाचे पैसे कोर्टात केस करून मिळवा, एक काडी येथून हलवू देणार नाही.'' त्या दिवशी सायंकाळी ४.३० च्या सुमाराचा हा प्रसंग. साईटवरच ह्याच मालकांचे त्रैमूर्ती दत्तात्रयांचे छोटे मंदिर होते. देवापुढे उभे राहून साईट सोडताना प.पू. महाराजांना अंतःकरणाच्या आतल्या गाभ्यातून हाक मारली व म्हटले, ''महाराज काय हा तुमच्या लेकरावर-भक्तावर

अन्याय! मी काय करू महाराज?'' प.पू. महाराज त्याच वेळी निंबोरे या गांवी एक भक्त त्यांना काही शेतजमीन दान करणार होता. त्या मिटींगमध्ये होते. श्री. माधवराव तांबोळी मुंबईस जाण्यास निघाले होते. प.पू. महाराजांनी त्यांना बोलावून एका कागदावर मंत्र लिहून तो कागद लागलीच नागले यांच्याकडे देण्यास सांगितले. माधवराव माटुंग्यास आल्यानंतर प.पू. महाराजांनी कागद लिहून दिला आहे तो घेऊन जाण्यास सांगितले. परंतु मी झालेल्या अन्यायाने अत्यंत विचलीत मन:स्थितीमध्ये होतो व वकीलांचे ऑफिसांतून उतावीळपणे खेटे घालण्यात व्यग्र होतो. माझी मन:स्थिती स्थिर राहीली नव्हती. त्यातून दोन दिवसानंतर तांबोळींकडे जाऊन मी तो घेतला. माझ्या कनवाळू माय माऊलीनी गुरुदेवांनी माझी प्रार्थना ऐकली होती. त्यांनी मला कागदावर एक मंत्र लिहून दिला होता. ''देवापुढे तुपाचा दिवा लावून या मंत्राचा शुचिर्भूत होऊन पाच माळा जप करावा. या मंत्राने आपले शत्रूपक्ष व देणेकरी वशीभूत होतील व सर्व व्यवहार सुरळीत होतील'' असे त्यात म्हटले होते. श्री. माधवरावांना हा मंत्र कागदावर प.पू. महाराजांनी केव्हा लिहून दिला ते विचारले तेव्हा त्यांची मुंबईस निघण्याची वेळ ४.३० ते ५ च्या दरम्यान होती. त्याचवेळी निघत असताना 'श्रीं'नी त्यांना हाक मारून, 'हा मंत्राचा कागद नागलेना ताबडतोब द्या,' असे सांगितले. प.पू. महाराज एवढ्यावर थांबले नाहीत तर लागलीच दि. २०.१.१९८५ रोजी पुण्यास पोहोचताच न विसरता त्यांनी मला स्वत:हून पत्र लिहीले, ते पुढे देत आहे. गुरुमाऊली स्मर्तृगामी कशी असते त्याचेच हे उदाहरण नव्हे का?

प.पू. महाराज निंबोऱ्याची जमीन स्वीकारण्यास का तयार झाले ते पुढे दिले आहे.

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २०.१.१९८५

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम. आम्ही काल निंबोऱ्याहून आलो असून येत्या २४ तारखेस गुरुवारी बेलापूरला श्री भागवत सप्ताहासाठी जात आहोत. २-३ फेब्रुवारी पर्यंत परत येऊ. परवा श्री. माधवरावांचे बरोबर मंत्राचा कागद पाठविला आहे. त्याप्रमाणे प्रार्थना करून जपास दोघानीही आरंभ करावा. याने व्यवहारात सर्व अनुकूलता येत राहील.

आज संध्याकाळी डोंबिवलीचे श्री. देखणे येऊन भेटून गेले. डोंबिवलीस येथून आम्ही २० फेब्रुवारीस सकाळचे एस्.टी.ने निघून भोजनास डोंबिवलीस जाऊ. त्या दिवशी सायंकाळी श्री भागवत महात्म्य होईल. २१ ते २७ ला श्री भागवत सप्ताह होईल. दि. २८ ला दुपारी प्रसाद घेऊन दुपारी ३-४ वाजेपर्यंत आम्ही लोकलने माटुंग्यास श्री. माधवरावांच्याकडे येऊ. तेथे ६-७ ला संध्या करून नंतर बॉम्बे सेंट्रल वरून रात्रीच्या गाडीने बडोद्यास जाता येईल.

तेथून पुढच्या प्रवासाची कल्पना श्री. गोडसे यांनी दिली आहेच. तरी दि. २८ फेब्रुवारीस रात्री बडोदा गाडीची तिकीटे रिझर्व करून ठेवण्यास हरकत नाही असे श्री. शुक्लाजींना कळवावे. आम्ही दोघे व श्री. रघुनाथराव दोघे अशी आमची चार तिकीटे आहेत. आता हे निश्चित झाले आहे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर



१३६) भाचा चि. श्रीपाद यास असाध्य रोग!

तिसरे संकट उपस्थित झाले ते माझा लाडका भाचा चि. श्रीपाद (निषाद), सौ. प्रभाताई व श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे यांचा द्वितीय पुत्र, याचा असाध्य आजार. काही महिन्यापूर्वी त्याची पांढरी फटफटीत कांती पाहून मीच त्यांना त्याचे हिमोग्लोबीन चेक करून ते कमी असेल तर डॉक्टरी सल्ल्याने ट्रिटमेंट सुरू करा सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी लागलीच डॉक्टरी ट्रिटमेंट सुरू केली. एकदा तर त्याला रक्त द्यावे लागले. माझे श्री वामन निवासाचे काम चालू असल्याने माझे वरच्यावर पुण्यास जाणे होत होते. एके सायंकाळी मी साईटवरून आश्रमात आलो. हातपाय धुवून वर गेलो तर महाराज त्यांचे नेहमीचे जाग्यावर एकटेच शांत बसले होते. मी पुढे होऊन साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, ''महाराज श्रीपादची प्रकृती ठीक नाही. त्याला रक्त द्यावे लागले.'' महाराज म्हणाले, ''होय! डॉक्टरने त्याला कॅन्सर झाल्याचे म्हटले आहे!'' प.पू. महाराजांचे हे शब्द ऐकताच आकाश अंगावर कोसळावे असा धक्का मला बसला. तो मला असह्य झाला. मी अतिशय घाबरलो व प.पू. महाराजांना आश्चर्याने आणि भयभीत होऊन विचारले, ''महाराज हे आपल्याला कोणी सांगितले?'' ''श्री'' म्हणाले, ''स्वत: शृंगारपुरेंनी सांगितले. तुम्हास यातील काही माहीती नव्हती का? घाबरून जाऊ नका, शांत व्हा. अहो डॉक्टरचे निदान तरी शंभर टक्के कुठे खरे असते? त्याच्या टेस्ट वगैरे चालू आहेत. ईश्वर सांभाळणारा आहे. प्रार्थना करीत राहू आपण!''

मुंबईस आल्यानंतर मी लागलीच शृंगारपुरे यांना भेटलो. भगिनी सौ. प्रभा हिलाही या आजाराची कल्पना दिलेली नव्हती. मी भाऊसाहेबांना ही गोष्ट मला का सांगितली नाही म्हणून विचारले तर ते म्हणाले, ''तुम्ही तुमच्या बहिणी इतकेच भावनाप्रधान असल्यामुळे मी तुम्हासही सांगितले नाही आणि माझ्या थोरल्या बंधुंखेरीज हे कोणासच माहीती नाही. प्रभाचे कानावर जाऊ नये म्हणून मी कोणासही कळू देत नाही. इतकेच काय पण ट्रिटमेंट करता लागणारे लोनही मी माझ्या ऑफिसकडे (रिझर्व्ह बँकेकडे) मागितले नाही. कारण तसे केले तर या

रिझर्व्ह बँक कॉलनीत सर्वत्र ही बातमी पसरून शेजारी प्रभास त्याबद्दल विचारतील.''

मीही पुढे भाऊसाहेबांचे बरोबर डॉक्टरांकडे जाऊ लागलो. ब्लड कॅन्सर मधून तो बरा होणे अशक्य आहे असे प्रत्येक डॉक्टरचे म्हणणे पडत होते. तो तर त्यावेळी युनिफॉर्म करून शाळेत जात होता. प्राविण्य मिळवीत होता. इंजेक्शनचा दिवस आला की, कॉटखाली लपून बसायचा. सर्वच घटना दु:खद होत्या. 'बाहेरचे रक्त त्याच्या शरीरात घालू नये' असे प.पू. सौ. ताई महाराजांचे निक्षून म्हणणे होते. तर प.पू. महाराज, 'आई-वडीलांचा विचार करून शक्यतो घालू नका' म्हणत. प.पू. महाराजांनी प.पू. मानवतकर महाराजांचे औषध सुरू करण्यास सांगितले. ते याच श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांचे परंपरेतील गांडा महाराजांचे अनुग्रहीत. श्री टेंबेस्वामी महाराजही दिव्य वनस्पतींची औषधे देत असत. श्री मानवतकर महाराजही जंगलातील दिव्य औषधी स्वत: जंगलात जाऊन आणीत. आवळ्याच्या कोवळ्या पानाच्या रसांतून अमरकंद ही दुर्मिळ मुळी देत असत. काही वेळा सुधारणा वाटे, पुन्हा तो इतका सिरीयस होई की रक्त देण्यापलिकडे पर्याय रहात नसे. त्याला सतत देवाधर्माच्या गोष्टी सांगाव्या लागत. आई-वडीलांना उशाशी बसवून दिगंबराची धून करायला सांगे. निमूट पडला असता विचारावे, ''डोळे मिटून काय करतोस तर हा पाच वर्षाचा बाळ म्हणायचा मी श्रीपाद श्री वल्लभ त्वं सदैव हे स्तोत्र सारखे म्हणत असतो.''

आश्रमात एकदा प.पू. मानवतकर महाराज आले असता त्यांचीही श्रीपादचे आजाराबद्दल प.पू. महाराजांशी चर्चा झाली होती. त्यावेळी जंगलात मिळणाऱ्या दुर्मिळ दिव्य वनस्पती, कंद वगैरे आपण जमिनीत लावून तयार करू शकू का? ह्या ''श्रीं''च्या प्रश्नावर प.पू. मानवतकर महाराज म्हणाले, ''हो, करता येईल पण त्या करता शेत जमीन पाहिजे, ती कोठून मिळणार?'' ह्या त्यांच्या प्रश्नावर प.पू. दत्तमहाराजांचे मनात हा विचार सतत होता. जमीन मिळावी, त्यावर दिव्य औषधांची लागवड करावी असे त्यांना वाटे. कदाचित त्याच करीता निंबोरे येथील जमीन एक शेतकरी भक्त दान करायला निघाला ती स्वीकारावी असे ''श्रीं''ना वाटले असावे.

१३७) दौऱ्यास निघताना ''श्रीं''ना श्रीपादची काळजी!

श्री. शुक्लाजींच्याही मी वरच्यावर संपर्कात होतो. प.पू. महाराजांनाही माझ्याबरोबर पुण्यास येऊन ते भेटून गेले व दि. ८.३.१९८५ ला गुजराथ दौऱ्यास निघण्याचे नक्की झाले. श्री. सुधाकर शृंगारपुरे यांना या दौऱ्यात सामील होण्यास महाराजांनी मनाई केली. प.पू. महाराज शृंगारपुरेना म्हणाले, ''तुम्ही उभयता या गुजराथ यात्रेत येऊ नका, होईल तेवढी

श्रीपादची सेवा करा, त्याची काळजी घ्या!'' प.पू. महाराजांनी स्वतः आश्रमात श्रीपाद (निषाद) च्या प्रकृती स्वास्थ्याकरीता अभिषेक, पाठ, अनुष्ठाने इत्यादी ब्रह्मवृंदाना करायला सांगितले होतेच.

दि. ८.३.१९८५ शुक्रवारी रात्री १० वाजता आम्ही बडोदा एक्सप्रेस मध्ये बसून पश्चिम यात्रेस प्रारंभ झाला. काही वेळानंतर मी सहज ''श्रीं''चे दर्शनास गेलो. वाकून नमस्कार करून उठताच ''श्रीं''नी माझ्याकडे पाहिले आणि आश्चर्याने विचारले, ''अरे तुम्ही पण आला आहात का?'' महाराजांच्या या विस्मयाचे मलाच आश्चर्य वाटले. दौरा ठरला तोही शुक्लाजींच्या व माझ्यासमोर. माझी पुण्याला ये-जा म्हणून शुक्लाजींचे निरोप मीच पोहोचवित होतो. आमच्या सर्वच गुरुबंधुंनाही श्री. शुक्लाजी परिचयाचे नसल्याने माझ्या मार्फत सर्व बोलणी ठरवाठरवी होत होती. मला पुढाकार घ्यावा लागला होता आणि आज महाराजांनी असे आश्चर्याने का विचारले? मीही येऊ नये असे ''श्रीं''ना वाटत होते का? असे का वाटावे? श्रीपादाच्या प्रकृतीची काळजी म्हणून का श्री वामन निवासाची कामाची काळजी म्हणून? मला काहीच कळेना. मनात पाल मात्र चुकचुकत राहीली.

१३८) ''श्रीं'' सोबत गुजराथ-सौराष्ट्र दौरा!

दि. ९.३.१९८५ रोजी पहाटे ६ वाजता बडोद्यास पोहोचलो. श्री. शुक्लाजींनी ठरविलेली मॅटेडोर बस स्टेशन बाहेर तयार होती. तरीही सर्वांचे मुखमार्जन होऊन निघण्यास ७.३० वाजले. आधी १६ माणसेच ठरली होती. परंतु नंतर श्री. बोडस वाढले.

सकाळी ९.४५ वाजता आम्ही श्री गरुडेश्वर क्षेत्री पोहोचलो. श्री दत्तमंदिरात जाऊन ''श्रीं''नी धूळभेट घेतली. ''श्रीं''चे डोळे पाणवले होते. सद्गदीत करुणभाव चेहऱ्यावर उमटले होते. संस्थांकडून करोटेश्वर मंदिरास लागून दोन खोल्या एक ''श्रीं''ना व दुसरी मोठी आम्हा सर्वांकरता होती.

स्नानास जाताना सुद्धा ''श्रीं''नी समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. घाट उतरुन जाताना १२५ पायऱ्या ''श्रीं''नी मोजल्या. येताना तेवढ्याच पायऱ्या चढून यायचे आहे. नदीवरच स्नान संध्या आटोपून ''श्री'' आन्हिकाला करोटेश्वर मंदिरात नदीच्या बाजूला बसले. ''श्रीं''नी सर्वांना मंदिरास प्रदक्षिणा घालून स्तोत्रे, जप वगैरे पठण करण्यास सांगितले. मग आम्ही काही मंडळी समाधी मंदिरात तर काही दत्तमंदिरात आपआपल्या नित्य आन्हिक पाठ वगैरें करता बसलो. १२.३० वाजता ''श्रीं''चे आन्हिक आटोपल्यानंतर १ वाजेपर्यंत ''श्रीं''नी विश्रांती घेतली. अचानक आल्याने आम्हा सर्वांस देवावर अभिषेक, पूजा वगैरे

करता येण्यासारखे नव्हते. शिवाय आज संकष्टी होती. फराळाचे वगैरे सर्वांचे आटोपले. दीड वाजता ''श्री'' बैठकीवर शांतपणे बसले होते. श्री. देवळे यांनी जप काऊंटर यंत्र नव्यानेच आणले होते. 'ते मी ''श्रीं''ना दाखवून, 'माळेऐवजी ह्या यंत्राने जप करून चालते का' हे विचारण्यासाठी मला ''श्रीं''चे खोलीपुढे ओढीतच आणले. त्यांच्या अतिआग्रहास्तव मी ''श्रीं''च्या पुढे नमस्कार करून बसलो व ''श्रीं''ना ते यंत्र दाखवून माळेऐवजी याने जप करून चालते का ते विचारले. पण ''श्री'' शांत होते, विमनस्क, उदास बसले होते. त्यांचे लक्ष आमच्या विचारण्याकडे नव्हते. ते उत्तर देण्याच्या मन:स्थितीत नव्हते. समोर असून ''श्री'' आमच्यात नव्हते. ही अशी त्यांची गंभीर, गहन विचारात गढलेली अवस्था यापूर्वी कधी दिसली नव्हती. (ह्याचे कारण यात्रेच्या शिवोर येथील सांगतेनंतरच कळले. ''श्रीं''नी एकाही प्रश्नाचे उत्तर न देता काही काळ पूर्ण मौन स्वीकारले होते.

''श्रीं''नी तेथील सर्व ब्रह्मवृंदाचा यथायोग्य सन्मान करून सर्वांस दक्षिणा व संस्थानाला देणगी देऊन ४.३० वाजता आम्ही गरुडेश्वर सोडले.

नारेश्वरला जाण्यास पुन्हा बडोद्यास यावे लागते. बडोद्याहून मुंबईच्या दिशेने निघाले की, पालेज नांवाचे गांव लागते. येथून १७ कि.मी. वर नारेश्वर आहे. आमची बस रात्री ८.३० वाजता नारेश्वरला पोहोचली. श्री. शुक्लाजी यांनी आधीच तेथील बंगला बुक केला होता. प.पू. महाराजांचा प.पू. रंगावधूत महाराजांपासून परिचय असल्याने व ''श्रीं''चा अधिकार जाणणारे ट्रस्टी असल्याने त्यांचे यथायोग्य स्वागत झाले. ''श्रीं''च्या सेवेला संपूर्ण आश्रम तत्पर असल्याने सर्वांचीच व्यवस्था उत्कृष्ट झाली. स्वयंपाक सोवळ्यात झाला. चंद्रोदयानंतर ''श्रीं''नी संकष्टी सोडली. ऑफिसजवळच पुढील ओटीवर नित्यक्रमाप्रमाणे भजन झाले. ''श्रीं''साठी खास आसन घातले होते. ''श्री'' थोडा वेळ बसले. येथील प्रत्येक कार्यक्रम अत्यंत शिस्तशीर आणि वक्तशीर असतात. प्रसाद भोजनात गुजराथी पक्वान्न होते. येथील देवदर्शनाच्या वेळा ठरलेल्या आहेत. राहण्यास खूप खोल्या आहेत. अन्नछत्र चालूच असते. देवासमोर पैसे ठेवण्यास मनाई आहे. दानपेटी किंवा ऑफिसमध्ये पावती करून देणगी स्वीकारली जाते. इतक्या खोल्या असून सतत भरलेल्या असतात. म्हणून येण्यापूर्वी पत्राने आधी कळवावे लागते म्हणजे गैरसोय होत नाही. इथल्या सेवेकऱ्यांची सेवा गुरुभावपूर्ण असते. प.पू. रंगावधूत स्वामी महाराज मंदिरात आहेतच या भावनेने, सर्व वरिष्ठांचा दबदबा असल्याप्रमाणे, शांतता राखून कार्य चालू असते. येथे मुख्य छोटे शिवालय आहे. श्री रंगावधूतांची व त्यांच्या प.पू. मातोश्रींची समाधी समोरासमोर आहेत. इथे त्यांच्या पादुकांची पाद्यपूजा होते. आश्रम वनश्रीतच वसलेला आहे. पक्षांचे कुंजारव चालू असते. पहाटे पहाटे तर इकडे तिकडे मोर इतस्तत: निर्भयतेने स्वैर संचार करीत असतात. एका बागेत जेथे प.पू.

रंगावधूत नेहमी बसायचे त्या जागेवरील निंब वृक्षांच्या शाखांनीही सिंहासनावर छत्र धरावे असा आकार धारण केला आहे. आजूबाजूची त्या आसनाच्या तिन्ही बाजूची वृक्षवल्ली हे सिंहासनच असल्याचे भासविते. असो. अशा या मंगल वातावरणात प.पू. महाराजांचे सहवासात आंतरिक आनंद उपभोगीत आम्ही दि. १०.३.१९८५ च्या पहाटे ६ ते ६.३० ला हॉलमध्ये बैठक आटोपून मनसोक्त चहापान करून नर्मदेत स्नानास गेलो. स्नानापूर्वी नौकेतून पैलतीरी जाऊन आलो. नौकेत ''श्रीं''नी सर्वांस त्रिपदी म्हणायला सांगितली. दत्तबावनी, दिगंबराची धून म्हटली. नर्मदेत सामुदायिक स्नान करीत असताना रघुनाथरावांच्या विनवणीस मान देऊन ''श्रीं''नी सर्व भक्तांच्या अंगावर नर्मदाजल सिंचन केले. सकाळी ९.३० ला पाद्यपूजा चालू असताना ''श्री'' अवधुतांच्या मातोश्रींच्या समाधीजवळ ध्यानावस्थेत बसले होते. आम्हां सर्वांच्या वतीने पाद्यपूजेस आमचे दत्ता सप्रे बसले होते. ही पूजा २.३० तास चालते. तासभर बसून ''श्री'' आवारांतील इतर स्थानांना भेट देऊन आले. अवधुतांच्या निवासस्थानी आत प्रवेश फक्त प.पू. महाराजांनाच मिळाला. खिडकीतून आम्हाला आतील भाग पहायला मिळाला.

या आश्रमात नर्मदा परिक्रमा केलेले रामभक्त नावाचे गृहस्थ आहेत. बरेच वर्षे ते मौनातच आहेत. त्यांची मुद्रा सदैव प्रसन्न, हसतमुख आणि उत्साही असते. आल्या आल्या ''श्रीं''च्या स्वागतास तेच सामोरे आले. पाद्यपूजेचा कार्यक्रम संपल्यानंतर रामभक्तांनी ''श्रीं''ना आपल्या खोलीवर नेऊन त्यांचे पूजन करून श्रीफळ व शाल देऊन सत्कार केला. त्यांचा ''श्रीं''च्या बद्दलचा आदर-प्रेम भाव त्यांच्या लीन चेहऱ्यावर सतत दिसत होता. आज ''श्रीं''करीता खास प्रसाद भोजन होते. अर्थात आम्हांलाही त्याचा लाभ झाला. जेवताना ''श्रीं''नी स्वत: श्लोक म्हटला तो असा,

गुरो तुझी ही पदवारी धारा। धुवो सदा कायिक दोष सारा।।
सदैव माझे मन-वाणी शुद्ध। करो तुझे नाम पवित्र सिद्ध।।

भोजन होईपर्यंत व्यवस्थापक जातीने सेवेस तत्पर होते. भोजनानंतर संस्थानातर्फे ''श्रीं''चा यथोचित सन्मानपूर्वक सत्कार झाला. शिवाय आम्हा सर्वांना प्रत्येकी धोतरपान व रु. ५ दक्षिणा दिली.

दुपारी २.३० ते ३.३० पर्यंत व्यवस्थापकांचे विनंतीस मान देऊन ''श्रीं''नी आशीर्वादपर धर्मे प्रितीम् सन्मतिं..... या श्लोकावर प्रवचन केले. चारचे सुमारास नारेश्वरहून आम्ही निघालो. ५.३० वाजता बस बडोद्यास, प्रतापनगर येथील ममता ट्रॅव्हल्स, या त्यांच्या ऑफिसला आली. ओव्हरलोड झाल्याने चाक चेसीला घासत होते. मोठ्या बसचा प्रयत्न झाला पण शेवटी याच बसची डागडुजी करून निघायचे ठरले.

सूर्यास्ताची वेळ होती. निघायला अवधी होता. शेजारी छोटी बाग होती. संधी साधून ''श्रीं''नी याच बागेत सायंसंध्यावंदन उरकून घेतले. शेवटी याच बसने ८ वाजता निघून आम्ही रात्री १० वाजता डाकोरला पोहोचलो. ह्या बसच्या प्रवासात एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाकडे जात असताना आम्ही गुरुबंधू दिगंबराची धून, भक्तीगीते-पदे, अभंग तर संध्याकाळ होताच त्रिपदी, पंचपदी, घोरात् कष्टात् व इतर स्तोत्रेही म्हणत असू. नारेश्वरहून निघताना रंगावधूतांची दत्तबावनी म्हटली तर डाकोरमध्ये शिरताना स्वत: ''श्रीं''नी दिगंबराची धून सांगितली.

डाकोरमध्ये शुक्लाजींनी संत पुनीत महाराजांच्या धर्मशाळेत बुकींग केले होते. या धर्मशाळेत लॉजिंग सारखेच ब्लॉक्स होते. चार मजली ६ इमारती होत्या. ब्लॉक्स सेल्फ कन्टेण्ड, आकार फक्त रु. १५/- प्रत्येक ब्लॉकचे. त्यात कॉटस्, गाद्या, ब्लँकेटस्, चादरी वगैरे होते. लागूनच मेस आहे. तिथे चहा, कॉफी, जेवण फक्त अडीच रुपये थाळी, जेवण उत्तम प्रतीचे.

श्री. शुक्लाजी भोजना व्यतिरिक्त चहा, कॉफी इत्यादी काहीच घेत नाहीत हे ऐकून ''श्रीं''नी समाधान व्यक्त केले. कौतुकाने म्हणाले, ''माणसानं असं असावं!''

डाकोरला येताना वाटेत नकुलेशला भेट दिली. ह्या मंदिराचे दोन मजले जमिनीखाली आहेत व एक जमिनीवर आहे. या तीन मजल्यावर अनुक्रमे ब्रह्मा, विष्णु, महेशाची मंदिरे आहेत. शास्त्रानुसार शिवाची तांत्रिक उपासना करण्यासाठी यांची ही वैशिष्ट्यपूर्ण रचना केली आहे. इथे योगाभ्यास शिकविला जातो. दोन वर्षापूर्वी ब्रह्मलीन झालेल्या कृपालुनंदजींनी हे मंदिर बिर्ला मंदिराचे धरतीवर बांधले आहे. सध्या त्यांचे उत्तराधिकारी राजर्षी महाराज इथे राहतात. अभ्यासूंना राहण्याची स्वतंत्र सोय आहे. स्वच्छता, टापटीप, बागा सर्वच प्रेक्षणीय आहे.

दि. ११.३.१९८५ ''श्रीं''नी आपले आन्हिक थोडक्यात आटोपले. इतर दोघांना पोथी वाचण्यावरून ''श्री'' म्हणाले, ''प्रवासात पोथीवाचन, अनुष्ठान असे काही ठेवू नये.''

श्री. शुक्लाजींनी डाकोर दर्शन-चरणस्पर्शाची आगाऊच तिकीटे सर्वांची काढून ठेवली होती. त्यामुळे सकाळी १० ते १०.३० पर्यंत मागच्या दाराने सर्वांस प्रवेश मिळून चरणस्पर्श करायला मिळाला.

डाकोर जुन्या संस्कृतीचे छोटेसे गाव आहे. मात्र धर्मशाळा यच्चयावत् सुधारलेल्या शहरात असतात तशा आहेत. डाकोर गांवाच्या मध्यावर हे श्री डाकोरजींचे भव्य मंदिर आहे. गुजराथमधील प्रमुख शहरांशी हे गांव रस्त्यांनी जोडले आहे. एस्.टी. सर्वत्र जाते. मंदिराशेजारी मोठे तळे आहे. मोगलांचा हल्ला होणार म्हणून डाकोरजींच्या एका महान भक्ताने डाकोरजींची

मूर्ती या तळ्यांत लपविली होती म्हणे. सैनिक आले. त्यांनी टोकदार भाले तलावाचे तळात घालून आत काही आहे का ते पाहिले. तसे ते पहात असताना डाकोरजींचे मांडीस म्हणे भाल्याचे टोक लागले व लाल रक्त पाण्याच्या पृष्ठभागावर पसरले अशी दंतकथा पुजाऱ्याने सांगितली.

दुपारचे १२ वाजले. भोजन आटोपून आम्ही दु. १.४० वाजता डाकोरहून निघालो. दुपारी २.४० ला कपडजंग या गांवी बसमधील डिझेल संपले व ते दुसऱ्या वाहनाने जाऊन पेट्रोल पंपावरून आणेपर्यंत तास लागला. गाडी उन्हात उभी ठेवून ड्रायव्हर गेला होता, सावलीची जागाच नव्हती. उन्हाचा फारच ताप झाला. इतके बरे की रस्ते फार चांगले होते. सायंकाळी ५.५० वाजता आम्ही शामलाजीला पोहोचलो. येथील श्री. कृष्णांची (श्री. कृष्णांना नकुलेश म्हणतात) मूर्ती नवव्या शतकांतील असून २०० वर्षांपूर्वी मफतलाल वंशजांनी हे सध्याचे मंदिर बांधले आहे. मंदिर भव्य असून त्याची शिल्पकला प्रेक्षणीय आहे. हे एक छोटे गांव आहे. मंदिराशेजारी धर्मशाळा आहे.

येथे फार वेळ न थांबता सव्वासहाला निघून मोडासामार्गे आम्ही खेडब्रह्मला पोहोचलो. हे देखील एक खेडेगावंच आहे. संपूर्ण भारतातील ब्रह्मदेवाचे असे हे एकमेव स्थान आहे. गांवापासून जरा उंचावर हे मंदिर आहे. श्री ब्रह्माजींची ८ ते ९ फूट उंचीची शुभ्र संगमरवराची उभी मूर्ती आहे. चतुर्मुख असून मूर्तीच्या उजव्या हातात वेद तर डाव्या हातात जपमाळ आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस सावित्री आणि गायत्रीच्या मूर्ती आहेत. इथे ''श्रीं''सह आम्हांस गवळ्यांकडून धारोष्ण दूध मिळाले. अंबाजीस पोहोचण्यास पाऊण तास लागला.

रात्री ९.१५ वाजता आमची बस अंबाजीला पोहोचली. श्री. शुक्लाजींनी आमच्याकरीता शेठ गोविंददास जमनादास धर्मशाळेत उतरण्याची सोय केली हाती. सोय उत्तम होती. येथून फक्त ३ कि.मी. वर अंबाजीचे मंदिर आहे. ही धर्मशाळा ऐन बाजारात आहे. गांव छोटेसेच आहे पण सर्व मुख्य शहरांशी रस्त्याने जोडलेले आहे. एस्.टी. बस सेवा शहरांकडे जायला आहे. अंबाजीपासून एखाद कि.मी.वर राजस्थानची हद्द येते. अबूपहाड लागूनच आहे. अबू पर्वतावरच अंबाजींचे मंदिर आहे.

येथील आसपासच्या शहरात जाणारे रस्ते अत्यंत चांगले, रुंद, सरळ असे आहेत. दुतर्फा झाडे आहेत. यामुळे प्रवास सुखावह होतो. रस्तोरस्ती मार्गदर्शक बोर्ड आहेत. कालवे, तळी, विहीरी खूप आहेत. सर्वत्र हिरवळ पहायला मिळते.

दि. १३.३.१९८५ ला सकाळी १० च्या सुमारास ''श्रीं''चे तथा सौ. आईसाहेबांचे सोबत आम्ही अंबाजींचे दर्शन घेतले. प.पू. श्रीमहाराज, त्यांचा अधिकार, या गोष्टींची पूर्वसूचना श्री. शुक्लाजींनी तेथील पुजारी व ट्रस्टी यांना दिली असावी. आम्हा सर्वांस

''श्रीं''च्या मागोमाग स्वतंत्रपणे प्रवेश मिळाला. सर्व गर्दी आणि रांगा थांबवून ''श्रीं''ना व सौ. आईसाहेबांना गाभाऱ्यात प्रवेश देण्यात आला. उभयतांचे हस्ते अंबाजींची साडी-चोळी, हार पुष्पे वाहून पूजा करायला मिळाली. आम्हांस तो अपूर्व सोहळा पहायला मिळाला. नंतर बाहेरच्या हॉलमध्ये ''श्री'' व सौ. आईसाहेबांच्या मागे बसून अंबाजींचे मनसोक्त दर्शन व ध्यान करण्यास मिळाले. तेथील सर्व ब्रह्मवृंद पुजारी यांची, भरघोस दक्षिणा देऊन ''श्रीं''नी आणि त्यांचे सोबत शुक्लाजींनीही संभावना केली. श्रीकृष्णांच्या वेळेपासून म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वी पासून हे शक्तीपीठ आहे असे सांगितले जाते. सिंहासनारूढ दागिन्यांनी नटलेली अशी अंबाजींची मूर्ती पहाण्यासारखी आहे. पण ती फारच छोटीशी आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार चालू होता. मंदिराच्या संस्थानातर्फे येथे सतत अन्नछत्र थोडक्या पैशात ठराविक वेळांत चालू असते. सतत भक्तांची वर्दळ असते.

अंबाजीपासून ६ कि.मी.वर श्री कोटेश्वर शिवलींग आहे. तेथे ५-१० मिनिटे थांबून आम्ही 'श्रीं'च्या बरोबर दर्शन घेतले.

दुपारी ४ वाजता निघून ९० कि.मी.वर असलेल्या मातृगया-सिद्धपूरला आम्ही सायं. ६.३० वाजता पोहोचलो. वाटेत पालनपूर येथे आम्ही भक्तमंडळींनी चहा-पाणी घेतले. ''श्रीं''नी थोडा गुलकंद घेतला. बसमधून उतरल्यावर सर्वांनी बिंदू सरोवराचे दर्शन घेतले. ही दोन व्यवस्थित बांधून घेतलेली तळी आहेत. श्रीकपील मुनींचे मंदिर आहे. येथेच आईचे श्राद्ध करतात. येथून आम्ही ''महाराष्ट्र भवन''च्या श्री. कोरान्नेंकडे गेलो. समोर श्री रणछोडजींचे भव्य मंदिर व मंदिरास लागूनच कोरान्ने यांचे दुमजली घर आहे. हे कोरान्ने प.पू. महाराजांचे पूर्वपरिचयाचे होते. यापूर्वी दोन वेळा ''श्री'' येथे राहून गेलेले आहेत. कोरान्ने यांनीही ''श्रीं''चे आदबशीर स्वागत सत्कार करून सर्वांचे चहापान होईपर्यंत ते व ''श्री'' वरच्या मजल्यावर मोकळ्या गच्चीत गप्पागोष्टी करीत बसले होते. मी व श्री. शुक्लाजी उत्तम सोयीची धर्मशाळा शोधण्याच्या मार्गात होतो. एक दोन ठिकाणी जाऊनही आलो. परंतु ''श्रीं''ना दुसरीकडे जागा पाहिल्याचे आम्ही सांगितल्यानंतर ''श्रीं''नी नकार दिला. म्हणाले, ''आपण सर्व खालीच मंदिराचे प्रशस्त हॉलमध्ये व मागील खोलीत असे राहू या. ह्या ''श्रीं''च्या आज्ञेप्रमाणे आम्ही हॉलमध्ये पथाऱ्या मांडल्या. ''श्रीं''ना व बायका मंडळींना मंदिरातच मागे दोन खोल्या होत्याच.

दि. १४.३.१९८५ ला पहाटे उठून सर्वांनी आपआपली स्नानसंध्या, आन्हिके आटोपली. सकाळी १० पर्यंत आम्ही पुढील कार्यक्रमास सज्ज होतो. दरम्यान या क्षेत्रांतील प्रसिद्ध पंडीत श्री. नरहरशास्त्री, ''श्रीं''च्या दर्शनास आले होते. त्यांचे व ''श्रीं''चे संस्कृत भाषेत खूप वेळ बोलणे झाले. ''श्रीं''नी त्यांचे घरी चलावे असा त्यांचा खूप आग्रह होता. परंतु वेळेअभावी

ते शक्य झाले नाही. ''श्रीं''नीच त्यांना पुण्यास श्री वासुदेव निवासात राहण्यास येण्याचे आमंत्रण दिले. नंतर श्री रंगावधूत शिष्य परिवाराने येऊन ''श्रीं''चे दर्शन घेतले व यथाशास्त्र ''श्रीं''चा सत्कार केला.

मातृगया/सिद्धपूर येथे श्रीकपील मुनींनी आपल्या आईस उपदेश करून आत्मसाक्षात्कार घडविला, तेच हे मातृगया तीर्थक्षेत्र स्थान होय! सकाळी ११ वाजता ''श्रीं''च्या बरोबर आम्ही आठजण बसून पुरोहीतांद्वारे मातृश्राद्ध केले. तासाभराचा हा विधी आटोपून१२.३० वाजता भोजन प्रसाद झाला.

प्रत्येक मुक्कामास बसच्यावर कॅरीअर मध्ये बांधलेले प्रत्येकाचे सामान काढणे व पुन्हा निघताना व्यवस्थित बांधणे ही मोठी कामगिरी करावी लागे. त्यात वेळ जाई, पण इलाज नव्हता. सिद्धपूर मातृगयेहून आम्ही १.४५ वाजता निघालो. आता आम्ही ५५० कि.मी.च्या द्वारकेच्या प्रवासास निघालो होतो. सायंकाळी ६.४५ वाजता सुरेंद्रनगरचे बाहेर पेट्रोल पंपावर थांबलो. येथे ''श्रीं'नी संध्यावंदन केले. गाडी थांबण्यापूर्वी एक मोर डौलदार चालीने ''श्रीं''च्या समोरून गेला.

रात्री ९ वाजता आम्ही राजकोटला आलो. पुढे रात्री १२.३० वाजता खंबालिया या ठिकाणी थोडे थांबून पहाटे चार वाजता आम्ही द्वारकेला पोहोचलो. येथे श्री. शुक्लाजींनी समुद्र किनारी (सिव्हील हॉस्पिटल शेजारी) असलेल्या नित्यानंदाश्रमात उतरण्याची सोय करून ठेवली होती.

सतत तेरा तास प्रवासाने ''श्रीं''ना त्रास झाला. त्यांचे पायावरही सूज आली होती. ह्या यात्रेत एवढ्या मोठ्या अंतराचा हाच टप्पा मोठा होता.

दि. १५.३.१९८५ ला अडीच-तीन तास विश्रांती नंतर सकाळी ७ च्या सुमारास उठाउठ झाली. आम्ही सर्वांनी तेथेच आश्रमात स्नान उरकून घेतले. ''श्रीं'' म्हणाले, ''येथे स्नान करण्यापेक्षा समुद्रस्नान केले असते तर बरे झाले असते. आता समुद्रावर गेल्यावर समुद्रजल अंगावर शिंपडून मार्जन करून घ्या.''

या आश्रमापासून पायी गेल्यास मुख्य मंदिरात पोहोचण्यास २० ते २५ मिनिटे लागतात. मंदिर भव्य आहे. समोरचे आवारही मोठे आहे. समुद्र किनारीच परंतु जरा उंचावर हे मंदिर आहे. आम्ही गेलो तेव्हा जीर्णोद्धाराचे काम चालू होते. मंदिराच्या आवारात आचार्यांचा मठ आहे, दोन छोटी देवळे आणि पाकशाळा वगैरे आहेत.

प्रत्येक स्थानांत ''श्रीं''च्या बरोबर दर्शनास जाताना एक अनुभव सतत येतो की, ''श्री'' मंदिरात येऊन दर्शन पूजा, देवाचा मानपान करीपर्यंत गर्दी ओसरलेली असते. निवांत वेळ मिळतो. कदाचित त्या ईश्वरी देवतेस आपल्या या लाडक्या 'संत-भक्ताचे' दर्शन शांतपणे

घ्यायचे असावे. या द्वारकाधीश गोपाल कृष्णांच्या मूर्तीसमोर ''श्रीं''नी हात जोडताच मूर्तीच्या उजव्या खांद्यावरून पुष्प खाली पडले. पुन्हा पुन्हा हा प्रकार प्रत्ययास आला. ''श्रीं''बरोबर दर्शन पूर्ण होत आले असतानाच नैवेद्यासाठी पडदा सारला गेला. ''श्री'' व त्यांचे मागे आम्ही तसेच सर्व सोपस्कार पहात होतो. देवांचे संपूर्ण अलंकार बदलले होते. नंतर (मूर्तीस) श्री कृष्णास त्यांचे मुख आरशात दाखविण्यात आले. देवांनी आरशांत पाहिले आणि नंतर ते मनमोहक, कोमल, नयनरम्य रुप आम्हांस दाखविले.

अहाहा! ते रुप, द्वारकाधीशांकडे एक टक डोळे भरून पहातच रहावेसे वाटते. गोकुळांतील लीलांचा सारा चित्रपट डोळ्यासमोर तरळू लागतो. मनास परिपूर्ण शांती आणि अमाप समाधान मिळते. सोन्याचा देव्हारा, वरची छत्र चामरे सुद्धा सोन्याचे दांड्यात बसविलेली, सुवर्णालंकार, जेथे पहावे तेथे सुवर्णच सुवर्ण. सोन्याची द्वारका, खरंच द्वारका नगरी सुवर्णनगरीच असणार! श्रीकृष्णाच्या एका वंशजानेच म्हणे ही मूर्ती आणि हे मंदिर स्थापित केले. दर्शन १५ ते २० फूट अंतरावरून होते. पण स्पष्ट दर्शन होते.

देवदर्शन झाल्यानंतर ''श्री'' द्वारकाधीश मठाधिष्ठित शंकराचार्यांच्या मठात दर्शन-भेटीस गेले. परंतु ते बाहेरगावी गेले होते. नंतर ''श्री'' सभामंडपात येऊन बसले. आम्ही सभोवार बसलो. ''श्रीं''नी दत्ता सप्रे यांस विष्णूसुक्त इत्यादी म्हणायला सांगितले. निघताना ''श्रीं''च्या बरोबर आम्हीही द्वारकाधीश श्रीकृष्णांचे अगदी निवांतपणे दर्शन घेतले. संस्थानातर्फे १ रुपयात प्रसाद पुडी मिळते ती प्रत्येकाने घेतली. ''श्रीं''ची तसेच त्यांच्याबरोबर दत्ता सप्रे, रघुनाथराव ह्या मंडळींची आश्रमात सोवळ्याने भोजन व्यवस्था होती. आम्हा सर्वांना कॉमन व्यवस्था होती.

द्वारका हे छोटेसेच गांव आहे. परंतु बंदर असल्याने ते दळणवळणास मोठे आहे. या गांवचे आसपास औद्योगिक विकास जोरात चालू आहे. रेल्वे, एस्.टी. आणि जलमार्ग या तीन मार्गाने येथून प्रमुख शहरांकडे जाता येते.

वेळेअभावी बेट द्वारका लाँचमधून जाऊन पहाण्याचा बेत रहित करावा लागला. आसमंतही बराच पहायचा राहीला.

सायंकाळी ४.४५ वाजता आम्ही द्वारका सोडली. पोरबंदर रस्त्यावर असलेल्या 'श्रीहरीसिद्धमाता' या देवीच्या देवळात आम्ही थोडा वेळ थांबलो. ही श्रीकृष्णांची कुलस्वामीनी असे म्हणतात. सायंकाळी ६.१५ ला आम्ही येथे पोहोचलो. येथील हे एक मोठे प्रसिद्ध मंदिर (स्थान) आहे. या देवळांत गाभाऱ्याचे बाहेर एक चांदीचा झोपाळा टांगलेला आहे. रात्री देवीची आरती सुरू झाली की, झोपाळा आपोआप हलायला लागतो. झोके चालू होतात. श्रीहरीसिद्धमाता आरतीस उपस्थित झाल्याचा हा संकेत आहे असे भक्त मानतात.

समुद्र किनारी वसलेले हे गाव प्रेक्षणीय आहे. श्रीकृष्ण म्हणे द्वारकेस आले तेव्हा येताना या समुद्रकिनारीच्या बागवान माळ्यांनी श्रीकृष्णांना शहाळी (कोवळे नारळ) व शहाळ्यांचे पाणी प्यायला दिले असे सांगतात.

पोरबंदरहून कुटीयान या मार्गे जुनागडला पोहोचायला रात्रीचे १०.३० वाजले. श्री. शुक्लाजींनी येथील उत्तम सोयीच्या धर्मशाळेत उतरण्यास बुकींग केले होते. परंतु डाकोरमध्ये बसच्या नादुरुस्तींमुळे आमचे पुढील कार्यक्रम २४ तासाने पुढे गेले. साहजिकच येथील बुकींग गेले. तरीही खटपट करून थोड्याच वेळात सुतार ज्ञातीच्या धर्मशाळेत उतरायला जागा मिळाली.

ही धर्मशाळा गिरनार पर्वत रस्त्याला लागूनच असल्याने उलट अधिक सोयीचे झाले. व्यवस्थाही उत्तम होती.

दि. १६.३.१९८५ ला सकाळी ८ वाजता निघून आम्ही वेरावळला म्हणजेच सोरटी सोमनाथला पोहोचलो. तसेच आम्ही त्रिवेणी संगमावर जाऊन स्नान केले. संगमावरून थेट मंदिरात सोमनाथाचे दर्शनास आलो. संपूर्ण देऊळ नव्याने बांधले आहे. गझनीच्या महंम्मदाने तोडलेल्या मूळ देवालयाचे जुने दगड अजूनही परिसरात विखुरलेले पहायला मिळतात. हे मंदिर अवाढव्य मोठे असून पिंडीही मोठी आहे. गर्दी नसल्याने निवांतपणे दर्शन मिळाले. देवाचे पिंडीसमोर ''श्री'' दहा मिनिटे स्वस्थ उभे राहून एक टक सोमनाथांच्या पिंडीकडे पहात होते. नंतर सभामंडपात ध्यानमग्न बसले होते. श्री. दत्ता सप्रे येताच त्यांना ''श्रीं''नी आवर्तने म्हणण्यास सांगितले. मंदिराला लागूनच असलेल्या महाराष्ट्र भवनाचे श्री. मोंडेकर यांना श्री. शुक्लाजी व मी भेटून आलो व ''श्रीं''ची सोवळ्यात भोजन व्यवस्था मंदिराचे ब्राह्मण किंवा पुजारी यांच्याकडे करता येईल का ते विचारले. त्यांनी कोणते व कोठले महाराज ती चौकशी केली. योगायोगाने ते स्वत: प.पू. गुळवणी महाराजांचे अनुग्रहीतच निघाले. ते प.पू. दत्तमहाराजांना ओळखत होते. ते स्वत:ही आचार संपन्न होते. ''श्रीं''नी त्यांच्याकडेच भोजन घ्यावे असा त्यांनी आग्रह धरला व म्हणाले, ''महाराज माझ्या घरी भोजनास आले तर मी माझे मोठे भाग्यच समजेन. मी त्यांना प्रार्थना करायला येतो. मला ते गुरुस्थानीच आहेत!'' अशाप्रकारे सोमनाथजींनी ''श्रीं''ची सोय केली. ''श्रीं''चे आन्हिक त्यांच्या घरीच झाले आणि भोजनही. आम्ही सर्व, बाजुच्या महिला मंडळाने सेवाभावाने अल्प दरात चालविलेल्या ब्राह्मण खानावळीत जेवलो.

''श्रीं''ची विश्रांती झाल्यावर १.४५ वाजता आम्ही जुनागडला जायला निघालो. वाटेत पुन्हा त्रिवेणी संगमावर जाऊन सुदामजींचे मंदिर पाहिले. तेथून श्रीकृष्णांना ज्या ठिकाणी पारध्याचा बाण पायाचे अंगठ्यास लागला ते ठिकाण पाहिले. त्याच जागेवर श्रीकृष्णाची

झाडाखाली छपरांत झोपलेली मूर्ती होती. मूर्ती उताणी विश्रांती घेत पहुडलेली, डावा पाय आखडून घेऊन ढोप्यावर उजवा पाय ठेवलेला. पाऊल म्हणजे लांबून हरणाचे मुख वाटत होते. उजव्या पायाचे आंगठ्यास बाण लागलेला, तो भिल्ल झालेल्या चुकीची क्षमा याचना हात जोडून करीत आहे. चेहऱ्यावर अपराधीपणाची भावना आहे, तर श्रीकृष्ण हसतमुख आहेत. तेथेच श्रीकृष्णांनी प्राण सोडला. नंतर त्यांचा देह पाच मिनिटाचे अंतरावर (प्रभासपट्टण येथे) भालकातीर्थ आहे, तेथे मोठी शिळा आहे, त्या शिळेवर ठेवला. त्या शिळेवरून श्रीकृष्णांचा देह अदृश्य झाला. त्या स्थानाला भालकातीर्थ म्हणतात. देहोत्सर्गाचे ठिकाण. देहोत्सर्गाबाबत ''श्री'' म्हणाले, ''श्रीकृष्णांना काही अग्निसंस्कार करावा लागला नाही. ते या स्थानांतून सदेहच वैकुंठाला गेले.''

ह्याच भालकातीर्थावर श्री राधाकृष्णांचे मंदिर आहे. त्यातील श्री राधाकृष्णांच्या मूर्ती ६ ते ७ फूट उंचीच्या असून संगमरवरी गुळगुळीत आहेत. अत्यंत देखण्या सुरेख असून रंगविलेल्या आहेत. या मूर्तींचे सौंदर्य अप्रतिम आहे. श्रीकृष्णांचे पायाला बाण लागला त्या स्थळी महाराज विसावले व भावावस्थेतच होते. एवढ्यात कुणीतरी, 'चला चला' म्हटले. ''श्रीं''चे ध्यान भंग पावले. ते उठले आणि तडक बसमध्ये जाऊन बसले. आमचा पुढचा गिरनारचा प्रवास सुरू झाला.

गिरनार पर्वताच्या पायथ्याशीच श्री. शुक्लाजींनी धर्मशाळा बुक केली होती. ''श्रीं''ची व आम्हा सर्व भक्तांची राहण्याची व्यवस्था उत्तम होती. आम्हांस धर्मशाळेत येऊन पोहोचण्यास रात्र झाली. भोजन व्यवस्था होती. रात्री भोजनोत्तर सर्व मंडळी लवकरच झोपली. दमलीही होती आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान लवकरात लवकर गिरनारच्या पायऱ्या चढण्यास सुरुवात करायची होती. प.पू. महाराज, सौ. आईसाहेब, रघुनाथराव, वासंती वहिनी आणि ज्यांना १० हजार गिरनारच्या पायऱ्या चढायची शक्ती नसेल असे भक्त लोक खालीच थांबणार होते. वृद्धांकरीता डोलीची व्यवस्था होती. शुक्लाजींनी ''श्रीं''ना विचारलेही पण ''श्री'' म्हणाले, ''आपल्याकडे सामर्थ्य नसताना दुसऱ्याच्या खांद्यावर बसून कशाला देवदर्शनास जायचे? आम्ही आपले खालीच नामस्मरण करीत बसू!'' श्री. शुक्लाजीही खालीच ''श्रीं''च्या जवळपास राहीले. ''श्रीं''नी सर्वांस जेवढ्या लवकर पायऱ्या चढण्यास प्रारंभ करता येईल तेवढ्या लवकर करा. स्नान वगैरे वाटेत अर्ध्यावर करता येईल. वरती वाटेत गोमुखी किंवा कुंडे स्नानाकरीता बांधलेली आहेत.

दि. १७.३.१९८५ रोजी ''श्रीं''ची आज्ञा व आशीर्वाद घेऊन आम्ही पहाटे चार वाजताच गिरनार चढायला सुरुवात केली. ''श्रीं''नी सुचविल्याप्रमाणे गोमुखीला जाऊन स्नान केले. तिथल्या बैराग्याने माणशी पन्नास पैसे घेतले. एक कुंड बांधलेले आहे. दोऱ्या

बांधलेल्या बादल्या ठेवलेल्या आहेत. बाजूला चौथरा आहे. आपण आपल्या हाताने पाणी काढून घ्यायचे. येथून पुढे लुटमारीचे भय असते. या ठिकाणी स्नानास आम्ही पहाटे ५.३० वाजता पोहोचलो होतो. येथे स्नान करता येईल का याची चौकशी करण्याकरीता तेथील बैराग्यांचे खोलीजवळ जाऊन विचारणा केली. तेथील सगळेच बैरागी सरळ उत्तर देणारे नव्हते. अत्यंत उद्धट होते. एकाने लांबूनच ते कुंड दाखविले. सर्वांची स्नाने आटोपल्यावर प्रत्येकाचे पैसे घेण्यास मात्र तो तेथे आला.

आमच्या बरोबरच पहाटे २ किंवा ३ पासून आबालवृद्ध मंडळी काळोखात गिरनार पर्वताच्या पायऱ्या चढताना दिसत होती. हिंदुंच्या बरोबर जैनही खूप असतात. वाटेत एक छोटेखानी अंबाजी मंदिर होते. तेथे टोल द्यावा तसे तो बैरागी प्रत्येकाकडून पैसे गोळा करीत होता. जाताना वाटेत अधून मधून चहाच्या टपऱ्या होत्या. खडी साखरेच्या पुड्या, हातात आधाराकरीता धरण्यास काठी, मध, लिंबू, लिंबू-सरबत असे विक्रेते बसलेले असतात. चढताना दम लागतो, अथवा घशास कोरड पडते म्हणून खडीसाखरेची व पाण्याची आवश्यकता भासतेच. अंधारात पायऱ्या चढण्याचा फायदा पहाटेची व रात्रीची थंड वेळ हे आहेच. शिवाय आपण किती अंतर तोडले व किती पायऱ्या अजून चढायच्या आहेत हे दिसत नाही. जर हे आपल्याला दिसले तर कदाचित आपला वर चढण्याचा आत्मविश्वास, डळमळीत होईल. आम्हीही हाताशी काठ्या आणि अधून मधून चघळायला खडी साखरेची पाकीटे घेतली होती. चढताना आपल्या पायाखालची पायरीच फक्त पहायची. जीवनात हेच तत्त्व स्वीकारायला हरकत नाही. मागे पायऱ्या किती टाकल्या-भूतकाळ विसरून जा. पुढे किती पायऱ्या चढायच्या आहेत. भविष्यकाळ पाहू नको. जे आज आता जी पायरी चढत आहेस त्या वर्तमानाकडेच लक्ष दे. म्हणजे गुरु दत्तात्रेयांच्या पादस्पर्शाचा आनंद मिळवशील. प्रयत्नशील राहणे, साधना करीत राहणे, एवढेच आपले काम.

आता झुंजुमुंजू व्हायला लागले होते. पक्ष्यांचे गुंजारव, सुखद थंड वाऱ्याची झुळूक याने मन उल्हासीत होत होते. पादुका दर्शन होणार हा आनंद मनी होताच. टप्याटप्याने आम्ही विश्रांती घेत चढत होतो. पुढे सहज नजर टाकली तर पर्वत शिखराचे टोक समोर दिसू लागले. मनास हायसे वाटले. ८ वांजता त्या शिखराच्या टोकावर येऊन पोहोचलो आणि गड जिंकल्याच्या आनंदात विसावा घेऊन, पादुका कुठे आहेत ते सोबतच्या काही अनुभवी मंडळींना विचारले. उत्तर आले, हे श्री गोरखनाथांच्या पादुकांचे शिखर स्थान आहे. आम्ही मनोभावे दर्शन घेतले. वाटले आता मच्छिंद्रादि नवनाथांना दीक्षा देणाऱ्या प्रभू दत्तात्रेयांच्या पादुका कुठे आहेत? उत्तर आले ते समोर आकाशास भिडलेले सुळाच्या आकाराचे डोंगराचे अग्रटोक दिसत आहे ना! तेच ते गिरनार पर्वतांतील 'श्री दत्तप्रभू पादुका स्थान.'

आपण ज्या गोरख शिखरावर आहोत येथून पुढे उतार होऊन खोल दरीतून पुन्हा त्या समोरच्या सुळक्याचा पर्वत चढायला सुरुवात करायची आहे. आले आता जवळ आले, आ गया अभी नजदीकही है असे म्हणायचे आणि चढ उतार चढ आक्रमायचे.

सकाळी ९.३० वाजता सुईच्या टोकासारख्या दिसणाऱ्या त्या टोकाग्रावर चढून आम्ही पोहोचलो. १० फूट बाय १० फूट किंवा १२ फूट बाय १२ फूट चौरस फूटाची जागा. मध्यावर चौरस भागात श्री प्रभुंच्या पादुका. ब्राह्मण म्हणजे हातात सिगरेट-विड्याची थोटके ओढणारे फाटकी पॅन्ट, फाटका शर्ट घातलेले दोघे गलीच्छ युवक २० वयाचे. गुजराथीत कसले मंत्र म्हणत होते कळत नाही. पण आम्ही ज्या पादुकांकरीता केला होता इतका अट्टाहास आणि इतका आटापिटा, त्या प्रभूंच्या पादुका आहेत हा मनी भाव दाटून भावभक्तीने डोळे मिटून मानस पूजन केले. ब्राह्मणाला दक्षिणा दिली. आसपास आणखी कोणी देवदेवता आहेत का ते पाहिले. पादुकांच्या थोड्या बाजूस कालीमातेची तसबीर होती. पादुकांचे मागचे बाजूस खड्यासारखी जागा होती. तिथे श्री नेमीनाथांची मूर्ती होती. त्या पुजाऱ्यांनी सुरुवातीस खात्री करून घेतली. विचारले, तुम्ही हिंदू आहात का जैन आहात? आपण हिंदू असल्याचे शपथेवर सांगावे लागते नंतरच ते आपली पूजा देवावर करण्याचे स्वीकारतात. जैन म्हटले तर हाकलून लावतात. पूर्वी म्हणे ह्या पादुकांवर देव्हारा होता. सन १९८०-८१ च्या दरम्यान वीज पडून तो भंगला. आम्ही पादुकांना अत्तर व अष्टगंध लेपन केले. प.पू. वासुदेवानंद विरचित स्तोत्रे म्हटली. श्री. दत्ता सप्रे यांनी रुद्राचे एक आवर्तन म्हटले. अगरबत्ती लावून नारळ फोडून नैवेद्य दाखविला. एवढे आटोपल्यानंतर आम्ही गटागटाने उतरण्यास प्रारंभ केला. पायऱ्या चढण्यापेक्षा उतरणे आपल्याला सहज सोपे वाटते. पण चढण्याने पोटऱ्यांचे-मांडीचे स्नायूंना ताण आल्याने उतरणे अत्यंत बिकट झाले. मांडीत, पायांत गोळे यायला लागले. एक एक पायरी उतरताना दक्षतेने उतरावी लागली, चढण्यापेक्षा उतरण्यास वेळ कमी लागला हे खरे परंतु धर्मशाळेत पोहोचल्यावर चालणे मुश्किल झाले. बादलीत गरम पाणी घेऊन त्यात पाय ठेवावे लागले.

धर्मशाळेत आम्ही सर्व पोहोचल्यानंतर प.पू. महाराज, सौ. आईसाहेबांना म्हणाले, ''अहो! ही भक्त मंडळी दहा हजार पायऱ्या चढून श्री दत्तप्रभूंच्या पादुकांचे दर्शन घेऊन तेवढ्याच पायऱ्या उतरून आली. खरं म्हणजे आपण या सर्व मंडळींच्या चरणाशी साष्टांग नमस्कार घातला पाहिजे. सर्व मंडळी पुण्यवान आहेत!''

सायंकाळी ४ वाजता ''श्रीं'' स्वत:हून म्हणाले, ''तुम्ही सर्व आमचे बरोबर चला. आम्ही तुम्हाला नरसी मेहतांची कोठी दाखवितो.''

बसमध्ये सर्व सामान कॅरीअरवर बांधून निघालो आणि प्रथम ''श्रीं''च्या सोबत नरसी मेहतांचे घर (कोठी) पाहण्यास गेलो. त्यांचे घर अजूनही उत्तम प्रकारे सुरक्षित ठेवले आहे.

ओवरी, माजघर, स्वयंपाकघर सर्व आतून बाहेरून पाहिले.

सायंकाळी ५ वाजता आम्ही जुनागड सोडले. आज एकादशीचा सर्वांस उपवास होता. पुढे वाटेत जैतपुर, भारद, वीरपूर,गोंडल, सामोद, आटकोट, धसा ही गांवे लागली. या मार्गे आम्ही भावनगर मधील सिहोर या श्री. शुक्लाजींचे गांवी येऊन पोहोचलो.

सिहोर येथील श्री. शुक्लाजींचा दुमजली प्रशस्त बंगला म्हणजे अत्यंत सुरेख बांधणीचा-शिल्पकलेचा एक उत्तम नमुनाच आहे. आसमंत आणि घरातील वातावरण सुद्धा प्रसन्न आणि आनंदमय आहे. ''श्रीं''ची तळमजल्यावर स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. तर आम्हा भक्त मंडळींस पहिल्या मजल्यावर जागा होती. सर्वांस गाद्या गिरद्या, परीट घडीचे पलंगपोस, चादरी, उशा होत्या.

१३९) सिहोर येथे गुजराथ दौऱ्याची सांगता!

रात्री सर्वांचा फराळ झाला. गप्पागोष्टी रंगल्या होत्या गच्चीवर! ''श्री'' व सोबतची तळमजल्यावरची मंडळी लवकर झोपी गेली. श्री. शुक्लाजी मला बोलावून एका बाजूला घेऊन गेले व त्यांनी त्यांची पत्नी काल रात्रीच मुंबईहून आली, तिने श्री. मुकावार यांनी दिलेले पत्र दिले व मला विचारले ''नागलेजी आपका कोई भांजा बिमार था क्या? वो गुजर गया!''

ते त्यांचे शब्द ऐकून माझे डोक्यावर वीज कोसळली. मी मोठ्याने आक्रोश करणार, पण ''श्रीं''नी मला माझ्या मनाला कसा आवर घातला, कोठून हा भयंकर संयम तत्क्षणी मला प्राप्त झाला? माझ्या नेत्रांतून घळघळा अश्रुधारा अविश्रांत पाझरत राहिल्या. आवंढा गिळण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीत होतो. श्री. शुक्लाजींनी मला जवळ घेऊन बराच वेळ ते पाठीवरून हात फिरवीत होते. मी मला कमालीचे सावरले.

शुक्लाजींनी मोठ्या भावभक्तीने अफाट कष्ट परिश्रम तेवढाच पैसा-धन वेचून ही गुजराथ-सौराष्ट्र यात्रा प.पू. महाराजांबरोबर सर्व भक्तांस घडविली. यजमान म्हणून ''श्रीं''ची जेवढी काळजी, व्यवस्था, बडदास्त ठेवली तेवढीच सर्व गुरुबंधू भक्त मंडळींची ठेवली. उद्या ह्या सर्व धार्मिक कार्यक्रमाची सांगता ते प.पू. श्रीमहाराजांची पाद्यपूजा आणि मिष्टान्न प्रसाद भोजन ठेवून करणार आहेत. या गच्चीवरून मागील बाजूस खाली पहा, मोठमोठ्या भांड्या-कढयातून सोवळे नेसलेले आचारी पंचपक्वान्ने शिजवीत आहेत. अशा मंगलमय वातावरणात श्री. शुक्लाजींच्या पूजाविधीच्या सांगतेत दु:खाने सर्वांच्या आनंदात विरजण पडू नये म्हणून मी शुक्लाजींना सर्व शोक आवरून म्हटले, ''आपल्या सद्गुरुंच्या पाद्यपूजेचा सोहळा तसेच प्रसाद भोजन संपन्न होत आहे. तेव्हा ही बातमी सर्व समारंभाची समाप्ती

आणि या यात्रेची सांगता होईपर्यंत अत्यंत गुप्त राहू द्या. माझ्या मनाला मी सांभाळीन. माझे गुरुदेव मला सामर्थ्य, धीर देतील. माझ्या बाबतीत आपण निश्चिंत असा. मी मात्र पूजाविधीत सामील न होता मला वरतीच राहू द्या. प.पू. महाराजांचे भोजनोत्तर विश्रांतीनंतर मी खाली येऊन ही दु:खद वार्ता ''श्रीं''च्या कानावर घालीन. आपण गुरुसेवेत पाद्यपूजेत संपूर्ण मन घालून एकाग्र व्हा, मन विचलीत होऊ देऊ नका.''



१४०) चि. श्रीपाद श्री चरणी लीन!

दुसऱ्या दिवशी सर्व कार्यक्रम यथासांग यथाविधी पार पडला. श्री. शुक्लाजी वर येऊन मला कडकडून मिठी मारून ढसढसा रडले आणि म्हणाले, ''नागलेजी मैं आपके आभार कैसे अदा करू? आपको कैसे धन्यवाद दूँ? कितना कठोर संयम आज आपने मेरे लिये संभाला है।'' मी म्हटले, ''शुक्लाजी तुम्हाला आम्हाला सांभाळणारा संयम देणारा तोच तो एकमेव सद्गुरु आहे.''

शुक्लाजी मला धरून खाली प.पू. महाराजांच्या समोर घेऊन गेले. श्री. शुक्लाजींनी प.पू. महाराजांकरिता सिंहासनासारखी मोठी खुर्ची बसण्यास दिली होती. महाराज खुर्चीवर विराजमान होते. मी सद्गदीत दु:खी अंत:करणाने वाकून नमस्कार घातला आणि ''श्रीं''च्या कानावर ही दु:खद घटना घातली.

''महाराज आपला श्रीपाद गेला! गेल्या संकष्टीच्याच दिवशी.''

''श्री'' हळहळले. त्यांचे नेत्रांतूनही अश्रू वाहिले. ''शेवटी असेच झाले का?'' असे म्हणून स्तब्ध झाले. काही वेळानंतर माझे सांत्वन करीत म्हणाले, '''अहो तो एक पुण्यात्मा होता. गतजन्मीचा योगभ्रष्ट महापुरुष होता. एवढ्या बालवयात एवढ्या तीर्थयात्रा, धार्मिक कार्यक्रम, संतसंग हे सर्वांनाच मिळते का?'' ही बातमी ऐकल्यानंतर पुढचा दौरा रद्द करून ज्यांना जायचे असेल त्यांना आज रात्रीच्या गाडीने परतायला ''श्रीं''नी अनुमती दिली. पुढे ''श्री'' म्हणाले, ''आमचा अहमदाबादचा कार्यक्रम जाहीर झालेला नसता तर आम्हीही येथून थेट तुमच्याबरोबर मुंबईस शृंगारपुरेंकडे आलो असतो.''

श्री. शुक्लाजींना प.पू. महाराजांनी त्यांनी आखलेल्या व घडवून आणलेल्या कार्यक्रमाबद्दल भरपूर कौतुकाचे बोल दिले. त्यांना पूर्ण समाधान दिले.

श्री. शुक्लाजी आम्हा सर्व भक्तांना कार्यक्रम समाप्तीनंतर म्हणाले, ''आजपर्यंत मी प्रसिद्धीच्या शिखरावर असलेले अनेक सत्पुरुष पाहिले, त्यांचे उदो उदो, जयजयकार ऐकले, त्यांचे सहवासांतही मी बराच काळ राहीलो. पण प.पू. श्रीदत्तमहाराजांसारखा प्रसिद्धी

पराङमुख विनयपूर्ण महापुरुष कधीही पाहिला नव्हता. खरा संत, खरा सत्पुरुष कसा असतो तर पूजनीय सद्गुरु दत्तमहाराजांसारखा. तुज सम तूंच। नच अन्य कोणी।।''

सायंकाळी चार नंतर आम्ही सर्व बसने अहमदाबाद येथे निघालो. मी, मुजुमदार, तांबोळी, तावडे व डांगे आम्ही रेल्वेने मुंबईस परतलो.



१४१) आध्यात्मिक मृत्यू!

भाचा श्रीपाद आजारी झाल्यापासून आम्ही सर्व कुटुंबीय व प.पू. महाराजांचे भक्त त्यांनी दिलेली अनुष्ठाने, जप, नामस्मरण करीत होतो. स्वतः ''श्रीं''नीही श्री वासुदेव निवासांतील दत्तपादुकांवर अभिषेक चालू ठेवला होता. इतकेच नाही तर शृंगारपुरे यांच्या परिचयाचे जे साधक, गुरुबंधू ''श्रीं''कडे श्रीपादचे आरोग्याप्रीत्यर्थ प्रार्थना करीत त्यांनाही ''श्री'' जपानुष्ठान देत व श्रीपाद करता हा जप चालू ठेवा सांगत. जेव्हा जेव्हा श्रीपाद (निषाद) याची प्रकृती अत्यवस्थ होई तेव्हा तेव्हा आमच्यापैकी कोणीतरी पुण्यास श्री रेणुका निवासात ''श्रीं''कडे धाव घेई. ''श्री'' अंगारा देत. नामस्मरण सांगत. दरवेळी धीर देत. सकारात्मक बोलणारे महाराज कधीही चिंता व्यक्त करीत नसत. ''जप नामस्मरण चालू ठेवा, होईल बरा!'' असे महाराज म्हणत. सद्गुरु सत्पुरुष असत्य वचने कधीच देत नसतात-बोलत नसतात. आम्हा गुरुभक्तांचा माझा, भाऊसाहेब शृंगारपुरे तथा सौ. प्रभा आमचा देवाधिदेव एकच होता, आहे आणि राहील. तो ईश्वर भगवंत म्हणजे आमचे सद्गुरु प.पू. दत्तमहाराज. ''श्री'' म्हणत आहेत तर श्रीपाद निश्चितच बरा होईल अशी आम्हा सर्वांची खात्री होती. कितीही असाध्य आजार असला तरी ''श्रीं''च्या कृपेने चमत्कार घडेल, आमचा बाळ बरा होईल ही भावना, ही श्रद्धा होती. परंतु एकदा श्री वासुदेव निवासात प.पू. श्रीमहाराज नेहमी बसायचे त्याच जागेवर पहिल्या मजल्यावर खिडकी खाली बसले होते. माझे श्री वामन निवास करता नित्य जाणे-येणे असले तरी श्रीपाद यास रक्त देण्याकरीता हॉस्पिटलला दाखल केल्याचे सांगायला मी आलो होतो. त्याचे प्रकृतीचा सर्व अहवाल कथन करून मी त्यांच्यासमोर परंतु एका बाजूस कोपऱ्यात बैठकीला-ध्यानास बसलो होतो. सायंकाळी ४ ते ५ चा सुमार असेल. कोणी एक पोक्त व्यक्ती ''श्रीं''च्या पुढे तक्रार करीत होती. त्यांचा नातू का कोणी अल्पवयी मुलगा दगावला होता. त्याचे म्हणणे होते आम्ही गुरुमहाराजांचे भरवशावर होतो. तुम्ही सांगाल ती जप अनुष्ठाने करत होतो. आपणही म्हणत होतात तो बरा होईल. मग हे असे कसे घडले?

''श्रीं''नी उत्तर दिले, ''ह्या सर्व ईश्वरी इच्छेच्या आणि आपल्या प्रारब्धाच्या गोष्टी आहेत. घडणारे अटळ आहे ते देवादिकांनाही टळलेले नाही.''

गृहस्थ - तुम्ही संत महात्मे आहात. पुढे घडणारे सर्व आपल्याला कळत असते. आपणास सर्व काय घडणार ते माहीत होतं मग उगाच आम्हाला आशा का लावली?

''श्रीं'' - अहो, तुमच्या म्हणण्याप्रमाणे पुढे घडणारे आम्हाला कळते हे जरी मानले तरी ते येणारे संकट ती दुःखद घटना आधीच तुम्हाला आम्ही सांगायची का? अशाने त्या आजारी रुग्णाकडे पहाणे, त्याची सेवा करीत रहाणे हे तुमच्याकडून घडेल का? हे कटु सत्य आम्ही सांगू शकत नाही.

गृहस्थ - इतकी अनुष्ठाने, डॉक्टरी इलाज मग कशाला करायचे?

''श्रीं'' - अहो, ज्याचे आयुष्य कमीच आहे त्याला देव तरी काय करणार? महाभारताच्या युद्धात अभिमन्यूचा वध झाला तेव्हा त्याचा मामा श्रीकृष्ण, साक्षात परमेश्वर युद्ध भूमीवर उपस्थित होता ना? मग त्या भगवान श्रीकृष्णांना आपल्या भाच्याचे प्राण वाचविता आले का? का नाही आले? याचे कारण असे, मृत्यू तीन प्रकारचे असतात. **१) आधिभौतिक, २) आधिदैविक आणि ३) आध्यात्मिक. आधिभौतिक मृत्यू डॉक्टरी, वैद्यकीय उपचाराने टाळतां येतात. आधिदैविक मृत्यू दैवी उपचाराने, जप, अनुष्ठाने, होम, याग, ग्रहशांती अशा उपचाराने टाळता येतो. परंतु आध्यात्मिक मृत्यू अटळ असतो. तो टाळता येत नाही.** नियतीने ब्रह्मदेवाने त्याच्या विधी लिखीतात तेवढेच आयुष्य दिलेले असते. काही वेळा असेही होते की एखादा मोक्षाकरिता साधना करणारा योगभ्रष्ट, उरलेले काही प्रारब्ध संपविण्यास नाईलाजाने जन्म घेतो. ईश्वराकडून वचन घेऊन तो जीवात्मा इतके महिने इतकी वर्षेच देह धारणेत ठेवीन म्हणून जन्मास येतो. मुदत संपताच ईश्वराला दिलेले ते वचन पाळावे लागते. तेव्हा आपल्याला हे काही ''श्री'' दरबारीचे माहीत नसते. आपले हातात फक्त प्रयत्न असतात. डॉक्टरी वैद्यकीय उपचार-पथ्यपाणी सांभाळीत रहावे, देवाची प्रार्थना जपानुष्ठान जे जे शक्य ते करीत रहावे. बाकी ईश्वरी इच्छेनुसारच घडणार आहे हे ध्यानी ठेवावे.

हे संवाद म्हणजे ''श्रीं''नी आमच्याही डोळ्यात अंजन घातले होते. श्रीकृष्ण स्वतः ईश्वर असून काही करू शकला नाही. ''श्रीं''नी बातमी ऐकताच म्हटले, ''श्रीपाद एक योगभ्रष्ट महापुरुष होता. उर्वरित प्रारब्ध भोगून तो मुक्तीमोक्ष घेऊन श्रीचरणी वैकुंठास गेला. बालवयात एवढ्या तीर्थयात्रा, एवढा सत्संग कोणास मिळतो?

मागे मी ''श्रीं''च्या पुढे बसलो व काऊंटर वापरून जप केला तरी चालेल का जपाला जपमाळाच लागते हा प्रश्न विचारला असता त्या फाल्गुन वद्य संकष्टी चतुर्थी ह्या दिवशी श्री मौनात होते. कारण दुपारी दीडच्या सुमारास चि. श्रीपाद (निषाद) याचे श्रीस्वरुपी विलीनीकरण होत होते.

अहमदाबादहून दादरला पोहोचताच महाराज व सौ. आईसाहेब स्टेशनवरून प्रथम श्री. तांबोळींकडे आले. नेहमीच्या पद्धतीने श्री. तांबोळी यांनी ''श्रीं'' करता पायघड्या अंथरून दारात पाट मांडून ''श्रीं''च्या पायावर घालण्यास समशीतोष्ण दूध पाणी, पाय पुसण्यास वस्त्र व आरतीची तयारी ठेवली होती. परंतु महाराज गाडीतून उतरून श्री. तांबोळींना अंगणात येताच काठीने पायघड्या बाजूस सारून दारांतील सर्व साहित्य बाजूस करण्यास सांगितले. सरळ आत शिरले. सामान वगैरे उतरवून मुखमार्जन करून लागलीच प.पू. महाराज व सौ. आईसाहेब चेंबूरला श्री. शृंगारपुरे यांच्या घरी दि. २१.३.१९८५ रोजी श्रीपादच्या तेराव्या दिवशी सकाळी नऊ वाजता आले. ''श्रीं''चे व सौ. आईसाहेबांचे उभयतांनी हसतमुखाने स्वागत केले. परंतु ''श्री'' स्थानापन्न होताच सौ. प्रभाने ''श्रीं''च्या मांडीवर डोके ठेवून दाटलेला ऊर मुक्त केला. ''श्रीं''नी उभयतांचे डोक्यावरून, पाठीवरून वात्सल्याने हात फिरविला. थोडावेळ थांबून नंतर ''श्रीं''ना व सौ. आईसाहेबांना माटुंग्यास श्री. तांबोळींकडे सोडले.

१४२) पुन्हा नित्यक्रमाकडे!

ह्याच कालवधीत माझ्या बोरीवलीच्या कामात अनेक भानगडी उपस्थित होऊन न्यायाकरिता शेवटी कोर्टाची पायरी चढावी लागली. एकीकडे दु:खावेग, दुसरीकडे कामाचा मानसिक ताण आणि तिसरीकडे प्रापंचिक आणि आध्यात्मिक कर्तव्ये. पण ह्यातून निभावून नेण्यास सद्गुरुच मार्गदर्शक असतात. ''श्रीं''नीच सर्व प्रसंगातून सावरले.

दि. १८.६.१९८५ रोजी पुण्यास गेलो. ''श्रीं''चे दर्शन घेतले. श्री. जगनशेठ धन्नावत आणि चंदूशेठ जालन्याहून आले होते. दि. १९ ला त्यांच्याबरोबर मिटींग होऊन त्यांनी श्री गुरुनिवासाच्या (श्री रेणुका निवासला लागून होणारे) बांधकामाबद्दलचे सर्व प्लॅन्स समजावून घेतले. दि. २० ला प.पू. महाराज व जगनशेठ यांच्या सोबत देऊळगावराजाचे धर्मशाळेच्या बांधकामाबाबत मिटींग झाली. दि. २१ ला सकाळी 'श्री वामन निवास' साईटवर कामाचे प्रगतीबद्दल मिटींग झाली.

दि. २८.६.१९८५ रोजी ''श्रीं''चे आगमन दादर स्टेशनवर सायंकाळी ७.१५ वाजता झाले. आषाढी एकादशीस सालाबादप्रमाणे ''श्री'' बोरीवलीस सौ. नीलाताई जोशींकडे आले होते. दि. २९ ला आषाढी एकादशी होती. बोरीवलीस दर्शन घेतले. दि. १.७.१९८५ रोजी पुण्यास गेलो.

दि. २.७.१९८५ रोजी गुरुपौर्णिमा श्री वासुदेव निवासांत साजरी झाली.

दि. २६.७.१९८५ रोजी आम्ही काही गुरुबंधू श्री. मुजूमदार, म्हसवडकर वगैरे जालन्यास

गेलो. सकाळी १०.३० ला पोहोचलो. ''श्रीं''चे तसेच प.पू. सौ. ताई महाराजांचे दर्शन झाले. आज २७.६.१९८५ रोजी सकाळी 'विष्णू यागाचा' प्रारंभ झाला. मी, मुजुमदार व म्हसवडकर मात्र दि. २८ ला रात्री परत फिरलो व २९ ला सकाळी श्री वामन निवासच्या कामावर हजर झालो.

दि. २९.८.१९८५ रोजी नारळी पौर्णिमेच्या दिवशी गुरुवारी ''श्रीं''चे तसेच प.पू. सौ. ताई महाराजांचे श्री रेणुका निवास मध्ये दर्शन झाले. सौ. सुलभाताईंच्या सोबत पुण्याहून माटुंग्यास दि. १ सप्टेंबर रोजी परत आलो.

दि. ३०.९.१९८५ रोजी श्री वामन निवासाची साईट! दि. २.१०.१९८५ रोजी संकष्टीच्या दिवशी प.पू. सौ. ताई महाराजांबरोबर गुरुनिवास बांधकामाच्या मुहूर्ताबद्दल चर्चा झाली. श्री. एस्.व्ही. मुजुमदार व म्हसवडकर उपस्थित होते.

''संमिश्र स्वैर आठवणी''

१४३) गुलाबाचे फूल

कु. वंदना ही आमच्या ओळखीतील गरीब कुटुंबातील मुलगी! आम्ही तिला आमचे घरी आमचे धाकटे चिरंजीव अभिजीत, वय वर्षे ५, याला सांभाळण्यास व त्याच्याबरोबर खेळण्यास ठेवले होते. वंदनाही १० वर्षांचीच होती. प.पू. महाराजांच्या प्रत्येक कार्यक्रमात बाळ अभिजीत बरोबर आम्ही तिलाही नेत असू. आम्हा गुरुबंधूंचे धुनचे कार्यक्रम होत. दिगंबराची धून निरनिराळ्या गुरुबंधूंच्या गोड चालीत संगीतासह गायली जाई. ही मुलगीही धुनला बसत असे. भावभक्तीचे संस्कार आपोआप तिच्यावर घडत होते. घरी सौ. लता तिला शिकवत असे. तिला लिहीता वाचता येऊ लागले. दुकानाची खरेदी हिशेब ती शिकली. घरात सौ. लताच्या हाताशी कामेही करायची. मध्येच दिगंबराच्या मधुर चालीची लकेर तिच्या मुखांतून बाहेर यायची. आम्हालाही बरे वाटायचे कारण ती लकेर ऐकून आमचेही मनी, मुखी ती चाल रूळायची.

एकदा प.पू. गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथीस आम्ही श्री वासुदेव निवासांत पुण्यास गेलो होतो. साल असेल १९८१ अर्थात कु. वंदनाही आमच्या सोबत होती. आम्ही आमच्या साधनेत व्यग्र होतो. वेळ सकाळची होती. वंदना बाळ अभिजीतला आश्रमाच्या बाहेरील अंगणात खेळवीत होती. इतक्यात एक मुलगा गुलाबाचे भरपूर गुच्छ घेऊन आला. जात्याच वंदनाला फुलांची आवड! ती धावत त्याच्याजवळ गेली व एखादे फूल देण्याबद्दल मिनतवारीने विनवणी करू लागली. पण देवाकरिता आणलेली ती फुले, त्यांतील फुल तो मुलगा हिला कसे देईल?

वंदना फार नाराज झाली. सौ. लताची तिची नंतर भेट होताच तिने ''त्या ब्राह्मण मुलाने किती छान छान गुलाबाची फुले आणली, पण मी त्याच्याकडे फक्त एकच फूल मागितले तर त्याने मला ते दिले नाही!'' असे सांगितले. सौ. लताने तिची समजूत काढली, ''अगं, ती देवाकरिता आणलेली फुले, एखादे जरी आपण आपल्या करता घेतले तर ती सर्व फुले उष्टी होतात म्हणून त्याने तुला ते दिले नाही.''

सालाबादप्रमाणे सायंकाळी रथयात्रा निघाली. रथ पुष्पांच्या माळांनी, पुष्प गुच्छांनी सजविला होता. रथाचे मध्यावर उच्चासनावर श्री गुरुमहाराजांचा फोटो ठेवला होता. फोटोच्या उजवीकडे प.पू. बाबा महाराज मानवतकर शुभ्र वस्त्रांत बसले होते. शुभ्र दाढी शोभून दिसत होती. उजवीकडे प.पू. दत्तमहाराज आपले नेहमीच्या पेहरावात स्थानापन्न होते. भक्त मंडळी रथ ओढीत होती. रथापुढे बॅण्ड पथक, दिगंबराची धून म्हणणारे झांज पथक, त्याच्या मागे भजनी मंडळ, लेझीम, मध्ये काही भक्तमंडळी तल्लीन होऊन नाचत होती. सुवासिनी व कुमारिका फुगड्या घालीत होत्या. अशी ही मिरवणूक कर्वे रोडने चालली होती. श्रींचे दर्शन होत रहावे म्हणून आम्ही रथाच्या जवळ जवळ रहात होतो. अभिजीतचा हात धरून कु. वंदनाही रथाचे जरा पुढेच होती. तेवढ्यात इतक्या अफाट गर्दीत प.पू. महाराजांनी अंगुलीनिर्देश करून एका सेवेकरी भक्तास सांगितले, ''ती झगा घातलेली, बाळाचे बोट धरून चाललेली मुलगी आहे ना! तिला इकडे बोलवा!'' त्या सेवेकराने वंदनास सांगितले, ''महाराज तुला बोलावित आहेत!''

वंदना अभिजीतसह रथाजवळ गेली. रथ थांबला होता. नाक्यावर खेळ, फुगड्या रंगल्या होत्या. वंदनाने डोके ठेवून रथांतील महाराजांना नमस्कार केला. प.पू. महाराजांनी तिला खडीसाखरेचा प्रसाद देऊन एक सुंदर असे गुलाबाचे फूल तिच्या हाती देत म्हटले, ''हे घे बाळ! तुला दिले आहे हे!'' असे म्हणून त्यांनी अभिजीतला आपल्या शेजारी त्याच्या हातात खडीसाखर देऊन बसवून घेतले. सौ. लताबाई चिरंजीवांचे डोके श्रींच्या चरणी टेकविण्यास आल्या होत्याच. त्यांनाही गुलाब पुष्पाचा लाभ झाला.

कु. वंदनाने ते गुलाबाचे फूल प्लास्टिकच्या पिशवीत बंद करून सांभाळले. पुढील आयुष्यांत आपले सांसारिक जीवन, ती आनंदात व्यतीत करीत आहे आणि प.पू. महाराजांनी माझ्या जीवनात गुलाब फुलविला अशी तिची भावना आहे.

१४४) आरतीमध्ये रुपया!

दि. १० एप्रिल १९८१ मध्ये प.पू. दत्तमहाराजांचे आगमन आमच्या हरिहरेश्वर घरी होणार हे नक्की झाले होते. मी व माझी थोरली बहीण सौ. शारदा कुळकर्णी. आम्हा दोघांस एकाच वेळी एकाच दिवशी प.पू. महाराजांकडून अनुग्रह प्राप्त झाला होता. तिला प.पू. महाराजांच्या दर्शनाची अत्यंत ओढ असे पण घरच्या अनेक अडचणींमुळे तिला ते शक्य होत नसे. 'श्रीं'चे हरेश्वरी आगमन होणार म्हणून ती बहरून गेली होती. तिलाही माहेरी हरेश्वरी हा आनंद लुटायचा होता. मी तिला गाडीने आईसोबत आधीच हरेश्वरी नेण्यास तयार होतो. पण तिला ते शक्य नव्हते. याचे स्पष्ट कारण असे सौ. ताईला अधून-मधून फिट (मूर्च्छा) येत असे. त्यामुळे तिची मुलेच नव्हे तर यजमान सुद्धा तिला बैठकीलाही बसून देत नसत! त्यांना वाटायचे ध्यान धारणा बैठकीत ही मूर्च्छा येऊन पडली तर कळणार कसे? म्हणून त्यांना भीती वाटे. व्यावहारिक ऐहिक जीवनात त्यांची भीती त्यांची धारणा बरोबरही असेल कदाचित! पण ती त्या आनंदास मनाची ओढ, तळमळ असून पारखी होई. यजमान कामावर व मुले शाळा कॉलेजात गेली की बैठकीच्या आनंदाची संधी ती सोडीत नसे. साहजिकच प.पू. महाराजांच्या सहवासात रहायला मिळावे असे तिला वाटत होते. मीही तिला महाराजांचा पुढे होणारा हरेश्वरचा आगमन सोहळा कल्पनेने रंगवून सांगत होतो, जेणेकरून तिने यावे हीच माझी इच्छा! परंतु तिची आंतरिक तळमळ तिला मनातच दाबावी लागली. मी तिच्यापुढे वर्णन केले होते ते तिच्या सतत डोळ्यापुढे दिसत होते. मी मुलांना व आमच्या मेहुण्यांनाही परोपरीने सांगून पाहिले. परंतु त्यांनी तिला हरेश्वरी नेण्यास परवानगी दिली नाही.

प.पू. महाराजांचे आगमनाचा दिवस उगवला. सौ. शारदाताई (मालाड येथील घरी) पहाटे उठली. तिने पतीराजांचा डबा, मुलांचे शाळेत-कॉलेजात जाण्यापुर्वीचे फराळ करून सर्व साफसफाई करून देवांची पूजा आटोपली. सर्व मंडळी घरातून गेल्यानंतर तिने देवांना प.पू. महाराजांना पुष्पहार अर्पण करून, ताम्हणांत तुपाचा दिवा निरांजन समोर महाराजांना ओवाळण्यास ठेवून देव्हाऱ्या समोर काही अंतरावर कंबळ आसन घालून बैठकीला बसली. आपण सर्व आटोपून कधी एकदा आसनावर बैठकीला बसतो असे झाले होते तिला! माझे गुरुदेव माझ्या माहेरी येणार ह्या विचारानेच तिला अंतरांत होणारी स्पंदने, उठणाऱ्या उर्मी बैठकीकडे खेचत होत्या. प.पू. महाराजांच्या हरेश्वर घरी होणाऱ्या आगमनाचे वेळे आधीच तिचे बैठकीत बेभान होऊन डोळे मिटले. नेत्रांपुढे चलचित्रपट सुरू झाला.

सद्गुरु श्री दत्तमहाराज अंगणांत गाडीतून उतरताहेत, फटाक्यांचा कडकडाट, फोटो कॅमेऱ्याचे विद्युत झोत, श्रवणास आनंद देणारे सनईचे स्वागताचे सूर, महाराज पायघड्यांवरून अंगणातून ओटीवर, नंतर प्रमुख द्वारापुढे पाटावर उभे आहेत. भक्त मंडळी दिगंबराचा गजर

करीत आहेत. फुलांचा पाऊस पडत आहे. नऊवारी साडीत असलेल्या सर्व सुवासिनी 'श्रीं'ना औक्षण करून ओवाळीत आहेत. ओवाळताच प्रत्येक सुवासिनीचे आरतीत ताम्हणांत श्री स्वहस्ते रुपया टाकीत आहेत. सौ. शारदाताईनेही बैठकीत ध्यानावस्थेत श्रींना निरांजन ओवाळले. श्रींनी ताम्हणात-आरतीत रुपया टाकला. 'खण्‌ण्‌' आवाज झाला. सौ. ताईचे त्या आवाजाने डोळे उघडले गेले. काय पाहिले? ताम्हणात निरांजन दीप तेवत होता आणि निरांजनापुढे पडला होता "एक रुपया!"

सर्व अष्टसात्विकभाव दाटून आले. नेत्रांतून अश्रूधारांचा पूर वाहिला. कोणी टाकला माझ्या ताम्हणात रुपया? घराची दारे खिडक्या बंदच होत्या! घरात तर कोणीही नव्हते.

सौ. शारदाताईने भावभक्तीने रुपया कपाळास लावला. हा चमत्कार तिने मी हरेश्वरहून येताच मला हे केव्हा कधी कसे घडले ते सविस्तर सांगितले. हरेश्वरी श्रींच्या आगमनाची, त्यांना सुवासिनींनी ओवाळण्याची वेळ आणि ताईचे आरतीत रुपयाची ओवाळणी-प्रसाद मिळण्याची वेळ एकच होती.

आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ताईने तो 'प्रसाद रुपया' देव्हाऱ्यात भावभक्तीने पूजला.



१४५) आमच्या सौभाग्यवती स्नेहलता हिचे अनुभव (तिच्याच शब्दात)

मनांतील भाव महाराज ओळखतात व त्याची जाणीव आपल्याला देतात. त्याचे दोन अनुभव पुढे देत आहे.

१) साध्या साध्या गोष्टीतून देखील प.पू. महाराज सर्वज्ञ आहेत याची प्रचिती येते. मुंबई-गोरेगांव येथील आमच्या घरी श्रीगणेश जयंतीच्या रात्री प.पू. महाराज मुक्कामास आले व दुसऱ्या दिवशी पारणे करूनच पुण्यास गेले. मी माझ्या नणंद सौ. प्रभाताईस म्हटले की, बरीच माणसे जमली आहेत. त्यातून प.पू. महाराज हीच नागल्यांची पत्नी म्हणून ओळखणार नाहीत. प.पू. महाराजांच्या आगमनाने आणि गणेशजयंती उपवासाचे पारणे दुसऱ्या दिवशी आपल्याकडेच ही गणेशमूर्ती करणार, हे पाहून मला काय काय करू असे होऊन गेले. प्रसाद भोजनास मी चक्क चौदा प्रकारची पक्वान्ने केली. जेवण होऊन श्रींची विश्रांती झाल्यावर मी व प्रभाताई श्रींच्या दर्शनास गेलो. प्रभाताईंनी मला पुढे करून पहिला नंबर दिला. मी समोर जाऊन डोके टेकून नमस्कार केला. मिश्कीलपणे आणि कौतुकाने हसत माझ्याकडे पहात मला म्हणाले, "काय आपले जेवण झाले की नाही? बराच त्रास घेतलात. तुम्ही केलेले

नाचणीचे सत्व आणि उकडीचे मोदक छानच झाले होते. तिकडे सुलभा आहे का?'' आवाज ऐकून सौ. सुलभाताई लागलीच आल्या. महाराज त्यांना म्हणाले, ''ते नाचणीचे सत्व, काय ते खांडवी म्हणतात, तो पदार्थ कसा करतात ते यांना विचारून घ्या! पौष्टिक आहे ते सत्त्व!'' नंतर माझ्याकडे पाहून म्हणाले, ''बऱ्याच दमला असाल, जरा विश्रांती घ्या!''

आपल्या संभाषणांतून प.पू. महाराजांनी मला सूचित केले की, आम्ही तुला ओळखतो. माझ्या सारख्या सामान्य स्त्रीच्या हातची पक्वान्ने श्रींनी गोड करून स्वीकारली. ग्रहण केली हे माझे परमभाग्य होय. माझ्या आयुष्यात यापेक्षा परम आनंदाचा क्षण दुसरा कोणता असणार?

२) १९८१ च्या प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथी करता आम्ही मुलांसह श्री वासुदेव निवासात गेलो होतो. रात्रीची रथयात्रा होऊन आश्रमात रात्रीचे भोजन आटोपले आणि माझ्या धाकट्या मुलास अभिजीतला ताप भरला. आश्रमांतील सर्वांची जेवणे होईपर्यंत मी एका कोपऱ्यात त्याला मांडीवर घेऊनच बसले होते. मुंबईहून आणि आसपासचे गांवाहून खूपच भक्त मंडळी येऊन आश्रम गच्च भरला होता. वरचे खालचे दोन्ही हॉल पूर्ण भरलेले. मुलाला झोपविण्यास व त्याच्या शेजारी बसण्यास कोठेच जागा मिळेना! शेवटी स्वयंपाकाशेजारी कोठीच्या खोलीत झोपायला गेले तर तेथील स्वयंपाक करणाऱ्या बाया ओरडू लागल्या. म्हणाल्या, ''येथे आम्ही सर्व आचारी बायका झोपणार आहोत. तुम्ही मुलाला घेऊन दुसरीकडे जा! येथे झोपवू नका!'' मला वाईट वाटले. मनात विचार आला, ''महाराजांच्या आश्रमात, ताप आलेल्या लेकराला सुद्धा झोपण्यास जागा मिळू नये?'' मला रडूच येऊ लागले. दुसऱ्या दिवशी दुपारी प.पू. महाराजांचा निरोप घेण्यासाठी आम्ही उभयता गेलो असतां महाराज अगदी सद्गदीत दिलगीर स्वरात म्हणाले, ''आपण मुलाबाळांना घेऊन आलात! बरे केलेत. पण काल रात्री मात्र आपली झोपण्याची फारच गैरसोय झाली ना?''

हे वाक्य ऐकून मला लाजल्यासारखे झाले. वास्तविक त्या रात्री महाराज मुक्कामास आश्रमातही नव्हते व ही गोष्ट त्यांच्या कोणी कानावरही घातली नव्हती!

सद्गुरु सतत आपल्या सन्निध असतात. पाठीराखे असतात, हेच खरे नव्हे का? पण आम्हा अज्ञ जनांस ते कळत नाही.

१४६) स्वप्नी दृष्टांत 'श्रीं'चा पत्ता

दिनांक २७.११.१९८० ते ४.१२.१९८०

श्री माधवराव सौ. सुलभाताई तांबोळी यांच्या घरी माटुंगा येथे 'श्रीमत् भागवत सप्ताह' चालू होता. रोज दुपारनंतर अडीच तास प.पू. महाराजांचे त्यांवर प्रवचन होत होते. या

सप्ताहातच एके दिवशी दुपारनंतरच्या प्रहरात एक वृद्ध ब्राह्मण जोडपे तांबोळी यांच्या घरी आले. सद्गृहस्थ धोतर, कोट, टोपी मध्ये तर त्यांच्या पत्नी नऊवारी साडीत होत्या. पत्ता पुरेसा नव्हता. 'कल्याण निवास,' किंग्ज सर्कल एवढाच पत्ता त्यांच्याकडे होता व ''तांबोळी'' यांचे नाव. त्यांना योगदीक्षेची तळमळ लागली होती व ती प्राप्त होणास प.पू. गुळवणी महाराजांनी स्वप्नांत दृष्टांत देऊन, प.पू. श्रीदत्तमहाराजांचा (भेटण्याचा पत्ता देऊन) या आठवड्यात श्रींकडे जाण्याचा आदेश दिला होता. श्रींची व त्यांची भेट झाली. पुढचे कळले नाही. काम झाले असावे.

१४७) प.पू. महाराज - सौ. आईसाहेब यांचा 'कानडी' संवाद

एकदा काही तातडीच्या कामाकरता मी व श्री. गोडसे प.पू. महाराजांना भेटण्यास पुण्यास आलो. बहुधा श्रींच्या देवांच्या खासगी ट्रस्ट बाबत श्रींचा सल्ला घेऊन दुसऱ्या दिवशी चार्टर्ड अकाऊंटंट व वकील यांच्या भेटी घ्यायच्या - असे काही तरी आमचे काम असावे. त्याप्रमाणे आम्ही शनिवारी श्री. गोडसे यांचे ऑफिस सुटल्यानंतर निघालो. पुण्यास पोहोचण्यास आम्हाला रात्र झाली. श्री वासुदेव निवास मधील जेवणे आटोपली होती. व्यवस्थापक नाना कुलकर्णी, 'काही खाऊन जा,' म्हणत होते. परंतु आधीच १० वाजून गेलेले. तेव्हा प.पू. महाराज झोपण्यापूर्वी भेटणे आवश्यकच होते. म्हणून आम्ही प.पू. श्रीमहाराजांचे घरून आल्यानंतर काही उरले-सुरले असेल तर खाऊ. श्री. नाना यांस ''तुम्ही आमच्या भोजनाची काळजी करू नका!'' असे सांगून, आम्ही लागलीच रिक्शा पकडून श्री रेणुका निवासांत गेलो. प.पू. महाराज काही तरी वाचत बसले होते. आम्ही आल्याचे कळताच त्यांनी आम्हांस आत बोलावले. आम्ही हातपाय धुवून आत गेलो. श्रींचे दर्शन घेतले. आम्ही निरोप घेऊ लागलो. श्रींनी आम्हांस थोडे थांबायला सांगून आईसाहेबांना बोलाविले.

कानडी भाषेत 'श्री' सौ. आईसाहेबांना विचारत होते, ''काही जेवण दोघांस पुरेल एवढे शिल्लक आहे का? नसेल तर काही पोहे वगैरे!''

आईसाहेब कानडीतच म्हणाल्या, ''शिल्लक काही नाही. पोहे पाहिजे तर करते. पण उद्या मी दोघांना जेवायलाच बोलाविते आहे!''

श्री. गोडसेनी संवाद ऐकला व एकदम म्हणाले, ''नको नको! महाराज! आम्ही आश्रमात 'आमच्या करता काही ठेवा' असे सांगूनच आलो आहोत!''

प.पू. श्रीमहाराजांनी गोडसेंना म्हटले, ''तुम्हाला कानडी भाषा येते वाटतं?''

१४८) प.पू. महाराजांनी घेतलेली फिरकी!

श्रींच्या दर्शनास पुण्यास श्री रेणुका निवास मध्ये गेलो होतो. दर्शन घेऊन समोर बसल्यानंतर प.पू. महाराजांना म्हटले, ''आपण जो मंत्र दिला आहे, तो रोज स्नानानंतर शुचिर्भूत होऊन देवासमोर बसून आपण सांगितल्याप्रमाणे कमीत कमी तीन माळा करतो. परंतु दिवसभरात किंवा बस, लोकलच्या प्रवासात सुद्धा हा जप मुखात किंवा अंत:करणात येऊ लागतो. मुंबईहून गोरेगांव हा प्रवास सुद्धा तासाभराचा होतो. मुखात आलेला किंवा मनात प्रादुर्भूत होत असलेला हा जप मी लोकल ट्रेन मध्ये सुद्धा मनोमन केला तर चालेल का? का देवासमोर बसूनच होईल तेवढाच करायचा?''

प.पू. महाराज म्हणाले, ''अशावेळी मनातल्या मनात हा जप करता येत असेल तर जीभ सुद्धा न हलविता करायला हरकत नाही!''

पण पहा बरं! नाहीतर जपात तल्लीन व्हाल आणि बोरीवलीला पोहोचाल!''

१४९) ''तुमचे ते सर्वात्मका सर्वेश्वरा आम्हांस फार आवडते!''

एकदा पंडीत जितेंद्र अभिषेकी यांचा श्री वामन निवासामध्ये गाण्याचा कार्यक्रम होता. पंडीत जितेंद्र अभिषेकी प.पू. महाराजांचे अनुग्रहीतच होते. ऑडीयन्स मधून जशी जशी फर्माईश आली त्याप्रमाणे त्यांनी गाणी गायिली. कार्यक्रमाचा शेवट होण्याचीच वेळ आली होती आणि प.पू. महाराज पंडीतजींना म्हणाले, तुमचे ते, ''सर्वात्मका सर्वेश्वरा!'' हे गाणे आम्हांस फार आवडते, पंडीतजी म्हणाले, ''होय तेच सुरू करण्याच्या मी तयारीत होतो!''

पंडीत जितेंद्र अभिषेकींनी हे गाणे प.पू. महाराजांकरिता अगदी रंगवून रंगवून म्हटले.

१५०) प.पू. महाराजांचे पूर्वसूचक संकेत

१) प.पू. महाराजांकडे कोणी संकटग्रस्त किंवा आर्त भक्त आला तर महाराज पूर्वसूचक संकेत देतात. आपण प्राप्त परिस्थितींत भांबावलेले किंवा मानसिक तणावात असतो म्हणून ते आपल्याला कळत नाही.

पहिले उदाहरण - आमच्या मेव्हण्यांना (पत्नीचे भाऊ यांना) हार्ट अॅटॅक आला ते हॉस्पिटलला दाखल झाले. संपूर्ण कुटुंब काय होणार या विवंचनेत! आम्ही ७-८ गुरुबंधू त्याच दिवशी हरेश्वरी जाऊन दुसऱ्या दिवशी २१ तासाची धून करणार होतो. प.पू. श्रीमहाराजांना हा दिगंबरा धूनचा संकल्प सांगून ठरवून आलो होतो. श्रींना सर्व कळविले. प.पू. श्रीमहाराजांचे

पत्र आले त्यात त्यांनी म्हटले होते. ''आर्त जनांची सेवा ही ईशसेवाच आहे. तुमचे मेव्हणे श्री. कर्णिक हॉस्पिटल मधून बरे होऊन आल्यानंतर हा नामस्मरणाचा कार्यक्रम संपन्न होईल।''

२) दुसरा प्रसंग म्हणजे प.पू. महाराज बोरीवलीला आषाढी एकादशीला आले होते, इतक्यात नाशिकचे श्री. वारे यांचा फोन आला. मी तेव्हा तेथे उपस्थित होतो.

श्री. वारे यांना हार्ट अॅटॅक आला होता. ते हॉस्पिटलमध्ये आय.सी.यू. मध्ये होते, स्वत: फार घाबरले होते व आता आपण जगत नाही, तेव्हा प.पू. महाराजांनी त्वरीत निघून यावे. अखेरचे दर्शन घ्यावे अशा प्रकारचे फोनवर त्यांचे बोलणे होत होते. ते श्रींचे भाषणातून कळत होते. प.पू. महाराज शांतपणे सांगत होते, ''अहो, तुम्ही बिलकुल घाबरू नका! आम्ही नाशिकला पुढील महिन्यात येणार आहोत, तेव्हा जरूर तुमच्या घरी येऊन भेटून जाऊ! काही काळजी करू नका! शिवाय पौषांत श्री वासुदेव निवासात प.पू. गुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या समारंभात आपली भेट होणार आहे.

ह्यावरून निश्चित होते की, श्री. वारे बरे होऊन घरी येणार आहेत, महाराज त्यांना भेटणार आहेत आणि तसेच झाले.

३) तिसरा प्रसंग म्हणजे आम्ही उभयता प.पू. श्रीमहाराजांबरोबर गेलो होतो. प.पू. श्री नारायणस्वामींच्या मठासमोरच प.पू. श्रीमहाराजांचे प्रवचन होत असे. एके दिवशी प्रवचन संपले आणि महाराज याच मठाच्या मागील धर्मशाळेच्या हॉलमध्ये गेले. श्री. रघुनाथरावांनी बोलावल्यामुळे आम्हीही श्रींचे पाठोपाठ आत गेलो. रघुनाथरावांनी महाराजांकरीता कॉफी ठेवली होती. अत्याग्रहास्तव आम्ही त्यांच्याबरोबर सहभागी झालो. नंतर बसलेलो असतानाच एक तरुण मुलगा अत्यंत भेदरलेल्या अवस्थेत महाराजांकडे आला. नमस्कार करून सांगू लागला, ''महाराज, माझी आई अत्यवस्थ आहे. काही केल्या तिचा पोटशूळ थांबत नाही. सर्व उपाय थकले. डॉक्टर म्हणाले आता देवाची प्रार्थना करा, बरे करणे आता परमेश्वराधीन आहे. महाराज! काही करा, माझ्या आईला वाचवा हो! तिला आता मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये ठेवले आहे! काय करू महाराज?''

श्री - तू एकटाच आला आहेस का?

तो तरुण - नाही महाराज! हा ड्रायव्हर आहे ना सोबत! वडीलांनी आणि आईने मला आपल्याकडे येऊन हे सांगण्यास सांगितले. येथून मी हॉस्पिटललाच जाणार आहे! गाडी आणली आहे!

श्री - मग असं करा! श्री वासुदेवानंदांची ओवरी आहे ना? श्री वासुदेवानंदांची तसबीर आहे. त्याखाली अंगाऱ्याची कुंडी आहे. त्यातील अंगारा कागदात घेवून जा! पाण्यातून चिमूटभर पाजा आणि कपाळास लावा! आईला मात्र आमचा निरोप सांगा की, हॉस्पिटल

मधून जेव्हा घरी जायला निघाल तेव्हा सरळ घरी न जाता आधी वाडीला या! पादुकांचे श्री स्वामी महाराजांचे दर्शन घ्या आणि नंतरच घरी जा! निघा लवकर!

तो तरुण - महाराज मी ओवरीत आधी बैठकीला बसतो आणि बैठक झाली का सरळ हॉस्पिटलला जातो!

श्री - नको नको! तुम्ही थांबू नका! आधी अंगारा आईकडे पोहोचू द्या! बैठक पाहिजे तर हॉस्पिटलला स्वतंत्र खोली आहे ना, तेथे करा! चला निघा!

तो मुलगा महाराजांना नमस्कार करून निघाला आणि श्री वासुदेवांच्या ओवरीत शिरला. आम्ही उभयतांही प.पू. महाराजांचा निरोप घेऊन उठलो. जाता जाता श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांचे दर्शनास आम्ही वासुदेवानंदांच्या ओवरीत शिरलो. बघतो तो हा मुलगा तेथे बैठकीस बसलेला. आम्ही दोघांनीही त्याला हलविले आणि म्हटले, "बाळा! महाराजांनी तुला काय सांगितले? ह्या कुंडीतील अंगारा लवकरांत लवकर आईकडे पोहोचला पाहिजे! बैठक पाहिजे तर हॉस्पिटलात आईच्या खोलीत कर! महाराजांची आज्ञा शिरसांवद्य पाळायला नको का? वेडेपणा करू नको! जेवढ्या लवकर अंगारा घेऊन जाता येईल तेवढ्या लवकर जा!"

ज्याअर्थी श्रींनी हॉस्पिटलमधून घरी जाण्यापूर्वी पादुका दर्शन करूनच घरी जायला सांगितले त्याअर्थी श्रींनी पूर्वसूचक संकेतच दिला नाही का? आपण मानसिक तणावात असतो. काय करावे ते आपल्याला सुचत नसते. कळत नसते.

१५१) व्यवहार दक्ष 'श्री'

प.पू. महाराज खर्चाच्या बाबातीत अत्यंत काटेकार असत. अवाजवी खर्च किंवा कोणी खोटेपणाने त्यांच्याकडून पैसे घेतल्याचे त्यांना आवडत नसे. एकदा मी महाराजांच्या सोबत आश्रमांतून श्री रेणुका निवासाकडे निघालो. नेहमीच्या जाण्या-येण्याने ३ रुपये ४० पैसे होतात हे महाराजांना माहीत होते. पण त्या दिवशी ३.७० पैसे झाले. श्रींनी आधीच काढून ठेवलेले ३.४० पैसे त्या रिक्शावाल्यास दिले. तो म्हणाला, "गुरुजी ३.७० झाले आहेत!"

श्री - तीन सत्तर कसे होतील? आम्ही रोज जात येत असतो,दरवेळी ३.४० रुपयेच देतो! जास्त कसे झाले?

रिक्शावाला - गुरुजी ट्रॅफिक मध्ये होते तसे! कधी रिक्शा ह्या कडेकडून दुसऱ्या कडेकडेला घ्यावी लागते. रन वाढतो.

१५२) संकष्टीला माव्याचे मोदक

माझे त्यावेळी श्री रेणुका निवासाच्या वरच्या मजल्याचे बांधकाम चालू होते. प.पू. सौ. ताई महाराज आलेल्या होत्या. सायंकाळी ४ नंतर उद्धवराव म्हसवडकर ताईंच्या दर्शनास आले. त्या दिवशी संकष्टी होती. सौ. ताईंचे मनात आले की आज संकष्टी आहे तर नैवेद्याला व प्रसाद भोजनाला माव्याचे मोदक करू या! त्यानिमित्ताने श्रींना माव्याचे मोदक खाऊ घालता येतील! मला व म्हसवडकरांना सौ. ताई महाराज म्हणाल्या, ''तुम्ही चितळ्यांचे दुकानात जाऊन चांगला मावा घेऊन या! आज संकष्टीला प्रसाद भोजनास मावा मोदक श्रींना खायला घालू!''

म्हसवडकरांची गाडी होतीच. आम्ही लगेच बाजारात जाऊन चितळ्यांचे दुकानातून मावा घेऊन आलो. प.पू. ताईंनी मोदक तळायला घेतले. गरम गरम खायला मिळावे म्हणून चंद्रोदयाचे वेळेसच तळायला सुरुवात केली. पण महाराज अजून कसे नाही आले म्हणून मी व म्हसवडकर आश्रमात गेलो. अहो! आश्रमात येऊन पाहतो तर काय? प.पू. महाराज हॉलमध्ये भोजन पंक्तीला बसून चक्क चित्राहुती घालीत होते! ते पाहून म्हसवडकरांची नुसती चुळबूळ सुरू झाली. आमचे म्हसवडकर म्हणजे जे मनात ते ओठावर! आता स्वस्थ बसून राहण्याखेरीज गत्यंतर नव्हते. ऑफिस मध्ये व्यवस्थापक श्री. नाना कुलकर्णींना म्हसवडकर म्हणाले, ''नाना! महाराज इथे कसे उपास सोडायला बसले? प.पू. सौ. ताईमहाराज त्यांची घरी वाट पहात आहेत! महाराजांसाठी त्यांनी माव्याचे मोदक केले आहेत हो! आता त्यांना काय वाटेल?''

आता प.पू. सौ. ताईमहाराजांना काय वाटेल हे नाना काय सांगणार? मी त्यांना बाहेरच्या अंगणात घेऊन गेलो. मला म्हणताहेत. ''शशीकांत! महाराजांनी हे बरे नाही केले हो! त्यांनी उपास सोडायला घरी यायला पाहिजे होते!''

मी म्हटले, ''म्हसवडकर आता काही बोलू नका! श्रींनी उपास तर सोडला ना! त्यांना उचित वाटले ते त्यांनी केले! त्यांना घरून कुठे असे आग्रहपूर्वक सांगणे झाले होते की, उपास सोडण्यास घरीच या म्हणून! तेव्हा स्वस्थ रहा! श्रींचे भोजन झाले की, आपण त्यांना घेऊन निघू!''

भोजनाची पंगत उठली. प.पू. महाराज जिना चढून वर गेले. बैठकीवर स्थानापन्न झाले. काही दर्शनार्थी भक्त वाट पहात होतेच! आम्ही दोघे वर गेलो. श्रींचे दर्शन घेऊन नमस्कार केला. लागलीच म्हसवडकर म्हणाले, ''महाराज! आता निघायचे ना? घरी वाट पहात आहेत!''

श्री - तुम्ही काय गाडी घेऊन आला आहात काय?

म्हसवडकर - होय महाराज! निघायचे ना?

असे म्हणत म्हसवडकरांनी श्रींचे बोचकेही उचलले नी काखोटीला मारले. आता श्रींना लवकर निघणे भागच होते. आम्ही श्रींसह खाली आलो. श्रींनी ट्रस्टींचा तसेच नानांचा निरोप घेतला. 'श्री' गाडीत मागील बाजूस येऊन स्थानापन्न झाले. म्हसवडकर ड्रायव्हिंगला, तर मी पुढे त्यांच्या शेजारी बसलो. गाडी निघाली, प्रभात रोडला आली.

म्हसवडकर - महाराज! ''ताईमहाराजांनी तुमच्यासाठी माव्याचे मोदक केले होते! म्हणाल्या, ''आज संकष्टी आहे तर नैवेद्याला माव्याचे मोदक करूया'' आणि प्रसाद भोजनाला आपण आला नाहीत! आश्रमातच उपास सोडलात! घरचा प्रसाद राहीला!''

श्री - अहो, येथेही प्रसादच होता! प्रसाद घरी काय किंवा आश्रमात काय? आम्हांस प्रसाद मिळाला.

म्हसवडकर - पण महाराज! ताईंनी आपल्या करता खास माव्याचे मोदक केले होते.

प.पू. महाराज यावर काहीच बोलले नाहीत.

१५३) ''स्थिर चित्त असावे!''

एकदा श्री वासुदेव निवासात मी श्रींच्या पुढे बसलो होतो. श्री वामन निवासाच्या कामाबद्दलच आमचे संभाषण चालू होते. काही वेळेनंतर श्री. उद्धवराव म्हसवडकर, आमचे गुरुबंधू, श्रींचे दर्शनास आले. श्रींचे खोलीत प्रवेश केला तो सुद्धा हसत आणि प्रसन्न चित्ताने! 'श्रीं' पुढे काही दक्षिणा ठेवून साष्टांग नमस्कार केला. प.पू. महाराजांनी विचारले, ''काय आताच आलात काय?''

''होय महाराज!''

श्री - ''काय ठीक आहे ना?''

म्हसवडकर - ''होय महाराज!'' लागलीच पुढे सांगू लागले. ''महाराज! आमचा कारखाना आग लागली त्यात अर्धा अधिक जळाला हो!''

श्रीं दिलगिरी व्यक्त करीत म्हणाले, ''अरे! अरे! असे कसे झाले? कशी लागली आग?''

म्हसवडकर - ''काय कळले नाही हो महाराज!''

म्हसवडकर शांत आणि प्रसन्न चित्तवृत्तींत!

मी जरा उठून खाली गेलो. श्रींचे व म्हसवडकरांचे संभाषण चालू होते. थोड्या वेळात म्हसवडकर खाली येताच मी अपूर्ण राहीलेली चर्चा पूर्ण करण्याकरीता श्रींकडे गेलो.

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! त्या म्हसवडकरांची अर्धी फॅक्टरी कारखाना जळला!

ऐकलं ना तुम्ही? कारखाना म्हणजे त्यांची दुभती गाय! जीविताचा आधार! तीच जळली तर आता करायचे काय, खायचे काय? पण पाहिलंत ना, कसे अगदी शांत-हसतमुख आहेत! जसे काही घडलेच नाही! धंद्यातील नुकसानीला सुद्धा मनाचा तोल जाऊ न देता स्थिरचित्त रहाणे ही काही साधी गोष्ट नाही! ही मनाची स्थिरता ही दैवी गुणसंपदाच प.पू. गुरुमहाराजांच्या कृपेने त्यांना लाभली आहे! साधकाने असे असावे! काही झाले तरी मन:शांती विचलीत होऊ न देता ''स्थिरचित्त'' असावे.''

१५४) ''वर्धापन दिन १९८९ चा कोठे करावा?''

ते १९८८ साल असेल. प.पू. महाराज माटुंग्यास श्री. माधवराव तांबोळींकडे आले होते. सायंकाळची चार साडेचारची वेळ असेल. प.पू. महाराज खोलीत कॉटवर बसले होते. सर्व साधक-भक्त मंडळी समोर खाली जाजमांवर बसली होती. श्री. गोडसे यांच्या मनात एक चांगली कल्पना आली. पुढील वर्षी प.पू. श्रीमहाराजांचा येणारा वर्धापन दिन माघ षष्ठी, आपण मुंबईत एखादा मोठा हॉल बुक करून सात दिवसांचा सोहळा करू! या सप्ताहात प.पू. महाराजांनी ''विद्यारण्य-शिष्य संवाद'' यावर सात दिवस प्रवचने द्यावीत! ही संकल्पना श्री. माधवरावांमार्फत त्यांनी श्रींच्या कानावर घातली. श्री. माधवराव तांबोळी हा प्रस्ताव श्रींपुढे मांडत असताना मी व गोडसे त्यांचे मागे उभे राहून श्री काय म्हणत आहेत ते कान टवकारून उत्सकुतेने ऐकत होतो. प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! हॉल कशाला? त्यापेक्षा आपल्या नागल्यांच्या गांवी श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे करू! ते तीर्थक्षेत्रही आहे आणि नागल्यांचे घर मोठे आहे. मागे पुढे प्रशस्त अंगण आहे! सर्वांना रहायला, उतरायला जागा आहे!''

परंतु यानंतर कोणीच काही म्हणाले नाही. मी माझ्याकडून तयारी दाखविली. श्रींना म्हटले, ''आपण म्हणत आहात ते बरोबरच आहे! तसे ठरले तर चार दिवस आधी पुढे जाऊन तेथील सर्व व्यवस्था पाहता येईल! हरिहरेश्वरी हा आपल्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम होण्याने आम्हांस-मलाही खूप आनंद होईल.

श्री म्हणाले, ''आहे अजून अवधी आहे. त्याकरता वर्धापन दिनच पाहिजे असे नाही! तुम्ही, तुम्हां सर्वांच्या विचाराने सवडीने ठरवा, कसे शक्य होईल ते!''

ह्या दिवसानंतर काही महिने निघून गेले. भक्तमंडळी गुरुबंधूंकडून काहीच हालचाल दिसली नाही. त्यानंतर एके दिवशी प.पू. महाराज दादर पूर्व येथे चित्रा टॉकीज समोरील 'बिस्मिल्ला बिल्डींग' मध्ये श्री. पांडुरंग लेले यांच्याकडे येत असल्याचे त्यांचेच पत्र आले.

१५५) श्री हरिहरेश्वर येथील तृतीय कार्यक्रमाचा संकल्प

मी प.पू. श्रीमहाराजांचे दर्शनास दादर पूर्व येथील बिस्मिल्ला बिल्डींग मध्ये श्री. पांडुरंग लेले यांच्या घरी गेलो. सायंकाळचा चारचा सुमार असेल. मला पाहून श्रींना आनंद झाला. क्षेम कुशल प्रश्नोत्तरे झाल्यानंतर श्रींनी हरिहरेश्वरचा विषय काढला. श्री म्हणाले, ''अहो! तुमचा तो श्री कालभैरव जयंती उत्सव हरेश्वरी कार्तिक वद्यांत असतो ना! आम्हाला तो उत्सव पहायचा आहे. जालन्याहून प.पू.सौ. ताई महाराज येत असतील तर त्यांनाही घेऊन जाऊ! त्रिपुरी पौर्णिमेनंतर आम्ही मोकळे आहोत. नोव्हेंबर महिना येईल नाही का? बघा कसे काय जमते ते! श्री. गोडसे, माधवराव, शृंगारपुरे व आपण मागच्या वर्षी माघात म्हणत होता. परंतु माघात आम्हाला अकोल्यास जावे लागते!

मी म्हटलं, ''काही हरकत नाही महाराज! कार्तिक वद्य सप्तमी, अष्टमी जन्मोत्सव, नवमी असा तीन दिवस उत्सव साजरा होतो. आपण चार दिवस आधीच हरेश्वरी जाऊ! उत्सवानंतर केव्हा परतायचे ते ठरविता येईल!''

एकूण आजचे दिवशी हरिहरेश्वराचा तृतीय कार्यक्रम होण्याचा संकल्प तरी सुटला.

१५६) श्री. मुकुंदराव टिपरे यांची बायपास सर्जरी

इतक्यात एक गृहस्थ ''खामगांवचे श्री. मुकुंदराव टिपरे खाली आले आहेत. त्यांचे उद्या बायपासचे हार्टचे ऑपरेशन आहे, ते जिने चढू शकत नाहीत. प.पू. महाराजांचे दर्शनाला ते उत्सुक आहेत!'' असे सांगू लागला. प.पू. महाराजांनी ते ऐकले व महाराज लागलीच उभे राहून पांडोबा लेलेंकडे खाली जाऊन येण्याबद्दल परवानगी मागू लागले. लेले हसले व म्हणाले, ''चला आम्ही येतो आपले सोबत!'' मी व श्री. लेले प.पू. महाराजांच्या सोबत तीन जिने उतरून खाली गेलो.

फूटपाथच्या कडेला बिल्डींगच्या खाली गाडी उभी होती. श्री. मुकुंदराव टिपरे यांनी फूटपाथवर उभे असलेल्या प.पू. महाराजांच्या चरणांवर डोके ठेवून नमस्कार केला. प.पू. महाराज ''अहो येथे रस्त्यांत वाकू नका'' सांगत होते. प.पू. महाराजांनी त्यांचे पाठीवरून ममतेने हात फिरविला व म्हटले, ''काही काळजी करू नका! सर्व काही व्यवस्थित होईल! टिपरे म्हणाले, ''महाराज आपण पाठीराखे असताना मला कसली भीति? पण महाराज ऑपरेशन आहे. तुम्ही माझ्या जवळ असा बरं का? प्रत्यक्ष नाही म्हणत! मनाने!''

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''आम्ही आहोतच आपल्या जवळ!'' प.पू. श्रीमहाराजांची सहस्रचंद्र दर्शन शांती श्री वामन निवासामध्ये झाली. त्यात अनेक साधक भक्त गुरुबंधू यांची

भाषणे व आपआपले अनुभव कथन झाले. त्यात आमचे खामगांवचे मुकुंदराव टिपरेही स्टेजवर आले आणि त्यांनी भावपूर्ण अंत:करणाने अगदी गहिवरून व्याकुळ होऊन आपला अनुभव सादर केला. त्यांचे ते कथन ऐकताना नेत्रांतून अश्रुंचा पूर वाहू लागला.

टिपरे म्हणाले, ''काय माझे भाग्य! मुंबईला माझे बायपासचे ऑपरेशन होणार होते तर माझ्या जाण्याआधी पुढेच माझी माय माऊली वाटेवर येऊन बसली होती. महाराज पांडुरंग लेले यांचे घरी आले होते. तिसऱ्या माळ्यावर! काय सांगू राव! माझी माय माऊली माझ्यासाठी तीन माळ्यांचे ६ जिने उतरून खाली आली हो! मला वर जाणे शक्य नव्हते! जगेन की नाही याची मला शाश्वती नव्हती. ऐंशीचे जवळपास वय, त्यात बायपास सारखे मोठे ऑपरेशन! भेटीलागी जीव तडफडतच होता! पण महाराजांचीही नाजूक प्रकृती आणि त्यांना कसे बोलावू? म्हटलं खाली न येता वरून आशीर्वाद दिलेत तरी पुरे! पण माऊली खाली आली! आणखी काय सांगू महाराज! मी सांगून तुम्हाला पटणार नाही पण माझ्या गुरुबंधूंनो, मी सद्गुरुंची शपथ घेऊन सांगतो! ऑपरेशनच्या वेळी मी साक्षात् प.पू. श्रीदत्तमहाराजांना ऑपरेशन थिएटर मध्ये पाहिले, एवढेच नाही तर माझ्या रुममध्ये मी कॉटवर हळूहळू शुद्धीत येत होतो आणि महाराज खोलीच्या कोपऱ्यात बसलेले! उभे राहताहेत, मला हात हलवून आशीर्वाद देत आहेत. 'बरे व्हाल' म्हणाले.

१५७) एक आठवण!

डॉ. अशोकरावांची डिस्पेंसरी पिंपळगाव येथे होती. रोज पुण्याहून ये-जा करणे शक्य नव्हते म्हणून त्यांना पिंपळगावीच बिऱ्हाड करावे लागले. अशोकराव व सौ. सविता वहिनी तिकडे रहात असताना प.पू. महाराज एके दिवशी आले. अशोकरावांना प.पू.दत्तमहाराज आपल्या बिऱ्हाडी येऊन राहिल्याचे आश्चर्य आणि परमानंद झाला. मला श्री. अशोकराव ती आठवण कौतुकाने प्रेमभरे सांगत असत. ''शशीकांत! अहो. दादा अचानक एके दिवशी आमच्या बिऱ्हाडी आले. आम्हा उभयतांना इतका आनंद झाला की, तो शब्दाने प्रकट करता येणार नाही आणि येऊन चांगले ४-५ दिवस राहीले बरं का? पहाटे स्नान करून यायचे (बहुधा नदीवर) मग त्यांचे आन्हिक चालायचे! सायंकाळी फिरून यायचे! आमचे ते दिवस किती मजेत आणि आनंदात गेले म्हणून सांगू? आमच्याशी खूप बोलायचे. आम्हाला काही गैरसोयी वगैरे नाहीत ना, इकडे त्यांचे लक्ष असायचे!''

१५८) श्री. विलास उर्फ आप्पा तावडे आणि प.पू. महाराज

वास्तविक दसऱ्याला सोने वाटायला सायंकाळी जायचे असते. परंतु आपले एक गुरुबंधू आप्पा उर्फ विलासराव तावडे यांना प.पू. गुरुदेव श्रीदत्तमहाराजांना पहाटे पुण्यास जाऊन सोने देणे आवडायचे. अहो, सायंकाळी म्हणजे 'श्री रेणुका निवास काय किंवा वासुदेव निवास काय,' दोन्हीकडे गुरुभक्तांच्या सोने देण्याकरीता रांगाच लागायच्या! प.पू. श्रीदत्तमहाराज सुद्धा विजयादशमीचे पहाटे, ''अहो, ते तावडे आले आहेत का?'' असे घरात विचारून चौकशी करायचे!

आप्पांचा स्वभाव तसा विनोदी! एकदा ते २ मार्च या दिवशी प.पू. श्रीमहाराजांचे दर्शनास आले. सामोपचाराच्या गोष्टी झाल्यानंतर अचानक आप्पा उद्‌गारले, ''महाराज! तुमच्यात नि माझ्यांत एक साम्य आहे!'' तावडे बसले होते आणि महाराज होते पलंगावर. इतक्या विधानानंतर आप्पा स्वस्थ राहीले नाहीत.महाराजांना म्हणताहेत, ''सांगा बघू कोणते ते?''

प.पू. महाराजही म्हणाले, ''सांगा बरं!''

आप्पा म्हणाले, ''महाराज! आपणही २ मार्चला जन्माला आलात आणि मीही! फरक इतकाच, आपण सद्‌गुणात जन्माला आलात आणि मी दुर्गुणांत!''

यावर प.पू. महाराज हसले व म्हणाले, ''कोण म्हणतं, आपण दुर्गुणात आहात?''

''चला, हवे ते मिळाले!'' तावडे.

असेच एक दिवशी आप्पा तावडे श्रींच्या दर्शनास आले. दर्शन घेऊन काही संभाषण झाल्यानंतर प.पू. महाराजांनी विचारले, ''काय आज रजा होती का? कसं काय येणं झालं?''

आप्पा म्हणाले, ''महाराज! आज मी काहीतरी मागण्यास आलो आहे. तुमची वापरातील पादत्राणे किंवा हातातील काठी किंवा वापरते धोतर, उपरणे काहीही! तुम्ही ते मला द्यावे! तुम्ही देणार नसलात, तर सरळ मी चोरी करून घेऊन जाईन! आपल्या भक्ताला लोकांनी चोर म्हटलेले आपल्याला आवडेल? नाही ना? मग मला काही तरी द्या!''

''बरं बरं!'' महाराज म्हणाले आणि लागलीच महाराजांनी कॉल बेलचे बटण दाबले. सौ. सवितावहिनी प.पू. महाराजांच्या कॉटजवळ येऊन उभ्या राहिल्या. प.पू. महाराजांनी त्यांना काही तरी अगदी हळू आवाजात सांगितले.

आप्पा वाट पहात होते. आता महाराज आपल्याला काय देत आहेत!

सौ. सविता वहिनींनी पाट आणला व आप्पांचे शेजारी मांडला. नंतर कुंकवाचा करंडा आणला तो पाटाजवळ ठेविला. एक चांगल्यापैकी शाल व श्रीफळ तबकांत आणून ठेवले. प.पू.महाराज कॉटवरून खाली उतरून उभे राहीले. हातात कुंकवाचा करंडा घेतला व

तावडेंना म्हणाले, ''या! बसा या पाटावर!'' गुरुमहाराजांची आज्ञा स्वीकारून आप्पा पाटावर बसले. प.पू. महाराजांनी काहीतरी आशीर्वादपर मंत्र मुखाने पुटपुटत आपले अंगठ्याने आप्पांचे भव्य कपाळावर कुंकुम तिलक लावला. अक्षदा शिरावर टाकल्या, मुखांतून मंत्रोच्चार होतच होता. साखर हातात दिली. आप्पांनी ती लागलीच तोंडात टाकली. श्रीफळ हातात दिले आणि मंत्र म्हणतच ती सुंदर शाल, जणू आपल्या मायेची पाखर आप्पांच्या अंगावर पांघरली. हे एवढे होत असताना आप्पा भावावस्थेत गेले. नारळ हातात घट्ट पकडलेला आणि अचानक त्यांना जोरदार योगीकक्रिया होऊ लागल्या. नारळ धरलेले हात थरथरत होते. क्रियेचा जोर ५-१० मिनिटात कमी झाल्यानंतर जवळ जवळ पाऊण तास आप्पा ध्यानावस्थेत निमग्न होते. जाग येऊ लागताच, त्यांचे नेत्रांतून घळघळा अश्रूंचा पूर वाहू लागला. कंठ दाटून आला. मुखांतून शब्द उमटत होते. ''महाराज! महाराज!'' आप्पा उठले. प.पू. महाराजांना साष्टांग नमस्कार घातला व म्हणाले, ''महाराज! महाराज, मला हवं ते मिळालं! मी धन्य झालो महाराज!'' प.पू. महाराज म्हणाले, ''ही शाल ध्यानधारणा बैठकीस बसताना नेहमी अंगावर घेऊन बसत जावे.''

१५९) "दत्त महाराजांची काळजी वहायला आम्ही समर्थ आहोत!"

एका रविवारी सकाळी श्री. गोडसे गुरुबंधूंचा फोन आला. "शशीकांत! दत्ता सप्रे पुण्याहून आले आहेत व आज सायंकाळी चारच्या सुमारास ते माझ्या घरी येणार आहेत!"

एखादी सासुरवाशीण जशी माहेरच्या हालहवाली साठी हव्यास धरून असते, माहेरची कोणीही व्यक्ती भेटली की आनंदाने बहरून जाते. तशीच अवस्था आम्हा गुरुबंधूंची असायची. पुणे-मुंबई अंतर जरी फारसे नसले तरी मुंबईत नोकरी धंदा-धावपळ यांतून उसंत मिळणे आणि पुण्यास जाऊन येणे नेहमीच शक्य व्हायचे नाही. शिवाय आमची गुरुमाऊली पुण्यात असेलच असे नाही. जगदोद्धारासाठी दौरे चालूच असायचे. श्रींचे वय त्यावेळी ७० ते ७१ वर्षाचे असेल. वेगवेगळ्या गांवी जाणे-येणे. प्रत्येक ठिकांणचे हवामान वेगवेगळे. सतत सभोवार जनता जनार्दनाची गर्दी, नानाविध व्यक्ती, प्रवासाचा त्रास. त्यातही आम्हाला प्रथम वर्गांतून किंवा ऐष आरामी प्रवास कधीच रुचला नाही. एस्.टी.ने किंवा रेल्वेच्या द्वितीय (तृतीय) वर्गांतून होणारा प्रवास. मला वाटतं ही गोष्ट १९८० ते ८१ मधील असावी.

मी व श्री. सुधाकर शृंगारपुरे श्री. गोडसेंच्या घरी सायंकाळी चार वाजता पोहोचलो. श्री. दत्ता सप्रे आले. त्यांना पाहून आम्हांस आनंद झाला. कारण ते सतत 'श्रीं'चे संपर्कात असायचे. 'श्रीं'चे जवळ पाठशाळेला बसायचे. "श्री वासुदेव निवासांतच' रहायचे. म्हणजे

श्री पुण्यात असले की त्यांना सतत 'श्रीं'चा सहवास घडायचा. श्री. दत्ता सप्रे यांचे वडील दादर येथील श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे मठात असायचे. कदाचित पुजारी म्हणून असतील. पण त्यामुळे दत्ता सप्रे मात्र अधून-मधून त्यांना भेटायला यायचे आणि आम्हांस प.पू. महाराजांची सांप्रत हालचाल, दौरे, प्रवचने यांची इत्यंभूत माहीती मिळायची. प्रथमदर्शी क्षेमकुशल समाचार झाला आणि आम्ही आमच्या अत्यंत अधीर उत्सुक अंत:करणास मोकळे केले. "सांगा सप्रे! आमची श्री गुरुमाऊली कशी आहे? त्यांची प्रकृती कशी आहे? सध्या कुठे पुण्यात आहेत का बाहेर गावी?"

आमच्या अनेक प्रश्नांच्या सरबत्तीनंतर सप्रे जरा गंभीर झाले. त्यांच्या मनात काहीशी सल जाणवली. ते म्हणू लागले, "सर्व तसे सकृतदर्शनी ठीकच आहे. सर्व आनंदी आनंदच आहे. प.पू. श्रीमहाराज शनिवारांत त्या वर्तक वाड्यात राहतात. तुम्हाला माहीतच आहे. तिसऱ्या माळ्यावर दोन खोल्या आणि स्वयंपाक घर. वर संडास-असून घरमालक वापरू देत नाही. तो त्यांचा स्वत: करता आहे. महाराजांना तळमजल्यावर कॉमन संडासाचा वापर करावा लागतो. वरच्या मजल्यावर राहणे त्रासाचे पडते. घरचा त्रास, आश्रमांतही अनेक समस्या आणि मानसिक त्रास आहेच. त्यातही आर्थिक स्थिती चांगली असेल तर बरेच त्रास कमी करता येतात. परंतु महाराजांची आर्थिक स्थिती अतिशय बेताबाताचीच आहे. अहो! घरून शनिवार वाड्यातून कर्वे रोडला आश्रमात यायला रिक्शाच्या भाड्यासही त्यांच्याकडे पैसे नसतात. बरेच वेळा ते पायी, एवढ्या लांब, तेही अनवाणी पायाने येतात. गुरुस्थानी जायचे ना? मग पादत्राणे घालून जाणे कसे चालेल? गांवोगांवच्या लोकांकडून काही कार्यक्रमानिमित्त आमंत्रणे असतात. कुठे 'श्री गुरुचरित्र पारायण' तर कुठे 'श्री भागवत सप्ताह.' खेडोपाड्यांतून जाणे-येणे. सर्वानाच काही सूचत नाही की 'श्रींच्या' जाण्या-येण्याची सोय करावी. गाडी घोडी प्रवासाची आरक्षणे नेहमीच होतात असे नाही. अहो, इतकेच काय पण खूप वेळा प.पू. महाराजांना स्वत:ची पदरमोड खर्चून प्रवास करावा लागतो. आश्रमातूनही नेहमीच प्रवासखर्च 'श्रींचे' करता होत असेल असे वाटत नाही आणि झाला तरी 'श्रींनी' स्वीकारलाही पाहिजे ना? अपरिग्रह अपरिग्रह म्हणजे किती? आपण सोबत गेलो तरी आपणास रिक्शाचे भाडे सुद्धा देऊ देत नाहीत. मोठे चिरंजीव अशोकराव पिंपळगांव येथे असतात. तेही भाडोत्री घरात राहून आपला प्रपंच सांभाळून काही देत असतील. चि. अनिल यांची हौसिंग बोर्डातील नोकरी सरकारी, पगार तो काय असणार? चि. अजित तर शिकत आहे. अशा या परिस्थितीत आपण सर्वांनी काय करायचे? हा आपण सर्वांनीच विचार करायला हवा. फार कठीण आहे ते. तुम्हाला माहीत असेल. ते नातुंच्या वाड्यात रहायचे तर श्री. नातू त्यांच्याकडून भाडे घ्यायचे नाहीत म्हणून ती जागा त्यांनी सोडली."

गोडसे म्हणाले, ''अहो! एकदा पगारा व्यतिरिक्त, काही पगारवाढीचे सांचलेले फरकाचे काही महिन्याचे पैसे एकदम मिळाले. (ॲरीअर्सचे) म्हणून मनात विचार आला की, मोठी रक्कम मिळाली आहे तर 'श्रीं'ना थोडे फार का पाठवू नये? मी पाठविले, किती? फक्त १०१ रुपये. कारण मला माहीत होते जास्त ते स्वीकारणार नाहीत! तरी सुद्धा लागलीच त्यांचे पत्र! काय लिहावे त्यांनी? ''आपण पाठविलेली रक्कम पोहोचली तरी त्या रकमेचा विनियोग काय करायचा ते कळवावे!'' आता काय लिहीणार यांना.''

नागले म्हणाले, ''मलाही धंद्यात बरेच पैसे मिळायचे. दक्षिणा द्यायची असते रु.११/- नाहीतर रु. २१/-. पण एकदा ठरविले ११ तर ११च किंवा २१, ५१, १०१ तर तेवढीच दरमहा पाठवावी कमी करू नये म्हणतात. मी ठरविले आई, वडील यांना जसे पैसे पाठवितो तसे सद्गुरुंना का पाठवू नयेत? रु. १०१ ने प्रथम सुरुवात करू म्हटले. तर रु. १०१/- ची मनीऑर्डर पोहोचताच पत्र आणि भेटीतही म्हणाले, ''अहो! दक्षिणा दक्षिणेच्या रुपात पाठवावी. एवढी मोठी रक्कम पाठवू नये. तुम्हीही प्रापंचिक आहात. तुम्ही तर दक्षिणा पाठवूच नये. त्यापेक्षा आम्हाला तुमच्या स्थापत्यशास्त्रांतील ज्ञानाचा पुढे उपयोग करून घ्यायचा आहे!''

श्री. शृंगारपुरे यांचेही अनुभव वेगळे नव्हते व ते आमचेच गुरुबंधू. आमच्या प्रमाणेच 'श्रींचे' शब्दाबाहेर न जाता 'गुरुवाक्य प्रमाणम्' म्हणून वागत होते.

बराच वेळ चर्चा करून मार्ग सापडत नव्हता. श्री. सप्रे निघून गेले पण आम्हांस बरीच काही वैचारिक चालना देऊन गेले. पुढील आठवड्यात आमचे वरच्यावर भेटणे झाले. या विषयावर खूप उहापोह झाला पण मार्ग सापडेना! मन व्याकुळ होई, गहीवरून येई पण करणार काय आणि कसे? सतत मनात डांचत रहायचे, आम्ही किती सुखवस्तू राहणीमानात राहतो. संडास, पाणी, स्नानगृहे, शयनगृहे सर्व काही अद्यावत् सुखसोयीने भरपूर! आमचे मोठे मोठे ब्लॉक होते. श्री. गोडसेंची जागा दोन खोल्यांची असली तरी दादर सारख्या ठिकाणी सोयीचीच होती. आमच्याकडे तर गाडी घोडी आणि सर्वच साधने, फोन, फ्रीज, टी.व्ही., नोकर चाकरांपासून सर्व काही आणि माझी गुरुमाऊली? तिसऱ्या माळ्यावर मुले बाळे नातवंडे यांच्यासह अपुऱ्या जागेत रहात आहेत! ते मात्र रिक्शाला पैसे नाहीत म्हणून अनवाणी पायपीट करीत आहेत. ज्यांचे आशीर्वादाने आम्ही सर्व प्रापंचिक, सर्व सुखे उपभोगत आहोत पण आम्ही महाराज आपले करता काय करू शकतो?

पुन्हा शनिवारी सायंकाळी आम्ही तिघे एकत्र आलो. तिघांच्याही मताने आम्ही ठरविले की आपण आपल्यात वरिष्ठ श्रेष्ठ असे विचारवंत अनुभवी श्री गुरुबंधू आहेत. आपण त्यांची अपॉईन्टमेंट घेऊन वेळ मागून घेऊ व सरळ त्यांचे घरी जाऊन शांतपणे यावर विचार करून त्यांचा सल्ला घेऊ. खात्री आहे की, यातून तेच काहीतरी मार्ग सुचवतील. झाले ठरले.

आम्ही त्या बंधूंना फोन करून अत्यंत तातडीची रविवारची दुपारीच बैठक ठरविली.

आम्ही तिघे रविवारी ठरल्याप्रमाणे त्यांच्या घरी गेलो. आम्ही त्यांना नुकतीच श्री. दत्ता सप्रे यांच्याकडून कळलेली व आम्हांसही माहीती असलेली प.पू. महाराजांची एकूण राहणीमान आणि आर्थिक परिस्थिती विशद केली. अशा या स्थितीमध्ये आम्ही प.पू. महाराजांसाठी काय व कसे करू शकतो. याचे मार्गदर्शन थोरले गुरुबंधू म्हणून आम्हांस आपल्याकडून हवे आहे.

ते म्हणाले, ''मी तुम्हाला प.पू. महाराजांच्या एकाच उदाहरणाने आणि एकाच वाक्यात सांगू का?'' हे बघा! तुम्ही महाराजांचे दर्शनास जाता. शास्त्राप्रमाणे श्रीफळाची शेंडी महाराजांचे कडे धरून ते श्रीफळ महाराजांना अर्पण करता. प.पू. महाराज काय करतात? ते श्रीफळ स्वीकारतात आणि लागलीच त्या श्रीफळाची शेंडी आपल्याकडे करून ते श्रीफळ आपल्या पदरात प्रसाद म्हणून टाकतात. यातंच काय समजायचे ते समजून जा.

तुमची तळमळ मी समजू शकतो. अहो, मीही तुमच्याच मार्गांतून गेलो आहे. मलाही असे तुमच्या सारखेच वाटायचे की, आपण प.पू. महाराजांकरता काही तरी केले पाहिजे. एक दिवशी तर न राहून बेचैन होऊन मी भलीमोठी रक्कम ब्रिफकेसमध्ये घालून प.पू. महाराजांच्या घरी गेलो. ती ब्रिफकेस उघडून त्यांच्यापुढे ठेवून म्हटले, 'महाराज हे सर्व आपले आहे. श्रीगुरुमहाराजांनी आपल्या करताच मला प्राप्त करून दिले आहेत, ते आपण स्वीकारा!'' अनेक प्रकारे विनवणी करून देखील प.पू. महाराजांनी त्याला स्पर्श सुद्धा केला नाही. मी पुढे नाईलाजाने म्हटले, 'बरं महाराज! मग मी असे करतो ही संपूर्ण रक्कम माझ्या नावेच फिक्स डिपॉझीटला बँकेत ठेवतो व याचे दरमहा येणारे व्याज तरी आपल्या खात्यात जमा करण्याची मला परवानगी द्या!' हरप्रयत्न करून मी हार खाल्ली. त्यांनी असे काही चार उपदेशाचे अमृतवाणीचे बोल सुनावले की, शेवटी निरूत्तर होऊन ती ब्रिफकेस तशीच बंद करून पुण्याहून ठाण्यास परतावे लागले!

अहो, काय करणार आपण? सद्गुरुंनी आपली सेवा स्वीकारायला सुद्धा आपले तेवढे भाग्य लागते! पूर्व पुण्याई पूर्व सुकृत लागतं! गत जन्मात आपण पुण्याईचा संचय किती केला आपल्याला माहीत नाही, ह्या जन्मीचे आपले जीवन किती सात्विक, निर्मळ प्रामाणिक, किती शरणागतीने आणि सेवाभावाने भरलेले आहे हे काय माहीत आपल्याला? आपण आपली गुरुमहाराजांची, ईश्वराची प्रार्थना करीत राहणे एवढेच आपल्या हाती आहे!''

आम्ही ज्या मोठ्या आशेने ठाण्यास गेलो तेवढ्याच निराशेने घरी परतलो. मार्ग सापडला नाही. आपली पुण्याई कमी पडली.

रात्री अंथरूणावर तळमळत पडलो. ध्यास एकच लागलेला श्री सद्गुरुंचा! त्यांच्या एकूण परिस्थितीचा! काय करावे देवा, कसे करावे, दयाघना मार्ग सूचव. मी माझ्या गुरुदेवांकरीता काय व कसे करू शकतो? विचार करून करून मला पहाटे ३ ते ३.३० नंतर झोप लागली असेल.

एक सुंदर स्वप्न! सर्वभ्रम निराश करणारं! वरदहस्त देणारं! परम पूजनीय श्री वामनरावजी गुळवणी महाराज स्वप्नी दृष्टांत देते झाले.

प्रशस्त मोठा हॉल आहे. मध्यावर मोठा झोपाळा आहे. त्या झोपाळ्यावर प.पू. गुरुमहाराज (गुळवणी महाराज) आपले दोन्ही हात मागे टेकून, पाय पुढे झोपाळ्याखाली सरळ सोडलेले, अगदी आरामांत, शांत चित्त, हंसतमुख प्रसन्नतेने समोर माझ्याकडे पहात आहेत आणि त्यांच्या दोन्ही हातांचे आत कोण झोपले आहेत बरे? कौतुकाने, प्रेमाने दोन्ही हात त्यांचे शरीरामागे टाकलेले गुरुमहाराज आणि पहुडले आहेत माझे गुरुमहाराज प.पू. दत्तमहाराज! सुखासीनपणे शांत निद्रेत आहेत. मी समोर पहात आहे. अरे! गुरुमहाराज मी हात जोडूनच पुढे आलो. इतक्यात प.पू. गुरुमहाराज उद्गारले, ''तुम्ही कशाला चिंता करता? दत्तमहाराजांची काळजी वहायला आम्ही समर्थ आहोत!''

हे शब्द कानी पडताच मी लोटांगण घातले. गुरुमहाराजांच्या चरणावर डोके ठेवले, दोन्ही हातांनी चरण धरले व वर मान करून म्हटले, ''महाराज! आणखी काय पाहिजे आम्हाला? काही नको! आमच्या प.पू. श्रीमहाराजांना सांभाळा!''

प.पू. गुरुमहाराजांनी हाताने आशीर्वाद दिला. मंदस्मित करीत दृश्य अंत:र्धान पावले आणि मी आनंदाने उल्हसित होऊन जागा झालो. हातपाय धुतले. चार चुळा भरल्या, बैठक अंथरली, श्रींच्या फोटोपुढे उदबत्ती लावली आणि ध्यानमग्न झालो. तोच तेच शब्द कानी गुंजारव करीत आहेत. ''दत्तमहाराजांची काळजी वहायला आम्ही समर्थ आहोत!'' दुसऱ्या दिवशी आम्ही एकत्र आलो आनंदाने बहरून गेलो. दिगंबराची धून झाली, चांगली रंगली!

खरंच आमचा तो वेडा-खुळा भाव होता. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा! कुबेर गुरुदेवांपुढे नतमस्तक उभा असतो. आम्हा यक:श्चित जीवाणूंचा काय पाड? हे म्हणजे महाभारतांतल्या श्रीकृष्ण-बलरामजींना रथांतून नेणाऱ्या अक्रुरजींसारखे झाले.

श्रीकृष्ण-बलरामांना घेऊन मथुरेस सारथी अक्रुरजी निघाले होते. पाठीमागून मोठी सैन्याची फौज येत असल्याचे जाणवले म्हणून बलरामांनी अक्रूरजींना विचारले, ''मागाहून ही फौज कोणती येत आहे?'' त्यावर अक्रूरजी म्हणाले, ''श्रीकृष्णांना आणि आपल्याला वाटेत धोका निर्माण होऊ नये म्हणून आपण दोघांच्या संरक्षणाकरता वाटेत ठिकठिकाणी मी सैन्य लपून-छपून ठेवलेले आहे!''

इतक्यात अक्रुरजींची संध्येची वेळ होते. समोर नदीही दिसते. ते श्रीकृष्णांची अनुमती घेऊन रथ थांबवून नदीवर संध्यावंदन स्नानास जातात. पाण्यात डुबी मारून आत जाताच त्यांना श्री गोपाळ कृष्णांचे दर्शन घडते. क्षणांत विष्णूनारायण-विश्वंभर तर क्षणांत बालकृष्ण.

तिकडे रथांत बलराम श्री कृष्णांना म्हणत असतात, ''पाहिले कां कृष्णा? आपल्या संरक्षणाची हे अक्रूरजी आपली काळजी घेत आहेत. त्यांच्यामुळेच जणू आपण सुखरूप मथुरेस पोहोचणार आहोत!''

श्रीकृष्ण म्हणाले, ''दाऊ! यावरून अक्रुरजींचे आपल्या बद्दलचे प्रेम दिसून येते, त्यांचा भाव लक्षात घ्या!''

आम्हा वेड्या भाबड्या भक्तांचा भक्तीभावही लक्षात घेऊन सद्गुरुंनी आम्हांस क्षमा करावी.

१६०) अनपेक्षित पत्र

जून १९८६ चे पहिल्या हप्त्यांत श्री पुण्यातच आहेत याची मला खात्री होती. आम्हा गुरुबंधूंचे श्रींच्या दर्शनास जाण्याचे ३ ते ४ दिवस आधीच ठरले. शनिवार, दि. ७.६.१९८६ रोजी मी, मुजुमदार, गोडसे आणि म्हसवडकर श्री. भाऊसाहेब शृंगारपुरे यांच्या घरी दुपारी ३ पूर्वी एकत्र जमलो. ठीक ३ वाजता आम्ही श्रींच्या दर्शनास पुण्यास निघणार होतो. आमचा हा कार्यक्रम आम्ही कोणासही कळविला नव्हता. अगदी अचानकच आमचा हा बेत नक्की झाला आणि ठरल्याप्रमाणे २ ते २.३० पर्यंत आम्ही श्री. शृंगारपुरे यांच्या रिझर्व्ह बँक कॉलनी, चेंबूर येथील घरी जमलो. श्री. शृंगारपुरेही ऑफिसांतून घरी आले होते.

आश्चर्य असे की, आम्ही निघण्याच्या एक तास आधीच श्री. रघुनाथरावांचे पत्र आले. ''प.पू. महाराज पुण्यात नाहीत. आम्ही बाहेरगांवी जात असून दि. ९.६.१९८६ सोमवारी सायंकाळी परत येऊ. सोमवारी दर्शन होईल. पत्र प.पू. महाराजांचे आज्ञेने लिहीत आहे.''

श्रींचे भक्तांच्या हालचालीवर दूर गांवी असून सुद्धा कसे लक्ष असते ते ह्यावरून दिसते. मग आम्ही म्हसवडकरांचे गाडीने भीमाशंकरला गेलो. ब्राह्मण पुजाऱ्यांकडे उतरण्याची सोय झाली. रविवारी भीमाशंकर क्षेत्र फिरलो. रविवारी व सोमवारी भीमाशंकरावर अभिषेक, बिल्वपत्र पूजा प्रसाद भोजन करून सोमवार दि. ९.६.१९८६ ला पुणे येथे श्रींचे त्यांच्या घरी दर्शन घेतले.

१६१) "रक्कम आधी गंगेत बुडवा आणि नंतरच वापरायला घ्या!"

एप्रिल १९९०

प.पू. दत्तमहाराजांच्या सहस्रचंद्रदर्शन शांतीच्या सोहळ्याचे दिवस जवळ येत चालले होते. श्री वासुदेव निवासात येणारे सर्व ब्रह्मवृंदांची सोय होणार होती. परंतु गावोगावाहून येणारे साधक भक्त यांची निवास व्यवस्था व्हायची होती. श्री वामन निवासाचा हॉल, मॅझेनाईन फ्लोअर व बाजुच्या दोन खोल्या, संडास बाथरूम तयार होते. शेजारील प्लॉटमध्ये मंडपही उभारायचा होता. परंतु तरीही हजारो भक्तांची निवास व्यवस्था होण्यासारखी नव्हती. म्हणून पुण्यामध्ये ह्या १० दिवसाच्या कार्यक्रमाच्या दिवसात राहण्याच्या सोयीकरीता जवळपासची कार्यालये पाहण्यात आली. परंतु त्याची अवाढव्य भाडी देण्यापेक्षा श्री वामन निवासाचा आणखी एक माळा का वाढवू नये? असा विचार पुढे आला. सर्व विश्वस्तांत तो मंजूर झाला. वरचे बांधकाम पूर्ण करण्याकरितांही श्री. नागल्यांचीच त्यांच्या महत् भाग्याने नेमणूक श्री इच्छेने झाली. काम जोरात सुरू झाले. वेळ फारच थोडा होता. श्रींच्या कृपाशीर्वादाने कामे सुरळीत होत होती. नियोजित वरचा माळा दोन्ही विंगसह बांधून पूर्ण झाला. आता राहीली फक्त रंगरंगोटी. शेवटचा फिनीशींग अॅटम की, ज्यामुळे इमारत खुलणार होती. पण विश्वस्तांकडून सांगण्यात आले की, फंडस् संपले आहेत. आहे ती श्री शिल्लक होणाऱ्या मोठ्या कार्यक्रम सोहळ्याची बाकी आहे. तिला हात लावता येत नाही. आपल्या घरी सुद्धा श्रीगणपती सारखे सण आले तर आपण प्रथम रंगरंगोटी करतो. वास्तू पूर्ण होऊन रंगरंगोटी झाली नाही तर ती बोडकी आणि भकास दिसते. आपल्या सद्गुरुंचा सहस्रचंद्रदर्शनशांती सोहळा आणि ज्या इमारतीत तो साजरा होणार ती अशी? विवाहास उभी राहीलेली वधू जुन्या साडीत शोभेल का? हा विश्वस्तांचा निर्णय मनास पटत नव्हता. पण करणार काय? मी खूपच बेचैन झालो. श्री. नारायणराव दाते व मी आम्हा दोघांच्या मनासमोर एकच गुरुभक्त दाता उभा राहीला. पोलीयोवर हमखास इलाज करणारे वैद्य म.बा. वाघण्णा! हे गृहस्थ प.पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराजांकडून दीक्षा प्राप्त झालेले. प.पू. श्रीदत्तमहाराजांना देखील तेवढ्याच भक्तीभावांतून पाहणारे! महिन्याच्या पहिल्या शनिवारी श्री वामन निवासात ते येणार! पहाटेपासून रुग्णांची लाईन लागलेली. संध्याकाळी ५.३० पर्यंत रुग्ण तपासणी आणि औषध देणे झाले की, जाताना जमलेला सर्वच्या सर्व गल्ला फी मधून प्राप्त झालेला, श्री वामन निवासाच्या बांधकामा प्रीत्यर्थ ठेवलेल्या दान पेटीत ओतणार आंणि निघून जाणार!

त्या भोजनोत्तर रात्रीच्या बैठकींतच श्री. दाते व मी दोघांनी ठरविले की, विरुद्ध होईल, विश्वस्तांना आपले हे कृत्य आवडेल न आवडेल! काय होईल ते होवो. जे होईल त्याला सामोरे जाऊ! मी श्री. वाघण्णांना फोन लावला. म्हटले, "डॉक्टर, श्री वामन निवासाचे वरच्या

मजल्याचे काम पूर्ण झाले आहे. पण रंगरंगोटी बाकी आहे. संस्थेत बांधकाम फंडस् संपलेला आहे. रंगाचे काम रहीत करण्यात आले आहे. काय करावे? मोठा प्रश्न पडला आहे.''

समोरून उत्तर आले, ''नागले! काम अपूर्ण राहता कामा नये. ब्रशच्या शेवटच्या फटकाऱ्यापर्यंत काम पूर्ण झालेच पाहिजे. रंगरंगोटीला एकूण किती खर्च येणार आहे?''

मी म्हटले, २८ हजार तरी लागतील!''

श्री. वाघण्णा म्हणाले, ''ठीक आहे! मी उद्या पहाटेसच रुपये ३० हजार घेऊन माणूस तुमच्याकडे पाठवून देतो. प.पू. श्रीमहाराजांच्या समारंभात वास्तुचे कोणतेही काम बाकी राहता कामा नये! त्या करता अधिक काही आवश्यकता असली तर कळवा!''

फोन झाला. काम झाले. पण मनास आपण जे केले ते बरोबर केले कां नाही? विश्वस्त काय म्हणतील? मी श्री. दातेना म्हटले, ''आपले भाऊसाहेब वाकडे हे आपले फार मोठे आधारस्तंभ आहेत. काही प्रसंगच निर्माण झाला तर ते धैर्याने आपले मागे उभे राहतात. आता रात्रीचे दहा वाजले आहेत. चला आपण भाऊसाहेबांकडे जाऊन आपला अपराध त्यांच्या कानी घालू या!''

मी व श्री. नारायणराव दाते आम्ही रात्री दहा नंतर श्री. भाऊसाहेब वाकडे यांच्या घरी गेलो व त्यांना प्रांजलपणे आम्ही आमच्या भावना सांगितल्या व श्री. वाघण्णांना परस्पर फोन केल्याची माफी मागितली. भाऊसाहेब धीरोदात्तपणे म्हणाले, ''अरे! काही घाबरू नकोस, जे झाले ते चांगलेच झाले. आम्हाला त्यांच्याकडे शब्द टाकणे अगदी अशक्य होते. आधीच ते एवढे करत असतात आणि आणखी आम्ही हात कसे पसरायचे? तुम्ही काही काळजी करू नका. आता उद्या त्यांचा माणूस तीस हजाराची रक्कम घेऊन येईल. नागले, ती तुम्ही तुमच्या हाती घ्या आणि पेन्टींगचे सर्व साहित्य ब्रश, पॉलीश पेपर्स पासून सर्व उद्याच मार्केटला जाऊन खरेदी करून आपल्या ताब्यात ठेवा. ही रक्कम तुम्ही परस्पर खर्चाला घ्या. त्यातूनच त्या पेंटर अणि त्याचे मजुरांचे पेमेंट करा. चला, बाहेरचे बाहेर हा खर्च करू. अकाऊंटला जमा करण्याची जरूरी नाही. आपल्याकडे तेवढा वेळही नाही. चला लागा कामाला.''

दुसऱ्या दिवशी माझे स्नान, संध्या आन्हिक पुरे होते न होते तोच श्री. वाघण्णांचा माणूस कॅश घेऊन आला. ती रक्कम त्याच्या समोरच मोजून घेतली. लागलीच 'श्री रेणुका निवास' गाठले आणि महाराज मला म्हणाले, ''आता असे करा! ही रक्कम आधी गंगेत बुडवा आणि नंतरच वापरायला घ्या!''

मला श्रींच्या म्हणण्याचा अर्थच कळला नाही. मी म्हटले, ''महाराज! मला आपल्या बोलण्याचा अर्थ कळला नाही!''

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! आपली सुवर्ण सहकारी बँक आहे ना? त्या बँकेत आधी जमा करा! आणि तुमच्याकडे आम्ही चेकबुक सही करून दिलेले आहेच. जसे लागतील तसे चेकने (बेअरर चेकने) पैसे काढून मग खर्च करा!''

पहिली गोष्ट ही की, रात्री श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी ही रक्कम परस्पर वापरास घ्या, असे म्हटले होते ते अंतर्ज्ञानाने ओळखून श्रींनी हा सल्ला दिला. हे मार्गदर्शन दिले. गंगेत न बुडविताच ही रक्कम आम्ही वापरली असती आणि येनकेन प्रकारेण ही ३0 हजार रुपयाची रक्कम नागलेच्या हाती जमा झाल्याची वार्ता कर्णोपकर्णी होऊन त्याचा विपर्यास झाला असता तर सद्गुरुंच्या लाडक्या भक्ताची सज्जनता, चारित्र्यशीलता धुळीस मिळण्यास वेळ लागला नसता! कसे सद्गुरु आपल्या भक्तास पुढे येणाऱ्या संकटांतून आधीच सांभाळत असतात. त्याचेच हे उदाहरण नव्हे काय?

श्री. भाऊसाहेबांचा सल्ला हा वेळापव्यय टाळण्याकरीता होता, परंतु दूरदर्शी सद्गुरुंना सर्व काही भविष्य ज्ञात असते.

१६२) श्री. रघुनाथरावांची सोबत

दि. १२.३.१९९० रोजी मी श्री वामन निवासाच्या वरच्या माळ्याच्या बांधकामावर सायंकाळी हजर झालो. कामाची घाई असल्याने मी पंधरा सोळा दिवस पुण्यातच राहणार होतो. प.पू. श्रीमहाराजांच्या सहस्रचंद्रदर्शनशांती दर्शनाच्या दि. ११.५.१९९० ला महोत्सवाचा प्रारंभ होणार होता. त्यापूर्वी आठ दिवस आधी तरी वास्तू रंगरंगोटीसह परिपूर्ण करायची होती. प.पू. श्रीमहाराजांचा मला निरोप आला. त्यांनी मला घरी येऊन तातडीने भेटण्यास सांगितले होते. मी त्याप्रमाणे घरी गेलो.

प.पू. महाराज नुकतेच आश्रमांतून येऊन आपल्या खोलीत स्थानापन्न होत होते. मी आत जाऊन साष्टांग नमस्कार घातला. माझ्याकडे पाहून म्हणाले, ''आलांत कां तुम्ही? या बसा! आमचं आपल्याकडे एक खाजगी काम होतं! बघा, तुम्हाला श्री गुरुमहाराजांच्या श्री वामन निवासाच्या सेवेतून वेळ काढून करता येण्यासारखे आहे कां?''

मी हात जोडून म्हटलं, ''आज्ञा महाराज! आम्ही आपल्या सेवेला सदैव तयारच आहोत! ते तर आमचं भाग्यच आहे!''

प.पू. महाराजांनी आमचे इतर बोलण्याकडे लक्ष न देता सांगायला सुरुवात केली.

''आपल्या श्री रघुनाथरावांची प्रकृती ठीक नाही, अशक्तपणाही खूप आहे. तशात त्यांना त्यांच्या भावाच्या मुलीच्या लग्नाकरीता बेळगांवला जायचे आहे. ते म्हणत आहेत, आम्ही

एकटे जाऊ. पण हा लांबचा प्रवास आणि एकट्यांना पाठवायला आम्हाला बरे वाटत नाही. त्यांची काळजी वाटते. आम्ही कोणास पाठवावे यावर खूप विचार केला, पण आपल्याखेरीज कोणी आमच्या समोर येत नाही. आपल्याला आपल्या चाललेल्या सेवेतून, तीन एक दिवसांची वेळ काढता येईल कां? तुम्ही त्यांचे सोबत असलात म्हणजे आम्ही निश्चिंत झालो.

मी म्हटले, महाराज मी सोबत जाईन. तीन चार दिवस लागले तरी येथील कामावर श्री. चंदू शेट्टी लेबर कॉन्ट्रॅक्टर व सुपरवायझर आहे. आपण निश्चिंत असावे.

प.पू. महाराजांचे विनंतीवजा विनयपूर्ण आर्जवाने उमटलेले हे शब्द! किती नम्रता, शालीनता! कोणापुढे! तर आपल्याच एका दासापुढे! शिवाय काळजी कोणाची वाहताहेत तर आपल्या सेवकभक्ताची! केवढे श्री. रघुनाथरावांवर प्रेम, केवढी त्यांची काळजी आणि केवढा आमच्यावरही विश्वास की, आम्ही रघुनाथरावांना सांभाळून नेऊ-आणू! धन्य ते रघुनाथराव आणि धन्य ते नागले!

१६३) भाचा प्रदीप याचा आजार!

मालाड येथे माझी थोरली बहीण सौ. शारदा रहात होती. तिचा मुलगा म्हणजे माझा भाचा चि. प्रदीप, वय वर्षे ४२ हा खूप आजारी होता. मी पुण्यास श्री वामन निवासचे कामात अतिशय व्यग्र होतो. श्रींचा सहस्रचंद्रदर्शन शांतीचा महोत्सव श्री वामन निवासामध्ये साजरा होणार होता आणि म्हणून वरच्या मजल्याचे काम लवकर पूर्ण करायची जबाबदारी माझ्यावर होती. दर आठ दिवसात मुंबईस येताच मी प्रदीपला भेटून येत असे. प्रथम त्याला दादरच्या शुश्रूषा हॉस्पिटलला ठेवला होता. तिथे मी गेलो असतां तो अगदी काकुळतीने मला म्हणाला, ''मामा मी बरा होईन ना? मला शंका वाटते! आई, वडील, भावंडे आणि माझा संसार या सर्वांस मी सोडून तर जाणार नाही ना? मी तुला नमस्कार करतो. तू सतत पुण्यास आश्रमाचे कामास जातोस तर प.पू. महाराजांकडे माझा आजार बरा होण्याकरीता प्रार्थना कर.'' मी त्याला वचन दिले की, ''मी प.पू. श्रीमहाराजांकडे तुझ्याबद्दल सांगेन!''

मी प.पू. महाराजांचे घरी दि. २६.३.१९९० रोजी सकाळीच गेलो. चि. प्रदीप भाचा आजारी असल्याचे श्रींच्या कानी घातले. त्याला पोटांत कॅन्सर झाल्याचे डॉक्टरी निदान झाले होते. त्याच्या जीविताला असलेला धोका टळावा म्हणून काय अनुष्ठान करावे ते विचारून घेतले. दि. २८.३.१९९० ला सकाळी ९ वाजता त्याचे ऑपरेशन करायचे ठरले होते व या ऑपरेशनमध्ये यशाची खात्री १० टक्केच होती.

प.पू. श्रीमहाराजांनी, 'मुलाच्या आईने व पत्नीने कुलस्वामीनीची प्रार्थना, उपासना व जप करावा, इतरांनी दिगंबराचा होईल तेवढा जप करावा' असे सांगितले.

माझे काही समाधान झाले नाही. मी कुठेतरी ऐकले होते की, ''महामृत्युंजयचा बहुसंख्य जप केल्याने मृत्यू टळतो.'' मी प्रदीपच्या आजाराने हबकलो होतो. मला काही सुचत नव्हते. प.पू. श्रीमहाराज एवढे सांगत आहेत तरी गुरुवाक्य प्रमाण म्हणून स्वीकारण्याची मन:स्थिती नाही. मी प.पू. महाराजांना उतावीळपणे विचारले, ''महाराज महामृत्यूंजयाचा जप बहुसंख्य करावा कां?'' श्री उत्तरले, 'तो तुम्हाला करता येणार नाही. योग्य ब्राह्मणाकडून तो करून घ्यावा लागेल. त्यापेक्षा आपण सर्व घरातील माणसांनी दिगंबराचा जप करावा. आई व पत्नीने मात्र कुलस्वामिनीची स्तोत्रे, उपासना जप करावा.'

मी माझा हेका (मूर्खपणानेच म्हणा) चालू ठेवला. ''महाराज! कसबा पेठेतील ..... हे शास्त्री, दुसरे अमूक अमूक शास्त्री यांच्याकडून महामृत्यूंजयाचा जप करून घेऊ कां?''

शेवटी महाराज म्हणाले, ''तुम्ही म्हणता त्या शास्त्रींकडे जाऊन चौकशी करून या!''

त्याप्रमाणे एका शास्त्रींकडे मी गेलो. त्यांनी हा जप मृत्यूच्या दाढेतून रुग्ण बाहेर काढायचा आहे म्हणजे काही लाख करावा लागेल. चाळीस हजार रुपये खर्च येईल.

हे ऐकून मी अवाक् झालो. त्यांना विचारले, ''हे आम्ही मान्य केले तर १००% रुग्ण बरा होईल याची खात्री देणार कां?''

ते म्हणाले, ''एखाद्याची आयुष्याची मर्यादाच विधी लिखीताने संपली असली तर त्याला आम्ही काय करणार? हा एक अंतिम प्रयत्न आहे. फळ देणारा परमेश्वर!''

मी म्हटले, ''गुरुमहाराजांना विचारून सांगतो!'' श्री रेणुका निवास मध्ये येऊन श्रींचे कानावर घातले. आकडा ऐकून श्रींना आश्चर्यच वाटले. पुन्हा त्यांनी पहिले सांगितले तेच सांगितले व माझी तळमळ पाहून, 'फार तर आपल्या श्री. कोडणीकर गुरुजी यांस ११ हजार महामृत्यूंजय जपाचा आजच प्रारंभ करायला सांगा,' असे म्हणाले.

श्रींचा निरोप घेऊन श्री वासुदेव निवासात श्री. कोडणीकर गुरुजींना सांगण्यास गेलो तर काल रात्री आश्रमात फोन आला होता की इमर्जन्सी ऑपरेशन आजच सकाळी ९ वाजता करण्याचे ठरले असून मला लागलीच मुंबईस बोलावले होते. मी श्री. कोडणीकर गुरुजींना श्रींचा निरोप सांगितला. 'आताच जपास प्रारंभ करा' अशी विनंती केली. काही दक्षिणा ते स्वीकारण्यास तयार नव्हते तरी त्यांच्या चरणाशी ठेवली. त्यांनी माझ्याकडून संकल्प सोडून घेतला व प्रसाद म्हणून खडीसाखर, श्रीफळ माझ्या हाती दिले. ऑपरेशन तर मुंबईस सुरूही झाले असेल. मी 'श्री वामन निवास साईटवर' जाऊन कामाच्या पुढील सूचना दिल्या. श्री रेणुका निवासाच्या वरच्या मजल्याच्या बांधकामाचा मुहूर्त जवळ आला होता. जवळ

म्हणजे उद्याच चैत्री पाडव्याला दुपारी १.३० वाजता! मुहूर्ताचीही सर्व व्यवस्था करून मी मुंबईस निघालो. प्रथम श्री रेणुका निवासामध्ये श्रींची आज्ञा घेण्यास गेलो तर विचारण्या आधीच श्रींनी विचारले, ''आपण मुंबईस निघालात का? या. या. काळजी करू नका! सर्व काही ठीक होईल!''

मला काहीच बोलावे लागले नाही. त्यांनीही दिलेला प्रसाद घेऊन सकाळी १०.३० च्या एशियाडने निघून मुंबईस दु. २.३० ला दादरला तर ३.०० वाजता हिंदुजा नॅशनल हॉस्पिटलला पोहोचताच ऑपरेशन यशस्वी होऊन धोका टळल्याचे समजले. मी तेथून स्वगृही गोरेगांवी आलो.

दि. २७.३.१९९० रोजी चैत्री गुढीपाडवा - आज माझा दीक्षादिन! पण सालाबादप्रमाणे पहाटे ६ वाजता बैठकीस ध्यान धारणेस बसता आले नाही. आज 'श्री रेणुका निवास' प.पू. महाराजांच्या घराचा वरचा मजला बांधण्याचा शुभमुहूर्त होता. मी पहाटे ४.३० ला घर सोडले. दादरला मला ५.३० ची एशियाड मिळाली सोबत भाऊकाका मुजुमदार होते. सकाळी १०.३० ला आम्ही गुरुगृही पोहोचलो. शस्त्रक्रिया यशस्वी होऊन जीविताचा धोका टळल्याची भाचा प्रदीपची शुभवार्ता सांगितली.

दि. २७.३.१९९० ला दुपारी १.३० वाजता आज चैत्री पाडव्याचे मुहूर्तावर श्रींचे आज्ञेने श्री रेणुका निवासाच्या वरच्या मजल्याच्या बांधकामास वीट बांधकामाचे पाच थर बांधून मुहूर्त केला. प्रसाद भोजन गुरुगृहीच झाले. मी व भाऊकाका होतो.

१६४) ''काय मुंबईला निघालांत कां?''

मी नुकताच दि. २२.४.१९९० रोजी रविवारी सकाळी मुंबईहून 'श्री रेणुका निवासाच्या' कामावर हजर झालो होतो. आता आम्हाला श्री रेणुका निवासांतच मुक्काम ठेवण्याची आज्ञा होती. दुसऱ्या दिवशी स्नान संध्या आन्हिक आटपून मी श्री वासुदेव निवासात निघालो. मला श्री. नाना कुलकर्णींकडून म्युनिसिपल पाण्याचे बिल व पैसे घेऊन कार्पोरेशन मध्ये भरायला जायचे होते. मी माझे सर्व आटोपले. सौ. आईसाहेबांनी दिलेली न्याहारी, दुग्ध प्राशन करून निघण्यापूर्वी नेहमीप्रमाणे श्रींना नमस्कार करण्यास गेलो.

''काय मुंबईस निघालांत कां?''

श्रींच्या या प्रश्नांचे मला आश्चर्यच वाटले. मी म्हटले, ''नाही महाराज! कालच तर मी मुंबईहून आलो. आता आश्रमात जाऊन श्री वामन निवासाचे पाण्याचे बिल भरण्यास कार्पोरेशनला जायचे आहे!''

श्री काहीच बोलले नाहीत. मी श्री वासुदेव निवासात ऑफिस मध्ये जाऊन नानांकडून पाण्याचे बिल व पैसे घेतले. रिक्शा पकडली. म्युनिसिपल कार्पोरेशनच्या पाण्याचे बिल स्वीकारण्याच्या खिडकीवर लांबलचक रांग होती. मी रांगेत उभा होतो. काही वेळातच श्री. नारायणराव दाते घाईघाईने आले व म्हणाले, ''नागले ते बिल व पैसे माझ्याकडे द्या! मुंबईहून फोन आला होता, तुमचा भाचा सिरीयस आहे. तुम्हाला लागलीच मुंबईला बोलावले आहे. मी तसाच निघालो. श्री रेणुका निवासात गेलो. प.पू. महाराज आन्हिकांत होते. मी लागलीच निघत असल्याचे सौ. आईसाहेबांना सविस्तर सांगितले. त्यांनी मला भाजी पोळी डब्यांत दिली. मी माझी बॅग ओटीवर ठेवून श्रींचे दर्शनास आत आलो. श्रींना लांबूनच नमस्कार केला. श्रींनी पुन्हा प्रश्न केला.

''काय निघालात कां मुंबईला?''

मी दु:खीत अंत:करणाने होय म्हटले आणि निघालो. पुणे-मुंबई एशियाड १२.४५ दुपारची मला मिळाली. दुपारी ३.३० वाजता मालाडला ताईकडे पोहोचलो.

माझा भाचा प्रदीप कुळकर्णी मला भेटला नाही. तो आधीच सकाळी ७.५० ला प्राणज्योत मालवून श्री चरणाशी विलीन झाला होता.

१६५) ''शत्रूवरही दया!''

प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या सहस्रचंद्रदर्शन शांती सोहळ्याच्या १-२ महिने आधी प.पू. महाराजांवर कोण्या अज्ञात व्यक्तीने जारण-मारण क्रियेचा मंत्रप्रयोग केला होता.

प.पू. श्रीमहाराज तेव्हा बार्शीला होते. एके दिवशी सायंकाळी चार नंतर प.पू. श्रीमहाराजांचे 'श्री भगवंत मंदिरात' प्रवचन सुरू होते. प्रवचन संपले आणि महाराज हातपाय धुवून सायंसंध्येच्या तयारीत होते. इतक्यात त्यांच्या लक्षात आले की, आपल्या धोतरावर गुलाल शिंपडावा असे लाल लाल बारीक बारीक डाग शिंतोडे धोतरावर पसरले आहेत. एकूण कारण लक्षात येण्यास त्यांना वेळ लागला नाही. जवळच्या सेवेकऱ्यांस महाराज म्हणाले, ''आमच्यावर अरिष्ट आले आहे!'' प.पू. महाराज स्वगृही श्री रेणुका निवासांत आल्यानंतर वेदमूर्ती कृष्णा आर्वीकर यांना ही बातमी कळताच ते त्वरीत श्रींच्या दर्शनास आले. पूर्वीचे महामुनी कमंडलुंतील पाणी सिंचन करून एखाद्याला अभिमंत्रीत शुभाशीर्वाद आणि वर प्रदान करायचे तसे एखाद्या पाप्यास शापवाणीही द्यायचे. ह्या विद्येचा अभ्यास वेदशास्त्रांत संपूर्ण विधीसह आहे असे म्हणतात. प.पू. महाराजांसमोर श्री कृष्णा आर्वीकर व इतरही शास्त्री वेदशास्त्र संपन्न वेदमूर्ती उभे राहीले. श्री. कृष्णा यांनी श्रींना विचारले व आज्ञा

मागितली म्हणाले, ''महाराज, आम्हाला परवानगी द्या! आम्ही अनुष्ठानाने आपल्यावर झालेले मंत्रप्रयोग परतवून लावतो!''

प.पू. महाराज म्हणाले, ''नको नको! असे काही करू नका! आपल्याला ब्रह्महत्येचे पाप लागेल! त्यापेक्षा आपल्या संरक्षणाचे मंत्र आहेत, तेवढ्यांचे अनुष्ठान-शांती करून अरिष्ट थांबविण्यास, दूर करण्यास हरकत नाही!''

त्याप्रमाणे श्री. कृष्णा यांच्या पुढाकाराने महाराजांचे छात्र व हितचिंतक वेदमूर्ती मंडळींनी अनुष्ठाने सुरू करून 'श्रींच्या' वरील अरिष्ट शमविले.

प.पू. महाराजांच्या सहस्रचंद्रदर्शन शांती सोहळ्यात, 'कुंडली शृंगेरी मठाचे जगद्गुरु श्री शंकराचार्य-योगाभिनव नरसिंह भारती स्वामी महाराज' मुद्दाम आले होते. श्री. राजेश्वर शास्त्री प.पू. महाराजांकडे वेदपठणास होते. श्री वासुदेव निवासाच्या बांधकामानिमित्त आश्रमांत मुक्कामास राहिल्याने अनेक विद्वान आचारसंपन्न सच्छील शास्त्री पंडितांचा सहवास आम्हाला प.पू. श्रीमहाराजांच्या कृपेनेच लाभला. श्री. राजेश्वर शास्त्रींना अवसर मिळेल तर कधी आम्ही त्यांच्याशी सुखसंवाद साधत असू. मराठी त्यांना बोलण्यास जरा त्रास होत असला तरी त्यांच्या चेहऱ्यावरील शुद्ध सात्विक भावांतून त्यांच्या निर्मळ अंत:करणाचे दर्शन होत असे. सदा हसतमुख! त्यांना माझ्याबद्दल खूप आंतरिक प्रेम-आस्था आणि कौतुक असायचे ते प.पू. श्रीमहाराजांच्या भक्ती भावामुळेच! माझ्याकडून 'श्री वामन निवास' बांधला जात होता हेही कारण कौतुकांत भर घालणारे होते. या सोहळ्यात श्री नरसिंह भारती स्वामी महाराजांची रहाण्याची सोय 'श्री वासुदेवाश्रमांत' होती. प.पू. श्रीमहाराज बसतात त्या मागील खोलीत ते उतरले होते. श्री. राजेश्वर शास्त्रींना माझी त्यांच्याशी ओळख करून द्यायची होती. ते अक्षरश: मला हात धरून ओढीतच त्यांच्याकडे घेऊन गेले. मी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. राजेश्वर शास्त्रींनी आमची त्यांच्यासमोर कानडीतून, संस्कृतांतून खूपच तारीफ, प्रशंसा केली. मला लाजवून टाकले. ते स्वामी बालदीत गरम पाणी घेऊन त्यात दोन्ही पाय बुडवून बसले होते. मी त्यांना हिंदीतून आपल्या पायास काय झाले आहे. कसला त्रास होत आहे ते विचारले.

स्वामी म्हणाले, ''आम्हाला या प.पू. दत्तमहाराजांच्या सहस्रचंद्रदर्शनशांती महोत्सवाचे निमंत्रण पत्र मिळाले. प्रथम आमचा इतक्या लांब येण्याचा विचार नव्हता. आमच्या नित्यक्रमांत ते शक्यही नव्हते. परंतु आमंत्रण वाचले. रात्री अंतर्यामी दूरदर्शन केले व आम्हाला कळून चुकले की, श्रीदत्तमहाराज महासंकटात आहेत. त्यांच्यावर दारुण मंत्रप्रयोग जाहला आहे. आपल्याला त्यांचे संरक्षणास गेलेच पाहिजे. आम्ही आलो. त्यांना डोळे भरून पाहिले आणि त्यांचे सर्व अरिष्ट आम्ही आमच्या योगसामर्थ्याने आमच्याकडे खेचून

घेतले. आमच्या शरीरास सूज येऊ लागली ती सर्व पायात उतरली. वेदना असह्य होऊन चालणे अशक्य होऊ लागले. उपाय आमच्याकडे होता. तीन दिवस गरम मिठाचे पाण्यात पाय ठेवून आम्ही आहोत. ठीक होईल सर्व!''

श्री राजेश्वर शास्त्रीनींही त्यांची न समजणारी काही वाक्ये समजावून सांगितली.

या योगविद्या पारंगत नरसिंहभारती स्वामी महाराजांची ह्याच सोहळ्यांत प.पू. श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेबांनी पाद्यपूजा केली.

श्रींना जेव्हा मी हा वृत्तांत कथन केला तेव्हा प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''अहो! हे नरसिंहभारती स्वामी महाराज ४० दिवस नुसत्या हवेवर असतात. अन्न-पाणी काही नाही आणि पुढील ४० दिवस ते फक्त फळांचा रस आणि दूध अशा द्रवाचे मित आहारावर असतात. त्यांची प्रकृती कशी धडधाकट व संपूर्ण निरोगी आहे हे आपण पहातोच. त्यांचे तपःसामर्थ्य अवर्णनीय आहे. योगसामर्थ्य अफाट आहे!'' आपले सर्वांचे भाग्य आहे, या निमित्ताने कां होईना पण आपल्याला त्यांचे दर्शन झाले.

१६६) ''किरण म्हसवडकरांचा वाङ्निश्चय!''

दि. ३.२.१९९० सायंकाळी ५ वाजता मी श्री वासुदेव निवासांत होतो. दुपार नंतर भोजनोत्तर विश्रांती घेऊन श्री वामन निवासाचे बांधकामावर निघण्याचे तयारीत होतो. इतक्यात आश्रमांतील एका छात्राने प.पू. श्रीमहाराज मला बोलावित असल्याचे सांगितले. प.पू. महाराज आपल्या नित्य जागेवर वरच्या मजल्यावरील खोलीत स्थानापन्न होते. मी वर गेलो. साष्टांग नमस्कार केला व आपण मला बोलाविले आहे का? असे विचारले.

प.पू. महाराज म्हणाले, ''आपण कामावर निघालात का? आमचं एक काम जाता जाता करा! आपले म्हसवडकर आहेत ना त्यांना तांतडीने फोन करा आणि त्यांना आमचा निरोप सांगा की, उद्या रविवारी तुम्ही वधु-पित्यांकडे बोलणी करायला पुण्यात येणार आहात तर येताना सोबत गोडसेंना घ्या! गोडसे त्यांच्याबरोबर योग्यप्रकारे चर्चा करतील आणि त्यांच्याकडे जाण्यापूर्वी आमच्या घरी तुम्ही व गोडसे आम्हाला आधी भेटून जा!''

मी म्हटले, ''ठीक आहे महाराज! येथे जवळच टेलिफोन बूथ आहे. मी श्री म्हसवडकरांना आताच फोन करतो व ते काय म्हणाले तेही येऊन आपणास सांगतो आणि नंतरच साईटवर जाईन!''

प.पू. श्रीमहाराज पुढे मला थोडी पार्श्वभूमी समजावून सांगू लागले. श्री. म्हसवडकरांचा मुलगा आपला किरण याला एक मुलीचे स्थळ आले आहे. पुण्यातच आहे. त्या मुला-मुलीचा

पहाण्याचा कार्यक्रम होऊन एकमेकांची पसंतीही झाली आहे. आता उद्याच्या रविवारी पुढील बोलणी करण्याकरीता म्हसवडकर त्यांच्याकडे जाणार आहेत. आपले म्हसवडकर स्वभावत: अत्यंत साधे आणि सरळ स्वभावाचे आहेत. पुष्कळ वेळा त्यांना संभाषणांतील गूढ अर्थ, मथितार्थ, समजत नाही. मर्म लक्षात येत नाही. ही समोरची मंडळी आम्ही ओळखतो. चांगली आहेत. काही वाईट नाही. परंतु ते व्यवहार कुशल, भाषणप्रचूर, चाणाक्ष आहेत. त्या मानाने आपले म्हसवडकर हातचे राखून बोलणारे नाहीत. त्यांचे मन आणि वाणी एकच असते. ती ईश्वरी देणगीच आहे म्हणा. पण जगरहाटी आणि सांप्रत काळ यांचेही माणसाने व्यावहारिक जीवनात भान ठेवावे लागते. श्री. गोडसे त्यांची बाजू, त्यांचे म्हणणे, समोरच्या व्यक्तींशी व्यवस्थित मांडू शकतील. मुद्देसूद बोलतील आणि योग्य ते सडेतोड स्पष्ट वक्तव्य करतील. म्हणून म्हटले की, म्हसवडकरांनी पुढील बोलणी करण्यास श्री. गोडसे यांना सोबत घेऊन जावे.

प.पू. महाराजांना प्रत्येक भक्ताच्या स्वभावाची, त्याच्या दैवी गुणसंपदेची तसेच ऐहिक जीवनात आवश्यक असलेल्या व्यावहारिक कुशलतेची केवढी जाण असते.

सद्गुरु आपल्या भक्ताची कशी काळजी घेत असतात त्याचेच हे एक उदाहरण आहे.

श्री. म्हसवडकरांचे साध्या सरळ बोलण्यातून काही गैर अर्थ, काही नुकसान होऊ नये म्हणून श्रींनी श्री. गोडसे यांची योजना केली. गोडसेंबद्दल सुद्धा श्रींना एवढी खात्री की मला म्हणाले, ''गोडसे व्यावहारिक पातळीवर सडेतोड आणि स्पष्ट बोलतील आणि युक्तीवादही उत्तम करतील!''

१६७) ''आपण म्हसवडकरांना ओळखता का?''

दि. २६.८.१९८३ रोजी श्री वासुदेव निवासात प.पू. महाराजांकडून काशीहून आल्यानंतरचे गंगापूजन होते. मी आदल्या दिवशी दि. २५ रोजीच आश्रमात आलो होतो. सायंकाळी ७ नंतर श्री रेणुका निवासामध्ये जाऊन प.पू. महाराजांचे दर्शन घेतले. कुशलक्षेम विचारून झाल्यानंतर प.पू. महाराजांनी मला प्रश्न केला.

''तुमची आणि उद्धवराव म्हसवडकरांची भेट झाली आहे का? आपण म्हसवडकरांना ओळखता का?''

मी म्हटले, ''नाही महाराज. त्यांचा परिचय झालेला नाही.''

महाराज म्हणाले, ''ते आलेले आहेत! आश्रमांत तुम्हाला भेटतील!''

माझ्या लक्षात आले की, प.पू. महाराजांची ही फार इच्छा दिसते. आपण आश्रमात हे

म्हसवडकर कोण आहेत त्यांची ओळख करून घेतली पाहिजे.

दुसऱ्या दिवशी श्री वासुदेव निवासात गंगापूजनाची मोठी धामधूम होती. वरच्या साधनाकक्ष हॉलमध्ये पूजेची तयारी करण्यात येत होती. इतक्यात कोण्या व्यक्तीने स्टेज सजावटीत एका धोतर उपरण्यात असलेल्या व्यक्तीला ''म्हसवडकर!'' म्हणून हाक मारली व त्वरेने ते सजावटी जवळ आले. माझ्या लक्षात आले 'हेच ते म्हसवडकर' असणार! त्यांची धावपळ संपल्यानंतर मी त्यांच्याजवळ गेलो व विचारले, ''आपण उद्धवराव म्हसवडकर कां?''

''होय! आपण कोण?''

''मी प.पू. दत्तमहाराजांचा एक भक्त शशीकांत नागले!''

अहो! काय सांगायचं? पूर्व परिचय नसताना त्या गृहस्थानी फार वर्षाची मैत्री असावी अशा पद्धतीने मला मिठीच मारली आणि म्हणाले, ''हो हो! मीच म्हसवडकर! महाराज मला सारखे म्हणतात हो! नागले भेटले का? नागले भेटले का? बघा! आज तो योग आला! तुम्ही गोरेगांवला राहता ना?''

मी म्हटले, ''होय! आता तुम्ही फार कामात दिसता! आपण दुपार नंतर सावकाशीने बोलूं या!''

अशी म्हसवडकरांची आणि आमची ओळख झाली. आम्ही दोघेही घरी जाऊन प.पू.महाराजांचे दर्शन घेतले. आम्ही दोघेही एकत्र आल्याचे पाहून त्यांना आनंद आणि समाधान झाले. म्हणाले, ''झाली का तुमची भेट? चला बरं झालं! ह्यांनी मोठा प्लॉट लोणावळ्याला घेतला आहे. त्यात काय घर बांधायचे का काय करायचे याबाबत आपणच त्यांना स्थापत्यशास्त्राच्या ज्ञानाने मार्गदर्शन देऊ शकाल! एकदा ह्यांच्याबरोबर जाऊन तो प्लॉट तुम्ही पाहून या! ह्यांची काय इच्छा आहे, तुम्हाला त्यावर काय करावेसे वाटते ते संगनमताने ठरवा! तुम्हीच त्यांत लक्ष घातलंत तर ह्यांची बाहेरच्या व्यक्तीकडून फसवणूक तरी व्हायची नाही. शिवाय ते बांधकामाचे काम तुमच्याकडून करून घ्यायचे की कसे ते उभयता मोकळेपणाने बोलून उभयतांना फायदेशीर होईल असे करा!''

१६८) श्रीदत्त अमरेश्वर मंदिरांतील पुजाऱ्याचा क्रोध!

श्रींच्या सहवासात वाडी येथे मुक्काम असताना एके सकाळी साधारण १० वाजण्याच्या सुमारास आम्ही भक्त मंडळी प.पू. महाराजांचे सोबत औरवाडला निघालो. श्रीदत्त अमरेश्वर मंदिरात आम्ही श्रींच्या पाठोपाठ प्रवेश केला. श्रींनी श्रीदत्त अमरेश्वर गाभाऱ्यासमोर साष्टांग

दंडवत घातले. हाताने डोळ्यांच्या वरच्या प्रकाशास रोखून 'श्री दत्त अमरेश्वराचे' दर्शन अगदी निरखून घेत होते. एक कोणी पुजारी देवांची पूजा करीत होते. त्यांची पूजा आटोपून ते बाहेर येण्याचे तयारीत होते. म्हणून प.पू. श्रीमहाराज जरा बाजूला सरकून दर्शन घेत होते. हे पुजारी प.पू. श्रीमहाराजांकडे पहात म्हणाले, ''कोण कवीश्वर महाराज कां?''

प.पू. महाराजांनी विचारले, ''कोण आपण?''

ते पुजारी कठोर आवाजात उत्तरले, ''मी गोपाळ कुलकर्णी पुजारी! काय कधी होणार या मंदिराचा जीर्णोद्धार? कधी होणार? पावसात वरच्या छपरांच्या पत्र्यांतून पावसाच्या धारा लागतात! प्रमुख ट्रस्टी आहात ना तुम्ही? काय केलीत आजपर्यंत मंदिराची सुधारणा? आम्ही जाणून आहोत तुम्हाला काय, तुमच्या त्या श्री गुळवणी महाराजांना काय? वाडीला मंडप झाला. सगळं झालं! मोठे मंदिर, मोठे लोक, मोठा मान आणि मोठा लौकिक! या मंदिराकडे पहायला वेळ आहे कुणाला? इकडे पहायचं कारणच काय? आम्ही सर्व ओळखून आहोत! माहीत आहे सर्व आम्हाला!''

हा गृहस्थ प.पू. महाराजांसमोर अक्षरश: आग पाखडीत होता. वटारलेल्या डोळ्याने श्रींकडे पहात खाऊ का गिळू करीत होता. आपल्या सद्गुरुंबद्दल कोणी अपशब्द काढले तर त्यांची जीभ खेचावी असे समर्थ रामदास स्वामी दासबोधांत सांगतात. आम्हा गुरुभक्तांची तळपायाची आग मस्तकांत जात होती. पण करणार काय? त्यातूनही आमच्यापैकी काहींनी पुढे येण्याचा प्रयत्न केला, पण श्रींनी हस्तसंकेत करून मागे सरण्यास खुणावले. तो ओरडत, खेकसत होता. नालस्ती करीत होता. पण प.पू. श्रीमहाराज देवासमोर अगदी शांत उभे राहून त्या पुजाऱ्यास शांत करीत होते. ''अहो! गोपाळराव शांत व्हा! तुमचे म्हणणे काही चुकीचे नाही. देवस्थानाबद्दल तुम्हाला ही केवढी आत्मियता आहे, म्हणून तर तुम्ही पोटतिडकीने बोलत आहात! गेल्या साठ सत्तर वर्षांत संपूर्ण देवालयाचे नूतनीकरण झालेले नाही. दरवर्षी किरकोळ डागडुजी होत असते. आमचंही लक्ष आहे! नाही असे नाही! श्री अमरेश्वरांची इच्छा झाली की, सर्व काही घडून येईल. तोच करणारा आणि करवून घेणारा आहे! थोडी तितिक्षा हवी! वेळ आली, योग जुळून आले की होईल सर्व!! आमच्याकडून प्रयत्न चालूच आहेत. थोडा संयम हवा. तुमच्या सारखे तळमळीचे पुजारी लाभले आहेत. होईल, जीर्णोद्धार होईल!''

प.पू. महाराजांची स्थिर चित्तवृत्ती, शांतवृत्ती आम्ही भक्तगण न्याहाळीत होतो. गोडसे, शृंगारपुरे, तांबोळी, घोलकर, नागले अशी सर्व मंडळी हे दृश्य पाहण्यास उपस्थित होती.

यापूर्वी प.पू. महाराजांनी किती वेळातरी श्री दत्त अमरेश्वराच्या जीर्णोद्धाराचा विषय काढला होता. आर्थिक सहाय्याची गरज होती. आपल्या सद्गुरुंचे श्री नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी

महाराजांचे स्थान, प.पू. वासुदेवानंद सरस्वती पीठ! श्रींना प्राणापलीकडे प्रिय होतेच! इतकेच काय पण १९८६ मध्ये ते आमच्याकडे अनेकदा म्हणाले, ''एकदा सर्व व्यवहार-प्रपंचाची निरवा निरव करून लवकरांत लवकर आम्हाला सर्व सोडून श्री अमरेश्वर क्षेत्री कायमचे वास्तव्य करायचे आहे! कुठे जाणे नको नि येणे नको! तिथे आम्हाला क्षेत्र संन्यास घेऊन रहायचे आहे! श्रींच्या सहस्रचंद्रदर्शन शांतीनंतर ते जीर्णोद्धाराकडे वळतील असे वाटतच होते.

१६९) कृष्णामाईची न्याहारी!

श्री कृष्णामाईला (नदीला) साडी नेसविण्याचा कार्यक्रम प.पू. सौ. ताई महाराजांनी आयोजित केला होता. सर्व भक्तमंडळी, सेवेकरी त्या दिवशी सकाळपासून फुलांच्या माळा, नौकेची सजावट, साड्यांच्या निऱ्या घालून ठेवणे, पूजेचे - नदीची ओटी भरण्याचे साहित्य ह्यात व्यग्र होते. प.पू. श्रीमहाराज सुद्धा तयारीस लागले होते. नागलेंना बोलावून आणले, म्हणाले - 'पुलावरून ह्या तीरापासून त्या तीरापर्यंतचे अंतर तुमच्या मेजरींग टेपने मोजा, म्हणजे नऊवारी साड्या किती लागतील त्याचा अंदाज येईल. त्याप्रमाणे साड्या आणू. एखादी जास्त आणू. कमी नको पडायला!''

कार्यक्रमास सर्व मंडळी निघाली. नटून-थटून मुली, सुवासिनी निघाल्या. 'श्री दत्त अमरेश्वराचे मंदिर' रिकामे झाले. त्यात राहीले कोण? एकट्या सौ. आईसाहेब! दिनेश आपल्या पत्नीस सौ. देविकास म्हणाला, ''तू थांब सौ. आईसाहेबांचे सोबत आणि त्यांच्या सेवेला! काही हवे नको ते पहा! प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना ह्या सोहळ्यास येता येत नाही!''

सौ. देविका सौ. आईसाहेबांचे सेवेस राहीली. तब्बेत ठीक नसल्याने स्नानापासून त्यांचे सर्व आटोपायचे होते. सौ. देविकाने त्यांची स्नानाची तयारी गरम पाणी थंडपाण्यापासून करून दिली. नेसण्याची वस्त्रे दिली. नंतर त्यांना फोडणीचे पोहे ती करून देणार होती. सोवळ्यात आणि आपल्या हातून द्यायचे आहेत म्हणून तिने पाण्याचा वापर न करता दुधाने पोहे धुवून फोडणीस टाकण्यास नेत हेती. सौ. आई साहेबांचे लक्ष होते. त्या ओरडल्या, ''अग ते पोहे दुधात कशाला धुवायला पाहिजे होते? तुझ्या सारख्या सालस मुलीच्या प्रेमळ सेवेत, मला तुझ्या हातचे काहीही चालले असते आणि चालेल!'' कार्यक्रम संपल्यानंतर सर्व मंडळी परतल्यानंतर सौ. आईसाहेब प्रत्येकाकडे सौ. देविकाचे कौतुक करत होत्या. ''पोरीनं माझं सगळं केलं हो! माझ्या देविकाने मला सांभाळलं!'' सौ. आईसाहेबांचे ते कौतुक ऐकून सौ. देविकास मात्र अत्यंत संकोच वाटत होता.

१७०) ''श्रीं''चा अपरिग्रह - (४)

श्री वामन निवासाच्या वास्तुचे काम पूर्ण झाले. आता ''श्रीं''च्या दृष्टीसमोर 'श्रीदत्त अमरेश्वर मंदिराचा' जीर्णोद्धारच होता. ''श्रीं''चा सहस्र चंद्रदर्शन शांती सोहळा संपन्न झाला. सहस्रकरांनी ''श्रीं''च्यावर भक्तगणांकडून सदिच्छा, शुभेच्छांचा वर्षाव झाला. संपूर्ण कार्य उत्कृष्ट प्रकारे पार पडून, आलेल्या देणग्यांतून तीन लाखाच्या वर रक्कम शिल्लक राहीली. ''श्रीं''च्या पुढे तत्क्षणीच ही रक्कम ठेवली असती तर त्यांचे अंतरंगातून आम्ही सांगू शकतो की, लागलीच 'श्रीदत्त अमरेश्वर मंदिराच्या' जीर्णोद्धाराचा संकल्पाची कार्यवाही झाली असती. परंतु या महोत्सवानंतर विश्वस्त मंडळींच्या मिटींगमध्ये असा प्रस्ताव आला की ''हा कार्यक्रम 'श्री वासुदेव निवास ट्रस्टने' आयोजित केला होता. तेव्हा ती उर्वरित रक्कम ट्रस्टमध्ये जमा व्हावी.'' ह्या उर्वरित निधींतून प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे प.पू. दत्तमहाराजांनी संकलीत केलेल्या समग्र ग्रंथांचे पुनर्मुद्रण करावे, असाही एक विचार पुढे आला होता.

एक परम गुरुभक्त विश्वस्त श्री. भगवानराव पटवर्धन यांनी हरकतीचा मुद्दा मांडला. ते म्हणाले, ''हा संपूर्ण निधी प.पू. महाराजांना आलेल्या सदिच्छा भेटीतूनच तयार झाला आहे. तो केवळ प.पू. श्रीमहाराजांचाच निधी आहे. तो त्यांचे चरणी अर्पण करावा.''

श्री. भगवानराव पटवर्धन यांचे म्हणणे समस्त विश्वस्तांनी मान्य केले. श्री. पटवर्धन ती रक्कम एका ब्रिफकेसमध्ये घालून ''श्रीं''कडे घेऊन गेले. ती ब्रिफकेस उघडून ''श्रीं''च्या पुढे ठेवून पटवर्धन म्हणाले, ''महाराज! हे सर्व आपले आहे, आपणाकरीता आलेल्या निधीचा हा उर्वरित भाग आहे. कृपया तो आपण स्वीकारा.''

अंतर्ज्ञानी महात्मा! त्यांना काय घडले, काय काय वक्तव्ये झाली हे अंतर्यामांत कळल्याशिवाय राहीले असेल का?

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''ठीक आहे, आम्ही हा उर्वरित निधी स्वीकारतो. ती रक्कम आता आमची झाली आहे. आता या रकमेचा विनियोग आमच्या मर्जीनेच होणार आहे. ही रक्कम आम्ही स्वीकारली आणि आता ही रक्कम 'श्री वासुदेव निवास ट्रस्टमध्ये' आमच्याकडून देणगी म्हणून जमा करावी.''

प.पू. श्रीदत्तमहाराज प्रथम पुण्यात येऊन त्यांनी आपले कुटुंबासह बिऱ्हाड थाटले त्यावेळेची ही गोष्ट आहे. प.पू.महाराजांची सांपत्तिक स्थिती कठीण होती. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे पूर्वीपासून प.पू. श्रीमहाराजांना ओळखत होते. त्यांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांनी लागलीच टिळक विद्यापीठात आपला शब्द खर्चून त्यांची संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यास भाग पाडले. विद्यापीठांतील अधिकाऱ्यांच्या समोर दुसरी कोणी व्यक्ती असणार. परंतु दत्तो वामन पोतदारांचा शब्द डावलता येण्यासारखा नव्हता. प.पू.

श्रीदत्तमहाराजांची संस्कृतचे प्राध्यापक म्हणून विद्यापीठांत नेमणूक झाली.

प.पू. महाराज विद्यापीठात प्राध्यापकाचे जागेवर रुजू झाले. सोपविलेल्या वर्गावर वक्तशीर जाऊन ते आपली चाकरी इमाने इतबारे करू लागले. अध्यापन हा ''श्रीं''चा आवडता विषय. शिकवण्यात हातखंडा. स्वतः ज्ञानमूर्तीच! विद्यार्थ्यांच्या शंका कुशंकेस तेथल्या तेथे उत्तर. विद्यार्थ्याला समजेल अशा सोप्या शब्दांत समजावणार, वेगवेगळी उदाहरणे देऊन शंकेचे निराकरण करणार. शांत वृत्ती, प्रसन्न चित्त, अत्यंत वक्तशीर ही सर्व दैवी गुणसंपत्ती त्यांच्याकडे आधीच भरपूर. कशाची कमतरता नाही.

महिना झाला. सर्व शिक्षकांचे पगार झाले. प.पू. महाराजांना पगाराकरिता बोलावण्यात आले नाही. त्यांनीही त्याबद्दल काही विचारले नाही. दुसरा महिना पूर्ण झाला. सर्वांचे पगार झाले.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन!'

ह्या उक्तीप्रमाणे प.पू. श्रीमहाराज वागत राहीले. विद्यार्थ्यांना शिकवीत राहणे हे आपले काम. आपण आपले कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडणे. ईश्वराकडे रुजू आहेच. बाकी घरचा प्रपंच किरकोळ शिकवण्यांतून कसाबसा चालत असे. असे करता करता दोन वर्षे उलटली. विद्यापीठांतील अधिकाऱ्यांनी प.पू. श्रीमहाराजांना कधी विचारले नाही. महाराजांनी कधी काही सांगितले नाही. पुढे विद्यापीठातील कोण्या व्यक्तीने ही गोष्ट श्री दत्तो वामन पोतदारांच्या कानी घातली. त्यांना ऐकून दुःख झाले. त्यांनी लागलीच पुण्यास टिळक विद्यापीठात जाऊन संबंधीत अधिकाऱ्यांना चार बोल सुनावले व प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वरांचा दोन वर्षाचा साठलेला पगार एक रकमी देण्यास भाग पाडले. थोड्याच कालावधीत प.पू. श्रीमहाराजांना ही पुणे टिळक विद्यापीठातील प्राध्यापकाची नोकरी सोडून जावे लागले. राष्ट्रीय पंडित म्हणून शिवाय त्यांनी लिहिलेल्या, 'वेदांत पारिजात सौरभ' ग्रंथास मानधन म्हणून मोठ्ठा पुरस्कार त्यांना मिळाला. भारत सरकार कडून त्यांना वार्षिक मानधन सुरू झाले. जे काही ॲरिअर्स मिळाले ते विद्यापीठाच्या दोन वर्षाच्या पगारांपेक्षा निश्चित जास्त होते. परंतु प.पू. श्रीमहाराजांनी नम्रतापूर्वक ती रक्कम टिळक विद्यापीठास देणगी स्वरुपात दिली.

प.पू. श्रीमहाराज १९८१ ला आमच्या घरी हरिहरेश्वर येथे आले असताना सध्याचे शिक्षण खाते आणि खात्यांतील अंदाधुंदी हा एकदा चर्चेचा विषय ''श्रीं''च्या समवेत भक्तगणांत निघाला. माझ्या पुतण्याच्या पत्नीस शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी मिळाली. रुजू होऊन चार महिने होऊन गेले तरी अजून तिचा पगार मिळालेला नाही. या माझ्या वक्तव्यावर श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांनी प.पू. श्रीमहाराजांची ही वरील गोष्ट सांगितली.

(१७१)
नवे मंगळसूत्र

एखादी नवी वस्तू खरेदी केली की ती आपल्या आप्तजनांना, आपल्यावर प्रेम, माया करणाऱ्या व्यक्तींना दाखवावी व त्या व्यक्तीचे त्या वस्तुबद्दल मत विचारावे असे कोणासही वाटतेच. माझी बहीण सौ. प्रभा शृंगारपुरे हिने पैसे साठवून आपले जुने मंगळसूत्र मोडून, त्यात सोन्याची अधिक भर टाकून, चांगले घवघवीत मंगळसूत्र सोनाराकडून तयार करून घेतले. पहिली शुभ घटना किंवा आनंदाची गोष्ट सांगायची कोणाला? आपल्या प्रिय गुरुमहाराजांना. आम्हा गुरुभक्तांची ही भावना असतेच. जीवनात कोणत्याही आनंददायी किंवा दु:खप्रद घटना घडल्या तर प्रथम निवेदन करायच्या गुरुमाऊलीला. सांसारिक, पारमार्थिक कोणतेही निर्णय घ्यायचे असले तर मार्गदर्शन सल्ला मसलत करायची गुरुमहाराजांकडे. स्त्रीसुलभ स्वभावानुसार सौ. प्रभाने ''श्रीं''च्या दर्शनास गेलेली असताना गळ्यांतील मंगळसूत्र, गळ्यांतून न काढताच वाटी बोटाने धरून पुढे करून ''श्रीं''ना म्हटले, ''महाराज हे बघा! मी मंगळसूत्रांत सोन्याची भर घालून नवीन घसघशीत मंगळसूत्र घडवून घेतले.''

प.पू. महाराजांनी ते अगदी निरखून पाहिले आणि म्हणाले, ''वाऽ! छानच आहे. पण हे जरा तोकडे वाटते. हल्ली लांबलचक मंगळसूत्र वापरण्याची पद्धती दिसते.''

साध्या गोष्टीतून सुद्धा महाराजांचे केवढे निरीक्षण असते. जनरहाटीप्रमाणे आपणही नव्या पद्धती आचरण्याकडे ''श्रीं''चा कल दिसतो. नवे नवे जे योग्य चांगले असेल ते जरूर स्वीकारावे.

१७२) दिवंगत प्रिय व्यक्तीचे स्मरण करावे भक्ती भावाने, दु:खाने नाही!

सौ. आईसाहेबांचे निधनानंतर प.पू. महाराजांची धाकटी कन्या चि.सौ. शैला हिला आपल्या आईची वरचेवर आठवण येऊन दु:खावेगाने रडू येई. नेत्रांतून घळघळा अश्रू वहात. मन बेचैन आणि सुन्न होई. आईचे नावाने टाहो फोडून मुक्त कंठाने रडावे असे वाटे. अशावेळी आपली दुसरी कोणी माया ममतेची व्यक्ती पाठीवरून हात फिरविण्यास, समजावण्यास, सांत्वन करण्यास जवळ असावी असे वाटे. ह्या माहेरच्या आठवणीत तितकेच जवळचे कोण? आपले वडील दादा. प.पू. श्रीमहाराजांना सर्व अपत्ये ''दादा'' म्हणत असत. सौ. शैलाचे घर श्री रेणुका निवासापासून जवळच आहे. तिने आपले दु:ख आवरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पूज्य दादांना जाऊन त्यांच्या नित्यक्रमात व्यत्यय

आणू नये आणि त्यांनाही दु:खाचे स्मरण करून देऊ नये असेही तिच्या वेड्या मनास वाटे. सरते शेवटी दु:ख न साहून ती माहेरघरी आली व दादांच्या गळ्यात पडून रडू लागली. प.पू. महाराजांचा-वडीलांचा हात पाठीवरून फिरल्याने तिला बराच दिलासा मिळाला.

प.पू. महाराज तिला म्हणाले, ''आपली आई आपल्याला सोडून गेली याबद्दल लेकरास अतिशय दु:ख होणे सहाजिकच आहे. जसाजसा काळ जाईल तसे दु:ख विसरले पाहिजे. आई अव्यक्तांत गेली, ती आपल्यापासून दुरावली असे का म्हणायचे? आई आहेच, दिसत नाही इतकेच. दु:ख करू नये. स्मरण जरूर ठेवावे. परंतु पूज्यभाव ठेवून, आईस ईश्वरस्वरूप देवता स्वरूप मानून वंदन करावे. दु:ख करू नये.''

१७३) ही जोडी आम्हाला ६०-७० वर्षापूर्वी भेटायला हवी होती!

श्री वामन निवासाच्या वरच्या मजल्यापासून सर्व काम पूर्ण झाले होते. श्री दत्त अमरेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कामही पूर्ण झाले होते. मी व श्री. लाटे 'श्री वासुदेव निवास आश्रमाचे' ऑफिसमध्ये काही चर्चा करीत बसलो होतो. श्री. रघुनाथराव कुलकर्णी व इतरही काही मंडळी होती. प.पू. महाराज खाली आले व हातपाय धुवून येऊन ऑफिसात आले, टेबलाशेजारील खुर्चीवर बसले. प्रसन्न चित्त होते. समोर आम्हा दोघांस पाहून विचारले, ''कोण हो नागले कां?''

आम्ही दोघांनी एकाच वेळी ''श्रीं''च्या समोर गुडघे टेकून चरणी मस्तक ठेवून नमस्कार केला. ''श्रीं'' हसले. श्री. रघुनाथरावांकडे पहात म्हणाले, ''ही जोडी आम्हाला ६०-७० वर्षापूर्वीच भेटली असती तर बरें झाले असते!'' आम्ही हात जोडून समोर उभे होतो. ''बरे झाले श्री वामन निवासाचे काम आधीच झाले. नंतर 'श्री दत्त अमरेश्वराची' परिसरांतील संपूर्ण वास्तू पक्क्या सिमेंट बांधकामांत झाली.''

श्रीदत्त अमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार प.प. नृसिंह सरस्वती श्री स्वामी महाराजांनी करून घेतला होता. या गोष्टीस आज ७० वर्षे झाली होती. सद्गुरु श्री स्वामी महाराज काय आणि सद्गुरु प.पू. श्रीदत्तमहाराज काय हे गुरुतत्त्व एकच होते आहे. आम्ही मात्र श्री स्वामींचे वेळी जन्मास आलेले नव्हतो.

प.पू. श्रीमहाराजांना आपल्या भक्तांचे कितीही कौतुक केले तरी कमीच वाटते. धन्य ते भक्त ज्यांना प.पू. श्रीदत्तमहाराजांसारखे सत्कर्म करवून घेणारे गुरु आणि पुन्हा केल्याचे कौतुक करणारे, असे लाभले.

१७४) तुम्ही सर्व बॅण्ड वाजंत्रीसह या!

प.पू. महाराजांचे प्रतिवार्षिक जे काही कार्यक्रम असायचे त्यातील श्रावणात सोलापूर येथे नागपंचमीला श्रावणी झाली की महाराज श्री. बापूसाहेब कुबडे यांच्याकडून तुळजापूरला जात. तेथील प्रथम धाकट्या देवीची पूजा नंतर मोठ्या देवीची पूजा आटोपून गाणगापूरला जात असत.

१९८७ साल असावे. दि. ३० जुलै १९८७, गुरुवार, आम्ही कुर्डुवाडीहून श्री. तांबोळी यांनी आणलेल्या जीपने वैरागला सौ. सुमनताईंकडे गेलो. सायंकाळी ४.३० ते ७ पर्यंत दिगंबराची धून झाली आणि ७ वाजता प.पू. महाराजांचे आगमन झाले. दुसऱ्या दिवशी आम्ही भक्त मंडळी प.पू. महाराज आणि प.पू. सौ. ताई महाराजांचे पाठोपाठ तुळजापूरला निघालो. दि. १.८.१९८७, शनिवारी धाकट्या देवीची पूजा संपन्न झाली.

दि. २.८.१९८७ रविवारी मोठ्या देवीची पूजा होणार होती. आम्हा सर्व भक्तगणांचा मुक्काम ''श्रीं''च्या सहवासात श्री. पाठक गुरुजींच्या घरीच होता. मोठ्या देवीच्या पूजेस प.पू. महाराजांबरोबर जाताना प.पू. श्रीमहाराजांचे मार्गात जाते वेळी कुंकूमाचा सडा टाकीत जाण्याचा प.पू. सौ. ताई महाराजांनी संकल्प केला होता. तबके भरून कुंकूम-पिंजर घेऊन सुवासिनी जय्यत तयारीत होत्या. सौ. ताईंच्या आज्ञेने बॅण्ड वादनाची मिरवणूक काढायची ठरले होते. त्याकरिता बॅण्ड सांगितला होता. परंतु प.पू. श्रीमहाराजांना देवीच्या मंदिरात जाण्याची घाई होती. कोठल्याही कार्यक्रमास वेळेच्या पाच पंधरा मिनिटे आधीच उपस्थित राहण्याचा वक्तशीर स्वभाव. प.पू. श्रीमहाराज केव्हाचे निघण्यास तयार. बॅण्ड पथक येण्यास उशीर झाला होता. प.पू. श्रीमहाराज उठून सज्ज झाले. रघुनाथरावांना म्हणाले, ''चला आपण पुढे निघू या. फारच वेळ झाला आहे.''

श्री. माधवराव तांबोळी त्वरेने प.पू. महाराजांचे समोर येऊन उभे राहिले व म्हणाले, ''महाराज थांबा थांबा. आपल्या करिता बॅण्ड मागविला आहे.''

प.पू. महाराज म्हणाले, ''आपण सर्व बॅण्ड वाजंत्रीसह या, आम्ही पुढे चलतो. पूजेस उशीर होत आहे.''

१७५) पण आपला पास घेतलात कां?

श्री वासुदेव निवास आश्रमात वर्षभरांत जे काही समारंभ साजरे होतात. त्यापैकीच एक मोठा समारंभ होता. दरवेळी पुण्याची आश्रमाची निगडीत असलेली मंडळी आणि आदल्या दिवशी व समारंभाचे दिवशी उपस्थित झालेली भक्त मंडळी यांचा अंदाज घेऊन प्रसादाची

पाकनिष्पत्ती केली जाते. तरीही अर्ध्या पंक्ती पूर्ण होतानाच शिजविलेले अन्न संपुष्टात येऊ लागे. ऐनवेळी बरीचशी बाहेरची मंडळी आत शिरतात आणि पंक्तीत येऊन बसतात. साधक कोण, भक्त कोण, अनुग्रहीत कोण, आतला कोण नि बाहेरचा कोण हे काहीच कळत नसे. विचारायचे तरी कसे? यातून मार्ग काढण्याकरिता विश्वस्तांच्या सभेत सहमताने निर्णय घेण्यात आला तो असा की पुण्यातील नेहमीची संबंधीत मंडळी त्यांना पासेस द्यायचे. तसेच बाहेर गांवाहून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची ऑफिसात रजिस्टरमध्ये नोंद घेऊन त्यांना पासेस द्यायचे. प्रसाद भोजनाची पाने मांडली की प्रत्येक व्यक्तीचा म्हणजेच भक्त, सेवेकऱ्याचा, साधकाचा पास विचारायचा. ज्याच्याकडे पास असेल त्यालाच फक्त भोजनगृहात सोडायचे. प.पू. महाराजांना ही पद्धत पसंत पडली असेल किंवा नसेल हे माहीत नाही. पण प.पू. श्रीमहाराज प्रमुख विश्वस्त जरी असले तरी बहुमताचा मान ठेवणे त्यांना क्रमप्राप्तच होते. झाले, या समारंभास आठ दिवस आधीपासूच आबालवृद्ध भक्त मंडळीस तसेच विश्वस्त, कार्यवाही स्वयंसेवकांपासून सर्वांना पासेस देण्यात आले. बाहेर गांवाहून आलेल्या साधकाने रजिस्टरमध्ये ऑफिसात ओळख देऊन नोंद द्यायची आणि पास घ्यायचा.

ब्रह्मवृंदांची सोवळ्यातल्या ब्राह्मणांची पहिली पंगत खालच्या पादुका गाभाऱ्यात हॉलमध्ये बसणार होती. पास पाहून एकेका व्यक्तीस आत सोडण्यात येत होते. श्री. रघुनाथराव वर प.पू. श्रीमहाराजांचे खोलीत जाऊन महाराजांना म्हणाले, ''महाराज, सोवळे नेसा! प्रसाद भोजनाची पंगत खाली घेत आहेत.'' प.पू. श्रीमहाराज उठले. सोवळे नेसले व खोलीच्या बाहेर पडण्यापूर्वी रघुनाथरावांना अगदी भाबड्या मनाने विचारत आहेत, ''अहो पण आमचा पास घेतलात कां?''

१७६) श्रीयंत्र

श्री रेणुका निवासाचे काम चालू असताना एकदा गुजराथ मधून कोणी सरकारी खात्यातील एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर असे चौघे पाचजण ''श्रीं''च्या दर्शनास आले. मी प.पू. महाराजांना आपल्या भेटीस कोणी गुजराथहून इंजिनिअर आल्याचे सांगितले. तळमजल्यावरील देवांसमोरचा हॉल आधीच तयार झाला होता. ''श्रीं''नी मला, त्यांना बसण्यास चटया अंथरुन घेण्यास सांगितले. ती सर्व मंडळी बसली. ''श्री'' बाहेर आले. सर्वांनी उभे राहून साष्टांग नमस्कार करून आपली ओळख दिली व येण्याचे प्रयोजन कथन केले.

ह्या मंडळींना प.पू.महाराजांकडून श्रीयंत्र हवे होते. जेणेकरून घरात गडगंज लक्ष्मीचा

वास व्हावा, समृद्धी, भरभराट कुटुंबात व्हावी. ''श्रीं''नी त्यांना हे यंत्र द्यावे व त्याची उपासना सर्व विधी सांगावा असे त्यांचे म्हणणे होते.

''श्री'' म्हणाले, ''पुण्यात लक्ष्मीनगरमध्ये प.पू. बाबामहाराज मानवतकर हे अधिकारी सत्पुरुष राहतात. आपण त्यांच्याकडे जावे. ते आपणास श्रीयंत्र देऊन त्याची पूजा, उपासना, विधी कशी करायची ते उत्तम समजावून सांगतील.''

१७७) मंत्रजपाच्या अनुष्ठानाने अपुरे शिक्षण पूर्ण झाले.

चि. मयूर माझ्या चुलत भावाचा मोठा मुलगा. त्याला अभ्यासात गती नव्हती. जेमतेम बारावी झाला आणि पुढील शिक्षण कसे होईल ह्या विवंचनेत तो होता. शेवटी हताश होऊन माझ्याकडे आला व म्हणू लागला, ''मला तुमच्या महाराजांकडे घेऊन चला. मी त्यांच्या चरणी लीन होऊन पुढील यशाकरीता ते सांगतील ते मी करीन.''

त्याच्या सद्भावना, आलेले नैराश्य पाहून मलाही वाटले, एखाद्याच्या जीवनात सकारात्मक बदल आणि श्रीगुरु सहवास मिळण्याची वेळच आली असेल तर आपल्या श्रीगुरुमहाराजापर्यंत याला न्यायला काय हरकत आहे? पुढचे काय ते त्याला पहाताच भेटीत गुरुमहाराज पाहतील.

मी चि. मयूरला घेऊन श्री रेणुका निवासामध्ये गेलो. ''श्रीं''ना माझ्याबरोबर त्यानेही साष्टांग प्रणिपात केला. मी आपली ऐहिक पातळीवर ह्या जीवाची ''श्रीं''ना ओळख करून देऊन त्याची अडचण त्याने स्वतः ''श्रीं''च्या कानावर घालून ''श्रीं''पुढे प्रार्थना केली की, कसेही करून त्याचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे, कोणताही मानसिक, शारीरिक, आर्थिक प्रतिबंध मध्ये येऊ नये.

प.पू. महाराजांनी आस्थापूर्वक त्याची चौकशी करून अडचण समजावून घेतली व कागदावर एक मंत्र लिहून देऊन नित्याने त्या मंत्राचा शुचिर्भूत होऊन जपास कसे बसावे, कुठे बसावे, किती जप रोज करावा हे सर्व ''श्रीं''नी त्याला समजावून सांगितले.

चि. मयूरचे जपानुष्ठान सुरू झाले. यथावकाश त्याला अभ्यासाची पुस्तके उघडण्याची इच्छा होऊ लागली. हळूहळू अभ्यास वाढू लागला. पुढील परीक्षेला बसण्याचे फॉर्म्स भरले गेले. परीक्षा होत गेल्या, यश मिळत गेले. मयूर पदवी परीक्षा उत्तम मार्काने उत्तीर्ण झाला. पुढे एल.एल.बी.च्या कायद्याच्या परीक्षा पास झाला. आज मयूर एक मोठा वकील म्हणून आपला व्यवसाय करीत आहे.

१७८) जपानुष्ठानाने मन परिवर्तन!

आमच्या पत्नीच्या चुलत भगिनीची ही गोष्ट आहे. ती ठाण्यास रहात होती. पती पत्नी आणि एकुलती स्वरुपसंपन्न मुलगी इतकेच कुटुंब. घरी आध्यात्मिकतेचे वातावरण नसले तरी मंडळी नास्तिकही नव्हती. प.पू. महाराज, सौ. आईसाहेब व सौ. ताईमहाराज १९८९ साली दि. १७.११.१९८९ ते २४.११.१९८९ या सप्ताहात श्री हरिहरेश्वर क्षेत्री आमच्या घरी आले होते. पुण्या-मुंबईची भक्त मंडळी सोबत होती. हा समारंभ सोहळा चालू होण्याचे आठ दिवस आधी मला या ठाण्यास राहणाऱ्या माझ्या मेहुणीचा (नांव सौ. नीलाताई) फोन आला व तिनेही या आमच्या गुरुमहाराजांच्या सोहळ्यास येण्याचा मानस दर्शविला. मला माझ्या नात्यांतील मंडळींचा गुरुमहाराज, गुरुभक्ती या संकल्पनेस पूरक-आस्थापूर्वक किती मान्यता, विश्वास, श्रद्धा आहे याची अंतर्मनात जाणीव होती. ह्या कार्यक्रमाला म्हणजे कशी भक्तीभावाने ओथंबलेली भाविक मंडळींची आवश्यकता असते. जेणे करून सात्विक भाव दुणावतो. प्रसन्न भक्तीपूर्ण वातावरण निर्माण होते. सहाजिकच मी नीलूताईस म्हटले, ''अग! हा आमचा गुरुबंधू आणि गुरुमहाराजांचा सोहळा कार्यक्रम आहे. त्यात तुझे मनोरंजन होईल, तुला तो आवडेल असे मला वाटत नाही. तेव्हा तू हरेश्वरीआता न येता नंतरच्या एखाद्या मोठ्या रजेत मी व माझ्या पत्नी-तुझ्या भगिनीसह सहकुटुंब सहलीस येऊ.'' परंतु तिने येण्याचा बेत निश्चित केला, ती आली.

गुरुभक्त-गुरुमहाराज,साधक-साधना, भक्ती हे काय प्रकार असतात तिने अजमावले. एका संध्याकाळी प.पू. महाराजांचे आचार्य शंकराचार्यांच्या सौंदर्य लहरीवर प्रवचन चालू होते. आमच्या नीलाताई परीक्षणच करीत होत्या. प्रवचनास अगदी ''श्रीं''च्या समोरच्या रांगेतच बसल्या होत्या. प्रवचन चालू होते. नीलाताईंच्या मनात सहज एक विचार येऊन गेला, ''हे लोक महाराज, महाराज म्हणून फार मोठा उदो उदो करतात. पण एक साधे ब्राह्मणच तर आहेत हे!'' हा विचार त्यांच्या मनात यायला आणि प्रवचनाच्या ओघांत नेमके वाक्य श्रीमुखांतून बाहेर येण्यास एकच गांठ पडली. प.पू. महाराज सौ. नीलाताईंकडे पहात म्हणाले, ''अहो आम्ही कोण आहोत? साधे अकिंचन ब्राह्मण, कसले मोठेपण? आम्ही हे असे.''

सौ. नीलाताई एकदम चरकल्या व आपल्या मनात असा विचार यायला नको होता असे वाटून तिला आपल्या मानसिकतेचा त्या विचारांचा पश्चाताप झाला. प्रवचन संपल्यानंतर त्यांनी मला बाजूस बोलावून अंतर्मनांत झालेला प्रमाद सांगितला व त्याबद्दल आपणास पश्चाताप होत आहे हे सांगताना तिच्या नेत्रांतून पाणीही ओघळले.

पुढे सोहळा संपून आम्ही आपआपल्या गांवी गेलो. नित्यनैमित्तिक कामकाज कर्तव्यात व्यग्र झालो. एके दिवशी सौ. नीलाताईंचा फोन अचानक आला. म्हणाल्या, ''आम्हा

उभयतांपुढे एक मोठ्ठी समस्या निर्माण झाली असून प.पू. श्रीमहाराजांचे सहाय्य व्हावे या करता विचार करण्यास आम्हा उभयतांना तुम्हांला भेटायचे आहे.'' मी म्हटले, 'तुम्ही या! काही हरकत नाही.'

ते उभयता घरी येऊन मला भेटले. त्यांनी त्यांची समस्या सांगितली. त्यांची मुलगी कॉलेजमध्ये शिकत होती. ती रुपसंपन्न, देखणी आहे. त्याचबरोबर सुसंस्कृत घराण्याचे सुसंस्कार असल्याने ती अत्यंत साधी, शालीन, नम्र अशी गुणी मुलगी आहे. अभ्यासात स्कॉलर आहे. राहणे, वागणे अत्यंत मर्यादशील आहे. तिच्या कॉलेजला गुंड घोळक्यांतील एक संस्कृतीहीन मुलगा सतत तिची छेड काढायचा. वाटेत तिला थांबवून बोलण्याचा प्रयत्न करायचा. रस्त्याने जाता येता मैत्रिणी तिच्या सोबत असल्या तरी तिच्या जवळ कानाशी येऊन ''मी तुझ्यावर प्रेम करतो'' म्हणायचा. त्याच्या चेहऱ्यावरून, पेहरावावरून तो काळा सावळा, गुंडगिरी करणारा असभ्य वर्तनी, असंस्कृत जाणवायचा. काय करावे ते या मुलीला कळेना. ती अत्यंत मवाळ, खाली मान घालून चालणारी मुलगी. तिने आपल्या आई-वडीलांकडे तक्रार केली. ते म्हणाले, आपण प्रिन्सिपॉलकडे तक्रार करूया. ती म्हणे, कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये चर्चा होईल, तो मुलगा अधिक त्रास देईल.

पोलीस तक्रार करावी तर तोही आपल्या चारित्र्यास, प्रतिष्ठेस चांगला प्रयत्न ठरणार नाही आणि शिवाय या गुंड, गँगस्टर लोकांचे लागेबांधे असतातच. आपल्यासारख्या सज्जनांनी त्या मार्गास न जाणेच शहाणपणाचे. भांडणतंटे, बखेडे हा आपला प्रांत नव्हे. शांत निरामय जीवन जगणारी माणसं आपण. आपण कोणाच्या वाटेस जात नाही, कोणाचे वाईट करीत नाही, चिंतितही नाही.

पण मग इलाज काय करावा? सौ. नीलाने, मुलीच्या आईने रोज मुलीच्या सोबतीला तिच्याबरोबर कॉलेजला जाणे व पुन्हा येताना तिला सोबत करून आणायचे ठरले. पण तरी सुद्धा तो गुंड मुलगा जवळ यायचा, कानांत म्हणायचा, ''आय लव्ह यू.''

''या समस्येत प.पू. महाराज आमच्या करता काही करतील का? ते सांगतील ते देवधर्म, उपास तापास आम्ही करू.'' या त्यांच्या म्हणण्यानंतर मी त्यांना प.पू. श्रीमहाराजांचा श्री रेणुका निवासाचा संपूर्ण पत्ता दिला व म्हटले, ''आपण उभयता ''श्रीं''कडे जातीने जा. तुमची समस्या सविस्तर ''श्रीं''ना कथन करा. माझी गुरुमाऊली अत्यंत दयार्द्र व कनवाळू आहे. ते निश्चित आपणास मार्गदर्शन देतील.''

दोघेही पुण्यास जाऊन दर्शन घेऊन आले. हरेश्वरी आल्याचा संदर्भही दिला. ''श्रीं''नी आस्थापूर्वक चौकशी केली. सर्व शांतपणे ऐकून घेऊन त्यांना एका मंत्राचे जपानुष्ठान उभयतांनी करण्यास दिले व म्हणाले की, ''या जपानुष्ठानाने त्या गौरवर्तणूक करणाऱ्याची ही

मनोवृत्ती कमी होईल. त्याचे मन परिवर्तन होईल.'' ''श्रीं''चा आशीर्वाद व मंत्र घेऊन दोघे आले. सांगितलेल्या पद्धतीने जपानुष्ठान चालू झाले. कालांतराने फरक जाणवू लागला. आता मुलगी मैत्रिणींसोबत कॉलेजला जाऊ लागली.

नारळी पौर्णिमेचे दुसरे दिवशी सायंकाळी हा मुलगा यांचे घरी आला. मुलीस राखी बांधण्यास सांगू लागला. तिच्या आई-वडीलांना चरणस्पर्श करून आपल्या चुकीची माफी मागू लागला. तरीही या मुलाने बंधुत्वाचे संबंधानेही घरी येऊ नये असे वाटत असताना बातमी आली की या मुलाच्या वडीलांची नागपुरास बदली होऊन ते सहकुटुंब तिकडे गेले.

१७९) चिकाटीचे प्रयत्न केले की यश मिळणारच!

माझा मोठा मुलगा संदीप मेकॅनिकल इंजिनिअरींगचा डिप्लोमा करून काहीशा कामात व्यग्र होता. माझ्या व्यवसायामुळे व बाहेर गांवच्या कामामुळे मलाही त्याच्याकडे पहाण्यास वेळ नव्हता. एकदा मी त्याला म्हटले, ''आजच तुमच्या आर्थिक सहाय्याची गरज नाही. अमाप पैसा नसला तरी गरजा भागविल्या जातात. तेव्हा बी.ई. करा, ए.एम.आय.ई. करा, काही धंदा व्यवसाय शिका-करा, नाहीतर नोकरी तरी पहा. नुसता वेळ घालविण्यात अर्थ नाही.'' रोज तो सकाळी बाहेर जायचा, बहुतेक मामाकडे गोरेगांवातच असायचा. त्याचे आणि त्याचे मामेभावाचे काही उद्योग चालू असायचे. एके दिवशी आम्ही उभयता मामाकडे जाऊन तक्रारीचे स्वरांत म्हटले, ''हा नेहमी तुमच्याकडे येत असतो, तासन् तास घालवितो. सायंकाळी घरी येतो. हा करीत तरी काय असतो?'' आमची साशंक मनःस्थिती जाणवून मामाने आमच्यासमोर त्यांची ड्रॉईंग्ज, स्केचेस, डायग्राम सर्व समोर ठेवले व म्हटले, ''तशी काही काळजी करू नका. तो व मंगेश (मामाचे चिरंजीव) दोघेही काही तरी संशोधन आणि प्लॅनिंगमध्ये आहेत. काय ते लवकरच कळेल.''

मी संदीपला विश्वासात घेऊन विचारले, ''अरे तुमचे काय चालले आहे? ते आम्हाला कळू तरी द्या.''

संदीप म्हणाला, ''बाबा, प्लाझ्मा टेक्नॉलॉजीवर आधारित मशिनरी भारतात बनवून चालू करण्याचे मोठे धाडस आम्ही दोघे, मी व मंगेश करीत आहोत. आज तरी ह्या टेक्नॉलॉजीबद्दल पुरेशी माहीती भारतात उपलब्ध नाही. त्याकरीता आमचे संशोधन, रिसर्च आणि डेव्हलपमेंट चालू आहे. हे कितपत यशस्वी होईल ते आम्हालाच ठाऊक नाही. मग उगाच बभ्रा करून काय करायचे? तुम्ही धीर धरून असा, आमचे कसोशीने प्रयत्न चालू आहेत. आम्हाला जर यश आले तर कमी खर्चात कोणत्याही प्रकारचे आणि ५० ते ७५

एम.एम. पर्यंत जाडीचे लोखंड कटींग मशीन तयार होईल. महागडा गॅस वापरावा न लागता हे साध्य होईल. पण याला अवधी हवा. तेव्हा ही गोष्ट गुप्त ठेवणेच बरे.''

मी म्हटले, ''अरे तू एवढे मोठे धाडस करीत आहेस तर तुझ्या प्रयत्नांना यश मिळावे म्हणून आपल्या श्री सद्गुरुंच्या पुढे आपला विचार मांडून आशीर्वाद घ्यायला नकोत का? कोणतेही महत्त्वाचे निर्णय किंवा कार्य आपण श्रीसद्गुरुंना विचारल्याशिवाय करतो का?''

संदीपला क्षणात विचार पटले व आम्ही उभयता संदीपला घेऊन श्री रेणुका निवासात दर्शनास गेलो. ''श्रीं''ना येण्याचे प्रयोजन सांगितले. संदीपला त्याच्या नियोजीत कामाची संपूर्ण माहीती प.पू. महाराजांना सांगण्यास मी सांगितले. प.पू. महाराजांनी अतिशय आस्थापूर्वक अगदी कान लावून सर्व माहीती ऐकली.

संदीपने विचारले, ''महाराज चालले आहे ते बरोबर आहे ना? आम्ही पुढे जाऊ ना? आम्हाला यात यश मिळेल ना?''

''श्री'' मनापासून हसले आणि म्हणाले, ''ठीक आहे, चाललं आहे ते चांगलं चाललं आहे. प्रयत्नांची शिकस्त चिकाटी पाहिजे. तुम्हांला त्या विमानांचा शोध लावणाऱ्या राईट बंधूंची गोष्ट माहीत आहे का? ते आकाशांत भरारी मारण्याकरिता यानाचा शोध लावीत होते. कोठलेही कार्य हाती घ्यायचे तर आर्थिक बळ लागतेच. त्यांनी बचत करून खूप पैसे जमवले आणि विमान बांधणी आणि संशोधनाला प्रारंभ केला. ह्या गोष्टी पूर्ण होण्यास अवधी लागतो तेवढी तितिक्षा (धीर धरण्याची तयारी) हवी. रात्रंदिवस प्रयत्न करून त्यांचे विमान तयार झाले. परंतु आकाशात काही अंतरावर भरारी मारताच ते खाली कोसळले. सारी मेहनत, प्रयत्न पैसा सर्व मातीमोल झाले. पण म्हणून काही ते खचले नाहीत. आता पुन्हा प्रयत्न करायचे तर आर्थिक सहाय्य हवे. त्यांनी सायकल दुरुस्तीचे दुकान काढले. धीर सोडला नाही, हिंमत हरले नाहीत. पैसा जमा केला. पुन्हा नेटाने प्रयत्नास लागले. चिकाटीने प्रयत्न केले तर यश मिळणारच. तेव्हा हाती घेतलेले काम धैर्याने पुढे न्या आणि यशस्वी व्हा!''

''श्रीं''चा आशीर्वाद घेऊन संदीप आपल्या मामेभावाबरोबर प्रयत्नास लागला. प्रयत्नांना यश येऊ लागले. मशीनरीचे भाग तयार होऊ लागले. सर्व साहित्याची जुळणी झाली आणि एके दिवशी हे मशीन व्यवस्थित चालू झाले. चि. संदीपने ''श्रीं''चे दर्शन घेऊन आनंदाची बातमी सांगितली. पण ''श्री'' म्हणाले, ''इतक्यात हुरळून जाऊ नका. अजून कितीतरी समस्यांना तोंड द्यायचे आहे!''

''श्रीं''च्या म्हणण्याचा प्रत्यय दोघांनाही लवकरच आला. मशीनला टॉर्च म्हणून एक यंत्रणा जोडलेली असते. त्यातून लोखंड कापीत नेणारी फ्लेम (प्लाझ्मा फ्लेम) असते. इलेक्ट्रीसिटी आणि प्रेशरने सोडलेली हवा यातून ही फ्लेम तयार होऊन बाहेर येते. बाहेर

येण्याच्या वाटेवरील रसायन थोडक्या कटींग लांबीवरच संपू लागले. त्यावर पुन्हा संशोधन करणे आले. या जोडीच्या अथक प्रयत्नाने ''श्रीं''च्या वरदहस्ताने त्यांची मशीन पूर्णत्वास आली. आज त्यांच्या या मशीन्स संपूर्ण भारतात ठिकठिकाणी कारखान्यांतून पोहोचल्या आहेत. इलेक्ट्रो प्लाझ्मा इक्विपमेंटस् प्रायव्हेट लिमिटेड जन्मास आली. वसई रोडला दोन, गोरेगांवात दोन कारखाने, एक प्रशस्त ऑफिस, २५ पर्यंत वर्कर्स, ८-१० क्वॉलिफाइड इंजिनिअर्स असा स्टाफ आहे. 'ही सर्व सद्गुरु कृपा आणि ''श्रीं''चे आशीर्वाद.'

१८०) प.पू. महाराजांच्या हातच्या पुरणपोळ्या

एकदा प.पू. महाराजांनी पाठशाळेत शिकणाऱ्या आपल्या छात्रांना भोजनाकरीता आपल्या घरी आमंत्रित केले होते. पहाटे लवकर उठूनच सौ. आईसाहेब कामाला लागल्या होत्या. सकाळी दहा वाजेपर्यंत त्यांचा बहुतेक स्वयंपाक तयार झाला होता. आता फक्त पुरणपोळ्या लाटायच्या होत्या. पुरण शिजून तयार होते. तेवढ्यात नित्यक्रमानुसार म्हणा किंवा बोलावणे आले म्हणून सौ. आईसाहेब प.पू. श्रीगुरुमहाराजांचे (प.पू. श्रीगुळवणी महाराज यांचे) दर्शनास गेल्या. प.पू. श्रीमहाराजांनीही आपले आन्हिक लवकरच आटोपले. एक एक करत आमंत्रित सर्व छात्र आले. सौ. आईसाहेब आता येतील मग येतील करता करता साडेअकरा वाजले. कोणत्याही कार्यक्रमाला आपले नित्यनैमित्तिक कामे आटोपून पाच पंधरा मिनिटे आधीच तयार होऊन बसणे ही प.पू. श्रीमहाराजांची पद्धती. भोजनाची तर वेळ होत चाललेली. सौ. आईसाहेबांचा पत्ता नाही. तिकडे गुरुमहाराज सौ. आईसाहेबांच्या बरोबर काही विषयावर संभाषण करीत आहेत. संभाषण तोडून घरी आपल्या कामाकरता अगदी परवानगी घेऊन निघायचे म्हटले तरी चाललेल्या संभाषणाचा विषय मोडून जाणे सौ. आईसाहेबांना अशक्य होते. श्रीगुरुमहाराजांचा उपमर्द केल्यासारखे झाले असते. इकडे प.पू. श्रीमहाराजांनी छात्रांना थोडा वेळ तुमच्या गप्पा गोष्टी चालू द्यात. हे आम्ही आलोच म्हणून चुलीचा ताबा घेतला. पटापट एकामागे एक, गोल गरगरीत, सारण आच्छादित प्रमाणित पुरण, अशा सरस पुरणपोळ्या होऊ लागल्या. पाट-पाणी घेतले गेले. छात्रांना भोजनास बसण्याची विनंतीपूर्ण आज्ञा झाली. पहिली वाढणी झाली आणि सौ. आईसाहेबांचे आगमन झाले. छात्रांच्या भोजनाचे काय झाले असेल या चिंतेने त्या खूप घाबरल्या होत्या. परंतु पंगत बसलेली पाहून त्यांना हायसे वाटले. ''श्री'' पूर्ण शांत आणि हसतमुख होते. नंतर सौ. आईसाहेबांनी स्वयंपाक घराचा ताबा घेतला.

१८१) तुमचे वडील आमच्या ऋणांत आहेत!

एकदा प.पू. महाराजांचे सख्खे भाऊ श्री. दिगंबर काका ''श्रीं''च्या घरी आले. अतिथी देवो भव! ''श्रीं''कडून त्यांचे आदरातिथ्य झाले हे सांगणे नकोच. सौ. आईसाहेबांनीही मिष्टान्नाचे भोजन करून घातले असेल.

भोजनोत्तर बंधुवर्य ''श्रीं''च्या समोर येऊन बसले व प.पू. श्रीमहाराजांना म्हणू लागले, ''तुमचे वडील आमच्या ऋणात आहेत!''

''श्रीं''नी विचारले, ''ते कसे? आम्हाला समजले नाही.''

दिगंबर काका म्हणाले, ''पिताश्रींनी आमच्याकडून पाच हजार रुपये घेतले होते, ती रक्कम परत न करताच त्यांचे महानिर्वाण झाले. आता ती रक्कम वडील बंधू म्हणून तुम्ही आम्हांस परत करावीत म्हणून आज आम्ही आपल्याकडे आलो आहोत.''

प.पू. महाराज म्हणाले, ''हे आम्हांस काही माहीत नाही. आम्ही आपणास आमच्या वडीलांना पैसे देताना पाहिले नाही आणि त्यांना घेताना पाहिले नाही. कोणीही यापूर्वी आम्हांस तसा व्यवहार झाल्याचे सांगितले नाही आणि काही लेख समोर आला नाही. तथापि आपण जर म्हणत आहात की आमचे पिताश्री आपले ऋणात आहेत, तर त्यांना ऋणमुक्त करणे आमचे कर्तव्य आहे. आम्ही पाच हजार रुपयांचा धनादेश आपल्या घरातील देवापुढे आपल्या नांवे लिहून ठेवितो. आपले म्हणणे सत्यास धरून प्रामाणिकपणाचे असेल तर तो तुम्ही उचलून घ्यावा!''

श्री. दिगंबर काकांनी तो चेक उचलून घेतला. प.पू. श्रीमहाराजांच्या पिताश्रींना, परम पूजनीय धुंडीराज महाराजांना, आपल्या ऋणांतून मुक्त केले आणि ते निघून गेले.

१८२) श्री. नगरकर प.पू. महाराजांकडे राजीनामा मागतात!

श्री वासुदेव निवास आश्रमात नुकताच एक सोहळा झाला होता. या आधीच्या झालेल्या काही सोहळ्यात असे अनुभवास आले होते की काही कृपण लोक भोजनास बसताना थैली घेऊन येतात. प्रसादाचा लाडू वाढला की लागलीत तो थैलीत गेला. पुन्हा लाडू वाढा म्हणायला तयार. कितीही लाडू केले मग ते रव्याचे असोत वा बुंदीचे पण शेवटच्या पंक्तीला अपुरे पडायचे. मग विश्वस्तांच्या मिटींगमध्ये बहुमताने ठरले की, प्रसाद भोजनात एकच प्रसादाचा लाडू वाढायचा. ठरावाला प.पू. महाराजांची प्रमुख विश्वस्त म्हणून अनुमती असो अथवा नसो. बहुमत म्हटले की प.पू. महाराजांना सुद्धा मान्य करायला लागायचे.

एका सायंकाळी चारच्या सुमारा एक सद्गृहस्थ पुण्याचेच रहिवासी वयोवृद्ध श्री. नगरकर नांवाचे प.पू. महाराजांच्या समोर क्रोधायमान अवस्थेत येऊन बसले. तोंड उघडले, "काय चालवलं आहे काय हे? प्रसाद भोजनाला एकच लाडू? लाडू वाढा, लाडू वाढा, मीच नाही पंक्तीतील इतरही लोक मागत आहेत, कोणी वाढायला तयार नाहीत. एकच लाडू वाढायचे ठरले आहे म्हणे. ही काय अंदाधुंदी आणि आतून अफरातफर चालू आहे. मला सगळा हिशेब पाहिजे आहे. समारंभात भोजनाला मागणी आली किती? किती ताट झाले? निधी किती होता? सगळा हिशेब मला हवा. तुम्हांला धुरा सांभाळता येत नाही तर आताच्या आता राजीनामा द्या. मी पोलीसात तक्रार करीन, इन्स्पेक्टर माझ्या ओळखीचे आहेत. चॅरिटी कमिशनरला कळवीन!"

प.पू. महाराज शांत चित्ताने सर्व ऐकून घेत होते. प.पू. महाराज त्यांना म्हणाले, "अहो आम्हाला तसा राजीनामा देता येत नाही. आपण वासुदेव निवासाच्या ट्रस्टींकडे तसा लेखी अर्ज लिहून द्या. आपला काही आक्षेप आमच्यावर असेल, काही अयोग्य वाटत असेल, तक्रार असेल तर कायद्यानुसार आपणास जे जे करणे योग्य आणि शक्य असेल ते ते करा. येथे येऊन क्रोधाने आरडा ओरडा करून त्यातून काही निष्पन्न होणार नाही."

खाली ऑफिसमध्ये श्री. प्रभाकर निजामपूरकर होते. का कोणास ठाऊक पण त्यांना पाहिले की सदर गृहस्थ असतील तेथून उठून जायचे. वरून प.पू. महाराजांच्या खोलीतून मोठा आवाज येत असलेला ऐकून ते प.पू. महाराज स्थानापन्न असताना एवढ्या मोठ्याने कोण बोलते आहे ते पहाण्यास वर आले आणि सद्गृहस्थ निघून जाऊन सर्वत्र शांत वातावरण झाले.

१८३) "महाराज किशोरकुमारची गाणी कधी ऐकणार?

पुण्याचे पी.एम.टी. मध्ये नोकरीला असलेले श्री. दीक्षित रोज ऑफिस सुटले की सरळ श्री वासुदेव निवास आश्रमात यायचे. "श्रीं"ना रिक्शामधून घरी नेऊन सोडण्याची कामगिरी अगदी नियमितपणे ते बजावित असत. वाटेत बालभारती आणि गणेशखिंड सोडल्यानंतर गोखले चौकाकडे जाताना डावीकडील कॉलनीत ते कुठे तरी रहात असत. ते स्वभावाने अत्यंत शांत, सालस, मितभाषी, साधेभोळे आणि निष्पाप स्वभाव, विचारांत वागण्यात राहण्यातही अगदी साधेपणा. त्यांना हिंदी चित्रपट कलाकार आणि गायक किशोरकुमार यांची गाणी अगदी हुबेहुब म्हणता येत. (असे ते म्हणतात.) त्यांना सारखे वाटायचे की, एखादे दिवशी तरी प.पू. महाराजांनी आपल्या घरी येऊन आपली ही किशोरकुमारच्या आवाजातील गाणी ऐकावी.

आपल्या कलेचे कौतुक करावे असेही वाटत असेल. नेहमी ''श्रीं''ना घरी किशोरकुमारची गाणी ऐकायला कधी येणार म्हणून विचारीत. परंतु ''श्रीं'' वेळ नसे. एकदा मात्र ''श्रीं''नी त्यांना वेळ दिला. त्यांच्या सोबत प.पू. महाराज घरी गेले. तब्बल तास दीड तास दीक्षितांनी सिनेमात किशोरकुमारने गायलेली गाणी गाऊन दाखविली. महाराज म्हणाले, ''वाऽ! तुमचा आवाज फारच सुरेल आहे. गाताही छान. आम्हाला हे माहीत नव्हते की तुम्ही एवढे चांगले गाणारे आहात!''

१८४) गजर लावलेला आहे.

माझ्या तिन्ही मुलांना, चि. संदीप, चि. दिनेश व चि. अभिजीत यांना अनुक्रमे त्यांच्या वयाच्या १५, ११ व ६ व्या वर्षी प.पू. महाराज घरी हरिहरेश्वर येथे १९८१ साली दीक्षा झाली. पहिल्याच दीक्षेच्या वेळेला बराच वेळ त्यांचा भावावस्थेत गेला. नंतर काही दिवस न चुकता ठरल्यावेळी साधनेस बैठकीला बसत असत. पण पुढे सातत्य राहिले नाही. कधी बसायचे, कधी नाही असे चालू होते. प.पू. महाराजांच्या कानावर मी ही गोष्ट घातली व मुले हल्ली नेहमी साधनेला बसतातच असे नाही. ''श्रीं''ना विचारले, ''मी आपणाकडे या तिन्ही मुलांना दीक्षा देण्याबद्दल प्रार्थना केली त्यात माझी चूक तर झाली नाही ना?''

प.पू. महाराज म्हणाले, ''सध्या त्यांचे अभ्यासाचे आणि खेळाचे वय आहे. गजर लावलेला आहे, यथायोग्य वेळी तो आवाज देईल. शक्तीमाता तिच्या इच्छेनुरुप पण कल्याणच करील एवढी खात्री असू द्यावी.''

१८५) चव्हाणसाहेब गाडीही काढणार आहेतच!

'श्री दत्त अमरेश्वर देवस्थानाच्या' जीर्णोद्धारात उत्खननात (खोदाईत) जुने चांदीचे शिक्के एकूण ४५० सापडले होते व ''श्रीं''च्या अनुज्ञेने ते पोलीसांकडून पंचनामा करून सरकार जमा केले गेले. पुढे ते सरकारकडून परत मिळावेत किंवा मोबदल्यात इष्ट रक्कम मिळावी असे वाटले कारण दुसरे काम घाटाचे होते. सरकारचे जनहिताकरीता घाटाचे काम होणार म्हणून सहकार्य मिळावे म्हणून मी व श्री. चव्हाण साहेब (एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर एरिगेशन) जालन्याचे कलेक्टर पळसुळे साहेब यांना सोबत घेऊन कोल्हापूरच्या कलेक्टर साहेबांच्या भेटीस जाणार होतो. जालना-पुणे-कोल्हापूर या प्रवासास चव्हाण साहेबांनी गाडी काढायचे ठरविले होते. ''श्रीं''चा आशीर्वाद घेण्यास व या भेटीचा कार्यक्रम कानी

घालण्याकरीता श्री रेणुका निवासामध्ये गेलो. ''श्री'' म्हणाले, ''या, जाऊन या. महाराज प्रयत्नास यश देतील. बरं आहे, तुम्हांला जायला-यायला चव्हाण साहेब गाडीही काढणार आहेतच. म्हणजे प्रवासाचा त्रासही होणार नाही. (पण चव्हाण गाडी काढणार हे ''श्रीं''ना कोणी सांगितले?)''



१८६) कोणी दिली तुम्हांला दीक्षा?

दिनांक ११.२.१९८१ रोजी दुपारी ४ वाजता एका अधिकारी स्वामींचे, वडाळा, मुंबई येथील हॉलमध्ये प्रवचन होते. विषय होता सामुदायिक साधना-शक्तीपात दीक्षा, कुंडलीनी शक्ती जागृती. शिवाय साधकांची प्रश्नोत्तरे आणि शंका समाधानाचाही हा कार्यक्रम होता.

मी, श्री. शृंगारपुरे, श्री. गोडसे आणि श्री. तावडे असे या प्रवचनास गेलो होतो. श्री. गोडसे यांनी स्वामीमहाराजांना शंका विचारली, ''मी शक्तीपात दीक्षा घेतली आहे. आपण म्हणता की क्रिया होतातच. मग मला क्रिया कां होत नाहीत?''

श्री स्वामी म्हणाले, ''क्रिया व्हायलाच पाहिजेत. क्रिया होत नाहीत असे कसे होईल? कोणी दिली तुम्हांला दीक्षा?'' हा त्यांचा प्रश्न आम्हा सर्व गुरुबंधुंच्या जिव्हारी झोंबला. कारण आमच्या श्रीगुरुदेवांची त्यात अवहेलना होती. माझे तीन चार दिवस बेचैनीत गेले. मला क्रिया व्हायच्या पण सूक्ष्म असायच्या. शरीर दोलायमान व्हायचे. मी दि. १६.२.१९८१ रोजी पुण्यास श्री वासुदेव निवास आश्रमात गेलो. दुपारी चार वाजता प.पू. श्रीमहाराज आपल्या जागी स्थानापन्न होताच मी समोर जाऊन साष्टांग नमस्कार केला. क्षेम कुशल प्रश्न झाले. मी प.पू. श्रीमहाराजांना आम्ही वडाळ्यास प्रवचनास गेल्याचा व शंका समाधानाच्या कार्यक्रमात श्री. गोडसे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना स्वामी महाराज काय म्हणाले हे जसेच्या तसे कथन केले.

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! क्रिया ह्या शरीराच्या नाडीशुद्धीकरीता शक्तीमातेकडून होत असतात. नाडीशुद्धी झालेली आहे, किती झाली आहे याची कल्पना आपणास नसते. शिवाय ज्या काही क्रिया साधनेत साधकास होतात त्यापैकी काही अतिसूक्ष्म असतात. तुम्हांला स्वत:ला बैठकीला बसल्यानंतर आतून स्पंदने जाणवतात की नाही? शरीर दोलायमान होते का नाही?''

मला स्वत:स ह्याच क्रिया आजपर्यंत होत आलेल्या आहेत. ''श्रीं''नी त्या प्रकटपणे उद्धृत केल्या. नंतर बराच वेळ ''श्री'' आपल्या बैठकीच्या डाव्या बाजूचे कपाटात प.प. लोकनाथतीर्थ स्वामींच्या गुरुबंधूंनी योगिक क्रियेवर लिहीलेली ''साधन संकेत'' ही पुस्तिका

शोधीत होते. अखेर ती न मिळाल्याने मला त्यांनी ती पुस्तिका मिळविण्यास काशी येथील गैबी मठाशी पत्र व्यवहार करून ती मागविण्यास सांगितले. मी त्याप्रमाणे पत्र पाठविले. शेवटी मला ती पुस्तिका प्राप्त झाली. ''श्री'' म्हणाले, ''अहो ती पुस्तिका तुमच्या त्या स्वामींच्या गुरुमहाराजांनी लिहीली आहे.'' विशेष म्हणजे याच पुस्तिकेच्या शेवटी प.पू. श्रीदत्तमहाराजांचा आशीर्वादपर लेख आहे आणि ते पुस्तक वाचल्यावर माझे शंका निरसन झाले.

१८७) ''चला, बसा बैठकीला, दीक्षेची वेळ झाली!''

श्री वामन निवासाच्या बांधकामाकरीता माझे अधून-मधून वास्तव्य श्री वासुदेव निवास आश्रमात असायचे. आठवड्यांतून एकदा कधी तरी श्री. ठाकूर नावाचे, यु.पी.चे हिंदी भाषिक गृहस्थ, रात्री मुक्कामाला असायचे. हे गृहस्थ टॅक्सी ड्रायव्हर असून त्यांची टॅक्सी दादर-पुणे मार्गावर नित्य ये-जा करीत असे. हे गृहस्थ विरार येथे रहात होते आणि प.पू. दत्तमहाराजांचे अनुग्रहीत होते. विरारला त्यांचा गुरुबंधूंचा एक ग्रुप होता. कधी कधी एकत्र येऊन ते रात्रीच्या फिरण्यात श्रीसद्गुरुंच्या आठवणी काढीत असत. त्यांचेच ओळखीचे एक गृहस्थ या मंडळीत असायचे पण त्यांनी दीक्षा घेतलेली नव्हती. या सर्वांच्या गप्पागोष्टी आणि संवादांतून प्रतीत होणारा गुरुभाव, गुरुभक्ती, श्रद्धा, निष्ठा या सर्व सद्गुणांचे संस्कार आपोआपच ह्या गृहस्थांवरही होत होते. त्यांचे नांव माझ्या लक्षात राहिले नाही. हळूहळू त्या गृहस्थांना गुरुभेटीची ओढ लागू लागली. एके दिवशी श्री. ठाकूर यांना भेटून त्यांनी आपली प.पू. श्रीमहाराजांच्या भेटीचीच नव्हे तर दीक्षेची इच्छा प्रकट केली. त्या गृहस्थांना नोकरी आणि असलेली आर्थिक ओढाताण यातून ''श्रीं''च्या दर्शनाला प्रत्यक्ष जाणे शक्य होत नव्हते. तसं पाहिलं तर त्यांनी ''श्रीं''चा गुरुमहिमा, त्यांची वचने, उपदेश या मंडळींच्या मुखांतून नुसती ऐकली होती. ''श्रीं''चा फोटो सुद्धा यांनी पाहिला नव्हता. श्री. ठाकुरांना त्यांनी विचारले, ''प.पू. महाराजांची माझ्यावर कशी कृपा होईल, मला त्यांची दीक्षा कशी मिळेल, मी काय करू?''

श्री. ठाकुरांनी सांगितले, ''अरे! त्यांच्याकडे प्रत्यक्ष समोर जाऊनच दीक्षेची प्रार्थना करायला नको. एक जोडकार्ड-पत्र पाठवून तू त्यांना दीक्षा देण्याबद्दल प्रार्थना केलीस आणि खरंच तुझी दीक्षेची वेळ आली असली, तुझे भाग्यात हेच तुझे गुरु असतील तर लागलीच गुरुदेवांचे तुला त्या जोडलेल्या कार्डावर उत्तर येईल. भाग्य असेल तर ते तुला दीक्षेची तिथी, तारीख, वार व वेळ कळवतील. तू वेळ न घालवता त्यांना पत्र लिही. मी आश्रमाचा पत्ता देतो.''

त्या गृहस्थांनी जोडकार्ड (आपल्या पत्त्यासह) पाठविले. योगदीक्षा व्हावी म्हणून प्रार्थना केली. चार दिवसात श्री सद्गुरुंचे उत्तर आले. त्यात त्यांनी दिनांक, वेळ देऊन शुचिर्भूत होऊन, श्रीफळ देवापुढे ठेवून गुरुमहाराजांना प्रार्थना करून, वडीलधारी माणसे जवळ असली तर त्यांना नमस्कार, जवळ नसतील तर मनोभावे वंदन करून पहाटे ६ वाजण्याच्या पाच मिनिटे आधीच कांबळ्याचे आसन अंथरून त्यावर बसावे. श्री गुरुमहाराज आपल्याला अनुग्रह देतील असे लिहीले होते.

श्री. ठाकुर यांना त्यांनी पत्र दाखविले. श्री. ठाकुर यांनीही दीक्षेच्या पहाटे बसण्याच्या पद्धतीची सर्व माहीती, सूचना त्या गृहस्थांना दिल्या. दीक्षेचा दिवस उजाडला. ते गृहस्थ पहाटे उठले. चहापान, स्नानसंध्या अगदी शांतपणे चालू होते. कदाचित त्यांना वेळेचे महत्त्व तेवढे लक्षात आले नसावे. सर्व संथ गतीने चालले होते. सहा म्हणजे सहाचे आसपास कधी तरी बसायचे. संध्या संपली आणि पहाटे सहाला पाच मिनिटे कमी असतानाच दारावर टक्टक् कडी वाजली. बाकी मंडळी झोपेतच असल्याने त्याने त्वरेने जाऊन दार उघडले. कोणी धोतर उपरणे परिधान केलेले ब्राह्मण गृहस्थ दारात उभे होते. कोण काय विचारायच्या आधीच अत्यंत घाईने ते ब्राह्मण म्हणाले, ''चला चला! दीक्षेची वेळ झाली. लवकर बैठकीला बसा.'' एवढे बोलून ते ब्राह्मण गृहस्थ थांबले नाहीत. त्यांचे सोबत आत आले. त्या गृहस्थांनी त्यांना देव्हाऱ्याचे बाजूस पाट मांडला. ते पाटावर आणि हे कांबळ आसनावर. गृहस्थाने डोळे मिटले आणि क्षणार्धात ते भावावस्थेत गेले. बैठक रंगली, इतकी रंगली की वेळेचे भान नाही. आनंद लहरीत मश्गुल. तासाभरानंतर जाग आली. डोळे उघडून पहातात तर समोर कोणी नाही. पत्नीला हाक मारून विचारले, ''पहाटे ते ब्राह्मण आले होते, या पाटावर मी त्यांना बसविले, ते गेले कोठे?''

पत्नी आश्चर्यात पडली, ''अहो कोण कुठले ब्राह्मण? एवढ्या पहाटे कोण येणार? कोणीच आल्याचे मी तर पाहिले नाही. कसला तरी भास झाला तुम्हांला.''

हे गृहस्थ नंतर श्री. ठाकूर यांच्या घरी गेले. घडलेला प्रसंग सविस्तर सांगितला. श्री. ठाकुरांनी त्यांना आपल्या खोलीत नेऊन देव्हाऱ्यातील श्री सद्गुरु दत्त महाराजांचा फोटो दाखविला. ते मोठ्याने ओरडले, ''अहो हेच ते हेच. मी अभागी, ओळखले नाही हो मी त्यांना. क्षमा करा महाराज क्षमा करा.''

दुसऱ्या दिवशी सद्गृहस्थ वासुदेव आश्रमात ''श्रीं'' पुढे दाखल झाले. सर्व वृत्तांत गहिवरून नेत्रांतून अश्रू ओघळत सांगितला. परंतु प.पू. श्रीमहाराज जणू त्या गांवचेच नव्हते. ''ठीक आहे, चांगलं झालं''

१८८) नागल्यांना आमच्यापर्यंत येऊ द्या!

श्रीदत्त अमरेश्वर मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम चालू असताना मुंबईहून-वाडी-औरवाडला जाताना मी पुणे मार्गे जाऊन ''श्रीं''चे दर्शन घेऊन व कामाबद्दल काही सूचना, मार्गदर्शन, आशीर्वाद घेऊन जात असे. या भेटीत मी झालेल्या कामांचा अहवाल देत असे. सांप्रत चालू असलेल्या कामांची माहीती देत असे. अडीअडचणी उपस्थित झाल्यास ''श्रीं''च्या कानी घालत असे. त्यामुळे प.पू. महाराज येता-जाता कामाची प्रगती कळावी म्हणून या भाग्यवान जीवाची वाट पहात असत. मध्यंतरीच्या काळात ''श्रीं''ची प्रकृती ठीक नव्हती. म्हणून मी त्या वेळात मी औरवाड-वाडीहून परस्पर मुंबईस गेलो. पुन्हा औरवाडला येताना मुंबईहून पुण्याला ''श्रीं''च्या घरी ''श्रीं''ची प्रकृती चांगली असेल तरच जाऊ असे ठरविले होते. ''श्रीं''ना विचारून नंतरच करायच्या अशा खूप गोष्टी होत्या. त्यांच्या अनुमतीशिवाय पुढे जाता येत नव्हते. 'श्री दत्त अमरेश्वराचे मंदिर आणि वाडीतील प.पू. महाराजांचे जन्मस्थान-गृह' ह्या दोन्ही कामांच्या काही गोष्टींचे निराकरण, अहवाल कथन करायचे होते.

मुंबईहून वाडीस निघण्यापूर्वी ''श्रीं''ची तब्बेत खूपच अशक्तपणा आणि आजाराने बिघडली होती. सर्व सान-थोर भक्त मंडळी तसेच घरचे, दारचे, प्रतिष्ठीत सर्वांना दर्शन बंद होते. कोणत्याही व्यक्तीच्या संपर्काने, श्वासोच्छ्स्वासाने सुद्धा ''श्रीं''ना इन्फेक्शन होऊशकते असे डॉक्टरांचे म्हणणे होते. प.पू. श्रीमहाराज मात्र म्हणत, ''लोक लांबून लांबून येत असतात. त्यांना नुसत्या भेटीने किंवा दोन शब्द बोलून समाधान मिळते. त्यांना आमच्यापर्यंत येऊ देत जा.'' मला हे कळल्यानंतर मी श्री रेणुका निवासात फोन करून श्री. अशोकरावांना फोनवर बोलावले व म्हटले, ''मी उद्या मुंबईहून-वाडी, औरवाडला जात आहे. प.पू. श्रीमहाराजांकडून बऱ्याच गोष्टींचा खुलासा करून घ्यायचा होता. परंतु प.पू. श्रीमहाराजांची प्रकृती बरी नाही असे कळते. त्यांना त्रास देणे बरे नाही. नाईलाज आहे. पुढे बरे वाटल्यानंतर भेटता येईल. मी वाडी-औरवाडला गेल्याचे शक्य झाल्यास कानावर घाला.''

श्री. अशोकराव म्हणाले, ''अहो शशीकांत असं करू नका. तुम्ही या. महाराजांना तुम्ही आल्याचे पाहून बरे वाटेल. तुम्ही आलात का? येणार आहात का? असे दिवसांतून ३-४ वेळा चौकशी करतात. त्यांनाही तुमच्याजवळ काही महत्त्वाचे बोलायचे आहे. परवा फडके-पाटणकरना म्हणाले, नागले आले तर त्यांना आमच्यापर्यंत येऊ द्या. नाही तर तुम्ही परस्पर त्यांना बाहेरचे बाहेर पाठवाल, तेव्हा तुम्ही याच या.''

मी लागलीच मुंबईहून पुण्यास श्री रेणुका निवासमध्ये येऊन पोहोचलो. ''श्रीं''चे भावपूर्ण दर्शन घेतले. आजाराच्या यातनेत, अशक्तपणात सुद्धा प.पू. श्रीमहाराज प्रसन्न हसले. म्हणाले, ''या या! आम्ही तुमची कधीची वाट पहात होतो. आम्हांस वाटले तुम्हांला तरी आमच्यापर्यंत

पोहोचू देत आहेत की नाही ही मंडळी!! डॉक्टरांनी भेटण्यास सर्वांना बंदी केली आहे म्हणे. हं बोला, कसे काय चालले आहे 'श्री अमरेश्वरांच्या' कामाचे? कोठवर आले?'

यानंतर बरीच प्रश्नोत्तरी झाली. प.पू. श्रीमहाराज मोकळेपणाने मनमुराद बोलले. आमच्याही शंकांचे निराकरण होऊन कामाचे पुढील मार्ग मोकळे झाले. तशाही स्थितीत ''श्रीं''नी घरातील सर्वांची नावानिशी चौकशी, क्षेम कुशल समजावून घेतले. मला वाटत होते. प.पू. श्रीमहाराजांना आपण जेवढे बसू तेवढा अधिक त्रास होईल. मी सारखा निघण्याच्या तयारीत असे परंतु ''श्रीं''चे भाषण चालू राही. श्री. अशोकराव दाराचे फटीतून डोकावित आणि हाताने खूण करून सांगत, 'थांबा, घाई करून बाहेर येऊ नका. दादांना मनसोक्त बोलू द्या.' संभाषण पूर्ण होताच जड अंत:करणाने निरोप घेऊन मी निघालो. श्री गुरुदेव दत्त!

१८९) काय मग! ते गोविंदराव आता त्रास देत नाहीत ना?

'श्रीदत्त अमरेश्वर मंदिर' हे औरवाड मध्ये आहे. पूर्वी ह्या गांवाला अमरापूर म्हणत असत. औरवाड हे छोटेसेच गाव आहे. ४० टक्के हिंदूंची तर ६० टक्के मुसलमान लोकवस्ती आहे. गावात राहणारे श्री. गोविंदराव यांचा गांवातील खेडूत लोकांवर दरारा आणि धाकही आहे. 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचा गाभारा' आणि 'श्री वासुदेव पीठाचा गाभारा;' आहे त्याच ठिकाणी शास्त्रानुसार ठेवायला पाहिजे. परंतु गाभारा जुन्या साध्या फरश्या काढून संपूर्ण सफेद संगमरवराने सजवायचा ठरले होते. श्री दत्त अमरेश्वर गाभाऱ्यास आतून हातच न लावता बाहेरून ग्रॅनाईटने सजविण्यात प.पू. श्रीमहाराजांची अनुमती होती. बाकी सेवकांच्या खोल्या, स्वयंपाकगृह, न्हाणीगृह, शौचकूप या सर्वांचे प्लॅनिंग मुंबई चेंबूरचे आर्किटेक्ट श्री. नंदकुमार शृंगारपुरे यांच्याकडून करवून घेतले. प.पू. श्रीमहाराज प्रमुख विश्वस्त व बाकीच्या सर्व विश्वस्तानी त्यास मंजूरी दिली. आता बांधताना त्यात कोणताही फेरबदल करता येणार नव्हता. करायचाच झाला तर आर्किटेक्ट आणि विश्वस्त यांची मंजुरी आवश्यक होती. अगदीच ऐनवेळी काही अपरिहार्य फेरबदल करण्याचा अधिकार प.पू. श्रीमहाराजांनी श्रीदत्त अमरेश्वर मंदिराच्या विश्वस्तांना दिला होता. सर्व बांधकाम यथाशास्त्र यथोचित चालू होते. गांवातील लोकांना या सेवेचा, मजुरी कमाविण्याचा फायदा व्हावा म्हणून शक्यतो गांवातीलच कामगार कारागीर कामावर घेत होतो. मार्बल फिक्सींग, ग्रॅनाईट कटींग फिक्सींग किंवा इमारतीचे आर.सी.सी. कामे ही कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली येथून कारागीर कामगार आणून करून घेत असू. पंधरा वीस दिवसानंतर मी मुंबईस माझ्या कामाकरता जाऊन येत असे. माझी पाठ फिरली की श्री. गोविंदराव साईटवर यायचे, हुकमत, ऑर्डरी सुरु व्हायच्या. ड्रॉईंग पास झालेले

नकाशे राहिले बाजूला. हे गृहस्थ कामात हस्तक्षेप करून आपल्या मर्जीने विटांचे बांधकाम, कडाप्पा लाद्यांची कपाटे ह्यात काहीतरी विचित्रपणा करून ठेवायचे. मी मुंबईहून येऊन पहावे तर दिलेल्या सूचना अंमलात न आणता उलटसुलट काम झालेले असायचे. गवड्यांना मजुरांना विचारावे, ''मी कामाची यादी देऊन गेलो होतो त्याप्रमाणे काम न करता हे असे का केले?'' या प्रश्नावर ते गवंडी म्हणायचे, ''श्री. गोविंदरावांनी सांगितले असे करा म्हणून केले.'' मी विचारले, ''ते काय येथील इंजिनिअर आहेत का? तुम्ही त्यांचे का ऐकले?''

उत्तर, ''साहेब आम्हाला गावात रहायचे आहे. तो गोविंदराव आम्हाला मारेल, त्रास देईल.''

मी म्हणावे, ''ठीक आहे. तुम्हांला गावातले गावात रोजगार मिळावा म्हणून काम दिले. रोजंदारीचा पैसा बुडणार नाही, काम गावच्याच आपल्या देवाचे, तुम्हांला सेवाही घडावी, पण तुम्ही नेमलेल्या इंजिनिअरच्या आज्ञेत राहणार नसाल, ऐकणार नसाल तर उद्यापासून कामावर येऊ नका.''

मी श्री. गोविंदरावाना बोलावून आणून खूप दमात घेतले. म्हटले, ''हे चुकीचे झालेले सर्व काम तोडायला लागेल, विटा, रेती, सिमेंट हे सर्व सामान फुकट जाणार. ह्या मंदिराच्या नुकसानीचे पैसे कोण देणार? आज गांवच्या प्रमुख लोकांची सरपंचापासून सर्वांची सभा बोलवा. हे असे चालणार असेल तर कामे होणार नाहीत.''

तेवढ्यापुरते गोविंदराव नमले. चुकलो म्हणू लागले. आता असे घडणार नाही म्हणाले. काही महिन्यानंतर मी मुंबईहून येईपर्यंत पुन्हा गोविंदरावाने 'श्री वासुदेव पीठाची' मोठी खोली मोजमापे लक्षात न घेता बांधली. यावेळी कडप्पाचे खूपच नुकसान झाले.

पैशांची हानी, वेळेचा अपव्यय. मी खूपच चिडलेला आहे हे कळल्यानंतर गोविंदरावांची स्वारी इकडे फिरकलीच नाही.

पुढील काही दिवसात आश्चर्यकारक गोष्ट घडली. गांवातील एक उमदा तरुण मजुरीवर कामगार म्हणून येत असे. तो भाविक होता. आस्थेने काम मनापासून करीत असे. त्याचे नांव श्री. रमेश शिंदे. रमेश मला सांगू लागला, ''साहेब, गोविंदा सांगत होता त्या कवीश्वर महाराजांनी रात्री स्वप्नात येऊन मला खूप दरडावले आणि म्हणाले, 'खबरदार नागल्यांच्या कामात ढवळाढवळ कराल तर.' असा दृष्टांत एकदा नाही, दोनदा झाला. 'श्री वासुदेव पीठाच्या' त्यांच्या चुकीच्या कामाबद्दलचे प्रायश्चित्त म्हणून की काय त्यांना कंबर दुखीचे दुखणे होऊन ॲडमिट व्हावे लागले. त्यांनी स्वत: हे मला सांगितले आणि वर हेही सांगितले की ही गोष्ट त्या नागल्याला कळून देऊन नकोस. पण ''श्रीं''ची कृपा किती आपल्यावर आहे हे लक्षात येऊन मला सांगितल्याशिवाय रहावले नाही.''

हा वृत्तांत मला सकाळी कळला आणि त्याच दुपारी मी ''श्रीं''च्या प्रकृती-स्वास्थ्याकरता करवून घेतलेल्या महापुजेचा वाडीचा प्रसाद घेऊन पुण्यास ''श्रीं''कडे जाणार होतो. तो दिवस होता दि. १०.२.१९९६. प.पू. महाराजांचा ८६ वा वर्धापन दिन! 'श्री दत्त अमरेश्वरांवर' महापूजा प.पू. महाराजांच्या दीर्घ आयुरारोग्याकरीता करवून घेतली. गुरुजी श्री. नंदनवाडकरांनी प.पू. श्रीमहाराजांकरता तीर्थ प्रसाद दिला. तो घेऊन श्री. दामू पुजाऱ्यांमार्फत 'श्री नृसिंहसरस्वती रम्य पादुकांची' १२.३० ला महापूजा करवून घेतली. तीर्थ प्रसाद प.पू. महाराजांकरीता घेतला. 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरातून' बारा वाजताच निघून मी वाडीला महापूजेस हजर झालो. प्रसाद घेतला. सांगलीहून २.३० ला सुटणारी एशियाड ही बस पुण्यास जाणारी सुपरफास्ट होती. ही बस मिळाली तरच मी प.पू. महाराजांकडे 'श्री रेणुका निवासमध्ये' ''श्रीं'' शयनापूर्वी पोहोचणार होतो. सांगलीला आलो आणि चौकशी करताच कळले गाडी फुल् आहे. आता काय करावे! दुसरी एखादी बस किंवा पिवळी काळी टॅक्सी मिळते का हे बावरलेल्या मनाने अत्यंत घाई धावपळीच्या अवस्थेत बघत असतानाच पाठीमागून हाक आली, 'नागले साहेब!' मी वळून पाहिले तर दामू पुजाऱ्याचे भावजी, श्री. जोशी एस्.टी. बसचे ड्रायव्हर मला हाक मारीत होते. माझ्याजवळ येऊन बॅग हातात पाहून विचारू लागले. ''काय मुंबईला निघाला का?'' मी म्हटले, ''नाही हो भावजी मला पुण्याला घाईने जायचे होते. पण पुण्याला जाणारी सुपरफास्ट एशियाड फुल आहे.''

देवच बोलला, ''तुम्हांला सुपरफास्टनी जायचे आहे ना? गाडी सुटायला अजून ७-८ मिनिटे आहेत. द्या ती तुमची बॅग आणि या माझ्याबरोबर. मी तुम्हांला त्याच गाडीत कोटा सीटवर बसवून देतो.''

श्री. जोशी ड्रायव्हर यांनी सुपरफास्टचा ड्रायव्हर आणि कण्डक्टर गाठला व म्हणाले, ''हे माझे पाहुणे आहेत. सीट नसेल तर ड्रायव्हर केबीनमध्ये बसवा पण यांना न्या.'' श्री. जाधव कंडक्टर यांनी श्री. जोशींचे पाहुणे म्हणून माझी खूप काळजी घेतली. गाडी थोडी लेट झाली तरी १०.१५ ला रात्री स्वारगेटला उतरलो व लागलीच रिक्शा करून मी श्री रेणुका निवासात पोहोचलो.

मला एक नंबरची सीट मिळाली. प्रवास सुखावह झाला. ''श्रीं''चे दर्शन झाले. वाडीचा प्रसाद आणि पादुकांचे तीर्थ-हा ''श्रीं''ना सदैव अलभ्य लाभ. ''श्री'' प्रसन्नतेने हसले. प्रसाद घेतला. घरात बेल वाजवून आमचे भोजनपात्र घेण्यास सांगितले. कामाची चौकशी केली. हसत मिष्कीलपणे माझ्याकडे पहात विचारत आहेत, ''काय मग, ते गोविंदराव आता त्रास देत नाहीत ना?'' मी केव्हा तक्रार केली होती की गोविंदराव त्रास देतात म्हणून? मी म्हटले, ''नाही महाराज! सर्वकाही सुव्यवस्थित चालले आहे.''

१९०) नागल्यांची काळजी तुम्हांला करण्याचे काहीच कारण नाही!

'श्री दत्त अमरेश्वर' हे माझ्या सद्गुरु प.पू. श्रीदत्तमहाराजांचे श्रद्धास्थान. विशेष म्हणजे वाडीहून प.प. नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराज, आमच्या गुरुदेवांचे गुरुदेव, 'श्री दत्त अमरेश्वर मंदिर' (मठ) येथे वास्तव्यास आले. अशा या पवित्र भूमीत श्री दत्त अमरेश्वर, वासुदेव पीठ आणि निवासी खोल्या, हॉल, बांधण्याचे जीर्णोद्धाराचे काम प.पू. महाराजांनी मज पामराकडे सोपवावे ही त्यांची कृपा आणि माझे परम भाग्य होय. मी मला धन्य मानतो. हे काम चालू करण्यापूर्वी माझी मुंबईत काही कामे पूर्णत्वास येत होती. नवीन कामांची टेंडर्स भरणे चालू होते. इतक्या त्वरीत 'श्री दत्त अमरेश्वराचे' कामाची सुरुवात होणार याची मला कल्पना नव्हती. चेंबूर येथील छेडानगर मध्ये तीन मोठ्या इमारतींच्या बाहेरचे प्लास्टर नूतनीकरण आणि टेरेस वॉटरप्रुफींग ही नऊ लाखाची कामे मिळाल्यातच होती. कॉन्ट्रॅक्ट सेटलमेंट करता सोसायटी कमिटी आणि आर्किटेक्ट व आमची फायनल मिटींग २ दिवसांवर आली होती आणि श्री. लाटे साहेबांचा फोन आला की 'श्री दत्त अमरेश्वराचे' काम ताबडतोब डिसेंबर १९९२ मध्ये सुरू करायचे आहे. आता ही तीन इमारतींच्या दुरुस्तीची कामे स्वीकारणे इष्ट नव्हते. कारण जमिनीतील पायापासून नवीन काम करणे वेगळे आणि रिपेअरींगची कामे वेगळी. रिपेअरींगच्या कामाला जातीने सतत साईटवर उभे रहावे लागते. मी आर्किटेक्ट श्री. सुधीर जोशी यांना नकार दिला आणि पुण्यमार्गाकडे वळलो.

'श्री दत्त अमरेश्वराचे' काम सुरू झाले. राहिलेली कामे पूर्ण करण्याकरता अधून मधून मुंबईस जावे लागे आणि 'श्री अमरेश्वरांची श्री गुरुमहाराजांची सेवा' खंडीत होऊन किती नुकसान होई हे मागील कथेवरून लक्षात येतेच. मी माझे संपूर्ण लक्ष 'श्री दत्त अमरेश्वराच्या' कामात केंद्रीत केले. पण प्रपंच ओरडत होता. मोठ्या मुलाचा चि. संदीप याचा कारखाना नुकताच सुरू होत होता. धनार्जनास प्रारंभ झाला नव्हता. उलट धनाची पेरणीच त्यात चालू होती. दुसरा मुलगा चि. दिनेश इंजिनिअरची पदवी घेऊन नुकताच नोकरीस लागला होता. धाकटा कॉम्प्युटर इंजिनिअरींग करीत होता. हजारोंनी फीज् भराव्या लागत होत्या. अस्मादिकाची आर्थिक स्थिती ढासळत चालली. संदीपचे लग्न डिसेंबर १९९२ ला झाले. त्याचवेळी या बांधकामाची सुरुवात झाली होती. प.पू. श्रीमहाराज १९९४ ला चि. दिनेशचे लग्न आता उरकून टाका असे आम्हांस म्हणू लागले. गुरु आज्ञा. आम्ही त्याच्याकरीता स्थळे पाहू लागलो.

एके दिवशी श्री. लाटे यांनी माझ्यापुढे विचार मांडला. तो असा, ''कामाची गती कमी पडते आणि देणग्यांची गती फास्ट आहे. शिल्लक फार मोठी जमा आहे. तर आपण ही रक्कम कुठेतरी जास्त व्याज मिळेल अशा ठिकाणी गुंतवूया का? तशी गुंतवण्यास आपण प.पू. श्रीमहाराजांची परवानगी घेऊ. शॉर्ट टर्म डिपॉझीट बँकाही घेतात.'' मी म्हटले, ''तसे असेल

तर मला काही रक्कम व्याजाने द्या. मी जास्त व्याज देईन.''

श्री. लाटे म्हणाले, ''उत्तमच. पण नागले तुम्हांला कर्ज देत आहोत हे सुद्धा प.पू. श्रीमहाराजांना सांगावे लागेल. तुम्ही अडचणीत (पैशांच्या) आहात हे महाराजांना कळून चालेल का? तुमची हरकत नसेल तर मी प.पू. श्रीमहाराजांना एवढी रक्कम तुम्हांला कर्ज देण्याबद्दल म्हणतो!''

माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. हे ''श्रीं''ना कळून कसे चालेल? मी म्हटले, ''लाटे साहेब हा मुद्दा माझ्या लक्षातच आला नव्हता. नको, नको. मला 'श्री दत्त अमरेश्वराच्या' फंडातून कर्ज नको.''

श्री. लाटे साहेबांनी उपकृत करून माझी बरीच गरज उसनवारीतून भागविली.

परंतु नागल्यांच्या वरील प्रेमापोटी श्री. लाटे यांनी आम्हांस न विचारता ''श्रीं''पुढे एक प्रस्ताव टाकला. प.पू. श्रीमहाराजांना श्री. लाटे म्हणाले, ''महाराज, आपले नागले सध्या आर्थिक अडचणीत आहेत. आपले 'श्री अमरेश्वराचे' काम नाही म्हटले तरी पाच लाखापेक्षा जास्त झाले आहे. त्यांना कमीत कमी पाच टक्के म्हटले तरी पंचवीस एक हजार रुपये द्यायला काही हरकत नाही.''

प.पू. महाराज काहीसे गंभीर झाले आणि उच्च स्वरात लाटेंना म्हणाले, ''नागल्यांची काळजी तुम्हांला करण्याचे काहीच कारण नाही. ते आमचे आम्ही पाहून घेऊ.'' (म्हणजे ''श्री''ना म्हणायचे असेल श्री. नागलेंची काळजी वहायला आम्ही समर्थ आहोत. आपले काहीतरी चुकले हे लक्षात येण्यास श्री. लाटे यांना वेळ लागला नाही. त्यांनी लागलीच नमस्कार करून प.पू. महाराजांची माफी मागितली.

पुणे-अमरेश्वराचे ट्रिपमध्ये प्रवासात गप्पा गोष्टी करीत असताना श्री. लाटेंनी ''नागले तुमच्या बाबतीत माझी फार मोठी चूक झाली. मी तुम्हांला न विचारता, न सांगता प.पू. महाराजांपुढे असा प्रस्ताव मांडला आणि ''श्रीं''नी चांगली कान उघडणी केली. आता ''श्रीं''च्या नंतर मी तुमच्याकडे झाल्या प्रकाराबद्दल माफी मागतो. हे सर्व मला तुम्हास चुकीची कबुली देऊन सांगावे लागले ते इतक्याच करता की प.पू. महाराजांचे तुमच्यावर किती लक्ष आहे, किती प्रेम आहे. तुम्ही भाग्यवंत आहात.''

१९१) ''उंबरठ्याजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही!''

एकदा प.पू. श्रीमहाराज उगारचे (इचलकरंजी येथील) श्री. लक्ष्मणराव कुलकर्णी यांचे वडील श्री. कल्याणजी कुलकर्णी यांच्या भेटीस गेले होते. ही सदिच्छा भेट होती. श्री.

कल्याणजी यांना प.प. श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांचा सहवास, तद्नंतर प.प. श्री नृसिंह सरस्वती दीक्षित महाराजांचा तर खूपच सहवास लाभला होता. श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांनी तर श्री कल्याणजींना परम विश्वसनीय म्हणून 'श्री दत्त अमरेश्वर देवस्थानचे' विश्वस्त म्हणून नेमले. वर्षांतील 'श्री दत्त अमरेश्वराची' एक पूजा समारंभ त्यांच्याकडेच अव्याहत राहून त्यांच्याकडून सादर केला जावा, अशी सोय करून दिली. प.पू. श्रीदत्तमहाराजांना जसा त्यांच्याबद्दल आदर होता तसे श्री. कल्याणजीही पूर्वीपासून ओळखत असल्याने त्यांनाही ''श्रीं''च्या बद्दल आपुलकी होती. प.पू. श्रीदत्तमहाराजांचा घरी सत्कार करताना त्यांनी त्यांचा मनसोक्त गुणगौरव केला व स्तुती सुमने वाहिली. प.पू. श्रीमहाराजांच्या विनयशीलतेची प्रशंसा केली. प.पू. श्रीमहाराज त्यांना म्हणाले, ''श्री वासुदेवानंदाच्या भेटीस त्यांचे समीप जाणाऱ्यांपैकी आपण आहात. आपली तेवढी पात्रता आहे. उंबरठ्याजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही!''

१९२) ''श्रीं''चे कृपेने कर्जमुक्त!

प.पू. श्रीमहाराज वाडीत आलेले होते. एकदा ''श्रीं''ना भेटायला वाडीचे प्रमुख पुजारी श्री. रामशास्त्री जेरे आले होते. संभाषणात ते बोलताना म्हणाले, ''आमचा, आमच्या घराच्या जवळच एक प्लॉट, त्यावर एक पडीक घर आहे ते तोडून तेथे आर.सी.सी. दोन मजली इमारत बांधण्याचा विचार आहे.''

प.पू. श्रीमहाराजांनी विचारले, ''कोणी ठेकेदार नक्की केला आहे कां? नसेल तर आपले नागले आहेत. स्वतः इंजिनिअर असून बरेच वर्षांचा अनुभव आहे. त्यांची मुंबईत मोठमोठी कामे चालू असतात. आपले 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे' काम कसे उत्तम प्रकारे चालले आहे. आपण पाहून यावे, शिवाय परिचय आहे. पुण्याचे 'श्री वामन निवासाचे', आमच्या घराचीही कामे त्यांनीच चांगल्या प्रकारे केली आहेत.

''पण ते देवाचे म्हणून इकडे येऊन काम करीत आहेत. आमच्या घराचे करतील का?''

''श्री'' म्हणाले, ''इथे देवांचे अनायसे काम चालूच आहे. कामगार, गवंडी, सुतार सर्व जथा जमलेला आहे. मंदिराचे काम ३-४ वर्षे चालणारच आहे. त्यात तुमचेही होऊन जाईल. तुम्ही भेटा त्यांना, काय म्हणताहेत पहा. जरूर तर आमचे नांव घ्या. हरकत नाही. तुमचे काम उत्तम प्रतीचे होईल. जाता जाता त्यांनाही व्यवसाय मिळेल.''

श्री. प्रभाकर बडु यांच्यामार्फत श्री. रामशास्त्रींनी माझ्याकडे विचारणा केली व मी प.पू. महाराजांची परवानगी विचारून सांगतो म्हटले. पुण्यास श्री रेणुका निवासामध्ये गेलो असताना

''श्रीं''ना हे मी सांगितले. ''श्रीं''नी हसत परवानगी दिली. म्हणाले, ''श्री अमरेश्वर मंदिराचे वाटेवरच काम आहे. जाता येता तुम्हांला लक्ष देता येईल. वाडीतील पुजाऱ्यांचे काम म्हणजे देवांच्या पुजाऱ्यांची सेवा ही त्यांच्या प्रभुचीच सेवा आहे. श्री. रामशास्त्री आणि त्यांची मुले सज्जन मंडळी आहेत. मुले बँकेत वगैरे नोकरीस आहेत. कामाचे पैसेही वेळचे वेळी मिळतील. परमार्थाबरोबर प्रपंचही चालेल. चांगले आहे, घ्या त्यांचं काम.''

श्री. रामशास्त्रींचे काम चालू झाले. आर.सी.सी. डिझाईन चि. दिनेशनेच केले. उत्तम प्रकारे पार पडले. तसेच पुढे श्री. अवधूत बोरगांवकर यांचेही दुमजली इमारतीचे याही पेक्षा मोठे काम करण्याकरता प.पू. श्रीमहाराजांनी त्यांना माझे नाव सुचविले. ''श्रीं''चा उद्देश होता, नागलेंना आर्थिक लाभ व्हावा आणि पुजाऱ्यांची कामे इमाने इतबारे उत्तम प्रतीची व्हावीत. कामे सुरू झाली की, इथे कपाट हवे, इथे मार्बल हवा, कट्टा ग्रेनेटचा हवा असे काहीना काही गरजेचे, आवडीचे यच्चयावत् सोईचे निघते व दिलेल्या एस्टीमेटमध्ये वाढ होतेच. या दोन्ही महान पुजाऱ्यांची कामे ही कमीत-कमी दरात उत्कृष्ट प्रतीची करून दिली. तरीही फायनल बिलाचे बाबतीत मी काही सूट द्यावी अशी त्यांनी आग्रहपूर्वक विनवणी केल्याने आम्हीही त्यांना पन्नास हजारांची सूट देऊन समाधान दिले.

आम्हालाही या दोन कामात जो काही नफा झाला त्यात आम्ही कर्जमुक्त होऊन आमची ढासळलेली आर्थिक बाजू सावरली गेली. श्री दत्त अमरेश्वराचे कामाकरता मुंबईची कामे सोडली पण प.पू. श्रीमहाराजांनी पुरेपुर माप आमचे पदरात टाकले. ''श्रीं''चे नेहमी मला व श्री. लाटे यांना म्हणणे असे, ''**श्री दत्त अमरेश्वर कधीही कोणाच्या ऋणात रहात नाहीत!**''

१९३) सदाशिव ऊर्फ भाऊ मुजुमदारांची अंतिम यात्रा!

प.पू. श्रीमहाराजांचे कृपापात्र ठरलेले, ''श्रीं''चे आज्ञेने श्री महाशिवरात्रीस गोकर्ण महाबळेश्वर यात्रेस जाऊन महाशिवरात्रीच्या दिवशी गणेश पूजन आणि शिवशंकर गोकर्णाचे बिल्वपत्र वाहून पूजन करून तेथेच जीवनयात्रा संपविणारे श्री. भाऊकाका ऊर्फ सदाशिव विठ्ठल मुजुमदार, यांचा पूर्व परिचय देतो आणि नंतरच कथानकाकडे वळूंया.

माझी मुंबईत कन्स्ट्रक्शनची जी काही कामे मला अनेक ओळखीचे आर्किटेक्ट लोकांकडून मिळायची त्यातील एक श्री. मिलींद संभारे - संभारे ॲण्ड कंपनीचे मालक. याच संभारेंकडे भाऊकाका मुजुमदार अकाऊंटंट, मॅनेजर अशा पोस्टवर नोकरीस होते. वडीलांपासून पूर्व परिचयाचे असलेले हे भाऊ, संभारे यांचे आधारस्तंभ, त्यांना वडीलांचे ठिकाणीच होते. कामानिमित्त माझे जाणे संभारेंकडे व्हायचे. साहेब ऑफिसात नसले व ऑफिसात लवकर

येणार असले तर भाऊंजवळ आमच्या गप्पागोष्टी चालायच्या. त्यांची माझी ओळख ही सुद्धा माझ्या हातात योगसाधनेचे पुस्तक पाहूनच झालेली. ''तुमचे गुरु कोण? मलाही गुरु करायचा आहे. गुरुमहाराज तुमचे घरी येणार असतील तर मला कळवा, मीही दर्शनास येईन. ''अशाप्रकारे ते प.पू. श्रीदत्तमहाराजांपर्यंत पोहोचले. काही घरगुती अडचणी, आईचा आजार, तिची सेवा-शुश्रुषा यामुळे ते अविवाहितच राहिले होते. यथावकाश ते प.पू. श्रीमहाराजांचे अनुग्रहीत होऊन आमच्या सर्व गुरुबंधूंमध्ये एकजीव झाले. आधीच एकटा जीव, नांवे सदाशिव. विशेष म्हणजे त्यांची भक्ती सदाशिवाची. आराध्य दैवत कुलस्वामी ''मंगेश.'' (गोवा). ''श्रीं''नी दीक्षा देऊन नामजप दिला तोही ''ॐ नमः शिवाय.'' ''श्रीं''चा सहवासही अल्पावधीत खूप मिळाला. हैद्राबाद दौऱ्यात श्री शैल्यम्, कुरवपूर, शुक्लाजींनी ''श्रीं''सह काढलेल्या दौऱ्यांत गरुडेश्वर, नारेश्वर, डाकोर, अंबाजी, खेडब्रह्मा, सोरटी सोमनाथ, द्वारका, मातृगया, सिद्धेश्वर याशिवाय ते हरिहरेश्वर कार्यक्रमात प.पू. महाराज, सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताईमहाराज यांच्या सहवासात होतेच. गाणगापूर, तुळजापूर, सिद्धेश्वर सोलापूर आणि श्री वासुदेव निवासांतील सर्व वार्षिक उत्सवाला आवर्जून असायचे. कुरवपूरच्या भागवत सप्ताहांतही होते. त्या सप्ताहात तर ''श्रीं''चे बसून बसून ढोपर दुखायचे तर भाऊकाका रोज रात्री ''श्रीं''च्या अनुमतीने सोल्यूशन स्प्रे मारून वेदना कमी करायचे. त्यांना 'बाराक्षार' औषधांची माहीती होती. त्या साबुदाण्याच्या गोळ्या ''श्रीं''ना ते द्यायचे व तेही भाव पाहून घ्यायचे. प.पू. श्रीमहाराजांकरिता त्यांनी आयुर्वेदाचा अभ्यास करून एक टॉनिक बनविले होते. त्यांत डिंक, बदाम, खारीक, माखाणे, खसखस, पिंपळी, सुंठ, वेलची, अक्रोड, जर्दाळू, अंजीर असे पदार्थ! ते किती किती त्याचेही प्रमाण होते. हे मिश्रण मिक्सरमध्ये काढून तो डबा ते ''श्रीं''ना आणून द्यायचे व रोज सकाळी नाश्त्यानंतर प.पू. महाराज एक कप दुधांत ते घ्यायचे. एके काळी कर्मकांडाच्या विरोधात असलेले भाऊ ''श्रीं''चे प्रवचन ऐकून भस्मधारणेपासून प्रातःसंध्या आणि सायंसंध्या करू लागले. यावरून त्यांच्या भक्तीभावाची कल्पना आलीच असेल.

१९९२ च्या मार्च महिन्याच्या पहिल्याच हप्त्यांत महाशिवरात्र आली होती. यावेळी महाशिवरात्रीला मंगेशीला जायचे त्यांच्या मनात आले. प.पू. महाराजांची परवानगी घेण्यास श्री रेणुका निवास मध्ये आले. दर्शन घेऊन नमस्कार वगैरे झाल्यावर भाऊकाकांनी प.पू. महाराजांना म्हटले, ''महाराज महाशिवरात्रीला मंगेशीला जायचे म्हणतोय, जाऊ कां?''

''हो! गोकर्ण महाबळेश्वर महाक्षेत्र आहे! या जाऊन या!''

''मंगेशीला जायचे म्हणतोय'' पुन्हा मोठ्या आवाजात भाऊ मुजुमदारांनी सांगितले. तरी पुन्हा ''श्रीं''चे तेच. ''एकदा तुम्ही गोकर्णाला जाऊन आला आहात ना? पण

महाशिवरात्रीचा योग अधिक चांगला!''

झाले! शेवटी भाऊंना कळून चुकले की, आपण गोकर्ण महाबळेश्वरला जावे असे महाराजांना वाटत असावे. मनात त्यांनी ठरवून टाकले, ''गुरुवाक्य प्रमाणम्!'' ''श्री'' म्हणत आहेत तर गोकर्ण महाबळेश्वरलाच जायचे. प.पू. महाराजांनी विचारले, ''सोबत कोणी आहे कां नाही? शृंगारपुरे किंवा नागले कोणाला तरी बरोबर न्या. एकटे जाऊ नका!''

श्री. भाऊंचा मला फोन आला. परंतु मला धंद्यातील काही महत्त्वाच्या कामामुळे शक्य नव्हते. श्री. सुधाकर शृंगारपुरे तयार झाले. ''श्रीं''नी आम्हा दोघांची नावे घेतली त्यात मला शक्य नव्हते व शृंगारपुरे यांना रजा मिळत होती म्हणून ते सोबत गेले. ''श्रीं''ची योजना कशी होती ते ह्या वृत्तांतावरून कळून येते. श्री. भाऊ मुजुमदार आजारी, अशक्त वगैरे काही नव्हते. अगदी ठणठणीत होते. कथेचा विस्तार होत आहे पण घटना कशा घडत गेल्या ते कळण्यास, ''श्रीं''ची सूत्रे कशी हलतात ते सांगणे इष्टच होय. श्री. शृंगारपुरे यांच्या ऑफिसातील वरिष्ठ, अधिकारी बाई होत्या. त्यांचे कुणीतरी नातलग गोकर्णास रहात होते. त्या बाईंनी शृंगारपुरेंबरोबर त्या नातलगास देण्यास एक डबा आणि पत्र दिले. गोकर्णास आदल्या दिवशी पोहोचले आणि त्या नातलग - श्री. नाडकर्णी यांच्याकडे दोघेही गेले. भेटीत ते नाडकर्णी घरात कोकणी भाषा बोलत होते ते ऐकून आमचे भाऊ मुजुमदार (त्यांचीही मातृभाषा कोकणी), लागलीच त्या भाषेत त्यांच्याशी बोलू लागले. मग गप्पा रंगल्या, ओळखी झाल्या.

महाशिवरात्रीचे दिवशी पहाटे चार वाजता दोघेही समुद्रस्नान करून आले. प्रथम गणेश मंदिरात गणेशाच्या पायावर समुद्राचे लोटाभर पाणी घालायचे असते. लाईन तर खूप मोठी होती. भट-मुळे गुरुजी म्हणू लागले, ''गोकर्णाचे मंदिर अजून तरी रिकामे म्हणजे कमी गर्दीचे आहे. पुढे गर्दी वाढेल. आधी बेल वाहून पूजन पूर्ण करा!'' आपण या यात्रेला मुंबईहून एवढ्या लांबून आलो आणि आधी पाणी घालण्याचे शास्त्र आहे तर....! हे त्यांचे शब्द सिक्युरिटी गार्डने ऐकले. त्याला काय वाटले न कळे. त्यांने दोघांनाही म्हटले, ''चला, माझ्या पाठोपाठ या!'' त्याने दोघांना गाभाऱ्यात नेले. पुजाऱ्याने मंत्रोच्चाराने त्यांचा श्री गणपतीचा तो अभिषेक पण करून घेतला. (ही सर्व श्री सद्गुरुंची किमया) नंतर गोकर्ण मंदिर गाभारा रिकामा. तुरळक भक्त मंडळी. मुळे गुरुजींनी दोघांकडून साग्रसंगीत यथोचित पूजा, अभिषेक करून घेऊन बेल वाहून घेतला. पूजनानंतर गुरुजींचे परवानगीने कोपऱ्यात बसून संकल्पित जप पूर्ण केला. मुळे गुरुजींच्या घरी गेले. किरकोळ फराळ, चहापान प्रथम संध्यावंदन करून मग केले. दोघेही ध्यान धारणा बैठकीस बसले. भाऊ मुजुमदारांचे छातीत दुखू लागले. नाईलाजाने पंतांना (शृंगारपुरेंना) हलवून ''माझ्या छातीत फार दुखत आहे, मी डॉक्टरकडे जाऊन येतो'' म्हणू लागले. श्री. शृंगारपुरे लागलीच उठले, दोघांच्याही अंगावर उपरणे तसेच. एक जिना उतरुन

खाली आले. गुरुजींकडील माणसांना विचारत आहेत, ''डॉक्टर डॉक्टर!'' इतक्यात घेरी आली. त्यांना धरले, कोचावर बसविले. कॉफी पाजली. पुन्हा अॅटॅक, झोपले, अस्वस्थ. आज महाशिवरात्र. बाजार, दुकाने, दवाखाने बंद. तरीही त्यांना चादरीत गुंडाळून डॉक्टरकडे नेले. त्यांनी तपासले व म्हणाले, ''ही इज डेड!'' शृंगारपुरे यांच्या पायाखालची जमीन हादरली. आता काय करायचे? पोलीसांना बोलावून पंचनामा. शृंगारपुरे म्हणाले, ''थांबा, मी जरा जाऊन एका गृहस्थांना भेटून सर्व सांगून येतो.'' डॉक्टर म्हणाले, ''नाही, तुम्हांला ही बॉडी सोडून आता जाता येणार नाही. कुठे कोणाकडे जाणार होतात?'' शृंगारपुरे म्हणाले नाडकर्णींकडे. पत्ता वगैरे सांगितला. डॉक्टर म्हणाले, ''ते तर माझे चांगले मित्र आहेत! थांबा मी फोन करून त्यांना येथे बोलावतो!'' नाडकर्णी आले आणि म्हणाले, ''हो मी शृंगारपुरेना आणि ह्या मृत गृहस्थांना ओळखतो. काल रात्री तास दीड तास आम्ही गप्पा मारत होतो.'' (''श्रीं''ची योजना, सहाय्य लक्षात येत जाते) नाडकर्णी डॉक्टरांना म्हणाले की, तुम्ही डेथ सर्टिफिकेट 'हार्ट अॅटॅकने मृत्यू' असे द्या. लायन्स क्लबचे त्यांचे एक मिलीटरी अधिकारी, आणखी ओळखीचे दोघे घेऊन प्रेतयात्रा निघाली. तत्पूर्वी शृंगारपुरे यांनी मला मुंबईस फोन करून त्यांचे भाऊ मंगेश यांना दु:खद बातमी देऊन, दु:खावेग आवरताच गोकर्णातच अग्निसंस्कार करायची परवानगी मागितली. परिचयाचेच असल्याने त्यांनी ती दिली. महाशिवरात्रीचे दिवशी मरण आलेल्या व्यक्तीला पुण्यात्मा मानून सर्व यात्रेकरू दर्शनास! अशा प्रकारे सर्व आटोपले. तीन दिवस शृंगारपुरे यांना रहावे लागले. कारण शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी अस्थिसंचय झाला. या सर्व गोष्टी निर्विघ्नपणे पार पाडण्यास ''श्रीं''चे आशीर्वाद, कृपा हेच कारण. इकडे श्री. संभारे यांना ही बातमी कळताच ते दु:खाने हवालदील झाले. त्यांचे सारे अवसानच गेले. आता वडीलांचे छत्र गेल्यासारखेच झाले. उद्या ऑफिसात जायचे कसे, ऑफिस चालवायचे कसे? दु:ख अनावर झाले. ते माझ्याकडे आले व म्हणू लागले, ''मी पुरा खचलो आहे. मला काही कळत नाही, सुचत नाही, मला लागलीच आजच तुमच्या गुरुमहाराजांकडे घेऊन चला. तेच मला काही सांत्वनाच्या चार गोष्टी सांगू शकतील.''

श्री. शृंगारपुरे प.पू. महाराजांच्या दर्शनास पुण्यास जाण्यास निघालेच होते. मिलींद संभारेनाही त्यांच्या सोबत धाडले. ''श्रीं''च्या चरणावर डोके ठेऊन त्याने आपल्या भावना वेगांस, अश्रूंस मोकळे सोडले. एखाद्या लहान मुलासारखे ते रडले. त्यांना भाऊ म्हणजे कसे पितृतुल्य होते, ते त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या कसे सांभाळत होते, हे सविस्तरपणे त्यांनी प.पू. महाराजांना कथन केले.

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! आम्हाला हे तुमचे आणि मुजुमदारांचे इतके आत्मियतेचे, जवळचे, घरचे संबंध आहेत हे आधी माहीत असते तर आम्ही शृंगारपुरेंना त्यांचे सोबत न

पाठविता तुम्हांलाच पाठविले असते!''

या वरून पुढे घडणाऱ्या सर्व घटना प.पू. महाराजांना आधीच ज्ञात होत्या हेच सिद्ध होते. आता ''श्रीं''ची कै. मुजुमदारांबाबत आलेली पत्रे पाहूया.



१९४) सदाशिवभाऊंच्या निधनानंतरची ''श्रीं''ची पत्रे

पत्र क्र. १

॥ श्रीदत्त ॥

श्री वासुदेव निवास, पुणे ४.
दि. २.३.१९९२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम.

श्री. मुजुमदारांचे हार्टफेल झाल्याचा आपला फोन येथे आल्याचे सायंकाळी आश्रमांतून आल्यावर समजले. वाईट घटना घडली. ईश्वरेच्छेपुढे इलाज नाही. श्री. शृंगारपुरे बरोबर गेले हे बरे झाले. श्री. मुजुमदार सात्विक वृत्तीचे, श्रद्धाळू, सज्जन होते. ईश्वरभक्त होते. आयुष्यापुढे कोणाचेच चालत नाही. भगवान श्री शंकर त्यांना उत्तम गती देण्यास समर्थ आहेत. आम्हीही या दु:खात सहभागी आहोत. विवेकाने हे दु:ख आवरून प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे, असे त्यांचे बंधू वगैरे आत्मीय सज्जनांना सांगावे.

कळावे,

आपले
- दत्तात्रय कवीश्वर

---**---

पत्र क्र. २

आशय - पत्र शृंगारपुरे यांस,

॥ श्रीदत्त ॥

श्री वासुदेव निवास, पुणे ४.
दि. १६.३.१९९२

श्री. संभारे यांना वाडीस येऊन आपल्याबरोबर महापूजा करण्यास कळविले आहे. आपण प्रतिवर्षी वाडीस येऊन 'श्री दत्तपादुकांची महापूजा,' नैवेद्य करता ही पुण्यवासना कल्याणकारक आहे. श्री. मुजुमदार यावर्षी नाहीत. श्री शिवकृपेने शिवक्षेत्रात महाशिवरात्रीस देह त्याग घडल्याने ते शिवलोकी उत्तम मार्गाला गेले यात संशय नाही. त्यांचे उत्तरकार्य

बंधूंनी व्यवस्थित केले हे योग्य झाले. आपणही त्यांच्याबरोबर गेल्याने सर्व व्यवस्था शास्त्र व व्यवहार यांना अनुसरून झाली. श्री. मुजुमदार यांची सात्विक, परोपकारी वृत्ती, ईश्वरभक्ती, सत्कर्म प्रवृत्ती इत्यादी गुणांमुळे श्री महाबळेश्वरांची त्यांच्यावर कृपा झाली. "शेवटचा दिवस गोड व्हावा" हे खरे ठरले.

---**---

पत्र क्र. ३ - आशय

॥ श्रीदत्त ॥

श्री वासुदेव निवास, पुणे ४.
दि. २३.३.१९९२

श्री. मुजुमदारांचे उत्तरकार्य त्यांचे बंधूंनी केले असे शृंगारपुरेंच्या पत्रावरून समजून समाधान झाले. श्री. मुजुमदारांना मृत्यू शिवसान्निध्यात, महाशिवरात्रीच्या दिवशी, शिवक्षेत्रात आल्याने श्री शंकराचे कृपेने ते कैलासलोकांत श्री शिवसान्निध निश्चित जाऊन राहिले आहेत. मानव जन्माचे सार्थक झाले.

१९५) श्री. साबळे शेटजींकडे दत्तयाग "श्रीं"चा ७७ वा वर्धापन दिन.

श्री. साबळे शेठजींचे सोलापूर येथील कारखान्यात दत्तयाग संपन्न होणार होता. याच दरम्यान "श्रीं"चा वर्धापन दिनही येत आहे हे लक्षात घेऊन आम्ही म्हणजे मी, शृंगारपुरे, भाऊ मुजुमदार आणि म्हसवडकर दि. १८.२.१९८७ ला मुंबई सेंट्रलहून सकाळी आठच्या सोलापूर एस्.टी. बसने निघालो. श्री. शेठजींच्या कारखान्यात आम्ही सायंकाळी ६.३० वाजता पोहोचलो. प.पू. महाराजांचे 'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु' या श्लोकावर प्रवचन चालू होते.

कारखान्यापासून तीन किलोमीटर अंतरावर शेठजींनी भक्तांची राहण्या-झोपण्याची सोय केली होती. जाण्या-येण्यास जीप ठेवली होती. सर्व व्यवस्था चोख होती.

दि. १९.२.१९८७, गुरुवारी प.पू. महाराजांचा ७७ वा वर्धापन दिन होता. "श्रीं"चा मुक्काम बापूसाहेब कुबडे यांच्या घरी होता. आम्ही पहाटे ५.४५ ला कै. बापूसाहेब कुबडे यांच्या घरी पोहोचलो. आमच्या येण्याची चाहुल लागताच जागेच असलेल्या प.पू. महाराजांनी विचारणा केली, "कोण आले आहे?" श्री. रघुनाथराव म्हणाले, "आज आपला वर्धापन दिन आहे ना? भक्त मंडळी आली आहेत दर्शनाला! शृंगारपुरे, नागले, मुजुमदार, म्हसवडकर."

होय कां? महाराज साश्चर्य कौतुकाने हसले. प.पू.सौ. ताईमहाराज, सौ. आईसाहेब, सौ. सुमनताई, सौ. सुलभाताई, सौ. साबळे काकू, डॉ. भातलवंडे सर्व दिवाणखान्यात आले. मध्यावर चौरंग मांडण्यात आला. ''श्रीं''ना मालीश करण्याकरता तेल, उटणे सर्व तयारी करून ठेवली होती. सर्वांच्या इच्छेस मान देऊन मध्यावरील चौरंगावर प.पू. महाराज येऊन स्थानापन्न झाले. ''श्रीं''ना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये ही आम्हा प्रत्येकाची भावना होती. संकोचाने भक्तांचे हात पुढे येऊ लागले. अंगाला उटणे लावू लागले. मी ''श्रीं''च्या पायाजवळ संकोचाने बसलो होतो. पायांना तेल लावू का नको लावू, उटणे लावू का तेल लावू? इतक्यात सौ. ताईमहाराज मोठ्याने ओरडल्या, ''शशीकांत बघता काय? घ्या ते ''श्रीं''चे चरण आपल्या हातात आणि तेलाने चोळा!'' माझा संकोच दूर झाला. मी ओंजळीत तेल घेऊन ''श्रीं''च्या दोन्ही पोटऱ्यांपासून चरणांपर्यंत सोडले व हलक्या हाताने त्या कोमल चरणांचे भावपूर्ण मनसोक्त मालीश, मर्दन केले. आनंदाची परमावधी होती. अशी संधी कधीच मिळाली नव्हती. सोलापूरच्या दत्तयागांत ''श्रीं''चा १९ तारखेस वर्धापन दिन आहे हे कोणासच माहीत नव्हते. आम्ही जेव्हा सौ. साबळे काकुंना विचारले, ''आम्ही उद्या पहाटे आपली जीप घेऊन श्री. कुबडे यांच्या घरी जाऊ कां? उद्या ''श्रीं''चा वाढदिवस आहे.'' हे ऐकताच काकुंनी शेठजींना विचारले, ''अहो, तुम्हांला माहीत नव्हते कां? उद्या महाराजांचा वाढदिवस आहे. आधी कळले असते तर प.पू. श्रीमहाराजांना आज रात्री मुक्कामाला आपल्या घरीच नेले असते.''

साबळे शेठजीही हळहळले. पहाटे साबळे काकुही आल्या होत्या. नेमकीच माणसे असल्याने ''श्रीं''च्या सेवेचा त्यांना तेल उटणे लावून स्नान घालण्याचा भाग्याचा क्षण आम्हांस प्राप्त झाला. सकाळी ७ वाजता प.पू. महाराजांना सर्वांनी सचैल स्नान घातले. कोणतीही गडबड नाही, गोंगाट नाही. सर्व कसे शांतपणे. सर्वांस एक लोटी, ''श्रीं''च्या अंगावर, चरणावर घालण्यास मिळाली. नंतर श्री गुरुपूजनाचाही लाभ झाला. दत्तयाग, त्यानंतर ''श्रीं''ची साबळे उभयतांकडून पाद्यपूजा सायंकाळी ५ वाजता झाली. ''श्रीं''ची शर्करा तुला झाली आणि नंतर ''श्रीं''च्या उपस्थितीत श्री. साबळे दांपत्याची तुला झाली. रात्रीच्या प्रसादभोजनानंतर ''श्रीं''चा निरोप घेऊन आम्ही चौघे पंढरपूरला निघालो.

दुसऱ्या दिवशी चंद्रभागा स्नान, पांडुरंग रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन सायंकाळी माजी विद्यार्थी म्हणून, मी व माझे सोबती लोकमान्य विद्यालयाच्या महोत्सवाला गेलो. प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले व श्री. साठे गुरुजींची भाषणे झाली. १९५४ ला मी नववी इयत्तेत पंढरपुरांत या शाळेत होतो. तेहतीस वर्षांनी आमचे वर्गमित्र व गुरुजी, विशेषत: पूज्य श्री. देवधर गुरुजी यांचे दर्शन झाले.

१९६) १९८७ - ''श्रीं''च्या सोबत तुळजापूर, गाणगापूर

दि. २९.७.१९८७, बुधवारी सिद्धेश्वर एक्सप्रेसने रात्री १० वाजता आम्ही निघालो. आम्ही म्हणजे मी, सुधाकर शृंगारपुरे, नंदकुमार शृंगारपुरे, मुजुमदार व श्री. तांबोळी, प्रभाकर आंबेकर व श्री. नाना जळवी. दि. ३० ला सकाळी कुर्डुवाडीस पोहोचताच श्री. तांबोळी यांनी मागविलेल्या जीपने आम्ही बार्शीला गेलो. बार्शीच्या भगवंताचे दर्शन घेतले. तसेच उत्तरेश्वर मंदिराचे दर्शन करून आम्ही वैराग येथे सौ. सुमनताईंचे (भातलवंडे यांचे) घरी ११ वाजता गेलो. सायंकाळी ४.३० ते ७ ला दिगंबराची धून झाली. ७ वाजता प.पू. महाराजांचे आगमन झाले.

दुसऱ्या दिवशी दि. ३१.७.१९८७ ला वैरागहून प.पू. सौ. ताईमहाराजांसमवेत तुळजापूरला गेलो. धाकट्या देवीची पूजा ''श्रीं''च्या हस्ते संपन्न होणार होती. आम्ही काहीसे लवकरच पोहोचलो म्हणा किंवा पुजाऱ्यांनी येण्यास उशीर केला म्हणा, काही असो, पुजेला थोडा वेळ होता. तोपर्यंत बाजूच्या धर्मशाळेत जाजमे अंथरून बसण्याची सोय केली होती. प.पू. महाराजांकरिता बैठक मांडली होती. श्री. जगन्नाथ पुजारी ''श्रीं''च्या सोबत होते व ते शेजारीच बसून ''श्रीं''शी बोलत होते.

सदा संतापाशी जावे। त्यांचे जवळी बैसावे।।
उपदेश ते न देती। तरी ऐकाव्या त्या गोष्टी।।
तेच उपदेश होती।।

ह्या प.प. वासुदेवानंदांच्या ओव्यांचा प्रत्यय आला. जगन्नाथ पुजाऱ्यांनी प.पू. महाराजांना विचारले, ''व्यसनाबद्दल आपले काय मत आहे? कुठले तरी व्यसन असावे का नसावे?''

प.पू. महाराज म्हणाले, ''व्यसन हे केव्हाही वाईटच. मनाच्या लहरीवर बुद्धी निर्णय घेऊ लागते. साधकाच्या निश्चयात्मक बुद्धीला ती बाध करते.''

पुजारी, ''पण महाराज काहींना तंबाखूचे, काहींना मद्य प्राशन करण्याचे तर काहींना अगदी साधे चहाचे व्यसन असते. ही माणसे असे अनुभवाने म्हणतात की व्यसनाची तलफ लहर किंवा उर्मी भागविली की आम्ही अधिक ताजेतवाने होतो. उत्तेजीत होऊन आम्ही महत्त्वाची कामे उत्साहाने करू शकतो.''

प.पू. महाराज म्हणाले, ''हे मानसिक आहे. कृत्रिम उत्तेजकता, ही बुद्धी किंवा मेंदू व ग्रंथी यांवर परिणाम करणार नाही कां? आम्ही साधनेच्या बैठकीला निघालो आणि आम्हाला ती लहर उर्मी आली, कां ती पूर्ण करण्याकरिता आम्हांस धावले पाहिजे. म्हणजे साधनेस प्रतिबंध, अडथळा आलाच ना?''

पुजारी, ''पण महाराज काही सत्पुरुष सुद्धा पान तंबाखू अशा काही सवयीत असलेले

दिसतात. त्यांचे काय?''

श्रीमहाराज, ''संत सत्पुरुषांचा मनाचा कल हा त्यांचे स्वाधीन असतो. आमचे तसे आहे का?''

ह्या गोष्टींच्या श्रवणांतून भरपूर काही शिकायला मिळाले. मी स्वत: या दिवसापूर्वी २५ वर्षे तंबाखूच्या व्यसनात होतो. दात, दाढा दुखतात त्या मशेरीने घट्ट होतील यासाठी औषध म्हणून ही सुरुवात झाली. पुढे मशेरीची सुधारीत आवृत्ती तंबाखू पेस्ट वापरू लागलो. मग ती फक्त सकाळीच नाही तर उत्साह येण्यासाठी दिवसांतून ३-४ वेळा लावू लागलो. घरी असल्यास हे ठीक आहे पण बाहेर साईटवर, कामावर असल्यावर तेथे तंबाखू पेस्ट ब्रशींग हे कसे शक्य आहे? मग त्या वेळात ही तलफ तंबाखू पान खाऊन भागवावी, तंबाखू पान कुठे नाही मिळाले तर सहकाऱ्यांकडून तंबाखूची डबी मागून घ्यावी. अहो! इतकेच काय पण तंबाखू पेस्ट लावल्याने ध्यान धारणा बैठक उत्तम होते हे आमच्या मनाने घेतले व साधनेची वेळ होताच आधीची पंधरा मिनिटे त्यात जाऊ लागली. वरील संभाषणातून मर्म छेदच झाला. बरं सत्पुरुषांत काही तंबाखू खाणारे किंवा शंकरमहाराजांसारखे सिगारेट पिणारे असले तरी ते व्यसन किंवा मनाच्या कलाने वागणे नव्हे हेही कळले.

मनाचा दृढ निश्चय होऊन प.पू. श्रीमहाराजांच्या कृपा आशीर्वादाने मी तंबाखू संबंधीत व्यसनातून मुक्त झालो. व्यसन म्हणून कोणतेच राहिले नाही. तरी पण ''श्रीं''नी भावभक्तीचे, साधनेचे व्यसन दृढ करावे, हीच श्री गुरुचरणी प्रार्थना.

१९७) आता तुम्ही छोटी छोटी कामे घेत जा!

जीवनात चढउतार हे प्रत्येकास अनुभवावेच लागतात. प्रारब्ध-संचिताच्या प्रभावाने हे बरे वाईट दिवस येतच असतात. गतजन्मात केलेल्या सत्कृत्यांची पुण्याची फळे (चक्रवत् फिरणाऱ्या सुख दु:खांच्या फेऱ्यांत) चांगली फळे देणारी, सुख देणारी, आनंद देणारी तर दुष्कृत्यांची, पापकर्माची फळे दु:ख, यातना देणारी ही नियतीच्या न्यायाने प्रत्येकास भोगावीच लागतात.

भोग अटळ आहेत, ते भोगूनच सोडावे लागतात. हेच आपण प.पू. श्रीमहाराजांचे वचनांतून सतत ऐकत असतो. श्री. सद्गुरु कृपेतून त्या बऱ्या-वाईट भोगांना सामोरे जायचे सामर्थ्य मात्र मिळते. महाराज म्हणतात, "भोग हे देहाचे, संभ्रमांत गेलेल्या जीवात्म्यांचे असतात. साधनेतून विवेक जागृती होते तेव्हा कळून चुकते आत्मा सदैव सच्चिदानंदातच असतो." प.पू. श्रीमहाराजांसारखे पूर्णत्वांत असलेले महात्मे हे स्थितप्रज्ञतेने या सुख-

दु:खांकडे प्रभूची लीला म्हणून पहात असतात, सदैव चिदानंदात असतात.

आपण साधकावस्थेतील जीव. आपल्याला हे चटके व्यावहारिक जीवनात जाणवतातच. पण श्री सद्‌गुरु आपले सतत पाठीराखे असतात हेच प्रत्ययास येते.

१९८५ सालापासून बिल्डर लॉबी मोठ्या गतीने मार्केटमध्ये शिरली. गाठीला पैसा असलेला कोणीही बिल्डर बनू लागला. जमीन, प्लॉट खरेदी करायची, आर्किटेक्ट इंजिनिअर्स कडून प्लॅन बनवून घ्यायचे. लेबर कॉन्ट्रॅक्टरवर काम सोपवायचे, फार तर एखादा क्वालिफाईड इंजिनिअर सुपरव्हिजनला ठेवायचा. आमच्यासारख्या छोट्या कॉन्ट्रॅक्टरना माल मटेरियलसह काम दिले तरी अगदी खालच्या दरात. मग इमारतीच्या मजबूतीकडे कोण पहातो. आम्हांस आता कामे मिळालीच तर एखाद्या बंगल्याची किंवा परस्पर मालकांकडून कारखान्यांच्या इमारतींची. ''श्रीं''चे भक्तांकडे एवढे लक्ष असते की, माझी ही स्थिती त्यांच्या लक्षात आली. पुण्याचे प्रख्यात बिल्डर डी.एस्. कुलकर्णी प.पू. महाराजांचे दर्शनास आमचे गुरुबंधू श्री. विवेक आपटे यांच्या सोबत येत असत. प.पू. महाराजांनी श्री. विवेक आपट्यांना आम्हांस डी.एस्.के. कडे नेण्यास त्यांना निरोप देऊन पाठविले. आम्ही गेलो. त्यांना भेटलो. परंतु त्यांनी दिलेलं लेबर कॉन्ट्रॅक्टींगचं प्रपोजल आम्हाला पेलवण्यातले नव्हते.

असेच काही दिवस गेले. छोटी मोठी इमारत दुरुस्तीची कामे, आतील प्लास्टर, बाहेरील प्लास्टर, टेरेस वॉटर प्रुफींग आणि इतर टायलींग, कुकींग प्लॅटफॉर्म, लाकडी खिडक्या दरवाजे, जे मिळेल ते काम करू लागलो. प.पू. श्रीमहाराज माटुंग्यास श्री. माधवराव तांबोळींकडे आले होते. दुपारी आम्ही उभयता दर्शनास जाणार होतो. रविवार होता. काम बंद होते. सकाळी आमच्या उभयतांत पती पत्नीत विषय झाला की, ''मोठी कामे पायापासून संपूर्ण इमारतीची मिळत नाहीत तर आता आपण अशीच छोटी मोठी कामे घेऊन प्रपंचाचा गाडा हाकूया.''

दुपारी आम्ही ''श्रीं''च्या दर्शनास माटुंग्यास गेलो. आम्ही उभयतांनी साष्टांग नमस्कार घालून उठतो ना तोच ''श्रीं'' म्हणाले, ''काय ठीक आहे ना? आता यापुढे तुम्ही छोटी छोटी कामे मिळतील ती सुद्धा घेत जा. अहो, अशा छोट्या छोट्या कामातूनही बराच फायदा मिळतो असे म्हणतात.''

''श्रीं''च्या मार्गदर्शनानंतर कोणताही कमीपणा न मानता छोटी छोटी कामे, प्राप्त स्थितीला अनुसरून व ''श्रीं''ची आज्ञा शिरसावंद्य मानून करू लागलो. पण पुढे पुढे असे होऊ लागले की, आमच्या सारखे छोटे ठेकेदार रिकामे पडू लागून सर्व ह्याच मार्गाला छोटी छोटी कामे करायला धावले. चढाओढ वाढली. सिमेंटचा वापर कमी करून कमी प्रतीचे इतर माल मटेरीयल वापरून कमी दर भरून लोक कामे मिळवू लागले. आम्ही चांगले काम

करतो, प्रामाणिकपणे करतो असे कोणताही ठेकेदार म्हणणारच. अशा स्थितीत ओळखीतून आणि ओळखीच्या आर्किटेक्टस् कडून मिळतील तेवढ्याच कामावर समाधान मानावे लागे.

१९८) पुण्यात तीन लाखांत बंगला!

पुण्यामध्ये बिबवेवाडी मध्ये माझी एक पुतणी राहते. मी तिच्याकडे गेलो असता तिचे यजमान म्हणाले, ''काका, आमच्या घरासमोरील हा प्लॉट वरील बंगल्यासह फक्त तीन लाखांत विकणे आहे. मालक माझ्या ओळखीचे आहेत. बंगला बांधूनही ३-४ वर्षेच झाली आहेत. नुसता रिकामा प्लॉट तीन लाखात म्हटला तरी स्वस्तच आहे. मालक काहीतरी अडचणीत आल्याने विकत आहे. घेण्याचा विचार असेल तर मी तुमचा व्यवहार जुळवून देतो.''

हे त्याचे शब्द ऐकून मी खूष झालो कारण मला माझ्या गोरेगांव पूर्व येथील जयप्रकाश नगर या चांगल्या वस्तीतील ब्लॉकला कमीत कमी पंधरा लाख त्यावेळी सहज मिळण्यातले होते. मी म्हटलं, ''ठीक आहे, मी पुढील आठवड्यात अनामत म्हणून दहा हजार रुपये घेऊन येतो. तत्पूर्वी तुम्ही बोलणी करून ठेवा आमच्या वतीने. दसऱ्याला अनामत देण्यापूर्वी सविस्तर चर्चा करूच.''

मी मुंबईस घरी गेल्यावर हे प्रपोजल सर्वांना सांगितले. आप्तजनांत आणि स्नेही वर्गात लागलीच पसंती मिळाली. शिक्षणालाही पुणे चांगले, संस्कृतीलाही चांगले. बंगला आहे तोही, चांगल्या वस्तीत. ''श्रीं''चे वास्तव्य श्री रेणुका निवासात पुणे, येथेच. श्री वासुदेव निवास, श्री वामन निवास सर्व काही पुण्यातच. हवामान चांगले. झाले ठरले. रुपये दहा हजार रोकड बरोबर न्यायची, आमचे थोरले मेहुणेही सोबतीला व प्लॉट पहायला आले. हे सर्व ठीक झाले. परंतु आम्ही आपल्या सद्गुरुंची आज्ञा-आशीर्वाद घेतल्याशिवाय थोडेच पुढे जाणार? प्रथम पुण्यात उतरताच ''श्रीं''ना साष्टांग दंडवत घालून नवा प्रस्ताव समोर ठेवला.

''महाराज बिबवेवाडीत आपल्या श्री रेणुका निवासाच्या प्लॉट एवढाच साधारण ३६०० चौ. फूटाचा प्लॉटवरील नवीन बांधलेल्या बंगल्यासह अवघ्या तीन लाखात मिळत आहे. आमचा गोरेगांव जयप्रकाश नगर येथील चार रुमचा ब्लॉक विकला तर त्यातून कमीत कमी पंधरा लाख मिळतील. हा बंगला घेऊन १२ लाखापेक्षा जास्त रक्कम आम्हांस फिक्स ठेवता येईल. त्याच्या येणाऱ्या व्याजातून घरखर्च सांभाळून दोघांचे पूर्ण होत आलेले व धाकट्याचे शिक्षण व्यवस्थित पार पडेल. आमची धनार्जनाकरिता होणारी धावपळ थांबली तर एक मार्गी आम्हांस ध्यान धारणा बैठक आणि भक्तीमार्गास वाहून घेता येईल. तरी मी आपणापुढे

आपली अनुमती मागण्यास आलो आहे. सकृत दर्शनी जरी आम्हांस सर्व इष्ट आणि योग्य वाटत असले तरी सर्वज्ञानी सर्वसाक्षी त्रिकालज्ञ आपण आहात. आम्ही आपल्या शब्दाबाहेर कधीच जात नाही, जाणारही नाही. तरी आपली आज्ञा होईल तसे करू.'' आमची ही विनवणी प.पू. महाराजांनी स्पष्टपणे धुडकावून लावली.

प.पू. महाराज म्हणाले, ''नाही, नाही! गोरेगांव, मुंबईची जागा विकायची नाही. मुंबई सोडायची नाही. अहो! ह्या तुमच्या संदीपसह तिघा मुलांची शिक्षणे आणि पुढील उत्कर्ष हा या जागेत आणि मुंबईतच होणार आहे. धनार्जनाचे तुमचे कामकाज जोवर देह साथ देत असेल तोपर्यंत चालूच राहणार आहे. प्रपंचाबरोबर श्रीसेवाही होतेच आहे. ईशसेवेकरिता कामकाज धंदा व्यवसाय थांबविण्याची आवश्यकता नाही. रोजचे कामकाज ही सुद्धा ईश्वरसेवाच आहे.''

तिन्ही मुले उत्तम प्रकारे मार्गास लागल्यानंतर एका सद्गृहस्थांशी बोलताना प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! हे नागले काही वर्षांपूर्वी त्यांचा गोरेगांव मुंबई येथील ब्लॉक विकून मुंबई सोडून पुण्यास स्थायिक व्हायला निघाले होते. आता बघा, या त्यांच्या तिन्ही मुलांचा उत्कर्ष त्याच जागेत आणि मुंबईतच व्हायचा होता ना?''

असे माझ्या सद्गुरुंनी पाठीशी उभे राहून मला वेळोवेळी सांभाळले आहे. पुढील सांगायचे राहिले ते असे की, मी माझ्या पुतणीकडे बंगला खरेदी करण्याचे रहित झाल्याचे सांगायला गेलो तर त्या आधीच तिने सांगायला सुरुवात केली की, त्या मालकाने बंगल्यासह प्लॉट विकण्याचे रहित केले आहे.

१९९) 'श्री रेणुका निवास' वाढीव बांधकाम प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प

आपल्या वास्तुचे बांधकामास भक्त मंडळींचे अर्थसहाय्य ही कल्पनाच प.पू. श्रीमहाराजांना असह्य होत होती. दक्षिणा कोण्या भक्ताने पुढे केली आणि ती जर मोठ्या रकमेची असेल तर प.पू. श्रीमहाराज स्वीकारत नसत. मोठ्या रकमा श्री वासुदेव निवास आश्रमाच्या ऑफिसमध्ये भरून पावती घ्या म्हणत. शे-दोनशेची दक्षिणा पाहिली तरी ''अहो, दक्षिणा दक्षिणेच्या स्वरूपात द्यावी. तुम्ही प्रापंचिक आहात.'' वगैरे वगैरे ऐकावे लागे. त्यांच्या दृष्टीने दक्षिणेचे स्वरुप म्हणजे रु. ५/-, रु. ११/- किंवा रु. २१/- असे असावे. मग आपल्या वास्तू बांधकामास हजारांच्या रकमेत भक्तांकडून कशी बरं रक्कम स्वीकारणार? त्यांची ही भूमिका लक्षात घेऊन प.पू. सौ. ताईमहाराजांनी त्यांना खूप समजावले व त्या

म्हणाल्या की आज रकमा स्वीकारल्या तर मनापासून भक्तीभावाने सेवा म्हणून हातभार लावल्याचा आनंद आणि समाधान सर्वांना लाभेल. पुढे मागे ह्या रकमा ज्याच्या त्यांना परतही करता येतील. नागले या जमा रकमेचा तपशील ठेवतील. शिवाय रकमा कोणी देण्यास आले तर श्री. नागले यांनी त्या भक्तास आमच्याकडे पाठवावे. त्यांनी दिलेली रक्कम स्वीकारावी का स्वीकारू नये हे आम्ही ठरवू. वित्तशुद्धी, चित्तशुद्धी ह्याचा विचार करून प.पू. सौ. ताईमहाराज रक्कम स्वीकारणार असणार. शेवटी प.पू. सौ. ताईमहाराजांनी विनयपूर्वक प्रार्थना करून ''श्रीं''ची अनुमती मिळवली.

दि. २४.१०.१९८३ रोजी आम्ही, मी, गोडसे, शृंगारपुरे जालन्यास गेलो असता प.पू. सौ. ताईमहाराजांनी संकल्प सोडला आणि आम्हांस श्री रेणुका निवासाच्या मागील बाजूस प.पू. महाराजांना सेल्फ कन्टेण्ड खोली व खोलीस लागून हॉल, त्यात देवघर असा प्लॅन, आर्किटेक्ट श्री. गद्रे यांच्यामार्फत, म्युनिसिपल कार्पोरेशनमध्ये मंजुरीस पाठविण्याची आज्ञा केली. प.पू. महाराजांचे म्हणणे होते की, 'श्री वामन निवासचे' पहिल्या स्टेजचे हाती घेतलेले बांधकाम पूर्ण झाल्याशिवाय या श्री रेणुका निवासच्या वाढीव बांधकामास प्रारंभ करू नये. श्री वामन निवासाचे पहिल्या टप्याचे म्हणजे तळमजला पोटमाळ्यासह पूर्ण, असे आता फिनीशींग स्टेजला आले होते.

दि. २.१०.१९८५ सकाळीच श्री. गद्रे आर्किटेक्ट यांना भेटून श्री रेणुका निवासाच्या वाढीव बांधकामाचे प्लॅन्स मंजुरीबद्दल चौकशी करून आलो. कामास प्रारंभ करण्यास हरकत नसल्याचा ग्रीन सिग्नल मिळाला. दुपारी प.पू. सौ. ताईमहाराजांबरोबर मी, म्हसवडकर, मुजुमदार चर्चेस बसून कामाच्या मुहूर्तास, प्रथम भूमीपूजन करण्यास दसरा ठरला. यादिवशी फक्त भूमीपूजन करावे. 'श्री वामन निवास' पूर्ण होताच या कामाच्या लाईन आऊट व खोदाईस म्हणजे रीतसर कामासच प्रारंभ करावा असे ठरले.

दि. २२.१०.१९८५ रोजी मंगळवार विजयादशमीच्या दिवशी प.पू. महाराजांचे आशीर्वाद घेऊन 'श्री रेणुका निवास' वाढीव बांधकामानिमित्त सकाळी भूमीपूजन यथाविधी झाले.

दि. १७.१२.१९८५ रोजी मंगळवार मार्गशीर्ष शु. चंपाषष्ठीस श्री रेणुका निवासाच्या मागील बांधकामास लाईन आऊट करून खोदाईची सुरुवात झाली.

१९९) पायांत भरणी

प.पू. सौ. ताईमहाराजांनी इच्छा प्रगट केली की, प.पू. महाराजांच्या ह्या वास्तू बांधकामाला सौ. ताईमहाराजांचा आणि उपस्थित भक्त मंडळींचाही सेवेचा सक्रीय हात

लागावा. फुटींगचे काँक्रिटींगचे काम पूर्ण झाले होते. आता झालेल्या फुटींगचे खड्डे मातीने भरायचे काम सुरू करायचे होते. सौ. ताई म्हणाल्या, ''ठीक आहे, उद्या आपण सर्वांनी मिळून भरणी करूया.''

दि. ७.१.१९८६, मंगळवारी मजूर मंडळी कंबर कसून तयार झाली. श्री. शृंगारपुरे, म्हसवडकर पहार टिकावाने मातीचे ढिगारे मोकळे करणार, मुजुमदार, गोडसे फावड्याने घमेली भरणार, नागले, तांबोळी घमेली उचलून सौ. ताईंकडे. सौ. ताईंचे हातून सौ. सुमनताई, सौ. सुलभाताई असे करीत भक्तांचे हातून ते खड्ड्यापर्यंत पोहोचवून ओतले जाणार. मुखाने धून 'दिगंबरा, दिंगबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' चालूच होती. भावभक्तीने सर्वांची मने प्रफुल्लीत उत्साही झाली होती. श्रम असे यत्किंचित जाणावत नव्हते. मध्ये थोडी चहापान, विश्रांती घेऊन एका प्रहरात, भरणीचे त्यावर पाणी मारून माती खाचणे, ठोकणे ही सर्व कामे यथोचित पार पडली. खूप खूप मजा आली. श्री भगवतींचे सोबत श्री सद्गुरूंचे काम करायला मिळाले.

१९९) ''श्रीं''ची उदासीनता

आपल्या देखरेखीखाली श्री सद्गुरुंचे घर बांधले जात आहे हा मनस्वी होणारा आनंद आत्मसुख देऊन जात असे. पण श्री सद्गुरुंच्या दर्शनास कामे आटोपल्यावर जावे तर हास्यमुद्रेने आमच्या भेटीचा आनंद व्यक्त होत नाही हे वेळोवेळी जाणवे. श्री गुरुमुद्रेवर गांभीर्य पसरलेले असे.

प.पू. सौ. ताईमहाराजांच्या संकल्पाचा आदर सांभाळून प.पू. श्रीमहाराजांनी श्री रेणुका निवासाच्या वाढीव बांधकामास अनुमती दिली तरी क्षणोक्षणी जाणवत होती ती प.पू. श्रीमहाराजांचे चेहऱ्यावरील उदासीनता. एकीकडे प्रिय भक्तांचे प्रेम, त्यांची सदिच्छा आणि भावपूर्ण आग्रह, त्यांत भगवतीस्वरुप असलेल्या आदरणीय प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प. हे सर्व म्हणजे प.पू. महाराजांच्या अपरिग्रही भूमिकेवर, त्यांनी जपलेल्या नीतीमूल्यांवर घालाच होता. इकडे तर आपल्या देवांकरिता आणि आपल्याकरिता स्वतंत्र खोलीची गरज ही तर नाकारता येत नव्हती आणि भक्तांना एकाच वास्तूत देव आणि सद्गुरु ह्या अद्वैताचे दर्शन, शिवाय 'श्री चरणांचा' सहवास हा अनन्य योग परमोच्च पदास नेणारा होता. ''श्रीं''चे म्हणणे होते, 'गाठीला चार पैसे जमले म्हणजे करू सगळे.'

श्री वामन निवासाच्या बांधकामाची प्रगती आमच्याकडून ऐकण्यास ''श्रीं''ना जशी अधीरता, उत्सुकता आणि आनंद असायचा, तसा 'श्री रेणुका निवास' बांधकामाच्या वेळी

नसायचा. उलट त्यांची होणारी घुसमट, नाराजी चेहऱ्यावर व बोलण्यांतून देखील जाणवायची. आपल्या श्री सद्गुरुंना आनंद देण्याची भूमिका सद्शिष्याची, सद्भक्तीची असावी, मग आपण जे काही हे बांधकामाचे काम करीत आहोत ही खरंच चांगली गोष्ट आहे का नाही? असा वेळोवेळी ''श्रीं''कडे पाहून मला संभ्रम व्हायचा. मी जवळ असल्याने मला हे तीव्रतेने जाणवायचे. प.पू. श्रीमहाराजांनी स्वत:हून होईल तेवढे अर्थसहाय्य केले, काम चालू असताना करीतच होते. प.पू. सौ. ताईमहाराजांचेही आर्थिक सहाय्यास हात पुढे होते. परंतु 'श्री' मनोमन खूष नव्हते. ''तुम्ही सर्व भक्तमंडळी प्रापंचिक आहात. प्रत्येकास प्रपंच त्यातील अनेक अडचणी ह्यांना तोंड द्यायचे आहे. अशा स्थितीत आमचे वास्तूकरिता आपणा सर्वांचा चाललेला खर्च हे पाहून आम्हांस बरे वाटत नाही.'' ही ''श्रीं'' वाक्ये एका भेटीत ऐकल्यानंतर भक्तांच्या भूमिकेतून मी माझे बोबडे बोल गुरुमाऊली पुढे मन मोकळे करून मांडले. ते पत्र जसेच्या तसे खाली देत आहे.

श्री गणेशदत्त गुरुभ्यो नम:

मुंबई, दि. ३१.१.१९८६

श्री सद्गुरु प.पू. ब्रह्मर्षी दत्तमहाराजांचे पवित्र चरणी बालक शशीकांत नागले याचा शिरसाष्टांग नमस्कार करून, हे सादर निवेदन 'श्री' चरणी ठेवीत आहोत.

श्री रेणुका निवासाच्या वाढीव कामास प्रारंभ झाला आहे आणि आपले मनास अस्वस्थता आल्याचे आम्हा सर्वांस जाणवत आहे. आपली मानसिक अस्वस्थता ''आम्हांस ऋणांत टाकू नका. आम्हांस ऋण घेणे बिलकूल आवडत नाही'' अशा शब्दोच्चाराने व्यक्त होत आहे. आपली अत्यंत संकोचाने होणारी तगमग आम्हांसही असह्य होत आहे. याकरिताच आपल्या लेकरांचे हे बोबडे बोल सादर करीत आहोत. अंकावरल्या अज्ञ शिशूचे 'प्रेम स्वैरालाप' माता श्रवण करते आणि बालहट्टास उचित सर्व कौतुक पुरविते. आम्ही आपली अज्ञ बालके आहोत. आमचे माता-पिता, बंधू, सखा सर्वकाही आपणच आहात. या भूतलावर आम्हांस सर्वथैव आपणच आहात. परमेश्वर आम्हांस ठाऊक नाही. आमचे देवाधिदेव आपणच आहात. जन्मदात्या मातापित्यांकडून सुद्धा मिळत नाही, अशी अनुग्रहाची गुरुकृपा आम्हांस आपल्याकडून प्राप्त झाली आहे आणि आम्ही कृतार्थ झालो आहोत. भावभक्ती ही सर्व आपल्या कृपेचीच फळे आहेत, मिळत आहेत आणि मिळत राहणार आहेत. अंतिम अपरोक्ष ज्ञानापर्यंत चित् शक्ती आपल्याच झालेल्या कृपेतून आम्हांस नेऊन सोडणार आहे. आपल्या ऋणांतून मुक्त होणे कधीतरी शक्य होणार आहे का? जन्मोजन्मी अशक्यप्राय आहे. आम्ही सर्व प्रापंचिक आहोत, ही गोष्ट जरी खरी असली तरी नुसते प्रापंचिकच रहायचे का भक्त किंवा शिष्य किंवा पुत्र म्हणून जी काही इतिकर्तव्यता, यथाशक्ती म्हणू, ती केव्हा पार पाडायची

हा प्रश्न आहे. आज आपणाकरिता, आपल्या देवांकरिता स्वतंत्र खोली असावी ही आत्यंतिक गरजेची बाब समोर दिसत असताना आम्ही सर्वांनी मात्र सर्व सुखसोयीत आपापल्या घरात रहावे, हे आम्हांसही बरे वाटेल कां? आम्ही आपली लेकरेच आहोत ना? दोन खोल्यांची वास्तू सर्वांनी मिळून बांधावी यात आम्ही काय मोठेसे कर्तव्य करतो आहोत? यांत प्रपंचाची कुठल्याही प्रकारे कुचंबणा किंवा आर्थिक ओढाताण करून हे कार्य होत नाही. प.पू. योगीराज श्रीगुरुमहाराजांचा पौष शु. १ शके १९०१ च्या पंथराज मधील पृष्ठ क्रमांक १० ते १६ हा लेख वाचल्यानंतर आमचे आम्हांस लाजीरवाणे होते की, आम्ही आमच्या सद्गुरुप्रीत्यर्थ काय केले आहे आणि करीत आहोत. साधक या भूमिकेतून आपला प्रवास झाला आहे आणि आपल्या प्रवचनांतून क्षणोक्षणी गुरुभाव प्रकट झाला आहे, मग आम्ही हा निवेदनाचा खटाटोप कशास करावा? आपण सर्वज्ञ सर्वसाक्षी आहात. शिष्याने गुरुंकरिता काय काय करावे आणि काय करू नये, सर्व शास्त्राधार आपणच आहात. साक्षात् शास्त्र आहात. आमची अपात्रता कदाचित आम्हांस कळत नसेल, पण आपण आमची माऊली आहात. आम्ही सेवेस पात्र असू किंवा नसू. आपण दयाघन कारुण्यसिंधू आहात. जी काही अल्पस्वल्प सेवा करण्याच्या इराद्याने आम्ही जवळ आलो आहोत ती स्वीकारावी. आम्हांस दूर लोटू नये. ''श्रीं''नी निर्माण केलेलीच पुष्पे ''श्रीं''चरणी अर्पण करण्यामध्ये आम्ही ''श्रीं''च्यावर कोणते ऋण करीत आहोत?

काय करणे ते कर्माचे आणि कोण काय करी।
बाहुल्या कळसूत्री आम्ही, आपले करी दोरी।।

आपल्या चरणी सविनय हीच प्रार्थना की, आम्हा बालकांची ही अल्प सेवा आपल्या चरणी रुजू करून घ्यावी, स्वीकारावी, अव्हेर होऊ नये आणि आम्हा सर्वांवर अधिक उपकार व्हावेत. आम्ही सर्व आपल्या चरणी मनोभावे प्रार्थना करीत आहोत.

आपले कृपाभिलाषी सदैव चरणी लीन
शशीकांत नागले आणि भक्त मंडळी

---*---

आमच्या वरील पत्रास ''श्रीं''चे आलेले उत्तर (पत्रोत्तर)

।। श्रीदत्त ।।

श्रीगुरुमंदिर, कारंजा.
दिनांक ५.२.१९८६

श्रीमान् माननीय नागले, गोडसे, शृंगारपुरे, तावडे, घोलकर, डांगे, म्हसवडकर, भाऊसाहेब प्रभृति सर्व आत्मिय सज्जनांना सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम.

श्री. रा. माधवरावजी तांबोळी यांच्याकडून आपले पत्र मिळाले. त्यावरून आपली सर्वांची आमच्या बद्दलची प्रेमादर वृत्ती तसेच दैवी संपत्तीही कळून आल्याने समाधान वाटले. ''वैराग्यं क्षान्तिरौदार्यं इत्याद्याः सत्वसंभवाः'' वैराग्य, क्षमा, उदारता इत्यादी गुण सत्वगुणाचे द्योतक आहेत. आपली उत्कट इच्छा आणि सौ. ताईमहाराजांची प्रेरणा व सदिच्छा यामुळे हे कार्य आपणाकडून सुरू झाले आहे, ते ईशकृपेनेच पूर्ण होणारे आहे. यामुळे आपणा सर्वांचा ऋणानुबंध ईश्वराकडूनच दृढ झाला असे म्हणावे लागेल व तो मान्य करावा लागेल. आता श्री रेणुका निवासातच आपणा सर्वांचे कल्याणाकरिता प्रार्थना करीत आम्हाला रहावे लागेल. इतरत्र जाऊन राहणेची उत्कट इच्छा असली तरी ती आता स्थगित करावी लागेल. ईशेच्छेने 'श्री वासुदेव निवासात' बारा वर्षे सेवा घडली तशी 'श्री रेणुका निवासात' किती वर्षे ठरविली कोण जाणे.

आपल्या तळमळीतून लिहीण्याप्रमाणे व्यावहारिक ऋणसंबंध जरी मनांतून सोडावा लागला तरी ईश्वराने निर्माण केलेला हा आपणा सर्वांचा प्रेमाचा ऋणानुबंध मात्र अनेक जन्मही कोणालाच नाकारता येणार नाही. असो ईश्वराची इच्छा आम्हांस मान्य आहे. ईश्वराचे पूर्व संकल्पित कार्य मात्र होण्यास बराच अवधी, कदाचित जन्मांतरही लागेल. असो. श्री रामरायांनी हनुमंताना शेवटी सांगितले की, ''हे मारुतीराया, तू माझ्यावर केलेले उपकार, सीता शोध, लक्ष्मणाला जीवदान इत्यादी हे माझ्या ठिकाणी जिरून जाऊ देत, तुझ्यावर प्रति उपकार करण्याची वेळ माझ्यावर कधीही येऊ नये, कारण उपकारकर्त्यावर परत पुन्हा उपकार करता यावा अशी इच्छा करणे म्हणजे त्याला विपत्ती यावी अशी इच्छा करण्याप्रमाणे होईल. म्हणून अशी इच्छा मला कधीही होऊ नये. तू नेहमी संकटरहित सुखांत रहावास एवढीच इच्छा आहे'' असे श्री रामरायांनी श्री मारुतीरायांना शेवटी सांगितले आहे. याचे स्मरण श्री रामप्रभुंनी आम्हांला नित्य ठेवावे एवढीच इच्छा आहे. सौ. ताईमहाराजांना सादर प्रणाम. सर्वांना सादर धन्यवाद. आम्ही येथून १२ तारखेला अकोल्यास जाऊन तेथून २५ ला पुण्यतिथी आहे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आपला प्रेमाश्रित
दत्तात्रेय कवीश्वर

१९९) उर्वरित आयुष्य अमरापुरी वेचावे अशी ''श्रीं''ची इच्छा!

श्री रेणुका निवासाच्या जुन्या बांधकामावरील गच्चीवर वॉटर प्रुफींगचे काम आम्ही, चार गुरुबंधुंनी, एकत्र येऊन सेवाभावे केले होते. परंतु ते ''श्रीं''च्या तत्त्वांत बसत नव्हते. त्या झालेल्या कामाची किंमत ''श्रीं''ना आम्हाला चुकती करायची होती. ते माझ्याकडे वारंवार, 'ते पैसे घ्या व ज्याचे त्यास देऊन टाका,' म्हणत होते. शेवटी ते स्वीकारण्यास आमची उदासीनता लक्षात घेऊन त्यांनी एक कल्पना सुचविली व ''श्रीं'' म्हणाले, ''तुमचे एक मंडळ स्थापन करा. त्यांत हे पैसे कोणत्या तरी बँकेत कायमस्वरुपी ठेव म्हणून ठेवा. येईल त्या व्याजांतून आमच्या देवांचे समोर नंदादीप सतत तेवत राहिल असे पहा!'' यानंतर त्यांनी महिन्याला नंदादीपाला तीन ते साडेतीन किलो गोडेतेल लागते, वगैरे हिशोब मांडले. मागील लिखाणांत आम्ही हे ''श्रीं''ची वाक्ये शब्दश: वर्णन करून सविस्तर लिहीले आहेच. याच संकल्पनेतून पुढे ''श्री गणेशदत्त रेणुकादेवी न्यास'' साकार झाला. ट्रस्ट स्थापन होण्यापूर्वी आणि झाल्यावरही त्यांचे तोंडून नेहमी उद्‌गार निघत की, आम्हांस सर्व प्रापंचिक व्यवहारांची पूर्तता करून 'श्री अमरापुरी दत्त अमरेश्वर मंदिरात' श्रीदत्तप्रभुंच्या सेवेस जाऊन रहायचे आहे. सर्व गोष्टींची निरवानिरव लवकर व्हावी असे बोलण्यात येत असे. 'श्री रेणुकानिवास' सुद्धा या ट्रस्टमध्येच घ्यावे असे त्यांचे म्हणणे होते. जेणेकरून पुढील पिढीत मालकी हक्काचे वाद उत्पन्न होऊ नयेत. सर्व निरवा निरव, होऊन मार्गी लागले की, क्षेत्रसंन्यास घेऊन 'अमरापुरी श्रीदत्त अमरेश्वर आणि वासुदेव पीठांत' देवांचे सान्निध्यात परमार्थाची वाटचाल करीत उर्वरित आयुष्य वेचावे, असा मनीचा संकल्प अनेक वेळा त्यांनी आमच्याकडे बोलून दाखविला होता. वाडीत ''श्रीं''च्या समवेत आम्ही चौघे गुरुबंधू, मी, गोडसे, शृंगारपुरे आणि मुजुमदार असताना तेथे (बाळू ऊर्फ मुकुंद पुजारी यांच्या घरी) त्यांच्या चुलत भावाचा मुलगा म्हणजे पुतण्या श्री. गिरीश कवीश्वर आला होता. त्याला ''श्री'' म्हणाले, ''तुम्ही भाग्यवान आहात. तुम्हांला वाडीत श्रीदत्तप्रभुंच्या सान्निध्यात रहायला मिळते. आम्हीही ठरविले आहे, तुमच्या शेजारी म्हणजे 'अमरापुरी श्री दत्त अमरेश्वर मंदिरात' रहायचे. मग काय, तुम्ही आम्हाला दोन वेळची मुगाची खिचडी करून खायला घालाल ना?'' चेष्टेतून सुद्धा त्यांचा हा मानस बोलण्यातून प्रकट होत होता. या त्यांच्या अखेरच्या दिवसाचे वास्तव्य 'अमरापुरी श्रीदत्त अमरेश्वर' मंदिरात करण्याच्या संकल्पाचे मूळ त्यांना त्यांच्या मोक्षगुरु प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांनी लिहीलेल्या पत्रात सापडते. त्या पत्राचा सारांश रूपाने त्यांनी श्री नारायणानंद स्वामींना लिहीलेल्या पत्रांत उल्लेख केला आहे तो अवलोकनास पुढे देतच आहे.

दि. ५.२.१९८६ चे आम्हा गुरुबंधुंच्या नावे लिहीलेल्या ह्या पत्रात त्यांनी जे म्हटले आहे. ''आपणा सर्वांचा ऋणानुबंध ईश्वराकडून दृढ झाला असे म्हणावे लागेल व तो मान्य करावा

लागेल. आता श्री रेणुका निवासातच आपणा सर्वांच्या कल्याणाकरिता प्रार्थना करीत आम्हाला रहावे लागेल. **इतरत्र जाऊन राहण्याची उत्कट इच्छा असली तरी ती आता स्थगित करावी लागेल.** ईश्वरेच्छेने श्री वासुदेव निवासात बारा वर्षे सेवा घडली तशी श्री रेणुका निवासांत किती वर्षे ठरविली कोण जाणे.'' पुढे म्हटले आहे. ''ईश्वराची इच्छा आम्हाला मान्य आहे. **ईश्वरानेच पूर्व संकल्पीत कार्य मात्र होण्यास बराच अवधी, कदाचित जन्मातरही लागेल.''**

प.पू. महाराजांना त्यांचे मोक्षगुरु श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांनी जे जीविताच्या मार्गदर्शनाचे किंबहुना आज्ञा म्हणून जे पत्र लिहीले आहे ते प.पू. श्रीमहाराज अव्याहत नित्यनियमाने आन्हिकापूर्वी श्रद्धापूर्ण अंत:करणाने भावभक्तीने वाचीत असत. शनिवार पेठेतील वर्तक वाड्यातून श्री रेणुका निवासात बिऱ्हाड हलविताना सामान नेत असताना प.पू. महाराजांचे पोथीचे बाडांतून ते पत्र कुठेतरी गहाळ झाले. दुसऱ्या दिवशी आन्हिक चालू करण्यास गेले तर सर्व बाडाच्या वरतीच ठेवले जाणारे ते स्वामीमहाराजांचे-श्रीगुरुदेवांचे ते पत्र तिथे नव्हते. प.पू. श्रीमहाराज अत्यंत अस्वस्थ आणि हवालदिल झाले. त्यांचे मन कशातही रमेना. भोजन गोड लागेना. त्या पत्रात खरोखरच त्यांचे पंचप्राण अडकले होते. घरातील सर्वांनी नेत्रात प्राण आणून त्या पत्राचा शोध केला. अखेर श्रीगुरु कृपेने ते सापडले. अन्यथा प.पू. श्रीमहाराजांनी अन्नच काय पण पाणी सुद्धा मुखात घेतले नसते.

''श्रीं''नी अखेरचे दिवस श्री अमरापूर क्षेत्री घालवायचे बोलून दाखविल्यानंतर काही गुरुबंधूंनी आपण ''श्रीं''च्या बरोबर त्यांच्या सेवेस राहूया असा विचार केला होता. परंतु आमच्यापैकी श्री. सदाशिव वि. मुजुमदार ऊर्फ भाऊकाका मुजुमदार यांनी मात्र दृढ निश्चय केला होता की, ''श्री'' ज्यादिवशी अमरापुरी जातील त्याच दिवसापासून ते आपली सर्व श्री शिल्लक फिक्सला टाकून त्या रकमेच्या व्याजातून श्री अमरापुरी श्रीसद्गुरुंच्या सेवेत राहणार होते. (त्यांना मात्र गुरुकृपेने गोकर्ण महाबळेश्वरी महाशिवरात्रीच्या दिवशी, शिवसान्निध्य, कैलासांतच लाभले.)

प.पू. महाराजांनी प.प. यति नारायणानंद सरस्वती महाराजांना कार्तिक शु. १२ शके १९११ रोजी लिहीलेल्या पत्रात प.पू. दत्तमहाराज लिहीतात.

''श्रीमोक्ष गुरुंनी बालवयात धारवाडला शिकत असताना वाराणसीहून पत्ररुपाने संकल्पादेश दिला, त्याचा आशय, विद्याभ्यास चांगला करून प्रस्थानत्रयीचा अभ्यास चांगला करावा. पुढे त्याचे पुराण श्रवण आम्हाला 'अमरापुरी अमरेश्वर दत्त गुरु सन्निध्य करवावे', पुढे प्रपंच करून परमार्थ लाभही संपादन करावा. हे सर्वही उपास्य देवता, श्री गणपती, श्रीदत्त, श्री गुरुमहाराजांचे कृपेनेच व्हायचे आहे - नारायण. असा आशय त्या पत्राचा आहे. हे पत्र पाहून चित्तातील तळमळ शांत होऊन वैयक्तिक ध्येय व तत्पूर्वीबद्दलचे

आश्वासन समजून आल्याने चित्त शांत झाले. पण अद्यापी प्रपंचासक्ती सुटत नसल्याने ही ध्येयपूर्ती या जन्मी का पुढील जन्मी हा संदेह निर्माण होऊन चित्तात व्याकुलीभाव पुन्हा निर्माण झाला.''

प.पू. महाराजांनी ह्या मोक्षगुरुंच्या संकल्पादेश दिलेल्या पत्राचा संदर्भ दिला, हेच पत्र प.पू. महाराज सातत्याने आन्हिकापूर्वी पठण करीत असत. हे पत्र प.प. श्री नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराजांनी काशीहून दि. २१.७.१९२७ रोजी पोष्टात टाकले व ते धारवाडचे पोस्टात दि. २७.७.१९२७ रोजी पोहोचले. ''श्रीं''चे हाती ते पत्र त्याचतारखेला दुपारी ३ वाजता मिळाले. ''श्री'' त्यावेळी धारवाडला शिकत होते. ''श्रीं''चे वय फक्त सतरा वर्षांचे होते. या पत्रारंभी, ''आषाढ वद्य षष्ठी, बुधवार, श्री गुरुदत्त भक्ती परायण वेदशास्त्र संपन्न रा.रा. दत्तात्रेयासी-नारायण. पत्र पाहून मनास आनंद होत आहे.''

अशी या पत्राची सुरुवात असून मध्ये एक वाक्य आहे, ''पुढे परमार्थ लाभ करून घेणे हे मनुष्य जन्माचे मुख्य कर्तव्य आहे असे म्हटले आहे.''

श्री रेणुका निवासाच्या वाढीव बांधकामावरील आर.सी.सी. स्लॅब दि. २२.१.१९८६ रोजी पूर्ण झाल्यानंतर स्लॅबचे बीमचे बॉटम खालील सपोर्टस् (मुंढे) ठराविक मुदतीत काढल्यानंतर, वीट कामास खऱ्या अर्थाने जोरात सुरुवात दि. २०.२.१९८६ पासून झाली. देवांचा चौरंग ज्या जागेवर येणार होता त्या जागेच्या खाली पायात आम्ही काँक्रिट टाकून कडाप्पा लादींची पेटी बनवून घेतली व त्यांत बऱ्याच गुरुबंधू आणि भगिनींनी स्वहस्ते लिहीलेल्या ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' या महामंत्राच्या वह्या ह्या पेटीत बंदीस्त केल्या. वर कडाप्पाचीच लादी बसवून त्यावर काँक्रीट टाकले.

प.पू. महाराजांचा ७६ वा वर्धापन दिन (माघ वद्य षष्ठी) दि. २.३.१९८६ रोजी आम्ही गुरुभक्तांनी, प्लास्टरींग न झालेल्या नव्या हॉलमध्ये, पहाटे ५.३० पासून सायंकाळपर्यंत ''श्रीं''चे वास्तव्य असलेल्या 'श्री रेणुका निवासात' साजरा केला.

मध्यंतरी म्हणजे स्लॅब पूर्ण झाल्यानंतर श्री. अनिल कवीश्वर यांच्या मनी आले की, तशी श्री रेणुका निवासाची तळमजल्याची जागा सर्व कौटुंबिक मंडळींच्या एकत्र निवासात अपुरीच पडते. मग अनायासे बांधकाम चालूच आहे तर ह्याचवेळी ह्याच जमलेल्या संचाचा फायदा घेऊन वरच्या मजल्याचेही काम हाती घेतले तर कामात काम होऊन जाईल. वाढत्या महागाईत आणि नंतर वरच्या मजल्याचे काम महागातच पडणार म्हणून आता केले तर आताचे माफक दरात होऊन जाईल. सौ. आईसाहेबांना आणि प.पू. सौ. ताईमहाराजांनाही ते पटले. पैशांची जमवाजमव होणारी असती तर मलाही पटले असते. स्लॅब झाल्याने काम होत आले असे वाटते पण खरा खर्च पुढेच असतो. त्यामुळे चालू असलेल्या कामाची काम

पूर्णत्वास जाईपर्यंत एस्टीमेटेड कॉस्ट (किंमत) किती होईल याची मला पूर्ण कल्पना होती.



१९९) वरच्या मजल्याचे काम सुरू करण्यास प.पू. सौ. ताईंची आज्ञा!

प.पू. सौ. ताईमहाराजांनी मला बोलावून घेतले व मला म्हणाल्या, ''उद्यापासून वरच्या मजल्याचे कॉलम बांधायला घ्या. आपल्याला वरच्या मजल्याचेही काम आताच करायचे आहे!''

माझ्यापुढे प्रश्नचिन्ह (?) प.पू.सौ. ताईमहाराजांची आज्ञा प्रमाण कां म्युनिसिपल नियमाप्रमाणे पुढील कामाची म्युनिसिपल ऑर्डर (कॉमेन्समेंट सर्टिफिकेट) प्रमाण? का प.पू. महाराजांची आज्ञा प्रमाण? काही झाले तरी आर्किटेक्टकडे वरील बांधकामाचे नकाशे म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये पाठवून मंजूर करून वर्क ऑर्डर घेतल्याखेरीज वरचे काम कसे चालू होणार? ह्या सर्वांतून मार्ग काढण्याकरीता प्लॅन पासींग वगैरे करीता धावपळ आणि पुढाकार घेणाऱ्या अजित यांचे कानावर ही संपूर्ण समस्या मांडली. अजितरावांनी पहिलाच प्रश्न टाकला, फंडस् कोठून आणणार? मला अजित म्हणाले, ''मी अनिलशी बोलतो तसेच प.पू. सौ. ताईमहाराज आणि पिताश्री पू. दादांशीही बोलतो.''

प.पू. सौ. ताईमहाराजांचे भगवती स्वरुपाची आम्हांस ओळख होती. पण म्हणून म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे कायदे कानून डावलून वरच्या कॉलम्सना आम्ही सुरुवात करणे व्यावहारिक नव्हते. श्री. गद्रे आर्किटेक्ट यांच्याही कार्यपद्धतीवर म्युनिसिपल कॉर्पोरेशनचा ठपका आला असता. आम्ही धर्मसंकटात सापडलो होतो.

दुसऱ्या दिवशी अजित यांनी घरात रुद्रावतार धारण केला होता. ते अनिल, आईसाहेब इतकेच नव्हे तर प.पू. सौ. ताईमहाराजांवर सुद्धा चिडले होते. मी आपला या वादातून पाय काढून हळूच ''श्रीं''च्या खोलीत जाऊन त्यांच्याशी कामांच्या आणि इतर गुजगोष्टी करीत होतो. बाहेर गरम वातावरण झाल्याची ''श्रीं''ना कल्पना आली. कदाचित चि. अजित यांचे ''श्रीं''शी या विषयावर बोलणेही झाले असावे. परंतु अजित प.पू. सौ. ताईमहाराजांनाही उच्च स्वरात बोलत आहेत हे प.पू. महाराजांना सहन झाले नाही. मला म्हणाले, ''अहो अजित काय एवढ्या मोठ्याने प.पू. सौ. ताईमहाराजांशी बोलत आहेत की काय? जा जा तुम्ही त्यांना लागलीच आम्ही आत बोलावले आहे म्हणून सांगा!''

मी पुढील हॉलमध्ये गेलो व अजितना प.पू. महाराज त्वरीत आत बोलावित असल्याचे सांगितले. ''श्रीं''ची आज्ञा ऐकून अजित ''श्रीं''च्या पुढे येऊन उभे राहिले.

प.पू. महाराज म्हणाले, ''अहो! कोणापुढे तुम्ही एवढा मोठा आवाज काढून बोलत आहात? ताईंपुढे? अहो तुम्हांला माहीत आहे कां त्या कोण आहेत? अहो, त्या साक्षात् 'भगवती रेणुका माता आहेत!' आधी जा आणि त्यांचे पाय धरून चुकीची माफी मागा!''

अजितांचे व्यावहारिक वक्तव्य अगदी बरोबर असले तरी प.पू.सौ. ताईंचा योग्य आदब ठेवायलाच पाहिजे होता. हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी प्रामाणिकपणे, नम्रपणे त्यांचे चरणास हात लावून ''श्रीं''च्या आज्ञेप्रमाणे क्षमा याचना केली. चि. अजित यांनी आपले वडीलांस पू. दादांना दि. २७.२.१९८६ रोजी पत्र लिहीले ते असे,

दि. २७.२.१९८६

पू. दादांना,

शि.सा.न.वि.वि.

वरच्या जागेचे बांधकाम होऊ नये असे मला वाटते. माझा त्याला स्पष्ट विरोध आहे. याकरिता दोन कारणे मी प.पू. सौ. ताईमहाराज, श्री. नागले वगैरेना सांगितली. त्यापैकी प.पू. सौ. ताईमहाराज सोडून नागले वगैरे मंडळी माझ्याशी सहमत आहेत. पहिले कारण म्हणजे वरच्या जागेत तुम्ही जाणार नाही आहात तेव्हा त्या दृष्टीने त्याचा उपयोग नाही. शिवाय तुम्ही सोडून बाकी कुणाकरिता दुसऱ्या लोकांनी साठविलेले पैसे खर्च करावेत अशी कुणाचीही लायकी, अधिकार नाही. ही वस्तुस्थिती आहे. दुसरे कारण म्हणजे बाकीच्या लोकांनी दिलेल्या पैशांमुळे तुमच्यावर आलेला मानसिक दबाव मला जसा जाणवला तसाच तो श्री. नागले वगैरेना जाणवला व म्हणूनच त्यांनी आपल्याला निवेदन पत्र पाठविले. त्यामुळे आहे ते बांधकाम पूर्ण करून थांबावे. वरचे करू नये या माझ्या मताशी ते सहमत आहेत. परंतु ते ताईमहाराजांना तसे सांगू शकत नाहीत, तेव्हा या बाबतीत आपण थोडी स्पष्ट भूमिका घेऊन प.पू. सौ. ताईमहाराजांना सांगावे व वरचे बांधकाम करू नये असे माझे मत आहे. मी इतर मंडळींना एवढेही सांगितले आहे की माझ्या स्वार्थाचा जास्त विचार केला तर मी या क्षणाला गप्प बसणे माझ्या हिताचे होते तरीसुद्धा मी विरोधी का बोलतो याचा थोडा विचार व्हावा. वरची जागा कशाकरता बांधायची याचा संदर्भ अजून स्पष्ट झालेला नाही. परंतु ती जर माझ्या करता असेल तर मी त्या जागेचा उपयोग करणार नाही. कारण माझ्यावरही एक विशिष्ट प्रकारचा मानसिक दबाव आहे. तेव्हा हे निवेदन लक्षात घेऊन आपण योग्य तो निर्णय घ्यावा ही विनंती आहे. माझा निर्णय व्यावहारिक व मानसिकदृष्ट्या योग्य आहे असा माझा अट्टाहास आहे. ही माझी विनंती आहे. यापुढे आपली मर्जी. कारण या घरात माझ्या इच्छेनुसार काही घडावे अशी माझी मुळीच अपेक्षा नाही. कारण माझा तो अधिकार नाही.

- अजित

१९९) प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प ''श्री'' प्रमाण मानीत!

प.पू. श्रीमहाराज अत्यंत व्यवहारी होते. आपल्या दैवी गुणसंपदेतील ''अपरिग्रह'' हा गुण त्यांचे वागण्यात प्रकर्षाने जाणवतो. आमचे मोक्षगुरु असून सुद्धा आमची जरा कुठे जास्त रकमेची दक्षिणा आली, तरी इष्टानिष्टाचा विचार महाराज पुढे मांडतात. आम्ही गुरुबंधूंनी त्यांचे निवासास आर्थिक सहाय्य सेवाभावाने लावलेले तेही त्यांना रुचले नाही. हे मागील आमच्या दि. ३१.१.१९८६ च्या निवेदनावरून आणि प्रत्युत्तरी ''श्रीं''चे पत्र दि. ५.२.१९८६ वरून लक्षांत येतेच. चि.. अजित यांचे पत्रांतील विचारही त्यांना पूर्णपणे पटले आहेत हे पुढे श्री. गद्रे आर्किटेक्टना लिहीलेल्या पत्रावरून लक्षात येईल. पण असे असून सुद्धा प.पू. महाराज प.पू.सौ. ताईमहाराजांचा शब्द, त्यांचा संकल्प प्रमाण मानतात. आम्हाला जी काही अल्पसेवा बांधकामाची प्राप्त झाली ती सुद्धा केवळ प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प म्हणूनच झाली. अन्यथा आम्ही गुरुबंधूंनी कितीही आर्जव-विनंत्या केल्या असत्या तरी प.पू. महाराजांनी म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे मंजुरीकरिता पाठवायच्या नकाशावर सही केली नसती.

प.पू.सौ. ताईमहाराजांना प.पू. श्रीमहाराज कधीही व्यक्ती समजत नाहीत, तर त्या साक्षात् भगवती माता आहेत, त्या आपल्या 'कुलस्वामीनी रेणुकामाता' आहेत असे आदरणीय भाव सदैव व्यक्त करतात व त्याप्रमाणे त्यांच्या बाबतीत आपली आज्ञाधारकाची भूमिका ठेवतात. चि. अजित यांचे पत्रही प.पू. सौ. ताईमहाराजांची इच्छा, त्यांचा शब्द आणि त्यांचा संकल्प यापुढे बाजूस ठेवून प.पू. महाराजांनी आर्किटेक्ट श्री. गद्रे यांना पुढील नकाशे मंजुरीकरिता पत्र लिहीले. ते असे,

।। श्रीदत्त ।।

पुणे, दि. ६..३.१९८६

श्रीमान् माननीय रविंद्र गद्रे यांना,

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम.

परवा गर्दीमुळे आपल्याबरोबर विचार करण्यास अवसर मिळाला नाही. म्हणून या पत्ररुपाने आपणापुढे काही विचार मांडत आहे. आपण उत्तम शिल्पशास्त्रज्ञ व व्यवहारज्ञ असल्याने आपला निर्णय सर्वांनाच मान्य होईल.

सध्या खालील बांधकामाबरोबर वर एक खोली करण्याचा आपला पहिला प्लॅन मंजूर झाल्याचे समजते. माडीवर आणखी १/२ खोल्या करणे झाल्यास तसा दुसरा नकाशा तयार करून कॉर्पोरेशनकडे पाठविणे शक्य असल्यास तसे करावे. हा विचार सर्वानुमते आपणापुढे मांडला आहे. याच बांधकामाबरोबर ते होऊन जाईल. पुन्हा काही करावे लागणार नाही असे सौ. ताईमहाराजांचे मत दिसते. खर्चाचा बोजा फार वाढत असल्याने चि. अजित या विचारांच्या

विरुद्ध आहे. मुंबईकर व आपण आत्मियतेने पूर्ण सहाय्य करीत असल्याने पुष्कळच खर्चात बचत होत आहे. तथापि इतर खर्च महागाईमुळे बराच होऊन राहिला आहे. हाही चि. अजितचा विचार उपेक्षणीय दिसत नाही. तथापि सौ. ताईमहाराजांचे संकल्पास अनुसरून नवीन वाढीचा प्लॅन करून ते काम यापुढे पूर्ण करण्यास किती खर्च लागेल हा विचार आपणासारखे शिल्पशास्त्रज्ञच करू शकतील. तरी तोही विचार करून कामात काम करणे योग्य असल्यास नवीन वाढीचा नकाशा करून परवानगीकरिता पाठविण्यास आमची हरकत नाही.

कळावे,

आपला प्रेमाश्रित
दत्तात्रेय कवीश्वर



१९९) "स्त्री धन"

कोणत्याही स्त्रीला आपले दागिने अत्यंत प्रिय असतात. सौ. आईसाहेबांना सुद्धा मनापासून दागिन्यांची आवड होती. त्या परिपूर्ण पतीमतानुवर्ती आणि व्रतस्थ सहधर्मचारिणी होत्या. बोलण्यात, वागण्यात त्यांनी कधी पती प्रेमाचे वास्तवरुप कोणापुढे प्रकट केले नाही पण अंतस्थ त्या "श्रीं"शी परिपूर्ण एकरुप होत्या. आम्हांस म्हणायच्या, "तुमचे आपले महाराज, आम्हा गरीबांकडे कोण पहाणार?" पण प्रत्येक गुरुबंधूंवर त्या पुत्रवत् प्रेम करायच्या. लेकरे लाडाने आईची चेष्टा मस्करी करतात. तसे आमचे विनोदाने, हजरजबाबीपणे लागलीच उत्तरे द्यायच्या. एकदा आम्ही विचारले, "आईसाहेब आपले खरे गुरु कोण? धुंडीराज महाराज कां गुळवणी महासज?" सौ. आईसाहेब उत्तरल्या, "अहो, आम्हा स्त्रियांचे खरे गुरु कोण असणार? आमचे पतीदेवच!"

प.पू. महाराजांचे कानावर जेव्हा गेले की, बांधकामाकरिता फंडस् कमी पडत आहेत. अजून प्लम्बर व सुतारकीचे काम करणारे श्री. शूळ यांचे, श्री. भिडे वॉटर प्रुफींगवाले, इलेक्ट्रीशियन, पेंटर यांचे पैसे देणे बाकी आहे तेव्हा लागलीच त्यांनी सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताईमहाराजांशी चर्चा केली असावी. जुलै १९८६ मध्ये साधारण दि. २० ते २३ च्या दरम्यान एके सकाळी "श्रीं"नी मला व श्री. गोडसेंना बोलावून घेतले. प.पू. महाराजांचे जवळच प.पू.सौ. ताईमहाराज बसल्या होत्या. "श्रीं"चे दर्शन घेऊन आज्ञेनुसार समोर जरा बाजूला बसलो होतो. सौ. आईसाहेब आल्या आणि त्यांनी फडक्यात बांधलेला दागिन्यांचा डबा "श्रीं"च्या पुढे आदरपूर्वक हसतमुखाने आणून ठेवला व म्हणाल्या, "हे घ्या! आम्ही देत आहोत. आहे ते सर्व आपलेच आहे."

तो प्रसंग आम्हांस अत्यंत लाजिरवाणा, क्लेशकारी, दु:ख देणारा होता. परंतु ईश्वरी इच्छेपुढे, नियतीच्या क्रीडेपुढे हार खावी लागली. पुढे ''श्रीं''नी सर्व समजावून आम्हांस पुढील सूचना दिल्या. काही लिहीण्यासही लेखणी धजत नाही आहे. आम्ही अपुरे पडलो. पण आम्ही तरी कोण? करता करविता श्री गुरुदेव!

प.पू. महाराजांची आलेली दोन पत्रे दि. २७.६.१९८६ चे व दि. १.७.१९८६ चे खाली देत आहे.

।। श्रीदत्त ।।

पुणे, श्री रेणुका निवास
दि. २७.६.१९८६

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपलाच पत्ता येथे सापडला. इतरांचे पत्ते जवळ नसल्याने आपल्याच नावावर हे पत्र लिहीत आहे ते पाहून सर्वांना कळेल. तसेच श्री. डांगे यांचा ठाण्याचा पत्ता न मिळाल्याने त्यांचे नावाचे पत्रही सोबत ठेवले आहे. श्री. गोडश्यांना पत्ता माहीत असल्यास श्री. डांगे यांचे पत्र ठाण्यास पाठवून द्यावे. आपल्या सर्वांच्या सहीच्या प.पू. सौ. ताईमहाराजांना पाठविलेल्या पत्राची इकडे पाठविलेली प्रत वाचण्यास मिळाली. त्यावरून पुढील बांधकामाच्या खर्चाची पूर्ण कल्पना आल्याने पुढील काम आता करणे अशक्य आहे. तो विचार सध्या थांबवून, आता शक्य झाल्यास जिन्यावर काही झांकण्याची व्यवस्था व त्याच्या खालील रस्त्याचे दार करून काम थांबवावे. १/२ पत्रे मागील हौदाजवळ वर टाकले म्हणजे धुतांना, भांडी घासताना पाऊस लागणार नाही. या करता परवा दिलेला माल विकून येईल तितकी रक्कम जमा करण्यास हरकत नाही. त्यांत मिश्रण असल्याने कोठेही सध्या चालू असलेल्या किंमतीपेक्षा कमीच भाव मिळणार. तरी तो माल शक्य तितक्या लवकर विकून रक्कम उभी करावी व त्यातून आतापर्यंत या कामापैकी कोणाचे राहिलेले पैसे सर्व देऊन टाकावेत. म्हणजे बाहेरचे सर्वांचे देणे संपून निश्चिंतता येईल. नंतर आपणा सर्वांच्या धार्मिक गंगाजळीत थोडे थोडे पैसे जमा करण्यास आरंभ करता येईल. सारस्वत बँकेकडून घेतलेल्या पैशांचे व्याज परस्पर भागणारे असल्यामुळे त्या द्रव्याची फेड हळूहळू होऊन जाईल. त्याची काळजी नाही. जास्ती जागा बांधली गेली तरी ''तुम्हांला इतकी जागा लागत नसल्यामुळे आमच्या नोकराला ती जागा द्या'' असे सरकारकडून विचारणे होणे शक्य मानावे लागेल. श्री. माधवरावांना याप्रमाणेच सध्याची जागा आहे. इनकम-टॅक्सचीही भीती. वार्षिक कॉर्पोरेशन चार्जही अधिक होण्याची भीति. या करिता पुढील बांधकाम थांबविणे बरे असे वाटते. माल विकताना, विकत घेणाऱ्याकडून एक चिठ्ठी, 'इतका माल इतक्या रकमेस घेतला' अशी मिळाली तर बरे म्हणजे

इनकम-टॅक्सला ती दाखविण्यास उपयोगी पडेल. तरी त्याप्रमाणे करण्याचे निश्चित ठरवून, सर्व भागवून टाकावे. म्हणजे आम्हाला समाधान वाटेल. आता त्या मालाबद्दल विचार करण्यात वेळ जाऊ नये. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. २ ते ८ तारखेपर्यंत श्री महाराजांची पुण्यतिथी उत्सव असून ८ तारखेस पुण्यतिथी आहे. १५ ते २१ पर्यंत श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव असून २१ तारखेस गुरुपौर्णिमा आहे.

आम्ही २२ जुलैला देऊळगांवी जाण्यास निघणार आहोत. तेथे एक आठवडा राहून जालना, बीड वरून वार्षिक तुळजापूर, गाणगापूर यात्रा करूनच श्रावण पौर्णिमेपर्यंत पुण्यास येण्याचा विचार आहे.

कळावे,

आपला

दत्तात्रेय कवीश्वर

हे पत्र घरी मंडळींना आणि चि. अजितला दाखवून दोघांचे संमतीने पाठविले आहे.

---**---

मुंबईहून आम्ही 'रेणुका निवासात' येताच ''श्रीं''चे दर्शन घेतले. ''आमचे २७ तारखेचे पत्र आपणास मिळाले का?'' मी म्हटले, ''होय महाराज! आता राहिलेली अगदी निकडीची कामे पावसापूर्वी पूर्ण करणे आवश्यकच आहेत. ती पूर्ण करून घेण्यासच आम्ही आलो आहोत. सर्वप्रथम गच्चीवरील जिन्याच्या खोलीचा दरवाजा व त्या खोलीवरील पत्रे टाकून फिक्स करून घेतो. म्हणजे जिन्यात पाणी येणार नाही!''

''त्याचबरोबर ती बाहेरची भांडी व कपडे धुण्याची जागा आहे. त्यावरही ताबडतोब पत्रे टाकून घ्या! त्या कामकरीण बाईला नाही तर पावसात भिजत धुण्याभांड्यांचे काम करावे लागेल. उन्हाळ्यात उन्हेही डोक्यावर फार तापतात!''

श्री. गोडसे व मी दादरमध्ये त्यांच्या व त्यांच्या पूज्य मातोश्रींच्या ओळखीने निरनिराळ्या सराफांकडे फिरलो. पण सगळीकडे सुवर्णात काहीसे मिश्रण असल्याचे व उच्च प्रतीचा भाव मिळत नसल्याचे अनुभवास येऊ लागले. या सर्व परिस्थितीवर आम्ही गुरुबंधू गोडसे, शृंगारपुरे, श्री. भाऊ मुजुमदार, आबा म्हसवडकर यांनी खूप खूप विचार केला. कमी दरात माल विकण्यापेक्षा तो न विकणे बरे. असेच आम्हा सर्वांचे मत होऊ लागले. मग प्रश्न राहिला देणी भागविण्याचा. प्रत्येकानी शक्य होईल तेवढे लोन घेऊया, असाही विचार केला. परंतु सेवक आणि गुरुदेव हे नाते असे पडते की व्यावहारिक असत्यही बोलून चालत नाही, सर्व गोष्टी सत्यास धरूनच श्री गुरुदेवांना कथन कराव्या लागतात आणि अंतर्ज्ञानी, सर्वसाक्षी प.पू. श्रीदत्तमहाराजांपासून आम्ही कोणते उपाय करणार हे तरी कुठे लपून राहणार आहे? त्यांना

आम्ही कर्ज काढावे ही कल्पना मान्य होणार नाही. तरी सुद्धा हा माल न विकता सौ. आईसाहेबांकडे परत करावा असा विचार करून ''श्रीं''ना चि. सूरज पुण्यास जायला निघाला होता त्याच्याबरोबर पत्र पाठविले. आधीच माल विकण्यात आमच्या जीवाची घालमेल होत होती. सौ. आईसाहेबांची प्रेमळ वात्सल्यमूर्ती सतत डोळ्यांपुढे उभी रहात होती. आम्ही पत्राने विचार कळविला, लागलीच प.पू. श्रीमहाराजांचे पत्रोत्तर आले, ते जसेच्या तसे खाली देत आहे.

।। श्रीदत्त ।।

श्री रेणुका निवास, पुणे १६.
दि. १.७.१९८६

सप्रेम नमस्कार निवेदन वि. क्षेम

चि. सूरज बरोबर दिलेले पत्र आज मिळाले. त्यातील एक विचार (तो माल ज्याचा त्याला परत करणे) हा धर्मशास्त्र दृष्टीने विरुद्ध वाटल्यामुळे हे पत्र लिहावे लागत आहे, याचा विचार आपण सर्वांनी करून पटेल तसे करावे, आग्रह नाही.

तो माल सौ. ताईमहाराजांचे समक्ष आमच्यापुढे ठेवला म्हणजे त्यावर दात्याचे स्वत्व राहिले नाही आणि तो आम्ही व्यवस्था करण्याकरिता आपणाकडे दिला. आपणही त्याप्रमाणे चौकशी करून व्यवस्थेची दिशा दाखवून दिली. आम्ही त्याबद्दल संमतीपत्र पाठवून ती व्यवस्था करण्यास आपणास पूर्ण अधिकार दिले आहेत. आता तो माल देणाऱ्यास परत घेता येणार नाही. तसे केल्यास एखाद्याचा मानसिक सत्संकल्प मोडल्याचा दोष आपणा सर्वांना आणि आम्हालाही लागेल आणि एकदा स्वत्व त्याग केल्यावर तीच वस्तु पुन्हा घेऊ नये. मनांतही तसे आणू नये. आता दिलेल्या वस्तूंचा योग्य विनियोग झालेला दिसून आल्यास आणखीही दानाची इच्छा वाढण्याचा संभव आहे. ती वस्तू परत घेतली तर लोभच वाढीस लागेल. हा दुसरा अनिवार्य दोष निर्माण होईल.

याबद्दल आता दोनच मार्ग स्वीकारता येतील ते असे, तो माल तेथेच देऊन टाकून मिळालेली रक्कम सारस्वत बँकेत भरून, त्या बँकेचे म्हणजे 'श्री रेणुका मातेच्या' कर्जातून मुक्त व्हावे. वास्तविक अद्यापि येथे बांधकाम सुरू असल्याने ते किती देणे द्यावे लागेल याचा अंदाज नाही. श्री. शूळ यांना अठरा हजाराचा चेक दिला, श्री. भिडे यांना त्यांचे सांगणेप्रमाणे सहा हजाराचा एक व तीन हजाराचा एक असे नऊ हजाराचे दोन चेक काल दिले. आता बत्तीस हजार सारस्वत बँकेच्या ऋणापैकी पाच हजारच शिल्लक राहतात हाही विचार केला पाहिजे. तरी बांधकामाचे सर्व देणे भागवून काही शिल्लक राहतील तेवढे सारस्वत बँकेत ऋण परिहारार्थ जमा करावे. हा एक मार्ग.

दुसरा मार्ग, सारस्वत बँकेचे सावकाश दिले तर चालत असल्यास आम्ही परवा संकल्प केल्याप्रमाणे आपणा सर्व परोपकार व्रती सज्जनांच्या धार्मिक गंगाजळीत यथाशक्ति भरण्यास सुरुवात करावी. तो सर्व हिशोब (जमा) पाहून त्याप्रमाणे धार्मिक गंगाजळी प्रत्येकाची सर्वांच्या विचाराने ठरविता येईल.

देवीचा ऋण परिहार अथवा धार्मिक गंगाजळी निर्माण यापैकी कोणतेही कार्य माल विकून करता आल्यास, तो माल देणाऱ्यांना मोठे श्रेय मिळेल. तो माल परत घेतल्यास परत घेणाऱ्यांनाही दोष लागेल. योग्य ते श्री भगवती सर्वांकडून करवून घेईल. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. वरीलप्रमाणे मालाची व्यवस्था झाल्यास, चिंता न राहता सर्वांना चांगली झोप येईल हाही फायदा आहेच.

कळावे,
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

प.पू. महाराजांचे दि. १.७.१९८६ चे पत्र येऊन पंधरा दिवस होऊन गेले तरी आमच्याकडून हा दागिन्यांचा व्यवहार पूर्ण होऊ शकला नव्हता. ''श्रीं''च्या पत्रानंतर आम्हा गुरुबंधूंना आता व्यवहार पूर्ण करण्याखेरीज गत्यंतर नाही हे कळून चुकले होते. तरी अधिक किंमत प्राप्त होण्याकरीता आमचे प्रयत्न चालू होते. आता आमचे कार्यवाहीबद्दलही ''श्रीं''ना शंका येऊ लागली असणार. ही मंडळी पैशाची अन्य मार्गाने उभारणी करून दागिने परत आणणार की काय. दि. १८.७.१९८६ ला आषाढी एकादशीला ''श्रीं'' बोरीवली येथे सौ. नीलाताई जोशींकडे सालाबादप्रमाणे आले होते. दर्शनास गर्दी खूप होती. दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.१० चे डेक्कन क्वीनने पुण्याला जाताना प.पू. महाराज आणि श्री रघुनाथरावांबरोबर मीही होतो. पण प.पू. महाराजांनी विषय काढला नाही. दि. २१ ला ''श्रीं''च्या दर्शनास घरी देखील गर्दी होती. दि. २२.७.१९८६, मंगळवारी ९ वाजता प्रवासास निघण्यापूर्वी ''श्रीं''नी घाईत आम्हांस पत्र लिहीले ते खालीलप्रमाणे,

॥ श्रीदत्त ॥

श्री रेणुका निवास, पुणे.
दि. २२.७.१९८६

श्रीमान् नागले प्रभृति सर्वांना
सप्रेम सादर निवेदन वि.

आम्ही आता सकाळी ९ ला प्रवासास निघत आहोत. काल गर्दीत आपली निवांत भेट होऊ न शकल्याने हे लिहीत आहे.

मागील दुसऱ्या पत्रात आमचे मनोगत स्पष्ट लिहीले आहे. त्याप्रमाणे आपणाकडे दिलेला माल इकडे परत न आणता तो देऊन येणाऱ्या रकमेतून बांधकामाचे राहिलेले देणे प्रथम भागविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे काम प्रथम होणे आवश्यक आहे तरी निश्चितपणे हे काम प्रथम केल्यास समाधान वाटेल. आम्हांस परत येणेस तीन आठवड्याचा काल लागेल. आल्यावर पुढील विचार आपणा सर्वांपुढे मांडता येतील.

कळावे,

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

रविवार, दि. २९.७.१९८६ रोजी प.पू. महाराजांचे आज्ञेनुसार आम्ही, मी व श्री. गोडसे दादरमध्येच एका सराफाकडे या सौ. आईसाहेबांचे दागिन्यांचा व्यवहार जड अंत:करणाने पूर्ण केला. ''श्रीं''ना असलेली रितसर पावती, वजन, भाव एकूण रक्कम सर्व व्यवस्थित घेतले. पुण्यास जाऊन रक्कम आज्ञेप्रमाणे बँकेत टाकून देणाऱ्यांची देणी पूर्ण केली.

२००) प्रेमस्वरुप वात्सल्यमूर्ती सौ. आईसाहेब!

हे मात्र अगदी खरं आणि कबूल करावेच लागेल की आम्ही गुरुबंधू मुंबईहून निघून प.पू. श्रीमहाराजांचे दर्शनास यायचे ते अगदी त्यांचे दर्शनाचे उत्कंठेने. जसे दर्शनास तहानेने व्याकुळ झाल्यासारखे असायचे. गेटमधून आत शिरताच बाहेर पादत्राणे काढली की आमची पाऊले बाजूच्या साईडने सरळ मागील हौदाचे नळाकडे वळायची. हातपाय धुतले की, मागील दरवाजाने आत शिरून अंथरलेल्या चटयांवर घरच्यांचे सांगण्यानुसार ''श्रीं''ची बाहेर येण्याची वाट पहात बसायचे.

असं आम्हाला कधी सुचलं नाही की आधी सौ. आईसाहेबांची ख्याली खुशाली घेऊ या. त्याबद्दल मात्र त्या नेहमी म्हणायच्या ''तुमचे आपले महाराज नि महाराज! आले की आपले चालले तडक महाराजांकडे. आम्ही कोण आहोत कुणाचे?''

त्यांचे म्हणणे पटायचे. चूक कळून यायची. आम्ही अगदी शरमिंदे व्हायचो, ''तसे नाही हो! खरंच तसे नाही हो आईसाहेब.'' हे आपले उगीचचे उगीच म्हणायचे. ते त्यांनाही कळायचे आणि इतके करून पुढील आमच्या येण्यात हीच चूक परत घडायची. सौ. आईसाहेबांकडे क्षमा याचना करावी आणि हसतमुखाने त्या प्रेमळ माऊलीने मनातून आनंदीत होत आमचा गुरुभाव लक्षात घेऊन माफ करावे. पुढे मग ठरल्याप्रमाणे, ''जेवल्याशिवाय

जायचे नाही. लांबून आलांत, थांबा आधी पोहे, चहा काही खायला करते.'' त्या वात्सल्यमूर्तीस तिच्या मातृत्वाला, तिच्या वात्सल्याला जी पुरवणी आम्ही करायला हवी होती ती, गुरुस्थानाचे केंद्रीकरणामुळे कळत नकळत राहून गेली याची खंत आम्हांस नेहमीच पडते. सौ. आईसाहेब काही बोलू द्यात पण ते वरकरणी मिष्कील - आमची फिरकी घेण्यापुरते असायचे. त्यांना ''श्रीं''च्या चरणाशी आमची असलेली प्रीती आवडायची.

मी श्री रेणुका निवासाच्या बांधकामानिमित्त, प.पू. श्रीमहाराजांच्या आज्ञेने श्री रेणुका निवासातच रहात होतो. या वास्तव्यात ''श्रीं''चे प्रेम आणि आत्मियता जशी अनुभवली तशी मातृवात्सल्याचे सुखही भरपूर भोगले. सकाळी उठल्यापासून मी माझ्या नित्यकर्मांत आणि बांधकामांतच व्यग्र असलो तरी सौ. आईसाहेबांनी माझ्याकडे सकाळच्या चहा, नंतर न्याहारी, भोजन, सायंकाळी चहाच्या वेळी काही खाणे, रात्रीचे भोजन, स्वतः किंवा तितक्याच तत्पर असलेल्या सौ. आईसाहेबांच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या सौ. सवितावहिनीनी तत्परतेने लक्ष पुरवावे. ''श्रीं''च्या घरी वास्तव्य असेल तेव्हा 'श्री' आज्ञेने त्यांच्या समोर किंवा बाजूला पान वाढले जायचे. तिथेही गुरुमाऊलीच, लक्ष ठेवून असायची, काय हवं नको. ''श्रीं'' दौऱ्यावर असले की सौ. आईसाहेब आणि श्री. अशोकरावांच्या पंक्तीचा स्वयंपाक घरातच लाभ व्हायचा. जेवताना सुद्धा हसत खेळत गप्पांना विनोदाना खूप वाव असायचा.

काशीहून आम्ही प्रयाग-काशी-गया त्रिस्थळी यात्रा करून आल्यानंतर श्राद्धविधीचे वेळी आपल्या आवडीचे फळ आणि एक भाजी सोडायची असते. मीही पेरू आवडीचा आणि मनापासून न आवडणारी भेंडीची भाजी सोडली होती. या श्री रेणुका निवासाच्या वास्तव्यात गप्पा गोष्टींच्या नादांत सौ. आईसाहेबांनी मी कोणते फळ व कोणती भाजी सोडली हे विचारून घेतले त्यांचा उद्देश माझ्या लक्षात आला नाही. पण नंतर जेव्हा तळलेली भेंडीभाजी आणि पेरूचे फ्रुटसॅलड किंवा कापलेल्या पेरुंच्या फोडींची डिश भोजनोत्तर माझ्या हाती येऊ लागली. सुरवातीस मी म्हटले, ''आईसाहेब माझ्या पानांतील भाजी मी भोजन सुरू करण्यापूर्वी काढून ठेवता कां?'' तर म्हणाल्या, ''नाही! गुरुगृही सोडलेले पदार्थ खाऊन चालतात. भोजन झाल्यावर मी काल आणलेले पेरु कापून देणार आहे. हा गुरुप्रसाद आहे, खा. माझे म्हणणे पटत नसेल तर तुमच्या गुरुमहाराजांना विचारा!'' मग माझ्या लक्षात आले की सौ. आईसाहेबांनी सुरवातीसच कोणते फळ, कोणती भाजी सोडल्याचे का विचारले होते.

एकदा मी सकाळच्या १० च्या एस्.टी. ने जालन्यास जाण्यास निघालो होतो. १९९३ ते १९९६ पर्यंत माझ्या 'श्री दत्त अमरेश्वर जीर्णोद्धार' बांधकामाकरिता मुंबई-पुणे-वाडी अशा जाता येता वाऱ्या चालू होत्या. तशा आता १९९६ मध्यापासून मुंबई-पुणे-जालना आणि

तसेच परत, ह्या वाऱ्या सुरू झाल्या होत्या. ईशकृपेने सत्संगाचा या काळात सुकाळ होता. मी १० ची एस्.टी. पकडण्यास श्री रेणुका निवासांतून ९ वाजताच सौ. आईसाहेबांना गुंगारा देऊन पळण्याच्या विचारात होतो. उद्देश एवढाच की सकाळी सकाळीच सौ. आईसाहेब आणि वहिनीसाहेब यांना काही करावे लागू नये. पण दूरदर्शी माऊलीने आधीच तळली भेंडी भाजी पोळी, पाण्याची बाटली तयार ठेवली होती. शशीकांत निघताना आरडा ओरडा. ''शशीकांत गेले नाहीत ना? थांबा! शिदोरी घेऊन जा. अरे अशोक, त्यांना दोन पेरु गुंडाळून दे.'' वगैरे.

१९८१ च्या एप्रिल महिन्यांतील हरिहरेश्वर वास्तव्यांत सौ. आईसाहेबांचा जवळून परिचय झाला. सकाळी स्नान झाले की सौ. आईसाहेब देवखोलीचे समोर (देवखोली ओठाणांतच आहे) पण ओठाणाचे मध्यावर पाट मांडून त्यावर वस्त्र अंथरून पोथी ठेवीत व त्या पोथीला प्रदक्षिणा घालीतच जपही करीत. एकदा त्यांनी कसले तरी व्रत केले होते. तेव्हा प.पू. श्रीमहाराजांचे चरणाचे तीर्थ घेऊन त्या उपवास सोडायच्या. हरेश्वरी वेळ मिळेल तेव्हा शंकर स्वामींनी लिहीलेले प.प. नृसिंह सरस्वती•दीक्षित महाराजांचे चरित्र वाचायच्या. कधी दुपारच्या वेळात सर्व सुना-मुलींना घेऊन नारळी सुपारीच्या शीतल छायेत सतरंज्या अंथरुन पडल्या पडल्या गप्पागोष्टी, आठवणी तर कधी चेष्टा विनोद करून हसवून सोडायच्या. नारळी सुपारीचे शिंपणे दर ३-४ दिवसांनी केले जाते. शिवाय सुपारीच्या झाडांची दाट सांवली, यामुळे मार्च-एप्रिल-मे मध्ये भरपूर थंडावा आणि समुद्राच्या हवेमुळे गारवा सुखद वाटतो. कधी पूर्वेकडील ओटीवर अगदी वरच्या ऩायठणीवर बसायच्या. ओटी आणि अंगण यांत प्रमुख दारासमोर ७ पायऱ्या आहेत. आम्ही साधक गुरुबंधू, गुरुभगिनी आईसाहेबांच्या अवतीभवती वर खाली पायऱ्यांवर, काही ओटीवर तर काही अंगणांत बसत असू. अंगणातही भव्य मंडप घातला होता. मांडवावर नारळीची पाने झावळ्या किंवा सुपारीच्या झावळ्यांचे छत आच्छादन असल्याने छाया होती. काही बऱ्या वाईट आठवणी सांगताना सौ. आईसाहेब आणि संपूर्ण कवीश्वर कुटुंबीयांना शनिवारांत कसा त्रास सोसावा लागला. तिसऱ्या माळ्यावर म्हणजे सहा जिने चढायचे, स्वयंपाकघर आणि दोन खोल्या यात सर्वांनी रहायचे. पाणी वर चढले नाही तर खालून कळशी हंड्यांनी भरायचे. संडास मालकांचा वरचा वापरायचा नाही तर खाली तळमजल्यावर कॉमन संडासात जायचे. हा सर्व त्रास श्री रेणुका निवासांत स्वयंपाकघर आणि दोन खोल्या बांधून तयार असताना सहन करावा लागत आहे. कां? तर तो उद्धव फडणीस. जागा फुकट वापरायला दिली. ४-६ महिन्यांकरिता, खरी एकच खोली दिली होती पण शहाण्याने सर्व घरांत हातपाय पसरले. हे सर्व सांगण्यात आईसाहेब रंगल्या होत्या. म्हणजे संतापल्याच होत्या. ते ऐकता ऐकता आमचे गुरुबंधू नंदकुमार शृंगारपुरे

विनोदमूर्ती आईसाहेबांचे समोर येऊन म्हणू लागले, ''हे बघा आईसाहेब! मला महाराजांनी दीक्षेची तारीख दिली आहे, पण ती तारीख यायला अजून पंधरा दिवस अवधी आहे. आजच काय ती मला आज्ञा द्या. मी जाऊ पुण्याला? धरू त्या उद्धव का कोण त्याला? चांगला झोडून काढू? मानगूट धरून त्याला तुमच्या समोर आणून आपल्या चरणावर नाक घासायला लावू? बोला अजून. मला दीक्षेला पंधरा दिवसांचा अवधी आहे. एकदा मला दीक्षा झाली तर मग मला काही करता येणार नाही.''

नंदूच्या ह्या भाषणाने खसखस पिकली. गंभीर झालेल्या वातावरणात हास्याचे फवारे. आईसाहेब तर एवढ्या मोठ्याने खळखळून हसल्या की सांगता सोय नाही. कथेचे गांभीर्य संपले व पुन्हा आनंदी वातावरण निर्माण झाले.

तशा आईसाहेब मूलत: प्रसन्न, आनंदी, शांत स्वभावी. मिष्कील विनोदवृत्ती, खेळकर आणि हजर जबाबी. अशा अनेक गुणसंपदेने परिपूर्ण! दयार्द्र कनवाळू पण तितक्याच सडेतोड, स्पष्टवक्त्या. कोणाचे काही चुकले किंवा गैर दिसले तर त्या व्यक्तीच्या तोंडावर फाड्कन बोलणार. कोणाची भीडभाड ठेवणार नाहीत. पण मनाच्या मोकळ्या. जे मनात तेच ओठावर. आत बाहेर छक्केपंजे काही नाहीत. आपले पतीदेव ज्ञानाचे भांडार, ज्ञानी, योगी, शास्त्रसंपन्न, वेदाधिकारी, महापंडीत आणि आपण सातवी शिकलेल्या. वास्तविक सांसारिक, व्यावहारिक ज्ञानांत ''श्रीं''सारख्या महापुरुषाच्या पावलावर पाऊल टाकून चालणाऱ्या सहधर्मचारिणी, तरी स्वत: मधील न्यूनत्व त्यांचे बोलण्यातून जाणवत असे. त्या एक शास्त्रीबुवांच्या पत्नी, शास्त्र जाणणाऱ्या होत्या. पण कर्मठ नव्हत्या. सर्वांना समसमान वागणूक माणुसकी देतांना त्यांनी शास्त्रांतील काही चालीरिती पद्धतीची पर्वा केली नाही. याची माझ्या समोर घडलेली उदाहरणे.

कोणी तरुणी सुवासिनी रंगसंगतीचा पेहराव करून सौ. आईसाहेबांच्या दर्शनास आली होती. हिरव्या रंगाची साडी, हिरव्या रंगाचा ब्लाऊज, हिरव्या रंगाची इअरींग्ज, गळ्यात हिरव्या मण्यांची माळ, केसांत हिरवा दवणा व पाचू माळलेला, टिकलीही हिरव्या रंगाचीच! सौ. आईसाहेबांना नमस्कार करायला पुढे वाकली. तिच्याकडे निरखून पहात सौ. आईसाहेब उद्गारल्या, ''मुलींनो! कसलीही फॅशन करा, पण टिकलीचे मॅचिंग करायला जाऊ नका! कुंकू किंवा टिकली, पण ती लालच हवी! तसेच मंगळसूत्राला आपल्या शरीराचा अवयव समजा! अगदी अविभाज्य!''

हरेश्वरी भोजनाच्या पंगतीत, बरेच ब्राह्मण स्त्री-पुरुष देखील होते. अंगणात पंगत बसली होती. सौ. आईसाहेबांच्या बाजूला एक भगिनी भोजनास बसल्या असताना माझी बहीण सौ. प्रभा शृंगारपुरे वाढायला आली. तेवढ्यात त्या भगिनी कडाडल्या. त्यांनी हरकत घेतली. ब्राह्मणांच्या पंक्तीची वाढणी ब्राह्मण स्त्रीनेच करावी. सौ. आईसाहेबांना त्यांचे बोलणे

रुचले नाही. तितक्याच मोठ्या आवाजांत आईसाहेब सौ. प्रभाला मोठ्याने हाक मारून म्हणाल्या, ''माझ्या पानावर सर्व पदार्थ तूच वाढ.''

कुरवपूरला भागवत सप्ताह चालू होता. सकाळी श्री. राजारामभाऊ संहिता वाचन व दुपार ते संध्याकाळ प.पू. महाराज निरुपण करायचे. माध्यान्हीला सर्व भक्तमंडळींच्या भोजनाच्या पंक्ती बसायच्या. स्त्रियांच्या पंक्तीत प्रथम क्रमांवर सौ. आईसाहेबांचे पान होते. त्याच पंक्तीत काही पाने सोडल्यानंतर श्रीमती माई क्षीरसागर या बसल्या होत्या. माई प.पू. श्री गुळवणी महाराजांच्या अनुग्रहीत आणि गुरुमहाराजांच्या लाडक्या शिष्या, कवीश्वर घराण्याशी चांगला घरोबा, सौ. आईसाहेबांच्या घनिष्ठ मैत्रीतल्या. काही ब्राह्मण स्त्रियांनी आक्षेप घेतला. प्रसाद भोजनात सुवासिनींच्या पंक्तीत विधवा नको. त्यांना दूर बसवा. सौ. आईसाहेबांना हे आक्षेप, ह्या हरकती सहन झाल्या नाहीत. भोजनास सुरुवात व्हायची होती. सौ. आईसाहेब आपल्या आसनावर उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, ''माईंचे पान माझ्या शेजारी पहिल्या क्रमांकावर वाढा.

स्वयंपाक घरात आचाऱ्यांच्या हाताशी काम करताना माझी पत्नी व भगिनी प्रभा काकडीच्या साली आधी काढून नंतर काकडी किसत होत्या. आईसाहेब तिथे होत्या. त्यांचे लक्ष गेले. त्या म्हणाल्या, ''अग लता आणि प्रभा ही साल काढण्यात वेळ कशाला घालवतां? तुम्हांला किसांत ते काकडीचे साल यायला नको नां! मग असे करा काकडी मध्यावर उभी चिरून दोन भाग करा व आतील भाग किसणीवर ठेवून किसायला सुरवात करा. आतील भागाचा किस किसणीचे खाली पडेल आणि साल शेवटी तुमच्या हातात राहतील!'' स्वयंपाकातील छोट्या छोट्या टिप्सही आईसाहेबांना अवगत होत्या. त्याचे कारण त्या स्वत: सुगरण होत्या. सौ. आईसाहेबांच्या हातचा स्वयंपाक मी, या महाभागाने अनेकदा महत् भाग्याने ग्रहण केला आहे. पोळी दिसायची वरून जाड. सौ. ताईमहाराजांसारख्या मला म्हणायच्या, ''शशीकांत तुमच्या लतासारख्या पोळ्या आम्हाला करता येत नाहीत हो. आमच्या आपल्या जाड जाड!'' अहो कसल्या जाड जाड? आतून कितीतरी पोळीत पदर, अगदी लुसलुशीत.

हरिहरेश्वरी पाच एकराची आमची सामाईक शेतीवाडी बागायत आणि कौलारू मोठे घर अशी इस्टेट आगर भागात आहे. घरापासून सुरू होऊन नारळी सुपारी बागा, भात शेती नंतर पुन्हा मोठे पडीक भाट (त्यातही लागवड केलेली) नंतर पुढे समुद्र किनारा. चौपाटी समुद्र सुरू होतो. एवढ्या मोठ्या जागेत वडीलांचे पश्चात आई आणि माझ्यापेक्षा मोठा एक आजारी भाऊ यांना ठेवणे इष्ट नव्हते. म्हणून मुंबईस बंधुस कधी घरी तर कधी हॉस्पिटलला ठेवावे लागे आणि आईलाही माझ्या घरीच गोरेगांवी ठेवले होते. आईलाही पॅरॅलिसीसचे दुखणे होऊन गेले. या सर्व प्रापंचिक अडचणींमुळे माझी पत्नी सौ. लता हिला दरवेळी ''श्रीं''चे किंवा

सौ. आईसाहेबांचे दर्शनास किंवा 'श्री वासुदेव निवास, श्री वामन निवास, श्री रेणुका निवास' येथील कार्यक्रमास न्यायला मिळत नसे. सौ. आईसाहेबांचे ''श्रीं''चे समवेत ३-४ वेळा वास्तव्य, तीनदा ८-१० दिवसांचे हरेश्वरी तर १-२ वेळा गोरेगांवी झाले होते. म्हणून त्यांना आमच्या घरातील सर्व समस्यांची परिस्थितीची जाणीव होती. सौ. लतास येणे जमले नाही की आईसाहेब हळहळायच्या. पण कधी लता आलेली दिसली, आईसाहेबांचे जवळ गेली की लाडा-कौतुकाने म्हणायच्या, ''आलं गं आलं! माझं उंबराचं फूल आलं.'' उंबराचं फूल कधी कोणाला दिसत नाही, क्वचितच दिसते असे म्हणतात.

सौ. आईसाहेबांना भविष्यांतील काही गोष्टी आधीच कळत असाव्यात. असा मला माझे थोरल्या सुनेचे संदर्भात दोनदा सौ. आईसाहेबांची वाणी खरी ठरल्याचे अनुभवास आले.

माझा थोरला मुलगा संदीप याचा विवाह होऊन काही महिनेच झाले होते. श्री रेणुका निवासामध्ये सौ. आईसाहेब, सौ. सुलभाताई व श्री. माधवराव तांबोळी यांना म्हणाल्या, ''संदीपच्या पत्नीला, तनुजाला दिवस गेले आहेत.'' तसं पाहिलं तर सौ. आईसाहेबांनी लग्न झाल्या झाल्या तनुजास पाहिले होते. नंतर नाहीच. मुंबईस परततांच श्री. तांबोळींचा फोन आला, ''अभिनंदन! काय तुम्ही म्हणे आजोबा होणार.'' मला काहीच कळेना. कारण कोणाला काहीच माहीत नव्हते. पती पत्नीसही माहीती नव्हते. नंतर तपासणी करून घेतल्यानंतर सौ. आईसाहेबांचे म्हणणे पटले.

दुसऱ्या खेपेसही असेच झाले, आम्ही सर्व वाडीला गेलो होतो. प.पू. श्रीमहाराजांचे सोबत सौ. आईसाहेबही नरसोबावाडीस आल्या होत्या. आम्ही सर्व ''श्रीं''चे दर्शन घेऊन सौ. आईसाहेबांचे दर्शनास गेलो. पहिल्या बाळंतपणानंतर चि.सौ. तनुजाचे पोट जरा सुटले होते. ती नमस्काराकरिता सौ. आईसाहेबांच्या पुढे वाकली. आईसाहेब मिश्कीलपणे हसत म्हणाल्या, ''काय? बेत आहे वाटतं.'' सौ. लता, 'नाही नाही' म्हणाली; तसं काही नसल्याचे सांगून पुढे प्रस्तावना करू लागली, ''अहो, आईसाहेब, पहिली मुलगी चिन्मयी अवघ्या दहा महिन्यांचीच आहे.'' तरीही आईसाहेब म्हणाल्या, ''लता, तू ते काही सांगू नकोस. तनुजाकडे बेत आहे. लवकरच पेढे घेऊन या.''

सौ. आईसाहेबांची वाणी खरी ठरली आणि चिन्मयीच्या पाठीवर दीड वर्षाच्या अंतराने ऋषीकेश जन्माला आला.

हरिहरेश्वरचा पहिला कार्यक्रम दि. १० ते १८.४.१९८१ चा पूर्ण होऊन प.पू. श्रीमहाराज व सौ. आईसाहेब पुण्यास गेले. ते ९-१० दिवस मोठ्या मजेत, धामधुमीत गेले. बरीच माणसे म्हणजे आपलेच गुरुबंधू-भगिनी मेळावा! श्री गुरुदेवांचे सहवासात बहार आली. मुंबईस नित्यक्रम सुरू झाल्यावर वाटू लागले कशाला इतके लवकर हा सत्संगाचा सोहळा संपला.

सौ. लतास चैन पडेना. तिने सौ. आईसाहेबांना खूप मोठे पत्र आनंदी सोहळ्याच्या आठवणींचे लिहीले व आपली आम्हांला फार आठवण येत आहे म्हटले होते. जरा वेळा उशीरा कां होईना पण सौ. आईसाहेबांचे दुर्मिळ म्हणजे उंबराच्या फुलासारखे पत्र उंबराचे फुलास आले.

।। श्रीदत्त ।।

पुणे, दि. (साधारण मे १९८५)

सौ. प्रिय स्नेहलतास,

अ.आ.

तुझे पत्र येऊन बरेच दिवस झाले. उत्तर लवकर पाठवावे असे रोज म्हणून एक महिना होत आला. तरी पत्र लिहीण्यास सुचतच नाही. तरी नाराज न होणे. आई नुसती बडबड करणारी आहे. तिला लिहीता काही येत नाही, हे या पत्रावरून कळेलच. असो. मी आपल्याकडून आल्यानंतर मला जे काही झाले ते वर्णन पत्रात करीत नाही. समक्ष जेव्हा भेटू तेव्हा आपण बोलू. मी वाडीला गेले होते. तिथे आपली सर्व मंडळी आली होती. पण त्यात तुमची जोडी नसल्यामुळे थोडी उणीव भासली. सौ. प्रभा सर्व सांगेल. तिथेही खूप मजा आली. असो. मला लिहीता चांगले येत नाही म्हणून लिहीण्याचा कंटाळा करत होते. पण मुलीचे पत्र येऊनही जर उत्तर दिले नाही तर मुलीला काय वाटेल म्हणून कसे कां होईना पण लिहून पाठवित आहे. अक्षर फार चांगले म्हणून गौरव करू नये. असो. आता बालगोपाळ काय म्हणताहेत (अन् अबू महाराज की जय बोला) सर्व बाल गोपाळांना गोड गोड पापा जरूर कळविणे.

।। वेडे वाकुडे गाईन।। परी तुझा मी म्हणवीन।। अशापैकी माझे शब्द वेडेवाकुडे आहेत, तरी तुम्ही सर्व लोक भावनाशील असल्यामुळे मला उगीचच मोठेपणा देऊन गौरव करता आहात. श्रीमती आईंना माझा नमस्कार सांगणे.

चि. संजयला मुलगा झाल्याचे समजले. तेव्हा आम्हाला खूप आनंद झाला. मग काय सौ. लता आजी ठीक आहे ना नातू वगैरे? बरे असो. आपण सर्वजण २१ तारखेला मुंजीला येणार हे ठीक आहे, पण आधी ४-८ दिवस जर येणे केले तर जास्त बरे वाटेल. लवकर येण्याचे करावे. मी वाट पहात आहे.

कळावे, घरी सर्वांना स.न. व आ., श्रीमती आईंना नमस्कार.

सौ. लक्ष्मी कवीश्वर

आई

ता.क.: लेकीचे अक्षर मोत्यासारखे आणि आईचे अक्षर ओळखा पण हसू नका. उत्तर लवकर आले तरी चालेल. आईनी १ महिन्यांनी पाठविले तरी लेकींनी लवकर पाठविले तरी चालेल.

---*---

वरील पत्रात ''अबू महाराज की जय बोला'' असे म्हटले आहे. सौ. आईसाहेब आमचे धाकटे चिरंजीव अभिजीत साडेपाच वर्षाचे होते. त्यांना आईसाहेब अबूमहाराज म्हणून संबोधीत.

चि. संजयला मुलगा झाल्याचे समजले असे म्हटले आहे. हा संजय म्हणजे माझा पुतण्या. सौ. आईसाहेबांची गाडी चि. संजय चालवित होता. त्याचेही सौ. आईसाहेब खूप लाड करायच्या.

वरील पत्रावरून सौ. आईसाहेबांचा साधेपणा, मनमोकळेपणा आणि त्यांची वत्सलता लक्षात येते. खरोखरच आमच्या सर्वांच्या त्या आई-मातोश्री होत्या. 'आम्ही सर्व लोक भावनाशील आहोत म्हणून आईसाहेबांचा गौरव करून त्यांना मोठेपणा देतो' या वाक्यातून त्यांची लीनता व्यक्त होते.

माझा दुसरा मुलगा हर्षल उर्फ दिनेश बी.ई. सिव्हील होऊन एका आर.सी.सी. कन्सल्टंट कंपनीत नोकरीस लागला होता. १९९४ साली प.पू. महाराजांनी चि. दिनेशचा विवाह लवकर उरकण्यास सांगितले. त्यावेळी त्याचे वय २३ ते २४ च्या दरम्यान होते. आमचा आणि त्याचा स्वत:चाही विवाह एवढ्या लवकर करण्याचा मानस नव्हता. परंतु गुरुआज्ञा म्हटल्यानंतर आम्ही मुलींची स्थळे पाहू लागलो. एका मुलीचा फोटो आणि पत्रिका आली होती. मुलगी सौंदर्यसंपन्न होती, पत्रिकाही जमत होती. प.पू. महाराजांनी फोटो पत्रिका पहाण्याआधीच सौ. आईसाहेबांना फोटा दाखविला. तो त्यांना अतिशय आवडला. मला व सौ. लतास म्हणाल्या, ''ही नातसून मला एकदम पसंत आहे. शशीकांत-लता तुम्ही हिला होकार देऊन टाका.'' आम्ही या मुलीला सांगून टाकले की, आमच्या घरी धार्मिक वातावरण आहे. आम्ही संपूर्ण शाकाहारी आहोत. पण ती मुलगी पक्की मांसाहारी होती. म्हणून तिलाही सर्व पसंत असून मांसाहार मिळणार नाही म्हणून नकार दिला. सौ. आईसाहेबांना जेव्हा हे सांगितले तेव्हा त्या मुलीवर खूप चिडल्या. ''अगं बयो, तुला ते काय खायचं होतं ते बाहेर जाऊन, माहेरी जाऊन खायचं होतं. माझ्या सोन्यासारख्या नातवाशी लग्न करायला सुद्धा भाग्य लागतं!''

सौ. आईसाहेबांना बालपणापासून धार्मिक ऐतिहासिक सिनेमा पाहण्याची फार आवड होती. 'आपले थोरले चिरंजीव दत्तात्रेय काही लक्ष्मीला सिनेमा दाखवायला नेणार नाही. म्हणून सुनेची आवड पूर्ण करण्याकरिता स्वत: प.पू. धुंडीराज महाराज सुनेला व मोठ्या आईसाहेबांना घेऊन पूर्वी गांवातून यायचा तो तंबूतला सिनेमा दाखवायला निघाले.' 'मोठ्या आईसाहेबांनी स्वत: येत नाही पण लाडक्या सुनेस न्यायला सांगितले' सौ. आईसाहेब सासरे असलेले गुरुदेव प.पू. श्री धुंडीराज महाराजांसोबत जाऊन सिनेमा पाहून आल्या. १९८० नंतरच्या दशकांत

मुले, सुना, मुली, जावई एखादे चांगले नाटक किंवा सिनेमा लागला असेल तर सौ. आईसाहेबांना नेत असत.

एकदा एक मजेशीर प्रसंग घडला. श्री रेणुका निवासात काही सणवार किंवा काही समारंभ असेल म्हणा. बरीच भक्त मंडळी आली होती. एका भक्ताने ''श्रीं''चे दर्शन घेऊन ''श्रीं''च्या पुढे उघडा करून एक मोठ्ठा पेढ्यांचा पुडा ठेवला. दर्शन घ्यायला आलेल्या प्रत्येक भक्तास ''श्री'' त्यातील पेढा प्रसाद म्हणून हातावर ठेवीत होते. सर्व भक्तमंडळींची दर्शने झाली. पेढेही तंतोतंत पुरले. नंतर पेढेही संपले. पण नंतर एक भक्त व्यक्ती संकोचाने एवढ्या मंडळींचे समोर वाकून नमस्कार करू का नको असा विचार करीत उभी होती. प.पू. श्रीमहाराजांनी वर मान करून निरखून पाहिले. आणि मिश्कीलपणे म्हणाले, ''खोक्यातील पेढे संपलेले आहेत, खोक्याकडे पहा आणि नंतर नमस्कार करायचा कां नाही ते ठरवा.'' ती व्यक्ती म्हणजे आमच्या सौ. आईसाहेब होत्या.

मजेत आणि आनंदी खेळकर मूडमध्ये असले की प.पू. श्रीमहाराज कधी कधी कोणास तरी संबोधण्यास मध्ये ठेवून सौ. आईसाहेबांच्या फिरक्या घेत. पण त्याचबरोबर सौ. आईसाहेबांकडून काही आपले मनाविरुद्ध दिसले तर कडक कटाक्षही टाकीत. पण हे सर्व क्वचित अनुभवास येई. कुटुंबात कोणाचे लग्नकार्य असले तर अहेर देण्या-घेण्याचे बाबतीत सौ. आईसाहेब दक्ष असत आणि प.पू. श्रीमहाराजही लग्नास जाण्याची मानापानाच्या वस्तू देण्याची खरेदी झाली किंवा नाही व काय काय झाली ते समजावून पाहून घेत.

सौ. आईसाहेब पूर्वीच्या आठवणी सांगू लागल्या की बार्शीमध्ये परकराच्या ओच्यांत फुले घेऊन मी रस्त्याने जात असताना मोठ्या सौ. आईसाहेबांनी कसे बोलावले, काय म्हणाल्या. एक अभ्यासू तरुण कसे एका बाजूला अभ्यास करीत बसलेले होते हे कथानक व बार्शीत मुलाकरतां वधू पहायला येणार असलेल्या धुंडीराज महाराजांना किती वधुपित्यांचे टांगे न्यायला आले होते आणि महाराज कोणत्या टांग्यात बसले हे प्रसंग अगदी आवर्जून आणि रंगवून सांगायच्या.

श्री नरसोबा वाडीचे, प.पू. श्रीमहाराज जेथे जन्मले ते घर मोडकळीस आल्याने पाडून नवीन करण्याचे काम 'श्री दत्त अमरेश्वराचे जीर्णोद्धाराच्या' कामाच्या वेळात झाले. श्री धुंडीराज कवीश्वरांचे घर.' त्याचा ट्रस्ट देऊळगांवराजा येथील ट्रस्टींकडे आहे. ह्या जुन्या वास्तुचे तोडकाम करताना बरेच सामान आज्ञेप्रमाणे हलविले. जुने रेकॉर्ड 'श्री रेणुका निवासमध्ये' ''श्रीं''कडे दिले. त्यात मला प.पू. महाराज व सौ. आईसाहेबांची विवाहाची निमंत्रण पत्रिका मिळाली. ती मी माझ्याकडे संग्रही ठेवली आहे. वाचायची असेल तर पुढे जशीच्या तशी देत आहे. शिवाय एक वही अगदी जीर्णावस्थेत व अक्षरे पुसट झालेली अशी

होती. त्या वहीवर मुखपृष्ठावर सूचना लिहील्या होत्या म्हणून आधी हात लावू का नको अशी शंका मनात आली. बालवयातील असली तरी श्री गुरुदेवांची त्यावर आज्ञा होती.

''ही वही दत्तात्रेय कवीश्वर यांची आहे. तिला कोणीही हात लावू नये.''

पण पुढील ओळ वाचल्यानंतर मात्र मी ती उघडून पाहिली. पुढील ओळ होती,

''हात लावल्यास जपून उघडा आणि पुन्हा जागचे जागी ठेवावी.''

त्या वहीत शास्त्रोक्त गायनाची नोटेशन तर काही तबला शिकणाऱ्याचे धडेही होते.

निमंत्रण पत्रिका खालील प्रमाणे,

।। श्री गणेश ।।

श्रीमन्मंगलमूर्त्य खंड कृपया शाखे खबाणाष्टभू-।
युक्ते फाल्गुनमासि भार्गवदिने कृष्णा चतुर्थी तिथिः।।
तस्यां ज्येष्ठ सुतस्य सत्परिणयो दत्ताभिधेयस्य वै।
सुंदर्याख्यवधू स्तु पाठककुलोत्पन्ना सुभाग्यैषिणी।।१।।
विज्ञापि स्तत्रभवान् सकुटुंबो ऽवश्यमेत्य परिवारैः।
समलंकरोतु मंगलविवाहकार्यं सदाशीर्भिः।।२।।

सप्रेम विनंती विशेष,

आमचे घरी श्री गणेश कृपेकरून आमचे ज्येष्ठ चिरंजीव वक्रतुंड (दत्तात्रेय) याचा विवाह मिती फाल्गुन वद्य ४ शके १९५०, शुक्रवार ता. १९.३.१९२९ इ. रोजी दिवसा घ. २५, प. २८ (स्टँ.टा. ४.४५ वाजतां) निश्चित केला आहे. शरीरसंबंध वे. भगवान धोंडिबा पाठक बार्शीकर यांची कन्या सौभाग्य कांक्षिणी चि. सुंदराताई इजला वधू नेमस्त केली आहे. हे मंगलकार्य श्री नरसिंहवाडी क्षेत्री श्री दत्तचरणाजवळ होणार आहे. कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेत. तरी आपण सहकुटुंब सहपरिवार अगत्य येऊन कार्यसिद्धी करावी. आपण आल्याने कार्यास विशेष शोभा येऊन आम्हांस आनंद होणार आहे. कळावे ही विनंती.

आपला
धुंडीराज वक्रतुंड कवीश्वर

श्रीक्षेत्र नरसिंहवाडी
ता. ८.३.१९२९

सूचना : श्रीनरसिंहवाडीस येणेचे ते एस्.एम. रेल्वेने व्हाया मिरज जयसिंगपूर स्टेशनहून यावे. मोटारीची सोय आहे.

माझे श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे काम चालू असताना माझ्या मुंबई-पुणे-वाडी आणि येताना वाडी-पुणे-मुंबई अशा फेऱ्या १९९३ पासून चालू होत्या. सौ. आईसाहेबांनी मला

एकदा विचारले, ''दरवेळी वाडीहून येतांना माझ्या करता काय आणाल?'' मी म्हटले, ''वाडीच्या पेढ्यांचा प्रसाद!'' आईसाहेब म्हणाल्या, ''तो प्रसाद तर तुम्ही नेहमी आणताच. रात्रीची धुपारती आणि पालखी झाली की स्वारींची शेजारती होते. नंतर पुजारी धुपारती घेऊन श्री वासुदेवानंदांच्या ओवरीच्या पायठणीजवळ उजव्या हाताला धुपारतींतील अंगारा खोबणींत ठेवतात ना! त्यांतील अंगारा मला न विसरता आणीत जा.'' पुढे सातत्याने वाडीहून पुण्यास दुसऱ्या दिवशी निघायचे असेल तर तो अंगारा घेऊन मी निघत असे. अंगारा आणलेला पाहताच सौ. आईसाहेबांना मनापासून आनंद होत असे. तो त्यांच्या चेहऱ्यावरच दिसत असे. लागलीच भक्तीभावाने त्या अंगारा कपाळी लावत असत. पण पुढे १९९६ पासून माझे जालन्यास दत्तपादुका मंदिराचे काम सुरू झाले. नंतर जेव्हा कधी माझे जाणे वाडीस होई, तेव्हा न विसरता मी अंगारा आणत असे. दि. ८.१.१९९९ रोजी मी व श्री. चव्हाण साहेब एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, एरिगेशन डिपार्टमेंट, प.पू. सौ. ताईमहाराज व प.पू. महाराजांचे भक्त, जालन्याहून कोल्हापुरी गेलो. ही आमची फेरी कलेक्टर ऑफिस मधून श्री दत्त अमरेश्वर मंदिरासमोरील घाट प्रकल्पाकरता होती. मंदिरामागील जुन्या वास्तु तोडताना उत्खननांत सांपडलेली चांदीच्या रुपयांची नाणी ''श्रीं''च्या आज्ञेने सरकार जमा केली होती. त्यातील १०० वर्षे पूर्वीची नाणी पुरातन खाते ठेवून घेऊन त्याची किंमत देवस्थानला देणार होते. ती १०० वर्षानंतरची नाणी सर्वच्या सर्व परत करणार होते. या दोन कामाचे प्रयत्नास वरची सूत्रे हलविण्यास हाच दिवस ठरवून श्री दत्त अमरेश्वराने आम्हाला पाठविले होते. दोन्ही कामे बऱ्यापैकी मार्गी लावून आम्ही मुक्कामास दुसऱ्या दिवशी वाडीस आलो. रात्रीचा धूप-पालखी-शेजारती संपेपर्यंत थांबून आमच्या सौ. आईसाहेबांना हवा असतो तो अंगारा (विभूती) गोळा केला.

रविवारी आम्ही वाडी सोडली आणि श्री रेणुका निवासात दुपारी आलो. घरांत पाऊल टाकताच घरांतील गांभीर्याची कल्पना आली. सौ. आईसाहेब अत्यावस्थ होत्या. श्री. चव्हाण साहेबांची गाडी असल्यामुळेच मी वेळीच दाखल झालो होतो. हातपाय धुवून ''श्रीं''चे दर्शन घेतले. श्री. अशोकरावांना म्हटले, ''आईसाहेबांनी शेजारतीचा अंगारा घेऊन यायला सांगितले होते, तो मी आणला आहे. तुम्ही तो त्यांना लावता का?''

श्री. अशोकराव म्हणाले, ''तुम्ही स्वत:च जाऊन हांक मारून अंगारा आणल्याचे व कपाळी लावत असल्याचे मोठ्याने बोलून सांगा. तिला बरे वाटेल.''

मी पुढील खोलीत अंगाऱ्याची पुडी घेऊन गेलो. सौ. आईसाहेबांना हांक मारली, अंगारा आणल्याचे सांगितले पण तो स्वीकारण्याच्याही मन:स्थितीत त्या नव्हत्या. ती हास्यमुद्रा, ते कौतुकाने पहाणे आज नव्हते. विमनस्क मनाने माझ्याकडे एकच कटाक्ष

टाकला. घरात गडबड उडाली. प.पू. श्रीमहाराजांना बोलवा, एकच वाक्य सर्वांचे मुखांतून निघाले. श्री. अशोकराव ''श्रीं''च्या खोलीत येऊन हांका मारू लागले. श्री. रघुनाथराव म्हणाले, महाराज झोपले आहेत. पण महाराज झोपले नव्हते. ध्यानावस्था होती. येणाऱ्या प्रसंगाची जाणीव होती. काठी सुद्धा न घेता कॉटवरून उठले. सौ. आईसाहेबांचे प.पू. श्रीमहाराजांकडे नेहमी अहेवपणाचे, सौभाग्यवती म्हणून जाण्याचे मागणे असायचे. प.पू. श्रीमहाराज सौ. आईसाहेबांचे कॉटजवळ उशाशी गेले. मोठ्या आवाजात विचारत होते, ''काय शेवटी आपल्या मनासारखे झाले नां?'' वाडीची विभूती कपाळावर असलेल्या सौभाग्यवती आईसाहेब प.पू. महाराजांकडे एकटक पहात अनंतात विलीन झाल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळीच यात्रा निघाली. प.पू. महाराज श्री रेणुका निवासच्या फाटकापर्यंत पोहोचविण्यासाठी गेले. हमरस्त्याला वळेपर्यंत प.पू. महाराज डोळ्यांचे वर उन्हे टाळण्यास हात धरून पहात उभे होते. चला, श्रीहरी असे काही तरी म्हणत घरात परतले.

प.पू. महाराज सौ. आईसाहेबांच्या विनंतीस मान देऊन त्यांच्या पातिव्रत्याची शान राखून, अखेरची इच्छा पूर्ण करण्याकरीतांच थांबले होते. पुढे फक्त ५० दिवस थांबले.

या पूज्य सौ. आईसाहेबांचे विरह दु:खात धाकटी कन्या सौ. शैलाताई अत्यंत व्याकूळ होऊन प.पू. महाराज म्हणजे पूज्य दादांकडे आल्या व आपले दु:खीत मन त्यांनी वडीलांपुढे उघडे केले. प.पू. महाराज म्हणाले, ''गेलेल्या व्यक्तीबद्दल असं दु:ख करू नये. त्या देवतास्वरूप झाल्या आहेत. त्यांचे स्मरण करा पण दु:ख करू नका.''

आपणही ''श्रीं''ची वचने लक्षात घेऊन दु:ख न करता आपल्या प्रेमस्वरूप वात्सल्यमूर्तीचे सतत स्मरण करूंया.

या देवि सर्वभूतेशु प्रेमरुपेण संस्थिता।
नमः स्तस्यै, नमः स्तस्यै, नमः स्तस्यै नमोनमः।।

---**---

प.पू. सौ. ताईमहाराजांचे वात्सल्य!

सौ. आईसाहेबांच्या पश्चात् आम्हांस मातृसुख दिले सौ. ताईमहाराजांनी! माझ्या दोन्ही सुनांची विवाहानंतरची नांवे. मोठीचे 'शांभवी' आणि दुसरीचे 'देविका' ही नांवे सौ. आईसाहेबांनी ठेवली तर तद्नंतर जन्मास आलेल्या देविका दिनेशच्या मुलांची नांवे दीपक व श्रेयस ही प.पू. सौ. ताईमहाराजांनी ठेवली. चि. अभिजितने सौ. ताईंच्या अनुमतीने मुलगी पसंत केली. प.पू. सौ. ताईमहाराजांनीच तिचे विवाहानंतर 'गौरी' हे नांव ठेवले.

चि. दीपकला पाहण्यास सौ. ताईमहाराज मुंबईत आल्या असताना स्वत: आमच्या चारकोपच्या घरी आल्या होत्या. सौ. आईसाहेबांच्या लाडक्या (अबू महाराजांच्या)

अभूच्या पत्नीची, गौरीची पहिली मंगळागौर सौ. ताईंनी साजरी केली. आठव्या महिन्यात डोहाळे जेवण व ओटीभरणे अगदी दणक्यात केले. गौरीला मुकुट, कंबरपट्टा दागिने माळा फुलांनी नटवून तयार केलेल्या अर्ध चंद्रावर बसवून हाती फुलांचे धनुष्यबाण देऊन फोटो काढले. सौ. आईसाहेबांची जरा सुद्धा उणीव भासू दिली नाही. सौ. गौरी-अभिजीतला कन्यारत्न प्राप्त झाले. या कन्येचे नांव 'सर्वेश्वरी' हे प.पू. सौ. ताईमहाराजांनीच सुचविले. आमच्या परमभाग्याचे संत सत्पुरुषांच्या सान्निध्यांतील क्षण किती वर्णावेत! संसार सागरांतून आमची जीवन नौका पैलतीरावर नेतील यात शंकाच नाही.

२०१) ''श्रीं''चे श्री. अशोकरावांना पत्र

'श्री रेणुका निवासांत' बांधकामानिमित्त माझे वास्तव्य असताना श्री. अशोकरावांना प.पू. महाराजांचे आलेले पत्र त्यांनी वाचून माझ्याकडे दिले. आधी आपण ते पत्र वाचूया व नंतर त्यावर बोलूया.

।। श्रीदत्त ।।

खर्डा, दि. ३१.५.१९८६

सप्रेम आशीर्वाद, वि. क्षेम.

परवाचे पत्र मिळाले असेलच. त्यात काही मजकूर लिहीण्याचा राहिला, देवांतील सप्तशतीपोथीची जुनी पाने प्लास्टिकच्या पिशवीत प्रत्येक पान घालून ठेवता आल्यास सवडीने प्रयत्न करावा. मागे आमच्या पोथीची पाने तशी तुम्ही बनवून दिली आहेत. त्यामुळे पानाला हात न लागल्यामुळे ती सुरक्षित राहून वाचनास घेता येतील. तशी ही जुनी पोथी सुधारता आल्यास तुम्हांला आम्हांला वाचनास घेता येऊन सुरक्षित राहील. प्लास्टीकच्या बऱ्याच पिशव्या लागतील. विकत मिळतील. प्रयत्न करावा. ती पोथी फार जुनी आहे. फार जपून प्रयत्न करावा. आमचा मुक्काम येथे ४-५ जूनपर्यंत होईल. नंतर येथून निघता येईल. भूम, बीड येथील अद्यापि समजावयाचे आहे. तिकडे जाणे झाल्यास काही दिवस आणखी मोडतील. सर्वांस मंगल आशीर्वाद. पू. सौ. ताईमहाराजांना सादर प्रणाम.

कळावे,

आ.

दत्तात्रेय कवीश्वर

१) स्वत:चे मुलास लिहीताना सुद्धा महाराज आज्ञा म्हणून लिहीत नाहीत. ''जुनी पाने प्लास्टीकच्या पिशवीत प्रत्येक पान घालून ठेवता आल्यास सवडीने प्रयत्न करावा''

आज्ञार्थ नाही तर विध्यर्थ वाक्य आहे. पुन्हा 'लागलीच करावे' असे नाही तर 'सवडीने प्रयत्न करावा.'

२) आपल्या जुन्या झालेल्या पोथीबद्दल आस्था-पूज्यभाव आणि नीटनेटकेपणा प.पू. महाराजांचा स्वभावगुण दर्शवितो आहे. ''मागे आमच्या पोथीची पाने तशी तुम्ही बनवून दिली आहेत.'' म्हणजेच हे गुण चिरंजीवांचे स्वभावात मूलत: अंगीभूत आहेत. बऱ्याच पिशव्या घ्याव्या लागतील पण त्या विकत मिळतील, त्या विकत आणाच आणि हे काम कराच असा आग्रह नाही, तर प्रयत्न करावा. वाक्यागणिक आर्जव आहे, आज्ञा नाही. धन्य ते पितापुत्र. त्यांच्या छोट्या छोट्या वागण्यांतून सुद्धा आम्हाला बरेच काही शिकायला मिळते.

२०२) आग्रह नाही!

प.पू. श्रीमहाराजांनी हुकमत जर चालविलीच असेल तर ती फक्त आपल्या मनावर. आपली तत्त्वे, विचार, आचरण या बाबतीत ते मनोनिग्रही असत. मनावर परिपूर्ण ताबा आणि निश्चयात्मक बुद्धी. जे हितोपदेश आचार्य किंवा श्री वासुदेवानंदांच्या शिकवणीतून प्रवचनात दिले जायचे त्या सर्व विचारांचे पडसाद स्वत:वर असायचे. प्रथम केले नि मग सांगितले. आपणाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीवर त्यांनी सत्ता गाजविली नाही. हुकूम, आज्ञा हे शब्द त्यांच्या शब्दकोषांतच नव्हते. या शब्दांची जागा, आर्जव विनंती हितोपदेश या गुणांनी घेतली होती. हितोपदेश, तरी मी, आम्ही म्हणतो म्हणून नव्हे तर 'आचार्य असे म्हणतात.' श्री वासुदेवानंदांचे श्लोक, रामायण महाभारतांतील, भागवत, दासबोध, ज्ञानेश्वरी अशा अनेक धर्मग्रंथांच्या दाखल्यांतून दिला जायचा. ''मी'' ''आम्ही'' केव्हाच देहांतून, मनातून हद्दपार केला होता. सत्पुरुषांचे दाखले, धर्मग्रंथांचे दाखले समोर ठेवून प.पू. श्रीमहाराज सल्ला, मार्गदर्शन जरूर देत. परंतु त्याप्रमाणेच आपण वागावे किंवा कार्यवाही व्हावी असा त्यांचा आग्रह नसे. भल्याचा सांगावा द्यावा पण तसेच करा असा आग्रह नाही. तसे समोरच्या व्यक्तीने आचरण केले, न केल्याचे आम्हांस त्याचे काही नाही. हिताचे ते सांगितले, यापुढे तुम्ही आणि तुमचे नशीब आणि प्रारब्ध! पुन्हा तो विषय नाही. जे जनांत, सभा, मिटींग, प्रवचनांतून जनता जनार्दनासमोर, तेच आपल्या घरांत, आपल्या कुटुंबात! ''श्रीं''ना तसे द्वैत नाहीच.

आपल्या कुटुंबांतील आपले धाकटे चिरंजीव अजित यांना प.पू. श्रीगुरुमहाराज (गुळवणी महाराज) लाडाने 'शास्त्रीबोवा' म्हणून संबोधित. गुरुमहाराजांनी देह ठेवतांच शाळेत, वर्गात

असलेल्या बाळ अजितला प्रत्यक्ष दर्शन देऊन म्हटले, ''शास्त्रीबुवा आम्ही निघालो! लवकर घरी या.'' ही आपली एक आठवण जाता जाता सांगितली. प.पू. श्रीगुरुमहाराज लाडक्या नातवाला अजितला शास्त्रीबोवा म्हणायचे आणि प.पू. श्रीमहाराजांनाही वाटायचे अजितने वेदाध्ययन करून वेदशास्त्र संपन्न व्हावे. अजितचे बालपणी ''श्रीं'' तसं म्हणायचे. परंतु पुढील शिक्षणक्रमांत शालेय शिक्षणानंतर ''श्रीं''नी तसा आग्रह धरला नाही. आपल्या कुटुंबाचा विचार काय आहे? चि. अजितचा कल कुठे आहे? हे लक्षात घेऊन त्यांनी आपले मत पुढे आणले नाही.

पुढे श्री. अनिलरावांचे द्वितीय चिरंजीव यांनी तर आजोबांकडे लकडाच लावला होता की मला शालेय शिक्षणानंतर वेदाभ्यासच करायचा आहे. शालेय माध्यमिक शिक्षण चालू असल्यापासूनच हे विचार चि. कपीलच्या मनात होते. आपल्या आजोबांचे विद्वत्सभा तसेच कोणी विद्वान पंडित घरी आले तर त्यांचे एकमेकांशी होणारे संस्कृतप्रचुर आणि संस्कृत भाषेंतीलच संवाद त्यांनी बालपणापासून ऐकले होते. आजोबांसारखे आपल्यालाही सुस्पष्ट सरळ संस्कृतांत बोलता यावे असे त्यास वाटे. परंतु त्याच्या मनाची खरोखरच अंत:स्फूर्त इच्छा, तयारी आहे कां? आणि कुटुंबातील विशेषत: त्याचे आई-वडीलांकडून सहमत-अनुमती आहे कां हे पडताळून पाहिले. जणू बाळ कपीलची त्यांनी परीक्षाच घेतली. चि. कपीलची कुमारावस्था बाल्य बुद्धीतून बाहेर येत होती. तो अत्यंत निरागस होता, अजाण होता. प.पू. महाराजांनी त्याला म्हटले, ''अहो, तुम्ही याज्ञिकी किंवा वेदाध्यनाकडे गेलांत तर तुम्हांला मुलगी कोण देणार? तुमचे लग्न कसे होणार? वधुपिते मुलगा इंजिनिअर, डॉक्टर, उच्चशिक्षण घेतलेले पदवीधर पाहातात'' या आजोबांच्या प्रश्नावर कपील म्हणतो, ''आजोबा मी आईकडून स्वयंपाक कसा करायचा ते शिकून घेईन.''

२०३) चि. कपीलला वेदपाठशाळेत प्रवेश

चि. कपीलला मनापासून वेदपाठ शाळेत दाखल होण्याची आणि वेदाध्ययन करण्याची इच्छा होती. प.पू. आजोबांकडून परवानगी कशी मिळवावी हा त्याचा प्रश्न होता. प.पू. श्रीमहाराजांपुढे उभे राहून आपली इच्छा त्यांना कथन करावी असे वाटे पण धीर होईना. आदरयुक्त भीती होती. बाल असला तरी प.पू. महाराज आपले आजोबा, त्यांची महती, त्यांचे ज्ञान, दिव्य स्वरुप याची त्याला कल्पना येऊ लागली होती. समोर बोलून मनोदय कथन करता येईना. मग घरातच त्याने आपल्या आजोबांना पत्र लिहीले. त्याला मनापासून वेदाध्ययन करावे, वेदशास्त्रसंपन्न व्हावे असे वाटत होते हे या पत्रावरून लक्षात येते.

।। श्री ।।

तीर्थरुप प.पू. पूजनीय माझे आजोबा,

मला आपल्याशी काही बोलायचे होते. परंतु या आपल्या तुच्छ भक्ताला बोलायला धीर होत नाही. आजोबा, मला कॉलेज शिक्षण घ्यायचे नाही. मला ''माध्यं''शाखेचा ''शुक्ल यजुर्वेद'' शिकायचा आहे. त्यासाठी आपण मला अनुमती द्यावी ही माझी कळकळीची विनंती आहे. आपल्या घराचा थोडा तरी परंपरेचा अंश माझ्यात उतरावा असे मला वाटते. माझा निश्चय पक्का आहे. मला आपण वेदाध्ययनासाठी जिथे कोठे पाठवाल तिथे जायला कुठल्याही परिस्थितीत मी तयार आहे. मी कष्टाची लढत द्यायला तयार आहे. आपला आशीर्वाद पाठीशी असल्यावर कोण बरे मैदान जिंकू शकणार नाही? आपण, आजी, ताईमहाराज व सर्वजण आशीर्वाद द्या, म्हणजे हे जीवन सार्थक होईल असे मी समजेन.

आपला कृपाकांक्षी
कपील

---**---

ता.क. : प.पू. श्री दीक्षित स्वामी महाराज आणि प.पू. श्री गुळवणी महाराज ह्यांसारखे उच्चकोटीचे गुरु आपल्याला लाभले आणि आपले कल्याण झाले. त्याप्रमाणे आपण माझे गुरु म्हणून कल्याण करावे.

आपला कृपाकांक्षी
कपील

---**---

या कपीलच्या पत्रास प.पू. आजोबांनी लागलीच उत्तर दिले नाही. त्यांनी कपीलची खूप परीक्षा घेतली. त्याचा विचार किती पक्का आहे, एवढा मोठा अभ्यास करू शकेल का? हा त्याचा क्षणिक उत्साह आहे का, खरंच त्याची तशी तयारी आहे? चिकाटी, सातत्य, जिद्द आहे कां? एखाद्या विषयात प्राविण्य संपादण्याचा मनोदय असेल तर सर्वप्रथम मूलत:च त्या विषयाची आवड हवी, जिज्ञासा हवी. मनोदय पूर्ण करण्यास ध्येयपूर्तीस निश्चयात्मक बुद्धी हवी. आपल्याला जे साध्य साधायचे आहे त्यांतून जीवनात काय साधायचे आहे याचा दूरदर्शी विचार हवा. आपल्या आजोबांकडून उत्तर कां येत नाही? ते अनुमती कां देत नाहीत? घरातून विरोध आहे म्हणून देत नाहीत की काय? पुन्हा दुसरे पत्र चि. कपीलने लिहीले तेही मोठे मजेशीर आहे. वाचू या.

॥ श्री ॥

प.पूज्य तीर्थस्वरुप आजोबा,

या माझ्या देहाकडून काही अपराध घडला आहे कां? की जेणेकरून आपण मला परवानगी देत नाही. मला आपले म्हणणे कबूल आहे की, सर्वांचा विरोध असताना आपण परवानगी कशी देणार? आपल्याच कृपेवरून सगळे घरातले आता माझ्याबद्दल अनुकूल आहेत. इकडच्या शिक्षणाचा विचार करायचा म्हटलं तर एकदा कॉलेजमध्ये गेलो तर कॉलेजची गोडी जास्त वाढून याज्ञिकी वगैरे शिकण्याची गोडी कमी होईल अशी संभावना टाळता येत नाही.

आजोबा! मी कुठल्या जन्मात एवढं वाईट कर्म केलं की त्याची शिक्षा आपण घेताय ह्या परीक्षारूपाने! मला आपल्याशी खणखणीत संस्कृत बोलायचंय. त्यासाठी आळंदीला जावे लागेल असे मला वाटते, कारण कॉलेजचे संस्कृत, पुस्तकी संस्कृत असल्यामुळे संस्कृत भाषा तेवढी येणार नाही. आपल्या सारख्यांना पत्र लिहीण्याचा मला काही एक अधिकार नाही, परंतु तोंडानीही आपल्याशी बोलतांना जीभ थरथर कापते.

काही चुकल्यास क्षमा करावी. एवढी शेवटची विनंती करून हे लहान बाळासारखे बोबडे बोल थांबवितो.

आपला कृपाकांक्षी
कपिल

---*---

एवढा आजोबांचा पाठपुरावा केला. नंतर चि. कपील प.पू. श्रीमहाराजांचे दर्शनास त्यांच्या खोलीत शिरला. प.पू. श्रीमहाराज कॉटवर बसून वर्तमानपत्र वाचीत होते. कपीलने शिरसाष्टांग नमस्कार केला व आजोबांना अनुमतीबद्दल विचारले. प.पू. श्रीमहाराजांनी विचारले, "तुमच्या आई-वडीलांचे काय म्हणणे आहे? बोलवा बरं त्यांना." चि. कपीलने आपले आई-वडील सौ. अनिता वहिनी व श्री. अनिलरावांस बोलावून आणले. "श्री" म्हणाले, "काय, हे कपील काय विचारत आहेत? त्यांना वेदपाठशाळेत प्रवेश घेऊन माध्यं-यजुर्वेदाचा अभ्यास करायचा आहे म्हणतोय. काय मग तुम्हा उभयतांची त्याला वेदाध्ययनास पाठविण्याची तयारी-अनुमती आहे कां?"

"आपण आमचे वडील, आपला तो नातू, मग आपण जे काही ठरवाल ते आम्हांस मान्य असेलच," श्री. अनिल.

"ते ठीक आहे, पण त्याच्या भवितव्याचा विचार करता तुम्हा उभयतांस मनापासून हे मान्य आहे ना?" - "श्रीं"

''होय महाराज!''

कपीलकडे हसतमुखाने पहात म्हणाले, ''तुमच्या आईवडीलांची अनुमती आहे मग वेदपाठशाळेत प्रवेश घ्यायला हरकत नाही. आमचे आशीर्वाद आहेतच.''

पुढे चि. कपील आणि घरच्या मंडळींच्या विचाराने चि. कपीलला आळंदीस वेदपाठशाळेत प्रवेश घेण्याचे नक्की झाले. संस्कृत पाठशाळा म्हटल्या की, प.पू. श्रीमहाराजांचा कोणत्याही पाठशाळेत संपर्क असणारच. आळंदी पाठशाळेच्या मुख्याध्यापक यांस प.पू. श्रीमहाराजांनी पत्र दिले. चि. कपीलने आळंदीस जाऊन ते मुख्याध्यापकांचे हाती दिले आणि कपीलला पाठशाळेत सन्मानपूर्वक प्रवेश मिळाला.

२०४) चि. श्री. कपील यांनी सांगितलेला एक प्रसंग

कपील सांगतो आहे, मी घरी भागवत सप्ताह करणार होतोच. प.पू. सौ. ताईमहाराज घरी आल्या होत्या. प.पू. श्री आजोबांनी (महाराजांनी) प.पू. सौ. ताईमहाराजांना भागवत संहिता वाचन रोज सकाळपासून ऐकविण्यास सांगितले. आळंदीच्या वेदपाठशाळेत माझा संस्कृतचा अभ्यास बऱ्यापैकी झाला होता. मी रोज सकाळी १० वाजता प.पू.सौ. ताईंपुढे बसून भागवत संहिता वाचन करू लागलो. सकाळ-संध्याकाळ मी पुरा बांधला गेलो होतो. माझी एक इच्छा होती, कार ड्रायव्हिंग शिकण्याची. माझा मित्र आशुतोष कुलकर्णीने मला कार ड्रायव्हिंग शिकवण्याचे कबूल केले होते. पण मला वेळच मिळत नव्हता. मध्ये एका रविवारी माझ्या मनात आले की, आज आशुतोषकडे जावे. मी सकाळीच बाहेर जाण्यास निघालो. प.पू. आजोबांना मी बाहेर जाऊन येतो असे सांगणे शक्य नव्हते. उपयोगही झाला नसता, त्यांनी स्पष्ट, 'नाही जायचे,' म्हटले असते, म्हणून प.पू. सौ. ताईमहाराजांना, 'मी जरा बाहेर जाऊन येतो,' असे मोघम सांगून बाहेर आलो. घराच्या पायरीस हात लावून प.पू. आजोबांचे स्मरण करून नमस्कार केला आणि निघालो. मी उतावीळ होऊन मोठ्या उत्कंठेने आनंदाने आशुतोषकडे गेलो खरा, पण माझ्या येण्याचा उद्देश सफल झाला नाही. कारण आशुतोष त्याच्या महत्त्वाच्या कामाकरिता आधीच बाहेर गेला होता. त्याची थोडा वेळ वाट त्याच्या घरी पाहिली. दुपारी घरी भोजनास येण्यास मला खूप उशीर झाला. आजोबा आता आपल्याला ओरडणार म्हणून मनातून मी खूप घाबरलो होतो. मी आजोबांचे समोर गेलोच नाही. सायंकाळी आजोबांनी मला बोलावले आणि विचारले, ''काय किती अध्याय पूर्ण झाले?''

मी म्हटले, ''पंचम स्कंध दुपारपर्यंत पूर्ण झाला.''

आजोबा म्हणाले, ''तो तर कालच पूर्ण झाला होता. आज काय केले?''

मी आशुतोषकडे गेलो होतो असे सांगितले नाही. सूरजकडे गेलो होतो असे खोटेच सांगितले.आजोबा खूप रागावले, म्हणाले, ''काय गरज होती तिकडे जाण्याची? त्यांनी काय तुम्हांला बोलावले होते कां? विनाकारण आपला वेळ घालवायचा आणि वर दुसऱ्यांना अचानक जाऊन त्रास द्यायचा. जो तो आपल्या कामात असतो, विचारात असतो. आपण जाऊन त्यांना त्यांच्या कामात व्यत्यय आणायचा. हे बरे आहे काय? अहो! त्या ताईमहाराज आपला वेळ काढून संहिता वाचनाच्या श्रवणास बसलेल्या. तुम्ही भाग्यवान आहात की, साक्षात् भगवती तुमचे संहिता वाचन ऐकायला श्रोते म्हणून मिळाल्या. तुम्ही मात्र ठरल्याप्रमाणे आपले वेळचेवेळी संहिता वाचन करायचे, ते सोडून निघून गेलांत!''

मी खाली मान घालून उभा होतो. पश्चातापाने माझ्या डोळ्यांतून अश्रूधारा वहात होत्या. मी आजोबांसमोर हात जोडून ''मला क्षमा करा आजोबा, मी चुकलो!'' असे केविलवाण्या नजरेने त्यांच्याकडे पहात म्हणत होतो. पण आजोबांनी क्षमा केली नाही. त्यांचा राग शांत झाला नाही.

म्हणाले, ''आता पश्चाताप करून काय उपयोग?'' वेळ निघून गेली ती परत येणार आहे थोडीच? जा! ताईमहाराजांसमोर बसा आणि दोन अध्याय तरी वाचा, मोठ्याने वाचा!''

मी पुन्हा विनंती करूं लागलो, क्षमा मागू लागलो. पण त्यांनी सरळ माझ्या विनंतीकडे दुर्लक्ष केले. मी दोन अध्यायांचे संहिता वाचन केले.रात्री जेवणानंतर आजोबा त्यांच्या खोलीतून बाहेर आले. आता आपल्या जवळ ममतेने दोन शब्द बोलतील, त्यांनी बोलावे या आशेने मी समोर घुटमळत होतो. पण आजोबा सरळ आत आपल्या खोलीत जाऊन कॉटवर मांडी घालून बसले होते. मी त्यांच्या खोलीत गेलो व त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून, आवर धरून ठेवलेल्या माझ्या भावना मोकळ्या करून स्फुंदून स्फुंदून रडू लागलो. मग मात्र आजोबा शांत झाले. माझे डोक्यावरून, पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, ''असं करू नये बाळ, अशा वागण्याने मोठ्यांचा अनादर होतो. कोणाकडेही आपल्याला बोलावल्याशिवाय जाऊ नये. आपलेच महत्त्वाचे काम असेल तर फोन करून येण्याबद्दल परवानगी घ्यावी. अचानक जाण्याने कोण कोणत्या विचारात, कोणत्या घाईत, कोणत्या कामात असेल तर आपल्या जाण्याने त्यांना अस्वस्थता येते. त्यांना आपल्या अचानक जाण्याने कामात व्यत्यय येतो. आता असं करा. पुढील महिन्यात पुन्हा पहिल्यापासून भागवत सप्ताह करा!''

आजोबांच्या म्हणण्याप्रमाणे मी दुसरा भागवत सप्ताह घरात केला. तो फारच चांगला झाला. उत्तम प्रकारे पार पडला. आजोबांनी पाट मांडायला सांगून मला पाटावर बसविले. धोतर, उपरणे, कपाळाला कुंकुम तिलक लावून दिले. तोंड गोड केले आणि अहेराचे पाकीट माझ्या हातात दिले.

माझ्या मनात अपराधीपणाची भावना येऊन जी अपवित्रता मनास आली होती, ती नाहीशी झाली. हा माझ्या सन्मानाचा कार्यक्रम होत असताना माझी आई म्हणाली, ''कपीलचे दोन सप्ताह झाले!'' लागलीच आजोबा म्हणाले, ''दोन कुठे? एकच!''

हा सर्व प्रसंग मला शहाणपणा देऊन - पवित्र करून गेला.

२०५) वेदमूर्ती सर्वांनाच सन्माननीय असतात!

'श्री रेणुका निवास'मध्ये एका सकाळी कृष्णा आर्वीकर आले होते. बालपणापासून आणि नंतरही पुण्यातच वेदपाठशाळा, श्री वासुदेव निवासात मुक्काम, सहाजिकच आईसाहेबच काय पण सर्वच लहान थोर, 'ए कृष्णा!' असे एकेरी नांवानेच सर्व संबोधित असत. सौ. आईसाहेबांना तर ते आपल्या लेकरा नातवंडासारखे. त्या तरी कशाला त्यांना अहो-जाहो करतील. प.पू. महाराजांचे खोलीत ''श्रीं''च्या पुढे कृष्णा बसले होते. काही चर्चा संभाषण चालू होते. सौ. आईसाहेबांनी त्यांच्या करता दूध ओतले होते. जवळ ते नेऊन देण्यास कोणी नव्हते म्हणून आईसाहेब, ''कृष्णा, अरे कृष्णा! हे दूध घेऊन जा.'' कृष्णा उठले. स्वयंपाक घरांत गेले. पाठोपाठ प.पू. श्रीमहाराज आले व सौ. आईसाहेबांस म्हणू लागले, ''कृष्णा आता वेदशास्त्र संपन्न वेदमूर्ती झाले आहेत. त्यांना यापुढे एकेरी नावाने संबोधू नका. आपले बाळ कपीलही आता वेदशास्त्र संपन्न झाले आहेत. वेदमूर्ती कपीलनाही एकेरी संबोधून चालणार नाही!

२०६) प.प. विमलानंद स्वामींचे श्री वासुदेव निवासांत आगमन!

दि. २४.११.१९८७, मंगळवारी दुपारी १२.३० वाजता अनपेक्षित प.प. विमलानंद स्वामी महाराजांचे श्री वासुदेव निवासात आगमन झाले. आश्रमवासीयांची त्यांच्या स्वागतास एकच घाई उडाली. प.पू. श्रीमहाराज आज आश्रमातच होते. ''श्रीं''ना वरती स्वामी महाराज आल्याचे कळताच ताडकन् आपले बैठकीवरून उठून आधाराची काठीही हाती न घेता, एखाद्या जवानाप्रमाणे, झटकीपट महाराज जिना उतरून खाली आले. तोपर्यंत स्वामींना श्री वासुदेव निवासाच्या खालच्या हॉलमध्ये श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या तसबिरीखाली आसन घालून देण्यात आले होते. स्वामी स्थानापन्न झाले होते. उंची पुरी, धिप्पाड शरीरयष्टी असलेले स्वामी महाराज भव्य गौरवर्ण-तेजाळ दिसत होते. व्यक्तिमत्त्व पहात रहाण्यासारखे होते. प.पू. श्रीमहाराज आधीच विनयमूर्ती! नम्रतापूर्ण दोन्ही हात जोडून त्यांच्यासमोर जमिनीस जोडलेले हात टेकवून त्या हातांवर आपले भाळ टेकून नमस्कार

झाला. स्वामींचे तोंडून उद्‌गार निघाले, ''नारायण, नारायण!'' नंतर महाराज त्यांच्यासमोर जमिनीवरच (लादीवर) बसू लागताच कोणीतरी चटई आणून दिली. स्वामी हिंदीतून बोलत होते. प.पू. महाराजही हिंदीतून संभाषण करीत होते. ख्याली खुशाली झाल्यानंतर श्री स्वामी महाराज म्हणाले, ''गाणगापूरके लिए प्रस्थान रखनेका इरादा है। वहाँ कोई आश्रम या निवासके लिये सुविधा हैं?'' प.पू. श्रीमहाराजांनी तेथे आपणास उतरण्यास 'श्री वासुदेवाश्रमासारखीच' 'श्री वासुदेवानंद सरस्वती आश्रमात' व्यवस्था असल्याचे सांगितले. तेथील या आश्रमाची सर्व व्यवस्था श्री. दत्तूशेठ साबळे पहात असतात. 'आपण थोडा वेळ येथेच विश्रांती घ्या, आम्ही साबळे शेठजींना घेऊन येतो,' असे म्हणून प.पू. श्रीमहाराज उठले सुद्धा. वरून काठी आणून दिली. रिक्शा आणली. प.पू. श्रीमहाराजांचा उत्साह, धावपळ पाहून आश्चर्यच वाटत होते. पुन्हा कोणास तरी पाठविले असते तर कोणीही जाऊन शेठजींना घेऊन आले असते, पण सोबत कोणासही न घेता प.पू. श्रीमहाराज एकटेच श्री. साबळे शेठजींकडे गेले व त्यांना घेऊन आले. त्यांना श्री स्वामींपुढे हजर करून म्हणाले, ''हे आपली सर्व व्यवस्था गाणगापूर आश्रमात उत्तमप्रकारे करतील.''

श्री. शेठजींनी साष्टांग नमस्कार घातला. नंतर त्या दोघांचे संभाषण होऊन त्यांना घेऊन जाण्यापासूनची सर्व जबाबदारी श्री. साबळे शेठजींनी घेतली.

प.पू. महाराजांपुढे आम्ही भक्त, सेवेकरी शब्द झेलण्यास समोर उभे असताना ''श्रीं'' कोणासही काही न सांगता स्वत:च कां गेले? एखादा फोन बाहेरून करून शेठजींना तातडीने बोलावून घेता आले असते. श्री स्वामी महाराज हे प.प. लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांच्या गुरुबंधू शाखेतील असावेत म्हणून की काय, पण कोणी स्वामी, संन्यासी, संत सत्पुरुष म्हटले की, ''श्रीं''चा आदरणीय भाव पराकोटीस जातो हेच खरे!

२०७) श्री कुरवपूर (कुरगड्डी) येथील भागवत सप्ताह

श्री कुरवपूर-कुरगड्डी श्रीपाद श्रीवल्लभांचे स्थान, तपोभूमी. श्री कृष्णा नदीचे नाभीस्थान, श्री वासुदेवानंद सरस्वतींची गुहा. त्या गुहेतील त्यांची तप:श्चर्या, त्यांचे चातुर्मास आणि त्यांचे बहुतकाळ झालेले वास्तव्य. अशा पवित्र भूमीत भागवताचे अवतार प.पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ही पर्वणी आम्हा भक्तभाविकांना लाभली याचे सर्व श्रेय आमच्या गुरुभगिनी सुशीलाताई मोडक यांनाच द्यायला हवे. कारण त्यांच्याच सत् संकल्पाला प.पू. श्रीमहाराजांचा आशीर्वाद आणि अनुमती लाभली.

पुण्याची आणि मुंबईची भक्त मंडळी या सप्ताहास मोठ्या संख्येने सहभागी होणार होती.

श्री. मोघे काकांचे घरी श्री. अशोकरावांचे उपस्थितीत आमच्या मिटींग होत होत्या. कोणी कसे निघायचे, कसे जायचे, प्रवास तर फारच दुर्गम आहे. कृष्णेच्या तीन धारा ओलांडाव्या लागतात. कृष्णा नदीच्या ऐन पात्रात मध्यावर हे पाऊण मैल लांब, अर्धा मैल रुंद असे हे क्षेत्रस्थान आहे. एक सुविधा झाली आहे, ती म्हणजे पूर्वी कृष्णेच्या तीन धारा (प्रवाह) पायी पाण्यांतून चालत जाऊन ओलांडायला लागायच्या. वाटेत खांच खळगे, लहान मोठे दगड, शिळा, कोळ्यांचा हात धरून चालावे लागायचे. पण आता होडीने जाता येते. प्रत्येकाने जाण्याच्या, राहण्याच्या दृष्टीने काय काय सामान घ्यायचे, तेथील निवास व प्रसाद भोजन व्यवस्था ह्या विषयी विचार विनिमय दर मिटींगमध्ये व्हायचे. सोबत आबालवृद्ध आहेत, स्त्री-पुरुष आहेत, दिवस थंडीचे आहेत, प्रवास लांबचा खडतर आहे. श्री सद्गुरु सांभाळणार आहेत, हे खरे असले तरी भक्तांनी ''श्रीं''च्यावर भार तरी किती टाकायचा? प.पू. महाराजांना सर्वांची काळजी आहेच. ''श्रीं''च्या पत्राद्वारे आलेल्या सूचना वाचल्या म्हणजे ''श्रीं''चे दूरदर्शी, दूरगामी विचार कसे असतात ते कळते. दि. १६.११.१९८७ रोजी आलेले ''श्रीं''चे पत्र पुढे ठेवीत आहे.

॥ श्रीदत्त ॥

पुणे - ४.
दि. १६.११.१९८७

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम

इकडे कुरुगड्डीस येणारी जास्ती मंडळी झाल्याने, मुंबईच्या सर्व मंडळींनी मुंबई ते रायचूर अशी जाता येता रिटर्न तिकीटे काढून मुंबईहून रायचूरला यावे, असे काल श्री. गोडसे यांना सांगितले असून मुंबईच्या सर्व मंडळींची यादी घेऊन ते परत गेले. त्यांत श्री. माधवराव व सौ. सुलभा या दोघांचीही तिकीटे मुंबईहूनच रिटर्न काढण्यास त्यांना सांगितले आहे. २४ डिसेंबरला मुंबईहून निघावं व ३ जानेवारीस एक्सप्रेसने रात्री रायचूरहून परत निघायचे. या दोन तारखा लक्षात असाव्यात. या बरोबरच सौ. ताईमहाराज व आमची मंडळी या दोघींचीही तिकीटे सर्वांबरोबर मुंबईहूनच रिटर्न रिझर्व करावीत असे श्री. गोडसेंना कळवावे. म्हणजे तेथून जाता येता एक्सप्रेसचा प्रवास लवकर होईल. या दोघी १-२ दिवस आधी माटुंग्यास येतील व आपणासर्वांबरोबर तेथूनच निघतील. येथून पॅसेंजरचा प्रवास २६ तासांचा आहे. तरी अशी व्यवस्था झाल्याचे कळवावे. घरी सर्वांस मंगल आशीर्वाद.

कळावे,

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

२०८) चिरंजीव दत्तू बाळास थंडीला बंडी!

श्री क्षेत्र कुरवपूरला जायला निघण्यास आठ दिवस असतानाच कुरवपूरहून श्री. केळकर गुरुजींचे पत्र आले की तिकडे भरपूर थंडी आहे. तरी प्रत्येकाने स्वेटर, मफलर, रजई वगैरे सोबत आणावे. आमचे बरोबर आमची पोरेबाळेही होती म्हणून त्यांचा विचार जसा आमच्या मनी आला तसा प.पू. श्रीमहाराजांनाही आपल्या बाळाचा विचार मनी आला. आपल्या दत्तूबाळासही थंडी वाजणार! नेमक्या त्याच दुपारनंतरच्या वेळात सौ. सवितावहिनी मशीनवर काही तरी शिवत होत्या. प.पू. महाराज त्यांच्या खोलीत गेले व म्हणू लागले, ''त्या केळकर गुरुजींचे कुरवपूरहून पत्र आले आहे. तेथे म्हणे कडाक्याची थंडी आहे. तुम्हांला आपल्या दत्तू बाळासाठी बंडी वगैरे काही शिवता येईल कां?'' सौ. सवितावहिनी म्हणाल्या, ''हो, येईल की! माझ्याकडे वेलवेटचे कापड आहे. त्या वेलवेट कापडाची बंडी शिवते आणि त्यांवर आपण जरीची वस्त्रे नेसवित असतोच म्हणजे त्यांना अजिबात थंडी वाजणार नाही!''

आज्ञावंत! दोन चार तासही लागले नाहीत! दत्तू बाळाचे माप तर होतेच. सौ. सविता वहिनींनी सुंदर सुबक अशी बंडी दत्तू बाळासाठी स्वहस्ते शिवली. त्यावेळी त्यांचा शिवणकलेचा क्लास चालू होताच. बंडी प.पू. महाराजांना फारच आवडली. दुसऱ्या दिवशी पूजा करताना प.पू. महाराजांनी ती बंडी दत्तू बाळाला घातली सुद्धा! अगदी बरोबर झाली.

दत्तूबाळ घरी आल्यापासून आज प.पू. श्रीदत्तमहाराजांचे नातू म्हणजे पाचवी पिढी. पण दत्तूबाळ दत्तूबाळच आहेत आणि कवीश्वर कुटुंबात पुढे जन्मास येणारी प्रत्येक व्यक्ती ही दत्तूबाळास वडीलांसमान आणि दत्तूबाळ पुत्ररूपच राहतील. प.पू. वक्रतुंड महाराज यांची मुले जगत नसत. प.पू. श्री गोविंद स्वामी महाराजांनी त्यांना हा दत्तूबाळ दिला व म्हटले, 'पुत्रवत् या बाळाचा सांभाळ करावा, तुम्हांला पुत्र होईल.' पुढे प.पू. वक्रतुंड महाराज आणि पत्नी सौ. सावित्रीबाईंना पुत्ररत्न झाले. तेच आपले प.पू. धुंडीराज महाराज, प.पू. धुंडीराज महाराजांनी दत्तूबाळास जन्मभर सांभाळून प.पू. श्रीदत्तमहाराजांचे हवाली केले. प.पू. दत्तमहाराजांनी प.पू. श्री अशोक महाराजांकडे सुपूर्द केले. आता दत्तू बाळ श्री रेणुका निवासात कवीश्वरांच्या देव्हाऱ्यात कायम स्वरुपात स्थानापन्न राहून पुढील पिढीचे संरक्षण, संवर्धन, संगोपन करीत आहेत. श्री. अनिलरावांचे चिरंजीव आपले कपिलशास्त्री दत्तूबाळांना सांभाळत आहेत.

सांगायची विशेष गोष्ट अशी की आम्ही सर्व श्री कुरवपूर क्षेत्री पोहोचण्यापूर्वीच तेथील थंडी गायब झाली होती. श्रीमत् भागवत सप्ताह संपेपर्यंत थंडी सुखावह व माफक राहिली. थंडीचा कोणत्याही प्रकारे कोणासही त्रास झाला नाही. पुण्याच्या श्री वामन निवासाच्या

कामावर सुप्ते नांवाचा एक तरुण माझ्याकडे पेटींग आणि प्लम्बिंगचे काम मागायला आला होता. ही कामे आधीच दिलेली असल्याने किरकोळ कामे मी त्याला देत असे. पुढे श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी श्री वासुदेव निवासातील अशीच किरकोळ कामे देण्यास सुरुवात केली. तो आता आश्रमाचा सेवेकरीही झाला होता. प.पू. श्रीमहाराजांनी त्याला आपल्या पत्नी व लेकरांसह कुरवपूरला 'श्री भागवत सप्ताहास' येण्यास सांगितले. तो आलाही आणि तेथील धावपळ, सर्व व्यवस्थेस सेवेकरी म्हणून त्याचा चांगला उपयोग झाला. प्रवचनास तो रोज बसत असे. भागवत सप्ताह समाप्तीनंतर आम्ही सर्व मुंबई पुण्याची मंडळी परतण्यास निघालो पण प.पू. श्रीमहाराजांनी श्री. सुप्तेला मात्र श्री श्रीपाद श्रीवल्लभांचे सेवेस काही दिवस राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे सेवेस राहून तो जेव्हा श्री वासुदेव निवासात परत आला तेव्हा तो सांगत होता की, सर्व मंडळी पुणे मुंबईस निघून गेल्यानंतर कुरवपूरला इतकी कडाक्याची थंडी पडली की सहन करणे कठीण झाले.

पुण्यास येऊन श्री. सुप्ते यांना आठ-दहा दिवसच झाले असतील आणि एके दिवशी सायकलने जात असताना एका ट्रकने त्यांना उडविले आणि त्यांतच त्यांचा अंत झाला. पुढील प्रसंग लक्षात घेऊन गंडांतर जाणूनच ''श्रीं''नी त्यांना भागवत ऐकविले आणि कुरवपूरला काही काळ सेवेस ठेविले.

२०९) कुरवपूर भागवत सप्ताह समाप्ती!

श्री क्षेत्र कुरवपूर येथील भागवत सप्ताह दि. २६.१२.१९८७, शनिवारी सुरू झाला आणि समाप्ती शनिवारी, दि. २.१.१९८७ रोजी झाली. रोज सकाळी श्री. राजाभाऊ जोशी हे संहिता वाचन करीत असत. दुपारी २.३० पर्यंत रोज प.पू. महाराजांचे प्रवचन सुरू होई ते सायंकाळी ६ वाजता संपत असे. मध्यंतरी २० ते ३० मिनिटे विश्रांती, चहापान होई.

सतत बसण्याने ''श्रीं''चा एक ढोपा अतिशय दुखू लागला. मी 'भागवत प्रवचनास' बसू शकत नव्हतो कारण माझ्याकडे रोजच्या खरेदीचे काम होते. माझ्या सोबत श्री. अनिल कर्णिक मदतीस असायचे. रोज आम्हांस नावेने हातखूर येथे व तेथून आजूबाजूच्या शहरात जाऊन धान्य, कडधान्य, भाज्या, हार, फुले, आणखी काही आवश्यक वस्तू आणणे, हे करावे लागे.

''श्रीं''चा ढोपा फार दुखतो हे श्री. रघुनाथरावांकडून कळतांच ''श्रीं''कडे चौकशी केली. सोबत भाऊकाका मुजुमदार, आमचे सांताक्रूझचे गुरुबंधू सोबत होते. ते बारा क्षाराची औषधे देणारे वैद्यही होते. ''श्रीं''ना ते रोज त्यांच्या बारा क्षाराच्या साबुदाण्यासारख्या गोळ्या देत आणि ढोप्यावर ते औषध स्प्रेने मारीत असत. त्यामुळे प.पू. महाराजांना बराच

उतार मिळाला. प्रवचनास बसण्यापूर्वी व रात्री झोपतांना प.पू. श्रीमहाराज, भाऊकाकांची सेवा त्यांचे महत् भाग्याने स्वीकारीत असत.

भागवत सप्ताहास आलेली मुंबई पुण्याची मंडळी १०० ते १२५ पर्यंत असतील. संपूर्ण 'श्री भागवत सप्ताह' अगदी निर्विघ्न, भक्तीभावांत पार पडला.

आम्ही सर्व भक्त सेवेकरी मंदिराच्या आसमंतात उघड्या अंगणांत-परिसरांत रात्री पथाऱ्या टाकत असू. परंतु कोणासही, थंडी नसल्याने, काहीच त्रास झाला नाही.

पुणे-मुंबईकर आपापल्या जागी येऊन स्थिरावले. प.पू. श्रीमहाराजांचा मात्र दि. २४.१.१९८८ ला दौरा सुरू होऊन त्यांचे अकोल्यास प्रस्थान झाले.

२१०) प.पू. महाराजांचा वर्धापन दिन! (वय ७८ वर्षे पूर्ण)

कल्पनाच करवत नाही, ह्या वयात प.पू. महाराज पुणे-कुरवपूर, कुरवपूर-पुणे-अकोला, अकोला-पुणे लागलीच पुणे-गाणगापूर, गाणगापूर-पुणे, पुणे-दादर असे खडतर दुर्दम्य प्रवास प्रकृती स्वास्थ्य नसताना कसे करत होते? प्रथम श्रेणीचे रेल्वेचे रिझर्व्हेशन आम्हांस आवडत नाही. तेवढे पैसे गोरगरीबांना द्यावे. ह्या प्रवासाबरोबर होणारे सप्ताह, प्रवचने, दोन दोन, तीन तीन तास आसनस्थ होणे आणि सतत वक्तव्य-कथन करीत रहाणे. हे नमुन्यादाखल वर दिलेले प्रवास, पुण्याहून कुरवपूरला दि. २३.१२.१९८७ ला निघाल्यापासून दादर येथील सप्ताह दि. २५.२.१९८८ पर्यंतच्या कालावधीचे आहेत. कसे ते पहा -

ह्या कुरवपूर सप्ताहापूर्वी सालाबादप्रमाणे दि. ३०.७.१९८७ पासून प्रवास बार्शी, ३१.७.१९८७ तुळजाभवानी, १.८.१९८७ धाकटी देवी, २.८.१९८७ मोठी देवी, ३.८.१९८७ गाणगापूर, १९.१०.१९८७ गुरुद्वादशी वाडी, २६.१०.१९८७ भागवत सप्ताह वसई, ४.११.१९८७ विरार दत्तयाग, ५.११.१९८७ येऊन हे झाले.

दि. २४.१२.१९८७ पुण्याहून कुरवपूरला प्रयाण

दि. २६.१२.१९८७

ते ०२.०१.१९८८ भागवत सप्ताह कुरवपूर

२४.०१.१९८८ अकोल्यास प्रस्थान

०४.०२.१९८८ अकोल्याहून महाराष्ट्र एक्सप्रेसने पहाटे ६ वा. पुणे स्टेशनवर आगमन

०६.०२.१९८८ गाणगापुरी प्रयाण

१५.०२.१९८८ पुण्यात आगमन

१८.०२.१९८८ सकाळी डेक्कन एक्सप्रेसने दादरला सकाळी १०.२० ला आगमन

१९.०२.१९८८ प.पू. नाना महाराजांचे उपस्थितीत भागवत सप्ताह श्री. जुवेकर गृही प्रारंभ
२५.०२.१९८८ भागवत सप्ताह समाप्ती

दि. ९.२.१९८८, मंगळवार, माघ वद्य ६, प.पू. महाराजांचा वर्धापन दिन आम्ही मुंबईकर भक्त मंडळींनी गोरेगांव, अभिषेक येथे नागल्यांच्या घरी साजरा केला. सालाबादप्रमाणे प.पू. श्रीमहाराजांचे तसबिरीची पूजा शोडषोपचारे करून, दीप प्रज्वलीत करून जन्मवेळी, पहाटे ६.२० वाजता, पुष्पवृष्टी करून दिगंबराच्या धुनचा प्रारंभ झाला. ह्या वर्षी विशेष म्हणजे अनपेक्षितपणे 'जगद्गुरु शंकराचार्य श्री कृष्णानंदतीर्थ स्वामीजी' महाराज द्वारका, जगद्गुरु कर्नाटक हे श्री. पूज्य राजेश्वर शास्त्री यांचे सोबत उपस्थित झाले. सर्व भक्त मंडळीचा भक्तीभाव बहरून आनंदास उधाण आले. आचार्यांचे श्री. राजेश्वर शास्त्रींसह यथायोग्य स्वागत, पूजन झाले आणि आम्हा सर्वांस व आमच्या या कार्यक्रमास आशीर्वाद लाभले.

आमच्या परम पूजनीय सद्गुरु श्रीदत्तमहाराजांना उदंड आयुष्य लाभो, त्यांचा आम्हाला जास्तीत जास्त सत्संग, सहवास लाभो ही आम्ही सर्वांनी त्यांच्यापुढे प्रार्थना केली.

सायंकाळपर्यंत आमचा हा ''श्रीं''च्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि आनंदात पार पडला. सर्व भक्तांच्या अंत:करणात एकाच दिवशी एकाच स्थळी एकच सद्गुरु प.पू. दत्तमहाराज होते तो आनंद काय वर्णावा? सद्गुरुंच्या संकल्पाने सर्वांठायी संचारीत झालेली चित् शक्ती समष्टी रुपाने गात होती, नाचत होती.

सायंकाळी प.पू. महाराजांच्या अनेक आठवणी सर्वांच्या तोंडून ऐकायला मिळाल्या. ''श्रीं''ची आरती झाली. सारे वातावरण प.पू. श्रीमहाराजांचे स्मरणाने दुमदुमले होते.

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त! हे श्री जगद्गुरु कसे उपस्थित झाले?

जगद्गुरु शंकराचार्य कर्नाटक, यांचे आगमन राजेश्वरशास्त्रींसोबत पुणे येथे श्री वासुदेव निवासात दि. ८ जानेवारी १९८६ मध्ये झाले होते. मी व म्हसवडकर आणि निमकर आश्रमात होतो. श्री. राजेश्वर शास्त्रींना आणि स्वामी महाराजांना घेऊन गोरेगांव जयप्रकाश नगर हनुमान मंदीर द्वारकाधिश मठात जायचे होते. हे मंदीर व मठ माझ्या घराशेजारीच होते. आम्ही त्यांना म्हसवडकरांच्या गाडीने गोरेगांवी आणले. दि. १०.१.१९८६ रोजी हा सहप्रवास झाला. दुसऱ्या दिवशी जगद्गुरु व राजेश्वर शास्त्री आमच्या घरी आले होते. त्यांनी ती ओळख ठेवली, हे सर्व ''श्रीं''च्या मुळेच घडले.

२११) 'श्री गणेशदत्त रेणुकादेवी खाजगी न्यास'

श्री. रायरीकरांनी प.पू. महाराजांची आणि सर्व भक्तांची भूमिका, भावना, इच्छा समजावून घेतली आणि त्याप्रमाणे न्यासाचा आलेख तयार केला. ''श्रीं''चे जे म्हणणे होते की तीन किंवा चार विश्वस्त पुरे झाले, यांवर श्री. रायरीकर म्हणाले, ''चार ट्रस्टी हे झाले मग त्या दोघांची नांवे कशाला शिल्लक ठेवता, त्यांनाही म्हणजे श्री. अशोकराव व श्री. अनिल यांनाही ट्रस्टी करा!'' ''श्रीं''नी त्यांचा सल्ला मान्य केला. दुसरे ''श्रीं''चे म्हणणे होते की, ही 'श्री रेणुका निवास' वास्तू ही सुद्धा 'श्री रेणुका मातेची' आहे, तेव्हा ती ही न्यासांत सामील करा!

श्री. रायरीकर म्हणाले, ''गुरुजी, आपण वास्तुही या ट्रस्ट डिडमध्ये घातली तर त्या वास्तूचे व्हॅल्यूएशन (किंमत) करून एकूण होणाऱ्या रकमेवर स्टॅम्प ड्युटी भरावी लागेल, ती फार होईल! तुमची तशी इच्छाच असली तर तसे आपले इच्छापत्र तयार करा व त्यात म्हणा ही वास्तू न्यासाची म्हणजेच श्री रेणुका मातेची आहे.''

हाही सल्ला ''श्रीं''ना पटला. मग त्याप्रमाणे सर्व लक्षात घेऊन 'श्री गणेशदत्त रेणुका देवी न्यासाचा' आलेख तयार होऊन सब-रजिस्टर ऑफिस पुणे येथे दि. १८.१०.१९८८ रोजी या न्यासाची नोंदणी झाली.

या न्यासाचा मूळ उद्देश असा आहे, न्यासाच्या रकमेच्या व्याजांतून कवीश्वर घराण्यांतील कुलाचार व कुलधर्माप्रमाणे श्री गणेश, दत्त, रेणुकादेवी या देवतांची उपासना व्यवस्थित व्हावी. नित्यपूजा अर्चा, नैवेद्य व अखंड नंदादीप आणि वर्षांत येणारे (वार्षिक) कुळधर्म कुलाचार साजरे व्हावेत, या करिता या रकमेच्या व्याजांतून येणाऱ्या रकमेचा विनियोग करायचा आहे.

वरील देवतांची पूजा-अर्चा करण्याचा हक्क प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या मुलांना वंशपरंपरागत राहील. विश्वस्तांनी श्री गणेश, दत्त, रेणुकादेवी या देवतांची पूजा-अर्चा तसेच कवीश्वर घराण्यांतील कुलाचार कुलधर्माप्रमाणे नीट होण्यासाठी देखभाल करायची आहे.

विश्वस्तांनी मूळ रकमेचे संरक्षण, अधिक संवर्धन, सांभाळायचे आहे. व्याजांतून येणाऱ्या रकमेचा विनियोग मूळ उद्देशाप्रमाणेच होत आहे. इकडे लक्ष ठेवून न्यास रकमेत वाढ कशी होईल याची देखील दक्षतेने काळजी घ्यायची आहे. याशिवाय प.पू. महाराजांनी आपल्या स्वहस्ते दोन लेख आपल्या स्वाक्षरींसह (सही करून) लिहून दिले आहेत. ते लेख म्हणजे ''श्रीं''चे इच्छापत्रच असून त्यांत त्यांनी हे संकल्पपत्र व्यवहाराच्या दृष्टीने उपयुक्तता वाटल्यास व विधीज्ञांचे मत ठरल्यास हे रजिस्टर करून ट्रस्ट पत्रांच्या फाइलीत ठेवावे असे म्हटले आहे.

१) पहिल्या लेखात देवार्चनाकरिता ही आर्थिक व्यवस्था कशी घडून आली व या आर्थिक व्यवस्थेच्या व्याजांतून कोणते कार्य कसे त्याचे संकल्पाप्रमाणे चालू रहावे ही लिहीले आहे.

२) दुसऱ्या लेखात कवीश्वर घराण्यांतील वार्षिक धार्मिक कर्तव्ये कोणती, अगदी दैनंदिन कार्यक्रम नित्य उपासनेपासून, देवाजवळ तेलाचा नंदादीप अखंड असावा येथपासून ते प्रतिमासांत येणारे कुळधर्म, प्रत्येक कुलधर्म कशा पद्धतीने, रितीने करायचा, त्यांत नैवेद्यास कोणते पदार्थ कोणते पक्वान्न करायचे येथपर्यंत सविस्तर वर्णन केले आहे. त्यांत चैत्री पौर्णिमा, अश्विनी नवरात्र, कार्तिक पौर्णिमा व माघ पौर्णिमा हे चार प्रमुख कुलधर्म लिहीले आहेत. प्रत्येक कुलधर्म प्रात:कालपासून रात्रीपर्यंत विधी, नैवेद्य, आरत्या त्रिकाल, नमस्कार, प्रार्थना कसे करायचे याचे वर्णन आहे. सुवासिनी, ब्राह्मण, कुमारिका, बटू (ब्रह्मचारी) यांचे पूजन, भोजन, सर्वांचे अतिथींसह प्रसाद भोजन यांची समग्र माहीती अधिक मासांची माहीती या लेखांत आहे.

२१२) "श्री" व सौ. आईसाहेबांचे प्रेम!

प.पू. श्रीमहाराज आणि सौ. आईसाहेब यांचे घरच्या प्रत्येक कार्यास आम्हा उभयतांस न विसरता अगदी अगत्यपूर्वक आमंत्रण दिले आहे. सौ. आईसाहेबांनी तर चार आठ दिवस आधीपासूनच येण्याचा आग्रह धरला आहे. माझा उभयतांनी आणि घरच्या सर्वांनीच आपल्या घरांतील व्यक्ती म्हणून मान ठेवला आहे. जी आपली दैवते, श्रद्धास्थाने त्यांनीच आपल्या बद्दल एवढी आत्मियता, आपुलकी, प्रेम द्यावे यापेक्षा या जगतात अधिक भाग्य असे कोणते असेल?

चि. आमोदचा व्रतबंध गुरुवार, दि. २१.५.१९८१ ला झाला. पत्रिका प.पू. महाराजांनी पाठविलीच होती. शिवाय श्री. अशोकराव घरी येऊन आमंत्रण करून गेले. चि. अश्विनचा व्रतबंध सोमवार दि. १२.५.१९८६ ला झाला. चि. कपीलचा व्रतबंध बुधवार, दि. १४.५.१९८६ ला झाला. ह्या घरगुती कार्यक्रमांत आम्हा उभयतांची उपस्थिती सर्वांस आनंददायी झाली. तसेच चि. अजित यांच्या साखरपुडासमारंभास शनिवार दि. २८.५.१९८८ रोजी आम्ही उभयतां उपस्थित राहिलो होतो.

चि. अजित यांचा विवाह गुरुवार, दि. ७.७.१९८८ रोजी सकाळी ७ वाजता झाला. आम्ही आदल्या दिवशीच पुण्यात येऊन सोहळ्यास "श्री" व सौ. आईसाहेबांच्या आमंत्रणाप्रमाणे उपस्थित झालो. हे सर्व सोहळे, आम्हा सर्वसामान्यांस सन्मानाने पाहण्यास,

अनुभवण्यास मिळाले ही आमची भाग्यरेषा, आपणास दाखविण्याकरीता ''श्रीं''चे व सौ. आईसाहेबांचे प्रेम, वात्सल्य दाखविण्याकरीता म्हणून लिहीले आहे.

हीच आपुलकी आम्हांस श्री. अशोकमहाराज यांच्याकडून मिळाली. श्रीमती सवितावहिनी, श्री. अनिल आणि सौ. अनितावहिनी, श्री. अजित आणि सौ. जयश्रीवहिनी यांच्याकडून मिळत आहे. प.पू. श्रीमहाराजांच्या नातवंडांकडूनही तिसरी पिढी नागलेकाका, नागलेकाका म्हणून पुकारीत आहेत. प.पू. महाराज आणि सौ. आईसाहेबांनी वहात ठेवलेला हा प्रेमामृताचा झरा असाच वहात राहो ही श्री गुरुदेव प.पू. दत्तमहाराजांच्या व सौ. आईसाहेबांच्या चरणी प्रार्थना!

२१३) आमच्या कामधंद्याची ''श्रीं''ना काळजी!

आपल्या आई-वडीलांना आपली जशी सर्वतोपरी काळजी असते तशी श्री गुरुदेवांना असते. आपले योगक्षेम तेच सांभाळीत असतात. तरीही चिंता दर्शवितात. भेटीत पहिला प्रश्न, ''कामं वगैरे ठीक चालली आहेत नां, किती मोठी आहेत, पैसे वेळेवर मिळतात की नाही?'' असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. ''तुम्ही आधी म्हणजे आगाऊ पैसे घेऊन काम कां करीत नाही? पैसे संपले की पुढील रकमा मागाव्यात.'' आपण म्हणावे, ''महाराज धंद्याचे बाजारांत असे होत नाही. एकतर कामे मिळविण्याची स्पर्धा चढाओढ चालू असते. दुसरे म्हणजे काम स्वीकारताना अनामत रक्कम मालकांकडे ठेवावीच लागते. सर्वच ठेकेदार प्रामाणिक, सज्जन नसतात. नुकसान होत आहे असे वाटले किंवा फायद्याची तेवढी कामे करून कमाई झाली, पुढील राहिलेली कामे फायद्याची नाहीत, मग अर्धवट कामे टाकून सोडून देतात'' असे बरेच वेळा निर्मळ, प्रेमळ मनाला समजावून सांगावे लागे. ''श्रीं''चे पुढे खोटे तर बोलता येत नाही. परंतु काही छोटी मोठी कामे पैसे देणारी अथवा न देणारी असली तरी ''श्रीं''ना आपली चिंता राहू नये म्हणून ''कामे आहेत महाराज! सर्व ठीक चालले आहे'' असे सांगावे लागे.

१९८८ च्या 'श्री नारायण स्वामींचे' उत्सवास मला वाडीला जायला मिळाले नाही. आमचे गुरुबंधू सांताक्रूझचे भाऊकाका मुजुमदार गेले होते. त्यांच्याबरोबर मी प.पू. श्रीमहाराजांना पत्र दिले होते. आम्ही सर्व गुरुबंधू सालाबादप्रमाणे 'श्री नारायण स्वामींचे' उत्सवास चैत्र अखेर जाणार होतो हे ''श्रीं''ना माहीत होते. परंतु मला खरोखरच वेगवेगळ्या ठिकाणी छोटी छोटी कामे मिळालेली चालू होती म्हणून जाता आले नाही. माऊलीस चिंता वाटू नये म्हणून मी गुरुबंधूंबरोबर पत्र पाठविले. ''श्रीं''चे उत्तर पुढे देत आहे.

।। श्रीदत्त ।।

नरसोबावाडी
दि. १०.४.१९८८

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम.

आपले श्री. मुजुमदारांचेकडे दिलेले पत्र मिळाले. सध्या तेथील कामे मिळाल्याचे वाचून समाधान वाटले. पुण्यासही वे. मोरेश्वर घैसास यांचे द्वारा काही कामे मिळाल्यास बरे होईल. ईशकृपेने सर्व ठीक होईल. काळजी नसावी. 'श्री रेणुका निवासावरील' खोल्यांच्या कामाची घाई नाही. पुढे स्वखर्चाने, परवानगी मिळाल्यानंतर आरंभ झाला तरी चालेल. राहण्याची इच्छा आज तरी दिसत नाही. पण कर्तव्य होऊन जाणे बरे. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

आम्ही १७ तारखेस सकाळी येथून निघून कोल्हापुरी जाऊ. तेथे सर्वांना भेटून सह्याद्री गाडीने निघून १८ ला सकाळी पुण्यास येणे होईल.

कळावे.

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

प.पू. महाराजांना चि. दिनेश वारणा कॉलेजच्या वस्तीगृहांतून वरचेवर पत्र टाकीत असे. दिनेशचे पत्र येऊन कुशल समजले की,''श्री'' आम्हाला लिहीलेल्या पत्रांत त्याचे कुशल कळवित. चि. दिनेशला प्रत्येक पत्रांत, 'शिक्षण पदवी लवकर संपादन करून पिताजींचे सहाय्यास या' असे लिहीत. चि. दिनेशला आलेली उपदेशपर पत्रे, सर्वच गुरुबंधूंच्या पुत्र पौत्रांस मार्गदर्शक ठरावी म्हणून शेवटी देणार आहेच. 'श्री नारायण स्वामींचे उत्सवास' मला जायला मिळाले नाही, पण चि. दिनेशने मात्र वाडीला हजेरी लावून ''श्रीं''चे दर्शन घेतले. प.पू. महाराज दि. १८.४.१९८८ ला पुण्यात आले. मला ''श्रीं''च्या दर्शनाची ओढ असून पुण्यास कामे टाकून जाता येत नव्हते. ''श्रीं''ना ते आवडलेही नसते. प्रथम आपले कर्तव्य, त्यांत कसूर केलेली ''श्रीं''ना आवडत नसे. दर्शनाला जाताच प्रथम सांगायला लागायचे, ''आज काम बंद होते म्हणून येणे झाले'' वगैरे. मी गुरुबंधू श्री. शुक्लाजींचे सोबत पत्र पाठविले त्याचे आलेले उत्तर पुढे देत आहे.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ७.५.१९८८

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम.,

आपले पत्र व दक्षिणा श्री. शुक्लाजींचेकडून मिळाली. कुशल वृत्त समजून समाधान

वाटले. परवा चैत्रांत वाडीला श्री. नारायण स्वामींचे उत्सवांत चि. दिनेश मित्रांसह एक दिवस येऊन भेटून गेला. त्याची प्रकृती व अभ्यास बरा आहे. ईश्वरकृपेने त्याचे शिक्षण पूर्ण होऊन तो आपल्या सहाय्यास तयार होईल. तसे घडून येणेबद्दल श्री जगदीश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. २१ तारखेस आपली सर्वांची भेट होईलच. येथे ऑफिसमधील श्री. देशपांडे यांच्याकडे 'श्री गुरुचरित्र सप्ताह' दि. १६ ते २२ आहे. सायंकाळी ५ ते ७ आम्हाला प्रवचनास जावयाचे आहे. नंतर दि. २३ ते ३० 'श्री कसबा गणपती मंदिरात' 'श्री भागवत सप्ताह' पं. पारखी शास्त्रींनी ठरविला आहे. ती वेळ सकाळी १० ते १२ व दुपारी ३ ते ६ अशी ठरविली आहे. हे आटोपून आम्ही बार्शीस काही दिवस जाऊन येऊ. येथील वरील बांधकाम अजितला नको आहे. त्याने श्री. गद्रे यांना स्वतंत्र जागा बांधून देण्यास सांगितल्याचे समजते. तो हाँगकाँगहून १-२ दिवसांत परत येईल. ईशेच्छेनुसार काय घडते पहावे. पुढील श्री रेणुका निवास व्यवस्थेबद्दल काही निश्चित योजना आपणा तिघांचे विचाराने ठरविणेची आहे. श्री. गोडसे यांचे कानावर घातले आहे. तो विचार मांडण्यास १५-२० मिनिटांचा अवधी मिळाला पाहिजे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ.

दत्तात्रेय कवीश्वर

२१४) ''श्रीं''चे दर्शन व गोकर्ण महाबळेश्वर यात्रा!

'श्री रेणुका निवासमध्ये' दर्शनास गेलो असता पुढील महिन्यात महाशिवरात्र आली होती म्हणून की काय, पण ''श्रीं''नी मला विचारले, ''गोकर्ण महाबळेश्वरला जाणे झाले होते कां? महाशिवरात्रीला मोठी यात्रा असते.''

मी म्हटले, ''जाण्याचा योग आला नाही. पण सोबत कोणी गुरुबंधू निघाले तर या महाशिवरात्रीला जायला काहीच हरकत नाही.''

''बघा! कसे काय जमेल ते!''

श्री सद्गुरुंच्या आज्ञा भक्तांना या अशाच प्रकारच्या असतात. माझ्या सोबत येण्यास आमचे भाऊ ऊर्फ स.वि. मुजुमदार एका पायावर तयार होते. शिवाय श्री. नंदकुमार शृंगारपुरे आणि श्री. अनिल कर्णिक हे देखील निघाले.

दि. ४.३.१९८९ रोजी सायंकाळी मुंबई सेंट्रलहून सुटणारी सेमी लक्झरी एस्.टी.,

कारवारला जाणारी आम्ही पकडली. मुजुमदारांची कारवार, अंकोला ही चांगल्या माहीतीतील शहरे होती. दि. ५ ला आम्ही सकाळी ११ वाजता पोहोचलो. तेथून बस पकडून गोकर्ण महाबळेश्वरला पोहोचलो.

पहाटे उठून समुद्र स्नान, गणेशास पाणी घालणे, गोकर्ण महाबळेश्वराचे पूजन बिल्वपत्र वाहणे, जपजाप्य जेवढे जास्तीत जास्त करता येईल तेवढे केले. सर्व देवालयांत जाऊन दर्शन घेतले. तेथील पुजारी भट श्री. मुळे यांच्याकडे आम्ही उतरलो होतो. आम्हांस स्वतंत्र खोली मिळाली होती. फराळाचे व चहा, दूध, कॉफी सर्व काही सुविधा होत्या. त्यांच्याकडूनच मुख्य मंदिरात महाबळेश्वरावर अभिषेक करून घेतला. परतीचे प्रवासास दि. ७.३.१९८९, पहाटेची गोकर्ण-कुमठा बस मिळाली तर सकाळी ८.१५ ला कुमठा-मुंबई लक्झरी बस मिळाली. दि. ८.३.१९८९ रोजी सकाळी ८.३० ला दादरला पोहोचलो.

२१५) श्री हरिहरेश्वरचा तिसरा कार्यक्रम निश्चित झाला!

१९८७ चा वर्धापन दिन दि. १९.२.१९८७, गुरुवारी श्री. कुबडे यांच्या घरी होता. श्री. साबळे शेठजींकडे फॅक्टरीत श्रीदत्तयाग चालू होता. काही महिन्यानंतर प.पू. महाराज माटुंग्यास श्री. माधवराव तांबोळींकडे आले होते. दुपारी चार नंतरची वेळ होती. ''श्री'' छोट्या कॉटवर बसले होते. आम्ही सर्व गुरुबंधू आणि भक्तमंडळी खाली बसलो होतो. ''श्रीं''चे समवेत सुखसंवाद चालू होते. श्री. गोडसेंच्या मनात एक चांगली संकल्पना आली. मी, शृंगारपुरे,तांबोळीही समोर होतोच. त्यांनी प्रथम आम्हाला आपसात ही संकल्पना बोलून दाखविली व ''श्रीं''पुढे मांडायची कां ते विचारले. सर्वांस ती मनापासून पसंत पडली. श्री. गोडसेंनी सुतोवाच करण्यास श्री. तांबोळींचा आधार घेतला आणि नंतर सर्वांनीच त्या संकल्पनेची री ओढली. ती संकल्पना अशी,

श्री. गोडसे म्हणाले, ''महाराज! आता पुढील आपला वर्धापन दिन दि. ९.२.१९८८ ला येत आहे. वर्धापन दिनाच्या अलीकडे किंवा पलीकडे सात दिवस एखादा हॉल (कार्यालय) मुंबईत घेऊन या सप्ताहांत आपली श्री. विद्यारण्यांच्या गुरु-शिष्य संवादावर प्रवचने ठेवू. म्हणजे आम्हांस बरेच काही शिकायला, ऐकायला मिळेल.''

प.पू. महाराजांनीही ही संकल्पना लागलीच मान्य केली. फक्त एक बदल त्यांनी स्वतःहून सुचविला. ''अहो! मुंबईत कार्यालय कशाला? आपल्या नागल्यांचे श्री हरिहरेश्वर क्षेत्री मोठे घर आहे. भरपूर जागा आहे, शांत वातावरण आहे. हरेश्वरी जाऊन हा प्रवचन सप्ताह करूया.''

श्री. गोडसेंची संकल्पना म्हणजे श्री हरिहरेश्वराच्या तिसऱ्या कार्यक्रमाची नांदीच होय. एकदा श्री. प्रभुदेसाई म्हणाले होते की, ''प.पू. महाराजांना गावी चलण्याचा आग्रह करू नका. विघ्ने येण्याची शक्यता असते. प.पू. महाराजच गांवी जाऊया म्हणाले तर मार्गांत श्री ब्रह्मदेव सुद्धा प्रतिबंध आणू शकत नाहीत.''

''श्रीं'' ही संकल्पना विसरले नाहीत. त्यांनी मनःपूर्वक सर्व भक्तमंडळींसह माघांत हरेश्वरी जाण्याचे व श्री. गोडसेंची संकल्पना पूर्ण करण्याचे ठरविले होते. परंतु नेमके त्याच वेळांत ''श्रीं''ना अकोल्यास जाणे भाग पडले. त्याबद्दल त्यांचे आलेले पत्र वाचूयां.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २०.६.१९८९

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम

पत्र व्यवहार पहात असताना आपले मागील महिन्यांतील पत्र दृष्टीस पडले. समक्ष भेटीही एक-दोनदा झाल्या. त्यावेळी सामान्यतः बोलणे झाले आहेच. वाडीस गुरुद्वादशी करून तसेच इचलकरंजीस जावे लागेल. हे परवाच्या भेटीत आपणास सांगितले आहेच. त्यानंतर कार्तिक वद्य पक्षांत हरिहरेश्वरी श्री कालभैरवाचा उत्सव असतो, त्यावेळी चार दिवस हरिहरेश्वरी जाता आल्यास विचार करता येईल. उत्सवही पाहण्यास मिळेल. ईशेच्छेप्रमाणे सर्व घडेल, अथवा माघ वद्य तृतीयेस श्री लोकनाथतीर्थ स्वामींची पुण्यतिथी झाल्याबरोबर येथील परिस्थिती पाहून जाता आल्यास पहावे. मागच्या वर्षी माघात याचवेळी श्री. गोडसे, श्री. माधवराव, आपण, श्री. शृंगारपुरे सर्वांची इच्छा असूनही अकोल्यास सहस्रचंडी सांगतेस जावे लागल्याने तिकडे येणे राहिले. त्यावेळी मुंबईस यावयाचे होते. यावेळी हरिहरेश्वरांची इच्छा असेल तर हरिहरेश्वरी येथूनच येण्याचे ठरविता येईल. सहस्रचंद्र दर्शन शांतीचा विचार, येथील व देऊळगांवच्या मंडळींचा चालू आहे. त्याबद्दल काय होते ते पाहून माघात जमेल तर त्यावेळी नाहीतर फाल्गुनात शुद्ध पक्षांत जाऊन येण्याचे ठरविता येईल असे वाटते.

एकंदर परिस्थिती पाहून हे विचार मांडले आहेत. ईशेच्छा जशी असेल तसे घडून येईल. त्यातच समाधान मानून रहायचे आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

प.पू. महाराजांचे वरील पत्र येताच त्यांना पत्र लिहीले. त्यात ''आपणास गुरुद्वादशीला वाडीहून पुन्हा इचलकरंजी येथे जाणे नंतर पुण्यास येणे. सतत प्रवास आणि प्रकृती स्वास्थ्य ह्यांचा मेळ कसा बसत असेल ते कळत नाही. आपले प्रकृती स्वास्थ्य हे आम्हांस अत्यंत महत्वाचे आहे. इचलकरंजीस भागवत सप्ताहही होणार आहे असे कळते. तरी हरिहरेश्वरचा कार्यक्रम पुढे मागे झाला तरी चालेल. पण आपणास कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये असे वाटते. कळावे...''

आमच्या पत्रानंतर लागलीच दि. ३०.६.१९८९ चे आम्ही लिहीलेले पत्र व ''श्रीं''चे पुण्याहून दि. ६.७.१९८९ चे उत्तरी आलेले पत्र आम्हांस दि. ९ रोजी मिळाले ते पुढे देत आहे.

।। श्रीगणेशदत्त गुरुभ्योनमः ।।

३९/७, अभिषेक, जयप्रकाश नगर, ३ रा रस्ता,
गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
दि. ३०.६.१९८९

प.पू. गुरुमहाराजांचे पवित्र चरणी दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष,

आपले पत्र पोहोचले. वाचून परमानंद जाहला. आपले आगमन श्री हरिहरेश्वरी श्री कालभैरव जयंती उत्सवांत व्हावे ही श्रीचरणी प्रार्थना आहे. जयंती उत्सवाचा समारंभ कार्तिक वद्य सप्तमीपासून सुरू होतो. अष्टमीला रात्री १२ वाजता जन्मोत्सव असतो आणि नवमीस लळीत व प्रसाद भोजन समाराधना असते. तिन्ही दिवस रात्री ९ ते १२ कीर्तन असते.

यावर्षी विशेष म्हणजे नूतन उत्सवमूर्तीची स्थापना होय. सर्वप्रथम पितामह कै. यशवंत बळवंत नागले यांनी इ.स. १८९७ साली या श्री कालभैरव जयंती उत्सवाचा शुभारंभ प.पू. श्री नारायण महाराज (पुणे नजीक इंदापूर गांवचे) गुरुदेव यांचे हस्ते मूर्ती स्थापित करून, श्रीगुरुदेवांचे मार्गदर्शनाखाली केला. ही उत्सवमूर्ती; शाडूची, केवळ उत्सवापूर्वीच मखरांत ठेवितात. पूर्वीची मूर्ती विसर्जीत करून पुढील उत्सवांकरिता ही नवी मूर्ती कै. य.बा. नागले कुटुंबातून श्री इच्छेने येत आहे. प्रथम मूर्तीचा मुक्काम आपल्या गृही होईल. कार्तिक वद्य सप्तमीस मोठ्या मिरवणुकीने ती मंदिराकडे सन्मानपूर्व नेण्यास, स्थापनेस आपले मार्गदर्शन आम्हा सर्वांस व्हावे अशीच श्री कालभैरवाची इच्छा दिसते. आम्हा वरिष्ठ बंधुंसह सर्व कुटुंबीयांस आपल्या आगमनाच्या वार्तेनेच आनंदी आनंद झाला.

कार्तिक वद्य षष्ठीस अथवा त्याही आधी शुभदिन पाहून आपणास नेण्यास पुणे येथे मोटरकार घेऊन येऊ. नोव्हेंबर महिन्याची १८ तारीख, शनिवार आहे. आदल्या दिवशी

म्हणजे १७.११.१९८९ रोजी आम्ही आपणास नेण्यास येऊ. आपले सोबत अखंड सौभाग्यवती आईसाहेब तसेच प.पू. सौ. ताईमहाराज आणि श्री. रघुनाथराव असे गाडीमध्ये असावेत. घरची मंडळी किती निघतील, त्याप्रमाणे टेंपो, बसची व्यवस्था करता येईल. आदरणीय श्री. रा.रा. मोघेकाका व सौ. काकू आणि श्रीमती सुशीलाताई यांनीही यावे अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. त्याप्रमाणे सोय करू.

आपणाकडून वरीलप्रमाणे कार्यक्रम आखण्यास अनुज्ञा होताच सर्वांस आमंत्रण पत्रके पाठवू.

एका दिवसाचा ''श्रीदत्तयाग'' श्री कालभैरव उत्सवानंतर व्हावा अशी सौभाग्यवतींची इच्छा आहे. नवमीनंतर कोणती तिथी धरावी याचे मार्गदर्शन व्हावे. श्री. कृष्णा आर्वीकर यांचे कानी घातले आहेच. हरेश्वरी श्रावणांत किंवा तत्पूर्वी जाऊ तेव्हा तेथील ब्रह्मवृंद मिळतील का ते पाहू.

कोणत्या दिवशी पुण्याहून निघावे हे कळण्याकडे लक्ष आहे. सौ. आईसाहेबांस शिरसाष्टांग नमस्कार. थो.न.ल.आ.

कळावे विज्ञापना
आपले चरणी सदैव लीन
शशीकांत दि. नागले

''श्रीं''चे आलेले पत्रोत्तर

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ६.७.१९८९

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले, आम्ही श्री गुरुद्वादशीकरिता वाडीस जाऊ. तेथील कार्य संपल्यावर २-३ दिवसांनी तेथूनच इचलकरंजीस जावे लागेल. मागील वर्षी माणगांवी जमले प्रमाणे यावर्षी सर्व विद्यार्थी इचलकरंजीस ह्यावेळी जमणार आहेत. तेथे 'श्री भागवत सप्ताह' ठरला आहे. तो कार्यक्रम आटोपून कार्तिक पौर्णिमेपर्यंत आम्ही पुण्यास येत आहोतच. नंतर कार्तिक कृष्ण ७ ते ९ (दि. १९ ते २१ नोव्हेंबर) 'हरिहरेश्वरी कालभैरव जयंती' महोत्सव आहे. तत्पूर्वी आपल्या इच्छेप्रमाणे १७ तारखेस मुक्कामाला तेथे जाण्याचे ठरविण्यास हरकत नाही. उत्सव आटोपताच २२ तारखेस शक्य झाल्यास 'श्रीदत्तयाग' आटोपून इकडे परत येता येईल. तेथील ब्राह्मण मंडळी याग करू शकतील. वे. कृष्णदेव आर्वीकर हे नवरात्रींकरिता नागपूरला घरी जाणार आहेत. त्यांचे येणे तोपर्यंत इकडे झाल्यास तेही करू

शकतील. तेथील ब्रह्मवृंदासही सांगून ठेवावे. तेथील उत्सवही चार दिवस पाहण्यास मिळेल. आपली सर्वांची इच्छाही पूर्ण होईल. उत्सवानंतर पुण्यास थेट येणे झाल्यास बरे होईल. पुढील कार्यक्रमाचाही विचार तेथे आल्यावर करणे शक्य होईल. सर्वांस यथोचित नमस्कार, आशीर्वाद.

कळावे.

आ.

दत्तात्रेय कवीश्वर



२१६) श्री वामन निवास वरचा मजला!

प.पू. महाराजांचे सहस्रचंद्र शांती महोत्सवांत परगांवाहून येणाऱ्या भक्तांची सोय कशी करावी याबद्दल ह्या महोत्सवाची समिती आणि ट्रस्टी यांची सभा झाली. ८ ते १० दिवस पुण्यात काही कार्यालये आरक्षित करण्याचा मानस होता. परंतु या महोत्सवाच्या नजिक कार्यालये मिळणे आणि दुसरे म्हणजे त्यांची १० दिवसांची भाडी इतकी महाग पडू लागली की त्या खर्चात आपल्या श्री वामन निवासाचा दुसरा मजला बांधणे होईल हा विचार पुढे आला. समस्त ट्रस्टींपुढे जबाबदारीने बांधकाम करण्यास आणि उत्तम प्रकारे योग्य मुदतीत पूर्ण करण्यास श्री. नागलेच समोर दिसले. ही आमचेवर असलेली गुरुकृपाच होय. त्यांची सेवा हा त्यांचाच गुरुप्रसाद आहे.

दि. १९.७.१९८९ रोजी प.पू. महाराजांसोबत श्री. भाऊसाहेब वाकडे यांच्याशी आमची श्री वामन निवासाचा वरील मजला वाढविण्याबद्दल चर्चा झाली. ''श्रीं''नी आमच्याकडून किती वेळात काम पूर्ण होईल व किती खर्च येईल, आम्हांस हे पुढील काम करण्यास वेळ मिळेल किंवा नाही अशा अनेक प्रश्नांची उकल करून घेतली. त्याबरोबर हेही बोलणे झाले की, ''आमचे ट्रस्टकडे पैसे कमी नाहीत. ह्यावेळी आम्ही तुम्हास एक अट घालणार आहोत. ती तुम्हास मान्य असेल तरच आम्ही तुम्हांला काम देऊ. ती अट म्हणजे तुम्हांला काम पूर्ण करून देण्याबद्दल योग्य ते कमिशन प्रसाद रुपाने दिले जाईल, ते तुम्हास स्वीकारावे लागेल. आमच्याकडे पैसा आहे, ती अडचण नाही. आम्हाला आवश्यकता आहे ती तुमच्यासारखी आत्मीयतेने, भक्तीभावाने काम करणाऱ्या माणसाची! शिवाय स्थापत्यशास्त्रांतील तज्ञ माणसाची. तुम्ही पूर्वी केलेले काम सर्व विश्वस्तांना आवडले आहे व हे कामही आपणांवर सोपविले तर पूर्वीप्रमाणे व्यवस्थित पार पडेल असा सर्वांचा विश्वास आहे.''

मी म्हटले, ''प्रसाद प्रसादाइतकाच दिला तर तो आम्हाला अधिक गोड लागेल. आम्ही आपले वचनाबाहेर नाही आहोत. ''श्रीं''ची सेवा मिळावी ही आमची मनस्वी इच्छा आहे एवढेच!''

दि. १७.९.१९८९ रोजी 'श्री गणेश दत्त रेणुकादेवी ट्रस्टची मिटींग' ''श्रीं''च्या समवेत श्री रेणुका निवासामध्ये होणार होती. श्री. गोडसे, शृंगारपुरे, मी अशा तिघांस ''श्रीं''नी घरीच प्रसाद भोजनास बोलाविले होते. श्री वामन निवासावरील बांधकामाबद्दल काही चर्चा करण्यास ''श्रीं''नी मला जरा लवकर येण्यास सांगितले हाते. मी घरी लवकर आलो. ७.३० ते ८ पर्यंत आमच्याबरोबर कामाबद्दल चर्चा झाली. चहापान वगैरे झाले. आठ वाजायला आले होते. ''श्रीं''नी विचारले, ''काय टी.व्ही.वर महाभारत पाहता कां नाही?'' मी म्हटले, 'कामावर नसलो, घरी असलो तर पहायला मिळते.' ''श्री'' म्हणाले, ''चला तर मग! आता महाभारत पाहूं या!'' दि. १७.९.१९८९ रोजी सकाळी ''श्रीं''च्या बरोबर श्री रेणुका निवासांत महाभारत पाहण्याचा योग आला.

२१७) प.पू. महाराजांचे हरेश्वरी आगमन!

दि. १४.१०.१९८९, आम्ही श्री हरिहरेश्वरच्या तिसऱ्या कार्यक्रमाच्या पूर्व तयारीस हरेश्वरी गेलो. सोबत होते गुरुबंधू भाऊसाहेब (सुधाकर) शृंगारपुरे, भाऊकाका मुजुमदार, नंदकुमार शृंगारपुरे आणि अनिल कर्णिक.

''श्रीं''चे आगमन आपल्या घरी होणार व त्यांचे सोबत भक्तगण देखील येणार! मग त्यांच्या आगमनाच्या, त्यांच्या निवासाच्या सोयींच्या तयारी करण्यात सुद्धा केवढा आनंद असतो. मन उल्हासित, उत्साही झालेले असते. आनंदाने बहरुन गेलेले असते. ती पूर्वतयारीची कामे करताना श्रमांची जाणीव नसते. इतर विचारांना स्थान नसते. सात्त्विक भावाने देह आपादमस्तक भरलेला असतो आणि त्या आगमन स्थानांत ''श्रीं''ची पाऊले आगमन होण्यापूर्वीच दृष्टीस भावपूर्ण दिसू लागतात. ही पूर्वतयारीची कामे म्हणजे ''श्रीं''चे पादसंवाहनच जणू चालू असते.

ही खेप आम्ही कुठे, काय, कसे, कधी करायचे व तत्सम लागणारी सामुग्री कोठे कोठे उपलब्ध होईल याचा परामर्ष घेण्याकरीताच ठरविली होती. अनेक गुरुबंधूंच्या सात्त्विक भावांतून ''श्रीं''च्या व्यवस्थेच्या निरनिराळ्या योजना, कल्पना निघाव्यात, त्या अंमलात आणल्या जाव्यात याचकरता ही आमची पहिली खेप होती. एका महिन्यावरच ''श्रीं''च्या आगमनाचा दिवस आला होता. आम्ही सर्वांनी ठरविलेल्या योजनाही लिहीतो, त्या

साकारण्यास आम्हांस जो आनंद मिळाला तो आपणासही वाचनांतून मिळावा. तसं पाहता मागील, ''श्रीं''च्या व सौ. आईसाहेबांच्या आगमनाचे दोन सोहळे समोर होतेच. परंतु ह्यावेळी प.पू. सौ. ताईमहाराजही ''श्रीं''चे सोबत होत्या. शिवाय मुंबईकर भक्त मंडळींबरोबर पुण्याचीही भक्तमंडळी होती.

पूर्वतयारी :

१) हरेश्वरचे घर खालून वरून भिंती छतापासून, छपरापासून झाडून साफ करणे, कौलांचे फटींतून विंचू काटा राहू नये, भिंतींचे कानाकोपऱ्यात कोळ्यांची जाळी जळमटे राहू नयेत, भिंती, खिडक्या, दरवाजे, कौलाखाली रिफा लाकूडकाम यांचे दोन हात पेन्टींगचे करणे, प.पू. महाराजांच्या खोलीच्या फळ्यांच्या सिलींगखाली कापडाचे आच्छादन करणे, ''श्रीं''ची आरामखुर्ची, टेबल रंगविणे, पलंगास पॉलिश करणे, पलंगावर त्या साईजची नवी सतरंजी, गादी, पलंगपोस घालणे, नवी चादर, ब्लँकेट आणणे, पूर्वेकडील अंगणांत ''श्रीं''चे प्रवचनास व्यासपीठ, उत्सवमुर्तींच्या मखरासमोर सजविणे.

२) घरांतील आंतील जमिनी तसेच घरासभोवतालची तिन्ही प्रशस्त अंगणे, औदुंबराचे अंगण आणि फाटकापासून घरापर्यंत येणारा रस्ता, ह्या सर्व जमिनी उखडून त्यांवर मुरुम पसरून पाणी मारुन चोपणे, शेणाने सारवून गुळगुळीत करणे, कुठे टापर टेपर, कुठे एखादा खडा राहू नये. माझ्या सद्गुरुंचे कोमल पावलांस टोचू नये. हे पहात असताना तर सर्वत्र त्या गाईचे शेणाने सारवलेल्या जमिनीवर ''श्रीं''ची उमटलेली पाऊलेच दिसू लागतात. ''श्रीं''ना समुद्रदर्शन अतिशय आवडते, मग घरापासून नारळी सुपारींच्या बागांतून आणि केतकीच्या बनांतून जाणारी फर्लांगाची पाऊलवाट काळजीपूर्वक न्याहाळायला नको का?

३) सर्व मंडळींकरिता नारळीच्या झापांची कवाडीसह तीन स्नानगृहे आणि तीन शौचकुपे तयार करण्याचे ठरले. ''श्रीं''च्या करिता व सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज यांच्याकरीता घरास लागून पक्की स्नानगृहे, शौचकुपे होतीच. वर स्लॅबवर पाण्याकरता टाक्या बांधल्या होत्या. त्यांचे लिकप्रुफींगचे काम करणे, त्या टाक्या आतून साफ करणे.

ग्रामपंचायतीचे पाणी या सात दिवसात भरपूर मिळावे, तिन्ही मंडपातील, घरांतील लाईटींग करता जास्त विद्युत सप्लाय मिळावा म्हणून त्या त्या खात्यांकडे अर्ज विनंत्या करून मंजुरी घेण्यात आली.

१०० ते १५० पर्यंत मंडळींच्या आगमनाचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे सर्वांची राहण्याची, उठण्या-बसण्याची सोय तसेच ''श्रीं''ची खोली होतीच, सौ. आईसाहेब सौ. ताईमहाराजांकरीता स्वतंत्र मोठ्या खोलीची योजना झाली. अंगणापुढील फुलबागा त्या महिन्यात फुलतील या दृष्टीने खतपाण्याची व्यवस्था करणे होते.

स्वयंपाक घर - मुंबईहून तीन ब्राह्मण आचारी आणणे. सात दिवसास पुरून उरेल असा अन्नधान्य साठा, टिकाऊ भाज्या, ऐनवेळी हरेश्वर श्रीवर्धन बागमांडला येथून ताजा भाजीपाला, हार, फुले, फळे, दुधदुभते सर्व सोयी कशा करायच्या ते ठरले. लहान मोठी भांडी, ताटे, वाट्या, पेले, देवस्थानकडून किंवा गावांतील ब्राह्मणांकडून आणण्याचे ठरले. जाजमे, बैठकी देवस्थानची उत्सवास लागतील मग गावकीतून आणण्याचे ठरले.

मुंबईहून व पुण्याहून येथे न मिळणाऱ्या जिनसा आणायचे ठरले. हरेश्वरांत तेव्हा गॅस नव्हते. चुली, शेगड्या, स्टोव्हची व्यवस्था, लाईट गेल्यास पेट्रोमॅक्सचे गॅसचे दिवे ह्या सर्व कामांची वाटणी आम्ही आमच्या सर्व तरुण स्वयंसेवक मंडळींवर सोपवली. मंडपांची, घराची सजावट, रोषणाई, आतषबाजी, तोरणे, पताका याशिवाय 'श्री कालभैरव मुर्तीच्या' मिरवणुकीस वाहन, टाळमृदुंग, वाजंत्री, भजनी मंडळ, फोटो व्यवस्था, व्हीडियो शुटींग, टेपरेकॉर्डींग, लाऊडस्पीकर्स ही व्यवस्था करण्याचे ठरले. 'श्री दत्तयागाची' तयारी, समीधा सर्व साहित्य व अधिक ब्रह्मवृंद लागल्यास सोय असावी. पाट चौरंग, बैठका लागतील.

सर्व गुरुबंधूस कार्यक्रम पत्रिका पोस्टाने पाठविणे. पत्रिकेत मुंबई-हरेश्वर व पुणे-हरेश्वर ह्या प्रवासाचे एस्.टी.चे वेळापत्रक जोडणे. पुण्याहून ''श्री'' आणि समवेत मंडळीस गाडी तर बाकी घरच्या मंडळीस मेटॅडोर बस, इतर मंडळीस एस्.टी. रिझर्व्हेशन करून देणे हेही ठरले.

दि. १६.१०.१९८९ पासूनच वरील सर्व कामे पूर्ण करण्यास प्रारंभ झाला. गडीमाणसांवर व स्वयंसेवकांवर कामे सोपवून आम्ही परतलो. दि. २३ ते ३.११.१९८९ आम्ही उभयतां सहकुटुंब व भगिनी सौ. प्रभा शृंगारपुरे व कुटुंब, भाऊकाका मुजुमदार यांनी हरेश्वरी मुक्काम ठोकून सर्व कामे पूर्ण करून घेतली.

दि. १५.११.१९८९ पासून भक्तमंडळी हळूहळू जमू लागली. 'श्री वासुदेव निवास भजनी मंडळाच्या' भगिनींनी ह्या कार्यक्रमास येण्याची अनुमती ''श्रीं''कडे मागितली. ''श्रीं''नी त्यांना आम्हांस विचारण्यास सांगितले. आम्हांस आनंदच झाला. उत्सवांत भर पडली.

मुंबईकर मंडळी दि. १६ ला पोहोचली. दि. १७ ला पहाटे पुण्याहून मंडळी एस्.टी.ने निघाली. मेटॅडोर बसने काही घरची मंडळी आली. तर सौ. आईसाहेब, सौ. ताईमहाराज, बेबीताई हे गाडीने आले. प.पू. श्रीमहाराज व श्री. रघुनाथराव यांना श्री. जोशी आपल्या गाडीने घेऊन आले.

श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, आधीच हे पवित्र स्थान।
लक्ष्मी, भगवती, गुरुवर, ह्या त्रयींचे आगमन।।

श्री सद्गुरु दत्तमहाराज, सौ. आईसाहेब आणि सौ. ताईमहाराज यांचे आगमन हरिहरेश्वरांचे तृप्तीनिवासाच्या अंगणांत होताच सहस्र फटाक्यांच्या मालिका कडाडल्या, अंगणी बिगुलांनी

ललकारी दिल्या. मंगल वाद्य, चौघडा निनादू लागला, भक्तगणांच्या कंठातून धुनचे स्वर उमटू लागले, ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' पताका, तोरणे, आकाशकंदीलाने सजविलेल्या फुलाहाराने नटलेल्या त्या प्रांगणात स्वर्ग अवतीर्ण झाला. रंगीबेरंगी विविध दीपमालीका चमचमू लागल्या. त्रैमूर्तींची पाऊले अंगणाच्या प्रवेशद्वारांत भक्तांकडून होणाऱ्या स्वागतास स्थिरावली. पुष्पवृष्टीचा वर्षाव झाला. नऊवारी साडी ल्यालेल्या, नथी बुगडी, दागिन्यांनी नटल्या-थटलेल्या सुवासिनी आपले हाती पंचारती घेऊन दुतर्फा त्रैमूर्तींना औक्षण करून ओवाळीत होत्या. त्या मंगल वातावरणात देहभान विसरून गुरुबंधू भक्तीभावाने धुनचा स्वर मिळवून नृत्य करीत होते. अशा सुमंगल सोहळ्यात सद्गुरु सर्वांस दर्शन देत, आशीर्वाद देत गृहांत प्रवेश करते जाहले.

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त!

पूर्वेकडील या प्रशस्त प्रांगणांत, मंडपात आग्नेय कोपऱ्यांतील मखरांत स्थापित होणारी 'श्री कालभैरवाची' तीन फूट नऊ इंच उंचीची श्यामल नीलवर्णी भव्य उत्सवमूर्ती उभी होती. आपले खरे उग्ररुप सोडून हा 'भक्तकामकल्पद्रुम कालभैरव' शांत स्वरुप, स्मितहास्य करीत गुरुमहाराजांचे स्वागत करणाऱ्या भक्तांकडे पहात होता. शतघ्न राक्षसाचा वध करून त्या शंकरभक्त दानवाचे शीर त्या दानवाचे अंतिम इच्छेनुसार डाव्या हातात धरून उभा होता. दुसऱ्या हाती तलवार (खड्ग), उर्ध्वकरी उजव्या हाती डमरू आणि डाव्या हाती त्रिशूल, दानवाचे धडावर पाय ठेवून वीरश्रींनी पण विजयी हास्य मुद्रेने जटा मोकळ्या पाठीवर सोडून उभा असलेला 'श्री कालभैरव' सर्व भक्तांकडे कौतुकाने पहात होता.

'मखरांत उत्तराभिमुख श्री कालभैरव' आणि मखराशेजारी व्यासपीठावर दुसरी मूर्ती, भक्तकामकल्पद्रुम गुरुदेवांची, सायंकाळी प्रवचनास सिद्ध होऊन बसली होती. पुण्याचे श्री. मोघेकाका यांचे विनंतीस मान देऊन दुसऱ्या दिवशी श्री गुरुदेवांचे आद्यशंकराचार्यांच्या सौंदर्यलहरीवर प्रवचन झाले. दि. १९.११.१९८९ कार्तिक वद्य सप्तमीपासून 'श्री हरिहरेश्वर आणि श्री कालभैरव योगेश्वरी मंदिरात,' मंदिराच्या बाजूच्या भव्य मंडपात श्री कालभैरव जयंती उत्सव सोहळ्याचा प्रारंभ झाला. सप्तमी, जन्मदिन अष्टमी आणि लळीत नवमी असा हा उत्सव!

सायंकाळी ४ वाजून ३० मिनिटांचे सुमारास हरिहरेश्वर ग्रामस्थ उत्तरेकडील अंगणांत जमू लागले आहेत. स्वयंसेवक सर्वांची चहापान व्यवस्था पाहण्यात व्यग्र आहेत. हरेश्वर बेंजो पथक फाटकापासून अंगणाचे रस्त्यांत दुतर्फा सज्ज झाले आहेत. तरुण आणि बाळगोपाळ फटाक्यांच्या माळा, सुतळी बॉम्ब, अनार हे आतषबाजीचे साहित्य घेऊन रस्त्यावर तयारीत आहेत. चौघड्यांचे मंगल सूर निनादू लागले आहेत. टाळ मृदुंगांसहित भजनी मंडळांनी दिंडी

उभी केली आहे. प.पू. श्रीमहाराज व श्री. रघुनाथराव 'श्री कालभैरव उत्सवमूर्तीच्या' मखरात आले आहेत. वरिष्ठ बंधू ज्येष्ठ दादासाहेब त्यांच्यासमोर पूजा साहित्याचे तबक धरून उभे आहेत. प.पू. श्रीमहाराजांनी श्री कालभैरव चरणी हळद-कुंकू अक्षदा वाहून फुले वाहिली. श्री. रघुनाथराव ''श्रीं''च्या सोबत आहेत. सर्वांचे पूजन होईपर्यंत ''श्रीं''ना आरामखुर्चीचे आसन देण्यात आले आहे. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज मूर्तीचे पूजन करीत आहेत. पंचारतीने ओवाळीत आहेत. सर्वांचे श्री कालभैरव पूजन झाले. पाच वाजता मिरवणुकीचा प्रारंभ होणार. थोरले बंधू, मूर्ती उचलण्यापूर्वी, ''श्रीं''ना हस्तस्पर्श करण्यास घेऊन चालले आहेत. सर्व भक्तांचे हात सरसावले आहेत. सर्वांनी श्री कालभैरव महाराज की जय म्हणताच आणि ''श्रीं''नी हस्तस्पर्श करताच, भक्तांनी मूर्ती उचलताना, बिगुलाची ललकारी, फटाक्यांचा कडकडाट झाला. उत्सवमूर्ती चौचाकी गाडीवर मखरांत स्थानापन्न झाली. ''श्रीं''नी गाडीस हाताने गती देताच भक्तांनी 'श्री कालभैरवांचा रथ' अंगणांतून बाहेर आणला आहे. बेंजो बॅण्ड वाजू लागला आहे. आतषबाजी चालूच आहे. बेंजो बॅण्डच्या भक्तीगीतांचे मंडळ, भगिनींचे भजनी मंडळ अशी मोठी मिरवणूक आता उत्तर दिशेने श्री कालभैरवाचा जयजयकार करीत निघाली आहे. ''भैरवनाथ भैरवनाथ, आम्ही अपराधी घ्या पदरांत'' ही हरेश्वर भक्त मंडळांची धून मुंबई-पुणे भक्तगणही म्हणत आहेत. श्री हनुमान पाराजवळ, गणेश मंदिरासमोर भव्य चौकांत मिरवणूक स्थिरावून स्त्रियांच्या फुगड्या, बंधू-भगिनींचे फेर धरून धूनगान होत आहे. येथून पुढे उजवीकडे पूर्व दिशेस वळून मिरवणूक मारळ गावांतून चालली आहे. येथील रहिवासीही सामील होत आहेत. आगरांतून मारळांत आणि बागेवरून देवघरांत मिरवणूक प्रवेश करीत आहे. हे सर्व आगर, मारळ, देवघर हे हरेश्वराचेच भाग आहेत. मुख्य रस्त्याने मिरवणूक येऊन दक्षिणेकडे आता मंदिराच्या रस्त्यास पायऱ्या चढू लागत आहे. मूर्ती पुन्हा उचलून घेऊन चौचांकीवर आणून, त्यावर पुन्हा ठेवून, कुरंदी दगडाच्या मंदिराच्या लाल रंगी रस्त्यावरून मिरवणूक जात असताना घराघरांतून यजमान व गृहिणी येऊन मूर्तीचे पूजन करीत आहेत. महाद्वारांतून रथयात्रा मंदिरांचे प्रांगणांत आली आहे. भव्य मंडपांत मखरांत 'श्री कालभैरवांची मूर्ती' प.पू. श्रीमहाराजांच्या हस्ते स्थानापन्न करण्यात आली. मंदिरात घंटानाद झाला. हा कार्यक्रम येथे संपून आम्ही सर्व प.पू. श्रीमहाराजांसह घरी परतलो. रात्रीचे भोजन आटोपून पुन्हा सर्व मंडळी मंदिराकडे आली. सर्वांनी देवदर्शने करून मंडपांत कीर्तनास बसली. ह.भ.प. नरेंद्रबुवा हाटे कीर्तनकार सालाबादप्रमाणे होते. बुवांना प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांची महानता माहीत होती. ग्रामस्थांपुढे त्यांनी प.पू. श्रीमहाराजांची माहीती, महती वर्णन करून ग्रामस्थांना झालेल्या महान सत्पुरुषाच्या सत्संगाची कल्पना देऊन आपण किती भाग्यवंत आहोत ते कथन केले. श्री कालभैरवानंतर प.पू.

महाराजांना वंदन करून बुवांनी कीर्तनास सुरूवात केली. रात्री बारापर्यंत कीर्तन चालले. प.पू. महाराजांबरोबर सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताईमहाराजही तिन्ही दिवस कीर्तनास उपस्थित होत्या.

दि. २०.११.१९८९, कार्तिक वद्य कालाष्टमी, श्री कालभैरव जयंती उत्सव! आम्ही सर्व भक्तमंडळी ''श्रीं''समवेत उपस्थित होतोच. रात्री नऊ वाजता कीर्तनास प्रारंभ झाला. 'श्री कालभैरव जन्माख्यान' सुरू झाले. रात्री बारा वाजता कीर्तनकार बुवांनी ''त्या दुष्ट शतघ्नाच्या संहाराकरिता शिवशंकराने आपली जटा जमिनीवर म्हणजे ह्याच हरिहरेश्वर क्षेत्री आपटली आणि त्या जटेंतून अक्राळ विक्राळ महाभयंकर शामलवर्ण श्री कालभैरव महाराज जन्मास आलेले आहेत'' असे म्हणताच तोफेचा मोठ्ठा आवाज दणाणला, घंटानाद, चौघडा, बिगुल ललकारी, शंखध्वनी, फटाक्यांचे आवाज, असंख्य रंगीबेरंगी अनारांची आतषबाजी या सर्वांचा एकच कल्लोळ होऊन आसमंत दणाणून गेला. पंधरा मिनिटे हा जल्लोष चालू होता. जमलेल्या सर्व भाविकांस गुलाल मिश्रीत शेवंती फुलांची दले दिली होती. ती 'श्री कालभैरवाच्या मूर्तीवर' उधळण्यात आली. समोरील मंडप पूर्ण भरून मंडपाबाहेरील पूर्वेकडील रस्ता, बाग, ग्रामस्थ, भक्त भाविकांनी गच्च भरला होता. अर्ध्या तासात सर्व स्थिर स्थावर होऊन सर्व मंडळीस आपआपल्या जागी स्वयंसेवकांनी बसवून प्रत्येकास जागेवर प्रसाद वाटला. पुढील कीर्तन कथाभाग शतघ्न राक्षसाचा वध अवतारकार्य कथन करून कीर्तन संपले. ''श्रीं'' आणि श्री. रघुनाथराव, सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज यांच्या करता मंदीर ते घर अशी वाहन व्यवस्था होतीच. रात्री एक वाजता घरी परतलो.

दि. २१.११.१९८९, कार्तिक वद्य नवमीस मंदिराकडे प्रसाद भोजन, भंडारा असतो. सर्व प्रसाद भोजनास गेले होते. प.पू. महाराज, सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज आणि काही भक्तमंडळी घरी होती. घरी देखील प्रसाद भोजन होतेच. रात्री नऊ ते बारा मंदिराकडे लळीत कीर्तन होऊन श्री कालभैरव जयंती उत्सवाची सांगता झाली.

दि. १८.११.१९८९ रोजीच फक्त एकदा सायंकाळी ४ ते ६ प.पू. महाराजांचे 'आद्यशंकराचार्यांच्या सौंदर्यलहरींवर' प्रवचन झाले.

दि. २२.११.१९८९ रोजी 'श्री कालभैरवावर चंदनाची महापूजा' प.पू. महाराजांच्या दीर्घ आयुरारोग्याकरिता संपन्न झाली. याच दिवशी प.पू. सौ. ताईमहाराजांना भावणारे अन्नदान भंडारा गांवजेवण, प्रसाद भोजन आपल्या घरी झाले.

चंदनाची महापूजा ही श्री कालभैरवावर चंदनलेपन करून केली जाते. गाभाऱ्यातील कालभैरव व योगेश्वरी ह्या मूर्तींवर जाड उगाळलेल्या चंदनाचा लेप दिला जातो. त्या लेपांवर

आखणी करून आपली गणेशाच्या शाडूच्या मूर्ती सारखीच, रंगरंगोटीसह, ह्या दोन्ही मूर्ती सगुण रुपात आपल्याला दर्शन देतात. दुपारी तीन वाजता लेपनास प्रारंभ होऊन सहा वाजेपर्यंत तयार होते. त्यानंतर पूजन पुष्पहार वगैरे शतघ्न राक्षसाचे दमन करण्यास हा उग्र संतप्त अवतार आहे म्हणून त्याला शांत करण्यास चंदन लेपन पूजा केली जाते. नवसाच्या आणि भक्त गणांच्या अर्थार्थी ही पूजा असते.

दि. २३.११.१९८९, कार्तिक वद्य एकादशीस आपल्या घरी प.पू. दत्तमहाराजांचे मार्गदर्शनाखाली श्री दत्तयाग सकाळी ८ ते दुपारी १.३० पर्यंत संपन्न झाला. पौरोहित्य वेदमूर्ती कृष्णदेव आर्वीकर यांनी केले. सहाय्यार्थ श्री. कल्याण गुरुजी (कृष्णदेवांचे मेहुणे) व बाकी ग्रामस्थ ब्रह्मवृंद होते. प.पू. श्रीमहाराजांच्या तथा सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज यांच्या उपस्थितीत हा 'श्री दत्तयाग' महत् भाग्याने यथाशास्त्र यथाविधी पार पडला. आम्हा सर्वांस त्रैमूर्तीचे आशीर्वाद लाभले. आम्हाला पूर्ण समाधान झाले. धन्य आम्ही महाराजांचे भक्त आणि सर्व ग्रामस्थ. हरिहरेश्वर श्री कालभैरव उत्सवास त्रैमूर्तींचा लाभ झाला.

दि. २४.११.१९८९, अंत:करणे गहीवरून टाकणारा दिवस. सात दिवस सुखासमाधानाचे, भक्तीभावांनी भारलेले, स्वर्गसुखाचे, परमानंदाचे गेले. असाच सत्संग सदा घडो! सकाळी अकरा वाजता प.पू. श्रीमहाराज, श्री. रघुनाथराव, श्री. मोघेकाका, नंदकुमार शृंगारपुरे यांच्या गाडीने, सोबत भाऊकाका मुजुमदार, असे निघाले. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज आणि सोबत मंडळी अशी नऊ सीटर गाडीने निघाले.

सर्व घर, सारा आसमंत ओस, विराण भासू लागला. सर्व पसारा आवरता घेऊन आम्ही नागले आणि शृंगारपुरे मंडळींनी जड अंत:करणाने काढता पाय घेतला. शनिवार, दि. २५.११.१९८९ रोजी आम्ही सर्व स्मृती हृदयात साठवून मुंबापुरी-कर्मभूमीस नित्य व्यवहार धर्माकरता परतलो.

२१८) श्री वामन निवास वरील बांधकाम प्रारंभ!

दि. २८.११.१९८९ रोजी प.पू. श्रीमहाराजांकडून आलेल्या निरोपाप्रमाणे पुण्यास गेलो. ''श्रीं''चे समवेत श्री. भाऊसाहेब वाकडे व पूर्वीचे लेबर कॉन्ट्रक्टर श्री. शेट्टींसह पुढील काम चालू करण्याबद्दल चर्चा झाली. ''श्रीं''च्या आज्ञेनुसार दि. ५.१२.१९८९ पासून वरील काम सुरू करण्याचे ठरले. मागील प्रमाणे ह्याही वेळेस प.पू. श्रीमहाराजांनी आम्हांस निवेदन पत्र दिले. ते निवेदन पुढे देत आहे.

दि. १५.१२.१९८९

श्रीमान् माननीय शशीकांत नागले इंजिनिअर यांना सप्रेम सादर निवेदन. श्री वामन निवासचे बांधकाम विश्वस्तांचे इच्छेप्रमाणे सध्या चालू आहे. हेही काम आपल्या देखरेखीने झाल्यास पूर्वीप्रमाणे व्यवस्थित रीतीने पार पडेल असा सर्वांचा विश्वास आहे. याबद्दल योग्य ते कमिशनही प्रसाद रूपाने आपणास दिले जावे अशीही सर्व विश्वस्तांची इच्छा आहे. तरी हे काम आपण पूर्णपणे लक्ष देऊन पार पाडाल अशी विश्वस्तांना आशा आहे. श्री गुरुमहाराज आपणासारख्या सज्जन शास्त्रज्ञांना प्रेरणा देऊन हे काम करवून घेतीलच. काळजीचे कारण नाही.

- दत्तात्रेय कवीश्वर

---*---

ह्यावेळी मानधनही स्वीकारावे लागेल ही ''श्रीं''नी अट घातल्याने माझ्या मनावर काहीसे दडपण आले होते. मुंबईस पुढील काम न घेता मी या कामावर माझे पूर्ण लक्ष केंद्रीत केले. या कामावर सुपरवायझरही न ठेवता मीच जातीने काम पाहू लागलो. कामाची गती वाढली. ह्यावेळी एक नवीन सहृदय गुरुबंधू ''श्रीं''च्या कडून लाभले, ते म्हणजे श्री. तुळशीदास लाटे. प.पू. श्रीमहाराजांनी श्री. प्रभाकर निजापूरकरांमार्फत दि. ३.१२.१९८९ रोजी त्यांची ओळख करून दिली. ''श्रीं''नी १.१.१९९० रोजी सायंकाळी आम्हा उभयतांस घरी बोलावून परिचय वृद्धींगत केला. श्री. लाटे साहेबांचे श्रीवामन निवासाचे ट्रस्टींना जसे सहाय्य झाले तसेच सहाय्य आम्हांलाही कामात झाले. संपूर्ण बांधकाम आम्हांस एप्रिल १९९० पूर्वी पूर्ण करणे अत्यावश्यक होते, कारण मे महिन्यात ११.५.१९९० पासून प.पू. महाराजांचा सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळा सुरू होणार होता.

श्री वामन निवासाचे वरील बांधकाम यथाशास्त्र योग्य मुदतीत पूर्ण झाले. आता सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळ्याकरिता 'श्री वामन निवास' सज्ज झाला.

२१९) प.पू. महाराजांचा सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळा

दि. १५.२.१९९०, माघ वद्य षष्ठी, प.पू. महाराजांचा ८० वा वर्धापन दिन. या वर्षी आम्ही सर्व मुंबईकर भक्तमंडळी 'श्री वासुदेव निवासात' आदल्या दिवशी येऊन ह्या ''श्रीं''च्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात सहभागी झालो. ''श्रीं''चे ८१ व्या वर्षांत पदार्पण आणि पुढे येत असलेला सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळा! सर्व गुरुबंधुंची मने आनंदातिशयाने बहरून गेली होती. माघ वद्य षष्ठी पहाटे ''श्रीं''चे प्रतिमेचे पूजन, पुष्पदलांची उधळण, दीप

प्रज्वलनाने झाली. पहाटे पासून १२.३० पर्यंत दिगंबराची धून झाली. प्रसाद भोजनानंतर मुंबईकर मंडळी मुंबईस परतली.

प.पू. महाराजांच्या सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळ्याच्या पूर्व तयारीस प्रारंभ झाला. अस्मादिक आता 'श्री वासुदेव आश्रम निवासी' आणि पुणेकरच झाले होते. सहाजिकच निवासी मंडळींसोबत आणि पुणेकर मंडळींसोबत ह्या सहकार्याच्या सेवेत सेवाभावाने कामे करण्याचा लाभ आम्हा भाग्यवंतासही झाला. 'श्री वामन निवासाला' लागून असलेल्या मोकळ्या मैदानाचा या कार्यास वापर करण्याची परवानगी मिळाली होती. स्टेजची रचना अशी केली की स्टेजवर चाललेला कार्यक्रम तिन्ही बाजूने कोठूनही पाहता यावा. मंडपाचे प्रवेशद्वारापाशीच चप्पल स्टॅण्ड, नंतर दोन बुकस्टॉलचे गाळे, या पुढील कमानीतून आत येताच स्वागतकक्ष, प्रतिक्षा कक्ष, चौकशी कक्ष व त्याला लागूनच समितीचे मोठे कार्यालय, नंतर आपण प्रमुख मंडपात प्रवेश करता. या शिवाय 'श्री वामन निवासाच्या' चारही बाजूंच्या मोकळ्या जागेत मंडप उभारण्यात आले होते. रस्त्याकडील प्रवेशद्वारांतून आत येताच दोन्ही बाजूस निरनिराळ्या आकाराची शास्त्रानुसार यज्ञकुंडे पं. राजेश्वरशास्त्री आणि पं. आनंदशास्त्री पारखी यांच्या मार्गदर्शनाखाली बांधून घेतली होती. मागील भागातही टाकीच्या बाजूस दोन कुंडे होती तर गॅरेज साईडला मोठ्ठे स्वयंपाकघर, गॅरेजसमोर कोठीची खोली अन्नधान्य साठविण्याकरिता केली होती. टाकीच्या पलीकडे भांडी धुण्यास जागा होती. उत्साह ओसंडून जात होता. यज्ञकुंडे बांधण्यास ऐनवेळी गवंडी न आल्याने आमच्या असे लक्षात आले की हे पवित्र बांधकाम उभय वेदमूर्ती पंडितांचे मार्गदर्शनाखाली आमच्या हस्तेच करून घ्यायचे असावे. ही परम पवित्र सेवा आम्हांस लागली. सराव नसल्याने मंदगती का होईना पण यथाशास्त्र बांधकाम करायला मिळाले. आम्हा इंजिनिअर मंडळींना हुकूम सोडून कामे नुसते मार्गदर्शन देऊन करून घेता येतात. पण सराव नसताना प्रत्यक्ष काम करणे किती कठीण असते हे स्वहस्ते केल्यानेच कळते.

आम्हा स्वयंसेवक मंडळात २० ते २५ प्रमुख खात्यांच्या कक्षांची विभागणी करून देण्यात आली. प्रत्येक खातेप्रमुख स्वयंसेवकाने आपली कामे जबाबदारीने सांभाळायची. आम्हा सर्व २५ स्वयंसेवकांचे प्रमुख होते श्री. नारायणराव दाते. आम्हा सर्व स्वयंसेवकांची दाते गुरुजींनी मिटींग घेऊन, कामे प्रत्येक विभाग प्रमुखाने, कशी करून घ्यायची याबद्दल मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाच्या प्रारंभापासून म्हणजे आठ दिवस आधीपासून आणि कार्यक्रम संपल्यानंतरही पुढील ३-४ दिवस रोज रात्री ११ वाजता आम्हा सर्व स्वयंसेवकांची श्री. दाते गुरुजी मिटींग घेत. कामांतील अडचणी, अनुभव चर्चा होई. त्याप्रमाणे सर्व दुसऱ्या दिवशी कार्यवाही होत असे. प्रत्येक कक्ष सांभाळणारे स्वयंसेवक व सहाय्यक भक्त निष्ठेने भावभक्तीने

आपापले सेवाकार्य करीत होते.

बुधवार, दि. ९ मे १९९० रोजी रात्री नऊच्या सुमारास उत्सवमूर्ती प.पू. श्री दत्तमहाराजांचे मंडपात आगमन झाले. उपस्थित भक्तगणांच्या जयघोषात ''श्रीं''चे स्वागत झाले. पहिल्या मजल्यावर ''श्रीं''ची खोली सुसज्ज होती. सेवेकरी मंडळी होतीच. बाजूची खोली ''श्रीं''चे सेवेकरी भक्त मंडळींकरिता होती.

गुरुवार, दि. १० रोजी उदकशांत सुरू झाली. आम्रपल्लवांनी अभिमंत्रीत उदक सिंचन सर्वत्र केले, तसे सर्व उपस्थित भक्त मंडळींवरही करण्यात आले. जन्मापासून घडलेल्या ज्ञात-अज्ञात पापक्षयासाठी व आत्मशुद्धीसाठी कुष्मांड होम झाला.

शुक्रवार, दि. ११ रोजी सनईच्या मंजूळ सुरात मंगलमय पवित्र वातावरणात सोहळ्यास प्रारंभ झाला. प.पू. श्रीमहाराजांच्या हस्ते पुण्याहवाचन होऊन संकल्प होताच वैदिक मंडळी व अन्य पारायणकर्ते आपापल्या जागी स्थानापन्न झाले.

अशा सोहळ्यांच्या समाप्ती-सांगतेला पर्जन्याचा वर्षाव होणे हे शुभसंकेताचे प्रतिक होय. प.पू. श्रीमहाराजांचे सहस्रचंद्र दर्शन शांती सोहळ्याची समाप्ती दि. १८ मे १९९० ला झाली आणि लागलीच वरुण देवांनी शुभसंकेत दिला. इतका पाऊस पडला की शेवटी रथयात्रा मिरवणूक रहित करावी लागली.

२२०) श्री रेणुका निवासाचे वरील बांधकाम

प.पू. श्रीमहाराज नेहमी म्हणायचे की, ''प.पू. सौ. ताईमहाराजांचे संकल्प मोठे असतात आणि ते पूर्णही होतात.'' श्री रेणुका निवासावरील बांधकामाचा संकल्प प.पू. सौ. ताईमहाराजांचा होता. तो संकल्प सिद्धीस कसा जाणार? पैसे कुठून आणायचे ते कसे फेडायचे? हा प्रश्न बाळ अजित यांचा होता. ''श्रीं''ना घरातल्या घरातच पत्रे देऊन केवळ याच कारणास्तव त्यांनी विरोध नोंदविला होता. तीनच वर्षे मध्ये गेली आणि चि. अजित यांच्या ऑफिसलाच जागेची गरज उत्पन्न होऊन श्री रेणुका निवासावरती एक मजला त्यांच्या कंपनीच्या खर्चानेच बांधायचा प्रस्ताव आला. झालेला बांधकामाचा सर्व खर्च पुढील मिळणाऱ्या भाड्यातून वळता होणार होता. प.पू. महाराजांची अनुमती संपादून कामास प्रारंभ दि. २८.३.१९९० रोजी दुपारी १.३० केवळ मुहूर्त करून झाला. खरी कामास गती ''श्रीं''च्या सहस्रचंद्र दर्शन शांती नंतर दि. ५.७.१९९० पासून मिळाली.

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''श्री वामन निवासाचे बांधकाम आता संपलेले आहे. आता श्री रेणुका निवासाच्या बांधकामाकरिताच आपले वास्तव्य पुण्यात होणार आहे. तेव्हा इकडे

तिकडे कोठेही न राहता आपल्याच घरी श्री रेणुका निवासात आपले राहणे व्हावे.''

व्यवहार सुद्धा ''श्रीं''कडेच शिकावा! आमचे पुण्यात काही नातलग होते. सोय झाली असती. परंतु नुसती गुरुआज्ञाच नव्हे तर ''श्रीं''चे अंत:करण व आमच्या बद्दलची आत्मीयता आम्ही अंतर्यामी जाणत असल्याने ते मान्यच करावे लागले. मागील वेळीही जानेवारी १९८६ ला श्री वामन निवासाचे पहिल्या स्टेजचे काम संपताच श्री रेणुका निवासाच्या मागील वाढीव बांधकामास प्रारंभ झाला होता. असेच ''श्रीं''च्या आज्ञेने आमचे बांधकामाकरिता मुंबईहून येणे होई तेव्हा मुक्काम श्री रेणुका निवासात असे. त्या ७-८ महिन्यात मी पूर्ण घरचाच झालो होतो. अगदी बालगोपाळ आमोद, रेणुका, आश्विन, कपील आणि रमा यांचा नागलेकाका किंवा नानाकाका तर थोरांचे शशीकांत. श्री वामन निवासाच्या कामानिमित्त मी पुणेकर, श्री वासुदेव निवासी झालो होतो. तसाच श्री रेणुका निवासात आडनांव 'कवीश्वर' लावत नव्हतो एवढेच. अहो, केवढे हे भाग्य! माझे आई-वडील, सौ. आईसाहेब आणि श्रीमहाराज. माझी भावंडे अशोकदादा, अनिल आणि धाकला अजित. ह्या सुसंस्कृत, आध्यात्मिक घरात सात्विक आहाराने माझी देहशुद्धी होत होती वर आध्यात्मिक वातावरणात मन बुद्धी सुसंस्कृत सात्विक बनत होते.

दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रह हेतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुष संश्रय:।।

मनुष्यजन्म प्राप्त झालेलाच आहे. अंत:करणात मुमुक्षुत्व निर्माण झालेले आहे, महासंत सत्पुरुषांचा सत्संग, सहवास, माझे मायबाप म्हणून लाभला आहे. श्री सद्गुरु माझा परमात्मा त्यांचा अनुग्रह तर आहेच आहे. आणखी काय हवे?

ना भुक्तीची ना मुक्तीची असे मला आंस।
जन्मोजन्मी तूंच सद्गुरु आणिक मी तव दास।।

दि. ३.७.१९९० ला ''श्री'' व रघुनाथराव सौ. नीलाताई जोशींकडे सालाबादप्रमाणे आषाढी एकादशीस आले होते. आम्ही सहकुटुंब दर्शन घेतले. दि. ४.७.१९९० ला ''श्रीं''च्या व रघुनाथरावांच्या सोबतच मी, दिनेश डेक्कन क्वीनने पुण्यात परतलो. गाडीत सारखा चहावाला येई. प.पू. श्रीमहाराज मला व दिनेशला वारंवार चहा घेण्याचा आग्रह करीत. परंतु ''श्रीं''च्या घरी वास्तव्यास पूरक, सात्विक भावाची, आम्ही काळजी घेत होतो. पण ''श्रीं''ना हे कसे सांगणार? आम्ही घरी गेल्यानंतर रात्री भोजनापूर्वी ''श्रीं''नी आम्हाकरिता चहा करायला लावला. माझा मुक्काम ''श्री'' गृहीच होता.

दि. ८.७.१९९० रोजी दुपारी १ वाजता स्लॅब कास्टींगला प्रारंभ झाला. चि. दिनेशही मदतीस थांबला होता. आपल्या वडीलांना कामात मदत करावी असे प्रत्येक पत्रात प.पू.

श्रीमहाराज लिहीत असत. स्लॅबचे कामाकरिता दिनेश थांबलेला पाहून ''श्रीं''ना आनंद झाला. सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत स्लॅबचे काम पूर्ण झाले. चि. दिनेश ९ च्या एस्.टी.ने कोल्हापूर मार्गे वारणा कॉलेज हॉस्टेलला, ''श्रीं''चा निरोप घेऊन गेला.

दुसऱ्या दिवशी चि. अजित यांचे आम्हांस सहाय्य झाले. चि. अजितने स्लॅबवर पाणी साठविण्याकरिता टूलूपंप आणला. हा पंप बांधकाम पूर्ण झाल्यावर स्टोअरेज टाकीत पाणी भरण्याकरिता लागणार होताच. पंप आणण्याची त्यांना कल्पना सुचावी याबद्दल मला आश्चर्य, कौतुक वाटले. मलाही हे सुचले नव्हते. दुसऱ्या दिवशी पाणी साठविण्याकरिता करायचे वाफे बहुतेक आम्ही आदल्या रात्रीच केले होते. दुसऱ्या दिवशी स्लॅबवर तुडुंब पाणी भरण्यास मिळाले.

दि. १.८.१९९० रोजी प.पू. श्रीमहाराज तुळजापूर, गाणगापूर वार्षिक दौरा, यात्रा संपवून आले. येताच आम्हाला खोलीत बोलावून आस्थापूर्ण ख्याली खुशाली विचारपूस केली. ही आस्थापूर्ण चौकशी नेहमीपेक्षा अधिक का झाली ते घरी आल्यानंतर सौ. लतास प.पू. महाराजांचे आलेल्या पत्रावरून कळले. सौ. स्नेहलतास ''श्रीं''चे आलेले पत्र.

॥ श्रीदत्त ॥

तुळजापूर, दि. २७.७.१९९०

सौ. स्नेहलताताई श. नागले यांना मंगल आशीर्वाद, वि.

आपले पत्र मिळाले. श्री. नागले यांची प्रकृती डॉक्टराना दाखविली आहेच. त्यांच्या सांगण्याप्रमाणे पूर्ण विश्रांती, औषधे घ्यावी म्हणजे काळजी राहणार नाही.

''नमः शिवाय'' या पंचाक्षरी मंत्राचा जप रोज अकरा माळा चालू करावा. भोजनापूर्वी, नंतर सवड मिळेल तेव्हा करण्यास हरकत नाही. मृत्युंजय विश्वेश्वराचे कृपेने गंडांतराचा दोषही असल्यास दूर होऊन जाईल. काळजीचे कारण नाही. चि. दिनेशचा अभ्यासही लवकरच संपून तोही श्री. नागले यांच्या हाताखाली राहून सहाय्य करील अथवा त्याच्या इच्छेप्रमाणे पुढे अधिक शिक्षणही घेऊ शकेल.

श्री. नागले यांची पत्रिका तेथे श्री. कोठुरकरांना एकदा दाखवावी म्हणजे ते योग्य तो निर्णय सांगतील. सौ. सुलभाच्या घराजवळ ते राहतात. काल्पनिक विचार दूर होऊन जातील. सर्वांना आशीर्वाद. मंत्रजप सुरू करावा. निराश होऊं नये.

कळावे,

आ.

दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. १८.८.१९९० रोजी श्री. तांबोळींकडे सौ. आईसाहेब आणि प.पू. सौ. ताईमहाराजांचे दर्शन झाले. श्री. गोडसे, म्हसवडकर, श्री. भाऊकाका मुजुमदार असे बरेच भक्तमंडळ होते. दुपारपासून सायंकाळपर्यंत सत्संग झाला. प.पू. सौ. ताईमहाराज जालन्यास परतल्या. दुसऱ्या दिवशी दि. १९, रविवारी सौ. आईसाहेबांचे सोबत मी व म्हसवडकर पुण्यास आलो.

वरील बांधकाम सुरू करायचे होते. वरील माळ्यावर जाण्याकरिता रस्त्याकडील अंगणाच्या बाजूने ऑफिसकरता बाहेरच्या बाहेर जिना करायचा होता. हे काम त्वरीत करायचे होते. कारण आमच्या कामास लागणारे सामान विटा, रेती, सिमेंट वगैरे याच जिन्याने चढविणे सोईचे होते व मुख्य म्हणजे आतील जिनाही खराब झाला असता. घरांतही त्रास झाला असता. प.पू. श्रीमहाराजांनाही धुळीचा, सिमेंट, रेतीचे कणांनी त्रास, मजुरांचे आवाज ह्याचा त्रास नको, म्हणून बाहेरच्या जिन्यास प्रारंभ केला. बाहेरील जिना हा म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडून प्लॅन बरोबर मंजूर करून घेतला होता. अर्धे अधिक काम झाले असेल आणि शेजारच्या प्लॉट मालकांनी मला कुंपणाजवळ हाक मारून हा जिना करण्यास हरकत घेतली. मी त्यांना कारण विचारले. ते म्हणाले, ''ह्या जिन्याने आमच्या घरातील उजेड नाहीसा होईल. अंधार येईल.'' मी म्हटले, ''अहो, तुमच्या व आमच्या घरात दोन्ही ओपन स्पेस मिळून १५-१६ फूटांचे अंतर आहे. आपली घरे पूर्वाभिमुखी म्हणजे पूर्व पश्चिम अशी आहेत. शिवाय आमचा हा जिना उघडा आहे. यावर आच्छादन स्लॅब नाही आणि केला तरीही तुमच्याकडे सावली येत नाही.'' गृहस्थ काही केल्या ऐकायला तयार नाहीत. मग म्हणाले, ''मालकांना बोलवा!'' मी म्हटले, ''आपणाला जर काही सांगायचे असेल तर आपणच आमच्या घरी याना.'' इतक्यात श्री. अशोकराव बाहेर आले. त्यांनी विचारले, ''काय आहे? काय म्हणणे आहे यांचे?'' मी सविस्तर सांगितले. अशोकरावांनी समजावण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. सदर गृहस्थ म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये ड्राफ्टमन् कां कोणत्यातरी जागेवर सर्व्हिसला होते. आम्हाला त्यांच्याशी वाद घालण्याचे काहीच कारण नव्हते. तरी सामोपचाराने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. ते टोकाला जाऊन म्हणू लागले, ''येथे जिना मी होऊ देणार नाही!''

मी म्हटले, ''अहो आमचा प्लॅन म्यु. कॉर्पोरेशन कडून मंजूर झालेला आहे. त्यात जिनाही दाखविला आहे. आमचे काम मंजूर झालेल्या प्लॅनप्रमाणे चालू आहे.'' यावर ''जिना येथे कसा करता ते पाहूं,'' ते म्हणाले.

आधीच या गृहस्थांच्या कुत्रे व्यवसायाने सर्व कुटुंबास विशेषत: ह्या कुत्र्यांची शेड प.पू. श्रीमहाराजांच्या बेडरुमला लागूनच असल्याने, कुत्र्यांच्या भुंकण्याने अहोरात्र प.पू. श्रीमहाराजांना

त्रास सहन करावा लागत होता. प.पू. श्रीमहाराजांनी चुकूनही होणाऱ्या त्रासाबद्दल तक्रार केली नाही. त्यांची कुत्री, मध्ये कम्पॉऊंड वॉल नसल्याने नेहमी आपल्या आवारात येऊन घाण विष्ठा करीत. श्री. अशोकराव व सौ. आईसाहेब त्यांना वारंवार विनंती करून पहात पण त्यांनी कधीच ऐकले नाही. आता ते स्वतः त्रास देऊ लागले. शेवटी श्री. अशोकरावांनी त्यांना स्पष्ट सांगितले की "तुम्हास कायद्याने जे करायचे ते करा. आम्ही मंजूर झालेल्या प्लॅनप्रमाणे आमच्या हद्दीत जे काम चालू आहे ते थांबविणार नाही."

शेजाऱ्यांचा फायदा होतो आहे, कुत्र्यांना शिक्षण देऊन तयार करून विकायचे, पैसे मिळत आहेत तर ठीक आहे. आम्हाला होणारा त्रास त्यापुढे विशेष तो काय? भाग्यवान शेजारी, संत सत्पुरुषाचा शेजार लाभला आहे!

दि. १५.९.१९९० ते २०.९.१९९० पर्यंत रोज सायंकाळी सौ. आईसाहेब यांची श्री वासुदेव निवासामध्ये न्यायचे व घरी आणायचे ही मातृसेवेची कामगिरी आम्हाला लाभली. नवरात्र जवळ आली. नवरात्रीच्या नऊ दिवसात श्री रेणुका निवासात देवीचा उत्सवच असतो. रोज प्रसाद भोजन असते. प्रसादास भक्त, अतिथीही बरेच असतात. त्याकरिता आठ दिवस आधीपासूनच पुढील खोलीत सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज काही वेळा आणखीही मदतनीस असतात, असे सर्व पुढील खोलीत धान्य, कडधान्य निवडण्याचे काम हातात सूप किंवा पाटावर धान्य घेऊन करीत असत. हे चालू असताना काही विषयांवर चर्चा, गप्पागोष्टी, विनोदही चालायचे. माझे काही लिखाणाचे, बिले तपासणे, लेबर कॉन्ट्रॅक्टरची बिले बनविणे, तपासणे अशी कामे असायची. मीही काम करता करता सहभाग घेत असे. दोन तीन दिवस लक्षात आले की प.पू. श्रीमहाराज ६.३० ला आश्रमातून आले की समोरच्या मुख्य दरवाजातून आत न शिरता घराच्या बाजूच्या मार्गाने मागील दारातून आत यायचे. हा समोरचा जवळचा आणि नेहमीचा रस्ता टाळून महाराज हा वळसा घालून का घरात प्रवेश करतात? वास्तविक ही बायका मंडळी धान्य निवडण्याची कामगिरी करीत असल्या तरी जाण्या-येण्यास मोकळी जागा होती. मी प.पू. सौ. ताईमहाराजांना विचारले, "ताई, महाराज नेहमीच्या जवळच्या मार्गाने न येता असे वळसा मारून मागच्या दारांतून का आत येतात?"

सौ. ताई म्हणाल्या, "प.पू. श्रीमहाराज प्रमुख दरवाजांतून आत येताच मी सन्मानपूर्वक बसलेली असलेली आदबीने उभी राहते. मला उठून उभे राहण्याचा त्रास होऊ नये म्हणून महाराज हा द्राविडी प्राणायाम करतात. छोट्या छोट्या गोष्टीतून सुद्धा आपल्या येण्या-जाण्याने कोणास त्रास होऊ नये म्हणून ते दक्षता घेतात!"

२२१) श्री रेणुका निवासात भागवत सप्ताह!

दि. १.१२.१९९०, शनिवारी श्री रेणुका निवासात 'श्रीमत् भागवत सप्ताहास गोकर्ण महात्म्याने' सुरुवात झाली. श्री. अशोकराव संहिता वाचन करीत असत व रोज दुपारनंतर प.पू. महाराजांचे झालेल्या अध्यायांवर प्रवचन होत असे. दि. २.१२.१९९० ला श्री भागवतास प्रारंभ झाला. भरपूर मंडळी प्रवचनास असायची. १९८६ मध्ये झालेल्या खालील नवीन हॉलमध्ये देवांचे समोरच उत्तराभिमुख ''श्रीं''चे व्यासपीठ होते. शेजारीच देवांकडे अभिमुख सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताईमहाराज बसत असत. कवीश्वर कुटुंबातील सर्व मंडळी, तिन्ही माहेरवाशिणी मुली, ''श्रीं''च्या भगिनी आणि सर्व बालगोपाळ, सानथोर उपस्थित असत. तिन्ही जावई, लेकी, सुना आणि नातवंडे या सर्वांचा निवास ''श्रीं''गृही होता. जणू 'श्री रेणुका निवास श्रीकृष्णांचे गोकुळच' भासत होते. वरचा स्लॅब झालेला असल्याने माळा साफसफाई करून वरतीही बसण्या उठण्याची, निजण्याची, तात्पुरती व्यवस्था होती. या ८.१२.१९९० पर्यंत चाललेल्या 'श्री भागवत सप्ताहास' मात्र व्रतस्थ होऊन श्रोता म्हणून आम्हांस बसता आले नाही. तरी श्री. अजितरावांनी आमच्या करता वरती एक स्पीकर लावला होता. काम पहाता पहाता ऐकायला मिळत होते. एकीकडे सेवा आणि दुसरीकडे ''श्रीं''चे कर्णमधूर महापुण्यप्रद भागवत प्रवचन! असे सात सात दिवस चालू होते. श्री. अजित यांनी संपूर्ण 'श्री भागवत सप्ताह' व्हीडीओ रेकॉर्डिंग केल्याने आजही भागवताच्या सीडी पहायला, ऐकायला मिळतात. सप्ताहाचे आयोजन हे सर्व काही प.पू. श्रीमहाराजांनी चि. अजित मार्फत करवून घेतले. दि. ९.१०.१९९०, रविवारी समाराधना झाली. प्रसाद भोजनाचा लाभ झाला.

२२२) ''श्रीं''चे वर कोर्टाचे वॉरंट!

दि. १८.२.१९९१ रोजी ''श्रीं''ना कोर्टात हजर राहण्याबद्दल वॉरंट बजावण्यात आले होते. सत्पुरुषांनाही प्रारब्ध, मग ते परेच्छा कां असेना, पण भोगावे लागते. हे वॉरंट कोणत्या केसचे होते हे मला कळले नाही. एकतर श्री. केशवराव जोशी यांनी प.पू. श्री मामा देशपांडे व प.पू. श्रीमहाराजांवर केलेली कोर्ट केस होती. अर्थार्थी प.पू. महाराजांचा या केसबाबतीत काहीच संबंध नव्हता. प.पू. श्रीमहाराज आमच्याशी बोलत असताना म्हणाले होते, ''अहो, ते केशवराव जोशी आमच्याकडे आले होते व आम्हांस विनंती करीत होते की कोर्टाला लेखी देऊन तुम्ही केस मागे घ्या! आम्ही त्यांना म्हटले, अहो केस दाखल करणारे आपणच आहात. आम्ही कुठे तुमच्यावर केस केली आहे? तुम्ही केली आहे ती मागे घ्यायची का चालू ठेवायची

हे तुम्हीच ठरवायचे आहे!''

कदाचित ह्याच केसबद्दलचे किंवा आपली नवी वास्तू वापरास देऊन ज्यावर ''श्रीं''नी उपकार केले, त्या फडणीसांच्या केसबद्दलचे ते वॉरंट असावे.

प.पू. श्रीमहाराजांना निवेदन करण्यास जेव्हा पिंजऱ्यात उभे राहण्यास बोलाविण्यात आले व ''श्री'' जेव्हा त्या पिंजऱ्यात येऊन उभे राहिले तेव्हा न्यायाधीश महाशयांनी ''श्रीं''ना बसण्याकरिता खुर्ची देण्यास सांगितले. कदाचित प.पू. श्रीमहाराजांची महानता तरी जज्ज साहेबांना पुण्यात माहीत असावी किंवा त्यांचे वय व सात्विक तेज पाहून त्यांनी तशी व्यवस्था केली असावी. परंतु प.पू. श्रीमहाराजांनी न्यायाधीशांना अभिवादन करून म्हटले, ''कृपया न्यायदेवतेपुढे आपण आम्हांस बसण्यास सांगू नये. आम्ही उभे राहू शकतो. ही आमची विनंती आहे!'' प.पू. श्रीमहाराजांनी आपले शिष्टाचार कधीही सोडले नाहीत.

२२३) मुलींनी पंजाबी पोशाख घालावा कां?

सौ. जयश्रीवहिनींची एका प्रसंगाची गोष्ट त्यांच्या शब्दात वाचूया.

मी आणि अजित बँकेच्या काही कामानिमित्त बाहेर गेलो होतो. त्यावेळी आम्ही नवसह्याद्रीमध्ये स्वतंत्र ब्लॉक घेऊन रहात होतो. श्री रेणुका निवासामध्ये घरी असताना प.पू. दादांचे (महाराजांचे) समोर मी साडीतच असायची. ड्रेसमध्ये म्हणजे पंजाबी पोषाखांत मी कधीच त्यांच्यासमोर गेले नव्हते. त्या दिवशी ज्या कामाकरिता आम्ही गेलो होतो तेथे आणखी काही कागदपत्रे आवश्यक होती आणि ती श्री रेणुका निवासामधील कपाटात ठेवलेली होती. अजित यांनी ती कागदपत्रे घरून घेऊन येण्यास मला सांगितले. माझ्या पुढे मोठे प्रश्नचिन्ह! मी ड्रेसमध्ये घरी जाऊ कशी? प.पू. दादा आश्रमातून घरी आलेले असले तर? अजित म्हणाले, ''अगं दादांना आश्रमातून येण्यास सायंकाळचे ६.३० ते ६.४५ होतात, तोपर्यंत तू ते कागदपत्र घेऊन घरातून बाहेर पडशील सुद्धा.''

मी ड्रेसमध्येच स्कूटरवरून घरी गेले. ५.३० वाजून गेले होते. कागदपत्र शोधून काढेपर्यंत काही वेळ गेला. थोडा वेळ घरच्यांशी गप्पा-टप्पा करण्यात गेला. साडेसहा वाजले. मी ती कागदपत्रे घेऊन लगबगीने बाहेर पडले. अंगणातून गेटपर्यंत पोहोचण्यापूर्वीच प.पू. श्री दादांची रिक्शा गेटसमोर उभी! प.पू. श्री दादा रिक्शांतून उतरण्याआधीच रिक्शावाल्याचे पैसे हातात काढून ठेवलेलेच असतात, ते देऊन, गेट मी उघडायला आणि प.पू. श्री दादा गेटमधून आत यायला एकच वेळ आली. त्यांनी आत जाण्याच्या घाईत माझ्याकडे ओझरता दृष्टीक्षेप टाकला. कदाचित त्यांनी मला पाहिले तरी घाईत ओळखलेही नसेल. पण प.पू. श्री दादा घरी आलेले

पाहिल्यानंतर त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय मी बाहेर कशी पडू? मला त्यांच्या मागोमाग घरात शिरणे व दर्शन घेणे, वाकून नमस्कार करणे क्रमप्राप्त होते. मी तसे केले. माझ्याकडे पहात म्हणाले, ''कोण जयश्री कां? बाहेर जायला निघालात काय? आमच्या रंजू जया सारख्या (नातींसारख्या) तुम्ही पंजाबी पोषाख घालता वाटतं? चांगलं आहे! नोकरी करता गाडीवरून (स्कूटरवरून अथवा मोटरसायकल वरून) जाताना हा पोषाख बरा सुटसुटीत पडतो!''

माझ्या मनात आदरयुक्त भीतीचे जे मोहोळ उठले होते, मनात अपराधीपणाची भावना निर्माण झाली होती, शंका निर्माण झाली होती त्याचे निराकरण झाले. मला हायसे वाटले.

पुढे दादांच्या रौद्रीशांतीकरिता आम्ही सर्व कुटुंबीय देऊळगांवला जाणार होतो. घरच्या कोणत्याही समारंभास मी साडीतच असायची. पण ह्या रौद्रीशांतीच्या मोठ्या समारंभास मी नऊवारी साडीत असावे असे प.पू. श्री दादांना वाटत असावे. त्यांनी सौ. आईसाहेबांस विचारले, ''रौद्रीशांतीचे समारंभास मुलींना नेसायला लुगडी वगैरे आहेत की नाहीत?'' मी मनात समजून गेले व या समारंभास प्रारंभापासून समारंभ संपेपर्यंत मी नऊवारीतच होते.

कवीश्वरांचे गृहात प्रवेश करण्यापूर्वी घराण्यातील रीतीरिवाज, सणवार, कुलधर्म, कुलाचार यांची मला काहीच कल्पना सुद्धा नव्हती. इतकेच काय पण प.पू. श्रीमहाराज, एक सत्पुरुष म्हणून त्यांची महानताही मला माहीत नव्हती. कॉलेज, नोकरी निमित्त बाहेर पडताना देवांना नमस्कार करणे आणि सायंकाळी दिवेलागणीचे वेळी रामरक्षा, मनाचे श्लोक असे काही म्हणणे इतकीच माझी भक्ती सीमित होती. या परम पवित्र कुळात महद् भाग्याने प्रवेश केल्यानंतर मला बरेच काही शिकावे लागले, आत्मसात करावे लागले. मी स्वत:ला धन्य मानते.

आम्ही उभयतां प.पू. श्री दादांचे परवानगीने स्वतंत्र ब्लॉक घेऊन कुटुंबाच्या आमच्यावरील जबाबदाऱ्या व कर्तव्ये निभावून नेत होतो श्री. अजित यांची नोकरी चांगलीच होती. मला आता बँकेत असलेली नोकरी चालू ठेवणे तेवढे गरजेचे नव्हते. त्यापेक्षा आपल्या कवीश्वर कुटुंबाच्या परंपरा अणि सांसारिक कर्तव्यकर्मांत वेळ व्यतीत करण्याचा मानस होता. एके दिवशी मी व अजित श्री रेणुका निवासात नेहमीप्रमाणे दर्शनास गेलो असताना, अजित यांनी प.पू. श्री दादांना म्हटले, ''जयश्रीच्या नोकरीची आता तशी आवश्यकता वाटत नाही. तर मग जयश्रीने ही बँकेतील नोकरी सोडावी कां?''

प.पू. महाराजांनी प्रतिप्रश्न केला, ''अहो, पण हे तुम्ही आधी जयश्रीच्या आई-वडीलांना विचारले कां? त्यांनी तिला बँकेत नोकरीत लावले आहे! मग प्रथम त्यांना विचारायला नको कां?''

प.पू. श्रीमहाराज सर्व शास्त्र संपन्न होते, शास्त्री होते. परंतु कर्मठ नव्हते. पुरोगामी विचारांचे होते. कालाप्रमाणे गरजेचे सोईचे आवश्यक ते स्वीकारावे अशी त्यांची भूमिका

होती. नोकरी, धंदा, व्यवसाय किंवा बाजारहाट या करता किंवा कोणतेही लांबचे जवळचे प्रवास करताना सुटसुटीत आणि सुरक्षित पोषाख असावा, घरात संस्कारक्षम अशा समारंभात, देवधर्म धार्मिक कार्यात आपले हिंदु आचार धर्माप्रमाणे पेहराव आणि वागणे असावे.

जुन्या गैर असलेल्या आचार-विचार-रूढी त्यजाव्यात. मुलाचे वडील किंवा कुटुंबप्रमुख म्हणून त्यांची भूमिका, विशेषत: पुत्र-सून, कन्या-जामात, सासर-माहेर अशा उभयपक्षी कुटुंबाशी सामंजस्याची विनयपूर्ण सहकार्याची असावी. उभयतांत समानाधिकार ''श्रीं''ना अभिप्रेत होते.

२२४) दहावीचे विद्यार्थ्यांस परीक्षेस आशीर्वाद!

(मार्गदर्शक पत्रे)

चि. अभिजीत (धाकटे चिरंजीव) याची एस्.एस्.सी.ची परीक्षा १५.३.१९९१ रोजी सुरू होणार होती. त्याकरिता प.पू. श्रीमहाराजांचे शुभाशीर्वाद मिळावे म्हणून चि. अभिजीतने प.पू. श्रीमहाराजांना पत्र लिहीले होते. त्या पत्रास आलेले उत्तर म्हणजे ''श्रीं''चे आशीर्वाद व विद्यार्थ्यास परीक्षेपूर्वी मार्गदर्शनच आहे. ते आपणा सर्वांस उपयुक्त ठरावे म्हणून खाली देत आहे.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १५.३.१९९१

सप्रेम आशीर्वाद, वि. क्षेम,

तुमचे १३ तारखेचे पत्र आज मिळाले. तुमची दहावीची परीक्षा आज सुरू झाली असेलच. उद्याचे प्रश्न आज चांगला अभ्यास करून पाहून ठेवावेत. म्हणजे प्रश्न लिहीताना स्मरण होईल. तसेच ''घोरात्कष्टादुद्धरास्मान नमस्ते'' हे पांच श्लोकांचे स्तोत्र म्हणून रोज प्रार्थना करावी, म्हणजे ईश्वरकृपेने परीक्षेत उत्तम यश मिळेल. काळजीचे कारण नाही. श्रद्धेने देवाची प्रार्थना नित्य चालू ठेवावी म्हणजे यशाची चिंता रहात नाही. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

वरील पत्र चि. अभिजीतला पोहोचताच आमच्या भगिनी सौ. प्रभा शृंगारपुरे यांनाही पत्रात शनि साडेसाती करता तिला व आम्हांसही शनिमहाराजांचा जप दिला होता व तो नित्य चालू ठेवण्यास सांगितले होते.

आम्ही ''श्रीं''ना थोरल्या व मधल्या मुलांची शिक्षणे पूर्ण झाल्याचे लिहीले होते. त्याचे उत्तरही गुरुबंधू भगिनींस मार्गदर्शक ठरावे म्हणून पुढे देत आहे.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १८.३.१९९१

सप्रेम आशीर्वाद, वि. क्षेम,

आपणांकडील मनीऑर्डर मिळाली. चि. अभिजीतच्या पत्राचे उत्तर पाठविले आहे, तेही मिळाले असेलच. चि. संदीप व चि. दिनेश दोघांचीही शिक्षणे पुरी झाली. ईश्वरकृपेने या जबाबदारीतून आपण मोकळे झाला, हे बरे झाले. पुढे योग्य ठिकाणी ते कोठेही नोकरीस लागतील ती चिंता नाही. आपला सर्व परिवारच सश्रद्ध, ईशभक्तीसंपन्न असल्याने सर्वांची काळजी ईश्वरालाच आहे. ईश्वरावर भार टाकून, ईशप्रार्थना नित्य श्रद्धेने चालू ठेवावी, कल्याण होईल. सर्वांना आशीर्वाद.

कळावे,

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

२२५) मायेची पांखर!

मागील माझ्या लेखांक १०७ मध्ये मला हृदयविकाराने गुरुसेवेत कसा प्रतिबंध निर्माण झाला आणि श्री गुरुकृपेनेच मी त्या विकारांतून कसा मुक्त झालो हे लिहीले आहेच. त्या दिवसापासून प.पू. श्रीमहाराज मात्र माझी सतत काळजी वहात आहेत हे प्रत्ययास येत असे. प्रभात दर्शनी ''काय चहा घेतलात का नाही'' येथून सुरवात होई. नऊचे सुमारास बेल वाजायची. ''नागलेंना फराळाचे काही दिले की नाही?'' दुपारी भोजन पंक्तीचा लाभ मिळे. ''श्रीं''च्या समोरच आमचे पान मांडलेले असायचे. ''श्रीं''चे लक्ष असायचे. ''सावकाश होऊ द्या. दुपारी जरा वामकुक्षी करावी. तास अर्धा तास तरी पडावे. नाहीतरी मजुरांची तासाभराची सुट्टी असतेच. जास्त खालीवर चढउतार करत जाऊ नका. सतत उभे राहू नका. बसायला खुर्ची वगैरे वर आहे का नाही? काही लागले तर कोणाबरोबर तरी निरोप पाठवावा.

उन्हं लागत असतील. डोक्यावर काही टोपी वगैरे आहे की नाही? नसेल तर टॉवेल उपरणे काहीतरी डोक्यावर घ्यावे.''

मी म्हटले, ''अजित यांनी काम सुरू करताच एक चांगल्यापैकी टोपी घेतली आहे'' अशी रोजची काहीना काही चौकशी सूचना चालू असायची. त्रिभुवनात दुर्लभ अशी सेवा आम्हांस प्राप्त झालेली. त्या संधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्यास अत्यंत उत्सुकता आणि ''श्रीं''ना मात्र वाटायचे आमचे कामामुळे नागलेना त्रास सोसावा लागत आहे. भुकेल्या भक्ताला मिळणारी ही मेजवानी, ब्रह्मानंद कोठे आणि आमच्या करता किती उतराई होऊ ही ''श्रीं''ची भावना कुठे! ते आमची सतत ऊठबस सांभाळायला बघायचे, सतत काळजी वहायचे. ते पाहून आमच्या जीवाची घालमेल व्हायची. अतिशय संकोच वाटायचा.

कासवी जशी आपल्या लेकराचे नुसते निरीक्षण करून पोट भरते तसे माझी श्री गुरुमाऊली सतत लक्ष ठेवून आमचे पोट भरायची. आध्यात्मिक भूकही भागवायची. हे आपलं गुपीत तुम्ही गुरुबंधू म्हणून सांगतो. रात्री झोपण्यापूर्वी अशी बैठक रंगायची की असं वाटायचं झोपूच नये, दिवसभराचा सारा शीण निघून जायचा. दुसऱ्या दिवशी प्रसन्न वाटायचे, उत्साह वाटायचा! ''श्रीं''चा शब्द कानी पडताच गोपालकृष्णांची बासरी कशी बेभान करीत असेल याचा प्रत्यय यायचा.

या वास्तव्यात निदान तीन वेळा तरी प.पू. श्रीमहाराजांनी म्हटले, ''आपण संपूर्ण दिवस दमता. पुन्हा हॉलमध्ये झोपता म्हणून सर्वांबरोबर लवकर उठावे लागते. त्यापेक्षा आमच्या खोलीत येऊन झोपत जा. आम्ही पलंगावर झोपतो, आपण खाली या खिडकीकडे झोपत जा. उठायला उशीर झाला तरी चालू शकेल. नाहीतरी मजूरवर्ग दहा वाजल्याशिवाय तरी येत नाही! दिवसभरांतही विश्रांती मिळत नाही.'' पण मन म्हणायचं, ''अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराजाचे शयनगृह, त्यात विसावलेला जगदीश्वर कोठे आणि चौऱ्याऐंशी योनीतून फिरणारा हा क्षूद्र जीव कोठे? शक्य आहे कां हे?'' पण मोहात रमणारे मन कधी म्हणायचे, ''ही गुरुमाऊली, पक्षिणी, ह्या जीवावर पाखर घालून आध्यात्माची उब देऊन ह्या जीवास योगमायेच्या अंड्यातून बाहेर काढू इच्छित नसेल ना? छे! इतका अधिकार या जीवाला प्राप्त होण्यास किती जन्म घेऊन तपस्या करावी लागेल. इतके भाग्य कोठले? ही माय माऊलीच्या वात्सल्यातून होणारी आज्ञा समजायची कां गुरुआज्ञा म्हणायची?''

मला काहीच कळत नसे. उगाच मनाला वाटते की, आपण ''श्रीं''च्या चरणाशी लोळायला पाहिजे होते. त्यांचे म्हणणे ऐकायला हवे होते. न जाणे रात्री सद्गुरुंचा कटाक्ष आपल्या शरीरावर पडला असता तर आपण मानव जीवनात मिळवायचा ''देवानुग्रह'' मिळवून बसलो असतो.

श्री सद्गुरु माझा, दैवी गुणांचा महासागर आणि मी गांवचे लेंड ओहळ. परंतु ओहळ समुद्रास मिळून त्या अफाट सागरात जिरून जातोच ना! असेच आपणही या सागरात विलीन होऊन गेलो असतो. आपली मर्यादा सांभाळून आम्ही राहिलो. आपली पात्रता आपल्या बुद्धीस समजते. ती बुद्धी तरी किती परिपक्व, किती शुद्ध, हा भाग वेगळा.

या ''श्रीं''च्या सान्निध्यात मात्र या दैवी गुणसंपन्नतेच्या सागरात अल्प-स्वल्प का होईना पण एखाद्या थेंबाचे काही कण प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. त्यांच्या कोणत्या दैवी गुणाचे किती गुणवर्णन दाखले देऊन करावे तरी थोडेच आहे. गुरुचरित्र उलगडणे म्हणजे बृहस्पतींसही नेति नेति म्हणावे लागेल. पण त्यांतील एकेक थेंब सुद्धा आम्हा पामरास अमृततुल्य होय!

''श्रीं''च्या सहवासात प्रसंगोचित एकेका दैवी गुणाचे समोर प्रात्यक्षिकच अनुभवायला, पहायला आणि शिकून संस्कार करून घ्यायला मिळाले. माझे मन मला म्हणते, आपण पूर्व संचित प्रारब्धवशात् ह्याच जन्मी कदाचित् पूर्णत्वास पोहोचणार नाही, पण त्याकरिता पोषक असलेले संस्कार त्यांच्या सहवासांतून शिकून, बिंबवून आत्मसात करायला हवेत तरच आपण त्यांचे शिष्य, साधक किंवा भक्त ठरूं. ''श्रीं''ची प्रवचने आपण ऐकतो, रेकॉर्ड करतो, पुन्हा त्याचे शब्दांकन करून ते ग्रंथीत करतो. पण या संस्कारांचे, गुणांचे प्रात्यक्षिक पहायला मिळणे खरंच भाग्याचे! त्याने सुसंस्काराची कायमची मुद्रा, छाप मनावर पडते. ''श्रीं''च्या कडून ती संपदा मिळविण्याच्या बाबतीत आपण प्रयत्नशील असले पाहिजे. आपण ''श्रीं''च्या सहवासाच्या बाबतीत खूपच भाग्यवान आहोत. ''श्रीं''चे हे दिव्यत्व वेळोवेळी अनुभवास मिळून सुद्धा प्रारब्ध, संचित आणि पूर्वकर्मानुसारिणी बुद्धी यांचे द्वारा ते किती आत्मसात करायला मिळाले हे सांगणे कठीण. पण जे गवसले ते वाटत सुटलो आहे. हे अद्वितीय धन असे आहे की, ''व्ययेकृते वर्धते एव नित्यम्'' म्हणून व्यय करतो. सर्वांस वाटल्याने ते वाढते आणि आनंदही देते. सर्वांसच तो परमानंद अनुभवास मिळावा ही आंतरिक इच्छा म्हणूनच लिहीतो. ह्या सर्व लिखाणांतून येणारे ''मी''त्वाचे, अहंपणाचे दोष असले तर ते माझ्या बुद्धीचे आहेत. तरी हंसक्षीर न्यायाने याचे वाचन करून सात्त्विक अहंकार प्रकट झालेला आढळल्यास त्याची उपेक्षा करावी.

२२६) वाडीस महापूजा

दि. १३.४.१९९१ रोजी आम्ही गुरुभक्त श्री. शृंगारपुरे उभयतां, आम्ही उभयतां, चि. अभिजीत आणि भाऊकाका मुजुमदार महालक्ष्मी एक्सप्रेसने वाडीस गेलो. प.पू. श्रीमहाराज व श्री. रघुनाथराव आधीच वाडीत पोहोचले होते. ह्यावेळी आम्ही तिघांनी म्हणजे मी,

शृंगारपुरे व श्री. भाऊकाका मुजुमदार यांनी प.पू. श्रीमहाराजांचे उपस्थितीत प.पू. श्रीमहाराजांच्या आरोग्याप्रीत्यर्थ नृसिंहवाडीत रम्य मनोहर पादुकांवर महापूजा-प्रसाद करण्याचे ठरविले होते. वाडीत पोहोचताच आम्ही प.पू. श्रीमहाराजांचे दर्शन घेतले. आधीच पत्राद्वारे ''श्रीं''ना महापूजेबद्दल लिहीले होते.मी नंतर ह्या दोघांत एकाच दिवशी महापूजा कार्यक्रमात सहभागी झालो. आम्हांसही ''श्रीं''नी तशी अनुमती दिली.

दि. १५.४.१९९१, सोमवारी ठरल्याप्रमाणे महापूजा आमचे पुरोहित श्री. दामोदरपंत बडु पुजारी ह्यांचे मार्फत करून घेतली. स्वत: ''श्रीं'' देखील महापूजेच्या वेळी मंदिरात उपस्थित होते. श्री. दामोदरपंत ह्यांचे गृहीच प्रसाद भोजन व्यवस्था ठेवली होती. प.पू. श्रीमहाराजांचे श्री. दामोदरगृही आमच्या करिता आगमन झाले. नरसोबांचे वाडीत प.पू. श्रीमहाराजांना सत्कार सोहळा किंवा त्यांना आरतीने ओवाळलेले आवडत नाही. वाडीत ''श्रीं''ना वाकून नमस्कार केलेला सुद्धा तेवढा रुचत नाही. ते स्वत:च दत्तप्रभूंचे दास होऊन वावरत असतात. अशा सोपस्काराने ते संकोच पावतात. आम्हीही ''श्रीं''चे मनोचित सर्व करीत असतो. सांप्रत ''श्रीं''ची प्रकृती तेवढी समाधानकारक नव्हती. तरीही महापूजा-प्रसाद त्यांनी, उपस्थित राहून, आम्हा सर्वांबरोबर राहून सहवासाचा आनंद दिला.

प.पू. श्रीमहाराज वाडी क्षेत्रात एस्.टी.तून किंवा कोणत्याही वाहनांतून उतरले की, लागलीच समोर येणाऱ्या पुजाऱ्यास, मग तो अगदी कुमारवयी असला तरी त्याला वाकून नमस्कार करीत.

२२७) प.पू. श्रीमहाराज आणि प्रकृतिस्वास्थ्य

दि. २३.६.१९९१ रोजी आम्ही उभयतां आमच्या तीन मुलांसह श्री रेणुका निवासात ''श्रीं''च्या दर्शनास गेलो होतो. आमच्या काही कौटुंबिक समस्या व निर्णय या बाबतीत प.पू. श्रीमहाराजांची अनुमती, मार्गदर्शन आणि उपदेशाची आम्हांस नितांत आवश्यकता होती. आजपर्यंतचे कोणतेही ऐहिक, पारमार्थिक निर्णय आम्ही प.पू. श्रीमहाराजांच्या अनुमती, आशीर्वादानेच घेतले आहेत. ह्यावेळीची समस्या आमचे सामाईक हरिहरेश्वर येथील इस्टेटीबाबत होती. ह्या विषयावर सविस्तर वर्णन समारोपाचे प्रकरणात करूया!

या प्रकरणात प.पू. श्रीमहाराज आणि त्यांचे प्रकृतीस्वास्थ्य यावर विचार करू या. जुलै १९९१ मध्ये प.पू. महाराजांची प्रकृती खूपच बिघडली होती. डॉ. सरदेसाईंचे म्हणणे होते की प.पू. श्रीमहाराजांना जनसंपर्कापासून काही महिने दूर ठेवावे. त्यांची प्रकृती एवढी नाजूक झाली आहे की इतरेजनांच्या किंवा कोणाही व्यक्तीच्या श्वासोच्छवासाने सुद्धा त्यांना

अपाय होऊ शकतो. प्रवास तर बिलकुल बंद करावेत.

पण हे सर्व खरे असले तरी सर्वच भक्त तसा सामोपचाराचा विचार करणारे असतात का? आणि असले तरी आमच्या भक्तवत्सल भक्ताभिमानी सद्गुरु प.पू. श्रीमहाराजांनी ते मानले पाहिजे ना! आताच जवळ आली होती आषाढी एकादशी. म्हणजे मुंबईस बोरीवली येथे श्रीमती नीलाताई जोशींकडे सालाबादप्रमाणे रामनाम सप्ताह समाप्तीस प.पू. श्रीमहाराजांना जायला हवे! घरची मंडळी, श्री. रघुनाथराव, मुलांच्यात सडेतोडपणे वक्तव्य करणारा चि. अजित सर्वच काळजी घेत होते. आता प्रश्न होता, 'बोरीवलीस यावर्षी प.पू. महाराजांची प्रकृती बरी नसल्याने आपण बोलावू नये' असे श्रीमती नीलाताईना पत्र कोण लिहीणार? चि. अजित मला म्हणू लागले, ''नागले ही कामगिरी तुम्हीच करा. मी लिहीणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास होईल, तेव्हा हे काम तुम्हीच सामोपचाराने समजूतीने करू शकाल.'' अहो, मला तरी कसे शक्य आहे. प.पू. श्री गुरुमहाराजांच्या (श्री. गुळवणी महाराजांच्या) त्या परम शिष्या. फार वर्षांपासूनचे त्यांचे आणि महाराजांचे संबंध. वयाने, मानाने, विचाराने अत्युच्च पदावर असलेल्या ताईना हा बालक काय व कसे लिहीणार? तरी सुद्धा माझ्या गुरुमाऊलीचे प्रकृतीस्वास्थ्य सांभाळण्याकरिता काहीही करू. फार तर काय होईल, आम्हांस शिष्ठ म्हटले जाईल, आणखीही काही दुषणे मिळतील. मिळू देत. मी हिय्या करून गुरुभक्त भगिनी नीलाताई यांना विनय सांभाळून, मान सन्मानास कोठेही दुखापत होऊ नये, मन दुखविले जाऊ नये अशा प्रकारे सर्व काळजी घेऊन चांगले चार पानी पत्र लिहीले. पण पोस्टात टाकण्यापूर्वी आपले तन आपले मन सर्व काही महाराजच आहेत. त्यांच्या परवानगी खेरीज हे पत्र पाठविणे बरे नाही म्हणून ''श्रीं''पुढे मनोभावे लोटांगण घातले, म्हटले, ''महाराज! आपली प्रकृती बरी नाही. थकवा फारच आहे. डॉ. सरदेसाई यांनी जनसंपर्क कमी करून प्रवास बिलकूल टाळावे म्हटले आहे. या करिता आम्ही श्रीमती नीलाताईंना पत्र पाठवून यावर्षी आपणास बोरीवलीस येता येत नाही म्हणून पत्र पाठवावे कां? आपण डॉक्टरांचे सल्ल्यानुसार हा प्रवास टाळावा असे आम्हा सर्वांनाच वाटतं!''

प.पू. महाराज म्हणाले, ''नको नको, असं काही पत्र लिहू नका! अहो, दरवर्षीचा हा ठरलेला कार्यक्रम आहे. आमचे न जाणे गुरुमहाराजांनाही आवडणार नाही. प्रकृती काय? श्री गुरुमहाराज सांभाळणारे आहेत. त्यांनी सालाबादप्रमाणे सर्व तयारी कार्यक्रम आखला असेल. असे ऐनवेळी नाही म्हणणे बरे नाही. प्रवासाचा त्रास काय, फार तर रेल्वेने न जाता येथून मोटार कारने जाऊ. आहेत महाराज, आपण सर्व गुरुभक्त काळजी घेणारे आहोतच. दि. २१.७.१९९१ ला निघू, तेथे दोन दिवस राहू, २३-२४ तारखेला परतता येईल. गुरुपौर्णिमा २६ तारखेला आहे.''

आम्ही लिहीलेले पत्र पोस्टात न पडता आमच्या बॅगेत राहिले हे सांगणे न लगे!

प.पू. महाराज बोरीवलीस आले. दि. २२ आणि २३.७.१९९१ हे दोन्ही दिवस आम्ही भक्त मंडळी उपस्थित होते. ''श्रीं''ना त्रास होऊ नये म्हणून सर्व लांबूनच बोलत होते, दर्शन घेत होते. ''श्रीं''च्या प्रकृती स्वास्थ्याबद्दल श्री. रघुनाथरावांनी श्रीमती नीलाताई आणि समस्त मुंबईकर भक्त मंडळींना कल्पना दिली होती.

बोरीवलीचा कार्यक्रम आटोपून प.पू. महाराज पुण्यास परत आले. दोनच दिवस मध्ये होते, मग आली गुरुपौर्णिमा. प.पू. श्रीदादांनी गुरुपौर्णिमेला श्री वासुदेव निवासात जाऊ नये म्हणून खूप खूप सांगून पाहिले. चि. अजित एवढेही म्हणाले की, दर्शनार्थी येणाऱ्या सर्व भक्तजनांची आम्ही श्री रेणुका निवासामध्ये व्यवस्था करतो. बाहेर रांगा लागतील. मंडप उभारून भक्तांना आडोसा करू. मंडपावर प्लास्टीक पेपर वापरून पावसापासून संरक्षण करू!

पण नाही. ''श्रीं''ना ते काही मान्य नव्हते. स्थान माहात्म्य असते. येणाऱ्या-जाणाऱ्यांना प्रसाद भोजन आश्रमात असले तरी आपले घरी येणाऱ्या भक्तांना काही दूध, चहा, कॉफी नको का द्यायला. पण हे सर्व सांभाळायला अजित तयार असले तरी ''श्री'' अशा ठिकाणी तडजोड करीत नसतात. ''आम्ही फाटकात गाडीमध्ये बसू आणि आश्रमाचे फाटकात उतरू. इथेही बसायचेच आहे आणि तिथेही. तिथे स्वयंसेवक मंडळीही बरीच आहेत. रांगा लावणे सर्व सोयी पहाणे, सांभाळतील सर्व!''

ह्यावर्षी श्री वासुदेव निवासाच्या ऑफिसातच टेबल खुर्च्या, कपाटे काढून कॉटवर प.पू. श्रीमहाराजांची बैठक घालून बसण्याची सोय केली होती. ''श्रीं''चे बैठकीपासून सहा फूटावर बाके लावून कोणाही व्यक्तीस बाके ओलांडून ''श्रीं''च्या समीप जाण्यास प्रतिबंध केला होता. फलक लावला होता, ''दुरून दर्शन घ्यावे!'' भक्तमंडळीही अत्यंत काटेकोरपणे सर्व पथ्ये पाळत होती. कोणीही जास्त न बोलता, काहीही प्रश्न न विचारता नुसते दर्शन घेऊन पुढे जात होती.

प्रसाद भोजनापर्यंत दर्शन ठेवून नंतर ''श्रीं''ना विश्रांती दिली. अशा प्रकारे गुरुपौर्णिमा श्री गुरुदर्शनाचा हा सोहळा श्री वासुदेव निवासात सुव्यवस्थित पार पडला.

१९९१ चा संपूर्ण ऑगस्ट महिना प.पू. महाराजांच्या प्रकृती अस्वस्थतेचाच गेला. श्री रेणुका निवासाच्या वरील माळ्याचे बांधकाम पूर्ण झाले होते. माझी कामे मुंबईत चालू होती. ''श्रीं'चे एक खास वैशिष्ठ्य येथे सांगावेसे वाटते, ''प.पू. महाराजांना कोणत्याही भक्ताने मनीऑर्डरने किंवा कोणा गुरुबंधूंसोबत दक्षिणा पाठविली तर लागलीच महाराज त्या दक्षिणा पाठविणाऱ्या भक्तास स्वत:हून पत्र लिहीतात. पत्रात ख्याली खुशाली

विचारतात, आपली कुशलता व आपल्या पुढील दौऱ्यांची माहीती देतात आणि शेवटी सर्वांस मंगल आशीर्वाद किंवा यथोचित नमस्कार आशीर्वाद लिहीतात.'' आमची दक्षिणा पोहोचताच आलेले हे पत्र वाचा.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ६.९.१९९१

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपणांकडील मनीऑर्डर सव्वाशे रु. मिळाली. सर्वांचे कुशलवृत्त समजून समाधान झाले. आमचा मुक्काम तूर्त येथेच आहे. डॉक्टरांचे सांगण्याप्रमाणे प्रवास बंद ठेवून पूर्ण विश्रांती चालू आहे. यामुळे यावर्षी आम्हाला वार्षिक तुळजापूर, गाणगापूर यात्रेला जाण्याचा योग आला नाही. श्री. रघुनाथरावच जाऊन सर्व अर्चनादि कर्तव्य करून आले. ईश्वरेच्छा. आपणास नवीन काम मिळत आहे, बरे झाले. चि. दिनेश वगैरे मुलांना कोठे उद्योग लागला की नाही, नाहीतर चि. दिनेश आपल्या हाताखाली काम करेल. आपल्या मार्गदर्शनाने त्यालाही माहीती अनुभव मिळेल. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रय कवीश्वर

---**---

ता.क.: दि. १७ ते २३ सप्टेंबर सात दिवस आश्रमात श्री भागवत सप्ताह पं. पारखी शास्त्री प्रतिवर्षाप्रमाणे करणार आहेत.

द.धु.

दि. १७.१०.१९९१, गुरुवार दसऱ्यानिमित्त प.पू. श्रीमहाराजांना सोने देण्यास आम्ही उभयतां गेलो होतो. थोरला मुलगा चि. संदीप याचा विवाह ठरविणे होते म्हणून सोबत मुलीचा फोटो व पत्रिका घेऊन आलो होतो. प.पू. श्रीमहाराजांनी फोटो पत्रिका पाहून येथेच अनुमती दिली तरच होकार देऊन पुढील कार्यास लागणे हा विचार होता. प.पू. महाराजांनी फोटो हातात घेऊन पाहिला व म्हणाले, ''चांगलं आहे! आपल्या संदीपला व आपणा सर्वांस पसंत आहे ना? जन्मपत्रिका दोघांचीही असेल तर आपल्या कोडणीकर गुरुजींना दाखवा आणि नंतर नक्की करा!''

आम्ही दोघांचीही पत्रिका श्री आज्ञेनुसार श्री. कोडणीकर गुरुजींना दाखविली. त्यांनी

पत्रिका चांगली जमत असल्याचे सांगताच पुन्हा श्री रेणुका निवासामध्ये दुसऱ्या दिवशी जाऊन ''श्रीं''च्या कानी घातले. पुढील पाऊले उचलण्यास हरकत नसल्याचे ''श्रीं''च्याकडून ऐकून आम्ही गोरेगांवी परतलो. पुढील महिन्यात आम्ही प.पू. श्रीमहाराजांना नियमीत दक्षिणा पाठविली. लागलीच ''श्रीं''चे पत्र आले, ते खालीलप्रमाणे -

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ३०.११.१९९१

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपली व चि. दिनेशची मनीऑर्डर (रु.१२५/-) मिळाली. इतके द्रव्य दोघांनी पाठविण्याची आवश्यकता नाही. चि. दिनेशचे अजून शिक्षण व्हायचे आहे. चांगली कायम नोकरी मिळायची आहे. त्याने पैसे पाठवू नयेत असे वाटते. काटकसरीने राहण्यास शिकावे. असो, आम्ही आज रात्रीच्या गाडीने वाडीस जात आहोत. तेथे मुंबई भागातील बरेच स्त्री-पुरुष 'श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव' करणार आहेत. तीन तारखेस पुण्यतिथी आहे. ती करून आम्ही चार तारखेस सकाळी निघून मध्ये कासेगांव, कराड येथे जाऊन पाच तारखेस महाराष्ट्र एक्सप्रेसने पुण्यास परत येऊ. नंतर ३-४ दिवसांनी भुसावळला 'देवीचे स्थापनेला' जाऊन ५-६ दिवसांनी येथे 'श्री दत्त जयंती' करिता परत येऊ. नंतर पुन्हा २५ तारखेपासून इंदूर, मुंबई ठाकुरद्वार दत्तमंदिर व हिंगोली असा प्रवास आठवड्याचा आहे. चि. दिनेश व घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रय कवीश्वर

---*---

श्री दत्त जयंतीस आम्ही ''श्रीं''च्या दर्शनास पुण्यास दि. १७ व १८.१२.१९९१ रोजी जाऊन आलो. ''श्रीं''चे प्रकृतीमान प्रत्यक्ष पाहणे व औषधोपचार कोणते चालू आहेत हे पहाणे हाही उद्देश होता. दि. ५.१.१९९२, रविवार पहाटेच्या डेक्कन एक्सप्रेसने आम्ही उभयता होणाऱ्या सुनेसह, चि.सौ.कां. तनुजा व संदीप तसेच मुलीचे वडील श्री. भाई प्रधान यांच्यासह 'श्री चरण दर्शनास' गेलो. प.पू. महाराजांना व सौ. आईसाहेबांना प्रत्यक्ष मुलगी दाखविणे आणि आशीर्वाद घेणे झाले. प.पू. महाराजांची प्रकृती तेवढी समाधानकारक वाटली नाही. थोड्याशा हालचालीनेही त्यांना दम-धाप लागल्यासारखे वाटत होते. प.पू. महाराजांना मुंबईस प्रख्यात डॉक्टरकडे संपूर्ण शरीर तपासणी करण्यास न्यावे असे आमचे

गुरुबंधू श्री. शुक्लाजी यांचे मत कानावर घातले. परंतु त्याबद्दल तेवढी तयारी ''श्रीं''च्या कडून दिसली नाही. सर्वांसमोर जास्त न बोलता मुंबईहून सविस्तर पत्र पाठवून आपला मानस कथन करू असे ठरवून आम्ही प.पू. महाराजांचा व सौ. आईसाहेबांचा निरोप घेऊन मुंबईस परतलो. प.पू. महाराजांना विनंतीपर लिहीलेले पत्र खाली देत आहे.

।। श्रीगणेशदत्त गुरुभ्योनमः ।।

३९/७, अभिषेक, जयप्रकाश नगर,
३ रा रस्ता, गोरेगांव (पू.),
मुंबई ४०००६३.
दि. ९.१.१९९२

प.पू. ब्रह्मर्षी गुरुमहाराजांच्या चरणी बालके शशीकांत याचा दोन्ही कर जोडून, त्रिकाल चरणी मस्तक ठेवून शि.सा.न.वि.वि.

श्री. शुक्लाजींचा व आमचा मानस आपणास रविवार भेटीत कथन केला. मुंबईत सांताक्रूझ येथे नानावटी हॉस्पिटल मोठं प्रख्यात आहे. ह्या हॉस्पिटलचे जे मालक श्री. नानावटी. डॉक्टर श्री. शेठ हे त्यांचे जामात, संपूर्ण नानावटी हॉस्पिटलचे श्री. शेठ हे सुपरिन्टेण्डेंट आहेत. शिवाय ''रक्ताभिसरण-रक्तवाहिन्यांचे कार्य'' या विषयांतील डॉ. शेठ हे मुंबईतील एक निष्णात डॉक्टर आहेत. अचानक चक्कर येणे, डोळ्यांपुढे काळोख येणे, तोल जाणे असेच प्रकार श्री. शुक्लाजी यांनाही होत असत. श्री. शुक्लाजींची डॉ. शेठ ही चांगल्यापैकी परिचित व्यक्ती असल्याने आपल्या प्रकृतीची संपूर्ण चिकित्सा त्यांच्याकडून करून घेऊ. एकच दिवस फक्त मुंबईत वास्तव्य करावे लागेल. गोरेगांवी आमच्या शेजारच्या बिल्डींग मध्येच श्री. शुक्लाजी राहतात आणि गोरेगांवहून नानावटी हॉस्पिटल जवळ आहे. आदल्या दिवशी गोरेगांवी मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी ११ नंतर डॉक्टरांची वेळ ठरवून संपूर्ण तपासणी करून घेऊ. दुपारनंतर आपल्या मर्जीनुरुप पुणे येथे परतता येईल. आपली व श्री. रघुनाथरावांची यथाशास्त्र वास्तव्याची व्यवस्था ठेवू. श्री. शुक्लाजींच्या निकट परिचयामुळे फार काही खर्चाचे होईल असेही नाही. तरी आपण तसा विचारही आणू नये. मुंबईस येणे व पुण्यास परतणे या करिता मोटारगाडी ठरवू. दि. २६.१.१९९२ रोजी 'श्री वासुदेव निवासात' प.पू. श्री गुरु महाराजांचा पुण्यतिथीचा कार्यक्रम पूर्ण होत आहे. आम्हीही दि. २५ व २६ ला कार्यक्रमास येत आहोत. तद्नंतर आपण आपला मुंबईस येण्याचा दिवस आपल्या मर्जीनुरुप ठरवावा अशी आपल्या चरणी अत्यंत कळकळीची प्रार्थना आहे. आपला मुंबईस येऊन जाण्याचा हा बेत पूर्णतया

गुप्त राखल्यास बरं होईल असे या बालबुद्धीस वाटते. श्री. अशोकरावांजवळ आम्ही सर्व कथन केले आहे. चि. अजित यांनाही कळवू. श्री. रघुनाथराव यांसी ह्याच पत्री कळवीत आहे. बाकी सर्व श्री. शुक्लाजी कथन करतीलच.

अ.सौ. आईसाहेबांचे चरणी शि. साष्टांग नमस्कार, थोरांस नमस्कार, लहानांस आ. कळावे ही विनंती.

आपले चरणी लीन
शशीकांत नागले

प्रतः श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांचे अवलोकनास व विचार संमत होण्यास प्रार्थना.

---*---

आमचे गुरुबंधू (वयोवृद्ध) श्री. शुक्लाजी यांच्या सोबतच प.पू. श्रीमहाराजांना वरील पत्र पाठविले. त्याचबरोबर श्री. रघुनाथराव यांनाही प.पू. महाराजांना लिहीलेल्या कॉपीसह पत्र दिले.

आमच्या वरील दि. ९.१.१९९२ च्या पत्रास प.पू. महाराजांचे उत्तर -

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १५.१.१९९२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपले पत्र आम्हाला व श्री. रघुनाथरावांना श्री. शुक्लाजींचे कडून मिळाले. आपणा सर्वांच्या आत्मीयतेमुळे समाधान झाले. सध्या येथील डॉक्टर सरदेसाई यांनी नुकतीच आमची प्रकृती तपासून, ''आता कोणतेही औषध नको, फक्त प्रवास थांबवून योग्य आहार विहार घरीच घेऊन विश्रांती घ्यावी म्हणजे सर्व ठीक होईल, या वयात औषधांवर भर नको'' असे सांगितले आहे आणि ते योग्यही आहे. वयोमानाप्रमाणे चढ उतार प्रकृतीमध्ये होणारच. ईशस्मरण करीत शांततेत काळ घालविणे. यापेक्षा अन्यत्र कोठे प्रकृती तपासणे, पुन्हा प्रारब्धाने त्यात काही निघाल्यास, परेच्छा प्रारब्धानुसार पुन्हा औषध सुरू करणे, व्यर्थ चिंता वाहणे, येथील आत्मीय, बरेच वर्षाचे प्रसिद्ध डॉक्टर, यांचाही विश्वास गमावणे, त्यांना नाराज करणे, अशा गोष्टी घडत असतील तर त्याला निमित्त कशाला व्हावे, असे वाटते. विचार व्हावा. ईश्वरावर भार घालून राहण्यास डॉक्टरांचीच संमती मिळाल्याप्रमाणे आहे, तेच खरे कर्तव्य घडावे असे वाटते. तथापि प्रारब्धाप्रमाणे सर्व आपणा आत्मीयांची इच्छाच असल्यास एखादा दिवस दाखविण्याचे पहावे. खर्चाचाही विचार करावा. फक्त शरीर तपासणी व्हावी. पाणी वगैरे दवाखान्यात देऊ नये, घेऊ नये असे वाटते. समक्ष

सर्वांनी विचार करावा. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रय कवीश्वर

वयोमानाप्रमाणे साधक भक्तांनी वृद्धापकाळात कसे रहावे असे श्री महाराज या पत्रांत आपल्याला सांगतात. पण आम्हा आत्मीयांची इच्छा म्हणजे परेच्छा प्रारब्ध म्हणूनच स्वीकारतात. तेव्हा आपल्या इच्छा येथेच सोडून देणे बरे!

सांप्रत आपण प.पू. श्रीमहाराज आणि प्रकृती स्वास्थ्य या विषयावर वाचीत आहोत. तथापि थोडे विषयांतर करून खाली महाराजांची आलेली दोन व एक आम्ही लिहीलेले पत्र ग्रंथीत करीत आहोत. यातून प्रकृती स्वास्थ्य नसताना सुद्धा ''श्री'' मार्गदर्शनपर पत्र विद्यार्थ्यास कसे लिहीतात, त्यात इतर विद्यार्थ्यांसही घेण्यासारखे असते म्हणून ते लिहीतो आणि त्या त्या तारखेच्या अनुक्रमाने आले म्हणून लिहीतो.

चि. दिनेश यांस लिहीलेले पत्र :

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ८.२.१९९२

सप्रेम आशीर्वाद, वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले. आपण लिहीलेली ''सर्व इंद्रिये आणि मन हे...'' ही प्रार्थना थोरल्या श्री महाराजांनी सर्वांना मार्गदर्शक केली आहे. ती आपण चालू ठेवावी. परमात्म्याचे एक नांव 'हृषीकेश' असे आहे. हृषीक म्हणजे इंद्रिये, यांचा ईश म्हणजे नियंत्रण करणारा भक्तांच्या सर्व इंद्रियांचे नियमन करणारा ईश्वर आहे. हा अर्थ वरील प्रार्थनेत दाखविला आहे. ती ईश्वरशक्ती लक्षात आणून रोज प्रार्थना करीत असावे. कल्याण होईल. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. १६.४.१९९२ रोजी प.पू. श्रीमहाराजांना पत्र लिहून ''श्रीं''च्या कृपेने चि. दिनेश हा एम.टेक./ एम.ई. या पदवी परीक्षेच्या प्रवेश परीक्षेत उत्तम श्रेणीत उत्तीर्ण होऊन त्यांना पवई येथील आय.आय.टी. किंवा व्ही.जे.टी.आय. या कॉलेजात प्रवेश अर्ज भरले आहेत. तसेच त्याला दरमहा रु. १५००/- शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या यशाबद्दल ''श्रीं''ना

लिहीले आहे.

तसेच आम्ही भक्त गतवर्षीप्रमाणे (दि. ३०.४.१९९२) रोजी वाडीला पोहोचत असून महापूजा व महाप्रसाद ह्याची आपल्या मार्गदर्शनाखालीच सेवा घडावी असा मानस आहे, असे लिहीले होते. या पत्रास ''श्रीं''नी दिलेले उत्तर पुढे देत आहे.

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २१.४.१९९२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

चि. दिनेशकडून आपले पत्र व दक्षिणा मिळाली. चि. दिनेशने परीक्षेत उत्तम यश मिळविल्याचे समजून समाधान वाटले. विद्याभ्यास तत्परता, त्याच्याजवळ पूर्वीपासूनच आहे. पुढील दीड वर्षाचे शिक्षण घ्यायचे तर ही कायम झालेली अधिक पगाराची नोकरी सोडून द्यावी लागेल. शिष्यवृत्तीही वेळेवर मिळणे कठीण असते असे चि. दिनेशचे बोलण्यावरून समजले. तरी हाही विचार पूर्ण करूनच नंतर आहे ती नोकरी न सोडता, तीच सांभाळावी का शिक्षण घ्यावे, हे आपण सर्व आत्मीय मंडळींनी विचार करून योग्य ते ठरवावे. गडबडीने नोकरी एकदम सोडून देऊ नये. नोकरी चांगली आहे. पुढे तरी नोकरीच करायची आहे. आम्ही २३ तारखेस दुपारी निजामुद्दीन एक्सप्रेसने निघून वाडीस जात आहोत. २४ एप्रिल ते २ मे पर्यंत उत्सव आहे. ३ तारखेस लळीत झाल्यावर मिरजेवरून महाराष्ट्र एक्सप्रेसने इकडे परत येऊ. ४ तारखेस सकाळी डेक्कन क्वीनने माटुंग्यास येता येईल. तेथून ७ तारखेस येऊरला जाऊन नंतर १० तारखेस नाशकास ११ ते १३ उत्सवास थांबून १४ ते १६ त्र्यंबकेश्वरी सिंहस्थ तीर्थ विधी आटोपून इकडे परत येणे होईल. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

---*---

वरील पत्रावरून प.पू. महाराजांचा पुढील तारीखवार कार्यक्रम आपणास कळतो, दि. २३.४.१९९२ पासून पुणे सोडून दि. २४.४.१९९२ ते २.५.१९९२ पर्यंत 'श्री नारायण स्वामी पुण्यतिथी उत्सव,' ३ तारखेस लळीत, लागलीच पुण्यास परत. रात्री मिरजहून पुणे घरी कधी पोहोचणार, पुन्हा पहाटे उठून दि. ४ ला सकाळी डेक्कन क्वीनने माटुंग्यास, तेथून ७ तारखेस ठाणे-येऊर नंतर १० तारखेस नाशिकमध्ये ११ ते १३ पर्यंत उत्सवास थांबून १४

ते १६ ला त्र्यंबकेश्वरी आणि सिंहतीर्थ स्नान आटोपून पुण्यास परत. प.पू. महाराजांची प्रकृती अत्यंत नाजूक झालेली. संत सत्पुरुषांना सुद्धा प्रारब्ध, परेच्छा प्रारब्ध सोडत नाही हेच खरे.

दि. २८.४.१९९२ रोजी श्री. अशोक निमकर आमचे गुरुबंधू वाडीहून मुंबईस आले. रात्री आठ वाजता त्यांचा मला फोन आला. ''मी आताच वाडीहून आलो. प.पू. महाराजांची प्रकृती अस्वस्थ असून त्यांना श्वसनास त्रास होत आहे. श्री. रघुनाथरावांनी तुम्हास लागलीच फोन करून कळविण्यास सांगितले म्हणून कळवीत आहे.''

वाडीला जाण्याकरिता आमचे दुसऱ्या दिवशी महालक्ष्मी एक्सप्रेसचे रिझर्वेशन होते. परंतु लागलीच निघावे की काय, हा प्रश्न पडला म्हणून डॉ. प्राणी यांना त्यांच्या मिरजेच्या घरी फोन लावला. डॉक्टरांकडे ''श्रीं''च्या प्रकृतीची विचारपूस केली. ''आम्ही आजच येथून निघावे कां उद्याचे रिझर्वेशन आहे त्याप्रमाणे निघून चालेल? प.पू. श्रीमहाराजांचे उपचारांस मुंबईहून काही औषधे, इंजेक्शन्स आणायची असल्यास आम्ही घेऊन गेलो असतो.'' पण डॉ. प्राणी म्हणाले, ''इकडे औषधे इंजेक्शन्स सर्व काही मिळते, मिळत नाही गॅस सिलेंडर. इकडे गॅस सिलेंडरचे शॉर्टेज आहे. प.पू. श्रीमहाराजांना तात्काळ गॅस पुरवठा (कृत्रिम) श्वसनास आवश्यक आहे. गॅस सिलेंडर तुम्ही ताबडतोब आणू शकत असाल तर पहा!'' मी म्हटले, ''ठीक आहे, कसेही करून उद्या सकाळपर्यंत गॅस सिलेंडर वाडीस ''श्री'' राहतात त्या घरी पोहोचेल अशी व्यवस्था करतो.''

मी लागलीच माझे फॅमिली डॉक्टर नाईक यांना फोन लावला व म्हटले, ''डॉक्टर, मला वाडीला गॅस सिलेंडर घेऊन आताच निघायचे आहे. तुम्ही मला गॅस सिलेंडर मिळवून द्या.'' डॉक्टर म्हणाले, ''मी तुम्हांला सिलेंडर मिळवून दिलाच म्हणून समजा. तो तुम्ही नेणार कसा? वाडीला पोहोचल्याबरोबर पेशंटला लावणार कसा? कोणी नर्स किंवा डॉक्टर सोबत आहे का? तुम्हांला एवढ्या तातडीने वाडीला सिलेंडर घेऊन जायचे असेल तर पुण्यास कोणी ओळखीचे नाही का? तेथून प्रवासाचा ४-५ तासांचा तरी वेळ वाचेल.''

ही कल्पना मला पसंत पडली. पुणे आपलेच आहे. खूप मंडळी सेवाभाव भक्तीने धावणारी आहेत. मी डॉ. नाईकांना म्हटले, ''मी पुण्याहून प्रयत्न करतो. जमले तर ठीक, नाहीपेक्षा गॅस सिलेंडर घेऊन मी निघतो, आपण येऊ शकत असाल तर महत् उपकार होतील, निदान गॅस लावण्यास कोणी माणूस वा नर्स सोबत द्या. मी व सौ. घेऊन निघू. मी पुन्हा फोन करतो. आधी पुण्याचे बघतो.''

मी श्री. तुलसीदास लाटे आमचे परम स्नेही, सहकारी आणि प.पू. श्रीमहाराजांचे भक्त यांना फोन लावून सविस्तर हकीकत सांगून प्रसंगाची त्वरीतता लक्षात आणून दिली. रात्रीचे नऊ वाजून गेले होते. श्री. लाटे म्हणाले, ''तुम्ही काही काळजी करू नका. मी डॉ. अरुंधती

मानवीना गॅस सिलेंडर घेऊन निघायचे आहे म्हणून सांगतो. तुम्हांला मी अर्ध्या तासात फोन करून व्यवस्था झाल्याचे कळवितो.''

मी डॉ. नाईकाना अर्ध्या तासाची मुदत देऊन थांबवून ठेवले. अर्ध्या तासात होतील तेवढे 'घोरात्कष्टकाचे' पाठ केले. श्री. लाटे यांचा अर्ध्या तासात फोन आला, ''सर्व व्यवस्था होत आहे. आम्ही, (मी व डॉ. अरुंधती मानवी) गॅस सिलेंडर घेऊन स्पेशल गाडीने बरोबर रात्री १०.३० ला निघत आहोत. सिलेंडर घेणे, गाडीत भरणे, आम्ही तयार आहोतच. म्हणून जास्तीत जास्त १०.३० ला निघूच. निघताना पुन्हा फोन करतो. पण हे शंभर टक्के निश्चित समजा.''

त्यावेळी वाडीला डायरेक्ट फोन लावण्याची सुविधा नव्हती. परंतु डॉ. प्राणींना डॉ. मानवी व श्री. लाटे गॅस सिलेंडर घेऊन पुण्याहून रवाना झाल्याचे कळविले.

आम्ही आता निर्धास्त झालो. गॅस लावल्यानंतर प.पू. श्रीमहाराजांचे प्रकृतीस आराम पडेल आणि मुख्य म्हणजे सालाबादप्रमाणे याही वर्षी 'श्री नारायण स्वामी उत्सव,' प.पू. श्रीमहाराजांची दि. २९, ३० व १ मे व २ मे ही चार दिवसांची राहिलेली सप्ताहांतील प्रवचने उत्तम प्रकारे पार पडतील, असा विश्वास आला.

दि. २९.४.१९९२ ला पहाटे डॉ. अरुंधती मानवी व श्री. लाटे वाडीस प.पू. महाराज रहात असलेल्या श्री. बाळू पुजारी यांच्या घरी पोहोचले. डॉ. मानवींही ''श्रीं''ची प्रकृती तपासली. कार्डीओग्राम काढला. आजाराची गहनता त्यांच्या लक्षात आली. डॉ. अरुंधतीताई म्हणाल्या, ''महाराज निघा! आपल्याला लागलीच पुण्याला जायचे आहे.''

महाराज चपापले. स्वामींची प्रवचनसेवा अर्धी सोडून कसे निघायचे? त्यांचे म्हणणे होते तुम्ही येथेच उपचार करीत रहा आणि आम्ही प्रभुचरणाची सेवा ३-४ दिवसच राहिली आहे, ती पूर्ण करू. पण डॉक्टर मानायला तयार नाहीत. शेवटी प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''ईश्वरी इच्छा! नाहीतरी आता आम्ही राहणे म्हणजे मुंबई पुण्याहून आम्हालाच पहायला येणाऱ्यांची गर्दी वाढणार. त्यापेक्षा परतणे बरे!''

प.पू. श्रीमहाराज, श्री. रघुनाथराव, डॉ. मानवी व श्री. लाटे त्याच गाडीने पुण्यास परतले. वाडी सोडताना महाराजांना काय वाटले असेल? रम्य पादुका म्हणजे त्यांचे पंचप्राण. सारखे म्हणत होते, ''अहो, आमचे काय व्हायचे ते येथेच प्रभुंच्या पायाजवळ होऊं द्या. नका हो आम्हाला दूर नेऊ.'' पण नंतर वरील विचार घेऊन महाराजांनी मौन स्वीकारले. पुण्यास पोहोचल्यानंतर प.पू. श्रीमहाराजांच्या प्रकृती स्वास्थ्यावर जरूर ते औषधोपचार झाले व हळूहळू ''श्रीं''ची प्रकृती सुधारू लागली. विश्रांतीनेही स्वास्थ्यास मदत झाली.

आम्ही ३० तारखेस वाडीस श्री. दामोदर पुजारी यांच्या घरी पोहोचलो. श्री. उद्धवराव म्हसवडकर तेथेच होते. आम्हाला पहाताच त्यांना भरून आले. अक्षरशः लहान मुलासारखे

रडून म्हणू लागले, ''शशीकांत महाराजांना येथून न्यायला नको होते. महाराजांचे नेत्रांत पाणी आले हो! लेकराला आईपासून ओढून न्यावे असे त्यांना झाले हो! मनोहर पादुका म्हणजे महाराजांचे प्राण, सर्वस्व. 'आमचे काय व्हायचे ते येथेच होऊ द्या हो, आम्हाला देवांपासून दूर नेऊ नका!' असे म्हणत होते. पण कोण ऐकणार? शशीकांत, हे चांगलं झालं नाही हो! महाराजांचं म्हणणं सर्वांनी ऐकायला हवं होतं!''

हे सर्व ऐकल्यानंतर मलाही अपराध्यासारखे वाटू लागलं. माझा मनापासून उद्देश होता दरवर्षीप्रमाणे ह्याही वर्षी हा श्री नारायणस्वामी प्रवचन सेवेचा प.पू. महाराजांकडून होणारा उत्सव उत्तम प्रकारे पूर्ण व्हावा.

संकल्पाप्रमाणे श्री. शृंगारपुरे उभयतां, आम्ही उभयतां, व दिनेश ह्यांनी प.पू. महाराजांचे आयुरारोग्याप्रीत्यर्थ संकल्पित महापूजा, प्रसाद पूर्ण केली. दि. १.५.१९९२ ला महापूजा संपन्न झाली. पुढे उत्सव समाप्ती लळीत, महाप्रसाद आटोपून आम्ही सर्व दि. ४.५.१९९२ ला मुंबईस परतलो. पुण्यास जाणे म्हणजे ''श्रीं''ना त्रास देण्यासारखेच झाले असते. त्यांना पूर्ण विश्रांतीची नितांत आवश्यकता होती.

आम्ही जरी सद्भावनेने भक्तीभावाने सर्व धावपळी केल्या होत्या, ''श्रीं''ना सप्ताह उत्सवाचा सोडून यायला लागू नये हीच भावना होती. परंतु ईश्वरेच्छेने सर्व विचित्रच घडले. आमचे मन धास्तावले. आता ''श्रीं''च्या पुढे कसे जावे? काय म्हणतील महाराज? ''आमचा दैवी सामर्थ्यावर विश्वास नव्हता कां? 'श्री दत्तप्रभुंच्या पादुका' आम्हांस सांभाळण्यास असमर्थ होत्या कां? मनोहर पादुकांचे ठायी आम्ही विलीन होऊन चिरशांती घेतली असती तर आमच्याही जीविताचे सार्थकच होते ना?'' असे अनेक विचार भेडसावू लागले. महाराज काय म्हणतील? म्हणतील, 'ही असलीच का तुमची आमच्या विषयीची आत्मीयता? आम्हांस बंधनात टाकणारी.'

पुण्यास दर्शनास ''श्रीं''च्या पुढे जाण्याचे धैर्य झाले नाही. पौर्णिमेला नियमित सद्गुरुचरणी मनीऑर्डरने दक्षिणा पाठविली. हे लिहावे लागते इतक्याच करता की ''श्रीं''चे तद्नंतर पत्र आले ते आपल्या समोर ठेवायचे आहे. ते असे,

श्रीदत्त

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २३.५.१९९२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपणाकडील मनीऑर्डर (रु. १२५/-) मिळाली. चि. दिनेशकरता पुढील शिक्षणाचा अर्ज गेला बरे झाले. मुंबईतच जवळ शिक्षणाची सोय ईशकृपेने झाली म्हणजे जाण्या-

घेण्यास बरे होईल. तसा काही प्रयत्न शक्य असल्यास करावा.

घरी सर्वांना मंगल आशीर्वाद, इतर सर्वांना यथोचित नमस्कार आशीर्वाद, आमची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. औषध चालू आहे. काळजीचे कारण नाही. कळावे.

आ.
दत्तात्रय कवीश्वर

दि. १४.७.१९९२ ला श्री वासुदेव निवासात गुरुपौर्णिमा झाली. थकवा सोडल्यास प.पू. महाराजांची तब्बेत ठीक होती. हल्ली दरवेळी भेटीत चि. दिनेशच्या शिक्षण-नोकरीची, चि. संदीपच्या कारखान्याची आणि आमच्या कामधंद्याची काळजी व्यक्त होत असे. पुढील १-२ पत्रे आमच्या पत्रास उत्तर, अशी देऊन नंतर ''श्रीं''च्या 'श्री दत्त अमरेश्वर आणि वासुदेव पीठ मंदिराच्या' जीर्णोद्धाराचे संकल्पाकडे वळूया. आमच्या पत्र संग्रहातील पुढील दोन पत्रेच आपणास वाचण्यास देण्याची राहिली आहेत. यानंतर वाडी औरवाडला जाता येता प्रत्येक वेळी प.पू. श्रीमहाराजांना भेटून झालेल्या कामांचा अहवाल देणे, पुढील करायची कामे कानी घालणे, जरूर तेथे मार्गदर्शन घेणे हे चालू होते. औरवाडच्या १९९३-९४-९५ नंतर प.पू. सौ. ताईमहाराजांचे कामांची जबाबदारी प.पू. श्रीमहाराजांच्या आज्ञेने स्वीकारली. आमच्या परम भाग्याने ही सर्व सेवा प्राप्त झाली आणि कामांमुळे जाता येता ''श्रीं''चे दर्शन आणि मार्गदर्शन कायम राहिले.

श्री रेणुका निवासात प.पू. महाराज, सौ. आईसाहेब आणि समस्त कवीश्वर कुटुंबीयांस चि. संदीपच्या विवाहाचे आमंत्रण देण्यास आम्ही सहकुटुंब गेलो होतो. प.पू. श्रीमहाराजांनी 'श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज, कोल्हापूरची महालक्ष्मी आणि हरिहरेश्वर कालभैरव योगेश्वरी' या मंदिरांत सहकुटुंब जाऊन देवांना आमंत्रण आणि कार्य निर्विघ्न पार पाडण्यासाठी मन:पूर्वक प्रार्थना करायला सांगितले. समक्ष जाऊन कार्य निर्विघ्न पार पाडावे अशी प्रार्थना करण्यास का सांगितले हे नंतर कळले. चि. संदीप व सौ. तनुजा जानेवारीत पहिल्या आठवड्यात बाहेरगांवी असतानाच दि. ६.१.१९९३ ला बाबरी मशीद प्रकरण सुरू होऊन सर्वत्र दंगे-धोपे झाले. तत्पूर्वी विवाह १ डिसेंबर १९९२ ला यथाशास्त्र यथाविधी सुखरूप आनंदात पार पडला.

प.पू. श्रीमहाराजांचे प्रकृतीस्वास्थ्य बिघडलेले होते. त्यांना डॉक्टरांनी पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले होते. ''श्रीं''चे आश्रमात जाणेही सांप्रत बंद होते. ''श्रीं''नी प्रवास करून मुंबईस यावे, कसे म्हणणार? वधू-वरांवर टाकण्यास अक्षदा मात्र ''श्रीं''नी अभिमंत्रून आमच्या हाती दिल्या होत्या व त्या मंगलअष्टकांचे वेळी वधूवरांचे शिरावर वाहण्यास

सांगितले होते. प.पू. महाराजांचे मंगल आशीर्वादाचे आलेले पत्र खाली देत आहे. लेखी पत्र प.पू. महाराजांकडून हे अखेरचेच होय. नंतर सतत भेटीगांठी दर्शन यामुळे पत्र लिहीण्याची वेळच आली नाही.

''श्रीं''चे पत्र

॥ श्रीदत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २४.११.१९९२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम,

आपणाकडील विवाह मंगल पत्रिका व समक्ष निमंत्रणही मिळाले. आनंद झाला. आमची प्रकृती बरी रहात नाही. आठ दिवस आश्रमातही जाता आले नाही. श्री. डॉक्टरांची परवानगीही नाही. त्यामुळे येथूनच प्रार्थना करीत आहे.

आयुष्यमान् वधु-वरांचा संसार, अमृतमय करणेबद्दल विश्वपालक श्री परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आयुष्यमान् वधु-वरांना मंगल आशीर्वाद.

कळावे.

आ.
दत्तात्रेय कवीश्वर

२२८) श्री दत्त अमरेश्वर मंदिर जीर्णोद्धार!

दि. १४.१.१९९३ व दि. १५.१.१९९३ ह्या दिनी मी व श्री. शृंगारपुरे पुण्यास ''श्रीं''च्या दर्शनास गेलो होतो. 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे' जीर्णोद्धाराचे काम पुढील महिन्यात चालू करायचे असल्याचे ''श्रीं''नी सांगितले. 'श्री दत्त अमरेश्वर मंदिर' व त्या परिसरांतील सर्व कच्च्या भिंती तोडून नवीन पक्क्या बांधकामात बांधण्याची संपूर्ण जबाबदारी श्री वामन निवासाप्रमाणेच आमच्यावर सोपविली. इतकेच नव्हे तर 'श्री नृसिंह वाडीत' असलेल्या प.पू. महाराजांच्या घराची तीन माळ्याची वास्तू पाडून तेथेही पक्क्या बांधकामांत घर बांधणीचे काम आमच्यावर सोपविले.

'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे' काम सुरू करण्यापूर्वी दि. २३.२.१९९३ रोजी वाडीहून परततांना पुण्यास ''श्रीं''चे दर्शन घेऊन ''श्रीं''च्या बरोबर जीर्णोद्धार कामांबद्दल चर्चा झाली. काम सुरू करण्याचा मुहूर्त दि. ११.३.१९९३ रोजी करण्यास सांगितला. परंतु पुढे एक संकट प.पू. श्रीमहाराजांच्या घराच्या कामाबाबत उभे राहिले. आश्रमात श्री. रघुनाथराव

कुलकर्णी भेटले व त्यांनी आम्हांस म्हटले, ''वाडीच्या दत्तमहाराजांचे घराचे कामात तुम्ही लक्ष घालायचे नाही. ते काम आम्ही श्री. बाळू उर्फ मुकुंद पुजारी यांना दिले आहे!''

श्री. रघुनाथरावांचे शब्द ऐकताच ती जुनी वास्तुच आमच्या शिरावर कोसळली असे वाटले. इतकेच काय पण एकवेळी ''श्रीं''ची जुनी जीर्ण वास्तू आमचे अंगावर खरंच कोसळली तर आमच्यासारखे आम्हीच भाग्यवंत पुण्यवंत ठरलो असतो. आम्ही अत्यंत दु:खी झालो. आम्ही या आघातावर काहीच बोललो नाही. मन स्थिर केले व म्हटले, ''जशी ''श्रीं''ची इच्छा!'' माझ्या ''श्रीं''ची अशी इच्छा असणेच शक्य नाही हे माझे मन मला सांगत होते. मनी म्हटले या प्रकरणाचा उलगडा ''श्रीं''च्या भेटीतच होईल. माझं रडणारं बालमन माऊलींच्या दर्शनास, माऊलींचा वात्सल्यपूर्ण हात पाठीवरून फिरवून घेण्यास आतुर झाले. पुण्याहून मुंबईस परतण्यापूर्वी माझी पाऊले श्री रेणुकानिवासाकडे वळली.

इकडे आम्ही वाडीतील घराचे प्लॅनिंगचे वेगवेगळे मनसुबे आखत होतो. एकदा श्री. अजित कवीश्वर व मी जाऊन काय करायचे, कसे करायचे ते ठरवून आलो. पुढील दोन खेपा आर्कीटेक्ट श्री. नंदकुमार शृंगारपुरे यांच्याबरोबर झाल्या. ह्या छोट्याशा जागेत जास्तीत जास्त जागेचा वापर कसा करून घ्यायचा, ती कशी भक्कम, कशी सुरेख बांधायची यावर आमचे प्लॅनिंग चालू होते. प्लॅन्स तयारही झाले आणि हा धक्का आम्हांस बसला.

प.पू. श्रीमहाराजांना वंदन करून आज्ञेने ''श्रीं''पुढे बसलो. नम्रतेने ''श्रीं''ना श्री. रघुनाथरावांचे म्हणणे कथन केले. ''श्री'' म्हणाले, ''हो, श्री. रघुनाथरावांचे म्हणणे तसे आहे. त्यांनी काम सुरू करण्यास मुकुंद पुजारी यांस सांगितले आहे. त्यांनी काही पाच एक हजारांची रक्कमही आगाऊ दिली आहे. आपणही जाता येता त्या कामावर लक्ष घाला.''

आम्ही ''श्रीं''चे शब्दाबाहेर कधीच गेलो नाही, जाणारही नाही. श्री गुरुवाक्य प्रमाणम्! फक्त एक विनंती केली की आम्हीही काही टेक्निकल गोष्टी पहाण्यास कामावर अधून मधून जरूरीप्रमाणे येत जाऊ. एवढी विनंती पुजारी यांना व्हावी. चि. अजित तेवढ्यात आले व म्हणाले, ''दादा तुम्ही बाळू पुजारी यांना तसं पत्र लिहा की काम टेक्निकली बरोबर चालले आहे हे पाहण्यास नागले अधून-मधून जरूरीप्रमाणे कामावर देखरेखीला येत जातील, त्यांचे मार्गदर्शन घेत जावे.''

''श्रीं''ना चि. अजित यांचे म्हणणे मान्य होऊन त्यांनी तसे पत्र बाळुंना लिहीले असावे. मी जेव्हा औरवाडचे कामास वाडीस गेलो तेव्हा श्री. बाळू पुजारी यांना भेटलो. त्यांना विनंती केली, ''केव्हाही कधीही तुम्हांला कामात काही टेक्निकलच नव्हे तर कोणतीही अडचण अगदी आर्थिक अडचण जरी आली तरी आम्हांस सांगा. आमचे मुंबईस जाणे-येणे

हे व्हाया पुणेच असते. ''श्रीं''च्या मार्गदर्शनाने आम्ही निरीक्षण करत राहू.''

माझा मुक्काम वाडीत श्री. दामोदरपंत बट्टु यांचे घरीच होता. श्री. बाळू पुजारी श्री. दामोदरांच्या घराशेजारी एक घर सोडून रहात होते.

औरवाडला भूमीपूजन करून 'श्री दत्त अमरेश्वराचे' एकेका वास्तूचे जुने कच्चे बांधकाम तोडण्याचे दि. ११.३.१९९३ रोजी सकाळी सुरू झाले.

अर्धे अधिक तोडकाम होताच आम्ही पुणे मार्गे मुंबईस निघालो. जाण्यापूर्वी श्री. बाळू पुजारी यांस भेटलो. त्यांनी ''श्रीं''चे घराचे अगदी वरचे काहीसे कच्चे बांधकाम तोडले होते. मी त्यांना प.पू. महाराजांकरिता काही निरोप आहे कां ते विचारले, ते म्हणाले, ''रघुनाथरावांना सांगा की आपण दिलेले रु. ५,०००/- संपले आहेत. संपूर्ण वास्तू तोडण्याचे काम एका माणसास दिले आहे. एकूण बारा हजारात तो तोडून देणार असल्याचे ठरले आहे. तरी त्याप्रमाणे पैसे पाठवा'' रक्कम मला पटली नाही! हे तोडकाम करणारे गावातले अडाणी लोक असेच तोंडाला येईल ती अवाढव्य रक्कम सांगून मोकळे होतात. लागला तर लागला लग्गा. आम्हाला सुद्धा अमरेश्वर मंदिरांतील पाच-सहा जुन्या वास्तू तोडण्याचे व माती साफ करून जागा मोकळी करून देण्याचे कोणी सव्वा लाख, कोणी लाख तर कोणी ७५ हजार सांगितले. नेहमीच्या व्यवसायामुळे हे आम्हांस अव्वाचे सव्वा वाटले आणि शेवटी श्री. लाटे साहेब व मी मस्टरवर मजूर लावून मजूरांवर काम करवून घेणारे मुकादम नेमून तेच काम रु. १० हजाराच्या आत करवून घेतले. पांढरी माती विकली त्याचे तोडकाम-खर्चाच्या दुप्पट पैसे मिळाले.

बिचारे श्री. बाळू पुजारी हे खरे शिक्षक आणि देवाचे पुजारी त्यांना ही मोजमापे आणि मजूरी आणि ठेके यांची काय कल्पना असणार? त्यांचा त्यात काही दोष नसेल. पण त्यांना काही न बोलता मी माझे निवेदन ''श्रीं''ना सांगितले. मी म्हटले, ''हा तोडण्याचा खर्च हजाराच्या जवळपास येईल. शिवाय पडणारी पांढरी माती विकूनदोन हजार तरी मिळतील.'' प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''असं असेल तर तुम्हीच त्या कामात पूर्ण लक्ष घाला.'' अजितही उपस्थित होते. प.पू. श्रीमहाराजांनी चि. अजित यास स्वत: बाळू पुजारी यांच्याकडे जाऊन ''अनायासे नागले येथे आहेत तर तेच आमचे हे घराचे काम पहातील.'' श्री. बाळूंना न दुखविता त्यांनी त्यांना व्यवस्थित समजावले. श्री. बाळू पुजारी दामूंचे घरी येऊन आम्हांस भेटले व मलाही वेळ नाहीच तर आपणच हे काम पहावे असे म्हणाले.

दि. ७ ला सायंकाळी आम्ही श्री रेणुका निवासात प.पू. श्रीमहाराजांना दोन्ही कामाची प्रगती कथन करण्यास दाखल झालो. श्री. रघुनाथरावही ''श्रीं''च्या खोलीत उपस्थित होते.

प.पू. श्रीमहाराजांना म्हटले, ''आपले वाडीचे घर संपूर्ण तोडून पाडून सर्व डेब्रीज

मातीचे ढिगारे साफ करून जागा मोकळी केली व पायाकरिता चर घेऊन कामास प्रारंभ केला आहे. जुनी वास्तु तोडण्यास रु. ११२५/- चा खर्च आला असून पडलेली माती विकून २५००/- रुपये आपल्याला मिळाले आहेत.''

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''म्हणजे आम्हांस १२ हजार द्यायला न लागता तुम्हीच कामातून १३००/- रुपये घेऊन आलात.'' लागलीच रघुनाथरावांकडे वळून श्री. बाळू पुजारी यांची कणव येऊन महाराज म्हणाले, ''बाळूंचे आपण खूप नुकसान केले आहे. ताबडतोब त्यांना निदान रुपये पाच हजार तरी, भेट म्हणून पाठवून द्या.''

'श्री वासुदेव निवास ट्रस्टकडून' 'श्री दत्त अमरेश्वर व प.प. वासुदेवानंद पीठ ट्रस्टला' अर्थसहाय्य देणगी स्वरुपांत मिळावे या करिता मिटींग होती. मिटींगमध्ये श्री. लाटे व नागले यांनी गेल्या चार महिन्यात किती कामे झाली, किती खर्च झाला, पुढील कामे, त्यास आवश्यक निधी ही सर्व माहीती दिली. 'श्री दत्त अमरेश्वर व श्री वासुदेव पीठ' या ट्रस्टला जास्तीत जास्त हातभार लावण्याचे ठरले. परंतु किती रक्कम हे 'श्री वासुदेव निवास' ट्रस्टींच्या मिटींग नंतर ठरेल.

प.पू. श्रीमहाराजांची 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराच्या' जीर्णोद्धाराबरोबर दुसरीही एक संकल्पना होती ती म्हणजे मंदिरासमोर कृष्णा नदीवर घाट व्हावा. मंदिरासमोर आपली मळी म्हणजे शेतजमीन देवस्थानचीच आहे. त्यातून घाटाकडे जाण्याचा रस्ता बनविता येईल. सर्व गावकऱ्यांना ह्या घाट प्रकल्पाचा फायदा होणार होता. ''श्रीं''ची इच्छा लक्षात घेऊन विशेषत: श्री. लाटे आणि त्यांना सहाय्यक मी, आम्ही मनापासून त्या प्रयत्नात होतो. ह्या प्रकल्पास फार मोठा निधी उभा करावा लागणार होता, म्हणून समस्त गांवकरी पुढाऱ्यांस हाताशी धरून आम्ही सरकारकडून सहाय्य व्हावे या करता आमदार नामदार श्री. बाळासाहेब माने, श्री. रत्नाप्पा कुंभार अशा अनेक मान्यवर व्यक्तींकडून प्रयत्न करीत होतो. मे. कलेक्टर कोल्हापूर सी.ओ. ह्यांच्याही भेटीगांठी घेत होतो. गांवकरी, गावातून वर्गणी काढून काही रक्कम (काही टक्के) गांवकऱ्यांनी उभी करायची असते म्हणून जमा करीत होते. श्री मंदिराकरिता भक्तांकडून जसा देणग्यांचा ओघ चालू होता तसा घाट प्रकल्पाकरताही चालू रहावा म्हणून आमचे गुरुबंधू अत्यंत प्रयत्नशील होते. श्री. रत्नाप्पा कुंभारांचे हस्ते ''श्रीं''च्या संमतीने घाट प्रकल्पाचा शिलान्यास कार्यक्रम करून घेतला. दि. १७.१०.१९९३ ते २९.१०.१९९३ च्या मुक्कामात औरवाड व वाडी येथील कामांवर रात्रंदिवस जोर मारून 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे' परिसरांतील सहा इमारतींपैकी सत्संग निवास तळमजला मंदिर व हॉल एवढे पूर्ण वापरास तयार झाले. प.पू. श्रीमहाराजांचे मार्गदर्शनाखाली नव्या तयार वास्तूंची उदकशांत करायचे ठरले. दि. ५.११.१९९३ रोजी 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरात'

'शिवपंचायतन याग' झाला.

दुसऱ्या दिवशी दि. ६.११.१९९३ ला शनिवारी वाडीतील नव्या वास्तुमध्ये प.पू. श्रीमहाराजांचा सकाळी ठीक ११ वाजता प्रवेश झाला. आम्हांस सार्थकता आणि समाधान झाले. मनस्वी आनंद झाला.

दि. ७.११.१९९३ रोजी रविवारी प.पू. श्रीमहाराजांच्या नवीन घरात शिवपंचायतन सौरयाग संपन्न झाला. दि. ८ रोजी औरवाड 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरात' याग चालूच होता. दि. ९.११.१९९३ रोजी मंगळवारी 'शिवपंचायतन देवीयाग समाप्ती' व समाराधन प्रसाद भोजन समस्त गांवकऱ्यांस झाले. दि. १०.११.१९९३, बुधवारी सकाळी ८.३० पासून प.पू. श्रीमहाराजांच्या वाडींतील घराची उदकशांत झाली. दि. ११.११.१९९३ वाडीत 'श्री गुरुद्वादशीचा' उत्सव साजरा झाला.

दि. २८.१२.१९९३, मंगळवारी मी व श्री. लाटेसाहेब गांवकरी मंडळींसह घाट प्रकल्पाकरिता खासदार बाळासाहेब माने यांच्या घरी गेलो. गांवकऱ्यांपैकी श्री. बापू रावण (पुढारी), मारुतराव तसेच देवाची शेती ज्या श्रीमती बाळाबाईंकडे होती, ज्या बरीच वर्षे ट्रस्टींच्या अनुमतीने उसाचे पीक काढीत होत्या, त्या बाईही सोबत होत्या. खा. बाळासाहेब माने यांच्यासमोर समस्त गांवकऱ्यांच्या सौजन्याने व श्रीमती बाळाबाईनी सद्भावनेने त्यांची शेती मंदिराच्या विश्वस्तांकडे हस्तांतरीत केली. तसे सर्वांसमक्ष घोषीत केले. श्रीमती बाळाबाई यांनी बिनशर्त मळी (शेती) सोडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

ह्यावेळी श्री. लाटे आणि माझे सोबत प.पू. श्रीमहाराजांनी प.प. श्री गजानन आश्रम स्वामी महाराजांनाही विनंतीपूर्वक सोबत पाठविले. ह्यांत ''श्रीं''चा खास उद्देश असावा. श्रीमती बाळाबाईंकडून सद्भावे बिनशर्त मळी ताब्यात आली तशाच प्रकारे रस्त्यास लागून असलेल्या आपल्या मंदिराच्या ट्रस्टच्या मालकीच्या प्लॉटवर औरवाडचे श्री. गोविंदराव कुलकर्णी यांनी दोन दुकाने बसविली होती. तो प्लॉटही रिकामा करून ताब्यात घ्यायचा होता. प्रमुख ट्रस्टी म्हणून प.पू. श्रीमहाराजांना यायचे होते परंतु प्रकृतीस्वास्थ्य ठीक नसल्याने डॉक्टरांची अनुमती नव्हती. ''श्रीं''च्या वतीने श्री गजानन आश्रम स्वामी महाराज, २) श्री. भिर्डीकर ट्रस्टी, ३) श्री. कडेकर ट्रस्टी, ४) श्री. लक्ष्मणराव कुलकर्णी, ५) श्री. गोविंदराव कुलकर्णी, ६) श्री. किरण कडेकर, ७) श्री. लाटेसाहेब, ८) श्री. नागले ही मंडळी उपस्थित होती.

प.पू. श्रीमहाराजांचे घराचे काम पूर्ण झाले होते. आता वास्तव्य करण्यास आवश्यक पाणी, वीज आणि ड्रेनेज लाईन. प्लंबींगचे आतील काम नळाच्या तोट्या लावण्यापासून गच्चीवर स्टोअरेज टाकी आणि इमारतीच्या जलवाहिन्या (पाईप फिटींग) सर्व तयार होते.

आता फक्त ग्रामपंचायतीकडून पाण्याच्या लाईनला जोडणी बाकी होती. आपली इमारत व शेजारचे श्री. खोंबारे यांचे घर या दोन इमारतीत सामाईक बोळ (गल्ली) आहे. त्या बोळात चर खणून आम्ही पाण्याच्या पाईपाची लाईन रस्त्याच्या कडेला आणून ठेवली होती. आता जोडकाम आम्ही मुंबईहून येताच करून घेणार होतो. तत्संबंधी जोडकाम व्हावे म्हणून आम्ही ग्रामपंचायतीकडे अर्जही दिला होता. दुसरी आम्ही चीनी मातीचे पाईप (स्टोनवेअर पाईप) याच बोळातून टाकून सेप्टीक टँकचे पाणी बांधलेल्या सोकपीटला सोडले होते. परंतु मुंबईहून ४-५ दिवसात परत आल्यानंतर कळले की शेजारच्या श्री. खोंबारे यांनी आम्ही टाकलेल्या दोन्ही लाईनी उखडून काढून तेथेच फेकून दिल्या होत्या. चीनी पाईप फुटून तुटून गेले होते. पाण्याचे पाईप वेडेवाकडे झाल्याने पुन्हा वापरता येतील का याबद्दल शंकाच होती. लाईन टाकणे,सामानाची मोडतोड असे सात एक हजाराचे तरी, प.पू. महाराजांच्या कामाचे, नुकसान झाले होते. हे त्यांनी असे का केले ते आम्हांस कळले नाही. वास्तविक तो बोळ, ती जागा समाईक होती. ड्रेनेज व पाण्याची लाईन जमिनीखालून होती. वर आम्ही काँक्रीटींग करून चांगला काँक्रेट पॅसेज तयार करणार होतो. पायाला काही पाईप लाईन्स अडत नव्हत्या. शिवाय पावसाळ्यात एरव्ही सुद्धा पायास चिखलही लागला नसता. कदाचित ती जागा, तो बोळ त्यांच्या एकट्याच्या मालकीचा वाटला असावा. पण किमानपक्षी काम चालू असताना किंवा पूर्ण होताच त्यांच्या शंका किंवा हरकती काय असतील तर त्या त्यांनी आम्हांस सांगायला तरी हव्या होत्या. ''हे आपण बरे केले नाही'' एवढा निरोप पाठवून आम्ही हे सर्व प.पू. श्रीमहाराजांच्या कानावर घालण्यास पुण्यास निघून गेलो. नुकसान झाले होते. हे सर्व काम पुन्हा करण्याचा खर्च होताच, पण तो करून पुन्हा आम्हांस कामात अडथळा नको म्हणून ''श्रीं''च्या कानावर घालणेच उचीत होते. प.पू. श्रीमहाराजांनी या कृत्याबद्दल दिलगीरी व खेद व्यक्त करणारे सामंजस्याचे पत्र कसे लिहीले आहे ते एक नमुना म्हणून पुढे देत आहे.

एक स्थितप्रज्ञ पण व्यवहार कुशल संत सत्पुरुष अत्यंत क्रोधायमान होण्याच्या स्वाभाविक प्रसंगीही कसा धीराने आणि सौजन्याने वागतो, समोरच्यास त्याची चूकही कशी गळ्यात टाकतो हे या पत्रांतून घेण्यासारखे आहे. हे पत्र अंतर्देशीय पाकीटात आहे. ते लिहून पूर्ण होताच आम्ही ''श्रीं''च्या पुढे हजर झालो म्हणून त्यांनी ते पोस्टात न टाकता आमच्या मार्फत दिले. आम्ही ते पत्र स्वहस्ते श्री. खोंबारे यांच्या हाती दिले. ते त्यावेळी त्यांच्या माडीवरील हॉलमध्ये पेपर वाचीत बसले होते. पत्र वाचून त्यांनी सुस्कारा सोडून ते पत्र आमच्यापुढे ठेवले. आम्हीही ते त्वरीत उचलून खिशात घातले, आमचे ज्ञानाकरिता!

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास.
दि. ४.१.१९९४

श्री. दत्तोपंत खोंबारे

सप्रेम नमस्कार वि. क्षेम,

आपणाकडीलही कुशल वृत्त सवडीने कळत असावे. आमच्या पत्राचा पूर्ण विचार करून राग शांत करावा अशी प्रथम प्रार्थना आहे.

तेथे आमचे घराचे व औरवाडचेही जीर्णोद्धाराचे बांधकाम मुंबईचे एक सज्जन गृहस्थ वारंवार मुंबईहून मुद्दाम येऊन करीत असतात. ते परवा मुंबईस जाताना आम्हाला भेटून, तेथे झालेली एक दुर्घटना सांगून गेले. त्यामुळे वाईट वाटून हे प्रार्थना पत्र आपणास लिहीत आहे. त्यांनी आमच्या घरात नळाचे पाणी येण्याकरिता खाली जमिनीत काही नळ घातले होते. पण ते येण्यापूर्वीच ते सर्व उकरून आपण फेकून दिल्याचे ऐकून खेद वाटला. ते येईपर्यंत आलेला राग आवरून आपण ते आल्यावर त्यांना सांगितले असते तर त्यांनी ते सर्व काढून घेतले असते. तोपर्यंत आपण थांबला असतात तर काही भूकंप होऊन घरेदारे जमीनदोस्त होण्याचा प्रसंग आला नसता आणि आज पाच सात हजाराने एका ब्राह्मणाचे निष्कारण नुकसान केल्याचे पापही आपणास लागले नसते. शांत चित्ताने आम्हाला जरी एका पत्राने ताकीद दिली असती तर आम्हीही त्यांना ते काम काढून घेण्यास सांगितले असते. पूर्वी श्री गुळवणी महाराज वामन शास्त्रींचेकडे एका अवघड माडीवर रहात होते. त्यावेळी त्यांचा तो त्रास चुकविण्याकरिता तुम्हीच पुढाकार घेऊन मारुती जवळ त्यांना राहण्याकरिता 'श्रीगुरुनिवास' ही वास्तू बांधून दिली. हे उत्तम पुण्यकार्य आपणाकडून झालेले आम्ही पाहिले आहे. श्री महाराजांनाही त्याबद्दल समाधान वाटत होते. असे असताना आज इतका राग अनावर होऊन आपल्या हातून ही ब्राह्मणाची नुकसानी का झाली हे लक्षात येत नाही. असो. आपली मर्जी, आमचे प्रारब्ध. पूर्वी श्री. पिल्लंभट, वे. सीतारामपंत सोलापूरकर आम्हांस तोंडावर स्पष्ट बोलत होते. पण तो त्यांचा राग तात्पुरता होता. श्री. पिल्लंभटजी आमचे घरी श्राद्धपक्षांत येऊन जेवण करून पान तंबाखू खाऊन आनंदाने जात होते. मनात काही ठेवीत नव्हते. वाडीत आम्ही आपणा पुजाऱ्यांची सहानुभूती संपादून, हा देह कधीतरी स्मशानात जाणार आहे, हे मनात नित्य बाळगून, आज चार पिढ्या आम्ही वाडीत राहात असल्यामुळे 'भगवान श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंह सरस्वती दत्त प्रभूंनी' आम्हाला चार पिढ्या सुरक्षित ठेवले याबद्दल आम्ही नित्य कृतज्ञ आहोत. आज आम्हाला आपल्यासारख्या पुण्यकर्म करणाऱ्यांचाही राग व नुकसान प्रारब्धाने भोगण्याचा

प्रसंग आलेला आहे. रस्त्यावरचे पाणी घेता येईल किंवा एखाद्या दयाळू शेजाऱ्याकडून पिण्यापुरते पाणी आम्हाला मिळेल. असो. वरच्या लिहीण्याचा पूर्ण विचार करावा. आपणाविषयी असणारी आमची प्रेमादरबुद्धी अशा क्षुद्र कारणाने कमी होणार नाही ही खात्री असू द्यावी. मानसिक त्रासामुळे हे पत्र व त्यातील स्पष्ट विचार आपणापुढे मांडण्याचा प्रसंग आला याबद्दल क्षमा करावी ही प्रार्थना. सर्वांना यथोचित नमस्कार, आशीर्वाद.

कळावे,

आपला प्रेमाश्रित
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

दि. ३०.१.१९९४, रविवारी सकाळीच श्री रेणुका निवासात ''श्रीं''च्या दर्शनास गेलो. सोबत सौ. लता, चि. दिनेश, चि. अभिजीत होते. 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराच्या' कामाबाबत चर्चा झाली. दहा वाजता गुलबर्ग्याच्या श्रीमती मीराबाई आणि त्यांचे भजनी मंडळ दर्शनास आले. त्यांच्या भजनाचा कार्यक्रम सकाळी १० ते ११.३० पर्यंत झाला. प.पू. श्रीमहाराज ऐकण्यास बसले होते. भजनात प.पू. श्रीमहाराजांचेच स्तवन, स्तुती आणि त्यांचे विषयीची भावपूर्ण गुरुभक्तीपूर्ण गीते त्यांनी गाईली. प.पू. श्रीमहाराज त्रयस्थाच्या भूमिकेतून श्रवण करीत होते. जणू ते त्या गावचे नव्हतेच आणि आपल्याच श्री गुरुमहाराजांची भजने आहेत असे समजून हाताचे बोटावर ठेकाही धरीत होते. भजनाचा कार्यक्रम आणि सर्वांस दुग्धपान करून मंडळी श्री वासुदेव निवासात गेली. नंतर ''श्रीं''नी आम्हा चौघास खोलीत बोलावून घेतले.

मुले मोठी झाली. प्रपंच वाढला. मोठ्याचे लग्न होऊन त्याला कन्यारत्न झाले होते. गोरेगांवचा ब्लॉक आता लहान पडू लागला. तो विकून दोन चार खोल्यांचे ब्लॉक एकत्र करून घ्यायचे. मीरा रोडला तसे होते. परंतु आम्ही ''श्रीं''च्या अनुमतीखेरीज निर्णय कधीच घेतले नाहीत. प.पू. श्रीमहाराजांनी गोरेगांवचा ब्लॉक विकण्यास स्पष्ट नकार दिला.

दुसरी बाब होती चि. दिनेशची. नोकरी-व्यवसायाची आणि धनार्जनात स्थिर झाल्यानंतर ३-४ वर्षांनी त्याचा विवाह करण्याची. परंतु प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''आता त्याला नोकरी लागली आहेच. पगार पुढे वाढेल. दुसरी नोकरीही चांगली मिळाली तर पहाता येईल. आता त्याचा विवाह उरकण्यास हरकत नाही. तरी तुम्ही त्याचा विवाह लवकर करण्यास तयारी करावी.'' ''श्रीं''चे वाक्य प्रमाण मानून आम्ही तयारीस लागलो. प.पू. श्रीमहाराज अधून-मधून चौकशी करायचे, ''दिनेश याच्या विवाहाचे कोठवर आले?''

आम्ही म्हणावे, ''पाहिजे तसे स्थळ अजून येत नाही!'' ''श्री'' म्हणाले, 'असे कसे स्थळ येईल? चार चौघांना नातलग, स्नेही, परिचित व्यक्तींना आपला 'मुलगा यंदा

विवाहास उभा आहे' असे सांगितले पाहिजे.'' अखेर अमरावतीचे स्थळ आले. प.पू. श्रीमहाराजांना फोटो, पत्रिका व मुलीची माहीती दाखवली. फोटो अगदी निरखून पाहिला. चांगली आहे मुलगी म्हणाले. सौ. आईसाहेबांनाही माहीती व फोटो दाखविण्यास सांगितले. ह्या गोष्टी वाडीमध्ये श्री. दामु पुजारी यांच्या घरी ''श्रीं''चा व आमचाही मुक्काम असताना घडल्या. प.पू. श्रीमहाराजांची आज्ञा घेऊन आम्ही मुलीच्या आई-वडीलांस मुलीसह आमच्या घरी बोलावून होकार दिला.

पुढे चि. दिनेश-अल्पना यांचा विवाह प.पू. श्रीमहाराजांना व सौ. आईसाहेबांना विवाहास वधूवरांस आशीर्वाद देण्यास आगमन सुलभ व्हावे म्हणून पुण्यातच कार्यालय नक्की केले. दि. २३.१२.१९९४ रोजी सकाळी विवाह संपन्न झाला. प.पू. श्रीमहाराज व सौ. आईसाहेब या विवाह समारंभास आम्हांस परम भाग्याने लाभले. सौ. आईसाहब म्हणाल्या, ''नवऱ्या मुलीचे नांव देविका ठेवा!'' अर्थात तेच नांव आम्ही ठेवले.

हे सर्व धार्मिक-प्रांपचिक समारंभ श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे काम चालू असतानाच घडले म्हणून याच प्रकरणात घेतले आहेत.

दि. ३१.१.१९९४ रोजी ''श्रीं''नी मला घरी बोलावून घेतले. रत्नागिरी हातखंब्याचे रहिवासी प.पू. श्रीमहाराजांचे परम भक्त श्री. सदानंद मोघे यांचे पत्र आणि चेक आला होता. प.पू. श्रीमहाराजांनी मला पत्र वाचायला सांगितले. त्यांनी पाठविलेला रु. १० हजारांचा चेक त्यांनी माझ्या हाती दिला. पत्रात लिहीले होते, 'ही रक्कम श्री दत्त अमरेश्वर मंदिर ट्रस्टचे बँक अकौंटमध्ये फिक्सला जमा करावी आणि येणाऱ्या व्याजांतून श्री दत्त अमरेश्वराच्या नंदादीपाच्या तेलाचा खर्च करावा.'

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''आज जीर्णोद्धाराचे काम चालू आहे. तोपर्यंत ही रक्कम तुम्ही बांधकामाकरिता वापरा. मंदिर परिपूर्ण झाल्यानंतर मात्र न विसरता ही दहा हजारांची रक्कम श्री. मोघ्यांनी सांगितल्याप्रमाणे बँकेत श्री दत्त अमरेश्वराचे खाती फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवून व्याजाचे पैसे नंदादीपास लावण्याचा ट्रस्टींकडून ठराव करून घ्या.''

मंदिराचे काम संपल्यानंतर प.पू. श्रीमहाराजांनी श्री. मोघे यांचे पैसे ठरल्याप्रमाणे नंदादीपाकरीता ठेवले किंवा नाही हे दोनदा विचारले. पुढे ते काम पूर्ण केले.

दि. १६.७.१९९३ रोजी ''श्रीं'' समवेत तसेच श्री वासुदेव निवासचे ट्रस्टींबरोबर श्री वासुदेव निवास ट्रस्टकडून श्री दत्त अमरेश्वर मंदिर जीर्णोद्धारास भव्य देणगी देण्याबद्दल मिटींग झाली होती. परंतु ह्या मिटींगमध्ये देणगीची रक्कम ठरली नव्हती.

दि. ८.८.१९९४ रोजी देणगी किती द्यावी याबद्दल प.पू. श्रीमहाराजांच्या उपस्थितीत श्री वासुदेव निवास ट्रस्टींबरोबर आम्ही जीर्णोद्धार मंडळींची मिटींग झाली. मंडळाकडून

श्री. लाटे व नागले हजर होतेच. प.पू. श्रीमहाराजांनी माझ्याकडे श्री वासुदेव पीठाचे काम कितीपर्यंत एस्टीमेट होईल ते विचारले व आम्ही श्री वासुदेव निवासाकडून साडेतीन लाख मिळाले तर श्री वासुदेव पीठाचे काम पूर्ण होईल असे सांगितले. पुढे आम्ही मंडळांकडून विनंती केली की साडेतीन लाख एवढी रक्कम तरी श्री वासुदेव निवास ट्रस्टने द्यावी म्हणजे श्री वासुदेव पीठाचे काम श्री वासुदेव निवासानेच केल्यासारखे होईल. विश्वस्त मंडळीस संकल्पना एकदम पसंत पडली. श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी बिना हरकत मंजूरी दिली आणि श्री. दामले यांनी दुजोरा दिला. देणगी नक्की झाली. लागलीच प.पू. श्रीमहाराजांनी याच मिटींगमध्ये रुपये पन्नास हजाराचा चेकही श्री दत्त अमरेश्वर मंदिर ट्रस्टला बहाल केला. आमच्या हाती सुपूर्त केला. रात्रीच्या सह्याद्री एक्सप्रेसने आम्ही वाडी-औरवाडला रवाना झालो.



२२८/१) दक्षिणद्वार खुले झाले!

वाडीतील परवलीचा हा वाक्प्रचार आहे. त्याचा अर्थ आधी पाहूयां. पावसाळ्यांत कृष्णा नदीचे पाणी हळू हळू वर चढू लागते. पाणी वर चढण्याचे कारण असते पावसाची अतिवृष्टी. पाऊस वाडीतच पडला तर पाणी वाढते असे नाही. वाडीच्या उत्तर भागातील प्रदेशात, तसेच कोकण प्रदेशात कोठेही पाऊस जास्त पडला किंवा कोयना धरण दुथडी भरून वाहू लागले तरी कृष्णेचे पाणी वर वर चढू लागते. शेवटच्या पायरीची पातळी गाठली की वाडीचे पुजारी दक्ष असतात. मंदिरांतील काही पूजासाहित्यादी व इतर जी असतील नसतील ती उपकरणे वर 'श्री नारायण स्वामींचे मठात' आणली जातात. मंदिराचे दर्शनी दार आणि उत्तर दक्षिणेकडील पादुकांच्या गाभाऱ्यांची द्वारे सताड उघडी केली जातात. कृष्णेचे पाणी चढता चढता मंदिराचे जवळ येऊन कधीही खाली उतरते व नदीच्या पाण्याची पातळी खाली जाऊन नित्यपूजा नित्याप्रमाणे सुरू होतात. तर काही वेळा ही पाण्याची पातळी वर वर चढत पाणी गाभाऱ्याच्या उत्तरेकडील दारातून आत शिरून पादुकांवरून वहात दक्षिण द्वारांतून बाहेर पडू लागते. ही घटना कधी कोणत्या वेळी घडेल हे सांगता येत नाही. कधी रात्री अपरात्री तर कधी भल्या पहाटे, कधी सकाळी, दुपारी, सायंकाळी कधीही ते घडते. असे हे कृष्णेचे पाणी गाभाऱ्यात शिरून दक्षिण द्वारांतून बाहेर पडू लागले की या घटनेस 'दक्षिण द्वार खुले झाले' असे म्हणतात. मंदिरात सतत काही मिनिटे मोठ्ठा घंटानाद केला जातो. घंटानाद सुरू झाला की समस्त ग्रामस्थांना तसेच आसपासच्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांना आबाल-वृद्धांना दक्षिणद्वार खुले झाल्याचा संकेत मिळतो. दक्षिण द्वारातून

पादुकांवरून वहात येणारे पाणी आपल्या आपादमस्तक शरीरावरून वाहून जावे म्हणून गावांतील समस्त आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष दक्षिण द्वारांत हजर होतात. नदीचे पाणी वाहते असते, तशी पाण्याला ओढही असते. परंतु लोखंडी कठडे रेलींगला धरून दक्षिण द्वारात जाता येते. तेथे स्नान व डोक्यावरून पाणी घेऊन तांब्या लोट्यांतही पाणी घेऊन भाविक लोक कृतार्थ होऊन घरी परततात. महाराष्ट्रातच नव्हे तर गुजराथ, गोवा, कर्नाटक अशा प्रांतीतील भाविक लोकांनी सुद्धा वाडीतील पुजाऱ्यांना आपले फोन नंबर, मोबाईल नंबर देऊन ठेवलेले असतात. 'दक्षिणद्वार होण्याची चिन्हे दिसू लागली की आम्हाला कळवा!' गांवागांवाहून, प्रांताप्रांतातून भाविक भक्त वाडीत येऊन धर्मशाळेतून किंवा पुजाऱ्यांच्या घरांतून वस्ती करून राहतात. दक्षिणद्वार केव्हा उघडेल हे सांगता येत नाही. चिन्हे दिसताच फोन जातो, भक्त धावत येतात आणि कृष्णामाई सरळ त्यांच्याशी लंपडाव-शिवाशिवीचा खेळ खेळते. भाविक आठआठ पंधरा पंधरा दिवस वाडीत मुक्काम करून राहतात, त्यांना वाटते कधी दक्षिणद्वार खुले होते आणि आम्हांस पवित्र करून सोडते. भाग्याच्या गोष्टी आहेत या. कधी खुले लागलीच होतेही तर कधी भाविक भक्तांची तितिक्षा पहाते. काहीना तर निराश होऊन परतावे लागते. पाऊसच दडी मारतो.

दक्षिणद्वार खुले झाले की गावातील विशेषत: वाडीतील मंडळी एकमेकांना विचारतात, ''काय झालं कां दक्षिणद्वार खुलं?'' तर कोणी वृद्ध स्त्री-पुरुष जे मंदिराकडे जाण्यास असमर्थ किंवा पायऱ्या उतरणे ज्यांना अशक्य आहे अशा व्यक्तींकरिता कोणीना कोणी सान थोर मंडळी लोटाभर पाणी घरी आणून देतात.

ही मंगलमय स्नानाची पर्वणी स्वीकृत करताना सर्वच भाविक भक्तांना आणखी एक लाभ घडतो तो म्हणजे उत्तर द्वारी उभे राहून आपल्या हाताचे ओंजळीने पाण्याचे प्रोक्षण दत्तपादुकांवर करण्याचा, वाडीत नित्य कार्यक्रमात कृष्णेचे लोटाभर पाणी पादुकांवर घालण्याचा अधिकार फक्त वाडींतील ब्राह्मण पुजाऱ्यांनाच 'श्री दत्तप्रभू नृसिंह स्वामी महाराजांनी' दिला आहे व हा शिरस्ता भावभक्तीने मान्य करून भाविक, मर्यादा किंवा नियमांचे उल्लघंन करीत नाहीत. परंतु दक्षिणद्वार खुले झाले की देवांच्या पादुकांवर पाणी घालण्यास कोणासही परवानगी अर्थात उत्तरद्वारांतून लांबून घालण्याची आहे. भक्त भाविक उत्तर द्वारांतून पादुकांवर कृष्णेचे पाणी उडवून आनंद उपभोगीत असतात.

नदीचे पाणी ओसरले की ग्रामस्थ पुजाऱ्यांना गाभाऱ्यांमध्ये शिरलेला चिखल साफ करण्याची मोठी कामगिरी असते.

२२८/२) देव घरी आले!

दक्षिणद्वार खुले होऊन पाणी कमी न होता वाढत गेले तर श्री देवांचा मुक्काम 'श्री नारायण स्वामींच्या मठांतच' राहतो. उत्सवमूर्तीचे मुखवट्यावर अभिषेक महापूजा होत असतात. काकड आरतीपासून शेजारतीपर्यंतचे सर्व सोपस्कार उत्सव मूर्तीवर होतात. पालखी चातुर्मासात आषाढी एकादशी पासून बंदच असते. ती दसऱ्याचे सीमोल्लंघनापर्यंत. कृष्णेस महापूर क्वचित येतो. देव दीनाघरी धावतो तो नदीस महापूर आल्यानंतर. दरवर्षी महापूर येईलच असे नाही. पावसाळ्याचे महिने संपेपर्यंत रम्य पादुका पाण्यातच असतात. पावसाळा संपल्यानंतर पादुकांचे दर्शन होते. 'श्री प्रभू पादुकांना' सतत पाण्यात राहण्याने सूज आलेली असते. ग्रामस्थ पुजारी मंदिर परिसरात मोठा चुला तयार करून त्यावर मोठे भांडे ठेवून त्यात श्री पादुकांवर घालण्यास पादुकांची सूज ओसरण्यास औषधी काढा तयार करतात. या काढ्यात धणे, बडीशेप, दालचिनी, सुंठ, वेखंड असे काही सर्दी कमी करणारे औषधी पदार्थ वापरीत असावेत. नंतर पत्री खडीसाखरही घालीत असावेत. हा काढा रम्य पादुकांवर घालून बाहेर येणारा पादुकास्पर्श झालेला काढा गोळा केला जातो व समस्त ग्रामस्थ हा काढा घरी बाटलीत संपूर्ण वर्ष सांभाळतात. मोसमी येणाऱ्या कोणत्याही आजारावर ह्या काढ्याचे सेवन म्हणजे रामबाण औषध असते.

नदीला पूर येऊन पाणी चढू लागले की संपूर्ण पादुका मंदिर-त्यांवरील प.पू. श्री गुळवणी महाराजांनी बांधून घेतलेला मंडप पाण्याखाली जातो. या मंडपावरही दहा ते पंधरा फूट पाणी चढते. 'श्री नारायण स्वामींचे मठात' पाणी शिरताच देवांना 'श्री वासुदेवानंदांच्या ओसरी मंदिरांत' नेतात. मंदिरांच्या परिसरांत ही ओसरीच उंच भागावर आहे. येथे सर्व नित्यक्रम सुरू होतात. हळूहळू पाणी आणखी वाढू लागते. 'श्री वासुदेव ओसरीच्या' अर्ध्या पायऱ्या पाण्याखाली जाताच गावात स्वच्छत मोहीम निघते. सर्व गावांची विशेषत: ज्या मार्गावरून 'श्री दत्तप्रभूंची पालखी' जाणार तो मार्ग गाईच्या शेणाने सडासंमार्जन करून पवित्र करतात. रस्त्याच्या दुतर्फा पताका तोरणे लावून सजावट केली जाते. जेथे शक्य तेथे रांगोळ्या काढल्या जातात. पांढरे शुभ्र घोडे सजवून तयार होतात. बॅन्ड पथक, झांजपथक, लेझीम, भजनी मंडळी सर्व तयारीत असतात. 'श्री देवांचे पादुकासमोर' बसण्याची दक्षिणा स्वीकारणे, प्रसाद देणे याकरिता पुजाऱ्यांचे दिवस ठरलेले असतात. एका दिवसात अर्ध्या अर्ध्या दिवसाचे दोन पुजारी व त्यांच्या वेळा ठरलेल्या असतात. आता देव गावात आले तर त्यादिवशी किंवा त्या ठराविक वेळी कोणाची बारी असेल त्या पुजाऱ्याचे घरी त्याच्या महत् भाग्याने देव येतात. 'श्री वासुदेवांचे ओसरीच्या' शेवटच्या म्हणजे अगदी वरच्या पायरीला कृष्णेच्या पाण्याची लाट एक-दोन-तीनदा आपटली की तेथे सतत दक्ष असलेले पंच पुजारी एकमेकांस विचारतात, 'निघायचे

कां देवांनी गावाकडे?' त्यांच्यापैकीच पुजारी म्हणतात, 'त्रिवार श्री कृष्णेचा जलस्पर्श' झालेला आहे, आता निघायचे. असे काहीतरी त्या पाच पुजाऱ्यांत निर्णयाचे बोलणे होते. घंटा निनाद लागतात, तुतारी ललकारी, ताशा, ढोल सुरू होतात. सर्वात पुढे चालू लागताच सर्व लवाजम्यानिशी 'अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या पादुकांची' मिरवणूक पुढे पुढे सरकू लागते. ग्रामदक्षिणा करून ज्या पुजाऱ्यांची देव निघतात तेव्हा बारी असेल त्या पुजाऱ्यांचे घरी देव येतात. तशी त्या दिवसाच्या दोन्ही पुजाऱ्यांनी 'श्री दत्तप्रभूंच्या आगमनाची' आणि स्वागताची तयारी ठेवलेली असते. श्री दत्तप्रभूंचा मुक्काम नदीचे पाणी पूर्ण ओसरेपर्यंत आणि त्यांच्या रीतीरिवाजाप्रमाणे योग्य वेळ येईपर्यंत देव त्या पुजाऱ्यांकडे राहतात. मंदिरातील नित्यक्रम काकडआरतीपासून माध्यान्ही महापूजा-शेजारतीपर्यंत या पुजाऱ्यांचे गृही संपन्न होतात. भोजन समयी येणाऱ्या अभ्यागत अतिथींना भोजन असते. त्यांची सेवा निःस्वार्थ असते. देव घरी येतात तेव्हा यजमानाचा खूप खर्च असतो. पण त्या खर्चाच्या कितीतरी पटीने 'श्री दत्तप्रभू' धनदौलत त्या पुजारी यजमानास देऊन जातात. आपल्या घरी देव येणे हे आपले परम भाग्य पुजारी समजतात. त्यांच्या घरी जाल तर घरात प्रवेश करण्यापूर्वीच ओवरीत तुम्हांला देव आपल्या घरी आल्याचा फोटो दिसेल. ते आनंदाने तुम्हास म्हणतील, ''हा फोटो पहा, अमुक अमुक साली देव आमच्या घरी आले होते!''

असाच प.प. टेंबे स्वामी महाराजांचा पुण्यतिथी उत्सव आषाढ शु. १ ला होतो. आठ दिवस सायंकाळी चार पासून तीन तीन हरीदासबुवा कीर्तनाची हजेरी लावतात. श्रावण कृ. ५ जन्मोत्सवही जोरात साजरा होतो. पुण्यतिथीचे सप्ताहात हरीदासबुवांचे कीर्तने होतात. त्यात ९-१० वर्षाच्या कुमारापासून सत्तरी ओलांडलेले वृद्ध कीर्तनकारही असतात. एक सहज प्रसंग आठवला म्हणून लिहीतो.

एकदा मी व माझे सहकारी श्री. प्रभाकर पुजारी महाद्वार रस्त्याने मंदिराकडे चाललो होतो. पुण्यतिथी उत्सवाची कीर्तने सायंकाळी होत होती. प्रभाकर हे पेटीवादक म्हणून बसत असत. आम्ही जात असताना धोतर नेसलेला एक कुमार असेल ९ ते १० वर्षाचा समोरून येत होता. प्रभाकरने मला सांगितले, 'हा लहान मुलगा येत आहे ना त्याचे आज कीर्तन आहे. फार छान कीर्तन करतो. तुम्ही आज याच् कीर्तन ऐकायला!' मी म्हटले, 'हा एवढा लहान मुलगा कीर्तन कसा करू शकेल? कीर्तन म्हणजे बाळ गोपाळांचा खेळ नव्हे!' इतक्यात तो मुलगा जवळ येताच प्रभाकरने त्याला थांबविले व विचारले, 'काय आज तुमचे 'श्री वासुदेवांचे ओसरीत' कीर्तन आहे ना?'

तो मुलगा म्हणाला, ''होय, आज आमचे कीर्तन आहे. 'श्री स्वामी महाराजांचे' समोर कीर्तन करण्याची आमची पहिलीच वेळ आहे. करवून घेणारे तेच आहेत!''

त्या मुलाचे एखाद्या शास्त्रीबुवांना शोभतील असे बोल ऐकून मी अवाक् झालो. निरोप घेऊन मुलगा पुढे निघून गेला. प्रभाकरने मला विचारले, ''आता सांगा नागलेकाका, हा मुलगा कीर्तन करू शकेल की नाही?'' मी म्हटले, ''मानलं बुवा. आज आपण यांच्या कीर्तनाला येणारच!''

सायंकाळी या बाळाने रामदासांच्या एका बालबुद्धी शिष्याचे कथानक लावले. स्वामी सर्व शिष्यगणांसह काशी यात्रेस जातात आणि सज्जन गडावरची 'श्री प्रभू रामचंद्र, सीतामाई, लक्ष्मण आणि हनुमानजींची पूजा नैवेद्य' या भाबड्या भक्ताकडे सोपवितात. तो बालहट्ट करून सीतामाई, लक्ष्मण आणि हनुमानाला कसे कामाला लावतो, प्रत्यक्षात ते प्रकट होऊन याची सर्व कामे कशी ऐकतात, सीतामाईने केलेली भाजी रामदासांच्या आवडीची असते. त्यांना खायला मिळणार नाही म्हणून हा रडू लागतो. हनुमानजी खांद्यावर बसवून वायुवेगाने त्याला काशीला स्वामींकडे नेतात... वगैरे वर्णन अप्रतिम झाले.



२२८/३) श्री कृष्णावेणी मातेचा उत्सव

ह्या महोत्सवाचा प्रारंभ 'प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांनी' केला. पुढे प.पू. मौनी स्वामींनी त्याला यथायोग्य स्वरुप देऊन हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होऊ लागला. कृष्णानदीवर श्री वासुदेवानंदानी ''कृष्णालहरी'' हे काव्य करून दिले. कृष्णा नदीचा वेण्यानदीशी माहुली गांवी संगम होऊन ती कृष्णावेण्या झाली. आताची श्री कृष्णावेणी मातेची मूर्ती आहे ती कशी तयार झाली याची एक आख्यायिका जुने लोक सांगतात ती अशी -

'प.पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांनी' वाडीतील पुजाऱ्यास कृष्णाकाठी एका झाडाखालची जागा दाखविली व त्यांना अमुक अमुक तिथीला अमुक वेळी या झाडानजीक कृष्णा नदीतून एक लाकडाचा ओंडका वहात येईल. क्षणभर तो या ठिकाणी (त्यांनी ती जागा पुजाऱ्यांना दाखविली) विसावेल. नंतर पुढे वहात जाण्यापूर्वी तो ओंडका काढून घ्या. त्याप्रमाणे ठरल्या तिथीला त्यावर्षी तो ओंडका वहात आला. पुजाऱ्यांनी तो पुढे वहात जाण्याआधी नदीतून काढून घेतला. उत्तम कारागिराकडून ही मूर्ती कोरून घेतली. ती मूर्ती खरोखरच अत्यंत सुंदर, रेखीव, लावण्यवती आहे. पूर्वीपासून ही मूर्ती वाडीत श्री. कागलकर यांच्या घरी परंपरागत ठेविलेली असते. दरवर्षी माघ शु. षष्ठीला 'श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची' आज्ञा घेऊन श्रीफल घेऊन कार्यकारी ब्रह्मवृंद मंडळी पहाटे चार वाजता 'श्री कृष्णावेणी मातेस' मोठ्या सन्मानाने आणण्यास वाजंत्री बॅण्डसह मिरवणुकीने

श्री. कागलकर यांच्या घरी हजर होतात.

सर्व रस्ते सडासंमार्जन करून रांगोळ्यांनी सुशोभित केलेले असतात. रस्त्याच्या दुतर्फा फुलांच्या माळा, तोरणे, उदबत्त्या लावलेल्या असतात. सुगंधाची दरवळ पसरलेली असते. वाडीवासीयांच्या आनंदाला कृष्णेच्या पुरापेक्षांही मोठा पूर-उधाण आलेले असते. सर्व रस्ते रोषणाईने विद्युत दिपमालांनी सजलेले असतात. पहाटे पासूनच कुमारिका आणि सुवासिनी प्रशस्त रांगोळ्या काढण्यात व्यग्र असतात. सगळा मिरवणूक मार्ग रांगोळ्यांनी भरून गेलेला असतो. रांगोळीतूनच स्वागतपर वाक्ये लिहीलेली असतात, ''श्री कृष्णावेणी माता आपले स्वागत असो!, श्री कृष्णावेणीमाता प्रसीदताम!, श्री कृष्णावेणीमाता की जय!'' पहाटे चार वाजल्यापासूनच मंदिराजवळील श्री कृष्णावेणी उत्सव मंडपांतून भक्ती गीतांच्या ध्वनीमुद्रिका ध्वनीक्षेपकावरून प्रसारित होत असतात. तुतारींची आणि बिगुलांची ललकारी दुमदुमते आणि फटाक्यांचे कडाक्याचे आवाज होतात अणि समस्त ग्रामस्थांना कळते की माऊली घरून निघाली. नगरवासी दारादारात माऊलीची प्रतिक्षा करीत असतात. कोणी तरी म्हणते, ''बिगुल वाजले, कृष्णावेणी मातेचे उत्थान होऊन प्रस्थानास प्रारंभ झाला. आता थोड्याच वेळांत आपले दाराशी माऊलीचे आगमन होईल.'' नटलेल्या थटलेल्या सुवासिनीचे एकमेव लक्ष माऊलीच्या आगमनाकडे असते. कृष्णावेणीचे मंडपावर विविध प्रकारची विविध रंगांची आतषबाजी चालू असते. आकाशात उडणारे अग्निबाण खाली येताना विविध रंगांचे ताऱ्यांसारखे बिंदू आकाशांत पसरवित असतात. मिरवणूकीला बॅण्ड खास पुण्याहून आणलेला असतो. झुंजू मुंजू पहाट सरत आलेली असते. प्रत्येक दारासमोर क्षणभर थांबून सर्व सुवासिनी आणि कुमारिकांकडून ओवाळणी औक्षण माऊली स्वीकारते. मूर्तीचा हसतमुख चेहरा त्यांना बरेच काही सांगून जात असतो. लहान लहान चिमुरड्या नऊवारी साडीत, तर छोटे छोटे चिमुरडे धोतर उपरण्यात माऊलीच्या अवतीभवती मिरवणुकीत नाचत असतात. प्रत्येक घरासमोर मोठ्या छत्रीखाली पुजारी कृष्णावेणी मातेस घेऊन पाटावर उभे रहातात. त्यांचे दोन्ही बाजूस छत्र चामर ढाळणारे पुजारी असतात. कोणी मशाली घेऊन पुढे असतात. भालदार चोपदार मावळ्यांचे वेषांत पगडी, पागोटे कंबरेस पटका बांधून चालत असतात. पुजारी माऊलीस घेऊन पाटावर उभा राहिला की चार पाच घरच्या सुवासिनी येऊन पायावर पाणी घालून पूजा करून ओवाळतात तर पुरुष मंडळी हार तुरे अर्पण करतात. गजगतीने ही मिरवणूक उत्सव मंडपाकडे सरकत असते. अरुणराज उदयाला येऊन माऊलीचे दर्शन घेत असतात. आपणही दर्शन घेऊया. कशी आहे आपली कृष्णावेणी माऊली?

''प्रसन्न मुद्रा, टपोऱ्या नेत्रांनी जणू सर्वांकडे कौतुकाने पहात आहे. सर्वांचा आनंद, उत्साह, सोहळा पाहून ती तृप्त होत आहे. समाधान तिचे चेहऱ्यावर पसरले आहे. सर्व दागिने

नथ, बुगडी, सुवर्णहार, बांगड्या, तोडे, रत्नजडित कमरपट्टा, मुगूट ल्यायली आहे. मुगूटावर हिरे माणके चमकत आहेत. हाती शंख, चक्र, गदा धरून एक हात वरदहस्त आपणा सर्वांस देण्यास उभारला आहे. गौरवर्ण, मंदस्मित अशी हालत डुलत माऊली शृंगारलेल्या आपल्या मंडपाकडे निघाली आहे. तिथे ती दहा दिवस वास्तव्य करून तुमचे सर्व सोहळे स्वीकारणार आहे. भक्तांची भावभक्ती पाहून संतुष्ट झालेली माऊली सर्वत्रांना सुखमय निरामय जीवन लाभावे, सर्व दु:खांचा दुरितांचा परिहार होवो म्हणून वरदान देणार आहे.''

उत्सव प्रसंगी नित्य दहा दिवस प्रात:पूजन सकाळी आठ पासून ऋकसंहिता, ब्राह्मण आरण्यक, श्री गुरुचरित्र, कृष्णामहात्म्य, श्रीसुक्त, रुद्रैकादशिनी व सप्तशती ही पारायणे तर दुपारी रात्री आरती नैवेद्य होतो.

सायंकाळी विविध कार्यक्रम, गायन, भक्तीगीते, कीर्तने, नाट्यसंगीत, प्रवचने असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात.

'श्री दत्त अमरेश्वर मंदिरात' मोठा उत्सव 'प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांची जयंती' चैत्री पाडव्याला असते. इतर वार्षिक कार्यक्रम येथेही साजरे होत असतात.

औरवाड या गावात चाळीस टक्के हिंदु तर साठ टक्के मुसलमानांची घरे आहेत. पण दोन्ही जमातीत येथे बऱ्यापैकी ऐक्य आणि भक्तीभाव आढळतो.

जीर्णोद्धारापूर्वी मंदिराशेजारी पहिल्या माळ्यावर भजनाची खोली होती. खोली प्रशस्त होती. दर शनिवार आणि सणासुदीला येथे भजन होत असे. अजूनही होत आहे. हे भजनी मंडळ 'श्री दीक्षितस्वामी महाराजांपासून' चालत आले आहे. जुनी भजनाची खोली तोडल्यानंतर दुसऱ्या दिवशी एका ग्रामस्थानी मला येऊन विचारले की आमची भजनाची नवी खोली तुमच्या प्लॅनमध्ये आहे किंवा नाही? असली तर कोठे आहे?

हा एस्.टी. कंडक्टर आहे. पण भजनास न विसरता येणारा, त्याला मी प्लॅन दाखवून तुमची भजनाची खोली होती त्यापेक्षाही मोठी व सोईची बांधून देऊ म्हणून सांगितले. तो तेथून गेल्यानंतर कार्यकारी ग्रामस्थ श्री. मारुतरावांनी मला विचारले, साहेब या माणसाला ओळखतां का तुम्ही? तो कोण आहे?

मी म्हटले, तो एक ग्रामस्थ आणि भजन मंडळातील दिसतो. मारुतराव म्हणाले, त्याचे नांव मुन्नाभाई. तो मुसलमान आहे पण न विसरता भजनाला येतो.

विजयादशमीच्या सीमोल्लंघनास 'श्री दत्तप्रभुंची पालखी दत्त अमरेश्वर मंदिरातून' निघाली. मीही या पालखी मिरवणुकीत होतो. पालखीच्या गमनाचा मार्ग मुसलमान वस्तीतून त्यांचे मोहल्ल्यातून होता. पण विशेष म्हणजे त्यांनी 'श्री दत्तप्रभूंचा पालखी मार्ग' शेणाचा सडासंमार्जन करून पवित्र केला होता. रस्त्याचे दुतर्फा सजावट होती. रांगोळ्या होत्या. वर

बॅनर्स लावले होते, **'श्री दत्तप्रभू आपले स्वागत आहे!'** नंतर ही मिरवणूक एका शेतात शमी वृक्षाचे खाली थांबली. गावच्या मानकऱ्यांस सन्मानाने बोलावण्यात आले. त्याने पालखीला हार घातला. ग्रामस्थ प्रमुखाने त्या मानकऱ्यास हार घातला. मानकऱ्याने नारळ फोडला. वृक्षावर आधीच चढून बसलेल्या तरुण पोरांनी शमी वृक्षावरून आपट्याची पाने म्हणजे सोन्याची पाने वरून उडवण्यास सुरवात केली. ग्रामस्थ वेचण्यास धावले. हे वेचलेले सोन्याचे पानच देवाला आणि नंतर सर्वांना द्यायचे असते. नारळ फोडण्यास जो मानकरी मानाचा ठरलेला आला होता तो मुसलमान असून त्याचे आडनाव पाटील आहे.

असे म्हटले जाते की, 'श्री. नारायण स्वामी महाराजांनी' कृष्णा नदीच्या प्रवाहात तळात गेलेल्या श्री अमरेश्वराच्या पिंडीस वर काढण्याचे ठरविले आणि मंदिराकरिता घडविलेले दगड आणले. परंतु 'श्री अमरेश्वरांनी नारायणस्वामींना' दृष्टांत देऊन सांगितले की, तू पिंडी वर काढून स्थापन करण्यास जाऊ नको. योग्यवेळी कालांतराने हे कार्य आम्ही करवून घेऊ. पुढे ते पडून राहिलेले घडविलेले दगड 'प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी' महाराजांनी त्यांचे स्नेही 'प.पू. वझीरबाबा यांच्या दर्ग्यास' दिले. ह्या दर्ग्याच्या वझीरबाबाशी त्यांची बंधुत्वाची खास मैत्री होती. दोघेही नेहमी भेटत असत. बैठकीस रंगत येत असे व नेहमी अध्यात्मावर त्यांच्या चर्चा संवाद होत. त्या दोघांचे सख्य हेच कारण औरवाडच्या ग्रामस्थांच्या एकोप्याचे आणि सहिष्णुतेचे असावे. वझीरबाबांच्या दर्ग्यांत उत्सव असतो तेव्हा ब्राह्मण ब्राह्मणी सुद्धा वझीर बाबांच्या दर्ग्याची पूजा आणि आरती ओवाळणी करण्यास आजही जात असतात.

प.पू. दीक्षित स्वामी महाराजांचे फोटो आणि प.पू. कवीश्वर महाराजांची भावनोत्कटता

'श्री दत्त अमरेश्वर मंदिरांतर्गत श्री वासुदेव पीठ मंदिराचे' काम जोरात चालू होते. या पीठांतच गाभाऱ्याच्या समोरील रुंदीकडील भिंतीवर 'श्री वासुदेव निवासात पुणे येथे जसे श्री वासुदेवानंदांचा आणि लोकनाथतीर्थांचा' असे दोन मोठे फोटो लावले आहेत तसेच औरवाड येथील 'श्री वासुदेव पीठांत' दोन मोठे फोटो 'प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज व प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित महाराज' असे लावायचे ठरले.

आता आर्टीस्टकडून कोणते फोटो एन्लार्ज करावेत हे ठरवायचे होते. 'श्री वासुदेवानंदांचा' उभा फोटो कोणता हे नक्की झाले होते. पुण्यास आहे तसाच. पण 'श्री दीक्षित स्वामी महाराजांचा' फोटो नक्की झाला नव्हता.

दि. २२.९.१९९४ रोजी पहाटे इंद्रायणी एक्सप्रेसने मी, श्री. कुंटे, गोरेगांवचे आर्टीस्ट, यांना घेऊन पुण्यास गेलो. 'श्री वासुदेव निवासांतील' प.पू. श्री गुळवणी महाराजांच्या

बैठकीच्या खोलीतील व्याघ्रासनावर बसलेला फोटो, श्री दत्तमहाराजांचा (कवीश्वर) फोटो हे याच श्री. कुंटे आर्टीस्ट यांनी काढले आहेत.

प्रथम श्री. लाटेंकडे जाऊन आम्ही जमविलेले 'श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचे' निरनिराळ्या पोजेसचे फोटो घेऊन कुंटे यांचेसह 'श्री रेणुका निवासात गेलो.' प.पू. श्रीमहाराजांना कुंटे कारागिरांची (चित्रकारांची) ओळख दिली. कामाबद्दल काही चर्चा झाली. या श्री. कुंटे चित्रकारांना 'प.प. नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचा' व 'मोठ्या महाराजांचा फोटो' मोठा करायला द्यायचा आहे हे सांगितले. प.पू. श्रीमहाराज खोलीतून हॉलमध्ये आले व पाटावर बसले. आम्ही त्यांच्यासमोर सर्व फोटो अनुक्रमाने लावले. काही बसलेले, काही उभे असे. प.पू. श्रीमहाराजांना मी विचारले, ''महाराज या स्वामी महाराजांच्या अनेक फोटोंपैकी कोणता फोटो मोठा करण्यास चांगला आहे? ते आपण सांगावे म्हणजे त्याप्रमाणे हे चित्रकार कुंटे मुंबईहून ते ठरविण्याकरिताच आले आहेत, त्यांना त्याप्रमाणे आपण सूचना देऊ.

प.पू. श्रीमहाराज खिन्न झालेले, सद्‌गदीत झालेले जाणवले. नेहमीच्या पद्धतीने त्यांनी उपरण्याचे पदराने डोळे, नाक पुसले व म्हणाले, ''अहो, हे सद्‌गुरु स्वामी महाराजांचे फोटो आहेत, यांतील डावे उजवे आम्ही कसे सांगणार? ज्याअर्थी ते सद्‌गुरु महाराजांचे फोटो आहेत, त्याअर्थी ते सर्वच चांगले आहेत. आता फोटो मोठा करण्याचे दृष्टीने यातील कोणता स्वीकारावा हे श्री. कुंटे चित्रकार, कलाकार आहेत, तर त्यांचे पद्धतीने तेंच ठरवतील. त्यांना पाहिजे तो यांतील कोणताही फोटो त्यांनी मोठा करावा!''

दि. २०.१०.१९९४, गुरुवार रोजी गोरेगांव मुंबईहून पहाटे ४.३० ला निघून ''श्रीं''च्या घरी सकाळी ११ वाजता हजर झालो. ठरल्याप्रमाणे श्री. लाटेही आले. प.पू. श्रीमहाराजांकडून पुढील सूचना घ्यायच्या होत्या. प.पू. सौ. ताईमहाराजही घरी होत्या. ''श्रीं''शी अगदी शांतपणे चर्चा करण्यास आणि मार्गदर्शन घेण्यास वेळ चांगली मिळाली. प्रथम झालेल्या व चालू असलेल्या कामांचा अहवाल ''श्रीं''नी ऐकला.

दि. २१.१०.१९९४ रोजी वाडीत-औरवाडांत दाखल होऊन ''श्रीं''च्या सूचनेप्रमाणे पुढील कामास लागलो. प.पू. श्रीमहाराजांच्या मार्गदर्शनाप्रमाणे दि. २६.१०.१९९४ पर्यंतचे सर्व कार्यक्रम यथाविधी पार पडले. ''श्रीं''च्या करता औरवाड येथील तसेच वाडीस पादुका मंदिराचे नजीक पोहोचण्यास कारमार्ग मंदिरापलीकडे उजव्या बाजूस दक्षिणोत्तर रस्ता ग्रामपंचायतीची परवानगी घेऊन करून घेतला. 'श्री दत्त अमरेश्वर हॉलमध्ये' उतरण्याच्या पायऱ्याही ''श्रीं''ना उतरण्यास सोपे जावे म्हणून करवून घेतल्या.

दि. २७.१०.१९९४, गुरुवारी प.पू. श्रीमहाराजांचे ठरल्याप्रमाणे प्रथम 'वाडी पादुका

मंदिर दर्शन' व नंतर 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरात' आगमन झाले. आमचे चित्त उल्हसित झाले होते. बहुतांशी तयार वास्तूंत श्रीचरण स्थिरावणार होते.

दि. ३१.१०.१९९४, गुरुवारी मुख्य 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराचा' स्लॅब सकाळी ९.३० ला प्रारंभ होऊन सायंकाळी ७.३० ला संपला. स्लॅबचे काँक्रेटींग संपता संपता प.प. गजानन आश्रम स्वामी महाराज आले होते. रात्री फोन करून प.पू. श्रीमहाराजांना स्लॅब पूर्ण झाल्याचे कळविले. ते ऐकून ''श्रीं''ना आनंद झाला.

दि. २३.१२.१९९४ ला सकाळी ११ वाजता चि. दिनेश याचा पुण्यात विवाह सोहळा पार पडला. प.पू. श्रीमहाराज व सौ. आईसाहेब वधु-वरांस आशीर्वाद देण्यास प्रत्यक्ष उपस्थित होते. ''श्रीं''नी व सौ. आईसाहेबांनी सर्व लाड पुरविले.

दि. २३.३.१९९५ रोजी मी व लाटे ''श्रीं''चा लातूर येथे भागवत सप्ताह होता, तेथे जाऊन दर्शन घेऊन आलो. प.पू. सौ. ताईमहाराजही तेथेच होत्या. प.पू. श्रीमहाराजांनी 'श्री दत्त अमरेश्वराची' कामे किती राहिली त्याबद्दल विचारणा केली. राहिलेल्या कामांची संपूर्ण माहीती देऊन अजून एक संपूर्ण वर्ष पूर्ण होण्यास लागेल असे सांगितले.

दि. १५.१०.१९९५, रविवारी सायंकाळी प.पू. श्रीमहाराज व प.पू. सौ. ताईमहाराज यांचे आगमन श्री दत्त अमरेश्वर मंदिरात होणार होते. सकाळपासून आम्हा गुरुभक्तांची साफसफाई आणि सजावटीची धावपळ चालू होती. पुढील मुक्कामाच्या दृष्टीने सर्व सामान, कडधान्य, भाजीपाल्यापासून भरणे, ब्राह्मण आचारी, गॅस शेगड्या सर्व जय्यत तयारी झाली होती. प.पू. श्रीमहाराजांना औरवाड ग्रामस्थ मंडळी गाडीतून मिरवणुकीने वाजत गाजत आणणार होते. मिरवणुकीची तयारी युवक झांजपथकासह झाली होती. सायंकाळी ठीक पाच वाजता प.पू. सौ. ताईमहाराज अचानक येऊन उपस्थित झाल्या. सुवासिनी, कुमारिका यांचीही खूप गर्दी झाली. परंतु सौ. ताईंनी प्रत्येकीला आणि गुरुंबंधूसही आगमन स्वागत समारंभाच्या तयारीस लावले. कोणी स्त्रिया, मुली रस्ते झाडून सडा घालू लागल्या, रांगोळ्या मंदिर रस्त्यावर घातल्या. पुरुष मंडळी तोरणे माळा लावीत होते. देवालयाचे आतील भाग हॉल, सत्संग निवास, मंदिर, वासुदेवपीठ, यमूताई निवास सर्व झाडून धुऊन साफसफाई झाली.

श्री नृसिंहवाडीहून ''श्रीं''ची मिरवणूक निघाल्याची बातमी आली. सौ. ताईंनी रस्त्याच्या दुतर्फा आरती निरांजनासह नऊवारीतील सुवासिनी उभ्या केल्या. सौ. ताई सतत स्त्री-पुरुषांना सूचना-मार्गदर्शन देत होत्या. आता मिरवणूक पुलापर्यंत आली. झांजपथक वाजंत्री फटाक्यांचे आवाज येऊ लागले. मुख्य रस्त्यापासून मंदिराकडे रस्ता वळतो तेथे स्वागत महिरप तयार केली होती. मिरवणूक मंदिर रस्त्याला वळून प.पू. श्रीमहाराजांची गाडी येताच सर्व सुवासिनींनी महाराजांना आणि प.पू. सौ. ताईमहाराजांना ओवाळले. कुंकुम तिलक

लावून हार घातले. ''श्रीं''च्या गाडीबरोबर सर्व गुरुभक्त बंधू व भगिनी पुढे पुढे सरकत होत्या. प.पू. सौ. ताईमहाराज मात्र गाडीच्यामागे होत्या. काय करीत होत्या त्या?

गाडीमध्ये प.पू. श्री सद्गुरु दत्तमहाराज आणि सौ. आईसाहेब विराजमान आहेत. गाडी हळूहळू पुढे सरत आहे तर प.पू. सौ. ताईमहाराज गाडीच्या मागून लोटांगणे घालीत येत आहेत. भावभक्तीने त्या धुंद बेभान झाल्या आहेत. कृष्णभक्ती करणारी मीराच आज अमरापुरात अवतरली आहे. प्रत्येक साष्टांग लोटांगणानंतर उभे राहून ''श्रीं''च्या गाडीमागे उभे राहून हात जोडून नमस्कार, पुन्हा लोटांगण. रस्ता अधून-मधून चिखलाचा आहे. वरुणराजाही ''श्रीं''च्या आगमनास हजेरी लावून गेला आहे. सौ. ताईंचे सर्वांग साडीसह चिखलाने माखले आहे, परंतु त्यांचे तिकडे किंवा आजूबाजूलाही लक्ष नाही. गाडी 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरासमोर' उभी राहिली. सुवासिनींनी घागरी भरून पाणी आणले. प.पू. सौ. ताईंनी भडाभडा डोक्यावरून घाईघाईने पाण्याच्या घागरी ओतून घेतल्या. प.पू. श्रीमहाराज व सौ. आईसाहेब गाडीतून उतरुन मांडलेल्या पाटांवर उभे रहात आहेत इतक्यात त्वरेने सौ. ताई उभयतांना औक्षण करण्यास सामोऱ्या झाल्या. तो मंगलमय सोहळा पाहताना डोळ्यांचे पारणे फिटत होते. मावळतीची सोनेरी किरणे सर्वत्र पसरली होती. सनईचे सूर वातावरणात भरले होते. अशाप्रकारे ''श्रीं''चे व सौ. आईसाहेबांचे आगमन होऊन 'श्री दत्त मंदिरात' प्रवेश झाला. देवांच्या दारात होणारे स्वागत, ''श्रीं''ना अत्यंत संकोचाचे होत होते. ते सर्व डावलून 'श्री दत्त अमरेश्वराकडे' प.पू. श्रीमहाराज धाव घ्यायला पहात होते.

भक्त मंडळींनी दिगंबराची धून सतत चालू ठेवली होती. दि. १६.१०.१९९५, 'प.प. श्री नृसिंहसरस्वती दीक्षित महाराजांच्या' पुण्यतिथीनिमित्त उत्सव सोहळा प्रसाद भोजन समाराधना झाली. दि. १७.१०.१९९५ ला प.पू. श्रीमहाराजांतर्फे 'श्री दत्त अमरेश्वराची' महापूजा संपन्न झाली.

दि. २३.१०.१९९५ ला सकाळीच ''श्रीं''नी आम्हांस बोलावून घेतले व सांगितले, ''पुलावरून औरवाड नदीतीर ते पलीकडील वाडीतील हे एकूण अंतर टेपने मोजून आम्हांस सांगा!'' नंतर आम्हांस कळले की, आज श्री कृष्णानदीस साडी नेसविण्याचा प.पू. सौ. ताईमहाराजांचा संकल्प आहे. एकूण अंतर जाण्याचे अधिक तेवढेच येण्याचे जेवढे होईल त्याच वारांत (तीन फूटाचा एक वार) रूपांतर करून नऊ वाराने भागून एकूण साड्या किती लागतील तेवढ्या प.पू. श्रीमहाराजांनी मागवून घेतल्या.

मोठी नाव फुलांच्या गुच्छांनी आणि माळांनी सजवून त्या साड्या घेऊन सर्व सुवासिनी, सौ. ताईमहाराज व भटजी अशी मंडळी बसली. सोबत आणखी दोन नावांतून भक्तमंडळी वाजत गाजत निघाली. होडींतल्या होडींतच एकेका साडीला दुसऱ्या साडीचे टोक जोडले

जाई. ती संपली की तिसरी अशा प्रकारे पैलतीरावर (वाडीचे तीरावर) जाऊन परत येईपर्यंत साड्या जोडत गेल्या. नंतर या सर्व साड्यांचे दोन्ही गांवातील ब्राह्मण स्त्रियांना दान करण्यात आले. हा सोहळाही प्रेक्षणीय होता. गुरुभक्त श्री. कुंटे (पुणे) यांनी या सोहळ्याचे व्हिडीओ शुटींग केले आहे.

दि. २४.१०.१९९५ हा सूर्यग्रहणाचा दिवस

सकाळी ग्रहण लागण्यापूर्वी प.पू. श्रीमहाराजांचे सोबत आम्ही सर्व गुरुबंधू भगिनी कृष्णानदी स्नानास गेलो. सोबत सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताईमहाराजही होत्या. औरवाड ते वाडी यामध्ये कृष्णा नदीवर जो पूल आहे, त्या पुलाच्या उजव्या बाजूने आम्ही सर्व ''श्रीं''च्या गाडी मागे खाली तीरावर उतरलो. सर्वांनी नदीस्नान केले. छातीभर पाण्यात सर्वांचे पोहणे म्हणजे नुसते उभे राहून तीन डुब्या मारून स्नान झाले. पुन्हा 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरात' येऊन सर्वांचे आन्हिक-जप-जाप्य सुरू झाले. ग्रहण सुटल्यानंतर पुन्हा प.पू. श्रीमहाराज गाडीने व बाकी मंडळी पाठोपाठ चालत जाऊन पुनश्च श्री कृष्णा नदीचे स्नानाने सद्गुरुसंगे स्नान करून पवित्र झाली.

दि. ३.१२.१९९५ रोजी सकाळपासून श्री दत्त अमरेश्वर मंदिर गाभाऱ्याच्या भिंतीस बाहेरून ग्रॅनाइट (टाईल्स) बसविण्याचे काम सुरू झाले. गाभाऱ्याच्या दर्शनी दरवाजा पूर्वीचा आहे तो फार लहान होता. देवांचे दर्शन घेण्यास कंबरेतून वाकावे लागते. ग्रामस्थ आणि इतरेजनांचे म्हणणे होते की आता नव्याने काम होतच आहे तर आताच गाभाऱ्याचे दार रुंदी-उंचीने मोठे करावे. वास्तविक गाभाऱ्याचे आतील भिंतींना सुद्धा ग्रॅनाइट लावणे सर्वांस आवश्यक वाटत होते. परंतु प.पू. श्रीमहाराजांनी गाभाऱ्यांचे आत काहीही करायचे नाही असे आधीच सांगितले होते. गाभाऱ्याच्या बाहेरचे काम जोरात सुरू झाले होते. निर्णय त्वरीत घ्यायचा होता. मी व दिनेशने एस्.टी.डी. बुथवर जाऊन फोन केला. चि. अजित यांनी फोन घेतला. मी अजितला माझी अडचण सांगितली. ते म्हणाले, मी विचारायचे, ते काय म्हणताहेत ते तुम्हांला सांगायचे. त्यापेक्षा मी फोनच दादांकडे देतो. आपला फोन घरात कोठेही नेता येतो.

अजितने फोन सरळ प.पू. श्रीमहाराजांच्या हाती नेऊन दिला. माझ्या हृदयाचे ठोके वाढले होते. आता प.पू. श्रीमहाराजांनी फोन घेतला आहे हे प.पू. श्रीमहाराजच प्रथम बोलतील तेव्हा कळणार. दिनेशला म्हटलं, दिनेश, ''महाराज फोनवर येत आहेत.'' मी जरा गांगरलोच होतो. ''श्रीं''शी फोनवर बोलण्याचा माझा पहिलाच प्रसंग होता. मी कान टवकारले होते. आता कशी सुरुवात होणार? हॅलो ने. इतक्यात कानात कर्णपटलावर शब्द आले.

प.पू. श्रीमहाराजांशी दूरध्वनीवर संवाद, रात्रीचे ८.४० वाजले होते.

प.पू. श्रीमहाराज : हंऽ कसं काय आहे? ठीक चाललं आहे ना?

मी : महाराज शशीकांत नागले आपणास वाडीहून दंडवत घालीत आहे. ठीक चाललं आहे. महाराज 'श्री दत्त अमरेश्वरांचे गाभाऱ्याचे' दगडी भिंतीना बाहेरून ग्रॅनाइट फरशी लावण्याचे काम आज सुरू केले आहे. महाराज, या गाभाऱ्याचा दर्शनी दरवाजा फारच लहान आहे. तो दोन फूट बाय दोन फूट सहा इंच आहे. तो तीन फूट बाय तीन फूट सहा इंच करावा असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आजच करायचा म्हटलं तर करता येण्यासारखा आहे. सध्याच्या दरवाजाने दर्शनाकरिता फारच वाकावे लागते. म्हणून तो दरवाजा रुंदीला आणि उंचीला थोडा वाढवावा असे सर्वांचे मत आहे. तर तो वाढवावा कां?

प.पू. श्रीमहाराज : नको, नको! वाढवू नका. अहो नृसिंह वाडीचा दरवाजा सुद्धा नाही का लहान आहे?

मी : होय महाराज. पण तेथे दूरून दर्शन घेतले जाते व दर्शनही व्यवस्थित होते. मंदिराची जमीनही थोडी उंच झाल्याने येथे जवळ उभे राहून खूप वाकावे लागते.

प.पू. श्रीमहाराज : ते खरं आहे, पण स्वामी महाराजांनी तो लहान केला आहे, त्यांत त्यांचा काही उद्देश असेल, कोणी काही म्हणेल, त्यापेक्षा आहे असाच राहू द्या बरं! तुमचं कसं काय चाललं आहे? चार-पांच कामे आहेत ना?

मी : नाही महाराज, दोन कामे चालू होती, पैकी श्री. शास्त्रींचे काम पूर्ण होऊन लवकरच आम्ही ते त्यांच्या ताब्यांत देत आहोत. त्यांची वास्तुशांत पण झाली आहे. श्री. बोरगांवकरांच्या घराचा स्लॅब झाला. आता पुढील कामे बाकी आहेत.

प.पू. श्रीमहाराज : आणखी कामे आली आहेत ना?

मी : होय महाराज! एक तरी श्री. गावडे यांचे आले आहे. बोलणी व्हायची आहेत.

प.पू. श्रीमहाराज : दिनेश नकाशे काढून देतो आहे ना?

मी : होय महाराज! दिनेशही येथे आला आहे.

प.पू. श्रीमहाराज : हो भेटला होता येथे.

दिनेश : मी नमस्कार करतो आहे महाराज. मी दिनेश बोलतो आहे.

प.पू. श्रीमहाराज : तुम्हीही तिकडेच आहात काय? काय तेथे आणखी काही कामे आली आहेत ना? त्यांचे नकाशे बनविता आहात ना? बनवा आणि त्यांना (मालकांना) देऊन टाका.

दिनेश : होय महाराज, आणि महाराज देविकाला नोकरी लागली.

प.पू. श्रीमहाराज : लागली का? बरे झाले.

दिनेश : मोठी कंपनी आहे महाराज. तो अमीत कोतवाल आहे ना, गोडसे काकांच्या शेजारी, त्याच्या भावाच्या ओळखीने लागली.

प.पू. श्रीमहाराज : चला, बरे झाले.

मी : महाराज, मुंबईला १६ तारखेला कोर्टाची तारीख आहे. मुंबईस जाताना १४ तारखेला निघून पुण्यास येऊन आपले दर्शन करून पुढे जाऊ.

प.पू. श्रीमहाराज : अजून ते कोर्टाचे चालूच आहे का? आता 'श्री अमरेश्वराचे' काय काय काम राहिलं?

मी : आता हे गाभाऱ्याच्या बाहेरून ग्रॅनाइट टाईल्स बसविण्याचे मुख्य काम आहे. शिवाय वरचा मजला वाढवून हॉल तयार केला, त्याचे टायलिंग, टाईल्स बसविणे, पाण्याची वरची टाकी केली तिचा स्लॅब वरचा बाकी आहे. अशी किरकोळ कामे झाली की काम पूर्ण झाले म्हणता येईल.

प.पू. श्रीमहाराज : अजून तीन महिने जातील कां?

मी : होय महाराज!

प.पू. श्रीमहाराज : आहे, आता आणखी कामेही मिळत आहेत.

मी : होय, पण आता जालन्याचेही पाहिले पाहिजे नां? श्री. अगरवाल शेठजीही येऊन गेले.

प.पू. श्रीमहाराज : होईल तेही हळूहळू!

मी : महाराज आपला निरोप घेऊ कां? फोन ठेवू कां? बराच वेळ आपणास बोलावे लागले.

प.पू. श्रीमहाराज : या या! या बरं! (रात्रीचे ८.५५ झाले होते.)

वाडी औरवाडहून मुंबईस परतण्यास उशीर झाला. पुण्यास उतरु शकलो नाही. मुंबईहून दि. १९.१२.१९९५ रोजी पहाटे निघून 'श्री रेणुका निवासांत' सकाळी ११ वाजता पोहोचलो. ''श्रीं''नी घरी भोजनास थांबण्यास सांगितले. **प.पू. सौ. ताईमहाराज म्हणतात, ''सद्गुरु काही खाऊन जा किंवा चहा, दूध काही पिऊन जा म्हणतात, तेव्हा त्यांना त्यातून काही**

तरी द्यायचे असते. म्हणून नकार कधीही देऊ नये. उलट फराळ करून जा म्हटले तर आपण अगदी नि:संकोच मनाने भोजन घेऊनच निघतो म्हणावे. श्री सद्गुरुंना गुरुकृपेचा पान्हा फुटलेला असतो अशा वेळी आपण कृपण बनू नये.'' ''श्रीं''च्या आज्ञेने मी प्रसाद भोजनास थांबलो तेवढ्या वेळात जवळ बसवून ''श्रीं''नी खूप गप्पागोष्टी केल्या. कसल्या? कामाच्या. आता कोणती कामे शिल्लक राहिली या प्रश्नावर मी समग्र चर्चा केली. अनेक समस्यांची उकल करून घेतली.

१) घेवड्याच्या शेंगांकडे जाण्याचा रस्ता करायचा कां? (श्री नृसिंह स्वामी महाराजांनी घेवड्याचा वेल मुळापासून उखडून काढला ही कथा श्री गुरुचरित्रांत आली आहेच. हे स्थान श्री दत्त अमरेश्वराचे मागील बाजूस आग्नेय कोपऱ्यांत आहे) महाराज, 'उगारचे श्री नारायणानंद स्वामी महाराज' म्हणत होते की, मंदिराबरोबर त्याही स्थानाचा जीर्णोद्धार करून तेथे मंदिर बांधा. प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''त्यांना सांगा, ती जागा कुलकर्णी पुजारी यांच्या मूळ वंशातील श्री. विष्णुपंत कुलकर्णी यांच्या ताब्यात परंपरेने आली आहे. या खाजगी जागेत आपला ट्रस्ट काही करू शकत नाही. ते विष्णुपंत ती जागा ट्रस्टमध्ये विलीन करीत असतील तर तसे करता येईल.'' मी म्हटले, ''घेवड्याचे देवस्थानचा पश्चिमेकडील म्हणजे आपल्या मंदिरा बाजूकडील दरवाजा बंद करून कै. विष्णुपंतांच्या पत्नीकडे ठेवणे ही कामे आपल्या ट्रस्टच्या खर्चाने करावीत कां? ते हे सर्व काम करू देण्यास राजी आहेत पण हक्क त्यांचाच राहणार. हा रस्ता मंदिरामागून करायचा म्हणजे श्री. बंडा आणि मनोहर-पत्नी कुलकर्णी यांचे हद्दीतून करावा लागेल. त्या दोघांची त्यांच्या हद्दीतून रस्ता करण्यास काही हरकत नाही. पण या मार्गांत येत असलेल्या त्यांच्या पाण्याच्या टाक्या तोडून त्या ते सांगतील तेथे बांधून द्याव्या लागतील. हा रस्ता पुढे मागे होईल या उद्देशांने तेथे आपण लोखंडी सरकते दार ठेविले आहे. ते दार सतत उघडे ठेवावे असे बंडा कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. म्हणजे देव पुजेस व देवास नैवेद्य नेण्यासही ह्या दाराने अगदी जवळचे पडेल. फिरून हेलपाटा मारायला नको. पण महाराज, ह्या मंडळींची देवांबद्दल सेवाभावी वृत्ती न दिसता स्वार्थसाधू वृत्ती दिसते. हे सरकते दार उघडे ठेवले तर हे लोक केव्हाही येऊन पंपमशीन मोटार चालू करतात. आमची येथून जाण्यायेण्याची वहिवाट आहे असे म्हणतात. दार उघडे टाकल्याने 'घेवड्याचे देवस्थान श्रीदत्त अमरेश्वरास' विलीन करण्याबद्दल चर्चा करावी कां? श्री. बापू सावकार विष्णुपंतांचे साडू कां कोणी नातलग आहेत.

२) श्री. नंदनवाडकर यांना सध्याचे वेतन अपुरे पडते.

३) देवस्थानास रखवालदाराची आवश्यकता आहे.

४) वार्षिक पूजा निधी (कायम निधी ठेवून) स्वीकारण्यास प्रारंभ करावा कां?

५) तेथील एक सेवेकरी श्री. जाधव देवळाची साफसफाई, तीर्थकुंड सफाई वगैरे पडेल ती सेवा करीतअसतात. मंदिरामागील कच्च्या बांधकामांतील खोल्या तोडल्या त्यात त्यांची एक खोली होती. नव्या, 'यमूताई निवास' वास्तूत तीन खोल्या आपण पाडल्या आहेत. त्यांतील एक खोली श्री. जाधव यांना राहण्यास द्यावी कां?

अशा अनेक समस्यांवर चर्चा करून प.पू. श्रीमहाराजांकडून उकल करून घेतली. राहिलेली शिल्लक कामे किती आहेत, ती पूर्ण करण्यास किती खर्च येणार आहे व तेवढी रक्कम ट्रस्ट बांधकाम निधीत आहे किंवा नाही ही सगळी चौकशी प.पू. श्रीमहाराजांनी केली आणि शेवटी तुम्ही श्री. लाटेंकडून कर्ज किती घेतले होते? ते किती फेडायचे राहिले? कामे आहेत की नाही? धनार्जनाकडेही आपले लक्ष आहे कां नाही हीही चौकशी झाली. या गुरुदेवांना मायबाप कां म्हणू नये? भक्तांची सर्व काळजी सद्गुरु वहात असतात. याशिवाय आपल्या आजूबाजूस वावरणारी भयानक संकटे आपल्या नकळतच कशी दूर करीत असतात किंवा त्यापासून संरक्षण कसे देत असतात ते पुढे लिहीणारच आहे.

दि. २३.१.१९९६ रोजी दुपारी मुंबईहून निघून पुण्यास 'श्री रेणुका निवासात' रात्री ८.३० वाजता पोहोचलो.

''श्रीं''ची सायंसंध्या आटोपून ते भिंतीस टेकून पाटावर बसले होते. उघडेच होते. उपरणे नव्हते. दाढीही थोडी वाढलेली होती. बसण्याची पोज् आणि चेहऱ्यावरील भाव पाहून तंतोतंत 'श्री रामकृष्ण परमहंसांचेच' दर्शन झाले. मी दंडवत घालून दर्शन घेतले. ''आत्ताच आलात कां? भोजन व्हायचे असेल ना?'' मी म्हटले, ''महाराज, भोजनास श्री. लाटे यांनी बोलावले आहे. नंतर आम्ही दोघे वाडी-औरवाडला जाणार आहोत.'' प.पू. श्रीमहाराजांनी बेल वाजवून आम्हांस काही फराळाचे व चहा-दूध काही देण्यास सांगितले. प.पू. श्रीमहाराज बरेच थकलेले दिसले. उठले व वाकून चालतच आपल्या खोलीत जाऊन कॉटवर आडवे झाले. आमचे चहा-पाणी होताच आतून बोलावणे आले. मी खोलीत गेलो. आरामशीर पहुडलेले महाराज उठून बसू लागले. मी विनंती केली की, कॉटखाली आपल्या कॉटच्या जवळच बसत आहोत. आपण झोपूनच आमच्याशी बोलावे. पण ते त्यांना रुचले नाही. उठून बसताच मी पाठीमागे लोड सारला. प.पू. श्रीमहाराज मला सूचना देऊ लागले.

१. 'श्री दत्त अमरेश्वराचे' गाभाऱ्यावर प्रथम कोणता श्लोक मार्बल प्लेटवर कोरून लावावा.
२. गाभाऱ्याचे मागील बाजूस योगीनींचे वर 'श्री वासुदेवानंद महाराजांचे स्तोत्रादी संग्रहांतील' तृतीय किंवा चतुर्थ पुष्पांतील योगिनींचे स्तोत्र आहे, त्या स्तोत्रांतील नेमका श्लोक श्री. रामशास्त्री यांना विचारून तो लिहावा.

३. गाभाऱ्याचे समोरील मंदिराच्या भिंतीवर योगिनींच्या नावाचे नऊ श्लोक मुख्य दरवाज्याच्या एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस 'श्री दीक्षित स्वामी महाराज विरचित श्री दत्त अमरेश्वर स्तोत्राचे नऊ श्लोक' मार्बलवर कोरून लावावेत.

४. सत्संग निवास ऑफिस खिडकीच्या भिंतीवर बाहेरून कोणता श्लोक तर

५. श्री वासुदेव पीठात गाभाऱ्याच्या दरवाजाचे दोन्ही बाजूस कोणती स्तोत्रे कोरावीत.

या समस्त सूचना आम्ही गुरुआज्ञा म्हणून स्वीकारल्या.

घरची ख्याली खुशाली विचारून झाल्यानंतर पुन्हा मंदिराबद्दल - "हे काम तीन महिन्यात म्हणजे फेब्रुवारी ते मार्च १९९६ पर्यंत रंगरंगोटीसह संपवावे, पुरे करावे!"

"श्रीं"ची आज्ञा घेऊन मी श्री. लाटेंच्या घरी गेलो. सह्याद्री एक्सप्रेसची वेळ होऊन गेली होती. रिझर्वेशन नव्हतेच. मग आम्ही रात्री दोनच्या महालक्ष्मी एक्सप्रेसच्या दाटी गर्दीत घुसून आत जमिनीवरच पथारी टाकून बसलो.

आता "श्रीं"चा मानस लक्षात घेऊन आम्हांस उसंत नव्हती. प्लास्टर, टायलींग, श्लोक कोरलेल्या मार्बल प्लेटस् रंगरंगोटी शक्य होईल तेथे, सर्वच कामांची गती वाढविली. पैशांकरिता काही ठेकेदार पीस वर्कर्स आडले नडले असल्यास त्यांचीही मोजमापे, बिले करून हिशेब चुकते केले व सर्वांगीण कामांची प्रगती वाढविली.

दि. २१.९.१९९६ रोजी हा सर्व 'वास्तू, संप्रोक्षण विधी' यथाविधी यथाशास्त्र पार पडला. इति श्री दत्त अमरेश्वर मंदिर जीर्णोद्धार कार्य!



२२९) वाल्याचा वाल्मिकी झाला!

शेशा. शिरसे

औरवाडला आमच्याकडे शिरसे नावाचा एक लेबर कॉन्ट्रॅक्टर होता. हा मजबूत बांधा असलेला, राकट, तापट पण सरळ स्वभावाचा कामसू माणूस होता.

हल्ली शिरसे बरेच काही ऐकून घ्यायला लागला होता. तो कसाही असला तरी त्याची धडाडी, पुढाकार घेणे, निर्भयपणा, धमक ही काहीशी आमच्या बांधकाम खात्यास मला पोषक वाटून आवडू लागली होती. मोठा पराक्रमी वाटू लागला होता तो मला. कोणतेही काम सांगा, ना नाही. अशक्य हा शब्दच नाही. मिरज, सांगली, इचलकरंजी किंवा कोल्हापूर येथे काही मोठी खरेदी करायची असली व माल मटेरीयल लागलीच साईटवर पोहोचणे आवश्यक असले तर या सर्व ठिकाणी, कोल्हापूरला सुद्धा तांतडीच्या खरेदी करीता रोकडी रक्कम चाळीस-चाळीस, पन्नास-पन्नास हजारांची सोबत न्यावी लागे. अशा

वेळी शिरसे सोबत असला म्हणजे भय वाटत नसे. म्हणून प्रत्येक वेळी मार्बल, ग्रॅनाइट, लोखंडी सळ्या, सागाचे लाकूड अशा मोठ्या खरेदीला रोकड कॅश घेऊन शिरसे सोबत त्याच्या मोटार सायकलमध्ये पेट्रोल आपले खर्चाने भरून जाऊ लागलो. सोबत मोठी रक्कम आहे हे शिरसेलाही माहीत असायचे.

आम्हा गुरुबंधूंच्या प.पू. श्रीमहाराजांविषयी भावभक्तीच्या गप्पा गोष्टी चालू असल्या तर त्या ऐकण्यात शिरसे रस घ्यायचा. एकेकाचे अनुभव ऐकून प्रभावित व्हायचा. दोन-तीन वेळा प.पू. श्रीमहाराजांचे आगमनही मंदिरांत झाले होते. ''श्रीं''च्या दर्शनाला तो सहकुटुंब म्हणजे मुले बायकोसह आलाही होता. त्याची पत्नीही डोक्यावर पदर घेऊन अगदी पद्धतशीर सन्मानपूर्वक प.पू. श्रीमहाराजांचे दर्शन घ्यायची. प.पू. श्रीमहाराज ईश्वरस्वरुप आहेत अशी त्याचीही धारणा होऊ लागली होती. ''श्रीं''च्या सान्निध्यांतल्या त्या सर्व सात्विक, भक्तीमय वातावरणाचा परिणाम म्हणून की काय पण त्यालाही वाटू लागले की आपणही या गुरुभक्तांप्रमाणे प.पू. श्रीमहाराजांची दीक्षा घ्यावी. मला म्हणायचा, ''महाराज देतील काय मला दीक्षा? मी असा अडाणी, खालच्या जमातीचा. पण त्ये आमचे मायबाप हैती. मग प्वॉर कसं, कायबी वंगाळ कां असं नां?''

मी त्याला समजावून सांगत असे, ''अरे गड्या! दीक्षा घ्यायची तर मांस-मच्छी खाऊन चालायची नाही. दारु पिता यायची नाही. शिव्यागाळ्या देता यायच्या नाहीत, मारा ठोक्या करतां येणार नाही, हे सर्व सोडता येईल कां?''

शिरसे म्हणायचा, ''समदं जे जे वंगाळ असंल ते सोडून देईन! मंग तर झालं?''

एकदा मी आणि शिरसे लोणावळ्यास श्री. उद्धव म्हसवडकर यांच्या साईटवर गेलो. म्हसवडकरांचा, त्यांनी त्यांच्या फॅक्टरीच्या इमारतीकरिता आणलेले घडीव खांडकी दगड, 'श्री दत्त अमरेश्वर मंदिराला' देणगीदाखल द्यायचा विचार होता. ते दगड आपल्याला उपयोगी येतील कां हे पाहण्यास शिरसे त्यांतील माहीतगार असल्यामुळे त्याला बरोबर घेतले होते. जाताना बसमध्ये आमच्या प.पू. श्रीमहाराजांच्या विषयी खूप गप्पागोष्टी झाल्या. परत जाताना 'श्री रेणुका निवासात' जाऊन ''श्रीं''चे दर्शन घेऊन आम्ही औरवाडला जाणार होतो. ह्याच्या काय मनात आले, मला म्हणू लागला, ''साहेब मला दीक्षा देण्याबद्दल तुम्ही महाराजास्नी शब्द टाकाल कां?'' मी म्हटले, ''दीक्षेबद्दल स्वत: विचारायचे असते, तू प्रथम विचार, मग नंतर मी बोलेन.''

आम्ही दोघे ''श्रीं''च्या दर्शनास 'श्री रेणुका निवासात' गेलो. हातपाय धुतले. ''श्रीं''चे बोलावणे येताच आत गेलो. ''श्री'' कॉटवर बसले होते. मी दंडवत घातले. माझे अनुकरण शिरसेने केले. ''श्रीं''नी मला कुशल विचारले. मी सर्व कथन केले. येण्याचे कारण,

लोणावळा येथील म्हसवडकरांच्या प्लॉटवर जाण्याचे प्रयोजन कथन केले. श्री. शिरसे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांची (स्मरण व्हावे म्हणून) पुन्हा ओळख करून दिली. लोणावळ्याचे दगड आपल्या मंदिराच्या जोत्यास कामास येतील. दगड उत्तम प्रतीचे असल्याचे शिरसेने सांगितले. शिरसे मला खुणेने विचारू लागला, ''विचारूं कां?'' मी मानेनेच होकार देतांच प.पू. श्रीमहाराजांपुढे पुन्हा लोटांगण घालून शिरसे म्हणाला, ''महाराज मायबाप, मला दीक्षा हवी! आपण मला दीक्षा द्याल तर लय उपकार होतील महाराज!'' असे रांगडी भाषेत बोलला. ''श्रीं''नी मंद स्मित केले. ''श्रीं''नी विचारले, ''दीक्षेची माहीती आहे कां तुम्हांला? या तुमच्या नागले साहेबांना विचारा, ते सर्व सांगतील.''

''श्रीं''नी पंचाग काढले आणि चक्र या गृहस्थाला दीक्षेची तारीख, वेळ दिली. शिरसे खूष झाला. मी त्याला, 'पहाटे ५.00 वाजताच उठून नदीस्नान वगैरे करून प.पू. श्रीमहाराजांचे फोटोसमोर उदबत्ती लावून, पुढे नारळ, साखर ठेवावी. नंतर कांबळे आसन नाहीतर घोंगडी अंथरून त्या आसनावर पावणेसहा वाजताच मांडी घालून ताठ बसावे. हातांची बोटे एकात एक घालून डोळे मिटून बसायचे. त्याआधी आई-बाबा मोठ्या माणसांना मनांतून नमस्कार करायचा, देवाला व महाराजांना नमस्कार करून दीक्षा व्हावी म्हणून प्रार्थना करायची.' असे सर्व सांगितले.

आजपर्यंत आम्हाला नेहमीच्या सवयीने रात्री लवकर झोपण्याची माहीती नाही आणि सकाळी ९ वाजल्याखेलीज आमचा दिस उगवत न्हाई. आता प्रश्न पहाटे उठायचे कसे? मला उठवा म्हणून तरी कोणाला सांगायचे? नंदनवाडकर गुरुजींना सांगण बरं दिसत नाही. ते बामण हैती, पुजारी हैती. शेवटी बायकोला लवकर उठ सांगून गडी झोपला. चांगली गाढ झोप लागली.

मंदिराचे साईटवर उत्तरेच्या बाजूला शिरसेने आमच्या मंडळाच्या परवानगीने कामाकरिता आणलेल्या आणि काही जुन्या विटा वापरून चिखलात कच्च्या बांधकामाची एक खोली बांधून घेतली. या विटा पुन्हा बांधकामाला मिळणार होत्या. जुन्या बांधकामात लाकडी दरवाजे, खिडक्या होत्याच. ते सामान वापरून त्याने राहते घर बनविले. तेथे तो सहकुटुंब राहू लागला. रोज कोल्हापूरहून येणे त्रासाचे होते व कामावर पोहोचण्यासही खूप वेळ व्हायचा. मंदिराचे कामाशेजारीच त्याचे राहणे कामाचे प्रगतीस, देखरेखीस आम्हांस बरे पडले. संरक्षणाचे दृष्टीनेही बरे पडले.

पहाटे शिरसे गाढ झोपेत असतांनाच कोणीतरी त्याच्या या खोलीचे दार ठोठावले. दार उघडून पाहिले तर बाहेर कोणीच नाही. ''अजून लय टाईम हाय! चला थोडं झोपूया'' असं मनात म्हणून तो पुन्हा झोपला. पुन्हा थोड्या वेळात कोणीतरी दार जोरात खडखडावले.

शिरसेला जाग येऊन तो उठला. आता त्याने दार न उघडता, बाजूच्या छोट्या खिडकीचे शटर थोडे उघडून बाहेर डोकावले तर कोणी एक भगवी वस्त्रे नेसलेला दंड कमंडलू हाती घेतलेला तेजस्वी माणूस खिडकी समोरून नदीचे दिशेने जाताना दिसला. त्याचे सर्व अंग शहारले. त्वरेने त्याने दार उघडले. तो त्या दिशेने निरखून पाहू लागला पण तिथे कोणीच दिसेना. आसपासही कोणी नव्हते. हाताचे घड्याळात पाहिले तर साडेपाच वाजले होते. मुखमार्जन करून चार तांबे गार पाण्याचे अंगावर, डोक्यावरून ओतून घेऊन लुंगी लपेटून गडी तयार झाला. सांगितल्याप्रमाणे आदल्या दिवशी प.पू. श्रीमहाराजांचा फोटो फ्रेम करून आणला होता. तो पाटावर कोरे वस्त्र अंथरून त्यावर ठेवला होता. उदबत्ती लावून फोटोपुढे नारळ साखर ठेवून सांगितल्याप्रमाणे आपणास दीक्षा व्हावी ही प्रार्थना करून वेळेच्या पंधरा मिनीटे आधीच आसनस्थ झाला. सहा वाजता दीक्षा झाली. ब्रह्मानंदी टाळी लागली. सकाळी ७.३० ला तंद्री उतरली. शिरसेचा आनंद गगनात मावेना. आनंदाला पारावार राहिला नाही. भेटेल त्याला सांगू लागला, ''महाराजांनी कृपा केली.'' मी त्यास म्हटले, ''पुरे, आता यापुढे हे कोणाला सांगायचे नाही. सकाळ, संध्याकाळी, रात्री जसे जमेल तशी साधना करायची.''

शिरसेला साधनेत गोडी उत्पन्न झाली. तो नियमित बैठकीस बसू लागला. त्याच्या वागण्यात बदल दिसू लागला. पण या दीक्षेच्या आठ दिवस आधीची कथा ही शिरसेची खरी ओळख करून देणारी आहे. हा शेशा शिरसे कोण होता? कोठून आला होता? कसा होता हे जरा मागे जाऊन पाहूया.

मंदिरात सेवेकरी म्हणून श्री. जाधव नांवाचे वयाने पन्नाशी ओलांडलेले गृहस्थ बरेच वर्षे रहात होते. दुपारी स्नानानंतर बारा वाजता ते माधुकरीला जायचे. जी माधुकरी मिळेल त्यावर दोन्ही वेळच्या भोजनाची सोय व्हायची. पूर्वी म्हणे जाधव मुंबईतील एका गिरणीमध्ये कामगार होते. गिरण्या बंद झाल्या. मग जी काही पुंजी मिळाली ती घेऊन ते या मंदिरात येऊन विश्वस्तांची अनुमती घेऊन सेवेला म्हणून राहिले. श्री. शिरसे आणि जाधव यांची मैत्री जमली. एके दिवशी श्री. जाधव यांनी शिरसेना आपला संपूर्ण पूर्व इतिहास कथन केला. त्यांना छातीचे मागील बाजूस पोक असल्यामुळे ते अविवाहीतच राहिले होते. त्यांच्या वडीलांची कोल्हापूरचे आसपासचे गावात मोठी इस्टेट होती. जाधवांचा संसार नसल्याने त्यांची सर्व इस्टेट त्यांच्या मिलीटरीमध्ये मोठ्या हुद्यावर असलेल्या परंतु आता निवृत्त झालेल्या भावाने घेतली होती. इस्टेटीचा भाग मागण्यास जाधव गेला असता, 'तुला काय करायची आहे इस्टेट? तुला आहेच कोण?' वगैरे बतावण्या करून त्यांना वाटेस लावले. इस्टेटीचा अर्धा हिस्सा जाधवांचा होता. तो जर त्यांना मिळाला तर ते लाखोपती होणार होते.

ही सर्व त्यांची कहाणी शिरसेने ऐकून घेतली व त्याच्या लक्षात आले की अंगच्या व्यंगामुळे व गरीबी, गरीब स्वभाव यामुळे ह्यांच्यावर अन्याय झालेला आहे. शिरसेने म्हटले, ''मी तुझा भाग तुला मिळवून देतो. ही मोठी रक्कम तुला मिळवून दिली तर तू त्या रकमेचे काय करणार आहेस?''

श्री. जाधव म्हणाले, ''मी ही सर्व रक्कम स्टेट बँक किंवा बँक ऑफ इंडिया या सारख्या सरकारी बँकेत फिक्सला ठेवणार. येईल त्या व्याजातून माझ्या खर्चास लागतील तेवढीच रक्कम दरमहा घेऊन माझा खाण्या-पिण्याचा, कपड्यालत्त्याचा, औषधपाण्याचा खर्च चालविणार. 'श्री दत्त अमरेश्वराने' मला रहायला आसरा दिला आहे. सेवेला संधी दिली आहे. मरेपर्यंत हातपाय चालतील तोपर्यंत सेवा करीत राहीन. माझ्या मृत्यूनंतर ही सर्व रक्कम, शिवाय व्याजातून राहिलेली सर्व रक्कम, 'श्री दत्त अमरेश्वर मंदिरास' माझ्याकडून देणगी म्हणून घेण्याबद्दल लेखी इच्छापत्र किंवा मृत्युपत्र मंदिराच्या विश्वस्तांना लिहून देणार.''

शिरसेने पुन्हा विचारले, ''हा विचार पक्का हाय नव्हं?'' श्री. जाधवांनी श्री दत्त अमरेश्वरासमोर शपथ घेऊन हा विचार पक्का असल्याचे सांगितले. शिरसे म्हणाले, ''जाधव तुमच्या हिस्स्याचे पैसे तुम्हांला मिळालेच म्हणून समजा. कसे मिळत नाहीत ते पहातो. चला उद्या माझ्याबरोबर आणि दाखवा मला तुमचा तो भाऊ आणि ती इस्टेट.''

श्री. आप्पा दुग्गे हे औरवाडचे रहिवाशी. आमचे रेतीचे (वाळूचे) सप्लायर होते. हेही शिरसेंचे मित्र झाले होते आणि हा शिरसे-जाधव संवाद ऐकत होते. दुसऱ्या दिवशी तेही त्यांच्या सोबत या दौऱ्यावर जाणार होते. ही गोष्ट गुपीत होती. काही तरी त्यांचे खाजगी कामाकरिता सकाळीच कोल्हापुरला गेल्याचे मला दुसऱ्या दिवशी कामावर मंदिरात आल्यावर कळले.

त्या दिवशी रात्री वाडीत ९.३० वाजता 'श्री दत्तप्रभूंची पालखी व शेजारती' होऊन मी श्री. दामुंचे घरी परतलो होतो. ओवरीत गादी अंथरून झोपण्याच्या तयारीत होतो. रात्रीचे दहा वाजण्याच्या सुमारास श्री. आप्पा दुग्गे माझ्याकडे आले. मला म्हणाले, ''साहेब तुम्हांला झोप आली आहे कां? मला जरा तुमच्या संग बोलायचं होतं. एक तास तरी सर्व बोलायला वेळ लागेल. झोप आली असली तर तुम्ही झोपा, मग आपण हे समदं उद्या बोलू.''

मी उठलो व त्यांना घेऊन अंगणांतील औदुंबर पारावर येऊन बसलो. मी म्हटलं, ''होऊं द्या झोपायला उशीर. एवढे रात्री येऊन तुम्हांला काय विशेष बोलायचे आहे?''

आप्पा दुग्गे म्हणाले, ''साहेब विशेष मंजी विशेषच आहे बघा. आणि भयंकर बी हाय!'' मी म्हटलं, सांगा.

आप्पा दुग्गे बोलू लागले, ''अहो साहेब, हा शिरसे म्हणजे साधा माणूस नाय. लय खतरनाक माणूस हाय बघा. अवोऽ हा सुपारी घेऊन खून करणारा खुनी दरोडेखोर हाय. हे आज मला माहीत पडलं. अवो केवढी मोठी गँग हाय त्येची. एक एक तगडा हत्यारबंद माणूस त्याच्या नुसत्या शब्दावर चालतोया.''

मी आप्पाला मध्येच थांबवून विचारले, ''अहो पण हे आजच कसे काय तुम्हांला कळले?''

आप्पा म्हणाले, ''अवो त्येच तर सांगतोय की. आज सकाळीच मी, शिरसे आणि जाधव काही कामाला गेल्तो नव्हं? अवो, गेलो ते थेट त्या जाधवांच्या मिलीटरीत कमांडर होता त्या भावाच्या बंगल्यात. जाधवांनी बेल दाबली. दार उघडले त्या भावानीच. काय रे तू कश्यापायी येणं केले?''

''अरे आंत तर येऊं देशील की नाही? मग सांगतो की समदं.''

त्यांनी आम्हास्नी आंत घेतलं. आम्ही सोप्यावर बसलो. काय पॉश बंगला आणि तो आंतला दिवाणखाना. भावानी विचारले, 'हे दोघं कोण आहेत?' जाधव म्हणाले, 'हे माझे दोस्त हैती.'

भावाने इचारले, ''काय म्हणून येणं केले?''

शिरसे पुढे सरसावला, ''थांबा जाधव मी बोलतो!'' असे म्हणून त्याने एकदम विषयालाच हात घातला, ''तुम्ही ह्यांचा प्रॉपर्टीतला वाटा स्वत:च बळकावून बसला आहात म्हणे!''

तो म्हणाला, ''तुम्ही इचारणारे कोण?''

शिरसे म्हणाला, ''मी हेचा भाव, सगा, हितचिंतक कायबी समजा. पण गोष्ट खरी हाय की नाही? गुमान ह्यांच्या हिश्याचे होणारे पैसा ह्यास्नी देऊन टाकायचे. जास्त बोलायचं काम नाय.''

ते मिलीटरीवाले भाऊ म्हणाले, ''काय दमदाटी करता काय मला? मी कोण आहे माहीत आहे कां तुम्हांला?''

शिरसे म्हणाले, ''तुमी कोन बी असा हो. ह्यांचे पैसे कधी देता ते आधी सांगा!''

त्या गृहस्थाने पोलीसांना फोन लावण्याचा प्रयत्न केला इतक्यात त्यांचा मुलगा बाहेरून आला आणि म्हणाला, ''डॅड आपल्या बंगल्याला गुंडांनी वेढा घातला आहे.''

शिरसे म्हणाले, ''गुमान सांगा, या १५ दिवसात पैसे न्यायला कधी यायचं? पोलीसांची धमकी दाऊ नगा. असे लय पाहिले आमी. बऱ्या बोलाने ऐका नाही तर नाहक जान गमवाल.''

ते गृहस्थ म्हणाले, ''सगळे पैसे एका हाती देता येणार नाहीत. थोडे थोडे देईन.''

शिरसे म्हणाले, ''ते काय बी चालायचं नाय! अर्धी रक्कम १५ दिवसांत अर्धी ह्याच महिन्यात हवी. तसं नाय झालं, तर याद राखा. पोलीस मदतीसाठी गेलात तर माझ्यासारखा वाईट माणूस नाय. एवढं धेनात ठेवा. काढा टोकन मनी. कितीबी असू द्या, मंजी ५, १०, १५ हजार जे असतील ते!''

अप्पा दुग्गेने सांगितलेला हा प्रकार ऐकून मी अवाक् झालो. दुसरे दिवशी सकाळीच शेशा शिरसेला गांठले. मी बोलावले आहे म्हटल्यावर अंगावर शर्ट घालून ओशाळलेल्या चेहऱ्याने आपल्या खोपीतून तो माझ्याकडे आला. खाली मान घालून समोर उभा. मी त्याला एका बाजूला नेले व विचारले, ''आप्पा दुग्गे कडून कळले हे सर्व खरे आहे कां?''

शिरसे म्हणाला, ''व्हय साहेब! समदं खरं हाय. अव आमचा ह्योच पेशा काल पावेतो होता. आमचा बॉस आम्हास्नी एखाद्यावर कुत्र्यावानी छू म्हणून सोडायचा आनि आमी धावत जाऊन त्यास्नी पकडून बॉसम्होरं हजीर करायचं. कधी पांच पन्नास हजाराची सुपारी घ्यायची. काम फत्ते करायचे नि रोकड घ्यायची. पन सायेब तुमच्या पायाला हात लावून सांगतो, आता म्या ठेकेदारीचा इमानदारीनं धंदा करून परपंच करायचा ठरवलं हाय. ह्या गरीब जाधवाचं त्या लय शिरीमंत मानसानं सग्या भावाचे प्रॉपर्टीच्या वाट्याचे पैसे बुडविले म्हणून शानी गेलो. तुमास्नी माहीत नसल, जाधव मयत झाल्यावर सर्व पैसे अमरेश्वराला देणार म्हणून आधीच लिहून देणार आहे. सायेब हा शेवटचा खेळ बगा! यापुढं नाय!''

शिरसेने मग गेल्या वर्षातील त्याच्या या जुन्या धंद्यातील एक प्रसंग सांगितला, तो असा -

आमच्याच गँग मधला एक म्हणजे आमचा भाऊबंदच, वसंता. बॉसने त्याचेकडून सुपारी घेऊन खून करविला होता. तो खून होताना एकाने पाहिला. तो पहाणारा पोलीसांना साक्षीदार म्हणून मिळाला. आता आमचा हा भाऊबंद वसंता पोलीसांचे हाती सापडला तर बॉससह सर्वच गोत्यात येणार. म्हणून बॉसने दुसऱ्या एकास (भाग्यास) २५/२५ हजार देण्याचे ठरवून त्या भाऊबंदाचा म्हणजे वसंताचा खून करण्याची कामगिरी दिली. आम्ही दोघे, मी व भाग्या, वसंताच्या घरी गेलो. त्याला बिचाऱ्याला थोड्या वेळात आपण मरणार याची कल्पनाच नव्हती. एकमेकांचे घरी आमचे येणे जाणे असायचे. वसंताच्या घरी जाताच त्याच्या पोराने मामा मामा म्हणत माझ्या कंबरेला मिठी मारली. वहिनी मला म्हणाली, काय भावजी बरेच दिवसांनी आलांत! आता जेवूनच जावा.

मी म्हटलं, नगं नंग! मला लय काम हाय. वसंताला म्हटलं, चल, आपल्याला कामगिरी आहे. तो आमच्याबरोबर निघाला. तिघंही एका मोटार सायकलने दूर जंगलात

एका नदीकाठी ठरल्या ठिकाणावर निघालो होतो. कुठे चाललो आहोत हे त्याला माहीत नाही. आम्ही दोघांनी घेतलेल्या दारुची नशा उतरली. आता परत झोकली पाहिजे, त्याशिवाय पुढची कामगिरी करता येणार नाही. शिरसे सांगतो, ''माझ्या नजरंसमोर सारख ते मामा मामा करणारं प्वॉर आणि त्येची आय दिसं!''

वाटेत एका टपरीवर आम्ही थांबलो. तेथे कोणी नव्हते. बाटली काढली. वसंताला म्हटलं, ''जारं, नदीतून ह्या प्लास्टीकच्या बाटलीत पाणी घेऊन ये.'' तेवढ्यात भाग्याला मी म्हटलं, ''बाबारे माझ्याच्याने हे काम व्हायचं नाय. माझं मन देईना. ते ५० हजार तू एकटाच घे. मला कायबी देऊ नग.'' भाग्या म्हणाला, ''अरे यार! तुला काय याड बीड लागलय की काय? बॉसला त्वाँड कसं दावशील? तो आपल्याला जगात ठेवील काय?''

वसंता पाणी घेऊन आला. दोघांनी जास्त ढोसली. वशालाही थोडी दिली. शिरसेने या कामांत संपूर्ण माघार घेतली. ती ठरलेली जागा येताच वसंताला मारून टाकण्यास भाग्या सुरा घेऊन बेसावध वसंतावर धावला. पण शिरसेने त्याचा हात पकडला आणि त्यालाही वसंतावर वार करू दिले नाही. शिरसेच्या पोटात कुठेतरी दयेचा पाझर होता म्हणून वसंता वाचला. पुढे शिरसेने बॉसला भेटून सांगितले की, ''मी तुझी कोठलीही गुपीते (सिक्रेटस) कोठेही सांगणार नाही, अशी शपथ घेऊन वचन देतो.'' बॉसची मनधरणी करून शपथ वाहून आपल्या जीवनाची वाट बदलली. तरीही अजून गँग मधील त्याचे पूर्वाश्रमीचे भाऊबंद त्याला मारण्या झोडण्यास टपलेलेच आहेत. आता शिरसे अध्यात्मांत-भावभक्तीत शिरताना प.पू. श्रीमहाराजांच्या प्रवचनांतील मोठ्या स्वामी महाराजांची गोष्ट पुढे ठेवून म्हणतो, ''सायेब, श्री वासुदेव स्वामी महाराजांनी त्या नागाला यापुढे कोणाला दंश करायचा नाही म्हटले तर तो नुसता पडून राहिला. मग कोणीबी यावं आणि त्याच्यावर दगड धोंडा मारावा, तशी माझी गत झालीया.''

कल्पना करा, अशा या शिरसेला कामात मी अनेक वेळा दटावत होतो. नुकसान झाले तर थांब तुझ्या बिलांतून पैसे कापतो असे म्हणत होतो. ते तर काहीच नाही, पण ५०/५०, ६०/६० हजारांची कॅश घेऊन माल मटेरियल खरेदीस त्याच्याबरोबर मोटार सायकलने एकटाच जात येत होतो. रस्ते सुद्धा मैलोनमैली निर्मनुष्य असायचे तर कधी खरेदी न झाल्याने ती कॅश परत वाडीस आणण्यास रात्रीचे दहा तर कधी अकरा वाजायचे.

'श्री दत्त अमरेश्वराच्या' ह्या सर्व कामकाजात अशी दुष्ट प्रवृत्तीची माणसे माझ्या अवती भवती वावरत होती. शिरसेचा मेहुणा किसन असाच होता. त्याच्या थोरल्या भावास दगड घडाईचे काम दिले होते, तोही असाच होता. प.पू. श्रीमहाराजांनी मला किती सांभाळले हे यावरून कळून येते. उलट या दुष्ट लोकांच्या धिटाईचा माझे शरीररक्षक म्हणून उपयोग

करून घेतला महाराजांनी. त्यांच्या दांडगाईने कामे जोरांत होऊ शकली.

अशी आपल्याकडून पुण्याईची श्री सेवेची कामे करवून घेताना प.पू. श्रीमहाराजांनी आपल्याला फुलासारखे जपले व दुष्ट प्रवृत्तीस थोपवून त्या वृत्तीस श्री सेवेसच कारणी लावले. श्री गुरुसेवा ही साधी गोष्ट नाही. आपण करू म्हटले तर आपणाकडून घडणारी नाही. ही त्यांची सेवा त्यांनीच आपल्याकडून करून घ्यायची आहे. पुन्हा चार चौघांत आपल्या भक्ताचे गुण गौरव कौतुक करून न कळत पुण्याचा साठा बहाल करायचा आहे.

वाडीतील प्रमुखांपैकी पुजारी श्री. रामशास्त्री जेरे यांचे काम, प.पू. श्रीमहाराजांनीच आमची शिफारस करून आम्हांस देवविले. स्वतः श्री रामशास्त्री, आम्ही रहात असलेल्या दामू पुजारी यांचे घरी येऊन ''आमच्या इमारतीचे काम आपण करावे. प.पू. श्रीमहाराजांनीच आपले नांव सुचविले आहे.'' असे म्हणून काम दिले. या दुमजली इमारत बांधकामासही श्री. शिरसेच लेबर कॉन्ट्रॅक्टर होता. शेवटचा रंगाचा हात चालू असताना आपले नवे घर दाखविण्यास श्री. रामशास्त्री प.पू. श्रीमहाराजांना या नव्या घरी घेऊन आले. प.पू. श्रीमहाराजांना आभारपूर्वक ते म्हणाले, ''आपल्यामुळेच आमचे हे काम उत्तम प्रकारे झाले. आपण श्री. नागल्यांची या कामास योजना केलीत.'' योजकःस्तत्र दुर्लभः! असे काहीतरी म्हणाले. ''श्रीं'' बैठकीवर बसले होते. आम्ही सर्व मंडळी मागे उभे राहून प.पू. श्रीमहाराजांचा सत्कार सोहळा पहात होतो.

भक्तांची दर्शनाकरिता लाईन लागली. रांगेत श्री. शिरसेही होता. रांगेतून येऊन प.पू. श्रीमहाराजांपुढे नमस्कार करण्यास वाकला. इतक्यात श्री. रामशास्त्री महाराजांना म्हणाले, ''नागल्यांचे हे लेबर कॉन्ट्रॅक्टर शेशा शिरसे! मंदिराचे कामासही अमरेश्वरी हेच होते. महाराज, आपण तर यांना दीक्षा देऊन ''वाल्या कोळ्याचा वाल्मिकी'' बनविले आहे असे हे श्री. शिरसेनेच आम्हांला सांगितले आहे.''

२३०) 'श्री दत्त पादुका मंदिर, जालना'

श्री वामन निवासाचा वरचा मजला आणि श्री रेणुका निवासाचा वरचा मजला बांधून पूर्ण झाला होता. प.पू. श्रीमहाराजांच्या आज्ञेनुसार प.पू. सौ. ताईमहाराजांनी त्यांचा 'दत्ताश्रम' आणि त्यांचे राहते घर जुन्या जालन्यांतून नाव्हा रोड (जुना सिंदखेडराजा रस्ता) येथील घेतलेल्या प्लॉटवर स्थापित करण्याचे ठरविले. आश्रमांकरिता भूमीपूजनही झाले होते. या नवीन होणाऱ्या 'दत्त आश्रमाचे' आणि प.पू. सौ. ताईंच्या राहण्याच्या घराची वास्तू ही दोन्ही बांधकामे मी म्हणजे श्री. नागले यांनीच करावी अशी प.पू. सौ. ताईंची

इच्छा होती. वारंवार त्या मला ही कामे तुम्हीच करा असे म्हणत होत्या. सौ. ताईंचे वरच्यावर 'श्री रेणुका निवासात' येणे होत असे. दोन्ही वास्तुंचे प्लॅन्स तयार झाले होते. सौ. ताईंच्या घराचा प्लॅन श्री. नंदकुमार शृंगारपुरे यांनीच काढलेला त्यांनी मला दाखविला होता. आश्रमाचाही त्यांनीच काढला असावा. श्री. नंदकुमार प.पू. श्रीमहाराजांना प्लॅन्स दाखवित असताना मी तेथे उपस्थित होतो. प.पू. सौ. ताईमहाराज प.पू. श्रीमहाराजांना बांधकामाकरिता आमचे नांव सुचविण्याचे धाडस का करीत नव्हत्या हे कळले नाही. शेवटी मीच प.पू. श्रीमहाराजांना विचारले, ''महाराज ही बांधकामाची कामे मी स्वीकारू कां?'' त्यावर प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''अहो तेथील भक्त मंडळींनाही सेवेचा लाभ होऊ द्या.''

''श्रीं''च्या या वचनांनंतर मी, प.पू. श्रीमहाराजांकडे पुनः विषय काढला नाही. माझ्या मनी विचार आला, जालना रहिवासी रामभाऊ गाढे सारखे मोठे कॉन्ट्रॅक्टरही प.पू.सौ. ताईमहाराजांचे भक्त आहेतच, आणखीही कोणी असतील. शिवाय नागल्यांचा आपल्या मुंबईतील धंद्याचा वेळही आपण घेतला, आता जरा संसाराकरिता धनार्जनास नागल्यांना संधी किंवा उसंत म्हणूया द्यायची असेल. प.पू. सौ. ताईमहाराज पुनः पुन्हा मला म्हणायच्या, ''खरं म्हणजे जालन्याची दोन्ही कामे तुम्हीच करायला हवी होती!''

मी ठराविक उत्तर देत असे, ''होय ताई महाराज, पण महाराज नाही म्हणतात. तेथील लोकांना सेवा घडूं द्या म्हणतात, मग मी तरी काय करू?''

सहस्रचंद्रदर्शन शांतीनंतर प.पू. श्रीमहाराजांनी श्री दत्त अमरेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराकडे, ते चालू करण्याकडे जास्त उचल घेतली. खरं सांगायचं तर १९८६ साली श्री वामनरावजी गुळवणी महाराजांचा शताब्दी सोहळा श्री वामन निवासात संकल्पाप्रमाणे पार पडल्यानंतर प.पू. श्रीमहाराजांना श्री अमरापूर क्षेत्री श्री दत्त अमरेश्वराचा जीर्णोद्धार करून तेथेच उर्वरित आयुष्य वेचायचे होते. ७० वर्षापूर्वी प.प. श्री नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराजांनी नाही कां श्री दत्त अमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करून उर्वरीत आयुष्य तेथेच व्यतीत केले, अगदी तसेच! प.पू. श्रीमहाराजांना या जीर्णोद्धाराची घाई होती तर ताई आमच्यापाशी अजूनही म्हणतात की, श्री दत्त अमरेश्वराच्या बांधकामाआधी जालना येथील श्री दत्ताश्रमाचे संपूर्ण काम म्हणजे आज जे पूर्ण झालेले दिसत आहे तेवढे, आधी व्हायला पाहिजे होते.

आम्हाला गुरुवाक्य प्रमाणम्!

आता मात्र श्री दत्त अमरेश्वराच्या सर्व वास्तूंचा जीर्णोद्धार होऊन प.पू. श्रीमहाराजांचे जुन्या घराच्या ठिकाणी वाडीत नवीन घराचेही काम झाल्यानंतर, प.पू. श्रीमहाराजांनी जालन्यास प.पू. सौ. ताईमहाराजांच्या संकल्पानुसार 'श्री दत्त पादुका मंदिर' बांधण्यास आमची नियुक्ती केली.

दि. ९.४.१९९६ रोजी दुपारनंतर श्री रेणुका निवासामध्ये गेलो. सौ. आईसाहेब यांची ख्याली खुशाली घेतली. त्यांचे दर्शन घेतले. प.पू. सौ. ताईमहाराजही तेथेच होत्या. त्यांचेही दर्शन घेऊन प.पू. श्रीमहाराजांच्या खोलीत गेलो. आम्ही आज सहकुटुंब दर्शनास आलो होतो. कुशल प्रश्न झाल्यानंतर प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''आता तुम्हांला जालन्यास दत्तपादुका मंदिराचे बांधकाम करायचे आहे. ते कधी काम सुरू करायचे, कसे करायचे ते सर्व प.पू. सौ. ताईमहाराजांना विचारून करा!''

प.पू. सौ. ताईमहाराजांचे बाहेरील खोलीत दर्शन घेऊन त्यांना ''श्रीं''ची आज्ञा कथन केली. श्री दत्त अमरेश्वराची राहिलेली किरकोळ कामे संपवून आम्ही २० जून नंतर मी, चि. दिनेश जालन्यास खेप करू म्हटले व त्याचवेळी पुढील गोष्टी ठरवू. असे म्हणून मी निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही वाडी-औरवाडला गेलो.

जालन्याचा दत्त आश्रम व प.पू. सौ. ताईंचे घर १९९२ ला तयार झाले. मी व दिनेश प.पू. सौ. ताईमहाराजांना चि. संदीपच्या विवाहाचे आमंत्रण देण्यास जालन्यास गेलो तेव्हा सौ. ताई जालन्यात ए.पी. पेट्रोलपंपासमोर रहात होत्या. श्री. मधुकरराव भाऊजी याच पेट्रोलपंपावर अकौंटन्ट म्हणून काम करीत होते आणि पेट्रोलपंपाच्या मालकानीच त्यांना चार खोल्यांची जागा राहण्यास दिली होती. भोजनोत्तर प.पू. सौ. ताईमहाराज मला व चि. दिनेशला चालू असलेले आश्रमाचे व घराचे बांधकाम दाखविण्यास घेऊन गेल्या होत्या. सौ. ताईंचे घर बांधून पूर्ण होऊन रंगरंगोटी चालू होती. तर आश्रमाचा आदल्या दिवशीच स्लॅब भरला होता.

आश्रमाची वास्तुशांत होऊन 'प.पू. श्री धुंडीराज महाराज व प.पू. श्री दत्तात्रेय काजळकर महाराज' यांचे फोटो आश्रमात आणून स्थापना करण्यात आली. या दोन फोटोंच्या मध्यावर आपल्या 'सद्गुरु श्री दत्तमहाराज कवीश्वरांचा' फोटो असावा असे सारखे सौ. ताई महाराजांना वाटू लागले. श्री. गोडसे आणि म्हसवडकर यांच्या सतत खेपा मुंबई-पुणे-जालना अशा चालू होत्या. या खेपा-वाऱ्या म्हणूया, प.पू. सौ. सरस्वती आईसाहेब यांचे समाधी मंदिर सुलतानपूर येथे बांधण्याकरिता चालू होत्या. एके दिवशी ही प.पू. श्रीमहाराजांचा फोटो मध्यावर ठेवण्याची आपली संकल्पना सौ. ताईमहाराजांनी श्री. गोडसे यांना सांगितली व म्हणाल्या, ''पुढील खेपेस याल तेव्हा ह्या दोन फोटोंच्या साईजचाच प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वरांचा फोटो प.पू. श्रीमहाराजांचा हस्तस्पर्श करून घेऊन या. गाभाऱ्यांत लावण्यास सौ. ताईंनी मागितला आहे असे सांगा!''

श्री. गोडसेंनी प.पू. सौ. ताईमहाराजांचा निरोप व पुढील खेपेस जाताना फोटो घेऊन जाणार हे सांगितले. आता ''श्रीं''ना हे कसे पटणार? श्री. गोडसेंना प.पू. श्रीमहाराजांनी

विचारले, ''फोटो काय साईजचा हवा हे आपणास माहीत आहे ना? मग असं करा, त्याच साईजचा श्री. दत्तात्रेयांचा एकमुखी फोटो आहे तो घेऊन जा आणि म्हणावं दोन फोटोंच्या मध्यावर हा फोटो लावा!''

पुढील खेपेस श्री. गोडसे दत्त आश्रमात आले तो 'श्री दत्तप्रभूंचा फोटो' घेऊन आले. अहो, असं म्हणतात की प.पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराजांना 'श्री दत्तप्रभूंचे' जसे दर्शन झाले तशीच ही प्रतिमा त्यांनी कागदावर काढली, रंगवली. ते स्वतः चित्रकार (आर्टीस्ट) होते. ड्रॉईंग मास्तरच होते. श्री दत्तप्रभू जसे दिसले तसेच हुबेहुब चित्र त्यांनी काढले. तेच श्री दत्तप्रभू प.पू. श्री धुंडीराज महाराज आणि प.पू. काजळकर महाराज यांचे मध्यावर विराजमान आहेत.

'श्री दत्त पादुकांचे' बाबतीतही असेच झाले. प.पू.सौ. ताईमहाराजांनी प.पू. श्रीमहाराजांकडे त्यांच्या स्वतःच्या पादुका मागितल्या तर प.पू. श्रीमहाराजांनी त्यांच्या हस्ते भावभक्तीपूर्णतेने 'श्री दत्तप्रभुंच्या पादुका' अर्पण केल्या. प.पू. श्री सद्गुरु दत्तमहाराजांचे हस्तस्पर्शाने आलेल्या त्या पादुका प.पू. सौ. ताईमहाराजांनी मात्र आपल्या प.पू. श्री सद्गुरु महाराजांच्या पादुका म्हणून स्वीकारल्या. आज त्याच प.पू. श्री सद्गुरु श्री दत्तमहाराज कवीश्वरांच्या पादुकांचे भव्य मंदिर प.पू.सौ. ताईमहाराजांच्या संकल्पाने जालन्यात दत्त आश्रमात साकार झाले आहे. आम्हां सर्व भक्तांचे श्रद्धास्थान, आमच्या अंतरिचा विसावा, आमचे माहेर असे मंदिर आमच्या भक्तीभावाकरिता प.पू. सौ. ताईमहाराजांनी उभारले आहे.

मी व दिनेश ठरल्याप्रमाणे दि. २२.६.१९९६ रोजी जालन्यास दत्त आश्रमात आलो. साईटचे दर्शन घेतले. ''श्रीं''च्या हस्ते लावलेल्या औदुंबराचे दर्शन घेतले. औदुंबराभोवती पार बांधलेला होता. एकदा तर या पारावर औदुंबराखाली पाटावर प.पू. श्रीमहाराज बसले होते. श्री. गोडसेंनी त्यांचा फोटोही घेतला. फोटोच्या कॉपीज आश्रमात उपलब्ध आहेत. १९९५ ला श्री दत्त आश्रमात मोठा यज्ञयाग झाला. भक्तांनी दत्तआश्रम तुडुंब भरला होता. प.पू. सौ. ताईमहाराजांचा ''श्री''ना प्रश्न होता की श्री पादुकांची स्थापना कोणत्या ठिकाणी करायची? त्या समारंभात अफाट भक्तगणांच्या मेळाव्यात प.पू. श्रीमहाराजांनी या महाभागास बोलावून घेतले व सहज विचारले, ''काय मग! पादुकांची स्थापना कुठे करायची?''

प्रथम यज्ञमंडपात होमाकरिता मोठा चौथरा बांधला होता त्याच्या मध्यावर म्हणजे आताच्या राघवालयाच्या मध्यावर स्थापन करायच्या कां? असे फक्त विचारले. आम्ही म्हटले, ''आपण सांगाल तेथे!'' त्या ठिकाणाहून प.पू. श्रीमहाराज औदुंबराजवळ आले आणि औदुंबराखाली पूर्व दिशेस पारावर हात थोपटून स्वतःच म्हणाले, **''या इथे स्थापन करा!''**

खरं सांगायचं म्हणजे प.पू. श्रीमहाराजांचा औदुंबराखाली बसलेला जो फोटो आज आश्रमात उपलब्ध आहे, त्या पाटाच्या खालचीच म्हणजेच प.पू. श्रीमहाराज बसले होते तीच जागा त्यांनी दाखविली आणि आमच्या अंत:करणात तीच जागा होती.

आम्हाला मंदिराचे गर्भस्थान-गाभारा तेव्हाच दिसला होता. दि. २२.६.१९९६ ही, या कामानिमित्त म्हणूनआमची पहिली भेट होती. दुपारी प.पू. सौ. ताईमहाराजांसमवेत श्री. भाऊ आगरवाल शेठजी, मी व दिनेश अशी बैठक झाली. जागा तर निश्चित झालेलीच आहे. आता फक्त मंदिराची साईज लांबी-रुंदी आणि काम सुरू करण्याचा मुहूर्ताचा दिवस नक्की करायचा होता. सर्वसाधारण सांप्रत (पूर्वीच्या) आश्रमाच्या रुंदी इतकीच रुंदी व लांबी ठेवावी व मुहूर्त या श्री गुरुपौर्णिमेस म्हणजे दि. ३०.७.१९९६ रोजी सकाळी प.पू. श्रीमहाराजांची मान्यता घेऊन करावा असे ठरले.

रविवार, दि. २३.६.१९९६ रोजी दुपारी बाराच्या गाडीने मी व दिनेश पुण्यास रवाना झालो. श्री रेणुका निवासात आम्ही सायंकाळी ७.३० ला पोहोचलो. ''श्रीं''चे दर्शन घेऊन सर्व वृत्तांत कथन केला. श्री गुरुपौर्णिमेस कामाचा मुहूर्त करण्यास ''श्रीं''ची अनुमती मिळाली. ''मंदिरास गाभारा करायचा कां नाही हे प.पू. सौ. ताईमहाराजांना ठरवू द्या. त्यांच्यावरच हा निर्णय सोपवा!''

असे म्हणून चि. दिनेश यांस सौ. ताईंचे म्हणण्याप्रमाणे नकाशे तयार करण्यास सांगितले.

दि. २६.७.१९९६ ला मी, दिनेश, सौ. देविका जालन्यास पोहोचलो. श्री. गोडसे व श्री. मामा ढापरेही उपस्थित होते. कामाच्या प्रारंभाकरिता प.पू. सौ. ताईमहाराजांच्या आज्ञेनुसार रोजची दिगंबराची धून सुरू केली. चि. दिनेश व मी मंदिराचे ड्रॉईंग बनविणे, साईटवर मोजमापे घेणे ही कामे करीत होतो.

दि. ३०.७.१९९६ ला 'श्री दत्त पादुका मंदिराचे भूमीपूजन' श्री. गोडसे यांचे हस्ते करून खोदाईचा प्रारंभ श्री. भाऊ अगरवाल यांचे हस्ते संपन्न झाला.

दि. १.८.१९९६ ला दुपारचे १.३० च्या तपोवन गाडीने आम्ही, धूनला बसलेली भक्त मंडळी श्री. राऊत उभयतां, श्री. पुरोहित उभयतां, श्री. गोडसे व त्यांचे शेजारी तसेच सौ. प्रभाताई आयकर असे प.पू. श्रीमहाराजांच्या आणि सौ. ताईमहाराजांच्या आठवणीत मुंबई येईपर्यंत रमलो. प्रवासात धूनही झाली.

२३१) गुरुसेवा फार कठीण आहे! - १

श्री गुरुसेवा ही किती कठीण आहे याचे अनेक दाखले 'श्रीमत् गुरुचरित्र ग्रंथात' आलेले आहेत. गुरुसेवा घडायला गुरुकृपाच लागते. पण काही वेळा तो गुरु परमात्मा परेशूच आपल्या शिष्याची, आपल्या भक्ताची कस लावून परीक्षा घेऊ लागतो. अटळ श्रद्धा, दृढ भक्ती असेल तरच भक्तांचा निभाव लागायचा. पण आम्हा गृहस्थाश्रमी संसारी, भक्तांचा या परीक्षेत गुरुकृपेखेरीज कसा निभाव लागायचा? गुरुसेवेत येणारे अडथळे, येणाऱ्या अडचणी, संकटे ही निभावून नेताना तारेवरची कसरतच असते. कधी तोल जाईल सांगता येत नाही. आपल्याला गुरुसेवा तर हवी असते. मग त्यात येणाऱ्या अडचणी, विघ्ने ही तरी गुरुमहाराजांना कशी कथन करणार? आम्हालाही अशा बऱ्याच गोष्टींना सामोरे जावे लागले. हे यापूर्वी झालेल्या लिखाणांतून आम्ही कथन केले आहेच. पुनरुक्ती टाळतो. आम्ही जरी आम्हांस इतरेजनांकडून मिळणारे कटू बोल किंवा मानसिक आघात गुरुमहाराजांच्या कानी जाऊ नयेत म्हणून सर्व प्रकारे काळजी घेतली तरी सुद्धा त्यातील काही प्रसंग श्री गुरुमहाराजांच्या कानी जाऊन त्यांचे द्रवलेले अंत:करण, सद्गुरुंच्या नेत्रात उभे राहिलेले अश्रू आम्ही स्वनेत्राने पाहिले आहेत. ही केवढी अंत:करणास यातना देणारी घटना भक्त अनुभवतो! काय वाटत असेल त्या भक्ताला ते सद्गुरुंचे वात्सल्य रूप पाहून!!!

जालन्याच्या गुरुपादुका मंदिराचे काम हे माझ्याच श्री सद्गुरुंच्या मंदिर उभारणीचे काम होते. प.पू. सौ. ताईमहाराजांच्या भक्तीभावांतून प्राप्त झालेल्या 'श्री सद्गुरु दत्त महाराजांच्या पादुकांचे मंदिर!' हे मंदिर माझ्याकडून बांधून घेण्याची प.पू.सौ. ताईंची इच्छा, प.पू. श्रीमहाराजांचे आशीर्वाद आणि प.पू. सौ. ताईमहाराज म्हणतील त्याप्रमाणे त्यांच्यावरच निर्णय सोपवून काम सुरु करण्याची ''श्रीं''ची आज्ञा घेऊन आम्ही जालन्यास आलो. पूर्वीच्या ''श्रीं''च्या आज्ञेनुसार झालेल्या कामांचा अनुभव जमेस धरून आमचा काम उत्तम प्रकारे करण्याचा आत्मविश्वास दृढावला होता. ''श्रीं''चे तसेच 'भगवती ताई महाराजांचे कृपाछत्र' असताना विवंचना, भय,शंका यांस थाराच नव्हता.

आजपर्यंत प.पू. श्रीमहाराजांनी आमच्यावर सोपविलेल्या आश्रम, मंदिराप्रमाणे हेही काम त्याच पद्धतीने सेवाभावी वृत्तीने आम्ही चालू केले. आम्हांस आश्रमाच्या बजेटची किंवा प.पू. सौ. ताईंना मंदिर किती लांबरुंद बांधायचे आहे याची कल्पना नव्हती. प.पू. ताईंपुढे आम्ही, मी व दिनेशने प्लॅन ठेवला तो त्यावेळच्या आश्रमाच्या हॉलच्या साईजचा चौरस धरला. त्याप्रमाणे साडेआठ लाखाची एस्टीमेटेड कॉस्ट सांगितली. परंतु कामाचा भूमीपूजन करून प्रारंभ केला आणि प.पू. सौ. ताईमहाराजांनी आम्हा दोघांस दिनेशला व मला स्नान संध्या उरकून घरी भेटीस बोलावले व बेडरूममध्ये ठेवलेल्या व प.पू.

श्रीमहाराजांनी दिलेल्या, पादुकांवरील वस्त्र-आवरण काढून दर्शन घडविले व म्हणाल्या पादुकांसमोर बैठकीस बसा (ध्यान धारणेस बसा) म्हणजे मंदिर कसे हवे ते तुमच्या समोर येईल. अर्धा पाऊन तासांच्या बैठकीनंतर श्री दत्त अमरेश्वराचे मंदिर त्याची लांबी-रुंदी पण मंदिरास अष्टकोन असावेत असे दोघांनाही जाणवले आणि आमच्या बैठकीनंतर प.पू. सौ. ताई म्हणाल्या, ''पादुकांची बैठक सुद्धा अष्टकोनी आहे की नाही? मंदिर पण तसेच आणि भव्य व्हावे.''

श्री आज्ञेनुसार प.पू. ताईंचे इच्छेप्रमाणे चि. दिनेश याने सुधारित प्लॅन केला. प्लॅन व्यवस्थित काढून प.पू. ताईंपुढे ठेवला. त्यांनी प्रसन्नतापूर्वक तो मान्य केला. त्याप्रमाणे आर.सी.सी. ड्रॉईंग तयार होऊ लागली. कामास गती आली. काम सुरळीत प्रसन्नतेत चालू झाले. 'सद्गुरुंचे पादुका मंदिर' होत आहे हे पाहून आश्रमवासी आणि सर्वच भक्त मंडळीत आनंदाचे वातावरण होते.

मुंबईस जाता येता आम्ही व्हाया पुणे जाणे येणे करावे, श्री रेणुका निवासात प.पू. श्रीमहाराजांचे दर्शन घेऊन यावे आणि जावे, कामाची प्रगती ''श्रीं''ना कथन करावी, ''मुख्य म्हणजे **'श्रीं'चा वारा श्री रेणुका निवास मधून घेऊन जालन्यास यावे. प्रथम प.पू. सौ. ताईंचे भेटीस जावे'** ही प.पू. सौ. ताईंची आज्ञा!''

रोज सायंकाळी काम संपून हातपाय धुतले की, प.पू. सौ. ताईमहाराज चहापानास बोलावून घ्यायच्या. तासभर तरी त्यांच्या सहवासात जायचा. विषय प.पू. श्रीमहाराज आणि गुरुभक्ती हाच असायचा. संभाषणातून प.पू. सौ. ताईंचे मनोगत उलगडले जायचे. हा आश्रम कशाकरिता आहे, गुरुभक्ती कशी असावी, भरपूर अन्नदान कसे घडावे, त्यात भुकेल्यास अन्न देण्यात केवढे पुण्य आहे, अशा अनेक दैवी गुणसंपदेचा पक्वान्नाचा प्रसाद आमच्यावर संस्कार करून जायचा. प.पू. सौ. ताईंची गुरुभक्ती, गुरुभाव, आश्रम आणि उद्दिष्टे, त्यांचे आध्यात्मिक आणि जनकल्याणाचे कार्य याचा अभ्यास होऊ लागला. त्यांना भक्तांकडून काय अभिप्रेत आहे हे कळू लागले. गुरुमंदिर जणू माझ्या अंत:करणात प.पू. सौ. ताई उभारीत होत्या.

प.पू. श्रीमहाराजांसारखेच सर्वाधिकाराचे पत्र आम्हाला इथे मिळाले नसले तरी प.पू. सौ. ताईमहाराजांनी आमची महती एवढी वाढविली की सांगता सोय नाही. प.पू. सौ. ताईमहाराजांच्या सहवासांतील आठवणींचे पुस्तक आमच्याकडून ''श्रीं''नी लिहून घेतले त्यात हे सर्व वर्णन आले आहे. तरी संदर्भाकरिता थोडक्यात कथन करतो. श्री. नागलेकाकांना कामात लागेल ती मदत सहकार्य सर्वांनी द्यावे. जालना मार्केटमधील माल मटेरियल सप्लायर त्यांना दाखवावे. कोणतेही मटेरियल आले, विशेषत: सिमेंट, लाकूड, लोखंड,

फरश्या, लाद्या, स्क्रू, कडी कोयंडे बिजागरीपासून कोणतेही सामान आल्यास ते आश्रमात उतरवून घेण्यापूर्वी नागलेकाकांनी प्रथम त्याला स्पर्श करावा. सप्लायर लोकांचे पैसे देताना नागले काकांच्या हाताचा स्पर्श करूनच नोटांची बंडले द्यावीत. अशा बऱ्याच गोष्टी आहेत. हे सर्व सौ. ताईंचे सोपस्कार मला अति संकोचाचे वाटायचे. पण यावर सौ. ताई म्हणायच्या, ''शशीकांत तुम्ही प.पू. श्री सद्‌गुरु महाराजांकडून आले आहांत! त्यांनी तुम्हांला माझ्या मदतीला पाठविले आहे. तुम्ही माझ्या गुरुदेवांचे प्रतिनिधी आहात. सर्व तुमच्या म्हणण्याप्रमाणे झाले पाहिजे. तुमचा सर्वांनी सन्मान ठेवणं म्हणजे प.पू. श्रीमहाराजांचा मान ठेवण्यासारखे आहे!''

'श्री दत्त आश्रम जालना येथील श्री सद्‌गुरु पादुका मंदिराचे आणि सुंदर दत्त निवासाचे बांधकाम' करण्याची ही सुवर्णसंधी 'श्री सद्‌गुरुंनी' आमच्या पदरात घातली आणि आम्हांस कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. आमच्या आनंदास सीमा राहिली नाही.

परंतु पुढे प्रारब्धवशात् म्हणा किंवा ''श्रीं''ना आमच्या निष्ठेचा कस लावून आमची परीक्षा घ्यायची होती! न कळे!

२३२) ''आपल्यास जालन्यास जायचे आहे!''

एक आठवण दि. ३० मार्च १९९७, स्थळ 'श्री रेणुका निवास' रात्री ८ वाजून ३० मिनीटे झाली होती. जालन्याच्या दत्त आश्रमांतील 'श्री दत्त पादुका मंदिराचा छताचा' स्लॅब पूर्ण करून मी शशीकांत नागले प.पू. श्रीमहाराजांचे खोलीत प्रवेश करून दंडवत घातले. प.पू. श्रीमहाराज आपल्या पलंगावर बसले होते. दंडवत घालून उभे राहताच विचारले, ''कोण, नागले कां? जालन्याहून आलात कां?'' मी म्हटलं, ''होय महाराज! श्री दत्त पादुका मंदिराच्या छताचा स्लॅब पूर्ण करून आलो आहे!'' ''असं का? असे म्हणून ते लागलीच पलंगावरून खाली उतरून उभे राहिले आणि तडक पुढील खोलीत सौ. आईसाहेबांचे जवळ गेले. सौ. आई साहेबांना म्हणाले, 'अहो, ऐकलं का? हे नागले आले आहेत. ते सांगत आहेत की, मंदिराचा छताचा स्लॅब झाला. मंदिर तयार झाले. आता लवकरच बऱ्या व्हा. आपल्यास जालन्यास जायचे आहे.

आज मला शिरडीच्या श्री साईबाबांचा तो प्रसंग साई सच्चरीत पोथीत वाचलेला आठवतो. श्री. बुट्टी यांनी श्री कृष्णांचे मंदिर बांधायला घेतले. ते बांधून पूर्ण झाले. श्रीकृष्णांच्या मूर्तीची स्थापना व्हायची होती. साईंचे परमभक्त श्री. बुट्टी, श्री बाबांना घेऊन तयार झालेले मंदिर दाखवायला घेऊन गेले. जेथे मूर्ती स्थापन होणार होती त्या गाभाऱ्यात

श्री साईबाबा गेले आणि हर्षोन्मादाने नाचू लागले व मुखाने म्हणू लागले, "**हे घर माझ्या रायाचे। इथेच मजला ऱ्हायाचे।।**" आणि खरोखरच दसऱ्याचे दिवशी दुपारी एकादशी चालू होताच श्री साईबाबांनी देह ठेविला. श्री. बुट्टींनी बांधलेल्या मंदिराचे गाभाऱ्यातच 'श्री साईबाबांचा देह चिरकाल समाधीत' येऊन राहिला.

आज आपण पादुका मंदिरात पाहतोच मध्यावर 'श्री दत्तमहाराज पादुका आणि बाजूला सौ. लक्ष्मीबाई' विराजमान आहेत.



२३३) सरकती खिडकी (स्लायडिंग विण्डो)
दुसरी एक आठवण

१९९८ सालांतील आषाढांतील व्यास पौर्णिमा-गुरुपौर्णिमा जवळ आली होती. यावर्षी प्रकृतीस्वास्थ्य नसल्यामुळे प.पू. श्रीमहाराजांच्या दर्शनास श्री रेणुका निवासासमोर रांगाच रांगा लागणार होत्या. हॉल पूर्ण भरणार होता. प.पू. श्रीमहाराजांना त्यांच्या खोलीतून जरा सुद्धा हलायला उसंत मिळणार नाही. स्वयंपाकघरांतून प.पू. श्रीमहाराजांना काही दूध, फलाहार किंवा औषध द्यायचे म्हटले तर हॉलमधील गर्दीतून मार्ग काढीत जावे लागणार. म्हणून चि. अजितने स्वयंपाकघर आणि प.पू. श्रीमहाराजांची खोली यामध्ये असलेल्या कॉमन भिंतीत एक स्लायडींग सर्व्हीस विण्डो करायचे प्रपोजल माझ्यापुढे मांडले. दिवस थोडे राहिले होते. प.पू. श्रीमहाराजांना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ न देता भिंतीला २.६" बाय १.६" या साईजचे भोक पाडून लागलीच मार्बल किंवा कडप्पा चारी साईडस्ना बसवून त्यात ॲल्युमिनियम स्लायडिंग ग्लास विण्डो (सर्व्हिस खिडकी) करायचे ठरले. मी व दिनेश जालन्यास जाताना एक दिवस या कामाकरता द्यायचा ठरवून आलो. मजूर, गवंडी-कारागीर सर्व साहित्य सिमेंट, रेती, हातोडी, छिनी, कडप्पा सर्व जय्यत तयारीने आलो. प.पू. श्रीमहाराजांची प्रकृती ठीक नसल्याने ते खोलीत कॉटवर झोपूनच होते. आता भिंतीस छिनी हातोडीने भोक पडेपर्यंत २० ते ३० मिनीटे आवाज होणार म्हणून चि. आमोद आजोबांना म्हणजे प.पू. श्रीमहाराजांना सांगायला गेला, "आजोबा, स्वयंपाकघर आणि आपली खोली या मध्ये एक सरकती खिडकी बसवायची आहे. त्या करता ती भिंत भोक पाडण्याकरता थोडी तोडावी लागेल. जरा आवाज होणार आहे, हे सांगायला आलो आहे मी आमोद!"

प.पू. श्रीमहाराज : काय? खिडकी बसविण्याकरिता भिंत तोडणार? काय करायची आहे ती खिडकी? शिवाय आपल्या नागल्यांनी ती भिंत बांधून घेतली आहे. नका रे त्यांनी ती बांधलेली ती भिंत तोडू!

आमोद : आजोबा खिडकी केली म्हणजे स्वयंपाक घरात कोणताही पदार्थ पेय आपणास तेथल्या तेथे देता येतील, हॉलमधून वळसा मारून यायला नको.

प.पू. श्रीमहाराज : अरे नका रे तोडू ती भिंत. पडला वळसा तर काय झाले? काही करू नका.

आमोद : नागलेकाकाच आले आहेत ती खिडकी करून द्यायला.

हे काम करण्यास प.पू. श्रीमहाराजांचा स्पष्ट नकार मी व दिनेश ऐकत होतो. असं असताना आम्ही आज्ञा उल्लंघन कशी करणार? आमोद आम्हाला पटवीत होता, ''अहो आजोबा त्यांच्याकरिता काही सुखसोयी करायला गेले की असेच नकार देतात. पण आपल्याला त्यांच्याच सोईकरिता करायचे आहे ना! मग तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका!!''

आम्ही दोघेही धर्मसंकटात पडलो. मनाशी निश्चय केला की प.पू. श्रीमहाराजांचा शब्द प्रमाण. मग मी आत गेलो. त्यांचे उशीजवळ जाऊन म्हटले, ''मी शशीकांत नागले आणि दिनेश आपणास नमस्कार करीत आहोत!''

महाराज उठण्याचा प्रयत्न करू लागले, आम्ही थांबविले व म्हटले, ''काय करायचे महाराज नको करू कां?'' प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''करा! तो आमोद काय म्हणतोय, अजितने काय सांगितले आहे तसे करा! ईश्वरी इच्छा!''

''श्रीं''नी आम्हांस धर्मसंकटातून सोडविले. ही अखेरचीच सेवा ''श्री'' सन्निधची होती. हळूवारपणे हलक्या हाताने सर्व केले. प.पू. श्रीमहाराजांना सुखसोयींपेक्षा दु:ख होत ते नागल्यांनी बांधलेली भिंत तोडावी लागणार याचे. त्यांनी तसे स्पष्ट बोलूनही दाखविले. आम्ही आलेले आहोत हे त्यांना माहीतही नव्हते.

गोष्ट इथेच संपली नाही. आवाज जरा कमी झाल्यानंतर आमोदला बोलावले अन् विचारले, ''नागले आहेत ना! त्यांना जरा आमच्याकडे पाठवा.''

मी उशाशी जाऊन हात जोडले, प.पू. श्रीमहाराजांनी माझा उजवा हात हाती घेतला आणि काही पैशांच्या नोटांची गुंडाळी आमच्या हाती दिली व म्हणाले, ''हे असू द्या. आणलेल्या सामानाकरिता आणि मजूरांचे द्यायला.'' श्री आज्ञा! काम करू दिले, सेवा घेतली हे काही कमी नव्हते. आता पैसे नको नको म्हणत त्यांनाच त्रास देत बसणे इष्ट नव्हते. मी बाहेर आलो. पैसे मोजले ते ४८० रुपये होते. सिमेंट, ब्लॅक कडप्पे ४ तुकडे, थोडी रेती आणि मजूर गवंडी यांची मजुरी बरोबर बिल ४८० रुपयेच झाले. ॲल्युमिनियम स्लायडिंगचे उर्वरित काम अजितने तीन दिवसांनंतर पौर्णिमेपूर्वी करून घेतले.

२३४) गुरुसेवा फार कठीण आहे (पुढे चालू) - २

आम्ही आमच्या श्री दत्त आश्रमाचे सेवेत रुजू झालो. श्री पादुका मंदिराच्या आतील बाहेरील प्लॅस्टर व टेरेसचे वॉटर प्रुफींग या कामाकरिता आम्ही श्री दत्त अमरेश्वर मंदिराचे प्लॅस्टर काम केलेले खास कारागीर आणले. जालन्याचे कारागीर, त्यांची कारागिरी आणि कामाची गती ही फारच कमी प्रतीची वाटली. श्री. परसूमेस्त्री पत्नीसह व त्याचे हाताखाली काम करणारे हे सर्व त्यांचेच कुटुंबातील होते. त्यांनीही श्री दत्त आश्रमाजवळ स्वतंत्र खोली घेऊन बिऱ्हाड केले होते. ह्या मंडळींना गांव परके व काम असे हे आपलेच म्हणून काम एकमार्गी शीघ्रगतीने होत राहिले. परसू मेस्त्री नुकताच विवाह होऊन ३-४ महिन्यात इकडे आला होता. प.पू. सौ. ताईंच्या आशीर्वादाने पत्नी गर्भवती झाली. प.पू. सौ. ताई रोज सकाळी तिला आपल्यासमोर बसवून कपभर दूध प्यायला लावीत. काम पूर्ण करून उभयता कोल्हापुरी गेले. तेथे त्यांना प्रसाद लाभ झाला.

आता प.पू. श्रीमहाराजांनी आमच्यावर सोपविलेली सेवा आणि जबाबदारी पूर्ण झाली होती. स्वस्थानी परतण्याचा विचारात असता प.पू. सौ. ताईमहाराजांची (विनंतीपूर्वक) आज्ञा झाली की, आता 'सुंदरदत्त निवास'चे काम चालू करा. दिनेश व तुम्ही प्लॉटच्या हिशेबाने जास्तीत जास्त मोठी ३-४ मजली वास्तू बांधा. त्यात येणाऱ्या यात्रींची सर्व भक्तमंडळींची रहायची सोय संडास बाथरुमसह व्हावी. मी मुंबईस जाऊन येताना जाता येता ''श्रीं''चे दर्शन घेऊन प.पू. सौ. ताईंचा मानस सांगितला. त्यांनी ''त्या म्हणताहेत तर करा'' म्हटले.

प्रारंभी या नियोजित वास्तुस आम्ही 'यात्री निवास' म्हणत असू. या वास्तुचा प्लॅन तयार झाला. तळमजला, पहिला, दुसरा प्रत्येक माळ्यावर पूर्वेकडे पश्चिमेकडे असे दोन मोठे हॉल. हॉलचे दक्षिणेस एक मोठी खोली, गाद्यागिरद्या, चादरी, उश्या ठेवण्यास कपाटे, स्टोअरींगला रुममध्ये व हॉलमध्येही हॉलचे लांबी बरोबरीने लॉप्टस्, उत्तरेस दोन संडास, दोन बाथरुम, एक वॉशिंग प्लेस, दोन वॉश हॅण्ड बेसीन अशी सोय ठेवली.

प.पू. सौ. ताईमहाराजांनी त्या जालन्यास येईपर्यंत काम बंद ठेवण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी चि. आमोद पुण्यास घरी जाणार होताच. रात्री शांत झोप येणे कठीणच होते. आम्ही प.पू. श्रीमहाराजांना परिपूर्ण लीनतेने सर्व मागील पुढील वृत्तांत लिहून म्हटले, **''आम्ही आपले आज्ञेने गुरुसेवेस आलो आहोत. सेवा सोडून आपले आज्ञेशिवाय जाणार नाही. अनेक संकटांना आपत्तींना सामोरे जात आम्ही आपली सेवा अव्याहत करत राहू, तसूभरही सेवेत खंड पडणार नाही. तरी आपले मार्गदर्शन आणि पुढील आज्ञा होण्याच्या प्रतिक्षेत आम्ही आहोत!''**

यात्री निवास, तळमजला आणि तीन माळे वरती असा चार माळ्यांचा झाला. अगदी वरचा मजला वाचनालय करण्याच्या उद्देशाने बांधला होता म्हणून दोन्ही हॉल एकत्रित केले. संडास बाथरुम कक्ष कमी करून हॉलची लांबी वाढविली. तथापि प.पू. सौ. ताईंच्या आज्ञेनुसार पूर्वेकडे व पश्चिमेकडे एक एक बाथरुम तयार केली. गॅलरी दोन्हीकडे आहेतच. पुढे या यात्री निवास वास्तूला प.पू. सौ. ताईमहाराज यांच्या आज्ञेने सौ. आईसाहेब व महाराजांचे संयुक्त नांव **''सुंदर दत्त निवास''** म्हणून ठेवण्यात आले.

प.पू. सौ. ताईमहाराजांचे फक्त तळमजल्याचे घर आता त्यांच्या परिवारास आणि सतत पाहुण्यांचा राबता असल्याने फारच कमी पडत होते. प.पू. श्रीमहाराजांकडे सर्व मुंबईकर गुरुबंधुच्या इच्छेने आम्ही ''श्रीं''ना विनवणी करून वरचा माळा करण्याची परवानगी मागितली परंतु प.पू. सौ. ताईंची इच्छा नसल्याने ते 'पुढे पाहू' म्हणाले होते. आता आमच्या सेवेतील कामे संपत आली होती. प.पू. सौ. ताईंनाही परोपरीने विनंती केली. आम्हांसही मुंबईत चारकोप मध्ये गोरेगांवचा ब्लॉक विकून स्वतःचे घर बांधायला प.पू. श्रीमहाराजांनी परवानगी दिली होती. आम्ही गेल्यावर प.पू. सौ. ताईंचे घर त्यांच्या इच्छेप्रमाणे नागल्यांकडूनच बांधले जाणार नाही. हे सर्व लक्षात घेऊन ''श्रीं''चीही अनुमती मिळताच काम सुरू करण्याचे ठरले. बांधकाम खर्चाच्या सहयोगास हजारोंनी रकमा देणारे पुढे आले पण श्री रेणुका निवासाच्या बांधकामासारखीच, हे सौ. ताईंचे गुरुनिवास बांधण्यास सहयोग कोणाकडून स्वीकारायचा याला बंधने होती. शुद्ध, सात्विक, भावपूर्ण सहयोग प्रत्येक वेळी प.पू. सौ. ताईंचे अनुमतीने या घरास उपयोगी आले. 'गुरुनिवास' बांधून झाले.



२३५) गुरुपादुकांची प्रतिष्ठापना ''श्रीं''चे हस्ते?

यात्री निवासचे फिनीशींग आणि प.पू. सौ. ताईमहाराजांच्या घराच्या आणि गुरुनिवासाच्या वरच्या मजल्याचे काम एकाच वेळी चालू होते. मध्यंतरी चि. अजित कवीश्वर प.पू. सौ. ताईंच्या दर्शनास आले होते. प.पू. सौ. ताईंनी मला चि. अजित यांस बांधून पूर्ण झालेले श्री गुरुपादुका मंदिर दाखविण्यास सांगितले. मी त्यांना नेऊन सर्व दाखविले व म्हटले, ''आता फक्त श्री गुरुपादुकांची प्रतिष्ठापना बाकी आहे. ''श्रीं''चे आणि सौ. आईसाहेबांचे लवकरच आगमन होऊन पादुकांची स्थापना होवो!''

अजित म्हणाले, ''मी असं करतो, आधी डॉक्टरांची परवानगी घेऊन प.पू. श्री दादा (महाराज) व सौ. आईसाहेब यांना येथे घेऊन येण्याकरिता हेलीकॉप्टर बुक करतो. सोबत मी स्वत: व दोन डॉक्टर असतील. प.पू. सौ. ताईंना मी हे सर्व सांगतोच. त्यांनी कार्यवाहींना

आज्ञा करून पादुका प्रतिष्ठापनेची ब्रह्मवृंदासह सर्व जय्यत तयारी करावी. आम्ही महाराज, सौ. आईसाहेबांसह गुरुद्वादशीस मुहूर्ताच्या वेळेप्रमाणे हेलीकॉप्टरने येथे हजर होतो. संपूर्ण कार्यक्रम आटोपल्यानंतर त्याच हेलीकॉप्टरने दुपारनंतर आम्ही पुण्यास परतू! हेलीकॉप्टर जमिनीवर उतरविण्यास लॅण्डींग पॅड बांधून घ्यावे लागते ते कशाप्रकारे बांधायचे वगैरे समग्र प्लॅन क्रॉस सेक्शनसह माहीती देणारे सर्व पुण्यास जाताच ते मिळवून तुमच्याकडे पाठवून देतो!''

सर्व ठरले, प.पू. सौ. ताईमहाराजांबरोबर सायंकाळच्या संभाषणात आमचा हाच विषय असायचा. 'श्री गुरुद्वादशीच्या दिवशी दत्त आश्रमात सद्गुरुरायांची प्रदक्षिणा' चालू असताना वेळ होईल विमान उतरायची' आपण उंच गगनात निरखून पाहू. एक बिंदू जवळ जवळ येत असलेला दिसू लागेल. तो जसजसा जवळ येईल नां, तसतसे ते गुरुमहाराजांचे पुष्पक विमान असल्याचे जाणवू लागेल. आणखी जवळ येताच खात्रीच पटेल, होय विमानच ते! आता काही क्षणांतच 'प्रभू श्री रामचंद्र सीतामाईंसह दत्त आश्रमात पुष्पक विमानातून' उतरतील. सारा 'दत्ताश्रम अयोध्या नगरी' होऊन जाईल. माझा राम सीतामाईसह आश्रमात अवतीर्ण होणार!

अशा मनोराज्यात आमचे दिवस जात होते. दिवसेंदिवस गुरुदर्शनाची ओढ वाढत होती. त्या ओढीतून भावपुष्पे प्रकट होऊ लागली आणि शब्दरुप घेऊ लागली.

२३६) दर्शन दे गुरुराय!

गुरुवार, दि. १०.९.१९९८
भाद्रपद कृष्ण पंचमी, शके १९२०

दर्शन दे गुरुराय! दर्शन दे गुरुराय!
प्रभो मज, दर्शन दे गुरुराय।।धृ.।।
मानस माझे व्याकुळ झाले, नयन शोधिती रुप आगळे,
तुझिया वाचुनि शुष्कचि सगळे, जगी न मजला ठाय।।१।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
मायमाऊली तूंच आमुची, तुझ्यावाचूनी कुणी न जगती
काम, क्रोध हे असूर भक्षिती, कळे न करूं मी काय।।२।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
माया ममता मोहित करिती, दुष्ट वासना अन् आसक्ती,
पिच्छा माझा लव न सोडिती, सांग तरणोपाय।।३।।

प्रभो मज दर्शन दे गुरुराय
तू जर मजला आपुले केले, मी शरणांगत पायी लोळे,
उद्धारा गुरु ब्रीद आपुले, कधी न वाया जाय।।४।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
धाय मोकलुनि रुदन करूं मी, भुके लेकरू असाह्य कां मी?
पतितपावना तुला म्हणू मी, तूच एक मज माय।।५।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
तुझ्याच चरणी लीन होऊनी, अन्य न मजला देवही कोणी,
ब्रह्मा, विष्णू, महेश आणि एकरुप तव ठाय।।६।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
चरणद्वयाचे होण्या दर्शन, आसुसलो मी पाडस होऊन,
कामधेनू तू पान्हा सांडून, धणी पुरवूनी जाय।।७।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय
दर्शनमात्रे दुरिते हरिती, पापे सारी विलया जाती,
मर्म जाणूनी चरणावरती, नतमस्तक मी रहाय।।८।।
प्रभो मज दर्शन दे गुरुराय

- चरणरज शशीकांत

२३७) आरती दत्तराजयाची!

आमच्या परम भगिनी सौ. सुलभाताई तांबोळी यांनी आमचा हा धावा तसेच चि. हर्षल उर्फ दिनेश नागले यांना गुरुकृपेतून स्फुरलेली आरती- आरती दत्तराजयाची प.पू. श्रीमहाराजांना ताला सुरांत सुस्वर कंठाने म्हणून दाखविली. ''श्री'' प्रसन्न हसले. ती दिनेश लिखीत आरती खाली देत आहे. ही आरती अवतीर्ण झाली ती प.पू. श्रीमहाराजांचे वर्धापन दिनी, माघ वद्य षष्ठी, शके १९१८, दि. २८.२.१९९७ असावी.

आरती दत्तराजयाची, धुंडीराज सुपुत्राची।।धृ.।।
पुण्यग्रामी तू वससी, भक्ता पावन तू करिसी
भजती त्याते उद्धरिसी
न भजती त्याही कृपाकरिसी
पुरुषोत्तमा तू अवतारा - पुरुषोत्तमा तू अवतारा

शरण येऊन, विनीत होऊन, धूली घेईन
श्रीगुरु आपुल्या चरणांची, किमया पावन करण्याची।।१।।
आरती दत्तराजयाची, धुंडीराज सुपुत्राची
भागवतावरी तव प्रीती, स्वकुळी गणेश-दत्त-भक्ती
ज्ञानी विद्या वाचस्पती, अंकित कुंडलीनी शक्ती
कवीश्वरा तू ईश्वरा - कवीश्वरा तू ईश्वरा
जगती प्रकटून, लीला दावून, तरीही लपवून
ठेविली ओळख स्वरुपाची, गाईन लीला कीर्तीची।।२।।
आरती दत्तराजयाची, धुंडीराज सुपुत्राची
शुभ्रवस्त्र शुचिचे ल्याले, वात्सल्या मूर्तरुप आले
ज्ञाना विनये शोभविले, ब्रह्म साकारुनी आले
भक्तवत्सला दयाघना - भक्तवत्सला दयाघना
दृष्टीने करुण, मजला बघून, जवळी घेऊन
वर्षा करि बा ममतेची, मागीन भिक्षा भक्तिची।।३।।
आरती दत्तराजयाची, धुंडीराज सुपुत्राची

२३८) प्रारब्ध बाळा, कोणासही चुकले नाही!

सन १९९८ च्या अखेरचे काळात प.पू. श्रीमहाराज खूपच अबोल झाले होते. एरवी दर्शनास गेल्यानंतर आपुलकीने आस्थापूर्वक चौकशी करणारे प.पू. श्रीमहाराज ''काय कधी आलात?'' हेही विचारित नसत. लागलीच बेलवर हात जायचा. ''अहो यांना चहा, दूध काही द्या!'' बस्स संपले दर्शन. पुढे काही नाही. आत्मानुसंधानात जायचे. आपण बाहेर यावे. प्रसाद म्हणून चहा दूध प्यावे, आईसाहेबांचे दर्शन घ्यावे. सौ. आईसाहेबांचे दर्शनही असेच झाले होते. आलेले पाहताच आनंदाने प्रफुल्लीत होणाऱ्या आईसाहेब अगदी दीन दृष्टीने पहायच्या. काही बोलण्याचे त्राण नसायचे. खुणेने फार तर ''ठीक आहे ना?'' असा संकेत द्यायच्या. हे सर्व पाहून श्री रेणुका निवासामधून बाहेर पडताना मन व्यथित व्हायचे.

पुढे डिसेंबरात सौ. आईसाहेबांचा आजार बळावला. त्या काही बोलायच्या नाहीत परंतु चेहऱ्यावर त्यांना होत असलेल्या यातना जाणवायच्या.

एके दिवशी हे न साहून चि. अजित, प.पू. श्रीमहाराजांकडे, पूज्य दादांकडे आले व

म्हणाले, ''दादा आईच्या या यातना आम्हांस आता पहावत नाहीत!'' प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''होय! त्यांनी आमचं घेतलं आहे!'' (म्हणजे ''श्रीं''चे सर्व भोग स्वत:कडे आईसाहेबांनी ओढवून घेतले आहेत.)

अजित म्हणाले, ''दादा ते काही असो, आपले भोग घेतले असतील, स्वत:चे भोगत असतील, ते काही असो, पण आम्हाला आता त्यांच्या या यातना पाहवत नाहीत. आपण त्यांना यातून सोडवा, मुक्त करा!''

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''अहो ते ईश्वराधीन आहे, ईश्वराचे इच्छेवर आहे!''

अजित म्हणाले, ''नाही दादा, हे तुमच्या हातीही आहे. तुम्हीही त्यांना यातनांतून सोडवू शकता!''

प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''तुम्हांला वाटते नां, हे आमचे हाती आहे, मग आम्ही म्हणू या सर्व यातना त्यांना ह्या जन्मीच भोगून संपवू द्यात!''

''श्रीं''ची वाक्ये ऐकून अजित यांच्या नेत्रास अश्रूंच्या धारा लागल्या. ''श्रीं'' शांतपणे म्हणाले, ''बाळा प्रारब्ध कोणासही चुकले नाही, ते भोगूनच संपवावे लागते!''

अखेर पौष वद्य अष्टमी १९९९ च्या जानेवारीमध्ये सौ. आईसाहेब आपणा सर्वांना सोडून गेल्या. अंत्ययात्रेस प.पू. श्रीमहाराज फाटकापर्यंत पोहोचविण्यास आले. नंतर हम रस्त्यास लागेपर्यंत फाटकांतूनच कपाळावर हात घेऊन ''श्रीं'' यात्रेचे अवलोकन भरल्या डोळ्यांनी करीत होते.

उत्तरकार्य चालू असताना पिंडाला कावळा शिवण्याचे दिवशी काही केल्या कावळा शिवेना. प.पू. सौ. ताई, सौ. शैलाताई, प.पू. श्रीमहाराजांकडे आल्या व म्हणाल्या, ''दादा अर्धा तास झाला, पिंडास कावळा शिवत नाही, काय करावे?'' प.पू. श्रीमहाराज म्हणाले, ''त्यांना प्रार्थनापूर्वक सांगा की आपल्या देवांचे वार्षिक सर्व कुलधर्म कुलाचार प्रतिवर्षी यथाविधी पार पाडूं! हेही विचारा की आम्ही यायला पाहिजे होते कां?''

प.पू. श्रीमहाराजांच्या या प्रश्नाचा दुहेरी अर्थ निघतो.

१. उत्तरकार्य पिंडदान वगैरे विधीस आम्ही यायला पाहिजे कां?

२. आम्हीही इहलोकीची यात्रा संपवून आपल्या बरोबर यायला पाहिजे होते कां?

उभयतांचे प्रश्न आणि उत्तरे ही त्या उभयतांस खऱ्या अर्थाने ठाऊक! एक मात्र खरे की सौ. आईसाहेबांचे पश्चात् प.पू. श्रीमहाराज असून नसल्यासारखेच पुढील पन्नास दिवसच राहिले.

प.पू. सौ. ताईमहाराजांनी माझ्या कानी घातलेली एक गोष्ट मात्र माझ्या गुरुबंधूस सांगितल्याविना रहावत नाही. ती अशी -

''पौष वद्य अष्टमीस प.पू. सौ. आईसाहेब निजधामास गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी आईसाहेबांचा वियोग असह्य होऊन मी प.पू. श्रीमहाराजांच्या चरणी मस्तक ठेवून हृदय मोकळे केले. खूप रडले मी! प.पू. श्रीमहाराज आधी मला म्हणाले, आवरतं घ्या! नंतर घरांतल्यांना म्हणाले, अहो यांना दूध वगैरे काही द्या! दुसऱ्या दिवशी चरणस्पर्श करण्यास प.पू. श्रीमहाराजांनी आम्हांस प्रतिबंध केला व आम्हांस म्हणाले, यापुढे आपण आमचे चरणांस स्पर्श करू नये. आमचा हा फक्त आता भौतिक देह राहिला आहे. सौभाग्यवतींच्या प्राणाबरोबर आमचेही आत्मतत्व श्री चरणी विलीन झाले आहे. ही शरीर धारणा लौकिक दृष्ट्या आहे. तरी या अशौच शरीरास-कायेस आपण स्पर्श करून नमस्कार करू नये. आम्ही केव्हाच त्यांच्याबरोबर निघून गेलो आहोत!''

हे ऐकून प.पू. सौ. ताईंना आश्चर्यही वाटले आणि तेवढेच व्यक्तांत महाराज राहिलेले नाही. 'व्यक्त सगुण दर्शनास' आपण पारखे झालो याचे अतिशय दुःख झाले.

मध्यंतरी श्री रेणुका निवासात प.पू. श्रीमहाराजांच्या दर्शनास गेलो होतो. फेब्रुवारीचा अखेरचा सप्ताह असेल. प.पू. श्रीमहाराज आपल्या खोलीत झोपून होते. दारांतून डोकावून दर्शन घेतले पण ते दर्शन मनास व्याकुळ करणारेच होते. प.पू. श्रीमहाराजांना काही दूध किंवा फळांचा रस देण्याकरिता बसविण्यात आले होते. आलेल्या माणसांकडे पाहणे त्यांनी सोडले होते. आपले डोळे, कान, तोंड एक एक इंद्रिय प्रतिदिनी महाराज बंद करीत होते. बोलत तर नव्हतेच पण काही पिण्यासाठी औषध घेण्यासही तोंड उघडत नव्हते. काही तरी पोटात तर गेले पाहिजे. औषधे तरी गेली पाहिजेत. परंतु त्यांना तोंड उघडण्याची, कंठाखाली घोट उतरविण्याचीही इच्छा नव्हती. सेवेकरी काहीशी जबरदस्ती करून पाजू लागताच कंठातून मोठ्ठा आवाज काढून ते हंबरडा फोडू लागले. दोनच अक्षरे उमटत, नऽऽकोऽऽ!

मला ते पहावेना. ते 'रेणुका निवास दणाणून टाकणारे करुण टाहो ऐकवेनात. मी बाहेर अगदी अंगणांत आलो. माझे हृदय भरून आले. मन सारखे हांक मारु लागले, महाराज! महाराज! महाराज! मी काय करू महाराज? म्हणजे तुम्हास बरे वाटेल!

सर्वांचा निरोप घेऊन अत्यंत जड पावलांनी मी शिवाजी नगर एस्.टी. स्टॅण्डवर जाऊन जालना गाडी पकडली. जालन्यास दिवस रात्र तेच ते ''श्रीं''चे आपले तोंडात काही घालताच होणारे कटू ओरडणे कानात घुमत होते.

२३९) ''श्रीं''चे महानिर्वाण

१ मार्च १९९९ ची सकाळ. मी स्नान संध्या आटोपून सकाळी ९ च्या सुमारास साईटवर (कामावर) निघालो होतो. इतक्यात ऑफिसमध्ये फोन खणाणला. मी धावत जाऊन फोन उचलला. ''मी भाऊ बोलतोय नागले काका, आपले महाराज शांत झाले.'' माझ्या गळ्यातून हुंदका निघाला. ''नाही भाऊ नाही, असं होणार नाही! महाराज! महाराज!''

आश्रमांत कोणीच नव्हते. मला दु:खावेग आवरेनां. कसेबसे मी साधनाकक्ष खोली गाठली. दार लावून घेतले आणि जगाची पर्वा न करता माझ्या हृदयाला पूर्ण मोकळीक दिली.

महाराज! आईसाहेबांसह तुम्ही येणार होतात, पादुका स्थापन करणार होतात. आयुष्यात नाही, पण आज मला तुम्ही आज फसविलेत. पादुका मंदिराचा स्लॅब झाल्याचे आपणास सांगितले तेव्हा आईसाहेबांना आपण आपल्याला जालन्यास जायला पाहिजे म्हणाला होतात. पण तुम्ही आला नाहीत. गेल्या 'गुरुद्वादशीलाही' नाही, महाराज आता कशासाठी जगायचे? आत्मारामच निघून गेला, आता कसे मनास आवरावे? कसे रहावे? काय करावे? काही कळत नाही महाराज, कोणापाशी जाऊन मन शांत करावे. आपलेच चरण फक्त या जगात सुखशांती, समाधान देणारे होते. आता आम्ही निराधार झालो, पोरके झालो.

तुजविण आम्हां असे कोण देवा, धाव सद्‌गुरुराया मायबापा।
दु:खाचे सागरी पडीलोसे आम्ही, कोण करी शांती तुजविण?।।
तुजविण आम्हा नसे आज कोणी, घेऊनीया हृदयी ठाव देई।।

काही वेळातच स्पेशल गाडीने प.पू. सौ. ताईंचे वरिष्ठ चिरंजीव दिलीप व सौ. संध्या वहिनी वगैरे मंडळी सोबत मीही निघालो. औरंगाबादला हॉस्टेलमधून चि. आमोदला घेतले व सायंकाळी आम्ही श्री रेणुका निवासात पोहोचलो.

''श्रीं''चे अंतीम दर्शन, दुसऱ्या दिवशी अंत्ययात्रा आणि पुढील उत्तरकार्यास आमच्या कवीश्वर मंडळींसह श्री नृसिंहवाडीस गेलो. अस्थी विसर्जनाचे वेळी बाळ अजितची अवस्था पहावेना. येथून परतणेच नको अशी अवस्था त्यांची झाली. शेवटी राहते जनराहटी. ती सोडून जाताच येत नाही. सद्‌गुरुंच्याच आज्ञेने विवेकाने दु:ख आवरावे लागते. मनास दिलासा घ्यावाच लागतो. महाराज गेले? नाही गेले. कायमचे मम हृदयी स्थानापन्न झाले. डोळे मिटावे, ते ध्यान लावावे, ते मंगल मनोहर रुप पहावे. जेथे जातो तेथे तू माझा सांगाती!

मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी।
तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही।।

२४०) स्वप्नी दृष्टांत - दि. २५.११.१९९९ ची रात्र! स्वप्नलहरी

मी व माझ्याबरोबर कोणी तरी गुरुबंधू, बहुदा श्री. देवळे असावेत. आम्ही महाराजांचे दर्शनास आलो आहोत. प.पू. श्रीमहाराज व श्री. रघुनाथराव दोन झाडांच्या बुंध्याचे मध्यभागी जंगलाच्या पठारी सपाट भागावर स्थानापन्न आहेत. आजूबाजूस हिरवीगार वनश्री आहे. प.पू. श्रीमहाराज प्राणायामातील अंतर कुंभक व बहिर्कुंभकाचे प्रात्यक्षिक करून दाखवित आहेत. दि. २५.११.१९९९ च्या रात्री झोपताना माझ्या छातीत दुखत होते. श्वसनास त्रास होत होता. हृदयाची स्पंदने वाढून कांहीशी अस्वस्थता होती. मी गुरुबंधुंस म्हटले, ''हे सर्व प्रयास महाराजांचे चालले आहेत ते केवळ मला मार्गदर्शन करण्याकरिता आहेत.'' प.पू. श्रीमहाराज ताठ बसून माझ्याकडे पहात म्हणाले, ''कोण नागले कां? या या, आमच्या समोर बसा. काय झालं? मध्यंतरी आजाराच्या काळात आम्हांसही तुमच्याकडे पाहता आले नाही, बोलताही आले नाही. तुम्हीही जास्त आला नाहीत. आता आम्हाला सर्व सांगा बघू. त्या तुमच्या गोरेगांवच्या ब्लॉकचे काय झाले? विकला गेला कां तो? कितीपर्यंत रक्कम हाती आली?''

मी म्हटले, ''होय महाराज विकला गेला. एकूण साडेतेवीस लाख ब्लॉकचे आले.''

प.पू. श्रीमहाराज, ''मग ह्या पैशांत नवीन घर बांधून पैसे काही शिल्लक राहतात की नाही? काम व्यवस्थित चालले आहे ना?''

(स्वगत : ह्या प.पू. श्रीमहाराजांचे प्रश्नाने मी मनी गोंधळलो होतो. याचे कारण असे की १९९३ साली श्री अमरेश्वराचे कामापासून ते जालन्याचे कामापर्यंत माझा १९९९ पर्यंत मुंबई मार्केटशी, लेबर रेटशी माझा संपर्क तुटला होता. श्री अमरेश्वराच्या तसेच वाडीत महाराजांचे घर व अन्य पुजाऱ्यांची घराची दोन कामे, जालन्याची कामे या सर्व कामांचा बांधकामाचा दर बिल्टअप् एरीयाला जास्तीत जास्त ४५० दर चौ. फूटास पडत होता. मुंबई फार तर ५०० पर्यंत जाईल. असे वाटले होते आणि त्याप्रमाणे साडेतेवीस लाखापैकी आम्हा उभयतांचे वार्धक्यास चार साडेचार लाख शिल्लक राहतील असे आम्ही म्हटले होते आणि पैसे शिल्लक राहतील म्हणूनच ब्लॉक विकून मोठे घर चारकोप-कांदीवली येथे बांधण्यास प.पू. श्रीमहाराजांनी परवानगी दिली होती. म्युनिसीपल अधिकाऱ्यांच्या दक्षिणेचा हिशेब आम्हांस माहीतच नव्हता. आमचे बजेट बारगळले होते. खर्च प्रमाणापेक्षा जास्त झाला. आता ''श्रीं''ना हे कथन करावे तर त्यांचे मनास दु:ख पोहोचेल म्हणून)

आम्ही म्हणालो, ''होय महाराज! पैसे शिल्लक रहावेत. पण महाराज खर्च फार होतो आहे. पाया खोदाईत पाणीही फारच लागले आहे. ही खाडीची जमीन आहे ना! शिवाय नकाशे मंजुरी करिता म्युनिसिपालटीवाले फार पैसे खातात! म्हाडातले सरकारी अधिकारीही

फार पैसे खातात. न द्यावेत तर आपले कामच होणार नाही.''

प.पू. श्रीमहाराज, ''असो पण तेवढ्या पैशांत काम तरी पूर्ण होणार आहे ना?'' मी होय म्हटले. वरील व्यवहाराचे संभाषण कोणासही कळू नये म्हणून प.पू.महाराज अगदी हळू आवाजात आमच्या कानाशी बोलत होते.

प.पू. श्रीमहाराज सगुण रुपात असतानाही स्वप्नी दृष्टांत देत असत. मागे येऊन गेलेल्या एका प्रसंगात त्यांनी स्वप्नी मंत्र जपण्यास दिला हे प्रत्यक्षात कबुलही केले होते. पुढील लेखांत मजवर आलेली संकटे आणि महाराजांनी मार्गदर्शन देऊन कशी निवारण केली. प.पू. श्रीमहाराज सतत माझ्या मागे कसे उभे राहिले हे सांगण्यास माझ्या कुटुंबातील समस्या मी प.पू. श्रीमहाराजांपुढे मांडल्या. त्यावर त्यांनी केलेले मार्गदर्शन हे जरी व्यक्तीशः स्वतःचे असले तरी आपण सर्व गुरुबंधू आपण आपले मायबाप 'श्री गुरुदेव दत्तमहाराजांची' या एका कुटुंबातीलच लेकरे-भावंडे म्हणून उघडपणे पुढे लिहीत आहे.

२४१) आत्मनिवेदन

सिव्हील इंजिनिअरची पदवी संपादन करण्याचे ध्येय सोडून १९५७ च्या फेब्रुवारी महिन्यात मला नोकरी लागून धनार्जनास प्रारंभ करावा लागला, कारण माझ्या वडीलांची सांपत्तिक स्थिती फारच खालावलेली होती. वडीलांना आर्थिक सहाय्य देण्यास मला नोकरी पत्करावी लागली. पाच बंधू व पाच भगिनी यामध्ये बंधूंमध्ये मी कनिष्ठ तर माझ्या मागे दोन भगिनी असे आमचे कुटुंब. माझ्या तिन्ही भावांची लग्ने होऊन ते आपापल्या संसारास लागले होते. दोन बहिणी लग्नाच्या होत्या. धाकटी शिकत होती. वडील कर्जाने ग्रासले होते. त्यांची पेन्शन फक्त रु. ६५/- आणि माझी नोकरीची सुरुवात रु. ११५/- पगाराची. घरचा पसारा मोठा. हरेश्वराची प्रॉपर्टी भाऊबंदकीतून वडीलांनी सोडविली होती. परंतु बरेच वर्षे दुर्लक्षित राहिल्याने जमीन नापिक, ओसाड झालेली होती. वडीलांनी व आजारी बंधू (सुरुवातीस मेहनत करणारा) हे सर्व नवी लागवड खत पाणी पहायचे. खर्च चालायचे माझा पगार आणि वडीलांची पेन्शन यावर. माझ्यावर आई-वडीलांच्या या प्रपंचाची फार मोठी जबाबदारी पडली. ती सांभाळण्याची जिद्दही सद्गुरुंनी दिली.

ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच १८ डिसेंबर १९५७ रोजी प.पू. श्री सद्गुरु रमादेवी यांची दीक्षा प्राप्त झाली. माऊलीच्या कृपेने अंतर्मुखता आली. जगांतील अनेक तारुण्यसुलभ प्रलोभनांस टाळून जीवनाची वाटचाल मी नेकीने, धर्मबुद्धीने आणि निरपेक्ष-निःस्वार्थ कर्तव्यबुद्धीने करीत राहिलो ही केवळ सद्गुरु कृपा आणि गुरुभक्ती यामुळेच!

सहाजिकच धनार्जनाचा विनियोग माता पित्यांच्या आणि धाकट्या भावंडांच्या कौटुंबिक कर्तव्य कर्मांत होऊ लागला. धाकट्या भगिनींची विवाहकार्ये, असाध्य व्याधीने आजारी असलेल्या बंधुंची शुश्रुषा, आई वडीलांची सेवा, त्यांच्या आर्थिक अडचणी व कर्जाचे निवारण आणि जमीन बागायत शेतीची सर्व खर्चाची बाजू सांभाळून आई वडीलांस पूर्ण सुख शांती समाधान देण्याची बुद्धी आणि आवश्यक ते आर्थिक बळ माझ्या सद्गुरुंनीच मला दिले. या भाग्यवंताला जन्मही प्रभुंनी एका सुसंस्कृत, आध्यात्मिक, धार्मिक विचारांच्या कुळात दिला. बाल्य व कुमारावस्था सुखसमृद्धीत गेली. कारण वडील एका संस्थानिकांकडे (जंजीरा येथील नबाब यांच्याकडे थोरल्या नबाबांपासून) नोकरीस मोठ्या हुद्यावर होते. विलीनीकरणानंतर कुटुंबास दैन्यावस्था आली. वडीलांना कर्जबाजारी होऊन अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले व त्यांच्या सहकार्यास गुरुमहाराजांनी मला सतत कुटुंबाशी संलग्न ठेवून जबाबदाऱ्या निभावून नेण्याचे, कुटुंबाचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य दिले. निरपेक्ष-धैर्यशाली बुद्धी श्री सद्गुरुंनी दिली. सतत या जीवास कार्यरत ठेविले. तिन्ही बंधुंच्या नोकऱ्या, त्यांचा प्रपंच हे त्यांचेच खर्च पुरे होण्याइतके होते, परमेश्वरांनी त्यांनाही आर्थिक बळ दिले असते तर त्यांच्याकडूनही काही कार्ये पार पडली असती. यथाशक्ती त्यांच्याकडूनही अधुन-मधून कुटुंबास मदत होत होती.

१९५७-१९६२ पर्यंत सरकारी नोकरी करून अधिक वेतनाकरिता मी खाजगी कंपनी मधून नोकरी स्वीकारण्याचे धाडस केले आणि ५-६ वर्षे निरनिराळ्या कंपन्यांतून अनुभव घेत १९६७ पासून स्वतंत्र धंदा बिल्डींग, रोडस्, ड्रेनेज अशा सिव्हील कामाचे कॉन्ट्रॅक्टर म्हणून कामे घेण्यास प्रारंभ केला. १९६३ ला विवाहीत होऊन पत्नीही सहधर्मचारिणी, कर्तव्यकर्मास अनुकूल अशी गुरुकृपया प्राप्त झाली. चार हात सेवेस लागले. सन १९७८ ऑक्टोबर मध्ये प.पू. श्री सद्गुरु रमादेवी समाधीस्त झाल्या आणि पुढील वर्षी प.पू. श्री दत्तमहाराजांचे दर्शन घडून मार्च १९८० मध्ये दीक्षा प्राप्तीही झाली.

१९५७ फेब्रुवारी पासून विवाह होईपर्यंत आणि तद्नंतर आई, वडील, आजारी बंधू हयात असेपर्यंत १९९२ पर्यंत तरी माझ्या कष्टार्जित मिळकतीचा बहुतांश वाट्याचा विनियोग आई वडीलांच्या सेवेत, त्यांचा प्रपंच सांभाळण्यात आणि गांवच्या शेतीवाडी बागायतीच्या उत्पन्नांत वाढ करवून घेण्यात, एकत्र कुटुंबावरील एकूण सर्व कर्जे फेडण्यात, तसेच जुने कच्चे मोडकळीस आलेले घर मोडून त्याजागी नवीन पक्की वास्तू उभारण्यात, श्री सद्गुरुंनी करून घेतला. हे सर्व घडले श्री गुरुकृपेतून लाभलेल्या धनाने, प्राप्त धर्मबुद्धीने, निरपेक्ष, नि:स्वार्थ मनाने! १९८० पासून मी ऐहिक पारमार्थिक सर्व निर्णय सद्गुरुंच्या मार्गदर्शनाने आणि सल्ल्याने घेतले. मुलांची शिक्षणे, ती कोणत्या साईडने घ्यावीत, इतकेच

काय पण मुलांना आलेली स्थळे, त्यांचे फोटो, पत्रिका ''श्रीं''ना दाखवून, आम्हांस पसंती असली तरी अंतिम निर्णय श्री गुरुमहाराजांना घेऊन ठरविला. ''श्रीं''नी मुहुर्त काढावा, सौ. आईसाहेबांनी नांव काय ठेवायचे ते ठरवावे. याहीनंतर नातवंडांची नांवे प.पू. श्रीमहाराज, सौ. आईसाहेब आणि तद्नंतर प.पू. सौ. ताईमहाराजांना विचारूनच ठेवली.

सद्गुरुंनी मला काही द्यायचे बाकी ठेवले नाही. धर्माने वागण्याची धर्मबुद्धी, 'धर्मेप्रितीम्, सन्मति' दिली. कधीही दुर्विचार, दुष्टबुद्धी मनास शिवली नाही. अहंकाराचा वारा न लागो माझ्या राजसा (माझ्या भक्ता) म्हणून ''श्रीं''नी सांभाळले. देवभक्ती ही तर बाल्यावस्थेपासूनच आजी, आजोबा, आई-वडील आणि माझी थोर प्रेमळ भावंडे यांचे वर्तनातून मिळाली. सत्संगही, या दोन पिढ्यांना, श्री गुरुमहाराजांपासून मिळत राहिला. १९५७ मध्ये मलाही सद्गुरु रमादेवींचा अनुग्रह कृपा प्राप्त झाली. त्यांचे निर्वाणानंतर लागलीच प.पू. श्री दत्तमहाराज, प.पू. सौ. ताईमहाराज यांची 'सत्संगती' झाली. ''श्रीं''नी भुक्ती मध्ये काही कमी केले नाही. जे जे वांच्छीले ते ते दिले. 'श्री वामन निवास, श्री रेणुका निवास, श्री गुरुमहाराजांची जन्मस्थल वास्तू, नृसिंह वाडीत, श्री अमरेश्वर मंदिर, श्री वासुदेव पीठ' व इतर वास्तू जीर्णोद्धार अशी पुण्यात्मक कामे ''श्रीं''नी माझ्याकडून करवून घेतली. ही पुण्यकर्मे करता करता वाडीच्या दोन पुजारी भक्तांची दोन दोन मजली इमारतींचे कॉन्ट्रॅक्टही देवविले. तिन्ही मुलांची पदव्यापर्यंत शिक्षणे ''श्रीं''चे मार्गदर्शनाखाली, ''श्रीं''नी पूर्ण करवून घेतली. त्यांचे धनार्जनही ''श्रीं''नीच उत्तम प्रकारे चालू करून दिले. धनार्जनास प्रारंभ होताच, तिन्ही मुलांची आम्हांस धंदा व्यवसायांतूनच नव्हे तर संसारातूनही निवृत्ती दिली, असे म्हणायला हरकत नाही. मुलांनी म्हटले, ''आपल्याला धनार्जनाची आता आवश्यकता नाही. कुठेही बाहेरगांवी धनार्जनाकरिता जाऊ नका. प.पू. श्रीमहाराजांची सेवा व त्यांचे आज्ञेने जी काही बांधकामे किंवा सेवा करायची असेल ती करा.'' आम्ही आमचा धंदा व्यवसाय सर्व बँक खाती, इनकम-टॅक्स, सेल्स-टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स सर्व काही त्याच दिवशी बंद केले. प.पू. सौ. ताईमहाराजांचे बोलावणे आले. गुरुमहाराजांची आज्ञा झाली आणि १९९६ च्या गुरुपौर्णिमेस जालना येथील श्री दत्त आश्रमात प.पू. श्रीमहाराजांच्याच पादुका मंदिराचे काम सुरू झाले. ह्याच कामाला लागून माझ्या समस्त गुरुबंधू भगिनींकरिता, भाविक भक्तांकरिता त्यांना उतरण्यास निवासासाठी सर्व सोईने युक्त असा 'सुंदरदत्त निवास' ''श्रीं''नी बांधून घेतला. शेवटी प.पू. भगवती ताईमहाराजांचे घरही नूतनीकरण आणि वरच्या मजल्याचे बांधकाम, ही म्हणजे परम भाग्याची परमावधीच झाली.

ही सर्व म्हणजे तिन्ही कामे आणि 'दत्ताश्रम' रस्त्याकडील कंपाऊंड भिंत गुरुकृपया उत्तमप्रकारे पार पडली.

वरील सर्व लिखाणात मी, माझी कौटुंबिक आणि सामाईक जबाबदाऱ्या धर्मबुद्धीने उचलल्याची कहाणी व पार्श्वभूमी कथन केली.

पुढे १९५७-१९८१ या काळात केलेली लागवड बागायत आता उत्पन्न फळ देऊ लागली. जोपर्यंत जबाबदारीची कामे आणि खर्चाची बाजू होती तोपर्यंत माझ्या कार्यात कोणाचाही अडथळा नव्हता. कोणी मला चुकून सुद्धा होणाऱ्या नित्य खर्चाबद्दल विचारले नाही. नाही माझ्या आई-वडीलांच्या, आजारी भावाच्या किवा शेतीवाडी बागायतीचे खर्चाबद्दल कोणी विचारले. नेमलेल्या माळ्याचे पगार, शिवाय गडी मजुरांचे पगार कसे दिले, खत पाण्यास काय खर्च आले किंवा हॉस्पिटलायझींगची काय बिले झाली हे देखील विचारले नाही. १९८२ ला पहिले उत्पन्न ८ हजारांचे, नंतर पुढे वाढ होत ३० हजारापर्यंत वार्षिक उत्पन्न येऊ लागले. ह्या सर्व येणाऱ्या रकमा मी बागायती व इतर झालेल्या खर्चात वळत्या करून घेऊ लागलो. जमेच्या रकमेत नोंदी घेत गेलो. माझ्या हस्ते होऊन गेलेल्या खर्चाच्या रकमा एवढ्या मोठ्या झाल्या होत्या की येणारे वार्षिक उत्पन्न महिन्याच्या व्याजाइतके सुद्धा भरत नव्हते. माझ्या खर्चाची आता परतफेड होऊ पहात होती. मलाही मुलांची कॉलेज शिक्षणे, धंद्यातील मंदी यामुळे, मी खर्चिलेल्या बागायतीच्या खर्चाची रक्कम, मला परत मिळेल तर हवी होती. १९९१ पासून आमच्या बंधुवर्गात आवाज उठू लागले. ''हा येतो, त्या बागायतीच्या उत्पन्नाचे पैसे कोणास न दाखविता स्वत:च घेतो, स्वत: करताच वापरतो. प्रॉपर्टी आणि त्यातून निघणारे उत्पन्न सामाईक आहे.''

खर्चांतून जावक होती ती फक्त एकट्याचीच होती, पण येणारी आवक मात्र सामाईक आहे. आपल्याच सख्या बंधुंकडून आपल्यावर एवढा अन्याय! हे बंधुवर्गाचे बोल ऐकून मला मनस्वी उद्विग्नता आली व वडीलोपार्जित प्रॉपर्टी बाबत नैराश्य येऊ लागले. खरंच आहे ते! तेच मनास सद्गुरुंना पटवायचे होते. भक्ता! बाळा जगात कोणी कोणाचे नाही, फक्त पैसाच महत्त्वाचा. जगात तुझा असा आहे फक्त श्री सद्गुरु! माझे मन म्हणून लागले जे काही केलेस ते नि:स्वार्थ, निरपेक्ष मनाने, धर्मबुद्धीने, मग त्यातून परतफेड कसली घेतोस? प्रॉपर्टी घेऊन कुठे आला होतास आणि जाताना कोठे नेणार आहेस? राहिला प्रश्न अपत्यांचा, नातवंडांचा. ती ज्या नियंत्यानी जन्मास घातली तो त्यांची काळजी वाहण्यास समर्थ आहे. कर्तृत्वाचा अहंकार कुठे तरी मानसात शिल्लक राहिला, म्हणूनच ही उद्विग्नता, दु:ख वाट्यास येत आहे. सर्वांवर पाणी सोड म्हणजे तू पूर्ण मोकळा सुखी समाधानी होशील!

हा अंतर्मनांचा आवाज (इनरव्हॉईस) मला स्वस्थ बसू देईना! मी माझ्या मुलाबाळांसह, पत्नीसह, प.पू. श्रीमहाराजांचे सान्निध्यात श्री रेणुका निवासामध्ये पुण्यास गेलो. ती तारीख होती २३.६.१९९१.

मागे येऊन गेलेले संपूर्ण आत्मनिवेदन ''श्रीं''चे पुढे मनमोकळे कथन केले व म्हटले, ''महाराज ह्या सर्व वडीलोपार्जित प्रॉपर्टीवर आणि आम्ही त्याकरिता सामाईक कुटुंबात केलेल्या सर्व खर्चावर आज आम्हाला, भावंडांना लेखी हक्क सोडचिठ्ठी लिहून देऊन पाणी सोडायचे आहे. आपण आम्हांस आपली परवानगी आणि आशीर्वाद द्या! जीवनातील प्रत्येक निर्णय आम्ही आपणास विचारून आपलेच मार्गदर्शन घेऊन घेतले आहेत. आपणच माझे मायबाप, बंधू, सखे-सोबती आपणच आहात. आपल्याविना या जगात मला कोण आहे महाराज? आपण, आपला आशीर्वाद, एवढेच आम्हांस संसार सागर तरुण जाण्या पुरेसे आहे!''

ना भुक्तीची ना मुक्तीची असे मला आस।
जन्मोजन्मी तूंच सद्गुरु आणिक मी दास।।

''श्रीं''चा हितोपदेश

''अहो असं कसं करता येईल तुम्हांला? १९५७ पासून आजपर्यंत तुमच्याकडून सामाईक कुटुंबात जे काही पैसे खर्च झाले ते तुमचा जेवढा भाग स्वकर्तव्याचा असेल तो सोडून बाकी पैसे तुम्हांला इतर भागीदारांकडून (बंधुंकडून) मिळाले पाहिजेत. ती रक्कम सुद्धा पूर्वी खर्चिलेली व आज खर्चिलेली याचे मूल्यमापन एखादा वकील करून त्यांच्याकडून कायदेशीररित्या केले पाहिजे. ते खर्चिलेले पैसे तुमचे एकट्याचे होत नाहीत. त्यावर तुमच्या पत्नीचा तुमच्या तीन मुलांचा हक्क आहे. त्यांचा हक्क डावलून तुम्ही काही लेखी लिहून देऊ नका. आता राहिला प्रश्न वडीलोपार्जित प्रॉपर्टीचा. तुमच्या वाट्यास येणारा भाग तुम्ही घेतला पाहिजे. तसे न केल्यास तुमच्या आई वडीलांच्या आत्म्यांस त्रास होईल. दु:ख होईल. तो वाटा घेण्याचा तुमचा विचारच नसेल तर यदृच्छा-ईश्वरी इच्छेने जो भाग मिळेल तो केवळ आई वडीलांचा प्रसाद म्हणून स्वीकारा! तुमच्यावर भाग वाटपात अन्याय झाला, काही नाहीच मिळाले तरी ईश्वराने तुम्हास एवढी गुणवान मुले दिली आहेत! अहो ही तीन सद्वर्तनी मुले ह्या तुमच्या तीन बँकाच आहेत. चांगले संस्कार घडून सुद्धा सद्वर्तनी कर्तव्यदक्ष मुलं निपजणे ही सुद्धा ईश्वरी देणगी आहे. काही चिंता नसावी, ईश्वरी कृपेने सर्व काही ठीक होईल. मात्र काही हक्क सोडण्याचा लेखी विचार आहे तो मनातून काढून टाका. जिथे धर्मबुद्धी आहे तेथे ईश्वराचा वास आहे. कल्याणमस्तु!''

जे जे घडेल ते ईश्वरी लीला आणि प.पू. श्रीमहाराजांची इच्छा म्हणून स्वीकारून,

ठेविले अनंते तैसेची रहावे।
चित्ती असूं द्यावे समाधान।।

२४२) ''श्रीं''चे अस्तित्व - १

प.पू. श्रीमहाराज सगुणात असताना कधीही कोणती समस्या निर्माण झाली की आम्ही प.पू. श्रीमहाराजांकडे धाव घेत असू. कधी पुण्यास श्री रेणुका निवासात जाऊन दर्शन घेऊन आपली अडचण कथन करावी तर कधी देव्हाऱ्यात ''श्रीं''चे प्रतिमेपुढे संकटाचा तीव्रतेप्रमाणे अगदी दीन, अगतिक होऊन काकुळतीने धावा करावा, प्रतिमेचे पुढेच आपले पुढील संकट वा समस्या प.पू. श्रीमहाराजच समोर बसले आहेत असे समजून कथन करावे. प्रतिमेपुढे केलेले निवेदनही ''श्रीं''ना कळायचे, त्यांच्यापर्यंत पोहोचायचे, हे त्यांच्या भेटीत ते ख्याली खुशाली विचारायचे तेव्हा संदर्भाला धरून बोलायचे, अशी काही उदाहरणे आम्ही यापूर्वी लिहीली आहेत. संकटग्रस्त होताच रात्री झोपताना तन्मयतेने केलेल्या प्रार्थनेचे उत्तर पहाटेच्या स्वप्नी दृष्टांतात मिळायचे. त्यांवर उपाय म्हणून महाराज मंत्रही अगदी कागदावर लिहून द्यायचे. मला तरी असे आठवत नाही की मी अगदी पूर्ण अंत:करणाने ''श्रीं''ना प्रार्थना करून काही अडचण सांगितली आणि महाराजांनी स्वप्नी किंवा भेटीत त्यावर उपाय सांगितला नाही. मुलांच्या कॉलेज डिग्री-डिप्लोमांच्या ॲडमिशन पत्नीने पदर पसरून आम्हांस ''श्रीं''ना निवेदन करायला भाग पाडावे, प्रतिमेपुढे, भेटीत ''श्रीं''नी आमच्या सौ.ना मिश्कील आविर्भावात विचारावे, ''मग काय दोन्ही मुलांना कॉलेज, डिप्लोमाला प्रवेश मिळाले ना?''

धंद्यात आकस्मित नुकसान होऊन सर्वस्व संपते की काय या भीतीने प्रश्न उभे रहायचे. आता बायको मुलांचे कसे होणार? अंथरुणावर निद्रीस्त लेकरांचे चेहरे पाहून मन निराश व्हायचे, हाक मारावी, ''महाराज! आता काय करू?'' महाराज पहाटे रघुनाथरावासंगे चालतच एक जिना चढून यायचे. खोलीत बसायचे. पिशवीतून कागद काढून मंत्र लिहून द्यायचे. म्हणायचे, ''ह्या मंत्राचे अनुष्ठान सुरू करा.'' आम्ही सकाळी उठल्यावर विसरून जावे. गुरुबंधू सोबत ''श्रीं''चे घरी जावे. 'श्रीं''ना पहाटेचा मंत्र कोणता? ''श्रीं''नी प्रतिप्रश्न करावा, ''लक्षांत राहिला नाही कां? बरं आम्ही पत्राने कळवू!'' धनार्जनातील विघ्ने नाहीशी करणारा तो मंत्र त्यांत शुद्ध बुद्धी आरोग्यही प्रदान केलेले. पोस्टाने मंत्र गुप्तपणे यायचा आणि पत्रही केवळ आमच्या हातीच पडायचे. असे किती अनुभव पुन्हा पुन्हा लिहावेत!!!

प.पू. श्रीमहाराज निर्गुणांत गेले. मन हे जेवढे रामदासजींचे म्हणण्याप्रमाणे सज्जन आहे ना? तेवढेच कधीतरी दुर्जन होऊन भेडसावते. ''श्रीं'' निर्गुणांत गेले! आता कोण आहे तुला?'' या मनाच्या प्रश्नाने चित्त डळमळू लागते. पण आमचा स्वप्नी दृष्टांत हा २४० वा लेख वाचल्यानंतर आपणास कळेल की अव्यक्तांत जाऊन सुद्धा स्वप्नांचे माध्यमांतून दयाघन सद्गुरु कसा संपर्क साधतात.

माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो! चुकून सुद्धा आपल्या मनास नकारात्मक विचारांत शिरू देऊ नका. महाराज आहेत. उलट अव्यक्त रुपांत जाऊन ते अधिक आपले सन्निध येऊन बसले आहेत. पूर्ण श्रद्धेने आणि मनाच्या तळमळीने त्यांना हाक मारा ते तुम्हास सांभाळण्यास आल्याखेरीज राहणार नाहीत. हे मी आपणास पूर्ण अनुभवांनी आणि अनेक दाखले देऊन सांगत आहे.

प.पू. श्रीमहाराजांनी पुढील मार्गदर्शनाकरिता व आपणा सर्वांचा सांभाळ करण्यास प.पू. भगवती ताईमहाराजांच्या पदरी टाकले हे तर सर्वांस माहीत आहेच. आपण सर्व भगवतींच्या कृपा प्रसादाचा आस्वाद घेतच आहोत. बऱ्याच गोष्टी आम्हां, प.पू. श्रीमहाराजांचे अनुग्रहीतांना प.पू. श्रीमहाराज, प.पू. सौ. ताई महाराजांच्या मुखांतून सांगत असतात.

प.पू. सौ. ताईमहाराजांनी प.पू. श्री अशोक महाराजांना प.पू. श्रीमहाराजांचे गादीवर बसविले. आपल्या प्रारब्धाने त्यांनी अवतार कार्य फारच लवकर संपविले. परंतु त्यांनी ज्या ज्या भक्तांना योगदीक्षा प्रदान केली त्यांचेही अनुभव प्रचंड आहेत. प.पू. श्री अशोक महाराजही प्रति प.पू. श्रीमहाराजच वाटू लागले होते. नव्या पिढीला ते अल्पावधीतच फारच जवळचे झाले. अनेक समस्यांवर यथायोग्य मंत्र प्रदान करण्याचे परिपूर्ण ज्ञान आणि अधिकार प.पू. श्री दत्तमहाराजांनी त्यांना दिले होते.



२४३) ''श्रीं''चे अस्तित्व - २

प.पू. सद्गुरु श्री दत्त महाराज अव्यक्तांत म्हणजेच निर्गुणात गेल्यानंतर अनेक वेळा ''श्रीं''चे दर्शन स्वप्नांत झाले. परंतु नुसते दर्शन! बोलणे काही नाही. 'प.प. श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या' स्तोत्रात म्हटले आहे.

''स्मर्तृगामी स्वभक्तानाम् उद्धर्ताभव संकटांत'' त्याही पुढे जाऊन असे अनुभवांत येते की श्री सद्गुरु स्मरण करण्यापूर्वीच संकटातून उद्धार करण्याकरिता भक्तापुढे उपस्थित असतात. भक्ताला माहीतही नसते की आपल्यावर महासंकट कोसळणार आहे. प.पू. श्रीमहाराजांनी स्वप्नी दर्शन देऊन जो आदेश दिला, जो उपाय सुचविला आणि संकटाचे निरसन केले, तो पुढे उद्भवलेला प्रसंग आणि त्या संकटाचे निराकरण कसे केले तो प्रसंग मला सांगायचा आहे. तत्पूर्वी या प्रसंगाची पार्श्वभूमी मला स्पष्ट करावी लागते आहे.

माझ्या तिन्ही मुलांस एकाच वेळी १९८१ च्या अक्षय तृतीयेस दीक्षा झाली. या तिघांपैकी मधला चि. दिनेश याचा गुरुभक्तीकडे जास्त ओढा लागला.

चि. दिनेशने वारणा कॉलेजला सिव्हील इंजिनिअरींग पदवी करीता प्रवेश हा, प.पू.

श्रीमहाराजांच्या सल्ल्यानेच (आज्ञेनेच) घेतला होता. मुंबईत त्याला एका इंजिनिअरींग कॉलेजला प्रवेश मिळाला होता. फीज् भरायच्या होत्या आणि ''श्रीं''ची आज्ञा होताच आम्ही वारण्यास जाऊन लागलीच प्रवेश घेतला.

प्राथमिक, माध्यमिक शाळेत दिनेशची हुशारी बुद्धी प्राविण्य आम्हांस कळून चुकले होते. स्कॉलरशीपवरच त्याचे शालेय शिक्षण झाले. महाविद्यालयांतही त्याने गुणांची टक्केवारी सांभाळली होती ८५ टक्क्यांचे जवळपास मार्कस् असायचे. वारणा कॉलेजला प्रवेश, हॉस्टेलला राहणे हा त्याला पहिलाच अनुभव होता. आई-वडीलांना, भावंडाना तो सोडून इतका दूर गेला नव्हता.

आम्हा आई वडीलांना मात्र आता त्याची यत्किंचितही काळजी नव्हती, कारण कॉलेज प.पू. श्रीमहाराजांनी ठरविले होते आणि प.पू. श्रीमहाराजांचे त्याच्यावर पूर्ण लक्ष होते. कॉलेजमधून तो आपल्या समस्या किंवा प्रगती, ख्याली खुशाली प.पू. श्रीमहाराजांना वरच्यावर कळवित असे. ''श्रीं''चेही त्यास पत्रोत्तर येत असे. ''श्रीं''ची त्याला तो कॉलेजला असताना आणि नंतरची जी पत्रे माझ्या हाती लागली ती शेवटी देणार आहेच.

बी.ई. पदवी प्रथम वर्गात उत्तीर्ण होऊन ॲटोकॅड सारखे आणखी काही तत्सम कोर्सेस करून तो एका आर.सी.सी. कन्सल्टन्टकडे (कंपनीत) मुंबई येथे नोकरीस लागला. 'श्री दत्त अमरेश्वराच्या' जीर्णोद्धारातील सर्व इमारतींची आर.सी.सी. डिझाईन्स त्यानेच करून दिली. पुढे ''श्रीं''चे आज्ञेने त्याचा विवाह डिसेंबर १९९४ मध्ये ''श्रीं''चे तथा सौ. आईसाहेबांचे उपस्थितीत पुणे येथे संपन्न झाला.

१९९६ सालच्या जुलैपासून आम्ही ''श्रीं''च्या आज्ञेने जालन्यास श्री दत्ताश्रमाच्या सेवेस लागलो. मी बांधकाम (एक्झिक्युशन) सांभाळत होतो तर चि. दिनेश सर्व आर.सी.सी. डिझाईन्स, ड्रॉईंग व डिटेल्स पुरवित होता. नोकरीत सुट्टी मिळताच किंवा खास काम असेल तर रजा घेऊन येत होता. रजा जास्त झाल्यास बॉस (मालक) ओरडत असे. ''धरणीकंपापासून आर.सी.सी. इमारतीचे संरक्षणात्मक डिझाईन'' ह्या विषयाचा विशेष अभ्यास करून ती परीक्षा देण्याकरिता मालक स्वत: आणि दिनेशच्याही फिज् भरून आपल्याबरोबर दिनेशलाही या कोर्सला बसविले. परीक्षा झाली, दिनेश फर्स्टक्लास फर्स्ट येऊन त्याला बरीच पारितोषिके व सन्मान मिळाला. हे आपल्या लेकराचे कौतुक फारच होत आहे नाही कां? पण हे पुढील प्रसंग कथन करण्यापूर्वी दिनेश बुद्धीमत्तेत किती प्रगल्भ होता आणि संत संग, साधन गुरुआज्ञा यांत तत्पर होता हे सांगावे लागत आहे. एकूण काय तर दिनेश दिवसेंदिवस प्रगती पथावर होता.

दि. १०.१.१९९९, रविवार पौष कृ. ८ शके १९२० सायंकाळी ६ वाजता प.पू. सौ. आईसाहेब इहलोकीची यात्रा संपवून गेल्या. दिनेश दु:खाने विव्हल झाला. प.पू. श्री अशोक महाराजांनी यापुढे घडणाऱ्या घटनांची जाणीव दिनेशला दिली होती. तेही जाणून होते की दिनेश फार हळवा आहे. पुढील आघात सहन व्हावेत म्हणून त्यांनी त्याला हे सुचविले असावे. पुढे आणखी प.पू. श्री अशोक महाराज त्याला म्हणाले होते की ''तू जास्तीत जास्त ''श्रीं''च्या संपर्कात रहा! तसा प्रयत्न कर.'' पण ''श्री'' देखील आपले अवतारकार्य संपविण्याच्या मागे लागले, हे त्याला जाणवू लागले. त्याचे हळवे मन व्यथित होऊ लागले. प.पू. श्री दत्तमहाराज श्री सद्गुरु दि. १.३.१९९९, सोमवार, फाल्गुन शु. १४ शके १९२० ला सकाळी ८.३० वाजता अनंतात विलीन झाले. हा आम्हा सर्व गुरुबंधुंना, आमच्या समस्त कुटुंबीयांना फार मोठा हादरा-आघात होता. प्रत्येकास स्वत:स सावरणे कठीणच होते.

या नैराश्यांत प.पू. श्रीमहाराजांनी आधीच आम्हा सर्व गुरुबंधू आणि गुरुभक्तांस प.पू. सौ. ताईमहाराजांच्या पदरी टाकले. आता आमचे प.पू. श्रीमहाराज आणि सौ. आईसाहेब आम्ही प.पू. सौ. ताईमहाराजांत पाहू लागलो. चि. दिनेश तर नोकरीची पर्वा न करता प.पू. सौ. ताईमहाराजांच्या चरणसेवेत जास्त वेळ रमू लागला. सौ. आईसाहेबांप्रमाणे प.पू. सौ. ताई त्याला लडीवाळपणे वात्सल्य पुरवू लागल्या. काही कालावधीतच प.पू. सौ. ताईमहाराजांनी प.पू. श्री अशोक महाराजांना प.पू. श्रीमहाराजांचे स्थानी विराजमान केले. प.पू. श्री अशोक महाराज जात्याच प्रेमळमूर्ती! सानथोरांत जवळीक साधायचे. कोणतेही प्रश्न वा शंकांचे निराकरण करण्यास तरुण मंडळीस हे सद्गुरु उपयुक्त वाटू लागले. सख्य भक्तीत सर्व आनंद घेऊ लागले. चि. दिनेशवर त्यांनी इतके प्रेम, माया केली की दिनेशलाही मुंबईहून त्यांना एखादा फोन केल्याखेरीज चैनच पडत नसे. ऑफिसमध्ये कामाचा बोजा वाढला होता. महिना पगार न देता आता मालकाने त्याला ऑन कॉन्ट्रॅक्ट पेमेंट करण्याची पद्धती सुरू केली. दिवस रात्र कसून कामे करून मालक वेळेवर ठरलेला कमाईचा भाग त्याला देत नव्हता. ॲरिअर्स लाखाचे वर तुंबले होते. पण मालकांकडून मिळण्याचे नांव नाही.

चि. दिनेशला मालकांकडून कमालीचा त्रास व छळवणूक होऊ लागली. दुसरी नोकरी चेंबूर येथे भगवती डिझाईन या कंपनीत मिळताच त्याने त्या पूर्वीच्या नोकरीस राजीनामा देऊन पूर्वीच्या पगाराच्या दुप्पट पगाराच्या या नोकरीचा स्वीकार केला. परंतु चारकोप कांदिवली ते चेंबूर हा उलट सुलट बसचा प्रवास अत्यंत त्रासदायक होऊ लागला. ऑफिसच्या वेळेच्या तीन तास आधी घर सोडावे लागायचे तर ऑफिस सुटल्यानंतर ३ ते ४ तास घरी पोहोचण्यास लागायचे. वेळेवर ऑफिसला पोहोचणे आणि वेळेत म्हणजे रात्री

११ च्या आत घरी परतणे कठीण होऊ लागले. कर्ज हप्त्याने मोटारगाडी घेतली. ट्रॅफिक फार, ड्राईव्हींग नुकताच शिकलेला. तरी तीन तीन तास जाणे येणे व्हायचेच. शेवटी नाईलाजाने चेंबूरमध्ये भाड्याने जागा घेऊन स्वतंत्र बिऱ्हाड थाटावे लागले. ठीक झाले, नोकरीचे जागेपासून जवळच जागा भाड्याने मिळाली. पण मोटारगाडीचे कर्ज, दोन्ही लेकरांच्या प्राथमिक शाळेत ॲडमिशन, चेंबूरसारख्या ठिकाणी भाडी मोठी, हप्ते जाऊन वाढीव पगाराचा लाभ होईना. आणखी त्यात दिनेशला क्लेशकारक गोष्ट झाली, ती म्हणजे आई-वडीलांचा नित्य सहवास, भावडांचा सहवास तुटला, वियोग झाला.

मोठी भाडी देण्यापेक्षा कर्ज काढून एखादा ब्लॉक घ्यावा म्हणून पहिले कर्ज फेडण्यापूर्वी दुसरे कर्ज. आई-वडीलांचा वियोग दिनेशला व त्याच्या सर्व कुटुंबासच फार जाणवला. अशा त्याच्या संकट समयाला त्याला प.पू. श्री अशोक महाराजांचा फार मोठा आधार, अगदी निकटवर्तीयांसारखा मिळाला. पूर्वीपासून काका पुतण्याचे नाते होतेच. आता तर 'त्वमेव माता पिता त्वमेव बंधू सखा त्वमेव च!' सखा म्हणूनही ते भासू लागले. मनांतील सारे भले बुरे विचार निर्भयपणे मांडून मन मोकळे करण्यास, तसेच सल्ला मसलतीस आधार मिळाला. जरा मनास काही टोचले की मोबाईल कानाला. असे असे झाले, आता काय करू! बॉस असे बोलले, आता काय करू? आई-वडीलांना मानसिक ताण येऊ नये म्हणून तो आर्थिक विवंचना, येणारी संकटे आई-वडीलांस, पत्नीसही सांगत नसे. आता त्याला एकमेव आधार होता, प.पू. श्री अशोक महाराज. ते देखील प्रत्येक संकटास त्याला मंत्र, जपानुष्ठान देत. त्या त्याप्रमाणे ती ती अनुष्ठाने करून तो संकटमुक्त व्हायचा. पुन्हा आर्थिक, पारमार्थिक समस्यांचा उच्चांक झाला. धनार्जनातील विघ्ने दूर होऊन संपन्नता समृद्धी यावी म्हणून प.पू. श्री अशोक महाराजांनी त्याला एक रुपयाचे नाणे अभिमंत्रून जानव्यात बांधण्यास अनुष्ठानासह दिले आणि हां हां म्हणता तो आर्थिक अडचणी, नोकरीतील कटकटीतून तो हळूहळू बाहेर-येऊ लागला.

आता या सर्व संकटांवर प.पू. श्रीमहाराजांचा कृपाशीर्वादामुळे बाहेर पडत आहे तोच पुन्हा महासंकट उभे राहिले ते म्हणजे प.पू. श्री अशोक महाराजांना असाध्य व्याधी (कर्करोग) झाल्याची गुप्तवार्ता. ही वार्ता एक महिना आधीच चि. दिनेशला कळली आणि तेव्हापासून तो अत्यंत व्याकुळ हवालदिल, उदासचित्त मुका झाला. आम्हांस प.पू. श्री अशोक महाराजांना हॉस्पिटलला दाखल केल्याचे कळले. दिनेश वरच्यावर जात होता. एके दिवशी आम्हां उभयतांसही पुणे येथे हॉस्पिटलला भेटण्यास घेऊन गेला. त्यांची अवस्था पाहून मन व्यथित झाले. दिनेश आमची समजूत काढायचा, ''आई बाबा, काळजी करू नका पण प.पू. सद्गुरु श्रीमहाराजांना प्रार्थना करा, त्यांचे आरोग्याप्रीत्यर्थ काही अनुष्ठाने

करा, ते बरे होतील.''

इकडे दिनेशचा नवीन जागेचा शोधही सुरू होता. प.पू. सौ. ताईमहाराजांनी चेंबूर मधील टिळकनगर मध्ये राहण्याकरिता इमारत बांधकामे कुठे कुठे चालू आहेत ती पाहून येण्यास व काम चालू असलेल्या इमारतीचे नांव अथवा नंबर घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे काही इमारतींची बांधकामे मी व दिनेश पाहून जालन्यास प.पू. सौ. ताईंपुढे बसलो. अनेक इमारतीतून ५१ नंबरच्या इमारतीत मागील बाजूचा ब्लॉक घेण्यास सांगितले. आज्ञेप्रमाणे दिनेशने त्याच इमारतीत ब्लॉक नक्की केला. प.पू.सौ. ताईंनी हीच इमारत कां सांगितली हे नंतर कळले. ही रजिस्टर सोसायटीची बिल्डींग होती. नांव होते औदुंबर को.ऑप. हौसिंग सोसायटी. प्लॉटमध्ये औदुंबर तरुही होता आणि एक जुना सभासद आपला होणारा ब्लॉक विकत होता. बँकेकडून कर्ज घेण्याचे ठरले. ऑफिसच्या वेळा सांभाळणे, बँकेत कर्जाकरिता खेटे मारणे, दोन जामीनदार मिळविणे, दहा टक्के रक्कम आपण उभी करणे हे चालू असतानाच प.पू. श्री अशोक महाराजांची चिंता. प.पू. श्री अशोक महाराजांच्या सेवेस हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहण्याच्या वेळा गुरुबंधूंनी ठरविल्या होत्या. सेवेकऱ्यांच्या ठरलेल्या वेळेत आपली सेवेची वेळ गाठणे हे सर्वांत महत्त्वाचे होते. असे सर्व धावपळीचे वेळापत्रक चिंतेने ग्रासलेल्या तणावात चालू होते.

महत् प्रयासाने एकदांचे मालकाबरोबर झालेले कन्व्हेअन्स रजिस्टर झाले. दुसऱ्या दिवशी तो ठरल्याप्रमाणे प.पू. श्री अशोक महाराजांच्या शुश्रूषेस पुण्यास निघणार इतक्यात फोन संदेश. दि. १३.३.२००६ दिवस असा उजाडला की त्याच्या जीवनांतील उजेडच नाहीसा करणारा. प.पू. श्री अशोक महाराज दि. १३.३.२००६, फाल्गुन शु. १४, सकाळी ८.३० वाजता (प.पू. दत्तमहाराजांचे तिथी, वार, मासी) आम्हांस सोडून गेले. दिनेशच्या डोक्यावर आकाशच कोसळले. आजाराचे निदान झाल्यापासूनच दिनेश नैराश्यात गेला होता.

दिनेश विमनस्क मन:स्थितीत घरी येऊन सुन्न बसायचा. ऑफिसमध्येही तसेच. वास्तविक तो चिफ इंजिनिअर या मोठ्या जागेवर होता. कामात लक्ष नाही, संसारात मन नाही. चेहरा भकास, भरकटलेला, मानसिक स्थिती पूर्ण खालावलेली. कामांच्या फायलींचा ढिग टेबलावर साचत रहायचा. वरचा अधिकारी बॉस त्याची ही निष्क्रीयता पाहून वैतागायचा. प.पू. श्री अशोक महाराजांचे उत्तर क्रियेसही उपस्थित होता. पुढे अशा अवस्थेत दोन महिने झाले. एके रात्री पत्नीकडे आपले डोके सुन्न बधीर झाल्याचे पत्नीस सांगून रडू लागला. सौभाग्यवती देविकाने देव्हाऱ्यांत प.पू. श्री दत्तमहाराजांसमोर निरांजन व उदबत्ती लावून रात्री जागून ''श्रीपाद श्री वल्लभत्वम् सदैवं'' या घोराष्टकाचे पाठ सुरू केले.

तिकडे दुसऱ्या दिवशी पहाटे (चारकोप येथील घरी) दि. १८.५.२००६ रोजी प.पू. श्री दत्त महाराज स्वप्नी आले. घाईघाईत आले व मला म्हणाले, ''आजपासून तुम्ही संकटनाशन स्तोत्राचे पाठ सुरू करा'' मी म्हटले, 'म्हणजे? घोराष्टकाचे, ठीक आहे.'

दि. १८.५.२००६ पासून नित्य घोराष्टकाचे २१ पाठ सुरू करून दिनेशकडे टिळकनगर चेंबूर येथे गेलो. दिनेशची ती अवस्था पाहून मनोमन मला महाराजांनी घोराष्टकाचे पाठ कां करायला सांगितले ते कळून चुकले. मी आठवडा त्याचे जवळच काढला. रात्री बाहेरच्या खोलीत मी झोपलेला असताना माझ्या पुढ्यात येऊन मला घट्ट मिठी मारून स्फुंदून स्फुंदून रडायचा. म्हणायचा, ''बाबा मी सुन्न झालो आहे, माझे डोके सुन्न-बधीर झाले आहे. डोक्यात मुंग्या मुंग्या येऊन मला काहीच कळत नाही. मी शून्य झालो आहे बाबा. माझ्यातले सर्व इंजिनियरींगचे नॉलेज (ज्ञान) नाहीसे झाले आहे. मला काहीच कळत नाही. मी भरकटलो आहे. आता माझे कसे होईल? माझ्या मुलांचे कसे होईल, बायकोचे काय होईल? मी संपलो. आता कोण माझ्या मुलांचे पोषण, संगोपन, संवर्धन करील? मी सैरभैर झालो आहे! मी असून नसल्यासारखा झालो आहे. बाबा तुम्ही मला सोडून जाऊ नका. माझ्या जवळ या. मला सांभाळा. मी काय करू? बाबा मी काय करू?'' असे म्हणून तो रडू लागे. त्याचा चेहरा निस्तेज झालेला, डोळे थिजलेले, भकास. एका पित्याच्या अंत:करणाला किंवा त्याच्या आईला, पत्नीला अशा प्रसंगी काय यातना होत असतील ते लिहीण्यास शब्द अपुरे! दिनेशच्या आईला तर आम्ही त्याच्या ह्या मानसिक धैर्यपतनाची कल्पनाच दिली नव्हती.

मी त्याला पुण्यास सवितावहिनी व आमोद यांच्या सहवासात नेले. कदाचित मनमोकळे होऊन दु:ख कमी होईल. पराकोटीचे दु:ख असून सुद्धा सवितावहिनीसाहेबांनी दिनेशला खूप समजावले. धीर दिला. पण तो नैराश्यांतून वर येईना. घरी तर चैन पडत नव्हते. पुण्यास आमोदशी गप्पा गोष्टीत मन रमेल पण नाही. सवितावहिनी व आमोदचा निरोप घेऊन आम्ही दोघे जालन्यास गेलो.

प.पू. सौ. ताईमहाराजांची प्रकृती ठीक नव्हती. नेहमी दर्शन नसे. दर्शन सुरू झाले की लांबच लांब रांगा लागायच्या. जास्त वेळ प.पू. सौ. ताईंसमोर बोलत बसणे कठीणच होते. आपण आलो आहोत तर निदान दर्शन तरी व्हावे ही अपेक्षा धरून होतो आणि काय आश्चर्य! कु. सुवर्णा आली व म्हणाली, ''तुम्हा दोघांना प.पू. सौ. ताईमहाराजांनी बोलाविले आहे.''

आम्ही दोघे प.पू. सौ. ताईमहाराजांच्या दर्शनास गेलो. यापूर्वीही त्यांचे जवळ दिनेशच्या आजाराची पूर्ण कल्पना मी त्यांना दिली होती. ''वरच्यावर त्याला जालन्यास दर्शनास

घेऊन येत चला. तो यायला तयार होणार नाही तरी त्याला येण्यास भाग पाडत जा! नकारात्मकतेचे वारे त्याच्यात शिरले आहेत!'' असे ताई म्हणाल्या होत्या. दि. २७.५.२००६, आज आम्ही त्यांना प.पू. श्रीमहाराज स्वप्नात दृष्टांत देऊन घोराष्टकाचे अनुष्ठान सुरू करण्यास सांगून गेल्याचे सांगितले. प.पू. सौ. ताईमहाराजांनी रोज किती पाठ करता ते विचारले. मी रोज २१ पाठ करत असल्याचे सांगितले. प.पू. सौ. ताई म्हणाल्या, ''एवढ्याने काय होणार? प.पू. श्रीमहाराजांपुढे सव्वा लाखाचा संकल्प करा. कुटुंबातील सर्वांनी मिळून रोज होतील तेवढे पाठ करावेत! तुम्ही मात्र रोज १०८ पाठ एक माळ दिवसाला करावी. २-३ झाल्या तर अधिक चांगले. पाठ सुरू करताना पेल्यांत वा गडव्यात पाणी समोर ठेवा, झांकण ठेवा त्यावर. उदबत्ती अनुष्ठान चालू झाल्यापासून सतत राहिली पाहिजे. एक संपत आली की दुसरी लावावी. जो अंगारा पडेल तो डबीत जमवून ठेवा व त्याला रोज त्यातील अंगारा समोर ठेवलेल्या पाण्यात चिमूटभर टाकून कपाळास व अंगास लावण्यास सांगा!''

जालन्यास अनुष्ठानाकरता 'दत्त आश्रमात श्री दत्त पादुकांसमोर' संकल्प करून करण्यास प्रारंभ केला. नंतर नित्य नियमाने सकाळी स्नान संध्या, देवपूजा नित्य उपासना, स्तोत्रे वगैरे आटोपून प.पू. श्रीमहाराजांना प्रार्थनापूर्वक आवाहन करून, दिनेशच्या आरोग्याप्रीत्यर्थ तसेच त्याचे संपूर्ण जीवित सुरळीत चालू होण्यास संकल्प सोडून घोराष्टकाचे पाठ सुरू झाले. कधी दोन माळा होत. जालन्यास तीन माळाही होत. प.पू. श्रीमहाराज सामर्थ्य देऊन करवून घेत होते. आपले समोर प.पू. श्रीमहाराज स्थानापन्न झाले आहेत. आपण त्यांनाच ''श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव श्री दत्तास्मान् पाही देवाधिदेव'' ही प्रार्थना म्हणत आहोत, ऐकवीत आहोत, ते प्रसन्नचित्त होऊन ऐकत आहेत ही भावना असे. सवयीने जलद पठण होऊ लागले, तरी स्तोत्रातील कडवी, त्यांचा अनुक्रम, त्यांतील अर्थभाव ग्रहण करीत अनुष्ठान व्हावे इकडे दक्षता असे.

चि. दिनेशला ही मानसिक दुर्बलता येण्याच्या दोन महिने आधीच कंपनीने त्याला नवी एअरकंडीशन्ड गाडी ''वॅगनॉर'' दिली होती. गाडीच्या किंमतीचे हप्ते कंपनी भरत होती. त्याने आपली आधीची स्वत:ची गाडी विकून टाकली. कंपनीने बहाल केलेली ही गाडी जेमतेम दोन महिने त्याने स्वत: ड्रायव्हींग करून वापरली. नंतर मात्र त्याचा ड्राईव्हींगचा आत्मविश्वास डळमळू लागला. मग तो रिक्शाने ऑफिसला जाऊ लागला. अनुष्ठान चालू होते. दिनेशची मानसिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली होती. डोके जड व्हायचे, डोक्यास मुंग्या आल्यासारखे व्हायचे, डोके-बुद्धी बधीर व्हायची, डोळे मिटून झोपावे असे वाटायचे. ऑफिसमध्ये जाऊन आपल्याला काम काही येत नाही. आपण काम

काहीच करत नाही, मग पगार तरी कसा घ्यायचा? घ्यायचा नाही तर घर कसे चालवायचे? रोजचे कौटुंबिक खर्च कसे चालवायचे? ऑफिसात या मोठ्या कंपनीच्या शिरस्त्याप्रमाणे सूट, बूट, टाय अशा पॉश पोषाखांत जायला लागायचे. हे चीफ इंजिनिअर साहेब ऑफिसात येऊन आपल्या खुर्चीवर बसायचे. पण त्यांचे त्यांना कळायचे नाही आपण कोण आहोत? कुठे आहोत? आपल्याला काय करायचे आहे? याचा काहीच पत्ता नाही. स्वत:स हरवलेला, स्वत:स विसरलेला. पण असे किती दिवस चालायचे? एके दिवशी वरिष्ठ अधिकारी एम.डी. (मॅनेजिंग डायरेक्टर) यांचा दिनेशच्या पत्नीस सौ. देविकास फोन आला. मीही यावेळी त्यांच्या भाड्याच्या ब्लॉकमध्ये चेंबूरला आलो होतो. तिला त्यांनी तातडीने ऑफिसला बोलावले होते. ''दिनेशचे वडीलही येथे आले आहेत, त्यांनाही घेऊन येऊ का?'' तिने विचारले. त्यांना हे ऐकून बरेच वाटले व त्यांनी वडीलांनाही घेऊन येण्यास सांगितले व या आपल्या मिटींगची दिनेशला कल्पना दिलेली नाही असे ते म्हणाले. आम्ही दोघेही घाबरलो होतो. शेवटी ही वेळ येणारच होती. आता हे एम्.डी. काय सांगणार? अशा दिनेशच्या अवस्थेत आम्ही त्याला नोकरीवर ठेवू शकत नाही. वस्तुस्थितीच तशी होती, ते तरी काय करणार? पण हा आणखी एक आघात होऊन त्याची प्रकृती आणखी ढासळणार! देवाजवळ दिवा, उदबत्ती लावली, प.पू. श्रीमहाराजांना प्रार्थना केली. ''महाराज आपण आमच्या सोबत चला. काय बोलायचे, काय ठरवायचे ते तुम्हीच सुचवा महाराज!'' आम्ही 'भगवती डिझाइन्सच्या' पॉश ऑफिसमध्ये शिरलो. रिसेप्शनिस्टने फोनवरून माहीती देऊन आम्हांस आत पाठवायचे का ते विचारले. परवानगी आली. आम्ही मॅनेजिंग डायरेक्टर मिस्टर दागा सर यांचे केबिनमध्ये शिरलो. मोठ्या अदबीने सरांनी आमचे हात जोडून स्वागत केले. समोरच्या खुर्च्यांत विनयशीरपणे बसण्यास विनविले. अगदी आस्थापूर्वक शब्दांत त्यांनी दिनेशबद्दल सांगण्यास प्रारंभ केला. ते आमच्याबरोबर हिंदीतून बोलत होते. गृहस्थ सडपातळ, उंचेपुरे, बोलणे अत्यंत आपुलकीचे सौम्य साधेपणाचे. प्रथम त्यांनी विचारले, ''सध्याचे दिनेश याचे वागणे, डोक्यावर काही तरी परिणाम झाला असावा, मनावर काही आघात झाला असावा असे दिसते. तुम्हांलाही तसे तो घरी असताना जाणवत असेल नाही कां?'' आम्ही होय सर म्हटले. पुढे सर बोलू लागले, ''अहो, हा अत्यंत बुद्धीमान आणि हुशार मुलगा. मी त्याचे ज्ञान परिपूर्ण जाणून आहे. मीच त्याचा इंटरव्ह्यू घेतला होता. मीही त्याचे सिव्हील इंजिनिअरींगचे आणि ज्या खास जॉब करता इंटरव्ह्यू घेत होतो, त्याबद्दलचे ज्ञान लक्षात येऊन अवाक् झालो. मी त्याचवेळी मनात हेरले की हा माझ्यापेक्षाही सुपिरिअर डोक्याचा प्राणी आहे. तो माझ्याकडे ही एकदम वरची एच्.ओ.डी.ची पोस्ट मागत होता. मलाही कळत होते की त्या लायकीचा ज्ञानाचा तो स्टुडण्ट आहे. परंतु

आमच्याकडे ती जागा रिकामीच नसल्याने आम्ही त्याला नाईलाजाने चीफ इंजिनिअर ही पोस्ट ऑफर केली. असा हा अत्युच्च्य पातळीच्या उंच शिखराच्या टोकांवर असलेला हा तज्ज्ञ एवढ्या खोल दरीत कसा कोसळला? काय कारण झाले? घरात कुटुंबात काही मतभेद-भांडण किंवा काही मोठा आघात त्याच्या मनावर झाला आहे कां?''

सरांच्या सहानुभूतीपर संभाषणाने आम्ही विस्मय-चकीत झालो. त्यांचे दिनेशचे ज्ञान, त्याचे वर्तन, त्याचे कामांतील प्राविण्य ह्याबद्दल अत्यंत चांगले मत होते. त्याच्याबद्दल अभिमान वाटत होता. त्यांच्या हृदयात दिनेशबद्दल सॉफ्ट कॉर्नर होता. आम्ही त्यांचे हृदगत समजून आल्याने पूर्ण समाधान होऊन भयमुक्त झालो. आता सर आपलेच आहेत हे लक्षात आल्याने त्यांच्यासमोर मनमोकळेपणाने संपूर्ण पूर्व इतिहास कथन केला. त्याच्या मनावर जानेवारी १९९९ पासून २००६ पर्यंतचे, प्रारंभापासून कसकसे आघात होत गेले हे सर्व वरील वर्णन त्यांना सांगितले. उलट आम्हीच त्यांना विचारले की, ''अशा स्थितीत तुम्ही त्यास नोकरीवरून काढून तर टाकणार नाहीत ना? तसे झाले तर त्याच्या मनावर आणखी एक मोठा आघात होईल आणि तो पूर्ण नैराश्याच्या खाईत पडेल!''

प.पू. श्री दत्तमहाराज, श्री. दागासरांच्या माध्यमांतून आम्हांस सहाय्य देत होते. आम्ही त्यांना होमिओपॅथीक औषधोपचारांबरोबर एका मानस शास्त्रज्ञामार्फत मानसोपचारही करीत असल्याचे सांगितले. आमचे प्रयत्न चालू आहेतच म्हटल्यावर तेही म्हणाले, ''मलाही तुमच्यातीलच एक सहकारी समजा. माझ्यापरीने होईल तेवढे सहकार्य मी देईन!'' त्यांनी दिनेशच्या डायरेक्ट बॉसनाही आमच्या समोरच बोलावून घेऊन समज दिली. त्यांनाही त्यांनी दिनेशशी कसे वागाल ते आस्थापूर्ण रीतीने समजावून सांगितले व ''अधिक मोठा मानसशास्त्रज्ञ मिळाला तर मीही पाहतो. ह्या खुर्चीवर जे जे मला सहाय्य करता येणे शक्य आहे ते सर्व मी करीन! त्याची सर्व्हिस टिकविण्याचा मी प्रयत्न करीनच, तुम्हीही त्याची मानसिक प्रगती मला कळवीत जा. माझ्याशी संपर्क साधत रहा. कधीही केव्हाही मला मोबाईलवर फोन करा! मीही तुम्हास फोन करून वेळोवेळी मार्गदर्शन देत राहीन'' असा प्रेमळ सल्ला घेऊन आम्ही दागा सरांचा निरोप घेतला.

दि. १६.६.२००६ रोजी दिनेश सहकुटुंब नवीन खरेदी केलेल्या टिळकनगर येथील ब्लॉकमध्ये राहण्यास गेला. मी आता जास्त दिवस त्याच्या जवळच रहात होतो. ब्लॉक घेऊन कर्जाचा बोजा आणखी वाढला आहे. आपले कसे होईल याबद्दल तो प्रत्येक वेळी मला प्रश्न विचारी. मी त्याला १९८० पासून आतापर्यंत प.पू. श्री दत्तमहाराज असे आपल्यामागे उभे आहेत याचे दाखले देत असे. त्यांच्या कृपेनेच असे अनेक प्रसंग, अनुभव, उदाहरणे मी त्याला देत होतो. प्रत्येक वेळी त्यांनी आपणास तारले ते आता दूर

लोटतील कां? तुझ्यावर हे एवढे मोठे संकट येणार हे मला माहीत सुद्धा नव्हते. आधीच महाराजांनी घोराष्टकचे अनुष्ठान सुरू करण्यास सांगितले. काहीही काळजी करू नको, तू हमखास या नैराश्यांतून बाहेर येशील.

पुढे पुढे तर ऑफिसला जायलाच तयार नसायचा. पत्नी देविका त्याला रिक्शात बसवून ऑफिसला सोडून यायची. आपल्या हाताखालील इंजिनिअर लोकांनी पूर्ण केलेली डिझाईन्स, प्लॅन्स ह्याने तपासून सही करायची, ही ह्याची कामे त्याच्या वरच्या बॉसला करायला लागायची. तो तरी किती दिवस करणार? तो आता ह्याला उलट सुलट बोलून वरचेवर अपशब्द देऊ लागला. ऑफिसांतील ज्युनिअर सिनीअर सर्व इंजिनिअर आणि इतर कर्मचारी एखाद्या वेड लागलेल्या माणसाकडे पाहतात तसे संशयात्मक नजरेने पहायचे. दागा सरांची सहानुभूती होती पण त्यांच्या चांगुलपणाचा फायदा तरी किती घ्यायचा, हेही त्याला गैर वाटायचे. नीतीमत्तेची विचारसरणी मात्र काम करायची. आपणाकडून घडत आहे ते ठीक नाही. फुकट पगार तरी कां घ्यायचा? मग त्याने राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. हे सर्व त्याचे मन:स्थितीतील विचार बाहेर फिरण्यास त्याला काढले की माझ्या समोर मांडत असे. सौ. देविका त्याचे सर्व आर्थिक व्यवहार सांभाळत होती. सतत त्याचे सेवेत होती. धडाडीने आणि पूर्ण श्रद्धेने ती त्याला ट्रीट करीत होती.

सौ. देविकाने व मी खूप विचार केला. याने राजीनामा द्यावा कां? याशिवाय राजीनामा द्यायचा तर दोन महिने आधी कंपनीला नोटीस द्यावी लागते. कंपनीने दिलेली गाडी कंपनी परत घेत नसते. गाडी अंगावर पडेल, तिचे हप्ते दिनेशलाच भरावे लागतील. ते कुठून भरणार? घराच्या कर्जाचे हप्ते कोठून भरणार? घरी नुसते बसून आजार जास्तच बळावला तर? आपण कमवित नाही हे न्यूनगंड. दोघे त्याचे भाऊ आर्थिक सहाय्याला तयार होते. ते म्हणत, 'आम्ही सर्व सांभाळू पण तू लवकर बरा हो.'' राजीनामा देण्याचेच दिनेशने नक्की ठरविलेले पाहून आम्ही भेटीची वेळ नक्की करून मी व सौ. देविका पुन्हा श्री. दागा सरांना भेटलो. दिनेशची मन:स्थिती व नोकरीबद्दलचे त्याचे विचार त्यांना कथन केले. त्यांनी ऑफिसांतून दिनेशला व त्याच्या बॉस-साहेबांनाही आपल्या केबिनमध्ये बोलावून घेतले. आम्ही दिनेशच्या राजीनाम्याच्या अनुषंगाने आमच्या व्यावहारिक अडचणी म्हणजे दोन महिन्यांची नोटीस आणि गाडीबद्दल सरांना सांगितल्या. श्री. दागा सर आम्हांस त्यांच्या प्रत्येक वक्तव्यांतून साक्षात् परमेश्वर श्री दत्तमहाराजच बोलत आहेत असाच साक्षात्कार होऊ लागला.

''दोन महिन्यांची नोटीस ही अट मी स्पेशल केस म्हणून कंपनीस दिनेशबाबत मागे घ्यायला लावीन. तो उद्यापासून जाऊ इच्छित असला तरी आम्ही सोडू. त्याची गाडी येथील

नियमाप्रमाणे परत घेतली जात नाही. गाडीचे पुढील हप्ते नोकरी सोडणाऱ्याला भरावे लागतात. परंतु दिनेशचे बाबतीत ती गाडी आहे त्या स्थितीत आम्ही परत घेऊ. ह्या सर्व सवलती देण्याची जबाबदारी दिनेशकरिता मी स्वीकारतो. पण दिनेश, तू लवकर बरा हो. ह्या मोहोळांतून लवकर बाहेर ये. आम्ही तुझ्याकरिता ईश्वराकडे प्रार्थना करू आणि तुला इतकेही आश्वासन देतो की तू या मानसिक व्यथेतून बाहेर पडून चांगला झालास आणि तुला जर परत याच कंपनीत यायचे असेल तर तू येशील त्या दिवसापासून मी तुला याच कंपनीत त्याच किंवा तेवढ्याच अधिकाराच्या जागेवर लावून घेईन. माझे आशीर्वाद, माझ्या शुभेच्छा सतत तुझ्या पाठीशी असतील!''

मी म्हटलं, ''दागा सर, मी अजून तो परमेश्वर पाहिला नाही, पण तो आज मला तुमच्यात दिसत आहे. खरंच आपले पाय धरावे असे वाटते!''

सर म्हणाले, ''नाही नाही! मला या जगात माणूस व्हायचे आहे, माणूस म्हणून जगायचे आहे. एवढीच श्री चरणी प्रार्थना आहे.''

आम्ही सरांचा जड अंत:करणाने निरोप घेऊन बाहेर पडलो. मी टिळकनगर मध्येच दिनेशसोबत रहात होतो. प्रत्येक वेळी तो प्रश्नार्थक चर्येने माझ्याकडे पहायचा. मी म्हणत असे, ''दिनेश आजपर्यंत सतत प.पू. श्रीमहाराजांनी आपल्याला अनेक संकटांतून, काळजी-विवंचनेतून, अनेक कठीण समस्यांतून मार्ग दाखविला आहे. स्वप्नी येऊन, जप देऊन, तर कधी भेटीत मंत्रानुष्ठान देऊन, कधी कोणा भक्तामार्फत पत्र देऊन, पत्रातून मंत्रानुष्ठान देऊन सांभाळले आहे. ते आज आपल्याला, तुला सांभाळणार नाहीत कां? तुझ्या माझ्यावर हे संकट कोसळण्याआधीच त्यांनी ''श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव'' ह्या स्तोत्राचे हे पाठ करण्याचे अनुष्ठान तुझ्याकरिताच दिले आहे ना? प.पू. श्रीमहाराजांवर तुझा विश्वास, तुझी श्रद्धा आहे की नाही? मग कां असा दु:खी-कष्टी नि उदास होतोस? मला १०१ टक्के खात्री आहे. अनुष्ठान सुरू झाले आहे, आता तुझ्यात सुधारणा व्हायलाच पाहिजे आणि होणारच. अरे आपण दागा सरांसमोर बसलो होतो. दागासरांच्या तोंडून कोण बोलत होते? कोण धीर देत होते? कोण तुझी सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेत होते? अरे आपली गुरुमाऊलीच त्यांच्या तोंडून बोलत होती. तुझा गेलेला आत्मविश्वास तुला निश्चितच परत मिळेल. याबद्दल मला तसेच तुझ्या पत्नीला, सौ. देविकालाही परिपूर्ण खात्री आहे.''

माझे चाललेले अनुष्ठान तो मन लावून ऐकत बसे. अहो, कधी कधी तर माझ्या मांडीवर डोके टेकून लहान बाळासारखा झोपत असे. हळूहळू श्री गुरुकृपेचा, श्री गुरुमहाराजांनी दिलेल्या अनुष्ठानाचा प्रभाव दृष्टोत्पतीस येऊ लागला. दिनेश एके दिवशी (जुलै २००६ मध्ये) म्हणाला, ''बाबा, ऑनलाईनवर मी वेगवेगळ्या कंपनीत अर्ज करतो. कॉल आला

तर इंटरव्ह्यूलाही जाईन. पाहूयां, जी काही उत्तरे देता येतील ती देईन.''

झाले. खरोखरच जुलै २००६ मध्ये त्याला कॉल यायला सुरवात झाली. त्याचा बायोडेटा सर्वत्र मान्यता मिळवून देई. दोन ठिकाणी हा मुलाखती देऊनही आला. कुठे परदेशी जावे लागत होते म्हणून नको, तर कोठे पगार कमी वाटतो म्हणून नको. शेवटी पवई येथील ''पेट्रोफॅक'' या कंपनीत तो मुलाखत देऊन आला. थोडा नाराजच होता. मनासारखी उत्तरे मुलाखतीत देता आली नाहीत असे म्हणाला. आशा सोडली, आसवे गाळली. हतबुद्ध, निराश होऊन बसला. आठ दिवस गेले आणि पेट्रोफॅक कंपनीचे पत्र बंद लखोट्यात आले. नकारघंटा वाजणार म्हणून अनिच्छेने पाकीट फोडले. आश्चर्याचा धक्का! कंपनीने त्याला अपॉईंटमेंट लेटर घेण्यास बोलावले होते. कळी खुलली. भगवती डिझाईन या पूर्वीच्या कंपनीपेक्षा सॅलरी अधिक मिळणार होती आणि जबाबदारीही कमी म्हणजेच मोठ्या अधिकाराची जागा नव्हती. आपल्याला सध्या तरी जोखमीची जागा नकोच होती. दिनेश या नव्या कंपनीत सप्टेंबर २००६ पासून रूजू झाला.

पुढील महिन्यातच गुरुद्वादशी आली. आम्ही सर्व दिनेशसह जालन्यास दत्त आश्रमांत दर्शनास गेलो. आश्रमात मी नेहमी सुंदरदत्त निवासचा पहिला मजला, खोली जवळचा कोपरा भावपूर्ण वास्तव्यास स्वीकारतो व जेव्हा जेव्हा जातो तेव्हा तेव्हा मला ती जागा ईशकृपेने मिळतेही. हॉलची बाजूची खोली ही आन्हिक, जपजाप्य, साधन, अनुष्ठानास प.पू. सौ. ताईमहाराजांचे अनुज्ञेने वापरतो. दुसरेही काही भक्त याच खोलीचा पारायणाकरिता वापर करतात.

२४४) ''श्रीं''चे अस्तित्व - ३

(दि. ३.१०.२००६ - पादुका दर्शन)

तो दिवस कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच बलीप्रतिपदेचा होता. आज दिवसभरांत तीन माळांच्या अनुष्ठानाचा मनी संकल्प करून बसलो. न्याहरी पूर्वी पहिले, न्याहरीनंतर आणि भोजनापूर्वी दुसरे आणि दुपारनंतर तिसरे. कॉम्प्युटरचा निरुपयोगी पण पाठकोरा असा नवा कागद घेऊन, कोरी बाजू उदबत्तीचा अंगारा पकडण्यास अंथरला. त्यावर उदबत्ती लावण्यास सोंगटी ठेवून समोर पाणी ठेवले, तुपाचा दिवाही प.पू. श्रीमहाराजांच्या फोटोसमोर लावला आणि अनुष्ठानास प्रारंभ केला. माझ्या मागे श्री. प्रकाश सोनी पारायणास बसले होते. ठरल्याप्रमाणे माझी तीन माळा अनुष्ठाने पूर्ण जाली. अंगारा जमा करण्यास माझ्याजवळ प्लॅस्टिकची डबी होती. अंगाऱ्यास स्पर्श न करता तो भरपूर जमलेला अंगारा त्या कागदाची

नाली करून दोन हाताने डबीत भरला. काही कण कागदास चिकटलेले काढण्याचा प्रयत्न केला. कागद उजव्या बाजूस सारून मी डबीचे झाकण लावू लागलो, इतक्यात माझे लक्ष त्या कागदावर गेले. पाहतो तर कागदावर साक्षात् पादुका अंगाऱ्याने घट्ट चिकटून उठलेल्या. मी मोठ्याने (विस्मयाने) प्रकाशना हांक मारली व आश्चर्याने म्हटले, ''प्रकाश हे पहा काय आहे!''

प्रकाश म्हणाले, ''काका या तर पादुका!'' मी तो कागद उचलून कपाळास लावला. मी डबीत अंगारा भरत असताना जे (सहज डबीत न पडणारे) कण खरडून काढले ती डाव्या चरणाची बोटे होती. बाकी सर्व ठीक होते. प्रकाश यांनी सल्ला दिला की, मी लागलीच या उमटलेल्या पादुका प.पू. सौ. ताईमहाराजांना दाखवाव्यात. मी तेच करणार होतो.

वास्तविक मी आज नवाकोरा कागद त्या कागदांचे गठ्यातून घेतला होता. त्या कागदास कोणताही गोंद, द्रव सोडाच पण पाणी सुद्धा लागले नव्हते. तरीही अंगारा पादुकांचा आकार रेखांकित करीत होता.

मी कागदास अलगद हलक्या हाताने राऊंड फोल्ड घालून प.पू. सौ. ताईंच्या घरी जाण्यास फाटकापर्यंत आलो, तितक्यात प.पू. सौ. ताईच फाटकांतून आश्रमांकडे जाण्यास बाहेर पडत होत्या. ''ताई हे पहा!'' असे म्हणत मी कागद उलगडू लागतो तर ताई म्हणाल्या, ''थांबा, येथे रस्त्यांत दाखवू नका. मला माझ्या जागेवर आधी बसू द्या. चला माझ्याबरोबर.''

प.पू. सौ. ताई दत्तआश्रमात आल्या. राघवालयात विसावल्या. कागदाकरिता हात पुढे केले. मी भावपूर्ण अवस्थेत त्यांचे हाती तो कागद सुपुर्त केला. त्यांनीही तितक्याच भावपूर्णतेने तो कपाळास लावला. मी वृत्तांत कथन केला. प.पू. सौ. ताई म्हणाल्या, ''प्रत्यंतर आले ना? प.पू. श्रीमहाराज, श्री दत्त आश्रमात आहेतच आणि जेथे अनुष्ठान चालते तेथे ते येऊन उभे असतात.''

आम्ही भाऊबीज आटोपून मुंबई चेंबूर येथील टिळकनगरात राहत्या घरी परतलो. चि. दिनेशने त्या अंगारा पादुकांची छोटीशी फ्रेम तयार करून घेतली व ती नित्यपूजेस देव्हाऱ्यात स्थानापन्न केली. आज ती तेथेच देव्हाऱ्यांत पूजनात आहे.

आता दिनेशचा मानसिक स्वास्थ्याचाच नव्हे तर एकूण प्रगल्भ बुद्धीमत्तेचा आलेख उंच उंच प्रगतीपथावर येऊ लागला ही सर्व प.पू. श्री दत्तमहाराजांची कृपा!

आता ही नोकरी नको ती, ती कमी पगाराची नको, अधिक पगाराची, नुसत्या जास्त पगाराची नको तर उच्चाधिकाराची, अधिक काही शिकायला मिळेल, बुद्धीला खुराक आणि चालना मिळेल अशी हवी. अशा १-२ नोकऱ्या बदलून झाल्या. स्वारीचे मनात

आले उच्चाधिकार सांभाळायचे म्हणजे मॅनेजमेंटचा अभ्यास पाहिजे. एम.बी.ए.ला प्रवेश घेतला. प्रत्येक परीक्षेला बाबांना फोन, १० वाजता पेपर सुरू होईल. त्याचवेळी अनुष्ठान सुरू करा. आज अडीच वाजता आहे, असे चालू झाले. मीही त्याचा भाव लक्षात घेऊन त्या त्या परीक्षा पेपरांचे वेळेला अनुष्ठानाला बसू लागलो. माझ्याकडूनही प.पू. श्रीमहाराजांना काही करवून घ्यायचे असणार. चि. दिनेशला अपेक्षेपेक्षा जास्त गुण मिळू लागले. पेपर बरा गेला म्हणावे तर पडावेत ७५ टक्के! जेमतेम गेला त्याने म्हणावे तर मार्कस् पडावेत ६० टक्के आणि बाबा या परीक्षेत उत्तीर्ण होण्याची आशा नाही म्हणावे तर पडावेत ५० टक्के असे चालू राहिले. आता तर परीक्षेपूर्वी काही मागे राहिलेल्या क्लासमधील विद्यार्थ्यांचा किंवा त्याच्या बरोबरीच्या मुलांचा तो अभ्यास घेऊ लागला. स्वत: करायचा, त्यांना शिकवायचा, समजावायचा. हे सर्व ऑफिसातून आल्यावर रोज किंवा अधून-मधून तास दोन तास चालायचे. काही वेळा तर हा पुढील पेपरांच्या परीक्षा आधीच एकदम द्यायचा. असे प्रगतीपथ आक्रमित चिरंजीव प्रथम श्रेणीत जुलै २००९ मध्ये एम.बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. आता नवागत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात, कधी अभ्यास शिकवतात, त्यांच्या डिफिकल्टीज् सोडवितात.

मध्यंतरी कोठल्या तरी एका शैक्षणिक इंजिनिअरींग इन्स्टिट्युट मधील एका कोर्सचे उद्घाटन व्हायचे होते. ऐनवेळी उद्घाटक येऊ शकत नसल्याचे कळले. त्या चालकांनी ओळखीच्या पेट्रोफॅक कंपनीच्या एच.आर.ना विचारले, कोणी अशी केपेबल व्यक्ती आहे कां, की जी उद्घाटन करून दोन तास त्या विषयावर लेक्चरही देईल. एच.आर. साहेबांनी खात्रीपूर्वक (आपले कंपनीत काम करून दुसऱ्या कंपनीत रुजू झालेल्या) दिनेशचे नांव, मोबाईल नंबरसह कळविले. साहेब जाऊन उद्घाटन करून चार तास लेक्चर देऊन आलेच, शिवाय तेथे असे घडले की, त्या सर्व विद्यार्थ्यांनी ह्या दिनेश सरांना घेरले, वेढा घालून म्हटले, सर तुम्ही स्वत: रोज लेक्चर देण्यास येणार असाल तर आम्ही आजच येथे प्रवेश घेऊन टाकतो.

प्रगती दर्शक आणखी महत्त्वाचे म्हणजे एका कंपनीने खास एका प्रोजेक्टरवर चर्चा करण्याकरिता दिनेशला चार पाच दिवसांकरिता बँकॉकला पाठविले, तर सध्या तो ज्या कंपनीत आहे त्या कॅनॉडॉईल कंपनीने महत्त्वाच्या एका प्रोजेक्टच्या चर्चासत्रास दोनदा इराणला पाठविले.

हे सर्व लिखाण लेकाच्या कौतुकाकरिता मी लिहीत नाही. आपण भरपूर शहाणे असू पण नैराश्यांत गेलो, आत्मविश्वास घालवून बसलो, तर आपण कोण असतो? कोणी नाही. निरामय निर्वेध आयुष्यमान देणे ही सर्व ईश्वरी कृपा आहे.

दिनेश-देविका आणि स्वत: नागलेकाका पूर्ण जाणून आहेत की सर्व सूत्रे ''श्रीं''च्या हाती आहेत. त्यांच्या कृपेमुळेच हे सर्व घडत आहे. ''श्रीं''चे अस्तित्व सतत आहे.

सकल जगाचा करितो सांभाळ। तुज मोकलील ऐसे नाही।।

सर्व साधक भक्तांनी सद्गुरुंच्या अस्तित्वाचा भावपूर्ण अनुभव घ्यावा ही कळकळीची प्रार्थना!

इति



२४५) चि. (हर्षल) दिनेश यांस आलेली प.पू. श्री दत्तमहाराजांची मार्गदर्शनपर व इतर काही पत्रे

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १६.८.१९८७

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले, आपणास वारणा नगरच्या विद्यालयात प्रवेश मिळाल्याचे आपल्या श्री. पिताजींच्या कडूनही समजले. चांगल्या विद्यालयात प्रवेश मिळून ईश्वर कृपेने जोडीदारही चांगला मिळाला. आता ईश्वर प्रार्थनापूर्वक अभ्यासाकडे पूर्ण लक्ष देऊन त्यात उन्नती साधणे व वडील मंडळींचे समाधान साधणे एवढेच आपले कर्तव्य आहे. एकदम घरांतून बाहेर पडल्याने गोंधळ होणे साहजिकच आहे, तथापि विचाराने, धैर्याने, गुरुजनांच्या मार्गदर्शनाने, श्रेष्ठ पुरुषांच्या ग्रंथवाचनाने लक्षपूर्वक अभ्यास करावा. ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' या महामंत्राचा जप रोज सवडीनुसार चालू ठेवावा. ध्यानाचाही अभ्यास काही समय निर्विचार स्थिती, शांती, उत्साह या करिता थोडा चालू ठेवावा. वाडवडीलांच्या पुण्याईने, ईश्वर श्रद्धेने आणि अभ्यासशील राहिल्याने आपली उन्नती ईशकृपेने निश्चित होईल. काळजी नसावी. आपल्या जोडीदारासही सप्रेम सादर निवेदन. कळावे.

आपला हितैषी
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

।। श्रीदत्त ।।

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १९.७.१९८८

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले, परीक्षेत यश मिळाल्याचे वाचून समाधान झाले. साधनाभ्यास, अभ्यास सांभाळून सवडीप्रमाणे चालू ठेवावा, कल्याणाचा मार्ग आहे. कॉलेजचा अभ्यासही दक्षतेने, नियमाने, उत्साहाने नित्य चालू ठेवावा. तुमचा अभ्यास लवकर व्यवस्थित आटोपून तुम्ही पदवीधर झाला म्हणजे तुमच्या श्री. पिताजीनाही आनंद होऊन त्यांना तुमचे सहाय्यही लाभेल. सर्व चिंता दूर होईल. ईश्वर प्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईश्वर कृपेने सर्व ठीक होईल. चिंता नसावी. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

।। श्रीदत्त ।।

देऊळगांवराजा (विदर्भ)
दि. १५.१०.१९८९

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले, आम्ही तूर्त इकडे प्रवासात आहोत. यामुळे उत्तरास वेळ झाला. २४ ऑक्टोबरला नरसोबा वाडीस येऊ. तेथे ५-६ दिवस मुक्काम होईल.

आपल्या अर्जाचा विचार होऊन, दोनही विषयात पास म्हणून निर्णय लागला यामुळे आपली निराशा नाहीशी झाली. ईश्वराची कृपा आहे. ईश्वर प्रार्थना व दक्षतेने अभ्यास चालू ठेवावा. म्हणजे लवकर शिक्षण पूर्ण होऊन आपल्या पिताजींना आपले सहाय्य मिळेल. ईशकृपेने कल्याण होईल. काळजीचे कारण नाही. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

चि. दिनेशने प.पू. श्रीमहाराजांना सहस्रचंद्र दर्शन शांती निमित्ताने पाठविलेले काव्यात्मक पत्र

।। श्री गुरुदेव दत्त ।।

दि. ५.५.१९९०

हर्षल (दिनेश) नागले

१३, भास्कर हॉस्टेल, वारणानगर ४१६ ११३.

प.पू. गुरुमाऊलीचे चरणी बालके दिनेशचा दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती विशेष.

''श्रीं''च्या सहस्रचंद्र दर्शन शांतीच्या निमित्ताने श्री कृपेनेच घडलेले काव्य श्रीचरणी अर्पण करीत आहे.

।। गुरुमाऊली ।।

शक्तिपात करोनी जन्मास घातले, उपकृत केले गुरुमाऊलीने।।१।।
पाऊल चुकता मज सांभाळीले, चालू शिकविले गुरुमाऊलीने।।२।।
अनाहत नादे मज जोजविले, मांडीवर घेतले गुरुमाऊलीने।।३।।
प्रणवोच्चारे बोलूं शिकविले, मुकेपण हरले गुरुमाऊलीने।।४।।
भोग देऊनीया लडीवाळी केले, त्यागणे मग शिकवीले गुरुमाऊलीने।।५।।
मार्ग आक्रमिता पडू न दिले, बोट पकडीले गुरुमाऊलीने।।६।।
विविध क्रियांनी बेभान केले, मज खेळविले गुरुमाऊलीने।।७।।
संसार सागरा तरुन नेले, बुडू न दिले गुरुमाऊलीने।।८।।
शिस्त लावूनी स्वपदी रमविले, भटकू न दिले गुरुमाऊलीने।।९।।
मंत्र देऊनी जाणते केले, ज्ञान हो दिधले गुरुमाऊलीने।।१०।।
आत्मानंदी तल्लीन केले, अंतिम सुख दिधले गुरुमाऊलीने।।११।।
बाळा म्हणे मजला सर्व काही दिले, काही न राखीले गुरुमाऊलीने।।१२।।

आपले लेकरु

दिनेश

---*---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास,
पुणे ४.
दि. ६.५.१९९०

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले. साधनाभ्यास प्रार्थनापूर्वक सवडीने चालू ठेवावा. कल्याणाचा मार्ग आहे. त्यावेळी जे जे होईल ते सर्व ईशशक्तीचेच कर्तृत्व आहे. आपले जीवांचे काहीच कर्तृत्व नाही, अशी तटस्थ समर्पण भावना ठेवावी. आवश्यक तो व्यवहार सांभाळूनच सर्व करावे लागले, नाईलाज आहे. आता उन्हाळ्याचे सुट्टीत घरी जाणार असालच. तेथेही वडील मंडळींना समाधान होईल. सर्वांच्या अविरोधाने जे करणे ते करावे. ईश्वर प्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईशकृपेने सर्व ठीक होईल.

आपला
दत्तात्रेय कवीश्वर

चि. दिनेशने ''श्रीं''ना पाठविलेले पत्र, काव्य आणि काही प्रश्न

।। श्री गुरुदेव दत्त ।।

दिनेश नागले
वारणानगर.
दि. २६.५.१९९०

श्री गुरुमाऊलीचे चरणी बालके दिनेशचा दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष,

आज पहाटेस साधनेला बसलेलो असताना मला खालील काव्याची स्फुर्ती अर्थातच आपल्या कृपेने झाली, ही गोष्ट वडीलांच्याच पैशांनी त्यांनाच भेटवस्तू आणून देण्यासारखी आहे.

आपला कृपाभिलाषी,
दिनेश

---**---

गुरुनाथा

संसार वाळवंटी एकले हे बाळ, तूच आता सांभाळ हे नाथा।।१।।
त्रिविध तापे पोळती रे पाय, तूच कर उपाय हे नाथा।।२।।
बाळ हे शेंबडे जातीने महार, परी तू थोर हे नाथा।।३।।
नको रे विलंब घेई उचलून, तू दयाघन हे नाथा।।४।।
गर्दभ वाळवंटी होई कासाविस, तुझीच रे आस हे नाथा।।५।।
होऊनी दयाळू तू आता धाव, मज तू रे पाव हे नाथा।।६।।
जरी मी पशू देई गंगाजळ, तू दीन दयाळ हे नाथा।।७।।
महाराजांचे घर माझे हे हृदय, त्याचे न तुज भय हे नाथा।।८।।
पायधूळ झाडूनी होई विराजमान, धन्य करी जीवन हे नाथा।।९।।
थोर भक्तांचा रे भाव अमृतापरी, भाव माझा भाकरी हे नाथा।।१०।।
भाकरीच माझी मानी गोड देवा, शिरी हात ठेवा हे नाथा।।११।।
अनाथ बालकासी तूच एकनाथ, करी रे सनाथ हे नाथा।।१२।।

---**---

श्री दत्ता

विविध तापे तापलो मी आता, सोडवी ताता श्री दत्ता।।१।।
मन हे माझे चंचल जरी रे, घे जवळी रे श्री दत्ता।।२।।
न जमे कर्म योग ज्ञानयोग जमेना, भक्ति नीट होईना श्री दत्ता।।३।।
तूच आता तारी रे तूच सांभाळी रे, घेई करूनी भक्ती रे श्री दत्ता।।४।।
योगमार्गी पुत्र चालता, हात देई मम ताता
तूच एक मज त्राता, श्री दत्ता।।५।।

ता.क. :

१) सतत ईशप्रार्थना कशी करावी?

२) दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ही प्रार्थना होऊ शकते कां?

३) व्यायाम कोणता व किती करू? की बंद करू?

---**---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास, पुणे ४
दि. १०.८.१९९०

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले, मनामध्ये सात्विक विचाराप्रमाणे राजस, तामसही विचार येणारच. पण तेही निघून जातात. ते समूळ जाण्याकरिता ईश्वरभक्ती हेच मुख्य साधन असल्याचे संतमहात्मे अनुभवाने सांगतात. हा विचार धरून, काल्पनिक किंवा नैसर्गिक दोषांचे परिमार्जन होण्यासाठी 'दिगंबरा दिगंबरा' या महामंत्राचा जप सवडीने १-२ माळा रोज चालू ठेवावा, परमात्मा दयासागर, सर्वज्ञ सर्व शक्तीसंपन्न आहे, हा पूर्ण विश्वास ठेवून प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे. ईशकृपेने सर्व ठीक होईल. काळजीचे कारण नाही. श्री. नागले १-२ दिवसात येथे येतील. त्यांची प्रकृती चांगली आहे. निराशा सोडून अभ्यासाकडे पूर्ण लक्ष द्यावे. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास, पुणे ४
दि. २.४.१९९१

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले. प्रवासाचा त्रास मुद्दाम कशाला? पत्रव्यवहाराने परस्पर विचार विनिमय करता येईल असा अभिप्राय होता. आता आम्ही वाडीस उत्सवाकरिता जाणार आहोत. तेथे १४ एप्रिलला श्री नारायण स्वामींची पुण्यतिथी आहे. त्यावेळी आपले पू. मातापिता, श्री. शृंगारपुरे इत्यादी मंडळी वाडीस येणार आहेत. दुसऱ्या दिवशी १५ एप्रिलला ती सर्व मंडळी महापूजा नैवेद्य करणार आहेत. तर एक दिवस वाडीस येऊन जावे, सर्वांची भेट देवदर्शन घडेल. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---*---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास, पुणे ४
दि. ८.२.१९९२

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र मिळाले. आपण लिहीलेली 'सर्व इंद्रिये आणि मन हे....!' ही प्रार्थना थोरल्या महाराजांनी सर्वांना मार्गदर्शक केली आहे. ती आपण चालू ठेवावी. परमात्म्याचे एक नांव 'हृषीकेश' असे आहे. हृषीक म्हणजे इंद्रिये यांचा ईश म्हणजे नियमन करणारा ईश्वर आहे. हा अर्थ वरील प्रार्थनेत दाखविला आहे. ती ईश्वरशक्ती लक्षात आणून रोज प्रार्थना करीत असावे, कल्याण होईल. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास, पुणे ४
दि. १.१२.१९९२

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र व मनिऑर्डर (रु. ५१/-) मिळाली. आपणा सर्व मुंबईकरांची आत्मीयता फार मोठी ईश्वरकृपेने आम्हाला लाभली आहे. यामुळे येथे शहरात आम्हांला सहपरिवार राहण्याचे स्थान निर्माण होऊ शकले व तेथे पूजा अर्चादि नित्य अनुष्ठानही निवांतपणे चालू ठेवता आले. हे सर्व श्रेय आपणा सर्व मुंबईकरांचेच आहे, याचे नित्य स्मरण आम्हाला आहे.

आज आपल्या बंधूंचे मंगल विवाह कार्य ईश्वरकृपेने निर्विघ्न व्यवस्थित पार पडले असेल. प्रकृतीमुळे इच्छा असूनही आम्ही येऊ शकलो नाही. आता आपलेही मंगलकार्य करण्यास हरकत नाही असे आपल्या श्री. पिताजींना सांगितले. उत्तम नोकरी आहे. येणाऱ्या मुलीचे उत्तम भाग्य आहे. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद. कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

नरसोबा वाडीचे पत्त्यावर

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास,
पुणे ४.
दि. १२.६.१९९३

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम,

आपले पत्र व मनिऑर्डर मिळाली. तेथील चेक जमा झाल्याचे व बांधकाम व्यवस्थित चालू असल्याचे समजून समाधान झाले. पावसाळा नजीक आला आहे. कामाला गती आल्यास पावसाचा त्रास होणार नाही. आपणास ईशकृपेने त्या क्षेत्रात राहण्याचा व ईशसेवा करण्याचा योग आला हे आपले पूर्वसुकृत आहे यात संशय नाही. कामही ईश्वराचेच जीर्णोद्धाराचे पाहण्याचा सुयोग मिळाला. त्याचे ज्ञानही आपण अभ्यास करून मिळविले आहे. त्याचा सदुपयोग झाला. श्री. पिताजींनाही सहाय्य करण्याचे श्रेय लाभले. ही सर्व ईश्वरकृपा आहे. मानव जीवनात काया, वाचा, मनाने होईल तितकी ईशसेवा करीत राहून जीवन सफळ करावयाचे आहे. ईशप्रार्थनेने सर्व घडेल. वे. दामोदर पंतांना सादर नमस्कार.

कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास,
पुणे ४.
दि. १.१२.१९९३

सप्रेम आशीर्वाद स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम,

आपले सविस्तर पत्र मिळाले. कुशल वृत्त समजून संतोष झाला. आपले शिक्षण पूर्ण होऊन नोकरीही मिळाली आहे. वडीलांस एक प्रकारे हे सहाय्यच होत आहे. मध्ये मध्ये अमरापुरी जाऊन आपण ते कामही पाहू शकता. यामुळे आपल्या वडीलांनाही समाधान वाटत असेल. नोकरीत रजा मिळाली तरच अन्यत्र जाता येईल. तूर्त मिळालेली नोकरी श्रेष्ठ व्यवस्थापकांना, मालकांना संतोष देऊन टिकविणे योग्य आहे. त्यांचेही तुमच्याकडे लक्ष आहेच. नाही तरी एकेक दिवस रजा घेण्यापेक्षा एकदम आठ दिवसांची रजा घेणे बरे असे त्यांनी सांगितले नसते. दक्षतेने काम करून मालकांचा संतोष मिळवावा म्हणजे कामानिमित्त परदेशांतही जाणे होईल. पुढे सौदी अरेबियाला श्री. नागले यांचे मित्र आत्मीयतेने बोलावत

आहेतच. घरी सर्वांचे विचार तिकडे जाणे झाले तर ईशप्रेरणेनुसार तेही हिताचेच आहे. काय होते पाहणे. मित्राचे देहावसान अपघाताने झाल्याने वाईट वाटणे स्वाभाविक आहे. तथापि त्याला इलाज नसल्याने विवेकाने दु:ख आवरण्याचा प्रयत्न करून प्राप्त कर्तव्याकडे लक्ष देणे बरे. काळानेच दु:ख कमी होणार आहे. मारुतीरायांची प्रार्थना करावी. 'मनोजय मारुत तुल्य वेगं..३'या मंत्राचा जप सवडीने रोज २८ वेळा चालू ठेवावा. आपला विवाहही लवकरच करण्याचा आपल्या वडील मंडळींचा विचार दिसतो. ते उत्तमच आहे. शिक्षण संपून नोकरीही आहे. मुलगी योग्य सुविद्य पाहून ठरवितील म्हणजे परदेशांत जाण्याचा योग आल्यास दोघांनाही तेथे राहता येईल. ईशप्रार्थना, नामस्मरण श्रद्धेने चालू ठेवावे. ईशकृपेने पूर्ण कल्याण होईल, काळजी नसावी. आपणाकडील मनिऑर्डर मिळाली. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद, कळावे.

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

॥ श्रीदत्त ॥

श्री वासुदेव निवास,
पुणे ४.
दि. ८.२.१९९५

सप्रेम आशीर्वाद स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम,

आपणाकडील मनिऑर्डर-दक्षिणा मिळाली, कुशल वृत्तही समजले. आपले पिताजी श्री. नागले यांचे पत्रही सविस्तर आहे. वाडीस जाताना भेटही झाली. 'काही काळ काम नसल्यामुळे घरखर्चाची अडचण होती. लग्नाकरिता श्री. लाटे यांच्याकडून काही कर्जाऊ रक्कम घ्यावी लागली, परंतु दोन्ही मुलांचे प्रेमाने, आदराने सहाय्य होत राहिल्याने काही अडचण चिंता वाटली नाही' असे समाधानाचे लेखन त्यांचे पत्रात आलेले वाचून संतोष झाला. पुत्रकर्तव्य लक्षात ठेवून वडील मंडळींची सेवा करणाऱ्यांचे पूर्ण कल्याण ईशकृपेने होते. काळजीचे कारण नाही. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद, कळावे.

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

।। श्रीदत्त ।।

श्री वासुदेव निवास, पुणे ४
दि. २४.६.१९९६

सप्रेम आशीर्वाद स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम,

आपणाकडील मनिऑर्डर-दक्षिणा (रु. ५१+५१) मिळाली. कुशल वृत्तही समजले. तेथे घरी सहाय्य करावे लागते. करिता इकडे पैसे पाठविण्याची आवश्यकता वाटत नाही. विचार करावा. सर्वांना मंगल आशीर्वाद, कळावे,

आपला,
दत्तात्रेय कवीश्वर

---**---

।। श्री स्वामी समर्थ ।।
दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

श्री चरणी प्रार्थना

नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे! असे तुमच्या आमच्या सर्वांचेच बाबतीत न घडो! संत सत्पुरुषांचे सहवासात, त्यांचे बोल, त्यांची वचने आमच्या हृदयाच्या आतील गाभ्यापर्यंत जाऊन पोहोचले जावोत, अंतर्मनात बुद्धीत खोलवर त्यांचे संस्कार होवोत. संत सहवासात त्यांची सर्व दैवी गुणसंपदा आमच्या ठायी संक्रमीत होवो आणि या सर्वांची परिणती आमच्या नित्य वागण्यात-वर्तनात तसेच वाणीत प्रतीत होवो. दुर्लभातील दुर्लभ संत संग लाभून आपले अपेक्षित कल्याण होवो अशी श्री सद्गुरु चरणी प्रार्थना!

समाप्त